महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

SCHOOL LEADERSHIP ACADEMY (SLA-MIEPA) MAHARASHTRA

शिक्षण अनुभूती



www.miepa.in

2025-26

प्रेरणा

मा.रनजितसिंह देओल, भा.प्र.से

प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य

मा.सचिंद्रप्रताप सिंह, भा.प्र.से

आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

मा.संजय यादव

राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

डॉ.हेमंत वसेकर, भा.प्र.से

संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

संपादक

प्रकाश मुकुंद

संचालक

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

सहसंपादक

डॉ.ज्योती कुलकर्णी

प्रशासकीय अधिकारी तथा नोडल अधिकारी,

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर

(SLA-MIEPA) महाराष्ट्र

संपादकीय



शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे मूलभूत साधन आहे आणि त्या शिक्षण व्यवस्थेचा कणा म्हणजे शाळा. परंतु शाळा ही केवळ भौतिक रचना नसून ती एक जिवंत संस्था आहे. जी विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देते, त्यांच्या क्षमतांना दिशा देते आणि समाजाचे भविष्य घडवते. या संपूर्ण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असतो तो शाळेचा नेता- मुख्याध्यापक.

NEP 2020 मधील शालेय नेतृत्वासाठी प्रमुख शिफारसी देण्यात आल्या होत्या.

1. विद्यार्थी-केंद्रित नेतृत्व (Student-Centric Leadership)

NEP 2020 मध्ये शिक्षणाचा केंद्रबिंदू "विद्यार्थी" आहे.

भूमिका :

मुख्याध्यापकांनी शाळेतील सर्व निर्णय विद्यार्थी हित लक्षात घेऊन घ्यावेत.

2. समावेशक आणि समान शिक्षण (Equity & Inclusion)

सर्व घटकांसाठी समान संधी, वंचित घटकांवर विशेष लक्ष

भूमिका :

शालेय प्रमुखांनी "कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये" यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

3. शिक्षक सक्षमीकरण (Teacher Empowerment)

शिक्षक प्रशिक्षण आणि सतत व्यावसायिक विकास, नवकल्पनांना प्रोत्साहन

भूमिका :

मुख्याध्यापक हे "Teacher Leader" म्हणून काम करतात आणि शिक्षकांना मार्गदर्शन करतात.

4. शाळा संकुल (School Complex/Cluster) संकल्पना

NEP 2020 मध्ये शाळा एकत्रित करून "School Complex" तयार करण्यावर भर दिला आहे.

भूमिका :

संसाधनांचा सामायिक वापर, शिक्षक व व्यवस्थापन सहकार्य

परिणाम :

लहान शाळांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षण देता येते.

5. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व (Accountability & Transparency)

स्पष्ट उद्दिष्टे आणि परिणाम, नियमित आढावा व मूल्यांकन

भूमिका :

मुख्याध्यापकांनी शाळेतील कामकाज पारदर्शक ठेवून जबाबदारी निश्चित करावी.

6. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर (Use of Technology)

डिजिटल शिक्षण, ऑनलाइन साधने

भूमिका :

नेतृत्वाने तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी बनवणे आवश्यक आहे.

7. अनुभवाधारित आणि कौशल्याधारित शिक्षण (Experiential Learning)

कृतीआधारित शिक्षण

भूमिका :

मुख्याध्यापकांनी अध्यापन पद्धतीत बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

8. नेतृत्व विकास आणि क्षमता बांधणी (Capacity Building)

शालेय प्रमुखांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, नेतृत्व कौशल्य विकास

भूमिका :

सतत प्रशिक्षणामुळे प्रभावी नेतृत्व विकसित होते.

9. समाजाशी जोडलेले नेतृत्व (Community Engagement) पालक, समाज, माजी विद्यार्थी सहभाग

भूमिका :

मुख्याध्यापकांनी शाळा आणि समाज यांच्यात दुवा निर्माण करावा.

10.मूल्यमापन आणि गुणवत्ता सुधारणा (Assessment & Quality Focus) कौशल्याधारित मूल्यमापन, PARAKH सारख्या संस्थांद्वारे मूल्यांकन

भूमिका :

नेतृत्वाने गुणवत्ता सुधारण्यावर सतत लक्ष ठेवावे.

“शिक्षणातील खरे परिवर्तन हे धोरणांमुळे नव्हे, तर सक्षम नेतृत्वामुळे घडते.”

म्हणूनच, मुख्याध्यापक हा केवळ प्रशासक नसून शाळेच्या परिवर्तनाचा प्रमुख चालक आहे.

आजच्या बदलत्या काळात शालेय नेतृत्व ही केवळ प्रशासकीय जबाबदारी राहिलेली नाही, तर ती एक सर्जनशील, प्रेरणादायी आणि परिवर्तन घडवणारी प्रक्रिया बनली आहे. मुख्याध्यापक हा केवळ व्यवस्थापक नसून तो मार्गदर्शक, प्रेरक, समन्वयक आणि समाजाशी जोडणारा दुवा आहे. त्याच्या नेतृत्वातूनच शाळेची दिशा आणि विद्यार्थ्यांचे भविष्य निश्चित होत असते. NCSL-NIEPA नवी दिल्ली यांच्या सूचनानुसार महाराष्ट्रात मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या प्रयत्नातून शाळांमध्ये झालेले बदल - यशोगाथांच्या स्वरुपात पुस्तिकेत संकलित करणे अपेक्षित होते त्यानुसार .....आपल्यासमोर ठेवण्यास अत्यंत आनंद होत आहे.

महाराष्ट्र राज्यात विविध भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या शाळांमध्ये अनेक मुख्याध्यापकांनी अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत काम करत, आपल्या नेतृत्व कौशल्याच्या बळावर उल्लेखनीय बदल घडवून आणले आहेत. अशा 150 शाळांमधून प्राप्त झालेल्या शालेय नेतृत्वाच्या यशोगाथा या केवळ अनुभवकथन नसून त्या प्रेरणादायी प्रवासाच्या साक्षी आहेत.

या यशोगाथांमधून आपल्याला अनेक महत्त्वाचे पैलू दिसून येतात.

- संसाधनांच्या मर्यादेतूनही उत्कृष्ट परिणाम साधण्याची जिद्द
- शिक्षक, पालक आणि समाज यांच्यातील प्रभावी समन्वय
- विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, आत्मविश्वास आणि मूल्यांची जपणूक
- तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून शिक्षणात नवकल्पना आणणे
- शाळेला समुदायाचा केंद्रबिंदू बनवण्याचा प्रयत्न

या सर्व यशोगाथा हे दर्शवतात की, योग्य दृष्टीकोन, सकारात्मक विचारसरणी आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या साहाय्याने कोणतीही शाळा उत्कृष्टतेच्या शिखरावर पोहोचू शकते.

या शाळा यशोगाथांच्या माध्यमातून आम्ही अशा मुख्याध्यापकांच्या कार्याचा गौरव करत आहोत, ज्यांनी आपल्या नेतृत्वातून परिवर्तनाची नवी दिशा दाखवली आहे. त्यांच्या

कार्यामध्ये केवळ शैक्षणिक यश नाही, तर सामाजिक बांधिलकी, मूल्याधारित शिक्षण आणि सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोनही दिसून येतो.

- या शाळा यशोगाथा केवळ एक संकलन नसून, ते एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे.
- नव्या मुख्याध्यापकांसाठी प्रेरणेचा स्रोत
- कार्यरत शालेय नेत्यांसाठी दिशादर्शक
- शिक्षण व्यवस्थापनातील अभ्यासकांसाठी संदर्भग्रंथ

या यशोगाथा वाचताना आपण लक्षात घेतो की, प्रत्येक शाळेची कहाणी वेगळी असली तरी त्यामागील ध्येय एकच आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास. या कथा आपल्याला शिकवतात की, नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देणे नव्हे, तर स्वतः उदाहरण घालून देणे, संघटितपणे कार्य करणे आणि प्रत्येक घटकाला सोबत घेऊन पुढे जाणे.

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) ने शालेय नेतृत्वाच्या बळकटीकरणासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा आणि क्षमता विकास उपक्रम राबवले आहेत. या उपक्रमांचा सकारात्मक परिणाम या यशोगाथांमधून स्पष्टपणे दिसून येतो. प्रशिक्षित आणि सजग नेतृत्व हेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे खरे आधारस्तंभ आहे, याची पुनःप्रत्ययकारी जाणीव या संकलनातून होते.

प्रत्येक यशोगाथा ही एका संघर्षाची, एका स्वप्नाची आणि एका यशस्वी प्रवासाची कहाणी आहे. या कथा आपल्याला केवळ प्रेरणा देत नाहीत, तर आपल्याला विचार करायला भाग पाडतात. आपण आपल्या शाळेत काय बदल करू शकतो.? आपण आपल्या नेतृत्वातून कोणती नवी दिशा देऊ शकतो.?

शेवटी, या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व मुख्याध्यापकांचे, शिक्षकांचे, तसेच या संकलनासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व संबंधितांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार. त्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेला एक नवी ऊर्जा आणि नवा आत्मविश्वास प्राप्त झाला आहे.

हया यशोगाथा भविष्यातील अनेक परिवर्तनांची बीजे ठरतील, अशी खात्री व्यक्त करतो.

(प्रकाश मुकुंद)
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (SLA-MIEPA),
छत्रपती संभाजीनगर

शाळा यशोगाथा

अनुक्रमणिका

अनुक्रमांक	जिल्हा	शाळेचे नाव	क्षेत्र	पृष्ठ क्रमांक
१.	अहिल्यानगर	सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर	विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका	1-6
२.	अहिल्यानगर	ज्युनिअर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूल, कोर्ट गल्ली, जि.अहमदनगर	रात्र शाळेतील शिक्षणात कौशल्य विकास करण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका	7-21
३.	अहिल्यानगर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी, केंद्र दौंडी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर	कृतीकेंद्रित शिक्षणाअंतर्गत विद्यार्थी विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका	22-30
४.	अमरावती	प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर, जि.अमरावती	कौशल्य आधारित आणि व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी शालेय नेतृत्वाची अग्रगण्य भूमिका	31-36
५.	अमरावती	सीताबाई संगई कन्या शाळा, अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती	पायाभूत शिक्षण सक्षमीकरणासाठी मुख्याध्यापकांचा परिवर्तनकारी प्रयत्न	37-44
६.	अमरावती	जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा गोळेगाव, केंद्र.रामतीर्थ, ता.दर्यापूर, जि.अमरावती	शालेय भौतिक सुविधा व गुणवत्ता संवर्धनात मुख्याध्यापकांची भूमिका	45-59
७.	अमरावती	जनता गर्ल्स हायस्कूल, शेंदुरजना घाट, ता.वरुड, जि.अमरावती	शालेय शिक्षणात व्यवसाय शिक्षणाची जोड देण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	60-77
८.	बीड	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढेकणमोहा, मु.पो. ढेकणमोहा, ता.जि.बीड	उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीत शालेय नेतृत्वाची भूमिका	78-121
९.	बीड	पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा खोकरमोहा, ता.शिरूर (का.), जि.बीड	विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वाढविण्यासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न	122-169
१०.	बीड	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हरकी निमगाव, केंद्र सावरगाव,ता.माजलगाव, जि.बीड	पायाभूत साक्षरता व अंकगणितिय क्षमता संवर्धनात शैक्षणिक नेतृत्वाची भूमिका	170-178

११.	बीड	साने गुरुजी निवासी प्राथमिक आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केज,ता.केज, जि.बीड	उसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मुख्याध्यापकांचे प्रयत्न	179-208
१२.	बीड	पी.एम.श्री.जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जरेवाडी,ता.पाटोदा, जि.बीड	समता, विविधता आणि लोकसहभाग यातून शालेय परिवर्तनात शालेय नेतृवाची भूमिका	209-221
१३.	बुलडाणा	PMSHRI School Shri Swami Vivekanand English Dnyanpeeth N.P. Shegaon, Dist.Buldhana	Leading Good Governance in Schools	222-250
१४.	बुलडाणा	जिल्हा परिषद हायस्कूल, रोहणा, मु.पो रोहणा,ता. खामगाव,जि.बुलडाणा	कौशल्य आधारित आणि व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न.	251-255
१५.	छत्रपती संभाजीनगर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी, केंद्र.लासुरगाव ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर	पटसंख्या वाढीत शालेय नेतृत्वाची भूमिका	256-354
१६.	छत्रपती संभाजीनगर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंचलगाव, मु.अंचलगाव,पो.टूणकी, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर	नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये शालेय नेतृत्वाची भूमिका	355-374
१७.	धाराशिव	जिल्हा परिषद प्रशाला उमरगा, शिवाजी कॉलेज शेजारी, बालाजी नगर, उमरगा, ता.उमरगा, जि.धाराशिव	मियावाकी पद्धतीच्या वृक्षांची लागवड करण्यात यशस्वी शालेय नेतृत्व	375-400
१८.	गडचिरोली	पीमश्री जवाहरलाल नेहरू नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा रामनगर, जि.गडचिरोली	पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमता वाढविण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका	401-403
१९.	गडचिरोली	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवणीपाठ मु.शिवणीपाठ पो.बोरी, ता.अहेरी, जि.गडचिरोली	दुर्गम,आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका	404-407

२०.	गडचिरोली	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, व्यंकटराव पेठा, ता.अहेरी, जि.गडचिरोली	दुर्गम,नक्षल प्रभावित आदीवासी भागातील गोंडी,तेलुगु भाषिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका	408-413
२१.	गोंदिया	जि.प.उच्च प्राथमिक शाळा, खर्रा, केंद्र भानपूर, ता. गोंदिया, जि.गोंदिया	लोक सहभागातून शालेय परिवर्तन करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	414-427
२२.	गोंदिया	जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, मोरगाव, ता.अर्जुनी मोर, जि.गोंदिया	शालेय परिवर्तनाकडे जाणाऱ्या प्रेरणादायी प्रवासात शालेय नेतृत्वाची भूमिका	428-435
२३.	हिंगोली	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी,ता.वसमत, जि.हिंगोली	उपक्रमशील शालेय नेतृत्वातून विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेचा विकास	436-444
२४.	हिंगोली	जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, भोसी, ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली	विद्यार्थी हिताचे नाविन्यपूर्ण उपक्रम घेणारे शालेय नेतृत्व	445-463
२५.	जळगाव	पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित, पंकज विद्यालय (प्राथमिक) चोपडा,ता.चोपडा, जि.जळगाव	विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढीसाठी शालेय नेतृत्वाची भूमिका	464-490
२६.	जळगाव	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरखेडे खुर्द, ता. पारोळा,जि.जळगाव	"उपक्रम आमचे खास: करी मूलभूत क्षमतांचा विकास" मुलभूत क्षमतांच्या विकासात विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये शालेय नेतृत्व	491-515
२७.	जळगाव	पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, साकरी, केंद्र दीपनगर, ता.भुसावळ, जि.जळगाव	अध्ययन साध्यतेच्या प्रेरणादायी प्रवासात शालेय नेतृत्वाची भूमिका	516-519
२८.	जालना	मत्स्योदरी विद्यालय, घुंगर्डे हदगाव, ता.अंबड, जि.जालना	कृतियुक्त अध्ययन प्रक्रियेतून शालेय विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका	520-525
२९.	जालना	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रायगव्हाण, ता.परतूर, जि.जालना	लिंग समभाव सुनिश्चित करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	526-530

३०.	कोल्हापूर	केंद्रीय प्राथमिक शाळा वेतवडे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर	'कविता लेखनातून स्व अभिव्यक्ती विकास'	531-542
३१.	कोल्हापूर	स्वातंत्र्यसैनिक मारुती गणपती पाटील आदर्श विद्यानिकेतन अँड ज्युनिअर कॉलेज मिणचे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर	मुलभूत क्षमता वृद्धिंगत करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	543-550
३२.	कोल्हापूर	विद्या मंदिर लोळाणे, केंद्र परळे निनाई, ता.शाहुवाडी, जि.कोल्हपुर	भौतिक सुविधा व शालेय उपक्रमातून विद्यार्थी विकास	551-572
३३.	कोल्हापूर	विद्या मंदिर, लाटवाडी, ता.शिरोळ, जि.कोल्हपुर	लिंग समभाव व समावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न	573-581
३४.	मुंबई	Cummoo Jaffer Suleman Girl's High School and Junior College of Arts and Commerce, Kambekar street, Mumbai	Cultivating Academic and Professional Excellence under Visionary Leadership	582-607
३५.	मुंबई	Indian Education Society's V. N. Sule Guruji English Medium Secondary school, Hindu colony, Dadar East, Mumbai	Leading School based Education for Academic Journey of Students	608-636
३६.	मुंबई	Anjuman-I-Islam's Saif Tyabji Girls' High School & Junior College, 260, J.B.B. Marg, Bellasis Road, Byculla, Mumbai	A Beacon of Social Transformation and Skill-Based Education	637-656
३७.	मुंबई	श्री.केशव रामभाऊ कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, डोंबिवली (पूर्व), मुंबई	विद्यार्थ्यांना विज्ञानातील मुलभूत संशोधनाकडे वळविण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका"	657-686

३८.	मुंबई	शिक्षण संस्थेचे अभिनव विद्या मंदिर (मराठी माध्यमिक), १२५, अभिनव नगर, बोरिवली पूर्व, मुंबई	भौतिक सुविधा व अभ्यासपूरक उपक्रमात शालेय नेतृत्वाची भूमिका	687-706
३९.	मुंबई	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा मिरा भाईंदर मनपा, काशी मराठी चार, भाजी मार्केट जवळ पो.मिरे ता.जि.ठाणे	"उपक्रमांचा झोका घेत दिशा धरू उत्कर्षाची, मिळता क्षमतांची साथ गाठू वाट प्रगतीची." या उक्तीनुसार शालेय नेतृत्वाची भूमिका	707-718
४०.	मुंबई	विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, CTS - 218, बॅरिस्टर नाथ पै नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई	नाविन्यपूर्ण उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न	719-730
४१.	मुंबई	S.I.E.S. High School, Matunga Chowk, K.A. Subramanyam Road, Matunga, Mumbai	Leading Foundational Competancies in School	731-770
४२.	मुंबई	चेंबूर एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा, चेंबूर एज्युकेशन सोसायटी मार्ग, स्वामी विवेकानंद चौक, चेंबूर, मुंबई	शैक्षणिक,सांस्कृतिक व सामाजिक विकासासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न	771-782
४३.	मुंबई	विवेक विद्यालय, आनंदगड, पार्कसाईट, विक्रोळी (प), मुंबई	शैक्षणिक व्यवस्थापन गुणवत्ता विकासात मुख्याध्यापकाची भूमिका	783-814
४४.	नांदेड	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर, नागापूर, पो.पुणेगाव, केंद्र.वाजेगाव, ता.नांदेड, जि.नांदेड	पायाभूत शिक्षण – मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसनासाठी पालकांचे सहकार्य घेण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	815-821
४५.	नांदेड	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेळगाव, केंद्र नरंगल, ता.देगलूर, जि.नांदेड	वृक्ष लागवड व संवर्धन तसेच मुलभूत क्षमता विकास यात शालेय नेतृत्वाची भूमिका	822-827
४६.	नंदुरबार	नंदुरबार एजुकेशन सोसायटी संचलीत श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, परदेशीपुरा, नंदुरबार	मूल्याधारित,सामाजिक शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका	828-842

४७.	नंदुरबार	Netaji Subhashchandra Bose Avasiya Vidyalaya Toranmal, Tq.Dhadgaon, Nandurbar	The Life Skills Education through Drama-the Change between Out of School Children.	843-858
४८.	नंदुरबार	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघळापाडा, वाघळापाडा, ता.नवापुर, जि.नंदुरबार	आदिवासी बहुल भागातील विद्यार्थी विकासासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न	859-865
४९.	नंदुरबार	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोभाणी, ता.तळोदा, जि.नंदुरबार	विविध विषय आणि उपक्रमांच्या अध्ययनातून शालेय विकासाचे प्रयत्न	866-878
५०.	नंदुरबार	नूतन विद्याप्रसारक मंडळ संचलित वल्लभ विद्यामंदिर, पाडळदा, ता.शहादा, जि.नंदुरबार	उपक्रमातून शाळेचा परिसर आनंददायी करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	879-895
५१.	नंदुरबार	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दसवड, ता.तळोदा, जि.नंदुरबार	दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या क्षमता वृद्धीसाठी शालेय नेतृत्वाची भूमिका	896-910
५२.	नंदुरबार	जिल्हा परिषद शाळा वरूळ, केंद्र.शिंदे, ता.नंदुरबार, जि.नंदुरबार	लोकसहभागातून विद्यार्थी विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका	911-933
५३.	नाशिक	के.बी.एच.विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मालेगाव केम्प, ता.मालेगाव, जि.नाशिक	कौशल्य आधारित आणि व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न	934-951
५४.	नाशिक	क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यामंदिर, मनपा शाळा क्रमांक १८, आनंदवली, नाशिक	कामगार वस्तीतील मुलांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नेणाऱ्या शालेय नेतृत्वाची यशोगाथा	952-968
५५.	पुणे	पीएमश्री जिल्हा परिषद शाळा भिगवण, ता इंदापूर, जि.पुणे	पूर्वप्राथमिक व प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या पायाभूत शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका	969-976
५६.	पुणे	पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लवळे, ता.मुळशी, जि.पुणे	मूलभूत क्षमतांकडे वाटचाल आमच्या शाळेचा यशस्वी प्रयोग	977-991
५७.	पुणे	पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अवसरी खुर्द नं .1, ता.आंबेगाव, जि.पुणे.	शिक्षण, आरोग्य आणि संस्कारांचे धडे देणारी शाळा	992-1000

५८.	पुणे	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वळवंती, केंद्र गोवित्री, ता.मावळ, जि.पुणे	आदिवासी बहुल मुलांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	1001-1031
५९.	पुणे	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पासली, ता.कोल्हे, जि.पुणे.	आदिवासी बहुल भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध कृती कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न	1032-1051
६०.	रायगड	पीएमश्री आदर्श शाळा रा. जि.प. सेंट्रल स्कूल आमटेम, मु.पो.आमटेम, ता.पेण, जि.रायगड	शाळा - समाज सहभाग एकत्रित फलश्रुती दर्शविणाऱ्या शालेय नेतृत्वाची यशोगाथा	1052-1056
६१.	रायगड	रायगड जिल्हा परिषद शाळा वरवणे, वरवणे ता.पेण, जि.रायगड	भटक्या मुलांना शालेय प्रवाहात आणण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	1057-1073
६२.	रायगड	रा.जि.प.शाळा सांगुर्ली, केंद्र. शिरढोण, ता.पनवेल, सांगुर्ली, केंद्र.शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड	प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी विशेष शिक्षण देणाऱ्या शाळेची यशोगाथा	1074-1111
६३.	रायगड	पीएमश्री खोपोली नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक ७, वासरंग, ता.खोपोली, जि.रायगड	विविध शैक्षणिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमतांचा विकास साधणारी शाळा	1112-1130
६४.	रत्नागिरी	जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा शिरखल ओलवण व सोंडेघर जाधववाडी, ता.दापोली, जि.रायगड	उपक्रमशील शालेय नेतृत्वातून विद्यार्थी विकास	1131-1134
६५.	रत्नागिरी	जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक गोखले कन्या शाळा, ता. राजापूर, जि.रत्नागिरी	रोबोटिक व कोडींगचे ज्ञान देणारी विज्ञानाधिष्ठित शाळा	1135-1140
६६.	सांगली	न्यू इंग्लिश स्कूल, मिरज, पंढरपूर रोड, मिरज, जि.सांगली	Role of School Leader in Leading Awareness in Traditional Education and Skills	1141-1153
६७.	सांगली	अल-आमीन मराठी प्राथमिक शाळा, १०० फुटी रोड, भोसले प्लॉट, सांगली	व्यावसायिक शिक्षणासाठी शाळेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	1154-1162

६८.	सांगली	छत्रपती शिवाजी विद्यालय, दुधोंडी, दुधोंडी, तापलूस., जि.सांगली	लिंग समभाव व समावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न	1163-1170
६९.	सांगली	जिल्हा परिषद शाळा चिंचणी अंबक, ता. कडेगाव, चिंचणी अंबक, ता. कडेगाव, जि. सांगली.	"इंग्रजी भाषा विकासासाठी विविध उपक्रम राबवणारी शाळा"	1171-1175
७०.	सांगली	जिल्हा परिषद शाळा भटवाडी, केंद्र. शिराळा, ता.शिराळा, जि.सांगली	लिंग समभाव व समावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न	1176-1181
७१.	सांगली	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिद्धेवाडी, ता.तासगाव,जि.सांगली	बालपंचायतीद्वारा नेतृत्व गुणास चालना देणारी सिद्धेवाडीची शाळा!!...	1182-1191
७२.	सांगली	जिल्हा परिषद शाळा बागणी नं .2, ता.वाळवा बागणी, जि.सांगली	शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीकरिता उन्हाळी वर्ग राबविण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न	1192-1199
७३.	सांगली	जिल्हा परिषद शाळा काळामळा (आटपाडी), काळामळा, तालुका आटपाडी, जि.सांगली	विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता वाढवण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न	1200-1204
७४.	सांगली	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनगरवाडा, खुंदलापूर,केंद्र.वारणावती, ता.शिराळा, जि.सांगली.	विविध उपक्रमांच्या मालिकेतून विद्यार्थी विकासाच्या प्रवासात शालेय नेतृत्वाची भूमिका	1205-1211
७५.	सांगली	जिल्हा परिषद केंद्रशाळा मांगले नं.१, ता. शिराळा, जि.सांगली.	सहकार्यातून शाळा विकास साध्य करण्यात शालेय नेतृत्वाचे यश	1212-1215
७६.	सांगली	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भाळवणी, ता.खानापूर, जि.सांगली	विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती विकसित करण्यासाठी मुख्याध्यापकांचे प्रयत्न	1216-1232
७७.	सांगली	जिल्हा परिषद शाळा रानमळा (लंगरपेठ), रानमळा, मु.पो., लंगरपेठ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली.	लोकसहभागातून विद्यार्थी विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका	1233-1238
७८.	सांगली	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाणपाव, (लोहगांव), ता.जत, जि.सांगली.	उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी उपस्थिती आणि उद्दिष्टपूर्तीसाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न	1239-1247

७९.	सांगली	जिल्हा परिषद शाळा नं. 2 निंबवडे, ता.आटपाडी, जि.सांगली	विद्यार्थिनींची उपस्थिती वाढविण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न	1248-1255
८०.	सांगली	जिल्हा परिषद शाळा लोहगाव, ता.जत, जि.सांगली	गट पद्धती व संघ पद्धतीच्या वापरातून कौशल्य विकास साधण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका	1256-1261
८१.	सांगली	जिल्हा परिषद शाळा हिंगणगाव, ता. कडेगाव, जि.सांगली	विद्यार्थीभिमुख आनंददायी शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	1262-1269
८२.	सांगली	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उमरकांचन, ता.कडेगाव, जि.सांगली.	आनंददायी उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकसनात शाळा नेतृत्वाची भूमिका	1270-1280
८३.	सिंधुदुर्ग	जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा हरकुळ गावडेवाडी, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग	भौतिक व गुणात्मक विकास साधण्यासाठी शालेय नेतृत्वाचा ध्यास	1281-1293
८४.	सिंधुदुर्ग	जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा, मसुरे देऊळवाडा, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग	भौतिक सुविधा व शैक्षणिक कामकाजात ग्रामस्थ व पालकांचे योगदान घेण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	1294-1301
८५.	सिंधुदुर्ग	जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा गोवळ गावठण , ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग	मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमाच्या ध्यासातून शाळेचा प्रेरणादायी प्रवास	1302-1309
८६.	सोलापूर	श्री सिध्देश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळा, ९१०, शिव गंगा मंदिराजवळ, भवानी पेठ, जि.सोलापूर	"घेतला वसा शिक्षणाचा ,ध्यास आम्हा गुणवत्ता वाढीचा"	1310-1336
८७.	मुंबई	इंडिअन एज्युकेशन सोसायटी, हर्णे गुरुजी विद्यालय, सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई	"विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता वाढविण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न"	1337-1344
८८.	मुंबई	ना.म.जोशी मार्ग प्राथमिक मराठी शाळा क्र.१, डीलाईल रोड, मुंबई	नाविन्यपूर्ण, खेळ आधारित आणि क्रियाकलाप केंद्रित अध्यापन पद्धतीचा शाळेत यशस्वी वापर	1345-1354
८९.	मुंबई	Worli Seaface Municipal English Upper Primary School, Khan Abdul Gaffar Khan Road, Worli Seaface, Worli.	Leading Technology Integrated School Processes	1355-1358

९०.	ठाणे	डॉ.बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभाग, विष्णूनगर, नौपाडा ठाणे पश्चिम, जि.ठाणे	शालेय विकासात विद्यार्थी हिताच्या उपक्रमातून शालेय नेतृत्वाचे प्रयत्न	1359-1369
९१.	ठाणे	कुळगाव बदलापूर नगरपरिषद शाळा क्र.१५, एरंजाड, बदलापूर (प), ता.अंबरनाथ, जि.ठाणे	विध्यार्थ्यांच्या क्षमता संवर्धनातून शालेय नेतृत्वाची भूमिका	1370-1400
९२.	वर्धा	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा उमरी (कु.) केंद्र, वायगाव गोंड, पं.स.समुद्रपुर, जि.वर्धा	विद्यार्थ्यांची वाचन क्षमता वृद्धिंगत करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	1401-1411
९३.	वर्धा	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सास्ताबाद, केंद्र वाघोली, ता.हिंगणघाट, जि.वर्धा	ज्ञानरचनावादी व स्वयंअध्ययनास प्रेरणा देणाऱ्या शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका	1412-1425
९४.	यवतमाळ	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चोंढी, पं.स बाभूळगाव, जि.यवतमाळ	आमची शाळा – उपक्रमांचा मळा	1426-1432
९५.	यवतमाळ	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा दहिफळ, पं.स.नेर, जि.यवतमाळ	विविध शैक्षणिक उपक्रमांच्या अंमलबजावणीतून विद्यार्थी विकास साधण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका	1433-1438
९६.	यवतमाळ	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणाडी, पं.स.नेर, जि.यवतमाळ	लोकसहभागातून शाळा समृद्धी- एक यशस्वी दिशा	1439-1456
९७.	यवतमाळ	पीएमश्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा रासा, ता.वणी, जि.यवतमाळ	विविध उपक्रमांतून गुणवत्ता विकास व मूल्यसंवर्धन	1457-1463
९८.	यवतमाळ	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इसापूर (ध), केंद्र, शेम्बाळ पिंपरी,ता.पुसद, जि.यवतमाळ	ई-वर्ग जमीन सुधारणेतून शाळा विकासात मुख्याध्यापकाचे प्रयत्न	1464-1484
९९.	यवतमाळ	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दू शाळा,मालखेड बुजुर्ग, पं.स.नेर, जि.यवतमाळ	समता आणि समानतेसाठी विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीत शालेय नेतृत्वाची भूमिका	1485-1487
१००.	यवतमाळ	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भाटंबा गाव, केंद्र.काटखेडा,ता.पुसद, जि.यवतमाळ	विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविण्यासाठी मुल्याधिष्ठित शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका	1488-1495

विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव : सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय.

शाळेचा पत्ता : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी ता.राहुरी, जि.अहिल्यानगर.

ई-मेल : officespjc@gmail.com

मुख्याध्यापक : श्री.अरुण विष्णू तुपविहीरे


मोबाईल क्रमांक : 9421556755

ई-मेल : satupvihire@gmail.com

भक्ती-शक्तीची समृद्ध परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात शेतकऱ्यांची "कृषीपंढरी" म्हणून सातासमुद्रापार ओळख निर्माण करणारं लोकमान्य नाव म्हणजेच "महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी" या विद्यापीठात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन व शास्त्रज्ञ निर्माण होतात. त्याचप्रमाणे या परिसरातील विद्यार्थ्यांची मूलभूत शिक्षणाची गरज पूर्ण करण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या 'सावित्रीबाई फुले विद्यालयाचे' नाव आज महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या आणि जगाच्याही कानाकोपऱ्यात पोहोचलंय ते येथील विद्यार्थ्यांच्या रूपाने. इयत्ता पाचवी ते बारावीचे शिक्षण देणाऱ्या शाळेत १८४६ विद्यार्थी शिकत आहेत.

याच विद्यालयात शालेय शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता वाढविण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेल्या प्रयत्नांतून फुललेली 'यशोगाथा' शब्दरूपात मांडत आहोत.

शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी अनेक प्रतिकूल समस्या आणि आव्हानांनाच आव्हान देत आदर्श पिढी घडविण्याच्या सिद्धांतावर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अरुण तुपविहीरे यांनी आपल्या ध्यासपर्वाची यशस्वी घोडदौड सुरू केली. Teaching is a Noble & Administration is a global profession या वैचारिक पार्श्वभूमीवर त्यांनी विद्यालयाचं शैक्षणिक व सांस्कृतिक पालकत्व स्विकारून आपल्या गुणग्राहक विचारातून शिक्षक व कर्मचाऱ्यांवर विश्वास आणि जबाबदाऱ्या टाकून त्यांना प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. त्यांच्या कार्यकुशल नेतृत्वशैलीमुळेच विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी अत्यंत निष्ठेने आणि समर्पित भावनेने कामे करू लागले. विद्यालयाचा कर्तबगार आधारस्तंभ या जाणीवेतुनच त्यांनी आपले विद्यालय हे शिक्षक आणि विद्यार्थी या दोन्हींसाठी सर्वोत्कृष्ट करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला आहे. शिक्षण देणे व शिक्षण घेणे या दोन्ही प्रक्रिया सर्वोत्तम करण्यासाठी त्यांनी विद्यालयात अनेक उल्लेखनीय व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा परिपूर्ण प्रयत्न केला आहे.



विद्यालयातील सर्वच विद्यार्थी हे समान व उच्च गुणवत्ताधारक असू शकत नाहीत परंतु प्रत्येक विद्यार्थ्यास किमान पायाभूत वाचन, लेखन, गणितीय क्रिया या बाबी सहज व सुलभतेने करता याव्यात या उद्देशाने मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली 'विशेष वाचन

लेखन' व 'गणितीय क्रिया' या दोन वर्गांची सुरुवात शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच करण्यात आली. या विशेष वर्गांसाठी इ. पाचवी ते इ. आठवी या प्रत्येक वर्गाच्या प्रत्येक तुकडीतून ज्या विद्यार्थ्यांना सदर बाबींची गरज आहे अशा विद्यार्थ्यांचे स्वतंत्र गट तयार करून त्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून किमान तीन दिवस स्वतंत्र विशेष वर्ग सुरू करून भाषा व गणिताच्या शिक्षकांच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांना परिपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शन वर्गाचा बहुसंख्य विद्यार्थ्यांना फायदा होऊन त्यांना योग्य प्रकारे वाचन-लेखन तसेच गणितीय क्रिया करता येऊ लागल्या .

अभ्यासक्रमातील सर्व विषयांसोबतच त्यांचे ज्ञानग्रहण, आकलन क्षमता, कल्पनाशक्ती, कुतूहल, नवनिर्मिती, प्रश्नांची उकल होणे, विवेक जागृती अशा मानवी भावविश्वातील विविध गुण व क्षमतांचा विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे ही खरी काळाची गरज लक्षात घेऊन विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विविध विज्ञानाभिमुख उपक्रम विद्यालयात राबविले जातात. यात विद्यालयातच विद्यार्थ्यांसाठी 'अपूर्व विज्ञान मेळाव्याचे' आयोजन करून त्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे यासाठी त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मुख्याध्यापक व सर्वच शिक्षकांकडून दिले जाते. दैनंदिन जीवनातील अगदी छोट्या गोष्टींमध्ये दडलेले विज्ञान प्रयोगाद्वारे सादर करून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी गोडी व आवड निर्माण होते याच अपूर्व विज्ञान मेळाव्यातून प्रेरणा घेऊन अधिकाधिक विद्यार्थी तालुका / जिल्हा / विभाग व राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी होऊन त्यात यश संपादन करतात. याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये असणारे कुतूहल, उत्सुकता, संशोधक वृत्ती या गुणांची वाढ होण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी 'प्रश्नमंजुषा' हा विशेष उपक्रम विद्यालयात राबविला जातो. यामध्ये विद्यार्थ्यांचे गट तयार करून प्रत्येक गटांच्या माध्यमातूनच प्रश्नावली तयार केली जाते व ती प्रश्नावली दुसऱ्या गटास देऊन त्या सर्व गटांत स्पर्धा घेण्यात येते. यातून प्रश्न तयार करण्यासाठी तसेच उत्तरे देण्यासाठी अशा दुहेरी अभ्यासातून विद्यार्थी विज्ञानाचा विशेष आनंद घेऊन हसत-खेळत विज्ञान शिकतात. हे विज्ञान पुस्तकांत वाचून, परिक्षेत लिहून किंवा स्पर्धेत उत्तरे देऊन शिकण्यापेक्षा विज्ञान जगता आले पाहिजे या उद्देशाने मुख्याध्यापकांच्या नेतृत्वाखाली विद्यालयातील निवडक विद्यार्थ्यांची इस्रो येथे सहल देखील आयोजित करण्यात आली व त्यातूनच प्रेरणा घेऊन अनेक विद्यार्थ्यांच्या मनात खगोलशास्त्राविषयी कुतुहल व अनेक प्रश्न निर्माण झाले. त्या प्रश्नांची फक्त पुस्तकात किंवा इंटरनेटवर उत्तरे शोधण्यापेक्षा खगोलशास्त्राचा खराखुरा आनंद विद्यार्थ्यांना घेता यावा या उद्देशाने मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना आकाश निरीक्षण करता यावे यासाठी विद्यालयात एक अत्यंत आधुनिक दुर्बिण देखील आणली आहे. या सर्व वैज्ञानिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत होऊन विविध अंधश्रद्धांना मूठमाती देणारे खरेखुरे विज्ञानेश्वर विद्यालयातून निर्माण होतात.




पर्यावरणाचा पावलोपावली होणारा विनाश आणि त्यात मानवाचा असणारा सक्रिय सहभाग या बाबी लक्षात घेऊन पर्यावरणाचा संवर्धनसंस्कार विद्यार्थ्यांच्या जडणघडणीच्या काळात त्यांच्या मनात रुजावा यासाठी विद्यालयात मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली

'हरित सेनेच्या' माध्यमातून अनेक उपक्रम राबविले जातात. यामध्ये वृक्षसंवर्धनाच्या दृष्टीने केवळ वृक्षारोपण न करता विद्यार्थ्यांसाठी 'झाड दत्तक योजना' ही राबविले जाते व ही योजना अत्यंत यशस्वीपणे राबविल्याने आज विद्यालयात तब्बल 3000 झाडे व असंख्य झुडपे आहेत आणि यामुळे संपूर्ण विद्यालयाचा परिसर हिरवळीने वेढलेला आणि नटलेला सर्वांग सुंदर वाटतो. विद्यार्थ्यांना विषमुक्त शेतीचे ज्ञान व कौशल्य आत्मसात करता यावे या दृष्टीने विद्यालयात 'परसबाग' उपक्रम अत्यंत उत्साहाने राबविला जातो. या उपक्रमातून पिकविलेला सेंद्रिय भाजीपाला हा विद्यार्थ्यांच्या दैनंदिन शालेय पोषण आहारात देखील बऱ्याचदा वापरला जातो. आपल्या सण उत्सवांच्या काळात पर्यावरणाची फार मोठ्या प्रमाणात हानी होते. ती टाळण्याच्या दृष्टीने व जनजागृतीच्या उद्देशाने विद्यालयात मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव काळात 'पर्यावरणपुरक गणेश मूर्ती बनविणे' स्पर्धा, दिवाळीच्या काळात 'फटाके मुक्त दिवाळी' होळी-रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर 'नैसर्गिक रंगनिर्मिती कार्यशाळा' अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनावर पर्यावरण संवर्धनाचे संस्कार केले जातात. स्वच्छता व प्लास्टिकमुक्त पर्यावरण या गोष्टींची जाण व भान यावे या अनुषंगाने विद्यालय परिसर व जवळच असणारे 'ज्ञानेश्वर सागर धरण' परिसराची विद्यार्थ्यांकडून स्वच्छता करून घेतली जाते. संगीतमय स्वच्छता हा एक आगळावेगळा उपक्रम मुख्याध्यापकांच्या कल्पकतेतून राबविला जातो ज्यामध्ये मधल्या सुट्टीत पाच मिनिटांसाठी एक देशभक्तीपर गीत साऊंड सिस्टिम वर वाजविले जाते आणि त्या वेळेत विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यालयाचा परिसर पूर्णपणे स्वच्छ करतात.

विद्यार्थ्यांना पर्यावरण व सभोवतालच्या परिसरातील प्राणी / पक्षी यांचेबाबत पुरेशी ओळख होण्याच्या उद्देशाने नोव्हेंबर / डिसेंबरच्या कालावधीत पक्षीनिरीक्षण व पक्षीगणना हा विशिष्ट उपक्रम मुख्याध्यापकांच्या विशेष प्रयत्नातून राबविला जातो. ज्यामुळे विद्यार्थ्यांचे कळत-नकळत निसर्गाशी नाते अधिकाधिक घट्ट होत जाते. पर्यावरण व निसर्गाच्या या सर्व बाबी व जाणीवांसोबतच विद्यार्थ्यांना त्याचा व्यावहारिक तसेच व्यावसायिक जीवनात उपयोग व्हावा या विचारातून मुख्याध्यापकांनी विद्यालयात 'कलम बांधणी प्रशिक्षणाची' सुरुवात काही तज्ञ मार्गदर्शकांच्या देखरेखी खाली सुरू केली असून मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी तब्बल 500 आंबा रोपांचे कलम तयार केले आहेत.

'राष्ट्रप्रेम' हा आपल्या आयुष्याचा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने त्याचीदेखील विद्यालयात अत्यंत उत्तम प्रकारे पायाभरणी होत असते. यामध्ये विद्यालयातील NCC चा अत्यंत मोलाचा व सिंहाचा वाटा आहे विद्यालयात मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व थोर ऐतिहासिक महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी व अनेक महत्त्वाचे दिवस विद्यार्थ्यांच्या विशेष सहभागातून साजरे केले जातात. या उपक्रमात प्रत्येक महत्त्वाचा दिवस हा एक वर्गास वेळापत्रकाप्रमाणे वर्षाच्या सुरुवातीलाच नेमून दिलेला असतो. त्यानुसार त्या संपूर्ण




कार्यक्रमाचे नियोजन, कार्यक्रम पत्रिका, सूत्रसंचालन, सादरीकरण या सर्व बाबी तो एकच वर्ग करीत असतो. या उपक्रमामुळे महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी व काही विशिष्ट दिवसांमुळे इतिहासाच्या ज्ञान व जाणीवेसोबतच कार्यक्रमाची जबाबदारी, नियोजन, सादरीकरण, नातेसंबंध जोपासणे, सहकार्य, विचारांची देवाणघेवाण, नेतृत्व, वक्तृत्व, कर्तृत्व अशा विविध गुणांची अगदी सहजपणे जोपासना होते. या उपक्रमासोबतच आपल्या भारतीय संस्कृतीची महती आणि थोरवी विद्यार्थ्यांच्या मनात रुजावी आणि त्यातूनच राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव असे सद्गुण वाढीस लागावेत यासाठी सामूहिक रक्षाबंधन, मकरसंक्रांति, रमजान ईद, महावीर जयंती, गुरुनानक जयंती, नाताळ असे सर्वधर्मीय सण विद्यालयात आनंदाने साजरे केले जातात.

या संपूर्ण पार्श्वभूमीवर वक्तृत्व, निबंधलेखन, रांगोळी अशा विविध प्रकारच्या स्पर्धा विद्यालयात आयोजित करुन विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेमाचे बाळकडू देण्याचा पुरेपूर प्रयत्न विद्यालयात केला जातो. आपल्या देशातील लोकशाही प्रणाली, मतदान पद्धती या बाबी विद्यार्थ्यांना समजाव्यात आणि त्याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना घेता यावा यासाठी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली 'राष्ट्रीय मतदार दिवस' मोठ्या उत्साहाने विविध उपक्रमांसह वर्गात प्रत्यक्ष मतदान पद्धतीचा अवलंब करून साजरा केला जातो.

विद्यालयात क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त इतर अवांतर वाचन केले तरच विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता वाढू शकतात या विचारांतून मुख्याध्यापकांनी विद्यालयाचे ग्रंथालय अधिकाधिक सुसज्ज करण्यासाठी भरपूर परिश्रम घेतले असून विविध क्षेत्रांशी निगडित नवनवीन पुस्तकांची खरेदी विद्यालयाच्या ग्रंथालयासाठी केली आहे. सध्या ग्रंथालयात सुमारे 9000 पुस्तके असून या व्यतिरिक्त इ.11 वी व 12 वी शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी CET, NEET, JEE यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी छोटेसे परंतु वेगळे सुसज्ज ग्रंथालय प्रयोगशाळेतच सुरू केले आहे. तसेच मधली सुट्टी अथवा इतर मोकळ्या वेळेत विद्यार्थ्यांना निसर्गरम्य वातावरणात वाचन करता यावे यासाठी विद्यालयात 'वाचन कट्टे' देखील तयार करण्यात आले आहेत.

अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता व क्रीडाकौशल्ये विकसीत करण्याच्या दृष्टीने विद्यालयात विविध प्रकारच्या खेळांच्या टीम तयार करून त्यांना योग्य ते मार्गदर्शन नेहमीच दिले जाते. यामुळे विद्यालयात अनेक पारंगत खेळाडू व खेळाडूंचे संघ तयार होऊन त्यातील अनेक खेळाडू व संघ विविध स्पर्धांमध्ये तालुका, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर देखील सहभागी होऊन त्यांतील अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी विजयश्री खेचून आणली आहे.

मुख्याध्यापकांनी आपली विद्वत्ता, प्रगल्भता, द्रष्टेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, शिक्षण क्षेत्राविषयी आपुलकी आणि सहृदय माणूसपणामुळे माणसे जोडण्याची जगावेगळी हातोटी यामुळे विद्यालयाच्या प्रगतीत अनेक आजी-माजी विद्यार्थ्यांचे देखील मदतीचे हात जोडलेले गेले आहेत. कारण, म्हणतात ना..



"दिव्यत्वाची जिथे प्रचिती,

तेथे कर आमुचे जुळती.."

या माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयात भौतिक सुधारणा वाढीस लागाव्यात यासाठी मुख्याध्यापकांच्या हाकेला साद घालत सढळ हाताने मदत तर केलीच आहे परंतु यापल्याड विविध क्षेत्रांत काम करणारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळण्याच्या दृष्टीने वर्गावर्गात उपलब्ध असणाऱ्या डिजीटल स्क्रीनच्या माध्यमातून झूम मीटिंगद्वारे अनेकदा विद्यार्थ्यांना देशातील तसेच परदेशातील अनेक नामवंत माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले आहे.

शिक्षण हा सर्वोत्तम संस्कार आहे, शिक्षक हा त्याचा शिल्पकार आहे व मुख्याध्यापक हा त्या संस्कारप्रणालीचा प्रमुख आधारस्तंभ आहे. ही बाब आमच्या विद्यालयाच्या बाबतीत तंतोतंत लागू पडते कारण विद्यार्थ्यांमध्ये एक नवजागेपण निर्माण व्हावं, त्यांचं जीवन संजीवन व्हावं, त्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच Value Based Education देऊन Value Based आयुष्य घडवावीत या उद्देशाने विद्यार्थ्यांची उत्तम मानसिक आणि वैचारिक जडणघडण होण्यासाठी विद्यालयात मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी योगा, दररोज आनापान उपक्रम तसेच शनिवारी आनंददायी शिक्षणाच्या उपक्रमांतर्गत दप्तर मुक्त शाळा असे विविध प्रेरणादायी आणि व्यक्तिमत्त्वात आमुलाग्र बदल घडवून आणणारे उपक्रम देखील राबविले जातात.

विद्यालय म्हणजे केवळ शैक्षणिक फॅक्टरी नसून केवळ गुणपत्रकावरील भल्या मोठ्या आकड्यांची बेरीज घेऊन आपल्या विद्यालयातून विद्यार्थ्यांच्या फौजा बाहेर न पडता, हे विद्यार्थी समाजसन्मुख व राष्ट्रनिष्ठ कसे घडविता येतील याचा अतिशय जिव्हाळ्याने, गांभीर्याने व कृतीपूर्ण पद्धतीने हाताळण्यासाठी मुख्याध्यापक पावले उचलत असतात. त्यांच्या या विचारातूनच विद्यार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी त्यांची दूरदृष्टी, नाविन्याचा ध्यास, धाडसी नेतृत्व, अचूक नियोजन, ज्ञानाधिष्ठीत आणि परिवर्तनवादी विचारांचा आग्रह, वैज्ञानिक संकल्पना सामाजिक स्तरावर प्रत्यक्षात आणण्यासाठी असणारी त्यांची धडपड या सर्व बाबीमुळे विद्यार्थ्यांच्या सर्व मूलभूत क्षमतांमध्ये वाढ होऊन त्यांचा सर्वांगीण व परिपूर्ण विकास होण्यास मदत होते.

विद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या या सर्व बाबी आणि विषयांबाबत अगदी थोडक्यात पण अचूक आणि मार्मिक शब्दात सांगायचं झालं तर... इथे भौतिकशास्त्र शिकविता-शिकविता भौतिक जगाची देखील जाणीव करून दिली जाते. चित्रकलेसोबत चरित्रकला आणि जीवशास्त्रासोबत जीवनशास्त्र शिकविले जाते रसायनशास्त्र शिकविताना जीवनातील विविध रसायनांची ओळख करून दिली जाते आणि गणिताच्या अभ्यासासोबतच आयुष्याची गणितं कशी सोडवावीत याचंही मार्गदर्शन केलं जातं. इतिहासातील घटना दुर्घटनांमधून वर्तमानाचे काटेरी डंख आणि उत्तुंग भविष्याचे पंख याची समग्र जाण दिली जाते. तर भाषा-साहित्य शिकवताना... 'शब्दांना कृतीचा स्पर्श झाला की




भाषेला अर्थपूर्ण पावित्र्य प्राप्त होते हे उदाहरणासह स्पष्ट केले जाते आणि संस्कृत शिकविताना प्रत्येक विद्यार्थी सुसंस्कृत कसा होईल याचा पुरेपूर प्रयत्न केला जातो. विविध कला-क्रीडा शिकता शिकवितानाच जीवन नावाची कला हसत खेळत जगण्याचं बाळकडू इथे दिलं जातं.

एकूणच काय... तर, विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक, वैचारिक आणि परिपूर्ण सुसंस्कारित विकास घडवून एक उत्तम, सज्ञान व सुजाण नागरिक घडविण्याचा वसा आणि वारसा सावित्रीबाई फुले विद्यालय सदैव जपत असते आणि विद्यालयाच्या या संपूर्ण जडणघडणीत मुख्याध्यापकांचं आणि सर्व शिक्षकांचं स्पृहणीय योगदान व संस्कारसंपन्न धडपड या बाबींचा सिंहाचा वाटा आहे. यातूनच विद्यालय म्हणजे माणूस घडविणारी उपक्रमांची आणि अनुभवांची प्रयोगशाळा अशी ओळख सर्वदूर निर्माण झाली आहे.

सिमेंट काँक्रीटच्या शाळेच्या इमारतीत शिकणाऱ्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांना प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहून त्यांच्या मनातील विजीगीषू वृत्ती जागृत करणाऱ्या व त्यांना जिद्दीच्या आकाशाचे दर्शन घडविणाऱ्या विद्यालयाच्या मुख्याध्यापकांच्या या अगम्य, साहसी व अखंड ध्यासपर्वाची ही यशोगाथा.

फोटो व व्हिडीओ लिंक -

https://drive.google.com/drive/folders/1FPzBLPrqHG4VNAm8bIDd8xPLXF5xe8NW?usp=sharing



रात्र शाळेतील शिक्षणात कौशल्य विकास करण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव : ज्युनिअर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूल.

शाळेचा पत्ता : कोर्ट गल्ली, अहिल्यानगर.

मुख्याध्यापकाचे नाव : श्री सुनिल दत्तात्रय सुसरे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक : 9822522223

मुख्याध्यापक ईमेल : susaresd@gmail.com

प्रस्तावना -

भारतातील शिक्षण व्यवस्थेमध्ये अनेक लोक अजूनही शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर आहेत. काहीजण गरिबीमुळे, तर काहीजण कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे आपले शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. अशा विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्रात रात्रशाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत. रात्रशाळा हे शिक्षण पूर्ण करण्याचे एक प्रभावी माध्यम ठरते. रात्रशाळांचे महत्त्व केवळ शैक्षणिक पुरवठ्यावर न थांबता, ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी देखील अत्यंत गरजेचे ठरते. याच संकल्पनेला पुढे नेत मासूम संस्था, मुंबई आणि जनशिक्षण संस्था,



अहमदनगर यांच्या सहकार्याने शाळेचे मुख्याध्यापक श्री सुनिल दत्तात्रय सुसरे यांनी एक प्रभावी उपक्रम राबवला आहे.

मुख्याध्यापक सुसरे सरांची भूमिका -

मुख्याध्यापक हे शाळेचे शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रमुख असतात. या भूमिकेतून त्यांनी रात्रशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षणापुरते न मर्यादित ठेवता, त्यांच्यासाठी विविध कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराभिमुख कार्यक्रमांचे आयोजन केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे शाळेत शिकणारे विद्यार्थी केवळ शैक्षणिकदृष्ट्या सक्षम झाले नाहीत, तर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासही सक्षम झाले.

अर्धवट शिक्षण सोडलेल्यांना रात्रशाळेत केले प्रवेशित

भाई सस्था नाईट स्कूलतर्फे सुसरे सन्मानित



समाचार/नगर-दि.१८

अहिल्यानगर : जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने हिंद सेवा मंडळ संचलित भाई सस्था नाईट हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य सुनिल सुसरे यांना गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या भाई वतीने नाईट हरण्यातू आला. विविध कारणांनी अर्धवट शिक्षण सोडलेल्या युवक-युवतींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासया उद्देशाने त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना रात्र शाळेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना समाविष्ट केरन्याबद्दल प्रा. सुसरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

हिंद सेवा मंडळाचे अंग्यक्ष मामर्त्तीराव अजित बोरा :व भाई सस्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या हस्ते प्रा. सुसरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शरद पवार, राजेंद्र गाडगीळ आदींसह शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

अजित बोरा म्हणाले की, रात्र शाळेत काम करण्याची मोठी संधी असून, हे कार्य प्रा. सुसरे यांनी आपल्याव व्रमांतून दाखवून दिले आहे. अनेकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांचे भवितव्य घडविण्यासाठी हा शिक्षक मनापासून कार्य करत असल्याचे कौतुक त्यांनी केले.

डॉ. कोठारी म्हणाले की, आर्थिक अडचण, कौटुंबिक प्रश्न व विविध कारणांनी अनेक युवक-युवतींचे शिक्षण अर्धवट राहते. शैक्षणिक क्षमता असताना देखील जबाबदायीच्या ओझ्याखाली अनेकांना शिक्षण घेता येत नाही. अशा युवक-युवतींसह मौठांना देखील भाई सस्था नाईट हायस्कूलच्या माध्यमातून प्रा. सुसरे यांनी शिक्षणामपूमी प्रोत्साहित ठेवण्याचे काम केले आहे, त्यांना मिळालेला पुरस्कार 'हिंद सेवा मंडळ संस्थेच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे.

सत्काराला उत्तर देताना प्रा. सुसरे यांनी हा पुरस्कार शाळेतील सर्व शिक्षकांचा आणि आजी-माजी विद्यार्थ्यांचा असून, त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्व श्रय साचे असल्याचे त्यांनी सांगितले.

मासूम संस्था, मुंबई यांचे योगदान

मासूम संस्था ही रात्रशाळांसाठी काम करणारी एक प्रमुख संस्था आहे. या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे रात्रशाळांना सशक्त बनवणे, रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण आणि प्रशिक्षण देणे, तसेच त्यांना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी मदत करणे. मासूम संस्थेला अहमदनगर शहरातील रात्रशाळेत आणण्यात सरांचा सिंहांचा वाटा आहे. मासूम संस्थेच्या सहकार्याने शाळेने पुढील उपक्रम राबवले.

1. कौशल्य विकास कार्यशाळा - शिवणकाम, सौंदर्य उपचार, संगणक प्रशिक्षण, मोबाइल रिपेअरिंग, बॅग बनवणे इत्यादी.
2. करिअर मार्गदर्शन शिबिरे - विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि कौशल्यानुसार योग्य करिअर निवडण्यात मार्गदर्शन.
3. व्यक्तिमत्त्व विकास सत्रे - विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी संवाद कौशल्य, नेतृत्त्व गुण, सादरीकरण अशा गोष्टींचा सराव.

जनशिक्षण संस्था, अहमदनगरचे सहकार्य

जनशिक्षण संस्था ही केंद्र सरकारच्या अंतर्गत येणारी एक संस्था असून ती कौशल्य प्रशिक्षणाद्वारे युवकांना रोजगारक्षम बनवते. या संस्थेच्या सहकार्याने शाळेतील विद्यार्थ्यांना



खालील प्रमाणे प्रशिक्षण देण्यात आले.

1. उद्योगाभिमुख प्रशिक्षण - जसे की टेलरिंग, इलेक्ट्रिशियन, प्लंबिंग, कुकिंग, अन्न प्रक्रिया इ.
2. प्रमाणपत्र अभ्यासक्रम - प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर शासकीय मान्यता असलेले प्रमाणपत्र दिले गेले, जे नोकरीसाठी उपयुक्त ठरले.
3. व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत - प्रशिक्षण घेतल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी स्वतःचे व्यवसाय सुरू केले. संस्थेने त्यांना कर्ज व मार्केटिंगमध्ये मदत केली.



शाळाबाह्य विद्यार्थ्यांची जनजागृती -

मुख्याध्यापकांनी रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना समाजसेवेची जाण देत त्यांना शाळाबाह्य मुलांमध्ये जनजागृतीसाठी प्रेरित केले. त्यांच्या प्रयत्नांनी खालील सकारात्मक बदल दिसून आले.

1. दारोदारी शिक्षण - रात्रशाळेतील विद्यार्थी आपल्या परिसरातील शाळाबाह्य लोकांशी संपर्क साधून त्यांना पुन्हा शिक्षणात सामील होण्यासाठी प्रवृत्त करत होते.
2. शाळा चलो अभियान - शाळेने आपल्या पातळीवर "शाळा चलो" मोहिम राबवून गावोगाव जागरूकता फेरी काढल्या.
3. समुपदेशन सत्रे - शाळाबाह्य लोकांचे समुपदेशन करून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

4. प्रवेश शिबिर – इच्छुकांसाठी सुलभ प्रवेश प्रक्रियेची व्यवस्था करून त्यांना शाळेत प्रवेश दिला गेला.



अहमदनगर TODAY अहमदनगर, शनिवार, ४ मे २०२४ सकाळ

रात्र शाळेतील ५५ विद्यार्थी बनले दूत

भाई सस्था नाईट स्कूलमध्ये शिक्षणदूत अभियानाचा प्रारंभ

अहमदनगर, ता. ३ : परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडून शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेच्या माध्यमातून पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने हिंद सेवा मंडळ संस्थेच्या भाई सस्था नाईट हायस्कूलने शिक्षणदूत अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. रात्र शाळेतील विद्यार्थी शिक्षणदूत म्हणून समाजात शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेत आणण्याचे काम करण्याची ही संकल्पना आहे.

या अभियानाचा प्रारंभ रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या उपस्थितीमध्ये झाला. यावेळी प्राचार्य सुनील सुसरे, शिक्षक महादेव राऊत, अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, बाळू गोरडे, कैलास करांडे, अनिरुध्द देशमुख, अनिरुध्द कुलकर्णी, अविनाश गवळी, कैलास बालटे, महिला शिक्षिका वैशाली दुराफे, वृषाली साताळकर आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

कोठारी म्हणाले, की भाई सस्था नाईट हायस्कूलचा शिक्षणापासून वंचित राहिलेल्या शाळाबाह्य, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन शैक्षणिक स्तर उंचावला. रात्र शाळेतील ५५ विद्यार्थ्यांनी शिक्षणदूत होण्यासाठी पुढाकार घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता आठवी ते बारावी ५०४ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य करणारे शरद पवार, मंगेश भुते, पी. एच. शिंदे, ए. सी. ओमकार भिंगारदिवे, स्वाती होले, शुभम पाचरणे यांचा डॉ. कोठारी व विलास वडवे यांच्या हस्ते सत्कार केला. सूत्रसंचालन एस. एस. शिंदे यांनी केले. या उपक्रमास संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, मार्गदर्शक अजित वोरा आदींनी शुभेच्छा दिल्या.

अहमदनगर : भाई सस्था नाईट स्कूलमध्ये शिक्षणदूत अभियानास प्रारंभ झाला. समवेत हिंद सेवा मंडळाचे पदाधिकारी.

गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

सोयतच मासूम संस्थेच्या (मुंबई) वतीने रात्र शाळेत प्रवेशित होऊन शैक्षणिक स्तर उंचावणाऱ्या गरजवंत विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्यात येते. आजअखेर फॅशन डिझायनिंगसाठी १२ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ४८ हजार रुपये) डीएमएलटीसाठी ३ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ५४ हजार रुपये), ब्युटी पार्लरसाठी २ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ४५ हजार रुपये) या व्यतिरिक्त इतर व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी आर्थिक मदतीस पात्र झाले असल्याची माहिती प्राचार्य सुनील सुसरे यांनी दिली.

रोजगार मेळाव्याचे आयोजन: मुख्याध्यापक सुसरे सरांची पुढाकाराची भूमिका –

रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देण्यापुरते न थांबता, त्यांना प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे ही एक महत्त्वाची गरज होती. ही गरज ओळखून शाळेचे मुख्याध्यापक यांनी रात्रशाळेत रोजगार मेळाव्याचे आयोजन केले. या मेळाव्यामध्ये स्थानिक उद्योग, व्यावसायिक संस्था, सेवा क्षेत्रातील कंपन्या आणि स्वयंरोजगार क्षेत्रातील प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचे प्रात्यक्षिक दिले आणि थेट मुलाखतीद्वारे काही विद्यार्थ्यांना कामाची संधी मिळाली.

या मेळाव्यामुळे रात्रशाळेतील शिक्षणाची उपयुक्तता अधोरेखित झाली आणि अनेक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नोकरी किंवा स्वयंरोजगाराचा मार्ग सापडला. मुख्याध्यापकांचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, इतर शाळांसाठीही प्रेरणादायक ठरला आहे.विद्यार्थ्यांमध्ये झालेला बदल या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये खालील बदल दिसून आले:

- आत्मविश्वासात वाढ – कौशल्य संपादनामुळे आत्मविश्वास वाढला.
- उद्योगाची सुरुवात – काही विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू केला.
- प्रेरणादायी भूमिका – अनेक विद्यार्थी शाळाबाह्य मुलांसाठी प्रेरणा बनले.
- सामाजिक बांधिलकी – समाजासाठी काहीतरी करण्याची भावना निर्माण झाली.

शाळेतील एकात्मता आणि सहकार्य

या यशामध्ये शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि स्थानिक लोकांचेही मोठे योगदान आहे. सर्वांनी मिळून एकात्मतेने काम केल्यामुळेच हे उपक्रम यशस्वी ठरले. विशेषतः शाळेच्या मुख्याध्यापकांनी नेतृत्वाची भूमिका सक्षमपणे पार पाडली.


महिलांसाठी सुरक्षित आणि सक्षम रात्रशाळा - महाराष्ट्रातील एक प्रेरणादायी उदाहरण

(विद्यार्थीच नाही तर विद्यार्थीनीही शाळेत आल्या तर त्यांनाही कौशल्य विकासाची संधी देता येईल)

शिक्षण हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे, पण अजूनही आपल्या समाजात अनेक महिला विविध कारणांमुळे शिक्षणापासून वंचित राहतात. विशेषतः विवाहित, कामगार महिला, एकल महिलांना किंवा तृतीयपंथीय यांना पारंपरिक शाळांमध्ये प्रवेश घेणे कठीण असते. अशा पार्श्वभूमीवर ज्युनिअर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूल, अहिल्यानगर येथील मुख्याध्यापक सरांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि सन्मानाच्या वातावरणासाठी विशेष प्रयत्न सुरू केले. सरांनी प्रथम रात्रशाळेत महिला विद्यार्थिनींना प्रवेश घेण्यासाठी जनजागृती मोहीम राबवली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, "या शाळेत शिकणाऱ्या प्रत्येक महिलेला सुरक्षित, आदरयुक्त आणि आत्मविश्वासदायक वातावरण मिळेल." हे केवळ शब्दांपुरते नव्हते, तर त्यांनी व्यवस्थापन आणि शाळेच्या रचनेमध्ये आवश्यक त्या सर्व गोष्टींची योजना केली:

1. स्वच्छ आणि स्वतंत्र महिला शौचालयांची सोय.
2. शाळेच्या वेळेत शिस्तबद्ध महिला स्टाफची उपस्थिती.
3. महिलांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा.
4. संध्याकाळनंतर सुरक्षिततेसाठी परिसरात अंधार न ठेवता लाइट्सची व्यवस्था.
5. तृतीयपंथीय यांना संपूर्ण सन्मान व समावेश.

या सगळ्या गोष्टींमुळे परिसरातील महिलांमध्ये शाळेबाबत विश्वास निर्माण झाला. सरांनी महिला विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र समुपदेशन सत्रं, आरोग्य तपासणी शिबिरं, आणि महिलांच्या विशेष गरजांनुसार अभ्यासक्रम समावेश सुरू केला. शिक्षणाशी जुळवून घेता यावं म्हणून लवचिक वेळापत्रक ठेवण्यात आलं. त्यामुळे ज्या महिला दिवसा काम करतात, त्यांनाही संध्याकाळी शाळेत येणे शक्य झाले.





या प्रयत्नांचा परिणाम असा झाला की, अहिल्यानगरमधील ज्युनिअर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूल ही महाराष्ट्रातील सर्वाधिक महिला शिक्षण घेणारी रात्रशाळा ठरली. प्रत्येक वर्षी येथे विविध वयोगटातील, पार्श्वभूमीतील १०० पेक्षा अधिक महिला शिक्षणासाठी प्रवेश घेतात.

या उपक्रमातून शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर, आत्मविश्वासी आणि सक्षम बनवण्याचे काम होत आहे. विशेष म्हणजे, इथे शिकलेल्या अनेक महिला आता सामाजिक कार्यकर्त्या, स्वयंरोजगार करणाऱ्या, शिक्षक किंवा स्थानिक पुढाकार घेणाऱ्या नागरिक बनल्या आहेत.



मुख्याध्यापक सरांचा हा दृष्टिकोन आणि प्रयत्न म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवणारा एक आदर्श मॉडेल आहे. त्यांच्या कार्यामुळे रात्रशाळा ही केवळ 'दिवसा काम करून रात्री शिकणाऱ्यांची जागा' न राहता, ती महिलांसाठी नवजीवन देणारी शिक्षणसंस्था बनली आहे.

स्वत:चा व्यवसाय आणि उच्च शिक्षणासाठी मदत - विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ


रात्रशाळेतील विद्यार्थ्यांमध्ये अनेकांनी शिक्षणासोबतच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली होती. शाळेचे मुख्याध्यापक यांनी ही गरज ओळखून विविध स्वयंसेवी संस्था, CSR प्रकल्प, शासकीय योजनांचा समन्वय करून विद्यार्थ्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे काम केले. शिवणकाम, सौंदर्य उपचार, खाद्यपदार्थ प्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक रिपेअरिंग यांसारख्या प्रशिक्षणांनंतर विद्यार्थ्यांना आवश्यक किट्स, लघुउद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक भांडवली मदत मिळाली.

विशेष उदाहरण म्हणजे शिला नावाची विद्यार्थिनी, जिला कायद्याचे शिक्षण (Law) घेण्याची तीव्र इच्छा होती. तिचे सामाजिक व आर्थिक आव्हान लक्षात घेता, शाळेने खास प्रयत्न करून एका सामाजिक संस्थेच्या माध्यमातून शिलासाठी शैक्षणिक खर्च, प्रवेश फी आणि राहण्याची व्यवस्था यासाठी निधी उपलब्ध करून दिला.

रात्रशाळेतील महिला आणि पुरुषांना संगणक कौशल्य विकास आणि साक्षरतेसाठी फिरत्या संगणक लॅबद्वारे दिले जाणारे संगणकाचे धडे

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संगणक साक्षरता ही काळाची गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर रात्रशाळेतील महिला आणि पुरुष विद्यार्थ्यांसाठी एक उपयुक्त उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत फिरत्या संगणक लॅबद्वारे विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाचे मूलभूत धडे दिले दिले. या लॅबमध्ये संगणक, प्रोजेक्टर, इंटरनेट सुविधा आणि कुशल प्रशिक्षक उपलब्ध करून देण्यात आले होते.

या माध्यमातून विद्यार्थ्यांना संगणकाचा इतिहास, त्याचे कार्यप्रणाली, टायपिंग कौशल्य, एम.एस. ऑफिस, इंटरनेट वापर, ई-मेल पाठवणे, ऑनलाइन फॉर्म भरणे, डिजीटल व्यवहार करणे आदी बाबतीत प्रशिक्षण दिले जाते. यामुळे रात्रशाळेतील विद्यार्थ्यांचे केवळ साक्षरतेचेच नव्हे, तर डिजिटल सक्षमीकरणाचे दरवाजे उघडले जात आहेत. विशेषतः काम करणाऱ्या महिला व पुरुषांना रात्रीच्या वेळेत संगणक शिक्षण मिळत असल्याने त्यांना नोकरीच्या संधीही प्राप्त होण्यास मदत होते. शासनाच्या डिजिटल इंडिया आणि साक्षर भारत या मोहिमेला अशा प्रकारचे उपक्रम बळकटी देतात. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाला संगणक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फिरती संगणक लॅब हा एक अभिनव आणि परिणामकारक उपक्रम ठरत आहे.



फिरत्या संगणक लॅबद्वारे रात्रशाळेत शिक्षण पूर्ण करणाऱ्या महिला आणि पुरुषांना संगणक साक्षर करण्यात पुढाकार कौशल्य विकास बरोबरच मतदार जागृती कार्यक्रम हा महत्वकांक्षी उपक्रम असतो.



अहमदनगर । मंगळवार, २९ ऑगस्ट २०२३

3 नगर टाइम्स

न्यूज पॉइंट

फिरत्या संगणक लॅबद्वारे विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण

■ **अहमदनगर (प्रतिनिधी)** – शहरात दिवसा काम करून रात्र शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्युनिअर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या माध्यमातून घरापर्यंत जाऊन शहरातील विविध ठिकाणी मासूम संस्थेच्या मुंबई येथून आलेल्या फिरत्या संगणक लॅबद्वारे (डिजीटल बस) संगणकाचे मोफत प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवक-युवतींना सारडा महाविद्यालयाच्या सभागृहात प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संगणक प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण सोहळ्याप्रसंगी सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष अनंत फडणीस,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,सुमतीलाल कोठारी, उपकार्याध्यक्ष जगदीश झालानी, सहसचिव ज्योती कुलकर्णी, रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, गिरीश पाखरे, योगेश देशमुख, बाळासाहेब कुलकर्णी, सुनिल सुसरे, प्राचार्या माहेश्वरी गावीत, अधीक्षक अशोक असेरी आदींसह नाईट स्कूलचे सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

शैक्षणिक साहित्य वाटप: गरजूंसाठी वह्यांचे मोफत वितरण:

रात्रशाळेतील अनेक विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या कमकुवत पार्श्वभूमीचे असतात. अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात अडथळे येऊ नयेत म्हणून गरजवंत विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वितरण करण्याचा उपक्रम राबवला. शाळेने विविध संस्था, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आणि दानशूर व्यक्तींना सतत आवाहन करून वह्या आणि शैक्षणिक साहित्यासाठी मदत मिळवली.या उपक्रमातून दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना शालेय वह्या, लेखन साहित्य आणि अभ्यासासाठी लागणारी मूलभूत साधने मोफत दिली जातात. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाविषयी आपुलकी निर्माण करतो, तसेच त्यांच्या आत्मसन्मानाला ठेच न लागता शिकण्याची प्रेरणा देतो. सरांचे हे कार्य केवळ मदत नव्हे, तर समाजाशी बांधिलकीचे प्रतीक ठरते.

पुस्तक बँकेचा उपक्रम: शिक्षणात अडथळा न येण्यासाठी ठोस पाऊल :

रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना अनेकदा पुस्तके खरेदी करण्यास अडचणी येतात. ही गरज लक्षात घेऊन शाळेने "पुस्तक बँक" उपक्रम सुरू केला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकांची कमतरता भासली नाही.

या उपक्रमात मागील वर्षी वापरलेली पुस्तके, दानशूर व्यक्तींकडून मिळालेली नवीन पुस्तके, तसेच संस्थांच्या सहकार्याने मिळवलेली शैक्षणिक साधने एका बँकेप्रमाणे जमा केली जातात आणि गरजू विद्यार्थ्यांना मोफत किंवा ठराविक कालावधीसाठी दिली जातात.

पुस्तक बँकेमुळे विद्यार्थ्यांना वेळेवर संपूर्ण पुस्तक मिळाल्याने शिक्षणात सातत्य टिकून राहते आणि त्यांचा अभ्यास अधिक प्रभावी होतो. या उपक्रमाने शाळेत सामूहिकता, सहकार्य आणि संसाधनांचा योग्य उपयोग याची सुंदर शिकवण दिली.अशा उदाहरणांमुळे रात्रशाळा ही केवळ शिक्षणसंस्था न राहता जीवन बदलणारे केंद्र बनली आहे, आणि त्याचे श्रेय शाळेच्या दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाला जाते

रात्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी नाश्त्याची सुविधा - एक संवेदनशील आणि प्रभावी उपक्रम :

रात्रशाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी हे विशेष परिस्थितीतील असतात. त्यांचा दिवस सकाळपासूनच कामात सुरू होतो - कोणी बांधकामावर मजुरी करतो, कोणी दुकानात मदतनीस असतो, तर कोणी घरोघरी काम करतो. दिवसभर शारीरिक आणि मानसिक श्रम



केल्यानंतर संध्याकाळी ते जेव्हा रात्रशाळेत येतात, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर शिक्षणाची ओढ असते, पण शरीर मात्र थकलेले आणि पोट भुकेलेले असते.

ही बाब ओळखून "शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्याचे पहिले पोट भरेल, मग त्याचा मेंदू शिकायला तयार होईल" ही भावना मनात ठेवून एक अभिनव आणि माणुसकीचा उपक्रम हाती घेण्यात आला. "मासूम संस्था, मुंबई" या रात्रशाळांसाठी कार्यरत असलेल्या नामांकित

संस्थेशी संपर्क साधून विद्यार्थ्यांसाठी दररोज मोफत नाश्त्याची व्यवस्था शाळेने उपलब्ध करून दिली. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना ताजे, पौष्टिक आणि पचायला सोपे असे पदार्थ दिले जातात – उदा. पोहे, उपमा, शिरा, उसळ पाव, इडली, फळे, वगैरे. या नाश्त्यामुळे विद्यार्थी थकवा विसरून शिकण्यावर लक्ष केंद्रित करतात. नाश्ता मिळणे ही केवळ भुकेची पूर्तता नसून, त्यांच्या मनामध्ये आदर, आत्मीयता आणि प्रेरणा निर्माण करणारे एक सकारात्मक वातावरण बनते.



मासूम संस्थेने केवळ अन्न पुरवले नाही, तर शाळेसोबत समन्वय साधून योग्य वेळ, वितरण व्यवस्था, स्वच्छता आणि विद्यार्थ्यांच्या पसंतीचा विचार करून नाश्त्याचा दर्जा टिकवून ठेवला आहे. यामध्ये शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि काही माजी विद्यार्थ्यांनीही भाग घेतला आहे.

या उपक्रमाचे अनेक फायदे स्पष्टपणे जाणवले :

1.हजेरी वाढली – जे विद्यार्थी भुकेमुळे पूर्वी वेळेवर येत नसत, ते आता नियमित येऊ लागले.

2.शिकण्यात लक्ष – भूक मिटल्यावर शिकण्यावर लक्ष केंद्रित करता येते, हे स्पष्ट दिसून आले.

3.आरोग्यात सुधारणा – नाश्त्यामुळे पोषण मिळाल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्यही सुधारले.

4.समाजात सकारात्मक संदेश – या उपक्रमामुळे रात्रशाळा ही फक्त शिक्षणाचे केंद्र नसून, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी झटणारी संस्था आहे हे सिद्ध झाले.

मुख्याध्यापक व शिक्षक यांची ही संवेदनशीलता आणि मासूम संस्थेचे सहकार्य हे खऱ्या अर्थाने शाळा म्हणजे संस्कार, सहानुभूती आणि समाज बदलाची जागा असते हे अधोरेखित करते. शिक्षण हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नसून, माणसाच्या मूलभूत

गरजांची पूर्तता करत त्याला उभे करण्याचे काम रात्रशाळा करत आहे, हे या उपक्रमातून स्पष्ट होते.

गुणवंत आणि प्रयत्नशील विद्यार्थ्यांचे रोख पारितोषिकांद्वारे प्रोत्साहन – मुख्याध्यापक सरांची प्रेरणादायी भूमिका

रात्रशाळेतील विद्यार्थी हे अनेक सामाजिक, आर्थिक अडचणींना तोंड देत शिक्षण घेत असतात. काही जण दिवसभर मजुरी करून येतात, तर काहींवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी असते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही अनेक विद्यार्थी विविध विषयांमध्ये उत्तम कामगिरी करतात. त्यांच्या या मेहनतीला योग्य दाद देणे, त्यांचे कौतुक करून त्यांना पुढील यशासाठी प्रेरित करणे आवश्यक असते. शाळेचे मुख्याध्यापक सरांनी ही बाब अत्यंत संवेदनशीलतेने ओळखली. त्यांनी शाळेतील गुणवंत आणि मेहनती विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन करण्यासाठी विविध दानशूर व्यक्तींशी संपर्क साधून निधी गोळा करण्याचा उपक्रम हाती घेतला. त्यांच्या अथक प्रयत्नातून दरवर्षी विविध विषयांमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच प्रगतीशील विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे देण्यात येतात.


या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे हे पारितोषिक केवळ पहिल्या क्रमांकाच्या विद्यार्थ्यापुरते मर्यादित नसून, ज्यांनी विशेष मेहनत घेतली, नियमित हजेरी लावली, वर्तनात सुधारणा केली, किंवा शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी प्रयत्न केला अशांनाही गौरविण्यात येते. अशा प्रकारे प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गुणधर्मानुसार ओळख देण्यात येते.

मुख्याध्यापक आणि शिक्षक यांचे योगदान या उपक्रमात 'सिंहाचा वाटा' ठरतो. त्यांनी समाजातील नामांकित उद्योजक, निवृत्त शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, माजी विद्यार्थी, तसेच CSR निधी असलेल्या संस्थांना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या यशामध्ये थेट गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. मुख्याध्यापकांच्या प्रभावी संवादशैलीमुळे अनेक दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन हा उपक्रम यशस्वी केला.

या रोख बक्षिसांचा विद्यार्थ्यांवर सकारात्मक परिणाम दिसून आला.

1. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेची सकारात्मक भावना निर्माण झाली.
2. ज्यांना याआधी कोणी ओळखले नव्हते, अशा विद्यार्थ्यांनाही आत्मविश्वास मिळाला.
3. पालकांची शाळेकडे अधिक ओढ निर्माण झाली.
4. विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षणासाठी बचत करण्यास सुरुवात केली.

या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थी केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्याही सक्षम बनत आहेत. सरांचा दृष्टीकोन हा केवळ परीक्षेच्या गुणांवर केंद्रित न राहता, विद्यार्थ्याच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर केंद्रित आहे.



अशा प्रेरणादायी उपक्रमांमुळे रात्रशाळा म्हणजे "फक्त गरीब मुलांसाठीची शाळा" हा दृष्टिकोन बदलून ती समाज घडवणारी आणि आत्मनिर्भर नागरिक घडवणारी प्रयोगशाळा बनते, हे पुन्हा एकदा सिद्ध होते.



पान नं. ५ दैनिक नवा मराठा

भाई सरथा नाईट हायस्कूलमध्ये शिक्षणदूत अभियान प्रारंभ प्रसंगी बोलताना चेअरमन डॉ. पारस कोठारी व उपस्थित रात्रशालेतील विद्यार्थी. दूसऱ्या छायाचित्रात शिक्षणदूत अभियानात सहभागी झालेले रात्रशालेचे विद्यार्थी. सम्पेत शरद पवार, मंगेश भुते, पी. एच. शिंदे, ओमकार भिंगारदिवे, स्वाती होले, विलास बढवे, सुभम पाचारणे आदी.

दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पंखात बळ निर्माण करण्याचे काम रात्रशाळा करत आहे

डॉ. पारस कोठारी यांचे प्रतिपादन; भाई सरथा नाईट हायस्कूलमध्ये शिक्षणदूत अभियानाचा प्रारंभ

नगर – भाई सरथा नाईट हायस्कूलमध्ये गेल्या ७२ वर्षांपासून शिक्षणात खंड झालेल्या, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या शाळाबाह्य, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांनी प्रवेशित होऊन आपला शैक्षणिक स्तर उंचावलेला आहे. अनेक विद्यार्थी रात्र शाळेत शिक्षण घेऊन सक्षमपणे रोजगार करत असून, त्यांनी आपली प्रगती साधली आहे. दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पंखात शिक्षणाने बळ निर्माण करण्याचे काम ही रात्रशाळा करत आहे. आजही अनेक शाळाबाह्य विद्यार्थ्यांना रात्र शाळा ही संकल्पना माहित नाही. अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले जाणार असल्याचे डॉ. पारस कोठारी यांनी सांगितले.

परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडून शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेच्या माध्यमातून पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने हिंद सेवा मंडळ संस्थेच्या भाई सरथा नाईट हायस्कूलने शिक्षणदूत अभियानाचे प्रारंभ करण्यात आले. रात्र शाळेतील विद्यार्थी शिक्षणदूत म्हणून समाजात शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेत आणण्याचे काम करण्याची ही संकल्पना आहे.

या अभियानाचा प्रारंभ रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या उपस्थितीमध्ये झाला. यावेळी प्राचार्य सुनील सुरसे, शिक्षक महादेव राऊत, अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, बाळू गोरडे, कैलास करांडे, अनिरुध्द देशमुख, अनिरुध्द कुलकर्णी, अविनाश गवळी, कैलास बालटे, महिला शिक्षिका वैशाली दुरापे, वृषाली सातालकर आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

रात्र शाळेतील ५५ विद्यार्थ्यांनी शिक्षणदूत होण्यासाठी पुढाकार घेतला असून, हे विद्यार्थी त्यांच्या भागातील शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेत आणण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत. भाई सरथा नाईट हायस्कूल मध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता आठवी ते बारावी ५०४ विद्यार्थी (विद्यार्थी २६४ व विद्यार्थिनी/महिला २४०) प्रवेशित झाले आहेत. दिवसा अर्थार्जन रात्री ज्ञानार्जन करण्याची संधी शहरातील सर्व गरजवंतांना उपलब्ध होत आहे. सोबतच मासूम संस्थेच्या (मुंबई) वतीने रात्र शाळेत प्रवेशित होऊन शैक्षणिक स्तर उंचावणाऱ्या गरजवंत विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी (शिष्यवृत्ती)आर्थिक मदत देण्यात येते.

आज अखेर मासूम संस्थेच्या वतीने फॅशन डिझायनिंगसाठी १२ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ४८ हजार रुपये) डीएमएलटी साठी ०३ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ५४ हजार रुपये) ब्युटी पार्लर साठी ०२ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ४५ हजार रुपये) या व्यतिरिक्त इतर व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी (शिष्यवृत्तीस) आर्थिक मदतीस पात्र झालेले असल्याची माहिती प्राचार्य सुनील सुरसे यांनी दिली.

भाई सरथा नाईट हायस्कूल मध्ये शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण देखील दिले जात असून, यासाठी जन शिक्षण संस्था, रिद्धी प्रसा मेडिसिल, इंडियन अकॅडमी ऑफ फॉशन डिझायनिंग, ट्राय लॉजिक सॉफ्ट सोल्युशन, ऐ.पी. प्रा.लि. (एफआयडीसी), ग्लोबल रिच स्किल ट्रेनिंग इंडिया प्रा.लि हे रात्र शाळेशी जोडलेल्या गेल्या आहेत.

शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य करणारे शरद पवार, मंगेश भुते, पी.एच. शिंदे, ए.सी. ओमकार भिंगारदिवे, महिला शिक्षिका स्वाती होले, विद्यार्थी सुभम पाचरणे यांना डॉ. कोठारी व शालेय समितीचे सदस्य विलास बढवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. एस. शिंदे व श्री. गाडगीळ यांनी केले, या उपक्रमास शिक्षण विभाग व संस्थेचे अध्यक्ष प्रा. गिरीष मोडक, कार्यवाह अनंत पळशीस, मानद सचिव संजय जोशी, जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व सर्व संचालक मंडळाने शुभेच्छा दिल्या.

अडचणी आणि उपाय

या उपक्रमांदरम्यान काही अडचणीही आल्या:

विद्यार्थ्यांचा वेळ व्यवस्थापन – अनेक विद्यार्थी दिवसभर काम करतात आणि संध्याकाळी शाळेत येतात, त्यामुळे त्यांना प्रशिक्षणासाठी वेळ काढणे अवघड गेले.

तांत्रिक साधनांची कमतरता – संगणक, प्रोजेक्टर, कार्यशाळा साहित्य यांचा अभाव जाणवला.

आर्थिक मर्यादा – शाळेला आणि संस्थांना निधीची कमी भासली.

उपाय

वेळेची लवचिकता ठेऊन प्रशिक्षण सत्रांचे वेळापत्रक ठरवले गेले.

स्थानिक स्वयंसेवी संस्था, CSR निधी आणि समाजातील दानशूर व्यक्तींना जोडून तांत्रिक साधनांची उपलब्धता वाढवली.

सरकारी योजना आणि CSR प्रकल्पांद्वारे निधी मिळवण्याचे प्रयत्न सुरू ठेवले.

भविष्यातील योजना

मुख्याध्यापकांनी पुढील गोष्टींचा आराखडा तयार केला आहे:


1. शाळेत कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे.
2. ऑनलाईन प्रशिक्षण आणि ओपन लर्निंगसाठी सुविधा निर्माण करणे.
3. विद्यार्थ्यांसाठी स्वयंरोजगार किट वाटप योजना.
4. शाळाबाह्य मुलींसाठी खास प्रशिक्षण सत्रे आणि सुरक्षित वातावरणाची हमी.
5. महिला, मुलींसाठी शाळेत नियमित येण्या-जाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

निष्कर्ष

रात्रशाळा म्हणजे केवळ शिक्षण घेण्याची जागा नाही, तर ती जीवन बदलणारी संधी असते. अनेक कारणांमुळे शिक्षणापासून दूर गेलेले विद्यार्थी, विशेषतः महिलावर्ग आणि कामगार, या शाळेतून नव्या जीवनाची सुरुवात करतात. अशा रात्रशाळांमध्ये विद्यार्थ्यांची व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे हे काळाची गरज आहे, हे ओळखून ज्युनिअर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूल, अहिल्यानगर येथील मुख्याध्यापक सुनील सुसरे सरांनी या दिशेने महत्वाचे पाऊल उचलले.

मुख्याध्यापक म्हणून त्यांनी 'विद्यार्थी प्रथम' हे तत्व स्वीकारले. त्यांना हे पूर्णपणे जाणवले की फक्त पुस्तकी ज्ञान देऊन विद्यार्थ्यांचे आयुष्य बदलणार नाही. त्यांना शाळेत आकर्षित करण्यासाठी आणि त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे अत्यावश्यक आहे. म्हणून त्यांनी रात्रशाळेत व्यावसायिक अभ्यासक्रम, प्रशिक्षण कार्यशाळा आणि बाह्य संस्थांच्या सहकार्याने कौशल्यविकास कार्यक्रम सुरू केले. या कार्यक्रमांमध्ये शिलाई प्रशिक्षण, ब्यूटी पार्लर कोर्स, मोबाईल रिपेअरिंग, संगणक शिक्षण, वक्तृत्व व संवाद कौशल्य, तसेच लघुउद्योग प्रशिक्षण असे विविध कोर्सेस घेण्यात आले. विशेषतः महिलांसाठी सुरक्षित आणि सुसज्ज वातावरणात प्रशिक्षण दिले गेले, ज्यामुळे महिलांचा सहभाग लक्षणीय वाढला.


प्रशिक्षणासाठी दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था, CSR निधी यांच्या सहकार्याने साधनसामग्री उपलब्ध करून दिली गेली. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केवळ कौशल्येच शिकली नाहीत, तर स्वावलंबन, आत्मविश्वास आणि सामाजिक प्रतिष्ठा देखील मिळवली. अनेक विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू केला किंवा चांगल्या नोकऱ्या मिळवल्या. मुख्याध्यापक सरांचे एक वेगळेपण म्हणजे, ते केवळ योजना तयार करत नाहीत, तर स्वतः त्या अंमलात आणण्यासाठी झटत असतात. विद्यार्थ्यांना दररोज प्रेरणा देणारी भाषणे, मार्गदर्शन व वैयक्तिक संवाद यामधून ते शिक्षण व कौशल्यांचे महत्व सतत समजावून सांगतात.



या उपक्रमामुळे ज्युनिअर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूल, अहिल्यानगर ही महाराष्ट्रातील सर्वाधिक महिलांना शिकवणारी आणि कौशल्य मिळवणारी रात्रशाळा ठरली आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली असून शाळेचा निकालही उजळला आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, रात्रशाळेत व्यावसायिक कौशल्य विकासाचे जे कार्य झाले आहे, ते मॉडेल म्हणून इतर शाळांसाठी प्रेरणादायी आहे. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे रात्रशाळा केवळ शिक्षण केंद्र न राहता व्यावसायिक, सामाजिक आणि वैयक्तिक उन्नतीचे केंद्र बनते.शाळेचे मुख्याध्यापक हे केवळ प्रशासकीय प्रमुख नसून, विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे मार्गदर्शक असतात. रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना कौशल्य विकास आणि रोजगाराचे पर्याय उपलब्ध करून देणं, तसेच शाळाबाह्य लोकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणं हे एक अत्यंत प्रेरणादायी आणि समाजहिताचे कार्य आहे. मासूम संस्था आणि जनशिक्षण संस्थेच्या सहकार्याने राबवलेले उपक्रम हे देशभरातील रात्रशाळांसाठी एक आदर्श उदाहरण ठरू शकते. या प्रकारची शिक्षणाची चळवळ ही केवळ शाळेच्या भिंतीत सीमित न राहता, संपूर्ण समाजात परिवर्तन घडवू शकते. अशा उपक्रमांचे राज्य आणि देशपातळीवर कौतुक आणि अनुकरण होणे ही काळाची गरज आहे.

----------**----------



कृतीकेंद्रित शिक्षणाअंतर्गत विद्यार्थी विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी


शाळेचा पत्ता : केंद्र.मा.दौंडी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर.

मुख्याध्यापकाचे नाव : श्रीम.पालवे वनिता अण्णासाहेब

मुख्याध्यापक ई-मेल : vanitadhakane3012@gmail.com

प्रस्तावना -

पाथर्डी तालुका हा उसतोड कामकारांचा तालुका असून पर्जन्यछायेचा प्रदेश म्हणून दुष्काळग्रस्त तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यात १८ केंद्र अंतर्गत २८७ जि. प. च्या शाळा असून खाजगी माध्यमाच्या ११७ शाळा आहेत. ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत अनेक कुटुंबातील माणसे उसतोडणीसाठी महाराष्ट्रातील विविध साखर कारखान्यावर, जातात. तालुक्यात अत्यंत दुर्गमभागात आष्टी तालुक्याच्या सीमेवर निसर्गरम्य डोंगराच्या पायथ्याशी आहे. जि.प. प्राथमिक उपक्रमशील शाळा शिंदेवाडी पाच वर्षापूर्वी पटाअभावी बंद पडणाऱ्या शाळेत तंत्रस्नेही उपक्रमशील, शिक्षिका बदलीने हजर झाल्या. अतिशय प्रतिकूल रिस्थिती मध्ये आव्हानात्मक शाळेत विविध समस्यावर मात करत या शिक्षिकेने शाळेचा चेहरा-मोहरा बदलव्याचा, चंगच बांधला. सातारा जिल्ह्यातील कुमठे बीट मधील कार्यरत आणखी एक उपक्रमशील तंत्रस्नेही शिक्षिका बदलीने हजर झाल्या. जुन्या कार्यरत शिक्षिकेला त्यांना पाहून हर्ष न झाला तर नवलच. वर्षभर एक शिक्षकी असलेली, शाळा द्वीशिक्षकी झाली. माता पालक गटाची स्थापना, सक्षम शालेय व्यवस्थापन समिती नियमित होणाऱ्या पालक सभा, पालक सभेत होणारी विदयार्थ्यांची शैक्षणिक चर्चा, शालेय इमारतीला दिलेला, सुंदर, रंग, बोलक्या भिंती पाहून शाळेची चर्चा परिसरात होऊ लागली. बहिरगावी जाणारी मुले शिंदेवाडीच्या शाळेत येऊ लागली. बघत बघत १० पटाची शाळा 20 पटाची शाळा झाली याचे कारण शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रम त्याला तंत्रज्ञानाची जोड व शाळेतील दोनही महिला शिक्षिकांचा आत्मविश्वास, शैक्षणिक कामकाज व पालक ग्रामस्थ यांची खंबीर साथ.



८० लोकवस्ती असणारी ४६० लोकसंख्येच्या गावात, सन 2099 च्या जगगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण केवळ ५६ % होते. तथापि गेल्या ५ वर्षामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याचा विडा या दोन महिला शिक्षिकेने उचलला व आज गावाचे साक्षरतेचे प्रमाण मोग्या प्रमाणात वाढविण्यात या शिक्षिकांचा सिंहाचा वाटा आहे . शाळा भेटी करत असताना क्षेत्रिय अधिकारी यांना दुर्गम भागातील शाळेत खालील नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू असल्याचे निदर्शनास आले.

१] बाला उपक्रमांतर्गत भौतिक सुविधा - शाळेला 2 वर्गखोल्या १ ली ते ४ थी वर्ग भरतात. समग्र शिक्षा अभियान मधील असून शाळेत सन २०१२ ला एक नवीन वर्गखोली बांधकाम झाले. मुलामुलीसाठी हँडवॉश स्टेशन व स्वतंत्र स्वच्छतागृह इ. सोई आहेत. तसेच पूर्वीची, खोली व आताची स्लॅबची वर्गखोली, झाल्यामुळे ग्रामस्थ, पालक यांच्यामध्ये उत्साह संचारला. ग्रामस्थांच्या लोकसहभागातून शाळेची आकर्षक, सुंदर रंगरंगोटी केली. ' बाला' (Building as learning aid) उपक्रमा अंतर्गत सर्व वर्गाच्या भिंती सुंदर शैक्षणिक चित्रातून बोलक्या केल्या. वर्गामध्ये डिजिटल फ्लेक्स लावले. यामधून संपूर्ण बेसिक ते ॲडव्हान्स्ड अभ्यास समाविष्ठ केला आहे.






२] इंटरॲक्टिव बोर्डचा वर्ग अध्यापनात प्रभावी वापर - शाळेतील दोनही शिक्षकाचा उत्साह पाहून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पंचसूत्री उपक्रमाद्वारे ग्रामपंचायतीने १ इंटरॲक्टिव बोर्ड व 9 LED संगणक, सोलर सिस्टिम मोठ्या 'डस्टबीन, पेव्हिंग ब्लॉक' दिले. इंटरॲक्टिव बोर्डमध्ये शालेय अभ्यासक्रम 'इन्स्टॉल केला. छोटी मोठी मुले माऊसच्या मदतीने संगणक हाताळू लागले. इंटरॲक्टिव बोर्ड चालू करणे, विषय निवडणे, घटक शोधणे, प्रश्नोत्तराचा खेळ खेळणे, अशा उपक्रमांमुळे १००% शालेय उपस्थिती वाढली. शाळेची गोडी वाढून, तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढून शाळा प्रगत झाली. .

३] वैशिष्ट्यपूर्ण शालेय परिपाठ - शाळेचा परिपाठ म्हणजे विदयार्थ्यांसाठी पर्वणीच होय. ब्लूटूथ व संगीताच्या तालासुरात शालेय परिपाठ घेतला जातो. राष्ट्रगीताबरोबरच दररोज वेगवेगळी प्रार्थना, पंचाग, कला, जिल्हयातील ताज्या घडामोडी वरील बातम्या सामान्यज्ञानावरील प्रश्न, पुस्तक परिचय, लेझिमच्या तालावर तारखेचा पाढा, अशा वैशिष्ट्यपूर्ण शालेय परिपाठात १००% मुले सहभागी होतात.

४] शिष्यवृत्ती पूर्व सराव तासिका - अहिल्यानगर जिल्हा परिषदेचा एक स्त्युत्यू उपक्रम म्हणजे 'मिशन आरंभ' उपक्रम ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना स्पर्धा परिक्षेची गोडी लागावी म्हणून इयत्ता 2 री पासूनच, शिष्यवृत्ती पूर्व जादा सराव तासिका शाळेत नियमित घेतली जाते. इंटरॲक्टिव बोर्ड मधून इ. 2 री ते ४ थी च्या वर्गातील विदयार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या जातात. यामुळे विदयार्थ्यांची स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतली जाते.




-काराचे शब्द
कि खि गि घि
चि छि जि झि
टि ठि डि ढि
णि ति थि दि
धि नि पि फि
बि भि मि यि रि
लि वि शि षि सि
हि ळि क्षि त्रि
-काराचे शब्द
-काराचे शब्द
-काराचे शब्द
फा
या रा
षा सा
क्षा ज्ञा

५] सण समारंभा नुसार साहित्य बनविणे - वर्षभरात येणाऱ्या प्रत्येक सण समारंभानुसा शाळेत उत्साहात साजरे होतात. त्यानुसार शाळेत गणपती बनविणे, बैलपोळ्याला माती शाडूचे बैल बनविणे रक्षाबंधनाला कागदी राख्या बनविणे, दिपावलीला मातीच्या पणत्या बनविणे, आकाश कंदिल तयार करणे, किल्ले बनविणे अशा कार्यशाळा घेऊन विदयार्थ्यांची



सृजनात्मक क्षमता वाढविण्याचे कार्य शाळेत केले जाते. सण समारंभ, उत्सवामधून 'सर्वधर्म समभाव ची शिकवण शाळेत दिली जाते


६] भाषिक क्षमता विकासासाठी विविध उपक्रमाचे आयोजन - ग्रामीण भागातील विदयार्थ्यांची भाषिक क्षमता वाढविण्यासाठी शाळेत भाषा समृद्ध वातावरणाची निर्मिती व कृतीतून क्षणासाठी व विदयार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम घेतले जातात. जसे विदयार्थ्यांना आपले अनुभव कायम करणे. एखादया विषयावर चर्चा करणे, गावाच्या, शब्दांच्या भेंड्या नाटिका सादर खेळणे, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करणे, करणे, बडबडगीत, कृतीयुक्त गीताचे सादरीकरण करणे, वाचन साहित्य उपलब्ध करणे, चित्रवाचन घेणे, उतान्याचे'प्रकटवाचन होंगे, भाषिक खेळ, शब्दकोडे सोडविणे, गटानुसार शिकविणे, अशा विविध उपक्रमामुळे विदयार्थ्यांची भाषिक विकासासाठी शाळेत उपक्रम घेऊन भाविक क्षमता, शब्दसंपत्ती वाढविली जाते.





शिक्षण हक्क कायदा 2000 नुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना बालस्नेही वातावरणात सहज व सोप्या पद्धतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिंदेवाडी सारख्या ग्रामीण दुर्गम भागात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून काम करणाऱ्या महिला शिक्षकांना त्याचे श्रेय निश्चित जाते. शिक्षकांनी विदयार्थ्यांसाठी अध्यापनाचे काम केल्यावर शिक्षकाच्या भरीव शैक्षणिक कामकाजावर उदयाचा समाज व राष्ट्र घडत असते. आपल्या तंत्रस्नेही, नाविन्यपूर्ण, शिक्षणाबद्दल शिक्षकांमध्ये आत्मसन्मानाची भावना वाढून अशा आदर्शवत काम करणाऱ्या शिक्षकांबद्दल समाजाप्रती त्यांचे मूल्य निश्चित वाढून प्रगत महाराष्ट्राचे स्वप्न साकार होईल असा विश्वास वाटतो.

----------**----------



कौशल्य आधारित आणि व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी शालेय नेतृत्वाची अग्रगण्य भूमिका

शाळेचे नाव : प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर, जि.अमरावती

शाळेचा पत्ता : विदर्भ प्रबोधन मंडळ,दर्यापूर, जि.अमरावती

शाळेचा ईमेल : prabodhan234248@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : सौ.प्रतिभा राजेश्वर संत


मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक : 9421025202

एकूण विद्यार्थी संख्या 1995 असलेल्या प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना 1939 मध्ये झाली असून 1939 मध्ये लावलेल्या रोपट्याचे आता वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. अमरावती जिल्ह्यात दर्यापूर तालुक्यात हे एकमेव कनिष्ठ महाविद्यालय आहे जिथे सर्वात जास्त विषय शिकविले जातात, या विद्यालयाची बोर्डाची निकालाची परंपरा सुरुवातीपासून कायम आहे, दरवर्षी दहावी व बारावीचे विद्यार्थी मेरिटमध्ये असतात, अमरावती जिल्ह्यातून सुद्धा काही विद्यार्थी प्रथम असतात, सर्वात जास्त विषय शिकविण्याकरता असलेले हे कनिष्ठ महाविद्यालय म्हणून नावलौकिक आहे. प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालय दर्यापूर येथे 1978 -1979 पासून द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम व 1988 -1989 पासून अधिक दोन स्तरावरील एच एस सी, Vocational हे दोन व्यावसायिक अभ्यासक्रम यशस्वीपणे राबविले जात आहेत. द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये इलेक्ट्रिकल मेंटेनन्स व ॲनिमल सायन्स हे दोन विषय शिकविले जातात अधिक दोन स्तरावरील एच एस सी ,Vocational या अभ्यासक्रमात इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी व ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी हे दोन विषय शिकविले जातात. द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमातून अनेक इंजिनियर व डॉक्टर तयार झालेले आहेत समाजात चांगल्या प्रकारे सेवा देत आहे अनेक डॉक्टर, इंजिनियर हे केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या सेवेत आहेत, अधिक दोन स्तरावरील अनेक विद्यार्थी उत्तीर्ण होऊन बरेच विद्यार्थी स्वयंरोजगार करीत आहे. शेकडो विद्यार्थी हे उच्चशिक्षित आहेत व काही उच्च शिक्षण घेत आहे. अनेक विद्यार्थी हे शासकीय व निमशासकीय सेवेत आहे या दोन्ही व्यावसायिक

अभ्यासक्रमाचा समाजाला चांगला उपयोग होत आहे. हे दोन्ही अभ्यासक्रम प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालयात यशस्वीपणे राबविल्या जात आहे.


प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये माननीय मुख्याध्यापकांनी कौशल्य आधारित व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व सांगणारे मार्गदर्शनाचे आयोजन केले. या कार्यक्रमाकरिता वर्ग दहावा व वर्ग बारावीचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य सौ प्रतिभा रा. संत , ह्या होत्या. कार्यक्रमाचे संचालन मयूर भागवत सर यांनी केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा त्यांना वेगवेगळे कौशल्य प्राप्त व्हावे विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडून ज्ञान मिळवावे व कौशल्य विकसित करावे यावर विस्तृतपणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. ह्या विषयावर मयूर भागवत सर ,संजय मनोहरे सर, आकाश सोळंके सर, मा.प्राचार्य संत मॅडम, यांनी कौशल्यावर आधारित व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ. संत मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी व्यवसाय शिक्षण घेऊन कौशल्य विकसित करावे, असे प्रतिपादन केले, कार्यक्रमाला संपूर्ण शिक्षक शिक्षिका हजर होते. विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला, शेवटी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचे शंका समाधान करण्यात आले. प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालयात चालू असलेल्या दोन्ही व्यवसाय अभ्यासक्रमांना माननीय प्राचार्य यांचे वेळोवेळी खूप सहकार्य असते. आमच्या विद्यालयात पूजा थोरात शिंदे मॅडम येऊन विद्यार्थ्यांना इन्स्पायर अवार्ड मानक यावर मार्गदर्शन करतात, ह्या मॅडम ऑनलाईन सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात , ह्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिझाइनिंग थिंकिंग, कल्पकतेचा उपयोग, समस्या सोडवण्याची मानसिकता आणि स्टीम शिक्षणाची ओळख निर्माण होते, अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना 21 व्या शतकातील आवश्यक कौशल्याचा पाया मिळतो, असे अनेक उपक्रम माननीय प्राचार्य व शालेय प्रशासनाच्या सहकार्याने या कनिष्ठ महाविद्यालयात राबविले जातात. प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालयात 1978- 1979 पासून द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे.

हे अभ्यासक्रम यशस्वीरित्या आजपर्यंत राबविण्यात येत आहे, ह्या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा प्रवेशा करता कल भरपूर आहे. हे अभ्यासक्रम सायन्स यासाठीची ऐच्छिक विषयी म्हणून जोडल्या गेलेले आहेत. विद्यार्थ्यांनी व्यवसाय शिक्षण घेऊन कौशल्य मिळवावे व




व्यवसाय करावा हा शिक्षणाचा या अभ्यासक्रमाचा मुख्य हेतू होता परंतु हा उद्देश शासनाचा सफल झाला नाही. या अभ्यासक्रमाचा फायदा अभियांत्रिकी शाखा व वैद्यकीय शाखेकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना भरपूर प्रमाणात होतो. कनिष्ठ महाविद्यालयात असतानाच या विद्यार्थ्यांना वैद्यकीय अभ्यासक्रमाची किंवा अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची या प्राथमिक माहिती मिळते. 1988-1989 पासून शासनाचे केंद्र शासन पुरस्कृत किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम शासनाने सुरू केले. हे अभ्यासक्रम कोणत्याही शाखेची न जोडता आट्र्स, कॉमर्स व विज्ञान या शाखेप्रमाणे एक स्वतंत्र व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून एक स्वतंत्र शाखा सुरू केली. किमान कौशल वर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव कालांतराने उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम,, (एच एस सी Vocational) असे करण्यात आले. द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमात अभियांत्रिकी गट व वैद्यकीय गट यामधील विषय असतात. प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालयात द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाचे अभियांत्रिकी गटातील इलेक्ट्रिकल मेंटेनन्स व वैद्यकीय गटातील ॲनिमल सायन्स हे विषय आहेत. 1978-1979 पासून हा अभ्यासक्रम आमच्या कनिष्ठ महाविद्यालयात व्यवस्थितपणे सुरू आहे. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद सुद्धा चांगला आहे.

प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालयात उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत अभियांत्रिकी गटातील इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी व ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी हे विषय शिकवल्या जातात. हे दोन्ही विषय ह्या कनिष्ठ महाविद्यालयात व्यवस्थित प्रमाणे चालू आहे. दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमात प्रवेश दिला जातो. त्या अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला आहे. इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी व ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी हे विषय घेऊन विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होतात ह्या विषयांचा निकाल उत्कृष्ट असतो. गेल्या 35 वर्षापासून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी उत्तम प्रकारे व्यवसाय करीत आहे. अनेक विद्यार्थी स्वयंरोजगार करीत आहे. स्वयंरोजगार करून विद्यार्थी चांगल्या पद्धतीने स्थायिक झालेले आहेत हे सर्व अभ्यासक्रम कौशल्य विकसित करून व्यवसायाभिमुख आहे. वरील अभ्यासक्रम उत्तीर्ण होऊन अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन महाराष्ट्र शासन व केंद्र शासन नोकरीत आहे. काही विद्यार्थी निमशासकीय सेवेत आहे. अनेक विद्यार्थी उच्चशिक्षित आहे. या अभ्यासक्रमाचा समाजाला चांगला फायदा आहे. हा अभ्यासक्रम प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालयात गेल्या 36 वर्षापासून व्यवस्थितपणे चालू आहे. प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालयात कौशल्य विकास व



व्यवसाय अभ्यासक्रमावर नेहमीच मार्गदर्शन दिले जाते. या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना दहावी व बारावीत विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षात दोन वेळा मार्गदर्शनपर भाषण दिले जाते. या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान दिले जाते. मार्गदर्शनासाठी व्याख्याते बोलवून व्याख्यान आयोजित केल्या जाते. विद्यार्थ्यांना या व्याख्यानाचा खूप फायदा होतो. कौशल्य विकास व व्यवसाय शिक्षण यावर भर दिल्या जातो. अशाच प्रकारचे व्याख्यान दिनांक 9 ऑगस्ट 2024 शुक्रवार रोजी कौशल्या वर आधारित शिक्षणाचे व व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व सांगणारे मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्य सौ संत मॅडम ह्या होत्या. कार्यक्रमाचे संचालन मयूर भागवत सर यांनी केले या मार्गदर्शनाला वर्ग दहावीचे पाचही वर्गातील विद्यार्थी हजर होते. विद्यार्थ्यांनी संपूर्ण मार्गदर्शन मन लावून ऐकून घेतले. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगल्या प्रकारे होता. सौ प्रतिभा संत मॅडम, भागवत सर, संजय मनोहरे सर व आकाश सोळंके सर यांनी विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित शिक्षणाचे महत्त्व व व्यवसाय अभ्यासक्रमाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. प्रत्येक विषयाच्या शिक्षकांनी त्यांच्या विषयाचे महत्त्व पटवून सांगितले. त्यांच्या विषयातील रोजगारांच्या, स्वयंरोजगाराच्या संधी कुठे कुठे उपलब्ध आहेत हे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी काही प्रश्न विचारले, त्यांनी शंका विचारल्या, त्यांचे समाधान करण्यात आले.


विद्यार्थ्यांना कौशल्य विषयाचे व व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व तसेच पुढील रोजगाराच्या संधी व उच्च शिक्षणाच्या उपलब्ध असणाऱ्या संधी ही सर्व माहिती विद्यार्थ्यांना मिळाली असे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. आमच्या कनिष्ठ महाविद्यातील शिक्षक इतर शाळेत जाऊन सुद्धा वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांना कौशल्य व व्यवसाय शिक्षण याचे महत्त्व समजून सांगतात. व्यवसाय शिक्षणाच्या या दोन्ही अभ्यासक्रमाकडे मुख्याध्यापकांचे खूप लक्ष असते. व वेळोवेळी सर्व प्रकारचे सहकार्य असते व प्राचार्य यांच्या सहकार्यामुळे या कनिष्ठ महाविद्यालयात द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम व अधिक दोन स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम व्यवस्थितपणे यशस्वीरित्या चालू आहे. या कनिष्ठ महाविद्यालयात दरवर्षी व्यवसाय शिक्षण प्रदर्शनी आयोजित केल्या जाते तसेच आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या जिल्हास्तरीय व्यवसाय शिक्षण प्रदर्शनी मध्ये सहभाग असतो दरवर्षी व्यवसाय शिक्षण दिंडी सुद्धा काढल्या जाते. अशाप्रकारे कौशल्य विकास व व्यवसाय शिक्षणाकरता या कनिष्ठ महाविद्यालयात अनेक उपक्रम राबविले



जातात. हे सर्व उपक्रम यशस्वीरित्या राबवल्या जातात. प्रत्येक शैक्षणिक क्षेत्रात इंडस्ट्रियल व्हिजिट, औद्योगिक भेटी दिल्या जातात. निरनिराळ्या आस्थापनांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना संपूर्ण ज्ञान दिल्या जाते, जे उपकरणे प्रयोगशाळेत उपलब्ध नाहीत ती उपकरणे विद्यार्थ्यांना निळनिराळ्या आस्थापनेमध्ये नेऊन दाखविल्या जाते , त्यांचे वर्किंग समजावून सांगितल्या जाते, औद्योगिक भेटीकरता विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद असतो, याकरता शालेय प्रशासन व प्राचार्य यांचे मोलाचे सहकार्य असते. दर्यापूर तालुक्यात महाराष्ट्र शासनाची तंत्र माध्यमिक शाळा आहे. या तंत्र माध्यमिक शाळेत इयत्ता नववी व दहावीचे विद्यार्थी प्रवेशित असतात. ही तंत्र माध्यमिक शाळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था गव्हर्नमेंट आयटीआय, शिवर रोड दर्यापूर येथे आहे. प्रबोधन विद्यालया करता तर नंतर माध्यमिक शाळेकरता 60 विद्यार्थ्यांचा Intake आहे. साठ विद्यार्थी वर्ग नववी करता व साठ विद्यार्थी वर्ग दहावी करता प्रवेशित असतात. ह्या तंत्र शाळेमध्ये इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल विषय शिकण्याकरता असतात. वर्ग नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांकरता टेक्निकल प्रवेश याकरता माननीय मुख्याध्यापक प्रयत्न करतात. सर्व शिक्षक सुद्धा त्यांच्या परीने प्रयत्न करतात. दरवर्षी आमच्या शाळेतील 60 विद्यार्थ्यांचा प्रवेश असतो. या विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच तंत्र विषय व कौशल्य विषय याबाबत प्राथमिक माहिती मिळते. त्यांचा व्यवसाय शिक्षणाकडे कल वाढतो. या विद्यार्थ्यांचा जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रदर्शनी मध्ये सहभाग असतो. पुढे हीच मुले द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम किंवा अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रमाकडे प्रवेश घेतात. प्रबोधन विद्यालयातून तंत्र माध्यमिक शाळे करता भरपूर विद्यार्थी असतात. या अभ्यासक्रमाकरिता प्रवेश याकरता माननीय मुख्याध्यापक मुख्याध्यापक वेळोवेळी बरेचदा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात व इतर विषय शिक्षक देखील वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतात. म्हणूनच तंत्र माध्यमिक शाळे करता या विद्यालयातून भरपूर विद्यार्थी असतात, या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच कौशल्य शिक्षण व व्यवसाय शिक्षण व तंत्र शिक्षण याची आवड निर्माण होते. पुढे याच विद्यार्थ्यांमधून चांगले इंजिनियर व उद्योजक निर्माण होतात. आमच्या विद्यालयातून अनेक उद्योजक निर्माण झालेले आहे. प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालय येथील व्यवसाय शिक्षणाची यशोगाथा-- 1978__ 1979 पासून द्विलक्षीय व्यवस्था अभ्यासक्रम व 1988 __1989 पासून अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालय ,दर्यापूर येथे यशस्वीरित्या चालू आहे अधिक दोन स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम उत्तीर्ण होऊन

अनेक विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगार सुरू केला आहे. त्याचे निवडक फोटो सोबत जोडले आहेत. अनेक विद्यार्थी केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या सेवेत आहेत.

हजारो विद्यार्थी खाजगी कंपनीमध्ये नोकरीत आहे. द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमातील विद्यार्थी शेकडो इंजिनियर व डॉक्टर आहे. अनेक विद्यार्थी केंद्र शासकीय व राज्य शासकीय सेवेत आहे. अनेक विद्यार्थी शासनाच्या वर्ग एक व वर्ग दोन च्या सेवेत आहे . काही विद्यार्थी मंत्रालयात सुद्धा नोकरीवर आहेत व तेथूनच सेवानिवृत्त झालेले आहे. या दोन्ही व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या यशस्वीतेचा आलेख खूप चांगला आहे. प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालय कौशल्य विकास व व्यवसाय अभ्यासक्रम यावर नियमित चांगले कार्यक्रम घेऊन मार्गदर्शन केल्या जाते. या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर निरनिराळे व्याख्याते बोलवून व्याख्यान आयोजित केले जाते. विद्यार्थ्यांना ह्या व्याख्यानाचा खूप फायदा होतो, कौशल्य विकास व व्यवसाय शिक्षण या अभ्यासक्रमाकरिता असे अनेक कार्यक्रम राबविले जातात. कौशल्य विकास व व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत तसेच गृह व्यवस्थापन विषयाअंतर्गत कचऱ्यातून कला, खाद्यपदार्थांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता माननीय श्री कोल्हे साहेब ,उपशिक्षणाधिकारी व माननीय श्री. पवन मानकर साहेब हे उपस्थित होते. या प्रदर्शनीचा लाभ शाळेतील वर्ग पाच ते वर्ग बाराच्या विद्यार्थ्यांनी घेतला. या प्रदर्शनीमुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव मिळाला तसेच व्यवसाय शिक्षणाचे धडे गिरवले गेले. अशा प्रकारचे कार्यक्रम आमच्या कनिष्ठ महाविद्यालयात दरवर्षी घेतल्या जातात. अशा कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचाच नव्हे तर पालकांचा सुद्धा चांगला प्रतिसाद असतो. अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निरनिराळे कौशल्य विकसित होऊन व्यवसाय शिक्षणाचे सुद्धा धडे गिरवल्या जातात . प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालयामध्ये व्यवसाय शिक्षण व कौशल्य शिक्षण यावर भर दिल्या जाते व या अंतर्गत चालणाऱ्या सर्व कार्यक्रमांना माननीय प्राचार्य व शालेय प्रशासनाचे मोलाचे सहकार्य असते त्यामुळे कौशल्य शिक्षण व व्यवसाय शिक्षण हे या महाविद्यालयात यशस्वीरित्या चालू आहेत. या अभ्यासक्रमाला पालकांचा व विद्यार्थ्यांचा प्रतिसाद खूप चांगला आहे.



पायाभूत शिक्षण सक्षमीकरणासाठी मुख्याध्यापकांचा परिवर्तनकारी प्रयत्न

शाळेचे नाव : सीताबाई संगई कन्या शाळा, अंजनगाव सुर्जी, अमरावती

शाळेचा ईमेल : sskshala123@rediffmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : श्री उत्तमराव तुळशीरामजी मुरकुटे


मुख्याध्यापकाचा मोबाईल क्रमांक : 8275395824

मुख्याध्यापक ईमेल - uttammurkute10@gmail.com

प्रस्तावना -

शिक्षण ही केवळ ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्व विकासाची आणि सामाजिक परिवर्तनाची गुरुकिल्ली आहे.भारतातील शिक्षण व्यवस्था ही गेल्या काही दशकांत सतत सुधारणा करत चालली आहे. भारतातील ग्रामीण आणि शहरी भागात असलेल्या शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शाळांमध्ये आजही लाखो मुले शिकत आहेत. ही मुले सक्षम नागरिक बनावीत, यासाठी पायाभूत शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे. शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे जी फक्त पुस्तकी ज्ञान देत नाही, तर विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवते. एका चांगल्या नागरिकाचा पाया शिक्षणावरच आधारलेला असतो. भारतासारख्या विशाल व विविधतेने नटलेल्या देशात शिक्षण ही केवळ संधी नव्हे, तर सामाजिक समता आणि प्रगतीसाठी एक प्रभावी साधन ठरते.

गेल्या काही दशकांमध्ये आपल्या शिक्षणव्यवस्थेमध्ये विविध सुधारणा घडवून आणल्या गेल्या, परंतु ग्रामीण आणि दुर्लक्षित भागातील विद्यार्थ्यांसाठी आजही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणींवर मात करून विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणारा शिक्षक किंवा मुख्याध्यापक हा एक खरा 'परिवर्तनकर्ता' ठरतो. पायाभूत शिक्षण म्हणजेच मूलभूत साक्षरता (वाचन, लेखन) आणि संख्याज्ञान (गणिती कौशल्ये) या बाबींमध्ये विद्यार्थिनींना सक्षम करण्यासाठी मुख्याध्यापकांचे नेतृत्व अत्यंत महत्त्वाचे ठरते. या बदलाचा केंद्रबिंदू म्हणजे मुख्याध्यापक. एक सक्षम, दूरदर्शी व प्रेरणादायी मुख्याध्यापक संपूर्ण शाळेचा चेहरामोहरा बदलू शकतो. त्यांच्या दूरदृष्टीने, नियोजनाने आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शाळेमध्ये परिवर्तन घडवून आणले गेले आहे. ही यशोगाथा अशाच काही प्रेरणादायी प्रयत्नांवर आधारित आहे. अशाच एका मुख्याध्यापकाच्या दूरदृष्टी, कल्पकता आणि समर्पित प्रयत्नांची ही यशोगाथा — जिच्या केंद्रस्थानी आहे पायाभूत शिक्षणाचा दृढ पाया घालणं.



१. पायाभूत शिक्षण म्हणजे काय.?

पायाभूत शिक्षण म्हणजे : विद्यार्थ्यांना वाचता, लिहिता व समजून घेता येणे.

मूलभूत संख्याज्ञान मिळवणे (जसे की आकडेमोड, सरळ गणिती क्रिया, प्रमाणे, तसेच दैनंदिन जीवनात गणिताचा वापर करणे, व्यवहार कौशल्य साध्य करणे इत्यादी. हा पाया घट्ट असेल तर पुढील शिक्षण सुलभ होते. पायाभूत शिक्षण म्हणजे मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान.

साक्षरता :

विद्यार्थ्याला स्वयंपूर्णपणे वाचता, लिहिता आणि समजून घेता आलं पाहिजे. शालेय व जीवनातील व्यवहारांसाठी भाषिक कौशल्य आवश्यक आहे.

संख्याज्ञान:

दैनंदिन गणिती क्रिया - बे, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, आकडेमोड, अंदाज, प्रमाण, वेळ, मोजमाप, व्यवहार कौशल्य या शिक्षणाचा पाया पक्का झाला तर पुढील इयत्तांमधील संकल्पनांचा आत्मसात होणं सुलभ होतं. अभ्यासाला गती येते. चांगली वाचन क्षमता आणि गणिती सुस्पष्टता हीच 'गुणवत्तापूर्ण शिक्षणाची' खरी सुरुवात मानली जाते.

२. मुख्याध्यापकांचे नेतृत्व : शाळा परिवर्तनाचा पाया


मुख्याध्यापक म्हणजे शाळेचा कर्णधार. त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यात समन्वय साधता येतो. मुख्याध्यापक ही केवळ प्रशासकीय भूमिका नसून ती एक प्रेरणादायी नेतृत्वाची भूमिका आहे. शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये समन्वय साधून, एक स्पष्ट ध्येय ठरवून त्यासाठी एकत्रितपणे काम करणं हे नेतृत्वाचं खरे स्वरूप आहे. शिक्षकांना प्रोत्साहन देणं, विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे लक्ष देणं, पालकांचा सहभाग वाढवणं आणि एकूणच शाळेतील शैक्षणिक, सहशालेय आणि सामाजिक वातावरणात सकारात्मक बदल घडवणं — हे प्रमुख जबाबदारीचे भाग आहेत.

अशा काही पुढाकारांची चर्चा पुढीलप्रमाणे :

३. शाळांतील यशस्वी बदल —

शाळेचे नाव: सीताबाई संगई कन्या शाळा, अंजनगाव सुर्जी, जिल्हा- अमरावती

मुख्याध्यापक: श्री. उत्तमराव तुळशीरामजी मुरकुटे



समस्या:

काही विद्यार्थिनी अस्खलित वाचू शकत नव्हत्या

काही विद्यार्थिनी गणितात मागे

काही विद्यार्थिनींचा आत्मविश्वास कमी

काही विद्यार्थिनी भाषण कौशल्यात मागे

काही विद्यार्थिनी संभाषण कौशल्यात मागे

पालकांची उदासीनता

मुख्याध्यापकांचे प्रयत्न:

(१) स्थिती विश्लेषण व निदान

प्रत्येक विद्यार्थिनींचा साक्षरता आणि गणिती स्तर तपासला

मुलींचे "कौशल्य गट" तयार केले (नसणारे, अर्धवट, सक्षम)

(२) मिशन मोड मध्ये कार्य

'एक विद्यार्थी – एक नियोजन' तत्व

"रिमेडियल टीचिंग" तास सुरू केले

वाचन/गणित सप्ताह, कथाकथन स्पर्धा, वकृत्व स्पर्धा , सुंदर हस्ताक्षर स्पर्धा ,

खेळांद्वारे शिक्षण

प्रायोगिक शिक्षण पद्धतीचा वापर


कृतीतून शिक्षण

निसर्गातील प्रत्यक्ष अनुभव- हरित सेना, परसबाग

शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन व तयारी

NMMS परीक्षेचे आयोजन व तयारी

नवोदय परीक्षेची तयारी



MTS परीक्षेचे आयोजन व तयारी

सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा

चित्रकला परीक्षा

महावाचन प्रकल्प राबविण्यात आला

डॉ. होमी भाभा परीक्षेचे आयोजन

राज्यस्तरीय समूह गान स्पर्धेत उत्कृष्ट सहभाग

क्षेत्रभेट


विद्यार्थी देशाचे भवितव्य आहेत म्हणून त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही मुख्याध्यापकाची आणि शिक्षकांची सामूहिक जबाबदारी आहे. भारत सरकारच्या 'निपुण भारत' प्रकल्पांतर्गत शाळेत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. माता-पालकांचे गट तयार करून त्यांना मार्गदर्शन केले जाते.

विद्यार्थिनींना बौद्धिक कौशल्याच्या विविध कृती करता येतात. उदा. वस्तू किंवा चित्रातील लहान-मोठा फरक ओळखणे, वस्तूंच्या प्रकाराप्रमाणे वर्गीकरण करणे, वस्तूंच्या जोड्या लावणे, वस्तू क्रमाने लावणे इत्यादी.

मुलांना शैक्षणिक वातावरणात आनंदी व सुरक्षित वाटावे. चांगल्या सवयी विकसित व्हाव्यात. शरीर तंदुरुस्त राहावे, स्वतः बाबतचा आदर वाढावा, स्वतः बाबत सकारात्मक कल्पना निर्माण व्हाव्यात. सकारात्मक दृष्टीकोनाचे योग्य संवर्धन केल्यास तो आयुष्यभर लाभकारक ठरतो. सर्व शिक्षक मुलांच्या सामाजिक व भावनात्मक स्वास्थ्याची जपणूक करण्याचा प्रयत्न करतात.

त्यांच्याविषयी संवेदनशील असतात. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (Foundational Literacy and Numeracy-FLN) अभियानाची उद्दिष्ट्ये/यथाशोध प्राप्त करण्यासाठी स्थापित करण्यात आलेल्या माता गटांना शिक्षकांकडून मार्गदर्शन केले जाते.

उद्देश प्राप्तीसाठी आणि आनंदी व्यक्तिमत्त्वाची जोपासना करण्यासाठी शाळेत व शाळेबाहेर सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असतात; जे मुख्याध्यापक आणि शिक्षकसमूह करत आहेत. विविध उपचारात्मक कृती कार्यक्रमांतून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (Foundational Literacy and Numeracy- FLN) अभियानाची उद्दिष्ट्ये प्राप्त करण्याचे



प्रयत्न सुरु आहेत. या प्रक्रियेत मुलांच्या पालकांना विशेषतः मातांना सामावून घेण्यासाठी या प्रक्रियेत स्वयंसेवकांची मदत घेण्याचा प्रयत्न होतो.

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानात (FLN) सहभागी करून ऑडिओ, व्हिडिओ/कार्डद्वारे, मेळाव्यांद्वारे आणि विविध उपाययोजना करून माता गटांना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न होतो.

महिन्यातून एकदा माता गटांना शाळेत बोलावून त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांना येणाऱ्या अडचणीवर मार्गदर्शन करणे जेणे करून त्या समूहात एकत्र राहून मुलांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यात आणि निपुण बनविण्यात मदत करू शकतील. ह्या बैठकीचे स्वरूप हे कार्यशाळेचे राहील, असे नियोजन करण्याचा प्रयत्न केला जातो. या कार्यशाळांचे उद्दिष्ट माता गटांचा उत्साह वाढविणे, त्यांना मार्गदर्शन करणे, वेगवेगळ्या कल्पना देणे म्हणजेच कृती आधारित राहतील ह्याचाही प्रयत्न केला जातो.

मुलांना शैक्षणिक वातावरणात आनंदी व सुरक्षित वाटावे. चांगल्या सवयी विकसित व्हाव्यात. शरीर तंदुरुस्त राहावे, स्वतः बाबतचा आदर वाढावा, स्वतः बाबत सकारात्मक कल्पना निर्माण व्हाव्यात. सकारात्मक दृष्टीकोनाचे योग्य संवर्धन केल्यास तो आयुष्यभर लाभकारक ठरतो. सर्व शिक्षक मुलांच्या सामाजिक व भावनात्मक स्वास्थ्याची जपणूक करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्याविषयी संवेदनशील असतात.

शिक्षकांचा प्रशिक्षण कार्यक्रम

FLN (Foundational Literacy & Numeracy) संदर्भात ऑनलाईन/ऑफलाईन प्रशिक्षण

अविरत द्वारे प्रशिक्षण

D.I.E.T Amravati अंतर्गत प्रशिक्षण

वरिष्ठ वेतन श्रेणी अंतर्गत प्रशिक्षण तसेच निवड श्रेणी अंतर्गत प्रशिक्षण


शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण 2.0 अंतर्गत प्रशिक्षण

SWAYAM / MOOC द्वारे प्रशिक्षण

दीक्षा ॲपद्वारे प्रशिक्षण

सहशिक्षकांत सामूहिक नियोजन

दर आठवड्याला रिव्ह्यू मीटिंग



पालकांना जोडणे

मासिक पालक-शिक्षक बैठक

माता पालक-शिक्षक समिती द्वारे चर्चा

परिवहन समिती

सरोजदेवी फाउंडेशन अंतर्गत विद्यार्थिनींच्या व्यक्तिगत समस्या सोडवण्यासाठी शिक्षक विद्यार्थिनी व माता पालक यांची बैठक

POCSO कायद्याचे पोलिसांद्वारे अद्यावत ज्ञान पालक व विद्यार्थिनींना देण्यात आले.

विद्यार्थिनींच्या आकलनावर भर

गणितात "मनातले गणित", गणित कोपरा, वैदिक गणित , घनफळ आणि पृष्ठफळ - कागदी घन आणि घन कोण तयार करणे, अपवर्तक भिन्न कागदी चकतीचा वापर, कोन मोजण्याचा प्रयोग, परीमिती व क्षेत्रफळ आलेख प्रयोग, इ.

साक्षरतेसाठी - चित्रवाचन , सृजन लेखन, चित्र व कथा जुळवा, शब्दफुली, कहाणी साखळी, श्रवण समज , शब्दकोड्यांचा खेळ , शब्दपेटी , शब्दफेरी, आपली गोष्ट लिहा व सांगा, वर्णमाला उधळण, नाटक/भूमिका, इ.


यशाचे मोजमाप

- ६ महिन्यांतील बदल :
- ९५ % विद्यार्थिनी वाचनात सक्षम
- ९५ % मूलभूत गणिती कौशल्ये आत्मसात
- शिक्षक अधिक प्रेरित
- पालकांची सक्रियता वाढली

डिजिटल साधनांचा उपयोग

मुख्याध्यापकांनी पुढील साधनांचा प्रभावी वापर केला:

- DIKSHA App: शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी संसाधने
- YouTube चॅनेल्स:
- ‘नवनीत सॉफ्टवेअर,
- WhatsApp गट: शिकवण्याचा फॉलोअप गृहपाठ व पालकांशी संवाद
- Zoom/Google Meet – डिजिटल समुपदेशन व प्रशिक्षण



उपाय योजना

- अभ्यासाचे वैयक्तिक वेळापत्रक
- सहवयीन अध्ययन
- श्रेणीवारी शिक्षण
- कार्यानुभव व कृती आधारित शिक्षण
- समुपदेशन सेवा
- संवाद सत्र
- मैत्री गट
- नियमांचे दर्शन व चर्चा
- स्व-अध्ययनाची सवय
- वाचन कट्टा
- भाषण, निबंध, चित्रकला स्पर्धा ,
- नाटिका, समूहगान, नृत्य.
- पालक-शिक्षक संवाद.

धोरणात्मक बदलात मुख्याध्यापकांचा सहभाग

- "निपुण भारत मिशन" लागू करताना अनेक मुख्याध्यापकांनी जिल्हा परिषद व शासन यांच्यासोबत सहकार्य केले.
- दृष्टी व उद्दिष्ट निश्चित केले.
- शिक्षक व पालक यांचा सहभाग वाढवला
- सर्व समावेशक नेतृत्व केले.
- शालेय अभ्यासक्रमात सुधारणा सुचवल्यात
- सुव्यवस्थापनासाठी धोरणे तयार केली.
- धोरण राबवण्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केले.
- राबवलेल्या धोरणांचा परिणाम दरमहा/ त्रैमासिक तपासणी केली.
- शाळा-विकास आराखड्यात साक्षरता व संख्याज्ञान केंद्रस्थानी ठेवले

शैक्षणिक गुणवत्ता मूल्यांकन

- SAT आणि NAS चाचणी निकालांत सुधारणा
- शैक्षणिक प्रगतीचे आकडेवारी आधारित विश्लेषण
- शिक्षकांचे अध्यापन कौशल्य अधिक सक्षम
- शाळेची राज्यस्तरीय स्पर्धांमधील कामगिरी उल्लेखनीय
- विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती झाली
- सहशालेय व सांस्कृतिक उपक्रमातील विद्यार्थिनींचा सहभाग वाढला



- मूल्यमापनात सुधारणा
- शाळेची श्रेणी उंचावली
- शिक्षकांचे अध्यापन कौशल्य व नियोजन
- शिक्षकांचे विद्यार्थिनींना मार्गदर्शन
- शिक्षकांचा सातत्याने प्रशिक्षणात सहभाग
- मूल्यांकनाची पारदर्शक पद्धती व न्याय पद्धतीचा वापर

उपसंहार :

शाळा ही केवळ इमारत नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याची शिल्पशाळा आहे आणि त्या शिल्पकाराची भूमिका मुख्याध्यापक उत्कृष्टरित्या पार पाडतो. त्यांच्या दूरदृष्टी, चिकाटी आणि विद्यार्थ्यांवरील प्रेमातूनच अशक्य ते शक्य होते. पायाभूत शिक्षण हे कोणत्याही शिक्षण व्यवस्थेचे मूलभूत तत्त्व आहे. जेव्हा एक मुख्याध्यापक त्या दिशेने सकारात्मक, समर्पित आणि अभ्यासपूर्ण प्रयत्न करतो, तेव्हा तो समाजाच्या भविष्यात अमूल्य योगदान देतो. हे सर्व प्रयोग सत्यात उतरविण्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा - सुंदर शाळा टप्पा - 2' या स्पर्धेमध्ये तालुक्यातून प्रथम, जिल्ह्यातून प्रथम, एवढेच नव्हे तर विभागातून द्वितीय क्रमांक पटकावून शाळेचा गौरव वाढविला.

"प्रत्येक विद्यार्थिनी ही एक दीपज्योत आहे — तिच्या ज्ञानप्रकाशासाठी झगडणारा प्रत्येक शिक्षक हा समाजाचा खरा दीपस्तंभ आहे."


शाळा आणि विद्यार्थिनींमध्ये झालेल्या सकारात्मक परिवर्तनाबाबतचे फोटोज -

https://drive.google.com/drive/folders/19OALbEGWDU8S5APOazQ-3lclNyvsxCgL?usp=drive_link

https://drive.google.com/drive/folders/1KE5vPbs1Gv8YHydUoKyNY_9j1wUm13N3?usp=drive_link

https://drive.google.com/drive/folders/1ClnJfYPDJ5w36D4MyvJxGX0vz3s0TcJp?usp=drive_link

----------**----------




शालेय भौतिक सुविधा व गुणवत्ता संवर्धनात मुख्याध्यापकांची भूमिका

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा गोळेगाव

शाळेचा पत्ता : गोळेगाव, केंद्र.रामतीर्थ, पं.स.दर्यापूर, जि.अमरावती

मुख्याध्यापकाचे नाव : कु.लता शिवचरण गणवीर

मोबाईल क्रमांक : 7028639409



अनेक उपक्रम राबवून प्रकाश झोतात येणारी माझी शाळा जिला मी आकार दिला व बघता बघता रूपच पालटले. होय रूप पालटले असेच मी म्हणेल.अशी ही माझी नकोशी असलेली व नंतर हवीशी झालेली जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा गोळेगाव, केंद्र.रामतीर्थ प.स. दर्यापूर जिल्हा अमरावती.

प्रास्ताविक

तो दिवस होता 30 मे 2018 होय हाच तो दिवस ज्या दिवशी मी तालुक्यातील नव्हे तर जिल्ह्यातील नामांकित शाळेतून म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साईनगर दर्यापूर या स्थानिक शहरात असलेल्या शाळेत दहा वर्षे सेवा करून आज प्रशासकीय बदलीने मला दर्यापूर

तालुक्यातीलच दहा किलोमीटर अंतरावर असलेले अकोला मेहसांग रोडवरील पहिलेच गाव असलेले गोळेगाव हे गाव मिळाले. आतापर्यंत जिल्ह्यातील पंधराशे पन्नास शाळेतील सर्वात टॉप मोस्ट असलेली शाळा माझी शाळा जिथे पहिली ते चौथीपर्यंत पाचशेच्या घरात विद्यार्थी होते. नोव्हेंबर डिसेंबर पासूनच ऍडमिशन घेण्यासाठीपालकांची वर्दळ सुरू व्हायची. जवळपास आजूबाजूच्या 15 ते 20 गावातून मुले त्या शाळेत शिकायला येत होती, अशी ही डॉक्टर, इंजिनियर ची फौज घडविणारी शाळा. शिस्तीचे व ज्ञानाचे संस्काराचे धडे देणारी शाळा सोडून मला एका छोट्याशा गावातील छोटीशी शाळा मिळाली म्हणून खूप वाईट वाटले. खूप रडायला येत होते. मन मानत नव्हते. सगळे समजावत होते. धारणी, चिखलदरा तर नाही मिळाले अगदी जवळची शाळा आहे. थोडी शांतता लाभेल कमी विद्यार्थ्यात, "असे म्हणून माझे सहकारी मैत्रिणी सांगायला लागल्या. पण मला होती सवय गच्च भरलेल्या 50 - 60 विद्यार्थ्यांच्या वर्गाची. स्वच्छ सुंदर माझ्या जवळ जवळ राहणारी सदैव घोडक्यात मुलांच्या गराड्यात असणारी मी आणि आता अगदी छोटेसे खेडे तेथिल लोकसंख्या केवळ 435 आणि 113 घरांचे गाव.

उन्हाळ्याच्या सुट्टीतच बदली झाल्यामुळे मनात असलेली हळहळ पाहून मला ह्यांनी गाव पाहायला नेले, पहाते तर काय ? शाळेत म्हशी बांधलेल्या, गाई, बकऱ्या बांधलेल्या होत्या. शेणाचा खच होता. हे पाहून तर मला रडायलाच आले आणि म्हटले मला नाही पाहिजे ही शाळा अशी कशी शाळा असू शकते, कारण त्या शाळेला आजूबाजूला तुटके तारांचे कुंपण होते. त्यातून शेजारचे लोक शाळेत झाडे भरपूर असल्यामुळे गुरेढोरे बांधायचे. हे दृश्य पाहूनच थरकाप उडाला बाजूला खताचा ढीग होता . शाळेला फक्त समोरच संरक्षण भिंत होती . दोन वर्ग खोल्या होत्या. एक षटकोनी व एक आपली चौकोनी, वर्ग रंगवलेले होते. पण परिसर मात्र अस्वच्छ होता. 30 मे 2018 ला मी त्या शाळेत आधीचे श्री राठोड सर जिल्हा बदलून गेल्यामुळे त्यांच्या जागेवर मी रुजू झाले. मुख्याध्यापक ह्या ओळखीच्याच कुमारी कविता भोंगळे मॅडम होत्या. त्या मला ज्युनियर असल्यामुळे त्यांना तर खूपच आनंद झाला. त्यांना असे वाटले की, आपल्यापेक्षा सीनियर व नावलौकिक असलेल्या शाळेतून मॅडम आल्या, त्यामुळे कधी त्यांना एकदा रुजू करून घेते व कधी शाळेचा मुख्याध्यापकाचा चार्ज देते असे झाले होते. पण मी मात्र आतापर्यंत विविध उपक्रमांबरोबरच फक्त वर्ग अध्यापन करणे, उत्तम विद्यार्थी तयार करणे हेच कार्य केले होते. त्यामुळे चार्ज वगैरेचा अनुभव नव्हता फक्त विद्यार्थ्यांना शिकवणे हेच मला माहित होते. कारण माझ्या शाळेत उच्च श्रेणी मुख्याध्यापक असल्यामुळे कार्यालयीन जी




जबाबदारी शिक्षकांवर येत असेल तेवढीच पूर्ण करावी लागत असे. इथे मात्र मला चार्ज घेणे भागच पडले. कारण मी त्यांच्यापेक्षा सीनियर होते म्हणजे आता वर्ग ही सांभाळा व चार्ज सांभाळा शिवाय एक वर्ग नाही तर दोन दोन वर्ग, वेळ पडली तर चारही वर्ग सांभाळा अशी भूमिका होती आणि पटसंख्या मात्र अगदी जेमतेम 20 - 21 होती. मला प्रश्न पडला एवढ्याशा मुलांना कसे शिकवायचे, तेही वेगवेगळ्या वर्गातील मला तर एकच वर्ग शिकवण्याची सवय होती.

पूर्वानुभव -

याआधी मी तीन-चार शाळेत सेवा केली. परंतु पटसंख्या भरपूर व एकच वर्ग शिकविला आतापर्यंत 22 वर्षे नोकरी झाली होती. सर्वात प्रथम मेळघाटात धारणी येथील धुळघाट रोड त्यानंतर दोन वर्षातच धारणी मुलांची शाळा तेथे सहा वर्ष नोकरी करून लग्न झाल्यामुळे 2001 ला दर्यापूर तालुक्यातील इतकी येथे प्रशासकीय बदली झाली. तिथे सात वर्षे पूर्ण करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साईनगर येथे 2008 ला विनंती बदलीने रुजू झाले . तिथे अगदी दहा वर्षे अतिशय छान शिस्तीने उपक्रमशीलतेमध्ये गेली. आणि मग गोळेगावची ही दुर्लक्षित शाळा मला मिळाली. तालुक्यापासून जवळ असले तरी शैक्षणिक बाबतीत अतिशय दुर्लक्षित असे हे गाव मला वाटले.

समस्या -

शाळेबद्दल अनास्था असलेले शैक्षणिक वळण नसलेले आणि शिक्षकांबद्दल वाटते तेवढी सकारात्मक दृष्टिकोन नसलेली ही शाळा व गाव होते. काय करावे काहीच सुचत नव्हते. रोज घरी आले की रडणे व मला नको ही शाळा हीच माझी म्हणणे होते. कारण माझ्या आधीच्या शाळेचा पगडा माझ्यावर पडला होता. सारखी ती शाळा त्या शाळेतील मुले वर्गात दिसायचे मन काही लागत नव्हते. शाळा मीटिंग अहवाल पोषण आहार कसे सांभाळावे कळतच नव्हते. माझी मुलं म्हणायची जाऊ दे मम्मी "आतापर्यंत तू अगदी चांगल्या घरच्या मुलांना शिकवले त्यांना संस्कार दिले, वळण लावले, त्यांना अभ्यासू केले, आता तुला हे चॅलेंज आहे, की गावातील मुलांना चांगले संस्कार चांगले वळण व अभ्यासू बनवणे आता तू हे चॅलेंज स्वीकार व करून दाखव की मी इथेही छान काम करू शकते." हे वाक्य ऐकून मला खरंच बळ आलं, धीर आला व वाटले आता खऱ्या अर्थाने संधी मिळाली त्याचं सोनं करायचं. जे आहे त्याचा स्वीकार करून




कामाला लागू या व काहीतरी करण्याचा प्रयत्न करूया अशी मनाशी खुणगाठ बांधली व मी निश्चय केला. आहे त्या परिस्थितीला सामोरे जाऊन नवीन काहीतरी बदल घडवून आणायचा. मग शाळेतील मॅडमशी चर्चा केली. सरपंच ताई शाळा व्यवस्थापन समिती यांना विश्वासात घेतले व काम सुरु झाले.

माझ्या समोरील आव्हाने -

सर्वात प्रथम शाळेला व मुलांना शिस्त लावणे हे माझ्यासाठी आव्हान होते. कारण मुले केव्हाही उठ सुट उठायचे बाहेर जायचे, पालक कधीही मुलांना घरी बोलवायचे, गावाला जायचे, कोणी कधीही केव्हाही येत असे ,पाहिजे तशी शिस्त व वळण नव्हते. म्हणून मग सर्वात प्रथम शाळेला नियम लावले पालकांचे गावोगावी मुलांना घेऊन जाणे बंद केले. शाळेच्या परिसरातून शेतात जाणे ,गुरे सुट्टीच्या दिवशी बांधणे बंद केले. मुलांना मधल्या सुट्टीत घरी जायची सवय होती, ती सुद्धा बंद केली. मुलांना गणवेश व शिस्तीत वागण्याच्या सवयी लावल्या, विविध उपक्रम राबवायला सुरुवात केली.

उपाय योजना राबविलेले उपक्रम

माझा सुंदर परिपाठ -

वेळेत परिपाठ सुरू करून प्रत्येक विद्यार्थ्याला संधी दिली. प्रत्येक विद्यार्थी समोर येऊन सादरीकरण करू लागले. परिपाठात राष्ट्रगीत, प्रतिज्ञा, संविधान प्रास्ताविक, सुविचार ,दिनविशेष सामान्य ज्ञान आधारित प्रश्न ,बातम्या ,प्रार्थना ,स्फूर्ती गीत ,पसायदान व मित्र उपक्रमांतर्गत आनापान हे उपक्रम घ्यायला सुरुवात केली. सुरुवातीला जड गेले, नंतर मराठी इंग्रजी या दोन्ही भाषेत मुले सादरीकरण करू लागले. त्यांच्यात स्पर्धा निर्माण झाली. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या प्रत्येक मुलाला संधी दिली . त्यामुळे त्यांच्यात माझं सादरीकरण कसे उत्तम होईल हा प्रयत्न त्यांनी केला. मराठी बरोबर इंग्रजीतही.परिपाठ करू लागले.

जो दिनांक तो पाढा -

परिपाठानंतर जो दिनांक तो पाढा पाठ करून सादर करू लागले. 31 तारखेपर्यंत मुले पाढे पाठ करून सादर करू लागले. ज्यांनी छान सादरीकरण केले. त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव




करून शाब्बासकीची थाप देऊन इतर मुलांना प्रेरणा मिळाली व इयत्ता पहिलीपासूनचे मुले ही पाढे म्हणू लागली.

दररोज पाच इंग्रजी शब्द सांगणे -

या उपक्रमामुळे मुलांना अनेक इंग्रजी शब्द माहिती झाले व शब्द संग्रह वाढला. जिद्द निर्माण झाली, जास्तीत जास्त मुले शब्द सांगायला लागली.

थोर पुरुषांच्या जीवनावरील पुस्तकांचे वाचन -


दररोज परिपाठा नंतर दोन पानं एका थोर पुरुषाचे पुस्तकाची पाने वाचणे. त्यामुळे वाचनाची गोडी लागली. ऐकण्याची क्षमता वाढली . समजून घेण्याची क्षमता वाढली व मला पण वाचता येते मी पण वाचतो ही स्पर्धा निर्माण होऊ लागली वाचनाची आवड सुद्धा निर्माण झाली. जे वाचले त्यावर प्रश्न विचारणे व मुलांनी उत्तरे देणे हे नियमित असे सुरू झाले. त्यामुळे प्रश्न निर्मिती व उत्तरे देण्यासाठी चुरस वाढली.

आनापान मित्र उपक्रम -

मुलांमध्ये असलेली एकमेकांबद्दलची द्वेष भावना, खोटे बोलणे, चोरी करणे, दुसऱ्यांना तुच्छ किंवा हीन लेखणे, भांडण करणे ही भावना आनापान क्रियेमुळे नष्ट झाली व सहकार्याची, आपुलकीची भावना निर्माण झाली त्यामुळे एकाग्रता व आत्मविश्वास वाढला.

भाषण स्पर्धा -

विविध जयंती पुण्यतिथीला भाषणाची स्पर्धा ठेवली. व त्यामध्ये इयत्ता पहिली पासून चौथीपर्यंतच्या मुलांना भाग घेणे सक्तीचे केले. त्यामुळे प्रत्येक जण आपले भाषण तयार करून कागद न पाहता दोन ओळी का असेना पण न पाहता भाषणे द्यायला लागली. त्यांना भाषणाची सवय झाली . चारोळ्या सहित मोठमोठी भाषणे मुले द्यायला लागली. त्यांचा आत्मविश्वास व सादरीकरण कौशल्य वाढीस लागले. बाहेरगावी देखील सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ लागले. त्यामुळे गावकरी व पालकांना देखील आनंद वाटू लागला. पेपरमध्ये बातम्या येऊ लागल्या. त्यामुळे वक्तृत्व शैली वृद्धिंगत झाली.



एकांकिका -

अनेक थोर पुरुषांच्या जयंती पुण्यतिथीला वेशभूषा करून त्यांच्या जीवनावर आधारित एकांकिका विद्यार्थी करू लागले. त्याचे सादरीकरण शाळेत गावात आजूबाजूच्या गावाला सामाजिक कार्यक्रमांमध्ये तालुक्यात क्रीडा महोत्सवामध्ये भाग घेऊन सांस्कृतिक स्पर्धेत नंबर मिळवून जिल्ह्यात देखील मी सावित्री बोलते, मी जिजाऊ बोलते, मी सरपंच बोलते या एकांकिका जिल्हा क्रीडा महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये खूप गाजल्या आणि भरपूर बक्षीसे पण मिळाली. त्यामुळे मुलांचा व गावाचा उत्साह वाढीस लागला.

माजी विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि सहकार्य -

माझंही काही देणं लागतं या भूमिकेतून शाळेबद्दल आपली काय भूमिका असायला पाहिजे हे माजी विद्यार्थी यांना पटवून दिल्यामुळे हे विद्यार्थी शाळेच्या प्रगतीसाठी भौतिक सुविधेसाठी तळमळीने भाग घेऊ लागले, सहकार्य करू लागले. त्यासोबतच त्या विद्यार्थ्यांचा वेळोवेळी गावातील छोट्या चिमुकल्या माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांचे मार्गदर्शन सुद्धा मिळाले.

लोकवर्गणी शैक्षणिक उठाव -

लोकांना शाळेच्या प्रगतीबाबत व भौतिक सुविधासाठी लोकसहकार्य कसे अपेक्षित आहे हे प्रत्येक राष्ट्रीय सणाला 15 ऑगस्ट व 26 जानेवारीला पटवून दिल्यामुळे शाळेच्या विकासात तुमचाही हातभार लागावा याचे महत्त्व पटवून दिल्यामुळे शैक्षणिक उठावांमध्ये शाळेला कपाट, परसबागेला कुंपण करण्यात आले. लोक मुलांना वह्या पुस्तक शैक्षणिक साहित्य भेट म्हणून देऊ लागले. त्याबरोबरच ग्रामपंचायत कडून शाळेच्या भौतिक सुविधेसाठी कसे सहकार्य घेता येते याची जाणीव करून दिल्यामुळे ग्रामपंचायत कडून अनेक सुविधा मिळाल्या .

ग्रामपंचायत कडून मिळालेल्या भौतिक सुविधा -

पंधराव्या वित्त आयोगातून शाळेसाठी मिळणारा निधी असतो. हे गावकऱ्यांना माहीत झाल्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती यांच्या माध्यमातून शाळेला अनेक भौतिक सुविधा मिळाल्या उदाहरणार्थ एलईडी टीव्ही, वॉटर फिल्टर, पाण्याची टाकी, खेळ साहित्य, शौचालय




नवीन बांधून सर्व सोयी सुविधायुक्त पाण्याच्या टाकीसह तयार करून मिळाले. त्यासोबतच कपाट, खुर्च्या, टेबल, साऊंड सिस्टिम असे अनेक भौतिक सुविधा ग्रामपंचायतीला विश्वासात घेऊन शाळेत पूर्ण करून घेतल्या आणि इलेक्ट्रिक बील, नळ बील ग्रामपंचायत भरायला लागली.

सुरक्षा भिंत -

शाळेला सुरक्षा भिंत नसल्यामुळे आजूबाजूला गुरेढोरे शाळेत येऊन परिसर घाण करायचे. त्यामुळे आमदार साहेबांची भेट घेऊन त्यांना विनंती करून आमदार निधीतून शाळेला सुरक्षा भिंत व त्याची रंगरंगोटी पूर्ण करून घेतली.

शाळेची रंगरंगोटी व सौंदर्यीकरण -

सुरक्षा भिंत झाल्यामुळे एक मोठी समस्या मिटली. गावकऱ्यांना कौतुक वाटू लागले , त्यांना अभिमान वाटला त्यामुळे सुरक्षा भिंतीचे सौंदर्यीकरण करण्यासाठी स्वतःच्या व सहकारी मॅडमच्या पैशाने चित्र रंगवून व शाळा व्यवस्थापन समिती यांची आर्थिक मदत घेऊन भिंती बोलक्या केल्या. त्यामुळे शाळा अधिक सुंदर दिसू लागली. शाळेबद्दल अभिमान वाटू लागला.

मिशन पटसंख्या -

शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी गावातून शहरात जाणारे व गावातील आपल्याच शाळेतील विद्यार्थ्यांची तुलना करून प्रत्यक्ष चाचणी करून गावातील शाळेचे महत्त्व मुलांना का वाटावे याची प्रचिती दिली. त्याबरोबर बाहेरगावातून वयानुरूप मुले दाखल करून त्यांच्या येण्या जाण्याची त्यांच्या आवश्यक शैक्षणिक गरजा पूर्ण करून शासकीय योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांच्यातील गुणवत्ता वाढविली त्यामुळे पटसंख्या वाढली.

मिशन पाचवी व मिशन नवोदय -

शाळेची पटसंख्या टिकून राहावी यासाठी 2024 - 25 मध्ये पाचव्या वर्गाची नैसर्गिक वाढ करून मान्यता मिळवून चौथीचे विद्यार्थी पाचवीत दाखल केले. एवढेच नाही तर, नवोदयला परीक्षेला शिष्यवृत्ती परीक्षेला विद्यार्थ्यांना बसवून पहिल्याच वर्षी त्यांचा जास्तीत जास्त नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घेतल्यामुळे शाळेतील कुमारी संस्कृती सचिन चोरपगार ही





इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी तिच्याच हट्टासाठी पाचवा वर्ग सुरू करून नवोदय परीक्षेत जिल्ह्यातून पहिल्याच वर्षी नवोदयला पात्र ठरली. जिल्ह्यातून तिसरी व तालुक्यातून पहिली येण्याचा बहुमान शाळेला मिळाला. तालुक्याला हा बहुमान मिळाला त्यामुळे सगळीकडे सत्कार घेण्यात आले. त्याबरोबर माझाही सत्कार झाला. एवढेच नाही तर, इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत ती पात्र ठरली. त्यामुळे सगळीकडे कौतुकाचा वर्षाव झाला. शाळेने इतिहास घडविला. एका दुर्लक्षित शाळेचे नाव पेपर मध्ये झळकू लागले.

जोड शाळा संलग्न शाळा -

या उपक्रमांतर्गत बाजूलाच असलेली तीन किलोमीटर अंतरावर असलेली आयएसओ मानांकित शाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंगलाबाद येथे आपले विद्यार्थी नेऊन त्यांच्या शाळेतील नवीन उपक्रम व आमच्या शाळेतील नवीन उपक्रम असे एकमेकांची देवाण घेवाण केली. संयुक्तरीत्या कार्यक्रम घेतले, मेळावे घेतले, त्यामुळे मुलांना नवीन मित्र-मैत्रिणी मिळाले व आपल्यात असलेल्या उणीवा इतर शाळेकडून पूर्ण करून घेतल्या. संयुक्तरीत्या क्षेत्रभेटी व शैक्षणिक सहल आयोजन करण्यात आले. मुलांमध्ये ऐतिहासिक व भौगोलिक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात आले . श्रीक्षेत्र लासुर येथे ऐतिहासिक हेमाडपंथी मंदिर या ठिकाणी भेट देऊन मुलांना ऐतिहासिक व भौगोलिक माहिती दिली. पर्यावरण संरक्षण व ऐतिहासिक मालमत्तेची जतन याचीही महत्त्व त्यांना सांगण्यात आले.

स्वच्छता दूत -

शाळेतील प्रत्येक विद्यार्थी हा स्वच्छता दूत आहे. त्याने स्वच्छता दूत म्हणून गावात, चौकात जिथे जिथे एकत्र लोक येतात त्या ठिकाणी स्वच्छतेचे महत्व, पाणी बचतीचे महत्त्व, आरोग्याचे महत्त्व लोकांना पटवून कसे सांगावे याबाबत मुलांना प्रशिक्षण दिले. स्वच्छतेच्या सवयी सांगितल्या, आरोग्य निरोगी राहण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, पाणी बचत कशी करावी हा संदेश विद्यार्थ्यांनी लोकांना दिला. उघड्यावर शोच्यास बसल्यामुळे होणारे दुष्परिणाम याची माहिती विद्यार्थी चौकाचौकात गणवेश घालून करू लागले त्यामुळे काही प्रमाणात लोकांमध्ये बदल घडू लागला.



महिला मेळावा आणि आरोग्य तपासणी शिबिर -



गावात महिलांना काहीच महत्त्व दिले जात नाही. त्यांच्या मतांचा आदर होत नाही. त्यांच्या विचाराला महत्त्व नाही. त्यांना फक्त घरकाम व शेतीचे काम करणे, इतर बाबींमध्ये व्यवहारांमध्ये ढवळाढवळ केलेली पुरुषांना आवडत नाही. काम महिलांनी करायचे व पुरुषांनी रस्त्यावर गप्पा ठोकायच्या असे काहीसे वातावरण मला त्या गावामध्ये आढळले. मग मी महिला काय करू शकतात. त्यांच्या विद्वत्तेला व त्यांच्या विचाराला चालना देण्यासाठी गावात आरोग्य तपासणी शिबिर व असा महिला मेळावा आयोजित केला. त्यामध्ये वक्त्या म्हणून नामांकित डॉक्टर, वकील साहित्यिक,पीएसआय महिला अधिकारी, बचत गट अधिकारी, कृषी अधिकारी, उद्योजक या सर्व क्षेत्रातील महिलांना बोलावून त्यांना डॉक्टरांनी आरोग्याबाबत व स्वच्छतेबाबत घ्यावयाची काळजी पीएसआय मॅडमने सायबर गुन्हे मुलींची सुरक्षितता याची माहिती तर वकील मॅडमने महिलांचे हक्क व अधिकार तसेच शैक्षणिक व उद्योगाबद्दल भरपूर माहिती दिली. त्यामुळे त्याचा परिणाम असा झाला की महिला रोजगार करायला लागल्या व घराबाहेर शिक्षण व व्यवसाय शिक्षण घेऊ लागल्या मुलांच्या शिक्षणात आईचे कसे योगदान असावे याबाबत ही माहिती देण्यात आली.

तंबाखू मुक्त व व्यसनमुक्त अभियान -

या उपक्रमांतर्गत महिला पालक व विद्यार्थी यांना तंबाखूचे दुष्परिणाम तसेच दारूमुळे उध्वस्त होणारे संसार यांच्या ध्वनी चित्रिफिती दाखवून महिलांमध्ये असलेले गुटखा, तंबाखू खाण्याचे व्यसन कमी झाल्याचे आढळले. मुले आई बाबांना तुम्ही आम्हाला आयुष्यभर हवेत, व्यसनामुळे शरीर खराब करू नका व आम्हाला पोरके करू नका असे भावनिक संदेश देऊ लागले.

शालेय साहित्य भांडार -

शाळेचे स्वतःचे असे शैक्षणिक साहित्य भांडार हा उपक्रम राबविला त्यामुळे वही नाही पेन नाही हे कारण समोर आलेच नाही ज्यांच्याजवळ वही पेन संपले त्यांनी वहीत आपले नाव नोंदविणे व काय घेतले किती दराला घेतले ते लिहिणे व तेवढे पैसे डब्यात टाकणे, त्यामुळे आर्थिक व्यवहार मुलांना समजला त्याबरोबरच मुलांना हिशोब समजायला लागला.

माझी पिगी बँक -

या उपक्रमांतर्गत घरी पाहुण्यांनी दिलेले पैसे, खाऊचे पैसे शाळेत पिगी बँक मध्ये जमा करण्याची सवय लागली घरी दिलेले खाऊचे पैसे चॉकलेट किंवा खाण्याच्या वस्तूत न उडवता आपल्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी कसा उपयोग होतो व आपल्याजवळ कशी पैशांची बचत होते याचे महत्त्व पटविले. शाळेतील बँक कोणाचे पैसे जास्त त्याला माझ्याकडून शंभर रुपये बक्षीस जाहीर केले ,त्यामुळे मुले नाव दिनांक नोंदवून किती रुपये टाकले याची नोंद ठेवू लागले. त्यामुळे आर्थिक बचतीचे महत्त्व पटले.

पुष्पगुच्छ निर्मिती, हार तयार करणे -

वेळेवर आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी शालेय परिसरात असलेल्या फुलांपासून पुष्पगुच्छ कसे तयार करायचे, हार कसे तयार करायचे याची दप्तर मुक्त शनिवार, आनंददायी शनिवार या दिवशी कार्यशाळा घेतली व कोणाचा सुंदर पुष्पगुच्छ हार तयार होतो याची स्पर्धा रंगायची त्यामुळे मुलांना सुंदर पुष्पगुच्छ व हार बनवण्याची सवय लागली व सौंदर्यात्मक दृष्टिकोन देखील वाढला.





जर्मन भाषेचा अभ्यास -

एक परकीय देशाची भाषा आपल्याला यावी यासाठी इंग्रजी बरोबरच शासनाने राबविलेल्या उपक्रमामुळे मला केदार जाधव सर यांनी शिक्षकांसाठी एस सी ई आर टी यांनी राबविलेल्या जर्मन भाषा शिक्षकांनी शिकावी व त्यातून शाळेत मुलांना शिकवून त्यांना रोजगार किंवा आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर होण्यास सक्षम बनविणे परकीय देशात रोजगाराची संधी असल्यामुळे भाषेमुळे कशी संधी उपलब्ध होते. हे जाणून मी स्वतः 2A1A लेवल शिकून मुलांना संख्याज्ञान स्वतःचा परिचय, A B C D छोटी छोटी वाक्य, गुड मॅनर्स अशाबाबत जर्मन भाषा शिकवली त्याचा मला खूप छान अनुभव आला.

LFW च्या माध्यमातून इंग्रजी विषयात प्रगती -

लिफ्ट फॉरवर्ड च्या माध्यमातून विविध छोटे छोटे व्हिडिओ इंग्रजीवर प्रभुत्व प्राप्त करण्यासाठी लीफ फॉरवर्ड च्या पुस्तकांचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांना छोटे छोटे इंग्रजी शब्द वाक्य संभाषण इत्यादी इंग्रजी मध्ये करता येऊ लागले. या उपक्रमामध्ये इयत्ता पहिली पासूनचे विद्यार्थी सहभागी झाले आणि ऑनलाईन टेस्ट सोडू लागले.

दप्तर मुक्त आनंददायी शनिवार



या उपक्रमात खूप चांगले अध्ययन अनुभव मुलांना देता आले. त्यात गाणी, गोष्टी, साहित्य निर्मिती, योगा, कवायत संचालन असे विविध मुलाखती व्यवसाय व रोजगाराची

माहिती अनेक मजेशीर खेळ पारंपारिक व बैठकी खेळ याचा आनंद मुलांना घेता आला. पारंपारिक खेळाची नावे व माहिती मिळाली. मैदानी खेळा बाबत सुद्धा माहिती झाली.

क्षेत्रभेट व परिसर भेट -

यामध्ये शाळेजवळच्या शेतात प्रत्यक्ष नेऊन कृषी मित्र श्याम गावंडे यांच्याकडून शेती कशी करतात. शेतीसाठी कोणत्या पिकाला कोणती जमीन लागते, पेरणीपासून कापणी मळणी पर्यंत कामे कशी करावी लागतात, याची इत्यंभूत माहिती मुलांना मिळाली. शेती करणे किती कष्टाचे आहे. याचे महत्त्व मुलांना समजले.

समूह भोजन वनभोजन -


सर्व मुलांना दिवाळी सुट्टी लागायच्या अगोदरच्या दिवशी वनभोजनाचा आनंद दिला. डबा पार्टी नृत्य, गायन, खेळ याची अनुभूती दिली. त्याचबरोबर बैलगाडीतून प्रवास हा सुखकारक अनुभव पण दिला. समूह भोजनामुळे प्रत्येकाने एकमेकांना विविध पदार्थाची चव चाखायला मिळाली.

आनंद मेळावा -

शाळेत मुलांसाठी आनंद मेळावा आयोजित करून त्यांना वस्तूची खरेदी व विक्री यातून मिळणारा नफा तोटा समजला व विविध पदार्थाचा आनंद घेऊन खरी कमाई काय असते, आर्थिक देवाणघेवाण काय असते, पैसे कमावण्यासाठी किती कष्ट करावे लागतात, दिवसभर राबराब राबाव लागतं या सर्व गोष्टींची जाणीव विद्यार्थ्यांना झाली आणि सोबतच आनंद सुद्धा मिळाला.

वाचनालयाला भेट -

गावात असलेल्या वाचनालयात प्रत्येक वर्षी 15 ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करत असतात. त्यानिमित्ताने वाचनालयाला भेट देऊन मुलांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले.काही मुले वाचनालयात एक तास जाऊ लागली. नवनवीन पुस्तके वाचू लागली. मुलांना त्यामुळे वाचनाची गोडी लागली शिवाय शाळेत आलेली गोष्टींची पुस्तके वाचून कोण



जास्तीत जास्त पुस्तके वाचन करतो . पुस्तकाचे नाव लेखकाचे नाव वाचलेली गोष्ट शाळेत विद्यार्थ्यांसमोर सांगणे. या सर्व गोष्टीमुळे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड ही निर्माण झाली.

दिनचर्या लेखन -

प्रत्येक मुलाला आज सकाळी उठला तेव्हापासून तर रात्री झोपेपर्यंत त्याने काय काय केले ? कोणाकोणाला मदत केली? कोणते सतकृत्य केले, याची नोंद ठेवायला प्रवृत्त केले. यात काही मुलांनी छान प्रतिसाद दिला. त्यांना लेखनाची आवड निर्माण झाली व ते रोज दुसऱ्या दिवशी शाळेत येऊन सांगू लागले की मी ही चांगली गोष्ट केली, मी बाबांना कामात मदत केली, मी आईला कामात मदत केली अशाप्रकारे विविध दिनचर्येमधील चांगल्या गोष्टी शाळेत येऊन सांगायला लागले.

सांस्कृतिक कार्यक्रम -


26 जानेवारीला विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला जातो. अशाच प्रकारे आमच्या शाळेमध्ये सुद्धा एकलनृत्य, सामूहिक नृत्य , नाट्य, एकांकिका, पथनाट्य, गीत गायन इत्यादी कार्यक्रम घेतले जातात.

प्लास्टिक मुक्त अभियान-

या उपक्रमातून मुलांना प्लास्टिकचे दुष्परिणाम याची माहिती मिळाली व प्लास्टिक किती आरोग्यासाठी व पर्यावरणाला घातक आहे त्याची माहिती दिली. प्लास्टिक पिशवीचा वापर टाळून कागदी व कापडी पिशव्या वापराव्या यासाठी कागदी पिशव्या बनविण्याचे प्रात्यक्षिक कार्यशाळा घेऊन विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. स्वतः तयार केलेली पिशवी याचा आनंद किती द्विगुणीत करून जातो याचा अनुभव मुलांना आला.

तालुका जिल्हा व राज्य गीत -

या उपक्रमांमधून एका ओळीतून संपूर्ण तालुका अमरावती जिल्ह्यातील तालुके याची माहिती मिळाली.



जसे " अ अ अं चांबा चारे भाचि मोदवती धा नां धारे "

तर जिल्हा गीत

"अगं कमला उठ पाय धु रस भजे चहा बनव"

राज्य गीत

"राम नाम जपते अत्री मत गुसी आऊ पंक मे उगो हमि अहि के छबि झाऊ ".

अशाप्रकारे तालुका जिल्हा व 29 राज्याची नावे माहीत होतात. ही गाण्याच्या रूपात पहिली ते पाचवीची मुले आनंदाने सांगतात.

फलश्रुती


अशी अनेक छोटी छोटी उपक्रम मी माझ्या शाळेत राबविली. मला स्वतःला नवनवीन गोष्टी शिकण्याची आवड असल्यामुळे जे काही नवीन मिळेल ते माझ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोचवले. मुले अभ्यासात गुंतली अभ्यास व खेळ ही दोन्ही पूरक आहेत याचा परिणाम निश्चितच मिळाला. सरपंच ताई गावातील प्रतिष्ठित लोक पालक यांना शाळेत झालेला शाळेमध्ये झालेला बदल लोकांनी स्वतः बघितला. आज सहा वर्षे कसे गेले हे मलाही कळले नाही. या शाळेचा लळा मला कधी लागला ते कामात कळलेच नाही आणि म्हणता म्हणताच माझी परत प्रशासकीय बदली झाली. हे लोकांना कळतच लोक ऑफिसमध्ये जाऊ लागले. खासदार साहेब, आमदार साहेब यांच्या माध्यमातून माझी बदली कशी रद्द करता येईल जिल्हास्तरावरून शिक्षणाधिकारी कार्यालय येथे जाऊन त्यांनी खूप प्रयत्न केले. पण आता ऑनलाइन बदली असल्यामुळे त्यात प्रशासन ढवळाढवळ करू शकत नव्हते. त्यांचे प्रयत्न सुरूच होते. आणि मग मला जाण्याची वेळ आली. गावकरी खूप हळहळले. पालक विद्यार्थी सगळ्यांना खूप दुःख झाले. मॅडम तुम्ही परत या तुमच्याशिवाय शाळेत करमत नाही, अशा प्रकारे त्यांची विनंती पण होऊ लागली. गावकऱ्यांनी खूप मोठा भव्य दिव्य निरोप समारंभ पेन्डोलसह भोजन, भेटवस्तू असा पंचायत समिती कार्यालयीन सर्वाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, गटसमन्वयक ,शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख सरपंच ,गावकरी पालक यांच्या उपस्थितीमध्ये अतिशय भावपूर्ण असा निरोप समारंभ घेतला. मीही भाऊक झाली काहीतरी माझे हरवले आहे असे वाटले.





जो काम करेल त्याला गाव जवळ करतं. भरभरून प्रेम देत. लोकांना फक्त परिवर्तन आवश्यक होतं त्यांच्या मुलांमध्ये त्यांच्या गावात झालेला अमुलाग्र बदल त्यांनी अनुभवला होता व माझ्यासाठीही हे खूप मोठे आव्हान होते. आज मला शाळा चालविण्याचा अनुभव नसताना सहकाऱ्यांच्या मदतीने शाळेच्या यशाच्या शिखराकडे नेण्याचा छोटासा प्रयत्न केला. त्यात मला मिळालेले यश यातून गावात झालेला शैक्षणिक बदल मी जवळून अनुभवला. मला फक्त एकच वाटत होते की, मी आज या शाळेत आल्यानंतर जे दृश्य अनुभवलं ते मी गेल्यानंतर कोणालाही अनुभवायला मिळायला नको. मी गेल्यानंतर लोकांनी बऱ्या गेल्या मॅडम काहीच करत नव्हत्या असे म्हणायला नको आपल्या कामातून जग जिंकता येतो. हा अनुभव मी या गावात घेतला. माझ्या कामाची पावती मला त्यांच्या प्रयत्नातून मिळाली. याचा अनुभव मी कधीच विसरणार नाही. ही माझ्यासाठी कायम शिदोरी राहील कायम स्मरणात राहील.

----------**----------



शालेय शिक्षणात व्यवसाय शिक्षणाची जोड देण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव व पत्ता : जनता गर्ल्स हायस्कूल, शेंदुरजना घाट

शाळेचा पत्ता : शेंदुरजना घाट, ता.वरुड, जि.अमरावती

शाळेचा ई-मेल : janataghss@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : डॉ.मायाताई त्र्यंबकराव हिवसे


मोबाईल क्रमांक : ९४०४९३५९१०/ ९९७०३७७६६३

मुख्याध्यापक ई-मेल : mayapundkar@gmail.com

प्रस्तावना -

जनता शिक्षण संस्था, शेंदूरजना घाट ता. वरुड जि. अमरावती द्वारा संचालित जनता गर्ल्स हायस्कूल शाळेची स्थापना १ जुलै १९६५ रोजी करण्यात आली. शाळा ही गेली ६० वर्षे मुलींना शिक्षण देण्याचे व समाजाभिमुख विद्यार्थीनी घडविण्याचे कार्य करत आहे. शाळेने आज पर्यंत अनेक विद्यार्थीनी सक्षम केल्या ज्या देशाच्या विकासासाठी, समाजासाठी अविरत कार्य करत आहे. आज काळ बदललेला आहे, त्याद्दष्टीने शाळेने सुद्धा पारंपारिक शिक्षणाची पद्धत सोडून 'हाताला काम-स्व चा विकास' आपल्या विद्यार्थीनी या २१ व्या शतकातील बदलानुसार सक्षम कराव्यात याच दृष्टीने शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.मायाताई हिवसे यांनी शिक्षकांशी सल्लामसलत करून व्यावसायिक शिक्षण देण्याचे ठरवले.


मानवाला त्याच्या सर्वांगीण विकासासाठी संधी प्राप्त करण्यास शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. शिक्षण हे आपल्या मूलभूत अधिकारापैकी एक अधिकार आहे. तसे पहिले तर माणसाचा सर्वांगीण विकास ही व्याख्या फार व्यापक आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये जीवन जगण्याचे कौशल्य निर्माण होण्यास मदत मिळते. हीच कौशल्ये मनुष्याला आयुष्यातील आलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी, जीवनातील आनंद घेण्यास, जीवनाचे रसग्रहण करण्यासाठी, उपजीविका भागविण्यासाठी, नोकरी मिळवणे किंवा व्यवसाय सुरू करणे यासारख्या गोष्टींसाठी मदतनीस म्हणून सहाय्यभूत ठरतात. व्यक्तीला समर्थपणे आयुष्य जगण्यासाठी नोकरी किंवा व्यवसाय करण्याचे कौशल्य निर्माण करणे हे शिक्षणाच्या उद्दीष्टापैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही, तर वास्तव जीवनात उपयोगी ठरणारे कौशल्यही तितकेच महत्वाचे



आहे याच विचारातून "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020" मध्ये आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीचे स्वप्न पाहिलेले आहे. त्यासाठी शालेय स्तरावरच व्यावसायिक शिक्षणावर (Vocational Education) भर दिला आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका शाळा व शिक्षकांची असल्याचे आपणास दिसते. बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या (२०१२-२०१७) अहवालानुसार औपचारिक व्यावसायिक शिक्षण मिळालेल्या १९ ते २४ वे या गटातील भारतीय कामगारांचे प्रमाण ५% पेक्षा कमी होते. हे प्रमाण अमेरिकेमध्ये ५२% होते जर्मनीमध्ये ७५% आणि दक्षिण कोरियामध्ये ९६% असल्याचे दिसून आले. त्यामुळेच भारतात व्यवसाय शिक्षण झपाटयाने देणे गरजेचे आहे. भारतातील शिक्षण प्रणालीमध्ये अनेक दशकांपासून व्यावसायिक शिक्षणाला कमी महत्त्व दिले जात होते, परिणामी अनेक विद्यार्थी शिक्षण पूर्ण केल्यानंतरही बेरोजगार राहत होते. ही परिस्थिती बदलण्यासाठीच NEP २०२० ने एक मोठे पाऊल उचलले आहे.

या धोरणानुसार, विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच विविध कौशल्याधारित शिक्षण, जसे की हस्तकला, संगणक वापर, शेती, उद्योगधंदे, तसेच स्थानिक रोजगारपरक कामांबाबत प्राथमिक ज्ञान मिळवावे, असा उद्देश आहे. हे शिक्षण विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देत नाही, तर आत्मनिर्भरतेचा मार्ग खुला करते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यवसाय करण्यापूर्वी तो यशस्वीपणे करण्याची कौशल्य निर्मिती शालेय शिक्षणातून करणे याला पूर्वव्यावसायिक शिक्षण म्हणता येईल असे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी व्यावसायिक शिक्षणासंदर्भात अनेक शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. याआधी राधाकृष्णन आयोग (१९४८) मध्ये व्यक्तिमत्व व्यावसायिक अभिरुची लक्षात घेऊन शिक्षणाच्या प्रत्येक क्षेत्रासाठी सामान्य व विशेष शिक्षणांतर्गत संबंध स्थापन करणारा अभ्यासक्रम असे सुचवले होते. मुदलीयार आयोग (१९५२-५३) यांनी सुद्धा ग्रामीण शाळातून कृषी शिक्षण, पशुपालन यासारख्या व्यवसायाबाबत माहिती देण्यासाठी राज्यांनी प्रयत्न करावेत असे सुचवले होते. कोठारी आयोग (१९६४) यात सुद्धा निम्न माध्यमिक शिक्षणात कार्यशाळेत तर उच्च माध्यमिक शिक्षणात उद्योगालयात शेतीवर किंवा व्यापारी औद्योगिक केंद्रावर कामाचा अनुभव मिळावा यासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात यासारख्या शिफारसी करण्यात आल्या होत्या. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) मध्ये माध्यमिक स्तरावर स्वयंरोजगार उद्योजकता यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रम राबवावेत अशा शिफारसी करण्यात आल्या होत्या.

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -2020" भाग तीन मधील २०.१ या परिच्छेदात व्यावसायिकांची तयारी करणाऱ्या शिक्षणात लोकांचे नितीनियम सार्वजनिक उद्देश नैतिकता शाखा निहाय व व्यावसायिक शिक्षण यांचा समावेश असावा असे मार्गदर्शित केले आहे.




त्यामुळे या सर्वांचा विचार करून आपल्या विद्यार्थ्यांना आपण ग्रामीण भागाच्या दृष्टीने काही व्यवसायिक ओळख करून देऊन त्याबाबतीत त्यांच्यात आवड निर्माण व्हावी. त्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. मायाताई हिवसे मॅडम यांच्या मार्गदर्शनात व्यावसायिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने दोन NGO माध्यमातून काम केले जात आहे. आज त्याचा मोठा फायदा विद्यार्थीनींना झाला.

व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण

विद्यार्थ्यांना रोजगार व्यवसाय उद्योग शिक्षण यांच्या संधी उपलब्ध करून द्यायचे असेल तर "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -2020" यांचा आधार घ्यावा लागेल. PAB मध्ये समग्र शिक्षा द्वारे क्षेत्र निहाय "व्यवसाय शिक्षण" या नुसार नियोजन करण्यात आले आहे ते पुढील प्रमाणे-

विद्यार्थीनींचे व्यवसायाविषयी असलेलें दृष्टीकोन -

आमच्या विद्यालयात ५३३ विद्यार्थीनी शिक्षण घेत असून सर्वच मुली शेतकरी व शेतमजूर वर्गातील आहे. शेंदूरजना घाटगाव संत्रा उत्पादन व पाणेरी यासाठी प्रसिद्ध आहे. त्यावर आधारित जोड उद्योग मुलींना शिकवले तर त्यांचा अधिक विकास होईल. भविष्यात या क्षेत्रात त्या उत्कृष्ट कार्य करू शकतील या उद्देशाने शेती व शिवणकला या व्यवसायाविषयी आवड निर्माण करण्यासाठी NGO च्या माध्यमातून हे कार्य सुरु केले.विद्यार्थिनींना शेती, शिवणकला या व्यवसायाविषयी विशेष ओळख नव्हती. त्यांच्या मनात व्यवसाय हा आपला विषय नाही. यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवल व जोखीम आहे त्यापेक्षा नोकरी किंवा चाकरी कशी चांगली आहे, त्यात सुख समाधान असल्याची भावना विद्यार्थिनींमध्ये होती. त्यांना व्यवसायाविषयी विशेष माहिती नव्हती त्यामुळे त्या आपल्यासारख्या ग्रामीण विद्यार्थ्यांना कुठे संधी मिळेल याबाबत त्या साशंक होत्या. शेती करणे हा व्यवसाय किंवा उद्योग होऊ शकतो याविषयी त्यांना विशेष कल्पना नव्हती, शेतीपूरक व्यवसाय म्हणजे दुग्धव्यवस्था किंवा शेळीपालन या पलीकडे त्यांना विशेष काही माहिती नव्हती. शेतीला जोड असे अनेक व्यवसाय असतात हे त्यांना माहीत नव्हते. शिलाई कामाविषयी फक्त कपडे शिवणे हेच त्यांना माहिती होती. त्यामुळे त्यांचा हा दृष्टीकोन बदलण्यासाठी महत्वाचे काम मुख्याध्यापिका डॉ. मायाताई हिवसे मॅडम यांनी शिक्षकाकडून करून घेतले. यासाठी या विषयातील काही तज्ज्ञ व्यक्तींशी चर्चा केली.



संबंधित तज्ञाशी चर्चा -


विद्यार्थिनींमध्ये उद्योग व व्यवसाय याविषयी आवड व जागृती करण्याच्या दृष्टीने संबंधित क्षेत्राशी संबंधित तज्ज्ञ व्यक्तीशी चर्चा करणे गरजेचे होते. त्यासाठी सर्वात महत्त्वाची भूमिका शाळेच्या प्रमुख मुख्याध्यापिका डॉ.मायाताई हिवसे यांनी संस्थेचे पदाधिकारी, सचिव मा.श्री.मोहनराव गणोरकर अध्यक्ष मा.श्री जगदीशराव काळे यांच्याशी याबाबत विचार विनिमय केला, त्यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ.देवेंद्र भोंगडे सर, प्राचार्य देवग्राम महाविद्यालय व माजी मुख्याध्यापक श्री.दामोदर गोडबोले सर श्री.वसंतराव नाईक हायस्कूल, जरुड यांच्याशी चर्चा करून उद्योग व व्यवसाय संबंधित मार्गदर्शन घेण्याचे ठरविले. चर्चेतून शेती, शेतीपूरक व्यवसाय, शिलाई व बुनाई कामाविषयी मार्गदर्शन करण्याचे सुनिश्चित करण्यात आले.

यासाठी आम्हाला खऱ्या अर्थाने मदत झाली असेल तर ती "Association for Future Agriculture Leader of India"(FALI)3rd flr Calcot House, MP shetty Marg (Tamarind Street) fort Mumbai 4000023 Maharashtra. व "समता पुरुषोत्तम अग्रवाल मेमोरिअल फाउंडेशन मुंबई- E-२८५७०" यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. तसेच २०१५ पासूनच जनता गर्ल्स तंत्र विद्यालय स्थापन करून तंत्र शिक्षणाची सोय करण्यात आली. या अभ्यासक्रमात इलेक्ट्रिकल टेक्नोलॉजी, व मेकॅनिकल टेक्नोलॉजी हे दोन विषय सुरु करण्यात आले. यांच्या सहकार्याशिवाय हा उपक्रम राबविणे फार कठीण होते. त्याचप्रमाणे शाळेचे संचालक मंडळ यांनी खुली जागा व खोली उपलब्ध करून दिली. त्यामुळेच FALI शेड व शिवणकला केंद्र सुरू करण्यास मदत झाली. वेळोवेळी गावातील प्रगतिशील शेतकरी, शेतीपूरक व्यवसाय करणारे व्यावसायिक यांचेसुद्धा मोलाचे सहकार्य मिळाले.

प्रत्यक्ष शेती व शेती पूरक व्यावसायिक शिक्षणाला सुरुवात -

विद्यार्थिनींना या उपक्रमाअंतर्गत शेती, शेतीपूरक व्यवसाय व उद्योग शिलाई व विणकाम याबाबतीत प्रशिक्षण देण्याचे ठरल्याप्रमाणे FALI यांना दिलेल्या जागेवर शेडनेट उभारले. त्यात त्यांनी शेती योग्य जागा तयार केली. एवढेच नाही तर शेती शिक्षण देण्यासाठी या कंपनी मार्फत एक प्रशिक्षित अश्या कु. गौरी देशमुख (M.Sc. Agri) यांची नियुक्ती केली. त्यांच्या मार्फत शाळेतील इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थीनींना प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थीनींना माती परीक्षण, रोप लागवडीचे तंत्र, शेतीपूरक व्यवसाय, संत्रा प्रक्रिया, दुग्ध व्यवसाय, पोल्ट्री व्यवसाय (कुकुट पालन), बँक



भेट(शेतीपूरक व्यवसाय कर्ज), भाजीपाला मंडी भेट, अन्न निर्मिती, यासारख्या अनेक क्षेत्राची माहिती व प्रशिक्षण विद्यार्थीनींना देण्यात आले. बिजनेस प्लॅन तयार करून नवनवीन उत्पादने तयार करायला मुली शिकल्या ज्यामुळे विद्यार्थीनीमध्ये एकप्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला. विद्यार्थीनी वरील क्षेत्रात पारंगत होत गेल्या, त्यांच्या प्रशिक्षणाचा भाग म्हणून खालील कृती विद्यार्थीनींनी केली.

उपक्रमाचे पुरावे -



सर्वात प्रथम FALI अंतर्गत 1500 स्क्वेअर फिट मध्ये एक शेड तयार करून त्यात विद्यार्थीनीना लागवडीचे तंत्र शिकवण्यात आले.



शेती विषयक माहिती मिळावी यासाठी क्षेत्र भेट देण्यात आले त्या ठिकाणी स्थानिक क्षेत्ररक्षण बाबत सविस्तर माहिती घेण्यात आली त्या ठिकाणी कपाशी पीक व संत्रा कलम कशा तयार करतात याची माहिती घेतली.



संत्रा मंडीला भेट देण्यात आली त्यात विद्यार्थिनींना त्या ठिकाणी संत्रावरील प्रक्रिया कशी करतात त्याची छाननी करून त्याचे ट्रेडिंग कसे केले जाते त्यानंतर संत्राचे पॅकिंग करून त्याचे मार्केटिंग कसे केले जाते याची संपूर्ण माहिती देण्यात आली.



शेतीपूरक व्यवसायांची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी लाकडी तेल घाण्याला भेट देण्यात आली त्याद्वारे तेलवर्गीय बियापासून जसे शेंगदाणा, सोयाबीन, तीळ, जवस, बदाम यातून तेल कसे निघते याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. कच्च्या तेलाच्या प्रक्रियेविषयी माहिती दिली. सोबतच लाकडी तेलघाण्याच्या व्यवसायातून मिळणारा नफा याविषयी सुद्धा माहिती देण्यात आली.



पोल्ट्री फार्म या व्यवसायाची विद्यार्थिनींना माहिती मिळावी यासाठी पोल्ट्री फार्मला क्षेत्रभेट देण्याचे नियोजन करण्यात आले. त्या ठिकाणी जाऊन तेथील कर्मचाऱ्यांकडून विविध जातींच्या कोंबड्याविषयी माहिती जाणून घेतली कोंबड्याची राखण्यात येणारी निगा , त्यांच्यावर येणारे रोग व त्यातून होणारे नुकसान तसेच पोल्ट्री फार्मच्या व्यवस्थापन होणारा फायदा याविषयी सखोल मार्गदर्शन देण्यात आले.



सेंद्रिय शेतीतून तयार झालेला भाजीपाला हा मार्केटमध्ये कशा पद्धतीने विकावा यासाठी भाजीपाला मार्केट यार्ड मध्ये क्षेत्रभेटीचे नियोजन करून त्याविषयी सखोल माहिती विद्यार्थिनींना देण्यात आली.



कृषी व्यवसाय व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती मिळण्यासाठी विद्यार्थिनींना स्थानिक HDFC बँकत क्षेत्रभेटीसाठी नेण्यात आले. त्यासाठी बँकेचे मॅनेजर व कृषी क्षेत्र अधिकाऱ्यांनी कृषी क्षेत्रातील बँकेचे महत्व व कार्य यांची सविस्तर माहिती दिली. तसेच विविध कृषी योजना व शेतकऱ्यांना त्याचा कसा लाभ होऊ शकतो यावर मार्गदर्शन करण्यात आले.



शेतीपूरक दुग्ध व्यवसाय याविषयी माहिती घेण्यासाठी डेअरी फार्मला भेट देण्यात आली. त्या ठिकाणी शास्त्रीय पद्धतीने दुग्ध व्यवसाय व गोपालन कसे करावे? त्यांच्या चाऱ्या पाण्याची व्यवस्था त्यांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी? त्यांच्या पासून मिळणारे दूध व त्यापासून तयार होणारे इतर पदार्थ कसे तयार करावे ? याची विक्री कशी करावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



शेती व्यवसायाला आधार असणारे कृषी औषधी विक्रेत्याच्या दुकानात भेट देण्यात आली. त्या ठिकाणी कोणते औषधे मिळतात ?. त्याचा उपयोग शेतीतील पिकासाठी कसा करतात ? याची संपूर्ण माहिती देण्यात आली.



आजच्या काळात आधुनिक शेतीसाठी महत्त्वाचे साधन म्हणजे ट्रॅक्टर सोबतच शेतीपूरक तंत्रज्ञान, शेती पूरक विविध अवजारे याविषयी सविस्तर माहिती मिळाली त्यासाठी सोनालीका ट्रॅक्टर शोरूम भेट देण्यात आली.



शालेय स्तरावर बिजनेस प्लॅन तयार करून नवनवीन उत्पादने तयार करायला शिकल्या त्याचे सादरीकरण करतांना.

यासाठी "भारताच्या कृषी क्षेत्रातील भविष्याचे नायक" अंतर्गत जैन इरिगेशन जळगाव येथे दहावे (२०२३-२०२४) वार्षिक संमेलन आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये तीन राज्यातून (महाराष्ट्र,गुजरात,राजस्थान) एकूण १५० शाळा सहभागी झाल्या होत्या. या संमेलनामध्ये व्यवसाय नियोजन स्पर्धा व नाविन्यपूर्ण शेती विषयक मॉडेल या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेतील एकूण ७ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. त्यातील व्यवसाय नियोजन स्पर्धेत DOC Treasure(De oiled cake) म्हणजेच शेंगदाणा, नारळ, तिळाच्या ढेपी पासून विविध पदार्थांच्या निर्मितीचा व्यवसाय व त्याचे नियोजन सादर केले. **या स्पर्धेत राज्यातून आमच्या शाळेचा दुसरा क्रमांक मिळाला**. सोबतच शेती इनोव्हेटिव्ह मॉडेल्स स्पर्धेत ऑर्डिनो बेस्ट रोबोटिक स्प्रे चे मॉडेल सादर केले.

https://drive.google.com/file/d/1dErt7QwHG-BMGTES6jSfkwCBWeOieHNm/view?usp=sharing

यामध्ये सहभागी विद्यार्थीनी –

१) राजश्री दिपक भारती
२) प्रचिती आंडे
३) लक्ष्मी गणोरकर
४) वंशिका सावरकर
५) इशिका सिनकर

https://drive.google.com/file/d/1ycMoJZLV5F_SllarjODyK9mVQmYmOPh2/view?usp=sharing

या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनी स्वतः माती परीक्षण, दूध परीक्षण करायला शिकल्यात. सोबतच सुगंधी साबण तयार करायला शिकल्या हेच या उपक्रमाचे खरे यश म्हणावे लागेल.



https://drive.google.com/file/d/1_ZDXhxGRYRTq-M6cte-e6W4FmzyQ0Fm3/view?usp=sharing

"भारताच्या कृषी क्षेत्रातील भविष्याचे नायक" अंतर्गत जैन इरिगेशन जळगाव येथे अकरावे (२०२४-२०२५) वार्षिक संमेलन आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये तीन राज्यातून(महाराष्ट्र,गुजरात,राजस्थान) एकूण 150 शाळा सहभागी झाल्या होत्या. या संमेलनामध्ये व्यवसाय नियोजन स्पर्धा व नाविन्यपूर्ण शेती विषयक मॉडल या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेतील एकूण ४ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. त्यातील व्यवसाय नियोजन स्पर्धेत TREASURE OF RAGI म्हणजेच नाचणी पासून विविध दहा पदार्थांच्या निर्मितीचा व्यवसाय व त्याचे नियोजन सादर केले. **या स्पर्धेत तीन राज्यातून आमच्या शाळेचा तिसरा क्रमांक मिळाला**. Solar based Insect and Pest Trapper हे Innovative

Model सादर केले. या प्रतिकृतीला सुद्धा **तीन राज्यातून आमच्या शाळेचा चतुर्थ क्रमांक मिळाला.**

https://drive.google.com/file/d/1SdudCWsdKtWsGglRWoWLkHJRbodrrgDk/view?usp=sharing

सहभागी विद्यार्थीनी –

१) आर्या तिडके
२) चर्या तिडके
३) गायत्री अकर्ते
४) तन्वी देशमुख
५) श्रावणी अकर्ते
६) स्नेहल मांजरे

विद्यार्थिनींना या उपक्रमाअंतर्गत शिलाई व विणकाम याबाबतीत प्रशिक्षण देण्याचे ठरल्याप्रमाणे "समता पुरुषोत्तम अग्रवाल मेमोरिअल फाउंडेशन मुंबई- E२८५७०", यांना दिलेल्या खोलीमध्ये शिवणकला केंद्र सुरु केले. शिवणकला व इतर प्रशिक्षण देण्यासाठी या संस्थेमार्फत एक प्रशिक्षित अश्या कु. दीक्षिता बानाईत यांची नियुक्ती केली. त्यांच्या मार्फत शाळेतील इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थीनींना प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली.

विद्यार्थिनी ड्रेसच्या डिझाईन करायला शिकल्या. त्या भरतकाम करायला शिकल्या, सोबतच टाकाऊ कपड्यापासून छोट्या सुंदर पिशव्या तयार करायला शिकल्या.





या उपक्रमाअंतर्गत मुली शिलाई मशीन चालविण्यास सक्षम झाल्या नंतर त्यातील काही गरजू विद्यार्थीनींना शिलाई मशीन सुद्धा वाटप करण्यात आल्या सत्र २०२४-२०२५ यात ५ विद्यार्थीनींना शिलाई मशीन वाटप करण्यात आली. सत्र २०२५-२६ यात सुद्धा ५ विद्यार्थीनींना शिलाई मशीन वाटप करण्यात आली.







बहुजनांचा बुलंद आवाज

विदर्भ मतदार

अमरावती, बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५, पृष्ठ क्र. ३

'जनता गर्ल्स'च्या विद्यार्थिनींना शिलाई मशीनचे वाटप

नमस्कार अमरावती

वरूड (ता. प्र.) दि. १८ : शेंदूरजनाघाट येथील जनता गर्ल्स हायस्कूलच्या चार गरजू विद्यार्थिनींना समता फाउंडेशनच्या माध्यमातून शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी दिपाली धूर्वे, दीक्षा दवंडे, अक्षरा लीलाधर बेलसरे, किर्ती गिरीष बोकडे या विद्यार्थिनींना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष जगदीशराव काळे, उपाध्यक्ष अरुणराव काळे, सतीशराव सोलव, सचिव मोहनराव गणोरकर, सहसचिव चंद्रशेखरराव टाकरखेडे, संचालक अरुणराव फुटाणे, राजेंद्र बेलसरे,अॅड. प्रभाकरराव सावरकर, मुख्याध्यापिका डॉ. मायाताई हिवसे, प्राचार्य डॉ. फुलारी, समता फाउंडेशनच्या दीक्षा बानाईत, पर्यवेक्षक येवले, शिक्षक आणि शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी समता फाऊंडेशनच्या पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

या सोबतच जनता गर्ल्स तंत्र विद्यालय स्थापन करून या माध्यमातून तंत्र शिक्षणाची सुरुवात करण्यात आली. या अभ्यासक्रमात इलेक्ट्रिकल टेक्नोलॉजी, व मेकॅनिकल टेक्नोलॉजी हे दोन विषय सुरु करण्यात आले. या साठी श्री. गजानन दिवाकरराव गोरडे व श्री. राहुल प्रभाकर सुपले यांची निवड संस्थेच्या माध्यमातून करण्यात आली. इयत्ता ९ वी व १० वी साठी हा व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. या अभ्यासक्रमासाठी ५० विद्यार्थीनी प्रवेशित असतात. या माध्यमातून विद्यार्थीनींना इलेक्ट्रिकल टेक्नोलॉजी, व मेकॅनिकल टेक्नोलॉजी याचे शिक्षण देऊन स्वत: च्या पायावर उभे राहून सक्षम केल्या जाते. सोबतच पुढील व्यावसायिक शिक्षणसाठी आरक्षण सुद्धा त्यांना प्राप्त होते. जसे की, आय.टी.आय., पॉलिटेक्निक यासारख्या अभ्यासक्रमाला प्रवेश सहजच होते.





या सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबविले जातात. शाळा नेहमी विद्यार्थी हित लक्षात घेऊनच उपक्रम राबवीत असते. शाळेतील पालकांना विश्वासात घेऊन शाळेचे नाव उज्ज्वल करण्यासाठी आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका आणि शाळेतील शिक्षक सतत प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी कोणतीही तडजोड करून त्यांना चांगले शिक्षण देण्यासाठी शाळा आणि संस्था सदैव तत्पर असते. त्यामुळेच जिल्ह्यातील एक उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते. याचे सर्व श्रेय शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. मायाताई हिवसे ,शिक्षकवृंद आणि संस्थेचे संचालक मंडळ यांना जाते.

वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्या



दूध व माती परिक्षण प्रात्यक्षिकाप्रसंगी मान्यवरांचा सत्कार करताना शिक्षक.

माती आरोग्य आणि दूध तपासणीचे प्रात्यक्षिक

जनता गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थिनींचा सहभाग

प्रतिनिधी | शेंदुरजनाघाट

जागतिक शेतकरी दिवसाचे औचित्य साधून शहरातील जनता गर्ल्स हायस्कूलमध्ये भारताच्या कृषी क्षेत्रातील भविष्याचे नायक संस्थेमार्फत माती आरोग्य तपासणी व दूध तपासणीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. या प्रात्यक्षिकात शेतकरी पालकांनी आपल्या पाल्यांकडूनच स्वतःच्या शेतातील मातीची आरोग्य तपासणी व रोज घरी वापरत असलेल्या दुधाची तपासणी करून घेत पाल्यांचे कौशल्य डोळ्यादेखत अनुभवले.

माती परीक्षण करून शेतात कोणते पीक घ्यावे, कमी खर्चात उत्पादन वाढ कशी करावी तसेच माती परीक्षणामुळे पिकांना द्यावयाच्या खताची मात्रा कशी ठरवावी व त्यामुळे गैरवाजवी खते देण्यावर नियंत्रण कसे होते याचबरोबर संयोग क्रियेतून तयार होणारे दूध व त्यामुळे शरीरावर होणारे विपरीत परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव मोहन गणोरकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून अनिकेत गणोरकर, मुख्याध्यापिका डॉ. एम. टी. हिवसे, पर्यवेक्षक एन. एम. अंबाडकर, कृषी शिक्षक गौरी देशमुख व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक उपस्थित होते.

बहुजनांचा बुलंद आवाज
विदर्भ मतदार
२०२३ ● वर्ष ४१ ● अंक १११ ● पृष्ठ ८ ● किंमत रु. ३.०० किंवा रू. ५.०० नमस्कार अमरावतीसह किंवा रू. ६.०० सा. विदर्भ मतद

जनता गर्ल्स हायस्कूल येथे कृषी विषयावर व्याख्यानमाला

नमस्कार अमरावती

शेंदूरजनाघाट (वार्ताहर)

दि.२१ : कृषी विद्या व उद्यानविद्या विभागा अंतर्गत कृषी तज्ज्ञांच्या व्याख्यानमालेचा कार्यक्रम जनता गर्ल्स हायस्कूल येथे राबवण्यात आला. व्याख्यानासाठी कृषी तज्ञ म्हणून वरुड तालुक्यातील कृषी सहायक मनोज भाकरे यांनी विद्यार्थिनींना शेतीविषयक विविध विषयांवर मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका डॉ.माया हिवसे यांनीही विद्यार्थिनींना कृषीविषयक माहिती दिली.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन, प्रास्ताविक व संचालन शाळेच्या कृषी शिक्षिका गौरी देशमुख यांनी केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



देशोन्नती

जनता गर्ल्स हायस्कूलचे राज्यस्तरावर यश !



देशोन्नती वृत्तसंकलन

मोर्शी : भारताचे भावी कृषी नेतृत्व अंतर्गत जैन इरिगेनचे जळगाव व महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना शेतीविषयक ज्ञान मिळवून एक कुशल नेतृत्व निर्माण व्हावे, यासाठी 'भारताचे भावी कृषी नेतृत्व' हा शालेय अभ्यासक्रम राबविण्यात येतो. याचे प्रशिक्षण केंद्र स्थानिक जनता गर्ल्स हायस्कूल, शेंदूरजनाघाट येथे सुरू आहे.

याअंतर्गत दरवर्षी जैन एरिगेशन जळगाव येथे विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्या ठिकाणी राज्यभरातून विद्यार्थी सहभागी होतात. या संमेलनात विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. या संमेलनात जनता गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थिनींनी याठिकाणी हा शेतकऱ्यानं ट्रिश्यू ऑफ रागी हा व्यवसाय नियोजनात फारच उपयोगाचा प्रकल्प सादर केला होता. या प्रकल्पाला राज्यातून तृतीय क्रमांक प्राप्त झाला. यात कु. आर्य तिडके, कु. स्नेहल मांढरे, कु. गायत्री अकर्ते, कु. श्रावणी अकर्ते सहभागी झाल्या होत्या.

नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थिनींनी 'सोलर बेस इंसेक्ट ॲण्ड पेस्ट ट्रेपर' यात कु. तन्वी देशमुख, कु. चर्या तिडके सहभागी झाल्या होत्या. या यशाबद्दल जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे, उपाध्यक्ष अरूण काळे, उपाध्यक्ष सतीश सोलव, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव टाकरखेडे, अरुण फुटाणे, बेलसरे, प्रभाकर सावरकर, मुख्याध्यापिका डॉ. मायाताई हिवसे यांनी अभिनंदन केले. **(ता. प्र.)**



दूध व माती परिक्षण प्रात्यक्षिकाप्रसंगी मान्यवरांचा सत्कार करताना शिक्षक.

माती आरोग्य आणि दूध तपासणीचे प्रात्यक्षिक

जनता गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थिनींचा सहभाग

प्रतिनिधी | शेंदुरजनाघाट

जागतिक शेतकरी दिवसाचे औचित्य साधून शहरातील जनता गर्ल्स हायस्कूलमध्ये भारताच्या कृषी क्षेत्रातील भविष्याचे नायक संस्थेमार्फत माती आरोग्य तपासणी व दूध तपासणीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. या प्रात्यक्षिकात शेतकरी पालकांनी आपल्या पाल्यांकडूनच स्वतःच्या शेतातील मातीची आरोग्य तपासणी व रोज घरी वापरत असलेल्या दुधाची तपासणी करून घेत पाल्यांचे कौशल्य डोळ्यांदेखत अनुभवले.

माती परीक्षण करून शेतात कोणते पीक घ्यावे, कमी खर्चात उत्पादन वाढ कशी करावी तसेच माती परीक्षणामुळे पिकांना द्यावयाच्या खताची मात्रा कशी ठरवावी व त्यामुळे गैरवाजवी खते देण्यावर नियंत्रण कसे होते याचबरोबर संयोग क्रियेतून तयार होणारे दूध व त्यामुळे शरीरावर होणारे विपरीत परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव मोहन गणोरकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून अनिकेत गणोरकर, मुख्याध्यापिका डॉ. एम. टी. हिवसे, पर्यवेक्षक एन. एम. अंबाडकर, कृषी शिक्षक गौरी देशमुख व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक उपस्थित होते.

बहुजनांचा बुलंद आवाज
विदर्भ मतदार
र, १२ फेब्रुवारी २०२४ ● वर्ष ४१ ● अंक २२१ ● पृष्ठ ८ ● किंमत रु. ३.०० किंवा रू. ५.०० नमस्कार अमरावतीसह ● संपादक :

जनता गर्ल्स हायस्कूल येथे व्यवसाय नियोजन स्पर्धेचे आयोजन





नमस्कार अमरावती
शेंदूरजनाघाट (वार्ताहर) दि.११ : स्थानिक जनता गर्ल्स हायस्कूल येथील ८ वी व ९ वी च्या विद्यार्थिनींसाठी नुकतीच फाली (फ्युचर ॲग्रीकल्चर लीडर्स ऑफ इंडिया) या उपक्रमांतर्गत शाळेत व्यवसाय नियोजन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थिनींनी शेंगदाण्याचे हेपीचे पदार्थ, विविध प्रकारचे फ्रूट जॅम, लोणचे, पेढे, सोयाबीन चटणी, लाकडी तेल घाणी व्यवसाय, अशा विविध विषयावरील व्यवसाय नियोजन सादर केले.

फाली ही संस्था विद्यालयामध्ये २०२० पासून कार्यान्वित आहे. या प्रकल्पांतर्गत विद्यार्थिनींना कृषि विषयी परस्परसंवादी शिक्षण, विविध प्रकारची प्रात्यक्षिके, क्षेत्रभेटी या माध्यमातून कृषीचे ज्ञान दिले जाते. आताचा विद्यार्थी भविष्यात कृषी व्यवसाय व आधुनिक शेतीकडे वळावा हेच प्रकल्पाची मुख्य ध्येय आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थिनी कृषी शास्त्र, पशुशास्त्र, कृषी अभियांत्रिकी, अन्नशास्त्र व कृषी व्यवसाय व्यवस्थापन इत्यादींचा अभ्यास करतात. तसेच कृषी तज्ञांच्या व्याख्यानमाला व चित्रफितीच्या माध्यमातून मार्गदर्शनही केले जाते.

दरवर्षी जैन इरिगेशनच्या जळगाव येथे विद्यार्थ्यांची वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले जाते. या स्नेहसंमेलनात मध्ये विद्यार्थी व्यवसाय नियोजन स्पर्धा तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम स्पर्धा यामध्ये भाग घेत असतात. शाळेमध्ये विद्यार्थिनींना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यासाठी मुख्याध्यापिका डॉ. माया हिवसे तसेच पर्यवेक्षक वेबले, स्पर्धेचे परीक्षक म्हणून लाभलेले काळे हे तत्पर असतात. त्याचप्रमाणे कृषी शिक्षिका गौरी देशमुख व शाळेतील सर्व सहकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.

बहुजनांचा बुलंद आवाज
विदर्भ मतदार
अमरावती | बुधवार, १ मे २०२४ | पृष्ठ क्र. ३

जनता गर्ल्स हायस्कूलचे राज्यस्तरावर सुयश





नमस्कार अमरावती
शेंदूरजनाघाट (वार्ताहर)
दि. ३० : भारताचे भावी कृषी नेतृत्व अंतर्गत जैन इरिगेनचे जळगाव व महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग यांच्या मार्फत विद्यार्थांना शेतीविषयक ज्ञान मिळवून एक कुशल नेतृत्व निर्माण व्हावे यासाठी प्रशिक्षण केंद्र स्थानिक जनता गर्ल्स हायस्कूल येथे सुरू आहे. याअंतर्गत दरवर्षी जैन एरिगेशन जळगाव येथे विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्या ठिकाणी राज्यभरातून विद्यार्थी सहभागी होतात. या संमेलनात विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. यासंमेलनात जनता गर्ल्स हायस्कूल च्या विद्यार्थींनी सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थीनींनी याठिकाणी हा शेतकऱ्याना शेंगदाणा व नारळाच्या हेपीपासून विविध पदार्थांची निर्मिती हा फारच उपयोगाचा प्रकल्प सादर केला होता. या प्रकल्पाला राज्यातून द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

यात लक्ष्मी गणोरकर, वंशिका साबरकर, इशिका सिनकर, राजश्री भारती, प्रचिती आंडे, स्नेहल मांजरे सहभागी झाल्या होत्या. त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या गौरी देशमुख यांचे जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीशराव काळे, उपाध्यक्ष अरूणराव काळे, उपाध्यक्ष सतीशराव सोलव, सचिव मोहनराव गणोरकर, सहसचिव चंद्रशेखरराव टाकरखेडे, संचालक अरूणराव फुटाणे, राजेंद्र बेलसरे, संजय बेले, प्रभाकरराव साबरकर, मुख्याध्यापिका डॉ. मायाताई हिवसे, पर्यवेक्षक प्रमोद येवले व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले.

----------**----------

उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीत शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढेकणमोहा,मु.पो.ढेकणमोहा ता.जि.बीड
शाळेचा पत्ता - मु.पो.ढेकणमोहा ता.जि.बीड
शाळेचा ईमेल आयडी - dhereusha123@gmail.com
मुख्याध्यापक नाव - श्रीमती उषा बप्पासाहेब ढेरे
मोबाईल क्रमांक - 9420025078
मुख्याध्यापक ईमेल आयडी - dhereusha123@gmail.com




२८ मे २०१८ चा दिवस .... ऑनलाइन बदलीची ऑर्डर हातामध्ये पडली आणि रुजू होण्यासाठी निघाले.आता मोठ्या शाळेवरती काम करण्यास मिळणार,हा आनंद मनामध्ये होता.नवनवीन कृती-उपक्रम घेण्यास वाव मिळणार होता. याच विचारात केंद्र शाळेवरती रुजू होण्यासाठी निघाले.तिथे गेल्यानंतर मात्र प्रत्येकजण विचारत होता की,मॅडम तुम्हाला पूर्वी शाळा माहीत नव्हती का? ऑनलाइन बदली फॉर्म भरताना तुम्ही या शाळेचे नाव का दिले? तिथे काय परिस्थिती आहे,ते माहित नाही का तुम्हाला? तेथील परिस्थिती तुम्हाला माहित नव्हती का?तिथे विद्यार्थीच नाहीत.विचार करून फॉर्म भरायचा ना.असे,असे एक ना अनेक प्रश्न समोरून ऐकू येत होते.त्याचे कारणही तसेच होते.आता ती फक्त नावालाच शाळा उरलेली होती.बदली पोर्टलला कुणीच त्या शाळेचे नाव दिले नव्हते.या शाळेला आता फक्त कुलूप लावायचे बाकी


होतं.शाळा शेवटच्या घटका मोजत होती. मला मात्र online बदलीने ऑक्सिजन वर असलेली हीच शाळा मिळाली होती.

पूर्वी एके काळी ही ढेकणमोहा शाळा केंद्रीय शाळा होती. ७००-८०० विद्यार्थी आणि १३-१५ शिक्षक तिथे कार्य करत होते.दूरवरून विद्यार्थी तिथे शिकण्यासाठी येत.पण पुढे मात्र याच शाळेला उतरती कळा लागली आणि चक्क पाचच विद्यार्थी शाळेत राहिले.त्यामुळे संपूर्ण बीड जिल्ह्याला या शाळेची ही झालेली अवस्था परिचित होती. मला इथे पोस्टिंग मिळाल्यानंतर, अनेकांच्या चेहऱ्यावर सुद्धा मी काहीतरी गुन्हा केल्यासारखे प्रश्नचिन्ह दिसत होते. बरेच जण धीर देणारेही होते. मॅडम,तुम्हाला काय? तुम्ही खडकावर सुद्धा हिरवळ फुलवणार...मलाही हे सर्व पाहून,ऐकून मनात वेगवेगळे प्रश्न पडत होते.तिथे विद्यार्थीच नाहीत या अनेकांच्या वाक्यावरून पुसटशी कल्पना आली होती पण मन मात्र क्षणभरात कुठे कुठे जाऊन येत होते .

शाळेचा पहिला दिवस उजाडला आणि सुरू झाली सावित्रीच्या लेकीची शाळा. जायभाये मॅडम आणि मी एकाच दिवशी शाळेत रुजू झालेलो.अगदी ऐकलं होतं त्यापेक्षाही भयानक वास्तव समोर दिसत आणि अनुभवत होते.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढेकणमोहा,बीड ही शाळा मोठी तर नव्हतीच पण एक ते चार वर्गाचे एकूण फक्त ५ विद्यार्थी शाळेत दिसत होते.विद्यार्थी कसले ? ते उगीच यायचं म्हणून शाळेत आणून मारून मुटकून बसवलेली, इतरत्र फिरणारी मुलेच ती.कोणत्याही गोष्टीची आवड नसणारी जवळ कशाचेच ज्ञान नसणारी,ना एखादी कविता,ना एखादे गाणे,ना कसले बडबडगीत.काहीच आणि कशाचाही गंध नसणारी ही मुले आणि आता यांना घडवण्याचं आव्हान समोर होतं.मी आणि जायभाये मॅडम एकाच दिवशी या शाळेत रुजू झालो होतो.माझे पूर्वीच्या शाळेवरील अध्यापनाचे व्हिडिओ अगोदरच गावकऱ्यांनी पाहिलेले होते.त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी शालेय व्यवस्थापन समितीने पहिली वर्गासाठी १० प्रवेश टेबलवर बसूनच दिले.आत्तापर्यंत नोकरीच्या काळात कुठेच विद्यार्थ्यांसाठी न फिरणारी मी आता मात्र गावात फिरल्याशिवाय प्रवेश मिळणार नव्हते हे तितकेच खरे होते. लोक तर दारातसुद्धा उभा करत नव्हते. लोकांचे पूर्वीचे अनुभवाचे बोल ते सहजपणे बोलत होते. परिस्थिती हळूहळू लक्षात येत होती.प्रवेश तर दूरच पण लोक दारातही जाऊन बोलायलाही तयार नव्हती.बोललीच तर काहीबाही बोलत होते.ऐकून मन खूप खट्टू व्हायचे.पण करणार काय!शिक्षणाचा वसा घेतला होता.काही पालकांनी तर चक्क तुम्ही कसं शिकवता हे पाहू,नंतर एडमिशन घेऊ,असं सांगून मुलांना शाळेत बसवण्यासाठी पाठवलं.. कारण...लोकांचा शाळेबद्दल असलेला प्रचंड नकारात्मक भाव...शिक्षक-पालक यांच्यामध्ये कामात एक पारदर्शीपणा येण्यासाठी शाळेतील सर्व पालकांचा मिळून मी प्रथम एक व्हॉट्सअप ग्रुप तयार केला आणि अशी ही सुरू झाली आमची सावित्रीची शाळा.



सुरुवातीला दिवसभर कानावर फक्त मॅडम,आता घरी कधी जायचं? एवढच वाक्य कानी ऐकू येत होतं. शिकवणं तर दूरच पण त्यांना सांभाळणं जास्त महत्त्वाचं होतं. त्यांना दिवसभर शाळेत रमवणं जास्त गरजेचं होतं. पुस्तकातलं काही शिकवून,सांगून ही मुलं शाळेत रमणार नव्हती हे माझ्या लक्षात आलं.पुस्तकातील काही सांगून किंवा शिकवून ते शाळेत रमणारे नव्हते. त्यांना शाळेत रमवण्यासाठी त्यांच्या मनाला आनंद देणारं असं काहीतरी करावं लागणार होतं.काहीतरी नवीन हवं होतं. सतत नाविन्याचा ध्यास म्हणजे माझा श्वासच जणू.जेथे जाईल तेथील होणं हा माझा स्वभावच! मला गाणे म्हणण्याची बालवयापासूनच आवड. त्याप्रमाणे त्यांच्यासाठी गाणी,गोष्टी लिहू लागले,त्या स्वतःच्या आवाजात गाऊन दाखवून मुलांच्या कृतीतूनही उतरवू लागले, मुलांमध्ये मूल होऊन त्यांच्याबरोबर खेळ खेळू लागले,नाचू लागले,गाणे गाऊ लागले. मुलांना भरभरून आनंद कसा मिळेल यासाठी सातत्याने आम्हीं धडपडत असू. प्रत्येक कविता, पाठ, संकल्पना ही पूर्णपणे प्रत्यक्ष कृतीतून देत होते,त्याचे व्हिडिओ मी बनवत होते आणि ग्रुपच्या माध्यमातून पालकांपर्यंत पोहचवत होते.यामुळे पालकांना शिकण्याची जी हमी दिली होती त्यामध्ये विश्वासार्हता येऊ लागली.पालकांमध्ये आपापसांत शाळेविषयी सकारात्मक चर्चा होऊ लागली. मुलांमध्ये सुद्धा, मी व्हिडिओमध्ये दिसतो. मला छान जमतंय, मी घरीपण स्वतःला मोबाईलवर पाहून शिकू शकतो याचा खूपच आनंद वाटू लागला होता.एक नाविन्यता,उत्सुकता,शिकण्याची ओढ,शाळेत दिवसभर टिकून राहणं आणि शिकणं ही प्रक्रिया आनंददायी आणि मनोरंजक होऊ लागली.हे असं मुलांना शाळेत बसवण्यासाठी सातत्याने सुरू होत. सुरुवातीचे सहा महिने सातत्याने हेच उपक्रम घेतले.त्यांच्याबरोबर त्यांना आवडेल त्या कृती केल्या, मुलांसाठी त्यांना सोबत घेऊन आम्ही शैक्षणिक साहित्य बनवत असू.त्याचा वापर योग्य प्रसंगी,पाठ, कविता,नाटक यासाठी करत असू. तेंव्हा हळूहळू मुलं शाळेत रमण्यास सुरुवात झाली.पालकांचाही शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत गेला आणि हळूहळू या ऑक्सीजनवर असलेल्या शाळेमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.मुलं शाळेकडे धावत येऊ लागली.पालकांनीही आपल्या मुलांचे प्रवेश निश्चित केले.'मनोरंजनातून अध्यापन' ही शिकवण्याची हातोटी पंचक्रोशीतील लोकांपर्यंत पोहचू लागली.माझ्या विद्यार्थ्यांच्या कृतींचे व्हिडिओ फक्त गावातच नाही तर तालुका,जिल्हा,राज्य,देश आणि परदेशातही फिरू लागले.प्रत्येक विद्यार्थी,पालक आणि शिक्षक यांना माझ्या मुलांमध्ये,शाळेमध्ये झालेला बदल, त्यांनी सादर केलेल्या कृती आणि हसतखेळत शिक्षण आवडू लागलं. संपूर्ण बीड जिल्ह्याला परिचित असलेली पूर्वीची ढेकणमोहा शाळेचा संपूर्ण चेहरामोहराच आता बदलला होता.शाळेत राबवत असलेल्या आनंददायी, हसतखेळत, मनोरंजनातून चाललेल्या अध्यापन पद्धतीची सगळीकडे चर्चा होऊ लागली. पंचक्रोशीतील अनेक लोक शाळेकडे येऊ लागली.त्यांच्यात आमच्याबद्दल विश्वास वाढू लागलेला दिसू



लागला. जो तो यायचा आणि संपूर्णपणे बदललेली शाळा आणि मुलांना पाहत समाधान व्यक्त करायचा.

पुढे लगेच २०२० ला कोरोनाच्या महामारीने लॉकडाऊन झाले.शाळा,कॉलेजचं काय? सगळ जग एकाच जागेवर थांबल होत.पुन्हा मनात अनेक प्रश्नांनी तोंड वर काढल.पण मी थोडीच गप्प बसणार होते.मला माझ्या कामावर विश्वास नाही तर आत्मविश्वास होता.पुन्हा लॉकडाऊन मध्ये मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात कसं टिकून ठेवायचं याचं नियोजन केलं.आणि

१) मुलांसाठी पाठ्यपुस्तकावर आधारित सर्व घटकाचे व्हिडिओ तयार करणे आणि पालकांच्या व्हॉट्सॲप ग्रुप वर पाठवणे.

२) त्यावर आधारित ऑनलाईन प्रश्न तयार करणे.

३) वर्क फ्रॉम होम अंतर्गत स्वाध्याय सोडवण्यास देणे.

४) फक्त अभ्यास देणंच नाही तर तो online पद्धतीने चेक करून मुलांना,पालकांना अभ्यासावर योग्य मार्गदर्शन करणे.

५) आठवड्याचा अभ्यास पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र,ट्रॉफी देवून ऑनलाईन सन्मान सोहळ्यात सन्मान करणे असे अनेक उपक्रम कोरोना काळात राबवले. या कठीण काळातील सोप्या उपक्रमांमुळे खालील फायदे विद्यार्थी आणि शाळेला झाले.

१) विद्यार्थी शिक्षण प्रवाहात टिकून राहिले.

२) तंत्रज्ञानामुळे मुलांची शिकण्यातील गोडी वाढतच गेली.

३) घरी बसून अभ्यासात सातत्य राहिले.

४) मुलं सहज शिकती झाली.

५) ई साहित्यामुळे मुलांचा शिकण्यातील आनंद वाढला.


६) लॉकडाऊन काळातही शिक्षण प्रक्रिया थांबली नाही.

७) शिक्षणातील पालकांचा सहभाग वाढला.

८) परिणामी आपलं मूल अभ्यासात कोठे आहे हे समजण्यास सोपे झाले.

९) लॉकडाऊन मध्ये तंत्रज्ञानाने सहज शिकता येते हे पालकांच्या लक्षात आले आणि शिक्षणातील तंत्रज्ञानाचे महत्त्व समजले.

लॉकडाऊन मधील जणू काही दिनक्रमच ठरला होता.वेळप्रसंगी पालकांच्या संमतीने ऑफलाईन वर्ग भरवून शिकण्यातील अडचणी दूर करणे,गृहभेटी करून समस्या जाणून घेणे, कॉन्फरन्स कॉलवर सर्व विद्यार्थ्यांशी वेळोवेळी संवाद साधणे, Online मीटिंग आयोजित करून विद्यार्थ्यांना जाणून घेणे यासारखे उपक्रम सातत्याने राबवत राहिले.त्यामुळे कोरोना काळातही माझ्या शाळेचा विद्यार्थी पट कायम वाढतच राहिला.कोरोना काळात विद्यार्थ्यांसाठी तब्बल ६०० शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती केली.अगदी मुलांना समजतील अशा सोप्या भाषेत आणि कसलेही




एडिटिंग नसणारे.मुलं घरी बसून व्हिडिओ पाहून अभ्यास पूर्ण करायची.त्याचा उपयोग फक्त आमच्या विद्यार्थ्यानाच झाला नाही तर संपूर्ण महाराष्ट्र,देश आणि विदेशातील विद्यार्थ्यांनाही झाला.त्यामुळे लॉकडाऊन काळात सुद्धा शाळेतील विद्यार्थी पट कायम वाढतच राहिला आणि **ABP माझा** या वृत्तवाहिनीने आमच्यासह विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ,शालेय व्यवस्थापन समिती या सर्वांची **मुलाखत घेतली.**

पुढे हळूहळू शाळा पूर्ववत चालू झाल्या आणि आता जायभाये मॅडम सुद्धा व्हिडिओ बनवू लागल्या. आता दररोज नियमित शाळेत काय सुरू आहे हे पालकांना घरबसल्या समजू लागले.कळू लागले.अभ्यासक्रमाचे व्हिडिओ, उपक्रम,कृतींचे फोटो ग्रुपवर पडू लागले.आमच्या कामाचा वेग आता चांगलाच जोर धरू लागला होता.त्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये अमुलाग्र बदल दिसून येत होता. ढेकणमोहा शाळेने आता कात टाकली, असं जो तो म्हणू लागला. पुढे कोणत्याही पालकांचा, गावातील व्यक्तीचा वाढदिवस असला की, शाळेसाठी शालेय साहित्य, मुलांना खाऊ मिळू लागला. ग्रामस्थांचा शाळेकडे कल वाढला.

आमच्या अनेकविध उपक्रमामुळे मुलांना अभ्यासामध्ये रस वाटू लागला, आवड निर्माण होऊ लागली आणि मुलं शिकू लागली.त्यामुळे या विविध उपक्रमामुळे

१)मुलांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.
२)१००%उपस्थिती वाढली.
३) शिक्षण आनंददायी झाल्यामुळे मुलेही आनंदी दिसू लागली.
४) कृती,खेळामुळे मुलांना शिकण्याची गोडी लागली.
५)पालकांना शाळेविषयी सकारात्मकता वाटू लागली.
६) मुले सोप्या पद्धतीने शिकण्यात रमून गेली.
७) शाळेतील प्रत्येक मूल शिकते झाले.
८) खेळ/कृतीमुळे वर्गातील प्रत्येक विद्यार्थी स्वतःहून पुढे येऊ लागला.
९) सातत्याने शाळेचा विद्यार्थी पट वाढत गेला.
१०)पंचक्रोशीत शाळेची ओळख 'उपक्रमशील शाळा' म्हणून झाली.
११) हसतखेळत शिक्षणामुळे विदयार्थी स्वच्छंदपणे आवडीने शिकू लागली.
१२) शाळेविषयीचा दृष्टीकोन बदलला.
१३) ओस पडलेल्या शाळेचा परिसर आता अनेक कृती, उपक्रमांनी गजबजून गेला.

त्यामुळे 'ABP माझा' या वृत्तवाहिनीने उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेऊन ११ फेब्रुवारी २०२२ ला माझी, माझ्या सहकारी शिक्षिका, विद्यार्थी, माझे पालक, शिक्षण समिती, गावकरी, ग्रामपंचायत सदस्य या सर्वांची मुलाखत प्रसिध्द केली.



आपल्याला लिंक share करत आहे.

ABP माझा लिंक -


https://youtube.com/playlist?list=PLiwYwSUOf03cMxPG4rEQC_WK1aKECTjUb&si=QxGMxNCmws8M4fsb

पुढे 'सामना ' आणि 'Times of India ' या वृतपत्रानेही दखल घेतली.याच काळात मी मुलांसाठी जी शालेय गीते लिहीत गेले. ती स्वलिखित गीते मुलांकडून वदवून, गाऊन, कृतीयुक्त, चाली लावून,आनंददायी पद्धतीने कृतीतून साभिनय सादर करून घेतली.पुढे आमचे सर्व उपक्रम संपूर्ण बीड जिल्ह्यासह राज्यात जाऊ लागली. मग हे कृतीयुक्त आनंददायी गीतांचा संग्रह फक्त माझ्यापुरताच न राहता सर्वानाच उपयोगी व्हावा म्हणून या सर्व गीतांचा संग्रह 'ऐसा घडवू बालक' या पुस्तक रूपानं सर्वानाच उपलब्ध करून दिला.या पुस्तकासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पुणे,पूर्व शिक्षण संचालक आदरणीय नांदेडे साहेबांचे भरभरून शुभेच्छारुपी आशीर्वादही मिळाले.

दररोज मुलांना नवीन काहीतरी घेण्याची आता चांगलीच सवय झाली होती.त्यांच्यासाठी प्रत्येक घटक कृतीतून, साभिनय घेणे,गणितातील बेरीज,वजाबाकी हा घटक प्रत्यक्ष खेळातून सादर करणे, बोटांवर उजळणी सादर करणे,वारांची नावे मनोरंजक पद्धतीने मुलांकडून सादर करून घेणे, मुलांना इंग्रजी मुळाक्षरे सोपे होण्यासाठी खेळातून मांडणी करणे, इंग्रजी विषयाच्या बऱ्याच संकल्पना मैदानावर मुलांना कृतीतून स्पष्ट करून,त्यांच्या कडून ते करून घेणे, जो वार तो पाढा पाठ करणे,अभ्यासाव्यतिरिक्त परिसर भेट, निसर्ग सहल, वृक्षारोपण करणे, झाडांचा वाढदिवस साजरा करणे, झाडांना राखी बांधून राखीपौर्णिमा साजरी करणे, उपक्रमाची दहीहंडी साजरी करणे,विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी स्नेहसंमेलन आयोजित करून त्याची अंमलबजावणी करणे,त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी स्पर्धा परीक्षेसाठी बसवणे, त्यासाठी एक्स्ट्रा तासिका घेऊन तयारी करून घेणे अशी अनेक उपक्रम सातत्याने घेत आम्ही राबवत असतो. याचा परिपाक म्हणजे शाळेचा विद्यार्थी पट कायम वाढत राहून आज ८ व्या वर्षी ८० वर पोहचला. हे सर्व उपक्रम ४००० च्याही वर उपक्रम माझे Dhere Usha या शैक्षणिक चॅनेलवरती सर्वांसाठी उपलब्ध आहेत.

चॅनल लिंक : https://youtube.com/@dhereusha1309?si=imlJTGR9Wt-hhkaB

वरील YouTube चॅनेलमध्ये विद्यार्थ्यांच्या क्षमता वाढीसाठी राबवलेले सर्व कृती,खेळ,उपक्रम यामध्ये आपणास पहावयास मिळतील. आमच्या या आनंददायी शिक्षण पद्धतीमुळेच ढेकणमोहा शाळेतील विद्यार्थी शाळेत टिकून राहिला आणि आनंददायी, मनोरंजक पद्धतीने शिकू लागला. अशा अनेक विविध उपक्रमाच्या जादूनेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण



विकासास पोषक वातावरण तयार होऊन शाळेचे वातावरण अगदी आनंदमय होऊन गेले.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात विविध खेळ,उपक्रम,गाणी,गोष्टी यांचे अनन्य साधारण महत्त्व आहे. फक्त पुस्तकी ज्ञान मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे. हेच वरील उपक्रमांमधून आपणास पहावयास मिळेल.

जे आजपर्यंत २३ कोटीपेक्षा जास्त लोकांनी पाहिलेले आहेत. यातीलच काही निवडक उपक्रमाचे २०२२ मध्ये 'नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम' नावाचे माझे दुसरे पुस्तक तयार झाले.यामध्ये मी शाळेत विद्यार्थ्यांसाठी राबवलेले आणि त्यातून आम्हाला काय फलनिष्पत्ती मिळाली हे सुद्धा नमूद आहे.

विद्यार्थ्यांचा क्षमता विकण्यासाठी गेल्या तीन वर्षापासून सातत्याने १ ली ते ३ रीच्या माता पालकांना एकत्र करून त्यांनाही कार्यशाळेच्या माध्यमातून मुलांच्या शिक्षणासाठी शाळेचा भाग बनवले.फक्त विद्यार्थ्यांसाठीच नाही तर विद्यार्थ्यांबरोबरच निपुण भारत (FLN) अंतर्गत आम्ही १ ली ते ३ रीच्या सर्व मातांचे एकूण ९ गट केले असून त्यांच्या मार्फत वाडी, वस्ती, गल्ली, मुहल्ला, तांडा येथील विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात टिकून ठेवण्याचा चांगला प्रयत्न करत आहोत. त्यासाठी

१) आठवड्याला माता पालकांची कार्यशाळा आयोजित करणे

२) मातांसाठी निसर्ग सहल आयोजन करणे.

३) उत्कृष्ट कार्य करणाऱ्या लीडर मातांचा आदर्श लीडर माता म्हणून सन्मानपत्र देवून सन्मान करणे.

४) रेडिओ आकाशवाणी वर व्यक्त होण्याची संधी माताना निर्माण करून देणे.

५) मातांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम घेणे.


६) मातांसाठी वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करणे.

७) मुलांच्या शैक्षणिक क्षमता वाढवण्यासाठी माताना योग्य मार्गदर्शन करणे.

८) मुलांना दिलेला घरचा अभ्यास पूर्ण करून तो पाठवण्यासाठी माता पालक व्हॉट्सॲप ग्रुप तयार करणे.

९) मुलांच्या क्षमता वाढवण्यासाठी माताना वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

१०) दिलेला अभ्यास यांसारखे अनेक उपक्रम सतत राबवत आहोत.या उत्कृष्ट कार्याबद्दल आमचा आणि आमच्या मातांचा डायट,बीड कडून सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.१५ ऑगस्ट २०२३ रोजी महाराष्ट्रातील निवडक दहा जिल्ह्यातील माताना थेट प्रकल्प संचालक कैलास पगारे साहेब यांच्याशी संवाद साधण्याची संधी होती ती सुध्दा आम्हाला आणि आमच्या मातांना मिळाली आणि त्याच दिवशी 'माता पालकांचा सन्मानपत्र देऊन कौतुक सोहळा' झाला.




मुले आता उपक्रमाची जणू वाटच पाहत असतात.सतत कार्यमग्न असणं हा त्यांचा स्वभाव जणू बनला. मुलांच्या नियमित अभ्यासाबरोबरच मागील तीन वर्षापासून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची ओळख व्हावी तसेच जगातील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी MTS,BTS सारख्या परीक्षेला बसवून त्याची तयारीही आम्ही शाळेतच करून घेतो.या परीक्षा बीड जिल्ह्याच्या ठिकाणी या स्पर्धा परीक्षा होतात. विशेष बाब म्हणजे या MTS सारख्या स्पर्धा परिक्षेत जिल्ह्याच्या ठिकाणी केंद्रातून प्रथम आणि द्वितीय येण्याचा मान सुद्धा आमच्या विद्यार्थ्यांनी मिळवून शाळेचा नावलौकिक आणखी वाढवला. (आमची शाळा चौथीपर्यंतच असल्याने शासनाची स्पर्धा परीक्षा लागू नाही).

शाळेमध्ये विद्यार्थी क्षमता वाढावी,त्यांच्या अंगी असलेले कौशल्य वाढीस लागावे यासाठी शाळेने राबविलेले उपक्रम

१) परिसर भेट आयोजित करून परिसराची ओळख करून देणे.
२) जयंती,पुण्यतिथी निमित्त शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे
३) गावातील आठवडी बाजाराला भेट देणे.
४) गावातील उद्योजक,डॉक्टर, शेतकरी यांची मुलांकडून मुलाखत घेणे.
५) परिपाठात जी तारीख तो पाढा घेणे.
६) शाळेत लावलेल्या झाडांचा दरवर्षी वाढदिवस साजरा करणे.
७) राखीपोर्णिमा हा सण दरवर्षी झाडांचा राखी बांधून साजरा करणे.
८) २६ जानेवारीनिमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून नियोजनपूर्वक पार पाडणे.
९) समूहगीत गायन आयोजित करणे.
१०) चित्रकला स्पर्धा आयोजन करणे.
११) सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आयोजन करणे.
१२) भाषण स्पर्धा आयोजन करणे
१३) शाळेसाठी परसबाग तयार करणे.

अशा विविध शालेय स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासास चालना देऊन त्यांच्यातील अंगभूत क्षमता विकनास या उपक्रमांचा सिंहाचा वाटा असतो. अशा वेगवेगळ्या स्पर्धा/कृती/खेळ यामधूनच

१) विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.
२) अंगभूत कलागुणांना वाव मिळतो.
३) अभ्यासातील प्रगती वाढीस चालना मिळते.
४) शिक्षण प्रक्रिया आनंददायी होते.
५) विद्यार्थी क्षमता वाढीस पोषक वातावरण तयार होते.



६) मुलांचा भावनिक,शारिरिक,मानसिक विकास होण्यास मदत होते.

वरील प्रकारचे असे अनेक उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अमुलाग्र बदल होत गेला. शाळेतील सातत्यपूर्ण कृतींमधून मुलांचे शिकण अगदी सहज झालं. शिकण्यातील मजा, आनंद वाढतच गेला. खालील उपक्रमांमधून मुलांच्या क्षमता विकसनास चालना मिळाली

१) स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेला बसवणे.

२)वेगवेगळे भाषिक खेळ राबवणे.

३)शैक्षणिक साहित्यातून पाठातील संकल्पना स्पष्ट करण्यासाठी कृती,खेळ घेणे.

४) आठवड्याला माता पालक कार्यशाळा घेणे.

५) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने दक्ष राहणे.

६) प्रत्येक कृती उपक्रमांमधून प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी चालना देणे.

७)१००% विद्यार्थ्यांच्या १००% क्षमता विकसनासाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करणे.

८) विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था गटाने करणे.


९) विद्यार्थ्यांना बालवयापासूनच वाचनाची गोडी लागावी यासाठी दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन साजरा करणे.

या सर्व उपक्रमांचा परिपाक म्हणजे आज आठव्या वर्षी माझ्या शाळेचा वाढता विद्यार्थी पट.मागील दोन वर्षापासून बाहेर गावाहून आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळेतूनही शाळेत प्रवेश झाले आहेत.त्यामुळे माझ्या आजपर्यंतच्या नोकरीच्या २३ वर्षाच्या काळात याच शैक्षणिक कार्याची दखल घेऊन अनेक नामांकित संस्थेने विविध पुरस्काराने आदर्श शिक्षिका म्हणून सन्मानित केलेले आहे. २०२२ मध्ये बीड जिल्हा परिषदेनेही ढेकणमोहा माझ्या कार्याची दखल घेऊन बीड जिल्हा परिषदेचा मानाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन सन्मान केला.२०२३ या वर्षीचा'लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर २०२३ चा अवॉर्डनेही सन्मानित केले.

लोकमत अवॉर्ड लिंक:-👇

https://youtu.be/XGpRGTxy0WI?si=29gUg5DOuVzaLqTx

अश्या प्रकारे माझी बदललेली ढेकणमोहा शाळा आज संपूर्ण राज्याने पाहिली. हे सर्व शैक्षणिक कार्य करताना मला माझ्या सहकारी जायभाये मॅडम,माझी केंद्रातील सहकारी शिक्षक बांधव, शालेय समिती,ढेकणमोहा ग्रामस्थ, ग्रामपंचायत,पालक, माता पालक, उत्कृष्ट कार्याला अनेक समाजातील हितचिंतक,विद्यार्थी यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले आणि कौतुकाची, प्रेरणेची थाप मिळत गेली आणि म्हणूनच आमच्या अनेक उपक्रमांची जादू होऊन ऑक्सीजनवरील शाळा आज बहरली याचा मनोमन आनंद आणि अभिमान वाटतो आहे.



बदललेली शाळा



पुरोगामी विचाराचे **एकमत** सप्तरंग epaper www.dainikekmat.com ७

रविवार, दि. ०४ ऑगस्ट २०१९

स्पर्धेच्या युगात टिकायचं असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. आज प्रत्येक पालक पाल्याच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी धडपडतो आहे. मुलांच्या शिक्षणासाठी पालक खेडेगाव सोडून शहरात राहायला येत आहेत.

शहरातील चकचक व झगमगाटी शाळेचा परिसर,तेथील डोनेशन पालक मोठ्या हिमतीने भरतायत, मात्र या शाळेमध्ये कुटल्या आणि कसल्या प्रकारचे गुणवत्तापूर्ण शिक्षण कुटली विद्वत्ता असणारे शिक्षक देतात हा

चिंतनाचा विषय आहे. असेच आपली बदली ज्या गावात झाली तेथील शाळेला मूर्त रूप देऊन तिला नवसंजीवनी देणाऱ्या बीड जिल्ह्यातील या दोन शिक्षिकांची यशोगाथा आपण जाणून घेणार आहोत.

ऑक्सिजनवर असणाऱ्या शाळेला शिक्षणसंजीवनी देणाऱ्या शिक्षिका

आशेचे बेट!

▶संतोष मुसळे

जालना, गोवा. ९७६३५२७०९४

अशीच काहीशी या शाळेची कहाणी.....

बीड तालुक्यातील, जरूड केंद्रातील जि. प. ढेकणमोहा शाळा. ज्या शाळेने आजूबाजूच्या दहा गावांतील आजपर्यंत पहिली ते सातवीपर्यंतच्या ४०० विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम केले, ती आज शेवटच्या घटका मोजत होती. या स्पर्धेच्या युगात शाळा रसातळाला गेली. सातवीपर्यंतची शाळा आता चौथीपर्यंत होऊनही तिचे अवघे दहाच विद्यार्थी राहिले होते. आता शाळा बंद पडणार अशा परिस्थितीत २०१८ मध्ये ऑनलाईन बदल्या झाल्या आणि या शाळेला श्रीमती उषा कृष्णासाहेब ढेरे आणि सुनीता जायभाये या हाडाच्या शिक्षिका मिळाल्या.

या दोघींनी वेळेचे भान न ठेवता गावात फिरून प्रत्येकाच्या दारात जाऊन गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी दिली, काही पालकांनी विश्वास ठेवून विद्यार्थी प्रवेश दिले परंतु काही पालकांनी मागच्या अनुभवावरून दारातही उभे राहू दिले नाही, तर काहींनी हो म्हणून वेळ निभावली, कुत्रा जणांनी तर म्हणणेसुद्धा ऐकून घेतले नाही. मन खूप उदास, खिन्न होत होते पण मॅडमनी जणू काही शाळा उभी करण्याचा विडाच उचलला होता.

महत्प्रयासाने पहिलीत वीस प्रवेश झाले आणि १० पटांची शाळा पहिल्याच वर्षी ३० पटांची झाली आणि सुरू झाली शाळेची नव्याने गुणवत्तेकडे वाटचाल. १९५० ला ढेकणमोहा येथे जि. प. प्रा. शाळा सुरू झाली. ४०० पट असणाऱ्या या शाळेने अनेक गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडवले, कालांतराने संस्थेच्या शाळा सुरू झाल्या, त्यांनी गुणवत्तेवर भर देण्यास सुरुवात केली मात्र जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या ही बाब लक्षात आली नाही आणि बघता बघता ही सातवीपर्यंतची शाळा चौथीपर्यंत होऊन फक्त १०विद्यार्थी राहिले. आता ही शाळा या वर्षी बंद पडणार, शाळेला कुलूप लागणार असे वाटत होते पण म्हणतात ना प्रत्येकाचे दिवस असतात तसे ढेरे मॅडम आणि जायभाये मॅडममुळे या शाळेचे दिवस पुन्हा फुलून आले.

जो तो शाळेविषयी नकारात्मक चर्चा करून सांगत होता, इतकेच काय पण तुम्ही online बदलीसाठी हे गाव कशाला दिले होते इथपर्यंत चर्चा होऊ लागली.....परिस्थिती कठीण होती. गावात गेल्यानंतर गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य आणि गावकऱ्यांना शाळेत निरोप पाठवून बोलावून घेतले, बरीच चर्चा झाली. शाळेविषयी कऱ्याच नकारात्मक प्रतिक्रिया येऊ लागल्या, त्यातही गावकऱ्यांनी ढेरे मॅडमच्या कामाविषयी youtube ला व्हीडीओ पाहिले असल्याचे सांगितले. मॅडमचे काम खूप छान आहे असे गावकऱ्यांनी सांगितले.गावाच्या आजूबाजूला कऱ्याच मराठी, इंग्रजी माध्यमाच्या शाळा-कॉलेज आहेत, अशा परिस्थितीत ढेरे मॅडम आणि जायभाये मॅडम शिक्षणाचा वसा चालवत होत्या, जून २०१५ ला पहिलीत १६ विद्यार्थ्यांचा प्रवेश होऊन शाळा सुरू झाली. काही पालकांनी तर तब्बल दोन-तीन महिन्यांनंतर गुणवत्ता पाहून मुलांचे प्रवेश निश्चित केले. अनेक नकारात्मक बाबी समोर असतानाही 'गुणवत्तापूर्ण शाळा'उभी करायचीच हे मॅडमनी ठरवले होते.

सुरुवातीला विद्यार्थ्यांना दिवसभर शाळेत टिकवून ठेवणे म्हणजे तारेवरची कसरत होती. सारखं सारखं मुले प्रश्न विचारायचे-मॅडम घरी कधी जायचं? शाळा कधी सुटणार? लई भूक लागली...,नाहीतर गुपचूप पळून जायची. कधी कधी मॅडमला जेवायलासुद्धा मिळत नसे. ...पण मॅडमही शेवटी सावित्रीचीच लेक, ती थोडीच असं मागे हटणार होती?

ढेरे मॅडमला गायन, नृत्य, उपक्रमांची आवड असल्याने कृतीयुक्त गीते मॅडम विद्यार्थ्यांसाठी सादर करत गाणी गात, विनोदी चुटकुले सांगून मुलांचे मनोरंजन करीत आणि प्रत्येक उपक्रमाचा व्हीडीओ तयार करून Dhere usha youtube चॅनलला अपलोड करून पालकांच्या व्हॉट्सॲप ग्रुपला share करत.यामुळे आपण मोबाईलवर दिसतो याचा आनंद मुलांना खूप होऊ लागला आणि पालकांना ग्रुपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता दिसू लागली,शिक्षणातील तळमळ जाणवली, कामाचा पारदर्शीपणा भावला, नकारात्मक दृष्टिकोन हळूहळू सकारात्मक होऊ लागला आणि जुले २०१८ अखेर शाळेचा एकूण पहिली ते चौथीचा पट ३० झाला. हळूहळू मुले शाळेत रमू लागली. हे सर्व पाहून गावकऱ्यांनीही शाळेसाठी मैदान, वर्गखोली दुरुस्ती, साऊंड सिस्टीम, खेळाचे साहित्य अशी मदत करण्यास सुरुवात केली, शाळेला पुन्हा पूर्वीचे दिवस येतील याची खात्री गावकऱ्यांना वाटू लागली. झाडाला पालवी फुटावी तसे मनाला आशेचे पंख फुटू लागले.१५ ऑगस्ट जवळ येत होता तशी विद्यार्थ्यांची भाषणे,देशभक्तीपर गीत गायन सराव, जोरात तयारी सुरू झाली, ढेरे मॅडमनीही स्वातंत्र्यदिनानिमित्त त्यांचे स्वलिखित गीत सादर केले, मुले आता छान रमली होती, अभ्यासातही खूप छान प्रगती होत होती, अवघ्या दोन महिन्यांत विद्यार्थी उपक्रमाचे 80 videoes youtube चॅनलला अपलोड झाले. अशा प्रकारे १५ ऑगस्ट कार्यक्रमामुळे प्रत्येक गावकरी खुशीत बोलायचा, आता शाळा बोलू लागली, कऱ्याच वर्षांनी शाळेतून गाण्याचा आवाज येऊ लागला, शाळेच्या भिंती बोलू लागल्या, आता शाळा खूप छान झाली, वगैरे, वगैरे... शालेयविषयीची पंचक्रोशीतील नकारात्मकता पुसून काढण्यासाठी दोघी भगिनी जिवाचे रान करत होत्या, शून्यातून मुले घडवताना तारेवरची कसरत करत होत्या, पण म्हणतात ना, 'कुंभारासारखा गुरू नाही रे जगात,वरी पालिती घपटा आत आधारावा हात.' अशी विविध मार्गांनी शिक्षणाच्या प्रवाहाबरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षणाची वाटचाल सुरू झाली. गावकऱ्यांनी १५ ऑगस्टचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना पेन, पेन्सिल, वह्या, कंपास, असे विविध साहित्य वह्यीस म्हणून दिले आणि ढेरे मॅडम आणि जायभाये मॅडम यांनाही 'गुणवंत शिक्षिका'म्हणून सन्मानित केले.

एक वर्षात जि. प. प्रा. शाळा ढेकणमोहा ही पंचक्रोशीत गुणवत्तापूर्ण शाळा म्हणून नावारूपास आली आहे त्याचे कारण म्हणजे शाळेत राबवले जात असलेले विविध उपक्रम--

▶मनोरंजनातून शिक्षण-: यामुळे विद्यार्थी शाळेत टिकून राहतो आणि आनंदाने शिक्षण घेतो.

▶youtube channel उपयोग : मॅडमच्या चॅनलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आपण छान उपक्रम सादर केला तर आपल्याला सगळे नावाजतात ही भावना विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागून अभ्यासाची चढाओढ विद्यार्थ्यांमध्ये लागली परिणामी विद्यार्थी टिकून राहण्यास आणि शिकण्यास मदत झाली ▶सर्वसमावेशक शिक्षण : आज शाळेतील प्रत्येक विद्यार्थी प्रगत आहे,शाळेतील बहुविकलांग बबलू चौरसे विद्यार्थीही सहजगत्या वाचन-लेखन करतो हे त्याचे उत्तम उदाहरण,त्यांचेही youtube ला video upload आहेत, पाहू शकता. ▶कृती प्रात्यक्षिकातून अध्यापनावर भर : यामुळे विद्यार्थ्यांना कृतीयुक्त सहभाग वाढून ज्ञान अधिक पक्के होण्यास मदत होते. ▶इंग्लिश विषयावर अधिक भर : यामध्ये मराठी शब्दांचे इंग्लिशमधून spelling सांगणे, 1 to 100 चे spelling सांगणे, मुलाक्षरे इंग्लिशमधून पाठांतर, poems कृतीयुक्त सादर करणे, नाटीकरणातून story शिकवणे, इ. मुळे हसतखेळत इंग्लिशचा अभ्यास होऊन विषयाची आवड निर्माण झाली. ▶जी तारीख तो पाढा : यामुळे पाढे अधिक पाठ होऊन गणित विषय अधिक सोपा झाला. ▶कृतीयुक्त गणित : यामध्ये बेरीज, वजाबाकी, अंकलेखन इ. पटक प्रात्यक्षिकातून,साहित्याच्या माध्यमातून घेतल्याने अधिक दृढ झाले आणि विद्यार्थी स्वयंअध्ययन करू लागली. ▶खेळातून शिक्षण : मनोरंजनातून शिक्षण हा मॅडमच्या अध्यापनाचा गाभा असून एखादा कठीण घटक खेळाच्या माध्यमातून त्यांनी शिकवला तर तो सहजच विद्यार्थ्यांच्या गळी उतरतो आणि पक्का होतो. ▶स्नेहसंमेलन : यामधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली. ▶हळदीकुंकू, महिला मेळावा: गावातील माता-भगिनींचा शाळेकडे कल वाढला आणि आपल्या पाल्याच्या शिक्षणाविषयी आस्था निर्माण होऊन शिक्षणाविषयी जागृती झाली. ▶वाढदिवसावरील खर्चाएवजी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करणे: यामध्ये गावातील कुण्या व्यक्तीचा, शाळेतील विद्यार्थ्यांचा, मॅडमचा कुणाचाही वाढदिवस असेल तर त्यावर होणारा खर्च टाळून शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गरज असलेली वस्तू दिली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळून उपस्थिती टिकण्यास मदत होते.

▶स्लीप डे: यामध्ये विद्यार्थ्यांना आठवड्यातून एक दिवस एक गोड पदार्थाची मेजवानी दिली जाते. ▶परिसर भेट: या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या परिसराविषयी माहिती मिळून भौगोलिक परिस्थितीचे प्रत्यक्ष ज्ञान होते. ▶वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन: यामध्ये शाळेत, परिसरात १ जुलैच्या दिवशी वृक्षारोपण करून ती सर्व झाडे आज जिवंत रूपात आहेत, विद्यार्थ्यांमध्ये वृक्षसंवर्धनाची ज्योत पेटवून, वृक्ष कालची गरज कशी आहेत हे बालमनावर बिंबवले जाते. ▶आंतरराष्ट्रीय योग दिन: २१ जून हा आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहाने प्रात्यक्षिकातून साजरा करून त्याचे आयुष्यात काय महत्व आहे ते पटवून दिले जाते.

epaper : www.dainikekmat.com epaper : www.dainikekmat.com epaper : www.dainikekmat.com epaper : www.dainikekmat.com epaper : www.dainikekmat.com

ऑक्सिजनवर असलेल्या शाळेला उपक्रमाने श्वास दिला.



सहशालेय उपक्रमात ग्रामस्थांचा सहभाग



झाडाना राखी बांधून दरवर्षी अनोखे रक्षाबंधन साजरे



लॉकडाऊन काळातील गृहभेटी



कोरोना काळात अभ्यास पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना online प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.



लॉकडाऊन काळातील अभ्यास आणि इ साहित्य निर्मिती



ाकाशा

7AUG2023

स्वातंत्र्यदिनी ढेकणमोहा माता-पालक यांचा कौतुक सोहळा संपन्न

बीड (महाराष्ट्र) संपादकीय गुरुवार, दि.०९ फेब्रुवारी २०२३ पान -२

प्राथमिक शाळा ढेकणमोहा,बीड माता पालक यांची निसर्ग सहल संपन्न

सक्रीय माता पालक गटांचा सन्मान सोहळा,उपक्रम



कृतीगीताची लस टोचून मृतशाळेला दिली नवसं

शिक्षणातील दीपस्तंभ

चला मुलांनो ऐवजी बाळांनो चला...

Save News

काशा

कोरोनाची सुट्टी,अभ्यासाशी गट्टी

रयतेचा कैवारी

ढेकणमोहा शाळेत शाळापूर्व तयारी मेळावा उत्साहात संपन्न

शाळेसाठी राबवलेल्या उपक्रमाची वर्तमानपत्रांनी घेतलेली दखल



विद्यार्थ्यांसाठी राबवलेले विविध उपक्रम



कौतुकास्पद

पाळण्यात 'न' दिसलेले पाय

'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात', अगदी सरसकट केले जाणारे हे विधान. पण प्रत्येक पेशी मुलाचे हे गुण लहानपणी आपल्याला दिसतीलच असं नाही. पालक, शिक्षकांना हे गुण शोधून ते विकसित करावे लागतात. कधी कधी ही प्रक्रिया वेळखाऊ, किचकट असते. पण एखाद्या विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्त्व अर्थ उमलताना पाहणे हा आनंद अगदी अगळा वेगळा.

उषा बप्पासाहेब दरेर, शिक्षिका, बीड
संपर्क : ९४२००२५०७८

अ‍ाडदांडगा वर्ग बोलणारा चुणचुणीत प्रतिसाद देणारा, पण तुम्हाला एका मुलीकडून प्रतिसाद येत नाही. तिला बौद्धिक मर्यादा नाहीत पण प्रचंड एकटेपणा आणि बुजलेपण आहे तिच्यात. या मुलीला इतरांच्या बरोबरीत आणायचं किंवहुना त्यांच्या पुढे न्यायचं अस मी ठरवलं आणि सुरू झाला रागिणी आणि माझ्या आगळ्या वेगळ्या नात्याचा प्रवास.

२०२१ मध्ये रागिणी निर्मळ या विद्यार्थिनीचा इयत्ता पहिली वर्गासाठी प्रवेश निश्चित झाला. तशी रागिणी स्वभावाने शांत शांतच. तिला प्रत्येक कृतीमध्ये उपक्रमामध्ये समाविष्ट करून घेण्याचा खूप प्रयत्न केला पण तिचा प्रतिसाद मात्र अत्यंच. सगळ्या क्लृप्त्या वापरून झाल्या पण रागिणीचा प्रतिसाद हवा तितका मिळत नव्हता. मनोरंजनातून अध्यापन ही माझी नेहमीची हातोटी असल्याने पहिली वर्गासाठी सातत्याने नवनवीन गाणी, गोष्टी, खेळ उपक्रम साद्रीकरण व्हायचं. प्रत्येक विद्यार्थी त्यात रमायचा, पण रागिणी मात्र या सर्वांना अपवाद ठरत होती. अनेक शैक्षणिक साहित्य वापरण्यास हाताळण्यास दिले तरीही तिची आवड काही दिसत नव्हती. किमान मैत्रिणींमध्ये तरी तिने खूप मनसोक्त खेळावं, हुंदडावं असं मनोमन वाटायचं पण रागिणीचा तिघेही प्रतिसाद कमीच.

भरपूर खेळल्यानंतर तरी ती वाचन, लेखन, कृती, उपक्रमामध्ये रमेल म्हणून मी तिला खेळातून देण्याचा खूप प्रयत्न करायचे पण रागिणी वाचन लेखन तर दूरच, पण साधं चेहऱ्यावर हसू देखील नाही. तिच्या आईशीही याबाबतीत बोलणं झालं, तिच्या घरी तिला सतत नकारात्मक भावनेने बघितलं जायचं हे लक्षात आल्यानंतर आपलंच काहीही करून रागिणीला वाचायला आणि लिहायला शिकवायचंच अशी पक्की खूणगाठ मनाशी केली.

असंच सहा महिने गेले वर्षही संपलं. आता ती दुसरीत जाणार होती. वर्गातील इतर मुलं खूप छान वाचन करायची, लिहायची, तरीही ममामध्ये मात्र कुठेतरी खंत वाटत होती कारण रागिणी मात्र या विद्यार्थ्यांच्या तुलनेमध्ये खूप मागे होती. वर्गातील प्रत्येक मुलाने हे बरोबरीने चालावंत तिच्या घरी तिला सतत नकारात्मक भावनेने बघितलं जायचं हे लक्षात आल्यानंतर आपलंच काहीही करून रागिणीला वाचायला आणि लिहायला शिकवायचंच अशी पक्की खूणगाठ मनाशी केली.

असंच सहा महिने गेले वर्षही संपलं. आता ती दुसरीत जाणार होती. वर्गातील इतर मुलं खूप छान वाचन करायची, लिहायची, तरीही ममामध्ये मात्र कुठेतरी खंत वाटत होती कारण रागिणी मात्र या विद्यार्थ्यांच्या तुलनेमध्ये खूप मागे होती. वर्गातील प्रत्येक मुलाने हे बरोबरीने चालावंत



हवं ही माझी नेहमीची तळमळ. रागिणीला वर्गामध्ये घेतलेल्या सर्व कृती पूर्णपणे येण्यासाठी मी स्वतःस पणाला लावत होते.

दुसरी वर्गात सहा महिन्यांनंतर अचूक प्रयत्नांनंतर शैक्षणिक साहित्याच्या मदतीने ती मुळाक्षरे आणि तोडकेमोडके साधे शब्द वाचू लागली. रागिणीला जसे स्वेत पटेल तीच भाषा, तीच पद्धती, तोच खेळ, तसाच उपक्रम मी राबवत होते. सगळ्या वर्गासाठी वेगळा आणि रागिणीसाठी वेगळा वेळ, वेगळा अभ्यास आणि सगळ वेगळच देत होते. तिनं स्पष्ट वाचायं, विचारलेल्या छोट्या छोट्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, मि- मैत्रिणींमध्ये वेगवेगळ्या उपक्रमात हसतमुखाने सहभागी व्हावं, यासाठी जे जे करायं लागेल तेथे मी करत होते.

आता मात्र हळूहळू रागिणीमध्ये बदल होऊ लागला होता. तिच्याच्यामे आत्मविश्वास दिसू लागला. चेहऱ्यावर आपल्याला काहीतरी येत असल्याचा आनंद दिसत होता. हळूहळू का होईना पण चित्र- मैत्रिणींशी ती बोलू लागली. काहीतरी लिहू लागली. वाचू लागली. चित्र काढू लागली. दरोज न चुकता नियमितपणे शाळेत येऊ लागली. नकळतपणे मजबूतजबळ येऊन बसू लागली. मी हे केलं, मी हे चित्र काढलं, मी हे लिहिलं असं दाखवू लागली तिच्या चेहऱ्यावर त्या कृतीमधला आनंद स्पष्ट दिसत होता. अधून-मधून 'मलाही' हे यायला हवं असं तिला वाटत होतं, हे मला दिसत होतं आणि हे तिचं बदलंच आता तिला पुढे घेऊन जाणार होतं.

आता रागिणी तिसरीला आहे

मुलांच्या अनुभवाला, परिस्थितीला, परिघेतनाला, शिक्षणाचं माध्यम बनवलं की, मूल करी शिकायला तयार होतात. मुलांचं शिकणं म्हणजे त्यांना 'शिकवून काहणयाची' घाई करणं नाही.प्रत्येक वर्गामध्ये अशा 'रागिणी' असतात. त्यांना इतर सर्वांसोबत आणायचं असेल तर नक्कीच तिचे खरी शिक्षकांची कसोटी असते. एकदा का मुलांच्या मनामध्ये आपण घर केलं की, मग त्यांच्या पुढचा शैक्षणिक प्रवास सहज, सोपा आणि आनंददायी व्हायला मदत होते. पाळण्यात 'न' दिसलेले पाय आपल्याला सापडतात. ते पाय विकसित सिद्ध होतात.

तिच्यामध्ये मला अपेक्षित बदल पाहून आणखीच हुरूप आला. त्या दिशेने माझे प्रयत्न मात्र चालूच होते त्याला रागिणीचाही छान प्रतिसाद मिळत होता. स्वत:हून काहीतरी मला विचारत असायची. काहीतरी करून दाखवायची. रागिणीला आता प्रत्येक गोष्टीमध्ये रस वाटू लागला. रागिणीसुद्धा या गटकार्यामध्ये छान प्रतिसाद नोंदवते. अगदी अस्खलितपणाचे ते वाचू लागली. तिच्या चेहऱ्यावर त्या कृतीमधला आनंद स्पष्ट दिसत होता. अधून-मधून 'मलाही' हे यायला हवं असं तिला वाटत होतं, हे मला दिसत होतं आणि हे तिचं बदलंच आता तिला पुढे घेऊन जाणार होतं.

आता रागिणी तिसरीला आहे आणि ती माझी नेहमीची तळमळ. रागिणीला वर्गामध्ये घेतलेल्या सर्व कृती पूर्णपणे येण्यासाठी मी स्वतःस पणाला लावत होते.

दुसरी वर्गात सहा महिन्यांनंतर अचूक प्रयत्नांनंतर शैक्षणिक साहित्याच्या मदतीने ती मुळाक्षरे आणि तोडकेमोडके साधे शब्द वाचू लागली. रागिणीला जसे स्वेत पटेल तीच भाषा, तीच पद्धती, तोच खेळ, तसाच उपक्रम मी राबवत होते. सगळ्या वर्गासाठी वेगळा आणि रागिणीसाठी वेगळा वेळ, वेगळा अभ्यास आणि सगळ वेगळच देत होते. तिनं स्पष्ट वाचायं, विचारलेल्या छोट्या छोट्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, मि- मैत्रिणींमध्ये वेगवेगळ्या उपक्रमात हसतमुखाने सहभागी व्हावं, यासाठी जे जे करायं लागेल तेथे मी करत होते.

आता मात्र हळूहळू रागिणीमध्ये बदल होऊ लागला होता. तिच्याच्यामे आत्मविश्वास दिसू लागला. चेहऱ्यावर आपल्याला काहीतरी येत असल्याचा आनंद दिसत होता. हळूहळू का होईना पण चित्र- मैत्रिणींशी ती बोलू लागली. काहीतरी लिहू लागली. वाचू लागली. चित्र काढू लागली. दरोज न चुकता नियमितपणे शाळेत येऊ लागली. नकळतपणे मजबूतजबळ येऊन बसू लागली. मी हे केलं, मी हे चित्र काढलं, मी हे लिहिलं असं दाखवू लागली



सहशालेय उपक्रमात विद्यार्थी सहभाग



लोकाशा दि.२६ डिसेंबर २०१९

विद्यार्थ्यांचे भावविश्व जपणारी शाळा

आपण आपल्या परिसरात अनेक इंग्लिश, मराठी माध्यमाच्या शाळा पाहतो. भरभक्कम प्रमाणात या आकर्षक फालकवर्गाही त्यांच्या भूलथापांना ही पडलेले दिसून येतात. साहजिकच प्रत्येक पालकांची इच्छा असते की आपल्या पाल्याला दर्जेदार शिक्षण मिळावे, परंतु फक्त फिस रूम,सुंदर बूट ,टाय स्ट,फालकाकडून पूर्ण ऊन घेण्यासाठी दिलेला मयवर्क देऊन दर्जेदार शिक्षणाची अपेक्षापूर्ती ले जात नाही.

हे सर्व सांगायचं हणजे पालकांच्या पेक्षापूर्ती पूर्ण करण्याचे ाम करतेय आपली माय राठी शाळा. .शिक्षणाचे येय म्हणजे 'बालकाचा वांगीण विकास करणे'होय ती अखिल प्रक्रिया ू आहे ती अरुड केंद्रातील जिल्हा परिषद ाथमिक शाळा ढेकनमोहा येथे.एरोड काहीतरी व शिकण्याचा ध्यास घेऊनच शाळेत शिक्षिका ाणि विद्यार्थी येतात.

प्राथमिक शाळा ढेकनमोहा येथे श्रीमती हेरे इम आणि श्रीमती जयभाई मैदम या दोन शिक्षिका उर्वरत आहेत.शाळेत हेरे मैदम मलत मूल्यवर्धन ची उपक्रम, मूल्यवर्धन गीते सादीकरण, स्वच्छ ाळा,सुंदर शाळा उपक्रम,कृतीयुक्त कविता ाठ,पाढे पाठांतर,नाटिका सादीकरण, उपक्रम शिलका सोदवणे,कृतीयुक्त पाठ सादीकरण,, त्यजेच इत्यादी उपक्रम राबवून कृतीयुक्त शिक्षण ून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी तत प्रयत्नशील असतात.

सध्या हेरे मैदम तुरोड शाळा सुटण्यागोदर ाद्यार्थ्यांना उपक्रम सागतात आणि दुसऱ्या दिवशी ा उपक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांकिोना मेन्की ाडून तो पालकांच्या आणि इतर व्हाट्सापच्या ुपवर शेअर करतात.त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची एक वेगळीच चढाओढ लवर होऊन विद्यार्थी आज मैदम काय उपक्रम देणार याकडे लक्ष देऊनच असतात.वांमध्ये,सुंदर हस्ताक्षर,इंग्लिश पाढे पाठांतर,इंग्लिश ,मराठी विषयाचे सुट्टलेखन, मराठी मुलाक्षरे इंग्लिशमध्ये पाठांतर करणे,इ उपक्रमाचा समावेश आहे.यामध्ये विद्यार्थी उपस्थिती वाढून शैक्षणिक प्रगती होण्यास मदत होते.असे मैदमचे म्हणणे आहे.त्या पुढे सागतात की,पहिलीच्या वर्गातील सपराज हा ७५% दिव्यांग असणारा विद्यार्थीही अतिशय छान अक्षरा पटुतीने प्रत्येक उपक्रमात आनदाने सहभागी होऊन जेव्हा कृती उपक्रम सादीकरण करतो तेव्हा मनाला खूप आनंद होऊन समाधान वाटते..

बोडक्यात काय तर मराठी विषयाबरोबरच इंग्लिश विषय शिक्षण हसतखेळत, मनोरजनातून,कृतीयुक्त शिक्षणाचा मा दिल्यामुळेच प्राथमिक शाळा ढेकनमोहा शाळेची प्रगती करण्यात आम्हाला बऱ्याच प्रमाणात यश मिळाले आणि यामुळे विद्यार्थी आणि पालक वर्ग देखील शाळेच्या प्रगतीबाबद समाधान व्यक्त करत आहेत असे दोघीही शिक्षिका भगिनींचे म्हणणे आहे,म्हणजेच मुलांचा सर्वांगीण विकास साधून त्यांचे भावविश्व उलगडणारी शाळा म्हणजेच ०प्राथमिक शाळा ढेकनमोहा० असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

लेखक :- अनंत उर्फ बाबू करांडे
ढेकनमोहा ९७११९८०१५१

विद्यार्थी सन्मान...



ABP माझा या वृत्तवाहिनीने घेतलेली दखल, आणि स्वलिखित उपक्रम पुस्तिका



सहशालेय उपक्रम आणि अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर



अध्यापनात साहित्य वापर आणि विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमात सहभाग



ढेकणमोहा ग्रामस्थांकडून सन्मान



प्राथमिक शाळा ढेकणमोहा शाळेचे यश

लोकाशा

13DEC2018

ढेकणमोहा ग्रामस्थांकडून उषा ढेरे यांचा सत्कार

रयतेचा कैवारी

बाल रक्षक

बालदिनाचे औचित्य साधून ढेकणमोहा शाळेची परिसर भेट

विविध स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे आणि माता पालकांचे यश,सन्मान



विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञानावर आधारित काढलेल्या प्रश्नावलीचे पुस्तक रूपाने प्रकाशन.



विद्यार्थ्यांसाठी राबवलेले विविध शैक्षणिक उपक्रम



'महाराष्ट्र शासन'
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
'महावाचन उत्सव २०२४'

प्रशस्तीपत्र

Vaishnavi Kale

ZPPS DHEKANMOHA, BID, इयत्ता ३ री, **महावाचन उत्सव २०२४** या उपक्रमात इयत्ता **३ री ते ५ वी** या गटातून सहभाग घेतल्याबद्दल आपणास हे प्रशस्तीपत्र प्रदान केले जात आहे. आपल्या वाचनाच्या आवडीने आणि सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम यशस्वी झाला आहे. वाचनाचा प्रवास आपल्याला नव्या उंचीवर नेऊन ठेवेल यात शंका नाही. महावाचन उत्सवात सहभागासाठी आपले अभिनंदन!

आपल्याला पुढील वाचन प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा!

दीपक केसरकर
मंत्री, शालेय शिक्षण,
महाराष्ट्र

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र



'महाराष्ट्र शासन'
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
'महावाचन उत्सव २०२४'

प्रशस्तीपत्र

Anushka Gade

ZPPS DHEKANMOHA, BID, इयत्ता ३ री, **महावाचन उत्सव २०२४** या उपक्रमात इयत्ता **३ री ते ५ वी** या गटातून सहभाग घेतल्याबद्दल आपणास हे प्रशस्तीपत्र प्रदान केले जात आहे. आपल्या वाचनाच्या आवडीने आणि सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम यशस्वी झाला आहे. वाचनाचा प्रवास आपल्याला नव्या उंचीवर नेऊन ठेवेल यात शंका नाही. महावाचन उत्सवात सहभागासाठी आपले अभिनंदन!

आपल्याला पुढील वाचन प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा!

दीपक केसरकर
मंत्री, शालेय शिक्षण,
महाराष्ट्र

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र



'महाराष्ट्र शासन'
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
'महावाचन उत्सव २०२४'

प्रशस्तीपत्र

Srushti Pisal

ZPPS DHEKANMOHA, BID, इयत्ता ३ री, **महावाचन उत्सव २०२४** या उपक्रमात इयत्ता **३ री ते ५ वी** या गटातून सहभाग घेतल्याबद्दल आपणास हे प्रशस्तीपत्र प्रदान केले जात आहे. आपल्या वाचनाच्या आवडीने आणि सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम यशस्वी झाला आहे. वाचनाचा प्रवास आपल्याला नव्या उंचीवर नेऊन ठेवेल यात शंका नाही. महावाचन उत्सवात सहभागासाठी आपले अभिनंदन!

आपल्याला पुढील वाचन प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा!

दीपक केसरकर
मंत्री, शालेय शिक्षण,
महाराष्ट्र

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र

शासनाच्या महावाचन चळवळीत विद्यार्थी सहभाग



शाळेच्या प्रत्येक कार्यक्रमात गावकऱ्यांचा सहभाग



सामूहिक वाचन करताना विद्यार्थी





बालिका दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमात माता पालकांचा हिरीरीने सहभाग शैक्षणिक साहित्य वापरुन स्वयंअध्ययन करताना विद्यार्थी



दिवाळीनिमित्त विद्यार्थ्यांनी रायगड किल्ल्याची बनवलेली प्रतिकृती



विशेष उपक्रमांतर्गत गावातील महिला उद्योजक यांची मुलांनी घेतलेली मुलाखत



आनंददायी,दप्तरमुक्त शनिवार अंतर्गत विद्यार्थी फुलांचे गुच्छ तयार करताना



शासनाच्या महावाचन चळवळीमध्ये विद्यार्थी सहभाग,प्रमाणपत्र



विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूपासून स्वतः तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन



विद्यार्थी उपस्थिती वाढवण्यासाठी राबविलेला उपस्थिती ध्वज उपक्रम





शाळेत फुलवलेली परसबाग



प्रसंगोपात उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग



तंबाखूमुक्त शाळा प्रमाणपत्र

शिक्षण



उषा बप्पासाहेब ढेरे / करपे

(सहशिक्षिका - एम.ए., डी.एड., जि. प. प्राथमिक शाळा, ढेकणमोहा, ता. बीड)

लोकमतच्या वतीने देण्यात आलेला हा पुरस्कार मी माझ्या ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना, माझ्या सहकारी शिक्षकांना, माझ्या गावाला आणि ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले, त्यांना अर्पण करते. त्यांच्याशिवाय मला इथपर्यंत मजल मारता आली नसती. शिवाय लोकमतने या पुरस्कारासाठी माझी निवड केली, यासाठी मी लोकमतचे आभार मानत शुभेच्छादेखील देते. भविष्यात माझ्या हातून उत्तम विद्यार्थी घडत राहतील, यासाठी मी नेहमीच काम करत राहीन.



लोकमत

epaper.lokmat.com

महाराष्ट्रीयन ऑफ द इयर | विजेते

मुंबई, रविवार, दि. ३० एप्रिल २०२३ लोकमत ४

लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर पुरस्कार सोहळ्याला सायंकाळी प्रारंभ नहीं उपस्थानी होती. मुंबईचे एच. एस. डी. आर. शॉप सिस्टर अनोरे भाले होते. दोघांच्याहा सेलेब्रिटी पुणेकरांच्या सत्कार होताना उपस्थित जनसमुदाय उत्साहा नाहीं, सेहा आणि उत्कृष्टतेच्या सलाम करत होता. डामेक सिनेमाची सर्वांगाचा सगळ्यर घेण्यात आल्योय उत्साह होते.

लोकमत

महाराष्ट्रीयन ऑफ द इयर

अवॉर्ड्स २०२३

Supported by GOVERNMENT OF TELANGANA

Associate Partners

TATA BKT der LARSEN & TOUBRO CIDCO

महाराष्ट्रातला सगळ्यात मोठा दिमाखदार पुरस्कार सोहळा

शौर्य, सेवा, कर्तृत्व आणि धाडसाला सलाम!

मुंबई : 'पुढच्यासी एकच्या दिवे ओंब करा सजग सावध' या अभंगाप्रमाणे 'लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर' या सोहळ्याने निमित्ताने 'सलेब्रा शतकोत्सवाकडे' या ध्यासाने प्रेरणे, दोघे काम करणे सर्वांच्या राजकीय सामाजिक क्षेत्रांतील दिग्गजांचा त्यांनी केलेले गौरविक भाष्य, पारंपरिक उद्योगांबरोबरच संस्कृतीजपत्रित महाराष्ट्रातील भावनाच्या अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या नवउद्योगांनी केलेली दखल यामुळे हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

या सोहळ्याला राज्याचे पर्यटन आणि पर्यटन वाढ विकासमंत्री गिरीश महाजन होते, उद्योगमंत्री उदय सामंत, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, पर्यावरण प्रदेशसाहब चंद्र पटोले, खासदार उद्योगपती अनिल अग्रवाल, आ. ना. आयरी माहुलकरांचे काम नव्हते आणि आजही नाही, अशी भावना व्यक्त केली दिलीप देशमुख आणि महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्याला राज्याचे पर्यटन आणि पर्यटन वाढ विकासमंत्री गिरीश महाजन होते, उद्योगमंत्री उदय सामंत, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, पर्यावरण प्रदेशसाहब चंद्र पटोले, खासदार उद्योगपती अनिल अग्रवाल, आ. ना. आयरी माहुलकरांचे काम नव्हते आणि आजही नाही, अशी भावना व्यक्त केली दिलीप देशमुख आणि महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

राजकारण (प्रॉमिसिंग)

आ. प्रसाद लाड (मुंबई, भाजप)

लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर राजकारण प्रॉमिसिंग या श्रेणीतील पुरस्कार भाजप आ. प्रसाद लाड यांनी मानले. प्रसाद लाड यांनी पक्षाचा उभारी कार्यालयात, सामाजिक उपक्रमातून आ. अमीन पटेलां, उद्योगमंत्री उदय सामंत आणि लोकमत पीपीसीचे संचालक डॉ. विजय दर्डा.

राजकारण (पदार्पण)

आ. श्वेता महाले (सिंदखेडराजा, जि. बुलढाणा (भाजप)

आयएएस (प्रॉमिसिंग)

मनीषा खत्री (जिल्हाधिकारी, चंद्रपूर)

आयपीएस (प्रॉमिसिंग)

नुरुल हसन (पोलिस अधीक्षक, वर्धा)

उद्योग / व्यवसाय

डॉ. विनय वरेरे (लक्ष्मण पुरम, कोल्हापूर)

क्रीडा

अनिरुद्ध जाधव (अंतर्राष्ट्रीय पूमा ज्युडोखेळाडू, कोल्हापूर)

वैद्यकीय - मुंबई

डॉ. प्रज्ञा चंगेरे (गायनॅकॉलॉजिस्ट, सायन हॉस्पिटल)

वैद्यकीय - राज्य

डॉ. अमेय अरुण बोडकर (ह्रदयरोगतज्ज्ञ, नागपूर)

शिक्षण

उषा वनमासाहेब होरे / कापसे (असिस्टिंग लेखा, टेलिकम्युनिका, ता. सोंदा)

लोकसेवा-समाजसेवा

डॉ. मेधा सामंत (अन्नपूर्णा चौकिदार, पुणे)

इनोव्हेशन इन अ‍ॅग्रिकल्चर

तिलास शिंदे (मधुबनी फार्मर्स, शिंदोरी, नाशिक)

SPECIAL FRAGRANCE PARTNER der

ASSOCIATE PARTNERS TATA BKT LARSEN & TOUBRO CIDCO MSRDC

ENERGY PARTNER MAHAGENCO

HOUSING PARTNERS

REAL ESTATE PARTNER

BANKING PARTNERS

OUTDOOR PARTNERS BRIGHT RONAK ADVERTISING

FUEL PARTNER

GIFTING PARTNERS I'm caffeine

ENVIRONMENT PARTNER

VENUE PARTNER

Tourism Partner

Mumbai Main
Page No. 4 Apr 30, 2023



ई साहित्य निर्मितीमध्ये scert पुणे येथे शिक्षकाचे योगदान



विद्यार्थ्यांसाठी दिक्षा अँप मार्फत तयार करण्यात आलेल्या कंटेंट निर्मितीमध्ये शिक्षक सहभाग



वर्गशिक्षिकेच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञानावर आधारित काढलेली प्रश्नावली पुस्तिका


जिल्हा परिषद शाळांची
यशोगाथा
य । शो । गा । था
विविध उपक्रमातून
विद्यार्थी समृद्ध
करणारी
जि. प. शाळा
ढेकनमोहा
ता.जि.बीड
परिस्थिती सांगण्यापलीकडील होती.पण ढेकनमोहा
नवीन शैक्षणिक उपक्रम । उषा देरे
उषा देरे
गुणग्राहक उपक्रमशील शिक्षिका आहेत. नावीन्यपूर्ण
ज्ञात त्यांनी विविध कृतियुक्त उपक्रमांचा समावेश
ानंददायी पध्दतीने अध्ययन-अध्यापन प्रक्रिया पूर्ण
दतीने कृतीची रचना केली आहे. ग्रामीण भागात काम
रजा व विद्यार्थ्यांचा बौध्दिक स्तर विचारत घेऊन
मांचे विश्लेषण केले आहे.
- श्रीकांत कुलकर्णी
शिक्षणाधिकारी, बीड
दुसरे पुस्तक. मुलांना उपक्रमाच्या माध्यमातून सहज
खेकने स्वानुभवातून मांडले आहेत. साध्या सोप्या
दे पालक व शिक्षक आपल्या मुलांसाठी सहजपणे
शीलतेचा ध्यास ही एक जादुई कल्पना आहे.
ल तर बालकांचा सर्वांगीण विकास होतो. संघर्षातून
गाला सांगण्याचा उषा देरे यांचा पुस्तकरूपी प्रयत्न
वाच तो दिशादर्शकही आहे.
-कचरू चांभारे
मुख्याध्यापक
नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम
प्रथम प्रतिबिंब, पुणे
नावी
शैक्षणि
उष





माझा या वृत्तवाहिनीने शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ, शालेय समिती अध्यक्ष यांची मुलाखत प्रसारित केली. १४ भाषेत प्रसिध्द असणारे Times Of India या वृत्तपत्राने देखील सर्वांची मुलाखत घेवून आमच्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थापच जणू दिली.

शाळेच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान

ढेकनमोहा शाळेच्या प्रगतीच्या चढत्या आलेखात शाळा व्यवस्थापन समिती, पालक, माता-पालक, सर्व पत्रकार, गावचे सरपंच, सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिक, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्राचे केंद्रप्रमुख, केंद्रीय मुख्याध्यापक, सर्व शिक्षक बंधू भगिनी, शाळेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या सर्वांच्या योगदानामुळे आज या शाळेत विविध उपक्रमातून विद्यार्थी समृद्ध होण्यास मदत होत आहे.


2018
7 चे 30 1st batch
2024
81

----------**----------

विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वाढविण्यासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न

शाळेचे नाव : जिल्हा परिषद माध्यमिक शाळा खोकरमोहा

शाळेचा पत्ता : हिवरसिंगा, ता.शिरूर (का.), जि.बीड

मुख्याध्यापकाचे नाव : श्री.अतुल रमेशराव मुळे

मुख्याध्यापक मोबाईल नंबर : 9420405790

ईमेल आयडी : zphskhokarmoha@gmail.com




प्रास्ताविक :

पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा खोकरमोहा या शाळेची स्थापना 1861 मध्ये झाली. साधारणतः 20 km अंतरापासून त्या काळामध्ये विद्यार्थी या शाळेमध्ये शिकण्यासाठी येत असत. अनेक गुणवंत विद्यार्थी घडवण्याचे कार्य या शाळेने केले आहे. जवळपास अनेक वाड्या, वस्त्या व खेड्यातून या शाळेला विद्यार्थी येतात. सर्वसामान्य ऊसतोड कामगाराची मुले या शाळेमध्ये येत असतात, वाढत्या स्पर्धेसोबत व इंग्रजी शाळांचे पेव फुटल्यानंतर शाळेतील विद्यार्थी संख्येवर शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे निश्चितच प्रभाव दिसू लागला होता. त्यामुळे नवीन जोमाने शालेय व्यवस्थापन समिती व शिक्षकांनी कामास सुरुवात केली.

परिसराची स्वच्छता वर्ग खोल्यांची सजावट विविध उपक्रमांचे नियोजन हाती घेण्यात आले. शाळेच्या भौतिक विकासासोबत गुणवत्तेला प्राधान्य देण्यासाठी विविध कार्यक्रमांची आखणी करण्यात आली

शाळेची वैशिष्ट्ये -

1. शाळेचे स्वतःचे ॲप निर्मिती
2. शाळेचा ब्लॉग
3. ISO मानांकन शाळा
4. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा 1 जिल्ह्यात व्दितीय क्मांक
5. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा 2 जिल्ह्यात प्रथम क्रमांक
6. CCTV यंत्रणा
7. किशोरवयातील मुलींसाठी पिंक रुम
8. RAIN WATER HARVESTING
9. वाय फाय सुविधा
10. संपूर्ण शाळेत साउंड सिस्टीम कनेक्शन
11. गुणवत्तापूर्ण शिक्षण
12. फ्युचरीस्टिक क्लासरूम
13. आकर्षक व सर्व सोई सुविधायुक्त खोल्या
14. डिजिटल क्लासरूम
15. VIRTUAL CLASSROOM
16. सौर उर्जा वापर
17. सुसज्ज प्रयोगशाळा
18. सुसज्ज अंतरिक्ष कक्ष
19. जलशुद्धीकरण युक्त पेयजल
20. सुसज्ज मैदान
21. शाळेतील सुविधा
22. मोफत गणवेश
23. डिजिटल शाळा
24. सर्व सोयींनीयुक्त शौचालय
25. सर्व वर्गात डिजिटल स्मार्ट बोर्ड
26. ग्रंथालय
27. वैशिष्ट्यपूर्ण विज्ञानकक्ष
28. मुबलक क्रिडा साहित्य
29. सुंदर परसबाग
30. मोफत गणवेश व पाठ्यपुस्तके
31. मोफत बूट व मोजे



विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी घेतलेले उपक्रम :

1. अभ्यासमित्र
2. अतिरिक्त पुरक मार्गदर्शन वर्ग
3. स्पर्धा परिक्षा वर्ग
4. गट अध्ययन अध्यापन
5. वाचन लेखन उपक्रम
6. सामान्यज्ञान प्रश्नमंजुषा
7. वाचन कोपरा
8. सुलेखन वर्ग
9. तारखेचा पाढा उपक्रम
10. गणिती खेळ व कोडी उपक्रम
11. निबंध, चित्रकला, गीतगायन, हस्ताक्षर, वक्तृत्व वादविवाद स्पर्धा
12. अभ्यासपुरक चित्रे लेख गाणी गोष्टी कोडी यांची कात्रणे संग्रह करणे
13. विविध सांस्कृतिक कार्यक्रम
14. बालसंसद व बालसभा
15. विज्ञान प्रयोगशाळेतील प्रयोग करून दाखवणे.
16. शाळेच्या ब्लॉगवर विद्यार्थ्यांचे लेख, चित्रकला, कविता प्रसिद्ध करणे.

शाळेत आलेल्या अडचणी -

विद्यार्थी संख्या कमी होत चालली होती .जिल्हा परिषदेमार्फत नवीन शिक्षकांची भरती नसल्यामुळे शिक्षक संख्या सुद्धा अत्यंत कमी झाली होती. आजूबाजूला नवीन इंग्रजी शाळा उभा राहत होत्या आणि त्याचा विद्यार्थी संख्येवर परिणाम होत होता. दर्जेदार शिक्षण देणे हीच काळाची गरज हे लक्षात घेऊन विद्यार्थी संख्या पुन्हा वाढविणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

शाळेला दर्जेदार ग्राउंड नव्हते.विविध क्रीडा प्रकारामध्ये शाळेचे नाव पुढे येण्यासाठी ग्राउंड तयार करणे आवश्यक होते.विद्यार्थ्यांना स्वच्छ पाणी पिण्याची सोय नव्हती.शाळेमध्ये आयसीटी प्रयोगशाळा व विज्ञान प्रयोगशाळेचा अभाव होता.स्पर्धा परीक्षांचा निकाल अत्यंत कमी येत होता.शाळेला उत्तम किचन शेड व परसबाग नव्हती. शाळेची संरक्षक भिंत अत्यंत दयनीय स्थितीमध्ये होती.वर्ग खोल्यांमध्ये दर्जेदार शैक्षणिक साहित्य व रंग-रंगोटीची आवश्यकता होती.बराच मोठा परिसर असून देखील वृक्षारोपणाची कमतरता जाणवत होती.




अडचणीवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजना -

शालेय व्यवस्थापन समितीच्या सहविचार सभेमध्ये व ग्रामसभेमध्ये शाळेच्या विकासासंदर्भामध्ये ठराव घेण्यात आला. लोकसहभाग वाढविण्यासाठी शाळेतील माजी विद्यार्थी उच्च पदस्थ अधिकारी झालेले आहेत त्यांच्यामार्फत एक **व्हाट्सअप ग्रुप** तयार करण्यात आला त्यावर शाळेच्या विकासासंदर्भातील उपाययोजना सांगण्यात आल्या व त्यासाठी आर्थिक निधी एकत्रित करण्यासाठी आवाहन करण्यात आले.

1. **ग्राउंडची निर्मिती** : एक महिन्यामध्ये जवळपास अडीच लक्ष रुपये एकत्रित झाले त्यामधून शाळेसाठी **ग्राउंडची निर्मिती** करण्यात आली. अतिशय दर्जेदार मैदानामुळे मागील दोन वर्षांमध्ये अनेक विद्यार्थी शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये तालुकास्तर जिल्हास्तर व विभाग स्तरापर्यंत पोहोचले. मागील वर्षी इयत्ता दहावीच्या एकूण 22 विद्यार्थ्यांना शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये प्रत्येकी पाच गुण व प्रमाणपत्र प्राप्त झाले. कबड्डी खो-खो क्रिकेट आणि वैयक्तिक रनिंग स्पर्धेमध्ये विद्यार्थी जिल्हास्तरावर क्रमांक प्राप्त करू शकले.



2. **वाहतूक व्यवस्थेचे नियोजन** - विद्यार्थी जवळपास आठ ते दहा किलोमीटर अंतरावरून चालत येत असत, विद्यार्थ्यांना येण्या जाण्यामध्ये अडचणी होत असल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाची बस सेवा सुरू करण्यात आली. घुगेवाडी, बरगवाडी या दुर्गम भागातून विद्यार्थी नियमितपणे शाळेला येऊ लागले.

3. **स्वच्छ पाण्यासाठी फिल्टर** उपलब्ध करण्याची जबाबदारी ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतने उचलली व अडीच लक्ष रुपयांचे आरो फिल्टर विद्यार्थ्यांना पिण्यासाठी उपलब्ध करण्यात आले. आता 576 विद्यार्थी याच उत्तम दर्जाच्या आरो फिल्टरचे पाणी पितात आणि आजारी पडण्याचे प्रमाण कमी झाले, शाळेतील नियमित उपस्थिती देखील वाढली.

4. माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद बीड यांच्याकडे पाठपुरावा करून **प्रयोगशाळा** अनुदान उपलब्ध करण्यात आले तसेच **नाविन्यपूर्ण** प्रयोगशाळा उभारण्यासाठी वेगळी खोली तयार करण्यात आली. सध्या 526 विज्ञान प्रयोग यामध्ये उपलब्ध असून विद्यार्थी परिपाठामध्ये दररोज एक विज्ञान प्रयोग सादर करतात.






5. शाळेला **दर्जेदार किचन** तयार करत असताना फ्रिज, रॅक व स्वयंपाकासाठी लागणारे सर्व साहित्य, गॅस मोठी भांडी इत्यादी साहित्य उपलब्ध करण्यात आले.

6. **परसबाग निर्मितीचा** अभिनव उपक्रम पाच गुंठे जागेवर करण्यात आला. यामध्ये टोमॅटो, वांगी, मिरची यांची रोपटी लावून त्यांचा उपयोग माध्यान्ह भोजनामध्ये करण्यासाठी निश्चित करण्यात आले. यामध्ये विविध औषधी वनस्पती व फळ देणाऱ्या जवळपास 40 झाडांची जपणूक मागील दोन वर्षांपासून करण्यात आली आहे. यासाठी संरक्षक जाळी व चांगल्या दर्जाची माती उपलब्ध करण्यासाठी जवळपास दीड लक्ष रुपये खर्च करण्यात आला.










जिल्हा परिषद माध्यमिक शाळा
या नुतन इमारतीचा
॥लोकार्पण सोहळ
शुभहस्ते
मा.ना.जयदत्तजी (अण्णा) क्षीरसागर
प्रमुख उपस्थिती
मा.रविंद्रजी क्षीरसागर
मा.संदीप क्षीरसागर
मा.नवलकिशोर राम
शनिवार दि २५
माहिती
अधिनि



7. **अंतरिक्ष शाळा** हा अभिनव उपक्रम माननीय आयुक्त केंद्रेकर साहेब यांच्या काळामध्ये राबविण्यात आला. त्यासाठी कुठलाही निधी नसताना लोकसहभागातून जवळपास एक लक्ष रुपयाची अंतरिक्ष शाळा उभारण्यात आली परिसरातील सर्व शाळांना ही अंतरिक्ष शाळा दिशादर्शक ठरत आहे यामध्ये विविध अंतराळवीरांच्या संदर्भातील माहिती, उत्कृष्ट प्रकारची दुर्बीण व रनिंग मॉडेल्स अशी विविध उपकरणे तयार करण्यात आली ज्यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी महत्त्वाची भूमिका व सहभाग घेतला. याचीच परिणती म्हणून इस्रो नासा संदर्भात जिल्हा परिषद बीड द्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जिल्ह्यातून सर्वप्रथम चिरंजीव **युवराज पांडुरंग सानप** हा विद्यार्थी आला त्याला **अमेरिकेतील नासा** या अंतराळ संशोधन केंद्राला जिल्हा परिषद बीडच्या निधीद्वारे भेट देता आली व त्यासोबत चिरंजीव **देवकर**



अथर्व हा विद्यार्थी इस्रोसाठी पात्र झाला. या शाळेतील दोन विद्यार्थी इस्रो तिरुवनंतपुरम येथे अभ्यास दौऱ्यासाठी जाऊन आले.



8. शाळेतील शिक्षकांच्या अभ्यास दौऱ्यांचे नियोजन करण्यात आले ज्यामध्ये हैदराबाद येथील बिर्ला प्लॅनेटोरियम व अंबाजोगाई येथील विज्ञान केंद्र यांचा समावेश आहे त्या अंतर्गत विविध उपक्रम पुढे शाळेमध्ये राबविण्यात आले व अंतरिक्ष शाळेची निर्मिती झाली.

9. इयत्ता पाचवी ते दहावी प्रत्येक वर्गामध्ये उत्तम दर्जाचा डिजिटल बोर्ड शिक्षकांना व विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन क्रियेसाठी उपलब्ध करण्यात आला तसेच पहिली ते चौथीच्या वर्गामध्ये 55 इंची स्मार्ट टीव्ही विद्यार्थ्यांना उपलब्ध करण्यात आला. मनोरंजन आणि प्रभावी तंत्रज्ञान याचा अध्ययन अध्यापनामध्ये उत्तम असा उपयोग होऊ लागला.

10. **शैक्षणिक साहित्य निर्मिती** व त्यांच्या उपयोगामध्ये सर्व शिक्षक सक्रिय सहभागी असतात. सर्व साहित्य उपलब्ध झाल्यामुळे विज्ञान पेटी, गणित पेटी व भाषा पेटी यांचा प्रभावी वापर सर्व विषय शिक्षक करू लागले यातून अध्ययन अध्यापनाचा दर्जा वाढला ,बाला उपक्रमांतर्गत वर्ग खोल्यांची रंगरंगोटी केल्यामुळे शाळा आकर्षक झाली .

11. प्रशालेमध्ये मंथन **राज्यस्तरीय परीक्षा** NMMS शिष्यवृत्ती परीक्षा ओलंपियाड व होमी भाभा परीक्षा यांची तयारी ज्यादा तासिकेद्वारे घेण्यात येऊ लागली. उन्हाळी सुट्टी व दिवाळी सुट्टी यांचा उपयोग यामध्ये होऊ लागला त्यामुळे विद्यार्थी या सर्व परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढले. 2022 मध्ये आपल्या शाळेचा विद्यार्थी विभाग स्तरावर शिष्यवृत्ती इयत्ता आठवी परीक्षेमध्ये सर्वप्रथम आला. शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा मागील तीन वर्षाचा निकाल शंभर टक्के आहे.2022 च्या NMMS मध्ये 26 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मागील दोन वर्षांमध्ये शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढण्यासाठी अधिक उपाययोजना केल्या जात आहेत.

12. शालेय **सांस्कृतिक कार्यक्रम** व **अपूर्व विज्ञान मेळावा.** वादविवाद स्पर्धा. वक्तृत्व स्पर्धा. उस्फुर्त भाषण स्पर्धा यांचे उत्कृष्ट असे नियोजन प्रशालेमध्ये केल्या जाते. त्यामुळे मुले तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये नेहमीच अग्रेसर असतात. 2023 विज्ञान मेळाव्यामध्ये जिल्हास्तरीय सर्वप्रथम क्रमांक चिरंजीव **धनराज संदिपान मिसाळ** यानी पटकावला. इन्स्पायर अवॉर्ड मध्ये 2025 साठी चिरंजीव **मानस मिठू मिसाळ** या विद्यार्थ्यांची निवड झाली. 2023 मंथन परीक्षेमध्ये **आनंदी अशोक मिसाळ** ही विद्यार्थी राज्यातून बाविसावी आली. शाळेतील विद्यार्थी राज्य स्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी दोनदा पात्र झाले आहेत तसेच मागील पाच वर्षांमध्ये तीनदा तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय सर्वप्रथम येण्याचा मान शाळेला मिळाला आहे.

13. मागील तीन वर्षापासून **शाळेचा निकाल** शंभर टक्के आहे. 90% च्या वर गुण घेणारे एकूण विद्यार्थी विषयावर भरपूर असून 80 टक्के विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होण्याची संधी शाळेने प्राप्त करून दिली आहे.यावर्षी शालांत प्रमाणपत्र परीक्षेतून उत्तीर्ण झालेले दोन विद्यार्थी फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये इयत्ता अकरावी साठी 96 टक्के गुण घेऊन प्रवेशित आहेत. परिसरातील एमबीबीएस, पॉलिटेक्निक व इंजिनिअरिंग साठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. पोलीस भरती व आर्मी साठी पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे.

14. **आरोग्य शिबिरांचे** नियमित आयोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे व आरोग्य विषयक कमतरतेकडे प्राधान्याने लक्ष दिले. अतिशय गरीब परिस्थितीतील मुले व ऊसतोड कामगारांची मुले शहराकडे डोळे, कान ,दात नियमित तपासणीसाठी जाऊ शकत नाहीत परंतु आरोग्य शिबिरामध्ये त्यांचे योग्य निदान होऊ शकले.

15. **रोबोटिक** व अटल टिंकरिंग लॅब साठी शाळेने सर्व आवश्यक बाबींची पूर्तता केली आहे, लवकरच याची उभारणी करण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी एआय टेक्नॉलॉजी चे नवीन डिजिटल बोर्ड विद्यार्थ्यांना वेगळ्या प्रकारची अध्ययन अनुभूती देतात.

16. शिक्षकांच्या राज्यस्तरीय **नवोपक्रम** स्पर्धेमध्ये यावर्षी श्रीमती **जयश्री अण्णासाहेब खेडकर** यांचा जिल्ह्यातून सर्वप्रथम क्रमांक आला तसेच शैक्षणिक साहित्य व्हिडिओ निर्मितीमध्ये सुद्धा जिल्ह्यातून व




तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा मान श्रीमती **जयश्री अण्णासाहेब खेडकर व मुकुंद भाऊराव पवार** या शिक्षकांना मिळाला.

17. मागील वर्षी राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय आदर्श **शिक्षक पुरस्कार** व राष्ट्र शिल्पकार पुरस्कार श्री **अतुल रमेशराव मुळे** माध्यमिक विज्ञान शिक्षक यांना मिळाला. **श्री राम वसंतराव वाघुंबरे** यांना जिल्हा परिषद चा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला.

18. **जी 20** च्या निमित्ताने रिझर्व बँक ऑफ इंडिया ने अभिनव उपक्रम 2024 मध्ये आर्थिक साक्षरतेवर परीक्षा घेण्यात आली त्यामध्ये तालुकास्तरीय 5000 रुपये जिल्हास्तरीय दहा हजार रुपये व राज्यस्तरीय सर्वप्रथम क्रमांक 51 हजार रुपयांचे पारितोषिक चिरंजीव **युवराज पांडुरंग सानप** व चिरंजीव **कृष्णकांत उद्धव मिसाळ**

या विद्यार्थ्यांना प्राप्त झाला यासाठी मार्गदर्शन श्री अतुल मुळे सर यांनी केले. रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांच्या हस्ते ताज हॉटेल येथे विभागीय स्पर्धेतील सुद्धा तृतीय पारितोषिक या संघास प्राप्त झाले.

19. **रिझर्व बँक ऑफ इंडिया** ने बीड जिल्ह्यातील निवडक शाळांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन केले होते त्यामध्ये देखील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा खोकर मोहातील विद्यार्थ्यांनी चित्रकला व निबंध स्पर्धेमध्ये सर्वप्रथम पारितोषिक प्राप्त केले.

20. **शैक्षणिक सहलीचे** आयोजन दरवर्षी केले जाते ज्यामध्ये वैज्ञानिक ऐतिहासिक भौगोलिक वारसा असणाऱ्या स्थळांना भेट दिल्या जाते व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला जातो.

21. **स्काऊट गाईड** पथकाची निर्मिती करण्यात आली असून या पथका अंतर्गत विविध उपक्रम पार पाडले जातात ज्या मधून सामाजिक उद्बोधन व बालविवाह प्रतिबंध याविषयीचे कार्यक्रम घेतले जातात. आदर्श तंत्रस्नेही व क्रीडा शिक्षक श्रीमान कानडे सर, गर्कळ सर व श्री बांगर सर यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना संगीत कवायत, क्रीडा प्रकार व स्काऊट गाईड संदर्भामध्ये प्राप्त होतात.

22.**मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा** या उपक्रमामध्ये शैक्षणिक वर्ष 2023 - 24 मध्ये बीड जिल्ह्यातून आपली शाळा पाच लक्ष पारितोषिक घेऊन सर्व द्वितीय तर शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये जिल्ह्यातून सर्वप्रथम 11 लक्ष रुपयांचे पारितोषिक शाळेस प्राप्त झाले. **यासाठी शालेय व्यवस्थापन समिती** अध्यक्ष **श्री भिमराव मिसाळ** व उपाध्यक्ष **अशोक मिसाळ** यांचे सहकार्य लाभले.

23. **व्यावसायिक शिक्षण : NSQF** अंतर्गत मागील चार वर्षापासून इयत्ता नववी व दहावी च्या विद्यार्थ्यांना कौशल्य विकास योजनेअंतर्गत व्यावसायिक शिक्षणासाठी इलेक्ट्रॉनिक व ॲग्रीकल्चर या विषयांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली, त्यासाठी श्री डोंगरदिवे व श्री शिरसाट यांची नियुक्ती करण्यात आली. व्यावसायिक शिक्षणासाठी असणाऱ्या सर्व सुविधा प्रयोगशाळा मार्फत देण्यात येत आहे. शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी या विषयासह विद्यार्थी उत्तम गुण घेऊन उत्तीर्ण होत आहेत व भविष्यात व्यावसायिक ज्ञानाचा उपयोग त्यांना होत आहे.




इलेक्ट्रॉनिक विषयाचे व विज्ञान विषयाचे प्रयोग इन्स्पायर अवॉर्ड मध्ये विद्यार्थी सादर करतात.

एग्रीकल्चर विषयामुळे परसबाग निर्मितीमध्ये विद्यार्थ्यांचे सहकार्य लागते, विविध प्रात्यक्षिक करू शकतात.

व्यावसायिक शिक्षणाची विजयपताका माध्यमिक स्तरावर रोवण्यासाठी विविध क्षेत्रभेटी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान दिले जाते यामध्ये नर्सरी, कुक्कुटपालन, शेळीपालन केंद्रांना भेटी आयोजित केल्या जातात.

इलेक्ट्रॉनिक विषया अंतर्गत विद्यार्थ्यांना विविध प्रात्यक्षिकांसोबत क्षेत्रभेटी द्वारे माहिती घेण्यासाठी संधी उपलब्ध करून दिल्या जाते औद्योगिक वसाहती, कारखाने व तिथे यांत्रिक स्वरूपातील माहिती विद्यार्थ्यांना घेण्याची संधी मिळते.

व्यावसायिक शिक्षणांतर्गत माध्यमिक स्तरावर विद्यार्थी औद्योगिक वसाहतीतील लघु उद्योगांना भेट देतात तेव्हा तेथील विविध माहिती आणि चर्चेतून त्यांच्या व्यावसायिक विचारसरणीमध्ये भर पडते आणि त्या संदर्भामध्ये ते प्रेरित होऊ शकतात याचा विचार करून लघु उद्योग भेट व लघु उद्योजकासोबत चर्चा, मुलाखत या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये लघुउद्योगासंदर्भातील अडचणी व त्यावर मात करण्यासाठी असणारे विविध उपाय जाणून घेऊ शकतात.

इलेक्ट्रॉनिक विषयांतर्गत घरातील विविध उपकरणे स्वतः विद्यार्थी दुरुस्त करण्यासाठी प्रात्यक्षिक ज्ञान घेतात,जसे फॅन दुरुस्ती, मिक्सर दुरुस्ती, लाईट दुरुस्ती, वॉटर फिल्टर दुरुस्ती इत्यादी.

शालेय स्तरावर विद्यार्थ्याला एखाद्या व्यवसायिकतेची गोडी लागल्यास विद्यार्थी त्यामध्ये आपले भविष्य निश्चितच घडवू शकतो. या दृष्टिकोनातून विविध इलेक्ट्रॉनिक साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले त्यानंतर त्यामध्ये येणाऱ्या समस्या व त्यावरील प्रत्यक्ष कार्य असे प्रात्यक्षिकाचे स्वरूप ठेवण्यात आले.


मुख्यमंत्री सुंदर शाळा : शासकीयमधून
खोकरमोहा, खाजगीत शांतीवन अव्वल
शाळा ठरल्या अकरा लाखांच्या बक्षिसांचा मानकरी

अशी दिले जाते बक्षीस

मुख्यमंत्री सुंदर शाळा उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात सरकारी मधून खोकरमोहा तर खाजगीतून शांतीवन जिल्ह्यात अव्वल

शाळा ठरल्या अकरा लाखाच्या बक्षिसांच्या मानकरी

9:49 am

इलेक्ट्रॉनिक अभ्यासक्रम: आजचा काळ हा तंत्रज्ञानाचा आहे. प्रत्येक क्षेत्रात यांत्रिकीकरण व डिजिटल यंत्रसामुग्री यांचा वापर वाढत चालला आहे. मोबाईल, टीव्ही, इन्व्हर्टर, वॉशिंग मशीन, सोलर उपकरणे इत्यादी गोष्टी आता गावागावात पोहोचल्या आहेत. अशा वेळी या सर्व इलेक्ट्रॉनिक साधनांची समज, दुरुस्ती व मेंटेनन्स करण्याचे कौशल्य ग्रामीण युवकांनी आत्मसात केले पाहिजे. यासाठी **NSQF (National Skills Qualifications Framework)** अंतर्गत दिले जाणारे इलेक्ट्रॉनिक्ससारखे व्यावसायिक शिक्षण अत्यंत गरजेचे ठरते.

4. पीएम श्री योजनेअंतर्गत शाळेत राबवलेले उपक्रम-

1. उपक्रमाचे नाव वित्तीय साक्षरता-
रिझर्व बँक ऑफ इंडिया वित्तीय साक्षरता उपक्रम अंतर्गत राज्यस्तरीय 31 हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक. विभागीय तृतीय पारितोषिक 21 हजार



NSQF ही भारत सरकारने सुरू केलेली योजना आहे. या योजनेंतर्गत आमच्या शाळेत इ. 9 वी ते 10 वी या वर्गांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम शिकवले जातात. यात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृती आधारित शिक्षण दिले जाते, ज्यामुळे त्यांच्यामध्ये ठोस कौशल्य निर्माण होते. ही शिक्षणपद्धती रोजगारक्षम असून शिक्षणासोबतच कामाचे प्रशिक्षणही मिळते.

इलेक्ट्रॉनिक्स हे व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. या क्षेत्रातील प्रशिक्षणाद्वारे ग्रामीण विद्यार्थी मोबाईल दुरुस्ती, टीव्ही रिपेअरिंग, होम ॲप्लायन्स मेंटेनन्स, सोलर उपकरणे बसविणे, वायरिंग इत्यादी कामे शिकू शकतात. यामुळे ते गावातच आपला व्यवसाय सुरू करू शकतात. कमी भांडवलात स्वतंत्र दुकान, सर्व्हिस सेंटर किंवा वर्कशॉप चालवता येते. गावातीलच ग्राहक मिळतात आणि उत्पन्नाचा चांगला स्रोत निर्माण होतो.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत. मात्र, NSQF अंतर्गत व्यावसायिक शिक्षण घेतल्यास ते एका वर्षाच्या आत कमवू लागतात. हे शिक्षण सरकारी प्रमाणपत्रासह दिले जाते, त्यामुळे नोकरी किंवा कर्ज मिळवणे सुलभ होते. काही विद्यार्थी पुढे ITI, पॉलिटेक्निक किंवा स्टार्टअप उघडण्यासाठीही पुढे जातात.

या शिक्षणामुळे ग्रामीण युवक आत्मनिर्भर बनतात. गाव सोडून शहरात स्थलांतर करण्याची गरज राहत नाही. गावातच कौशल्याधारित सेवा पुरवून ते समाजातील इतरांसाठी आदर्श ठरतात. यामुळे गावचा सर्वांगीण विकास होतो.

ॲग्रीकल्चर अभ्यासक्रम : आमच्या शाळेत इ. 9 वी ते 10 वी या वर्गांमध्ये **ॲग्रीकल्चर अभ्यासक्रम** हा अभ्यासक्रम शिकवला जातो. भारत हा कृषिप्रधान देश असून देशातील बहुतांश लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील तरुण व विद्यार्थी यांचे जीवनही प्रामुख्याने शेतीशी जोडलेले आहे. मात्र पारंपरिक शेतीतील अडचणी, बदलते हवामान, बाजारातील अस्थिरता आणि तांत्रिक ज्ञानाचा अभाव यामुळे शेतकरी अडचणीत सापडतो. अशा वेळी आधुनिक व कौशल्याधारित शेतीचे शिक्षण आवश्यक आहे. **NSQF (National Skills Qualifications Framework)** अंतर्गत दिला जाणारा **ॲग्रीकल्चर अभ्यासक्रम** हीच गरज पूर्ण करणारा महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम आहे.

हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतीसंबंधी तांत्रिक ज्ञान, आधुनिक साधने वापरण्याचे प्रशिक्षण, कीड व रोग नियंत्रण, खत व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, प्रक्रिया उद्योग, कृषी यंत्रसामुग्री वापर व देखभाल, बाजारपेठेचे ज्ञान आणि सरकारी योजनांची माहिती प्रदान करतो. त्यामुळे विद्यार्थी केवळ शिकत नाही, तर रोजगारक्षम बनतो.

या अभ्यासक्रमामुळे ग्रामीण भागातील तरुणांना गावातच रोजगार मिळू शकतो. ट्रॅक्टर ऑपरेटर, सेंद्रिय शेती मार्गदर्शक, शेती सल्लागार, कृषी सेवा केंद्र चालक यांसारख्या विविध स्वरूपाच्या नोकऱ्या व व्यवसाय सुरू करता येतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते आत्मनिर्भर बनतात.

आजच्या युगात शेती ही विज्ञान व तंत्रज्ञानाशी जोडलेली आहे. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने शेती शिकवणारा हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे. तो शेतकऱ्यांच्या पुढच्या पिढीला नव्या संधी देणारा ठरतो.






तालुका स्तरीय विज्ञान स्पर्धेत सहभागी विद्यार्थी






Khokarmoha
खोकरमोहा
Google
Feb 10, 2025 12:23:23 PM
Khokarmoha
Aurangabad Division
Maharashtra



व्यवसाय कौशल्य अभ्यासक्रमात कृषी अभ्यासक्रम अंतर्गत क्षेत्र भेट



रोप वाटिका क्षेत्र भेट






Khokarmoha
खोकरमोहा
Feb 10, 2025 12:25:10 PM
Khokarmoha


भावनात्मक ध्यान आहे.



शैक्षणिक सहली अंतर्गत योगेश्वरी महाविद्यालयातील रोबोटिक प्रयोगशाळेला भेट








विद्युत निर्मिती व परिवहन नियंत्रक कक्षास भेट



औद्योगिक वसाहत व साखर कारखाना क्षेत्रभेटीचे नियोजन





जिल्हास्तरीय विज्ञान स्पर्धेत सहभागी शाळेचा विद्यार्थी



Atul Mulay

30 Aug 2023 ·

30 ऑगस्ट 2023 मुंबई येथील ताज हॉटेलमध्ये झालेल्या क्षेत्रस्तरीय Reserve Bank of India च्या आर्थिक साक्षरता क्विज मध्ये महाराष्ट्राचे टीम म्हणून जिल्हा परिषद माध्यमिक शाळा खोकरमोहा ता. शिरूर कासार जि. बीड या शाळेतील चि.कृष्णकांत उद्धव मिसाळ आणि चि.युवराज पांडुरंग सानप त्यांच्या संघाला तृतीय क्रमांकाचे चाळीस हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन ... See more











Atul Mulay
3 Jul 2023 ·

आज दिनांक 3 जुलै 2023 रोजी चंपावती विद्यालय येथे जिल्हा परिषद बीड व RBI(भारतीय रिझर्व बँक) तर्फे आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळा खोकरमोहा येथील विद्यार्थी युवराज पांडुरंग सानप व कृष्णकांत उद्धव मिसाळ यांना सर्वप्रथम पारितोषिक 10000 रुपये सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले..... राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जिल्ह्यातून एकच शाळा निवडण्यात आली . शाळेचे मुख्याध्यापक श्री वाघुंबरे सर, मार्गदर्शक शिक्षक श्री अतुल मुळे ,शिरूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री शेख साहेब ,हिवरसिंगा केंद्रप्रमुख श्री राख सर व शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांच्यातर्फे हार्दिक हार्दिक अभिनंदन💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐









Atul Mulay

16 Sept 2023 ·

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा खोकरमोहा आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पूर्वसंध्येला 75 दिवे लावून हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली....













व्यावसायिक मार्गदर्शन करताना प्रमुक पाहुणे



बीड जिल्ह्यातून सर्वोत्कृष्ट पीएमश्री शाळा म्हणून आपल्या शाळेची निवड..



पाणी शुद्धीकरण फिल्टर



व्यावसायिक अभ्यासक्रम अंतर्गत इलेक्ट्रॉनिक प्रात्यक्षिक करताना विद्यार्थिनी



व्यावसायिक अभ्यासक्रम अंतर्गत रोपवाटीकेला भेट व माहिती घेताना विद्यार्थी व शिक्षक



शाळेत आयोजित तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धा





आनंददायी शनिवार


तालुका व जिल्हा स्तरावर सहभागी खेळाडू


Khokarmoha Maharashtra Jun 21, 2025, 07:20

मुद्दा क्र. 9 ICT पायाभूत सुविधा











विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन










शाळेचे ग्रंथालय



शाळेचा संपूर्ण परिसर CCTV च्या निगराणीखाली



AI WARKHOP



वर्ग 6 वी ते 8 वी AI कार्यशाळा



शाळेत आयोजित तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन



हस्तकला व विणकाम यात विद्यार्थ्यीनिनी तयार केलेल्या वस्तू







विविध कार्यक्रमानिमित्त घेतलेल्या रांगोळी स्पर्धेतील विद्यार्थी सहभाग

प्रत्यक्ष प्रत्येक वर्गात मतदान घेऊन बाल संसद निर्मिती




सुविचार - आमच्या वेलीला यशाची फळे
बालसंस
उमेदवारांची नावे
1) मिसाळ वैदेही
2) आघाव स्वरा
3) आघाव रागिनी
4) मिसाळ स्वरा
5) सानप श्रीतेश
A
B
मतदान
कक्ष


क्षण
आमच्या वेलीला यशाची फळे येतात
इयत्ता- तिसरी
पट- 40
उप- 38
दि: 16.7.2025
वार- बुधवार
बालसंसद
विजयी उमेदवार
1) श्रीतेश सानप



05/03/2025 11:59



शाळेतील अंतरिक्ष कक्ष


LG




07:38



आमची बक्षिसे
LIC नांगरे इन्शुरन्स सर्विसेस, बीड
प्रथम पारितोषिक
First Prize
राज्य स्तरीय प्रश्नमंजुषा
State Level Quiz
All India Quiz on Financial Literacy
2023
ZONAL ROUND
MUMBAI
THIRD PRIZE
प्रथम पारितोषिक
First Prize

3. अंतराळ शाळा उपक्रमांतर्गत अंतरिक्ष कक्षाची स्थापना व त्या अंतर्गत उपक्रम.
बीड जिल्ह्यातून NASA/ISRO स्पर्धा परीक्षेत सर्वप्रथम विद्यार्थी,
दोन विद्यार्थ्यांची निवड.
NASA अमेरिका येथे जिल्हा परिषद अंतर्गत उपक्रमामध्ये भेट सहल.


कार्यारंभ
शिक्षण सर्वांच्या उज्वल भविष्यासाठी सर्वोत्तम साधन आहे : सुनील धांडे

लोकमत
युवराज, कृष्णकांतची जोडी राष्ट्रीय स्पर्धेत



'नासा'त स्पेस राइड करताना अंतराळात गेल्यासारखा अनुभव अन् अॅस्ट्रो टॉकही





समारोप :

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री भिमराव मिसाळ उपाध्यक्ष अशोक मिसाळ ,सरपंच श्रीहरी मिसाळ, जिल्हा परिषद सदस्य श्री वैजनाथराव मिसाळ माजी सभापती सुधाकर आप्पा मिसाळ, शिक्षण तज्ञ शिवाजी मिसाळ सदस्य श्री गणेश मिसाळ, सहकारी संभाजी मिसाळ शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री विक्रम मिसाळ श्री कानडे टी .डी. ,श्री. राम वाघुंबरे, श्री. अनिल काळे, सोमीनाथ मिसाळ, श्री. साहेबा गर्कळ ,श्रीहरी बांगर, श्री. नामदेव पवार ,श्री. मुकुंद पवार, श्री. डोंगरदिवे, श्री. शिरसाट, श्रीमती आशा गर्कळ, श्रीमती शितल बनकर, श्रीमती वर्षा घुगे ,श्रीमती सारिका सानप, श्रीमती जयश्री खेडकर, श्रीमती अनुराधा पेडगावकर शाळेतील शिक्षण प्रेमी नागरिक पालक व सर्व विद्यार्थी यांचे सहकार्य वेळोवेळी लाभले.



पायाभूत साक्षरता व अंकगणितिय क्षमता संवर्धनात शैक्षणिक नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव -जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हरकी निमगाव

शाळेचा पत्ता – केंद्र.सावरगाव,ता.माजलगाव जि.बीड.

शाळेचा ई-मेल आयडी- zppsharkinimgaon77@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री.पांडुरंग गोपाळराव देशपांडे

"गावाला शाळेचा अभिमान असावा, शाळेला गावाचा आधार असावा."

अशाच एका गावाचा आधार आणि गावाला अभिमान असणाऱ्या आनंददायी शाळेची यशोगाथा आपल्यापुढे सादर होत आहे. बीड जिल्हयातील माजलगाव तालुक्यात गेवराई रस्त्याने थोडसं आत गेलं की, रस्त्याने, तुमच्या स्वागताला हजर असतात लिंबाची, चिंचाची, आंब्याची व वडाची झाडे अन त्याच्या जोडीला बंधाऱ्यातून खळाळत वाहणारे पाणी...! या बंधाऱ्याच्या कडेलाच उंचच उंच निलगिरीच्या, लिंबाच्या आणि करंजीच्या वनराईत व निसर्गाच्या सानिध्यात असणारी जि.प.प्राथमिक शाळा हरकी निमगाव...या शाळेचा इतिहासही मोठा रंजक आहे. गावात हरकेश्वराचे पुराणकालीन मंदिर असल्यामुळे आणि गाव चहुबाजूंनी लिंबाच्या वनराईने वेढले असल्यामुळे गावाला हरकी निमगाव असे नाव पडले आहे. ग्रामसभेत सर्व गावकऱ्यांनी गावातील गायरानातील 02 एकर जमीन शाळेसाठी देण्याचा ठराव एकमताने मंजूर करून घेतला आणि जुन्या जागेतून शाळा नवीन 10 खोल्यांच्या भक्कम L आकाराच्या इमारतीत किचनशेडसह स्थायीक झाली. पुढे जि.प.फंडातून अधिक 03 खोल्यांचे बांधकाम करण्यात आले. निसर्गाच्या सानिध्यात देखणी इमारत असतानाही शाळेचा पट मात्र कमी-कमी होत होता, तरीपण शाळा मात्र आपलं अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करीत होती. शाळेला अवकळा येण्याचे कारण म्हणजे परिसरात नव्याने सुरु झालेल्या शिक्षण संस्था, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, पालकांचा जि.प.शाळा बद्दलचा बदलता दृष्टीकोन आणि तत्कालीन शिक्षण पद्धती...!

अशा परिस्थितीत पुन्हा भर पडली ती 2019 च्या अखेरीस सुरु झालेल्या कोविड-19 (कोरोना) महामारीची. ती एक शैक्षणिक आणीबाणी ठरली. विशेषतः प्राथमिक शिक्षणावर (1ली ते 5वी) तिचा मोठा व दीर्घकालीन परिणाम झाला. जवळपास 18 ते 24 महिने शाळा पूर्णपणे बंद होत्या, मुलांचा नियमित वर्ग शिकण्याचा सराव सुटला, शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील प्रत्यक्ष संवाद हरवला. त्यामुळे विद्यार्थ्यांची वाचन, लेखन व गणित कौशल्ये मागे गेली. अनेक विद्यार्थी मुळाक्षरे, अंक विसरले. पहिलीत प्रवेश घेतलेली मुले तिसरीत गेली तरी मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यात निपुण झाली नाहीत. कोरोना महामारीने प्राथमिक शिक्षणाला मोठा धक्का दिला, पण त्याचवेळी शिक्षणपध्दतींना नव्याने विचार करण्याची संधीही

दिली. ती संधी 'निपुण भारत' (NIPUN Bharat) म्हणजे - National Initiative for proficiency in Reading with understanding and Numeracy (वाचन, समज आणि संख्या ज्ञानात आणि प्राविण्य मिळविण्या करिता राष्ट्रीय उपक्रम) होय. हा उपक्रम भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने 5 जुलै 2021 रोजी सुरु केला. याचा उद्देश 2026-27 पर्यंत इयत्ता तिसरी पर्यंतच्या सर्व विद्यार्थीमध्ये FLN (Foundational Literacy and Numeracy) मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसित करणे हे होय. वरील उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मुख्याध्यापक यांनी गुणवत्तेबरोबरच शाळेच्या वैभवात जणू क्रांती घडवण्याचा चंगच बांधला. शिक्षकांच्या सहकार्याने शाळेचे अस्तित्व टिकवत नवीन वैभव प्राप्त करून देण्यासाठी जि.प.शाळेबाबतचा पालकांच्या मनातील दृष्टीकोन बदलवण्याचा मानस पक्का केला आणि प्रथम शाळा व्यवस्थापन समितीची बैठक आयोजित करून त्यात "गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि भौतिक सुविधापूर्ण शाळा विकास" करण्याचा ठराव घेण्यात आला. त्यासाठी प्रथम शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ आणि सर्व शिक्षक यांनी जिल्ह्यातील आदर्श शाळांना भेटी देवून तेथील भौतिक सुविधा आणि शैक्षणिक उपक्रम याची सखोल माहिती मिळविली. त्यानंतर पालक मेळावा घेवून लोकसहभाग मिळवला. लोकसहभागातून शाळा रंगरंगोटी, बोलक्या भिंती, वाचन व गणित संदर्भातील ज्ञानरचनावादी निपुण शिक्षण,साहित्याने रंगविलेल्या भिंती, संगणक संच सर्व वर्ग ई-क्लास, ई-लर्निंग, वाचनकोपरे, ग्रंथालय, रंगमंच निर्मिती, सिमेंटचे प्रांगण, सिमेंट रस्ता पेव्हर ब्लॉक, पाणी फिल्टर, सुसज्ज खेळाचे मैदान इत्यादी कामे केली. विविध NGO आणि वरीष्ठ स्तरावरून शाळेस शैक्षणिक साहित्य, ग्रंथालय पुस्तके, संगणक लॅब फर्निचर, पाणी फिल्टर, ड्रीप ठिबक सिंचन, हॅन्डवॉश स्टेशन, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक लॅब, स्मार्ट बोर्ड इत्यादी मदत झाली. शाळेत सर्व शिक्षकांच्या सहकार्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण, एक तास वाचनाचा, विद्यार्थी संचलित परिपाठ, FLN आधारीत ज्ञानरचनावादी वर्गखोल्या, वाचन-लेखन उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय उत्सव, मेरी माटी मेरा देश, शैक्षणिक व निसर्ग सहल, वक्तृत्व स्पर्धा, क्रिडास्पर्धा, दिक्षा एप , v-स्कूल एपचा अध्यापनात वापर, संगणक शिक्षण, शालेय मंत्रीमंडळ, राष्ट्रीय एकात्मता उपक्रम, स्त्री-पुरुष समानता, एक घास पशु-पक्ष्यांसाठी, ओला-सुका कचरा विल्हेवाट, गांडूळखत निर्मिती, घनवन, परसबाग निर्मिती, तंबाखू मुक्त शाळा, मतदान जनजागृती, बचत बँक, आरोग्य तपासणी, दंतचिकित्सा मार्गदर्शन, व्यावसायिक शिक्षण मार्गदर्शन, किशोरवयीन मुलामुलींना मार्गदर्शन यासह विविध स्पर्धा परिक्षा तयारी - मंथन परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, NMMS, BTS परीक्षा मार्गदर्शन व तासिका नियोजन, असे विविध उपक्रम राबविण्यात आले. याचा परिणाम म्हणून कोरोना महामारीनंतरही विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागली. विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागली. दरवर्षी विद्यार्थी स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवू लागले. क्रीडास्पर्धेतही विद्यार्थी आपली चुणूक दाखवू लागले. स्पर्धा परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांची जि.प.मार्फत हैद्राबाद अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली. ABP माझा व ज्ञान-की यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "भारतीय स्वातंत्र्य अमृत

महोत्सव अभिनव स्पर्धे" त शाळेतील विद्यार्थ्यांस मुख्याध्यापकासह मुंबई येथे सहभागी होण्याची संधी मिळाली. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" टप्पा क्र. 01 मध्ये तालुक्यातून शाळेचा प्रथम क्रमांक येऊन शाळेस 03 लक्ष रुपयाचे बक्षीस मिळाले. याची फलश्रुती म्हणून पालकांचा शाळेबद्दलचा दृष्टीकोन बदलला आणि पटसंख्याही झपाट्याने वाढली.

'निपुण भारत' अंतर्गत मोठया उत्साहात शाळा पूर्व तयारी मेळावा घेवून नवीन प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले, त्यानंतर मातापालक मेळावा घेवून माता पालकांना "निपुण भारत अभियान" याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यात माता पालकांचे गट तयार करून माता-पालकांचे सहकार्य मिळवले, तसेच प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचेही Whatsapp group करून त्यात दररोज विद्यार्थ्यांना काय शिकवले? काय सराव करावा? याबददल ग्रुपच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. यासंदर्भाने पालकांच्या व मातापालकांच्या आवश्यक त्यावेळी बैठका घेऊन चर्चा करण्यात आली. तिसरीपर्यंतच्या विदयार्थ्यामध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या क्षमता विकसित होण्यासाठी तसेच अभ्यासात मागे असणाऱ्या शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांसाठी विविध गुणवत्ता वाढ उपक्रमांचे खालीलप्रमाणे आयोजन करण्यात आले-

मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN)

निपुण भारत अभियान उद्दिष्टे :-

01) 2026-27 पर्यंत इयत्ता 3 री पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्या ज्ञान यात निपुण बनवणे.

02) शिक्षणाच्या सुरुवातीला भाषा व गणिताची समज मजबुत करणे.

03) मुलांचा आत्मविश्वास वाढवणे, संवादकौशल्ये व तार्किक विचारसरणी विकसित करणे.

शिक्षकांची भूमिका :-

01) अध्ययन निष्पत्ती वर आधारीत भाषा व गणित कौशल्यांचे कृतीतक्ते तयार करणे.

02) खेळ, गाणी, गोष्टी, कृती यांचा वापर करून निपुण भारत पुरक शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर करणे.

03) मुलांच्या प्रगतीचे नियमित निरीक्षण करणे.

04) पालकांशी नियमित संवाद साधून घरचा अभ्यास सुलभ करणे.

05) प्रत्येक विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर निश्चित करून योग्य त्या ठिकाणी मार्गदर्शन करणे.

शाळा स्तरावर उपक्रमः-

01) एक तास वाचनाचा :- दररोज एक तास वाचन करून वाचलेल्या पुस्तकाबददल अभिप्राय लिहिणे, नविन शब्द लिहीणे.

02) ज्ञानरचनावादी निपुण भिंत वाचन :- वर्गात व शालेय परीसरात भाषा व गणित संदर्भातील 'ज्ञानरचनावादी निपुण शिक्षण भिंती' चे वाचन लेखन करणे.

03) शब्द बाग:- दिलेल्या अक्षरावरून शब्द-वाक्य बनविणे .

04) शब्दावरून कथा :- दिलेल्या शब्दावरून कथा तयार करणे, व सर्वांसमोर सांगणे यातून संवादकौशल्ये व तार्किक विचारसरणी विकसित होऊन आत्मविश्वास वाढविणे.

05) कृतीयुक्त खेळ :- संख्या ज्ञानाशी संबंधीत विविध खेळ खेळणे, निपुण भारत पूरक शैक्षणिक साहित्य (पेटीतील) वापरून संख्याज्ञान अधिक समृद्ध करणे.

06)"उन्हाळ्याची सुट्टी, पुस्तकांशी गट्टी" उपक्रमात सहभागी होऊन वाचलेल्या पुस्तकाचे आपल्या भाषेत पुस्तक परीक्षण करणे.

अपेक्षित परिणाम :-

01) इयत्ता तिसरी पर्यंत 95% विद्यार्थी वाचन-लेखनात निपुण झाली.

02) 92% विद्यार्थी संख्याज्ञानात पारंगत झाली.

03) विद्यार्थ्यामध्ये समजपूर्वक वाचन क्षमता रुजण्यास मदत झाली.

04) गणिती तर्कशक्तीत वाढ झाली.

05) अवांतर वाचनामुळे लेखन, वाचन, संवाद कौशल्ये विकसित झाली.

06) सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याची क्षमता निर्माण झाली.

07) इंग्रजी शिकण्याची भीती दूर होऊन इंग्रजी उच्चार, वाचन आणि संभाषणास प्रोत्साहन मिळाले.

08) सामाजिक व वैज्ञानिक जाण निर्माण झाली.

09) पालक आणि समाज शिक्षणप्रक्रीयेत सहभागी झाला.





निष्कर्ष:-

"मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN)" हे शिक्षणाचा पाया असुन त्यात विद्यार्थी पारंगत झाली तरच पुढील शिक्षण प्रवास सुलभ होऊन हे विद्यार्थी भविष्यवेधी शिक्षण प्रवासात यशस्वी होतील यात तीळ मात्र शंका नाही...!

अशाप्रकारे शाळेच्या विकासासाठी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांच्याबरोबरच डाएट चे वरिष्ठ अधिव्याख्याता, माजलगाव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, साधन व्यक्ती आणि सावरगाव केंद्राचे केंद्रप्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक या सर्वांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य मिळत गेले आणि शैक्षणिक उपक्रम, निपुण भारत पूरक शैक्षणिक साहित्य व तंत्रज्ञानाच्या मदतीने शाळा विकासात भर पडली. त्यामुळे पालकांचा आणि ग्रामस्थांचा विश्वास संपादन करण्यात शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी यश मिळवले. त्यामुळेच सध्या शाळेची विद्यार्थी संख्या वाढून विद्यार्थी उपस्थिती जवळपास 100% असते. शाळेतील मुले बहुतांशी शेतकरी कुटुंबातील आहेत, मात्र गुणवत्तेच्या बाबतीत ही सरस आहेत. आजही इंग्रजी शाळांचे वाढते प्रस्थ लक्षात घेता, आजही शाळा भक्कम पाय रोवून उभी आहे व शाळेची भविष्यवेधी विद्यार्थी घडवण्याच्या दिशेने यशस्वी वाटचाल सुरू आहे...

YouTube link - https://youtube.com/watch?v=_I3GqnSKGng&feature=shared



जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव

ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

3] शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक अवांतर उपक्रम :

II) महावाचन चळवळीतील विद्यार्थ्यांचा सहभाग :



जि. प. प्राथमिक शाळा हरकी निमगांव, ता.माजलगाव, जि. बीड. शाळेमध्ये महावाचन चळवळी मध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे संदेशाचे वाचन केले, तसेच विविध वाचनांची पुस्तके वाचली

जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव

ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

2] आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास :

I) व ि श ा ल ंध्येश लये ज वी पासनूच आर ि स वत ंबजुव ि य ंच ंदष ्टीपैश चंे ि जेन, गतुंवणकू, बकँ खंेव यह र कर ण ल ंइत ् दा ेबा तसचे आर ि व यह रा ंकर ती ंUPI स रख ्ं आधनु ि स धन च ंव पार करत ना ंय ्ं वाप ची काळजी याबाबत तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शनपर व्याख्यान :



विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे महत्व सांगण्यासाठी व तसेच यु.पी.आय. व्यवहार कसे करावे यासाठी मल्हारी मार्तंड अर्बन निधीचे चेअरमन मा. विशाल दैवकते यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना बँकचे व्यवहार, बचत बँक तसेच ATM card, Credit card, UPI, Phonepay, Googlepay बद्दल माहिती दिली.

जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव

ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

2] आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास :

I) व ि श ा ल ंध्येश लये ज वी पासनूच आर ि स वत ंबजुव ि य ंच ंदष ्टीपैश चंे ि जेन, गतुंवणकू, बकँ खंेव यह र कर ण ल ंइत ् दा ेबा तसचे आर ि व यह रा ंकर ती ंUPI स रख ्ं आधनु ि स धन च ंव पार करत ना ंय ्ं वाप ची काळजी याबाबत तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शनपर व्याख्यान :



जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव, ता.माजलगाव, जि. बीड येथील शाळेत बचत बँक स्थापन करण्यात आलेली असुन विद्यार्थ्यांना पैशाचा योग्य विनियोग कसा करावा व व्यवस्थापन कसे करावे यासंदर्भात मल्हारी मार्तंड पतसंस्था, माजलगाव चे शाखा व्यवस्थापक श्री. विकास यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केलेले आहे. विद्यार्थी बँकेचे व्यवहार या बाबतीत अतिशय काळजी घेतात.

जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव

ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

3] शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक अवांतर उपक्रम :

I) विद्यार्थ्यांचा शाळेतील उपस्तिथीचे प्रमाण :



जि. प. प्राथमिक शाळा हरकी निमगांव, ता.माजलगाव, जि. बीड. या शाळे मध्ये विद्यार्थ्यांची उपस्तिथी लमणीय असते शाळेमध्ये शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक अवांतर उपक्रमांचे आयोजन सतत केले जाते.

जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव
ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

➤ प्रसिद्धी माध्यमांकडून घेतलेली शाळेची दखल :

पार्श्वभूमी

हरकी निमगाव शाळेत दंत कीड प्रतिबंध उपचार शिबिर संपन्न



माजलगाव दि. १७ (प्रतिनिधी) – दिनांक १६ जानेवारी चार सोमवार रोजी सुरेश धोंडिबा आरोग्य कार्यक्रम डिग्गेश्वर आरोग्य केंद्रांतर्गत हरकी निमगाव येथे दंत कीड प्रतिबंधक उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरोग्य सेवक [illegible] होते. [illegible] राठोड तसेच डॉ. सुदर्शन [illegible] डॉ. आरोग्यश्री जुजगर मॅडम यांचा सत्कार करण्यात आला. सदरील शिबिरामध्ये ५८ ... विद्यार्थ्यांनी तपासणी करण्यात आली. [illegible] त्यांच्यावर उपचार करण्यात आले. [illegible] तसेच डॉ. सदर्शन [illegible] सर, डॉ. आरोग्यश्री जुजगर मॅडम, यांनी विद्यार्थ्यांना दातांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी काय केली पाहिजे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण सरवदे यांनी तर आभार भारत राठोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक [illegible] कुलकर्णी, उद्धव सिरसे, [illegible] चौरे, अंगद कांडे यांनी सहकार्य केले.

सकाळ



मुंबई : हरकी निमगाव शाळेचे मुख्याध्यापक पी. जी. देशपांडे आणि यशस्वी विद्यार्थी भूषण रेंजवे यांना सन्मानित करण्यात आले.

भूषण रंजवे पुरस्काराने सन्मानित

माजलगाव : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक हरकी निमगाव शाळेस भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवानिमित्त झालेल्या अभिनव स्पर्धेत पुरस्कार मिळाला आहे. या स्पर्धेत राज्यातून ७६ हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. भारतातील प्रगतीविषयी विद्यार्थ्यांना पोस्ट कार्डद्वारे विचार व्यक्त करायचे होते. यामध्ये हरकी निमगाव शाळेतील भूषण विक्रम रेंजवे या विद्यार्थ्याची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. ता. ११ रोजी मुंबई येथे पुरस्कार वितरण करण्यात आले. यावेळी जीवन पाचकर राजीव खांडेकर, केदार शिंदे, वंदना गुप्ते, जितेंद्र जोशी, बीमली जी-नी, प्रदिप लोखंडे, अनिता कीर्तिक यांच्या हस्ते मुख्याध्यापक पी.जी. देशपांडे आणि विद्यार्थी भूषण रंजवे यांना गौरविण्यात आले.

Aurangabad, Beed-Today
18/08/2023 Page No. 4

जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव
ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

6] शाळेचे माजी विद्यार्थी, पालक स्थानिक सेवाभावी संस्थाग शाळा उपक्रम सहभाग :

I) उपर लेखित दिवसाचे औचित्य साधुन शाळेतील विद्यार्थी पालक, स्थानिक सेवाभावी संस्था इत्यादींचा शक्य असेल त्याप्रमाणे अधिकाधिक सहभाग :



जि.प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव या ठिकाणी विद्यार्थी केंबित उपक्रम तसेच शाळा व्यवस्थापनांनी आयोजित करावयाचे उपक्रम यामध्ये शाळेचे माजी विद्यार्थी, पालक यांनी शाळेच्या ई लर्निंग कक्षासाठी मदत करून मोलाची अशी भुमिका निभावली.

जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव
ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

3] भौतिक सुविधा बाबत, खाजगी संस्था, व्यक्ती, कंपनी यांचा सहभाग व शाळा व्यवस्थापन समिती :

I) भौतिक सुविधांसंदर्भात अध्ययन अध्यापन साधनांसंबंधित आधुनिक साधनांचा उपलब्धतेनुसार शिक्षण करण्यासाठी कंपन्या संस्थांसोबत सामंजस्य करार व कंत्राटदार दायित्व काढून वस्तूंचा सदुपयोग व्यवस्थापन समिती करण्यासाठीचे प्रयत्न :





जि.प.प्रा. शाळा हरकी निमगांव शाळेतीलविद्यार्थ्यां माठी श्री टेंबे गणेश मंडळ, माजलगाव व न्यू प्रेरणा फौंडेशन, ग्यानकी, तुळजाभवानी मल्टीस्टेट, माजलगांव याच्यामार्फत् लेखन साहित्य यासाठी रजिस्ट्रर्स, वह्या मुबलक प्रमाणामध्ये शाळेत भेट स्वरुपात देण्यात आल्या.

जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव
ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

2] आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास :

II) स्वयंरोजगार व व्यवसाय व्यापार उदयोगाशी संबंधित शाळेच्या भौगोलिक परिसरातील उपलब्ध शैक्षणिक वातावरण आधारित शिक्षण व व्यवसाय शिक्षणाचे महत्व व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व व्यवसाय ताशा अभ्यासक्रमाची ओळख, शिक्षण देणाऱ्या संबंधित संस्था, प्रवेश प्रक्रिया,भविष्यातील संधी इत्यादी बाबतची माहिती असावी :





जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव
ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

2] आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास :

II) स्वयंरोजगार व व्यवसाय व्यापार उदयोगाशी संबंधित शाळेच्या भौगोलिक परिसरातील उपलब्ध शैक्षणिक वातावरण आधारित शिक्षण व व्यवसाय शिक्षणाचे महत्व व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व व्यवसाय ताशा अभ्यासक्रमाची ओळख, शिक्षणदेणाऱ्या संबंधित संस्था, प्रवेश प्रक्रिया,भविष्यातील संधी इत्यादी बाबतची माहिती असावी :





मल्हारी मार्तड अर्बनचे मा. विशाल देवकते यांचे आयोजित करण्यात आले. तसेच कु. पुनम रोजेभाऊ काळे. ही विद्यार्थिनी स्पर्धा परिक्षेतून मुंबई पोलीस म्हणून तिची निवड झाली म्हणून तीने कशा प्रकारे अभ्यास तयारी केली याबाबतही प्रत्यक्ष त्यांना बोलावून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले



जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव

ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

3] भौतिक सुविधा बाबत, खाजगी संस्था, व्यक्ती, कंपनी यांचा सहभाग व शाळा व्यवस्थापन समिती :

II) शाळा व्यवस्थापन समितीने पार पाडलेले अन्य कोनतेही प्रभावी कामकाज :



ज प्रि. प स्म क्रि श ळ ्हरक ी नि मिग वं श ळसे ठा ी ल व वस थून सम ति ी ेखरु क्र र , एक एलईड ्रेगंरगं टी सजावट या साठी मोलाच भूमिका बजावली. नेहमीच शाळा व्यवस्थापन समितीचे शाळेला सहकार्य मिळते.

जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव

ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

3] भौतिक सुविधा बाबत, खाजगी संस्था, व्यक्ती, कंपनी यांचा सहभाग व शाळा व्यवस्थापन समिती :

I) भ ौतिक सवु धि ेतसचे अध्ययू न अध्ययन श ैक्षबंध ि आधनु कि स धन बं ेउपलब ह् खनु शि ि करण्यू स ठा के पार ि कपंन्यू ्समुर्यसवे ेसंसं थू नासरू व क् ल्तिम् दाधिटक काडनू वस्तू्र सवे ेब ंध् ्यर पु ता अध कि धा कि दणेग ेी लो करण्यासाठीचे प्रयत्न :



जि. प. प्राथमिक शाळा, हरकी निमगांव

ता. माजलगांव, जि. बीड (४३११३१)

➤ प्रसिद्धी माध्यमांकडून घेतलेली शाळेची दखल :

दैनिक **पार्श्वभूमी**

हरकी निमगांव शाळेत विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरता मार्गदर्शन.

शालेय जीवनापासूनच विद्यार्थांना बचतीचे महत्त्व समजले पाहिजे– विशाल देवकते

दैनिक **पार्श्वभूमी**

आनंदनगरीतून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाचे धडे.

जि.प.शा.ह. निमगाव येथे आनंद नगरीचे आयोजन




मिशन-जरिवाडी







उसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मुख्याध्यापकांचे प्रयत्न

शाळेचे नाव - साने गुरुजी निवासी प्राथमिक आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,केज

शाळेचा पत्ता - धारूर रोड ,ता.केज जिल्हा बीड.

शाळेचा ईमेल आयडी - saneguruji high@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - डॉ.कविता नरसिंगराव गित्ते

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9404021705



प्रस्तावना -


महाराष्ट्रातील बीड जिल्हा हा आवर्षण प्रवणक्षेत्रात येत असल्याने आणि अपुऱ्या सिंचनाच्या सोयी, रोजगाराची साधने उपलब्ध नसल्याने येथील लोक ऊस तोडणी कामा करिता महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील कारखान्यावर स्थलांतर करतात यांची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही मात्र स्थलांतर करणाऱ्यांची संख्या 06 ते 07 लाख एवढी आहे.

ऊसतोड मजुरांमध्ये मागास समाज ,भटक्या जमाती, अनुसूचित जाती जमाती या समाजाचा समावेश आहे. ऊसतोड मजुरांच्या स्थलांतरणांमुळे अनेक सामाजिक ,शैक्षणिक ,आरोग्य विषयक प्रश्न निर्माण होऊन ऊसतोड कामगारांची पिळवणूक होते .त्यांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडतो, शिक्षणाविषयी अनास्था निर्माण होते. त्यामुळे मुले ,मुली शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडतात या बाबीचे गांभीर्य विचारात घेऊन " बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज " या सामाजिक संस्थेने सन 1994 मध्ये ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी निवासी स्वरूपाची शाळा सुरू केली.या शाळेतून आजमितीस जवळपास दहा हजारच्या(10000) विद्यार्थ्यांचे स्थलांतर रोखून त्यांना शिक्षण देण्याची कार्य " 'साने गुरुजी निवासी विद्यालय केज " या शाळेच्या माध्यमातून सातत्याने चालू आहे. **शाळेची एकूण विद्यार्थी संख्या 1030 आहे.**

FLN म्हणजे पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान क्षमता पूर्ण करणे ही एक शाळेची जबाबदारी समजून सदर शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांनी विद्यार्थी कोणत्याही इयत्तेत असला तरी त्याच्या त्या वर्गाच्या क्षमता विकसित न झाल्याचे लक्षात आल्याने म्हणजे त्यांचा पायाभूत क्षमता विकसित न झाल्याने त्यांच्यासाठी वाचन व लेखन व गणितीय क्रिया संवर्धनासाठी प्रयत्न केले.

प्रथमतः विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर निश्चित करून विद्यार्थी ज्या टप्प्यावर आहे तेथून पुढे हा अभ्यासक्रम शालेय वेळा व्यतिरिक्त (अतिरिक्त पूरक मार्गदर्शन तासिका) म्हणून विद्यार्थ्यांना शिकवण्यात आला. वर्ग 03 ते 09 करिता तो आजही सातत्याने प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. याचा सकारात्मक परिणाम होऊन शाळेची पटसंख्या झपाट्याने वाढली. पालकांमध्ये मुलांच्या शैक्षणिक प्रगतीची जबाबदारी स्वीकारणारी शाळा म्हणून नावलौकिक झाला. पालक मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशित करू लागले. त्यामुळे दर शैक्षणिक वर्षात शाळेची एकूण शासनमान्य प्रवेश संख्या- 240 असताना अतिरिक्त निवासी प्रवेशित संख्या 750 एवढी गेली पंधरा वर्षापासून आहे. यात प्रामुख्याने 300 एवढ्या निवासी मुलींचा

समावेश इयत्ता पहिली ते बारावी पर्यंत आहे.दरवर्षी सातत्याने या शाळेचा पट वाढतच आहे ही एका अर्थाने शाळेने मिळवलेले यश आहे. संपूर्ण वर्गाचा प्रवेश १ मे लाच बंद करावा लागतो. तरीही पालक पुढील वर्षी प्रवेशासाठी नाव नोंदणी करतात.





ऊसतोड कामगारांच्या मुलांची शैक्षणिक समस्या.





सर्वेक्षण फोटो





प्रचार व प्रसार पालक संवाद यात्रा



माजलगाव येथील तांडा, वस्तीवर जाऊन विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशित करण्याचे प्रयत्न करताना संस्थेचे अध्यक्ष व शालेय कर्मचारी.





साने गुरुजी निवासी विद्यालयामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना संस्था व लोकसहभागातून पुरवलेल्या भौतिक सुविधा.

- स्वतंत्र सुसज्ज शालेय इमारत
- स्वतंत्र वस्तीगृह इमारत
- संपूर्ण शालेय परिसर सीसीटीव्ही च्या कक्षेत.
- स्वतंत्र क्रीडांगण
- स्वतंत्र भोजन कक्ष
- निवासासाठी कॉट,गादी, बेडशीट व्यवस्था .
- मुला -मुलींसाठी स्वतंत्र जीम
- गरम पाण्याची सुविधा
- मुलींचे स्वतंत्र निवास कक्ष स्वतंत्र भोजन कक्ष
- धुलाई मशीन
- मुबलक प्रमाणात पाण्याची व्यवस्था

शैक्षणिक सुविधा

- ए आय कोडींग लॅब
- आय सी टी लॅब
- प्रोजेक्टर वायफाय कनेक्शन
- स्वतंत्र प्रयोगशाळा
- स्वतंत्र ग्रंथालय
- सर्व वर्गांच्या अध्ययन अध्यापन इन कॅमेरा
- इयत्ता सहावी पासून व्यावसायिक अभ्यासक्रम

निवासी मुलांना आंघोळ करण्यासाठीपाणी गरम करण्यासाठी सौर ऊर्जेचा (सोलार) वापर केला जातो.

शाळेतील पायाभूत शिक्षण :- मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान सक्षम करण्यासाठी मुख्याध्यापक व सहशिक्षक यांनी केलेले प्रयत्न




पार्श्वभूमी

मुलांचे उशिराच प्रवेश (वयानुरूप)
शाळेत खंड (स्थलांतरामुळे)
प्रवेशित इयत्तेच्या अध्ययन क्षमता विकसित नसणे.

कृती आराखडा

स्वतंत्र अभ्यासक्रम निर्मिती
विद्यार्थी अध्ययनस्तर निश्चिती
शालेय वेळेव्यतिरिक्त विशेष तासिका
प्रति महिना मूल्यमापन
उपक्रमाची निष्पत्ती

उपचारात्मक अध्ययन वर्ग



स्थलांतर व गळती थांबवण्यास पालकसभा





साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड











क्रीडा विभाग

सकाळ



केज : राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेसाठी निवड झालेला साने गुरुजी निवासी विद्यालयाचा मुलींचा संघ.

मुलींच्या बेसबॉल संघाची निवड

केज, ता. १९ (वार्तहर) : शहरातील साने गुरुजी विद्यालयाच्या संघाने विभागीय स्तरावर झालेल्या बेसबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे चौदा वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने या संघाचे क्रीडा क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा संचालनालयातर्फे आयोजित शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या चौदा वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने जालना येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे हा मुलींचा संघ जालना येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत औरंगाबाद विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. संघाच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष ॲड. उद्धव कराड, मुख्याध्यापिका डॉ. कविता कराड, राजेश कापसे, क्रीडा प्रशिक्षक रेवनाथ शेलार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

Aurangabad, Beed-Today
20/09/2019 Page No. 3

लोकमत

साने गुरुजी विद्यालयाचे बेसबॉल स्पर्धेत यश

लोकमत न्यूज नेटवर्क

केज : क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य स्तरीय बेसबॉल स्पर्धेत केज येथील साने गुरुजी विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

१४ वर्षाखालील गटात रत्नमाला बाबासाहेब चौरे, जीवन बाबासाहेब तांदळे यांची, तर १७ वर्षाखालील गटात लखन प्रकाश यादव व निकिता अशोक मुंडे यांची निवड झाली आहे. हे खेळाडू छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. याच शाळेच्या १४ वर्षीय मुलींच्या संघाने राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. शाळेच्या चारही संघांनी राज्यस्तरीय तृतीय क्रमांक पटकावला होता. त्यांना मुख्याध्यापिका कविता कराड, रेवणनाथ शेलार यांचे मार्गदर्शन लाभले.

Hello Beed
Page No. 3 Oct 28, 2019
Powered by: erelego.com

रत्नमाला चौरे, जीवन तांदळे यांची राष्ट्रीय बेसबॉल संघात निवड

प्रतिनिधी

केज । दि.३ ऑक्टोबर





क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना व जिल्हा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्धेमाने आयोजित राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धा २६ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधित जालना येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेत. साने गुरुजी निवासी विद्यालय केज या शाळेच्या संघाने तृतीय स्थान प्राप्त केला आहे.या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाळू म्हणुन कु. रत्नमाला चौरे व चि.जिवन तांदळे या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य बेसबॉल संघात निवड झाली आहे.सदर विद्यार्थ्यांस मार्गदर्शन सरस्वती कविता कराड यांनी अभिनंदन करुन पुढील राष्ट्रीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

दै. तरूण भारत.

समर्थ राजयोग
मुख्य संपादक - वैभव स्वामी | मो.9822628521

साने गुरुजी निवासी विद्यालयाचे चार विद्यार्थी राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र

केज/प्रतिनिधी

बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी विद्यालयाचे चार विद्यार्थी महाराष्ट्र राज्याच्या शालेय बेसबॉल संघात राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत.सतरा वर्ष बेसबॉल शालेय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या संघात चि.ओंकार मुंडे, कु.तनुजा आंधळे तर एकोणीस वर्ष वयोगट बेसबॉल महाराष्ट्र राज्य संघात कु.रत्नमाला चौरे, कु.पंकजा चौरे या चार विद्यार्थ्यांचा समावेश झालेला आहे.सतरा वर्ष वयोगटाच्या राष्ट्रीय स्पर्धा दिल्ली येथे तर एकोणीस वर्ष वयोगटाच्या राष्ट्रीय स्पर्धा नांदेड येथे संपन्न होणार आहेत.

सदर विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.कविता कराड मॅडम, क्रीडा शिक्षक सानप सर, सुरेश चौरे,जीवन तांदळे यांचे मार्गदर्शन लाभले होते.सदर विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.अरविंद विद्यागर सर,राज्य प्रशिक्षक रेवन्नाथ शेलार सर,ड.उद्धवराव कराड, राजेश कापसे,थोरात सर, क्षितिजा गव्हाणे,किशोर काळे यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

01 Dec 2024 - Page 3 | www.samarthrajyog.com
Powered by softisky | 9764331134

स्टार 24 न्यूज मराठी
महाराष्ट्राचा निःपक्ष आवाज
सुविचार
समय का उत्तम उपयोग करना सीखें क्योंकि विश्व के ज्यादातर सफल मनुष्यों ने इसी का प्रयोग किया है।
21 डिसेंबर 2024, बीड, महाराष्ट्र

साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या राम काळे याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

दत्तात्रय मुजमुले Reporter



केज प्रतिनिधी

दिनांक 17 डिसेंबर ते 19 डिसेंबर या कालावधीत क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा विभागीय क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे आयोजित राज्यस्तरीय 17वर्ष व 19 वर्ष वयोगट शालेय सॉफ्टबॉल स्पर्धा संपन्न झाल्या. यात साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या मुलींचा सतरा वर्षे वयोगट व मुलांचा सतरा वर्षे वयोगट संघाने सहभाग नोंदवला होता. मुलांच्या संघातून राम काळे या विद्यार्थ्याचे राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली आहे .सदर राष्ट्रीय स्पर्धा जळगाव या ठिकाणी जानेवारी महिन्यात संपन्न होणार आहे या स्पर्धेत निवड झालेल्या राम काळे या विद्यार्थ्यास मार्गदर्शिका डॉ. कविता गित्ते मॅडम ,क्रीडा शिक्षक सानप सर, श्री घुले सर, श्रीमती कांदे मॅडम, जीवन तांदळे, सुरेश चौरे यांचे मार्गदर्शन लाभले होते.सदर विद्यार्थ्याची महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर सर, संस्था अध्यक्ष अॅड.उद्धवराव कराड सर ,श्री.राजेश कापसे सर ,क्रीडा मार्गदर्शक रेवन्नाथ शेलार सर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या आहेत.

सकाळ



केज : राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेसाठी निवड झालेला साने गुरुजी निवासी विद्यालयाचा मुलींचा संघ.

मुलींच्या बेसबॉल संघाची निवड

केज, ता. १९ (बातमीदार) : शहरातील साने गुरुजी विद्यालयाच्या संघाने विभागीय स्तरावर झालेल्या बेसबॉल स्पर्धेत प्रथम पटकावला आहे. त्यामुळे चौदा वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने या संघांचे क्रीडा क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा संचालनालयातर्फे आयोजित शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या चौदा वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने जालना येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे हा मुलींचा संघ जालना येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत औरंगाबाद विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. संघाच्या या यशाबदल संस्थाध्यक्ष अॅड. उद्धव कराड, मुख्याध्यापिका डॉ. कविता कराड, राजेश कापसे, क्रीडा प्रशिक्षक रेवननाथ शेलार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

Aurangabad, Beed-Today
20/09/2019 Page No. 3



दिव्य मराठी

बीड जिल्हा 04-12-2023

राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेत साने गुरुजी विद्यालयाच्या मुलींच्या संघास सुवर्णपदक

राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावणारे सानेगुरुजी निवासी विद्यालयाच्या मुलींच्या संघाचे खेळाडू.

प्रतिनिधी | केज

जालना येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबरदरम्यान घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींमध्ये केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या संघाने छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रतिनिधित्व करताना सुवर्णपदक प्राप्त करून छत्रपती संभाजीनगर विभागाची मान उंचावली.

या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागाच्या मुलींच्या संघाने नाशिक विभागावर १ - ८ गुणांनी विजय प्राप्त करून उपांत्य फेरीत प्रवेश करत लातूर संघावर १ - ७ गुणांनी मात केली, तर अंतिम फेरीत नागपूर विभागाच्या संघावर १ - ८ गुणांनी विजय प्राप्त करून सुवर्णपदक पटकावले. या संघातील १६ विद्यार्थिनी शासनाच्या ५ टक्के क्रीडा आरक्षणास पात्र ठरल्या. या संघास साने गुरुजी विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कविता गित्ते, क्रीडा शिक्षक रामदास सानप, रेवणनाथ शेलार, दत्तात्रय घुले, नीलेश तरकसे, कांदे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल बेसबॉल राज्य संघटनेचे सचिव राजेंद्र इकनकर, इंद्रजित नितनवार, जालना जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, बीड जिल्हा क्रीडा अधिकारी सुहासिनी देशमुख, संस्थाध्यक्ष अँड. उद्धव कराड, राजेश कापसे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संघाचे कौतुक करीत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेतील परसबाग निर्मिती

प्रस्तावना :-

शैक्षणिक धोरण २०२० या शैक्षणिक धोरणात ५+३+३+४ असा आकृतीबंध आणला आणि खऱ्या अर्थाने भविष्यात जागतिक स्तरावर विद्यार्थ्यांना स्वीकारले जाईल अशा पद्धतीने शिक्षण पद्धती अमलात आली. यापूर्वी 1986 चे शैक्षणिक धोरण, मुदलियार आयोग, कोठारी आयोग, गांधीजींचे मूलोद्योगी शिक्षण, या नुसार शैक्षणिक कार्यक्रम राबवले गेले. ही सर्व आयोग, धोरणे राबवली गेली, अमलात आणली आणि समाजाला/ लोकांना शिक्षण त्या त्या पद्धतीने दिलं गेलं पण जसजसे शिक्षण क्षेत्र प्रगत होऊ लागलं राष्ट्र विकसित होण्याच्या मार्गावर येत गेलं तस तसे शिक्षण क्षेत्रात देखील आधुनिक पद्धतीचे बदल होत आहेत आणि पिढी शैक्षणिक दृष्ट्या प्रगल्भ होत चालली आहे हे असताना सुद्धा जीव घेणे स्पर्धा निर्माण झाल्याने सर्वांनाच शिक्षणाच्या माध्यमातून नोकरी मिळेल असे वाटत नाही.म्हणून सध्या कार्यरत असणाऱ्या.

केंद्र सरकारने शैक्षणिक धोरण २०२० अमलात आणलं व त्याची सर्व शैक्षणिक क्षेत्रात अंमलबजावणी केली. त्यातच महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कौशल्याधिष्ठित शिक्षणाला प्राधान्य दिलेलं दिसून येते .एका अर्थाने युवकांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःमध्ये असणाऱ्या कौशल्यांचा शोध घेऊन स्वतःची आवड लक्षात घेऊन, स्वतःचा व्यवसाय निर्माण करावा अशी खुणगाठ या धोरणात बांधल्याने नक्कीच युवकांच्या हाताला काम मिळेल व देशातील युवकांना

बेकारी सारख्या समस्यांना तोंड देण्याची गरज भासणार नाही. मुलांमध्ये श्रमप्रतिष्ठा हे मूल्य रुजवता येईल तसेच मुलांना शेतीची आवड निर्माण करता येईल.



शाळेतील राबवले जाणारे नवोपक्रम

उपक्रमाची यादी :-

1) टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे.

2) बोलक्याभिंती.

3)वर्गमंत्रीमंडळ.

5) दप्तरा विना शाळा.

6) योगासने.

7) अतिरिक्त पूरक मार्गदर्शन तासिका.

8) विद्यार्थी बचत बँक.

9) एक पेड मां के नाम

10)वृक्ष दत्तक

11)पाणी आडवा पाणी जिरवा

12) जुन्या जीर्ण कपड्यापासून पायपुसणी तयार करणे.

13) टाकाऊ खोक्यापासून पेन stand तयार करणे

14) टाकाऊ प्लास्टिक पासून शोभेचे फुले तयार करणे.

15) टाकाऊ जिन्स कपड्यापासून व थर्माकोलपासून चप्पल तयार करणे.

16) झाडाच्या वाळलेल्या फांदीपासून व टाकाऊ कागदापासून शेभेची कुंडी तयार करणे.

17) नारळाच्या झाडाच्या वाळलेल्या पानापासून झाडू तयार करणे.











७.३ विघटन न होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून वीट निर्मिती केलेल्याचे छायाचित्रे



1) विघटन होणारा कचरा नष्ट होतो.
2) वीट निर्मितीसाठी होणारा मातीचा हानी थांबते.
३) वीट निर्मिती करत असतांना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण होतो.
4) विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासला जातो.
५) विविध प्रयोग केल्यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण होते.

सांडपाणी पुर्नवापर

उपक्रमाचे नाव : सांडपाणी व्यवस्थापन

दिनांक: वर्षभर सतत चालणाराउपक्रम

वेळापत्रकानुसार वर्गनिहाय विद्यार्थ्यांचा सहभाग

सहभागी विद्यार्थी:- वर्ग 5 वी ते 10 वी.

उपक्रमाचा उद्देश :- विद्यार्थ्यांना पाण्याचा होणारा अपव्यय लक्षात आणून देऊन पाण्याचे महत्त्व पटवून पाण्याचा पुनर्वापर वापर करण्याच्या विविध पद्धती स्पष्ट करून देणे.







शालेय ग्राहक भांडारातून बचत बँकेच्या कार्डवर विद्यार्थी कॅशलेस व्यवहार करताना.

विश्वकर्मा (सुतारकाम)



Youtube link

1) https://www.youtube.com/watch?v=8P4frW1RM5Q
   (बाल विवाह निर्मुलन गीत गायन)
2) https://youtube.com/shorts/BhDeoUaf-eo?si=vxxfi47OFJ8HibDn
   (बाल विवाह निर्मुलन शपथ)
3) https://youtu.be/2tRjkp0ytYY?si=QZXlzJZWoKX **(नाटिका)**
4) https://youtu.be/sd0n4eB-ViQ?si=LaZhJhk9zp7B65oE **(चिडीमार आंदोलन)**

स्वच्छता विषयक जनजागृती








बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित
साने गुरुजी निवासी मा.मा.
उच्च माध्यमिक विद्यालय, केज
५१ वे राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक
विज्ञान प्रदर्शन २०२३-२४

नाट्यस्पर्धा


राज्य स्तरीय हागणदारीमुक्त विषयावर नाटिका सादरीकरण


जिल्हा पातळी पासून ते राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात शालेय विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी
राष्ट्रीय विज्ञान नाट्य महोत्सव




स्वच्छता MONITAR २०२४-२०२५


जिल्हाधिकारी पुरस्कार
माने गुरुजी निवासी माध्यमिक विद्यालय केज, ता. केज जि बीड.
स्वच्छता पुरस्कार


महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे
विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
पितृ स्मृति पुरस्कार
कु. मनिषा विनायक चौरे
साने गुरुजी निवासी विद्यालय, बेज, जि. बीड की छात्रा को
रा.भा बालबोधिनी प.क्र. ३२५ फरवरी २०२४ सत्र की
परीक्षा में मराठवाडा विभाग में सर्वाधिक अंक प्राप्त कर
सर्वप्रथम उत्तीर्ण होने का सम्मान प्राप्त हुआ है।
इस उपलक्ष्य में म.रा.भा. सभा जि. कार्यालय, छ. संभाजीनगर
तथा सुश्री श्रीमती मीना द्वितीय तिवारी छ. संभाजीनगर की ओर से यह
"स्व. रविशंकर दीक्षित पितृ स्मृति पुरस्कार" प्रदान कर गौरवित किया जाता है।
तारीख :
स्थान
डॉ. सुनील पवार
अध्यक्ष
डॉ. अ. व. सोनटक्के
सचिव
महाराष्ट्र राष्ट्र भाषा सभा, छ. संभाजीनगर

शाळेचा पट वाढवण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न

1) शाळा लगतच्या परिसरातील सहा वर्ष पूर्ण मुलांचा सर्वे करून शाळेत दाखल करून घेणे.
2) मुलींसाठी ज्यादा प्रवेश संख्या निश्चित करणे.
3) पालक संवाद यात्रा.
4) प्रवेशितांना टॅब वाटप करणे.
5) ऑनलाइन तासिका दीर्घ सुट्टीत आयोजन करणे.
6) कोरोना कालावधीत शिक्षण आपल्या दारी
7) नाविन्यपूर्ण विज्ञान लॅब
8) मुबलक प्रमाणात क्रीडा साहित्य
9) मुलांमुलींकरिता आवश्यक तेवढे स्वच्छतागृहे
10) दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता RAMP व्यवस्था
11) AI कोडिंग लॅब उपलब्धता.
12) अप्रगत विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम

13) **ICT लॅब व प्रोजेक्टर उपलब्धता.**

14) **शैक्षणिक साहित्य वाटप करणे.**

15) **शालेय गणवेश वाटप करणे**

लोकसहभागातून रोख रकमेतून शाळा व वस्तीगृहासाठी अत्यावश्यक लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्यात आली.

विद्यालयाची बालसंसद







दिनेश मराठी बीड जिल्हा 08-10-2024

आज साने गुरुजी निवासी शाळेतर्फे वृक्ष दिंडी, रोप वाटप

केज | येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या वतीने नवरात्रोत्सव निमित्त मंगळवारी शाळेतून भवानी माता मंदिरापर्यंत वृक्ष दिंडी काढून भक्तांना रोपांचे वाटप करण्यात येणार आहे. विद्यार्थी मंदिर परिसराची स्वच्छता करून खाद्य पदार्थांचे स्टॉल लावणार आहेत. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या इको क्लब, गांधी तीर्थ स्वच्छता अभियान प्रतियोगिता, स्काऊट गाईड विभागाच्या वतीने मंगळवारी शाळेपासून विद्यार्थ्यांची वृक्ष दिंडी भवानी माळ येथील भवानी माता मंदिरापर्यंत काढण्यात येणार आहे. गांधी तीर्थ स्वच्छ शाळा प्रतियोगिता २०२४ - २५ अंतर्गत मंदिर परिसराची विद्यार्थी हे स्वच्छता करणार आहेत. तर शाळेच्या स्काऊट गाईड विभागामार्फत खरी कमाई उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना स्वतः कमावलेल्या कमाईचा आनंद घेता यावा म्हणून विद्यार्थी खाद्य पदार्थ विक्रीचे स्टॉल लावणार आहेत. या उपक्रमाचा भक्तांनी लाभ घ्यावा. असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष उद्धव कराड, प्राचार्या डॉ. कविता गित्ते यांनी केले आहे.

स्टार 24 न्यूज मराठी
महाराष्ट्राचा निष्पक्ष आवाज

सुविचार -

12-03-2025, बीड, महाराष्ट्र

स्वच्छता ही माझी जबाबदारी समजून कृतीशील व्हावे- प्रा.हनुमंत सौदागर

दत्तात्रय मुजमुले Reporter

केज :- साने गुरुजी निवासी विद्यालय केज येथे गांधी तिर्थ स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छतचे महत्व व स्वच्छता आरोग्या साठी किती आवश्यक आहे विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या व्याख्यानाचे पुष्प गुंफताना प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांनी अस्वच्छता ही मानवनिर्मित घाण आहे तूज आहे तुजपाशी परी तू जागा चुकलाशी या उक्तीप्रमाणे स्वच्छतेची सुरुवात सर्वप्रथम स्वतहा पासून सुरू करायला पाहीजे भाषणे देऊन चालणार नाही या साठी आपण स्वतः कृती करायला पाहिजे.पृथ्वी निर्माण झाली त्यावेळेसच निसर्गतच सर्वांची निर्मिती झाली आहे. मानव,झाडे झुडपे,पशु पक्षी, प्राणी इत्यादीची निर्मिती झाली परंतु मनुष्याच्या गरजा जरा जास्तच वाढल्याने सुंदर स्वच्छ पृथ्वीवर मानसाने अस्वच्छता निर्माण करु लागला. हा देश माझा या देशाचे जरा से भान रहू द्या रे या प्रमाणे आपण स्वतः स्वच्छते विषयी जागरूक राहिले पाहिजे स्वच्छते मुळे रोगराई कमी प्रमाणात होते.अस्वच्छ असलेल्या भागात आजारपण व रोगराईचे प्रमाण आपण जास्त पाहतो या स्वच्छता ठेवा रोगराई मुक्त रहा हा संदेश आपण स्वतः पाळा व आपल्या परिसरातील नागरिक यांना सुद्धा स्वच्छते विषयीचे महत्व सांगितले पाहिजे. तरच भारत देश महासत्ता होईल असे मत व्यक्त केले.या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साने गुरुजी निवासी प्रा.मा. उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कविताताई गित्ते/कराड मॅडम या उपस्थित होते.

शाळेस मिळालेले विविध पुरस्कार

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा1मध्ये जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक सन 2023-24








मुख्यमंत्री पुरस्कार

लोकमत

साने गुरुजी निवासी शाळेला ११ लाखांचा पुरस्कार प्रदान

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धा...

लोकमत न्यूज नेटवर्क

केज : "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा" स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात जिल्ह्यात पहिल्या आलेल्या साने गुरुजी निवासी शाळेला ११ लाखांचा तर तालुका स्तरावर जि. प. व खासगी शाळेतून प्रथम आलेल्या प्रत्येकी ३ अशा एकूण ६ शाळांना मंगळवारी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

केज पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने-काळे, गट शिक्षणाधिकारी लक्ष्मण बेहरकर यांचे हस्ते धनादेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता चाटे, प्राचार्या डॉ. कविता गिते- कराड, सचिन हांगे, आशुबा सोनवणे, शंकर कंचनवार आदी उपस्थित होते. प्रास्ताविक तालुका समन्वयक सुनील केंद्रे यांनी केले.

सूत्रसंचालन सुवर्णा सिरसट यांनी तर आभार आशुबा सोनकांबे यांनी मानले. यावेळी केज तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, केंद्रीय मुख्याध्यापक व बाहीस प्राप्त शाळांचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

६ शाळा झाल्या पुरस्काराने सन्मानित

सन्मान झालेल्या शाळा

बीड जिल्ह्यातून सर्वप्रथम : साने गुरुजी निवासी विद्यालय, केज (११ लाख रुपये) खासगी शाळेतून विठ्ठल विद्यालय, सारणी सागवी (सर्वप्रथम, ३ लाख रुपये), प्राथमिक आश्रमशाळा, टाकळी (द्वितीय, २ लाख रुपये), गणपतराव मोकाळे इंग्लिश स्कूल, नांदुरघाट (तृतीय, १ लाख रुपये) जिल्हा परिषदेच्या शाळांमधून जिल्हा परिषद हायस्कूल, भाटुंबा (प्रथम ३ लाख रुपये),जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, तांबवा (द्वितीय,२ लाख रुपये), जिल्हा परिषद शाळा शिंदी (तृतीय,१ लाख रुपये)

Hello Beed
Page No. 4 Jun 28, 2025
Powered by: epaper.com

SCERT PUNEमार्फत राज्यस्तरावर घेण्यात आलेल्या नवोपक्रम स्पर्धेत शिक्षक व मुख्याध्यापक यांना मिळालेले जिल्हास्तर पारितोषिक.





शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्यामार्फत शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत शिक्षकांना मिळालेली बक्षिसे

चला बोलूया शाळेविषयी .....



मी चौरे वृषालीअभिमान साने गुरुजी निवासी विद्यालयांमध्ये इयत्ता आठवी पासून शिक्षण घेत आहे आत्ता मी याच विद्यालयात इयत्ता अकरावी विज्ञान शाखेत शिकत आहे. माझ्यामध्ये असलेले सुप्त कलागुण या शाळेने शोधून मला विज्ञान प्रदर्शन व विज्ञान नाट्य महोत्सव राष्ट्रीय स्तरापर्यंत जाण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यासाठी मला शिक्षक व मुख्याध्यापिका यांचे मार्गदर्शक लाभले. मला अभिनयाबद्दल व उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल माननीय जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पारितोषिक देखील प्राप्त झाले. आज मी कोणत्याही विषयावरती चांगल्या पद्धतीने माझे विचार मांडू शकते व अभिनय करू शकते. या शाळेमुळे माझी शिक्षणात प्रगती तर झालीच झाली पण माझ्या इतर कलागुणांना वाव दिल्याने मी संपूर्ण राज्यभर पोहोचले याचा मला अभिमान आहे या शाळेची मी ऋणी आहे



राष्ट्रीय खेळाडू

मी कु. चौरे रत्नमाला बाबासाहेब तुकुची वाडी ता. केज जिल्हा बीड येथील रहिवासी असून मी राष्ट्रीय खेळाडू आहे. मी इयत्ता तिसरी ते बारावी पर्यंत या शाळेत शिक्षण घेऊन बेसबॉल व सॉफ्टबॉल ची राष्ट्रीय खेळाडू बनली आहे .आज मी राष्ट्रीय पातळीवर आठ वेळेस खेळले असून मला सहा वेळेस गोल्ड, सिल्वर, ब्रांज मेडल मिळेल आहे. तर राज्य पातळीवर बारा वेळेस खेळले आहे. यावर्षी मी राष्ट्रीय फेडरेशन खेळले यात देखील मला गोल्ड मेडल आहे. यात माझ्या मार्गदर्शिका श्रीमती गित्ते मॅडम व क्रीडा शिक्षक सानप सर यांच्यामुळे या पातळीपर्यंत पोहोचू शकले. आज मी खेळाडू म्हणून शासनाच्या पाच टक्के आरक्षणात वर्ग दोन करिता पात्र आहे. आज मी स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. हा सर्व बदल माझ्या साने गुरुजी

निवासी विद्यालयामुळेच झाला आहे. आज माझ्या दोन बहिणी व एक भाऊ त्याच शाळेत शिकत आहेत. माझ्याबरोबर व आधी या शाळेतील 35 विद्यार्थी राष्ट्रीय खेळाडू व 300 विद्यार्थी राज्यस्तर खेळाडू आहेत .तर दीडशे विद्यार्थ्यांना वर्ग तीन साठी खेळाडू आरक्षणातून शासनाच्या नोकरीसाठी पात्र आहेत. खऱ्या अर्थाने ही शाळा राष्ट्रीय खेळाडू बनवणारी खाणच आहे.



MBBS MD

मी दशरथ चौरे केज तालुक्यातील जीवाची वाडी या गावचा असून सध्या मी बारामती येथे सरकारी हॉस्पिटल ला नोकरीला आहे. मी या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्याने माझा बेस पक्का झाला. त्यामुळे मला माझे पुढील शिक्षण घेताना कोणत्याही अडचणी आल्या नाहीत. त्याच पक्या बेसवर मी एमबीबीएस झालो. आज माझ्या गावातील दरवर्षी 300 ते 350 विद्यार्थी या शाळेतून शिक्षण घेतात बरेच विद्यार्थी शिक्षक, सैन्य दलात, इंजिनियर, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस, इत्यादी क्षेत्रात आहेत .माझे गाव जीवाची वाडी हे 100% ऊस तोडणी साठी स्थलांतरित होणार गाव आहे .खऱ्या अर्थाने या कामगारांच्या घरात शिक्षणाची गंगा या शाळेमुळे आली आणि आमच्या हातात कोयत्या ऐवजी लेखनी देण्याचे काम केले. यामुळे मी या संस्थेचा व शाळेचा ऋणी आहे.

मी पुष्पा इंद्रमोहन कराड साने गुरुजी निवासी विद्यालयात गेली दहा वर्षापासून अनिवासी विद्यार्थ्यांसाठी शालेय पोषण आहार बनवते मी तांबवा येथील रहिवाशी आहे. या शाळेचा पोषण आहार अत्यंत उत्कृष्ट दर्जाचा आहे कारण यात या शाळेने साधारणतः तीन एकर मध्ये केलेली परसबाग होय सर्व प्रकारचा भाजीपाला आहारामध्ये समाविष्ट केला जातो त्यामुळे पोषक रुचकर आहार बनतो या परसबागेचे खास वैशिष्ट्य सांडपाण्याचा वापर गांडूळ खत ताजी भाजीपाला होय विशेष म्हणजे यात विद्यार्थी कर्मचारी व संस्थाचालक यांचाही सहभाग असतो तसेच निवासी विद्यार्थ्यांना सुद्धा नियमित सीजन.नुसार ताजा भाजीपाला मिळतो.



ऊसतोड कामगार



MBBS

श्री.साधू चौरे. तुकुची वाडी ता. केज . जिल्हा बीड चा नागरिक असून मी ऊसतोड कामगार आहे. माझा मुलगा लहू व अंकुश हे दोन्ही या शाळेत प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण करून एमबीबीएस ला लागलेले आहेत. माझा अंकुश मुलगा तांत्रिक कारणामुळे एमबीबीएस करू शकला नाही. परंतु लहू हा सध्या अहिल्यानगर येथे एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण करत आहे. म्हणून मी माझ्या गावातून असंख्य मुलांना या शाळेत प्रवेशित केले आहे .कारण आमच्या मुलांना घडवणारे हे एक विद्यालय आहे. नुसते शिक्षणाचे इथे मिळत नाही तर संस्कार देखील मिळतात त्यामुळे मी या विद्यालयाची शतशः ऋणी आहे.

मी उर्मिला रवींद्र विडेकर (शिरूर घाट) येथील रहिवासी असून माझी मुलगी ऋतुजा विडेकर ही साने गुरुजी निवासी विद्यालयात इयत्ता पहिलीत प्रवेशित करून इयत्ता दहावीपर्यंतचे शालेय शिक्षण मिळाले. ती आज एम फार्मसी चे शिक्षण घेत आहे. व ती स्वतःच्या पायावर उभी आहे. खऱ्या अर्थाने ती माझ्याकडे जेवढी राहिली त्यापेक्षा जास्त काळ शाळेत राहिली त्यामुळे आज तिच्या मधील सर्व गुणसंपन्न संस्कार पाहता मला तिचा अभिमान वाटतो त्याचे संपूर्ण श्रेय शाळेला जाते. बीड जिल्ह्यातील मुलींसाठी सुरक्षित व गुणवत्ता पूर्ण संस्कारयुक्त शिक्षण देणारी ही एकमेव शाळा आहे.मी बीड जिल्ह्यातील सर्व माता-भगिनींना विनंती करते कि मुलींच्या शिक्षणासाठी फक्त साने गुरुजी हीच शाळा निवडा.



डॉ. सचिन मडावी

सहाय्यक आयुक्त इतर मागास बहुजन कल्याण विभाग गडचिरोली.

साने गुरुजी निवासी प्रा. मा. उच्च माध्यमिक विद्यालय हे इतर मागास बहुजन कल्याण विभाग अंतर्गत चालत असलेले निवासी विद्यालय राज्यातील निवासी शाळेचे , आश्रम शाळांचे एक आदर्श मॉडेल आहे. या शाळेत गुणवत्ता पूर्ण शिक्षण, क्रीडा, कला ,संस्कृती, विद्यार्थ्यांमधील उपजत गुण यांना वाव देणारे एकमेव विद्यालय आहे .जिल्ह्यातील भौतिक सुविधांनी परिपूर्ण असणारे हे विद्यालय बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांचा शिक्षणाचा आशेचा किरण बनली आहे.

श्री.लक्ष्मण बेडसकर (गट शिक्षणाधिकारी केज)

साने गुरुजी निवासी विद्यालय हे आमच्या तालुक्याचे अभिमानास्पद विद्यालय आहे. प्रशस्त इमारत, भव्य क्रीडांगण, स्वतंत्र वस्तीगृह इमारत, मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व संवर्धन, स्वागत कक्ष, नियमित विद्यार्थी उपस्थिती, वर्षभर सातत्याने वेगवेगळे गुणवत्ता पूर्ण उपक्रम राबवणारे हे विद्यालय आहे.

प्रत्येक स्पर्धांमध्ये राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारून बक्षीस प्राप्त करणारे विद्यार्थी या विद्यालयाने घडवले आहेत. या शाळेत शिस्त, गुणवत्ता, शैक्षणिक दर्जा, वस्तीगृहामध्ये निवास दर्जा, भोजन दर्जा, भौतिक सुविधा ,उपक्रमशील मु.अ.व शिक्षक यांची जणू खाणच आहे.


शैक्षणिक क्षेत्रातील कोणत्याही उपक्रमास बैठकीस सातत्याने आम्हाला शाळा उपलब्ध होते. या शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्वच्छ शाळा, स्वच्छता मॉनिटरिंग ,स्वच्छ व सुंदर शाळा युवा महोत्सव ,विज्ञान नाट्य महोत्सव ,सांस्कृतिक स्पर्धा इत्यादी मध्ये राष्ट्रीय स्तरापर्यंत पारितोषिके प्राप्त केली आहेत. या शाळेचा महत्वपूर्ण उपक्रम म्हणजे "एफ एल एन" पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करून" स्वतंत्र तासिका" घेतल्या जातात त्यामुळे शाळेची गुणवत्ता उत्तम आहे. तसेच शाळेचा पट ही उत्तम आहे. शाळेच्या प्रगतीस तालुक्याचा शिक्षण विभागाचा प्रमुख म्हणून हार्दिक शुभेच्छा.




केंद्रप्रमुख संजय चवरे

यांनी या शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रामीण माहिती दिली होती.

पोलिस अधीक्षक कार्यालय येथे पोलिस अधीक्षक मनीष बोलावून पोलिस विभागाची सर्व कलवानिया यांनी १५ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीच्या सर्व विद्यार्थ्यांना पोलिस अधीक्षक कार्यालयाचे संपूर्ण कामकाज जाणून घेण्यासाठी निमंत्रित केले होते. पोलिस अधीक्षकांनी पोलिस व्हॅन व कर्मचाऱ्यांना भिसेवाडी येथे पाठवून विद्यार्थी व शिक्षक यांना आणून पोलिस अधीक्षक कार्यालयातील संपूर्ण माहिती दिली. असा नाविन्यपूर्ण उपक्रमाची दानवे यांनी दखल घेत स्वतः भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीच्या सर्व विद्यार्थ्यांना मुंबई येथे निमंत्रित केले. तिथे संपूर्ण विधान भवन विद्यार्थी पाहणार असून विधानसभा अध्यक्ष, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट या विद्यार्थ्यांसोबत दानवे घालून देणार आहेत. शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्यासोबत विद्यार्थी व शिक्षकांची चर्चा करून देणार असल्याची माहिती लासूर स्टेशन येथील शिवसेनेचे माजी शहरप्रमुख नितीन कांजुने यांनी दिली.

आमच्यासाठी गौरवाची बाब : गायकवाड


केंद्रप्रमुख बी. जे. गायकवाड यांनी सांगितले की, भिसेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी मंत्रालयाचा अभ्यास दौरा म्हणजे आमच्यासाठी गौरवाची बाब आहे. कारण या शाळेची गुणवत्ता इंग्रजी शाळेला लाजवेल अशी आहे. त्यामुळे या शाळेतील विद्यार्थ्यांना पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी स्वतः माहिती घेऊन पोलिस अधीक्षक कार्यालयात बोलावून पोलिसांचे कार्य कसे चालते, याची माहिती दिली होती. त्याची दखल विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी घेतली आहे.

Devendra Fadnavis
10 Mar ·

Office of DCM :
उपमुख्यमंत्री आणि वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात 'लेक लाडकी' योजना सुरू केली.
लेक जन्मास आल्यानंतर तिच्यासाठी ठेवल्या जाणाऱ्या रकमेत भरघोस वाढ केली.

ही अत्यंत आनंदाची 'बातमी' पहिलीच्या वर्गात शिकणाऱ्या अयोध्या साबळे हिने (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी, ता.वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) तिच्या शाळेतल्या मित्र-मैत्रिणींना वाचून दाखवली.

तेव्हा या बालकांनी निरागस जल्लोष एकदा पहाच...!
#maharashtra #DevendraFadnavis



Prashant Dabhade and 9 others 1 comment • 16K views

पुण्य नगरी

विनोद जाधव

दर्जेदार शिक्षण हवंय तर शहरात नको, खेड्यात चला

भिसेवाडीच्या जि.प. शाळेत उच्च शिक्षितांची मुले

अकरा गावांतील विद्यार्थी शिकतात येथे

लासूर स्टेशन: शिक्षणासाठी खेड्यातून शहराकडे जाणारे अनेक विद्यार्थी आपण नेहमीच बघतो. मात्र, जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत शिक्षण घेण्यासाठी शहरातील विद्यार्थी आपण कधी खेड्यात जाताना बघितले का? नाही ना. जर बघायचे असेल तर भिसेवाडी (ता. वैजापूर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला आवर्जून भेट द्या. या शाळेत शिक्षण घेण्यासाठी लासूर स्टेशनसह परिसरातील अकरा गावातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक डॉक्टर, इंजिनियर, पीएसआय, शासकीय गुत्तेदार तसेच आर्थिक संपन्न आहेत. शाळेचे कार्य इतर शाळांसाठी आदर्श ठरणारे आहे. हा आदर्श इतर शिक्षकांनी घ्यावा, व गुणवंत विद्यार्थी घडवावे, अशी मागणी पालकांमधून होत आहे.



अकरा घरांची लोकवस्ती असलेल्या भिसेवाडी (लासूरगाव ग्रामपंचायत अंतर्गत) येथे ५५ वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेची शाळा स्थापन झाली आहे. शाळेतील कार्यरत शिक्षकांनी गेल्या काही वर्षात शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्याच्यादृष्टीने केलेले प्रयत्न, तसेच राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे शाळेकडे पालकांचा कल वाढला आहे. त्यामुळे आज रोजी या शाळेत गंगापूर व वैजापूर तालुक्यातील अकरा गावातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. शाळेत येण्यासाठी हे विद्यार्थी दररोज जवळपास १५ किलोमीटर अंतर पार करतात. हे विशेष. पाल्यांची येणे जाण्याची व्यवस्था पालकांकडून स्वतः करण्यात आली आहे.

शाळाबाह्य कामे करूनही गुणवंत विद्यार्थी

दरम्यान, शाळेत इतर शाळेप्रमाणे शाळाबाह्य काम सांभाळून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषदेच्या इतर शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षक तसेच शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून शाळाबाह्य कामांचा बाऊ केला जातो. असे या शाळेकडे बघितल्यावर लक्षात येते.

४० पैकी ३६ विद्यार्थी बाहेरगावचे या ठिकाणी पहिली ते पाचवीपर्यंत शाळा आहे. त्यात आजरोजी ४० पटसंख्या आहे. त्यात स्थानिकचे केवळ चार विद्यार्थी असून इतर ३६ विद्यार्थी बाहेरगावचे आहेत, त्यात लासूर स्टेशन, जळगाव, अमानतपूरवाडी, शिरेगाव, देवळी, हडस पिंपळगाव, भानवाडीसह इतर गावांचा समावेश आहे.

सुशिक्षित, आर्थिक संपन्नतेचे विद्यार्थी

येथे शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचे पालक डॉक्टर, इंजिनियर, वकील, पोलीस खात्यातील अधिकारी, शिक्षक, शासकीय गुत्तेदार, खाजगी बांधकाम ठेकेदार, व्यापारी तसेच आर्थिक संपन्न असलेल्या पालकांची मुले या जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत शिक्षणासाठी दाखल करण्यात आली आहेत.

> शाळा कुठे आहे? कोणती आहे? यापेक्षा महत्त्वाचे असते ते त्या शाळेत गुणवत्ता देण्यासाठी प्रयत्न करणारे शिक्षक. त्या पद्धतीचे शिक्षक भिसेवाडी येथील जिल्हा परिषदेचे शाळेत असल्याचे माहित झाले. तशी खात्री देखील झाली. म्हणून माझी मुलगी लासूर स्टेशन किंवा शहराच्या ठिकाणी शाळेत न पाठवता भिसेवाडी येथील शाळेत पाठवण्याचा निर्णय घेतला.
> : डॉ. किशोर जगताप, पालक

> पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी कुठलेही विशेष असे वेगळे प्रयत्न करावे लागत नाही. प्रत्येक विद्यार्थ्यांचे वैयक्तिक मूल्यमापन करून त्यांच्यासाठी गरजेचा अभ्यास करून घेतल्यानंतर निश्चितच त्यांची गुणवत्ता वाढते.
> : फेरोज शेख, मुख्याध्यापक, विजय म्हेत्रेवाड

वावरून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा अंदाज येतो.

Smart Chhatrapati Sambhajinagar Edition
Dec 30, 2023 Page No. 1
Powered by : eReleGo.com

अग्रलेख

नाही कलहांना तोटा!

आजचा गणपती

टेकडी गणपती, नागपूर
प्रेषक : हर्षल गोरे, बालाजीनगर

www.maharashtratimes.com

एकमेव निःपक्ष वृत्तपत्र

महाराष्ट्र टाइम्स

रविवारचे तापमान

	औरंगाबाद
कमाल	३०.५
किमान	१९.९

तापमान अंश सेल्सिअसमध्ये

वर्ष : ११ अंक : २२७ औरंगाबाद। सोमवार, ५ सप्टेंबर २०२२। पाने १२ (औरंगाबाद टाइम्ससह)। शहर आवृत्ती। ₹ ३.००

मटामध्ये जाहिरात देण्यासाठी 18001205474 वर कॉल करा. 'महाराष्ट्र टाइम्स'चा अंक मिळविण्यासाठी readercontact@timesgroup.com वर ईमेल करा किंवा subscribe.timesgroup.com इथे जा.

विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी

कृतियुक्त शिक्षणातून भिसेवाडीच्या शाळेची भरारी

शिक्षकदिन विशेष

Tushar.bodkhe
@timesgroup.com
Tweet : @tusharbMT

औरंगाबाद : कृतियुक्त शिक्षण पद्धतीने भिसेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या गुणवत्तेत भर पडली आहे. पालकांचा जिल्हा परिषद शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. आता निमशहरी भागातील विद्यार्थीही भिसेवाडीच्या शाळेत शिकत आहेत.

जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता आणि अध्यापनावर नेहमीच नकारात्मक चर्चा होते. पण, भिसेवाडी (ता. वैजापूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पायंडा जपला आहे. लासूरगाव केंद्राची १९६७ पासूनची ही पहिली ते पाचवीची एक वर्गखोली शाळा आहे. अकरा घरांच्या भिसेवाडीची लोकसंख्या ७९ असून, शाळेत विद्यार्थीसंख्या सध्या ३६ आहे. या शाळेचीही पटसंख्या कमी होती. २०१७ मध्ये रूजू झालेले सहशिक्षक शेख फेरोज यांनी उपक्रमशील अध्यापनातून बदल घडविला. सहकारी विजय म्हेत्रेवाड यांच्यासह विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले. परिणामी, शाळेचा दर्जा सुधारल्याने तीन वर्षांत विद्यार्थीसंख्या १६ वरून ३६ पर्यंत पोहचली आहे. लासूर स्टेशन, भानवाडी, जळगाव, भाडाईत वस्ती, धोंदलगाव अशा नऊ गावांतील विद्यार्थी इथे शिकतात. त्यात डॉक्टर, पोलिस, शिक्षकांच्या मुलांचाही समावेश आहे. कृतीतून स्वर काढणे, एक ते शंभर अंक आठ पद्धतीने वाचणे, कृतीतून एबीसीडी शिकणे, टेलिस्कोपद्वारे आकाश दर्शन, हसत खेळत विज्ञान अशा उपक्रमांनी विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाढविली आहे. वक्तृत्व आणि सामान्यज्ञान स्पर्धेत विद्यार्थ्यांनी औरंगाबाद येथे पारितोषिके पटकावली आहेत. तर उल्लेखनीय कामासाठी शेख फेरोज यांना जिल्हाधिकाऱ्यांनी दहा हजार रुपयांचे पारितोषिक दिले आहे. शिवाय, निवडणूक जनजागृतीसाठीही पारितोषिक मिळाले आहे. विद्यार्थ्यांचे इंग्रजी संभाषण सुधारण्यासाठी टॅबचा वापर सुरू आहे. शाळेच्या प्रत्येक उपक्रमाला पालकांचे पाठबळ असते. सुविधांसाठी पैशाची गरज असल्याने लोकवर्गणी गोळा करण्यात आली. तब्बल पाच लाख रुपये लोकवर्गणी जमा झाली असून रंगरंगोटी, विद्युत मीटर, लाइट फिटिंग, संगणक खरेदी, महापुरुषांची छायाचित्रे खरेदीसाठी निधी वापरला आहे. एक वर्गखोली पुरेशी नसल्याने भाडेतत्त्वावर दुसरी वर्गखोली घेण्यात आली आहे. दिवाळी आणि उन्हाळी सुटीतील अभ्यासक्रम शाळेने वेगळा तयार केला आहे.

चौदाखडी ते एकोणीसखडी

सध्या अभ्यासक्रमात चौदाखडी असून भिसेवाडीच्या शाळेत एकोणीसखडी आहे. कृतीयुक्त एकोणीसखडीने विद्यार्थ्यांना अवघड शब्द सोपे झाले आहेत. पहिलीतील विद्यार्थीही स्पष्टोच्चारात मराठी वाचन करतात. कृतीमुळे विद्यार्थ्यांना व्याकरण शिकणे सोपे होते, असे शेख यांनी सांगितले. गणित, इंग्रजी, सामान्यज्ञान या विषयांसाठीही वेगवेगळ्या पद्धती वापरल्या आहेत.



भिसेवाडीतील शाळेतील विद्यार्थी विविध उपक्रमांत सक्रिय सहभाग घेत आहेत.

> जिल्हा परिषद शाळांबाबतची नकारात्मकता पालकांनी बदलण्याची गरज आहे. अनेक शिक्षक उत्तम काम करीत आहेत. शिक्षण पद्धतीत सर्वांचा सहभाग असेल तर निश्चितच चित्र बदलू शकते.
> - शेख फेरोज, सहशिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, भिसेवाडी



लोकमत
मस्ट READ

जि.प.च्या भिसेवाडी वस्ती शाळेत येतात १३ गावांतील विद्यार्थी

लोकमत विशेष

उपक्रमशील शिक्षकांची परिश्रमपूर्वक किमया

राम शिनगारे
लोकमत न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर : वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी वस्तीत ११ घरे, ८० लोकसंख्या आणि ६३ मतदानसंख्या आहे. या वस्तीतील पहिल्या वर्गात एक ते दोन विद्यार्थ्यांचा प्रवेश होता, ज्यामुळे पहिली ते पाचवी वर्गामध्ये एकूण केवळ १४ विद्यार्थी होते. या परिस्थितीत २०१७ साली फेरोज शेख यांची शिक्षक पदावर नियुक्ती केली गेली. त्यांनी पटसंख्या वाढवल्यावर शिक्षण विभागाने दुसरा शिक्षक दिला. शाळेचा गुणवत्ता आणि भौतिक सुविधांतील सुधारणा लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात झाली. या शाळेत दोन तालुक्यांतील तब्बल १३ गावांमधील शेतकरी तसेच नोकरदारांची मुले शिकण्यासाठी येत आहेत.

भिसेवाडी येथील जि. प. शाळा ३१ डिसेंबर १९६७ रोजी पहिली ते चौथीपर्यंत शाळा म्हणून स्थापन झाली. सुरुवातीपासूनच या शाळेची पटसंख्या कमी होती. एकाच वर्गखोलीत पाचही वर्गांचे विद्यार्थी शिकत होते. त्यावेळी शासनाने २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा धोरण घेण्याचा विचार सुरू केला होता. त्या काळात २०१७ साली फेरोज शेख यांची शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी ३३ पर्यंत पटसंख्या वाढविली. मग विजय मिठ्ठेवाड यांची दुसरे शिक्षक म्हणून नियुक्ती झाली. दोन्ही शिक्षकांना एकाच वर्गात सर्वांना शिकविणे कठीण वाटल्यामुळे दोन वर्षे भाड्याने वर्गखोली घेतली. वर्गखोलीसाठी ३६ हजार रुपये भाडे दोन्ही शिक्षकांनी भरले.



वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी येथील वस्ती शाळेच्या बांधलेल्या नव्या शाळेसमोर ५० विद्यार्थ्यांसह शाळेतील दोन शिक्षक.

वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी शाळेत २०१७ मध्ये शिक्षक फेरोज शेख हे रुजू झाले, तेव्हा शाळेतील १४ विद्यार्थी.

तीन गुंठे जमीन दान

भिसेवाडी शाळेला केवळ एकच वर्गखोली होती, नवीन खोलीची गरज होती. गावातील प्रकाश भिसे यांनी ३ गुंठे जमीन दान दिली. लोकसहभागातून ७ लाख ३४ हजार ८०० रुपयांची कामे करण्यात आली. शालेय शिक्षण विभागाने २ नव्या खोल्या बांधल्या. अशा प्रकारे ५६ वर्षानंतर २ शिक्षकांच्या उपक्रमामुळे शाळा पूर्णपणे बदलली आहे.

या नोकरदारांची शिकतात मुले

डॉक्टर, इंजिनिअर, पोलिस, शिक्षक, व्यावसायिक, नेते, बिल्डर, शेतकरी, मजूर यांची मुले येथे शिकत आहेत.

शाळेच्या गुणवत्तेत झालेला बदल

१. जिल्हा ते राज्यस्तरावरील स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी बक्षिसे जिंकली आहेत.

२. स्कॉलरशिपमध्ये तालुक्यात शाळा दुसऱ्या क्रमांकावर आली. मंथन स्पर्धेत राज्यात २२ वा क्रमांक मिळविला. स्माईल स्पेलिंग स्पर्धेत जिल्ह्यात दुसरा क्रमांक, शॉर्ट फिल्म स्पर्धेत राज्यस्तरावर दुसरा क्रमांक मिळवला आहे.

Chhatrapati Sambhajinagar Main
Page No. 2 Jul 07, 2025
Powered by: erelego.com

देशोन्नती

जि.प. प्रा.शाळेत शिकतात विविध क्षेत्रातील पालकांची मुले

लासूर स्टेशन : भिसेवाडीतील जिपप्रा. शाळा ३१ डिसेंबर १९६७ ला स्थापन झालेली आहे. ही एक वस्ती शाळाअसूनतीग्रामपचायतलासूरगाव अंतर्गत येत आहे समृध्दी महामार्गापासून अवघ्या दोन किलोमीटरवर असलेली ही शाळा आपल्या दूरदृष्टीने व कल्पक कौशल्य यांचासाथघालतगुणवंताचेकेंद्र बनली आहे. ही किमया साथली ती येथील मुख्याध्यापक फेरोज शहानूर शेख व त्यांच्या सहकारी शिक्षकामूळे. या शाळेत शेतकऱ्यांचीच नव्हे तर समाजातील विविध क्षेत्रातील मुले शिक्षण घेतलआहेत.

मुख्याध्यापक शेख यांनी सांगितले की, लोकसंख्या कमी असल्याकारणाने व या ठिकाणी मागील काही वर्षात मुलच जन्माला न आल्यामुळे यावर्षी फक्त एक मुलगा या वस्तीतून शाळेत ९ ली ला प्रवेशित झालेला आहे.अशा अवस्थेत मी २०१७ ला जॉईन झालो त्यावेळेस या शाळेची पटसंख्या १४ होती२०१७ते २०२० या काळात अधिक प्रयत्न करून जवळपास ३३ पर्यंत पटसंख्या नेली व त्यानंतर मला दुसरा शिक्षक देण्यात आला.आज रोजी आम्ही पहिली ते पाचवी पटसंख्या ४६ व चार पहिली पूर्वप्रवेशित मुल आहेत. भिसेवाडी वस्तीतील फक्त चार मुलं आज रोजी शाळेत शिक्षण घेतात बाकी सर्व मुलंही बारा गावामथून येऊन शाळेत शिक्षण घेत आहे. यामध्ये ५५



टक्के मुलंही शेतकऱ्यांचीआहेव उर्वरित मूलही डॉक्टर, इंजिनिअर, पोलीस कर्मचारी, शिक्षक, बिझनेस मॅन, राजकीय, सी. एस. सी केंद्र चालक, बिल्डर्स, बांधकाम व्यवसायिक, बँक मॅनेजर, लेबर व माझ्या घरचे मुलं देखील या शाळेत शिक्षण घेत आहे. एकंदरीत ही एकमेव जिल्हा परिषद शाळा आहे ज्या ठिकाणी एकूण १२ गावांची मुलं येऊन शिक्षण घेत आहे तसेच प्रत्येक क्षेत्रातील पालकाची मुलं या शाळेत शिक्षण घेतात. तशी आमची शाळा ही वैजापूर तालुक्यातील परंतु गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन, शिरेगाव, देवळी, भानवाडी व वैजापूर तालुक्यातील थोंदलगाव, दहेगाव, लासुरगाव, जळगाव, अमानतपूरवाडी, भाडाईत वस्ती अशा विविध गावातील मुलं येऊन आमच्याकडे येऊन शिक्षण घेतआहेत. लोकसहभागातून शाळेला जमिनीसह अन्य साहित्यांचा पुरवठा समाजातील देणगीदारांकडून झाला आहे. तो केवळ आम्ही शाळेची गुणवत्ता सिध्द केल्यामुळे ज्यांनी शाळेला जमिन दिली त्यांची नात आमच्या शाळेत शिकत असल्याचे शेख यांनी सांगितले. केवळ मेहनत व गुणवत्ता या जोरावर तब्बल ५६ वर्षानंतर हा बदल या शाळेत झालेला आहे असेअभिमाने शेख यांनी सांगितले. या यशात माझ्या सह शिक्षकांनीही मोलाची साथ दिल्याचे त्यांनी आाथोरेखित केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभागी होत अनेक पुरस्कार प्रदान केलेआसून स्कॉलरशिप मध्ये तालूक्यात दुसरा क्रमाक पटकावला आहे.आतापर्यंत पाच आयएएस आधिकाऱ्याच्या हस्ते शाळेला पुरस्कार प्राप्त झाले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती , प्रत्यक्ष विविध स्थळांना भेटी, झूम ऑनलाईन द्वारे मार्गदर्शन यांच्यासह शाळेत विशेषउपक्रमराबविण्यातआलेआहे. तर विविध स्तरावरील पुरस्कार शाळेला मिळाले आहे.शिक्षण विभाग सन २०२३-२४ साठीजिल्हापरिषद छत्रपती संभाजीनगरच्या वतीने वैजापूर तालुक्यातून जिल्हा परिषद भिसेवाडी शाळेला निपुण व उपक्रमशील शाळा पुरस्कार मिळाला हे आमच्यासाठी गौरवास्पद असल्याचे ते म्हणाले.

Aurangabad Edition Edition
Sep 05, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

नवराष्ट्र
www.navarashtra.com

अविनाश संगेकर

चाकणकरांनी घेतली भिसेवाडीच्या लघुपटाची दखल

लासूर स्टेशन, (वा.) भिसेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या संयुक्त उपक्रमातून निर्मित रचांगला स्पर्श व वाईट स्पर्शर हा लघुपट राज्यभरातील शाळा, महाविद्यालय, हॉस्पिटल, घरामध्ये दाखवण्यात आला त्याबद्दल महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी शाळेचे कौतुक केले. सर्व उपस्थितांना सभागृहामध्ये हा लघुपट दाखवण्यात आला.



या लघुपटात कार्य करणारे सर्व विद्यार्थी, शाळेचे शिक्षक यांना बोलावून त्यांचा जिल्हाधिकारी कार्यालय येथे सन्मान करण्यात आला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, उपविभागीय पोलिस अधिकारी पूजा नांगरे, सहायक आयुक्त सुभाष भुजंग, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण सुवर्णा जाधव, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रेश्मा चिमणरे, उपजिल्हाधिकारी सुचिता शिंदे, प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण व माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यावेळी उपस्थित होते. संपूर्ण राज्यभर भिसेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षक व विद्यार्थ्यांचा 'चांगला स्पर्श व वाईट स्पर्श' हा लघुपट महिला आयोगाच्या माध्यमातून दाखवण्यात येणार आहे असे महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी सांगितले. गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर, मनीष दिवेकर, बाळासाहेब म्हस्के, हनुमंत कोळसे, संतोष जाधव तसेच ग्रामस्थ सर्व पालकांनी कौतुक केले आहे.

Chhatrapati Sambhajinagar Plus Edition
Feb 16, 2025 Page No. 3
Powered by: Navarashtra.com

भिसेवाडीचे जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी लवकरच जाणार मुंबईच्या मंत्रालयात

विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांचे विद्यार्थ्यांना मुंबई भेटीचे निमंत्रण
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व देवेंद्र फडणवीस यांची घेणार भेट



औरंगाबाद/लोकल्प प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे विधानपरिषद विरोधी पक्षनेते ना.अंबादास दानवे यांनी भिसेवाडी ता.वैजापूर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विधानभवन मुंबई बघण्याचे निमंत्रण दिले असून तसा नितेष भिसेवाडी शाळेचे मुख्याध्यापक फेरोज शेख व सहशिक्षक मिढेवाड यांना मोबाईलद्वारे कळवले असून यां विद्यार्थ्यांच्या दौऱ्याचा सर्व खर्च विरोधी पक्षनेते आंबादास दानवे करणार आहेत १५ ऑगस्टला ग्रामीण पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांनी यां शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय येथे बोलावून पोलीस विभागाची सर्व माहिती दिली होती.

भ्रमण ध्वनीद्वारे मा.विरोधी पक्षनेते अंबादासजी दानवे यांनी वैजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीचे मुख्याध्यापक फेरोज शेख सर यांचे कौतुक केले. कारण होते पोलीस अधीक्षक मा.मनिष कलवानिया यांनी १५ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीच्या सर्व विद्यार्थ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय बघण्यासाठी व संपूर्ण कामकाज जाणून घेण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी निमंत्रित केले होते आणि पोलीस अधिक्षकांनी पोलीस व्हॅन व कर्मचारी छोटीच्या वस्ती असलेल्या ११ घरांच्या भिसेवाडी येथे पाठवून विद्यार्थी व शिक्षक यांना आणून पोलीस अधीक्षक कार्यालयातील संपूर्ण माहिती आपल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने दिली. असा नाविन्यपूर्ण



उपक्रम राबवणारे खड्डस अधिकारी हे कदाचित महाराष्ट्रातील पहिलेच असेल त्यामुळे मा.अंबादास दानवे यांनी याची दखल घेत स्वतः भ्रमणध्वनी द्वारे संपर्क करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीचे सर्व विद्यार्थ्यांना मुंबई येथे निमंत्रित केले असून तिथे संपूर्ण विधानभवन विद्यार्थी पाहणार तसेच मा.विधानसभा अध्यक्ष , मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार दोन्ही पैकी जे उपलब्ध असतील त्यांची भेट यां विद्यार्थ्यांसोबत ना. दानवे घालून देणार असून शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या सोबत विद्यार्थी व शिक्षकांची चर्चा करून देणार असल्याची माहिती तालूर स्टेशन

बि.जे.गायकवाड (केंद्रप्रमुख, तालूरगाव) भिसेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी मंत्रालयाचा अभ्यास दौरा म्हणजे अभिनंदनीय बाब असून आमच्यासाठी गौरवाची बाब आहे कारण यां शाळेची गुणवत्ता इंग्रजी शाळेला लाजवेल अशी आहे त्यामुळे यां शाळेतील विद्यार्थ्यांना पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांनी स्वतः माहिती घेऊन पोलीस अधीक्षक कार्यलयात बोलावून पोलिसांचे कार्य कसे चालते याची माहिती दिली होती त्याची दखल विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांनी घेतली असून विद्यार्थ्यांना मुंबई विधानभवनात Arun देण्यासाठी बोलावले आहे.

जिल्हा परिषद शाळेचा भिसेवाडी पॅटर्न संपूर्ण जिल्ह्यात राबवावा...

वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी येथील शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहुन जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेत भिसेवाडी पॅटर्न राबवण्याची गरज आहे कारण केवळ अकरा घरांची लोकसंख्या असलेल्या यां शाळेला १९६७ पासून केवळ एक वर्गखोली असून चार वर्ग एकच बसूनही विद्यार्थ्यांची गुणवत्ता अचाट व अफाट आहे त्यामुळे यां झेडपीच्या शाळेत वैजापूरच नाही तर गंगापूर तालुक्यातील तालूर स्टेशन येथील डॉक्टर, वकील, इंजिनिअर, शिक्षक, कॉन्ट्रेक्टर यांची मुलें शिक्षण घेत आहे त्यामुळे त्यांची गुणवत्ता पाहुन मन थक्क होते त्यामुळे भिसेवाडी पॅटर्न जिल्ह्यातील प्रत्येक झेडपीच्या शाळेत रबवायला हवे मात्र शिक्षकांची इच्छाशक्ती भिसेवाडीच्या शाळेतील शिक्षकांसारखी हवी हे मात्र नक्की.

येथील शिवसेनेचे माजी शहरप्रमुख तिलीन पाटील कांजूने यांनी दिली असून हा अनुभव जेणेकरून आगाम्या - वेगाम्या अनुभवातून विद्यार्थ्यांना काही तरी नवीन शिकण्यास मिळेल.

दिव्य मराठी

छत्रपती संभाजीनगर जिल्हा 10-04-2024

भिसेवाडीच्या विद्यार्थ्यांचा अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव

प्रतिनिधी | बोरदहेगाव



लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांचा छोटासा व्हिडिओ तयार करण्यात आला होता. या व्हिडिओतील विद्यार्थ्यांचा व निर्मिती करणाऱ्या शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगरचे अपर जिल्हाधिकारी मा. डॉ. अरविंद लोखंडे यांच्या हस्ते आणि वैजापूरचे उपविभागीय अधिकारी डॉ अरुण जऱ्हाड,तहसीलदार सुनील सावंत,गटशिक्षणाधिकार ी हेमंत उशिरे यांच्या उपस्थितीत भिसेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांचा वैजापूर येथे तालुक्यातील सर्व मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत रविवारी सन्मान करण्यात आला. सदरील व्हिडिओ छत्रपती संभाजीनगर १९- लोकसभा मतदारसंघ निवडणूक मतदार जनजागृतीसाठी तसेच मतदान अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणामध्ये अधिकृतरीत्या प्रत्येक प्रशिक्षणात दाखवण्यात येत आहे.

देशोन्नती

भिसेवाडी शाळेचा लघुपट राज्यात व्हायरल



देशोन्नती वृत्तसंकलन

लासुर स्टेशन : येथील जिल्हा परिषदेच्या भिसेवाडी शाळेचा चांगला व वाईट स्पर्श लघुपट संपूर्ण राज्यात व्हायरल होत असून यातील चिमूकल्याचे व त्याना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकाचेही सर्वत्र कौतूक होत आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी केंद्र लासूरगाव तालुका वैजापूर शाळेचे सर्व पात्र विद्यार्थी,पालक व शाळेचे मुख्याध्यापक फेरोज शहानुर शेख, सहशिक्षक विजय नामदेवराव मिढ्वाड यानी मिळून प्राथमिक व माध्यमिक तसेच कॉलेज विद्यार्थ्यांसाठी आणि आई-वडील, भाऊ-बहीण यांच्यापर्यंत चांगला व वाईट स्पर्श संकल्पना पोहोचण्यासाठी विविध ठिकाणी जसे की बसमध्ये, बाजारपेठेत, निर्जन स्थळी, रेल्वे मध्ये वाईट स्पर्श कसा केला जातो आणि घरामध्ये प्रेमाचा,शाळेमध्ये शिक्षकाकडून शाबासकीच,शाळा सुटल्यानंतर आई-वडिलांसोबत,भावा-बहिणी सोबत गाडीवर जाताना जो स्पर्श असतो तो चांगला स्पर्श अशा दोन्ही संकल्पना या लघुपटाच्या माध्यमातून खूप चांगल्या रित्या कृतीतून दाखवले आहे. सध्या बदलत्या सामाजिक परिस्थितीमध्ये समाजात घडणाऱ्या अनेक वाईट घटना आणि बातम्या पाहता मन व्यथित होते. बऱ्याच प्रसंगी महिला अन्याय व अत्याचार सहन करतात काहीवेळा अगदी लहान बालकांचीही यातून सुटका होत नाही. अशा घटनांवर समाजात व कुटुंबात कोणीही मोकळेपनाणे बोलायला तयार नाही.त्यामूळे यासर्व बाबींची जाण त्याना व्हावी व भविष्यात त्या अशा घटनांचा प्रतिकार करु शकतील व समाजात एक निकोप वातावरण वाढीस लागण्यास मदत होईल हा उद्देश यामागील आहे.

विविध ठिकाणी प्रदर्शित व प्रतिसाद

हा लघुपट संपूर्ण राज्यात सर्व जिल्ह्यात पोहचला असून प्राथमिक-माध्यमिक शाळा,खाजगी कोचिंग क्लासेस तसेच महाविद्यालयात,हॉस्पिटल,घरात विद्यार्थ्यांना दाखवण्यात येत आहे. या लघुपटाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.हा लघुपट यशस्वी होण्यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांच्या संकल्पनेतून व विशेष मार्गदर्शनाखाली वैजापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर, यांच्या टीमने मेहनत घेतली आहे.

Aurangabad Edition
Sep 23, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

देशोन्नती

भिसेवाडीच्या विद्यार्थ्यांचे केले विकास मिना यांनी कौतूक ; पालकांशी साधला संवाद

देशोन्नती वृत्तसंकलन

लासुर स्टेशन : त्या छान नृत्य केलेस तू यातच पूढे चागले कर आम्ही सर्व तुला निश्चित मदत करु असे कौतूक करत सिईओ विकास मिना यानी विद्यार्थ्यांशी मनमोकळया गप्पामारतत्याना मार्गदर्शन केले. योवळी त्यानी या मुलाच्या पालकाशी सवाद साधत तुम्ही मुलाच्या कलागुणाना ओळखून त्याना योग्य संधी उपलब्ध करा असा सल्ला त्यानी यावेळी दिला. लासूर स्टेशन येथील जिल्हा परिषदेच्या भिसेवाडी येथील मुलानी जिल्हा सास्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट सादरीकरण केले होते. या विद्यार्थ्यांचे खास गोड कौतूक करताना विकास मिना याच्यातील सज्जन अधिकारी यावेळी उपस्थिताना दिसून आला हे विशेष.. दरम्यान विद्यार्थ्यांशी बोलतानात्यानीत्याच्या नृत्यातील अनेक बाबींवर चर्चा करत त्याना प्रोत्साहित केले. तसेच तुम्ही साकारलेले नृत्याचे व्हिडिओ आम्ही आपल्या जिल्ह्याच्या जिल्हापरिषदेच्या वेबसाईटला टाकत असल्याचे सागत त्यामुळे इतर मुलाना प्रेरणा मिळेल असे त्यानी यावेळी सागितले. तसेच भिसेवाडी येथील शाळेतील दोन्ही शिक्षकाच्या कामाचे कौतूक करत त्याचे अभिनदन विकास



मिना यानी केले. जिल्हा परिषदेतर्फे बक्षीस स्वरूपात एक वस्तूतसेच शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण , उपशिक्षणाधिकारी सवळ याच्याहस्ते आई - वडिलाचा यथोचित सन्मान करत त्याना पूढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सिईओ कडून विद्यार्थ्यांच्या तसेच त्याच्या पालकाशी थेट सवाद साधण्याची ही घटना जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यादाच घडली असून याची सर्वत्र चर्चा होत आहे.

पालकांशी मनमोकळा संवाद

आई जयश्री ताबट व वडिल नरेंद्र ताबट यांच्या मनमोकळा संवाद साधताना त्यानी अनेक मुद्यावर चर्चा केली यात प्रामूख्याने तुम्ही इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून आपल्या विद्यार्थ्यास जिल्हा परिषदेच्या भिसेवाडी शाळेत का टाकले या प्रश्नावर पालकाची स्पष्ट भूमकी विचारली. त्यासोबतच अनेक प्रश्न त्यानी पालकाना विचारत मुलामथील कलागुणाना भविष्यात पुढे नेण्यासाठी सर्वोतोपरी मदतीचे आश्वासन दिले.

Aurangabad Edition
Jan 28, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

भिसेवाडी शाळेचा लघुपट प्रसारित

गुड टच, बॅड टच कसा ओळखावा; उत्कृष्ट मांडणी

वैजापूर, (वा.) छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या संकल्पनेतून तसेच विकास मीना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या यांच्या प्रेरणेतून आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांसाठी तालुक्यातील भिसेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्यावतीने जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक तसेच कॉलेज विद्यार्थ्यांसाठी आणि आई-वडील, भाऊ-बहीण यांच्यासाठी चांगला व वाईट स्पर्श संकल्पना घेण्यासाठी लघुपट तयार करण्यात आला आहे.

चांगला व वाईट स्पर्श संकल्पना आमच्या जिल्हा परिषद भिसेवाडी शाळेच्या सर्व विद्यार्थी,पालक व शिक्षकांनी खूप चांगल्यारित्या दाखवले आहे. नक्कीच या लघुपटामुळे पालकांमधे भयमुक्त वातावरण निर्माण होईल.
- हेमंत उशीर, गटशिक्षणाधिकारी, वैजापूर

जसे की, बसमध्ये, बाजारपेठेत, निर्जनस्थळी, रेल्वेमध्ये वाईट स्पर्श कसा वेळा जातो आणि घरामध्ये प्रेमाचा,शाळेमध्ये शिक्षकांकडून शाबासकीचा ,शाळा सुटल्यानंतर आई-वडिलांसोबत,भावा-बहिणी सोबत गाडीवर जाताना जो स्पर्श असतो. तो चांगला स्पर्श अशा दोन्ही संकल्पना या लघुपटाच्या माध्यमातून प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी चांगल्या रित्या कृतीतून दाखवले आहे. सध्या बदलत्या सामाजिक परिस्थितीमध्ये समाजात घडणाऱ्या अनेक घटना आणि कानावर येणाऱ्या बातम्या पाहता मन व्यतिथ होते. बहुतांश वेळी महिला अन्याय व अत्याचार निमुटपणे सहन करतात तर काही अन्याय अत्याचाराच्या घटनांनाच वाचा फोडली जाते. अगदी लहान बालकांचीही यातून सुटका होत नाही. व अशा घटनांवर समाजात व



कुटुंबात कोणीही मोकळेपनाणे बोलायला तयार नाही. चांगला स्पर्श व वाईट स्पर्श दाखवा बालकांना व पालकांना जाणून असावी. चांगला व वाईट स्पर्श

हा लघुपट जिल्ह्यात जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे.
- जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

यातील त्यांना भेद ओळखता यावा व अशा प्रकारच्या घटनांवर त्यांना मनमोकळेपणे आई-वडिलांसोबत व्यक्त होता यावे. अगदी लहान वयातच अशा प्रकारच्या घटनांची बालकांना ओळख व्हावी व या संकल्पना स्पष्ट झाल्या तर ते मोठेपणी अशा घटनांचा प्रतिकार करू शकतात. समाजात निकोप वातावरण तयार होऊन. भयमुक्त वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.

काय आहे उद्देश?

या उपक्रमामागे किंवा लघुपट निर्मितीमागे उद्देश महिला सक्षमीकरण हा आहे. हा लघुपट जिल्हाभरातील सर्व प्राथमिक माध्यमिक शाळा,खाजगी कोचिंग क्लासेस तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांना दाखवण्यात येत आहे. याचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.हा लघुपट यशस्वी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर, मनीष दिवेकर आणि बाळासाहेब म्हस्के शिक्षण विस्तार अधिकारी वैजापूर व बी.जे गायकवाड केंद्रप्रमुख लासूरगाव यांच्या टीमने मार्गदर्शनपर मेहनत घेतली आहे. याशिवाय विद्यार्थी,पालक व शाळेचे मुख्याध्यापक फेरोज शहानूर शेख, सहशिक्षक विजय नामदेवराव मिड्डे?वाड यांनीही यात सिंहांचा वाटा आहे.

दिव्य मराठी
छत्रपती संभाजीनगर जिल्हा 23-07-2025

भिसेवाडी शाळेचे मंथन परीक्षेत सलग तिसऱ्या वर्षी यश, विद्यार्थ्यांचे कौतुक

प्रतिनिधी | बोरदहेगाव

वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी जिल्हा परिषद शाळेने राज्यस्तरीय मंथन परीक्षेत सलग तिसऱ्या वर्षी यश मिळवले. २०२२-२३ मध्ये चौथी आणि पाचवीच्या प्रत्येकी चार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यावेळीही विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर चांगले गुण मिळवले. २०२३-२४ मध्ये २५ विद्यार्थी परीक्षेला बसले. त्या वर्षी प्रत्येक वर्गातून विद्यार्थी प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

या वर्षी २०२४-२५ मध्ये गंगापूर तालुक्यातून लासुर स्टेशन केंद्रावरून पहिली ते पाचवीचे वीस विद्यार्थी परीक्षेला बसले. यामध्येही भिसेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा शिऊर येथील शिवकृपा मंगल कार्यालयात सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात आमदार प्रा. रमेश बोरनारे, डाएटचे वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. रवी जाधव, कन्नड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर, वैजापूर पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी म्हस्के, शिवाजी बारसे, वैभव रणखांब, सहाय्यक पोलिस निरीक्षक शिऊर हे मान्यवर उपस्थित होते.

शाळेचे शिक्षक फिरोज शेख, विजय मिट्टीवाड, अर्जुन जाधव यांचे विशेष योगदान होते. कार्यक्रमात शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच लासुरगाव केंद्रातील संजय धनाड व अर्जुन जाधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोसावी दाम्पत्य, शिक्षक घोडके, भारत दांडगे आणि इतर शिक्षकांनी मेहनत घेतली. त्यांचे आभार मानण्यात आले.

भिसेवाडी शाळेला जिल्हा न्यायाधीशांची भेट



लासुर स्टेशन : जि. प. प्राथमिक शाळा भिसेवाडी केंद्र लासुरगाव येथे मोहिययोदिन जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायालय वैजापूर यांनी उच्च न्यायालय खंडपीठ यांच्या शाळा निरीक्षण अंतर्गत शाळेला भेट दिली. यामध्ये त्यांनी शाळेच्या भौतिक सुविधांची पूर्ण माहिती जाणून घेतली. तसेच शैक्षणिक सुविधांची माहिती घेऊन विद्यार्थी शौचालय युनिट, वर्ग खोल्यांची संख्या, विद्दयूत पुरवठा आणि शाळेत सुरू असलेले विविध शैक्षणिक उपक्रम जसे छोटे-छोटे विज्ञानाचे प्रयोग, गणिताचे खेळ, चांद्रयान तीनचे सादरीकरण, भिसेवाडी शाळेचे आजपर्यंतचे यश विद्यार्थ्यांने स्वतः संगणकावर साहेबांना दाखवले. सांस्कृतिकमध्ये विद्यार्थ्यांनी एका गीताद्वारे आपल्या देशासाठी बलिदान दिलेल्या सैन्यांना साहेबांसमोर श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी साहेबांनी खुश होऊन विद्यार्थ्यांसोबत गावकऱ्यांसोबत चर्चा केली व अशी शाळा महाराष्ट्रात नाही, असे स्वतःहून सांगितले. प्रत्येक ठिकाणी आमच्या सोबत फोटो काढला जातो. मला तुमच्या सोबत फोटो काढायचा आहे असे म्हणून साहेबांनी शाळेला एक खूप मोठी शाबासकी दिली. जातांना विद्यार्थ्यांसोबत संगीत व क्रिकेट खेळात देखील आपला सहभाग नोंदवला. यावेळी न्यायाधिशांसोबत वैजापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर तसेच शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर बी. के. मस्के व केंद्रप्रमुख ए. टी. पगारे, बी. जे. गायकवाड व पोलीस प्रशासन उपस्थित होते.

Aurangabad Edition

RJ Archana - RED FM
3h •

मेहनत केली कि त्याचं फळ हे मिळतंच , आपण हे ऐकलं आहे आणि बघतही आलो आहोत आणि हे मेहनतीचं फळ एका शिक्षकाला मिळालं आहे शेख फिरोज जे आहेत लासूर स्टेशन मधील भिसेवाडी इथले ज्यांनी जनजागृती करून गावात एकही पॉसिटीव्ह नाही अशी स्थिती निर्माण केली आणि आपल्या जिल्ह्यात काय स्थिती आहे कोविड च्या केसेस कुठे कुठे शून्य आहेत हे जाणून घ्या आज मॉर्निंग नंबर वन मध्ये ZP CEO Dr गोंदवले सर यांच्याकडून #covid19 #0cases #rjarchana #redfm #bajaateraho
Shaikh Feroz



दिव्य मराठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा 19-10-2023

संमिश्र

शिक्षण • जिल्हा न्यायाधीश एम. मोहियोद्दीन यांचे भिसेवाडी शाळेत प्रतिपादन

इतर ठिकाणी माझ्यासोबत फोटो काढतात, विद्यार्थांनो... मला तुमच्यासोबत फोटो काढायचा

प्रतिनिधी | बोरदहेगाव

प्रत्येक ठिकाणी आमच्यासोबत फोटो काढला जातो, पण आता विद्यार्थ्यांनो... मला तुमच्यासोबत फोटो काढायचा आहे, असे म्हणत न्यायाधीश साहेबांनी विद्यार्थ्यांसोबत उभे राहत फोटो काढला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी (ता. वैजापूर) येथे जिल्हा न्यायाधीश एम. मोहियोद्दीन यांनी उच्च न्यायालयाच्या शाळा निरीक्षण दौऱ्याअंतर्गत भिसेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली. या वेळी त्यांनी शाळेतील भौतिक सुविधांची संपूर्ण माहिती जाणून घेतली. तसेच न्यायाधीशांनी शाळेतील शैक्षणिक सुविधांची माहिती घेऊन विद्यार्थ्यांसाठी असलेले शौचालय युनिट स्वच्छ व व्यवस्थित आहे का, वर्गखोल्यांची संख्या बरोबर आहे का, शाळेतील विद्युत पुरवठा सुरळीत चालू आहे का, याविषयी माहिती जाणून घेतली.

भिसेवाडी शाळेत सुरू असलेले विविध शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी छोटे-छोटे विज्ञानाचे प्रयोग, गणिताचे खेळ, शाळेत करण्यात आलेले चांद्रयान तीनचे सादरीकरण तसेच भिसेवाडी शाळेचे आजपर्यंतचे विविध उपक्रम विद्यार्थ्यांनी न्यायाधीशांना संगणकावर दाखवले.



भिसेवाडी शाळेला जिल्हा न्यायाधीश एम. मोहियोद्दीन यांनी भेट देत विद्यार्थ्यांसोबत फोटो काढला . छाया : बाबासाहेब वाघ.

या वेळी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांनी एका गीताद्वारे आपल्या देशासाठी बलिदान दिलेल्या शहिद सैनिकांना न्यायाधीश साहेबांसोबत श्रद्धांजली अर्पण केली. या वेळी न्यायाधीशांनी आनंद व्यक्त करत विद्यार्थ्यांसोबत व गावकऱ्यांसोबत चर्चा केली. त्यांनी सांगितले की, भिसेवाडी जिल्हा परिषद शाळा ही आदर्श शाळेपैकी एक आहे. भिसेवाडी येथील शाळा व येथील गुणवान विद्यार्थी पाहून न्यायाधीश साहेबांना विद्यार्थ्यांसोबत फोटो काढण्याचा मोह आवरला नाही. ते म्हणाले की, प्रत्येक ठिकाणी आमच्यासोबत फोटो काढला जातो, पण आता विद्यार्थ्यांनो... तुमच्यासोबत फोटो काढायचा आहे, असे म्हणत न्यायाधीश साहेबांनी विद्यार्थ्यांसोबत उभे राहत फोटो काढला. त्यानंतर न्यायाधीश साहेबांनी शाळेला खूप मोठी शाबासकी दिली व कौतिक केले. नंतर काही वेळ न्यायाधीश साहेबांनी शाळेतील विद्यार्थ्यांसोबत संगीताचा व क्रिकेट, बुद्धिबळ खेळण्याचा आनंद घेतला. गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर, शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर, बी. के. मस्के, केंद्रप्रमुख ए. टी. पगारे, बी. जे. गायकवाड, पोलिस कर्मचारी, मुख्याध्यापक फिरोज शेख, शिक्षक विजय मिट्टेवाड हजर होते.

सकाळ अविनाश संगेकर

विद्यार्थ्यांनी अनुभवले वैजापूर न्यायालयाचे कामकाज

भिसेवाडी जिल्हा परिषद शाळा : इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांचा समावेश

लासूर स्टेशन, ता.१५ (बातमीदार) भिसेवाडी (केंद्र लासुरगाव) (ता.वैजापूर) येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच वैजापूर न्यायालयाला भेट देऊन येथील न्यायालयीन कामकाजाची माहिती घेतली.

भिसेवाडी (ता.वैजापूर) प्राथमिक शाळेच्या पहिली ते पाचवीच्या ४० विद्यार्थ्यांनी सोमवारी (ता.१५) वैजापूरच्या जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाला भेट दिली.

केंद्रप्रमुख बी.जे.गायकवाड, मुख्याध्यापक फेरोज शेख, सहशिक्षक विजय मिट्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालयाला भेट दिली.

यावेळी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मोहम्मद मोहियोद्दीन यांच्या सूचनेनुसार सर्व विद्यार्थ्यांना तीन कोर्टमध्ये विभागून प्रत्येक न्यायाधीशांसमोर कामकाज कसे होते हे दाखविण्यात आले.

विद्यार्थ्यांनी जिल्हा न्यायाधीश पी. पी. मुळे, एस. के. उपाध्याय, आर. एम. नेरलीकर यांच्या न्यायालयातील कामकाज पाहिले. यावेळी आर. एम. कराडे, आर. एन. मरक, डी. एस. पिसाळ, एस. के. खान, व्ही. आर. कुलकर्णी सर्व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व कनिष्ठ स्तर आदींची उपस्थिती होती.

द जिल्हा परिषदेची इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात न्यायालयाची अनुभूती देणारी ठरली पहिलीच शाळा असे मत सर्व न्यायाधीश व कर्मचारी यांनी व्यक्त केले.



लासूर स्टेशन : भिसेवाडीच्या विद्यार्थ्यांनी वैजापूर न्यायालयाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली.

याप्रसंगी प्रियांशु जाधव या विद्यार्थिनीला न्यायाधीश यांनी बाजूच्या खुर्चीवर बसवून माहिती दिली.

तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले. विद्यार्थ्यांना न्यायालय अधीक्षक विवेक सरोसिया, सहाय्यक अधीक्षक शेख उस्मान, वरिष्ठ लिपिक संजय वाढवे आदींनी विद्यार्थ्यांना केळी, बिस्कीट, चॉकलेटचे वाटप केले.

Aurangabad, District-Today
16/01/2024 Page No. 4

epaper.saamana.com | समाजीनगर, रविवार, ३० ऑगस्ट २०२० | वर्ष : तिसरे अंक : १२४ | पृष्ठे ८+४ | मूल्य : ४.०० रुपये | ★★★ शहर आवृत्ती
संस्थापक संपादक : बाळ ठाकरे
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना



काँग्रेसला सक्रिय कोणी करायचे?
२३ ज्येष्ठांचे पत्रलेखन
रोखठोक उत्सव

वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वाटप | वेध वैजापूरने केले होते आयोजन

वैजापूर, दि. २९ (सा.वा.) - वेध वैजापूर या गुणवत्ता मंचच्यामार्फत कोरोना काळात घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रा. रमेश बोरनारे होते. तर पंचायत समिती सभापती सिना मिसाळ, गटविकास अधिकारी मोकाटे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब जगताप, साबेर खान, पंकज ठोंबरे, दीपक राजपूत, गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

वक्तृत्व स्पर्धेसाठी तालुक्यातील ३५ शाळांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी प्रथम क्रमांक भिसेवाडी शाळेचा विद्यार्थी शुभम भाडाईत याने पटकावला. द्वितीय, तृतीय तसेच उत्तेजनार्थ क्रमांक अनुक्रमे आकांक्षा सामृत प्रा.शा.निमगाव, मोहित सोनवणे स्वामी समर्थनगर परिषद शाळा, सोनाली रहाणे प्रा.शा.चांडगाव या विद्यार्थ्यांनी पटकावला. विजेत्या विद्यार्थ्यांना आमदार प्रा. रमेश बोरनारे यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धा वेध वैजापूरने आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेसाठी सर्व विजेत्या स्पर्धकांना तसेच सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र साने गुरुजी जि.प. कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., यांच्या वतीने देण्यात आली.

वेध वैजापूरचे संचालक त्र्यंबकेश्वर मोईन यांनी प्रास्ताविक केले. तसेच आभार साने गुरुजी पतसंस्थेचे चेअरमन श्याम राजपूत यांनी मानले. सूत्रसंचालन अनिल शहाणे यांनी केले.

वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षकांसह दिनेश संख, सुयोग बोऱ्हाडे, पुरुषोत्तम दोडे, मनोहर लवडे, नंदू जाधव, शिवाजी डुकरे, जगदीश कोठावदे, भारत दांडगे, सतीश जाधव, गंगाराम घुमरे यांच्यासह शिक्षकांनी परिश्रम घेतले.



दिव्य मराठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा 17-01-2024

अनुभव • न्यायालयात विद्यार्थ्यांचे स्वागत, विविध प्रश्न विचारून शंकांचे केले निरसन

भिसेवाडी जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले न्यायालयाचे कामकाज

प्रतिनिधी | बोरदहेगाव

जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या निमंत्रणातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी केंद्र लासूरगाव यांनी न्यायालय व न्यायालयीन कामकाज जाणून घेण्यासाठी सोमवारी भेट दिली. मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश वैजापूर यांनी १७ ऑक्टोबरला भिसेवाडी शाळेस भेट दिली होती. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी शाळेचे विविध उपक्रम व शाळेबद्दल माहिती न्यायाधीश यांना सांगितले होते. या चर्चेदरम्यान इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनि साहेबांना न्यायालय व न्यायालयीन कामकाज बघायला मिळेल का, असा प्रश्न केला होता. या वेळेस न्यायाधीश यांनी विद्यार्थ्यांस सांगितले होते की नक्कीच आम्ही तुम्हाला न्यायालय व न्यायालयीन कामकाज लवकरच दाखवु. त्या अनुषंगाने वैजापूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर, यांच्यासह बाळासाहेब म्हस्के, मनीष दिवेकर शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी येथील वर्ग पहिली ते पाचवीच्या चाळीस विद्यार्थ्यांना सोबत केंद्रप्रमुख बी. जे. गायकवाड, मुख्याध्यापक फेरोज शेख, सहशिक्षक विजय मिट्टेवाड सर्व वैजापूर येथील न्यायालयात पोहोचले. यावेळेस सर्व जिल्हा न्यायाधीश तथा दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर कनिष्ठ स्तर व न्यायालय अधीक्षक व सहाय्यक अधीक्षक, लिपिक यांनी मोठ्या उत्साहाने विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यानंतर सर्व न्यायाधीशांसमोर व सर्व वकील यांच्यासमोर शाळेबद्दल व विद्यार्थ्यांबद्दल स्वतः विद्यार्थ्यांनी माहिती सांगितली. त्यानंतर जिल्हा न्यायाधीश . मोहम्मद मोहियोद्दीन यांनी त्यांच्यासोबत असलेले जिल्हा न्यायाधीश पी. पी. मुळे, एस. के. उपाध्याय यांच्यासोबत तीन कोर्टामध्ये विद्यार्थ्यांना विभागून न्यायालयीन कामकाज कसे चालते हे दाखवले. त्यांच्यासोबत असलेले दिवाणी न्यायाधीश व सहदिवाणी न्यायाधीश आर. एम. नेरलीकर, आर. एम. कराडे, आर. एन. मर्के, डी. एस. पिसाळ, एस. के. खान, व्ही. आर. कुलकर्णी यांच्यासमवेत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला.



वैजापूर न्यायलयास भिसेवाडी जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांना न्यायाधीशांनी मार्गदर्शन केले.

शिक्षक पुरस्कार सोहळ्यात आ. काळेंची शाब्दिक फटकेबाजी

◤अनेक मुद्द्यांचा घेतला समाचार

◤१२ शिक्षकांना आदर्श पुरस्कार प्रदान

छत्रपती संभाजीनगर : शिक्षक पुरस्कार सोहळ्यात आमदार विक्रम काळे यांनी प्रशासनाच्या उणीवांवर बोट ठेवत चौफेर फटकेबाजी केली. जिल्हा परिषद प्रशासनाचा कारभार, शिक्षक संघटनांचे राजकारण यासह आमदार प्रशांत बंब यांची शिक्षकांप्रती असलेली नकारात्मक भूमिका या सर्वच मुद्द्यांचा आ. काळे यांनी समाचार घेतल्याने सर्वच शिक्षक खुश दिसले.

शिक्षक दिनानिमित्त दरवर्षी ५ सप्टेंबर आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ घेण्यात येतो. मात्र, यंदा दीड महिना उशीराने शनिवारी संत एकनाथ रंगमंदिरात हा सोहळा घेण्यात आला. त्याचीही ना निमंत्रण पत्रिका छापली ना, कुणाला अधिकृत निरोप दिले. या सोहळ्याच्या व्यासपीठावर शिक्षक आ. विक्रम काळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, उपसंचालक अनिल साबळे, शिक्षणाधिकारी मधुकर देशमुख, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण आदींची उपस्थिती होती.



आ. काळे म्हणाले, बहुतेक शिक्षक, शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी आपल्या कामांसाठी शिक्षण विभागात चकरा मारतात. त्यांची कामे वेळेवर होत नसल्याने त्यांना शाळा सोडून यावे लागते, प्रशासनाने आपोआप आणि वेळेत कामे केली तर त्यांना शाळा सोडून इकडे चकरा माराव्या लागणारच नाहीत. त्यादृष्टीने शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी नियोजन करण्याची सूचना काळे यांनी केली. आ. विक्रम काळेंनी यावेळी आ. प्रशांत बंब यांनी शिक्षकांना मुख्यालयी राहतात का? असे प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा आपल्या मतदारसंघात रस्ते कसे आहे याकडे लक्ष द्यावे. तसेच शिक्षकांना मुख्यालयी त्यांनी वन बीएचके घर बांधून द्यावे, शिक्षकांनी तेथे राहण्याची हमी मी घेतो असे जाहीर आव्हान आ. बंब यांना आ. काळेंनी दिले.



पुरस्कारप्राप्त शिक्षकांसमवेत आ. विक्रम काळे, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, अनिल साबळे आदी.

जिल्ह्यात पाच मंत्री, कुणालाही निमंत्रण नाही

पालकमंत्र्यांची वेळ घेण्यासाठी शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्यांनी हा सोहळा लांबविल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यातील मंत्री, आमदारांना शेवटपर्यंत निमंत्रण देण्यात आले नव्हते. खुद्द आमदार काळेंना कार्यक्रमाच्या एक दिवस अगोदर तेही रात्री ९० वाजता फोनद्वारे निमंत्रण देण्यात आले. मी स्वस्तातला आमदार आहे. मला निमंत्रनाची गरज नाही. चांगल्या कामासाठी मी हजर असतो, असे म्हणत जिल्ह्यातील अन्य लोकप्रतिनिधी, मंत्र्यांना या सोहळ्यात न बोलविल्याबद्दल आ. काळे यांनी नाराजी व्यक्त केली.

या शिक्षकांना मिळाला पुरस्कार

समारंभात गीता गवळी, गणेश आहेवाड, फेरोज शहानूर शेख, बुद्धीवंत पाष्टे, महेशकुमार पवार, मनिषा पाटील, संदीप घुगे, अशोक पवार, शाह पाशू इसाक शाह, प्रेमसिंग राठोड, मो. उस्मान नजमोद्दीन बागवान, सचिन भोरे या शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कोणत्याही शाळा अकारण बंद होणार नाही-शिक्षणाधिकारी देशमुख

माध्यमिकचे शिक्षणाधिकारी मधुकर देशमुख यांनी नवसाक्षर भारत अभियानावर शिक्षकांनी टाकलेला बहिष्कार चुकीचा असल्याचे सांगत निरक्षरांना शिकविणे हे अशैक्षणिक काम कसे असू शकते अशी थेट विचारणा सोहळ्यात केली. समूह शाळा आणि शाळा दत्तक योजना या दोन्ही गोष्टी चांगल्या हेतूने आणण्यात आलेल्या आहेत, कोणत्याही शाळा अकारण बंद होणार नाहीत तसेच जिल्हा परिषदेच्या शाळा कुणाला दत्तक म्हणजे आंदन दिल्या जाणार नाहीत. तर त्यासाठी संस्थांचे केवळ आर्थिक योगदान घेतले जाणार आहे, त्यामुळे उगाच या गोष्टींचा बाऊ करु नये, अशी कान उघडणीही शिक्षणाधिकारी देशमुख यांनी केली.

सकाळ

जिल्ह्यातील १२ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार

उपक्रमाला विरोध करण्याआधी अभ्यास करा : काळे

▸ सकाळ वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर, ता.२१ : जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत शिक्षकांचा जिल्हा शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी (ता.२१) उस्मानपुरा येथील संत एकनाथ रंगमंदिरात पार पडला. प्रसंगी व्यासपीठावर शिक्षक आमदार विक्रम काळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, शिक्षण उपसंचालक अनिल साबळे, शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख (माध्यमिक), जयश्री चव्हाण (प्राथमिक), अरुणा भूमकर (योजना) आदींची उपस्थिती होती.

यावेळी श्री. काळे म्हणाले, की शिक्षकांनी कुठल्याही कामाला विरोध करण्याअगोदर त्याचा अभ्यास करायला हवा. शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी आहे. मात्र, जिल्हा परिषदेने शिक्षकांच्या पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लावावा. तसेच वेळेवर वेतन करायला हवे. एम. के. देशमुख यांनी शिक्षकांच्या मनातील समूह शाळा, शाळा दत्तक योजनेबद्दल असलेले गैरसमज दूर केले. उपसंचालक अनिल साबळे यांनी, मराठी शाळांना खरा धोका इंग्रजी शाळांचा आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या सूचना दिल्या. यावेळी प्राथमिक नऊ, माध्यमिक व विशेषच्या प्रत्येकी एका शिक्षकाला शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच निपूण भारत उपक्रमात उत्कृष्ट ठरलेल्या २७ शाळांना गौरविण्यात आले.

पुरस्कार विजेते शिक्षक

- गीता गवळी, गणेश आहेवाड, फेरोज शेख, बुद्धिवंत पाष्टे, महेश पवार, मनीषा पाटील, संदीप घुगे, अशोक पवार, पाशु शहा, प्रेमसिंग राठोड, उस्मान बागवान (माध्यमिक), सचिन भोरे

'निपूण'अंतर्गत उत्कृष्ट जिल्हा परिषद शाळा

- पैठण : वरवंडी तांडा, गेवराई बुद्रूक, करंजखेड
- खुलताबाद : कनकशीळ, रेणूकानगर
- वैजापूर : लांडे वस्ती, भिसेवाडी, निमगाव
- सोयगाव : माळेगाव, पळाशी, मूर्ती
- फुलंब्री : रांजणगाव, जळगाव मेटे, पिंपळगाव वळण
- छत्रपती संभाजीनगर : सिंदोन, धोनखेडा, गाडीवाट
- गंगापूर : शरीफपूर, बोरगाव, धानोरा
- सिल्लोड : पिंपरी, केऱ्हाळा, अंधारी
- कन्नड : गोकुळवाडी, आमदाबाद, नागद

Aurangabad, Aurangabad-Today
22/10/2023 Page No. 4

सकाळ



जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत शिक्षकांचा जिल्हा शिक्षक पुरस्काराने गौरव करण्यात आला.

बंब यांचा समाचार, शिक्षकांचेही टोचले कान!

आमदार काळेंच्या फटकबाजीने सभागृहात हास्यकल्लोळ

छत्रपती संभाजीनगर, ता.२१ : जिल्हा परिषद प्रशासनाचा कारभार, शिक्षक संघटनांचे राजकारण यासह आमदार प्रशांत बंब यांची शिक्षकांप्रती असलेली नकारात्मक भूमिका या सर्वच मुद्द्यांचा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी समाचार घेतला. काळेंच्या चौफेर फटकेबाजीने सभागृहातील प्रत्येक शिक्षक मात्र खूश दिसला. छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी (ता. २१) पार पडला.

आमदार काळे यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच हा पुरस्कार वितरण सोहळा उशीराने होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. विविध मागण्या, समस्या संदर्भात शिक्षकांची गर्दी नेहमी शिक्षण विभागात असते हा धागा पकडत त्यांनी अधिकाऱ्यांना शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी नियोजन करण्याचे सूचविले. जे शिक्षक कार्यालयात येतील त्याची नोंद ठेवा, असा सल्लाही दिला. आमदार बंब यांनी आपल्या मतदार संघात लक्ष केंद्रित करून जनतेचे प्रश्न सोडवावेत. तसेच आमदार बंब ज्या मुद्यावर शिक्षकांना टार्गेट करतात, त्या विषयांची चर्चा होऊ नये, यासाठी शिक्षकांनी कोणती काळजी घ्यावी याच्या टिप्ससुद्धा आमदार काळेंनी शिक्षकांना दिल्या.

मी स्वस्तातला आमदार निमंत्रणाची गरज नाही!

पुरस्कार पालकमंत्र्यांच्या हस्ते देण्यात यावा, यासाठी शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने हा सोहळा लांबविला होता. पालकमंत्री यांची वेळ घेऊन सोहळ्याचे नियोजन करण्यात आले. मात्र, जिल्ह्यातील मंत्री, आमदारांना शेवटपर्यंत निमंत्रण देण्यात आले नव्हते. खुद्द आमदार काळेंना कार्यक्रमाच्या एक दिवस अगोदर तेही रात्री १० वाजता फोनद्वारे निमंत्रण देण्यात आले होते. हीच बाब हेरून त्यांनी प्रशासनाचे कान टोचले. मी स्वस्तातला आमदार आहे. मला निमंत्रणाची गरज नाही. हा तर शिक्षकांचा सन्मानाचा कार्यक्रम होता, मग मी कसा टाळेल, असे म्हणत जिल्ह्यातील अन्य लोकप्रतिनिधी, मंत्र्यांना या सोहळ्यात न बोलविल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

Aurangabad, Aurangabad-Today
22/10/2023 Page No. 4

देशोन्नती

भिसेवाडी जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतला न्यायालयीन कामकाजाचा अनुभव

लासुर स्टेशन : जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या निमंत्रणातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी केंद्र लासुरगाव यांनी न्यायालय व न्यायालयीन कामकाज जाणून घेण्यासाठी भेट दिली. जिल्हा व सत्र न्यायाधीश वैजापूर यांनी दि. १७ ऑक्टोबर २०२३ रोजी भिसेवाडी शाळेस भेट दिली होती. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी शाळेचे विविध उपक्रम व शाळेबद्दल माहिती न्यायाधीश यांना सांगितले होते या चर्चेदरम्यान इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांने साहेबांना न्यायालय व न्यायालयीन कामकाज बघायला मिळेल का हा प्रश्न केला होता.



यावेळेस न्यायाधीश यांनी विद्यार्थ्यास सांगितले होते की नक्कीच आम्ही तुम्हाला न्यायालय व न्यायालयीन कामकाज लवकरच दाखवु त्या अनुषंगाने हेमंत उशीर गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वैजापूर, बाळासाहेब म्हस्के, मनीष दिवेकर जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती वैजापूर यांच्या मार्गदर्शनाखाली आज पहिली ते पाचवीच्या चाळीस विद्यार्थ्यांना घेऊन केंद्रप्रमुख बी. जे. गायकवाड, मुख्याध्यापक फेरोज शेख, सहशिक्षक विजय मिट्टेवाड न्यायालयात पोहोचले. यावेळेस सर्व जिल्हा न्यायाधीश तथा दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर कनिष्ठ स्तर व न्यायालय अधीक्षक व सहाय्यक अधीक्षक, लिपिक यांनी मोठ्या उत्साहाने विद्यार्थ्यांचे स्वागत केले. सकाळी सर्व विद्यार्थ्यांना केळी बिस्किट व चॉकलेटचे वाटप करण्यात आले. न्यायालयात भिसेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांना बघून न्यायालयात आलेली सर्व जनता, पोलीस कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी आश्चर्यचकित झाले. यानंतर सर्व न्यायाधीशांसमोर व सर्व वकील यांच्यासमोर शाळेबद्दल व विद्यार्थ्यांबद्दल स्वतः विद्यार्थ्यांनी माहिती सांगितली.

त्यानंतर जिल्हा न्यायाधीश मोहम्मद मोहियोद्दिन यांनी त्यांच्यासोबत असलेले जिल्हा न्यायाधीश पी. पी. मुळे, एस. के. उपाध्याय, यांच्यासोबत तीन कोर्टामध्ये विद्यार्थ्यांना विभागून न्यायालयीन कामकाज कसे चालते हे त्यांच्यासोबत असले दिवाणी न्यायाधीश व सह दिवाणी न्यायाधीश आर. एम. नेरलीक आर. एम. कराडे, आर. एन. मर्के, डी. एस. पिसाळ, ए के. खान, व्ही. आर. कुलकर्णी यांच्या समवेत विद्यार्थ्यांना प्रत्य अनुभव देण्यात आला. तिन्ही कोर्टात विविध विषयांवरती व वकील युक्तिवाद करतात, न्यायाधीश कशाप्रकारे ऑर्डर देता लिपिक कसे टायपिंग करतात व काही साक्ष व्हिडिओ कॉन्फरन्सद्व कशी घेतल्या जाते या सर्वांचा अनुभव एकत्रित तिन्ही कोर्टाम विद्यार्थ्यांना न्यायालय अधीक्षक विवेक सरोसिया, सहाय्य अधीक्षक शेख उस्मान व संजय वाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्य अनुभव देण्यात आला. यामध्ये काही विषय विद्यार्थ्यांनी बघित जसे पती-पत्नीचे वाद, जमिनीवरील वाद, गाड्यांचे प्रकरण, वा उपसा प्रकरण, पोलीस अधिकारी यांची साक्ष, कागदपत्र तपासणे आवाज पुकारणे असे विविध विषय विद्यार्थ्यांना कळाले. त्यानं सर्व विद्यार्थ्यांना न्यायाधीश यांच्यातर्फे हॉलमध्ये पोह्यांचा आस्व देण्यात आला. शाळेच्यावतीने व पंचायत समिती शिक्ष विभागाच्यावतीने सर्व न्यायाधीशांचे व अधीक्षक, लिपिक व स कर्मचारी वृंद यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

Aurangabad Edition
Jan 19, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com

epaper.marathwadasathi.com
18 Jan 2024 - Page 5



■ वैजापूर येथील न्यायालय परिसरात एकत्र आलेले भिसेवाडी येथील विद्यार्थी.

भिसेवाडीची शाळा भरली न्यायालयात; विद्यार्थ्यांनी जाणून घेतले न्यायालयातील काम

मराठवाडा साथी न्यूज

लासूर स्टेशन : जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या निमंत्रणातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी केंद्र लासुरगाव येथील विद्यार्थ्यांनी वैजापूर येथे न्यायालय व न्यायालयीन कामकाज जाणून घेण्यासाठी बुधवारी भेट दिली.

गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर, बाळासाहेब म्हस्के, शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता १ ते ५ चाळीस विद्यार्थ्यांना घेऊन केंद्रप्रमुख बी.जे गायकवाड ,मुख्याध्यापक फेरोज शेख ,सहशिक्षक विजय मिट्टेवाड न्यायालयात पोहोचले. यावेळेस सर्व जिल्हा न्यायाधीश तथा दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर कनिष्ठ स्तर व न्यायालय अधीक्षक व सहाय्यक अधीक्षक, लिपिक यांनी मोठ्या उत्साहाने विद्यार्थ्यांचे स्वागत केले. सकाळी सर्व विद्यार्थ्यांना केळी बिस्किट व चॉकलेटचे वाटप करण्यात आले. न्यायालयात भिसेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांना बघून न्यायालयात आलेली सर्व जनता,पोलीस कर्मचारी,न्यायालयीन कर्मचारी आश्चर्यचकित झाले.यानंतर सर्व न्यायाधीशांसमोर व सर्व वकील यांच्यासमोर शाळेबद्दल व विद्यार्थ्यांबद्दल स्वतः विद्यार्थ्यांनी माहिती सांगितली. त्यानंतर जिल्हा न्यायाधीश मा.मोहम्मद मोहियोद्दिन यांनी त्यांच्यासोबत असलेले जिल्हा न्यायाधीश मा.पी.पी मुळे ,मा.श्रीमती एस.के उपाध्याय, यांच्यासोबत तीन कोर्टामध्ये विद्यार्थ्यांना विभागून न्यायालयीन कामकाज कसे चालते हे त्यांच्यासोबत असलेले दिवाणी न्यायाधीश व सह दिवाणी न्यायाधीश आर.एम नेरलीकर, आर.एम कराडे, श्रीमती आर.एन. मर्के, डी.एस पिसाळ श्रीमती एस.के. खान श्रीमती व्ही.आर कुलकर्णी यांच्या समवेत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला.

तिन्ही कोर्टात विविध विषयांवरती कसे वकील युक्तिवाद करतात न्यायाधीश कशाप्रकारे ऑर्डर देतात लिपिक कसे टायपिंग करतात व काही साक्ष व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे कशी घेतल्या जाते या सर्वांचा अनुभव एकत्रित तिन्ही कोर्टामध्ये विद्यार्थ्यांना न्यायालय अधीक्षक विवेक सरोसिया,सहाय्यक अधीक्षक शेख उस्मान व संजय वाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. यामध्ये काही विषय विद्यार्थ्यांनी बघितले जसे पती-पत्नीचे वाद, जमिनीवरील वाद, गाड्यांचे प्रकरण,वाळू उपसा प्रकरण,पोलीस अधिकारी यांची साक्ष,कागदपत्र तपासणी,आवाज पुकारणे असे विविध विषय विद्यार्थ्यांना न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी माहिती दिली.

न्यायाधिशांनी केले विद्यार्थ्यांचे कौतूक

■ सर्व विद्यार्थ्यांचे न्यायाधीशांनी तोंड भरून कौतुक केले. यावेळी न्यायाधीशांकडून शाळेला भारताची न्यायालये हे पुस्तक भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांची शिस्त, विद्यार्थ्यांची प्रश्न विचारण्याची पद्धत,आत्मविश्वास पाहून काही न्यायाधीशांनी त्यांच्या मुलांसोबत भिसेवाडी शाळेला आम्ही लवकरच भेट देऊ असे आश्वासन सर्व विद्यार्थ्यांना दिले.

लोकमत



भिसेवाडी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी बनविलेल्या शॉर्टफिल्मला राज्यातून द्वितीय पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार स्वीकारताना शाळेतील शिक्षक.

भिसेवाडी जि.प. शाळेच्या शॉर्टफिल्मला द्वितीय पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

लासूर स्टेशन : नुकतेच राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत रांगोळी, भित्तीपत्रक, निबंध व शॉर्टफिल्म स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात राज्यभरातून स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धांचे निकाल लागले असून, यात वैजापूर तालुक्यातील भिसेवाडी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांच्या 'चला करू मतदान' या शॉर्टफिल्मला व्हिडिओ गटातून राज्यातून द्वितीय पुरस्कार मिळाला.

स्पर्धेत व्हिडिओ गटात सहभागी राज्यभरातून एकमेव जिल्हा परिषद शाळा ही भिसेवाडी येथील होती. येथील विद्यार्थी व शिक्षकांनी ही शॉर्टफिल्म बनविली होती. पुरस्कार विजेत्यांना औरंगाबादेतील एमजीएमच्या रुक्मिणी सभागृहात आयोजित कार्यक्रमात गौरविण्यात आले. भिसेवाडी शाळेचे शिक्षक मच्छिंद्र बडोगे, शेख फेरोज शहानूर यांच्यासह विद्यार्थ्यांचा विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, पोलीस आयुक्त निखील गुप्ता, कमांडर ब्रि. उपिन्दर सिंग आनंद, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, नवेली देशमुख, उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर आदी मान्यवरांनी सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम बक्षीस देऊन सत्कार केला. कोविडसंदर्भात नियमांचे पालन करून हा कार्यक्रम घेण्यात आला. शाळेला मिळालेल्या पुरस्कारामुळे जिल्हाभरातून त्यांचे कौतुक होत आहे.

Hello Aurangabad Gramin
Page No. 4 Feb 03, 2021
Powered by: erelego.com

पुढारी

संक्षिप्त



मानवासाठी खगोल अभ्यास नवा नसला, तरीही अवकाशाविषयीचे रहस्य आणि आकर्षण आजही कायम आहे. खगोल अभ्यासातून विज्ञानाच्या सगळ्या शाखांतील उपयोजित पायाभूत प्रयोगांचा मानवी जीवनातल्या अनेक समस्यांची उकल करण्यास मदत झाली आहे. प्राचीनकाळापासून भारतीय खगोलीय अभ्यासक समाजाला वैज्ञानिक दिशा देण्याचे काम करतात याच परंपरांची मांडणी आणि खगोल अंतराळातील प्रगत संशोधनाचा अविष्कार जागतिक स्तरावरील संशोधन मोहीमेतून मिळत असलेल्या नवीन अद्ययावत माहितीचा पेटारा खगोल अभ्यासकांच्या अकराव्या राज्यस्तरीय संमेलनामध्ये खुला झाला. औरंगाबाद येथे (१९९७) २६ वर्षांनंतर खगोल अभ्यासकांचे संमेलन झाले. या संमेलनामध्ये १५० खगोल अभ्यासकांनी सहभाग घेतला आणि अनेक विषयांवर सखोल चर्चा केली.

पुण्यातील 'आयुका'चे माजी संचालक आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ अजित केंभावी यांनी कृष्णविवराविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये कृष्णविवराचा गुरूत्वीय लेन्सिंगद्वारे घेतला जात असलेला शोध, आइनस्टाइनच्या सिद्धांतानुसार अदृश्य असलेल्या कृष्णविवराचे अस्तित्व दाखवणाऱ्या प्रतिमा कशा केल्या घेतल्या जातात, याविषयी सविस्तर विवेचन केले. अवकाशातील ८५ टक्के वस्तुमान आपल्याला दिसतच नाही. त्याविषयी अनेक गूढ असून, कृष्णविवराच्या महाप्रचंड गुरुत्वीय बलामुळे प्रकाश किरणेही बाहेर पडत नाही. त्यामुळे, त्याविषयी फारशी माहिती मिळत नाही. मात्र, अलिकडच्या दोन वर्षांत शोधलेल्या नव्या संशोधनाचे विश्लेषण केंभावी यांनी त्यांच्या संमेलनाच्या बीजभाषणात केले.

'आयुका'च्या प्रसार-प्रचार कार्यक्रमाचे प्रमुख समीर धुरडे यांनी आंतरराष्ट्रीय खगोल अंतराळ संशोधन प्रकल्पातील भारताच्या सहभागाचा आढावा घेतला. पुण्याच्या अनुप्रिता मोरे यांनी यांनी अंतराळात फिरणारे आणि भूपृष्ठीय स्थिर उपग्रहावरून तसेच दुर्बिणींच्या साह्याने पृथ्वीवर येत असलेल्या कोट्यवधी प्रतिमांच्या माहितीचे वर्गीकरण, त्यातील उमजत असलेल्या खगोलीय तत्त्वांचा उलगडा करण्यासाठी 'सिटीजन्स सायंन्टिस्ट' या फोरमवरून जगभरातील हजारो हौशी खगोल अभ्यासकांच्या चाललेल्या कामाची माहिती देऊन महाराष्ट्रातून या वैज्ञानिक चळवळीला गती देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

चंद्रपूर 'स्काय वॉच ग्रुप'चे अध्यक्ष सुरेश चोपणे यांचे पुरातत्वीय खगोल या विषयाची मांडणी केली. कोट्यावधी वर्षांपूर्वीच्या पृथ्वीवर घडलेल्या खगोलीय आघाताचे पुरावे सादर केले; यात डायनासोरच्या विनाशासह त्यापूर्वीच्या कोट्यवधी वर्षांतील खुणांचे सत्य उलगडून दाखविले.

जागतिक तापमानाच्या विश्वव्यापी चर्चेच्या पार्श्वभूमीवर पृथ्वी लघु हिमयुगाच्या उंबरठ्यावर आहे, याविषयी एपीजे अब्दुल कलाम खगोल अंतराळ केंद्राचे संचालक श्रीनिवास औंधकर यांनी मांडणी केली. 'सावली'चे खगोलशास्त्रज्ञ ज्येष्ठ अभ्यासक हेमंत मोने यांनी प्रात्यक्षिके दाखवल. रेडिओ लहरीच्या माध्यमातून खगोलीय वेध हा विषय सुधीर फाकटकर यांनी मांडला, तर रेडिओ खगोलशास्त्रावर विलास नरवडे यांचे व्याख्यान झाले. दा. कृ. सोमण यांनी दिनदर्शिकेतील खगोलशास्त्र या विषयावर मांडणी केली. नाशिकच्या शिशिर देशमुख यांनी पिधान या खगोलीय घटनांचा वेध घेतला. खगोलशास्त्रातील आगामी आव्हाने व संधी या विषयावर वरिष्ठ वैज्ञानिक अरविंद रानडे यांनी माहिती केली.

दोन कृष्णविवरे एकमेकांच्या भोवती फिरत असताना अंतराळात प्रक्षेपित होत असलेल्या गुरूत्वीय तरंग लहरींची प्रतिमा असलेला संमेलनाचा लोगो,महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा निसर्गरम्य सुंदर परिसर, खगोलशास्त्राच्या सर्वांग छटांचे दर्शन घडवणारी व्याख्याने आणि झालेल्या चर्चेतून या संमेलनाचे वेगळेपण अधोरेखित झाले.

खगोल अभ्यासक मंडळाची स्थापना

महाराष्ट्र राज्यस्तरीय खगोल अभ्यासक मंडळ स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या संमेलनात घेण्यात आला. श्रीनिवास औंधकर (औरंगाबाद), दा. कृ. सोमण (ठाणे), हेमंत मोने (कल्याण), भरत अडूर (मुंबई), सुरेश चोपणे (चंद्रपूर), सुधीर फाकटकर (खोडद), सचिन मालेगावकर (नासिक), समीर धुरडे (पुणे) हे या मंडळाचे काम बघणार आहेत. या अभ्यासमंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनसामान्यांपर्यंत खगोलशास्त्र अंतराळ संशोधन विज्ञानाचा प्रकाशाची किरणे पोचतील, अशी योजना आखण्यात आली आहे.

आकाशदर्शनाचा आनंद

गांधेली परिसरामध्ये आकाशदर्शन झाले. यामध्ये रात्री दहा ते पहाटे साडेपाच वाजेपर्यंत खगोल शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आकाशदर्शन घेतले. यामध्ये पहाटे २.४५ वाजता प्रथम शनी ग्रह व त्याच्या कडा, त्याचे उपग्रह; पाठोपाठ ३.४५ वाजता गुरू व त्याचे चंद्र, मंगळ व चार वाजण्याच्या सुमारास बुध व शुक्र ग्रह दुर्बिणीच्या माद्यमातून दाखवण्यात आले. या वेळी टेलिस्कोप व वेगवेगळ्या उपकरणांच्या माध्यमातून बघितले. भरत आडूर खगोल अभ्यासक वयाच्या ७१व्या वर्षात पूर्ण रात्रभर दुर्बिणीसमोर बसून होते. धुमकेतू व त्याच्या रेडिओ लहरी, फोटो सेन्सर या आधुनिक उपकरणांची माहिती संमेलनाचा खरा आनंद देणारे झाले.

जल्ह्यात सर्वत्र महाराष्ट्र दिन व कामगार दिन विविध उपक्रमांनी साजरा









लासुर स्टेशन ■ सावंगी गृप ग्रामपंचायत लासुर नच्यावतीने ग्रामपंचायत सदस्या शमीना शफिक री यांच्या हस्ते ध्वजारोहण करून महाराष्ट्र दिन ारी (दि.१) रोजी साजरा करण्यात आला. ी सरपंच मीनाताई पांडव, उपसरपंच संपत ड, देविदास डेपले, नारायण ठोळे, गणेश ारे, भगवान गाडे, कल्याण पवार, अशोक गर, संजय पांडव, अमोल शिरसाट, राजू ख्वाड, सोपान बोरकर, जयदेव जाधव, मयूर वाल, ग्रामविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, ी व आदी कर्मचारी उपस्थित होते.

बाजारसावंगी ■ खुलताबाद तालुक्यातील मौजे ा येथे रविवारी (दि.१) रोजी महाराष्ट्र निमित्त जि.प.प्रा.शाळा लोणी येथे शालेय ्यापण समितीचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान य जावेद बाबा पटेल यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी शालेय समिती अध्यक्ष खलील पटेल, सरपंच तबस्सूम पटेल, ग्रामसेवक प्रशांत वाघमारे, तलाठी सोलंकी, सो.अध्यक्ष बाळकृष्ण दांडेकर, माजी केंद्र प्रमुख बाबुराव दांडेकर, मुख्याध्यापक वाघमारे, बाबू पटेल, अल्ताफ पटेल व सर्व शिक्षक वृंद, अंगणवाडी सेविका तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

लासुर स्टेशन ■ महाराष्ट्र दिन व कामगार दिन यानिमित्ताने रविवारी (दि.१) रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिसेवाडी केंद्र. लासुरगावच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नेटके व इंजिनियर नरेंद्र तांबट उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत सुंदर स्वागत गीताने झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त भाषणे व गीत म्हंटली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे प्रगती पत्रक प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. त्यानंतर नेटके मैय्या यांनी आपले मनोगत व्यक्त केले यातून विद्यार्थ्यांना व पालकांना व गावकऱ्यांना खूप चांगले विचार ऐकायला मिळाले. नेटके यांनी मिसे वाडीची शाळा पाहून आनंद व्यक्त केला. नेटके यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला मिठाई व सुंदर विचार कार्ड वाटप केले.

बाजारसावंगी ■ खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे एक मे महाराष्ट्र दिनानिमित्त ग्रामपंचायत, दुरक्षेत्र पोलीस चौकी, जिल्हा परिषद प्रशाला व केंद्रीय प्राथमिक शाळा व महाविद्यालय तथा अन्य स्थानिक संस्था शासकीय कार्यालयेमधे ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयाचे ध्वजारोहण सरपंच अप्पाराव नलावडे यांच्या हस्ते करण्यात आले. दुरक्षेत्र पोलीस चौकीचे ध्वजारोहण मुख्य जमादार कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेत ध्वजारोहण नंतर एक मे महाराष्ट्र दिनानिमित्त विविध उपक्रमा संदर्भात विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वाटप करण्यात आले. तर नवीन दुमजली शाळा व शिक्षक आ.विक्रम काळे यांच्या निधीतून शाळेला १० हजार रुपयेचे ग्रंथालय साठी पुस्तके कादंबरी व शाळेने विविध उपक्रम राबविल्याने जिल्हास्तरी नावलौकिक व शाळेची प्रगती आदीची माहिती शाळेकडून मुख्याध्यापक यांनी यावेळी दिली. यावेळी सरपंच अप्पाराव नलावडे, माजी सरपंच भिमराव नलावडे, चांदखान पठाण, उपसरपंच कारभारी नलावडे, सदस्य पोपट काटकर, शासअ संतोष नलावडे, विलास सोनवणे, इरफान शेख, श्रीधर पाटील रामेश्वर नलावडे विनोद नलावडे किशोर नलावडे, तलाठी मनिषा कदम, ग्रामविकास अधिकारी एबी बनसोड, फौ.विष्णु नलावडे, मिकन घुले, राजु नलावडे,विश्वंभर नलावडे आदी उपस्थित होते.

Aurangabad Edition
May 3, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

आप पढ़ रहे हैं देश का सबसे विश्वसनीय और नंबर 1 अखबार

दैनिक भास्कर
SUNDAY

bhaskarhindi.com | औरंगाबाद | 6 सितंबर 2020

उल्लेखनीय कार्य करने वाले शिक्षकों का सम्मान



▪ वैजापुर में मनाया शिक्षक दिवस

संवाददाता | वैजापुर

5 सितंबर को डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन इनका जन्मदिन है। इस दिन को शिक्षक दिवस के रूप में मनाया जाता है। इसके उपलक्ष्य में विधायक रमेश पाटील बोरनाने के संपर्क कार्यालय में शिक्षक दिवस मनाया गया। शैक्षणिक राष्ट्रीय सामाजिक कार्य और कोविड जैसी महामारी में उल्लेखनीय कार्य करनेवाले शिक्षकों का महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक संगठन की ओर से विधायक बोरनारे ने शिक्षकों को राज्यस्तरीय आदर्श सम्मान पत्र देकर सम्मानित किया। इस समय बोरणारे ने सभी को शिक्षक दिवस की शुभकामनाएं दी। इस समय उपजिला प्रमुख बाबासाहब जगताप, मनाजि मिसाल, शिक्षाधिकारी मनीष दिवेकर और सभी शिक्षक सेना मौजूद थे।

डिजिटल शैक्षणिक दैनिक स्यतेचा वाली (संपर्क – ९९७५७३८३२१) ~ वर्ष १ - अंक ००८ ~ मंगळवार २२/०९/२०२० पान ०४

सोन्याच्या व्यापाऱ्याने हेरले शिक्षण क्षेत्रातील 'हीरे'

'पारस ज्वेलर्स अँड सराफ' शोरुममध्ये आदर्श शिक्षकांचा सत्कार

औरंगाबाद : दि.२१ (रयतेचा वाली, ऑनलाइन वृत्तसेवा) लासुर स्टेशन येथील प्रसिद्ध सोन्याचे व्यापारी पारस ज्वेलर्स अँड सराफ चे मालक राजेंद्रजी मुथा साहेब यांचा एक सामाजिक उपक्रम अंतर्गत लासुर स्टेशन ग्रामीण भागातील राज्यस्तरीय व जिल्हा स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा शोरुम मध्ये सत्कार करण्यात आला.

शब्दगंध प्रकाशन'तर्फे महात्मा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सरकारी डिजिटल शाळा उंदिरवाडी येथील दिव्यांग शिक्षक, उपक्रमशील शिक्षक श्री अंगद गोविंदराव लोणे यांना जाहीर झाला. आदर्श शिक्षक समितीतर्फे लासूरगाव केंद्रातील सोनवणे मॅडम व फिरोज शेख सर यांनाही पुरस्कार जाहीर झाला.



तसेच लासुर स्टेशन येथील शशिकांत सांगवीकर सर यांनाही आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला. याचं औचित्य साधून राजेंद्रजी मुथा साहेब यांनी खालील पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे कौतुक करण्याचं धाडस दाखवलं आहे.

सौ. अश्विनी संतोष जाधव, लासुरगाव मा.श्री . अंगद लोणे सर, लासुर स्टेशन मा.श्री . शशिकांत सांगविकर सर, लासुर स्टेशन मा.श्री. शेख फ़िरोज सर, लासुर स्टेशन ह्या सत्कार प्रसंगी लासुर स्टेशन येथील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे प्रशांत जी दाभाडे आणि संदीप जोशी सर व महेंद्र देशमुख सर हेही आवर्जून उपस्थित होते.

"शिक्षक लोक सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कायम सेवा करतात. आम्ही फक्त सोन्याला आकार आणि उजाळा देतो. पण शिक्षक मात्र अंधाऱ्या खोलीतसुद्धा तेजोमय प्रकाश देणारा ज्ञानरुपी दिवा पेटवतात, तेही निस्वार्थी भावनेने. म्हणूनच आम्ही सामाजिक भान ठेऊन त्यांचा सत्कार करण्याचा मानस साध्य केला."

श्री राजेंद्रजी मुथा
पारस ज्वेलर अँड सराफा, लासूर स्टेशन वैजापूर

भिसेवाडीत एकही 'पॉझिटीव्ह' नाही

» वर्षभरापासून पथनाट्याव्दारे ग्रामस्थात जनजागृती » शिक्षकाच्या प्रयत्नाला यश





गुलाब वाघ, मराठवाडा साथी न्यूज

लासूर स्टेशन । येथून जवळच असणाऱ्या भिसेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे सहशिक्षक फेरोज शेख यांनी लासुरगाव - भिसेवाडी येथे कोरोना पासून गावचे संरक्षण करण्यासाठी भिसेवाडी गावात वेगळ्या पद्धतीने जनजागृती करुन गाव कोरोना संसर्गापासून दूर ठेवल्याने एक कौतूकाचा विषय झाला आहे.

जिल्ह्यात कोरोनाने थैमान घातले आहे. दुसऱ्या लाटेत ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कोरोनाचा संसर्ग वाढल्याने हजारो रुग्ण विविध रुग्णालयात उपचार घेत आहेत.यामुळे प्रशासनही हैराण आहेत. पहिल्या लाटेनंतर दुसरी लाट येऊ शकते यामुळे शिक्षक फेरोज शेख यांनी भिसेवाडी गावात लाऊडस्पीकर दुचाकीला बांधून संपूर्ण गावात कोरोना नियमांबाबत जनजागृती केली. मास्क लावणे, नियमीत हात धूणे, आणि सामाजिक अंतर ठेवून बोलावे याची ग्रामस्थांना पटवून दिले. ग्रामस्थांनी सुध्दा याला प्रतिसाद देत नियमांचे काटेकोरपणे पालन केल्याने गावातील ग्रामस्थांनी कोरोना हरविले आहे.

नागरिकांनी आपली जबाबदारी ओळखावी

◆ जिल्ह्यात कोरोनाचा संसर्ग वाढत आहे. प्रशासन यासाठी झटून काम करत आहे. यामुळे जवाबदार नागरिक आपले कर्तव्य ओळखून कोरोना नियमांचे पालन केल्यास कोरोनाचा संसर्ग रोखू शकतो. भिसेवाडी ग्रामस्थाप्रमाणे जर नियम पाळले तर गाव,राज्य देश नक्कीच सुरक्षित राहील.

फेरोज शेख , सहशिक्षक,भिसेवाडी

जैन संघटनेतर्फे विना मास्क फिरणार्या २०० जणांना गुलाबपुष्प व मास्क वाटप



वैजापुर(प्रतिनिधी): भारतीय जैन संघटना , वैजापुर तर्फे आज दिनांक ३०:०६:२०२० मंगळवार रोजी कोरोना सारख्या भयानक परिस्थितीने हाहाकार माजवला असताना सुद्धा व मोठ्या संख्येने कोरोना संक्रमित रूग्ण वैजापुर शहर व तालुक्यात सापडत असतांना विना मास्क रोडवर फीरणा-या जवळपास २०० लोकांना गुलाबपुष्प व मोफत मास्क देऊन सत्कार करत आपुलकी व आपलेपनाने समज देण्यात आली. कारण हा रोग इतका विचित्र आहे की जवळपासचे तर काय पण घर परिवारातले लोक पण इच्छा असूनही भेटायला कींवा काळजी घ्यायला येउ शकत नाही. आणि म्हणूनच फेरोज शेख यांनी कोरोना प्रतिकृती चे रूप धारण करून सर्वांना फीजिकल डिस्टंन्सींग , मास्क चा वापर , विनाकारण न फिरणे याबाबत माहिती देत जनजागृती केली. यावेळी भारतीय जैन संघटनेचे मराठवाडा विभाग सचिव निलेश पारख , नंदलाल मुगदिया , प्रफुल संचेती , संतोष बोथरा , प्रविण कोतकर , नगरसेवक गणेश खैरे , रूपेश कुचेरीया , ऋषभ पारख , नगरपालिकेचे मिलिंद साळवे , वाल्मिक वाणी आदी उपस्थित होते. यासाठी मा.नगराध्यक्ष दिनेशसिंग परदेशी , रवींद्रकुमार संचेती , हेमंतकुमार संचेती , प्रकाशचंद बोथरा , न.प. मुख्याधिकारी विठ्ठल डाके साहेब यांचे मार्गदर्शन लाभले.



वैजापूर : विनामास्क फिरणाऱ्या दुचाकीस्वाराचे पुष्प देऊन स्वागत करताना.

दैनिक
प्रतिवीर
सोलापूर/कोल्हापूर/मुंबई/दापोली/औरंगाबाद/नांदेड/सांगली/सातारा/नाशिक आर.एन.आय.रजिस्ट्रेशन क्र. ४४८४५/२०१०

भिसेवाडी येथे जि .प .प्रा .शाळेचे शिक्षक फिरोज शेख यांनी केली थर्मल गणने तपासणी



सलीम शहा

गंगापुर : तुम्ही बाहेर जाल तर मी आत येईल असा पोशाख परिधान करुन केली तपासनी . महाराष्ट्र शासन , सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई यांचे दिनांक 13 मार्च 2020 च्या अधिसुचनेनुसार कोरोना विषाणुमुळे (उडश्कळ्र - 19) उदभवणान्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपातकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात सायरोग अधिनियम 1897 खंड 2 .3 व 4 ची अनस्वजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासुन सुरु करण्यात आलेली आहे . त्या नुसार मा .तहसीलदार साहेब यांच्या आदेशान्वये वैजापुर तालुक्यातील लासुरगाव ग्रामपंचायत अंतर्गत भिसेवाडी गावाचा सर्व्हे करण्यात आला .या वेळेस प्राथमीक शिक्षक शेख फेरोज यांनी कोरोना प्रतिकृती चे रूप धारण करून सर्वांना फीजिकल डिस्टंन्सींग , मास्क चा वापर , विनाकारण न फिरणे , हात स्वच्छ धुणे आणि हा रोग इतका विचित्र आहे की जवळपासचे तर काय पण घर परिवारातले लोक पण इच्छा असूनही भेटायला कींवा काळजी घ्यायला येउ शकत नाही .त्यामुळे घाबरू नका पण काळजी घ्या असा संदेश देऊन कोरोना बाबत माहिती देत जनजागृती केली .या वेळेस आरोग्य सेविका श्रीमती .सुनीता दौड, श्रीमती .एस .एन . श्रीरसागर आशा स्वयंसेवीका श्रीमती .संगीता देशमुख व श्रीमती .उषा वाघुडे यांनी प्रत्येक कुटुंबाची घरोघरी जाऊन ऑक्सीमीटर व थर्मल गन ने तपासणी केली . यासाठी नोडल अधिकारी म्हणून बोरसर प्राथमीक आरोग्य केंद्राचे डॉ .विलास डुकरे यांचे मार्गदर्शन लाभले .

भिसेवाडी जि.प. शाळेची शैक्षणिक सहल

लासूर स्टेशन : भिसेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेची सहल नुकतीच निघाली. विद्यार्थ्यांना विमान दाखवण्यासाठी संभाजीनगरच्या एअरपोर्टवर नेण्यात आले. एअरपोर्ट वरील कार्य पद्धती व इतर माहिती एअरपोर्ट सुरक्षा अधिकारी पवन व सय्यद फिरोज यांनी विद्यार्थ्यांना दिली. विमान विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहिल्यावर त्यांचा आनंद गगनात मावेनासा होता. त्यानंतर प्रोझोन मॉल, सिद्धार्थ गार्डनही पाहिले. यावेळी मुख्याध्यापक फेरोज शेख व शिक्षक विजय मिट्टेवाड, जयश्री तांबट, सोनाली जगताप, कल्पना भिसे, शीतल साबळे, आफ्रिन शेख , शहानवाझ शेख, साई हुमे आदी उपस्थित होते.

देशोन्नती

भिसेवाडीच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे स्वप्न केले पूर्ण

जिल्हा परिषदेतील चिमुकल्यांनी केली विमानतळाची सफर

देशोन्नती वृत्तसंकलन...

लासुर स्टेशन : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी येथे शिक्षक वर्गात शिकवत असतांना शाळेच्या वरतून विमान गेले की मुलं म्हणायचे सर विमान चालले आह दाखवाना आणि ते विमान खूप छोट दिसायचं म्हणून सरांनी सांगितले की, तुम्हाला समक्ष डोळ्यांनी विमानतळावरच विमान दाखवतो. येथे स्वप्नांना सत्याचा आज खरच स्पर्श केला आहे. ६८ किमी वरून रविवारची सुट्टी असून देखील विद्यार्थ्यांना आगळे वेगळे ज्ञान देण्यासाठी व भविष्यात मुलांना जगाशी



जोडण्यासाठी मुलं औरंगाबाद विमानतळावर पोहचले.

विमान प्रवास, विमानतळ हे ग्रामीण भागात फक्त ऐकाला मिळते. कित्येक पिढ्या जातात तरी सुद्धा हे पाहणे ,जाणे कठीण आहे. विमान, विमानतळ विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना कुतूहलाचा विषय आहे. बस स्टँड, रेल्वे स्टेशन हे कॉमन आहे. पण विमानतळ म्हंटले तर फक्त मंत्री, व्यावसायिक, श्रीमंत लोकांचा विचार होतो. परंतु इथे ग्रामीण भागातील गरिबांची मुलं, जिल्हा परिषदेची मुलं विमानतळावर गेली. विमान बघितले, टेक ऑफ व लँडिंग आणि पासपोर्ट, परमवीर चक्र विजेते, एअरपोर्ट वरील कार्य पध्दती व इतर खूप माहिती विमानतळ सुरक्षा अधिकारी पवन व सय्यद फिरोज यांच्याकडून विद्यार्थ्यांना रविवारी मिळाली. आहे. विमान आपल्या डोळ्यांनी समक्ष विद्यार्थ्यांनी बघितले तेंव्हा त्यांचा आनंद गगनात मावेनासा होता. संपूर्ण प्रोझोन मॉल बघितला, सिद्धार्थ गार्डन बघितले.

पालक बैठकीत विनंतीवरून जि.प.प्राथमिक शाळा भिसेवाडीचे मुख्याध्यापक फेरोज शेख व शिक्षक विजय मिट्टेवाड यांनी विद्यार्थ्यांना सर्व ठिकाण पाहण्याची खूप मोठी संधी पालकांच्या उपस्थितीत दिली. त्याबद्दल त्यांचे व सोबत पालक जयश्री तांबट, सोनाली जगताप, कल्पना मिसे, शीतल साबळे, आफ्रिन शेख, शहानवाझ शेख, साई हुमे सर्वांचे गावकरी व संपुर्ण पालकांच्या वतीने आभार व्यक्त केले.

Aurangabad Edition
Dec 27, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

लोकमत

पाहिल. तेव्हा त्यांना छताच्या पख्याला माऊ असा पारवार आहे.



आकाशदर्शनाचा आनंद घेताना लासूरगाव प्रशालेचा विद्यार्थी.

लासूरगाव येथे आकाशदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

लासूरगाव : येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शुक्रवारी रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान दुर्बिणीद्वारे आकाश दर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

मुख्याध्यापक प्रदीप विसपुते यांच्या उपस्थितीत खगोल अभ्यासक शिक्षक मच्छिंद्र बडोगे व फेरोज शेख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. खगोल विश्वाबाबतीत लॅपटॉपच्या व लेझर टॉर्चच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रथम ग्रहगोल गॅलिलिओ टेलिस्कोप दुर्बिणीद्वारे चंद्र, शनी ग्रह व त्याच्या कडा मुलांना टप्प्याटप्प्याने दाखवून शेवटी गुरू ग्रह दाखविण्यात आला. पौर्णिमेनंतरचा तिसऱ्या दिवसांचा १२० अंशांतील चंद्र, त्याच्यावरती दिसणारा मंगळ, डोक्यावरती असलेल्या गुरू व त्याचे चंद्र, पश्चिमेकडे झुकलेला शनी, या स्थिती येण्यासाठी अनेक दिवस वाट बघावी लागते, असे खगोल अभ्यासक मच्छिंद्र बडोगे यांनी सांगितले.

Hello Aurangabad Gramin
Page No. 3 Dec 12, 2022
Powered by: erelego.com

सकाळ



लासुर स्टेशन : येथे फेरोज शेख यांनी सूर्यग्रहणासह इतर माहिती दिली.

आकाश निरीक्षण अंतर्गत सूर्यग्रहण निरीक्षण

लासूर स्टेशन, ता.२५ (बातमीदार): लासूर स्टेशन येथे खगोल अभ्यासक सहशिक्षक फिरोज शेख व सहशिक्षक मच्छिंद्र बडोगे यांनी आकाश निरीक्षण उपक्रम अंतर्गत खंडग्रास सूर्यग्रहण निरीक्षण आयोजित केले होते.

यावेळी दुपारी चार वाजून पन्नास मिनिटांनी सुरू झालेले सूर्यग्रहण पाच वाजून बेचाळीस मिनिटांनी संपन्न झाले. तर सूर्यास्त पूर्वी काही क्षण हे अधिक स्पष्ट दिसून आले. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी व नागरिक यांना पिनहोल केमेरा प्रोजेक्टर, सनव्हिविंग गॉगल तसेच डेमो व व्हिडिओ चित्रफितीच्या माध्यमातून ग्रहणामागील विज्ञानाची माहिती देण्यात आली. याप्रसंगी भास्कर बनसोडे, प्रशांत दाभाडे, डॉ.गणेश जगताप यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

Aurangabad, District-Today
26/10/2022 Page No. 4

पुढारी



विद्यार्थ्यांनी घेतली चंद्रग्रहणाची माहिती

लासूर स्टेशन : चंद्रग्रहणाच्या निमित्ताने परिसरातील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने समृद्धी महामार्ग लासुर स्टेशन या ठिकाणी चंद्रग्रहण अनुभवण्यासाठी आले होते; परंतु ढगाळ वातावरणामुळे चंद्रग्रहण मात्र बघायला मिळाले नाही. तरीही शिक्षकांनी निराश न होता विद्यार्थ्यांसाठी गुरु ग्रह व त्याचे चार चंद्र, शनी ग्रह व त्याच्या कडा आज दुर्बीणच्या साह्याने विद्यार्थ्यांना दाखवल्या. बच्चे कंपनी अत्यंत उत्साही व आनंदी होती. याप्रसंगी प्रशाला लासुरगाव, भिशेवाडी व लासुर स्टेशन परिसरातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने एकत्र आले होते. भिसेवाडी प्राथमिक शाळेचे शिक्षक फेरोज शेख, लासुरगाव प्रशालेचे शिक्षक मच्छिंद्र बडोगे, सेवानिवृत्त शिक्षक भास्कर बनसोडे, लासूरगाव प्रशालेचे शिक्षक महेंद्र देशमुख, जळगाव प्राथमिक शाळेचे शिक्षक संदीप जोशी, गंगापूरचे प्रशांत दाभाडे यांच्यासह परिसरातील खगोलप्रेमी शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

Aurangabad Gramin Edition
Nov 10, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

देशोन्नती

गुलाबी थंडीत विद्यार्थी व शिक्षकांनी घेतला उल्कावर्षाव पाहण्याचा आनंद

देशोन्नती वृत्तसंकलन...

लासुर स्टेशन : विद्यार्थी व शिक्षकांनी गुलाबी थंडीत घेतला उल्कावर्षाव पाहण्याचा शुक्रवार (दि.१८) पहाटे तीन वाजता सिंह राशीतून मघा नक्षत्रातून लिओनीड उल्का वर्षाव निरिक्षण करण्याची संधी खगोल प्रेमींना मिळाली आहे. ही माहिती खगोल प्रेमी शेख फेरोज (सहशिक्षक जि.प्रा.शाळा भिसेवाडी) यांनी दिली आहे. पहाटे तीन पासून लासुर स्टेशन मधून विद्यार्थी वरद भिसे (वर्ग ५ वी), शिक्षक प्रवीण



बनगे न्यू हायस्कूल लासुर स्टेशन, व कुंडलिक भिसे (सहशिक्षक जि.प.प्रा.शा.हडस पिंपळगाव) उल्का वर्षाव पाहण्यासाठी समृद्धी महामार्ग लासुर शहराच्या बाहेर जाऊन पाठीवर झोपून निरीक्षण केले. पृथ्वी सूर्याभोवती दर सेकंदाला ३० किलोमीटर या वेगानं भ्रमण करत असताना ज्यावेळी या धुमकेतूच्या मार्गात येते, त्यावेळी धुमकेतूच्या मार्गात असलेले धूलीकण पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणामुळे खेचले जातात. हे धूलिकण जेव्हा पृथ्वी सभोवतालच्या वातावरणात शिरतात तेव्हा वातावरणातील रॅम दाबामुळे जळून जातात. त्यामुळे उल्कांची प्रकाशित रेषा आपणास दिसते.

Aurangabad Edition
Nov 19, 2022 Page No. 3

पुढारी



लासूरस्टेशन : खगोलप्रेमी फेरोज शेख यांनी नागरिकांना टेलिस्कोपद्वारे सुपर मून पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली. टेलिस्कोपमधून सुपर मून पाहताना एका ज्येष्ठ नागरिकाचे टिपलेले छायाचित्र.

उ

अजिं

व आ
मंगळ
कारव
ठाण्य

पोलि
ठाणे
शेतात
मिळा
मनीष
विष्णू
धाड
रुपयां
लांडग

Aurangabad Gr
Page No. 01 Feb 01, 201
Powered by: erelego.co

शिक्षकांना मिळालेले आजपर्यंतचे पुरस्कार

- **छत्रपती संभाजीनगर जिल्हा शिक्षक पुरस्कार सन 2023-24** जिल्हा शिक्षक पुरस्कार व सन 2023-24 साठी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या वतीने वैजापूर तालुक्यातून जिल्हा परिषद भिसेवाडी शाळेला निपुण व उपक्रमशील शाळा पुरस्कार मिळाला. यावेळी मा.शिक्षक आमदार विक्रम काळे, मा.मुख्यकार्यकारी अधिकारी विकास मीना, मा.शिक्षण उपसंचालक अनिल साबळे, मा.शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती.जयश्री चव्हाण, माध्यमिक शिक्षणाधिकारी मा.मधुकर देशमुख, शिक्षणाधिकारी निरंतर श्रीमती.भूमकर मॅडम, मा.उपशिक्षणाधिकारी श्रीमती.संगीता सावळे, सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व शि.वि.अधिकारी यांच्या उपस्थित सन्मानीत करण्यात आले.

- दि.25.01.2021 राष्ट्रीय मतदार दिवस जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर आयोजित शॉर्ट फिल्म स्पर्धेत **"चला करू मतदान"** विद्यार्थ्यांच्या शॉर्ट फिल्मला राज्यातून द्वितीय क्रमांक मिळाल्याबद्दल **(सन्मानपत्र व रोख रक्कम ₹.10.000/-)** रु MGM कॅम्पस रुख्मिणी सभागृह येथे मा.सुनील केंद्रेकर विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, **मा.सुनील चव्हाण जिल्हाधिकारी** छत्रपती संभाजीनगर,मा.निखिल गुप्ता पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर, कमांडर ब्रि.उपिंन्दर सिंग, नवेली देशमुख युथ आयकॉन, मा.अंजली धानोरकर उपजिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर या सर्वांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.




- **98.3 Red FM…** मेहनत केली कि त्याचं फळ हे मिळतंच, आपण हे ऐकलं आहे आणि बघतही आलो आहोत आणि हे मेहनतीचं फळ एका शिक्षकाला मिळालं आहे शेख फेरोज जे आहेत लासूर स्टेशन मधील भिसेवाडी इथले ज्यांनी जनजागृती करून गावात एकही पॉसिटीव्ह नाही अशी स्थिती निर्माण केली. आणि आपल्या जिल्ह्यात काय स्थिती आहे कोविड च्या केसेस कुठे कुठे शून्य आहेत हे जाणून घ्या आज मॉर्निंग नंबर वन मध्ये ZP CEO Dr गोंदावले सर यांच्याकडून.

- महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिति राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२०

- कै.अंबादासभाऊ व्यवहारे प्रतिष्ठान लासुर स्टेशन क्रांतीरत्न पुरस्कार २०२०

- दि.07/01/2021 ग्रा.प.सार्वत्रिक निवडणूक 2021 मध्ये मतदारांना 100% मतदान करण्यासाठी प्रवृत्त केल्याबद्दल मा.माणिक आहेर उपविभागीय अधिकारी वैजापूर, मा.राहुल गायकवाड तहसीलदार वैजापूर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव.

- मराठा सेवा संघ छत्रपती संभाजीनगर पुरस्कार २०२१

- संकल्पपूर्ति फाउंडेशन लासुर स्टेशन शिवश्री युवा प्रेरणा पुरस्कार २०२२

- विज्ञान प्रसार (भारत सरकार) नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 11 वे राज्यस्तरीय खगोल अभ्यासकांचे संमेलनामधे उत्कृष्ट आकाश दर्शन व् सहभाग नोंदवल्याबद्दल डॉक्टर अरविंद रानडे वरिष्ठ वैज्ञानिक विज्ञान प्रसार (भारत सरकार) नवी दिल्ली यांच्या हस्ते सन्मान.

❖ शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून मुलांना दर्जेदार शिक्षण देत आहे त्या प्रित्यार्थ ग्रुप - ग्राम पंचायत लासुरगावच्या वतीने श्रीमती.वैशालीताई पाटील जि.प.सदस्या छत्रपती संभाजीनगर व मा.मनाजी पाटील मिसाळ सभापती प.स.वैजापूर, यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

❖ वेध वैजापूर चॅम्पियन सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा अंमलबजावणी व प्रक्रियेत योगदान दिल्याबद्दल मा.रमेश पाटील बोरणारे आमदार गंगापूर - वैजापूर विधानसभा, मा.अविनाश पाटील गलांडे शिक्षण व आरोग्य सभापती जि.प. छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

❖ लासुरगाव ग्रामपंचायतच्या वतीने सन्मान

जिल्हा परिषद भिसेवाडी शाळेला निपुण भारत अंतर्गत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते पुरस्कार मिळाला. तसेच मला यावर्षी जिल्हा शिक्षक पुरस्कार 2023-24 मिळाल्याबद्दल आमच्या दोघांचा मा.सरपंच,मा.उपसरपंच,मा.ग्रामविकास अधिकारी, सर्व सन्मानीय सदस्य व गावकरी यांच्या उपस्थितीत सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.आमच्या कार्यभूमीत आमचा दुसरा मोठा सन्मान हा आमच्या साठी अविस्मरणीय क्षण होता.




❖ **शिवना भूषण पुरस्कार 2023**

❖ **स्वराज्य बहुउद्देशिय सेवा भावी संस्था लासुरगाव पुरस्कार 2023**

शाळेला व विद्यार्थ्यांना मिळालेले आजपर्यंतचे पुरस्कार

❖ **महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांनी जिल्हा परिषद भिसेवाडी शाळेच्या लघुपटाची घेतली दखल.**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी केंद्र.लासूरगाव तालुका वैजापूर शाळेच्या विद्यार्थी,पालक व शिक्षकांच्या चांगला स्पर्श व वाईट स्पर्श हा लघुपट राज्यभर शाळा, महाविद्यालय, हॉस्पिटल, घरामध्ये दाखवण्यात आला त्याबद्दल कौतुक केले व सर्व उपस्थितांना सभागृहामध्ये हा लघुपट दाखवण्यात आला.या लघुपटात कार्य करणारे सर्व विद्यार्थी, शाळेचे शिक्षक यांना बोलावून त्यांचा जिल्हाधिकारी कार्यालय येथे सन्मान करण्यात आला.यावेळी अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा नांगरे, सहायक आयुक्त सुभाष भुजंग, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण सुवर्णा जाधव, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रेश्मा चिमणरे,उपजिल्हाधिकारी सुचिता शिंदे,प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण व माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यावेळी उपस्थित होते. संपूर्ण राज्यभर भिसेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षक व विद्यार्थ्यांचा चांगला स्पर्श व वाईट स्पर्श हा लघुपट महिला आयोगाच्या माध्यमातून दाखवण्यात येणार आहे असे महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी सांगितले आहे.या यशाचे गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर,शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर,बाळासाहेब म्हस्के,पंचायत समिती शिक्षण विभाग वैजापूर,लासूरगाव केंद्राचे केंद्रप्रमुख हनुमंत कोळसे, केंद्रीय मुख्याध्यापक संतोष जाधव तसेच केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक,भिसेवाडी,लासुरगाव गावकरी तसेच सर्व पालकांनी अभिनंदन केले आहे.




❖ **राजस्थानचे महामहिम राज्यपाल श्री.हरिभाऊ बागडे नाना व मा.अंबादासजी दानवेसाहेब विरोधी पक्षनेते विधानपरिषद मुंबई यांच्या समोर संधी...**

महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थीत मा.विकास मीना मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या संकल्पनेतून जिल्हास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीच्या विद्यार्थ्यांनी सादर केले देशभक्तीपर नृत्य.हा कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाट्यगृह येथे होता.यावेळी मा.अनिल साबळे साहेब,विभागीय शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर,श्रीमती.जयश्री चव्हाण मॅडम शिक्षणाधिकारी प्राथमिक,सर्व तालुक्यांचे गटशिक्षणाधिकारी तसेच विद्यार्थी,पालक शिक्षक उपस्थित होते.

❖ **26 जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे विकास मीना CEO यांनी दिली देशभक्तीपर नृत्य सादर करण्याची जिल्हा परिषद भिसेवाडीच्या विद्यार्थ्यांना मोठीसंधी.**

मा.विकास मीना मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ येथे जिल्हास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीच्या विद्यार्थ्यांचे नृत्य बघितले होते व ते नृत्य त्यांना खूप आवडले देखील होते त्यामुळे तेच नृत्य 26 जानेवारीला जिल्हा परिषदेच्या प्रांगणात ध्वजारोहणाच्या नंतर सादर करण्यास मा.जयश्री चव्हाण शिक्षणाधिकारी प्रा.यांना सांगितले होते.हे देशभक्तीपर नृत्य तेरे मिट्टी मे मिल जावा आमच्या विद्यार्थ्यांनी खूप सुंदर रित्या सर्वांसमोर सादर केले.यावेळी मा.राघवेंद्र घोरपडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी,प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, उपशिक्षणाधिकारी सावळे, सोफी साहेब,संगीता साळवे व जिल्हा परिषदेतील सर्व विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी खूप मोठी संधी एकमेव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीच्या विद्यार्थ्यांना मिळाली होती.याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक फेरोज शेख, विजय मिट्टेवाड,अर्जुन जाधव व पालक यांचे मा.गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर पंचायत समिती वैजापूर,मनीष दिवेकर,बाळासाहेब म्हस्के शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती वैजापूर व केंद्रप्रमुख बी.एच.कोळसे तसेच केंद्रीय मुख्याध्यापक संतोष जाधव व लासुरगाव केंद्रातील सर्वच मुख्याध्यापक शिक्षक,पालक,गावकरी यांनी अभिनंदनचा वर्षाव केला आहे.

- जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभाग नवोपक्रमशील आणि गुणवत्तापूर्ण शाळा म्हणून जिल्हा परिषद भिसेवाडी शाळेची निवड करून 5 सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त सन 2024-25 साठी आमचा सन्मान मा.विकास मीना साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी,श्रीमती.जयश्री चव्हाण शिक्षणाधिकारी (प्रा.),मा.हेमंत उशीर गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वैजापूर, यांच्या सर्वांच्या हस्ते आमचा सन्मान करण्यात आला.

- जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभाग सन 2023-24 साठी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या वतीने वैजापूर तालुक्यातून जिल्हा परिषद भिसेवाडी शाळेला निपुण व उपक्रमशील शाळा पुरस्कार मिळाला. यावेळी मा.शिक्षक आमदार विक्रम काळे ,मा.मुख्यकार्यकारी अधिकारी विकास मीना,मा.शिक्षण उपसंचालक अनिल साबळे, मा.शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती.जयश्री चव्हाण,माध्यमिक शिक्षणाधिकारी मा.मधुकर देशमुख, शिक्षणाधिकारी निरंतर श्रीमती.भूमकर मॅडम, मा.उपशिक्षणाधिकारी श्रीमती.संगीता सावळे, सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व शि.वि.अधिकारी यांच्या उपस्थित सन्मानीत करण्यात आले.

- सन 2020 कोरोना शाळा बंद काळात शुभम प्रशांत भाडाइत राज्य स्तरावर वकृत्व स्पर्धेत सर्वात जास्त 5241 लाईकस मिळवून यश मिळवले.

- दि.१४.०४.२०२२ बालवक्ता वरद भिसेचा मा.श्री.डॉक्टर निलेश गटणे साहेब मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात सन्मान.

- शिवोत्सव "शिवजागर" निमित्ताने आयोजित खुली वक्तृत्व स्पर्धा 2022 वर्ष पहिले यामध्ये वरद कुंडलिक भिसे (वर्ग 4 थी) माझ्या विद्यार्थ्यांने मा.अंजली धानोरकर उपजिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर, मा.श्री.अंबादास दानवे दादा विधान परिषद आमदार, मा.श्री.एस.डी.बनसोडे उपमुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा

परिषद छत्रपती संभाजीनगर याच्या हस्ते उत्तेजनार्थ रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन सन्मान.

- **वेध वैजापूर वक्तृत्व स्पर्धेत** भिसेवाडी शाळेला प्रथम क्रमांक पटकावल्या बद्दल मा.रमेश पाटील बोरणारे आमदार गंगापूर - वैजापूर, मा.मनाजी पाटील मिसाळ सभापती प.स.वैजापूर, मा.गटशिक्षणाधिकारी प.स.वैजापूर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

- **स्वातंत्र्य दिन वकृत्व स्पर्धेत** अंजली भाडाइत जिल्हास्तरावर शहरी ग्रामीण मधून प्रथम क्रमांक,तालुका स्तरावर प्रथम क्रमांक.

- **स्वदेश जिल्हा परिषद शाळेतील माजी विद्यार्थ्यांचे स्नेह मिलन कार्यक्रमध्ये संधी** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना साहेब यांच्या संकल्पनेतून स्वदेश जिल्हा परिषद शाळेतील माजी विद्यार्थ्यांचे स्नेह मिलन कार्यक्रम झाले. यामध्ये वैजापूर तालुक्यातून यशस्वी जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी म्हणून माझी शिक्षण मंत्री कमल किशोर कदम व नानासाहेब पोपट निगळ या दोन यशस्वी व्यक्तींची माहिती सांगण्याची संधी मिळाली होती. या संधीचे सोने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीच्या कु.श्रावणी संतोष साखळे हिने सर्वांसमोर केले. यावेळी पालकमंत्री मा.नामदार अब्दुल सत्तार साहेब, जिल्हाधिकारी मा.दिलीप स्वामी साहेब, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर,मा.प्राथमिक शिक्षणाधिकारी, कुलसचिव डॉ.भगवान साखळे, प्रशांत गावंडे, निवृत्त उपजिल्हाधिकारी नामदेव जाधव, श्री.भालेराव, प्रगतिशील शेतकरी यज्ञजीत कातबने, शिक्षण उपसंचालक अनिल साबळे यांच्या मातोश्री सुभद्राबाई साबळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष लता पगारे, निवृत्त शिक्षणाधिकारी भगवानराव तुपे,संचालक उत्तमराव झाल्टे, डॉ.पळशीकर,माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर मोठे, भरत राजपूत, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे, कृष्णा पाटील डोणगावकर, डॉ.काळे आदी




उपस्थित होते. व यामध्ये संपूर्ण जिल्ह्यातून माजी मंत्री, आयएस, आयपीएस, आमदार, खासदार अशा विविध क्षेत्रात ज्यांनी जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन यशस्वी झाले आहेत अश्या व्यक्तींनी देखील आपले मनोगत त्याठिकाणी व्यक्त केले.कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती संभाजीनगर येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यगृहात करण्यात आले होते.

❖ गीताबन कला महोत्सव 2024 प्रथम व द्वितीय क्रमांक

मा.आमदार प्रशांतजी बंब यांच्या वाढदिवसानिमित्त सौ.मीनाताई संजय पांडव सरपंच तथा आयोजक, लासुर स्टेशन यांनी गीताबन कला महोत्सव 2024 आयोजित केले होते.यामध्ये प्राथमिक,उच्च माध्यमिक व विद्यालय स्तरावरील सर्व माध्यमाच्या ग्रामीण भागातील शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.या स्पर्धेत सामूहिक नृत्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडीला प्रथम_क्रमांक मिळाला असून ₹.4500/- रु रोख रक्कम, सन्मानपत्र व ट्रॉफी मिळाली. या सामूहिक नृत्यामध्ये प्रियांशु जाधव, ज्ञानेश्वरी जाधव,गार्गी तांबट, राधेश्याम खर्डे, प्रणित नवले,आदित्य भाडाईत, श्रावणी साखळे, भार्गवी भिसे, गौरी भिसे होते व वैयक्तिक नृत्यामध्ये कु.गार्गी नरेंद्र तांबटला द्वितीय क्रमांक मिळाला असून रोख रक्कम ₹.2223/- रु हिने पटकावले आहे. हा सन्मान लासुर स्टेशनच्या प्रथम नागरिक सौ.मीनाताई संजय पांडव, गणेश व्यवहारे, प्रकाश कोकरे ,रवी चव्हाण, कल्पेश गायकवाड, संदीप गायकवाड यांच्या हस्ते सन्मानपत्र ट्रॉफी व रोख रक्कम अदा करण्यात आली.





❖ **मा.डॉ.अरविंद लोखंडे अप्पर जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते भिसेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांचा व निर्मिती करणाऱ्या शिक्षकांचा वैजापूर येथे सन्मान.**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी भिसेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन छोटासा व्हिडिओ देण्यात आला होता. या व्हिडिओतील विद्यार्थ्यांचा व निर्मिती करणाऱ्या शिक्षकांचा मा.डॉ.अरविंद लोखंडे अप्पर जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते आणि उपजिल्हाधिकारी वैजापूर,तहसीलदार वैजापूर, गटशिक्षणाधिकारी वैजापूर यांच्या उपस्थितीत भिसेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांचा वैजापूर येथे सर्व मतदान अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला आहे.सदरील व्हिडिओ छत्रपती संभाजीनगर 19 - औरंगाबाद लोकसभा मतदारसंघ निवडणुक मतदार जनजागृतीसाठी तसेच मतदान अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणामध्ये अधिकृतरित्या प्रत्येक प्रशिक्षणात दाखवण्यात आली आहे. तसेच या अगोदर देखील संपूर्ण जिल्ह्यात व इतरत्र मतदार जनजागृतीसाठी हा व्हिडिओ गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती वैजापूर यांच्या मार्फत समाज माध्यमांवर प्रसारित करण्यात आला होता. या व्हिडिओत सर्व क्षेत्रातील मतदार यांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा म्हणून शाळेच्या तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या पद्धतीने घोषवाक्यांची सुंदर अशी मांडणी करून त्याचे सादरीकरण केले आहे.

❖ **गंगापूर तालुक्यात भिसेवाडीच्या विद्यार्थ्याचा पहिला क्रमांक...**

शिवतेज विद्यालय व संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालय रांजणगाव (शे.पुं) ता.गंगापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवनिमित्त वक्तृत्व स्पर्धेत वरद कुंडलिक भिसे इयत्ता 5 वी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी केंद्र.लासुरगाव ता.वैजापूर याने (प्राथमिक गट वर्ग 4 थी ते 7 वी) गटात शिवरायांचे आठवावे रूप शिवरायांचा आठवावा प्रताप या विषयावर वक्तृत्व स्पर्धेत पहिला क्रमांक पटकावला. यामध्ये सर्व खाजगी इंग्रजी व मराठी माध्यमाच्या शाळा



सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेत एकूण 37 स्पर्धक सहभागी झाले होते. या यशाबद्दल वैजापूर तालुक्याचे मा.उशीर साहेब गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वैजापूर , मा.मनीष दिवेकर साहेब ,मा.म्हस्के साहेब शिक्षण विस्तार अधिकारी वैजापूर व बी.जे.गायकवाड केंद्रप्रमुख लासुरगाव यांनी वरदचे अभिनंदन केले आहे.

❖ **मध्ये वरद भिसेने मिळवले ३०० पैकी २५८ गुण**

(M.G.K.E) 2023 या परीक्षेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिसेवाडी केंद्र.लासुरगाव ता.वैजापूर शाळेचा विद्यार्थी वरद कुंडलिक भिसे (इयत्ता ५ वी) याने (८६%) गुण घेऊन उज्वल असे यश संपादन केले असून तो नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या राज्यस्तरीय गुणवत्ता यादी मध्ये राज्यातून बाविसावा क्रमांक, जिल्ह्यातून तृतीय क्रमांकव तालुक्यातून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.

❖ **स्कॉलरशीप परीक्षेमध्ये तालुक्यात द्वितीय क्रमांक.**

❖ **सैनिकी शाळा छत्रपती संभाजीनगर परीक्षेत ३०० पैकी २४२ गुण.**

सामाजिक कार्य व राष्ट्रिय कार्य

ग्रामपंचायत,विधानसभा,लोकसभा,पदवीधर मतदार जनजागृती , गोवर रूबेला लासिकरन जनजागृति ,कोरोना जनजागृति यामुळे भिसेवाडीत एकही बाधित रुग्न नाही १००% लसीकरण पूर्ण.




MPSP SELECTED SCHOOL DIFFERENT ACTIVITY VIDEO CLIP

We study hard and we also have a lot of fun in school. Watch this energetic performance of students of ZPPS Bhisewadi, Vaijapur and let our #ZPSchoolTalent reel you in.

- **TW:** https://twitter.com/MahaSamagra/status/1679394431139729410?t=Qa1z4J1019CfH6kREY3lDQ&s=19
- **FB:** https://fb.watch/lLFFW5n1p0/?mibextid=ZbWKwL
- **INSTAGRAM:** https://www.instagram.com/reel/CuoSTBWvGyX/?igshid=MzRlODBiNWFlZA==
- **YouTube:** https://youtube.com/shorts/htAilMuDqgs?feature=share

अतिशय मोलाची माहिती..खूप खूप आभार श्लोक..!
मित्रांनो,दुर्दैवाने कोणतीही दुर्घटना घडल्यास तातडीचे पहिले पाऊल म्हणजे प्रथमोपचार व त्यासाठीचे साहित्य जवळ बाळगणे.यातून एखाद्याला जीवनदान ही मिळू शकते. त्यामुळे प्रथमोपचार पेटी नक्की सोबत ठेवा.
जि.प.प्रा.शा. भिसेवाडी, वैजापूर

- **TW:**https://twitter.com/MahaSamagra/status/1684586655351808000?t=-95lSvYCtOc07brBbZt-FQ&s=19
- **FB:** https://fb.watch/m2qR0Xx7_W/?mibextid=ZbWKwL
- **Instagram:** https://www.instagram.com/reel/CvNU9ksNqMW/?igshid=MzRlODBiNWFlZA==
- **YouTube:** https://youtu.be/QKGJO086g8A


How to make a simple electric motor in a minute!!

A healthy scientific temper, sense of curiosity & a desire to innovate are encouraged in our schools, helping children understand the world around them. Here is a video from ZPPS Bhisewadi, Chhatrapati Sambhaji Nagar where a student explains the working of an electric motor.

- **TW:** https://twitter.com/MahaSamagra/status/1710978515284443142?t=-Nq-_e_GYR8bdANsrloyiA&s=19
- **FB:** https://fb.watch/nykbJLitWC/?mibextid=RUbZ1f
- **Instagram:** https://www.instagram.com/reel/CyH9MFxq1HH/?igshid=MzRlODBiNWFlZA==
- **YouTube:** https://youtu.be/G6jGSBqVWlg?feature=shared

The summers are harsh on our #littlewingedfriends who have to fly around in the heat in search of #food and #water. Students of ZPPS Bhisewadi, Vaijapur have therefore decided to leave a little something out for birds daily. We think you should do so too.

- https://twitter.com/MahaSamagra/status/1641307441219661826?t=vEPyYq2MvXd2QryOijIR6Q&s=08
- https://youtu.be/6MmxD1JnUc4
- https://fb.watch/jATguaKDfe/?mibextid=RUbZ1f
- https://www.instagram.com/reel/CqZsnfxDoyU/?igshid=YmMyMTA2M2Y=



Children are always fascinated by the concept of flying. For most children studying in ZP schools, the only flight possible is a flight of fancy! But what if a field trip helps them experience some of the magic of flying?
Here are students of Bhisewadi ZP school, Chhatrapati Sambhajinagar on their first ever visit to the airport. How excited they are!

- https://twitter.com/MahaSamagra/status/1608435396366721024?t=xnQkoTF80FccgoX1DpVYhA&s=08
- https://fb.watch/hKEkKXXw8b/
- https://www.instagram.com/reel/CmwF-qlplU-/?igshid=YmMyMTA2M2Y=
- https://youtube.com/shorts/0rWeIe3PY8w?feature=share

मुंबईसह महाराष्ट्रात गोवरच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर वैजापूर तालुक्यातील जि .प. .प्रा भिसेवाडी शाळेच्या या विद्यार्थ्यांनी व त्यांच्या शिक्षकांनी गोवर प्रतिबंधक लसीकरणाच्या जनजागृतीसाठी बनवलेली ही अतिशय उपयुक्त माहिती असलेली चित्रफीत घराघरात पोहोचेल यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करूया.

- https://twitter.com/MahaSamagra/status/1596474296016130048?t=1pxaF-GbAfX1BcVT9n3gkA&s=08
- https://fb.watch/h1MPHyOB6c/
- https://www.instagram.com/tv/ClbKOBJJE-J/?igshid=YmMyMTA2M2Y=
- https://youtu.be/Vd9WPNOJWF0

Z.P.P.S Bhisewadi Electronic News links

- https://youtu.be/_oCzro6ezM0?si=I8XkmFgj0bvPOp0m
- https://youtu.be/sLlX3zxyejs
- https://youtu.be/k2dzy5-7GJk
- https://youtu.be/BVOwAh1z_NI
- https://youtu.be/4FNJISyodQM
- https://public.app/s/DFkum

नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंचलगाव

शाळेचा पूर्ण पत्ता - मु.अंचलगाव, पो.टूणकी, ता.वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

शाळेचा ई-मेल आयडी - zppschoolanchalgaon@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव — श्री.मल्हारी भाऊसाहेब गोसावी

मुख्याध्यापकाचा मोबाईल क्रमांक - 9422131375

मुख्याध्यापक ई -मेल आयडी - gosavimalhari150@gmail.com

शाळेस प्राप्त पुरस्कार


- जिल्हास्तरीय नवोपक्रमशील व गुणवत्ता पूर्ण शाळा
- मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा.2 जिल्हास्तर तृतीय क्रमांक
- विविध संघटना यांच्याकडून आदर्श शाळा व्यवस्थापन समिती पुरस्कार

शाळेची वैशिष्ट्ये आणि शाळेचे उपक्रम, अध्ययन-अध्यापन तसेच विविध परीक्षांतील यश

- सन 2019 शाळेची पटसंख्या 80 सन 2025 शाळेचे पटसंख्या 240
- नवोदय विद्यालय कन्नड येथे चार विद्यार्थ्यांची निवड
- एन एम एम एस आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा 21 विद्यार्थ्यांची निवड
- शिष्यवृत्ती परीक्षा पाचवी आठवी सहा विद्यार्थ्यांची निवड
- उपग्रह निर्मिती परभणी येथे एका विद्यार्थ्यांची निवड
- प्रत्येक वर्षी इतर स्पर्धा परीक्षा मध्ये विद्यार्थी विशेष प्राविण्य
- मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा जिल्हास्तर तृतीय क्रमांक तीन लाख पारितोषिक

प्रस्तावना — दुर्गमतेतून उज्ज्वलतेकडे

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पश्चिम टोकाला, वैजापूर तालुक्याच्या सीमेवर वसलेले एक साधेसे पण मनाला भावणारे गाव **अंचलगाव**. सभोवती डोंगररांगा, निसर्गाची कुशीत वसलेली शेतं आणि साध्या माणसांच्या घामाने पिकणारे जीवन. शहरापासून ६५ किलोमीटर आणि वैजापूरपासून तब्बल ३५ किलोमीटर अंतरावर असलेले हे गाव, भौगोलिकदृष्ट्या दूर असले तरी शिक्षणाच्या प्रकाशाने उजळलेले आहे.



या गावात शिक्षणाचा दिवा प्रज्वलित झाला तो **१९५२ साली**, जेव्हा काही ग्रामस्थांनी एका झोपडीत वसवली ***"अंचलगावची प्राथमिक शाळा"***. त्या झोपडीतील फळ्यांवर खडूने लिहिलेलं 'अ' ते 'ज्ञ' हे केवळ अक्षर नव्हतं, तर ग्रामीण शिक्षणाच्या नव्या युगाचं बीज होतं.

त्या काळात शाळा म्हणजे गावाच्या भवितव्याचं केंद्र असायचं. पालक स्वतः वाचन करू शकत नसले तरी मुलांमध्ये शिकण्याची ओढ निर्माण व्हावी, ही त्यांची खरी अपेक्षा होती. शाळेच्या भिंती नव्हत्या, पण तिच्या स्वप्नांना आकाशाची मर्यादा नव्हती.

१९६५ साली या झोपडीच्या जागी एक साधी पण स्थिर इमारत उभी राहिली. *"जि.प.प्रा.शाळा अंचलगाव (केंद्र — लोणी खुर्द, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर)"* अशा अधिकृत नावाने शाळेचा प्रवास औपचारिक झाला. पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग सुरू झाले आणि अंचलगावच्या बालमनोमनी शिक्षणाची पहिली झुळूक वाहू लागली.

गेल्या अनेक दशकांत ही शाळा कधी एखाद्या आभाळातल्या ढगासारखी सावली देत राहिली, तर कधी मर्यादित साधनांमध्येही आशेचा दिवा जपून ठेवणारी दीपमाळ ठरली. शिक्षक बदलत गेले, विद्यार्थी बदलले, काळ बदलला, पण शाळा — "गाव उन्नतीसाठी शिक्षण हेच खरे साधन" — तशीच राहिली.

शाळेचा इतिहास — झोपडीपासून उज्ज्वलतेपर्यंतचा प्रवास

शाळेच्या सुरुवातीच्या काळात परिस्थिती अत्यंत मर्यादित होती. वर्गखोल्यांची संख्या कमी, साधनसंपत्ती अल्प आणि शिक्षक संख्या अपुरी. पण ग्रामस्थांची आणि शिक्षकांची निष्ठा मात्र अखंड होती. त्यांनी शाळेला स्वतःच्या मुलासारखं जपलं.

१९६५ नंतर शाळा सातत्याने कार्यरत राहिली, परंतु कालांतराने तिच्या भिंतींवर थकव्याचे पडसाद दिसू लागले. जुन्या वर्गखोल्या जीर्ण झाल्या, विद्यार्थीसंख्या घटू लागली, आणि गावात "शिक्षणाची चमक" थोडी मंदावली.

तरीही शाळा थांबली नाही. शिक्षकांच्या समर्पणाने, पालकांच्या मूक पाठिंब्याने आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाने ती आपलं अस्तित्व टिकवून राहिली. प्रत्येक सण, प्रत्येक बालदिन, प्रत्येक वार्षिक समारंभ म्हणजे या शाळेचा जीवंतपणाचा पुरावा ठरला.

परंतु २०१८-१९ पर्यंत परिस्थिती पुन्हा गंभीर झाली. विद्यार्थीसंख्या ८१ वर आली, शिक्षक केवळ चार राहिले. वर्गखोल्या मोडकळीस आल्या होत्या, परिसर निस्तेज झाला होता, आणि शैक्षणिक गुणवत्ता सामान्य पातळीवर थांबली होती.

अशा अवस्थेत **२०१९ साली** तीन नवीन शिक्षक या शाळेत बदलीने हजर झाले — त्यांच्यासोबत आले **स्वप्न, जिद्द आणि परिवर्तनाची ज्योत.** काळ पुढे सरकला, वर्ग वाढले, पिढ्या बदलल्या; पण शाळेच्या भिंतींवर काळाच्या खुणा उमटू लागल्या. जुन्या भिंतींनी थकवा

धरला, आणि विद्यार्थ्यांची संख्या घटू लागली. २०१८ च्या सुमारास शाळेची अवस्था जणू मूक आर्ततेने भरलेली होती.

तेव्हाच या शाळेच्या जीवनात प्रवेश झाला — **मुख्याध्यापक श्री. मल्हारी भाऊसाहेब गोसावी** या दूरदर्शी शिक्षकांचा हा प्रवेश म्हणजे केवळ बदली नव्हती — तो होता "परिवर्तनाचा आरंभ."

२०१९ — नवचैतन्याचा आरंभ

२०१९ साली श्री. गोसावी यांनी अंचलगाव शाळेत रुजू होताच परिसर पाहून एकच गोष्ट ठरवली. "शाळा फक्त शिक्षण देण्याचं ठिकाण नसून, ती गावाच्या प्रगतीची दिशा आहे." त्यांना जाणवले की येथे केवळ भिंतींची नाही, तर *मनांची दुरुस्ती* करणे गरजेचे आहे.

त्यांनी शाळेच्या जीर्ण भिंतींकडे अडचण म्हणून नाही, तर **संधी म्हणून पाहिलं.**
ते म्हणाले -

"परिस्थिती कठीण असू शकते, पण दृष्टिकोन सकारात्मक असेल, तर परिवर्तन अटळ असतं."


शिक्षणाच्या मंदिराला पुन्हा तेज आणायचं असेल, तर "वर्ग" नव्हे तर "विद्यार्थी" केंद्रस्थानी आणावे लागतील, हे त्यांनी ओळखले. म्हणूनच त्यांनी पहिला निर्णय घेतला — पारंपरिक वर्गपद्धती बंद करून **विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेनुसार व गतीनुसार गट तयार करणे.** हा प्रयोग नवीन होता, धाडसी होता, पण त्यांच्यासाठी तोच आशेचा किरण होता.

गावातील आर्थिक परिस्थिती हलाखीची. दानशूर लोकांची कमतरता, नव्या शिक्षकांविषयी आरंभी थोडीशी शंका, पण त्यांनी धीर सोडला नाही. लोकांमध्ये मिसळले, त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला, आणि शाळेचा वेळ संपल्यानंतरही *शाळेचाच विचार करत* दिवस-रात्र झटत राहिले.

त्यांनी ठरवलं — "शाळा ही फक्त शिक्षण देण्याचं ठिकाण नाही, ती गावाच्या विकासाची शिदोरी आहे."
आणि या विचारातून सुरू झाला **अंचलगाव शाळेचा परिवर्तन प्रवास.**

लोकसहभागातून शिक्षण क्रांती

शिक्षकांनी गावकऱ्यांना पटवून दिलं की शाळा ही सर्वांची आहे. "शाळा माझी — मी शाळेचा" हा नारा दिला आणि ग्रामस्थांचा विश्वास संपादन केला. शाळेच्या परिसराची रंगरंगोटी, भिंतींवर शैक्षणिक चित्रे, झाडे-फुले लावणे, वर्गखोल्यांमध्ये स्वच्छता व सजावट — हे सर्व ग्रामस्थांच्या मदतीने सुरू झाले.



थोड्याच दिवसांत अंचलगावच्या शाळेचा चेहरामोहरा बदलू लागला. ज्या शाळेकडे लोक उदासीनतेने पाहत होते, ती शाळा आता **गावाच्या अभिमानाची ओळख** बनू लागली.

शिक्षकांनी एकमेकांशी समन्वय साधून काम वाटून घेतलं. कोणीतरी *अध्ययन सुधारणा* हाताळली, कोणीतरी *सामाजिक उपक्रम*, तर कोणीतरी *वर्ग व्यवस्थापन*. त्यांचं एकच ध्येय होतं — *"गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आनंददायी वातावरण."*

आव्हानांचे संधीमध्ये रूपांतर

अशातच जगावर आले **कोरोना महामारीचे संकट.** पहिले दोन-तीन महिने सगळं थांबल्यासारखं वाटलं. पण या शिक्षकांच्या मनातला विचार थांबला नाही. त्यांनी ठरवलं — "विद्यार्थी आमच्यापासून दूर राहतील, पण शिक्षण नाही."

त्यांनी विद्यार्थ्यांच्या घरी भेट देणे सुरू केले, पालकांशी संवाद साधला, आणि विद्यार्थ्यांना अभ्यासाची सातत्यपूर्ण सवय लावली. हळूहळू लोकांचा विश्वास दृढ झाला. शिक्षक, पालक आणि व्यवस्थापन समिती या त्रिकूटाने शाळेच्या विकासाची गाडी पुन्हा मार्गावर आणली.

या काळातच पुढील अनेक उपक्रमांचे बीज पेरले गेले — शाळा डिजिटल करणे, वाचनालय सुरू करणे, साउंड सिस्टीम बसवणे, भौतिक सुविधांनी परिपूर्ण शाळा बनवणे, आनंददायी शिक्षणासाठी प्रयोग करणे आणि सर्वांत महत्त्वाचं — *१००% विद्यार्थी प्रगत करण्याचा संकल्प.*


उपक्रमांची फुलबाग — "शाळा शिकवते, पण प्रेरणाही देते"

२०१९ नंतर अंचलगाव शाळेने ज्या पद्धतीने स्वतःला घडवले, त्याला *"शैक्षणिक नवचैतन्याचा चमत्कार"* म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. एकेक दिवस, एकेक प्रयोग, आणि प्रत्येक छोट्या प्रयत्नातून उभी राहिली — एक **आदर्श ग्रामीण शाळा.**

१. शिक्षणाची नव्या पद्धतीने मांडणी

पूर्वी विद्यार्थ्यांना वर्गानुसार शिकवले जायचे, परंतु आता शिक्षकांनी ठरवले — *वर्ग नव्हे, तर क्षमता हा शिक्षणाचा पाया असावा.* त्यामुळे विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता आणि गती ओळखून **शिक्षण गट** तयार करण्यात आले. या पद्धतीमुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले जाऊ लागले, आणि अभ्यासाविषयी आत्मविश्वास वाढू लागला.

हळूहळू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, आणि शिक्षकांच्या नजरेत समाधान दिसू लागले. "वर्ग संपला" या संकल्पनेऐवजी "अभ्यास सुरू आहे" ही भावना निर्माण झाली.



२. डिजिटल शिक्षण — 'स्मार्ट' पिढीकडे वाटचाल

कोरोनाच्या काळात ऑनलाईन शिक्षण ही गरज होती, पण अंचलगाव शाळेने तिला *संधी* बनवली. गावातील पालक आणि व्यवस्थापन समितीच्या मदतीने शाळेत **डिजिटल क्लासरूम**, **प्रोजेक्टर**, **स्मार्ट टीव्ही**, **साउंड सिस्टीम**, आणि **वाय-फाय सुविधा** निर्माण करण्यात आली.

यामुळे विद्यार्थी "तंत्रज्ञानाच्या भाषेत" शिकू लागले. गावातील अनेक घरांमध्ये अजूनही इंटरनेट सुविधा मर्यादित असतानाही शाळेने "डिजिटल साक्षरता"चा दीप प्रज्वलित केला. आज अंचलगाव शाळेचा विद्यार्थी Google Classroom, QR कोड आणि ई-पाठशाळा सहज वापरतो — हेच शिक्षणातील परिवर्तनाचे प्रतीक आहे.

३. आनंददायी शिक्षण — शिक्षणात खेळ, खेळात शिक्षण

"शिकवणे" आणि "समजणे" यात फरक असतो. हे ओळखून शिक्षकांनी *आनंददायी शिक्षणाच्या* दिशेने प्रयत्न केले. वर्गात खेळाच्या माध्यमातून गणित, गीतांच्या माध्यमातून मराठी, अभिनयाद्वारे विज्ञान आणि प्रयोगांद्वारे पर्यावरण — असे अनेक नाविन्यपूर्ण प्रयोग राबवले गेले.

शाळेत दर आठवड्याला "ज्ञानगंगा सत्र", "वाचन सप्ताह", "कहाणीचा दिवस", "आवाजविना नाटक", "चित्रातून विचार" असे उपक्रम घेतले जातात. विद्यार्थ्यांच्या मनात "शिक्षण ही मजा आहे" असा विश्वास निर्माण झाला.


४. वाचन संस्कार — ज्ञानाचा सुवास

शाळेत एक सुंदर उपक्रम सुरू करण्यात आला — **"विद्यार्थी वाचनालय"**. गावातील दानशूर लोक, शिक्षक आणि पालक यांच्या मदतीने सुमारे **४०० हून अधिक पुस्तके** जमा करण्यात आली.

"प्रत्येक आठवड्यात एक पुस्तक" हा नियम राबवून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यात आली. शाळेच्या एका कोपऱ्यात सजवलेले हे वाचनालय म्हणजे मुलांच्या कल्पनाशक्तीचे पंख देणारे ठिकाण बनले. पुस्तकांच्या दुनियेत रममाण होणारा विद्यार्थी, हाच शाळेच्या परिवर्तनाचा खरा पुरस्कार आहे.

५. पालक सहभाग — शाळा म्हणजे आपले घर

अंचलगाव शाळेच्या यशामागे पालकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरला. शिक्षकांनी पालकांशी केवळ बैठकीत नव्हे, तर त्यांच्या शेतात, घरात, गावातील मंडपात संवाद साधला. त्यांना पटवून दिलं — "आपली मुलं शिकली तर तुमचं आयुष्यही उजळेल."



आज या शाळेच्या पालक सभा केवळ औपचारिक कार्यक्रम नाहीत, तर त्या *सामूहिक प्रेरणासत्रे* बनल्या आहेत. पालक शाळेच्या रंगरंगोटीपासून सण सोहळ्यांपर्यंत प्रत्यक्ष हातभार लावतात.

६. सामाजिक समरसतेचे धडे

शाळा केवळ शिक्षण देत नाही, ती *मानवता शिकवते.* अंचलगाव शाळेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समाजाशी जोडणारे अनेक उपक्रम राबवले — "स्वच्छ ग्राम अभियान", "हरित सप्ताह", "बेटी बचाओ जागरूकता मोहीम", "रक्तदान जनजागृती", "शाळा सुशोभिकरण" इत्यादी.

या माध्यमातून विद्यार्थ्यांना जबाबदारी, एकत्रित काम आणि समाजसेवेचे मूल्य शिकवले गेले. शाळा म्हणजे आता *गावाचा सांस्कृतिक केंद्रबिंदू* बनली आहे.

फलश्रुती — अंचलगाव शाळेचा अभिमान

सततच्या प्रयत्नांनंतर आज अंचलगाव शाळेने जे यश मिळवले आहे, ते केवळ आकड्यांत मोजता येत नाही — ते *भावनांमध्ये जाणवते.*

शैक्षणिक गौरव -


- शाळेच्या स्थापनेपासून प्रथमच **४ विद्यार्थ्यांची निवड "जवाहर नवोदय विद्यालय कन्नड येथे निवड "**
- **25 विद्यार्थी NMMS व सारथी परीक्षेत यशस्वी/ प्रत्येकास ४८०००/- रुपयांची शिष्यवृत्ती पात्र.**
- **5 विद्यार्थी 8 वी शिष्यवृत्ती धारक**
- **6 विद्यार्थी 5 वी शिष्यवृत्ती धारक**
- शाळेतील **एक विद्यार्थिनीची उपग्रह निर्मिती प्रकल्पासाठी निवड.**
- राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांमध्ये सतत यशस्वी कामगिरी.

क्रीडा आणि सांस्कृतिक यश:

- विद्यार्थ्यांसोबत पालकांचाही सक्रिय सहभाग असलेली **क्रीडा स्पर्धा.**
- बालदिन, प्रजासत्ताक दिन, शिक्षक दिन यांसारख्या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणामुळे शाळा सर्वांची पसंतीची बनली.

शाळा विकासाचे पुरस्कार:

- "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" स्पर्धेत **तालुक्यात प्रथम क्रमांक** आणि **जिल्ह्यात तृतीय क्रमांक**,तसेच **३ लाख रुपयांचे पारितोषिक.**
- **नवोपक्रमशील व गुणवत्तापूर्ण शाळा पुरस्कार**



- **स्माईल फौंडेशन वतीने आदर्श शाळा व्यवस्थापन समिती पुरस्कार**
- **साने गुरुजी पतसंस्था वतीने आदर्श शाळा व्यवस्थापन समिती पुरस्कार**
- मागील वर्षी **जिल्हास्तरावरील एक** आणि **तालुकास्तरावरील तीन पुरस्कार** प्राप्त.

श्री.मल्हारी गोसावी यांना पुरस्कार

- **कलाध्यापक आदर्श शिक्षक पुरस्कार**
- **उत्कृष्ट स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक जिल्हास्तरीय पुरस्कार सलग तीन वर्ष**
- **प्रगती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औरंगाबाद यांच्या वतीने दिला जाणारा "राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार 2022"**
- **शिक्षकसेना पतसंस्था वैजापूर यांच्या मार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार २०२३**

समाजाच्या विश्वासाने फुलणारे शिक्षण

आज या शाळेत केवळ अंचलगावच नव्हे, तर **कविटखेडा, नायगव्हाण, लोणी, टुणकी, सावखेड, वळण, बिरोळा, दसकुली, मनोली, वाकला, शिवूर बंगला, भादली** या दहा-बारा गावांमधून विद्यार्थी येतात. हे केवळ संख्येचं यश नाही, तर *विश्वासाचं द्योतक आहे.*


गावातील ग्रामपंचायत, उद्योजक, शेतकरी, पालक वर्ग आणि शिक्षक यांचं एकत्रित प्रयत्न म्हणजेच अंचलगाव शाळेचा "गुप्त मंत्र". प्रत्येक उपक्रम, प्रत्येक यश हे त्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे.

निष्कर्ष — प्रकाशाच्या दिशेने चालणारी वाटचाल

आज अंचलगाव शाळा म्हणजे एक आदर्श आहे. ती शिकवते की **मर्यादा अडथळा नसतात, तर प्रेरणेची ठिणगी असतात.** एका झोपडीतून सुरू झालेला प्रवास आज डिजिटल वर्गापर्यंत पोहोचला आहे. शाळेच्या प्रत्येक भिंतीवर मेहनतीचे, समर्पणाचे आणि शिक्षणप्रेमाचे ठसे कोरलेले आहेत. या शाळेने सिद्ध केलं. "जेव्हा शिक्षक, पालक आणि समाज एकत्र येतात, तेव्हा दुर्गम भागातही शिक्षणाचं सूर्योदय होतं."

अध्याय : नेतृत्वाचा दीप — श्री. मल्हारी भाऊसाहेब गोसावी

शहरातील जिल्हा परिषद प्रशालेत पहिल्यांदाच मियावाकी जंगलाची लागवड जिल्ह्यात प्रथमच करण्यात आली होती. जुलैला साडेचार हजार वृक्षांचे रोपण करण्यात आले होते. प्रारंभी उपविभागीय अधिकारी विठ्ठल उदमले, तहसीलदार संजय पवार यांच्या हस्ते वृक्षलागवड करण्यात आली होती. शहरातील दुमजली, भव्य मैदान असलेल्या जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात प्रथमच जपानसारख्या देशात विकसित झालेल्या मियावाकी पध्दतीने जंगल निर्माण करण्यासाठी साडेचार हजार विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आला होती. प्रशालेच्या मैदानावर मियावाकी पध्दतीचे जंगल तयार करण्यासाठी एक मीटर बाय एक मीटर अंतरावर वेगवेगळ्या चौरस प्रकारच्या साडेचार हजार रोपांची लागवड करण्यात आली असून, अशा प्रकारची लागवड करण्यात आलेला तालुक्यातील जिल्हा परिषदेची शहरातील ही एकमेव शाळा आहे.

उमरगा शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात मियावाकी जंगल साकारले आहे. १० महिन्यांपूर्वी साडेचार हजार विविध झाडांची लागवड केली होती. छाया: अंबादास



मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांचे मदतीचे आवाहन

जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे सायकल बँकेची स्थापना

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या प्रयत्नातून गरीब विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी सायकल बँक स्थापन करण्यात आली. या सायकल बँकेत उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींनी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शाळेत येण्या जाण्यासाठी मोफत सायकली उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या सायकली विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षणतज्ञ सदानंद शिवदे पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आल्या. यावेळी उमरगा शहरातील प्लाॅट व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते अनिल सगर उमरगा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीस धीरज बेळंबकर उमरगा केंद्राच्या केंद्रप्रमुख शिला मुदगडे मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते. मुलींना सायकली उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्व मुलींच्या पालकांनी उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींचे आभार मानले यामुळे आमच्या मुलींचे शिक्षण पूर्ण होईल अशी आशा व्यक्त केली.अनिल सगर मुख्याध्यापक पद्माकर मोरे राजेंद्र चव्हाण धीरज बेळंबकर आदर्श शिक्षिका पुष्पलता पांढरे,यांनी सायकल बँकेसाठी सायकली मोफत दिलेले आहेत. विद्यार्थ्यांना शहराच्या कानाकोपऱ्यातून शाळेत येण्यासाठी असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यावर उपाय म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींना आपल्याजवळ उपलब्ध असलेली जुनी सायकल किंवा नवीन सायकल शाळेला भेट म्हणून देण्याचे आवाहन केले, त्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून आतापर्यंत सायकल बँकेमध्ये दहा सायकली जमा झालेल्या आहेत .यापुढे उमरगा शहरातील इच्छुक दानशूर व्यक्तींना या सायकल बँकेसाठी मदत करण्याचे आव्हान मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी केलेले आहे. यावेळी प्रशालेतील सरिता उपासे सोनाली मुसळे ममता गायकवाड शिल्पा चंदनशिवे धनराज तेलंग बशीर शेख विद्यानंद सुत्रावे सदानंद कुंभार संजय रूपाजी व इतर सर्व शिक्षक विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत

माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला संगणक व प्रिंटर भेट

उमरगा.येथील जिल्हा परिषद हायस्कूल ला 1983 च्या बॅचचे पुणे येथे अभियंता असलेले माजी विद्यार्थी शिवाजी साबणे यांनी संगणक तर डी वाय पाटील येथे अभियंता असलेले डॉ मिलींद मंठाळकर यांनी प्रिंटर भेट दिला.यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक बाबुराव कांबळे अभियंता संजय सरपे,लोहार्याचे विस्तार अधिकारी व शाळेचे माजी विद्यार्थी सुभाष चव्हाण भारत शिक्षण संस्थेतून सेवानिवृत्त झालेले हरी पाचंगे, क्रीडा शिक्षक अमजद बेग,सिजाऊद्दीन लंगडे, सुनिल जाधव,राम गायकवाड उपस्थित होते.यावेळी मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे सुत्रसंचलन शिल्पा चंदनशिवे तर आभार बलभीम चव्हाण यांनी मानले.यावेळी धनराज तेलंग संजय रुपाजी, बशीर शेख उपस्थित होते.

समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी शाळेच्या भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी आतापर्यंत पाच लाखांपेक्षा जास्त मदत केलेली आहे.आज शिवाजी साबणे व मिलिंद मंठाळकर यांनी संगणक व प्रिंटर देऊन इतर माजी विद्यार्थ्यांसमोर नवीन आदर्श निर्माण केला आहे.इतर विद्यार्थ्यांनी ही पुढे येऊन शाळेला मदत करावी असे आवाहन मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी केले आहे.




माझी शाळा माझी परसबाग उपक्रम

उमरगा येथील मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांकाचे पाच लाखाचे बक्षीस पटकावणारी आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत माझी शाळा माझी परसबाग हा उपक्रम मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांनी परसबाग निर्मिती केलेली आहे. हा उपक्रम राज्यातील शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात कार्यान्वित झालेला आहे. विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीकता व्हावी, पोषक आहार मिळावा, कुपोषण दूर व्हावे, हा शाळेत परसबाग निर्मितीचा मुख्य हेतू आहे .शाळेचे माजी विद्यार्थी व उमरगा शहरातील प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉक्टर अनंत मुगळे यांच्या आर्थिक सहकार्यातून शालेय परिसरात वीस गुंठ्यामध्ये परसबाग निर्मिती करण्यात आलेली आहे. परसबाग निर्मितीसाठी लोक सहभागातून डॉ. ज्योती सातपुते यांनी 21 शेवग्याची रोपे देऊन सहकार्य केलेले आहे .शाळेतील विद्यार्थ्यांच्या परिश्रमातून निर्माण झालेल्या परसबागेत आज शालेय पोषण आहारासाठी सेंद्रिय भाजीपाला मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेला आहे .विविध प्रकारच्या फळभाज्या व पालेभाज्या परसबागेत बहरलेल्या आहेत टोमॅटो, वांगी, मिरची, दोडके, कांदे, पालक, मेथी, कोथिंबीर, अंबाडीची भाजी,भोपळा, परसबागेत मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेला आहे. शालेय पोषण आहारात फळभाज्या वापरूनही भाजीपाला विक्रीसाठी उपलब्ध होत आहे. आतापर्यंत 3000 रुपयाचे उत्पन्न परसबागेतून मिळालेले आहे अशी माहिती मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी दिली. परसबागेसाठी शाळेत गांडूळ खत निर्मिती करण्यात आलेली आहे .या परसबागेसाठी शालेय पोषण आहार मदतनीस कविता केदारे, सुमन साठे, सखुबाई चव्हाण, सेविका वनमाला वाले, सुनिता राठोड यांचे परिश्रम व मेहनतीतून ही परसबाग निर्माण झालेली आहे. परसबाग निर्मिती हा उमरगा शहरात कुतूहलाचा विषय झालेला आहे अनेक समाजातील शिक्षण प्रेमी नागरिक आतापर्यंत परसबाग पाहण्यासाठी शाळेला भेट दिलेले आहेत, उमरगा बीटचे विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके केंद्रप्रमुख शीला मुदगडे यांनीही परसबाग निर्मिती पाहून शाळेचे मुख्याध्यापक व सर्व परसबाग निर्मितीसाठी परिश्रम घेतलेल्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केलेले आहे.



शाळेचे क्रीडांगण

शाळेला तीन एकर चे भव्य क्रीडांगण आहे क्रीडांगणाला सर्व बाजूंनी संरक्षण भिंत आहे, संरक्षण भिंत असल्याने शाळेत एवढे मोठे मैदान असूनही काटे आणि सरकारी गवतामुळे मैदान पूर्ण अस्वच्छ होते परंतु आम्ही योग्य नियोजन करून डाव्या बाजूला 30 गुंठे जागेवर मियावाकी जंगल निर्मिती व उर्वरित क्रीडांगणावर 200 मीटरचे भव्य रनिंग ट्रॅक केलेले आहे त्यामुळे उमरगा शहरात सर्व प्रकारच्या स्पर्धा घेण्यासाठी हे ग्राउंड अतिशय उपयुक्त झालेले आहे



क्रीडा स्पर्धेत शाळेला नॅशनल चॅम्पियनशिप लाठी अजिंक्य पद क्रीडा स्पर्धेत उमरगा हायस्कूलला राष्ट्रीय स्तरावर मोठे यश मिळाले आहे गोवा येथे झालेल्या लाठी नॅशनल चॅम्पियनशिप 2024 हे जिल्हा परिषद हायस्कूलने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत असताना सुवर्णपदक व ट्रॉफी पटकावली आहे .तसेच धुळे येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय तेंग सु डो स्पर्धेत शाळेने आठ पदकाची कमाई करून राज्यस्तरावर यश मिळवले आहे.तालुका जिल्हा व विभाग स्तरावर ही शाळांनी वेगवेगळी शंभर पदके मिळवलेली आहेत. शाळेने या व्यतिरिक्त देशी खेळावर लक्ष केंद्रित करून आपले वेगळेपण सिद्ध केलेले आहे.



उमरगा हायस्कूलला तीन सुवर्ण, एक कांस्य

राष्ट्रीय लाठी अजिंक्यपद स्पर्धा

उमरगा, ता. २७ (बातमीदार) : येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय इंदोर मार्शल आर्ट गेम्स लाठी फेडरेशन कप स्पर्धेत तीन सुवर्ण व एका कांस्यपदकाची कमाई केली.

दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय लाठी अजिंक्यपद स्पर्धेमध्ये धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या मुलींनी तीन सुवर्ण व एक कांस्यपदक पटकावून जिल्ह्याला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवून दिली. १६ वर्षांखालील मुलींच्या लाठी क्रीडा प्रकारात प्रशालेतील ईश्वरी माने, श्रेयशी शिंदे, अफसाना नदाफ या विद्यार्थिनींनी सुवर्णपदक पटकावले; तर श्रुती जाधव हिला कांस्यपदक मिळाले. यापूर्वी गोवा येथे झालेल्या पाचव्या राष्ट्रीय लाठी चॅम्पियनशिपचेही विजेतेपद पटकावले आहे, तर जानेवारीमध्ये पिंपळनेर धुळे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय तेंग सुडो शालेय क्रीडा स्पर्धेत प्रशालेतील विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण, दोन रौप्य तर चार कांस्यपदके मिळवली आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख, धनराज तेलंग यांचे मार्गदर्शन लाभले. एकाच वर्षात चार राष्ट्रीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केल्याने धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनांक घोष, शिक्षणाधिकारी अशोक पाटील, गटशिक्षणाधिकारी काकासाहेब साळुंके, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, केंद्रप्रमुख शीला मुदगडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे, शिक्षण तज्ज्ञ सदानंद शिवदे पाटील, अशोक पतंगे, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे यांच्यासह शिक्षकांनी अभिनंदन केले.

उमरगा : राष्ट्रीय लाठी अजिंक्यपद स्पर्धेत जिल्हा परिषद हायस्कूलच्या मुलींनी तीन सुवर्ण व एक कांस्यपदक पटकावले.

MAHARASHTRA STATE ELECTRICITY TRANSMISSION CO. LTD



उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलचे राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेत यश

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलच्या संघाने डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथील क्रीडा संकुलात पाच व सहा एप्रिल रोजी झालेल्या राज्यस्तरीय डॉट बॉल स्पर्धेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत जिल्हा परिषद हायस्कूल मधील 17 वर्षे वयोगटातील मुलांचा व मुलींच्या दोन संघाने सहभाग नोंदवला होता धाराशिव जिल्हा डॉजबॉल असोसिएशन चे सचिव व उमरगा तालुक्यातील प्रसिद्ध क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशालेतील श्रेयशी शिंदे, अफसाना नदाफ, मोहिनी घोडके, आलिया बागवान, श्रुती जाधव,अनोखी एरंडे,अस्मिता भोसले, प्रमिला जाधव, श्रावणी कोळी, समृद्धी रणदिवे, सुदर्शन शिंदे, आदित्य सगर, दुर्गेश दुबे,आर्शियांन शेख, पृथ्वीराज पालमपल्ले, अशोक वजनम, अंकुश निंगदळे, इस्माईल नदाफ या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला यशस्वी विद्यार्थ्यांना कोच धनराज तेलंग व महेम्मद फजल शेख, वजीर शेख व आदिनाथ गोरे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शकुंतला मोरे अमर वरवडे शिक्षण तज्ञ सदानंद शिवदे पाटील अशोक पतगे सुजाता मोरे व शाळेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले



राज्यस्तरीय तेंग सु डो(कराटे) स्पर्धेत दोन सुवर्ण दोन रौप्य चार कांस्य पदक

उमरगा: येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलला राज्यस्तरीय शालेय तेंग सु डो स्पर्धेत दोन सुवर्ण दोन रजत आणि चार ब्राँझ पदक मिळाले आहेत. या स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, धुळे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धुळे, तेंग सु डो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपळनेर धुळे येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये राज्यभरामधील आठ विभागातील 14, 17 व 19 वयोगटातील एकूण 384 खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता.या स्पर्धेत जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वजन गटामध्ये 10 पदके मिळवून दबदबा निर्माण केला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल देऊन सत्कार करण्यात आला त्यामध्ये श्रेयसी शिंदे सुवर्ण, गीता गायकवाड सुवर्ण, अनुराधा गुंडे रजत, मोहिनी घोडके रजत,अश्विनी जाधव अफसाना नदाफ,अर्चना धोत्रे, ईश्वरी माने,या विद्यार्थ्यांनी ब्राँझ पदकाची कमाई केली या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षक महंमद रफी शेख जिल्हा परिषद हायस्कूल मधील फजल शेख, धनराज तेलंग,यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे मोठे यश प्राप्त केलेले आहे या यशाबद्दल अशोक पतगे अमर वरवटे सदानंद शिवदे पाटील सुजाता मोरे गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके केंद्रप्रमुख शिला मुदगडे, बशीर शेख विद्यानंद सूत्रावे सदानंद कुंभार संजय रुपाजी ममता गायकवाड सोनाली मुसळे शिल्पा चंदनशिवे वर्षाराणी पाटील व शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले यावेळी पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



5 वी लाठी नॅशनल चॅम्पियनशिप 2024

उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलने पटकावली

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी पाचव्या राष्ट्रीय लाठी अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेत नॅशनल लेव्हल वर प्रथम क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे तर प्रमुख उपस्थिती अँड आकांक्षा चौगुले सुजाता मोरे युसुफ मुल्ला यांची होती . या स्पर्धा गोवा येथे जवाहरलाल नेहरू इंडोर स्टेडियम मडगाव येथे नुकत्याच पार पडल्या. या लाठी नॅशनल चॅम्पियनशिप 2024 उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत असताना सुवर्णपदक व भव्य ट्रॉफी पटकावली या नॅशनल स्पर्धेत प्रशालेतील कुमारी ईश्वरी माने, स्नेहल कांबळे, अफसाना नदाफ, सृष्टी जाधव, श्रेयसी शिंदे या मुलींनी भाग घेतला होता.या स्पर्धेत यजमान गोवा, महाराष्ट्र, तेलंगाना, तामिळनाडू व इतर राज्यांनी सहभाग नोंदवला होता. यात जिल्हा परिषद हायस्कूलच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करून स्पर्धेत उत्कृष्ट यश राष्ट्रीय पातळीवर प्रथमच शाळेला मिळवून दिलेले आहे .या सर्व मुलींनी वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले आहे.या विद्यार्थिनींना लाठी प्रशिक्षक मोहम्मद रफी शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तर शालेय स्तरावर गेली तीन महिने ज्ञानज्योती सामाजिक संस्थेच्या सचिव अँड आकांक्षा चौगुले यांच्या सहकार्यातून शंभर मुलींना कराटे व लाठी प्रशिक्षण दिल्याने मुलींनी एवढे मोठे यश राष्ट्रीय स्तरावर मिळवल्याचे प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी सांगितले या यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने भव्य सत्कार करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यशस्वी विद्यार्थिनींचे उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी, युवा नेते किरण गायकवाड, अँड आकांक्षा चौगुले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे,अशोक पतगे, शिक्षण तज्ञ सदानंद शिवदे पाटील, गटशिक्षणाधिकारी

शिवकुमार बिराजदार, मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी अभिनंदन केले कार्यक्रमासाठी पालक विद्यार्थी शिक्षक व शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे सूत्रसंचालन श्रीमती शिल्पा चंदनशिवे तर आभार सोनाली मुसळे यांनी मानले कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.



दिल्ली येथील नॅशनल लाठी अजिंक्यपद स्पर्धेत

उमरगा जिल्हा परिषद हायस्कूल ला तीन सुवर्ण व एक कांस्यपदक

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी दिल्ली येथे आयोजित दुसऱ्या नॅशनल इंदोर मार्शल आर्ट गेम्स लाठी फेडरेशन कप अग्रवाल भवन बुद्ध विहार न्यू दिल्ली येथे 22 मे ते 25 मे 2025 दरम्यान आयोजित अजिंक्यपद स्पर्धेत विविध राज्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला या स्पर्धेमध्ये धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथील मुलींनी तीन सुवर्णपदक व एक कांस्यपदक पटकावून जिल्ह्याला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवून दिली 16 वर्षाखालील मुलींच्या लाठी क्रीडा प्रकारात प्रशालेतील कुमारी ईश्वरी माने, श्रेयशी शिंदे, अफसाना नदाफ, या विद्यार्थिनींनी सुवर्णपदक पटकावले तर श्रुती जाधव या विद्यार्थिनीला कांस्यपदक मिळाले. गेल्या वर्षभरात उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी गोवा येथे झालेल्या पाचव्या राष्ट्रीय लाठी चॅम्पियनशिप चे विजेतेपद पटकावले आहे तर जानेवारीमध्ये पिंपळनेर धुळे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय तेंग सुडो शालेय क्रीडा स्पर्धेत प्रशालेतील विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण दोन रोप्य तर चार कांस्य पदके मिळवली आहेत या यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख धनराज तेलंग यांचे मार्गदर्शन लाभले. एकाच वर्षात चार राष्ट्रीय स्पर्धेत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केल्याने धाराशिव जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष शिक्षणाधिकारी अशोक पाटील, गटशिक्षणाधिकारी काकासाहेब साळुंके,मुख्याध्यापक पद्माकर मोरे, केंद्रप्रमुख शिला मुदगडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे,शिक्षण तज्ञ सदानंद शिवदे पाटील, अशोक पतगे, बशीर शेख विद्यानंद सुत्रावे व शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी अनेक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे उमरगा तालुक्यात सर्वत्र विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

दैनिक आरंभ मराठी
28 May 2025 - Page 3
epaper.arambhmarathi.com

दिल्ली येथील नॅशनल लाठी अजिंक्यपद स्पर्धेत उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलला तीन सुवर्ण व एक कांस्यपदक

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी दिल्ली येथे आयोजित दुसऱ्या नॅशनल इंदोर मार्शल आर्ट गेम्स लाठी फेडरेशन कप अग्रवाल भवन बुद्ध विहार न्यू दिल्ली येथे २२ मे ते २५ मे २०२५ दरम्यान आयोजित अजिंक्यपद स्पर्धेत विविध राज्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथील मुलींनी तीन सुवर्णपदक व एक कांस्यपदक पटकावून जिल्ह्याला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवून दिली. १६ वर्षाखालील मुलींच्या लाठी क्रीडा प्रकारात प्रशालेतील ईश्वरी माने, श्रेयशी शिंदे, अफसाना नदाफ, या विद्यार्थिनींनी सुवर्णपदक पटकावले तर श्रुती जाधव या विद्यार्थिनीला कांस्यपदक मिळाले. गेल्या वर्षभरात उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी गोवा येथे झालेल्या पाचव्या राष्ट्रीय लाठी चॅम्पियनशिप चे विजेतेपद पटकावले आहे. तर जानेवारीमध्ये पिंपळनेर धुळे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय लेंग सुडो शालेय क्रीडा स्पर्धेत प्रशालेतील विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण दोन रोप्य तर चार कांस्य पदके मिळवली आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख धनराज लेलंग यांचे मार्गदर्शन लाभले. एकाच वर्षात चार राष्ट्रीय स्पर्धेत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केल्याने धाराशिव जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष शिक्षणाधिकारी अशोक पाटील, गटशिक्षणाधिकारी काकासाहेब साळुंके, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, केंद्रप्रमुख शिला मुदगडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे, शिक्षण तज्ञ सदानंद शिवदे पाटील, अशोक पतगे, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे व शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी अनेक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे उमरगा तालुक्यात सर्वत्र विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.



इन्स्पायर अवार्ड साठी उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलच्या तीन विद्यार्थ्यांची निवड

उमरगा येथील आय एस ओ मानांकित मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा अभियानात जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाचे यश संपादन केलेल्या टोबॅको फ्री जिल्हा परिषद हायस्कूलच्या तीन विद्यार्थ्यांची इन्स्पायर अवॉर्ड साठी निवड झालेली आहे हे शाळेला मिळालेलं सर्वात मोठे यश आहे इयत्ता आठवी वर्गात शिकत असलेल्या आदित्य सगरने सोलार पॉवर स्मार्ट कॉलिंग कॅप शेतकरी व लेबर यांना उपयोगी पडणाऱ्या साहित्याचे सादरीकरण केले. इयत्ता सातवी वर्गात शिकणाऱ्या वैष्णवी केदारे या विद्यार्थिनीने होममेड फूड प्रिझर्वेटिव्ह तर इयत्ता सहावी वर्गात शिकणाऱ्या कुलसुम उस्ताद या विद्यार्थिनीने बायो पेस्टिसाइड फॉर फार्मर या उपकरणाचे सादरीकरण केले होते या तीनही प्रकल्पाची इन्स्पायर अवॉर्ड साठी निवड झालेली आहे विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रकल्पाला प्रत्येकी दहा हजार रुपये मिळणार असून शाळेतील विज्ञान शिक्षिका ममता गायकवाड विद्यानंद सुत्रावे अटल तालुका समन्वयक ताज्योद्दीन सरवडे यांचे मार्गदर्शन लाभले विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ शकुंतला मोरे उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी गटशिक्षणाधिकारी जयराज पडवळ विस्ताराधिकारी काकासाहेब साळुंके केंद्रप्रमुख शिला मुदगडे अमर वरवटे अशोक पतगे सदानंद शिवदे पाटील सुजाता मोरे मुख्याध्यापक पद्माकर मोरे व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले शाळेतील विद्यार्थी पालक व समाजातील सर्व स्तरातून या विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

पुण्य नगरी

३ विद्यार्थ्यांची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड

उमरगा: शहरातील जिल्हा परिषद हायस्कूलच्या ३ विद्यार्थ्यांची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड झाली आहे. आयएसओ मानांकित मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा अभियानात जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाचे यश संपादन केलेल्या उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलच्या ३ विद्यार्थ्यांची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड झाली आहे. इयत्ता आठवी वर्गात शिकत असलेल्या आदित्य सगरने सोलार पॉवर स्मार्ट कॉलिंग कॅप शेतकरी व लेबर यांना उपयोगी पडणाऱ्या साहित्याचे सादरीकरण केले. इयत्ता सातवी वर्गात शिकणाऱ्या वैष्णवी केदारे या विद्यार्थिनीने होममेड फूड प्रिझर्वेटिव्ह

प्रत्येकी १० हजार रुपयाचे बक्षीस मिळणार





तर इयत्ता सहावी वर्गात शिकणाऱ्या कुलसुम उस्ताद या विद्यार्थिनीने बायो पेस्टिसाइड फॉर फार्मर या उपकरणाचे सादरीकरण केले होते. या तीनही प्रकल्पाची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रकल्पाला प्रत्येकी १० हजार रुपये मिळणार असून शाळेतील विज्ञान शिक्षिका ममता गायकवाड, विद्यानंद सुत्रावे, अटल तालुका समन्वयक ताज्योद्दीन सरवडे यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आ. प्रवीण स्वामी, गटशिक्षणाधिकारी जयराज पडवळ, विस्ताराधिकारी काकासाहेब साळुंके, केंद्रप्रमुख शिला मुदगडे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शकुंतला मोरे, अमर वरवटे, अशोक पतंगे, सदानंद शिवदे पाटील, सुजाता मोरे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे व सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

Osmanabad Edition
Mar 20, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा धाराशिव जिल्ह्यात द्वितीय

गतवर्षी तीन लाख या वर्षी पाच लाखाचे बक्षीस

उमरगा येथील आयएसओ मानांकित व टोबॅको फ्री जिल्हा परिषद हायस्कूल ला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा दोन मध्ये धाराशिव जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळाला आणि शाळेला पाच लाखाचे बक्षीस मिळाले शाळेने गेल्या वर्षी तालुक्यातील प्रथम क्रमांकाचे तीन लाखाचे बक्षीस मिळविले होते पाच वर्षात केलेल्या शैक्षणिक प्रगतीमुळे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे यांचे मार्गदर्शन आणि सर्व शिक्षकांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे फळ मिळाले अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी दिली.विविध प्रकारचे चाकोरी बाहेरील शिक्षण. स्पर्धात्मक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक कृती निर्माण होऊन त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळावी व त्यांना खऱ्या अर्थाने बाहेरच्या जगाची ओळख व्हावी यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. शाळेने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांचे आरोग्य स्वच्छता पर्यावरण क्रीडा या विविध माध्यमातून शैक्षणिक संपादनुकीस महत्त्व दिलेले आहे. शाळेत विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यासाठी पायाभूत सुविधा, सुसज्ज इमारत, अत्याधुनिक प्रयोगशाळा, भव्य क्रीडांगण, रनिंग ट्रॅक, अटल टिंगरिंग लॅब उच्च दर्जाच्या वर्ग खोल्या, शालेय ग्रंथालय, वाचन कोपरे, सुंदर कार्यालय, पाच हजार वृक्षाची लागवड करून तयार झालेले मियावाकी जंगल निर्मितीमुळे हिरवा गार परिसर,इको क्लब निर्मिती, खेळाचे भव्य क्रीडांगण, आकर्षक इमारत व रंगरंगोटी, उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे, सेंद्रिय परसबाग निर्मिती, तंबाखू मुक्त शाळा, शासन स्तरावरील ध्येय धोरणांची अंमलबजावणी, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प, जल पुनर्भरण प्रकल्प, विविध विद्यार्थी लाभाच्या शिष्यवृत्ती चा विद्यार्थ्यांना लाभ, अनेक समित्यांची प्रभावी अंमलबजावणी, दहा लाख रुपये लोकवाटा जमा माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य,समग्र प्रगती पुस्तक एच पी सी ची प्रभावी अंमलबजावणी, साक्षरता कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी, पाचवी व आठवी स्कॉलरशिप व एन एम एम एस परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश, गेल्या पाच वर्षांत दहावीच्या निकालाची उज्वल परंपरा, केंद्र शासनाच्या वतीने स्किल डेव्हलपमेंट साठी रिटेल व हेल्थकेअर हा अभ्यासक्रम 9 वी व 10 वी साठी राबवणारी तालुक्यातील एकमेव शाळा, स्काऊट गाईड उपक्रमात खरी कमाई मध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक, शाळेतील शंभर टक्के मुलींना गाईडचा गणवेश गाईडच्या विद्यार्थिनी चे उत्कृष्ट संचलन पथक व झांज पथक निर्मिती, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात शाळेचे उत्कृष्ट राज्य स्तरावर यश, आय सी टी लॅब आस्ट्रॉनॉमी क्लब,मिनी सायन्स लॅब, इंग्रजी लॅब गणित लॅब, हॅन्डवाश स्टेशन या सुविधांमुळे शैक्षणिक संपाद्णुकीत शाळेने उत्कृष्ट कार्य केलेले आहे. मुलींची गळती थांबवण्यासाठी मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांची नाविन्यपूर्ण सायकल बँक,तीस अनाथ विद्यार्थी दत्तक पालक योजना, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दानशूर पालकांनी चालू केलेला गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा लाटी-काटी राज्यस्तरीय स्पर्धेत व रंगोत्सव सेलिब्रेशन मुंबई तर्फे आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत 19 विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल यामुळे ही शाळा अनेक नामांकित संस्थेच्या यादीत ही अग्रक्रमाने ओळखली जाते शाळेच्या या यशात उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले युवा नेते किरण गायकवाड शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे शिक्षण तज्ञ सदानंद शिंदे पाटील, अशोक पतगे, शंकर सुरवसे, अमर वरवटे किसन खंडागळे शाळेचे माजी विद्यार्थी, पालक व उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींचे मोलाचे सहकार्य लाभले तंत्रस्नेही शिक्षक संजय रूपाजी, विद्यानंद सूत्रावे,धनराज तेलंग, बशीर शेख, सरिता उपासे, शिल्पा चंदनशिवे, ममता गायकवाड, सोनाली मुसळे,सदानंद कुंभार, सुनिता राठोड वनमाला वाले नारायण अंकुशे या सर्व शिक्षकांच्या परिश्रमामुळे हे यश प्राप्त झाले आहे.






जिल्हा परिषद प्रशाला
Z.P.HIGH SCHOOL

राष्ट्रीय आदर्श शाळा पुरस्कार

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल ला आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था राळेगणसिद्धी यांच्याकडून दिला जाणारा मानाचा राष्ट्रीय आदर्श शाळा पुरस्कार 2025 मिळालेला आहे हा पुरस्कार 3 जून रोजी राळेगणसिद्धी येथे थोर समाजसेवक पद्मश्री पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष पर्यावरण मित्र देवा तांबे अँड चन्ना शरद बाबू अध्यक्ष बार असोसिएशन सुप्रीम कोर्ट विशाखापटनम, संतोष गायके पोलीस अधीक्षक गोरेगाव मुंबई, विठ्ठलराव जाधव माजी पोलीस महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे विस्तार अधिकारी संतोष माळी क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख राम साळुंके,यांनी स्वीकारला गेल्या पाच वर्षात शाळेने गुणवत्ता, पायाभूत सुविधा, पर्यावरण, मुलींचे शिक्षण, शाळेच्या भौतिक गरजा विविध नाविन्यपूर्ण राबविलेले उपक्रम, लोकवाटा, मियावाकी जंगल निर्मितीतून पर्यावरणाचे केलेले संरक्षण, विविध स्पर्धा परीक्षेतील शाळेचे यश, लाठीकाठी दांडपट्टा कराटे यासारख्या देशी खेळातून मुलींना स्वसंरक्षणासाठी शाळेने केलेले उत्तम कार्य,आदि शैक्षणिक उपक्रम राबवून शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात सतत दोन वर्ष आठ लाखाचे मिळवलेले पारितोषिक लिटल प्लॅनेट फाउंडेशन व ऊर्जा कडून महाराष्ट्र व गोवा राज्यातील 10 उत्कृष्ट शाळेत मिळविलेले स्थान व शाळेला मिळालेले पन्नास हजाराचे पारितोषिक या गोष्टींमुळे शाळेला राष्ट्रीय आदर्श शाळा पुरस्कार मिळालेला आहे शाळेला मिळालेल्या पुरस्काराबद्दल उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी धाराशिव जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष शिक्षणाधिकारी अशोक पाटील, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके,केंद्रप्रमुख शीला मुदगडे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे शिक्षण तज्ञ सदानंद शिवदे पाटील अशोक पतगे अमर वरवटे सुजाता मोरे व शाळेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले शाळेला मिळालेला पारितोषिकामुळे शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.



अटल टिकरिंग लॅब कार्यान्वित

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये अटल टिंकरिंग लॅब कार्यान्वित करण्यात आली असून या लॅबमध्ये विद्यार्थ्यासाठी अत्याधुनिक साधने उपलब्ध झालेली आहेत. त्यात थ्रीडी प्रिंटर शोल्डर मशीन रोबोट तयार करण्यासाठीची साधने, विविध प्रकारचे सेन्सार,डी. सी. मोटार,शिलाईमशिन,हार्डवेअर साहित्य,थ्रीडी पेन, इलेक्ट्रॉनिक्स हत्यारे इत्यादी साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या नवनिर्माण क्षमतेला चालना मिळणार असून भविष्यातील स्पर्धात्मक व कौशल्य विकास शिक्षणाची माहिती आता विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर होणार आहे. अटल इंनोवेशन मिशन हा भारत सरकारच्या निती आयोगामार्फत तालुक्यातील मोजक्या शाळेत सुरू करण्यात आले आहे.अटल इन्चार्ज म्हणून प्रशालेतील शिक्षक बशिर शेख याची निवड करण्यात आली आहे.नावीन्यपूर्ण आणि उद्योजकतेची परीसंस्था उभी करून देशातील लक्षावधी तरुणांना आपले स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी या लॅबचा उपयोग होणार आहे .यातून विद्यार्थ्यांची कल्पकता, इनोवेशन, आर्थिक विचार,सामाजिक आणि अंतर सांस्कृतिक सहयोग, नैतिक नेतृत्व,यासहित एकविसाव्या शतकात लागणारी महत्त्वाची कौशल्य छोट्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणार आहेत. भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करणे आणि नवीन आव्हाने पेलण्यास विद्यार्थ्यांना तयार करून तरुण इनोव्हेटर्स ची फळी निर्माण करणे हा उद्देश या लॅबचा आहे. प्रात्यक्षिक उपक्रमाच्या सहाय्याने शालेय अभ्यासक्रम एकात्मिक केले जाऊन विद्यार्थी,टिन्कर्स,निर्माते,आणि शेवटी इनोव्हेटर्स अशा वेगवेगळ्या स्तरातून यशस्वीपणे वाटचाल करण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेशी संधी उपलब्ध होणार आहे . मुलांच्या बौद्धिक संपदा सादरीकरण कौशल्य आणि इनोव्हेशन द्वारे इतर महत्त्वपूर्ण कौशल्य संकल्पनाची देखील ओळख होणार आहे. विद्यार्थ्यांसाठी रोबोट तयार करणे, वेगवेगळ्या इलेक्ट्रिक वस्तू तयार करणे, स्पर्धेत नवीन साधने निर्माण करणे, इत्यादी कला आत्मसात होणार आहेत,अटल टिंकरिंग लॅब चा उपयोग करण्यासाठी इतर शाळेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात येणार असून त्याचे वेळापत्रक तयार करून परिसरातील शाळेना अटल टिंकरिंग लॅबची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी दिली.



सहा विद्यार्थी पाचवी शिष्यवृत्तीधारक

उमरगा येथील आय एस ओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल मधील पाचवीचे 14 पैकी 12 विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले होते त्यातील 6 विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले आहेत शिष्यवृत्तीधारक झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा केंद्रप्रमुख शिला मुदगडे मुख्याध्यापक पद्माकर मोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेतून सर्वप्रथम साकीब हन्नुरे 228 गुण आयशा कबीर 224 गुण श्रावणी कल्लीमुळे 222 गुण सिमरन जमादार 222 गुण ज्योती राऊत 216 गुण जैद मुल्ला 210 गुण घेऊन शिष्यवृत्ती धारक झाले आहेत.गेल्या चार वर्षांत प्रशालेचे 10 विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेतील शिक्षक संजय रुपाजी, शिल्पा चंदनशिवे सोनाली मुसळे वर्षा राणी पाटील यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी युवा नेते किरण गायकवाड आकांक्षा चौगुले शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे,अमर वरवटे, अशोक पतगे, शिक्षणतज्ञ सदानंद शिवदे पाटील मुख्याध्यापक पद्माकर मोरे गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत काकासाहेब साळुंके केंद्रप्रमुख शिला मुदगडे यांनी अभिनंदन केले 2025 मध्ये झालेल्या दहावी परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आणि त्यानंतर पाचवी स्कॉलरशिप मध्ये मोठे यश मिळाल्याने जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा शाळेने सर्व क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध केलेली आहे असे मत मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी मांडले

पुण्य नगरी

In Short

उमरगा जि.प.हायस्कूलचे ६ विद्यार्थी पाचवी शिष्यवृत्तीधारक



उमरगा : येथील आय एस ओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल मधील पाचवीचे १४ पैकी १२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी ठरले आहेत. यातील ६ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले आहेत. शिष्यवृत्तीधारक सर्व विद्यार्थ्यांचा केंद्रप्रमुख शिला मुदगडे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेतून सर्वप्रथम साकीब हन्नुरे २२८ गुण, आयशा कबीर २२४ गुण, श्रावणी कल्लीमुळे २२२ गुण, सिमरन जमादार २२२ गुण, ज्योती राऊत २१६ गुण, जैद मुल्ला २१० गुण घेऊन शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. गेल्या चार वर्षांत प्रशालेचे १० विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेतील शिक्षक संजय रुपाजी, शिल्पा चंदनशिवे, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

दहावीचा निकाल 100 टक्के

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूल चा दहावीचा निकाल 97.14 टक्के लागला होता व प्रशालेतील मनीषा पवार या विद्यार्थिनींला इंग्रजी विषयात फेर पडताळणीमध्ये 35 गुण मिळाले व ही विद्यार्थिनी उत्तीर्ण होऊन नवीन गुणपत्रक मिळाल्यामुळे प्रशालेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यामुळे शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे शाळेच्या इतिहासामध्ये शंभर टक्के निकाल लागण्याची शाळेची ही पहिलीच वेळ आहे गेल्या पाच वर्षात तीन वेळा शाळेचा निकाल 100% लागलेला आहे.विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे सुजाता मोरे बशीर शेख सरीता उपासे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी प्रशालेत प्रथम आलेली सृष्टी बिराजदार 94.00 दवितीय ममता वरवटे 82.00 टक्के तर तृतीय आलेला साहील बानकर 79.40 टक्के तसेच विशेष प्राविण्या सह उत्तीर्ण झालेला यासिन खैराटे 75.00 टक्के या विद्यार्थ्यांचा पण सत्कार करण्यात आला.शाळेतील प्रथम श्रेणीत 21 द्वितीय श्रेणीत 15 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.यावेळी मनीषा पवार या विद्यार्थिनींचा सत्कार करून तिला अकरावी प्रवेशाची संधी उपलब्ध करून दिली यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



खरी कमाई मध्ये जिल्ह्यात प्रथम

उमरगा येथील आय एस ओ मानांकित व मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळविलेल्या उमरग्याच्या जिल्हा परिषद हायस्कूल ने भारत स्काऊट आणि गाईड धाराशिव कडून आयोजित खरी कमाई स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कूल येरमाळा येथे स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्यात उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार मा. प्रवीण स्वामी उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे विस्तार अधिकारी संतोष माळी जिल्ह्याचे स्काऊट मुख्य संघटक विक्रांत देशपांडे यांच्या उपस्थितीमध्ये शाळेला ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावर्षी जिल्हा परिषद हायस्कूल येथील स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी 22000 रुपयाची उलाढाल करून सहा हजार रुपये नफा कमवून खरी कमाई करून जिल्ह्यात सर्वाधिक खरी कमी करण्याचा मान मिळवला मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्काऊट शिक्षिका शिल्पा चंदनशिवे ममता गायकवाड सरिता उपासे सोनाली मुसळे यांचा प्रयत्नाने विद्यार्थ्यांनी खरी कमाई करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला यामध्ये इयत्ता नववीच्या वर्गातील माहीन शानेदिवाण अश्विनी जाधव श्रुती जाधव कुलसुम उस्ताद,जोया मोमीन, पलक वरवटे,वैष्णवी केदारे,आदित्य सगर,शिवदर्शन शिंदे या विद्यार्थिनींनी शाळेत सर्वाधिक खरी कमाई केल्याने त्यांचा पण सत्कार करण्यात आला. शाळेला मिळालेल्या या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे शंकर सुरवसे सदानंद शिवदे पाटील अशोक पतगे अमर वरवटे गटशिक्षणाधिकारी विजयराज पडवळ,विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके केंद्रप्रमुख शिला मुदगडे आणि शाळेतील इतर व शिक्षकांनी अभिनंदन केले.

जिल्हा परिषद हायस्कूल 'खरी कमाई' मध्ये जिल्ह्यात प्रथम

उमरगा, ता. २५ (बातमीदार) : भारत स्काऊट आणि गाईड उस्मानाबाद यांच्या वतीने 'खरी कमाई' उपक्रमात उमरग्याच्या जिल्हा परिषद हायस्कूलने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्यात उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष नेताजी पाटील, अस्मिता कांबळे, शिक्षणाधिकारी माध्यमिक गजानन सुसर, माजी शिक्षणाधिकारी विद्याधर जगताप जिल्ह्याचे स्काऊट मुख्य संघटक विक्रांत देशपांडे, जिल्हा संघटक श्रीमती सत्रे यांच्या उपस्थितीमध्ये शाळेला ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

यावर्षी जिल्हा परिषद हायस्कूल उमरगाच्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्काऊट शिक्षिका शिल्पा चंदनशिवे, ममता गायकवाड, सरिता उपासे सोनाली मुसळे यांच्या नियोजनाने सात हजार साहाशे रुपयेचीखरी कमाई करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला, यामध्ये इयत्ता नववीच्या वर्गातील नादिया शनेदिवान, प्रतीक्षा मोरे, भूमिका दुबे या विद्यार्थिनींनी शाळेत सर्वाधिक खरी कमाई केल्याने त्यांचाही सत्कार करण्यात आला.

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, शंकर सुरवसे, सदानंद शिवदे- पाटील, अशोक पतगे, गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके, केंद्रप्रमुख शिला मुदगडे आदींनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



उमरगा : भारत स्काऊट आणि गाईडच्या 'खरी कमाई' उपक्रमात जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविल्याने जिल्हा परिषद हायस्कूलला पारितोषक देताना पाटील, अस्मिता कांबळे, गजानन सुसर आदी.

जिल्हा परिषद हायस्कूल उमरगाला सुंदर माझे कार्यालय पुरस्कार

उमरगा : आय. एस. ओ. मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा शाळेला जिल्ह्यातील सुंदर माझे कार्यालय पुरस्कार उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अस्मिता कांबळे यांच्या हस्ते प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे अटल इन्चार्ज बशिर शेख याना प्रदान करण्यात आला. यावेळी महिला व बालकल्याण सभापती रत्नमाला टेकाळे जिल्हा परिषद सदस्या उषा येरकर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नवाळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पी. एस. राऊत, नितीन दाताळ,बळीराम निपाणीकर,अनंत कुंभार शिक्षणाधिकारी माध्यमिक गजानन सुसर विविध विभागाचे अधिकारी पदाधिकारी जिल्ह्यातील मुख्याध्यापक व सर्व विभागाचे कर्मचारी उपस्थित होते .सुंदर माझे कार्यालय ही संकल्पना विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी गेल्या वर्षभरामध्ये मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविली. या संकल्पनेला उस्मानाबाद जिल्ह्यातून भरभरून प्रतिसाद मिळाला. गेल्या वर्षभरामध्ये गुणवत्ता विकास, शालेय रेकॉर्ड, परिसर स्वच्छता,मियावाकी जंगलनिर्मिती, तंबाखू मुक्त शाळा, परसबाग निर्मिती,वृक्षारोपण, अटल टिंकरिंग लॅब, मिनी सायन्स लॅब,स्पर्धा परीक्षा, व विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व परिसर स्वच्छतेसाठी शाळेतील प्रत्येक शिक्षकांनी घेतलेल्या कठीण मेहनतीचे हे फळ असल्याची प्रतिक्रिया यावेळी मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी व्यक्त केले. प्रशालेतील क्रीडाशिक्षक बाबासाहेब जाधव. धनराज तेलंग. चंद्रशेखर पाटील, बलभीम चव्हाण, संजय रूपाजी, सदानंद कुंभार, सरिता उपासे, सोनाली मुसळे, ममता गायकवाड, शिल्पा चंदनशिवे,सुनिता राठोड, वनमाला वाले व कनिष्ठ सहाय्यक नारायण अंकुशे या सर्व कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून शाळेला हे यश मिळाले आहे. शाळेच्या या उल्लेखनीय प्रगतीबद्दल तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले माजी बांधकाम सभापती अभय चालुक्य समाजकल्याण सभापती दिग्विजय शिंदे. युवानेते किरण गायकवाड. सुरेश दाजी बिराजदार शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, उपाध्यक्ष शंकर सुरवसे, अशोक पतगे, गटविकास अधिकारी कुलदीप कांबळे,गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, विस्ताराधिकारी महाबोले केंद्रप्रमुख शीला मुदगडे यांनी सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्ताराधिकारी संतोष माळी तर आभार कक्ष अधिकारी सुरेश वाघमारे यांनी मानले.





।। बहुतांच्या कामास यावे, बहुतांच्या सुखी सुखावे ।।

जिल्हा परिषद, उस्मानाबाद

'सुंदर माझे कार्यालय अभियान' २०२०-२१

सन्मान पत्र

मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे संकल्पनेतून जिल्हा परिषद उस्मानाबादच्या वतीने 'सुंदर माझे कार्यालय अभियान' सन २०२०-२१ मध्ये सर्व कार्यालयांमार्फत आयोजित करण्यात आले होते. सदर अभियानामध्ये आपल्या जि.प. प्रशाला उमरगा विभागाने सर्वोत्कृष्ट कार्य केले आहे. सदर कार्याची दखल घेवून आपणास हे सन्मानपत्र देवून गौरविण्यात येत आहे.

राहूल गुप्ता (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद

अस्मिता कांबळे
अध्यक्ष, जि.प. उस्मानाबाद

जिल्ह्यात पहिले हायस्कूल

टोबॅको फ्री स्कूल चे प्रमाणपत्र मिळाले.....

उमरगा : येथील आय .एस. ओ.मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल ने सलाम मुंबई फाउंडेशनच्या तंबाखूमुक्त शाळेचे नऊ निकष पूर्ण करुन जिल्ह्यातील पहिले तंबाखूमुक्त हायस्कूल होण्याचा मान मिळवला आहे .यासाठी गेल्या दोन महिन्यापासून प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे व तंत्रस्नेही शिक्षक संजय रुपाजी यांनी केलेल्या प्रयत्नाला यश मिळाले . शाळा तंबाखू मुक्त करण्यासाठी शाळेचे माजी विद्यार्थी दंतरोग तज्ञ डॉ.यतिराज बिराजदार यांनी सर्व विद्यार्थ्यांची मुख् तपासणी करून शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांना तंबाखू मुक्ती ची शपथ देण्यात आली. सौ.शकुंतला मोरे यांच्या अध्यक्षतेखाली तंबाखू नियंत्रण समिती स्थापन करण्यात आली.उमरग्याचे पोलीस निरीक्षक मुकुंद अघाव हे या समितीचे उपाध्यक्ष आहेत.आता शाळेतील एकही शिक्षक तंबाखू खात नाहीत या शैक्षणिक संस्थेच्या शंभर मीटर परिसरात असलेल्या भागात सिगारेट व इतर तंबाखू जन्य पदार्थाची विक्री करण्यास कडक निर्बंध घालण्यात आलेले आहेत. यासाठी गेल्या महिनाभरात प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी तंबाखूच्या दुष्परिणामाचे स्लोगन तयार करून वातावरण निर्मिती केली. तंबाखू मुक्त शाळा करण्यासाठी प्रभात फेरी, रांगोळी स्पर्धा बरोबरच शाळेत तंबाखूमुक्त मॉनिटर्स नेमण्यात आलेले आहेत. शिक्षकांमधून सोनाली मुसळे .संजय रुपाजी तर विद्यार्थ्यांमधून पायल काळे .यासीन खैराटे. आयान मुगले. नादिया शानेदिवान यांना तंबाखूमुक्त मॉनिटर्स नेमण्यात आलेले आहे. शाळा तंबाखू मुक्त करण्यासाठी प्रशालेतील शिक्षक बाबासाहेब जाधव. बशीर शेख. धनराज तेलंग .चंद्रशेखर पाटील. बलभीम चव्हाण .सदानंद कुमार. सरिता उपासे .शिल्पा चंदनशिवे. ममता गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले .या यशासाठी तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले शालेय

व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे. उपाध्यक्ष शंकर सुरवसे .अशोक पतगे. श्याम भोसले. गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार. विस्तार अधिकारी महाबोले बी.एस.केंद्रप्रमुख शीला मुदगडे . जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बालाजी नगर चे मुख्याध्यापक बाबुराव पवार. यांनी मुख्याध्यापक व शिक्षकांचे अभिनंदन केले.



जिल्हा परिषद प्रशाला, उमरगा

विद्यार्थी लाभाच्या योजना

योजनेचे नाव	५ ते ७ लाभार्थी	रक्कम प्रत्येकी	८ ते १० लाभार्थी	रक्कम प्रत्येकी
सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती	03	1000	13	1500
मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती	--	1000	03	1500
अपंग शिष्यवृत्ती	02	2000	05	2500
१० वी परीक्षा फीस	--	--	13	0420
डॉ. बा.आं. मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती	--	--	03	1500
गुणवत्ता शिष्यवृत्ती	06	0600	09	1000
सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती	08	2000	15	2250
अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती	36	1000	30	1000
एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती	--	--	05	12000
इन्स्पायर अॅवार्ड शिष्यवृत्ती	--	--	01	10000
५ वी व ८ स्कॉलरशीप	03	5000	--	7500
शालेय पोषण आहार	205	--	135	--
मोफत पाठ्यपुस्तके	205	--	--	--
मोफत गणवेश	205	600	--	--
मोफत बुट सॉक्स	205	170	--	--

पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमता वाढविण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे पूर्ण नाव - पीमश्री जवाहरलाल नेहरू नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा रामनगर

शाळेचा पत्ता - रामनगर, गडचिरोली, ता.जि.गडचिरोली.

शाळेचा ईमेल आयडी - jnupsgadchiroli@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. सुधीर विठ्ठल गोहणे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9423423351

मुख्याध्यापक ईमेल आयडी - sudhir9gohne@gmail.com

ईमेल आयडी - jnupsgadchiroli@gmail.com

विशेष कामगिरी - "माझी शाळा सुंदर शाळा" स्पर्धेत राज्यस्तरवर तृतीय क्रमांक


शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था शाळांमध्ये पायाभूत शिक्षण - मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यात सक्षम करण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न

प्रस्तावना -

शिक्षण हा व्यक्तिमत्व विकासाचा पाया आहे. प्राथमिक शाळांमध्ये मिळणारे शिक्षण हे मुलांच्या बौद्धिक,सामाजिक आणि भावनिक विकासासाठी अत्यंत आवश्यक ठरते. शासनाने सुरू केलेल्या "निपुण भारत अभियान" अंतर्गत शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था शाळांमध्ये पायाभूत शिक्षणात म्हणजे मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यांमध्ये सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना सक्षम करणे हे प्रमुख उद्दिष्ठ ठेवण्यात आले आहे. हेच उद्दिष्ठ समोर ठेऊन नगर परिषदेच्या १०५८ विद्यार्थी संख्या असलेल्या पीमश्री जवाहरलाल नेहरू नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा रामनगर,गडचिरोली येथील मुख्याध्यापक श्री. सुधीर विठ्ठल गोहणे यांनी घेतलेली पुढाकाराची भूमिका ही प्रेरणादायी ठरली आहे.

मुख्याध्यापकांनी राबविलेले उपक्रम -

अध्ययन स्तर निश्चिती : - शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला इयत्तानिहाय सर्व विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी घेऊन अध्ययन स्तर निश्चिती केली गेली. त्यानुसार स्तरनिहाय विद्यार्थ्यांचे गट करून निम्न स्तरात असलेल्या विद्यार्थ्यांना १ तास अतिरिक्त वर्ग घेऊन अध्यापन केले गेले. अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर , डिजीटल साधने ऊपयोगात आणली गेली. यांमुळे विद्यार्थ्यात वाचन व लेखनात प्रगती दिसून आली. प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या दिवशी अशा विद्यार्थ्यांचा शाळा व्यवस्थापन समिती समक्ष प्रगती अहवाल सादर केला.











वाचन स्पर्धा :- मराठी , इंग्रजी या विषयाचे वाचन गतिशील होण्यासाठी १ मिनिट वाचन स्पर्धा तसेच शालेय दिनक्रमात एक तासिका ग्रंथालयातील पुस्तके वाचण्यासाठी दिला. वाचन सम्राट स्पर्धा घेतली गेली यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची उत्सुकता वाढू लागली. यामुळे लेखन व शब्दसंपत्ती वाढली.

गणित जत्रा :- विद्यार्थ्याना गणिताचा संबोध स्पष्ट होण्यासाठी गणित जत्रेचे आयोजन केले. संख्याज्ञानावर तसेच विविध घटकावर शैक्षणिक साहित्य तयार करून अध्यापनात त्या साहित्याचा वापर करून संख्याज्ञानाचा संबोध स्पष्ट केला. परिसरातील साहित्यातून गणिताची ओळख देण्यात आली यामुळे विद्यार्थी संख्या वाचू व लिहू लागले.

मासिक पालक सभा : - घरी मुलांना वाचनाची आवड लागावी यासाठी 'पालक वाचन योजना' राबविली गेली. या सभेत विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी चर्चा करून पालकांना घरी मूलभूत अभ्यासासाठी प्रोत्साहित केल्या जाते.

शिक्षक मित्र :- उच्च प्राथमिक वर्गातील हुशार विद्यार्थ्याना 'शिक्षक मित्र' बनविले यातून विद्यार्थ्याना शिकण्यास मदत मिळाली.

खेळातून शिक्षण :- संख्या वाचन व लेखन समृद्ध करण्यासाठी अंकाची संगीत खुर्ची , तळ्यात मळ्यात , अंकाची सापशीडी असे खेळ घेऊन बेरीज – वजाबाकी संकल्पना स्पष्ट होऊन विद्यार्थी संख्या वाचन व बेरीज वजाबाकीची उदाहरणे सोडवू लागली.

स्वमूल्यांकन :- मासिक चाचणीनंतर विद्यार्थ्यांना स्वत:च्या प्रगतीचे मूल्यांकन करता यावे म्हणून स्वमूल्यांकन पत्रके देण्यात आली.यामुळे त्यांच्यात आत्मचिंतन व सुधारणा करण्याची संधी मिळाली याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये दिसून आला.

परिणाम :-

सदर उपक्रम राबविल्यानंतर चार महिन्यात ९५% विद्यार्थी वाचन , लेखन व संख्यावरील क्रिया करू लागले. उपस्थितीचे प्रमाण वाढले. १२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाली. **विशेष कामगिरी – "माझी शाळा सुंदर शाळा" स्पर्धेत राज्यस्तरावर तृतीय क्रमांक शाळेस प्राप्त झाला.**





दुर्गम,आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवणीपाठ

शाळेचा पत्ता : मु. शिवणीपाठ पो. बोरी ता. अहेरी जि. गडचिरोली पिन कोड :- 442705

मुख्याध्यापकाचे पूर्ण नाव : श्री. रविंद्र रत्नाकर यमसलवार

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक : 8329816765


मुख्याध्यापक ई मेल : raviyamsal@gmail.com

शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/अनुदानित शाळांमध्ये पायाभूत शिक्षण मूलभूत साक्षरता आणि संख्या ज्ञान यात सक्षम करण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न.

प्रास्ताविक -

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त शिवणीपाठ हे गाव घनदाट जंगलांनी वेढलेले, गोंड-माडी आदिवासी समाजाची वस्ती असलेले, अत्यंत मागास भागातले एक लहानसे गाव. गावातील बहुसंख्य लोक गोंडी भाषिक असून शिक्षण, आरोग्य, संपर्कसुविधा यासारख्या मूलभूत सेवा अत्यंत मर्यादित आहेत. अशा परिस्थितीत शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणण्याचा निर्धार मुख्याध्यापकांनी केला.शाळेतील मुलांना मराठी समजत नव्हती, गोंडी भाषा हीच त्यांच्या व्यवहाराची भाषा होती. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेतून शिकवत प्रमाण भाषेकडे नेण्याचा प्रयत्न केला. स्थानिक संसाधनांचा उपयोग, बोलीभाषा-अनुकूल अध्यापन पद्धती, मुलांच्या भाषेत संवाद, रंजक व कृतीशील शिक्षण, गावकऱ्यांचा सहभाग आणि विद्यार्थ्यांमध्ये जीवनकौशल्य विकास या सर्वांचा समन्वय साधून एक प्रेरणादायी बदल घडवून आणला.शाळेची ओसाड इमारत 'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून एक प्रेरणास्थान ठरली. शाळेच्या परसबाग स्पर्धेत प्रथम क्रमांक,पंतप्रधान पोषण शक्ती योजना अंतर्गत जिल्हास्तरीय पाक कृती स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी दाखविलेले यश यामुळे शाळेचे कौतुक झाले. गाव 100% साक्षर करण्यासाठी राबवलेल्या प्रयत्नांमुळे गाव प्रगतीपथावर आहे.नवसाक्षरांच्या जिल्हास्तर उल्हास कार्यक्रमात प्रथम क्रमांक पटकावला.या प्रास्ताविकाच्या माध्यमातून 2018 पासून सुरू झालेल्या शिक्षणप्रवासाची साक्ष आपण घेणार आहोत — अडचणी, प्रयत्न, सहभाग आणि परिवर्तन या साऱ्या टप्प्यांची प्रेरणादायी यशोगाथा.

क्षेत्र — शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/अनुदानित शाळांमध्ये पायाभूत शिक्षण मूलभूत साक्षरता आणि संख्या ज्ञान यात सक्षम करण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न.



1.गुणवत्तापूर्ण अध्यापनाची व्यवस्था

उद्दिष्ट : विद्यार्थ्यांमध्ये वाचन, लेखन, संख्याज्ञान आणि जीवन कौशल्ये यांचा विकास व्हावा.

कृती : शिक्षकांनी FLN (Foundational Literacy & Numeracy) प्रशिक्षण घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी शाळेत केली..वाचन , लेखन,संख्याज्ञान यावर आधारित विविध उपक्रम शाळेत आयोजित केले.. एक एका उद्दिष्टावर कार्य करून सर्व मुलांना अपेक्षित पातळीपर्यंत नेण्यात आले.

कृती - आधारित, आनंददायी शिक्षणावर भर.

शिक्षणात टीएलएम (Teaching Learning Material), कथाकथन, खेळ, गाणी यांचा वापर करण्यात आला.

2.मूलभूत साक्षरता वाढीसाठी उपक्रम

2.1 वाचन कट्टा / वाचन तास

परिपाठाच्या वेळी दररोज 20—30 मिनिटांचा वाचन तास घेऊन

गोष्टी, कविता, बालभारती, चित्रमय पुस्तकांचा समावेश.

विद्यार्थी एकमेकांसमोर वाचन करायला लावले

2.2 कथा वाचन सत्र

शिक्षक, पालक, वरिष्ठ विद्यार्थी कथा सांगतात,कथेनंतर चर्चा: “कथेचा अर्थ काय?”, “काय शिकायला मिळालं?” याची चाचपणी करण्यात आली.

2.3 शब्दकोश / अक्षर साखळी

विद्यार्थ्यांनी नवीन शब्दांची साखळी तयार करणे.

शब्द भिंती लावून भाषा समृद्ध करणे. अक्षर साखळी हा कृतीयुक्त खेळ शाळेत घेण्यात आला.

2.4 नाटक व संवादाभिनय

मुलांनी लहान नाटके सादर करण्याची संधी देण्यात आली

संवादातून भाषिक आत्मविश्वास निर्माण करणे, सभाधिटपणा , अभिनयाचा सराव देण्यात आला.

2.5 मुलांचे वाचन कोपरे (Reading Corners)

प्रत्येक वर्गात रंगीत, चित्रमय पुस्तकांची व्यवस्था करण्यात आली

विद्यार्थी स्वतःहून पुस्तक घेऊन वाचन करतात. मुलांना वाचन केल्यानंतर मनन करायला लावून वाचललेलं वहीत उतरवायला लावले... मुलांना आनंदाने आपल्या भाषेत लेखन करायला लावले.

3. संख्याज्ञानासाठी उपक्रम


3.1 गणित मेला (Math Mela)

गणितीय खेळ, आकडेमोडी, पझल्स यांचे आयोजन करून गणिती शिक्षण अतिशय रंजकतेने दिले. भूमितीक परसबाग यातून मुलांना भौमितिक आकृत्यांचे चालता बोलता शिक्षण देण्यात आले. शाळेत गणिती मेलाचे आयोजन करून त्यात विद्यार्थ्यांना सादरीकरण व सहभागासाठी संधी देण्यात आली.

3.2 घटकाधारित शिक्षण (Activity-Based Learning)

आकृती ओळखणे, मोजणी, तुलना, वजन, वेळ या गोष्टी प्रत्यक्ष शिकवणे.

शिक्षणाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्यासाठी तसे उपक्रम शाळेत घेण्यात आले.



3.3 साप्ताहिक गणित खेळ

झटपट उत्तर, कोडं, संख्या ओळख यांसारख्या क्रियाकलापांचा समावेश असलेली गणितीय खेळ घेण्यात आले.

4.पालक व समुदाय सहभाग

4.1 वाचन साथी योजना,पालकांना FLN चे महत्त्व समजावून सांगुन "रोज 20 मिनिटे मुलांसोबत वाचन"मोहिम राबविले..

विद्यार्थ्यांना घरी वाचनासाठी विशेष पुस्तकांचे संच दिले.

5. नवोपक्रम राबवणे

उद्दिष्ट:- मुलांमध्ये सर्जनशीलता, जिज्ञासा, संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास विकसित करणे.

कृती:प्रकल्प आधारित शिक्षण,बाल संसद, वर्ग समित्या

विज्ञान प्रयोग, हस्तकला, चित्रकला उपक्रम शाळेत घेण्यात आले.त्यात

विद्यार्थ्यांचे सादरीकरण, चर्चा आणि अभिप्राय सत्र ठेवून त्यांच्या अभिजात गुणाला वाव देण्यात आला.

6.शाळेचे वातावरण सुधारणा

उद्दिष्ट : विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी स्वच्छ, सुरक्षित व प्रेरणादायी वातावरण मिळावे.

कृती : शैक्षणिक भिंती, शिक्षण कोपरे, वाचन कोपरे.

स्वच्छता मोहिमा, हरित शाळा उपक्रम.

शालेय बाग, वर्गातील सजावट, शिस्तबद्ध बसण्याची व्यवस्था शाळेत करण्यात आली.


7.निपुण भारत अभियानात सहभाग

उद्दिष्ट:इयत्ता तिसरीच्या अखेरीस सर्व मुलांमध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान निपुणतेच्या पातळीपर्यंत पोहोचवणे.

कृती:- शाळेने FLN आधारित वर्षभराचा कृती आराखडा तयार करण्यात येऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

शाळा व्यवस्थापन समिती (SMC/SMDC) ला सहभागी करून बैठकीत चर्चा.

नियमित मूल्यमापन (baseline-midline-endline) करून प्रगतीचा मागोवा घेऊन मूल्यमापनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त तास घेऊन त्यांना उचित पातळीपर्यंत नेण्यात आले..



संदर्भ लिंक :-

फोटो

https://drive.google.com/drive/folders/12gAU_--PTGt8tK_eU41vEU6maNwtUJYe

व्हिडीओ -

https://youtu.be/mE00hpolDkU?si=Htny-2sy2sCtJgCd

https://youtu.be/aaFPfvXWEG4?si=zKRKCsb5rzIR8PUq

https://youtu.be/nR8JcWnLUuo?si=Ckm60LHgjIYnzuA9

https://youtu.be/0Mm7XLKsjhU?si=umg9LjFU2ZYzMSko


https://youtu.be/A8lbJisijWU?si=VbWtFUIVLNbYLFZ1

https://youtu.be/MSfzMbeD7WQ?si=b7NERBD3Vc4dLOLn

https://youtu.be/10onBsRBMa8?si=NfDFswmsdF5R9ppo

https://youtu.be/upvqCr9UWOM?si=BfSuIDDkby2AdyBi

https://youtu.be/cwsaxx40Rd0?si=CeL3hZmykuYvGsFk
https://youtu.be/mgh_tvTe2Oo?si=uo_15QrWSpri-fkw
https://youtu.be/WSXN2DBj34Y?si=okO-Z9NrlzWoSQuW
https://youtu.be/UzjoEA2N6uc?si=OOROXPdwCPbIkrXt
https://youtu.be/bumwmC8VqSs?si=u5nUGqxeht7ZL07P
https://youtu.be/qZtlqYLJgL8?si=QqlynOSZu9YQGLr8



दुर्गम,नक्षल प्रभावित आदीवासी भागातील गोंडी,तेलुगु भाषिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,व्यंकटरावपेठा

शाळेचा पूर्ण पत्ता - मु.व्यंकटरावपेठा पो. व्यंकटरावपेठा ता.अहेरी जि. गडचिरोली

मुख्याध्यापकांचे पूर्ण नाव - श्री.सुनिल तुलसीदास मामीडवार

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9421857805

मुख्याध्यापक ई मेल आय डी - smamidwar11@gmail.com





प्रस्तावना -

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील व्यंकटरावपेठा हे एक दुर्गम, नक्षलप्रभावित व गोंडी-तेलगू आदिवासी वस्तीवरील गाव असून, विकास आणि शिक्षणापासून दूर असलेल्या या भागात पोहोचणे पावसाळ्यात अत्यंत कठीण होते. गावात मराठीचा स्पर्शही नसल्याने, गोंडी-तेलगू भाषिक विद्यार्थ्यांना मराठी शिकणे कठीण जाते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत पूर्णतः जीर्ण असून, मूलभूत सुविधा अत्यल्प आहेत.

२५ वर्षांच्या अनुभवानंतर स्वगावी नेमणूक झाल्यानंतर मी मुख्याध्यापक म्हणून ही आव्हाने स्वीकारून कार्य सुरू केले. स्थानिक बोलीभाषा आणि निसर्गातील घटकांचा वापर करून मराठी भाषा शिकवण्याचे सृजनशील प्रयोग राबवले. मुलांच्या उपस्थितीमध्ये लक्षणीय वाढ झाली आणि अध्ययनात रस निर्माण झाला. शिक्षकांच्या चिकाटीने, गावकऱ्यांच्या सहकार्याने आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून या शाळेने अडचणींवर मात करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची दिशा तयार केली.

२०२३ पासून सुरु झालेल्या या प्रयत्नांचे फलित म्हणून आज व्यंकटरावपेठा शाळा एक प्रेरणादायी शाळा ठरली आहे. ही कथा म्हणजे दुर्गम भागातही योग्य दृष्टिकोन, समर्पण आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांनी परिवर्तन घडवता येते, याचे जिवंत उदाहरण आहे.

क्षेत्र - आदीवासी बहूल भागातून येण्या-या गोंडी तेलगू भाषिक विदयार्थांच्या हितासाठी विविध कृती कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक व सह.शिक्षकांनी केलेले प्रयत्न ...

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील व्येंकटरावपेठा हे गोंडी-तेलगू भाषिक आणि नक्षलप्रभावित भागातील गाव असून, येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची अवस्था अत्यंत जीर्ण व धोकादायक होती. त्यामुळे पालक आपली मुले शाळेत पाठवण्यास टाळाटाळ करत होते. परिणामी पटसंख्या व विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी होऊ लागली.

ही परिस्थिती लक्षात घेऊन शिक्षकांनी ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने ताडपत्री लावून सुरक्षितपणे शाळा भरविण्यास सुरुवात केली. त्यामुळे पालकांचा विश्वास निर्माण झाला आणि उपस्थितीत वाढ झाली.

शिक्षकांनी अपुऱ्या भौतिक सुविधांतूनही न थांबता स्थानिक संसाधनांचा वापर करून, आदिवासी संस्कृतीशी सुसंगत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले. विद्यार्थ्यांचे भाषिक अडथळे दूर करून शिक्षण रंजक बनवले. या सर्व प्रयत्नांतून शाळेने नवचैतन्य प्राप्त केले आणि आपली स्वतःची एक ओळख तयार केली.

1) बोलीभाषा-अनुवाद सहकार्य उपक्रम

उद्दिष्ट : शाळेतील शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या बोलीभाषा यामधील दरी भरून काढणे.

कृती :

स्थानिक गोंडी, किंवा इतर बोलीतील शब्दांचे मराठी अनुवाद भिंतीवर चित्रासह पेंटिंग केले मुलांना बोलक्या भिंती द्वारे प्रमाण भाषेची भीती कमी करण्यात आले.

दुभाषी विद्यार्थी साहाय्यक गट तयार करून एकमेकांना प्रमाण भाषेतील कठीण शब्दांचा सराव करून घेण्यात आला.

"माझी बोली, माझा अभिमान" या नावाने भाषा सप्ताह महिन्याच्या प्रत्येक आठवड्यात घेण्यात आला..त्यातून माय बोली गोंडीची मराठीशी सांगड घालण्यात आली.

२. वनशाळा / निसर्ग शिक्षण उपक्रम


उद्दिष्ट : निसर्गाशी संबंधित जीवनशैलीचा सन्मान राखून शिक्षणाशी जोडणे

कृती :

मासिक "वनशाळा दिवस" — वनभ्रमण, औषधी वनस्पती ओळख, स्थानिक वृक्षारोपण यासारखे उपक्रम शाळेत राबविण्यात आले.निसर्गाशी विद्यार्थ्यांशी असलेली नाळ अजून घट्ट करण्यात आली.

आदिवासी ज्ञान (औषधी वनस्पती, पशुपालन, हस्तकला) शाळेत सादर करणे

"माझं जंगल — माझी शाळा" प्रकल्प या उपक्रमांमुळे मुलांना प्रमाण भाषेची ओळख करून देण्यात यशस्वी प्रयत्न करण्यात आला.



३.सांस्कृतिक व कलाप्रदर्शन मंच

उद्दिष्ट: विद्यार्थ्यांच्या प्रतिभा व अभिव्यक्तीला वाव देणे

कृती:

स्थानिक लोकनृत्य, वेशभूषा, संगीत सादरीकरणाचे आयोजन

गोंडी/आदिवासी कथा, पोवाडे, समूहगीत स्पर्धा शाळेत आणि गावातील सांस्कृतिक मंडळामध्ये घेण्यात आला.. पालकांना आणि विद्यार्थ्यांना शाळेविषयी आपुलकी अजून वाढली.

“कला महोत्सव – आमची परंपरा, आमचा गौरव” उपक्रम दरवर्षी 9 ऑगस्ट रोजी घेऊन आदिवासी संस्कृती जतनाचा प्रयत्न करण्यात आला..

४.मार्गदर्शन व प्रेरणादायी व्यक्तींचे संवाद सत्र

उद्दिष्ट : विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे व शिक्षणात रुची वाढवणे

कृती : आदिवासी भागातून पुढे गेलेल्या डॉक्टर, शिक्षक, अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन सत्र शाळेत ठेवून शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले ..

“मी शिकतो कारण...” अनुभव कथन सत्र यासारख्या सत्राचे आयोजन करण्यात आले.

शाळा सोडून गेलेल्यांसाठी "शिक्षण परत येण्याचा सप्ताह" शाळेत राबविण्यात आला..शाळा बाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले गेले.

५.पालक सहभाग आणि संवाद कार्यक्रम

उद्दिष्ट: पालकांचा शैक्षणिक प्रक्रियेत सहभाग वाढवणे

कृती:

"आई-बाबांशी संवाद" कार्यक्रम – मासिक पालक बैठका

पालकांच्या हस्ते पारितोषिक वितरण / गोष्टी सांगणे / सामूहिक खेळ

गावपातळीवर शिक्षणविषयक स्नेहमेळावा यातून शाळा आणि समाज यातील संबंध अधिक दृढ करण्यात आला

६. शैक्षणिक पूरक अभ्यास व रेमेडियल क्लासेस

उद्दिष्ट: मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पूरक उपाय

कृती:

सायंकाळी तासिकांमध्ये बालमित्र योजना राबवून हुशार मुले अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले

पाठीमागे असलेल्यांसाठी विशेष सत्र – चित्र, गाणी, खेळ यांतून शिकवण देण्यासाठी हे सत्र खूप उपयोगी ठरले..यामुळे शाळेतील एकही विद्यार्थी अभ्यासात मागे राहिला नाही.

शब्दशक्ती, अंकज्ञान वाढवण्यासाठी खजिना खेळ, भाषेचा बाजार उपक्रम यातून मुलांची प्रमाणभाषा मराठीची गोडी वाढली.



७.डिजीटल आणि मोबाईल-आधारित शिक्षण पद्धती

उद्दिष्ट: टेक्नॉलॉजीचा वापर करून मुलांपर्यंत शिक्षण पोहोचवणे

कृती:

ऑफलाइन शैक्षणिक व्हिडिओ, गोष्टी, मराठी अक्षर ओळख

मोबाईल व्हॉट्सअॅप ग्रुपवरून शैक्षणिक टिप्स

"ई-शाळा माझी" प्रकल्प (ग्रामीण भागात सौर ऊर्जा/प्रोजेक्टर वापर)

विद्यार्थ्यांचे शिक्षण बोलीभाषेमुळे अडत असल्याचे लक्षात घेऊन, स्थानिक बोलीतील शब्दसूची व मराठी अनुवादाचा चार्ट तयार केला.

“शब्द मैत्री” उपक्रम राबवून मुलांना बोलीभाषा व शुद्ध मराठी यातील संबंध समजावले.

शाळेत बोलीभाषा गौरव सप्ताह साजरा करून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवला.

८. पालकसंवाद वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न

आदिवासी समाजात शिक्षणाबद्दल असलेली भीती दूर करण्यासाठी ग्रामभेटी व घर भेटी

९.भाषिक अडचणी दूर करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम

आदिवासी मुलांच्या बोलीभाषेमुळे मराठी भाषेतील अडचणी लक्षात घेऊन बोलीभाषा व शुद्ध मराठी यातील तुलनात्मक शब्दसंच तयार केला.

"शब्दमित्र" नावाचा उपक्रम सुरू केला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना बोलीभाषेतील शब्दांचे शुद्ध मराठीतील समांतर शिकवले गेले.

चित्र, गाणी, नाटुकले यांच्या माध्यमातून बोलण्यातून वाचन-लेखनाची वाट तयार केली.

१०. पालकांचा शाळेशी संवाद वाढवण्यासाठी प्रभावी कृती

"शाळा आपल्या दारी", "पालक-स्नेहसंमेलन", "आईसंग भाकरभाजी" यासारखे उपक्रम राबवले.


पालकांना त्यांच्या बोलीभाषेत समजेल अशा पद्धतीने शिक्षणाचे महत्त्व समजावले.

घरभेटी घेऊन विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढवली.

यातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढून विद्यार्थी पालकांना शाळेविषयी, शिक्षकाविषयी आपूलकी, जिव्हाळा वाढला.

सदर उपक्रमामुळे व शाळेतील एकूण परिस्थितीमुळे सदरची बातमी दैनिक वर्तमानपत्रांनी प्रसारित केलीली आहे. निसर्गातील शाळा सर्वांचे लक्ष वेधून घेतले याचा परिणाम असा झाली की, शाळेला लवकरात लवकर इमारत देण्याची हालचाली प्रशासकीय पातळीवर सुरु झाल्या. लवकरच शाळेला सुसज्ज इमारत मिळण्याचे संकेत मिळाले. सदर उपक्रमामुळे आपली शाळा प्रकाशझोतात आली ही बाब गावकरी व शिक्षकांना सुखावणारी, नवचैतन्य देणारी ठरली. सर्वांनी या उपक्रमाला भरभरुन प्रतिसाद दिला.

गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलप्रभावित अहेरी तालुक्यातील व्यंकटरावपेठा येथील जिल्हा परिषद शाळा ही गोंडी-तेलगू भाषिक आदिवासी भागातील अत्यंत दुर्गम शाळा आहे. जुनी, धोकादायक इमारत आणि भाषेचा अडसर यामुळे शाळेची पटसंख्या व विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी होत होती. शिक्षकांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने ताडपत्रीखाली शाळा भरविण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे शाळेचा पुन्हा स्वीकार वाढला.



शिक्षणातील मुख्य अडथळा म्हणजे मुलांची बोलीभाषा (गोंडी-तेलगू) आणि शिक्षणाची भाषा (मराठी) यातील तफावत. यावर मात करण्यासाठी शिक्षकांनी स्थानिक बोलीभाषेतून अध्यापन सुरू केले. त्यांनी स्वतः द्विभाषिक पाठ्यसामग्री, शब्द चार्ट, बोलीतील गोष्टी, भाषिक खेळ तयार केले. निसर्गातील घटकांपासून शैक्षणिक साहित्य तयार करून विद्यार्थ्यांचे भाषिक व बौद्धिक कौशल्य वाढविण्यात आले.“चला अक्षर ओळखू या”, “स्मृतिफलक”, “टोपलीत दडलंय काय?”, “पानं वाचू या” यांसारख्या अनेक उपक्रमांमुळे मराठीबद्दलची भीती दूर झाली. विद्यार्थी आता आत्मविश्वासाने मराठीत वाचन, लेखन, संभाषण करू लागले. शिक्षकांचा हा प्रयत्न वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाला आणि शाळेला नवीन इमारतीसाठी प्रशासकीय हालचाली सुरू झाल्या.हा उपक्रम हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरते की जिथे संकट आहे तिथे संधी आहे आणि जिथे कल्पकता आहे तिथे शिक्षणाचे नवे दालन उघडते.

समारोप :-

एकंदरीत जि. प. प्राथमिक शाळा, व्यंकटरावपेठा या शाळेची वाटचाल प्रगतीच्या दिशेने सुरु असून यासाठी शाळा, शिक्षक, समाज व प्रशासन आम्हाला सर्वतोपरी मदत करीत आहेत. शाळेच्या उत्कर्षासाठी आम्हा शिक्षकांना शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असला तरी आपल्या विद्यार्थ्यांना काहीतरी वेगळे व जादा अध्ययन अनुभव दिल्याचे समाधान शिक्षकांच्या चेहऱ्यावर दिसत आहे.

फोटो

















संदर्भ लिंक -

शाळेविषय आलेल्या बातम्या :- दैनिक भास्कर न्युज

https://epaper.bhaskarhindi.com/c/77295562

व्हिडीओ 1 -

https://youtu.be/G5dc7Sh2X00?si=3C9PSOFNX3uYZz11

https://youtu.be/34fCJjo3dw8?feature=shared

लोक सहभागातून शालेय परिवर्तन करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जि.प.उच्च प्राथमिक शाळा, खर्रा

शाळेचा पत्ता - केंद्र.भानपूर पं.स. गोंदिया, जि.प.गोंदिया

शाळेचा ईमेल आय.डी - zpupskharra@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री नरेंद्र नथूलाल गौतम

मुख्याध्यापक ईमेल आय.डी - narendragautam2012@gmail.com





ध्येयप्राप्ती प्रथम क्रमांक



प्रास्ताविक -

आयुष्यात कोणतीही गोष्ट मिळवायची म्हटलं की सहजासहजी मिळत नाही त्यासाठी परिश्रम, मेहनत घेतल्यानंतर निश्चित यश प्राप्ती होते हेही तितकेच खरे आहे आपली शाळा स्वच्छ सुंदर व सर्व भौतिक सुविधा युक्त करण्यासाठी लोकसहभागातून साकारलेल्या एका शाळेची यशोगाथा.

शैक्षणिक सत्र २०१८-२०१९ मध्ये जि.प. उच्च प्राथमिक शाळा खर्रा केंद्र- भानपूर शाळा जेमतेम उच्च प्राथमिक शाळा म्हणून अस्तित्व टिकविण्यासाठी धडपडत होती. एकूण पटसंख्या 81 व शिक्षक 5, विद्यार्थी आशेच्या नजरेने बघणारे, तेवढेच लाजाळू समोर येऊन बोलण्याएवढा सभाधीटपणा त्यांच्याकडे नव्हता. सामाजिक वातावरण व पालकांची शिक्षणाप्रती अनास्था हे छोटेसेकारण असू शकते पण शिक्षकांची इच्छाशक्ती असली तर या समस्यांवर मात करता येऊ शकते. आदिवासी बांधवांची मुले ३ किमी परीसरातील वाड्या, वस्त्या, टोले येथून पायी प्रवास करून, ऊनवारा,पाऊस ह्याची चिंता न करता शाळेत येण्याची ओढ बघून आम्ही सर्व शिक्षकांनी मनाशी एक खुणगाठ बांधली कि विद्यार्थ्यांसाठी झटायचं. सुरुवात केली ती पालकसभा मधून . पालकांना विश्वासात घेऊन कामाला सुरुवात झाली.

"एकच ध्यास विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास" अशी ही आमची जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खर्रा, केंद्र भानपुर, पंचायत समिती गोंदिया, जिल्हा परिषद गोंदिया महाराष्ट्रातील प्रसिद्ध खरोबा देवस्थान अशा या पवित्र स्थळात वसलेली आमची जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खर्रा आहे.आमच्या शाळेची स्थापना सन 1955 ला झालेली आहे. जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते सातवी चे वर्ग असून पटसंख्या 153 आहे. मुख्याध्यापक श्री.नरेंद्र गौतम, श्री.हितेश राहंगडाले, श्री.प्रल्हाद पारधी स.शि. श्री.राधेश्याम चौधरी स.शि. श्री.प्रभाकर वांगे स.शि. कु. उज्वला कोहरे स.शि.असे शाळेत सहा शिक्षक असून त्यापैकी दोन पदवीधर शिक्षक व चार सहायक शिक्षक कार्यरत आहेत.

शैक्षणिक सत्र २०१८-२०१९

परिपाठ - परिपाठातून विविध मुद्दे हाताळून विद्यार्थ्यांना बोलके करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वाढदिवस साजरा करणे, प्रश्न तुमचे उत्तर आमचे, प्रश्नमन्जुषा, अनुभव कथन, alphabet व action words, सामान्यज्ञान, व्यक्तिविशेष, longforms, Interview, असे अनेक मुद्दे परिपाठात घेऊन अधिक रंजक व ज्ञानात्मक करण्याचा प्रयत्न नेहमी असतो. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणजे परिपाठाचे live प्रक्षेपण DIET गोंदिया मार्फत करण्यात आले.





गुणवत्ता विकास -


सत्र २०१८-१९ मध्ये इ.५ वी चे ११ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत बसले व त्यातून १० विद्यार्थी पास होऊन **६ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक** झाले, त्यातून २ विद्यार्थ्यार्थांची **शासकीय विद्यानिकेतन केळापूर** साठी निवड झाली. सत्र २०१९-२०२० मध्ये इ.५ वी चे १२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत बसले व त्यातून १० विद्यार्थी पास होऊन **४ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक** झाले ,सत्र २०२०-२०२१ मध्ये इ.५ वी चे १४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत बसले व त्यातून १२ विद्यार्थी पास होऊन **६ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक** झाले. सत्र २०२१-२०२२ मध्ये इ.५ वी चे १५ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत बसले व त्यातून १४ विद्यार्थी पास होऊन **१० विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक** झाले.

सत्र २०२२-२०२३ मध्ये इ.५ वी चे १९ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत बसले व त्यातून १९ विद्यार्थी पास होऊन **६ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक** झाले. सत्र २०२३-२०२४ मध्ये इ.५ वी चे ११ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत बसले व त्यातून ११ विद्यार्थी पास होऊन **८ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक** झाले. २ विद्यार्थ्यांची एकलव्य मॉडेल स्कूल बोरगाव आणि रामटेक साठी निवड.

सत्र २०२४-२०२५ मध्ये इ.५ वी चे ११ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत बसले व त्यातून ११ विद्यार्थी पास होऊन 4 **विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक** झाले **आजपर्यंत असे एकूण 44 विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले.**

क्रीडा व सांस्कृतिक विकास -

स्वदेशी मंडळामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेत प्राथमिक विभागाची नाटिका जिल्हास्तरा पर्यंत गेली. लेझीम तालुकास्तर दरवर्षी कबड्डी मध्ये प्राविण्य. शाळेच्या इतिहासात प्रथमच स्नेहसंमेलन व महिला मेळावा घेयात आला व अतिशय उत्तम प्रकारे पालकांचा प्रतिसाद मिळाला. यंदा स्नेहसंमेलनात माजी विद्यार्थी मेळावा घेऊन शाळेसाठी आर्थिक मदत मिळवून घेतली. सत्र २०२३-२०२४ मध्ये अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवामध्ये समूह गायन (उच्च प्राथ.) जिल्ह्यातून प्रथम क्रमांक व सत्र २०२४-२०२५ मध्ये अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवामध्ये वैयक्तिक गायनात (उच्च प्राथ.) जिल्ह्यातून प्रथम क्रमांक व समूह गायनात द्वितीय क्रमांक पटकावला.







शैक्षणिक सहल - यंदा शाळेची सहल रमण विज्ञान केंद्र नागपूर येथे नेऊन त्यांना बाहेरच्या विश्वात भ्रमण करण्याची संधी प्राप्त करून दिली व मेट्रोमध्ये बसवून आगळावेगळाअनुभव वाट्याला आला.

लोकसहभाग व लोकवर्गणी - यंदा शिक्षकांनी आपल्याकडून दोन संगणक शाळेला दान दिले व लोकांनी सुद्धा **५७०००/- हजाराची देणगी** दिली. त्यातून xerox व printer व शालेय स्नेहसम्मेलन घेण्यात आला. गोंदिया येथील **दानशूर श्री हिम्मतभाई राठोड** यांनी शाळेला **जलशुद्धीकरण यंत्र (२५०००/-)** दान दिले. **श्री.कमल इनवती** यांनी व **श्री.गुड्डू रहांगडाले** यांनी खेळाडूंचे ड्रेस दान दिले.

सन २०२१-२२ मध्ये श्री गुजराती समाज चेरीटेबलट्रस्ट कडून बाहेरच्या वाड्या वस्त्या वरून येत असलेल्या २६ विद्यार्थीनीना सायकल वाटप (१२५००० रु.) करण्यात आले. कोविडच्या काळात जेव्हा शासनाकडून पुस्तक मिळाली नव्हती तेव्हा श्री. तौफिकभाई मेनन यांनी बालवाचन अंकलिपी वाटप केली.

ग्रामपंचायत - या वर्षी शाळेला **paverblock, projector, laptap**, व शौचालय बांधकाम ग्राम पंचायतीकडून करून देण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये पावसाळ्यात भिजत येत असलेल्या विद्यार्थ्यांना श्रीमती अंजली अशोक कौशिक यांच्याकडून ६० रेनकोटचे वितरण करण्यात आले. स्वयंपाकघराला शेड नसल्याने पावसाळ्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागे, तेव्हा श्री.गुलाबजी दादुरिया, राधाकृष्ण राईस मिल (पालक) यांनी ४ shit दान दिले. मो. युनुसभाई शेख एकोडी यांच्याकडून (१००००रु) एक आलमारी शाळेला मिळाली.adani foundation tirora कडून नवोदय परीक्षेत बसणाऱ्या विद्यार्थ्यांना १६ मार्गदर्शक पुस्तिकांचे वितरण करण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी **१ लक्ष २३ हजार** एवढी लोकवर्गणी जमा झाली.

नाविन्यपूर्ण उपक्रम - २०२२-२३ मध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांना एक आगळावेगळा अनुभव आला. तो म्हणजे उन्हाळी शिवीर (summer camp) जून महिन्यात दहा दिवसीय शिबिराचे आयोजन करून विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळीना बोलावून शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, कला, सांस्कृतिक क्षेत्रात मार्गदर्शन करण्यात आले. **२०२३-२४** मध्ये सुद्धा उन्हाळी शिवीर (summer camp) जून महिन्यात दहा दिवसीय शिबिराचे आयोजन करून विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळीना बोलावून शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, कला, सांस्कृतिक क्षेत्रात मार्गदर्शन करण्यात आले. IMA (women wing) द्वारे बालकांची दंत तपासणी करून मार्गदर्शन करण्यात आले.

आमची शाळा-आदर्श शाळा

सन २०२२-२०२३ या वर्षी शाळेच्या शिरपेचात सर्वात मोठा मानाचा तुरा रोवला गेला तो म्हणजे जि.प.गोंदिया व अदानी फाउंडेशन मार्फत राबविण्यात आलेल्या आमची शाळा-आदर्श शाळा या स्पर्धेत तालुक्यातून प्रथम स्थान मिळाले व जिल्ह्यातून सुद्धा प्रथम स्थान पटकावून १ लक्ष ६६ हजार रुपयांचे रोख बक्षीस प्राप्त झाले. सन २०२२-२०२३ मध्ये राष्ट्रीय अविष्कार अभियान अंतर्गत एकूण आठ विद्यार्थ्यांना ISRO ची सहल बंगळूरू, मुंबई, हैद्राबाद इ. ठिकाणी शैक्षणिक सहलीसाठी नेण्यात आले. सन २०२३ -२०२४ मध्ये राष्ट्रीय अविष्कार अभियान अंतर्गत एकूण आठ विद्यार्थ्यांना ISRO ची सहल बंगळूरू, मुंबई, हैद्राबाद इ. ठिकाणी शैक्षणिक सहलीसाठी नेण्यात आले.




मुख्यमंत्री माझी शाळा - सुंदर शाळा

मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा टप्पा-1 गोंदिया तालुक्यातून प्रथम बक्षिस रक्कम 3 लक्ष रुपये मिळाल्यानंतर शाळेला CCTV कॅमेरे, white board, वर्गखोली रंगकाम, व इतर आवश्यक साहित्य घेण्यात आले. मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा टप्पा-2 जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक बक्षीस रक्कम 5 लक्ष रुपये मिळाल्यानंतर शाळेला प्रत्येक वर्गामध्ये SMART TV, पहिल्या वर्गाला डेस्क बेंच, कुकर, मिक्सर मशीन,शौचालय दुरुस्ती, पेवर ब्लॉक बसवणे. परसबाग, नर्सरी मधून विविध प्रकारची झाडे,संगणक इत्यादी कामे करण्यात आले.

माहिती तंत्रज्ञान :- विद्यार्थि स्वतः हून संगणकावर ppt तयार करतात, व हाताळतात. Paint, Slide इ. बनवतात.

पटसंख्या :- सत्र २०१९-२०२० मध्ये शाळेची पट81 वरून 93 झाली. सातव्या वर्गातील 21 विद्यार्थी निघून सुद्धा 12 **विद्यार्थी वाढले.** आश्रम किंवा इतर कॉन्वेंट मध्ये जाणारे विद्यार्थी आमच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी उत्सुक असतात. सत्र २०२०-२०२१ मध्ये शाळेचा **पट ९३ वरून १०३** झाली. बाहेरच्या शाळेत शिकणारे गावची मुले परत फिरू लागली. सत्र २०२१-२०२२ मध्ये शाळेचा **पट १०३ वरून ११२** झाली. बाहेरगावातील मुले आपल्या नातेवाईकांकडे राहून आमच्या शाळेत शिकू लागली.सत्र २०२२-२०२३ मध्ये शाळेचा **पट ११२ वरून १३०** झाली. सतत चार वर्षापासून पटसंख्येत निरंतर वाढ होत असलेली आमची शाळा .....सत्र २०२३-२०२४ मध्ये शाळेची **पट १३० वरून १४०** झाली. नजीकच्या गावातील पालकांनी आपल्या पाल्यांना आमच्या शाळेत नाव भरती केले व रोज ने-आण करण्याची जबाबदारी सुद्धा स्वीकारली. सत्र २०२४-२०२५ मध्ये शाळेचा **पट १४० वरून १५३** झाली. नजीकच्या गावातील पालकांनी आपल्या पाल्यांना आमच्या शाळेत नाव भरती केले व रोज ने-आण करण्याची जबाबदारी सुद्धा स्वीकारली, ई- रिक्षा ने विद्यार्थी शाळेमध्ये यायला लागले.

वाहतूक सुविधा - सत्र २०२१-२०२२ मध्ये बाहेरून येणाऱ्या २३ विद्यार्थ्यांना प्रतिविद्यार्थी ६००० हजार रुपये त्यांच्या खात्यात शासनाकडून जमा झाले. सत्र २०२२ -२०२३ मध्ये बाहेरून येणाऱ्या ४१ विद्यार्थ्यांना प्रतिविद्यार्थी ६००० हजार रुपये त्यांच्या खात्यात शासनाकडून जमा झाले. सत्र २०२३-२०२४ मध्ये बाहेरून येणाऱ्या ६८ विद्यार्थ्यांना प्रतिविद्यार्थी ६००० हजार रुपये त्यांच्या खात्यात शासनाकडून जमा झाले. सत्र २०२४-२०२५ मध्ये बाहेरून येणाऱ्या ७२ विद्यार्थ्यांना प्रतिविद्यार्थी ६००० हजार रुपये त्यांच्या खात्यात शासनाकडून जमा झाले.




स्वच्छता व आरोग्य :- Handwash चा वापर केल्याशिवाय कोणताही विद्यार्थी भोजनाला बसत नाही. नेहमी नीटनेटके राहणे ही त्यांची सवय झालेली आहे. मूल्यशिक्षण मध्ये सवय महत्वाची असते त्यात आपल्यापेक्षा मोठ्यांना दादा व ताई प्रत्येकजण म्हणतो.





मुख्यमंत्री माझी शाळा - सुंदर शाळा :-

सन २०२३-२०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा या अभिनव उपक्रमामध्ये गोंदिया तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावून पुन्हा एकदा शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा :- सन २०२४-२०२५ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा टप्पा-२ या स्पर्धेमध्ये गोंदिया जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक पटकावून पुन्हा एकदा शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.

"एकच ध्यास विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास" अशी ही आमची जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खर्रा, केंद्र भानपुर, पंचायत समिती गोंदिया, जिल्हा परिषद गोंदिया महाराष्ट्रातील प्रसिद्ध खरोबा देवस्थान अशा या पवित्र स्थळात वसलेली आमची जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खर्रा आहे.आमच्या शाळेची स्थापना सन 1955 ला झालेली आहे. जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते सातवी चे वर्ग असून पटसंख्या 153 आहे शाळेत सहा शिक्षक असून त्यापैकी दोन पदवीधर शिक्षक व चार सहायक शिक्षक कार्यरत आहेत शाळेला भव्य सुसज्ज गेट असून शाळेमध्ये प्रवेश करताना सुंदर परिसर दिसतो. शाळेच्या भिंती व वर्ग खोल्या बोलक्या आहेत भिंतीवर विविध सुविचार, शैक्षणिक चार्ट, प्रथम महिला चार्ट, वैज्ञानिक चार्ट लावलेले आहेत. वर्गाच्या समोरील परिसरात विविध प्रकारची फुलझाडे इतर झाडे व भव्य परसबाग लावलेली आहे शाळेत खुले वाचनालय, प्रोजेक्टर कक्ष, बँड पथक ,लेझीम पथक, शालेय मंत्रिमंडळ, स्वच्छता मॉनिटर ग्रुप, स्वच्छता दूत आहेत.

प्रत्येक शनिवारी संगीतमय कवायत घेतली जाते जिल्हा परिषद गोंदिया व अदानी फाउंडेशन तिरोडा यांच्या संयुक्त विद्यमाने गोंदिया जिल्हास्तरावर राबविण्यात आलेल्या आमची शाळा सुंदर शाळा २०२२-२३ या शैक्षणिक सत्रात राबविण्यात आलेल्या स्पर्धेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खर्रा ला जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक येण्याचा मान पटकाविला. त्यानंतर 2023 24 मध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गोंदिया ने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेतील भाग एक मध्ये गोंदिया तालुक्यात प्रथम क्रमांकाने येण्याचा मान पटकाविला. त्यानंतर 2024 25 या शै. सत्रात झालेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ या स्पर्धेत गोंदिया तालुक्यातून प्रथम क्रमांक येण्याचा मान पटकाविला. याप्रमाणे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खर्राची वाटचाल सदैव अग्रक्रमित आहे. तर सत्र 2023 - 24 मध्ये आदर्श दैनिक परिपाठ, बाल आनंद मेळावा, क्रीडा संमेलन, विज्ञान प्रदर्शन, स्नेहसंमेलन घेण्यात येतात .तालुक्यात नृत्यकलेत व समूह गायन स्पर्धेत केंद्र तालुका व जिल्हा स्तरावर सदैव जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा प्रथम क्रमांकाने आलेली आहे.

सारथी प्रकल्पांतर्गत शाहू महाराज या विषयावर निबंध स्पर्धेत सुद्धा या शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे. चंद्रयान तीन प्रक्षेपणाच्या वेळेस शास्त्रज्ञांना विद्यार्थ्यांनी शुभेच्छा संदेश पाठवले तसेच इस्त्रोची फिरती प्रयोगशाळा शाळेला विद्यार्थिनी भेट देऊन माहिती जाणून घेतली आहे, एवढेच नव्हे तर इस्त्रोच्या उपक्रमांतर्गत विद्यार्थी बंगळूरू ला अभ्यास दौऱ्यापर्यंत मजल मारलेली आहे. शाळेत दप्तर मुक्त शनिवार अंतर्गत महावाचन, मनोरंजनात्मक खेळ, मातकाम, कागदकाम, रांगोळी, चित्रकला, प्रश्नमंजुषा, वेशभूषा, कविता निबंध, गायन ,नृत्य इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात येत असतात. सर्व महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी साजऱ्या करण्यात येतात.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्यासाठी शाळेत पर्यावरण पूरक व आनंददायी वातावरण तयार करण्यात आलेले आहे. वृक्षारोपण, मेरी माटी मेरा देश,




किशोरवयीन मुलींना समुपदेशन आर्थिक साक्षरतेवर मार्गदर्शन, सांस्कृतिक वारसा, यासारखे उपक्रम राबविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या अंगी स्वच्छतेची सवय रुजली असून विद्यार्थी स्वतः शालेय परिसर स्वच्छ ठेवतात. विद्यार्थी अधिकचा अभ्यास करायला शिकले. शाळा तंबाखूमुक्त, प्लास्टिक मुक्त आहे. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.गोंदिया, मा.शिक्षणाधिकारी शिक्षण विभाग (प्राथ.) गोंदिया, मा.प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था गोंदिया, मा.गटशिक्षणाधिकारी पं.स. गोंदिया, गटसमन्वयक,तथा गट साधन केंद्र गोंदिया,केंद्र प्रमुख,समूह साधन केंद्र भानपूर,शिक्षक, पालक शाळा व्यवस्थापन समिती, ग्राम पंचायत, गावातील मंडळे,माजी विद्यार्थी व इतर स्वयंसेवी संस्था यांचे मोलाचे योगदान मिळालेले आहेत.

“शाळा ही केवळ शिक्षणाचे केंद्र नसते, तर ती समाजाच्या प्रगतीची मूळ प्रेरणा असते.”

हीच विचारधारा अंगीकारून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खर्रा या ग्रामीण भागातील शाळेने गेल्या काही वर्षांमध्ये शिक्षण क्षेत्रात विविध आदर्श उभारले आहेत. सीमित साधनसामग्री, ग्रामीण पार्श्वभूमी आणि अडचणींना न जुमानता या शाळेने गुणवत्तापूर्ण शिक्षण, भौतिक परिवर्तन, सामाजिक सहभाग आणि शिष्यवृत्ती यश यांमध्ये उल्लेखनीय उंची गाठली आहे. ही यशोगाथा म्हणजे दृष्टी, दृष्टिकोन, आणि दृढनिश्चयाचा एक उत्तम नमुना आहे.


पुरस्कार आणि मान्यता

- आदर्श शाळा स्पर्धेतील यश
- 2022-2023 – जिल्हास्तरीय “आदर्श शाळा” स्पर्धेत प्रथम क्रमांक

या स्पर्धेत शाळेने शिक्षण गुणवत्ता, परिसर स्वच्छता, शिक्षक सहभाग, बालहितावर केंद्रित उपक्रम यामुळे हे स्थान पटकावले.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धा

- 2023-24: तालुकास्तरावर प्रथम क्रमांक
- 2024-25: जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक
- या स्पर्धेत शाळेने बालसुलभ आणि सुंदर अशा दृश्यरचनेपासून ते पर्यावरणीय शाश्वततेपर्यंत अनेक संकल्पना यशस्वीपणे राबवल्या.



पटसंख्येचा विस्फोट — विश्वासाचा विजय

गेल्या ५ वर्षात शाळेची पटसंख्या ७९ वरून १५३ पर्यंत पोहोचली.

या वाढीमागे शिक्षकांची निष्ठा, पालकांशी संवाद, आणि शाळेचे आदर्श रूप यांचा मोलाचा वाटा आहे.

- ✓ घरोघरी पालकसंवाद
- ✓ गुणवत्तेवर भर
- ✓ शिस्तबद्ध वातावरण
- ✓ शाळेच्या यशोगाथेचा गावात सकारात्मक प्रचार

शिष्यवृत्ती यश — गुणवत्तेचा ठसा

- ➢ गेल्या पाच वर्षांत एकूण ४४ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत.
- ➢ विशेष मार्गदर्शन वर्ग
- ➢ मूल्यमापन आधारित तयारी
- ➢ 5वी शिष्यवृत्ती पूर्व चाचण्या
- ➢ स्पर्धा परीक्षांचा आत्मविश्वास. शाळेच्या यशात शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांची भर घालणारी कामगिरी ही त्यांच्या कुटुंबासाठीही सन्मानजनक ठरली आहे.

परसबाग — मुलांसाठी जीवन शिक्षण

शाळेच्या परिसरात परसबाग विकसित करण्यात आली आहे.

या उपक्रमासाठी स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य मिळाले. विद्यार्थ्यांनी स्वतः काम करून बाग फुलवली.

- ➢ झाडलावणी, औषधी वनस्पती
- ➢ कंपोस्ट खत निर्मिती
- ➢ पर्यावरण विषयक शिक्षण
- ➢ किचन गार्डनमधून स्वावलंबन
- ➢ लोकवर्गणी आणि निधी संकलन

शाळेच्या विविध उपक्रमांसाठी गावकऱ्यांनी, माजी विद्यार्थी आणि संस्थांनी एकत्र येऊन ५ लाखांपेक्षा जास्त निधी उपलब्ध करून दिला.

- ➢ वर्ग रंगकाम
- ➢ संगणक खरेदी



- साहित्य व खेळाचे साधन
- पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
- शाळेच्या विश्वासार्हतेमुळे समाजानेही मदतीसाठी पुढाकार घेतला.
- नाविन्यपूर्ण उपक्रम

1. ई-पाठशाळा: स्मार्ट टीव्ही, प्रोजेक्टर, मोबाईल ॲप्सचा वापर

2. विद्यार्थी संसद: निर्णय प्रक्रिया, नेतृत्वगुण वृद्धिंगत

3. निबंध, वाचन व वक्तृत्व स्पर्धा: भाषिक विकास

4. कला व हस्तकला कार्यशाळा: सृजनशीलतेला चालना

5. पालक कार्यशाळा: शिक्षणात पालकांची सक्रिय भूमिका

कला, संगीत व स्नेहसंमेलने

शिक्षक राधेश्याम चौधरी यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांनी संगीत, गीते, वाद्यवृंद सादरीकरणात भाग घेतला. वार्षिक स्नेहसंमेलने सांस्कृतिक कार्यक्रम लोककला सादरीकरण यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला.

तंत्रज्ञान व डिजिटल शिक्षण

शिक्षक प्रभाकर वांगे यांचे मार्गदर्शन व पुढाकाराने शाळेने डिजिटल शिक्षण क्षेत्रात उडी घेतली.

इंटरनेट, व्हर्च्युअल क्लासेस ई-कंटेंट तयार करणे ई-परीक्षा व मूल्यमापन ई-शाळा प्रणाली

- ❖ सामाजिक सहभाग व सार्वजनिक भागीदारी गावकऱ्यांचा आणि स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार –

सागवान खांब देणगी रंग, साहित्य पुरवठा श्रमदान स्वच्छता मोहीम

- ❖ निष्कर्ष – खर्रा शाळेचा आदर्श

खर्रा शाळेची यशोगाथा म्हणजे निष्ठावंत शिक्षक, जिद्दी विद्यार्थी, सहकारी पालक आणि सजग समाजाचा विजय आहे.

आज ही शाळा प्रेरणास्थान, मार्गदर्शक आणि आदर्श मॉडेल बनली आहे.

- ❖ भविष्यातील योजना
- विद्यार्थ्यांसाठी कोडिंग व रोबोटिक्स लॅब




- विद्यार्थी कौशल्यविकास केंद्र 100% शिष्यवृत्ती पात्रता
- शाश्वत 'हरित शाळा' संकल्पना
- आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन

❖ समारोप

"शाळा ही मंदिर असते, आणि शिक्षक त्या मंदिरातील पुजारी." खर्रा शाळेने हे वाक्य कृतीत उतरवले आहे. हे यश टिकवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, नवा विचार आणि सहभाग आवश्यक आहे. खर्रा शाळेचा आदर्श इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरत आहे, आणि भविष्यातही तो मार्गदर्शकच ठरेल....

❖ उन्हाळी शिबिर – कमाल कार्निवल

सन 2022 पासून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खर्रा येथे उन्हाळ्याच्या सुट्टीदरम्यान एक अनोखा उपक्रम आयोजित केला जातो **"उन्हाळी शिबिर – कमाल कार्निवल"**. गोंदियातील **"आज फोरम"** या नामांकित स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरित्या राबवले जाते.

शिबिरात दरवर्षी सुमारे १५० विद्यार्थी सहभागी होतात, विशेषतः आदिवासी व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी हे एक मौल्यवान शिक्षणमंच ठरते. १० दिवसांच्या या शिबिरात, विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे अनुभवात्मक आणि कौशल्यविकासात्मक उपक्रम घेतले जातात:

- आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण – मुलींमध्ये आत्मविश्वास आणि सुरक्षिततेची जाण
- नृत्य व हस्तकला कार्यशाळा – सृजनशीलता व सांस्कृतिक सौंदर्य जपणं
- फायरलेस कुकिंग – स्वावलंबन आणि आहाराची शुद्धता
- "सायकल चलाओ – पर्यावरण बचाओ" मोहीम – पर्यावरणप्रेम आणि आरोग्य
- योगा व ध्यानधारणा – मानसिक आरोग्य आणि एकाग्रता
- ऍडव्हेंचर गेम्स व ट्रेजर हंट्स – समूह भावना, विचारशक्ती व आनंद
- मेडिकल कॅम्प्स व डेंटिस्ट मार्गदर्शन – आरोग्य चाचण्या व जनजागृती

या शिबिरामध्ये प्रोफेशनल मेंटर्स, डॉक्टर्स आणि प्रशिक्षित स्वयंसेवकांचे मार्गदर्शन मिळते. शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकापुरते न ठेवता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारा हा उपक्रम शाळेच्या नवोपक्रमशीलतेचे मूर्त रूप ठरतो.





Hand Wash Stand
Friend
Daughter
Wife
Sister
Mother


Thank You

शालेय परिवर्तनाकडे जाणाऱ्या प्रेरणादायी प्रवासात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, मोरगाव

शाळेचा पत्ता - मोरगाव, ता.अर्जुनी मोर, जि.गोंदिया

शाळेचा ईमेल आय डी - zpschool1955@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री सुरेन्द्र मोहनलाल भैसारे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९४०३११८७१८



जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा मोरगावची स्थापना सन १९५५ ला झालेली असून, हे एक छोटेसे गाव आहे. जवळपास गावाची लोकसंख्या २०२० असून, गावात विविध जाती, धर्माचे लोक मोठ्या गुण्यागोविंदाने सामाजिक व सांस्कृतिक वारशाचे जतन करीत असतात. त्यामुळे गावात समरसतेचे वातावरण दिसून येते. सदर गाव हे तालुक्यापासून अगदी दीड ते दोन किलोमीटर अंतरावर असल्यामुळे, गावात शैक्षणिक प्रगतीविषयी आस्था पालकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये दिसून येते. सदर गावात एक प्राथमिक आरोग्य उपकेंद्र ,आय.टी.आय. कॉलेज व एक जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा असून, त्यात पूर्व प्राथमिक शिक्षण ते इयत्ता आठवीपर्यंत सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे .मागील तीन-चार वर्षांपूर्वी गावात जिल्हा परिषद शाळेविषयी अनास्था दिसून येत होती. पालक, ग्रामस्थ व इतर पदाधिकारी यांचे पुरेशा प्रमाणात सहकार्य लाभत नव्हते .अधिक तर पालक नजीकच्या तालुकास्थळ अर्जुनी मोर या ठिकाणी आपल्या पाल्यांना दर्जेदार शाळेच्या गोंडस नावाखाली तालुक्याच्या ठिकाणी पाठवीत असायचे .जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेत सर्व शिक्षक उच्चशिक्षित व दीर्घ अनुभवी असताना सुद्धा शाळेबाबत ही अनास्था एक चिंतनाचा विषय होता. त्या दृष्टीने मुख्याध्यापकांनी एक दिवस सर्व शिक्षकांची सभा आयोजित केली .सभेत सदर विषयावर शालेय गुणवत्ता व पटसंख्या वाढ या विषयावर प्रत्येकाने आपापले मनोगत मांडण्यास सांगितले व ते रीतसर लेखी स्वरूपात सादर करण्यास सांगण्यात आले.

त्यावर एक कृती- योजना तयार करण्यात आली आणि त्या कृतीयोजनेनुसार गुणवत्ता विकासासाठी काय काय केले जाईल? याचा आराखडा तयार करण्यात आला .प्रत्येकाने वक्तशीरपणा ,नियमितपणा बालकेंद्रीय अध्ययन- अध्यापन ,बाल वाचनालय, अतिरिक्त पूरक वर्ग, विविध स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन, संगणक विषयक मार्गदर्शन, विविध शासकीय शिष्यवृत्तीचे योजना राबविणे ,पालक संपर्क ,पालकाशी आदराचे वर्तन ,गावातील विविध कार्यक्रमातील शिक्षकांचा सहभाग, विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन , स्वच्छ व आकर्षक परिसर, शालेय इमारतीची आकर्षक रंगरंगोटी,बाला पेंटिंग, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छ स्वच्छतागृह व शौचालय यावर लक्ष केंद्रित करून ,त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यबल गट तयार करण्यात आला आणि प्रत्यक्ष कार्यवाही करायला सुरुवात करण्यात आली आणि पालक, विद्यार्थी, पदाधिकारी यांची जिल्हा परिषद शाळेकडे बघण्याच्या दृष्टिकोन बदलत असल्याचे चित्र स्पष्ट होऊ लागले.

सदर शाळेत विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकसित करण्यासाठी सर्व शिक्षकांनी श्रवण, भाषण, वाचन, लेखन ,संख्याज्ञान या विषयावर लक्ष केंद्रित केले आणि प्रत्येक मूलभूत क्षमता विकसित करण्यासाठी अनेक उपक्रम राबविण्याचा चंग बांधला. शालेय परिपाठाच्या वेळेस विद्यार्थ्यांची श्रवण क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने वर्तमानपत्रातील परिसरातील बातम्याचे वाचन, त्याचबरोबर बोधकथा, सामान्य ज्ञानावर आधारित विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून श्रवण क्षमता विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. ऐकलेली बोधकथा, एखाद्या विद्यार्थ्यांला सर्वांसमोर बोलावून संक्षिप्त रूपात कथा सांगण्याची सवय लावली, त्यामुळे विद्यार्थ्यांची हळूहळू श्रवण क्षमता वाढीला लागली आणि विद्यार्थी लक्ष केंद्रित करून ऐकायला सुरुवात केले. त्याचबरोबर सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारून त्या विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर विद्यार्थ्यांकडून जाणून घेतले जाई, विद्यार्थी उत्तर देण्यास सक्षम नसल्यास, शिक्षक याप्रसंगी त्यांना मदत करीत असायचे त्यामुळे विद्यार्थ्यांचे श्रवण विषयक मूलभूत क्षमता विकसित होण्यास मदत झाली व विद्यार्थी अवधानपूर्वक ऐकायला लागले .

शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये भाषण कौशल्ये विकसित करण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला आहे, ज्यामुळे त्यांना आत्मविश्वास आणि प्रभावीपणे संवाद साधता यावे यासाठी सराव आणि संधी उपलब्ध करून देण्यात आली.

दैनंदिन संभाषण: शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वर्गात आणि वर्गाबाहेर एकमेकांशी संवाद साधण्यासाठी प्रोत्साहित केले. साध्या सूचना देणे, प्रश्न विचारणे आणि उत्तरे देणे यासारख्या क्रियाकलापांमुळे मुलांना बोलण्याची सवय लागली.

गटचर्चा: लहान गट तयार करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विशिष्ट विषयांवर चर्चा करण्यास प्रवृत्त केले, ज्यामुळे त्यांना आपले विचार मांडण्याची आणि इतरांचे ऐकण्याची सवय लागली.

भूमिका-खेळ : वेगवेगळ्या भूमिका साकारून विद्यार्थी संवादाचे विविध पैलू शिकू लागले, यामुळे त्यांच्या कल्पनाशक्तीलाही चालना मिळाली.




सादरीकरण: विद्यार्थ्यांना वर्गसमोर छोटे विषय सादर करण्यास सांगितले, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढत गेला व विद्यार्थी बोलके होऊ लागले.

नवीन शब्द: शिक्षकांनी नियमितपणे नवीन शब्द शिकवले आणि त्यांचा वाक्यात उपयोग कसा करायचा हे समजावले. यामुळे विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढण्यास मदत झाली.

व्याकरण: सोप्या व्याकरणाचे नियम शिकवून त्यांचा बोलण्यात योग्य वापर करण्यावर भर दिला. यामुळे विद्यार्थ्यांचे बोलणे अधिक स्पष्ट आणि अचूक झाले.

कथाकथन: विद्यार्थ्यांना कथा सांगण्यासाठी प्रोत्साहित केले. यामुळे त्यांची कल्पनाशक्ती आणि भाषा कौशल्ये विकसित झाली.

सकारात्मक प्रोत्साहन: शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बोलण्यासाठी नेहमी प्रोत्साहन दिले आणि त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. चुकांबद्दल त्यांना कधीही कमी लेखले नाही, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला.

ऐकण्याचे कौशल्य: चांगले बोलण्यासाठी चांगले ऐकणे किती महत्त्वाचे आहे, हे शिक्षकांनी समजावले. इतरांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकण्याची मुलांना सवय लावली.

शिक्षकांनी केलेल्या या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषण कौशल्यांचा विकास झाला, ज्यामुळे ते केवळ वर्गातच नव्हे, तर त्यांच्या दैनंदिन जीवनातही अधिक प्रभावीपणे संवाद साधू शकले.

विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्ये विकसित करण्यासाठी सातत्यपूर्ण वाचन सराव ,विद्यार्थ्यांना दररोज वाचनासाठी प्रोत्साहित करणे, यात पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त कथापुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके इत्यादींचा समावेश करण्यात आला.

वाचन कोपरा - जिथे विविध प्रकारची पुस्तके उपलब्ध करण्यात आली .

प्रकट वाचन- शिक्षकांनी किंवा पालकांनी विद्यार्थ्यांना मोठ्याने वाचायला लावणे, ज्यामुळे त्यांचा उच्चार आणि वाचनाचा वेग सुधारण्यास मदत झाली.

* **शब्दसंग्रह वाढवणे**- नवीन शब्दांचा अर्थ समजावून सांगणे आणि त्यांचा वाक्यात उपयोग करायला शिकवणे, शब्दकोडे आणि शब्द खेळ गावे - शहराच्या नावाच्या भेंडया (अंताक्षरी)वापरून शब्दसंग्रह वाढवणे,नवीन शब्दांची यादी बनवून त्यांना वारंवार वाचायला लावणे, वाचन केल्यानंतर विद्यार्थ्यांना मजकुरावर आधारित प्रश्न विचारणे, कथांचे पुनर्कथन करायला सांगणे, ज्यामुळे त्यांची आकलनशक्ती वाढिला लागण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार पुस्तके निवडण्यास मदत करणे,

वाचन स्पर्धा घेणे ,पालकसभेतील सूचनेनुसार, पालकांनी मुलांना वाचताना पाहून, स्वतःही वाचन करावे, ज्यामुळे मुले प्रेरित होतील व अनुकरण करतील. वाचन कौशल्ये सुधारण्यासाठी शैक्षणिक एप्स आणि ऑनलाइन संसाधनांचा वापर करण्यात आला .शाळेत ICT लॅब मधील ऑडिओबुक्स आणि ई-बुक्सचा वापर करून वाचनाची सवय विकसित करण्यात आली.





विद्यार्थ्यांमध्ये लेखन क्षमता विकसित करण्यासाठी प्रामुख्याने भाषा कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित केले गेले, ज्यामध्ये श्रवण, भाषण-संभाषण, वाचन आणि लेखन यांचा समावेश होतो.


त्यात बालकेंद्रीत व आनंददायी अध्यापन पद्धतीचा वापर करून, विद्यार्थ्यांना शिकण्याचा आनंद घेता यावा यासाठी कार्टून्स, मनोरंजक गोष्टी, कविता यांचे डिजीटल बोर्ड वर प्रक्षेपित चित्रण दाखविण्यात आले.चित्र, गायन, वादन, नृत्य, नाट्य यांसारख्या कलांचा समावेश करून विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना वाव दिला गेल्यामुळे त्यांची अभिव्यक्ती क्षमता वाढीला लागली.

वैविध्यपूर्ण बालसाहित्याचा वापर करून मुलांना भाषेच्या विविध शैलींशी परिचित केले गेले, ज्यामुळे त्यांना प्रभावी लेखनाची संधी मिळत गेली. ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे ही कौशल्ये एकमेकांशी संबंधित असल्याने त्यांचा एकत्रित विकास करण्यावर भर दिला गेला. उदा. ऐकलेल्या किंवा वाचलेल्या गोष्टींवर चर्चा करून त्यावर प्रतिक्रिया, प्रश्न किंवा टिपण लिहून व्यक्त होण्याची संधी दिली गेली.

विद्यार्थ्यांना समजपूर्वक वाचनाची सवय लावली गेली आणि त्यांना वाचलेल्या उताऱ्यांवर आधारित प्रश्न स्वतः तयार करण्यास प्रोत्साहित केल्या गेले, ज्यामुळे त्यांची विचार करण्याची आणि लिहिण्याची क्षमता विकसित झाली. प्रत्येक इयत्तेनुसार विद्यार्थ्यांनी कोणती लेखन कौशल्ये आत्मसात करावीत, हे ठरवून त्यानुसार अध्यापनाची प्रक्रिया आखली गेली व लेखनविषयक मुलभूत क्षमता विकसीत करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये संख्याज्ञान विषयक कौशल्ये विकसित करण्यासाठी शिक्षक विविध मूर्त साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये गणितविषयक गोडी निर्माण केली. सुरुवातीला मणी, ठोकळे, आकडे आणि इतर खेळण्यांचा वापर करून संख्या मोजणे, गट करणे, तुलना करणे, यामुळे विद्यार्थ्यांना संख्यांची प्रत्यक्ष जाणीव झाली.

विद्यार्थ्यांना १ ते १०० पर्यंतच्या संख्या वाचायला, लिहायला आणि क्रमाने लावणे,. मोठ्या संख्यांसाठी स्थानिक किंमत या संकल्पनेवर भर देण्यात आला.बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार: या क्रिया शिकवताना सोप्या उदाहरणांपासून सुरुवात करून आणि हळूहळू क्लिष्ट उदाहरणांकडे दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन या क्रियांचा वापर समजावून सांगण्यात आले.

पाढे पाठ करण्यावर आणि मानसिक गणिताचे सराव करून घेतल्यामुळे, विद्यार्थ्यांची गणना करण्याची क्षमता वाढिला लागली. संख्यांच्या सम-विषम संख्या, मूळ संख्या, संयुक्त संख्या या संख्यांचे प्रकार आणि त्यांची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगणे,अपूर्णांक आणि दशांश अपूर्णांकांची संकल्पना स्पष्ट करून त्यांचे दैनंदिन जीवनातील उपयोग सांगण्यात आले.तसेच लांबी, वजन, धारकता, वेळ आणि पैसा यांसारख्या मूलभूत मापनांच्या एककांची ओळख करून त्यांचे रूपांतरण कसे करायचे ते शिकवले. सोप्या आलेखांची ओळख करून आणि आकडेवारी कशी वाचावी व तिचा अर्थ कसा लावावा हे समजावून सांगितले गेले.




विद्यार्थ्यांना शाब्दिक गणित सोडवण्यास प्रोत्साहन मिळावे यामुळे त्यांना गणिताचा दैनंदिन जीवनात कसा उपयोग होतो हे समजाऊन सांगण्यात आले व संख्याज्ञान शिकवण्यासाठी विविध गणिती खेळ, कोडी आणि मनोरंजक उपक्रम आयोजित करण्यात आले.

या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संख्याज्ञान विषयक कौशल्ये विकसित होताना दिसली आणि गणिताची भीती कमी होऊन त्यात रुची निर्माण झाली .

शालेय गुणवत्ता व शिस्त याची ख्याती ऐकून गावापासून ११किलोमीटर लांब असलेल्या महालगाव, वडगाव /बांध्या,३ किलोमीटर अंतरावर असलेले निलज तसेच तालुका स्थळ अर्जुनी/ मोरगाव येथून विद्यार्थी अध्ययनासाठी ये - जा करीत असतात .सदर शाळेची पटसंख्या २०२१-२२ ला १६७ विद्यार्थी,२०२२-२३ला २१७ विद्यार्थी,,२०२३-२४ ला २२७ विद्यार्थी,२०२४-२५ ला २२८ विद्यार्थी तर २०२५-२६ ला २४१ विद्यार्थी अशाप्रकारे दरवर्षी शालेय विद्यार्थी पटसंख्या सातत्याने वाढत असून अर्जुनी मोरगाव तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक विभागातून सर्वाधिक पटसंख्या असलेली शाळा म्हणून नावारूपास आलेली आहे .

सदर शाळा सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रामध्ये अदानी फाउंडेशन तर्फे राबविण्यात येणाऱ्या माझी शाळा- सुंदर शाळा या उपक्रमात तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकाविले होते .तर शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा- सुंदर शाळा टप्पा- १ या उपक्रमात तालुका स्तरावर तृतीय स्थान पटकाविले होते. तसेच सन २०२४-२५ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ मध्ये जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावून शाळेने आपले नाव जिल्हास्तरावर अधोरेखित केले. शाळेच्या गुणवत्ता विकासासाठी, उच्चशिक्षित व दीर्घ अनुभवी यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनेतून शालेय विकासाचा आलेख दिवसेंदिवस वर चढत आहे हे सांगताना सार्थ अभिमान वाटतो. शाळेत विविध राबविले जाणारे उपक्रम, पालकांशी सातत्याने होणारे संपर्क, विविध नाविन्यपूर्ण उपक्रम ,अतिरिक्त सराव वर्ग ,शिष्यवृत्ती परीक्षा, माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, एन .एम. एम. एस .शिष्यवृत्ती परीक्षा, अशा विविध परीक्षांचे घेण्यात येणारे अतिरिक्त पूरक मार्गदर्शन व सराव वर्ग यामुळे सदर शाळेने आज तालुक्यातून वरिष्ठ प्राथमिक शाळा गटातून जिल्हा परिषद व्यवस्थापनातील तालुक्यातील सर्वाधिक पटसंख्या असलेली शाळा म्हणून स्थान मिळविलेले आहे. शाळेत गुणवत्ता विकासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या शारीरिक ,सांस्कृतिक विकास साधण्याच्या दृष्टीने शाळेत विविध मैदानी स्पर्धा आयोजित करण्यात येतात तसेच विविध सहशालेय उपक्रमाचे जसे- पिकनिक , स्नेहसंमेलन, शैक्षणिक सहल अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व सांस्कृतिक विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात येतो. शालेय गुणवत्ता वाढीच्या विकासासाठी सर्वात प्रथम मुख्याध्यापकांनी विविध उपक्रमाचे वार्षिक नियोजन करून ,उपक्रम निहाय कृती,

विविध नाविन्यपूर्ण उपक्रम ,सहशालेय उपक्रम ,नवोदय परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा यांचे अतिरिक्त पूरक मार्गदर्शन आदी उपक्रमांचे मासिक निहाय नियोजन करून शिक्षकांमध्ये कामाची विभागणी करण्यात आली व प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना शिक्षकांनी अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करून विविध उपक्रमांना मूर्तरूप रूप देण्याचा यथोचित प्रयत्न केला. शैक्षणिक सत्र २०२०-२१ मध्ये एन. एम .एम. एस. शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये-०४ उत्तीर्ण झाले, शैक्षणिक सत्र२०२३-२४ मध्ये ०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर २०२४-२५ मध्ये-03 विद्यार्थी उत्तीर्ण झाले तसेच शैक्षणिक सत्र २०२२-२३ व शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये प्रत्येकी एक विद्यार्थी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झालेला आहे .तसेच पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा शैक्षणिक सत्र -२०२०-२१,२०२१-२२ २०२२-२३,२०२३-२४ ला अनुक्रमे ०३,०२, ०४, ०१ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. सहशालेय उपक्रमांतर्गत शाळेत तीन दिवसीय स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले त्यात विविध क्रीडा स्पर्धा ,सांस्कृतिक स्पर्धा व बौद्धिक स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या .सदर कार्यक्रमाचे प्रसंगी अल्युमनी असोसिएशन न्यू दिल्ली येथील कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आलेले होते. सदर पाहुण्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम व शालेय गुणवत्ता विकासासाठी धडपडणारा शिक्षक वर्ग पाहून अल्युमनी असोसिएशन न्यू दिल्लीने सदर शाळेला ₹ १,२०,०००/- हजार रुपयांचे डिजिटल बोर्ड व ₹१,३०,०००/- वाटर प्युरिफायर प्लांट ,वस्तूरूपाने भेट दिली .सदर डिजिटल पॅनल बोर्डमुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने शालेय विद्यार्थ्यांना विविध जटील समस्या, सहज व सोप्या करून सांगणे सुलभ झालेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकास साधायला फार मोठी मदत झाल्याचे दिसून येते तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छ पाणी सातत्याने मिळत असून विद्यार्थ्यांच्या शारीरिक आरोग्याकडे सुद्धा शाळा पुरेशा प्रमाणात लक्ष पूरवित आहे, त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरिक आरोग्यावर झाल्याचे दिसून येत आहे .शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ यामध्ये जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा मोरगाव यांनी उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी दिलेल्या निकषांचा शिक्षक, पालक व गावातील शिक्षणप्रेमी यांची सामूहिक सभा घेण्यात आली व सदर उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला. शाळेत विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेसे फर्निचरची व्यवस्था उपलब्ध नव्हती परंतु लोकवर्गणीच्या माध्यमातून शाळेत मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना बसण्यासाठी टेबल आणि बेंचेसची व्यवस्था करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. सदर उपक्रमात काही निकषाची पूर्तता होणे शक्य नव्हते परंतु प्रशासनाने दिलेल्या निकषांची पूर्तता करण्यासाठी शालेय परिसरामध्ये परसबागेसाठी पुरेशी जागा उपलब्ध नव्हती तसेच क्रीडांगणासाठी सुद्धा

पुरेशी जागा उपलब्ध नव्हती, अशा वेळेस विद्यार्थ्यांना परसबागेची निर्मिती व त्याचे प्रत्येक ज्ञान निर्माण व्हावे त्या दृष्टीने गावातील पोलीस पाटील रमेश झोडे यांची अर्धा एकर जागा भाडेतत्त्वावर घेण्यात आली व शाळेशेजारी जागेवर सुंदर अशी परसबाग निर्माण करून ,दिलेल्या निकषांची पूर्तता करण्याचा यथोचित प्रयत्न करण्यात आला त्याचबरोबर क्रीडांगणासाठी मार्गशीर्ष बुद्ध विहार मोरगाव येथे संरचित क्रीडांगण आखण्यात आले व विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना वाव देण्याचा यथोचित प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अध्ययन अध्यापन व्हावे यासाठी शाळेत जिओ फायबर इंटरनेट स्थापित करण्यात आले .अध्ययन- अध्यापनात दृकश्राव्य साधनांचा वापर व विविध मूलभूत शैक्षणिक साहित्य निर्माण करून अध्ययन- अध्यापन परिणामकारक करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले व शालेय अध्ययन पूरक व आनंददायी वातावरण निर्मितीसाठी ग्रामपंचायत कार्यालय मोरगावने, शालेय भिंतीवर बाला पेंटिंग व शालेय रंगरंगोटी करून दिली. सदर अभियानास शिक्षक ,पालक, ग्रामपंचायत कार्यालय यांचे उस्फुर्त सहकार्य लाभले .प्रत्येक वर्गात विषयनिहाय व वर्गनिहाय अध्ययन निष्पत्ती प्रदर्शित करून त्यानुसार अध्ययन -अध्यापन प्रभावीपणे होऊ लागले. शासकीय योजनांचे विविध तक्ते ,फ्लेक्स दर्शनी भागावर प्रदर्शित करण्यात आले. शासन ध्येय -धोरणांची पूर्तता करण्यासाठी व विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व त्या पृष्ठ छायाचित्रे, यु-डायस प्रणाली वरील नोंदी, महावाचन चळवळ ,विविध समित्या स्थापन ,शासकीय यंत्रणेस अचूक माहिती पुरविणे, विद्यार्थी अभिलेखे, शालेय दप्तरांची नीटनेटके वर्गीकरण व अद्ययावतीकरण करून संवर्धन करण्यात आले .नवभारत साक्षरता सर्वेक्षण स्वयंसेवक नियुक्ती व त्यांचे अध्ययन- अध्यापन यामध्ये साक्षरता कार्यक्रमाला शाळेच्या वतीने प्रचार- प्रसार करण्यात आला. शैक्षणिक संपादणूकीमध्ये PATनुसार अध्ययन निष्पत्ती तसेच वर्ग पाचवा व आठवा शिष्यवृत्ती परीक्षा यांचे पूरक मार्गदर्शन केल्यामुळे शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ यामध्ये जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा मोरगाव यांनी जिल्हास्तरावर प्रथम स्थान पटकावले हे सांगताना मला सार्थ अभिमान वाटतो. मुख्याध्यापक, शिक्षक ,पालक, शिक्षण प्रेमी यांच्या शाळेला लाभलेला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य व शिक्षकांनी नियोजनबद्ध आखलेले विविध उपक्रमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामुळे शाळेकडे विद्यार्थी व पालक वर्ग आकर्षित होत असून, दिवसेंदिवस शाळेची पटसंख्या वाढत आहे .शाळेत विविध सांस्कृतिक स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, क्रीडा स्पर्धा आयोजित करून, विद्यार्थ्यांमध्ये समाधीटपणा विकसित करण्याच्या प्रयत्न शाळेच्या वतीने करण्यात येतो. विविध शालेय व सहशालेय उपक्रमामुळे शालेय विद्यार्थी शाळेत येण्यास उत्सुक असतात. त्यामुळे शाळेची सरासरी उपस्थितीचे प्रमाण ९५ टक्के पेक्षा अधिक असते.




शासनाने निर्धारित केलेल्या निकषांच्या यथोचित अभ्यास करून व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत असल्याने, आज शालेय गुणवत्ता विकासासाठी जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा मोरगाव याकडे अंगुली निर्देश केले जाते हे सांगताना मला सार्थ अभिमान वाटतो.



उपक्रमांची नांदी पसरली, सूर्यप्रकाश पसरावा जसा

शिक्षक, पालक ,समाज सहभागाने, बदल घडावा असा*

स्वच्छ ,सुंदर, गुणवत्तेचा मनात ठेवा वसा

उपक्रमशील शालेय नेतृत्वातून विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेचा विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी,

शाळेचा पत्ता - वाखारी ता. वसमत, जि. हिंगोली.

शाळेचा ई-मेल आय डी - zppswakhari801@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री माणिक विश्वनाथराव मुस्तरे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9421385548

प्रास्ताविक -


शाळा ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र असते. शिक्षण प्रक्रियेचा गाभा म्हणजे विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतांचा विकास. या क्षमतांमध्ये वाचन, लेखन, गणितीय कौशल्ये, विचारशक्ती, संवादकौशल्ये आणि जीवनोपयोगी मूल्ये यांचा समावेश होतो. या क्षमतांच्या विकासासाठी मुख्याध्यापकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

मुख्याध्यापक म्हणजे केवळ शाळेचे प्रशासकीय प्रमुख नसून ते शैक्षणिक नेतृत्व करणारे मार्गदर्शक असतात. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी योग्य शैक्षणिक वातावरण निर्माण करणे, शिक्षकांना प्रेरणा देणे, नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे, तसेच शिक्षक,पालक व समुदाय यांना शिक्षणप्रक्रियेत सहभागी करून घेणे हे त्यांचे मुख्य कार्य असते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या मूलभूत शैक्षणिक क्षमतांचा विकास हा शिक्षणप्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. मूलभूत क्षमतांमध्ये वाचन, लेखन, गणिती संकल्पना, निरीक्षण, विश्लेषण, संवादकौशल्ये, आत्मविश्वास, विचारशक्ती आणि स्व-अभिव्यक्ती यांचा समावेश होतो. या क्षमतांवरच पुढील शैक्षणिक टप्प्यांतील यश अवलंबून असते.

शाळा ही विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविणारी प्रयोगशाळा असते आणि या प्रयोगशाळेचे मुख्य मार्गदर्शक म्हणजे मुख्याध्यापक. ते शाळेचे प्रशासक असतानाच एक शैक्षणिक नेता म्हणूनही काम करतात. शिक्षण धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, गुणवत्तापूर्ण अध्यापनाची निगराणी, शिक्षकांचे नियोजनबद्ध प्रशिक्षण, तसेच पालक आणि समाजाच्या सहभागातून शाळेच्या कार्यक्षमतेत वाढ करणे ही त्यांच्या कामाची प्रमुख क्षेत्रे आहेत.

आजच्या बदलत्या शैक्षणिक आणि सामाजिक संदर्भात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पातळीवर योग्य प्रकारे मार्गदर्शन करणे ही काळाची गरज आहे. यासाठी मुख्याध्यापक विविध प्रकारच्या नावीन्यपूर्ण उपक्रम,सर्जनशील अध्यापन पद्धती, मूल्यमापन पद्धतींतील सुधारणा, आणि सकारात्मक शाळा संस्कृती निर्माण करण्यावर भर देत असतात.



मुख्याध्यापक, शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी -

1.विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक पातळीतील फरक :

सर्व विद्यार्थ्यांची वाचन, लेखन व गणितातील क्षमता सारखी नसते. काही विद्यार्थी खूप मागे असतात, त्यामुळे एकसंध अध्यापन करणे कठीण जाते.

2. अध्ययनातील रूची व प्रेरणेचा अभाव:

काही विद्यार्थ्यांना अभ्यासात रस नसतो, त्यांना शिकण्याबाबत सकारात्मक प्रेरणा मिळत नाही.

3. आई-वडिलांचा किंवा पालकांचा शिक्षणात कमी सहभाग:

कुटुंबातून शिक्षणाबाबत सहकार्य न मिळाल्यास विद्यार्थ्याच्या प्रगतीवर परिणाम होतो.

4. पालकाची शिक्षणाप्रती उदासिनता :

शिकून कोणाला नौकरी मिळत आहे. त्यापेक्षा शेतात कामाला चल अस म्हणून पालक शेताकडे मुलांना घेवून जातात. त्यामुळे विद्यार्थ्याची शाळेतील अनुपस्थिती वाढते व विद्यार्थी मुलभूत क्षमता विकसित होण्यापासून वंचित राहतो.

5. भौतिक साधनांची कमतरता:

वाचनासाठी पुस्तके, क्रियाकलापांची साधने, तंत्रज्ञान इ. गोष्टींचा अभाव शिक्षणात अडथळा


निर्माण करतो.

6. वेळेची कमतरता व अतिरिक्त कामांचा भार:

मुख्याध्यापक व शिक्षक यांना शैक्षणिक कामाबरोबरच प्रशासकीय कामेही करावी लागतात, त्यामुळे अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नाही.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्याध्यापक, शिक्षक यांनी केलेल्या प्रभावी उपाययोजना / अंमलबजावणी -

विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेऊन गट तयार करणे, नवीन व रंजक अध्यापन तंत्रांचा वापर, कथाकथन, चार्ट, ऑडिओ-व्हिडिओ, नाट्य रूपांतर यांचा वापर. कृतीआधारित (Activity-based) शिक्षणासाठी छोटे प्रयोग, खेळ, प्रकल्प, पालक सहभाग वाढवणे, दरमहा पालक बैठका घेणे. घरच्या घरी वाचन / पाढे / गणिती खेळ घेण्याचे प्रोत्साहन, शिक्षक प्रशिक्षण व सहशिक्षण, शिक्षक कार्यशाळा (workshops), demo क्लासेस, शिक्षण संवाद. इतर शाळांच्या उत्कृष्ट उपक्रमांचे निरीक्षण, तसेच शाळेमध्ये विद्यार्थ्यांना परिपाठापूर्वीचा अभ्यासवर्ग, स्पेलींग बी उपक्रम, रात्रीचे अभ्यास वर्ग, विविध ॲपच्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन, अध्ययन लॅब, डिजीटल बोर्डचा अध्ययन अध्यापनात वापर, अभ्यासमित्र जोडीच्या माध्यमातून अध्ययन करण्यास प्रोत्साहन देणे, आदि उपक्रमाची प्रभावीपणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी, ता. वसमत, जि. हिंगोली येथे अंमलबजावणी केली जाते.



1.**अभ्यास मित्र जोडी -**

शाळेमध्ये अभ्यासात मागे असणारे विद्यार्थी किंवा मुलभूत क्षमता विकसीत न झालेले विद्यार्थी व अभ्यासात पुढे असलेले विद्यार्थी / मुलभूत क्षमता प्राप्त विद्दयार्थी याची जोडी लावून देण्यात आली. विद्यार्थी / मुलभूत क्षमता प्राप्त विद्दयार्थी याची अभ्यास मित्र म्हणून निवड करण्यात आली व या विद्यार्थ्यांनी आपल्या मित्रासोबत नियमितपणे अभ्यास करण्यासाठी घरी एकत्र बसणे. गटात बसून अभ्यास करणे. यामुळे जरी एखादा विद्यार्थी अभ्यासासाठी कंटाळा करत असला तरी मित्र घरी आलेला पाहून तो देखिल अभ्यास करण्यासाठी तयार होतो. दोघे चर्चा करुन अभ्यास करतात. ज्या गोष्टी जमत नाही त्या गोष्टी तो मित्रांकडून शिकतो. उदा. संख्यांची ओळख, इंग्रजी मुळाक्षरे, शब्द याचे वाचन, मराठी जोडाक्षर युक्त शब्दांचे वाचन अशा क्रिया तो मित्रासोबत न घाबरता करतो यामुळे अभ्यासात मागे असणाऱ्या विद्दयार्थ्यांच्या मुलभूत क्षमता विकसित होण्यास मदत होते.



भाषा, इंग्रजी व गणित साहित्य पेटीचा वापर -

शासनाने पुरविलेल्या भाषा, इंग्रजी व गणित साहित्य पेटी याचा पुरेपुर वापर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी या ठिकाणी करण्यात येतो. यातील सर्व साहित्य अतिशय दर्जेदार असून विद्यार्थ्यांना ते हाताळताना आनंद होतो. या साहित्याच्या माध्यमातून मुलभूत क्षमता वृंध्दीगत होण्यास मदत होते.

मराठी मुळाक्षरे, इंग्रजी मुळाक्षरे, छोटे-छोटे शब्द, वाक्य इत्यादी विद्यार्थी स्वत: बनवून वाचन करतात. त्याचे अनुलेखन करतात. गणितातील बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या मुलभूत क्रिया साहित्याच्या माध्यमातून करतात त्यामुळे या क्रियांचे दृढीकरण होते.



अध्ययन लॅब / अध्ययन प्रयोगशाळा -

विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक साहित्य सहजरित्या हाताळता यावे व सर्व विषयाचे साहित्य एकाच छताखाली उपलब्ध व्हावे या उद्देशाने अध्ययन लॅब / अध्ययन प्रयोगशाळा उभारण्यात आली. यामध्ये मराठी, गणित, इंग्रजी या विषयाचे साहित्य मोठया प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आले. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी स्वत: जावून आपल्या हवे असलेल्या विषयाचे साहित्य घेवून त्याचे वाचन करणे, लेखन करणे अशा क्रिया विद्यार्थी या अध्ययन लॅबव्दारे करतात.

याचाच परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविण्यासाठी अध्ययन लॅब अतिशय उपयुक्त ठरत आहे. यातील साहित्याची मांडणी विदयार्थी स्वत: करतात. या लॅबमध्ये तीन विभाग करण्यात आले आहे. यामध्ये मराठी / भाषा विभाग, गणित विभाग व इंग्रजी विभाग अशा तीन विभागात साहित्याची मांडणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी बैठक व्यवस्था देखील करण्यात आली आहे.



परिपाठापूर्वीच्या वेळेचा सदुपयोग केला (सकाळी 9.00 ते 9.30)

शाळेची वेळ 9.30 ते 4.00 अशी आहे. परंतु बरेचसे विद्यार्थी हे शाळेत सकाळी 8.30 वाजता शाळेत येवून खेळतात तर काही विद्यार्थी भांडणतंटा करताना दिसून आले यातून पालकाच्या तक्रारी वाढत होत्या यावर उपाय म्हणून मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांच्या विचारातून इयत्ता 7 वी तील विद्यार्थ्यांच्या मदतीने परिपाठ पूर्वीच्या वेळेचा सदुपयोग करण्याचे ठरविण्यात आले. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना आपआपल्या वर्गात बसविण्यात येते. वर्गात बसून आपल्या मित्रासोबत विविध अभ्यास कृती करुन घेतल्या जातात. यामध्ये अभ्यास करताना कोणत्याही विषयाचे बंधन नसते. मुक्तअभ्यास करणे,विद्यार्थ्यांना वाचन, चिंतन, मनन करण्यासाठी हा वेळ देण्यात येतो. याचाच परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांचे मराठी, गणित, इंग्रजी या विषयातील मुलभूत क्षमता विकसित होण्यासाठी झाला.



रात्रीचे अभ्यासिका वर्ग -

ग्रामीण भागात वीजेची मोठी समस्या आहे. 24 तास वीज उपलब्ध राहत नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी अभ्यास करताना विद्यार्थ्यांना व्यत्यय निर्माण होतो त्याचाच परिणाम कधी कधी विद्दयार्थी मागे राहण्यामध्ये होत असतो,असे होवू नये म्हणून मुख्याध्यापक व शालेय व्यवस्थापन समिती वाखारी यांच्या संकल्पनेतून रात्रीचे अभ्यासिका वर्ग सुरु करण्यात आले. हे वर्ग शाळेत व गावातील बुध्दविहार या ठिकाणी भरविण्यात येतात. या दोन्ही ठिकाणी इर्न्वटरची व्यवस्था असल्याने वीजेअभावी अभ्यास करता आला नाही ही समस्या सोडविण्यास मदत झाली. हे वर्ग शालेय व्यवस्थापन समिती सदस्य व पालक, शिक्षणप्रेमी यांच्या मार्गदर्शनाखाली चालविण्यात येतात. या वर्गाची वेळ सायंकाळी 6 ते 8 अशी आहे. याचाच परिणाम म्हणजे शाळेतील बऱ्याच विद्यार्थ्यांना मुलभूत क्षमता प्राप्त करण्यात मदत झाली आहे.





मोबाईल मधील विविध ॲपचा अध्ययनासाठी वापर


सर्वच मुले ही मोबाईल वापर करताना हल्ली मोठया संख्येने दिसत आहे. परंतु त्यावर गेम न खेळता त्याचा वापर अध्ययन करण्यासाठी करता येईल का यासाठी पालकांना विविध ॲप वापराबाबत पालक सभेतून माहिती देण्यात आली. पालकांच्या निगराणीत मोबाईल शैक्षणिक ॲप्स कशा वापरायाचे याबाबत कार्यशाळा घेवून मार्गदर्शन करण्यात आले. त्यासाठी निश्चित वेळ ठरवून देण्यात आला. कोणत्या ॲप्स वापरायच्या? किती वेळ वापर करायचा? इत्यादी सखोल मार्गदर्शन पालक व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक व शिक्षकांनी केले. यातून विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविण्यास मदत झाली.

मराठी ॲप, READ TO ME, DIGITAL SAKSHAR,

YOUTUBE, HELLO ENGLISH, WHATSAPP

स्मार्ट बोर्ड आणि स्मार्ट टि.व्ही. चा वापर -

कृतीयुक्ती अध्ययन-अध्यापन व्हावे यासाठी शाळेत डिजीटल स्मार्ट बोर्डचा वापर करण्यात येतो. या बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थी स्वत: कृती करतात. गणितातील बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, या क्रिया सहज करतात. तर भाषेतील शब्दकोडी, अर्थपूर्ण शब्द तयार करणे, वाक्य तयार करणे. व्हिडीओच्या माध्यमातून विविध संकल्पना समजून घेणे इत्यादी कृती स्मार्ट बोर्ड व्दारे करण्यात येतात.



PDF पाठ्यपुस्तक वापर करण्यात आला.

बालभारती च्या वेबसाईटवरील पीडीएफ स्वरुपातील पुस्तके कशी डाऊन लोड करावी त्याचा वापर कसा करावा याबाबत देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रामुख्याने इयत्ता 6 वी व इयत्ता 7 वी तील विद्यार्थ्यांना याबाबत कार्यशाळेच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. या पीडीएफ पुस्तकाचा वापर करुन पुस्तकातील स्वाध्याय व लेखन कृती मोबाईलवर व स्मार्ट बोर्ड वर सहजरित्या करणे शक्य झाले आहे.

युट्युब वरील व्हिडीओ यांचा वापर -

विद्यार्थ्यात आत्मविश्वास वाढला पाहिजे त्याशिवाय तो चांगल्या रितीने अध्ययन करु शकणार नाही. यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरीत करणारे व्हिडीओज युट्युब व्दारे दाखविण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने इंग्रजी मध्ये संवाद कसा साधावा? इंग्रजी शब्दाचे उच्चार कसे करावेत ? उच्चारशास्त्राचे ज्ञान अवगत करण्यासाठी, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या क्रिया अचूक व कमीत कमी वेळात कशा कराव्यात? पाढे कसे तयार करावे? मराठी पत्रलेखन, निबंधलेखन याबाबत मार्गदर्शन या व्हिडीओज व्दारे करण्यात येते. यातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागतो. याचाच परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांत मुलभूत क्षमता विकसित होण्यास मदत झाली.

स्पेलिंग बी उपक्रम -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी, ता. वसमत, जि. हिंगोली येथे दर शनिवारी आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गतच स्पेलिंग बी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमात विद्यार्थ्यांना दररोज इंग्रजी 10 शब्द दिले जातात. व्हाटसॲप ग्रुपच्या माध्यमातून आठवड्यात 50 शब्द दिले जातात. या शब्दावर आधारित शनिवारी एक चाचणी घेतली जाते. यामध्ये विदयार्थ्यांनी इंग्रजी शब्दाचे श्रृतलेखन करावयाचे. 20 शब्द ऐकून लिहावयाचे यासाठी 20 गुण दिले जातात. प्रत्येक अचूक शब्दाला 1 गुण असे गुणांकन केले जाते. 20 पैकी 20 गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तू भेट देवून त्याचे कौतुक केले जाते.

यासाठी विद्यार्थ्यांचे गटात विभागणी करण्यात आली आहे. इयत्ता 1ली व 2री गट, इयत्ता 3 री व इयत्ता 4 थी गट, इयत्ता 5 वी ते इयत्ता 7 वी अशा तीन गटात विद्यार्थ्यांची विभागणी करुन स्पेलींग बी हा उपक्रम राबविण्यात येतो.

या उपक्रमाचा फायदा असा झाला की विदयार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढला. इंग्रजी उतारे, पाठ वाचताना त्यांना मदत झाली. इंग्रजी भाषेतून संवाद साधणे सोपे झाले.



बाला (BALA) उपक्रम -

असे म्हणतात विद्यार्थी हा परिसरातील गोष्टीतून निरीक्षण करुन बरेच काही शिकत असतो. म्हणून शाळेतील असणारी झाडे, खिडक्यावरील पट, संरक्षक भिंत, व्हरांडे इत्यादी ठिकाणी विविध चित्र, शब्दाव्दारे विद्यार्थ्यांचे मुलभूत क्षमता वृंध्दीगत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. झाडावर फळे, फुले, वाहन, संगणक भाग इत्यादी नावे व चित्र असलेल्या पाट्या तरंगत्या लावण्यात आल्या आहेत.

याचाच परिणाम म्हणजे विद्यार्थी फळे, फुले, संगणक भाग यांची नावे मराठी व इंग्रजी भाषेत सहज सांगू शकतात. त्या चित्रांचे वर्णन करु शकतात.

माता-पालक मेळावा तथा कार्यशाळा -

मुलाची पहिली शाळा म्हणजे आई. या उक्तीनुसार विद्यार्थ्यांत परिवर्तन करण्याची क्षमता जर कोणात असेल तर ती म्हणजे आईत असते या विचाराने प्रेरीत होवून मुख्याध्यापक व शाळेतील सर्व शिक्षक यांनी माता-पालक मेळावा व कार्यशाळा आयोजन करण्याचे ठरविले. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घरी असल्यावर कोणत्या गोष्टी करणे अपेक्षित आहे या बाबत माता-पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना होणारे आजार, त्याचे खानपान या गोष्टीबद्दल आपण माता म्हणून कसे जागरुक असले पाहिजे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना आपण अभ्यासात कशी मदत करु शकतो याचे प्रात्यक्षिक स्वरुपात डेमो देवून प्रेरीत करण्यात आले. संगणक वापर, मोबाईल वापर कसा परिणामकारकपणे करावा याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थी शाळेत अनुपस्थित राहणार नाही यासाठी मातांनी कोणती काळजी घ्यावी याबाबत माहिती व जाणीव जागृती करण्यात आली. याचाच परिणाम विद्यार्थ्यांच्या उपस्थिती वाढीवर झाला आणि विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता विकसीत कण्यासाठी झाला.

नवोदय, स्कॉलरशिप पात्र विद्यार्थी -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी येथील सन 2024-25 मध्ये नवोदय पात्र 2 विद्यार्थी व स्कॉलरशिप धारक 5 विद्यार्थी झाले असून सरस्वती विद्या अकॅडमी लोणावळा येथे 4 विद्यार्थी निवड झाली आहे. या यशासाठी उन्हाळी वर्ग घेण्यात आले. या वर्गाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदशन करण्यात आले.

लोकसहभागातून विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार योजना -

लोकसहभागातून दर शनिवारी विद्यार्थ्यांना पूरक पोषक आहार देण्यात येतो. यामध्ये गावातून ग्रामस्थ, प्रतिष्ठीत नागरीक, शिक्षणप्रेमी, ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, यांच्या सहकार्यातून विद्यार्थ्यांना केळी फळाचे वाटप करण्यात येते. यासाठी इच्छुक देणगीदाराकडून देणगी मूल्य 1001 रु. घेण्यात येते. स्वईच्छेने गावकऱ्यांना पूरक पोषण आहार योजनेसाठी आवाहन करण्यात येते.

फलनिष्पती / यशोगाथा -

वसमत तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी ही शाळा उपक्रमशील शाळा, प्रयोगशील शाळा म्हणून नावाजलेली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी, ता. वसमत, जि. हिंगोली या शाळेने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणून दाखविले व पालकांचा विश्वास संपादन केला यामुळे पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला यातूनच शाळेचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम लोकसहभागातून झाले. याचाच परिणाम म्हणून ***मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा*** अभियानात शाळेने




तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवत तीन लाखांचे बक्षिस मिळविले. या बक्षिसातून शालेय गुणवत्ता वाढीचे नियोजन करण्यात येत आहे. प्रामुख्याने संगणक, पुस्तके, कृतीयुक्त अध्ययन - अध्यापनासाठी लागणारे साहित्य, फर्निचर, क्रीडा साहित्य, डिजिटल स्मार्ट बोर्ड, विविध विषयासाठी असलेले घटक निहाय ॲनिमेटेड व्हिडीओ पेन ड्राईव्ह, खरेदी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यातून विद्यार्थी गुणवत्ता वाढण्यास मदत होणार आहे. शालेय विद्यार्थी व शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नाना प्रतिसाद म्हणून शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ अधिक क्रियाशील होवून शालेय प्रगतीसाठी प्रयत्न करत आहेत. शाळेसाठी मदतीचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे. शिकण्या शिकविण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी व परिणामकारक झाली आहे. शाळेतील 90 टक्के विद्यार्थ्यांना मराठी, गणित व इंग्रजी या विषयातील मुलभूत क्षमता पूर्ण करतात. हिच आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी, ता. वसमत, जि. हिंगोली शाळेची यशोगाथा आहे.



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा 2 जिल्हास्तरीय मूल्यांकन समिती

समारोप -

मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्यातून, शालेय व्यवस्थापन समिती सहभाग, ग्रामस्थांचे योगदान यांच्या बळावर शाळेने विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविण्यासाठी मदत झाली आहे. यापुढेही शाळा अशीच विद्यार्थी विकासासाठी सतत प्रयत्नशील राहणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव तयार असणार आहे. एकविसाव्या शतकातील पिढी घडविण्याचे कार्य करणार आहे.

----------**----------

विद्यार्थी हिताचे नाविन्यपूर्ण उपक्रम घेणारे शालेय नेतृत्व

शाळेचे नाव - जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, भोसी

शाळेचा पत्ता - भोसी,तालुका औंढा नागनाथ जिल्हा हिंगोली

मुख्याध्यापक नाव - श्री. अंकुश रंगनाथ जाधव

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९३५९३९४३६३

मुख्याध्यापक ईमेल आय डी - ankushjadhav123@gmail.com

प्रस्तावना -

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे कोणत्याही शाळेचे मुख्य उद्दिष्ट असते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, भोसी ही अशा काही आदर्श शाळांपैकी एक आहे, जी शिक्षण, संस्कार, पर्यावरण संवर्धन, डिजिटल साक्षरता आणि सामाजिक सहभाग यांच्या माध्यमातून गावाच्या विकासात मोलाचा वाटा उचलते आहे.


शाळेतील शिक्षकवृंद, मुख्याध्यापक श्री. अंकुश जाधव यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली व पालक, ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागातून शाळेने अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. शाळेची भौतिक, बौद्धिक व सामाजिक प्रगती ही विद्यार्थ्यांच्या हितासाठी रचनात्मक दृष्टिकोनातून करण्यात आली आहे.

शाळा सुंदर आणि स्वच्छ ठेवणे, वर्ग सजावट, ICT लॅब, Wi-Fi सुविधा, जलसंधारण, सौरऊर्जा, इको क्लब, शाळा सुरक्षा शपथ, शैक्षणिक प्रदर्शन, NSQF अभ्यासक्रम, मुलाभिमुख शिक्षण, मुलांच्या हक्कांची जपणूक, झिरो ड्रॉपआउट, विद्यार्थी पोर्टल, अशा अनेक उपक्रमांमुळे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, भोसी शाळा जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण राज्यात प्रेरणादायी उदाहरण बनली आहे.

या यशोगाथेमधून शाळेच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेण्याचा आणि इतर शाळांसाठी प्रेरणास्रोत ठरण्याचा उद्देश आहे. शिक्षण विभाग, शिक्षक, अभ्यासक, पालक व शालेय समिती सदस्यांसाठी ही यशोगाथा एक मार्गदर्शक ठरेल, हीच अपेक्षा !

वर्ग व शाळा सजावट

- विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गांची स्वतः सजावट करून भिंतींवर चार्ट्स, कागदी कलाकृती, सुविचार लावले. यामुळे त्यांच्या सृजनशीलतेला चालना मिळाली. वर्गातील शिक्षण अधिक प्रभावी आणि आनंददायक बनले. शिक्षकांनी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांचे नेतृत्व विकसित केले. वर्ग सजावटीमध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचा सहकार्याने सहभाग राहिला. यामुळे शाळेच्या एकंदर वातावरणात सकारात्मक बदल झाला.



शालेय स्वच्छता व वृक्षारोपण

- शालेय परिसरातील स्वच्छता व वृक्षारोपण "स्वच्छ शाळा, सुंदर शाळा" या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात दररोज स्वच्छता मोहीम राबवली. प्रत्येक वर्गाने आपापले क्षेत्र निश्चित करून तण काढणे, झाडांना पाणी घालणे यासारख्या कामांमध्ये सहभाग घेतला. विविध प्रकारच्या झाडांचे रोपण करून शाळा हिरवीगार करण्यात आली. शाळेच्या आजूबाजूला फुलझाडे, औषधी वनस्पती आणि फळझाडे लावण्यात आली आहेत. विद्यार्थी नियमितपणे झाडांची निगा राखतात.





मैदान व क्रीडा नियोजन व अमलबजावणी

- खेळाचे मैदान व क्रीडा साहित्य विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी खेळ हे आवश्यक आहेत. शाळेने मोठे व स्वच्छ मैदान तयार करून त्यात खो-खो, कबड्डी, बॅडमिंटन आदी खेळांसाठी व्यवस्था केली आहे. खेळांचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून शिक्षक क्रीडा मार्गदर्शक म्हणून कार्य करतात. रोजच्या वेळापत्रकात क्रीडेसाठी वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थी आनंदाने व स्फूर्तिने शाळेत सहभागी होतात.





आधुनिक डिजिटल लर्निंग रूम

- ICT लॅब व Wi-Fi सुविधा शाळेत आधुनिक डिजिटल लर्निंगसाठी ICT लॅब स्थापन केली आहे. या लॅबमध्ये संगणक, प्रोजेक्टर, टॅबलेट्स आणि इंटरनेटची सोय आहे. शिक्षकांनी डिजिटल साधनांद्वारे अध्यापन करणे सुरू केले आहे. Wi-Fi कनेक्टिव्हिटीमुळे विद्यार्थ्यांना व्हिडीओज, ऑडिओ क्लिप्स व शैक्षणिक ॲप्सचा वापर करता येतो. ICT लॅबचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये टेक्नोलॉजिकल स्किल्स वाढल्या आहेत.



सुरक्षा व्यवस्थापन व आपत्ती नियोजन

- सुरक्षा व्यवस्थापन व आपत्ती नियोजन शाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. शाळेच्या आवारात सुरक्षा फलक, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग आणि अग्निशमन यंत्रे लावण्यात आली आहेत. शिक्षक आणि विद्यार्थी यांना आपत्तीव्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले आहे. दर महिन्याला आपत्ती परिस्थिती हाताळण्याचा सराव घेतला जातो. विद्यार्थ्यांना सुरक्षा शपथ दिली जाते आणि आपत्कालीन क्रमांकांची माहिती दिली जाते

दिव्यांग विद्यार्थी सुविधा

- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुविधा - शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, उतार (Ramp) आणि सुलभ आवागमनाची व्यवस्था करण्यात आली आहे. वर्ग कक्षांतही दिव्यांग अनुकूल बैठक व्यवस्था ठेवण्यात आली आहे. शिक्षक विशेष काळजी घेतात. सर्व उपक्रमांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग असतो. शाळा समावेशक शिक्षणासाठी कार्यरत आहे.

स्कूल फर्निचर

- स्कूल फर्निचर - शाळेतील प्रत्येक वर्गात पुरेसे व दर्जेदार फर्निचर पुरवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या उंचीप्रमाणे डेस्क व खुर्च्या निवडल्या आहेत. शिक्षकांसाठी टेबल, फाईल कपाट आदी साहित्य उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छ व आरामदायक बसण्याचे वातावरण मिळते. फर्निचर देखभाल नियमित केली जाते. शाळेचे वर्ग आकर्षक व कार्यक्षम बनले आहेत.

सुरक्षित कंपाउंड वॉल

- शाळेचा सुरक्षित कंपाउंड वॉल विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा विचार करून शाळेभोवती मजबूत कंपाउंड वॉल उभारण्यात आला आहे. यामुळे शाळेचा परिसर सुरक्षित राहतो. अनधिकृत व्यक्तींचा प्रवेश टाळला जातो. याशिवाय प्रवेशद्वारावर दरवाजा लावून योग्य देखरेख ठेवली जाते.यामुळे पालकांचा विश्वास वाढला आहे.



बोलक्या भिंती

- प्रेरणादायी भित्तीचित्रे व सुविचार शाळेच्या भिंतींवर रंगीत चित्रकला, सुविचार, माहितीफलक लावले गेले आहेत. यात पर्यावरण, देशभक्ती, स्वच्छता, शिक्षण यासारख्या विषयांचा समावेश आहे. हे चित्र विद्यार्थी आणि शिक्षकांनी मिळून तयार केली आहेत. यामुळे परिसर आकर्षक झाला असून शैक्षणिक वातावरण निर्माण झाले आहे.

पर्यावरणस्नेही उपक्रम

- जलसंधारण प्रकल्प व सौरऊर्जा शाळेत पावसाचे पाणी साठवण्यासाठी जलसंधारण प्रकल्प राबवण्यात आला आहे. यामुळे उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासत नाही. शाळेत सौरऊर्जा प्रकल्प बसवण्यात आला असून शाळेला वीज पुरवठा सौरपॅनलद्वारे केला जातो. यामुळे विजेची बचत होते व पर्यावरण पूरक उपक्रम घडतो.

शाळेची बचत बँक योजना (School Savings Bank Scheme)

जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा भोसी ता. औंढा (ना.), जि. हिंगोली

उद्देश

विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय, जबाबदारीची भावना व आर्थिक साक्षरता निर्माण करणे.

प्रमुख वैशिष्ट्ये

1. सहभागी विद्यार्थी- इयत्ता 1वी ते 8 वी पर्यंत सर्व विद्यार्थी.

2. संचालन- शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी प्रतिनिधींमार्फत.

3. बचतीचा कालावधी- दर आठवड्याला/महिन्याला ठराविक रक्कम जमा केली जाते.

4. खाते उघडणे- प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वतंत्र बचत खाते.

5. नोंदवही- प्रत्येक व्यवहाराची नोंद बँक वहीत व डिजिटल स्वरूपात.

6. व्याजदर- ठरवलेले दरश्रेणीनुसार (सहसा बिनव्याजी योजना).

7. उपयोग- शैक्षणिक साहित्य, फी भरती, अपत्कालीन गरजांसाठी.

फायदे

विद्यार्थ्यांमध्ये बचत व नियोजनाचे महत्त्व समजते.आर्थिक जबाबदारीची सवय लागते.

स्वावलंबन व उद्योजकतेची बीजे पेरली जातात.पालकांचा सहभाग वाढतो.

वार्षिक अहवाल (उदाहरण)-

एकूण खातेधारक विद्यार्थी- 250

एकूण बचत रक्कम- ₹ 18,000/-

उपयोग- वही, पुस्तक, गणवेश, परीक्षा फी आदीसाठी

शिक्षक व विद्यार्थी यांच्या एकत्रित प्रयत्नातून शाळेची बचत बँक ही यशस्वीरीत्या कार्यरत आहे आणि विद्यार्थ्यांचे आर्थिक सशक्तीकरण घडवत आहे

शाळेतील ग्रंथालय, वाचन कोपरे आणि पुस्तकं पतपेढी

जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा भोसीता. औंढा (ना.), जि. हिंगोली

शाळेचे ग्रंथालय

उद्देश- विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानवृद्धी साधणे व अभ्यासाबरोबरच सर्जनशीलता विकसित करणे.

वैशिष्ट्ये-

पुस्तकांची संख्या- 600+

प्रकार- गोष्टी, बालवाङ्मय, विज्ञान, स्वच्छता, प्रेरणादायी जीवनचरित्र, इ.

उपलब्ध भाषा - मराठी, हिंदी,इंग्रजी



पुस्तक वापर - आठवड्याला ठराविक दिवशी ग्रंथालयातील पुस्तकांचा उपयोग

ग्रंथालय शिक्षक- ग्रंथपाल म्हणून एक शिक्षक नियुक्त

नोंद प्रणाली- विद्यार्थी पुस्तक घेतल्याची व परत केल्याची नोंद वह्यात ठेवली जाते

वाचन कोपरे (Reading Corners)

उद्देश- प्रत्येक वर्गात वाचनासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देणे.

वैशिष्ट्ये-

प्रत्येक इयत्तेसाठी कोपरा - वाचन टेबल, गादी, रंगीत भिंती, प्रेरणादायी वचन

दररोज 10-15 मिनिटांची वाचन सवय

वर्गशिक्षक देखरेख - शिक्षक वाचन सत्र चालवतात

विद्यार्थ्यांचा सहभाग - विद्यार्थी एकमेकांना गोष्टी सांगतात, वाचन स्पर्धा घेतल्या जातात

पुस्तकं पतपेढी (Book Bank / Book Lending Library)

उद्देश - गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके घरी नेण्याची व परत करण्याची सोय उपलब्ध करून देणे.

वैशिष्ट्ये-

सदस्यत्व- इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश पत कालावधी - 7 दिवस (वाढवता येतो)

पुस्तक परतावा- वेळेवर न परतविल्यास सूचना देखरेख. शिक्षक प्रतिनिधी आणि विद्यार्थी स्वयंसेवक

उपयोग - परीक्षेपूर्व तयारी, गोष्टी ऐकणे, सर्जनशील लेखनासाठी उपयोग


विशेष उपक्रम-

"वाचन सप्ताह", गोष्टी सांगण्याची स्पर्धा, लेखन कार्यशाळा

ज्ञानभेट, बाळशास्त्र परिषद यासाठी पुस्तक संकलन

बालवाचक दिन व गुरुवारी मौनवाचन

नवीन पिढीला विचारशील, जाणिवसंपन्न आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी शाळेतील ग्रंथालय, वाचन कोपरे आणि पुस्तकं पतपेढी महत्वाचे योगदान देत आहेत.



शाळेतील प्रयोगशाळा (Science Laboratory)

जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा भोसी ता. औंढा (ना.), जि. हिंगोली

उद्देश-

विद्यार्थ्यांना विज्ञानाचे सैद्धांतिक ज्ञान प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे अनुभवास येणे, निरीक्षण, विचारशक्ती व निष्कर्ष काढण्याची सवय लावणे.

प्रयोगशाळेची वैशिष्ट्ये -

वयोगटानुसार साहित्य - इयत्ता 1वी ते 7वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी सोप्या व सुरक्षित साधनांची निवड.

प्रयोगक्षम साहित्य- ~~5~~ भिंग, आरसे, चुंबक, बत्तीस पाटी

बीकर, नळी, रंगीत द्रव्य

स्थूल चुंबक, पाण्याचे नमुने, झाडांच्या व बीयांच्या नमुन्या

तापमानमापक, साधी इलेक्ट्रिक सर्किट बोर्ड

प्रदर्शन- प्रत्येक प्रकल्प नंतर विद्यार्थ्यांच्या हस्तकलेने सजवलेली भिंतचित्रे व चार्ट

शिक्षकांचे मार्गदर्शन-

विज्ञान शिक्षक मार्गदर्शन करतात

विद्यार्थ्यांना गटांमध्ये विभागून प्रयोग करून घेतले जातात

प्रयोग नोंद वही ठेवली जाते

निरीक्षण, निष्कर्ष लिहिण्याचा सराव

विद्यार्थ्यांचा सहभाग-

प्रात्यक्षिके सादर करणे

विज्ञान प्रदर्शनात भाग घेणे

पुनर्वापर साधनांनी मॉडेल तयार करणे

विशेष प्रयोग (उदाहरण) -

प्रयोग	उद्देश	इयत्ता
चुंबकाचे गुणधर्म	आकर्षण व अपकर्षण	5 थी
वनस्पतींचा जलवहन	कसे पाणी शोषले जाते	6 वी
प्रकाशाचे परावर्तन	आरशाचा उपयोग	7 वी
सर्किट तयार करणे	वीजप्रवाह समजणे	8 वी





सुरक्षेची काळजी -

लहान व सुरक्षित साहित्य

शिक्षकाच्या देखरेखीखालीच प्रयोग

आग/रसायन यांचा वापर टाळलेला

प्रयोगशाळा ही विद्यार्थ्यांसाठी केवळ अभ्यासाची जागा नसून, ती त्यांच्या संकल्पनात्मक विकासाची कार्यशाळा आहे. 'करून शिका' ही शिकवण येथे वास्तवात उतरते.





किशोर वयातील मुलींना मार्गदर्शन

किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन

(इयत्ता 1 ली ते 8 वी - वय 6 ते 14 वर्षे)

जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा भोसी

मार्गदर्शनाचे उद्दिष्ट -

शारीरिक, मानसिक व भावनिक विकासात मदत करणे

स्वच्छता, आरोग्य, आत्मसन्मान व सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करणे.शिक्षणात सातत्य राखण्यासाठी प्रेरणा देणे

इयत्ता 1 ली ते 4 थी (प्राथमिक वय - 6 ते 9 वर्षे)

मार्गदर्शन मुद्दे -

स्वच्छतेची सवय - दात घासणे, नखं कापणे, अंघोळ, कपड्यांची स्वच्छता

चांगले स्पर्श - वाईट स्पर्श यातील फरक

आई-वडिलांशी/शिक्षकांशी मोकळेपणाने बोलण्याची सवय

योग्य पोषण व आहाराचे महत्त्व

मैत्री, सहकार्य आणि विनयशील वागणूक

इयत्ता 5 वी ते 8 वी (किशोरवय - 10 ते 14 वर्षे)

महत्त्वाचे मुद्दे -

१. शारीरिक व मानसिक बदलांचे समजून घेणे -

वयानुसार शरीरात होणारे नैसर्गिक बदल

मासिक पाळी- स्वच्छता, नियमितता, घाबरू नये

हार्मोन्समुळे होणारे भावनिक बदल (चिडचिड, गोंधळ, ओढ, न्यूनगंड इ.)

२. आरोग्य व स्वच्छता -

पाळीच्या दरम्यान अंगस्वच्छता राखणे

सॅनिटरी नॅपकिनचा वापर व योग्य विल्हेवाट

पौष्टिक आहाराचे महत्त्व

नियमित व्यायाम व झोप

३. संवाद कौशल्य व आत्मविश्वास -

मोकळेपणाने प्रश्न विचारण्याची सवय

'नाही' म्हणायचे धाडस

कोणत्याही त्रासदायक प्रसंगात शिक्षक, आईवडील यांना कळविणे

४. लैंगिक शिक्षण व सुरक्षितता -

चांगले स्पर्श - वाईट स्पर्श

सोशल मीडियाचा वापर - सावधगिरी

आत्मरक्षण प्रशिक्षण / हेल्पलाईन क्रमांक


५. शिक्षण आणि स्वप्नं -

शिक्षणाची सातत्यता - मूलभूत अधिकार

पुढील शिक्षणाच्या योजना, करिअरची दिशा

बालविवाहविरोधी जनजागृती

कुटुंब, समाज व शिक्षकांचा पाठिंबा



मार्गदर्शन सत्र कोण घेऊ शकते?

महिला शिक्षक

आरोग्य सेविका / ANM

ग्रामसेविका

विशेष प्रशिक्षित समुपदेशक

अनुभवी विद्यार्थी-विद्यार्थिनी मेन्टर्स

विशेष उपक्रमांची कल्पना -

"सखी संवाद" - मुलींसाठी स्वतंत्र गट चर्चा

आरोग्य सप्ताह

सेनेटरी नॅपकिन वाटप व स्वच्छता जनजागृती

युवती नेतृत्व कार्यशाळा

'मी सक्षम' मुलींसाठी आत्मरक्षण प्रात्यक्षिके

टीप-

हा विषय संवेदनशील असल्याने वयाच्या अनुषंगाने योग्य शब्दांची निवड करून प्रेमाने, विश्वासपूर्वक व सुरक्षित वातावरणातच मार्गदर्शन द्यावे.

परस बाग व तिची उपयुक्तता

(शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व पालकांसाठी उपयुक्त)

जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा भोसी ता. औंढा (ना.), जि. हिंगोली

परस बाग म्हणजे काय?

परस बाग म्हणजे घराच्या किंवा शाळेच्या मागील किंवा मोकळ्या जागेत फळभाज्या, पालेभाज्या, फुलझाडे इत्यादींची नैसर्गिकरीत्या लागवड केलेली छोटी बाग. शालेय स्तरावर याला शालेय बाग असेही म्हणतात.


परस बागेतील सामान्य पिके-

पालेभाज्या - मेथी, पालक, शेपू, कोथिंबीर

फळभाज्या - टोमॅटो, वांगी, कारली, भेंडी, ढोबळी मिरची

कंदमुळे - गाजर, बीट, मुळे

औषधी वनस्पती - तुळस, आंबेमोहर गवत, आलं, हळद



फुलझाडे - झेंडू, गुलाब (मधमाशा व पक्ष्यांचे आकर्षण वाढवण्यासाठी)

परस बागेची उपयुक्तता-

1. **पोषण व आरोग्य-**

विद्यार्थ्यांना ताजी, विषमुक्त भाज्यांचा पुरवठा

आयरन, कॅल्शियम, फायबर्स यांसारख्या पोषकतत्त्वांची प्राप्ती

शाळेत मध्यान्ह भोजनात या भाज्यांचा वापर करता येतो

2. **शैक्षणिक उपयोग** -

विज्ञान, पर्यावरण, कृषीविषयक शिक्षण प्रत्यक्ष अनुभवावर आधारित

झाडांची वाढ, भाग, प्रक्रिया, खत, कीटकनाशक याबाबत ज्ञान

"करून शिका" तत्त्वावर आधारित प्रयोग

3. **स्वावलंबन व श्रमसंस्कार** -

विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, जबाबदारी व सहकार्याची भावना निर्माण

शाळेच्या स्वच्छतेत व सौंदर्यीकरणात भर

स्वकष्टातून काहीतरी निर्माण करण्याचा आत्मविश्वास

4. **पर्यावरण पूरक जीवनशैली** -

सेंद्रिय शेतीचे प्रात्यक्षिक

जलसंधारण, कंपोस्ट खत तयार करण्याचे शिक्षण

किटकमित्र, पक्षी, फुलपाखरांचे संवर्धन

5. **पालक व ग्रामस्थांचा सहभाग** -

बियाणे, कंपोस्ट, शेती साहित्य, अनुभव देणे


शिक्षक-विद्यार्थी-पालक यांचा सामुहिक उपक्रम

शाळेत परस बाग राबवताना घ्यावयाची काळजी -

पाण्याची व खतांची योग्य व्यवस्था

शाळेतील उपलब्ध जागेचा सुयोग्य वापर

विद्यार्थ्यांचे आठवड्याला शेड्यूलनुसार सहभाग कीटकनाशकांपासून दूर राहून सेंद्रिय पद्धतींचा अवलंब



विशेष उपक्रम -

“एक विद्यार्थी - एक रोपटं”

वर्गनिहाय झाड दत्तक योजना

शालेय बाग प्रदर्शन / भाज्यांचे संकलन दिवस

कंपोस्ट खत प्रकल्प

निष्कर्ष -

परस बाग ही शाळेतील शिक्षण व जीवनकौशल्य यातील दुवा आहे. ती विद्यार्थ्यांना केवळ नैसर्गिक पोषणच देत नाही तर पर्यावरणप्रेम, श्रमसंस्कार आणि सर्जनशीलता यांचेही बाळकडू देते









मेरी माटी मेरा देश उपक्रम

जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा भोसी ता. औंढा (ना.), जि. हिंगोली

उद्देश -

स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे स्मरण

देशभक्ती, राष्ट्रप्रेम, एकात्मता आणि मातीशी नाते घट्ट करणे

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय मूल्यांची जोपासना

मुख्य उपक्रम व अंमलबजावणी (शाळेतील स्वरूपात) -
पंचप्राण शपथ (पांच प्रतिज्ञा)-
विद्यार्थ्यांनी खालील शपथ सामूहिकरित्या घ्यावी-
1. देशाची सेवा करीन
2. भ्रष्टाचारापासून दूर राहीन
3. देशाच्या प्रगतीसाठी प्रामाणिकपणे काम करीन
4. पर्यावरण व पाण्याचे जतन करीन
5. भारतीय संस्कृती आणि वारसा जपेन

मृत्तिक कलश संकलन (मातीचे कलश)-
शाळेच्या पटांगणातील माती गोळा करून एक कलशात ठेवणे
तो कलश 'अमृत कलश' म्हणून ओळखला जातो
या मातीचा उपयोग "अमृत वाटिका" साठी केला जातो


वीरांना श्रद्धांजली व तिरंगा ध्वजारोहण-
शाळेत राष्ट्रध्वज फडकवणे
शहीद जवानांबद्दल माहिती सांगणे
विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषण, गीत सादरीकरण

भित्तीचित्र व चित्र प्रदर्शन-
"भारत माझा देश आहे", "शूरवीरांची गाथा", "हर घर तिरंगा" या संकल्पनांवर आधारित चित्रे
वर्गनिहाय स्पर्धा

'अमृत वाटिका' लागवड -
शाळेच्या आवारात वृक्षारोपण
प्रत्येक वर्गाने एक झाड दत्तक घेणे
झाडांवर स्वातंत्र्यसैनिकांची नावे देणे

विद्यार्थ्यांचे सहभाग कार्यक्रम-
देशभक्तीपर गीते, कवितावाचन
भाषण स्पर्धा (माझा देश, माझा अभिमान, माझे कर्तव्य)
'मी एक भारतीय' हे घोषवाक्य

छायाचित्र व अहवाल संकलन-
सर्व कार्यक्रमांचे फोटो
छोटा अहवाल तयार करून BRC/CRC स्तरावर सादर करणे



उपक्रमाचे फायदे-

विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना

स्वातंत्र्याचा इतिहास आणि शहीदांचे योगदान समजण्याची संधी

पर्यावरणपूरक, मूल्याधारित शिक्षण

"मेरी माटी मेरा देश" उपक्रम हे विद्यार्थ्यांमध्ये भारतीयत्वाचा अभिमान निर्माण करणारे एक प्रभावी पाऊल आहे.

शाळेतील पटसंख्या वाढ व गळती कमी करण्यासाठी उपाय

मुख्य उद्दिष्ट-

शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढवणे

विद्यार्थी मधूनच शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे

सर्वांगीण शिक्षण व गुणवत्ता वाढवणे

जनजागृती व पालकांशी संवाद-

शाळा प्रवेश मोहीम राबवणे- दरवर्षी जून महिन्यात ग्रामभेट, घरभेट

पालकसभा- नियमित पालक-शिक्षक संवाद वाढवणे

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवाहन

"एकही मुलगा/मुलगी शाळेबाहेर राहणार नाही" या संकल्पनेवर कार्य

विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे उपक्रम-

सातत्याने उपक्रम राबवणे - बालसभा, चित्रकला स्पर्धा, खेळ

बालमैत्री वातावरण- विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार शिकवण्याच्या पद्धती

वाचन कोपरे, बालसाहित्य, विज्ञान खेळणी

कला व क्रिडा दिन, बालदिन साजरे करणे

गुणवत्तापूर्ण व प्रेरणादायी शिक्षण-

करून शिकण्यावर भर- प्रयोग, नाटिका, प्रात्यक्षिक शिक्षण

समान संधी- गरीब, आदिवासी, दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष पाठपुरावा

‘गुणवत्ता-आधारित’ वर्गनिहाय विश्लेषण करून पूरक शिक्षण

मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे-


शौचालय, स्वच्छ पिण्याचे पाणी, प्रकाश, खेळाचे साहित्य

मध्यान्ह भोजन दर्जेदार ठेवणे मुलींना स्वतंत्र शौचालय - किशोरवयीन काळात अत्यावश्यक

किशोरवयीन मुलींसाठी उपाय (गळती टाळण्यासाठी)-

पाळी दरम्यान स्वच्छतेसाठी सुविधा व जनजागृती

आत्मसन्मान वाढवणारे उपक्रम - सखी संवाद, स्वसंरक्षण प्रशिक्षण



बालविवाहविरोधी जागृती

विशेष आकर्षण / सन्मान योजना-
नियमित येणाऱ्या व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र/बक्षिसे
'विद्यार्थी दूत' योजना - विद्यार्थीच गावातील इतर मुलांना शाळेत आणण्यासाठी प्रेरित करतात
'माझा वर्ग - माझी जबाबदारी' उपक्रम

शाळा व्यवस्थापन समिती (SMC) सक्रिय करणे-
SMC मध्ये पालकांचा सक्रिय सहभाग
मासिक बैठकांमध्ये गळतीमुक्त शाळेची समीक्षा
ग्रामसभेत शाळा केंद्रस्थानी

डिजिटल व सामाजिक प्रचार -
WhatsApp, मोबाईल, पत्रके, पोस्टर वापरून प्रचार
स्थानिक गणपती/यात्रा/मेळयांमध्ये शाळेचा स्टॉल
यशस्वी विद्यार्थ्यांच्या कहाण्या गावात सांगणे


निष्कर्ष-
सकारात्मक शिक्षक वृत्ती, समाजाचा सहभाग, आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांद्वारेच पटसंख्या वाढवता येते आणि गळती रोखता येते. हे काम केवळ शाळेचे नसून गाव, पालक आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचेही सामूहिक उत्तरदायित्व आहे.

असाक्षरता निर्मुलन कार्यक्रम

(साक्षर भारत - सबका अधिकार, सबकी जबाबदारी)

उद्दिष्ट-
सर्व वयोगटातील नागरिकांना वाचन, लेखन व मूलभूत गणिताचे ज्ञान देणे
ग्रामस्तरावर शिक्षणाचा प्रसार करून समाज सशक्त करणे
स्त्रिया, वृद्ध, मजूर, अल्पशिक्षित यांना दैनंदिन व्यवहारासाठी आवश्यक ज्ञान मिळवून देणे

लक्ष्यित गट-
15 वर्षांवरील अशिक्षित महिला व पुरुष
विशेषतः ग्रामीण भागातील स्त्रिया
स्थलांतरित कामगार, मागासवर्गीय नागरिक
दिव्यांग किंवा शिक्षणापासून वंचित व्यक्ती



कार्यक्रम राबवण्याच्या पद्धती-

1. साक्षरता वर्ग सुरू करणे-

शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत इमारतीत

सायंकाळी किंवा नागरिकांच्या सोयीच्या वेळेनुसार

स्थानिक स्वयंसेवक, शिक्षक किंवा युवक कार्यकर्त्यांमार्फत

2. शिकवण्याचे विषय-

वाचन व लेखन (अक्षर ओळख, शब्द तयार करणे, वाक्य वाचन)

मूलभूत गणित (बेरीज, वजाबाकी, चलन ओळख)

दैनंदिन उपयोगाची माहिती (बँक, आधार, सरकारी सेवा)

3. शिक्षण साहित्य-

"नई रोशनी", "प्रेरणा", "साक्षर भारत सामग्री"

फळ्यावरून शिकवणे, पोस्टर, काड्र्स, खेळांच्या माध्यमातून

मोबाईल ॲप व ऑडिओ-व्हिज्युअल साधनांचा वापर (जर शक्य असेल तर)

4. सातत्यपूर्ण सहभाग-

वर्गनिहाय उपस्थिती नोंद

प्रगती तपासणी चाचण्या

सहभागींसाठी प्रमाणपत्र

विशेष उपक्रम -

'एक साक्षर - तीन असाक्षर' अभियान- साक्षर व्यक्तीने तीन अशिक्षितांना शिकवणे

'रात्रशाळा अभियान'

स्त्रियांसाठी विशेष वर्ग - घरकाम, आरोग्य, स्वावलंबनावर लक्ष

'साक्षरता सप्ताह' / रॅली / भित्तीचित्र

अपेक्षित परिणाम-

नागरिकांना स्वत-चे नाव लिहिता-वाचता येणे

साक्षर मतदान, बँक व्यवहार, अर्ज भरणे इत्यादी सक्षम होणे

स्त्रियांमध्ये स्वावलंबन व आत्मसन्मान वाढणे


समाजाच्या सर्वांगीण प्रगतीत भर

सहकार्य संस्था-

शाळा शिक्षक व विद्यार्थ्यांचा सहभाग

ग्रामपंचायत, अंगणवाडी, महिला मंडळे

एनजीओ / स्वयंसेवी संस्था



निष्कर्ष-

"साक्षर भारत" घडवण्यासाठी शाळा, समाज आणि शासन एकत्र आल्यास असाक्षरता निर्मूलन शक्य आहे.ज्ञान देणे म्हणजे उजेड देणे!



शालेय सांस्कृतिक कार्यक्रम

जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा भोसी ता. औंढा (ना.), जि. हिंगोली

उद्दिष्ट-

विद्यार्थ्यांमध्ये कला, सृजनशीलता, संवादकौशल्य विकसित करणे

भारतीय परंपरा, संस्कृती व विविधतेचा अनुभव देणे

आत्मविश्वास, सहकार्य व नेतृत्वगुण वाढवणे

कार्यक्रमात समाविष्ट घटक-

क्र.	कार्यक्रमाचे प्रकार	वर्णन

1.स्वागत गीत/नृत्य - शाळेच्या विद्यार्थ्यांच्या वतीने स्वागतासाठी गाणं किंवा नृत्य

2.पारंपरिक नृत्य - लावणी, कोळी, गोंधळ, भारूड, आदिवासी नृत्य

3.देशभक्तिपर गीत/नाट्य - स्वातंत्र्यलढा, शहीद सैनिक, 'मी भारतीय' अशा संकल्पनांवर आधारित

4.नाटिका/एकपात्री अभिनय -सामाजिक विषय - स्वच्छता, शिक्षण, मुलींचे अधिकार, पर्यावरण

5.वेशभूषा स्पर्धा -स्वातंत्र्यसैनिक, पंतप्रधान, डॉक्टर, किसान, भगिनी निवेदिता आदींचे सादरीकरण

6.समूहगीत/संगीत वादन - हार्मोनियम, तबला, टाळ, ढोलकी इ. विद्यार्थ्यांच्या हातून सादरीकरण

7.हास्य विनोदी कार्यक्रम -बालमजूरी, मोबाईलचा अतिरेक, घरगुती प्रसंग यावर विनोदी अभिनय

8.कविता वाचन -विद्यार्थी स्वतः लिहिलेल्या किंवा प्रसिद्ध कवितांचे वाचन

9.निबंध/भाषण सादरीकरण - बालदिन, शिक्षक दिन, राष्ट्रपुरुष यांच्यावर भाषण

10.खेळ व योग सादरीकरण - सूर्यनमस्कार, पिरॅमिड, डंबेल खेळ व क्रिडा सादरीकरण

11.सहभाग आणि नियोजन- प्रत्येक वर्गातून कमीत कमी एक कार्यक्रम सादर

पालकांचा सहभाग घेऊन विशेष म्हणजे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना तयारीसाठी मार्गदर्शन करणे, ऑडिशन व सराव सत्र पूर्वतयारीसाठी आयोजित करणे

बक्षिस वितरण व गौरव-

उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे
सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र
पालकांचा सत्कार, शाळा समितीचे अभिनंदन

सांस्कृतिक कार्यक्रमाचे महत्त्व-

विद्यार्थी सृजनशील बनतात
विविध राज्य व भाषांची ओळख होते
शाळेचे नाव गावात उजळते
विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संघभावना, आणि आत्मभान निर्माण होते

निष्कर्ष-


सांस्कृतिक कार्यक्रम ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक गोष्ट आहे.यातून विद्यार्थी केवळ कलाकारच नव्हे, तर सजग नागरिक घडतात.

फलनिष्पत्ती.....

ZPCPS भोंसी ही शाळा ही आज केवळ ग्रामीण शिक्षणाची प्रतीक नाही, तर सर्वांगीण शालेय विकासाची एक आदर्श पायवाट ठरली आहे. अभ्यासक्रमातील गुणवत्ता वृद्धीसोबतच नैतिक, शारीरिक, बौद्धिक आणि सामाजिक विकास या सर्व स्तरांवर या शाळेने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. वर्ग सजावट, ICT लॅब, वाय-फाय, जलसंधारण, सौरऊर्जा, इको क्लब, परसबाग, वैज्ञानिक दृष्टिकोन विकास, पर्यावरण जनजागृती, समावेशक शिक्षण, दिव्यांगांसाठी विशेष सुविधा, वाचनवाढीचे उपक्रम, घनदाट वृक्षलागवड, Multilingual Context, शालेय समित्यांचा सक्रीय सहभाग, आणि विद्यार्थी हिताचे विविध नावीन्यपूर्ण उपक्रम हे या यशामागचे प्रमुख घटक आहेत. आमच्या

विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेले हे उपक्रम मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणिवा जागृत करतात. दरवर्षी वाढणारी उपस्थिती, झिरो ड्रॉपआउट दर, वर्धित नावनोंदणी, नियमित पालक सभा, आणि गुणवत्तात्मक अध्ययन निष्पत्ती ही या कार्यप्रणालीची फळे आहेत. 2023-24 मध्ये शाळेचा पट 236 होता तो आता 2025-26 मध्ये 303 इतका वृदिंगत झाला आहे. शाळेच्या कार्यशैलीत पारदर्शकता, जबाबदारी आणि उत्तरदायित्व ही मूल्ये पाळली जाता आहेत.

म्हणूनच दुर्गम, आदिवासी बहुल गावात वसलेल्या आमच्या शाळेला ***'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानात पहिल्या टप्प्यात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक आणि पुढील वर्षी दुसऱ्या टप्प्यात जिल्हास्तरावर तिसरा क्रमांक मिळाला.*** ही आमच्या सामूहिक प्रयत्नांची ठोस पावती आहे असे म्हणता येईल.....



सुभाषितम् -

"विद्या ददाति विनयं विनयाद् याति पात्रताम्।
पात्रत्वात् धनमाप्नोति धनात् धर्मं ततः सुखम्॥"



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान जिल्हास्तरीय मूल्यांकन समिती

शाळेचे यश.....



----------**----------

विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढीसाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित पंकज विद्यालय (प्राथमिक)

शाळेचा पत्ता - बोरोले नगर १, चोपडा, तालुका चोपडा. जिल्हा जळगाव.

शाळेचा ईमेल आयडी - pankaj.vidyalayapri@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री. मच्छिंद्रनाथ वासुदेव पाटील

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9403837637

मुख्याध्यापक ईमेल आयडी - mvpatil1971@gmail.com



शाळेचा थोडक्यात परिचय...

पंकज विद्यालय प्राथमिक **सन १९९२ साली अवघ्या १४ विद्यार्थ्यांवर** सुरु झाली आणि आज शाळेत १२०८ विद्यार्थी आहेत.त्यावेळी शाळा नविन असल्याने पालकांना समुपदेशन करून विद्यार्थी प्रवेश केले जायचे. सुरुवातीला मजुरांचे व सामान्य कुटुंबातील बालके यांचे प्रवेश या शाळेत व्हायचे. दरवर्षी विविध उपक्रम राबवून शालेय अभ्यासासोबत गुणवत्ता वाढीसाठी शालेय संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाने सर्व शिक्षकांनी सुरु केला.



शाळेची जुनी इमारत

वर्गातील पटसंख्या वाढीसाठी पालक सभा बोलवून पालकांशी पाल्य विकासासाठी **वैयक्तिक चर्चा** करून बालकांचा **संस्कारक्षम** विकास करण्याचे प्रयत्न करण्यात आले. दैनिक परिपाठात विद्यार्थी सहभाग वाढविला. विविध स्पर्धा आयोजन – **सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, समूह गायन स्पर्धा, बरची नृत्य, चित्रकला, संगणक शिक्षण इयत्ता पहिली पासून, अध्ययन गती कमी असणाऱ्या विद्यार्थांना पूरक मार्गदर्शन, गुणवत विद्यार्थी सत्कार, मातृ प्रबोधन** असे कार्यक्रम राबवून पालकांचा आत्मविश्वास सुरवातीच्या काळात वाढला.

पालकांना गुणवत्तेचे शिक्षण आपल्या पाल्यात होणारे बदल व निकाल दिसू लागले. पाल्याची गुणवत्ता वाढू लागली. कालांतराने **सन २००२ वर्षी शिष्यवृत्ती परीक्षेत पहिला गुणवत्ता धारक विद्यार्थी विद्यालयास मिळाला.** त्यानंतर यशाचा आलेख उंचावत **२०१५ पर्यंत ६३ विद्यार्थी गुणवत्ता धारक झाले**. स्पर्धा परीक्षेचा अनुभव व विद्यालयातील तयारी उल्लेखनीय असल्याने विद्यालयाचा नावलौकिक परिसरात होऊन प्रवेशासाठी गर्दी होऊ लागली. पूर्वी एक वर्गाची एक तुकडी होती आता मात्र एक वर्गाच्या तीन तुकड्या व विपुल प्रमाणात विद्यार्थी संख्या आहे. आता विद्यार्थी शोधावे लागत नाहीत तर प्रवेशासाठी पालक अट्टाहास करतात.

उल्लेखनीय उपक्रमात शाळेची सुरुवात आदर्श परीपाठाने होते. **GROUP STUDY CIRCLE माध्यमाने सराव**. वाचन प्रेरणा. देवून अभ्यासाची तयारी केली जाते. शैक्षणिक सहलींचे आयोजन व क्षेत्र भेटी आयोजित केल्या जातात. विविध प्रसंगी शिक्षक व पालकांना व्याख्यान आयोजन करून प्रशिक्षण दिले जाते.

संस्थेने सर्व शिक्षकांसाठी अभ्यास दौरे आयोजित करून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यास प्रेरणा दिली आहे इयत्ता ४ थी व ७ वी मधील विद्यार्थी गुणवत्ता धारक झाल्याने स्पर्धा परीक्षेची गोडी वाढली. **आजपर्यंत ७००० पेक्षा जास्त विद्यार्थी घडविण्यात विद्यालयास यश मिळाले आहे.**




शाळेची नवीन इमारत

रंगतरंग उत्सव हा सर्व विद्यार्थी व पालकांना आनंददायी व प्रेरणादायी असतो. मातृप्रबोधन मेळाव्यात महिलांना मार्गदर्शन केले जाते. वर्षाच्या सुरवातीला पालकांना वार्षिक नियोजन पालक सभेत सांगितले जाते. भव्य मैदानावर योग शिबिर बालक व पालक यांचेसाठी आयोजन विद्यालय करते . गणेशोत्सव हा आगळा वेगळा असतो. यात प्रबोधनपर स्पर्धा आयोजित केल्या जातात. दर शनिवारी कवायत देखणी असते. विविध जयंती कार्यक्रम साजरे करताना. वेशभूषा व सजावट आकर्षक ठरते त्यातून सर्व विद्यार्थांना खुले व्यासपीठ मिळते.

अध्यापन मनोरंजक व्हावे यासाठी डिजिटल पद्धतीने कार्य केले जाते. पालकांना पाल्याची प्रगती मोबाईल संदेशवहन यंत्रणेच्या माध्यमाने कळवली जाते. विद्यालयातील प्रत्येक शिक्षकाची विविध क्षेत्रात ख्याती आहे. **कथाकथन, गायन, संगीत, स्पर्धा परीक्षा, नृत्य, अध्यापन यामुळे विविध उपक्रमाबद्दल विद्यालयाने सर्वदूर नावलौकिक मिळवला आहे.**

गुणवत्ता वाढीमुळे शाळेतील पटसंख्या वाढीचा आलेख...





मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र. 2 (2024-25) तालुका स्तरीय प्रथम क्रमांक :-

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र. 2 (2024-25) सहभागासाठी प्रस्तावाची लिंक पुढीलप्रमाणे:
https://tinyurl.com/ye2xtdn8





विषय क्र. १: "मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न"

शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत शालेय शिक्षणातील विविध क्षेत्रांतर्गत झालेला सकारात्मक बदल

ब्रीदवाक्य - "ध्यास गुणवत्तेचा. राहा एक पाऊल पुढे..."

हे ध्येय घेवून सन 1993 पासून विद्यालयाने पायाभूत विकासास सुरुवात केली. विद्यार्थी सर्वेक्षण, परिसरातील पालक भेटी व बैठका घेवून विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी तयार केले. विद्यार्थी प्रवेशित झाल्यावर त्यांची मुलभूत क्षमता तपासणी केली. त्यासाठी भाषा वाचन-लेखन कौशल्य, गणितीय क्रिया कौशल्य, कला, संगीत, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण इ. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून शाळेबद्दल गोडी वाढवली.

सोबतच पालकांच्या बैठका घेवून त्यांना विश्वासात घेवून विद्यार्थ्यांची माहिती व सूचना देवून पालकांना घरी तयारी करून घेणेबाबत प्रवृत्त केले. विद्यार्थी हजेरीचे प्रमाण वाढले. विविध भाषिक व गणितीय क्रिया विद्यार्थी आत्मसात करू लागले. त्यांच्यातल्या क्षमता वाढू लागल्या.या सराव प्रक्रियेमध्ये सातत्य टिकवून ठेवले. विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार केले गेले. ग्रुप स्टडी सर्कलच्या माध्यमातून गुणवत्ता विकासाचा प्रयत्न केला.

विद्यार्थ्यांचे स्तर निहाय गट केले व त्यानुसार अध्यापनाचे व अतिरिक्त पूरक मार्गदर्शनाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांचे अनुक्रमे प्रगत, मध्यम व अध्ययन गती कमी विद्यार्थी असे गट केले. यामुळे विद्यार्थ्यांच्या श्रेणीत वाढ झाली. 60% ची गुणवत्ता 75% वर गेली. त्यातूनच प्रज्ञावान विद्यार्थ्यांमध्ये वाढ झाली. शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा व इतर अश्या अनेक स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.

विविध उपक्रम-कृती, सांस्कृतिक कार्यक्रम इ. च्या माध्यमातून सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न झाले. अशा अनेक उपक्रमातून मुलभूत क्षमता वाढीसाठी पुढील प्रयत्न शाळेने केलेले आहेत.


विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढीसाठी शाळेने केलेले प्रयत्न ...

विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा स्तर ठरविणे ही एक महत्वाची प्रक्रिया आहे त्यामुळे शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या प्रगतीची अचूक समज येते, म्हणून शैक्षणिक वर्षाच्या आरंभी वर्गाच्या अध्ययन निष्पत्तीनुसार विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर निश्चित केला जातो, त्यात विद्यार्थ्यांचे लेखन, वाचन, गणितीय क्रिया, समज, विचारशक्ती, प्रश्नोत्तर, लेखन क्षमता, प्रकल्प सादरीकरण तसेच कृती व उपक्रम यांचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांचे तीन स्तरात वर्गीकरण (प्रज्ञावान, मध्यम व अध्ययनात गती कमी असणारे) केले जाते.

त्यातील अध्ययनात गती कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त पूरक व उपचारात्मक मार्गदर्शन शाळेत व शाळेच्या वेळे व्यतिरिक्त केले जाते. पालकांना वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी माहिती देवून सहभागी करून घेतले जाते.

विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढीसाठी राबविलेले उपक्रम...

खेळ, गाणी, गोष्टी, चित्र यातून विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देवून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवला जातो. विद्यार्थ्यांच्या खाजगी अडचणी, न्यूनगंड किंवा मानसिक कारणे समजून घेवून विद्यार्थी व पालकांना समुपदेशन केले जाते, पालक भेटी घेतल्या जातात.











निर्मिती: सचिन भिमराव लोखंडे (उपशिक्षक, पंकज विद्यालय (प्राथमिक)

विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन व संख्याज्ञान क्षमतेत वाढ होण्यासाठी विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक व उपचारात्मक मार्गदर्शन करून प्रवाहात आणले..









निर्मिती: सचिन भिमराव लोखंडे (उपशिक्षक, पंकज विद्यालय (प्राथमिक), चोपडा.



PEER Learning उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी







विमिती: मनिन मिलाप सोनवणे (उपशिक्षक, पंचम विद्यालय (प्राथमिक), चोपड़ा.










विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी विविध उपक्रम –

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, विचारशक्ती वाढवणे व भाषिक कौशल्य विकसित करणेसाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

विद्यार्थी रोज ठरवलेल्या वेळेस ग्रंथालयातील तसेच आपल्या वैयक्तिक पुस्तकांचे वाचन करतात. विद्यार्थ्यांनी स्वतःहून कथा, गोष्टी, आत्मचरित्रे व माहितीपर पुस्तके वाचून त्यावर चर्चा सत्रात सहभाग घेतात.

शाळेमध्ये "वाचू आनंदे", "आपले आवडते पुस्तक", "वाचन स्पर्धा" व "वाचन प्रेरणा दिन" "महावचन चळवळ" अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येते, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व सर्जनशीलता वाढून मुलभूत क्षमता विकसित होतात..

यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नियमित वाचनाची सवय लागली असून, ते आता पुस्तकांशी मैत्री करायला लागले आहेत, हे अत्यंत सकारात्मक परिवर्तन घडून आले आहे.



निर्मिती: सचिन भिमराव लोखंडे (उपशिक्षक, पंकज विद्यालय (प्राथमिक), चोपडा.

2.2) मागील वर्षी या अभियानांतर्गत शपथ घेतली आहे.



महावाचन अभियानात सक्रिय सहभाग-






निर्मिती: सचिन भिमराव लोखंडे (उपशिक्षक, पंकज विद्यालय (प्राथमिक), चोपडा.

2.4) वाचन वृद्धीसाठी विविध उपक्रमाचे आयोजन-








निर्मिती: सचिन भिमराव लोखंडे (उपशिक्षक, पंकज विद्यालय (प्राथमिक), चोपडा.

शैक्षणिक • चोपडा येथील पंकज विद्यालयात महावाचन उत्सवात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

वाचनामुळे अभ्यासाची गती वाढते, समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीसाठी तरुणांमध्ये वाचन संस्कृती रुजवण्याची गरज

प्रतिनिधी | चोपडा

शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन करावे. वाचनाने अभ्यासाची गती वाढते व सर्वांगीण विकासात भर पडते. वाचनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात प्रगती करण्याची संधी मिळते. वाचन हे व्यक्तिमत्व विकासाचे साधन असुन आपली ज्ञान वृद्धी होते. असे आवाहन दिलीप जैस्वाल यांनी पंकज विद्यालयात आयोजित महा वाचन उत्सव -२०२४ मध्ये केले.

वाचनाने विचारांची क्षितिजे विस्तारीत होउन सर्जनशीलता वाढते. वाचनाने विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्ये सुधारतात. तणाव कमी होउन मेंदूला चालना मिळते. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्व विकास तसेच समाज व राष्ट्राच्या उन्नती साठी वाचन संस्कृती जोपासण्यासाठी नियमीत वाचन केले पाहिजे. असे ही मार्गदर्शन करताना दिलीप जैस्वाल यांनी सांगितले. शासनाच्या महा उत्सव २०२४ अंतर्गत इयत्ता चौथी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी विद्यालयातील बाल ग्रंथालयातून पुस्तके वितरीत करण्यात आली. पुस्तके वाचून विद्यार्थ्यांनी आपला अभिप्राय विचार कागदावर लिहा अथवा तोंडी व्यक्त करावे अशी प्रेरणा दिली. वाचनासाठी प्रेरणादायी घोषवाक्ये विद्यार्थ्यांनी म्हटली व उत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमासाठी मनोज अहिरे, प्रियंका पाटील, महेश गुजर यांचे सहकार्य लाभले.



शासनाच्या महा उत्सव २०२४ चोपडा येथील पंकज विद्यालयात आयोजित केलेल्या महावाचन उत्सवात सहभागी झालेले विद्यार्थी.

आजच्या मुलांवर वाचन संस्कारांची नितांत गरज

या महोत्सवाचे मुख्याध्यापक एम.व्ही. पाटील यांनी कौतुक केले. मुलांना वाचनाचा कंटाळा येऊ लागला. यामुळे मुलांवर वाचन संस्कारांची आता गरज आहे. मुले चांगले वाचन करू लागली तर ते चांगले विचार प्रकट करू शकतील. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला चांगला आकार येऊ शकेल, वर्तनही चांगले घडेल. वाचन हे मनाचे अन्न आहे. या उक्तीनुसार मनाला चांगले वळण लावण्यासाठी वाचनाची गरज असल्याचे सांगितले.

निर्मिती: सचिन भिमराव लोखंडे (उपशिक्षक, पंकज विद्यालय (प्राथमिक), चोपडा.

माझा वाढदिवस माझी भेट

या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थी त्यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रंथालयास पुस्तके भेट म्हणून देत असतात त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास प्रोत्साहन मिळते वाचनाची आवड निर्माण होते, वाचन साहित्याचा संग्रह वाढतो विविध प्रकारचे वाचन साहित्य विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होणे शक्य होते. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित होऊन त्यांच्या मुलभूत क्षमता वाढतात.





भाषा व गणित विषयाच्या मुलभूत क्षमतांचा वर्गनिहाय स्तर-

8.2) भाषण क्षमता-

इयत्ता	अध्ययन निष्पत्ती प्रमाण (% मध्ये)	अभिप्राय (अतिउत्तम, उत्तम, चांगली, समाधानकारक, असमाधान कारक)
१ ली	64	चांगली
२ री	68	चांगली
३ री	70	चांगली
४ थी	72	उत्तम
५ वी	72	उत्तम
६ वी	74	उत्तम
७ वी	75	उत्तम

8.2) वाचन क्षमता-

इयत्ता	अध्ययन निष्पत्ती प्रमाण (% मध्ये)	अभिप्राय (अतिउत्तम, उत्तम, चांगली, समाधानकारक, असमाधान कारक)
१ ली	71	उत्तम
२ री	73	उत्तम
३ री	75	उत्तम
४ थी	78	उत्तम
५ वी	79	उत्तम
६ वी	76	उत्तम
७ वी	78	उत्तम

8.3) लेखन क्षमता-

इयत्ता	अध्ययन निष्पत्ती प्रमाण (% मध्ये)	शिक्षक अभिप्राय
१ ली	62	चांगली
२ री	65	चांगली
३ री	69	चांगली
४ थी	68	चांगली
५ वी	70	चांगली
६ वी	74	उत्तम
७ वी	75	उत्तम

8.4) गणितीय क्रिया-


इयत्ता	अध्ययन निष्पत्ती प्रमाण (% मध्ये)	शिक्षक अभिप्राय
१ ली	78	उत्तम
२ री	77	उत्तम
३ री	75	उत्तम
४ थी	77	उत्तम
५ वी	79	उत्तम
६ वी	76	उत्तम
७ वी	76	उत्तम





निर्मिती: सचिन भिमराव लोखंडे (उपशिक्षक, पंकज विद्यालय (प्राथमिक), चोपडा.







निर्मिती: सचिन भिमराव लोखंडे (उपशिक्षक, पंकज विद्यालय (प्राथमिक), चोपडा.

शिक्षकांनी राबविलेला शैक्षणिक उपक्रम - पंकज स्कॉलर

विद्यालयात इ.१ ली ते इ.४ थी या वर्गासाठी शालेय अभ्यास व अवांतर सामान्य ज्ञान यावर आधारीत शिक्षकांनी स्वतः स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करून पंकज स्कॉलर हा शैक्षणिक उपक्रम राबविला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता, आत्मविश्वास, निर्णयक्षमता, अचूकता, सामान्यज्ञान, अभ्यासाची नियमित सवय आदी गुणांचा विकास या परीक्षेतून झाला आहे. पंकज स्कॉलर या उपक्रमामुळे पुढील स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यास विद्यार्थी सक्षम असतात.






स्पर्धा परीक्षा गुणवंत विद्यार्थी यश निवड

"ध्यास गुणवत्तेचा, रहा एक पाऊल पुढे " या उक्तीप्रमाणे आमच्या पंकज विद्यालय प्राथमिक विभागातील गुणवत्तेसाठी नेहमी अग्रेसर व निकालाची परंपरा कायम असते. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले जाते. त्यात महाराष्ट्रातून दर वर्षी लाखो विद्यार्थी परीक्षेसाठी बसत असतात. त्यात आपल्या विद्यालयाचा देखील मोठा सहभाग असतो. यात राज्य व जिल्हा मेरीट यादी असे निकष असतात. यात दरवर्षी आपले विद्यार्थी गुणवत्ता यादीत चोपड्या तालुक्यातून सर्वात जास्त विद्यार्थी चमकदार कामगिरी करतात. आजपर्यंत सन 2003 पासून ते 2025 पर्यत विद्यालयाचे एकूण 185 विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. तसेच जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत एकूण ५ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

आजपर्यंत तालुक्यातून सर्वात जास्त गुणवत्ता यादीत स्थान पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आपले विद्यालय अव्वल स्थानी आहे.

२०११ - कु. मयूर शंकर वारे — राज्यात पाचवा
२०१७ — कु. प्रज्ज्वल परमेश्वर पाटील — जिल्ह्यात प्रथम
२०२० — कु. विदिशा दिलीप साळुंखे — तालुक्यात प्रथम व जिल्ह्यातून सहावी
२०२५ — कु. श्रावणी अरुण गर्जे — तालुक्यात प्रथम



ग्रुप स्टडी सर्कल

ग्रुप स्टडी सर्कल म्हणजे विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन अभ्यास करण्याची पद्धत होय. यात काही विद्यार्थी एक गट बनवून नियमित ठराविक वेळेला अभ्यास करतात, चर्चा करतात व परस्परांना मदत करतात.

ग्रुप स्टडी सर्कलचे उद्दिष्ट :

1) विषयाचे सखोल आकलन होणे.
2) शंका निरसन करणे
3) सहकार्य व टीमवर्कची भावना वाढवणे
4) अभ्यासाची आवड निर्माण करणे

फायदे :

1) परस्पर चर्चेमुळे विषय समजणे सोपे होते.
2) आत्मविश्वास वाढतो.
3) शिकविणाऱ्या विद्यार्थ्याचे ज्ञान अधिक मजबूत होते.
4) स्पर्धात्मक परीक्षांसाठी तयारी सुलभ होते.

ग्रुप स्टडी सर्कलमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सहकार्याची वृत्ती विकसित होते. या उपक्रमासाठी गुजरात सरकारने मा. श्रीमती. आनंदीबेन पटेल, शिक्षण मंत्री, यांच्या हस्ते शाळेला Innovative Award पुरस्कार देऊन गौरविले आहे.



Group Study Circle ला अधिकारी व पालक भेट लिंक:
https://www.facebook.com/share/r/1R5gDERcRq/

मुलभूत क्षमता वाढीसाठी शिक्षकांनी राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम :-

विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना देणारे सर्जनशील व शिक्षणात आनंद निर्माण करणारे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात, त्यातून विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता विकास होण्यास मदत होते.
योग, ध्यान, प्राणायाम, योगासने, आनापान साधना कवायत विविध क्रीडा स्पर्धा यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शारिरीक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी सराव केला जातो .


Pankaj Shaikshanik & Samajik Sanstha,
Chopda Dist. Jalgaon
Celebrating
INTERNATIONAL DAY OF YOGA
आंतरराष्ट्रीय योग दिवस
"Yoga for Vasudhaiva Kutumbakam
"One Earth, One Family, One Future
21 June
Associated with
• Pankaj Bal Sanskar Kendra, Chopda
• Pankaj Secondary & Higher Secondary Vidyalay, Chopda
• Pankaj Global Public School, Chopda
International Day of Yoga





विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी हा संस्कार (वसुधैव कुटुंबकम) विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी तसेच आधुनिक जगातील बदलांसाठी व मानसिक शांतीसाठी ध्यानधारणा...







जागतिक सूर्यनमस्कार दिवस -

सांस्कृतिक वारसा व परंपरा जोपासण्यासाठी जागतिक सुर्यनमस्कार दिवस 2025 पासून साजरा केला जातो त्यात इयत्तानिहाय विद्यार्थ्यांचे सूर्यनमस्कार प्रात्यक्षिक घेतले जाते.

नियमित सूर्यनमस्कार साधना केल्याने शारिरीक लाभ तर प्राप्त होतातच शिवाय मंत्रोउच्चारासह सूर्यनमस्कार केल्याने मानसिक स्थिरता प्राप्त करण्यासाठी मदत होतेत ,सेच सकारात्मक उर्जा प्राप्त होते व अध्यात्मिक ऊर्जा वाढिस लागते.





क्रीडा विकासासाठी केलेले प्रयत्न:

विद्यालयात अध्ययनाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा प्रकारांना देखील तितकेच महत्व दिले जाते. शरीर आणि मन सशक्त ठेवण्यासाठी क्रीडा अत्यावश्यक आहे, याची जाणीव विद्यालयाने ठेवली आहे.

आमच्या विद्यालयाचे स्वतःचे मोठे क्रीडांगण आहे, जेथे विविध खेळ व स्पर्धांचे नियमितपणे आयोजन केले जाते. शाळेच्या मैदानात कबड्डी, खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल तसेच मैदानी स्पर्धांसाठी उत्तम सुविधा आहेत. विद्यालयाकडे खेळाचे पुष्कळ साहित्य उपलब्ध असून वेळोवेळी ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाते.

दरवर्षी शाळेत वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह व सहभाग लक्षणीय असतो. विद्यार्थ्यांचे क्रीडा कौशल्य विकसित करण्यासाठी क्रीडा शिबिरांचे आयोजन केले

जाते. विद्यालयाचे अनेक विद्यार्थी तालुकास्तरावर यश मिळवून जिल्हा व त्यापुढील टप्प्यात सहभागी होतात. क्रीडा शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व शिस्तबद्ध प्रशिक्षण यामुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाप्रती आवड निर्माण होते.

क्रीडामुल्यांचा प्रसार व अंगीकार शाळेतूनच होतो हे आमच्या विद्यालयाचे वैशिष्ट्य आहे.





भारतीय सांस्कृतिक व सामाजिक वारस्याचे जतन:

विद्यार्थ्यांना विविध राज्यातील संस्कृतीचा परिचय व्हावा म्हणून विद्यार्थी विविध राज्याची निवड करून त्या राज्यांतील संस्कृती खानपान, पेहेराव, सण व उत्सव याबाबत सविस्तर माहिती सादर करतात.









सांस्कृतिक महोत्सवातून सुप्तकलागुणांना वाव -"रंग तरंग महोत्सव"

विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा यासाठी विद्यालयात दरवर्षी सांस्कृतिक महोत्सव रंग तरंग चे आयोजन करण्यात येते. विद्यार्थी 100% उत्साहाने सहभाग घेतात. विद्यार्थ्यांचा सराव शिक्षक करून घेतात. सहभागामुळे विद्यार्थ्यांच्या नृत्य, गायन, वादन, अभिनय, वक्तृत्व, संवाद, वेशभूषा आदी कला गुणांचा विकास होतो. त्यांचा आत्मविश्वास वाढून सार्वजनिक ठिकाणी बोलण्याची व वागण्याची भिती कमी होते. स्वतः चा आत्मविश्वास वाढतो. सामाजिक कौशल्य व जबाबदारी याची जाणीव होते. विविध भाषा, संस्कृती परंपरा याची माहिती होते. सोबत राष्ट्रभक्ती व एकात्मता सण उत्सव , सामाजिक बांधिलकी, व्यक्तिमत्व विकास, प्रादेशिक कला, प्रेरणा अशा गुणांना आत्मसाद करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. सदरील कार्यक्रमांसाठी पालकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद असतो. आपल्या पाल्याचा

सांस्कृतिक कार्यक्रम सहभागाने झालेला बदल अभ्यासात निर्माण झालेली एकाग्रता, वर्तन बदल, कला गुणांचा विकास होऊन मुलभूत क्षमतांची वाढ होते.



स्वराज्य महानाट्यात विद्यार्थ्यांसमवेत शिक्षकांचा सहभाग



शाळा प्रवेशोत्सव

विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा केला जातो याप्रसंगी सर्व नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत संस्थाध्यक्ष, संचालक मंडळ, विद्यालयाचे मुख्याध्यापक, उपस्थित मान्यवर अधिकारी व पालक बंधु-भगिनी यांच्या हस्ते केले जाते.





आदर्श संगितमय परिपाठ

संगीतमय परिपाठातून नियमित प्रार्थना, पत्रिज्ञा, राज्यगीत, राष्ट्रगीत, पसायदान, कविता गायन व विचार मांडण्यासाठी विदयार्थ्यांना संधी देवून त्यांचा आत्मविश्वास वाढत असतो, परिपाठ सादर करताना विद्यार्थ्यांमध्ये आनंद व उत्साह दिसून येतो.











किशोरवयीन मुलींना समुपदेशन व घ्यावयाची काळजी :-

विश्व उमलत्या कळयांचे शिक्षण व समुपदेशन :-

विद्यालयात किशोरवयीन मुलींसाठी (पाचवी ते सातवी) कार्यक्रमात मुलींना मासिक पाळी दरम्यान आरोग्याची घ्यावयाची शारीरिक स्वच्छता व मानसिक आरोग्य याबाबत काळजी कशी घ्यायची तसेच गुड टच व बॅड टच याविषयावर मार्गदर्शन केले जाते..





प्लास्टिक पिशव्या संकलनातून पर्यावरण संदेश



चोपडा : येथील पंकज विद्यालयातील विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक व वर्गशिक्षकांनी केलेल्या आवाहननुसार पर्यावरण संरक्षण करण्यासाठी आपल्या घरातील व परिसरातील अनावश्यक प्लास्टिक पिशव्या संकलन करून त्याची विभागणी करण्यात आली. यासर्व पिशव्याची कचरा गाडीतर्फे योग्य विल्हेवाट लावली जाणार आहे. यावेळी प्लास्टिक पिशव्या पर्यावरणमध्ये कसा धोका निर्माण करतात? याची माहिती विद्यार्थ्यांना अनिल पाटील यांनी दिली.

सदरील धोका टाळण्यासाठी आपण विविध ठिकाणी कापडी व कागदी पिशव्या वापराव्यात, आपल्या परिसरातील नागरिकांना अशा पिशव्या वापरण्यासाठी सांगावे, असे आवाहन बालमित्रांना विद्यालयातर्फे मुख्याध्यापक एम.व्ही.पाटील यांनी केले. विद्यालयातील शिक्षिका गायत्री शिंदे यांनी रांगोळीद्वारे प्लास्टिकमुक्ती करून पृथ्वी वाचविण्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला.



दैनिक दिव्य मराठी

03-Oct-2
चाळीसगा

विद्यार्थ्यांनी संकलित केल्या प्लास्टिक पिशव्या

चोपडा येथील पंकज विद्यालयाचा उपक्रम

प्रतिनिधी | चोपडा

प्लास्टिक कॅरीबॅग वा अन्य साहित्य वापराने पर्यावरणाचे नुकसान होते. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कुटुंबीयांना प्लास्टिक कॅरीबॅग वापराचे दुष्परिणाम पटवून द्यावे, घर व परिसरातील प्लास्टिक पिशव्यांचे संकलन करावे, असे आवाहन पंकज विद्यालयाने केले होते. त्यानुसार विद्यार्थ्यांनी संकलित कॅरीबॅगचा योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

येथील पंकज विद्यालयाचे मुख्याध्यापक, वर्ग शिक्षकांनी केलेल्या आवाहनानुसार विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील व परिसरातील अनावश्यक प्लास्टिक पिशव्या संकलित करून शाळेत जमा केल्या. यानंतर त्यांची विभागणी करण्यात आली. सर्व पिशव्या घंटागाडीत भरून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी प्लास्टिकमुळे पर्यावरणाचा कसा धोका होतो? याची माहिती अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिली. हा धोका टाळण्यासाठी कापडी व कागदी पिशव्या वापरण्याचा सल्ला देण्यात आला. मुख्याध्यापक एम.व्ही.पाटील यांनीही संवाद साधला. विद्यालयातील शिक्षिका गायत्री शिंदे यांनी रांगोळी काढून प्लास्टिक मुक्तीचा संदेश दिला.

संकलित केल्या प्लास्टिक पिशव्यांसह विद्यार्थी.

परस बाग संवर्धन

विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व समजून देण्यासाठी परस बाग संवर्धन उपक्रम राबवला जातो. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थी शाळेच्या आवारात किंवा घरच्या परसदारी फळे, फुले, औषधी वनस्पती व भाज्यांची लागवड करतात.

विद्यार्थी स्वतः मातीची तयारी, बियांची पेरणी, झाडांना पाणी देणे, खत टाकणे आणि देखभाल करण्याचे काम करतात. त्यामुळे त्यांच्यात स्वावलंबन, जबाबदारी, श्रमप्रतिष्ठा व पर्यावरणप्रेम या मुलभूत गुणांची जोपासना होते.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत शेती, आरोग्यदायी आहार व जैवविविधतेचे संरक्षण याबाबत जागृती निर्माण करतो. शिक्षक मार्गदर्शन करत असले तरी संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांच्या सहभागातूनच घडते, हे या उपक्रमाचे खास वैशिष्ट्य आहे.





संदर्भ व माहितीसाठी शाळेच्या विविध लिंक: -

शाळेचे Facebook Page: https://www.facebook.com/share/15oeQZEn2Z/

शाळेची यशोगाथा व्हिडीओ लिंक:
https://youtu.be/OmKZrPcqZXQ?si=KYLgEK9BRp6D4z1A

अध्ययन अध्यापनात व उपक्रमांत शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा केलेला वापर :
https://www.facebook.com/share/r/1AYs9zggpZ/
https://youtu.be/EUL-RLERRBQ?feature=shared
https://youtu.be/3DLfrJjhoiI?si=94DWYr8vm9ELdZzM
https://youtu.be/nIz1ItrSzm4?feature=shared
https://www.facebook.com/reel/1114755267001710?sfnsn=wiwspwa&mibextid=6AJuK9
https://youtu.be/9C64tAS7jCk?si=qB-C0MGmsMNr2mEh
https://youtu.be/4FtTedBrzKU?si=wG51r9oHBfXmAU6Q
https://youtu.be/3DLfrJjhoiI?si=aVN26TDkcZuWWMAd
https://www.facebook.com/share/r/1CgPTKH4SZ/
https://www.facebook.com/share/r/1CgPTKH4SZ/
https://www.facebook.com/share/r/19bgLXdofT/
https://www.facebook.com/share/r/15hdVKQKYX/
https://www.facebook.com/share/r/19YEn91wDm/
https://youtu.be/2Cr-J_9AEBY?si=Ccz19X3ESecMRvXV
https://youtu.be/v7A5YtHVhbg?si=RNJuM9iQAQE9WOdR
https://youtu.be/7agCcRlOEw8?si=YEm7v2xOz5aaA6yi
https://youtu.be/dmcZyRzr1Wc?si=tLS6PMIPREmv1Svp

----------**----------

मुलभूत क्षमता विकासात विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये शालेय नेतृत्व

"उपक्रम आमचे खास: करी मूलभूत क्षमतांचा विकास"

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरखेडे खुर्द,

शाळेचा पत्ता — हिवरखेडे खुर्द .तालुका पारोळा, जिल्हा जळगाव

शाळेचा ईमेल आयडी - zpschoolhivarkhedekh@gmail.com

मुख्याध्यापक नाव -श्रीमती सीमा विठ्ठल पाटील

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9970830878

मुख्याध्यापक ईमेल आयडी - seemavitthalpatil2711@gmail.com

प्रस्तावना : गावाच्या कडेला असलेली आमची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरखेडे खुर्द. आमची शाळा शिक्षणाच्या व लोकसहभागाच्या माध्यमातून ज्ञानाचा, मुलभूत क्षमतांचा व जाणिवजागृतीचा प्रकाश पसरवत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ऊसतोड मजुर, स्थलांतरित कुटुंब (मध्य प्रदेश राज्यातील) अशा विविध घटकातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुलभूत क्षमतांवर व गरजांवर आधारित नवनवीन उपक्रम या शाळेत राबवले जातात. शिक्षण केवळ पुस्तकी न राहता अर्थात केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता अनुभवातून, प्रात्यक्षिकातून शिकवण्यावर भर देणारे शाळेतील वैविध्यपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधारस्तंभ ठरले आहेत. शाळेत राबविलेल्या वेगवेगळ्या उपक्रमामुळे शाळेची सर्वांगीण प्रगती झालेली आहे. यात गावकऱ्यांचा पाठिंबा, लोकसहभाग, अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, सहकारी शिक्षकांचे अथक परिश्रम व विद्यार्थ्यांची उर्मी या सर्व गोष्टी अंतर्भूत आहेत.

शाळेची पार्श्वभूमी : सन. २०१९ फेब्रुवारी महिन्यात माझी या शाळेवर समायोजनातून बदली झाली. मुख्याध्यापिका म्हणून शाळेचा पदभार आपसूकच माझ्याकडे सोपविला गेला. सुरुवातीस सहकारी मनोहर पाटील, रोशनकुमार जैन यांच्याकडून गावाची पार्श्वभूमी, पालकांचा व्यवसाय व शालेय अडचणी जाणून घेतल्या. विद्यार्थी पटसंख्या व उपस्थिती वाढविण्यासाठी, शालेय अंतरंग व बाह्यरंग सजावटीसाठी, शालेय भौतिक सुविधांसाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येतील? याविषयी चर्चा व नियोजन केले. त्यावेळी लक्षात आले की बहुतांश पालक हे शेतकरी, कष्टकरी व मजूर वर्गातील असून त्यांचे पाल्य बऱ्याचदा वरचेवर शालेय वेळेत गैरहजर राहतात. विद्यार्थ्यांची उपस्थिती, सातत्य टिकून राहण्यासाठी व शाळा विकासासाठी सहकारी मनोहर

पाटील, रोशनकुमार जैन, शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या मदतीने प्रयत्न सुरू करण्यात आले. त्यानुसार विद्यार्थी उपस्थिती व सातत्य कसे टीकेल या घटकाला प्राधान्यक्रम देण्यात येऊन गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना भेटण्याचे नियोजन करण्यात आले. शाळेपासून एक ते दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या 'बल्ली' या वस्तीतील विद्यार्थ्यांच्या भेटीसाठी अगदी सकाळी आम्ही तिघेजण पायपीट करीत 'बल्ली' या वस्तीवर पोहोचलो. तिथे पोहोचल्यावर चर्चेअंती लक्षात आले की, बहुतेक विद्यार्थ्यांचे पालक हे मजूर व ऊसतोड कामगार असल्याने सकाळीच कामावर निघून जातात. त्यामुळे आपण कामावर गेल्यानंतर आपला पाल्य शाळेत गेला किंवा नाही ? याची ते खातरजमाही करीत नसत. पालकांची व विद्यार्थ्यांची समस्या लक्षात आल्यावर वेळोवेळी पालकांची भेट घेऊन त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी जनजागृती व प्रबोधन केले. पालकांनाही आमचे म्हणणे पटल्यामुळे ते विद्यार्थ्यांना अपवाद वगळता नियमितपणे शाळेत पाठवू लागले. सुरुवातीस अगदी अल्प प्रमाणात उपस्थित राहणारे विद्यार्थी आता नियमित उपस्थित राहत असून शाळेची पटसंख्या देखील वाढलेली आहे. आजमितीस एकाहत्तर(71) विद्यार्थी शाळेत दाखल असून विद्यार्थ्यांना व पालकांना शाळेची व शिक्षणाची गोडी वाटू लागली आहे.

सुरूवातीला अवघ्या दोनच वर्ग खोल्या असलेल्या आमच्या शाळेला संरक्षक भिंतही नव्हती. दोनच खोल्यांमध्ये अध्ययन अध्यापनाचे कार्य होत असे. मात्र पालकसभेच्या माध्यमाने, शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने, पालकांच्या व ग्रामस्थांच्या जनजागृतीने गावकऱ्यांनी लोकसहभागातून एक वर्ग खोली बांधून दिली. वर्ग खोलीची मुख्य समस्या सुटल्यानंतर पुढची समस्या होती, शालेय भौतिक सुविधा उपलब्ध करण्याची. त्यासाठी मी स्वतः पुढाकार घेऊन शालेय विकासासाठी दहा हजाराची मदत दिली. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून त्यावर्षी नियुक्त झालेल्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षांनी शाळेला लागलीच दहा हजाराची देणगी दिली. शाळेतील सहकारी शिक्षक व गावकऱ्यांनीही शाळेसाठी आर्थिक मदत देऊ केली व शाळेचा कायापालट होऊ लागला. त्यातून शाळेसाठी भौतिक सुविधा, रंगरंगोटी या बाबींची पूर्तता करण्यात येऊ लागली. आपल्या गावातील शाळेचा परिसर आकर्षक व सुंदर व्हावा म्हणून सर्व गावकऱ्यांनीही मोलाची मदत केली. हळूहळू शाळेचे रूपं बदलत होते, आता अडचण होती फक्त संरक्षक भिंतीची. मात्र तीही अडचण मार्गी लागावी म्हणून आम्ही जाणीवपूर्वक प्रयत्न करीत होतो . अखेर प्रयत्नांना यश आले आणि शालेय संरक्षक भिंतही बांधली गेली. मी व माझे सहकारी सर्वजण शालेय विकासाबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झपाटून कामाला लागलो. शाळेत राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे शाळेची व विद्यार्थ्यांची तालुका, जिल्हा, व राज्यस्तरावर दखल घेतली गेली. याचा सकारात्मक परिणाम व्हायचा तोच झाला. फक्त गावातीलच नव्हे तर मध्य प्रदेशातील तसेच गावातील नातेवाईकांची मुलेही आज शाळेत शिकू लागली आहेत हेच आम्हा सर्वांनी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांचे व उपक्रमांचे यश आहे. सध्या शाळेमध्ये मुख्याध्यापिका म्हणून मी श्रीमती. सीमा विठ्ठल पाटील, सहशिक्षिका श्रीमती.हर्षदा तुळशीराम बोरसे, सहशिक्षक श्री. रोशनकुमार लखीचंद जैन व मुख्यमंत्री युवा कौशल्य अंतर्गत नियुक्त शिक्षक श्री.महेंद्र वसंत कोळी सतत प्रयत्नशील राहून शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जीवापाड मेहनत घेत आहोत. शाळेतील विद्यार्थिनी राष्ट्रीय पुरस्कार सुवर्णबाण परीक्षेसाठी




(स्काऊट व गाईड) पात्र ठरलेल्या आहेत. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमतांचा विकास कसा होईल ? याच विचारांनी प्रेरित होऊन विविध उपक्रम राबवित आहोत. नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करणारी शाळा म्हणून आमच्या हिवरखेडे खुर्द शाळेकडे पाहिले जाते.

शाळेचे पूर्वीचे फोटो -





शाळेचे आताचे फोटो -









शाळेला व विद्यार्थ्यांना मिळालेली पारितोषिके -

- स्काऊट गाईड राज्यस्तरीय हीरक पंख परीक्षेत सहा विद्यार्थिनींना प्राविण्य. या परीक्षेत पात्र होणारी जिल्हा परिषदेची जिल्ह्यातील एकमेव शाळा म्हणून नावलौकिक.
- तृणधान्य पाककला स्पर्धेत तालुकास्तरीय प्रथम क्रमांक.
- परसबाग स्पर्धेत तालुकास्तरीय सतत दोन वर्षापासून पुरस्कार प्राप्त.
- माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत शाळेला सतत दोन वर्षापासून तालुक्यातील द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक.
- शाळेतील "माझे पाट, बहुपयोगी पाट: फिरते भोजनालय व वाचनालय" उपक्रमाला जिल्हास्तरावर पारितोषिक.
- शाळेतील "माझी उपचारात्मक पुस्तिका" या नवोपक्रमाला जिल्हास्तरावर पारितोषिक प्राप्त.
- जिल्हास्तरीय स्काऊट गाईड मेळाव्यात मुले नृत्य गटात प्रथम क्रमांक, मुली नृत्य गटात प्रथम क्रमांक, गोणपाट स्पर्धेत प्रथम क्रमांक विद्यार्थी, लिंबू चमचा स्पर्धेत प्रथम क्रमांक विद्यार्थी ,क्राफ्ट स्पर्धेत उत्तेजनार्थ विद्यार्थिनी, गोणपाठ स्पर्धेत उत्तेजनार्थ विद्यार्थीनी .जिल्ह्यातून सर्वाधिक प्रथम क्रमांकाचे बक्षिसे मिळवणारी शाळा म्हणून नावलौकिक.
- विनोबा भावे ॲपवरील विद्यार्थ्यांच्या पोस्टला जिल्हास्तरावर सन्मानपत्र माननीय जिल्हाधिकारी ,डायट प्राचार्य , शिक्षणाधिकारी , डायट अधिव्याख्याते यांच्या हस्ते प्रदान.
- शिक्षक निर्मित अध्यापन साहित्याचा तालुकास्तरावर विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक
- शिष्यवृत्ती परीक्षेत २०१९ ते २०२५ पर्यंत एकूण १९ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र.
- नवोदय परीक्षेत दोन विद्यार्थ्यांची निवड.
- शिक्षक व विद्यार्थ्यांनी मिळून साकारलेल्या वारली पेंटिंगचा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जळगाव यांच्या पुस्तिकेत समावेश.
- कोरोना काळात विद्यार्थ्यांनी केलेल्या काव्य लेखन उपक्रमाचा जिल्हास्तरीय उपक्रमात समावेश.
- "चला मेंदूची कार्यक्षमता वाढवूया" उपक्रमाचा जिल्हास्तरीय उपक्रम पुस्तिकेत समावेश.
- शिक्षक व विद्यार्थी निर्मित व्हिडिओला व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत जिल्हास्तरावर पारितोषिक प्राप्त.

वरील मिळालेल्या यशात आमच्या शाळेने राबविलेल्या नवनवीन उपक्रमांचा सिंहाचा वाटा आहे हे सत्य नाकारता येणार नाही. ज्या उपक्रमामुळे आमच्या शाळेचा नामोल्लेख व गौरव होतो ते नवनवीन उपक्रम कोणकोणते आहेत ते थोडक्यात जाणून घेऊया.

नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे मुलभूत क्षमतांचा विकास - आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरखेडे खुर्द येथे राबविलेल्या खालील वैविध्यपूर्ण उपक्रमामुळे भाषिक साक्षरता यात वाचन, लेखन ,शब्दसंग्रह व व्याकरण, श्रवण व संभाषण कौशल्य विकास, संख्याज्ञान व मोजणी, क्रिया कौशल्यमापन व आकडेवारी, गणिती संकल्पना तसेच जीवन कौशल्य व सामाजिक आकलनात सामाजिक आचार व मूल्य शिक्षण ,पर्यावरणीय आकलन, हाताळणी कौशल्य या सर्व मूलभूत क्षमतांचा सर्वांगीण विकास होण्यात मदत झाली.




१. माझे पाट :बहुपयोगी पाट:फिरते भोजनालय, फिरते वाचनालय

या उपक्रमासाठी लोकसहभागातून सुरुवातीला ७५ पाट खरेदी करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याचा स्वतःचा पाट असल्याने स्वयंशिस्त व सांस्कृतिक परंपरेची जोपासना ही मुले रुजवण्यात आली. कार्यानुभव, कला व इतर विषय शिकवण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी आपापल्या कल्पकतेने या पाटांचा उपयोग अध्ययन अध्यापनात करतात. यावरच भोजन, वाचनासारखे उपक्रमही राबवले जातात. फिरते भोजनालय व वाचनालय शाळेत उभे राहिले. या आगळ्यावेगळ्या नवोपक्रमला जिल्हास्तरावर दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले. दैनंदिन वापरातील पाटही अभ्यासाचा भाग होऊ शकतो हि बाब सर्वांसाठी कौतुकाची ठरली. जेवणासाठी, अभ्यासासाठी, लेखनासाठी, वाचनासाठी तसेच कार्यानुभवासाठी विविध वस्तू बनवितांना विद्यार्थी या पाटांचा दैनंदिन शालेय वेळेत उपयोग करतात.


(महाराष्ट्र शासन)
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगांव

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२३-२४

प्रमाणपत्र

श्री./श्रीमती ..... सीमा विठ्ठल पाटील ..... पदनाम ..... उपाशिक्षिका .....
शाळा ..... जि. प. प्राथमिक शाळा, हिवरखेडे खुर्द ..... ता. ..... पारोळा .....
यांनी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२३-२४ साठी जिल्हास्तरावर सादर केलेल्या ..... माझे पाट बहुपयोगी पाट फिरते .....
भोजनालय, फिरते वाचनालय फिरते उपक्रमशाळा ..... या नवोपक्रमास प्राथमिक / माध्य. व उच्च माध्य. गटातून प्रथम / द्वितीय / तृतीय / उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

स्थळ : जळगाव

डॉ.जगन्नाथ दंदले
अधिव्याख्याता तथा नवोपक्रम समन्वयक
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव

डॉ.चंद्रकांत साळुंखे
अधिव्याख्याता तथा विभागप्रमुख
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव

डॉ.अनिल झोपे
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव


शिक्षकांच्या संकल्पनेतून साकारले फिरते भोजनालय व फिरते अभ्यासालय उपक्रम

पारोळा । प्रतिनिधी

तालुक्यातील हिवरखेडे खुर्द जि.प.शाळेत शिक्षकांच्या संकल्पनेतून साकारले फिरते भोजनालय व फिरते अभ्यासालय उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थी गुणवत्ता वाढवण्यासाठी अनेक नवनवीन उपक्रम शाळेत राबविले जातात. याचाच एक प्रयत्न म्हणून हिवरखेडे खुर्द शाळेत फिरते भोजनालय व फिरते अभ्यासालय तयार करण्यात आले. यात प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी लोकसहभागातून पाट विकत घेऊन [illegible] पाटांवर स्टीकर लावण्यात आले. विद्यार्थ्यांनी कल्पकतेने पाटांवर सजावट केलेली आहे. पाटांमुळे विद्यार्थी उत्साहाने शाळेत येतात. पाटांवर ताटे ठेवून जेवतांना विद्यार्थी एक वेगळा अनुभव घेतात. तसेच लेखन कार्यासाठी, वाचनासाठी, हे पाट अत्यंत उपयुक्त ठरत आहेत.

मदत, सहकार्य, जतन, कलाकौशल्य अशी अनेक उद्दिष्टे यातून साध्य होत आहेत. या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ग.शि.अ.चंद्रकांत चौधरी, शा.पो.आ.अधिक्षिका प्रीती पवार, शि.वि.अ.कविता सुर्वे, केंद्रप्रमुख संजय चव्हाण व पंचायत समिती पारोळा गटशिक्षणाधिकारी बोळे केंद्रप्रमुख संजय चव्हाण व विद्यार्थी पालक उपस्थित होते. सर्व अधिकाऱ्यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन झाले व परसबागेस रोपे लावण्यात आली. गजिअ चौधरी, आधिक्षिका प्रीती पवार, शि.वि.अ.कविता सुर्वे, केंद्र प्रमुख संजय चव्हाण यांनी हा एक आगळा वेगळा तालुक्यातील पहिला उपक्रम असून शाळेचे कौतुक केले. सुत्रसंचालन मुख्याध्यापिका सीमा पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन शिक्षक मनोहर पाटील यांनी केले. यशस्वीतेसाठी मनोहर पाटील, गोशनकुमार जैन, सीमा पाटील यांनी प्रयत्न केले.










२. माझी उपचारात्मक पुस्तिका: एक वाचन क्रांती

मुख्याध्यापिका श्रीमती. सीमा पाटील यांनी वाचनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वानुभवातून एक खास पुस्तिका तयार केली. विद्यार्थ्यांचा भावनिक -मानसिक स्तर, भाषा आकलन, दृश्य माध्यम यांचा वापर करून हळूहळू विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण केली. या पुस्तकामुळे अप्रगत विद्यार्थ्यांच्या वाचनात प्रगतीचा आलेख वाढत असल्याचे लक्षात आले. या नवोपक्रमाला जिल्हास्तरावर बक्षीस मिळाले असून या पुस्तकाची निवड अप्रगत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जळगाव यांच्यामार्फत करण्यात आलेली आहे. यामुळे सर्व विद्यार्थ्यांची मुलभूत वाचन क्षमता विकसित होण्यास मदत होत आहे.



माझी उपचारात्मक पुस्तिका

लेखिका
श्रीमती सिमा विठ्ठल पाटील
लॉट नं. ८, 'मॉसाहेब' पाटीलनगर,
धुळे, ता. जि. धुळे – ४२४००२
मो.: ९९७०८३००८७
जि. प. प्राथ. शाळा हिवरेखेडे
खु.।।, ता. पारोळा, जि. जळगाव

प्रकाशक
वैशाली प्रकाशन, पुणे
३२३, नारायण पेठ, तिसरा मजला
मोदी गणपतीच्या मागे,
पुणे – ३०

कार्यालय
वैशाली प्रकाशन
द्वारा – विलास बुक एजन्सी
साईप्रसाद रो–हाउसेस,
उदय कॉलनी, सिडको,
चौथी स्कीम, नाशिक ४२२००९
संपर्क : ९८९०९३३७९०

हक :
श्रीमती सिमा विठ्ठल पाटील

प्रथमावृत्ती :
३१ एप्रिल २०२४

अंतर्गत सजावट :
सौ. मेघा अनिल खैरनार, नाशिक

मुद्रक :
देवगिरी ऑफसेट, सातपूर, नाशिक

मूल्य :
४०/– रु.

ISBN - 978-93-88607-83-4









पारितोषिक प्राप्त

३. वारली चित्रकला: सृजनातून संवेदनांचा विकास


जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव यांनी दिलेल्या प्रशिक्षणातून प्रेरणा घेऊन श्रीमती.सीमा पाटील यांनी शाळेत वारली पेंटिंगचा उपक्रम राबविला. त्याअंतर्गत भाषा, गणित, पर्यावरण, व्यसनमुक्ती, बेटी बचाव, जलसाक्षरता, व्यायाम, स्वच्छता यावर आधारित चित्रे मुख्याध्यापिका सीमा पाटील, सहशिक्षिका हर्षदा बोरसे सहशिक्षक रोशन कुमार जैन व विद्यार्थी यांनी स्वतः साकारली आहेत. या चित्रांमुळे विद्यार्थ्यांचे अभिव्यक्ती कौशल्य वाढले. अध्ययन अध्यापनासाठी या कलाकृतीचा उपयोग उत्तम प्रकारे होत आहे. वारली पेंटिंग मध्ये विद्यार्थ्यांच्या परिसरातील परिचित चित्र असल्यामुळे विद्यार्थीही आवडीने शिकण्यात सहभागी होतात. या लोककला कृतींची विशेष दखल स्थानिक वृत्तपत्रांनी घेतली. अनेक मान्यवरांनी भेटी देऊन या कलाकृतीची पाहणी करीत शाळेचे कौतुक केले. विशेष म्हणजे या चित्रांचा उल्लेख जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या पुस्तिकेतही करण्यात आला. ही बाब आम्हा सर्वांसाठी आनंदाची व अभिमानाची आहे. श्रीमती.सीमा पाटील यांनी तयार केलेल्या तंबाखू मुक्तीवरील वारली चित्रशैलीतील संशोधन लेखाने शाळेला विशेष गौरव मिळवून दिला.

Link- https://youtu.be/kAK38k3dk7M?si=B40GJ66qefuKdHvo













ज्येष्ठ अधिव्याख्याता मा. डॉ.संगीता महाजन यांची भेट















लोकमत

शिक्षकांनी साकारली वारली कलाकृती

हिवरखेडे खुर्द शाळेला आमदारांची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळा : तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा हिवरखेडे खुर्द येथे आमदार चिमणराव पाटील यांनी भेट दिली. यावेळी शिक्षकांनी साकारलेल्या वारली कलाकृतीचे उद्घाटन आमदार पाटील यांनी केले.

शाळेची मुख्यमंत्री ज्ञानू सोमा भिल हिने आमदारांना सलामी देत पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर स्काऊट-गाइडच्या कब-बुलबुल पथकाने संचलन केले. याप्रसंगी आमदारांनी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अंतर्गत शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची व कामांची पाहणी करीत विद्यार्थ्यांशी व शिक्षकांशी संवाद साधला. शालेय स्तरावरील विविध उपक्रमांचे व कामाचे कौतुक करून ग्रामस्थांच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. वारली चित्रशैलीतून पायाभूत साक्षरतेकडे या वारली कलाकृतीचे प्रशिक्षण घेतलेल्या मुख्याध्यापिका सीमा पाटील यांनी हर्षदा बोरसे, रोशन जैन यांच्या सहकार्याने सुरक्षा भिंतीवर साकारले. त्याचे उद्घाटन आमदार चिमणराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जि.प.चे माजी कृषी सभापती दिनकर पाटील, देवगाव सरपंच समीर पाटील आदी उपस्थित होते.

डाएटचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे, तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. संगीता महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली सीमा पाटील, हर्षदा बोरसे, रोशनकुमार जैन यांनी वारली पेंटिंगचा हा उपक्रम शाळेत राबविला आहे.

आमदारांसोबत उपस्थित मान्यवरांनीही यावेळी वारली पेंटिंगचे निरीक्षण व कौतुक केले.



चाळीसगाव 04-02-202

हिवरखेडे खुर्द जि.प. शाळेत साकारल्या वारली पेंटिंग

शहर प्रतिनिधी | पारोळा

तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा हिवरखेडे खुर्द येथे आमदार चिमणराव पाटील यांनी शाळेस भेट दिली. याप्रसंगी आमदारांनी मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा अंतर्गत शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची व कामांची पाहणी करीत विद्यार्थ्यांशी व शिक्षकांशी संवाद साधला. शालेय स्तरावर चालू असलेल्या विविध उपक्रमांचे व कामाचे कौतुक करून ग्रामस्थांच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. वारली चित्रशैलीतून पायाभूत साक्षरतेकडे या वारली कलाकृतीचे प्रशिक्षण घेतलेल्या मुख्याध्यापिका सीमा पाटील यांनी सहकारी हर्षदा बोरसे, रोशन जैन यांच्या सहकार्याने सुरक्षा भिंतीवर साकारलेल्या वारली पेंटिंगचे उद्घाटन यावेळी आमदार चिमणराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. डाएटचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे, तज्ञ मार्गदर्शक डॉ. संगीता महाजन यांच्या मार्गदर्शनाने सीमा पाटील, हर्षदा बोरसे, रोशन कुमार जैन यांनी वारली पेंटिंगचा हा उपक्रम राबविला आहे.



देशदूत

हिवरखेडे खुर्द जि.प.शाळेत वारली पेंटिंगचे उद्घाटन

▸▸ पारोळा। प्रतिनिधी –

तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा हिवरखेडे खुर्द येथे आ. चिमणराव पाटील यांनी शाळेस भेट दिली. याप्रसंगी आमदारांनी मुख्यमंत्री माझी शाळा–सुंदर शाळा अंतर्गत शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची व कामांची पाहणी करीत विद्यार्थ्यांशी व शिक्षकांशी संवाद साधला. वारली चित्रशैलीतून पायाभूत साक्षरतेकडे या वारली कलाकृतीचे प्रशिक्षण घेतलेल्या मुख्याध्यापिका सीमा पाटील यांनी सहकारी हर्षदा बोरसे, रोशन जैन यांच्या सहकार्याने सुरक्षा भिंतीवर साकारलेल्या वारली पेंटिंगचे उद्घाटन यावेळी आ. चिमणराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. डाएटचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे, तज्ञ मार्गदर्शक डॉ. संगीता महाजन यांच्या मार्गदर्शनाने सीमा पाटील, हर्षदा बोरसे, रोशन कुमार जैन यांनी वारली पेंटिंगचा हा उपक्रम शाळेत यशस्वीरित्या राबविला आहे.

४. चला मेंदूची कार्यक्षमता वाढवूया: ब्रेन ॲक्टिव्हिटी उपक्रम

या उपक्रमात विद्यार्थ्यांकडून संगीताच्या पार्श्वभूमीवर कृती करून घेतली जाते. तदनंतर मेंदूला विश्रांती देणारे संगीत ऐकविले जाते. यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता, स्मरणशक्ती आणि समज वाढण्यास मदत होते. या उपक्रमाने विद्यार्थ्यांची शाळेतली उपस्थिती वाढली असून, या उपक्रमाची नोंद जिल्हास्तरावरील पुस्तिकेतही घेण्यात आलेली आहे. या उपक्रमातून नकळतपणे "फिट इंडिया "ही संकल्पना सुद्धा प्रत्यक्षात साकारली जाते. दीक्षा ॲप वरील ऑनलाइन ब्लेंडेड मोड कोर्स मध्ये "ताण तणाव व्यवस्थापन" च्या मॉड्युल निर्मितीत या उपक्रमाची कृती समाविष्ट करण्यात आलेली आहे. मनासाठी, शरिरासाठी आनंददायी अशा ह्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता वाढण्यास मदत तर होतेच पण त्याचसोबत ऊर्जाही निर्माण होते.



जळगाव : आपला जिल्हा – आपले उपक्रम २०१९ - २०२०

उपक्रम क्रमांक १७

चला मेंदूची क्षमता वाढवू या

श्रीमती सीमा विठ्ठल पाटील

शाळेचे नाव थोडक्यात – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरखेडे खुर्द. ता पारोळा जि.जळगाव

मोबाईल क्र.- ९७९०८३०८७९

उद्दिष्टे –

१) विद्यार्थ्यांची अभ्यासातील एकाग्रता वाढवणे.
२) विद्यार्थ्यांच्या मेंदूची क्षमता विकसित होणे.
३) बंडखोरी वृत्ती कमी होणे.
४) सर्वांग सुंदर व्यायाम येणे.
५) शालेविषयी आवड निर्माण होणे.
६) आत्मविश्वास वाढण्यास मदत होणे.
७) शारीरिक मानसिक तंदुरुस्ती येणे.

पूर्वतयारी –

वेगवेगळ्या गाण्यांचे म्युझिक डाऊनलोड करून घेणे. त्यात लोकगीते.. देशभक्तिपर.. गीते कविता.. इंग्रजी मराठी. मुलांची आवडती गाणी कट करून जोडून घेणे. युट्युब वरून ब्रेन म्युझिक व मेडिटेशन म्युझिक व flute म्युझिक डाऊनलोड करून घेणे.

उपक्रमाच्या कालावधी –

साधारण १० ते २० मिनिट. जेवणाच्या एक तास अगोदर नाहीतर जेवणानंतर दोन तासात.

कार्यवाही –

वर्गखोलीत दरवाजे खिडक्या बंद करून मुलांना अंतरावर उभे करणे. मुलांना भीती वाटल्यास उघडे ठेवू शकतो. पण पंखे बंद ठेवणे. पहिल्या दिवशी मुलांना पाच मिनिट याप्रमाणे कालावधी वाढविणे. कृती चालू असताना कोणीही बोलणार नाही. तसेच तोंड उघडे करणार नाही. याची सूचना देणे. नंतर मुलांचे आवडते गाणे लावून न थांबता मुलांकडून कृती करून घेणे. (नाचणे) कृतीत व्यायामाच्या वेगवेगळ्या कृती घेणे. एक कृती साधारणतः दहा वेळा करून घेणे. कृती निवडताना मुलांच्या शरीराचा योग्य व्यायाम होईल याची खबरदारी घेणे जमत नसल्यास जागेवरच मार्च चालू, सुरु ठेवणे, म्युझिक सुरू करण्याअगोदर वार्मिंग अप करून घेणे. सुरु पूर्णपणे थकली असल्यास मुलांना डोळे लावून रिलॅक्स स्थितीत लगेच आहे. त्या जागेवर बसायला किंवा झोपायला सांगणे. सुरुवातीला ब्रेन म्युझिक व नंतर मेडिटेशन फ्लूट म्युझिक/स्टीपिंग म्युझिक लावू शकतो. हे म्युझिक साधारणता दहा ते वीस मिनिट सुरू ठेवावे नंतर हळूच मुलांना डोळे उघडायला सांगणे मुलांना काय फिल झाले ते विचारावे. रोज वेगवेगळ्या थीमवर मुलांना व्यक्त होण्यास सांगावे उदाहरणार्थ कुटुंबविषयी स्वत:विषयी परिसरविषयी. प्रत्येक विद्यार्थ्याना बोलते करणे. माझा अनुभवानुसार मुलांमध्ये खूपच बदल घडून येतात व अतिशय आनंदाने मुले या उपक्रमात सहभागी होतात. भावनिक दृष्ट्यासुद्धा व्यक्त होतात व या उपक्रमाचे जे उद्दिष्ट आहेत त्यानुसार बदल होण्यास निश्चित मदत होते. आपण हा उपक्रम दररोज किंवा आठवड्यातून एकदा घेऊ शकतो विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकांसाठी हा उपक्रम फायद्याचा आहे.

(टिप: कृती निवडतांना मुलांचे मानसशास्त्र व शारीरिक क्षमता लक्षात घेणे महत्वाचे आहे.)

फल निष्पत्ती –

फिट इंडिया ही संकल्पना साकार होईल.
कारण निरोगी शरीरात निरोगी मन असते.
Health is wealth.

शिक्षक आमचा मानबिंदू – विद्यार्थी आमचा केंद्रबिंदू ४५




जळगाव : आपला जिल्हा – आपले उपक्रम २०१९ - २०२०

अनुक्रमणिका

अ.नं.	उपक्रमाचे नाव	शिक्षकाचे नाव	तालुका	पान नं.
१	'एक गांव- एक रंग' उपक्रमांतर्गत सुशीला व भटिनांच्या स्वयंशिक्षणाचे प्रतीक म्हणून गावातील पहिले सुलवी गांव	श्री.जितेंद्र स्वंस गवळी	रावेर	०१
२	शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांचे व्यसनमुक्ती अभियान	श्री.माहेश्वर हिरालाल सोनवणी	महालाव	०७
३	'रिंगे ते पाय रिंगवा'	श्रीमती. किरी प्रकाशर भारसार	पोरोळा	१०
४	सुलभविज्ञान पुस्तिका (संकलन)	श्री. विमा चाहिल्य भोसले	चाळीसगाव	१३
५	स्वयंअध्ययन कालावधीत पेक्षेचा सदुपयोग	श्री.शिवप्रसाद सदुकर उजनेकर	मुक्ताईनगर	१६
६	चला जूक या भाषा समृध्द	श्रीमती स्वाती अशुलाल पाटील	पारोळा	१८
७	उपस्थिती थ्वज	श्री. वीरेन्द्र वसंतराव पाटील	पारोळा	२०
८	व्यक्ति व्यक्तीचे सुशीलता	श्री.अनिल सदुलाल पाटील	रावेर	२४
९	पत्रव्यवहारी परख उपलब्ध करणे	श्री.किशोर इरी पुले	जळगाव	२४
१०	'आपली विद्यालयाचे पालकांनी'	श्री.सुधीर अर्जुन पाटील	महालाव	२७
११	स्वतः तयार केलेल्या साहित्याचा गणितात गोडी निर्माण करण्यासाठी उपयोग.	श्री.तरस नारायण पाणी	पारोळा	३१
१२	सुंदर हस्ताक्षर हा उपक्रम सफल विद्यार्थ्यांचा सुंदर अक्षर काढण्यासाठी प्रोत्साहन देणे	श्रीमती सुलभा विठ्ठल महाजन	पारोळा	३३
१३	मुक्तसदनद्वारे भाषा विषयातील संशोधन कौशल्य विकसन उपक्रम	श्री.प्रवीण लालसाम माळी	पोरोळा	३६
१४	गणा कलेक्टर व्हायचं....	श्री.अविनाश पंढरीनाथ शिंदे	पारोळा	४०
१५	इ. ९ वी व १० वी विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी विषयाचे अध्ययनासाठी तैत्तिरीय व्याप्ति (Educational Blog)	श्री. अजय स्वंस सैंदाने	पोरोळा	४४
१६	कोण बनणार लाभार्थी ?	श्रीमती वैशाली प्रल्हाद पाटील	जळगाव	४९
१७	चला मैत्री समता वाढवू या	श्रीमती सीमा विठ्ठल पाटील	पारोळा	५१
१८	'व्यायशाळा मोहिम'	श्री.विनोद धर्मसेठ पाटील	पारोळा	५४
१९	शोध प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांचा समोर	श्री.राहुल भास्कर पोपली	जळगाव	५४
२०	किशोरवय मार्गदर्शन परिषद कालवा यशस्वी पडावयी	श्री. एकनाथ स्वंस पाटील	पोरोळा	५६
२१	आपले समा - संस्कृतीचा ठेवा	श्रीमती किरी भानुदास भोगडे	जामनेर	५८
२२	भाषाभ्यासाच्या आधारावे इंग्रजी शिक्षण	डॉ.विजय काशिनाथ सानुदा	धरणगाव	६०
२३	चला लिहिते होऊ या.....	श्रीमती. पुनम चंद्रशेखर गोडसे	जळगाव	६१
२४	विद्यार्थ्यांची पेक्षता एनिसाकिया "नानाची" विज्ञानाचा अनुभव	श्री.गणेश चंद्रशेखर लोढाते	जळगाव	६१
२५	सुलभवान घेणे	श्री. स्वंतस्वि नवनस्वि पाटील	पोरोळा	६३
२६	राष्ट्रपिता महात्मा गांधी : वैचिक व्यक्तिमत्व	श्री.विजय सुरेषु गुले	जळगाव	६५
२७	मुलांचा, जोड व आत्मकेंद्रितपणा यावरविषय सादर करणे	श्रीमिया सुरेश पोपले	मुक्ताबाद	६६
२८	जेणेकरतील घरणे आले सावीत शिक्षणपरीक्षा सेटिंग...!	श्री.संतोष सुधाकरेसप पवार	जळगाव	७०
२९	अभिनवोत्तेन शिक्षण अडचणीवर आमचा कोरोना कालावधीत प्रयोग घर घर शाळा शिक्षण आपल्या दारी	श्रीमती जयश्री पुरुषोत्तम पाटील	एरंडोल	७४
३०	शब्दकोश निर्मिती (स्तरावी ते ७वीला सथर) मुलांमध्ये पर्यायवाचकाचे मूल्य रुजविण्यासाठी	श्रीमती. वैशाली अशोकराव गोडे	पारोळा	७७
३१	विविध झाडांच्या बिया जमिनीत लावणे	श्री.संजीव नीलकंठ शेटे	पोरोळा	७९
३२	गटनेपद्धती- सेवाकार्यांची, प्रभावंजुरा अन् सुलभतेची	श्री.नवाज्य वारसू सोनवणे	अमळनेर	८१
३३	ऐकू संगीत गोड, त्याची शिक्षणाची ओढ	श्री.डॉ.जगन्नीक हिरामण अहिरे	पारोळा	८४
३४	आनंददायी शिक्षणाचा उपक्रमांची जोड	श्रीमती संगता सं. गायकवाड	चाळीसगाव	८८

शिक्षक आमचा मानबिंदू – विद्यार्थी आमचा केंद्रबिंदू



५. व्हिडिओ निर्मिती: डिजिटल माध्यमातून शिक्षण

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. सीमा विठ्ठल पाटील यांनी स्वतः क्रिएट केलेल्या यूट्यूब चैनलवर इंग्रजी, गणित, विज्ञान, कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा आदी विषयांवर आधारित विद्यार्थ्यांच्या सहभागाने मोठ्या प्रमाणावर व्हिडिओ निर्मिती करून प्रसारित करतात. विविध अंगभूत कलागुण दाखवण्यासाठी, विद्यार्थ्यांना सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी स्वतःचे व्यासपीठ मिळते. या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सादरीकरण कौशल्य व तंत्रज्ञानाची ओळख वाढीस लागली आहे. शैक्षणिक कार्यासाठी या व्हिडिओंचा उपयोग होत आहे.


(महाराष्ट्र शासन)
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,जळगांव

शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३

प्रमाणपत्र

श्री. सीमा विठ्ठल पाटील, जि.प.प्राथमिक शाळा,हिवरखेडे खुर्द, ता.पारोळा, जि.जळगांव यांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३ या स्पर्धेत इ. ३ री ५ वी गटात परिसर अभ्यास या विषयात जिल्हास्तर तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

डॉ.जगन्नाथ दंदले
अधिव्याख्याता तथा नवोपक्रम समन्वयक
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव

डॉ.चंद्रकांत साळुंखे
अधिव्याख्याता तथा विभागप्रमुख
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव

डॉ.अनिल झोपे
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,जळगाव


शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगांव

शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३


प्रमाणपत्र

मा.श्री/श्रीमती. सिमा विठ्ठल पाटील जि. जळगांव यांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जळगांव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३ या स्पर्धेत १ली व २री भाषा या विषयात तालुकास्तर द्वितीय क्रमांक मिळाल्याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

श्री. चंद्रकांत चौधरी
शिक्षण विस्तार अधिकारी, पं.स.पारोळा

श्री. विश्वास पाटील
गटशिक्षणाधिकारी, पं.स., पारोळा

श्री. संजय मोरे
गट विकास अधिकारी, पं.स., पारोळा



६. विद्यार्थी बचत बँक: आर्थिक साक्षरतेचा पाया

विद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेसाठी तसेच संख्याज्ञानासाठी शाळेत बचत बँकेची निर्मिती केलेली आहे. विद्यार्थ्यांचे बचत कार्ड तयार केले गेले असून, प्रत्यक्ष बँकेच्या भेटीतून त्यांना व्यवहार व बँकिंग कामकाज कसे चालते हे भेटीदरम्यान लक्षात आणून दिले जाते. शाळेच्या युट्युब चॅनलवर यासंबंधीचे व्हिडिओ सुद्धा अपलोड केलेले आहेत. गणितातून व्यवहाराकडे ही संकल्पना यामुळे साकार होत आहे.

Link- https://youtu.be/90HweWqInHY?si=QoGPvoDorMPHX6Pz



देशदूत

हिवरखेडे खुर्द शाळेत झाली शालेय बचत बँकेची स्थापना

पारोळा । श. प्र.

तालुक्यातील हिवरखेडे खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'मुख्यमंत्री-माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी 'बँक ऑफ हिवरखेडे खुर्द' या नावाने बचत बँक ही संकल्पना राबविण्यात आली.

पैशाचा योग्य विनियोग व व्यवस्थापन यातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा या दृष्टीने ही बचत बँक स्थापन करण्यात आली आहे .यात प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नावे शाळेचे पासबुक तयार करण्यात आलेले असून सोबतच बँक व्यवहाराची खाते वही, (रोजकिर्द) देखील तयार करण्यात आलेली आहे.

कृष्णा पाटील, ज्ञानू भिल, जान्हवी पाटील, मोहित पावरा, खुशी कोळी, कुलदीप खैरनार हे विद्यार्थी शालेय बचत बँकेचे व्यवहार सांभाळतील. विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासून आर्थिक साक्षरता रुजविण्याच्या दृष्टीने पैशाचे नियोजन ,गुंतवणूक, बँकिंग व्यवहार, कर्ज व व्याज प्रणाली इत्यादी आर्थिक व्यवहाराबाबत तसेच यूपीआय सारख्या आधुनिक साधनांचा वापर करतांना घ्यावयाची काळजी जळगाव जिल्हा मध्यवर्ती बँके बोळे शाखेचे व्यवस्थापक सचिन पाटील यांनी विद्यार्थ्यांन मार्गदर्शन केले .

यावेळी विद्यार्थ्यांनी बोळे शाखेस भेट देऊन प्रत्यक्ष व्यवहाराचा अनुभव घेतला. शिपाई पंडित चौधरी यांनीही बँकिंग व्यवहार संदर्भात आवश्यक सूचना दिल्या. मुख्याध्यापिका सीमा पाटील, हर्षदा बोरसे ,रोशनकुमार जैन यांनी शाळेतील बचत बँकेबाबत तसेच बँकेतील नियमाविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

याकामी गटशिक्षणाधिकारी विश्वास पाटील, शालेय पोषण अधीक्षक सी.एम चौधरी ,केंद्रप्रमुख संजय चव्हाण, शाखा व्यवस्थापक सचिन पाटील, प्रमोद शिंदे शा.व्य.समिती अध्यक्ष प्रकाश भिल, उपाध्यक्ष भाऊराव खैरनार यांचे मार्गदर्शन व





७. विद्यार्थ्यांचे मंत्रिमंडळ: प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया :

शाळेत मतदान कक्ष उभारून, विद्यार्थ्यांना मतदान अधिकाऱ्यांची जबाबदारी देत निवडणूक प्रक्रिया राबवून मंत्रिमंडळ स्थापन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमता, नेतृत्वगुण आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होते. सोबतच निवडणूक प्रक्रिया कशाप्रकारे राबवली जाते याचा प्रत्यक्ष अनुभव येतो. विद्यार्थ्यांना मताधिकाराचे महत्त्व कळते. शालेय मंत्रिमंडळातील विद्यार्थी शाळेची कामे जबाबदारीने वाटून घेतात व पुढाकाराने कामेही करतात.






Link: https://youtu.be/wSu_F0Jb-j0?si=RgbgKiZKBsQLn3FC

८. परसबागेचं देणं: भाजीपाल्याचं लेणं

परसबाग उपक्रमात सातत्याने सहभाग घेत दोन वर्षापासून शाळा परसबाग उपक्रमात बक्षीसास पात्र ठरत आहे. विद्यार्थ्यांनी परसबागेत लावलेल्या भाजीपाल्याची माहिती सांगणारे उपक्रम घेतले जातात. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती होऊन परसबागेचे महत्त्व वाढवण्याचे काम परसबागेच्या माध्यमातून झालेले आहे. यासाठी शाळा स्तरावर विद्यार्थ्यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. परसबागेमुळे शरीर पोषणासाठी योग्य आहार, सकस आहार मिळावा म्हणून मुबलक भाजीपाला काढता येतो. शिवाय शाळेत होणाऱ्या पाककला स्पर्धेमध्ये शाळेने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावलेला आहे.

Link (https://youtu.be/XOL-2_4y5eY?si=-1yWHQfkVH7esOXg)

Link (https://youtu.be/T10hPq0UYTU?si=d-fv4aJdaeUohlEv)

Link (https://youtu.be/V2znkdTH8zE?si=cpviKb5UaDRca4H2)





शिक्षण विभाग, पंचायत समिती,पारोळा

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत...

परस बाग स्पर्धा

प्रमाणपत्र

~~श्री./श्री.~~/कु. ~~लताबाई~~ / ~~मंदाताई~~ / ~~मंदाकिनी~~ / ~~मालक~~

शाळेचे नांव जिल्हा परिषद शाळा हिवरखेडे बु॥ ता.पारोळा जि.जळगांव यांना प्रमाणित करण्यात येते की प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत तालुकास्तरीय परस बाग स्पर्धेत यांनी प्रथम / द्वितीय / तृतीय क्रमांक प्राप्त केलेला असून सदर उत्कृष्ट कार्याबद्दल प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे. पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !!!

(नी.एम.चौधरी) अधिक्षक,शालेय पोषण आहार

(व्ही.एच.पाटील) गटशिक्षणाधिकारी

(एस.टी.मोरे) गटविकास अधिकारी





देशदूत

पारोळा येथे प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत तालुकास्तरीय पाककला स्पर्धा

पारोळा । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत पंचायत समिती पारोळा येथे तालुकास्तरीय पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी तालुक्यातून सात केंद्रांमधील स्वयंपाकी, मदतनीस, पालक यांनी सहभाग नोंदविला. यात बाजरी, ज्वारी, नाचणी, साबा, कोदो, कुटकी, राजगिरा या पौष्टिक तृणधान्यांपासून विविध पदार्थ महिलांनी बनविलेले होते. तालुकास्तरावर प्रथम क्रमांक बोळे केंद्रातील किलाद परिषद शाळा हिवरखेडे खुर्द येथील चेतना सुदाम खैरनार, द्वितीय क्रमांक उंदीरखेडे केंद्रातील माध्यमिक विद्यालय मोहाडा पिंपी येथील अर्चना लक्ष्मण पाटील, तृतीय क्रमांक सिरसोदे केंद्र शाळेतील ललिता शामकांत पाटील यांना जाहीर झाला. बनविलेल्या पदार्थांमध्ये नाचणीचे खमन, नाचणीची बर्फी, राजगिऱ्याची बर्फी, नाचणीचे लाडू, बाजरीच्या पिठापासून बनवलेला आरोग्यवर्धक पौष्टिक काढा, नाचणीचा हलवा, ज्वारी बाजरीचे थालीपीठ, डोसे, कडधान्य पुलाव यांचा समावेश होता.

पाककला स्पर्धेचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी एस.पी.पवार हे होते तर परीक्षक म्हणून केंद्रप्रमुख भटू पाटील, किरण शिरसाठ, छाया महाजन छाया महाजन यांनी पदार्थांचे परिक्षण केले. शालेय पोषण आहार अधीक्षक सी एम चौधरी यांनी आपल्या प्रमुख मार्गदर्शनात तृणधान्यांचे महत्त्व विशद केले तसेच पौष्टिक तृणधान्यांपासून बनविलेले पदार्थ विद्यार्थ्यांचे आरोग्य निश्चितच चांगले राहतात असा विश्वास व्यक्त करून या स्पर्धेच्या निमित्ताने या पाककलेची देवाण-घेवाण होऊन जबाबदारीसाठी या स्पर्धा महत्त्वाच्या असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी मोहाडा पिंपी संस्था संचालक पंकज पाटील, सावखेडा होळ माध्यमिक विद्यालय मुख्याध्यापक देवरे सर, हिवरखेडे खुर्द मुख्याध्यापिका सीमा पाटील हे उपस्थित होते तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी नितेश निकम, सिद्धार्थ सरदार, सचिन खोडे, माया पाटील यांचे सहकार्य लाभले.



चाळीसगाव 14-09-2023

शैक्षणिक • प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राबवला उपक्रम

हिवरखेडे जि.प. शाळेत भरली पाककृती शाळा, पौष्टिक तृणधान्यापासून बनवले रुचकर पदार्थ

शहर प्रतिनिधी | पारोळा

राज्यामध्ये या शैक्षणिक वर्षापासून प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाची अंमलबजावणी करण्यात येत आहे, या अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरखेडे खुर्द शाळेत तृणधान्य जागरूकता म्हणून पाककृती स्पर्धा घेण्यात आली. यात महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन ज्वारी, बाजरी, नाचणी, राजगिरा, साबा, कुटकी, राळा, वरई, कोदो या पौष्टिक तृणधान्यांपासून विविधांगी चविष्ट व रुचकर पदार्थ बनविले. यात बिस्कीट, पराठे, खमन, खिचडी, आप्पे, बर्फी, गोडदिवे, डोसा इडली, थालीपीठ या पदार्थांचा समावेश होता. स्पर्धेत प्रथम क्रमांक चेतना सुदाम पाटील, द्वितीय क्रमांक मंगलबाई किशोर कोळी, तृतीय क्रमांक वैशाली मनोहर पाटील तर उत्तेजनार्थ चेतना ज्ञानेश्वर पाटील, लताबाई यशवंत पाटील यांची निवड करण्यात येऊन सर्व स्पर्धक महिलांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शा पो आ अधीक्षक सी एम चौधरी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले व पौष्टिक तृणधान्यांपासून बनविलेले पदार्थ हे आजच्या मॅगी, पिझ्झा, बर्गरच्या जगात असेप्यासाठी किती महत्त्वाचे आहेत याचे महत्त्व प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. यावेळेस शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रकाश भिल, प्रदीप सोनवणे, ग्यानीराम पाटील, रवींद्र पाटील, कपिकेश खैरनार, गावातील महिला उपस्थित होत्या. यासाठी ग गि अ संजीव पवार, शापोआ अधीक्षक सी एम चौधरी, शिक्षण विस्तार अधिकारी विश्वास पाटील, केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वितेसाठी मुख्याध्यापक सीमा पाटील, रोशन कुमार जैन, हर्षदा बोरसे यांनी परिश्रम घेतले.

देशदूत

तृणधान्यांपासून बनविलेले पदार्थच बालकांच्या पोषणासाठी महत्त्वाचे- सी.एम.चौधरी

पारोळा । प्रतिनिधी



राज्यामध्ये या शैक्षणिक वर्षापासून प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाची अंमलबजावणी करण्यात येत आहे या अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरखेडे खुर्द शाळेत सकस बालक सशक्त भारत या हेतूने पाककृती स्पर्धा घेण्यात आली. यात महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन ज्वारी, बाजरी, नाचणी, राजगिरा, साबा, कुटकी, राळा, वरई, कोदो या पौष्टिक तृणधान्यांपासून विविधांगी चविष्ट व रुचकर पदार्थ बनविले. यांत बिस्कीट, पराठे, खमन, खिचडी, आप्पे, बर्फी, गोडदिवे, डोसा इडली, थालीपीठ या पदार्थांचा समावेश होता. पदार्थांची मांडणी अतिशय सुबक पद्धतीने महिलांनी केलेली होती. स्पर्धेत प्रथम क्रमांक चेतना सुदाम पाटील, द्वितीय क्रमांक मंगलबाई किशोर कोळी, तृतीय क्रमांक वैशाली मनोहर पाटील तर उत्तेजनार्थ चेतना ज्ञानेश्वर पाटील, लताबाई यशवंत पाटील यांची निवड करण्यात येऊन सर्व स्पर्धक महिलांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शा पो आ अधीक्षक सी एम चौधरी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले व पौष्टिक तृणधान्यांपासून बनविलेले पदार्थ हे आजच्या मॅगी, पिझ्झा, बर्गरच्या जगात असेप्यासाठी किती महत्त्वाचे आहेत याचे महत्त्व प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. यावेळेस शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रकाश भिल, प्रदीप सोनवणे, ग्यानीराम पाटील, रवींद्र पाटील, कपिकेश खैरनार, गावातील महिला उपस्थित होत्या. यासाठी ग गि अ संजीव पवार, शापोआ अधीक्षक सी एम चौधरी, शिक्षण विस्तार अधिकारी विश्वास पाटील, केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वितेसाठी मुख्याध्यापक सीमा पाटील, रोशन कुमार जैन, हर्षदा बोरसे यांनी परिश्रम घेतले.





९. माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम:

या उपक्रमांतर्गत शालेय परिसरात व शालेय संरक्षक भिंतीवर विधायक बाबींची, मूल्यांची व अभ्यासाची माहिती पूर्ण पेंटिंग केलेली आहे. वारली पेंटिंग, महावाचन, चित्रकाम, प्लास्टिक मुक्ती अभियान, स्वच्छता दूत, व्यसनमुक्ती अभियान, कंपोस्ट खत निर्मिती, खरकटे अन्नाचा योग्य विनियोग, कौशल्याधारित उपक्रमांवर चर्चासत्र, लोकसहभागातून शाळा विकास, माजी विद्यार्थी मंच, इको क्लबची स्थापना इत्यादींवर आधारित जागृतीपर पेंटिंग केलेली आहे. शासन निर्णयानुसार सर्वंकष बाबींची पूर्तता करून 'माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमात शाळेला तालुकास्तरावर सलग दोन वर्ष द्वितीय क्रमांक प्राप्त झालेला आहे. या उपक्रमामुळे महत्त्वाची गोष्ट म्हणजे शाळेचे अंतरंग बाह्यरंग तर बदललेच पण त्याचसोबत विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमतांचा विकास होण्यास निश्चितच मदत झालेली आहे. शालेय परिसरात विद्यार्थ्यांच्या, ग्रामस्थांच्या व सहकाऱ्यांच्या मदतीने विविध शोभिवंत फुलझाडे, रोपे, वृक्ष लावलेली आहेत. यामुळे शाळेच्या सौंदर्यात भर पडली व पर्यावरण संवर्धनाचे मूल्यही विद्यार्थ्यांमध्ये विकसित करता आले.







एरंडोल पारोळा विधानसभा आमदार मा.आबासो चिमणरावजी पाटील यांची शाळेला भेट

शिल्पकार विकासाचा...

देशदूत

जळगाव आवृत्ती

epaper.deshdoot.com

15 Sep 2024 - 4-A



हिवरखेडे खुर्द शाळेस मंत्री अनिल पाटील यांची अचानक भेट

पारोळा । श. प्र.

मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील यांनी जिल्हा परिषद शाळा हिवरखेडे खुर्द येथे अचानक भेट देऊन शाळेची पाहणी केली. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत शाळेच्या कामकाजाबाबत व विविध उपक्रमांबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली. यावेळी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत शालेय स्तरावर राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे, कागदपत्रांचे त्यांनी अवलोकन केले. शालेय कामकाज अतिशय चांगल्या प्रकारे चालू असून शाळा प्रगतीपथावर असल्याचे सांगत शाळेबद्दल गौरवोद्गार काढले. तसेच शाळेचे अंतरंग व बाह्यरंग खूप आकर्षक असून शाळा विकासात लोकसहभाग चांगला मिळत असल्याबद्दल त्यांनी गावकऱ्यांची व शिक्षकांची प्रशंसा केली. यावेळी.मुख्याध्यापिका सीमा पाटील, शिक्षिका हर्षदा बोरसे, शिक्षक रोशनकुमार जैन व बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

मदत, पुनर्वसन मंत्र्यांनी दिली हिवरखेडे शाळेला अचानक भेट



पारोळा : मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील यांनी हिवरखेडे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेला अचानक भेट देऊन शाळेची पाहणी केली. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत शाळेच्या कामकाजाबाबत व विविध उपक्रमांबाबत त्यांनी या वेळी माहिती जाणून घेतली. या वेळी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत शालेय स्तरावर राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे, कागदपत्रांचे त्यांनी अवलोकन केले. शालेय वातावरण व कामकाज पाहता शाळा प्रगतीपथावर असल्याचे गौरवोद्गार मंत्री अनिल पाटील यांनी या वेळी काढले. शाळेचे अंतरंग व बाह्यरंग आकर्षक असून शाळा विकासात लोकसहभाग चांगला मिळत असल्याबद्दल त्यांनी ग्रामस्थांसह शिक्षकांची प्रशंसा केली. या वेळी मुख्याध्यापिका सीमा पाटील, शिक्षिका हर्षदा बोरसे, शिक्षक रोशनकुमार जैन व बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

तरुण भारत

16 Sep 2024 - Page 11

epaper.tarunbharatlive.com

हिवरखेडे खुर्द शाळेला मंत्री अनिल पाटलांची अचानक भेट

तभा वृत्तसेवा

पारोळा, १५ सप्टेंबर



मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी जिल्हा परिषद शाळा हिवरखेडे खुर्द (ता.पारोळा) येथे अचानक भेट देऊन शाळेची पाहणी केली.

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमांतर्गत शाळेच्या कामकाजाबाबत व विविध उपक्रमांबाबत त्यांनी माहिती घेतली. यावेळी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमांतर्गत शालेय स्तरावर राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे, कागदपत्रांचे त्यांनी अवलोकन केले. शालेय वातावरण व कामकाज पाहता शाळा प्रगतीपथावर असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.

शाळेचे अंतरंग व बाह्यरंग आकर्षक असून शाळा विकासात लोकसहभाग चांगला मिळत असल्याबद्दल त्यांनी गावकऱ्यांची व शिक्षकांची प्रशंसा केली.

यावेळी मुख्याध्यापिका सीमा पाटील, शिक्षिका हर्षदा बोरसे, शिक्षक रोशनकुमार जैन व ग्रामस्थ उपस्थित होते.

सकाळ



हिवरखेडे खुर्द (ता. पारोळा) : शाळेला दिलेल्या भेटीप्रसंगी मंत्री अनिल पाटील, मुख्याध्यापिका सीमा पाटील, हर्षदा बोरसे, रोशनकुमार जैन आदी.

पुनर्वसनमंत्री अनिल पाटील यांची हिवरखेडे खुर्द शाळेला भेट

पारोळा, ता. १४ : राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील यांनी हिवरखेडे खुर्द (ता. पारोळा) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला नुकतीच भेट देऊन शाळेची पाहणी केली. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत मंत्रिमहोदयांनी शाळेच्या कामकाजाबाबत माहिती जाणून घेतली. शाळेतील विविध विविध उपक्रमांची माहिती घेऊन कागदपत्रांचे त्यांनी अवलोकन केले. शालेय वातावरण व कामकाज पाहता, शाळा प्रगतीपथावर असल्याचे गौरवोद्गार काढले. शाळेचे अंतरंग व बाह्यरंग आकर्षक असून शाळा विकासात लोकसहभाग चांगला मिळत असल्याबद्दल त्यांनी ग्रामस्थांसह शिक्षकांचेही कौतुक केले. यावेळी मुख्याध्यापिका सीमा पाटील, शिक्षिका हर्षदा बोरसे, शिक्षक रोशनकुमार जैन व ग्रामस्थ उपस्थित होते.

Jalgaon, Jalgaon-Today
15/09/2024 Page No. 2

१०. कब आणि बुलबुल उपक्रम: शिस्त व नेतृत्वाचा संगम

शाळेने स्काऊट व गाईड मध्ये विशेष प्रगती केली आहे. मुख्याध्यापिका श्रीमती.सीमा विठ्ठल पाटील या फ्लॉक लीडर म्हणून काम पाहतात. पंचमढी येथे जाऊन ऍडव्हान्स ट्रेनिंग त्यांनी घेतलेले विद्यार्थ्यांबरोबरच जळगाव, धुळे, दोंडाईचा या ठिकाणी महिला शिक्षिकांना प्रशिक्षित करण्याचे काम त्यांनी केलेले आहे. सहा विद्यार्थिनींना राज्यस्तरीय हीरक पंख पुरस्कार देखील प्राप्त झाला ही जमेची बाजू जिल्ह्यातील इतर शाळांसाठीही प्रेरणादायक

बाब ठरली आहे. शाळेने विविध स्पर्धांमध्ये अनेक पारितोषिके मिळवली आहेत. जिल्हास्तरीय स्काऊट गाईड मेळाव्यात जिल्हाभरातून प्रथम क्रमांकाचे सर्वात जास्त बक्षीस मिळवणारी शाळा म्हणून हिवरखेडे खुर्द शाळेचा नावलौकिक झालेला आहे. नेतृत्व व शिस्त याबरोबरच मूलभूत क्षमतांच्या विकासासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरलेला आहे.














आयोजक - डॉ. किरण कुंवर मॅडम शिक्षणाधिकारी प्राथ.धुळे / मुख्याआयुक्त.


मार्गदर्शक -०१) श्री जीवन मटके.लिडर ट्रेनर,ठाणे
०२) श्री वसंत माने,डी.टी.सी.सांगली (सातारा)
०३) श्री जितेंद्र आव्हाड जि.प.शाळा,अमळगे
०४) श्री चैत्राम निकम जिल्हा प्र.आयुक्त स्काऊट
०५) श्री जयवंत असोले जिल्हा संघटक
०६) श्री ज्ञानेश्वर सावंत एल.टी.



फ्लॉक लिडर प्राथमिक प्रशिक्षण शिबीर

दिनांक-०६ मार्च २०२५ ते १२ मार्च २०२५

शिबीर प्रमुख - ०१ श्रीमती रंजना शिंदे (LT) ०२ श्रीमती संगिता रामटेके (ALT)
जिल्हा संघटक गाईड - श्रीमती हेमा रा. वानखेडे (ALT)
शिबीर सहाय्यक - ०१-श्रीमती सुनिता मोळे (ALT) ०२-सिमा पाटील (प्रगत)



आयोजक - डॉ. किरण कुंवर मॅडम शिक्षणाधिकारी प्राथ.धुळे / मुख्याआयुक्त.

मार्गदर्शक -०१) श्रीमती रंजना शिंदे लिडर ट्रेनर
०२) श्रीमती सिमा पाटील सहाय्यक
०३) श्रीमती संगीता पाटील
०४) श्रीमती लता मासरे केंद्र प्रमुख नंदुरबार
०५) श्री जयवंत असोले जिल्हा संघटक
०६) श्री चैत्राम निकम जिल्हा प्र.आयुक्त



सकाळ

हिवरखेडे, दळवेल शाळेतील विद्यार्थ्यांचे यश

जिल्हास्तरीय स्काउट, गाइड मेळाव्यात विविध स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी

सकाळ वृत्तसेवा

पारोळा, ता. २५ : तालुक्यातील दळवेल व हिवरखेडे खुर्द या शाळेतील विद्यार्थ्यांनी स्काऊट गाईडच्या जिल्हास्तरीय कब-बुलबुल मेळाव्यात विविध स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करीत मोठे यश मिळविले आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक) व भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय यांच्यातर्फे वावडदे (ता.जळगाव) येथे दोन दिवसीय मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या मेळाव्यात अनेकविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, वासारखे उपक्रम घेण्यात आले.

यात हिवरखेडे खुर्द शाळेतील विद्यार्थ्यांच्या कब-बुलबुल दोन्ही गटांना सामूहिक नृत्यासाठी (प्रथम) तर गोणपाट स्पर्धेत-रितेश बरडे (प्रथम) लिंबू चमचा स्पर्धेत मोहित पावरा (प्रथम) गोणपाट स्पर्धेत जान्हवी पाटील (उत्तेजनार्थ) क्राफ्ट स्पर्धेत खुशी कोळी (उत्तेजनार्थ) तसेच दळवेल शाळेतील विद्यार्थ्यांच्या समूह



वावडदे (ता. जळगाव) : हिवरखेडे खुर्द व दळवेल शाळेतील यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांसोबत मान्यवर.

नृत्यास द्वितीय, विद्यार्थिनींच्या समूह नाटिकेस द्वितीय, चित्रकला स्पर्धेत तुषार साळवे (प्रथम), गोणपाट स्पर्धेत चेतना गिरासे (उत्तेजनार्थ), पवन बेलदार (उत्तेजनार्थ), अशी मोलाची कामगिरी बजावत दोन्ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी जिल्ह्यातून सर्वाधिक पारितोषिके मिळवित तालुक्याचा ठसा उमटविला आहे. या मेळाव्यासाठी जिल्ह्यातील पन्नास शाळा व साडेचारशेच्या आसपास विद्यार्थी सहभागी झाले होते.

प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, भारत स्काऊट गाईड अध्यक्ष संजय गरुड, नीळकंठ गायकवाड, यशवंत ठोसरे, जे. के. पाटील, गटशिक्षणाधिकारी पाचोरा समाधान पाटील, एल. एच. फाउंडेशनचे वीरेंद्र पाटील, प्राचार्य जयश्री पाटील, प्रशिक्षण आयुक्त बी. व्ही. पवार, सचिव सरला पाटील, सहसचिव डी. एस. सोनवणे, जिल्हा सचिव संजय बेलोरकर, संघटक हेमा वानखेडे, किशोर पाटील, आरोग्य अधिकारी नीलेश अग्रवाल, सुजिता साळुंखे, यू. यू. पाटील यांची मेळाव्यासाठी उपस्थिती लाभली.

दळवेल शाळेचे शिक्षक प्रेमचंद अहिरराव, हिवरखेडे खुर्द शाळेच्या शिक्षिका सीमा पाटील यांनी फ्लॉक लीडरची जबाबदारी पार पाडत विशेष परिश्रम घेतले. वैशाली पाटील, अश्विनी कोळी यांचीही या कामी पालक म्हणून साथ लाभली.

एस. पी. पवार (गटशिक्षणाधिकारी पारोळा), सी. एम. चौधरी (शापोआ अधीक्षक), व्ही. एच. पाटील (शिक्षण विस्तार अधिकारी), केंद्रप्रमुख संजय चव्हाण, करणा देवकर यांच्यासह सर्व केंद्रप्रमुख, सतीश धोबी (मुख्याध्यापक दळवेल) यांनी तसेच दळवेल व हिवरखेडे गावातील ग्रामस्थांनी समाधान केले. रत्ना बागूल, सुनीता भोळे, प्रतिभा खडके, रवींद्र कोळी, एस. एस. भोई, स्वाती खडके, जी. आर. भावसार, सी. एस. पाटील, आर. सी. गोसावी, सीमा माळदकर यांनी नियोजन व परीक्षण यासाठी परिश्रम घेतले.

Jalgaon, JalgaonDist-Today
26/12/2023 Page No. 2

दिव्य मराठी

चाळीसगाव 27-12-2023

शिबिर • विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरीबद्दल पारोळा तालुक्यातील शाळांचा झाला गौरव

स्काऊट-गाइडच्या जिल्हास्तरीय मेळाव्यात विद्यार्थ्यांना मिळाले स्वयंशिस्त, देशभक्ती, स्वावलंबनाची अन् समाजकार्याची प्रेरणा

शहर प्रतिनिधी | पारोळा

जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक) व भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय यांच्या वतीने वावडदे येथे दोन दिवसीय मेळावा झाला. यामध्ये विद्यार्थ्यांनी तिरंगीचे, देशभक्तीचे, स्वावलंबनाचे व समाजसेवेचे धडे मिळाले. तालुक्यातील दळवेल व हिवरखेडे खुर्द या शाळेतील विद्यार्थ्यांनी स्काऊट गाईडच्या जिल्हास्तरीय कब-बुलबुल मेळाव्यात विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. तर गोणपाट स्पर्धेत-रितेश बरडे (प्रथम) लिंबू चमचा स्पर्धेत मोहित पावरा (प्रथम) गोणपाट स्पर्धेत जान्हवी पाटील (उत्तेजनार्थ) क्राफ्ट स्पर्धेत खुशी कोळी (उत्तेजनार्थ) तसेच दळवेल शाळेतील विद्यार्थ्यांच्या समूह नृत्यास द्वितीय, विद्यार्थिनींच्या समूह नाटिकेस द्वितीय, चित्रकला स्पर्धेत तुषार साळवे (प्रथम) गोणपाट स्पर्धेत चेतना गिरासे (उत्तेजनार्थ) पवन बेलदार (उत्तेजनार्थ) पारितोषिक मिळाले. या मेळाव्यात जिल्ह्यातील ५० शाळा व ४५० विद्यार्थी सहभागी झाले होते. प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, स्काऊट-गाईड अध्यक्ष संजय गरुड, नीळकंठ गायकवाड, यशवंतराव ठोसरे, जे.के. पाटील, गटशिक्षणाधिकारी समाधान पाटील, एल.एच. फाउंडेशनचे वीरेंद्र पाटील, प्राचार्या जयश्री पाटील, प्रशिक्षण आयुक्त बी.व्ही. पवार, सचिव सरला पाटील आदी उपस्थित होते.



स्काऊटच्या मेळाव्यात पारोळा तालुक्यातील शाळांचा गौरव झाला.

विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

या मेळाव्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना आपत्कालीन मदतीसाठी उपाययोजनांचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच वेरी आणि काहीच्या साहाय्याने लेंडू उचलणे, विविध गाठींचे प्रकार, अग्निशमनाच्या वेळेस जखमींवर करण्यात येणारे प्राथमिक उपचार, तसेच कराटेकारे मार्शलकार्य करता येईल, याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.






स्काऊट-गाईड मेळाव्यात यश संपादन केलेले हिवरखेडे खुर्द व दळवेल शाळेतील विद्यार्थी. (छाया : भूपेंद्र माठे)

स्काऊट गाईड मेळाव्यात विद्यार्थ्यांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळा : दळवेल व हिवरखेडे खुर्द या शाळेतील विद्यार्थ्यांनी स्काऊट गाईडच्या जिल्हास्तरीय कब-बुलबुल मेळाव्यात विविध स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करीत यश मिळविले.

जि. प. व भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय जळगाव यांच्या वतीने दादडे (ता. जळगाव) येथे दोन दिवसीय शिबिर नुकतेच झाले. या मेळाव्यात विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम झाले.

या मेळाव्यासाठी जिल्ह्यातील ५० शाळा व सुमारे ४५० विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमांना शिक्षणाधिकारी विकास पाटील, भारत स्काऊट गाईड अध्यक्ष संजय गरुड, नीळकंठ गायकवाड, यशवंतराव ठोसरे, जे. के. पाटील, गटशिक्षणाधिकारी समाधान पाटील, वीरेंद्र पाटील, प्राचार्या जयश्री पाटील, बी.व्ही. पवार, सचिव सरला पाटील, सहसचिव डी. एस. सोनवणे, संजय बेलोरकर, संघटक हेमा वानखेडे, किशोर पाटील, आरोग्य अधिकारी नीलेश अग्रवाल, सुजिता सालुंखे, यू. यू. पाटील आदी उपस्थित होते.

मेळाव्यात आयोजित विविध स्पर्धांचा निकाल

यात हिवरखेडे खुर्द शाळेतील विद्यार्थ्यांच्या कब-बुलबुल टोळी गटांना सामूहिक नृत्यासाठी (प्रथम) तर गोणपाट स्पर्धेत-रितेश बरडे (प्रथम), लिंबू चमचा स्पर्धेत मोहित पावरा (प्रथम), गोणपाट स्पर्धेत जान्हवी पाटील (उत्तेजनार्थ), क्राफ्ट स्पर्धेत खुशी कोळी (उत्तेजनार्थ), तर दळवेल शाळेतील विद्यार्थ्यांच्या समूह नृत्यास द्वितीय, विद्यार्थिनींच्या समूह नाटिकेस द्वितीय, चित्रकला स्पर्धेत तुषार साळवे (प्रथम), गोणपाट स्पर्धेत चेतना गिरासे (उत्तेजनार्थ), पवन बेलदार (उत्तेजनार्थ) यांनी यश मिळवले.

दळवेलचे शिक्षक प्रेमचंद अहिरराव, हिवरखेडे खुर्द शिक्षिका सीमा पाटील यांनी परिश्रम घेतले. वैशाली पाटील, अश्विनी कोळी यांचीही याकामी पालक म्हणून साथ लाभली.

गटशिक्षणाधिकारी एस. पी. पवार, शालेय पोषण आहार अधीक्षक सी. एम. चौधरी, शिक्षण विस्तार अधिकारी व्ही. एच. पाटील, केंद्रप्रमुख संजय चव्हाण, करुणा देवकर, सतीश धोबी यांनी तसेच दळवेल व हिवरखेडे गावातील ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. परीक्षण रत्ना बागूल, सुनीता भोळे, प्रतीभा खडके, रवींद्र कोळी, एस. एस. भोई, स्वाती खडके, जी. आर. भावसार, सी. एस. पाटील, आर. सी. गोसावी, सीमा माळदकर यांनी केले.

पुण्य नगरी

जिल्हास्तरीय मेळाव्यात हिवरखेडे, दळवेल शाळेतील विद्यार्थ्यांचे यश



पारोळा : तालुक्यातील दळवेल व हिवरखेडे खुर्द या शाळेतील विद्यार्थ्यांनी स्काऊट गाईड्स जिल्हास्तरीय कब-बुलबुल मेळाव्यात विविध स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करीत यश मिळविले.

जिला परिषदेचा शिक्षण विभाग व भारत स्काऊट गाईड्स जिल्हा कार्यालयाचा वतीने वावडदे येथे २ दिवसीय मेळावा झाला, या मेळाव्यात अनेक स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यामध्ये उपक्रम घेण्यात आले. यात हिवरखेडे खुर्द शाळेतील विद्यार्थ्यांच्या कब-बुलबुल टोळी गटांना सामूहिक नृत्यासाठी प्रथम तर गोणपाट स्पर्धेत रितेश बरडे (प्रथम), लिंबू चमचा स्पर्धेत मोहित पावरा (प्रथम), गोणपाट स्पर्धेत जान्हवी पाटील (उत्तेजनार्थ), क्राफ्ट स्पर्धेत खुशी कोळी (उत्तेजनार्थ) यांनी यश मिळवले. तसेच दळवेल शाळेतील विद्यार्थ्यांच्या समूह नृत्यास द्वितीय, विद्यार्थिनींच्या समूह नाटिकेस द्वितीय, चित्रकला स्पर्धेत तुषार साळवे (प्रथम), गोणपाट स्पर्धेत चेतना गिरासे (उत्तेजनार्थ), पवन बेलदार (उत्तेजनार्थ) अशी कामगिरी करत दोन्ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी जिल्ह्यातून सर्वाधिक पारितोषिके मिळवले आहेत. या मेळाव्यास जिल्ह्यातील ५० शाळा व ४५०च्या आसपास विद्यार्थी सहभागी झाले होते. मेळाव्यास शिक्षणाधिकारी विकास पाटील, संजय सरड, नीळकंठ गायकवाड, यशवंतराव ठोसरे, जे. के. पाटील, समाधान पाटील, एल. एच. पाटोदेकर, संघटक हेमा वानखेडे, किशोर पाटील, आरोग्य अधिकारी नीलेश अग्रवाल, सुजिता सालुंखे, यू. यू. पाटील, प्राचार्या जयश्री पाटील, प्रतिभा अशोक बी.व्ही. पवार, सचिव सरला पाटील, सहाय्यिका डी. एस. सोनवणे, किशोर पाटील, सहाय्यिका बेलोरकर, संघटक हेमा वानखेडे, किशोर पाटील, आरोग्य अधिकारी नीलेश अग्रवाल, सुजिता सालुंखे, यू. यू. पाटील यांची उपस्थिती लाभली. दळवेलचे शिक्षक प्रेमचंद अहिरराव, हिवरखेडे खुर्द शाळेच्या शिक्षिका सीमा पाटील यांनी पर्यंत लीडरची जबाबदारी पार पाडली. वैशाली पाटील, अश्विनी कोळी यांचे सहकार्य लाभले. यावेळी गटशिक्षणाधिकारी एस. पी. पवार, सी. एम. चौधरी, व्ही. एच. पाटील, केंद्रप्रमुख संजय चव्हाण, करुणा देवकर, सतीश धोबी यांनी दळवेल व हिवरखेडे ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. रत्ना बागूल, सुनीता भोळे, प्रतिभा खडके, रवींद्र कोळी, एस. एस. भोई, स्वाती खडके, जी. आर. भावसार, सी. एस. पाटील, आर. सी. गोसावी, सीमा माळदकर यांनी परिक्षणासाठी सहकार्य केले.

दैनिक महाराष्ट्र सारथी

शोषित, पीडित, दलित, वंचितांचा मुलनिवासी आवाज

जि.प.शाळेत हीरक पंख राज्य पुरस्कार स्काऊट सहा विद्यार्थ्यांनी यशस्वी



दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा
जळगाव । प्रतिनिधी :

पारोळा तालुक्यातील हिवरखेडे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा पाटील यांच्या स्वयं पुढाकाराने स्काऊटच्या राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या सहा विद्यार्थिनींनी यश मिळवले आहेत राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेसाठी विद्यार्थिनींना प्रेरित केल्याबद्दल मा.आमदार आबा साहेब चिमणराव पाटील व सेवा निवृत्त शिक्षक स्काऊट मास्तर मुरलीधर मिस्तरी.. महात्मा गांधी स्काऊट पथक प्रमुख गिरीष रमणलाल भावसार जळगाव डॉ. विजय पाटीलसर .मा.मुख्याध्यापक पी.बी.पाटील सर व पालक व ग्रामस्थ यांनी पुरस्कार प्राप्त बुलबुल (मुलीचं) हार्दिक अभिनंदन व कौतुक केले.

आमदार अमोल चिमणराव पाटील (एरंडोल - पारोळा)मा.नगर अध्यक्षा ताईसाहेब नलिनी पाटील. मृणाल अमोल पाटील.कार्यकरत्या.इतर मंडळी यांनी मार्गदर्शन केलं व अभिनंदन केले आह. मा.स्काऊटस्/गाईड राज्य प्रशिक्षण आयुक्त श्री.बी.व्ही.पवार सर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी चे सीमा पाटील (मार्गदर्शक) यांचे कौतुक व अभिनंदन केले.

पुढील भावी काळात असेच घवघवीत यश मिळो हीच शुभेच्छा दिल्या आहेत..जळगाव जिल्हा भारत स्काऊट गाईड संस्थेने व ग्रामस्थांनी मुख्याध्यापिका सीमा पाटील व पात्र विद्यार्थिनी यांचे अभिनंदन केले आहे सन २०२४ २५ या शैक्षणिक वर्षातील बुलबुल पथकाचे राज्यस्तरीय शिबिर दोंडाईचा जिल्हा धुळे येथे २५ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी दरम्यान घेण्यात आले राज्यस्तरीय हीरक पंख व चतुर्थ चरण चाचणी शिबिर परीक्षेत ८९ कब आणि ५७ बुलबुल उपस्थित होते जळगाव जिल्ह्यातून प्रथमच पारोळा तालुक्यातील हिवरखेडे खुर्द येथील मुख्याध्यापिका सीमा पाटील यांनी फ्लॉक लीडरची जबाबदारी यशस्वीपणे निभावून सहभाग नोंदविला हे विशेष यशस्वी विद्यार्थिनी पुढील प्रमाणे उन्नती पाटील मयुरी पाटील अंजाडावर यामिनी पाटील वजस्वी पाटील राजलक्ष्मी खंदळे या सहा विद्यार्थिनींना मुख्याध्यापिका सीमा पाटील यांनी राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेसाठी बसविले होते.

जळगाव जिल्ह्यातून प्रथमच जिल्हा परिषद शाळेतील मुली या ठिकाणी राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेसाठी पोहोचल्या याचे गौरोदगार शिबिर प्रमुखांनी यावेळी काढले या कामी शिक्षणाधिकारी विकास पाटील डायटचे प्राचार्य अनिल झोपे गटशिक्षण अधिकारी विश्वास पाटील शालेय पोषण आहार अधीक्षक चंद्रकांत चौधरी केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांनी स्काऊट गाईड विभागात हिवरखेडे खुर्द शाळेने केलेल्या या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले जळगाव जिल्हा भारत स्काऊट गाईड संघटनेच्या प्रमुख संघटक हेमा वानखेडे यांचे मार्गदर्शन मिळालेलेडॉ. विजय पाटील गिरीष रमणलाल भावसार जळगाव यानिविशेष सहकार्य केले.

14 Mar 2025 - Page 4

११. परिसर भेट व कुटुंब संवाद:

परिसर भेटीमुळे विद्यार्थ्यांना परिसरातील विविध वनस्पतींची, पिकांची व व्यवसायाची माहिती मिळते. सोबतच सामाजिक व पर्यावरण विषयी जाणीव जागृती निर्माण होते. परिसर भेटी अंतर्गत मध्यप्रदेशातून स्थलांतरित झालेल्या मजूर कुटुंबातील मुलांना शाळेत प्रवेश देण्यात आला. याच पद्धतीने आपल्या गावात कुणीही विद्यार्थी शाळाबाह्य राहणार नाही हेही क्षेत्रभेटीच्या निमित्ताने लक्षात येते. पावरा कुटुंबाला प्रत्यक्ष भेट देऊन, संवाद साधल्यामुळे त्या कुटुंबातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली. सद्यस्थितीत ते सर्व विद्यार्थी दररोज शाळेत उपस्थित राहतात व अभ्यासातही त्यांची विशेष प्रगती दिसून येत आहे.













१२. सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन: उपस्थिती वाढीचा यशस्वी प्रयत्न

यापूर्वी शाळेत वरचेवर गैरहजर असणारे व अनियमित असणारे विद्यार्थी आज शंभर टक्के उपस्थित राहतात. शाळेच्या सृजनशील उपक्रमांमुळे, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे मुलांना शाळेविषयी, शिक्षणाविषयी गोडी निर्माण होऊन शाळेबद्दल जवळीकता निर्माण झाली आहे. मुख्याध्यापिका सीमा पाटील, सहकारी रोशनकुमार जैन, हर्षदा बोरसे, मुख्यमंत्री युवा कौशल्य अंतर्गत आलेले शिक्षक महेंद्र कोळी सर्वांच्या मेहनतीमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड निर्माण होऊन मुलभूत क्षमतांचा चांगला विकास झाला आहे.











१३. स्पर्धा परीक्षेचे केंद्र: हिवरखेडे खुर्द शाळा

गेल्या पाच वर्षांमध्ये विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी यश मिळविलेले आहे. शाळेतील शिक्षक यासाठी अध्ययन अध्यापनाचे योग्य ते नियोजन करतात. आतापर्यंत शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये एकोणीस विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केलेले आहे. तसेच गेल्या दोन वर्षापासून नवोदय परीक्षेमध्ये यश मिळवीत नवोदय विद्यालयात दोन विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळविलेला आहे.

प्रवेशोत्सव • नावीन्यपूर्ण उपक्रम प्रयोगशाळा म्हणजे हिवरखेडे खुर्द शाळा - विजय भामरे

जि.प.शाळेचा शैक्षणिक सोहळा साजरा

पारोळा, (वा.) शिक्षकांच्या अंगी शाळेविषयी, गावाविषयी व विद्यार्थ्याविषयी तळमळ असेल, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची उर्मी असेल तर त्या शाळेचे नावलौकिक नक्कीच वाढते. याचा प्रत्यय जिल्हा परिषद शाळा हिवरखेडे खुर्द शाळेकडे पाहून सर्वांनाच येत आहे. ही शाळा म्हणजे नाविन्यपूर्ण उपक्रमांची प्रयोगशाळाच आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही, असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी विजय भामरे यांनी केले.

हिवरखेडे खुर्द जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरावा असा शैक्षणिक सोहळा नुकताच त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. इयत्ता पहिली प्रवेशित बालकांचा शैक्षणिक साहित्य देऊन प्रवेशोत्सव साजरा करणे, २०१९ ते २०२५ या कालावधीत शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेसाठी पात्र चौदा विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार करणे, इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना फोटो फ्रेम देऊन निरोप देणे, शालेय उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करणे, असा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



एकाच व्यासपीठावरून विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन

विद्यार्थ्यासाठी एकाच व्यासपीठावरून अनेकवरे विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल शिक्षण विस्तार अधिकारी भामरे यांनी शिक्षकांविषयी व ग्रामस्थांविषयी गौरवोद्गार काढले. हिवरखेडे खुर्द शालेचे कार्य अनुकरणीय व प्रशंसनीय असून मुख्याध्यापिका सीमा पाटील यांच्या कार्यकालात या शालेने प्रत्येक उपक्रमात सहभाग नोंदवून आपला ठसा उमटवला आहे. सहकारी शिक्षक, ग्रामस्थ यांचे सहकार्य व अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळत असल्याने शालेचा सर्वांगीण विकास साधला असे मत केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांनी व्यक्त केले. यावेळी सेवानिवृत्त आदर्श शिक्षक मुरलीधर मिस्तरी व बोळे येथील भाईदास निकम यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक हर्षदा बोरसे यांनी तर सूत्रसंचालन मुख्याध्यापिका सीमा पाटील यांनी केले.आभार मनीषा पाटील यांनी मानले.

देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
04 May 2025 - 4-A

नावीन्यपूर्ण उपक्रमांची प्रयोगशाळा जि.प.हिवरखेडे खुर्द शाळा - विजय भामरे

पारोळा। प्रतिनिधी

शिक्षकांच्या अंगी शाळेविषयी, गावाविषयी व विद्यार्थ्याविषयी तळमळ असेल, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची उर्मी असेल तर त्या शालेचे नक्कीच नावलौकिक होते याचा प्रत्यय जिल्हा परिषद शाळा हिवरखेडे खुर्द शाळेकडे पाहून सर्वांनाच येत आहे असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी विजय भामरे यांनी हिवरखेडे खुर्द येथे केले. हिवरखेडे खुर्द जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यासाठी संस्मरणीय ठरावा असा शैक्षणिक सोहळा नुकताच त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला त्यावेळी ते बोलत होते. इयत्ता पहिली प्रवेशित बालकांचा शैक्षणिक साहित्य देऊन प्रवेशोत्सव साजरा करणे, २०१९ ते २०२५ या कालावधीत शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेसाठी पात्र चौदा विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार करणे, इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना फोटो फ्रेम देऊन निरोप देणे, शालेय उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करणे, असा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर शा.व्य. समिती अध्यक्ष प्रकाश भील, सुरेखा पाटील, शितल भील, अर्चना पाटील, ग्यानीराम पाटील, समाधान पाटील, ज्ञानेश्वर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक हर्षदा बोरसे यांनी तर सूत्रसंचालन मुख्याध्यापिका सीमा पाटील व आभार मनीषा पाटील यांनी मानले.

शिक्षण विस्तार अधिकारी विजय भामरे यांनी शिक्षकांविषयी व ग्रामस्थांविषयी गौरवोद्गारही काढले.

हिवरखेडे खुर्द शालेचे कार्य तालुक्यासाठी व जिल्ह्यासाठी अतिशय अनुकरणीय व प्रशंसनीय असून मुख्याध्यापिका सीमा पाटील यांच्या कार्यकालात या शालेने प्रत्येक उपक्रमात सहभाग नोंदवून आपला ठसा उमटवला आहे. याकामी त्यांना सहकारी शिक्षकांचे, ग्राम स्वांचे सहकार्य व अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळत असल्यामुळे शालेचा सर्वांगीण कायापालट झाला असल्याचे मत केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांनी याप्रसंगी व्यक्त केले.



सेवानिवृत्त आदर्श शिक्षक मुरलीधर मिस्तरी व शालाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात टिकून राहण्यासाठी मोलाची मदत करणारे बोळे येथील भाईदास निकम यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हर्षदा बोरसे यांनी तर सूत्रसंचालन भिल, सुरेखा पाटील, शितल भिल, अर्चना पाटील, ग्यानीराम पाटील, समाधान पाटील, ज्ञानेश्वर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक
महाराष्ट्र सारथी

हिवरखेडे खु जि.प शाळा,नाविन्यपूर्ण उपक्रमांची शाळा – विजय भामरे

दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा
पारोळा । प्रतिनिधी :

शिक्षकांच्या अंगी शाळा,गाव व विद्यार्थ्यांविषयी तळमळ आहे,शाळेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची उर्मी आहे, म्हणून हिवरखेडे खु जिल्हा परिषद शाळा ही नावलौकिक नाविन्यपूर्ण उपक्रमांची शाळा आहे असे गौरवोद्गार शिक्षण विस्तार अधिकारी विजय भामरे यांनी काढले.

हिवरखेडे खुर्द जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचा आयोजीत शैक्षणिक सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी शा.व्य.समिती अध्यक्ष प्रकाश भिल,सुरेखा पाटील,शितल भिल, अर्चना पाटील,ग्यानीराम



ज्ञानेश्वर पाटील व्यासपिठावर उपस्थित होते.

यावेळी इयत्ता पहिलीचा बालकांचा शैक्षणिक साहित्य देऊन प्रवेशोत्सव,शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेस पात्र चौदा विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार, पाचवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप, शालेय उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचा गौरव अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचेआयोजन करण्यात आले होते.शाळेचे कार्य तालुका जिल्ह्यासाठी अतिशय शाळेने प्रत्येक उपक्रमात सहभाग नोंदवून गुणवत्तेचा ठसा उमटवत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला असे मत केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांनी व्यक्त केले. यावेळी सेवानिवृत्त आदर्श शिक्षक मुरलीधर मिस्तरी व बोळे येथील भाईदास निकम यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक हर्षदा बोरसे यांनी तर सूत्रसंचालन मुख्याध्यापिका सीमा पाटील यांनी केले.आभार मनीषा पाटील यांनी मानले.

www.parolabhushan.com
पारोळा भूषण

जिल्हा परिषद शाळेच्या ७ विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात निवड



कमलेश पटील भावेश पाटील आकाश भिल झानू भिल रेणुका पाटील राजरत्न रगोशी यश पाटील

पारोळा- आजकाल इंग्रजी माध्यमांच्या शाळांची चलती असतांना जिल्हा परिषद शाळा देखील पारंपारिकतेला फाटा देत, परिश्रम घेत विद्यार्थ्यांना गुणवंत बनवत नवोदय विद्यालयासारख्या शाळेत प्रवेशासाठी पात्र करत आहेत. पारोळा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील सात विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालयात निवड झाली असून जिल्हा परिषदेच्या शाळेत देखील गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते याची प्रचिती आलून दिली. आजकाल पालकांचा कल गावातील जि.प. मराठी शाळांमध्ये पाल्यांना न शिकवता इंग्रजी माध्यमांकडे वळला आहे. मात्र पारोळा तालुक्यातील जि.प.शाळांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन स्पर्धात्मक युगात तग धरायला लावणारे शिक्षण प्रदान केले असल्याचे याचे फलित म्हणजे तब्बल सात मार्गदर्शनाखाली उच्चस्तम शिक्षण देत आहेत. **नवोदय विद्यालयासाठी पात्र ठरलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे-** वि.कमलेश संदीप पटील (जि.प.शाळा पळासखेडे), वि.भावेश गणेश पाटील (जि.प.शाळा पळासखेडे), वि.आकाश अरविंद भिल (जि.प.शाळा भोलाणे), कु.झानू सोना भिल (जि.प.प्रा.शाळा हिवरखेडे खुर्द), कु.रेणुका विजेंद्र पाटील (जि.प.उच्च प्रा.शाळा भाँडण दिगर), राजरत्न भिकन रगोशी (जि.प.उच्च माध्य.शाळा उंदीरखेडे), वि.यश विनोद पाटील (जि.प.शाळा पिंपी-मोंढाळे) आदींचा समावेश आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे गटविकास अधिकारी किशोर गिरी, शिक्षणाधिकारी विश्वासराव पाटील, शाळेचा

पुण्य नगरी

तळमळ, चिकाटी, नाविन्यतेमुळे शाळेचा नावलौकिक : विजय भामरे



पारोळा : शिक्षकांच्या अंगी शाळा, गाव व विद्यार्थ्यांविषयी तळमळ असेल, नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याची उर्मी असेल तर त्या शाळेचे नक्कीच नावलौकिक होते. याचा प्रत्यय हिवरखेडे खुर्द जिल्हा परिषद शाळेकडे पाहून सर्वांनाच येतो, असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी विजय भामरे यांनी केले.

हिवरखेडे खुर्द जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सोहळा नुकताच पार पडला, त्या वेळी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. पहिलीत प्रवेशित बालकांचा शैक्षणिक साहित्य देऊन प्रवेशोत्सव साजरा करणे, सन २०१९ ते २५ या काळात शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेसाठी पात्र १४ विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार करणे, पाचवीच्या विद्यार्थ्यांना फोटो फ्रेम देऊन निरोप देणे, शालेय उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचा गौरव करणे अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन केले होते. हिवरखेडे खुर्द शाळेचे कार्य अनुकरणीय व प्रशंसनीय असून मुख्याध्यापिका सीमा पाटील यांच्या कार्यकाळात या शालेने प्रत्येक उपक्रमात सहभाग नोंदवून आपला ठसा उमटवला आहे. यासाठी त्यांना सहकारी शिक्षक, ग्रामस्थांचे सहकार्य व अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळत असल्याने शाळेचा सर्वांगीण कायापालट झाल्याचे मत केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांनी याप्रसंगी व्यक्त केले. निवृत्त आदर्श शिक्षक मुरलीधर मिस्तरी, शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात टिकून राहण्यासाठी मोलाची मदत करणारे बोळे येथील भाईदास निकम यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर शा.व्य. समितीचे अध्यक्ष प्रकाश भील, सुरेखा पाटील, शीतल भील, अर्चना पाटील, ग्यानीराम पाटील, समाधान पाटील, ज्ञानेश्वर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक हर्षदा बोरसे, सूत्रसंचालन मुख्याध्यापिका सीमा पाटील तर महेंद्र कोळी यांनी आभार मानले.

देशदूत

पाहून शाळेची भरारी यशस्वी झाली शाळापूर्व तयारी

पारोळा । श. प्र.

तालुक्यापासून अवघ्या बारा-तेरा किलोमीटर अंतरावर असलेले एक छोटेसे गाव म्हणजे हिवरखेडे खुर्द. याच गावातील जिल्हा परिषद शाळेत राज्य शासनाने, जिल्हा परिषदेने नेमलेले विविध शालेय, सहशालेय उपक्रम यशस्वीरित्या राबविले जात आहेत. म्हणून आज या शाळेने जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर आपले नावलौकिक केले आहे.

'मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत तालुक्यात द्वितीय क्रमांक, तालुकास्तरीय पाककला स्पर्धेत तालुक्यातून प्रथम क्रमांक, परसबाग स्पर्धेत तालुक्यातून तृतीय क्रमांक, राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत जिल्ह्यात द्वितीय क्रमांक, जिल्हास्तरीय स्काऊट गाईडच्या कब-बुलबुल मेळाव्यात सर्वाधिक पारितोषिके, विज्ञान प्रदर्शनात शिक्षक निर्मित साहित्यात प्रथम क्रमांक, स्कॉलरशिप, नवोदय व इतर स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचे सुयश अशी उंचावणारी कामगिरी करीत शाळेने तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर आपली छाप उमटवली आहे.

अशा या छोट्याशा हिवरखेडे खुर्द गावातील पालकांचे योगदानही शालेय कामात मोलाचे असते. या शाळेतील मुख्याध्यापिका सीमा पाटील, सहकारी हर्षदा बोरसे, रोशन जैन हे शिक्षक विविध उपक्रमात स्वतःला झोकून देत ते उपक्रम यशस्वीपणे राबवितात. त्याचेच फलित म्हणून आज पालक आपल्या पाल्यांना बाहेरगावी शिक्षणासाठी पाठवित नाहीत. गाव अगदी छोटेसे असले तरी गावातील पालक आपल्या मुलांना गावातील जिल्हा परिषद



शाळेतच शिकविण्यासाठी आग्रही असतात. आज शाळा पूर्वतयारीच्या निमित्ताने सहा विद्यार्थ्यांना शाळा पूर्वतयारी प्रवेश देण्यात आला. याप्रसंगी सात स्टॉल लावण्यात आले होते. 'शाळेत पहिले पाऊल' या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांकडून विविध कृती करून घेण्यात आल्या. यावेळी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्याचे वाटप करून निरोप देण्यात आला.

पालक व विद्यार्थ्यांना सुरुची भोजनासोबत पूरक आहार म्हणून केळी वाटप करण्यात आले. पालक मोहेंद्र कोळी यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले,याप्रसंगी भाऊराव पाटील, समाधान पाटील , प्रकाश भिल,मंगलाबाई पाटील ,भाऊसाहेब भिल ,बायजाबाई भिल, मंगलबाई भिल, नबाबाई भिल तसेच गावातील माता पालक उपस्थित होते. मेळावा यशस्वीतेसाठी रोशन कुमार जैन, हर्षदा बोरसे, मुख्याध्यापिका सीमा पाटील स्वंयसेवक शशिकांत पाटील, रोहित पाटील यांनी परिश्रम घेतले. शाळापूर्व तयारी मेळाव्यासाठी गटशिक्षणाधिकारी व्हि. एच .पाटील, शालेय पोषण आहार अधीक्षक सी .एम. चौधरी, केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

सकाळ वृत्तसेवा

पाहून शाळेची भरारी, यशस्वी झाली शाळापूर्व तयारी

हिवरखेडे येथे सहा विद्यार्थ्यांना शाळापूर्व तयारी प्रवेश; विद्यार्थ्यांनी केल्या कृती



हिवरखेडे (ता. पारोळा) : शाळापूर्व तयारीप्रसंगी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना शिक्षकांसह ग्रामस्थ.

पारोळा, ता. २२ : तालुक्यापासून अवघ्या बारा-तेरा किलोमीटर अंतरावर असलेले एक छोटेसे गाव म्हणजे हिवरखेडे खुर्द. याच गावातील जिल्हा परिषद शाळेत राज्य शासनाने, जिल्हा परिषदेने नेमलेले विविध शालेय, सहशालेय उपक्रम यशस्वीरित्या राबविले जात आहेत. म्हणून आज या शाळेने जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर आपले नावलौकिक मिळविला आहे.

''मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा'' या उपक्रमांतर्गत तालुक्यात द्वितीय क्रमांक, तालुकास्तरीय पाककला स्पर्धेत तालुक्यातून प्रथम क्रमांक, परसबाग स्पर्धेत तालुक्यातून तृतीय क्रमांक, राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत जिल्ह्यात द्वितीय क्रमांक, जिल्हास्तरीय स्काऊट गाईडच्या कब-बुलबुल मेळाव्यात सर्वाधिक पारितोषिके, विज्ञान प्रदर्शनात शिक्षक निर्मित साहित्यात प्रथम क्रमांक, स्कॉलरशिप, नवोदय व इतर स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचे सुयश अशी उंचावणारी कामगिरी करीत शाळेने तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर आपली छाप उमटवली आहे.

अशा या छोट्याशा हिवरखेडे खुर्द गावातील पालकांचे योगदानही शालेय कामात मोलाचे असते. या शाळेतील मुख्याध्यापिका सीमा पाटील, सहकारी हर्षदा बोरसे, रोशन जैन हे शिक्षक विविध उपक्रमात स्वतःला झोकून देत ते उपक्रम यशस्वीपणे राबवितात. त्याचेच फलित म्हणून आज पालक आपल्या पाल्यांना बाहेरगावी शिक्षणासाठी पाठवित नाहीत. गाव अगदी छोटेसे असले तरी गावातील पालक आपल्या मुलांना गावातील जिल्हा परिषद शाळेतच शिकविण्यासाठी आग्रही असतात. आज शाळा पूर्वतयारीच्या निमित्ताने सहा विद्यार्थ्यांना शाळा पूर्वतयारी प्रवेश देण्यात आला. याप्रसंगी सात स्टॉल लावण्यात आले होते. ''शाळेत पहिले पाऊल'' या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांकडून विविध कृती करून घेण्यात आल्या. यावेळी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्याचे वाटप करून निरोप देण्यात आला.

पालक व विद्यार्थ्यांना सुरुची भोजनासोबत पूरक आहार म्हणून केळी वाटप करण्यात आले. पालक महेंद्र कोळी यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी भाऊराव पाटील, समाधान पाटील, प्रकाश भिल, मंगलाबाई पाटील, भाऊसाहेब भिल, बायजाबाई भिल, मंगलबाई भिल, नबाबाई भिल तसेच गावातील माता पालक उपस्थित होते. मेळावा यशस्वितेसाठी रोशनकुमार जैन, हर्षदा बोरसे, मुख्याध्यापिका सीमा पाटील स्वंयसेवक शशिकांत पाटील, रोहित पाटील यांनी परिश्रम घेतले. शाळापूर्व तयारी मेळाव्यासाठी गटशिक्षणाधिकारी व्ही. एच. पाटील, शालेय पोषण आहार अधीक्षक सी. एम. चौधरी, केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

Jalgaon, Jalgaon-Today
23/04/2024 Page No. 4

१४.लोकसहभाग-माजी विद्यार्थी मंच व शाळा विकास

सुरुवातीला हिवरखेडे खुर्द शाळेत दोनच वर्ग खोल्या होत्या परंतु शालेय कामी एक शिक्षक मिळावा म्हणून गावकऱ्यांची व शाळेची तळमळ होती. यातूनच गावकऱ्यांनी लोकसहभागातून एक वर्ग खोली बांधून दिली. लोकसहभागातून शाळा विकास सातत्याने होत आहे. माजी विद्यार्थी मंच शाळेत स्थापन करण्यात आलेला असून वस्तुरूपाने तसेच आर्थिक रूपाने शाळेसाठी सहभाग नोंदवून शाळेची विशेष प्रगती झालेली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान जागृत होते. ज्याप्रमाणे माजी विद्यार्थी व गावकरी शाळेसाठी मदत करतात त्याप्रमाणे आपणही भविष्यात शाळेसाठी काहीतरी केले पाहिजे ही भावना विकसित होते.

देशदूत



पारोळा । श. प्र.

हिवरखेडे जि.प.शाळेत प्रमाणपत्राचे वाटप

तालुक्यातील हिवरखेडे खुर्द येथे प्रजासत्ताक दिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तंबाखुमुक्त ची शपथ घेण्यात आली. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अंतर्गत शालेय स्तरावर मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. शालेय स्तरावर नवनियुक्त विद्यार्थी मंत्रिमंडळातील सर्व विद्यार्थी मंत्र्यांचे व त्यांच्या कार्याचे कौतुकही करण्यात आले. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत येणाऱ्या काळात लोकसहभागातुन शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येईल असे सूतोवाच गावकऱ्यांनी केले. शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची व कामांची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे ध्वजारोहण रवींद्र पाटील यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रतिलाल पाटील हे होते .याप्रसंगी गावातील सर्व महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका सीमा पाटील, शिक्षक रोशन जैन ,शिक्षिका हर्षदा बोरसे यांनी परिश्रम घेतले.









लोकसहभागातून साहित्य वाट

१५. प्रवास शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा: लळा शिक्षणाचा

परिसर भेटी अंतर्गत मध्यप्रदेशातील एक कुटुंब उदरनिर्वाहासाठी एका शेतात असल्याचे आम्हाला कळले होते. आम्ही त्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले. शाळाबाह्य असलेली ही मुले हिवरखेडे खुर्द शाळेमध्ये दाखल केली व नियमित येऊ लागली. मात्र दुसऱ्या वर्षी कुटुंबप्रमुखांने हिवरखेडे खुर्द गावापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या दुसऱ्या गावात स्थलांतर केल्यामुळे त्या मुलांची ने-आण करण्याची जबाबदारी मी आनंदाने स्वीकारली. सद्यस्थितीत त्या सर्व विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळेत घेऊन येणे व पोहचविणे ही जबाबदारी मी आनंदाने पार पाडत असल्यामुळे इतर विद्यार्थ्यांमध्ये स्वानुभव, आपलेपणा, जबाबदारी या मूल्यांचा विकास होण्यास मदत झालेली आहे.













फलनिष्पत्ती:

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरखेडे खुर्द या शाळेने प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला आहे. गावाची लोकसंख्या चारशे ते पाचशे आहे. परंतु शाळेतील अभिनव उपक्रमामुळे ग्रामस्थांच्या नातेवाईकांचीही मुले येथे शिकण्यास प्राधान्य देतात. म्हणून आज दाखलपात्र विद्यार्थी कमी असतांना देखील शाळेची पटसंख्या चांगली आहे. उपक्रमशीलता विद्यार्थ्यांप्रती प्रेमळ दृष्टिकोन, तांत्रिक माध्यमांचा वापर, समुदाय सहकार्य आणि शिक्षकांचा प्रामाणिकपणा यामुळे शाळेने आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. 'उपक्रम आमचे खास: करी मूलभूत क्षमतांचा विकास' ही केवळ घोषणा नसून आमच्या शाळेचे ब्रीद आहे. बदल घडवायचा असेल तर विचार बदलले पाहिजे. विचार बदलवायचा असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे लक्षात ठेऊन आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरखेडे खुर्द येथे केवळ ज्ञानाची नव्हे तर कौशल्याची, स्वजागृतीची स्वयंशिस्तीची, स्वानुभवाची, स्वावलंबनाची रुजवणूक होते. गेल्या काही वर्षापासून आमच्या शाळेने नवनवीन विधायक उपक्रम राबविल्यामुळे शाळेचा व विद्यार्थ्यांचा विकास झालेला आहे हे मात्र तेवढेच खरे आहे. https://youtu.be/gq0_Pmds5ns?si=W9TO6QXVNwN9-ajR



मा.जिल्हाधिकारी श्री.पियुष गोयल

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आयुष प्रसाद

व शिक्षण विभागातील अधिकारी

----------**----------

अध्ययन साध्यतेच्या प्रेरणादायी प्रवासात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - पी. एम. श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, साकरी

शाळेचा पत्ता - साकरी,केंद्र दीपनगर, तालुका भुसावळ जिल्हा जळगाव.

शाळेचा ईमेल आय डी - zppssakari@gmail.com

मुख्याध्यापक पूर्ण नाव - सुनिता सुपडू सरोदे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 8806873659

मुख्याध्यापक ई मेल आयडी.- patilsunita466@gmail.com

1.शाळेची ओळख



पी. एम. श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, साकरी ही भुसावळ तालुक्यातील दीपनगर केंद्रातील एक ग्रामीण शाळा असून येथे शिक्षण घेत असलेले विद्यार्थी प्रामुख्याने शेतकरी, मजूर, स्थलांतरित कामगार अशा कुटुंबांतील आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीमुळे आणि घरात शैक्षणिक वातावरणाच्या अभावामुळे मुलांच्या अध्ययन प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होत होत्या. त्यात सातत्याने प्रयत्न करण्यात आले त्यातून ही शाळा आज शिक्षण क्षेत्रातील एक यशस्वी प्रयोगशील शाळा म्हणून पुढे आली आहे.

2. पार्श्वभूमी व समस्या

कोविड-19 च्या महामारीमुळे शिक्षण क्षेत्रावर गंभीर परिणाम झाला. लॉकडाऊनमुळे शाळा बंद होत्या, डिजिटल साक्षरतेचा अभाव आणि साधनांची मर्यादा यामुळे विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन आणि संख्याज्ञानाचे कौशल्य मोठ्या प्रमाणात कमी झाले. शाळेतील FLN स्तर खालावला होता. विद्यार्थ्यांची शाळेत नियमित उपस्थिती नव्हती. अनेक विद्यार्थ्यांना अक्षरओळख, संख्या ओळख, वाचनगती अशा मूलभूत बाबीही येत नव्हत्या. पालकांचा सहभाग कमी होता आणि शाळेतील साधनसामग्री अत्यंत मर्यादित होती. इंग्रजी आणि गणित या विषयांबाबत विद्यार्थ्यांत स्पष्ट भीतीभाव होता.

3. मुख्याध्यापकांचे नेतृत्व व नियोजन



मुख्याध्यापक सौ. सुनीता सरोदे मॅडम यांनी 2024-25 या शैक्षणिक वर्षात पदभार स्वीकारल्यानंतर शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी एक सुसंगत नियोजन सुरू केले. सर्वप्रथम विद्यार्थ्यांचे प्रारंभिक मूल्यमापन करून त्यांना वाचन आणि

गणित कौशल्यानुसार तीन स्तरांमध्ये - सुरुवातीचा, प्रगतीशील व प्रवीण - विभागले गेले. निपुण भारत अंतर्गत सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करून शिक्षकांमध्ये समन्वय साधला गेला. प्रत्येक आठवड्याला शिक्षकांसोबत बैठक घेऊन साप्ताहिक नियोजन ठरवले गेले.

4. वाचन-लेखनातील उपक्रम



विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढवण्यासाठी 'सकाळचा वाचन तास' दररोज सक्तीने राबवला जातो. इयत्ता निहाय सेतू अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. वर्गांमध्ये वाचन कोपरे, शब्द झाडे, चित्रकथा टांगणीसारख्या साहित्यांचा वापर करण्यात आला. इंग्रजी भाषेतील वाचन सुलभ करण्यासाठी 'जॉली फोनीक्स' ही ध्वनीशास्त्र आधारित पद्धत प्रभावीपणे वापरण्यात आली. प्रार्थनेनंतर दररोज एक शिक्षक सर्व विद्यार्थ्यांसाठी जॉली फोनीक्स तास घेतात. यामध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजीतील शब्दांचे उच्चार, आवाज, स्पेलिंग व वाचन याबद्दल आत्मविश्वास प्राप्त झाला. पालकांनाही जॉली फोनीक्स ॲप मोबाईलमध्ये डाऊनलोड करून देण्यात आले. त्यांनी घरी मुलांना योग्य उच्चारांनुसार वाचनाची सवय लावली.

5. गणित विषयातील नवोपक्रम



गणित विषयात मुलांची गती वाढवण्यासाठी विविध सृजनशील व खेळमूलक तंत्रांचा उपयोग करण्यात आला. 'मनाचे आकडे', रंगीत पट्ट्या, आकृती ओळख खेळ, गणित आणि तारखेनुसार पाढे, गीतं यांचा वापर केला गेला. 'गणिताचा मळा' नावाने एक विशेष उपक्रम राबवण्यात आला, ज्यात मैदानी शिक्षण, समूहकृती व मुलांच्या स्वतःच्या साधनांच्या माध्यमातून शिकवले गेले. विद्यार्थ्यांनी स्वतःचे मोजपट्ट्या, आकडेमोजा काड्र्स, सापशिडी तयार करून क्रियाशील शिक्षणाचे उदाहरण घडवले.

6. विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षांमध्ये सहभाग आणि यश -



शाळेतील विद्यार्थ्यांना केवळ शालेय अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता, **बौद्धिक क्षमतेचा विकास घडवण्यासाठी** विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी करून घेतले जाते. यामध्ये महाराष्ट्र टॅलेंट सर्च (MTS) परीक्षा हा एक महत्त्वाचा टप्पा होता. आमच्या शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी उत्साहाने MTS परीक्षेसाठी तयारी केली.

शाळेच्या शिक्षकांनी नियमितपणे मार्गदर्शन सत्रं घेतली, पूर्वतयारी टेस्ट घेतल्या, आणि विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. परिणामी, **१५ विद्यार्थी MTS परीक्षेत अतिशय उत्कृष्ट मार्कांसह यशस्वी झाले.** ही यशोगाथा विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेसोबतच शिक्षकांच्या मार्गदर्शन आणि शाळेच्या सकारात्मक शैक्षणिक वातावरणाची साक्ष देते.

7. पालकांचा सहभाग



शाळेच्या यशात पालकांचा सहभाग फार मोठा आहे. दर महिन्याला पालकसभा घेऊन त्यांच्या पाल्यांच्या प्रगतीची माहिती देण्यात आली. प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र व्हॉट्सअप ग्रुप तयार करून त्यावर गृहपाठ, व्हिडीओ, ऑडिओसंदेश आणि वाचनसाहित्य नियमित पाठवण्यात आले. "मोबाईलवरून शिका" या उपक्रमाअंतर्गत पालकांना डिजिटल शैक्षणिक ॲप्स वापरण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. ऑनलाइन पालकसभा, व्हॉइस कॉल्स, व्हिडीओ मेसेजेसद्वारे पालकांशी सातत्याने संवाद साधण्यात आला. यामुळे पालक-शाळा भागीदारी दृढ झाली. अनेक पालक आता घरी १० मिनिटांचा वाचन वेळ राखून मुलांसोबत अभ्यास करतात.

8. समुदायाचा सहभाग



शाळेच्या यशामध्ये स्थानिक समुदायाचाही मोठा वाटा आहे. माजी विद्यार्थ्यांनी शाळेला दोन 65 इंच टीव्ही, पाच कॉम्पुटर पाच टेबल व खुर्च्या, बाल लायब्ररी व कपाट देणगी स्वरूपात दिले. ग्रामपंचायतीने वॉल चार्ट्स, ब्लॅकबोर्ड आणि पंख्यांसाठी निधी तसेच CCTV कॅमेरा उपलब्ध करून दिला. गावातील काही सेवानिवृत्त शिक्षक, समाजसेवक व तरुणांनी स्वयंसेवक म्हणून नियमितपणे शाळेत वेळ दिला. या सहकार्यामुळे शाळेचे शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध झाले.

9. प्रेरणादायी उपक्रम - 'वाढदिवसाचा सण'



विद्यार्थ्यांमध्ये आपलेपणाची भावना वाढवण्यासाठी आणि शाळेत येण्याची प्रेरणा टिकवण्यासाठी शाळेत एक अभिनव उपक्रम राबवला जातो - 'वाढदिवसाचा सण'. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचा वाढदिवस शाळेत साजरा केला जातो. वाढदिवसाच्या दिवशी विद्यार्थ्याला शुभेच्छा दिल्या जातात, सेल्फी काढून तो पालकांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठवला जातो. या छोट्याशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेप्रती आत्मीयता निर्माण झाली आहे. अनेक मुले फक्त वाढदिवसाच्या दिवशी नव्हे तर दररोज उत्साहाने शाळेत येऊ लागली आहेत.

10. साध्य केलेले यश

या एकत्रित प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांच्या FLN पातळीत लक्षणीय प्रगती झाली आहे. जॉली फोनीक्स उपक्रमामुळे विद्यार्थी इंग्रजी वाचनात प्रगती करू शकले. FLN मूल्यांकनात विद्यार्थी योग्य पातळीवर पोहोचले. शाळेची विद्यार्थ्यांची उपस्थिती दर वाढला आहे. शिक्षक, पालक, समुदाय आणि विद्यार्थी या सर्व घटकांचा समन्वय साधून शाळेच्या गुणवत्तेमध्ये मोठी वाढ झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य, आत्मविश्वास आणि शिकण्याची प्रेरणा दिसून येते.


11. निष्कर्ष

पी. एम. श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साकरी ही केवळ एक ग्रामीण शाळा नाही, तर शिक्षणाच्या बदलांची एक प्रेरणादायी प्रयोगशाळा ठरली आहे. मुख्याध्यापक सौ. सरोदे मॅडम यांनी दाखवलेले नेतृत्व, शिक्षकांचा समर्पण भाव, पालकांचा सक्रिय सहभाग आणि स्थानिक समुदायाचे सहकार्य यामुळे मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या दोन्ही आघाड्यांवर शाळेने ठोस प्रगती साधली आहे. या यशोगाथेतील एक महत्त्वाचा स्तंभ म्हणजे शाळेतील शिक्षकवृंद. शाळेतील शिक्षक हे केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता, प्रत्येक उपक्रमात उत्साहाने सहभाग घेणारे, सहकार्यशील आणि विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोन असलेले आहेत. ते नवीन पद्धती आत्मसात करणे, तंत्रज्ञानाचा उपयोग करणे, तसेच पालक व समुदायाशी संवाद साधणे यामध्ये नेहमी पुढाकार घेतात. त्यांचा सकारात्मक आणि आनंददायी दृष्टिकोन हा शाळेतील सर्जनशीलतेचा मुख्य आधार आहे.

12. पुढील दिशा

सध्या शाळेमध्ये प्रत्येक वर्गात दरमहा पायाभूत साक्षरता आणि अंकगणितिय क्षमता संवर्धनासाठी नियोजनपूर्वक मूल्यमापन घेतले जात आहे. पालकांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर प्रेरणादायी गोष्टी, वाचन व्हिडीओ आणि शब्दकोश लिंक्स पाठवण्यास सुरुवात झाली आहे ज्यातून विद्यार्थ्यांच्या क्षमता वाढण्यासाठी मदत होईल.

----------**----------



कृतियुक्त अध्ययन प्रक्रियेतून शालेय विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - मत्स्योदरी विद्यालय, घुंगर्डे हदगाव
शाळेचा पत्ता — घुंगर्डे हदगाव ,तालुका अंबड, जिल्हा जालना
शाळेचा ईमेल आयडी - mvgh777@gmail.com
मुख्याध्यापकांचे नाव - श्री कल्याण नरसिंगराव सोळुंके
मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9373661885, 9422559346

मुख्याध्यापक ईमेल आयडी - solunkekalyan511@gmail.com

अंबड तालुक्यातील ग्रामीण भागातील पाथरवाला बुद्रुक केंद्रांअंतर्गत असणारी मत्स्योदरी विद्यालय घुंगर्डे हदगाव येथील शाळेने अनेक सकारात्मक बदल घडवून शाळेची एकंदरीत गुणवत्ता व भौतिक विकास उच्च दर्जाचा घडवून आणला .

1) यामध्ये प्रामुख्याने आज सर्व पालकांची इच्छा असते की माझा पाल्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जावा परंतु आर्थिक परिस्थिती व दूर अंतरावर असलेल्या सुविधा या कारणामुळे ते आपले पाल्य इंग्रजी माध्यमाच्या शाळांना पाठवू शकत नाहीत म्हणून 2025-26 या शैक्षणिक वर्षासाठी सर्वप्रथम पालकांची गरज लक्षात घेता इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीसाठी सेमी इंग्रजी माध्यम मत्स्योदरी विद्यालय घुंगर्डे हदगाव शाळेत सुरू केले. त्यामुळे पालकांना आपल्या परिसरातच उत्तम दर्जाचे शिक्षण सहज उपलब्ध झाले व हे शिक्षण निशुल्क असल्यामळे अनेक पालकांचा ओढा शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी वाढला. परिणामी शाळेची विद्यार्थी संख्या झपाट्याने वाढली.

2) याबरोबरच वर्ग अध्यापनामध्ये विशेषतः विज्ञान इंग्रजी व गणित अध्यापनामध्ये अनुभवात्मक शिक्षण पद्धती, कृतीयुक्त शिक्षण पद्धती ,रोल प्ले मेथड, इन्क्वायरी बेस पेडाकॉजी टूल, इत्यादी नवनवीन पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेमध्ये वाढ करण्याच्या हेतूने प्रयत्न करण्यात आले.

विज्ञान विषयातील विविध संकल्पना फक्त फळा आणि खडू च्या माध्यमातून समजाऊन न सांगता कृतीयुक्त अध्यापन पद्धती बरोबरच वेगवेगळे प्रोजेक्ट करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाद्वारे शिक्षण देण्यात आल्यामुळे त्यांच्या संपादणूकीमध्ये प्रचंड बदल झाला. विज्ञानातील ज्या अमूर्त संकल्पना आहेत त्या ऍक्टिव्हिटीच्या माध्यमातून व्यवस्थित समजाऊन देता आल्या व विद्यार्थीही आनंदाने या सर्व प्रक्रियेमध्ये भाग घेऊ लागले .

याचे उत्तम उदाहरण द्यायचे ठरल्यास विज्ञान शिक्षकाने स्वतः काही शैक्षणिक साहित्य निर्माण करून ते विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवले व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलनामध्ये बदल घडवून आला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र या विषयातील गुरुत्वाकर्षण या पाठातील केपलरचे नियम , मुक्त पतन व याबरोबरच अनुवंशिकता व उत्क्रांती या पाठातील प्रतिलेखन या संकल्पना विविध शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून विज्ञान शिक्षकाने सांगितल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलनामध्ये सकारात्मक बदल घडून आला.






रसायन शास्त्रातील आधुनिक आवर्तसारणी गुरुत्वाकर्षण पाठातील केपलर चे नियम ग्लास च्या माध्यमातून दर्शविले.

शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दाखवताना....

3) इंग्रजी भाषा संवाद कौशल्य वाढविण्यासाठी मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय राजेश टोपे यांच्या संकल्पनेतून प्रत्येक विद्यार्थ्याला इंग्रजी भाषा संवाद कौशल विकसन वहीचे वितरण करण्यात आले व या वहीमध्ये दररोज विद्यार्थ्यांनी दहा नवीन इंग्रजी शब्द लिहून त्याचा वाक्यात उपयोग करायचा आहे त्यामुळे इंग्रजी भाषेतील शब्दांचा साठा वाढेल व इंग्रजी भाषेतून चांगल्या पद्धतीने ग्रामीण भागातील विद्यार्थी संवाद करू शकतील व त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल इंग्रजीची भीती निघून जाईल. यानुसार प्रत्येक विद्यार्थी दररोज 10 नवीन शब्द त्या वहीमध्ये लिहून त्याचा वाक्यात उपयोग करू लागले व इंग्रजी भाषेच्या शब्दसाठ्यात वाढ होऊ लागली.



इंग्रजी भाषा संवाद कौशल्य विकसन वही विद्यार्थ्यांना देण्यात आली


4) **शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांचा सहभाग**

शालेय स्तरावर घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षेचे यशस्वी आयोजन करून त्या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करून विद्यार्थी सहभाग वाढविला.

यामध्ये प्रामुख्याने इयत्ता पाचवी साठी नवोदय परीक्षा, इयत्ता सहावी व इयत्ता नववी साठी होमी भाभा यंग सायंटिस्ट परीक्षेचे आयोजन करण्यात आले. तसेच इन्स्पायर मानक या स्पर्धेसाठी इयत्ता सहावी ते इयत्ता दहावीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

इन्स्पायर मानक स्पर्धेसाठी शाळेच्या दर्शनी भागात आयडिया बॉक्स ठेवण्यात आला व विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील व त्यांच्या परिसरातील वेगवेगळे प्रश्न आणि समस्या शोधून त्यावर काय उपाययोजना करता येतील याबाबत मार्गदर्शन करण्यात आले व या आयडिया बॉक्समध्ये त्या समस्या संकलित केल्या गेल्या याचा परिणाम सकारात्मक झाला व प्रत्येक विद्यार्थी आपल्या सभोवताली असणाऱ्या विविध प्रश्नावर व समस्येवरती विचार करू लागला व आयडिया बॉक्स मध्ये या समस्या टाकून यापैकी उत्कृष्ट समस्या निवडून त्या इन्स्पायर मानकसाठी नोंदविण्यात आल्या, यामुळे शाळेमध्ये एक सकारात्मक स्पर्धात्मक वातावरण तयार झाले.





शालेय आवारात आयडिया बॉक्स ठेवण्यात आला.

5) भारतीय परंपरा व ज्ञान संस्कृतीची ओळख

या उपक्रमामध्ये महाराष्ट्रातील अतिशय पुरातन वारकरी संप्रदायाने जपलेली वारकरी सांप्रदायिकता विद्यार्थ्यांना अवगत करण्यासाठी शाळेमध्ये वेगवेगळ्या दिंडीचे आयोजन करण्यात यामध्ये प्रामुख्याने वारकरी दिंडी वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले व विद्यार्थ्यांना आपल्या प्राचीन भारतीय व महाराष्ट्राची संस्कृती बद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले यामुळे आपली महान परंपरा जोपासण्यासाठी विद्यार्थी सकारात्मकतेने भाग घेऊ लागले .



वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा सादर करताना

6) वसुंधरा सप्ताह पर्यावरण रक्षण व वृक्ष जोपासना उपक्रम

पर्यावरण मंत्रालय भारत सरकार तथा पर्यावरण मंत्रालय महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार शालेय परिसरात व इतर ठिकाणी नैसर्गिक जलस्त्रोत स्वच्छता करणे व वृक्ष लागवड तथा वृक्ष जोपासना करण्याच्या हेतूने एक पेड मा के नाम या उपक्रमामध्ये शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने सहभाग घेतला व आईच्या सोबत वृक्षारोपण करून त्या वृक्षाचे संगोपन करण्याची प्रतिज्ञा केली तसेच शालेय परिसर शेतीवाडी गावातील उजाड जागी अनेक वृक्षांचे वृक्षारोपण करून वृक्ष संगोपन करण्याचे उद्दिष्ट ठरविले. यामध्ये विद्यालयानी शासनाच्या मार्फत व खाजगी स्वरूपातून वृक्ष उपलब्ध करून दिले . या उपक्रमाच्या निमित्ताने विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानवी साखळीच्या माध्यमातून EARTH DAY ही अक्षरे तयार केली व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला यासोबतच वसुंधरा दिनाच्या व वसुंधरा सप्ताहाच्या निमित्ताने वसुंधरेचे घोषवाक्य तयार करण्यात आले






वसुंधरा सप्ताह व वृक्ष संगोपन

s 7) विद्यार्थी वाचन संस्कृती

दररोज सकाळी 9 ते 9.45 या वेळेत वेगवेगळी क्रमिक पुस्तके शाळेच्या मैदानामध्ये शिस्तबद्ध पद्धतीने वाचत असतात. शालेय अभ्यासक्रमातील वेगवेगळे विषय किंवा इतर पूरक पुस्तके सकाळच्या वेळेत वाचण्यासाठी विद्यार्थ्यांना रांगेत बसवले जाते व या माध्यमातून वेगवेगळ्या पुस्तकांचे वाचन त्यांच्याकडून घडते व त्यामुळे वाचन संस्कृतीला चालना मिळते



वाचन संस्कृती वाढावी या हेतूने सकाळच्या वेळेत अध्ययन करताना विद्यार्थी ..

8) प्लास्टिकचा पुनर्वापर व परसबाग निर्मिती

प्लास्टिक बॉटलचा पुनर्वापर

शाळेमध्ये वेगवेगळे उपक्रम पर्यावरणाच्या संवर्धनासाठी तसेच वेस्ट टू बेस्ट या संकल्पनेद्वारे प्लास्टिकचा कचरा कमी करण्याच्या हेतूने गावातील वेगवेगळ्या ठिकाणी पडलेल्या निरुपयोगी रिकाम्या प्लास्टिकच्या बॉटल एकत्र करून त्या प्लास्टिकच्या बाटल्या वेगवेगळ्या रंगाचे पाणी भरून शाळेच्या आवारात फुल झाडांना संरक्षण भिंत म्हणून त्याचा रियूज करण्यात आला व प्लास्टिकचे प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले

अनेक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात स्वेच्छेने सहभागी होऊन गावातील व शालेय परिसरातील प्लास्टिकचे प्रदूषण कमी करण्याच्या हेतूने या उपक्रमात भरघोस प्रतिसाद देऊन शाळा सुशोभित करण्याच्या हेतूने प्रयत्न केले.

तसेच शालेय पोषण आहारासाठी शाळेच्या आवारात प्लास्टिकचा पुनर्वापर व परसबाग निर्मिती

परसबाग निर्मितीचे काम पूर्ण करण्यात आले यामध्ये प्रामुख्याने वेगवेगळ्या फळभाज्या व पालेभाज्या यांची लागवड करण्यात आली.





शालेय परिसरात परसबाग व प्लास्टिकच्या बाटल्यांचा पुनर्वापर

अशाप्रकारे वेगवेगळ्या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या क्षमता वाढविण्याच्या हेतूने वरील उपक्रम सर्व शिक्षकांच्या माध्यमातून करण्यात आले या उपक्रमासाठी गावकऱ्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला व एक आनंदी पर्यावरण पूरक अध्ययन अध्यापनासाठी उत्तम वातावरण मत्स्योदरी विद्यालय घुंगर्डे हदगाव या शाळेत तयार झाले.

----------**----------

लिंग समभाव सुनिश्चित करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रायगव्हाण

शाळेचा पत्ता - रायगव्हाण, तालुका परतूर, जिल्हा जालना

शाळा ईमेल आयडी - zppsraigavhan@gmail.com

मुख्याध्यापकांचे नाव - श्री नवरंगे किरण नरहरराव

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 777603286

मुख्याध्यापक ईमेल आयडी - kirannavrange@gmail.com

शाळेमध्ये लिंग समभाव (gender equality) सुनिश्चित करण्यासाठी मुख्याध्यापकांनी अनेक प्रयत्न करणे आवश्यक होते. यात मुला-मुलींना समान संधी मिळणे, त्यांच्यावर होणारा अन्याय थांबवणे आणि सर्वांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. यासाठी शाळेत मुख्याध्यापक आणि शिक्षक यांनी पुढील प्रयत्न केले.

1. **समान संधी:**

मुला-मुलींना शिक्षणाच्या समान संधी मिळतील याची खात्री केली,यासाठी ज्या मुली शाळा बाह्य होत्या त्यांना प्रवाहात आणले .

https://youtu.be/BwmMJ2bZO9s?si=8Au7icRKd_uA6wEA

खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतर शैक्षणिक उपक्रमांमध्ये दोघांनाही समान संधी देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला गेला.



https://youtu.be/O7Ab-lDbN5M?si=2rXOmw_V-fz986Wf

शिक्षण साहित्य, गणवेश आणि इतर सुविधांमध्ये कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान सुविधांचे वाटप केले.

2. भेदभावरहित वातावरण:

सर्व शिक्षकांनी मुला-मुलींशी समान व्यवहार करण्याचे नियोजन करून तशी अंमलबजावणी केली .



https://youtu.be/AopMKoRht4w?si=_JTz4m50L2DO1u_e

वर्गखोलीत किंवा शाळेत कोणत्याही प्रकारचा लिंगभेदात्मक संवाद किंवा विनोद कटाक्षाने टाळला गेला. महिलांचे स्वागत सुद्धा पुरुषाप्रमाणे करून लिंगभेद दूर केला.

https://youtu.be/Lk4svE5CZ_M?si=-tB06cEIGbvWG_IX

मुला-मुलींना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी वेळोवेळी स्पर्धेचे व कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. यामध्ये व्यवहारात सुद्धा महिलाना समान संधी यावर उपक्रम घेण्यात आला.

https://youtu.be/9BgoZDuJH6A?si=JjM8g6Lzw1d3tEJ2

शिक्षकांनी लैंगिक समानतेबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी स्त्री पुरुष समानता उपक्रम राबविला.



3. **पालक आणि समाजासोबत संवाद:**

पालकांना शाळेतील लिंग समभावाच्या धोरणाबद्दल माहिती पालक भेटी मार्फत देण्यात आली. वाचन शपथ मार्फत मुलामुलींना समान शिक्षण हा उपक्रम घेतला

https://youtu.be/TCNcu-J0_NU?si=wW49OAJfmjKiwsla

पालकांना मुला-मुलींच्या समान विकासासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आनंदनगरी, माता पालक सभा, राखी विक्री स्टॉल असे उपक्रम राबवले गेले.



https://youtu.be/dmwW0CGL_oQ?si=d_eogrxuia8YPhi4

समाजात लैंगिक समभाव वाढवण्यासाठी जनजागृती करण्यासाठी प्रभातफेरी काढण्यात आली.



https://youtu.be/8qvSaOAHcKM?si=bu3XTGXPhohsZFv4

यामध्ये मुलींनी नाटिका व पथनाट्य सादर केले.



https://youtu.be/hAxZdm_WHqc?si=XfBuYp8N8279ItVH

4. नियम आणि धोरणे:

शाळेतील नियम आणि धोरणे लैंगिक समानतेवर आधारित ठेवले.लैंगिक छळाच्या घटनांवर त्वरित कारवाई होईल अशा सूचना आष्टी पोलीस स्टेशन च्या पोलिसांमार्फत देण्यात आल्या.लैंगिक समानता आणि सामाजिक न्यायासाठी विशाखा समिती स्थापन करण्यात आली.
महिला आणि पुरुषांच्या समान योगदानाला महत्व देण्याच्या उद्देशाने मेरा देश मेरी माटी उपक्रम घेऊन शालेय विद्यार्थिनी मार्फत वृक्ष भेट देऊन समानतेचे आवाहन करण्यात आले.
विद्यार्थ्यांना लैंगिक समानता आणि सामाजिक न्यायासाठी काम करण्यासाठी प्रेरित करण्यासाठी माझी भाकरी माझा सन्मान हा उपक्रम राबविला.



https://youtu.be/ZZiWijCpLsU?si=JHwN9fUSyZX-FY5X



या प्रयत्नांमुळे शाळेत एक असे वातावरण निर्माण झाले की जिथे प्रत्येक मुला-मुलीला स्वतःचा विकास करण्याची संधी मिळाली आणि ते समाजाच्या विकासात सक्रियपणे योगदान देण्यासाठी पूर्णपणे सक्षम व्हावेत यासाठी शाळा प्रयत्नशील आहे.

----------**----------

‘कविता लेखनातून स्व अभिव्यक्ती विकास’

शाळेचे नाव - केंद्रीय प्राथमिक शाळा वेतवडे

शाळेचा पत्ता - वेतवडे, तालुका पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर.

शाळेचा ई-मेल आयडी - anilteli3242@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.जयवंत दत्तात्रय चौगले

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 8805472595

मुख्याध्यापक ईमेल आयडी - **anilteli3242@gmail.com**

प्रस्तावना -

'वेतवडे' ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर हे गाव पन्हाळ्याच्या पश्चिम दिशेला धामणी खोऱ्यात वसलेले छोटेसे पण टुमदार गाव. गावाची लोकसंख्या 3000 च्या आसपास गावातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती व पशुपालन. बरेच तरुण वर्ग बांधकाम व्यवसायाशी संबंधित छोटे-मोठे कामगार.


माझ्या शाळेचे नाव केंद्रीय प्राथमिक शाळा वेतवडे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर. मी **सौ.ऊर्मिला अनिल तेली** अध्यापन करीत असलेले इयत्ता ६ वी व ७ वीचे वर्ग. ‘मराठी’ विषय हा माझ्या आवडीचा व अध्यापनाचा विषय.

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण शोधून त्यांचा विकास करणे. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली सृजनशीलता लेखनाद्वारे तसेच इतर कलेद्वारे अभिव्यक्त केली जाते.

विद्यार्थी मराठी भाषेतील विविध साहित्यप्रकार समजपूर्वक वाचून स्वतःची आवड, विचार व्यक्त करतात.०६.०१.०९ या अध्ययन निष्पत्तीचे दृढीकरण होण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

इयत्ता सहावी प्रथम भाषा (मराठी) पाठ्यपुस्तकात कु.सोनाली फुफरे या विद्यार्थिनींनी "झाड" या विषयावर लिहिलेले कविता आहे. या विद्यार्थिनीने लिहिलेली कविता वाचून, त्यावर विचार करून कवितेच्या ओळी पूर्ण करा हा उपक्रम स्वाध्यायामध्ये दिलेला आहे.

अभ्यासक्रमात भाषा, साहित्य, संस्कृती आणि मूल्ये यांचा समावेश केला आहे. शिक्षणामुळे चारित्र्य घडले पाहिजे आणि ज्यायोगे शिकणारे नीतीवान, तर्कशुद्ध, सहानुभूतीशील आणि सहृदयी बनतील. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये विशेषत: प्रत्येक व्यक्तीच्या सृजनशीलतेच्या विकासावर भर दिला आहे.



मुख्याध्यापक शिक्षक यांना आलेल्या अडचणी

1. विद्यार्थ्यांना कवितेतील ओळींचा बरेचदा आशय समजत नव्हता.

2. कवितेचे समजपूर्वक वाचन करता येत नव्हते.

3. मनातील भावना व्यक्त करता येत नव्हत्या.

या अडचणी सोडविण्यासाठी उपक्रम अंमलबजावणी करणे आवश्यक वाटले .

भाषा ही मानवाला लाभलेली महान शक्ती आहे. भाषा विचार विनिमयाचे प्रमुख साधन आहे. भाषेमुळे विचारशक्ती विकसित होते. माणसाचे अनुभव जसे संपन्न होतात तशी अभिव्यक्तीची कौशल्य विकसित होतात.

1.मुलांवर सुसंस्कार करावयाचे वय हे प्राथमिक शिक्षण घेत असलेले वय. व्यक्तिमत्व आकारास येणारे संस्कारक्षम वय. या वयात केलेले संस्कार विद्यार्थी कधीही विसरू शकत नाही.

2. मराठी साहित्याचे विविध प्रकार समजून घेऊन त्यांचा आनंद घेता येणे, सामाजिक रूढी विषयी जागरूकता निर्माण करणे.

3. विविध विषयावर आधारित कविता आपल्या भाषेत लिहिता येणे,, लिहिलेल्या कवितावर चर्चा करून आपले मत अभिव्यक्त करता येणे. कल्पनाशक्ती व सृजनशीलतेचा विकास होणे.

यातून काही कृती करण्याचे नियोजन करण्यात आले.

1. नेहमीच्या पारंपरिक अध्यापन पद्धतीचा वापर न करता मुलांना आनंद निर्माण होईल, सर्वच विद्यार्थी कृती व उपक्रम मध्ये सहभागी होतील अशा कृतीयुक्त उपक्रमांचा समावेश केला आहे.

2. विद्यार्थ्यांच्या कृतीवर भर देऊन त्यांच्या अंगी असलेल्या सृजनशीलतेला चालना देणारे उपक्रम समाविष्ट करण्यात आले.

3. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व नवनिर्मितीला चालना देणारे विषयावर कवितांचे लेखन करून घेतले.

4. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कवितांना सादरीकरणाची संधी या उपक्रमाद्वारे प्राप्त झाली.

5. विद्यार्थ्यांच्या स्वरचित कवितांचा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला, कविता लेखन स्पर्धेमध्ये सहभाग होण्याची संधी मिळाली.

6. विद्यार्थ्यांना मनातील भावना व्यक्त होण्यासाठी लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्याची संधी दिल्याने हा उपक्रम नाविन्यपूर्ण वाटतो.




उपक्रमाचे नियोजन

कोणत्याही कार्यक्रमाचे पूर्वनियोजन असेल तरच तो कार्यक्रम यशस्वी होतो. कार्यवाही करण्यापूर्वी त्यांचे प्रमाणबद्ध नियोजन करणे गरजेचे आहे हे लक्षात ठेवून सुयोग्य नियोजन करण्यात आले. नियोजनामुळे उपक्रमाला योग्य दिशा मिळते येणाऱ्या अडचणीवर योग्य उपाय शोधून त्यावर उपाययोजना करणे सुलभ झाले.

1. **पूर्वस्थितीचे निरीक्षण** :

इयत्ता सहावीच्या प्रथम भाषा (मराठी) पाठ्यपुस्तकांमध्ये कु. 'सोनाली फुफरे' या विद्यार्थिनीने लिहिलेली झाड ही कविता उपक्रम या सदरात आहे. विद्यार्थ्यांनी त्या कवितेचे समजपूर्वक वाचन करून खाली दिलेल्या ओळी पूर्ण करावयाच्या आहेत.

माझी शाळा म्हणते खेळा .....

वेळ, काळ तुम्ही नियमित पाळा .....

इ.६ वी व इ. ७ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना हा उपक्रम पूर्ण करण्यास सांगितला, अकरा विद्यार्थ्यांनी या आशयाच्या ओळी पूर्ण करून दाखवील्या परंतु वर्गातील इतर विद्यार्थ्यांनी उपक्रम पूर्ण करून दाखवला नाही. वर्गातील इतर विद्यार्थ्यांना हा उपक्रम हा पूर्ण करता आला नाही त्या कारणांचा शोध घेतला. ती निरीक्षणे पुढील प्रमाणे:

1. तीन अक्षरी, चार अक्षरी यमक जुळणाऱ्या शब्दांचा संग्रह कमी होता.

2. कवितेचा आशय सांगता येत नव्हता.

3. कवितेला योग्य शीर्षक देता येत नव्हते.

4. आत्मविश्वासाचा अभाव होता.

5. यमक जुळणाऱ्या शब्दांचा वापर कविता लेखनात कुठे करावा हे माहित नव्हते.


वरील निरीक्षणाच्या नोंदी करून ठेवल्या. नोंदीवरून आधारित प्रश्नावली तयार केली. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे पूर्व चाचणी घेतली. पूर्व चाचणीमध्ये आढळल्यानंतर/निरीक्षणावरून उपाययोजना करून इ. ६वी व इ.७ वी चा वर्गातील विद्यार्थ्यांवर हा उपक्रम राबवण्याचे निश्चित केले.




करावयाच्या कृतींचा क्रम :

उपक्रमासाठी खालील कृतींची अंमलबजावणी प्रभावीपणे केली.

कृतींचा ओघ तक्ता



उपक्रमोत्तर स्थितीची

निरीक्षणे व नोंदी -

उपक्रम पूर्वस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी निरीक्षण व नोंदी केल्या त्याप्रमाणे उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण व नोंदी ठेवल्या. उपक्रमामुळे कोणते सकारात्मक बदल झाले वर्तनाबदल झाल्याचे निरीक्षण करून नोंदी ठेवल्या विद्यार्थ्यांमध्ये खालील वर्तन बदल दिसून आले. उत्तर चाचणीच्या निरीक्षणातून उपक्रमोत्तर स्थिती सकारात्मक दिसली. वर्गातील १००% विद्यार्थी उपक्रमात सहभागी झाले.

- मनातील भावना लेखनाद्वारे व्यक्त करता आल्या.
- कविता समजपूर्वक वाचन करून आपले मत व्यक्त करू लागले.
- संगीत वाद्याच्या साह्याने कविता सादर करू लागले.
- विद्यार्थ्यांमध्ये सभाधिटपणा व आत्मविश्वास आला.

- उत्साहाने सहभागी झाल्याने मनातील भीती दूर झाली.
- कविता लेखन करताना रचना करता येऊ लागली.
- शब्दसंपत्तीत वाढ झाली.
- स्व कल्पनेने कविता लेखन करू लागले.
- विषयावर आधारित कविता लेखन करू लागले.
- कवितांचे प्रदर्शन, हस्तलिखित तयार केल्याने स्वनिर्मितीचा आनंद मिळाला.

उपक्रमाची कार्यपद्धती

उपक्रम क्र.१) दोन अक्षरी यमक जुळणारे शब्द संग्रह:


कविता लेखन करण्यासाठी यमक जुळणारे शब्दांच्या आवश्यकता यमक म्हणजे काय, ते कवितेच्या ओळी तयार करताना कुठे कधी वापरायचे याविषयी मार्गदर्शन केले, या शब्दांचा सराव करून घेतला.

उपक्रम क्र.२) तीन अक्षरी यमक जुळणारे शब्द संग्रह:

पाठ्यपुस्तकात तसेच वाचनालयातील कवितेच्या पुस्तकातील तीन अक्षरी शब्द शोधायला लावले. त्यांचे वाचन/लेखन करून वहीत शब्द लिहिण्यास सांगितले. ज्यादा सरावासाठी स्वतः आठवून शोधून शब्द लिहिण्याचा सराव घेतला. किशोर मासिक मधील बालकविता ऐकविल्या त्यामुळे शब्द संपत्तीत वाढ झाली.

उपक्रम क्र.३) : तज्ञांचे मार्गदर्शन





श्री. चंद्रकांत निकाडे (बाल साहित्यिक तथा अध्यक्ष, बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर) डॉ.अंजली रसाळ (वरिष्ठ अधिव्याख्याता डाएट, कोल्हापूर)

१) विद्यार्थ्यांना कविता लेखनाविषयी मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. अंजली रसाळ (वरिष्ठ अधिव्याख्याता डाएट, कोल्हापूर) यांना बोलवण्यात आले. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यासाठी लेखन करणे महत्त्वाचे माध्यम आहे. कविता ही सहजासहजी उत्स्फूर्त न होणारी कला आहे. मनामध्ये भाव विचार आले की वहीत नोंद करून ठेवणे. सुरुवातीला यमक न जुळणाऱ्या दोन/ चार ओळीतील मुक्त छंद प्रकारातील रचना लिहावी. मग यमक जुळणाऱ्या चारोळ्या लिहाव्या,, लेखनातील टप्पे पार करत आठ ते दहा ओळींची कविता लिहावी,, एखादा विषय घेऊन त्यावर आपल्या भावना व्यक्त कराव्यात याविषयी सखोल ओघवत्या शैलीमध्ये मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी, भावात्मक विकास होण्यासाठी, सृजनशीलता विकास करावी. त्यांनी अगदी मोजक्या शब्दात कविता लेखन विषयी मार्गदर्शन केले.

२) श्री. चंद्रकांत निकाडे (बाल साहित्यिक तथा अध्यक्ष, बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर) यांनी विद्यार्थ्यांना कविता लेखनाबाबत मार्गदर्शन केले. घटना, विचार, परिस्थिती भावना या टप्प्यावर कविता लेखन केली जाते. यमक म्हणजे काय? यमक कविता रचनेत कुठे, केव्हा वापरायचे याबाबत माहिती दिली. सुरुवातीला विद्यार्थ्यांनी दोन ओळींची, चार ओळींची कविता लेखन करण्याचा सराव करावा. यमकाचे योग्य ठिकाणी मांडणी करू शकतो. ऱ्हस्व , दीर्घ ,अक्षर, लघु, गुरु, क्रम यांची रचना प्रमाणबद्ध करावी, कविता अल्प अक्षरी असावी, कमी शब्दात जास्त असे सांगणारी असावी, विद्यार्थ्यांकडून त्यांची दोन-चार ओळींची कविता तयार करून घेऊन यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेदरम्यान त्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यास पुस्तक भेट दिले.

उपक्रम क्र.४) आवडणाऱ्या विषयावर कविता लेखन

विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यासाठी दोन ओळींची /चार ओळींची कविता मुक्त छंद प्रकारात लिहून घेतली आवश्यक ते मार्गदर्शन केले, लेखन करताना अक्षरांचा लघु, गुरु ,क्रम कसा ठरवायचा ,ऱ्हस्व व दीर्घ अक्षरांचा योग्य वापर याचा सराव करून घेतला.





उपक्रम क्र.५) विषयावर कविता लेखन

मुक्तछंद प्रकारात आवडणाऱ्या विषयावर कविता लिहून सराव घेतल्यानंतर अधिक सरावासाठी एखादा विषय देऊन त्यावर कविता लेखन कसे करायचे त्याचे मार्गदर्शन केले सराव करून घेतला. मुक्त छंद प्रकार म्हणजे काय कविता अल्प अक्षरी लेखन कसे करावे. यांचे स्वतः कविता लेखन करून विद्यार्थ्यांकडून सराव करून घेतला. उदा. आई, ,झाड, ,निसर्ग,, पाऊस, शिक्षक यासारखे विषय देऊन त्यांचा सराव घेतला.

उपक्रम क्र.६) काल्पनिक कविता लिहिणे


विषय देऊन कविता उत्तम प्रकारे रचना करू लागले त्यानंतर पुढील टप्पा काल्पनिक विषय देऊन कविता रचना करणे सुरुवातीला मी अशा कवितांची रचना कशी करावी सांगितले. अशा कवितांचे समज पूर्वक वाचन, कवितेतील मध्यवर्ती कल्पना, असे स्पष्टीकरण बाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांकडून सराव करून घेतला. विद्यार्थ्यांमध्ये गुणात्मक बदलाबरोबर भावनात्मक बदल व्हावा यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले, परी, बाहुली,

पंढरीचा पांडुरंग यासारख्या विषयावर विद्यार्थ्यांनी खूप छान आशय मांडणी केली.


उपक्रम क्र.७) हस्तलिखित व काव्यगंध कविता संग्रहाचे प्रकाशन

विद्यार्थ्यांनी रचलेल्या कवितांच्या हस्तलिखित तयार करून घेतले, त्याच कविता शब्दबद्ध करून काव्य गंध हा कवितासंग्रह तयार केला, हृदय प्रकाशन पोहाळे यांनी हा कवितासंग्रह प्रकाशित केला.

हस्तलिखित



काव्यगंध कविता संग्रह





काव्यगंध प्रकाशन सोहळा

कार्यवाही करताना आलेल्या अडचणी व त्यावर उपाय योजना उपक्रम राबवताना

उपक्रम राबवताना काही अडचणी, समस्या आल्या त्यावर योग्य उपाय योजना करून मात केली या अडचणी पुढील प्रमाणे :-

१) उपक्रमांतर्गत बालकविता पुस्तके, बालपुरवण्या असणे आवश्यक होते.

खाजगी वाचनालय वर्तमानपत्र स्टॉल मधून तसे शालेय ग्रंथालयामधून काही पुस्तके उपलब्ध करून विद्यार्थ्यांना वाचण्यास दिली अशा प्रकारे अडचणीवर मात केली.

२) मराठी शब्दकोश उपलब्ध नव्हता.

लेखन करताना शब्दांचे रचना व्याकरण दृष्ट्या सदोष असणे आवश्यक आहे. ऱ्हस्व व दीर्घ शब्दांचा योग्य ठिकाणी वापर लघु गुरु क्रम रचनेत कसा प्रमाणबद्ध करावा मराठी शब्दकोश उपलब्ध करून तसेच, मराठी व्याकरण पुस्तक विकत आणून देऊन ही समस्या दूर केली.

३) हस्तलिखित निर्मितीसाठी साहित्याचा अभाव

स्वरचित कवितांचे विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात हस्तलिखित तयार करण्यासाठी साहित्य उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांनी मित्राच्या वाढदिवसानिमित्त वर्गात स्केचपेन,, खोडरबर,, प्रोजेक्ट पेपर भेट देऊन साधनांची उपलब्धता केली. त्यामधून विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लागली.

४) शुद्धलेखन सरावाचा अभाव

कविता लेखन करताना शब्दांची मांडणी प्रमाणबद्धपणे कशी करावी याची माहिती मुलांना नव्हती. योग्य रचनेचा सतत सराव घेऊन लेखन कौशल्याचा विकास केला. ऱ्हस्व दीर्घ शब्दांची मांडणी सराव घेऊन मार्गदर्शन करून तज्ञांचे मार्गदर्शन कार्यशाळा घेऊन लेखन कौशल्य विकसित केले.

वरील अडचणीवर सुयोग्य मार्ग काढून उपक्रम यशस्वी केला.

उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या झालेले सकारात्मक बदल :

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबत भावनिक विकास घडवून आला.विद्यार्थ्यांच्या झालेले बदल पुढील प्रमाणे :

१. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा व कल्पनाशक्तीचा विकास झाला.

2. मनातील भावना व्यक्त करण्यासाठी कविता लेखनाची संधी मिळाली.

3. कविता समजपूर्वक वाचून आपले मत तसेच कवितांचा असे आपल्या भाषेत सांगू लागले.

4. संगीत वाद्यांचा सहाय्याने कविता सादर करू लागले.

5. कविता लेखन करताना शब्दांचा लघु गुरु क्रमाचा विचार करून प्रमाणबद्ध कवितेची रचना करू लागले.

6. शब्दसंपत्तीत वाढ झाली.

7. स्वरचित कवितांचे प्रदर्शन हस्तलिखित तयार केल्याने स्वनिर्मितीचा आनंद मिळाला.

8. अभिलेखन स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाली.

9. दिलेल्या विषयावर कविता लेखन करू लागले.

10. स्व कल्पनेने काल्पनिक कविता लेखन करू लागले.




11. काव्यमैफलीचा आस्वाद घेता आला.


12. विद्यार्थ्यांच्या कवितेला दिवाळी अंकांमध्ये प्रसिद्धी मिळाली.

13. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली तर शाळा, शिक्षक, यांनासदर उपक्रम विद्यार्थी गुणवत्ता वाढीस नक्कीच मार्गदर्शक ठरला.

मुख्याध्यापक जयवंत चौगले, सौ. ऊर्मिला तेली व सर्व शिक्षक यांच्या सहकार्यातून हा उपक्रम यशस्वीरित्यापूर्ण पूर्ण झाला.

मराठी बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या कविता लेखन स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त .





करी मनोरंजन जो मुलांचे। जडेल नाते प्रभुशी तयाचे।।


नों.क्र. एफ/१०३२५/को/दि.७/२/१९९५ सहा.नि.महा./१०४३४/कोल्हापूर दि:२९/१२/१९९४

मराठी बालकुमार साहित्य सभा,
कोल्हापूर यांच्यावतीने
सन २०२२/२३ मध्ये घेण्यात आलेल्या

कु.वैष्णवी रघुनाथ किरुळकर
केंद्रीय प्राथमिक शाळा, वेतवडे

हिने [illegible] मिळविल्याबद्दल
हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे. दि.२८ एप्रिल, २०२३

परशराम आंबी, कार्यवाह | नसीम जमादार, कार्याध्यक्ष | शिकांत पाटील, उपाध्यक्ष | चंद्रकांत निकाडे, अध्यक्ष




अभिप्राय

'काव्यलेखनातून स्व अभिव्यक्ती विकास'

वेदिय प्राथमिक शाळा वेतवडे, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर या शाळेतील मुलींचा नवोपक्रम खेतला हे खरं झाल. विद्यार्थ्यांना मराठी भाषा साहित्य वाचायाची, लिहायाची संधी मिळाली व त्यांना भाल मिळाल. अंजली रसाळ मॅडम व निखाडे सर व सर्व शिक्षक यांनी जाणे आर. टी बरगे साहेब व या सर्वांनी प्रोत्साहन दिले. काव्यगंध हे पुस्तक तेली मॅडमांनी संपादन केले, व मा आर. टी बरगे साहेब यांनी पुस्तकाचे प्रकाशन केले व पुस्तक वाटली तेली मॅडमांचे आभार कि आज मुलींच्या कामी आली तेली मॅडमांनी कवितेची आवड निर्माण करून, प्रामाणिकपणे मुलींना कविता लिहायला शिकवल्या, त्यामुळे मुले स्वत: लिव्हार करून आपले मत लिहू लागले. काव्यगंध हे पुस्तक तेली मॅडमांनी संपादन केले म्हणून मी त्यांचे आभार मानतो.

नाव - कु. आवळी सर्जेराव पवेली
वही - इ.१ली.



"गावाचा सर्वांगिण विकास हेच ग्रामपंचायतीचे ध्येय"

ग्रामपंचायत वेतवडे
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

• पाणी उकळून पिउ या. • पाच वर्षाच्या आतील मुलांचे लसीकरण करुन घ्या. • शुद्ध पाणी वापरा. • घर परिसर स्वच्छ ठेवा. • घरकुल, शौचालयाचे अर्ज करा. • प्लास्टीक कचरा टाकू नका.

जावक क्रमांक- २०२३/२४ दिनांक: ०३ / ०८ /२०२३

कोविना लेखनातून स्व अभिव्यक्ती विकास हा नवीन उपक्रम केंद्रीय प्राथमिक शाळा वेतवडे

ताहसूचा : पन्हाळा,जिल्हा:कोल्हापूर

या शाळेत इयत्ता ४ थी व ५ वी मधील विद्यार्थ्यांसाठी वी. प्रमिला अनिल तेली यांनी राबविला आहे.

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा विकास होणे,काव्यलेखनाची व सृजन दिसतेचा विकास होणे यासाठी हा उपक्रम राबविला आहे.

भाषा ही मानवाला लाभलेली महान शक्ती आहे. भाषेमुळे विचार शक्ती विकसित होते.

मुलांच्या अभिव्यक्तीला प्रोत्साहन देवरा उपक्रम शाळेत राबण्यात मुळे विविधांगी नावकीच मराठी साहित्यात बालसाहित्य निर्माण होईल.

केंद्रीय प्राथमिक शाळा वेतवडे या नवीनतपूर्ण उपक्रम राबविल्याबद्दल वी. प्रमिला अनिल तेली,मुख्याध्यापक श्री जयवंत चौगले व शिक्षक वृंदाचे मनःपूर्वक अभिनंदन.

तसेच पुढील शैक्षणिक कार्यास खूप खूप शुभेच्छा.

RAP
सरपंच
ग्रा.पं. वेतवडे, ता. पन्हाळा
जि. कोल्हापूर

काव्य संग्रहाचे प्रकाशन



दैनिक हिंदुसम्राट शुक्रवार दि. ०१/०९/२०२३

वेतवडे येथील केंद्रीय प्राथमिक शाळेतील बाल कवयित्रींच्या 'काव्यगंध' या काव्य संग्रहाचे प्रकाशन

कळे (हिंदुसम्राट प्रतिनिधी अनिल सुतार यांजकडून):-वेदीय प्राथमिक शाळा वेतवडे ता. पन्हाळा या शाळेतील बाल कवयित्रींच्या काव्यगंध या काव्यसंग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.यासाठी सहाय्यक शिक्षिका ऊर्मिला अनिल तेली यांनी कविता लेखनातून स्व अभिव्यक्ती विकास या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन केले होते. सदर पुस्तकाचे प्रकाशन शाळेतील विद्यार्थिनींच्याहस्ते करण्यात आले. ऊर्मिला तेली यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांची सृजनशीलता वाढीस लागणे.सुप्त गुणांचा विकास होणे ,आत्मविश्वास निर्माण होणे ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इयत्ता ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रमाची फलश्रुती म्हणजेच काव्यगंध काव्यसंग्रह ची निर्मिती.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांची लेखन क्षमता वाढावी, विद्यार्थ्यांच्यात नवनिर्मितीचा विकास व्हावा, त्यांच्या मनातील भावना व्यक्त करण्याचे व्यासपीठ म्हणजे लेखन होय असे मत कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आर. टी. बरगे यांनी व्यक्त केले. मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक जे.डी चौगले यांनी केले.कार्यक्रमास गावचे उपसरपंच शिवाजी पाटील , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य तसेच श्रीमती कलकुटकी ,पी. पी. दळवी ,श्री ड. एम. म्हावरी,डी.ए पाटील हे शिक्षक उपस्थित होते.या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी शिवाजी मानकर ,री निकाडे ,डॉ



मंडळवार दि. २१/०३/२०२३

दैनिक हिंदुसम्राट

मराठी साहित्यामध्ये सर्वात आधी कवितेचा जन्म झाला -चंद्रकांत निकाडे

कळे (हिंदुसम्राट प्रतिनिधी अनिल सुतार यांजकडून):-पदना, विचार,पतिपत्ती ,भावना या चार हत्यावर कवितेचे लेखन केले जाते.अक्षर म्हणजे काय? ते कसे? कोणत्याही तरीच सदस्य तरीच श्रीमती कलकुटकी साहित्यामध्ये सर्वात आधी कवितेचा जन्म झाला आणि त्यानंतर इतर साहित्य निर्मिती झाली असे मत बालसाहित्यिक ,तरीच बालकुमार साहित्य सभा ,कोल्हापूर अध्यक्ष चंद्रकांत निकाडे यांनी वि.म.रोही केले होते. इयत्ता ६ वी व ७ वी मधील विद्यार्थ्यांसाठी हा अभिनव उपक्रम आयोजित केला होता.या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे प्रास्ताविक प्रमिला अनिल तेली यांनी केले. मार्गदर्शनानंतर सादितलेल्या भागातर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यात आले, अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुस्तके भेट देण्यात आली.कार्यक्रम प्रसंगी डाएट कोल्हापूरचे प्राध्यापक डॉ. सी.शेख ,अभिव्याख्याता अंजली रसाळ ,गटशिक्षणाधिकारी शिवाजी पाचवर ,केंद्रप्रमुख ,आर. टी. बरगे ,केंद्रीय मार्गदर्शक निजामे. यावेळी व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कोल्हापुरचे प्राध्यापक डॉ. सी.शेख ,अभिव्याख्याता अंजली रसाळ ,गटशिक्षणाधिकारी शिवाजी पाचवर ,केंद्रप्रमुख ,आर. टी. बरगे ,केंद्रीय मार्गदर्शक निजामे. यावेळी विद्यार्थ्यांनी कविता लेखन करताना कोणती काळजी घ्यावी ,डी.ए पाटील ,म्हावरी, श्रीमती कलकुटकी यांचे सहकार्य लाभले .यं तयं ११वचे काव्यलेखनाविषयी मार्गदर्शन केले.सदर सरपंच,उपसरपंच ,सदस्य , शालेय व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष व शिक्षिका उपस्थित होते.

संकेत स्थळे : -

1. https://youtu.be/uo-Dmu018fs
2. https://you.tu.be/AQKeGSGWqA
3. https://you.tu.be/BiBFVAZ7CWA
4. https://you.tu.be/-iqxH5hlpE

परिशिष्ट ब

पूर्व व उत्तर चाचणी

प्रश्नावली

विद्यार्थ्याचे नाव:..... **एकूण गुण - २०**

शाळेचे नाव : ..... **प्रत्येक प्रश्न — २ गुण**

ह. क्र. प्राप्त गुण -

१. तुम्ही कोण कोणत्या बालकविता वाचल्या आहेत?

२. दोन अक्षरी यमक जुळणारे शब्द लिहा जसे फळा मळा

3. यमक जुळणारे शब्दांचा वाक्यरचनेत वापर करा.

एक होती परी
केस तिचे सोनेरी
घाली कपडे.....

४. माझी शाळा या विषयावर दोन ओळींची काव्यपंक्ती तयार करा.

५. बागेत फुले रंगीबेरंगी
लाल हिरवे पिवळे
त्यावर उडते फुलपाखरू
ठिपके त्यावर निळे. या कवितेचे समाज पूर्वक वाचन करा.

6. वरील कविता वाचा व तिचा थोडक्यात असे लिहा.

7. वरील कवितेला योग्य शीर्षक द्या.

8. झाड आहे हिरवेगार
वारा देते थंडगार
.....
..... या काव्यपंक्तीच्या ओळी पूर्ण करा.

9. गंध मातीचा घेऊन
आला पाऊस मृगाचा
थुई थुई नाचे मोर
फुले पिसारा मनाचा
या काव्य पंक्तीचे रसग्रहण करा.

10. 'आई' विषयी तुमची भावना काव्यलेखनातून व्यक्त करा.

----------**----------




मुलभूत क्षमता वृद्धिंगत करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - स्वातंत्र्यसैनिक मारुती गणपती पाटील आदर्श विद्यानिकेतन अँड ज्युनिअर कॉलेज मिणचे

शाळेचा पत्ता - मिणचे,तालुका हातकणंगले, जिल्हा-कोल्हापूर

शाळेचा ईमेल आयडी - adarshvidyaniketan@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री दत्तात्रय श्रीधर घुगरे

मुख्याध्यापक मोबाईल नंबर - 9922631631

प्रास्ताविक - राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) हे शिक्षणाच्या नव्या युगाची सुरूवात आहे. हे धोरण केवळ पाटीवर लिहून घेतले जाणारे पुस्तक शिक्षण न राहता, विद्यार्थी घडवण्याचा, त्यांना उत्कृष्ट नागरिक, नैतिकदृष्ट्या प्रगल्भ, कौशल्यसंपन्न, आणि समाजशील बनवण्याचा संकल्प आहे.

या संकल्पाची साक्षात अंमलबजावणी करत आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिक मारुती गणपती पाटील आदर्श विद्यानिकेतन अँड ज्युनिअर कॉलेज, मिणचे ही 5 वी ते 12 वी पर्यंतची निवासी शाळा, जिच्या मुख्याध्यापकपदी कार्यरत आहेत डॉ. डी. एस. घुगरे. त्यांच्या नेतृत्वाखाली ही शाळा एक "शिक्षण मंदिर" म्हणून नावारूपाला आली आहे.

या विद्यालयात राबवत असलेले काही उपक्रम :


1. **पर्यावरणपूरक शिक्षणाची दिशा — परसबाग आणि जीवनकौशल्य विकास**

आदर्श विद्यानिकेतन अँड ज्युनिअर कॉलेज, मिणचे या निवासी माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांमध्ये शेतीप्रेम, पर्यावरण संवर्धन आणि स्वावलंबनाची भावना निर्माण करण्यासाठी परसबाग प्रकल्प, पालेभाज्यांचे उत्पादन व जीवनकौशल्यांचा विकास या उपक्रमांवर विशेष भर दिला जातो.

प्रत्येक वर्गासाठी विशिष्ट शेतीक्षेत्र व जबाबदाऱ्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांना वाटून दिल्या जातात. संपूर्ण वर्षाचे नियोजन ठरवून माती परीक्षण, बियाण्यांची निवड, पाणी व्यवस्थापन, सेंद्रिय खते, कीड नियंत्रण यावर प्रत्यक्ष काम केले जाते.

पालेभाज्या, औषधी वनस्पती, फुलझाडे, फळझाडे यांची नियोजनबद्ध लागवड केली जाते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाशी नाते, मेहनतीची सवय, अन्ननिर्मितीची समज आणि शाश्वत जीवनशैलीची जाणीव निर्माण होते.



हा प्रयोग NEP 2020 नुसार कौशल्याधिष्ठित शिक्षण आणि जीवनाशी नाते जोडणारे शिक्षण याचा उत्कृष्ट नमुना ठरतो.

2. देशभक्ती आणि शिस्तीचा संस्कार – NCC व MCC विभाग

या निवासी शाळेत शासनमान्य राष्ट्रीय छात्र सेनेचा (NCC) उपक्रम 2021 पासून प्रभावीपणे राबवला जात आहे. सध्या 50 विद्यार्थी NCC मध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत.

याशिवाय विद्यालयात MCC (Maharashtra Cadet Corps) विभागही कार्यरत असून 100 विद्यार्थी त्यात सहभागी आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, एकता आणि अनुशासनाचे मूल्य जागृत व्हावे यासाठी कारगिल युद्धात सहभागी असलेले मिल्ट्री इन्स्ट्रक्टर विद्यार्थ्यांना नियमित प्रशिक्षण व प्रेरणादायी मार्गदर्शन करतात.

दररोज पथसंचलन, राष्ट्रगीत, सलामी, शिस्त उपक्रम, युद्धप्रशिक्षण, प्राथमिक मदत, सिग्नलिंग यावर भर दिला जातो.

या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्ती आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा निर्माण होते.

हा विभाग शाळेच्या "संस्कारयुक्त व राष्ट्रनिष्ठ विद्यार्थी घडवा" या ध्येयाची पूर्तता करत आहेत.

3.सर्वधर्मसमभावाचे प्रत्यक्ष शिक्षण –

ही निवासी शाळा असून येथे सुमारे ७५० विद्यार्थी विविध जिल्ह्यांतून येऊन एकत्र गुण्यागोविंदाने राहतात. हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन अशा सर्व धर्मांचे विद्यार्थी येथे एकाच छताखाली शिक्षण घेतात. शाळेतील परिपाठ, सण-उत्सव, प्रार्थना, सामूहिक कार्यक्रमांतून सर्व धर्मांचा आदर करण्याचा संस्कार दिला जातो.

सर्वधर्म प्रार्थना, संतविचार, आणि संविधानातील मूल्यांवर आधारित शिक्षण यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहिष्णुता, बंधुभाव आणि एकतेची भावना बळावते. ही शाळा 'वसुधैव कुटुंबकम्' या मूल्याची जिवंत अनुभूती देते.

4. नाविन्यपूर्ण उपक्रमांची शाळा –

आदर्श विद्यानिकेतन, मिणचे ही शाळा शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासावर भर देणारी संस्था आहे. येथे वर्षभर नाविन्यपूर्ण व बहुआयामी उपक्रमांचे नियोजनबद्ध आयोजन केले जाते.




अॅकॅडमी महोत्सवात सर्व विषयांचे प्रात्यक्षिक सादरीकरण, प्रकल्पे व हस्तकला प्रदर्शन होते. गॅदरिंग व क्रिडा महोत्सवात विद्यार्थी नृत्य, नाटक, गायन, मल्लखांब, मैदानी खेळांमध्ये भाग घेतात. पदभ्रमंती उपक्रमातून विद्यार्थ्यांना निसर्ग अनुभव व सामाजिक जाणीव मिळते.

संविधान वाचन, व्याख्याने, व प्रकल्प कार्यशाळांमधून विचारशीलता आणि अभ्यास कौशल्ये विकसित होतात.

आनंददायी शनिवार हा विद्यार्थ्यांसाठी सृजनशीलतेचा आनंद देणारा दिवस असतो. शाळेची नियतकालिके विद्यार्थ्यांची लेखनकौशल्ये वाढवते.

सर्व उपक्रमांचे वार्षिक नियोजन कॅलेंडर तयार करून शिस्तबद्ध अंमलबजावणी केली जाते.

सर्व सण-सोहळे एकत्र साजरे करून एकता, संस्कृती व समविचाराची भावना रुजवली जाते. हे सर्व उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, जबाबदारी, सहकार्य व अभिव्यक्तीचा आत्मविश्वास निर्माण करतात.

5. आरोग्य व्यवस्थापनाची आदर्श प्रणाली –

आदर्श विद्यानिकेतन, मिणचे येथे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास सर्वाधिक प्राधान्य दिले जाते. शाळेत एम.डी. डॉक्टर उपस्थित राहून विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी, सल्ला व मार्गदर्शन करतात. दर महिन्याला वजन व उंची मोजली जाते, त्यानुसार विद्यार्थ्यांच्या शारीरिक वाढीचे निरीक्षण करून आवश्यक उपाययोजना राबवली जाते.

शाळेत शासकीय आरोग्य तपासणी शिबिरे नियमितपणे आयोजित केली जातात. डॉक्टरांच्या देखरेखीखाली विशेष आरोग्य विभाग कार्यरत असून त्यात पोषण, स्वच्छता, वैद्यकीय मदत व आरोग्य शिक्षण दिले जाते.

जेवण विभागही डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार कार्यरत असून विद्यार्थ्यांना संतुलित व पौष्टिक आहार तसेच सकस नाश्ता दिला जातो.

या आरोग्य व्यवस्थेमुळे विद्यार्थी तंदुरुस्त, निरोगी व सक्रिय राहतात आणि त्यांचा शैक्षणिक व क्रीडाप्रदर्शनातही उत्तम विकास होतो.

6. संस्कारक्षम पिढी घडवणे -

संस्कारक्षम पिढी घडवणे, आदर्श नागरिक तयार करणे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, सहकार्य आणि सहिष्णुता,शिस्त आणि जबाबदारी, प्रेम, दया, करुणा,देशभक्ती आणि सामाजिक जाणीव, पर्यावरणाप्रती आदर, मेहनतीची सवय, नीतिमूल्यांची जाणीव या हेतूने विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. अगदी सकाळी प्रार्थनेपासूनच परिपाठामध्ये बोधकथा त्याचबरोबर त्या दिवशी जन्मलेल्या किंवा मृत्यू पावलेल्या थोर व्यक्तींची माहिती विद्यार्थ्यांमार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली जाते,त्याचबरोबर जिथे जिथे विद्यार्थी जाईल,येथे त्याच्यावरती चांगले संस्कार होतील याची काळजी घेतली जाते. उदाहरणार्थ मेसमध्ये जेवण




घेतल्यानंतर जेवण वाया न घालवणे , परिसरामध्ये असलेल्या झाडांची योग्य निगा राखणे, झाडे न तोडणे , परिसर स्वच्छता ठेवणे, आपल्यापेक्षा मोठ्या वयाशी आदराने वागणे देशावरती प्रेम करणे, या गोष्टी विद्यार्थ्यांवरती बिंबवण्याचा प्रयत्न केला जातो. वेगवेगळ्या उपक्रमाचे आयोजन केले जाते व त्यातून एक चांगला नागरिक घडवण्याचा प्रयत्न विद्यालयामार्फत केला जातो.

7.स्पर्धा परीक्षा -

शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये असणाऱ्या स्पर्धा परीक्षांची ओळख व्हावी, त्यांच्यामध्ये स्पर्धा परीक्षा बद्दल असलेली भीती कमी व्हावी, त्याचबरोबर विद्यार्थी आत्मविश्वासाने या स्पर्धा परीक्षांना सामोरे जावेत या हेतूने प्रशालेमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांना विद्यार्थ्यांना प्रविष्ट केले जाते. यात प्रामुख्याने इयत्ता पाचवीसाठी शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय प्रवेश परीक्षा, इयत्ता आठवीसाठी शिष्यवृत्ती परीक्षा, NMMS परीक्षा त्याचबरोबर इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी टिळक विद्यापीठामार्फत घेणारी परीक्षा, त्याचबरोबर इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा, त्याचबरोबर जनरल नॉलेजची GTSE परीक्षा तसेच विज्ञान प्राविण्य परीक्षा, गणित प्राविण्य परीक्षा, चित्रकला ग्रेड परीक्षा इत्यादी स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले जाते.त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असणारी स्पर्धा परीक्षांची भीती कमी होण्यास व या स्पर्धा परीक्षांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतो.

8. क्रीडा -

प्रशालेमध्ये एकूण 22 विविध क्रीडा प्रकारांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते यात प्रामुख्याने हॉकी, खो-खो कुस्ती,हॉलीबॉल,नेटबॉल,थ्रो बॉल,आर्चरी, योगा, रिंग टेनिस, फुटबॉल, बुद्धिबळ, आर्चरी, आट्यापाट्या या खेळांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते या विविध स्पर्धांमधून अनेक विद्यार्थी राष्ट्रीय, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये खेळलेले आहेत व त्यांनी घवघवीत असे यश मिळवलेले आहे. विद्यार्थ्यांनी या मिळवलेल्या यशामुळे शाळेच्या नावलौकिकात भर पडलेला आहे त्याचबरोबर याचा विद्यार्थ्यांना फायदा होऊन अनेक विद्यार्थी खेळाडू सरकारी नोकरीस लागलेले आहेत. आज अखेर राष्ट्रीय 305,राज्य 3126 , विभाग 4259, जिल्हा 5347 या खेळाडूनी विविध स्पर्धेत यश मिळवले आहे. जिल्हा व राज्यस्तरावर आदर्श विद्यानिकेतनने क्रीडा क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.हा विभाग शाळेला वेगळी ओळख निर्माण करून देत आहे याचा आम्हाला अभिमान आहे.




9. कला, चित्रकला, सृजनशीलता :

विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता निर्माण व्हावी त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या हेतूने प्रशालेमध्ये चित्रकला व कार्यानुभव या विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांना वेगवेगळे अनुभव देण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी हस्ताक्षर कार्यशाळा आयोजित केली जाते. विद्यार्थ्यांना चित्रकला ग्रेड परीक्षेला प्रविष्ट केले जाते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना कागदापासून विविध वस्तू बनवणे, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणे, मातीच्या विविध वस्तू बनवणे इत्यादी उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.शालेय शासकीय ग्रेड परीक्षेत आमचे विद्यार्थी उत्तुंग यश निर्माण करत असून आज अखेर ग्रेड परीक्षेत A श्रेणी प्राप्त 62,B श्रेणी प्राप्त 220 , C श्रेणी प्राप्त 241 विद्यार्थी आहेत.

१०.अभ्यासिका

आपली शाळा निवासी असल्यामुळे प्रशालेमध्ये शाळा सुरू होण्यापूर्वी एक तास व शाळा सुटल्यानंतर साडेसहा ते साडेनऊ अशा कालावधीमध्ये अभ्यासिकेचे आयोजन केले जाते. या अभ्यासिकेमध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांचा दैनंदिन अभ्यास त्याचबरोबर अभ्यास करत असताना विविध अडचणींचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. अभ्यासिकेचा हेतू विद्यार्थ्यांच्या मध्ये अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी त्यांना अभ्यासाचे वळण लागावे हा आहे. या अभ्यासिकेस, स्पर्धा परीक्षांची अभ्यासिका ज्यात इयत्ता पाचवी, आठवी शिष्यवृत्ती परीक्षा एनएमएमएस परीक्षा त्याचबरोबर इयत्ता दहावी,इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष अभ्यासिकांचे आयोजन केले जाते जेणेकरून त्यांना अभ्यासामध्ये येणाऱ्या विविध अडचणी दूर होतील.

११. भौतिक सुविधा - सुसज्ज व सुव्यवस्थित शिक्षण परिसर — आदर्श विद्यानिकेतन, मिणचे

आदर्श विद्यानिकेतन, मिणचे ही निवासी शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक व सुसज्ज सुविधा असलेला शिक्षण परिसर आहे. येथे पुरेसे स्वच्छ शौचालय, नीटनेटकी निवास व्यवस्था, स्वच्छ व हवेशीर वर्गखोल्या, तसेच प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा (विज्ञान, गणित, कला) उपलब्ध आहेत.

संगणक कक्ष, एनसीसी कक्ष, मुख्याध्यापक व शिक्षकांचे स्वतंत्र कार्यालयीन कक्ष, तसेच विद्यार्थ्यांच्या अन्नविषयक गरजा पूर्ण करणारा भोजन कक्ष अत्यंत नियोजनपूर्वक रचलेला आहे.

विद्यार्थ्यांसाठी मोठे क्रीडांगण, तसेच अभ्यासासाठी शांत वातावरण असलेली जागा उपलब्ध आहे.

या सर्व सुविधा आरोग्य, शिक्षण, क्रीडा, संस्कार व तंत्रज्ञान यांचा समतोल साधून विद्यार्थ्यांचा समग्र विकास घडवतात.







Minche, Maharashtra, India
R88M+GRM, Minche, Maharashtra 416109, India, Minche, Maharashtra , India
Lat 16.823152° Long 74.311638°
01/03/2025 09:40 AM GMT +05:30
GPS Map Camera
Google


Latitude: 16.821761
Longitude: 74.324999
Elevation: 626.17±17 m
Accuracy: 9.2 m
Time: 01-24-2024 16:41
Note: विद्यार्थ्यांना केळी वाटप
Powered by NoteCam


Latitude: 16.822568
Longitude: 74.324403
Elevation: 625.17±13 m
Accuracy: 5.3 m
Time: 01-25-2024 11:40
Note: परस, बागेतील भाजीपाला देखभाल
Powered by NoteCam






Peth Vadgaon, Maharashtra, India
R8F2+RWQ, Peth Vadgaon, Maharashtra 416112, India
Lat 16.824258°
Long 74.302838°
06/09/24 09:15 AM GMT +05:30
GPS Map Camera
Google




GPS Map Camera
Peth Vadgaon, Maharashtra, India
R8CF+VQC, Vadgaon - Hatkanangale Rd, Peth Vadgaon, Maharashtra 416109, India
Lat 16.821712°
Long 74.324319°
06/08/24 10:10 AM GMT +05:30
Google


Latitude: 16.822217
Longitude: 74.324717
Elevation: 626.17±2 m
Accuracy: 20.8 m
Time: 14-08-2024 12:46
Note: ICT प्रयोगशाळा
Powered by NoteCam
















I AM INNOVATOR



----------**----------

भौतिक सुविधा व शालेय उपक्रमातून विद्यार्थी विकास

"एक पाऊल शाळा विकासाकडे"

शाळेचे नाव - विद्या मंदिर ,लोळाणे

शाळेचा पत्ता - लोळाणे,केंद्र परळे निनाई,तालुका शाहुवाडी,जि.कोल्हापूर

मुख्याध्यापकांचे नाव - श्री अविनाश पुरुषोत्तम राऊत

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ८७६७०३०४८४





प्रास्ताविक

प्रशिक्षित सुजाण आणि प्रभावी नागरिक निर्मितीचे प्रभावी साधन म्हणून **'शिक्षण'** ही बाब अत्यंत महत्वपूर्ण ठरते. 6 ते 14 वयोगटाच्या सर्व मुलांना निःशुल्क प्राथमिक शिक्षण पुरविणे हे शासनाचे अर्थातच सर्व प्राथमिक शाळांचे घटनात्मक दायित्व आहे. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडून भविष्यात उज्वल पिढी घडविण्याकरिता तसेच आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शैक्षणिक पायाभूत सुविधा


निर्माण करण्याकरिता विविध उपक्रम जसे **सर्व शिक्षा अभियान, मा.प्रधानमंत्री पोषण आहार योजना, मा.मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा** इत्यादी राबविण्यात येतात. राज्यातील 6 ते 14 वयोगटाच्या सर्व मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण पुरविण्याच्या उद्देशाने " **समग्र शिक्षा**" हा 1 ली ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाकांक्षी कार्यक्रम शासनाकडून राबविण्यात येतो. सदर कार्यक्रम राबविण्याकरिता प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई ही स्वतंत्र स्वायत संस्था महाराष्ट्र शासनाने निर्माण केली आहे. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत **जिल्हा, तालूका** आणि **शाळास्तरावर** केली जाते.

पंचायत समिती शाहूवाडी कार्यालयापासून अगदी १२ किलोमीटर अंतरावर असलेली व निसर्गाच्या कुशीत वसलेली शाळा म्हणजे विद्या मंदिर लोळाणे. दिनांक **०१ जून १९४९** रोजी विद्या मंदिर लोळाणे शाळेची स्थापना झाली. स्थापने पासून ते आज अखेर ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आजही दिमाखात उभी आहे; ती आपली गावातील शाळा, आपली **जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा लोळाणे** ! विद्या मंदिर लोळाणे शाळेत एकूण इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत चे वर्ग भरविले जातात. शासनाच्या निर्णयाप्रमाणे सर्व शैक्षणिक पायाभूत सुविधा विद्यार्थ्यांना पुरविल्या जातात. शिक्षण संस्कृती,क्रिडा,समुदाय सहभाग असा संयुक्त **शिक्षण सप्ताह** दि. **२२ जुलै ते २८ जुलै २०२४** या कालावधीत विद्या मंदिर लोळाणे शाळेत राबविण्यात आला. त्याच बरोबर **मा.मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा** या अभियानात आम्ही सहभाग घेतला. आमच्या शाळेत शिक्षणा बरोबरच क्रिडा क्षेत्रात क्रिडा संस्कृतीचे संवर्धन व विकास होण्याच्यादृष्टीने विविध क्रिडा सराव व युवक कल्याण विषयक कार्यक्रम राबविण्यात येतात. ह्यामुळे प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वेगाने होत आहे.

सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शालेय **शिक्षण व क्रिडा** क्षेत्रामध्ये **खालील उद्दिष्टांची** पूर्तता करण्यास विद्या मंदिर लोळाणे शाळा कटीबध्द आहे. तसेच या उद्दिष्ट पुर्तीचे सर्व कार्य शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक,पालक व शाळा व्यवस्थापन समिती मार्फत पार पाडले जाते.

- प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावून व त्यामध्ये जीवनोपयोगी शिक्षणाचा समावेश करणे.
- सर्व मुला-मुलींचे निःशुल्क प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे.
- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याबाबतच्या धोरणानुसार शाळेतील विदयार्थीची गळती कमी करुन 100 टक्के उपस्थितीचे उद्दिष्ट साध्य करणे.
- 6 ते 14 वयोगटातील शाळा सोडलेली / शाळेत कधीही न गेलेली, स्थलांतरीत मुलांमुलींकरिता पर्यायी शिक्षणाचे उपक्रम राबविणे.
- विशेष गरजा असलेल्या मुलांना शिक्षणाची समान संधी व सहभाग मिळवून देणे.
- मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी विशेष कार्यक्रम राबविणे.
- शैक्षणिक विकासासाठी असलेल्या केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजना प्रभाविपणे राबविणे.
- प्रधानमंत्री शालेय पोषण आहार योजना प्रखरपणे राबविणे.

शाळेच्या विकासाची कार्यक्षमता अजून जास्त वाढावी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा प्रचार आणि प्रसार अधिकपणे व्हावा ह्या भावनेने **विद्या मंदिर लोळाणे शाळेची यशोगाथा** सादर करीत आहोत.



वाटचाल शाळा विकासाची - इमारतीचे बदलते स्वरूप





पूर्वी (Before)	आज (Today)
• इमारतीच्या दर्शनी बाजुचा काही भाग नादुरुस्त होता. • वृक्ष रोपण प्रमाण कमी होते. • कुंड्या नव्हत्या. • शाळा फलक नव्हते. • ramp नादुरुस्त होता. • पायऱ्या नादुरुस्त होत्या. • रंगकाम, सुशोभिकरणाचा केलेले नव्हते. • खेळाचे मैदान सपाट नव्हते • वर्गखोल्या मध्ये बोलक्या भिंती फलक लेखन केलेले नव्हते. • वाटर फिल्टर नव्हते. • CCTV कॅमेरा बसविला नव्हता.	✓ इमारत दुरुस्त करून घेतली. ✓ जास्त प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. ✓ कुंड्यांमध्ये रोपे लावून विशिष्ट नाव देण्यात आले. ✓ शाळा फलक दर्शिनी बाजूस मोठ्या आकारात लावण्यात आले. ✓ ramp दुरुस्त करण्यात आला. ✓ नादुरुस्त पायऱ्या चिरा लावून दुरुस्त करण्यात आल्या. ✓ शाळेचे गेट व दर्शनी बाजूस इमारतीला रंग देवून सुशोभिकरण करण्यात आले. ✓ खेळाचे मैदान सपाट करून घेतले. ✓ वर्गखोल्या मध्ये हस्ताक्षराने फलक लेखन केले. ✓ वाटर फिल्टर(RO) बसविण्यात आले. ✓ CCTV कॅमेरा बसविला.

दिनांक २८ जून २०२४ रोजी विद्या मंदिर लोळाणे शाळेच्या विकास कामाला सुरुवात केली होती. अतिवृष्टी वादळवारा ह्या मुळे होणारे नुकसान लक्षात घेता शाळेच्या भौतिक वस्तूंमध्ये बदल करणे किंवा त्या दुरुस्त करून घेणे गरजेचे होते. शाळेच्या सर्व वर्ग खोल्या व किचन शेड आतून आणि बाहेरून स्वच्छ करण्यात आल्या ह्यामुळे आता वर्गातील अध्ययन –अध्यापन क्रिया प्रसन्नतेने होऊ लागले.

शाळा रंगकाम














शाळा फलक लावतांना






ओळखपत्र वाटप




विद्यार्थी सुरक्षा



फलक लेखन


शालेय विद्यार्थी सुरक्षा ही विद्या मंदिर लोळाणे शाळेची नैतिक जबाबदारी म्हणून शाळेत दहा हजार किमतीचा रेकॉर्डिंग होत असलेला CCTV कॅमेरा बसविण्यात आला. आता शाळेत विद्यार्थी CCTV च्या निगराणीत शिकतात व त्यामुळे गैरवर्तणुकीला आळा बसला आहे .तक्रार निवारणासाठी **तक्रार पेटी** लावण्यात आली आहे. ह्या सुरक्षा यंत्राबाबत सर्व पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.



सॅनिटरी पॅड (व्हेंडिंग मशीन) प्रशिक्षण



विद्या मंदिर लोळाणे शाळेत **सखी सावित्री समितीची** स्थापना करण्यात आली आहे. सदर समिती कडून विद्यार्थी विद्यार्थिनींच्या सुरक्षतेबाबतची दाखल घेण्यात येते. सॅनिटरी पॅड (व्हेंडिंग मशीन) चा वापर कसा करावा ह्या बाबत शाळास्तर प्रशिक्षण देण्यात आले. नियमित बैठका घेवून विद्यार्थिनींच्या समस्या व इतर समस्या बाबत मार्गदर्शन व सूचना दिल्या जातात. समिती मार्फत विविध कार्यक्रमांचे, कार्यशाळांचे आयोजन केले जाते.



सॅनिटरी पॅड (व्हेंडिंग मशीन)

सखी सावित्री समिती, लोळाणे अंतर्गत कार्यशाळा / उपक्रम



सखी सावित्री समिती लोळाणे





हळदी कुंकू **गजरा भेट देऊन स्वागत करताना** **भेट वस्तू देताना**





संगीत खुर्ची स्पर्धा लिंबू चमचा स्पर्धा तळयात मळयात स्पर्धा चिट्ठी उचला - कृती करा

विद्या मंदिर लोळाणे शाळेत दि. 10/02/2025 सोमवार रोजी सखी सावित्री समिती लोळाणे आयोजित सुवासिनींचा सौख्यभरा हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. **सखी सावित्री समिती लोळाणे** च्या उपाध्यक्षा सौ मेघा इंगळे व सोबत सर्व माता पालक उपस्थिती होती . कार्यक्रमात विविध स्पर्धांचे जसे, **गीत गायन, संगीत खुर्ची, लिंबू चमचा, तळयात मळयात, चिट्ठी उचला कृती करा** आयोजन कार्यात आले होते. सर्व माता पालकांनी संपूर्ण कार्यक्रमाचा आनंद घेतला. काही माता पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी स्पर्धेतील सर्व विजेत्यांना **पारितोषिके वितरण** करून मा. मुख्याध्यापकांनी सर्वांचे प्रति आभार व्यक्त केले.



विजेत्यांना पारितोषिके वितरण करताना मा.मुख्याध्यापक

“ स्वच्छता गृह, वॉशबेसीन/ हँडवॉश स्टेशन ”

“ स्वच्छता मॉनिटर ”



स्वच्छ हँडवॉश स्टेशन



नियमित स्वच्छता गृहाची स्वच्छता



परिसराची स्वच्छता



स्वच्छता मॉनिटर

विद्या मंदिर लोळाणे शाळेत विद्यार्थ्यांच्या अंगी स्वच्छतेची आवड निर्माण करून परिसरात स्वच्छता टिकून राहावी यासाठी विद्यार्थ्यांना **प्रोजेक्ट लेट्स चेंज** अंतर्गत “ **स्वच्छता मॉनिटर** ” म्हणून जबाबदारी घेण्यास प्रोत्साहित केले. **ओला कचरा, सुका कचरा** चे योग्य व्यवस्थापन, वर्ग खोल्यांमध्ये स्वच्छता रहावी ह्या साठी सर्व इयत्तांमध्ये एक स्वच्छता मॉनिटरची निवड करण्यात आली. तसेच सर्व वर्ग खोल्यांमध्ये कचरा पेटी ठेवण्यात आली आहे व वेळोवेळी त्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. सर्व इयत्तांच्या स्वच्छता मॉनिटरांना वेळोवेळी स्वच्छते बाबतचे विविध व्हिडीओ, पी.पी.टी. दाखवून स्वच्छतेचे महत्व पटवून दिले जाते. ह्या बाबत स्वच्छता मॉनिटर शाळा ऑनलाईन नोंदणी करण्यात आली आहे.

“ युवा व इको क्लब व स्काऊट गाईड उपक्रम ”



शाळा परिसर स्वच्छता



वृक्षारोपण

——**विद्या मंदिर लोळाणे शाळेत भारत स्काऊट गाईड,कबबुलबुल युवा व इको क्लब ची स्थापना करण्यात आली.युवा व इको क्लब व स्काऊट गाईड पथक अंतर्गत लेझीम नृत्य,वृक्षारोपण, शाळा व गाव परिसर स्वच्छता त्याच बरोबर सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता विषयक सुविचार लेखन केले जाते. स्वच्छता विषयक प्रभात फेऱ्यांचे आयोजन करून जनजागृती केली जाते.**



“ लेझीम पथक ”

“ मध्यान्ह भोजन योजना ”



सकस आहार भोजन



भांडी स्वच्छता



पिण्याचे पाणी (RO)

विद्या मंदिर लोळाणे शाळेत प्रधानमंत्री पोषण शक्ती योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना **सकस आहार मांसाहारी जेवण, अंडी / केळी,शिरा,लाडू,जिलेबी,बिस्कीट** असे पदार्थ देण्यात येतात,विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात येते. त्याच बरोबर दररोजच्या जेवणाची चव घेण्यात येते व तशी नोंद **चव रजिस्टर** मध्ये ठेवण्यात येते.विद्यार्थ्यांना पिण्यासाठी **WATER फिल्टर RO** चे पाणी देण्यात येते. जेवणापूर्वी जेवणाची सर्व भांडी स्वयंपाकी व मदतनीस यांचे कडून स्वच्छ करून वापरली जातात. पालकांच्या सतत भेटी चालू असतात. सदरच्या मध्यान्ह भोजनेबाबत पालकांनी समाधान व्यक्त केले.

ऐतिहासिक संस्कृती जतन (सन/उत्सव)



दहीहंडी



श्रीकृष्ण जन्माष्टमी



रक्षाबंधन





जयंती/पुण्यतिथी

विद्या मंदिर लोळाणे शाळेत सर्व विद्यार्थ्यांचा, पालक यांचा सहभाग घेवून विविध सन, उत्सव साजरे केले जातात, जसे कि **वारकरी दिंडी, श्री कृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी, बाल गोपाळांची पंगत, रक्षाबंधन** त्याच बरोबर **महापुरुष्यांच्या जयंती, पुण्यतिथी** इत्यादी शालेय सहशालेय उपक्रमातून **ऐतिहासिक संस्कृतीचे** जतन केले जाते.

“ महावाचन चळवळ ”










विद्या मंदिर लोळाणे शाळेत दि.**१६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२४** ह्या कालावधीत **“महावाचन चळवळ ”** उपक्रम राबविण्यात आला. सदरच्या उपक्रमाअंतर्गत वर्तमानपत्र वाचन, बोधपर कथा वाचन, दर्जेदार लेखक कवी यांच्या साहित्याची ओळख इत्यादी कृतीतून वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे,विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे. मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे, त्याच बरोबर अभ्यासक्रम संलग्निकृत भाषा इंग्रजी, हिंदी ची ओळख निर्माण करणे. विद्यार्थ्यांचा **भाषा**

संवाद कौशल्य, **सृजनशील** आणि **व्यक्तिमत्व विकास** साध्य करणे इत्यादी उदिष्टे साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

“ महावाचन शपथ ”





महावाचन. इयत्ता ६ वी. शाळेचे नाव-
दुखणे बोटभर. विद्या मंदिर लोखणे
नाव लेखनी राजेश नाईक

बरेच दिवसांत कोणाची खुशाली कळली नसली, की 'बोटभर चिठ्ठीसुद्धा का नाही पाठवली!' असे म्हणतात. आमच्या वाड्यातल्या एक बाई, 'आवजीनं 'भला बोटभर चिंधीसुद्धा नाही दिली हो', अशी तक्रार करायच्या. आता दहा हात साडीही नीट न पुरणाऱ्या बाई, बोटभर चिंधीचं काय करणार होत्या? असं आम्हांला वाटे.

सांगायचा मथितार्थ असा, की 'बोटभर' हा शब्द अगदी क्षोटंसं, क्षुल्लक अशा अर्थी वापरला जातो; पण माझ्या 'बोटभर' दुखण्यानं मला कसं हैराण केलं, त्याची ही 'हातभर' कहाणी आहे.

कुल्लातरी कडक ठरल्ल बात्यानं ठेचताना (आणि त्याबरोबर हुकड्या-हुकड्या शब्या करताना) एक घाव डुबव्या हाताच्या बोटाच्या वर्मी बसला.



अभिप्राय लेखन

स्वतंत्र वाचन कोपरा

विद्या मंदिर लोळाणे शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी हा मुख्य उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून विद्या मंदिर लोळाणे शाळेत विशिष्ट वाचन कोपरा तयार करून **महावाचन उत्सव** हा उपक्रम मोठ्या उत्साहात सर्व उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या सहभागात घेण्यात आला. उपक्रमापुर्वी जे विद्यार्थी वाचनासाठी टाळाटाळ करत होते ते आज स्वताहून पुढे येऊन शाळेत पुस्तकांचे वाचन करतात व अभिप्राय लिहितात. त्याच बरोबर ज्या विद्यार्थांना वाचन येत नव्हते ते आज स्वयं गतीने प्रभावीपणे वाचन करतात.

“ मतदान जनजागृती ”





शाळा व्यवस्थापन समिती नियमित बैठका व पालक कार्यशाळा



मुख्याध्यापक कक्ष

विद्या मंदिर लोळाणे शाळेमार्फत **गृहभेटी, विविध कार्यशाळा, नियमित मासिक सभा, आढावा बैठका** इत्यादीचे वेळोवेळी आयोजन करून विविध लाभाच्या योजना तसेच आरोग्य विषयक, मतदान विषयक, शाळा पूर्व तयारी विषयक, समाजकल्याण शिष्यवृत्ती योजना इत्यादींविषयी जनजागृती केली जाते.

“ आनंददायी शनिवार ”



क्षेत्र भेट



नकाशे हाताळणे



योगासने



कवायत



कृती शिक्षण(कार्यानुभव)

विद्या मंदिर लोळाणे शाळेत **आनंददायी शनिवार** उपक्रमाअंतर्गत गावातील किराणा **दुकान, देऊळ, दुध संकलन केंद्र** ह्यासारख्या ठिकाणी क्षेत्र भेट त्याचबरोबर **संगीत कवायत, योगासने, वर्गाध्यापानातील गमतीचे खेळ, नकाशे हाताळणे, कोडी सोडविणे**, कार्यानुभव (कृती शिक्षण) अंतर्गत **कागदकाम, मातीकाम, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविणे, रंगकाम** इत्यादी शालेय व सहशालेय उपक्रम घेतले जातात.

बालसभा / स्वयंशासन दिन / स्वयंप्रेरणा दिन



दिनांक २७/११/२०२४ रोजी विद्या मंदिर लोळाणे शाळेत **इ. ६ वी व ७ वी** च्या विद्यार्थ्यांकडून इ. १ली ते ५वी च्या बालकलाकारांसाठी **बालसभे**चे आयोजन करण्यात आले होते , **प्रसंगी प्रश्नमंजुषा,चर्चासत्र,हास्य विनोद,स्वागत गीत गायन,आरोग्याचा कान मंत्र,स्वच्छतेच्या सवयी** इत्यादींचे आयोजन करण्यात आले होते.

शिक्षक दिन /स्वयं शासन दिन

दिनांक ०५/०९/२०२४ रोजी विद्या मंदिर लोळाणे शाळेत **डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन** यांची जयंती साजरी करण्यात आली. त्या निमित्ताने एक दिवसीय **स्वयंशासन दिन** विद्यार्थ्यांच्या स्वयं प्रेरणेतून राबविण्यात आला. वरिष्ठ इयत्तेतील विद्यार्थ्यांनी विविध शिक्षकांची भूमिका साकारली. व मुख्याध्यापक, शिक्षकांच्या निगराणीत दैनिक कामकाज पार पाडले.



एकदिवसीय भूमिका करणारे विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करताना शाळेचे मा. मुख्याध्यापक



शारीरिक शिक्षण क्रिडा सराव





विद्या मंदिर लोळाणे शाळेत दर शनिवार सकाळी परिपाठानंतर शारीरिक कसरत, व्यायाम, योगासने अध्यापक श्री. जाधवर सर यांचे मार्फत देण्यात येतात. त्याच बरोबर दुपार नंतर क्रिडा तासिकेत वर्गनिहाय लहान गट मोठा गटनिहाय मुले मुली यांना स्वतंत्र क्रिडा सराव दिला जातो. **जिल्हा परिषद कोल्हापूर अध्यक्ष चषक क्रिडा स्पर्धा सन 2024-25** अंतर्गत **केंद्रस्तरीय क्रिडा महोत्सवात** वि.मं.लोळाणे शाळेच्या मोठा गट मुले यांनी खो-खो खेळात **द्वितीय** क्रमांक तर मोठा गट मुली यांनी कबड्डी ह्या क्रिडा प्रकारात **प्रथम** क्रमांक मिळवून तालुकास्तरावर प्रतिनिधित्व केले.

विद्यार्थी लाभाच्या योजना



विद्या मंदिर लोळाणे शाळेत सर्व पात्र विद्यार्थ्यांना सर्व लाभाच्या योजना जसे की , मोफत गणवेश, मोफत बूट-पायमोजे,उपस्थिती भत्ता, सावित्रीबाई फुले दत्तक पालक भत्ता, समाजकल्याण शिष्यवृत्ती पुरविल्या जातात.

मोफत गणवेश वाटप करताना शा.व्य.समिती उपाध्यक्ष

आधुनिक तंत्र ज्ञानाचा वापर करून शैक्षणिक गुणवत्तेत वाढ



विज्ञान व स्पर्धा परीक्षा



संगणक माझा मित्र



विविध शैक्षणिक मोबाईल

शाळेतील प्रशिक्षित शिक्षक आधुनिक तंत्रज्ञानाचा जसे की **संगणक, मोबाईल, स्मार्ट TV** चा वापर दैनंदिन अध्ययन-अध्यापनात करतात. अभ्यासक्रमावरील आधारित **शैक्षणिक व्हिडीओ, संभाषणे, परीक्षा पे चर्चा** असे कार्यक्रम दाखविले जातात. विज्ञान विषयासाठी **मायक्रोस्कॉप, दुर्बीण** अश्या अनेक वस्तूंचा वापर प्रात्याक्षिके करताना करण्यात येतो.

निपुण भारत शाळा पूर्व तयारी (इयत्ता १ ली मध्ये प्रवेशित होणाऱ्यांसाठी)





इयत्ता पहिली मध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी **शाळा पूर्व तयारी** मेळाव्याचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. प्रवेशित होणारे ***६ + दाखल पात्र*** विद्यार्थी व पालक ह्या मध्ये सहभागी होतात. सन 2024 -25 च्या शाळा पूर्व तयारी च्या अनुषंगाने 15 ऑगस्ट 2024 रोजी **शाळा पूर्व तयारी (शाळेतील पहिले पाऊल)** **नाट्यरुपी गीत** व **नवभारत साक्षरता गीत** नृत्य स्वरुपात सादर करण्यात आले.

" शालेय आरोग्य मार्गदर्शन कार्यशाळा / तपासणी "



जिल्हा परिषद कोल्हापूर, पंचायत समिती शाहूवाडी आरोग्य विभाग यांचे कडून **तज्ञ वैद्यकीय अधिकारी,आरोग्य सेविका,** मार्फत विद्या मंदिर लोळाणे शाळेत विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी केली जाते. विशेषतः विद्यार्थ्यांची वजन, उंची, लसीकरण ह्या कडे बारकाईने लक्ष दिले जाते. त्याच बरोबर मुख्याध्यापक विनंतीवरून बाल स्वास्थ अधिकारी, आरोग्य सेवक, PHC उपकेंद्र परळे निनाई यांचे कडून वेळोवेळी **सकस आहार, साथीचे रोग , स्वच्छतेच्या सवयी, हात धुण्याचे प्रात्यशिक** यांबाबत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले जाते व विद्यार्थ्यांना उपचार दिले जातात.





शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य व सलाम फाऊंडेशन मुंबई यांचा संयुक्त **" तंबाखू मुक्त आरोग्य संपन्न शाळा "** **(संदर्भ- महा.शासन परिपत्रक २५/११/२०२२ व तंबाखू नियंत्रण कायदा COTPA २००३)** ह्या कार्यक्रमात विद्या मंदिर लोळाणे शाळेने १५/०८/२०२४ रोजी सहभाग घेतला होता व तंबाखू मुक्त शाळा करण्यासाठीचे सर्व नऊ निकषांची पूर्तता केली असल्याने विद्या मंदिर लोळाणे शाळा सन 2024-2026 ह्या **दोन** वर्षांकरिता **" तंबाखू मुक्त आरोग्य संपन्न शाळा "** म्हणून घोषित करण्यात आली व प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

" समुदाय /लोकसहभाग /शैक्षणिक उठाव "



शिवशक्ती - भीमशक्ती मंच लोळाणे चे सदस्य स्वागत स्वीकारताना भेट दिलेला पोडेम (डायस)

लोकसहभाग / शैक्षणिक उठाव हा शाळा विकासाचा मानबिंदू असतो. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे हे शाळेचे प्रथम कर्तव्य आहे परंतु हीच शाळा कायम आपल्या ज्ञानदानाचा ठसा उमटवत कायम टिकून राहावी ह्या साठी प्रत्येकाकडून प्रयत्न होणे आवश्यक आहे. **“ आपली शाळा, आपल्या गावातील शाळा ”** ह्या धारणेतून व **“ जिल्हा परिषद शाळा, माझी शाळा ”** टिकून राहावी ह्या भावनेतून प्रत्येक व्यक्ती शाळा विकासासाठी पुढे येणे गरजेचे असते म्हणून प्रत्येक व्यक्ती पर्यंत पोहोचण्याचा आम्ही संकल्प केला. दि. २६ जानेवारी २०२५, स्वतंत्र भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनी **शिवशक्ती - भीमशक्ती मंच लोळाणे** यांचे कडून विद्या मंदिर लोळाणे शाळेस रुपये ४ हजार किमतीचा **एक पोडेम (डायस)** भेट देण्यात आला. शैक्षणिक उठावाची पहिलीच सुरुवात होती.ह्या एका भेटवस्तूने शाळा विकासात अजुन जास्त पाठबळ मिळाले.

आपली विद्या मंदिर लोळाणे शाळा आता बदलत आहे, शाळा विकासाच्या दिशेने एक एक पाऊल पुढे जात आहे, आपणही शाळा विकासात मदत करून शाळा विकासाचा प्रवाह द्विगुणीत करूया, क्रिडा विषयक पायाभूत सुविधा निर्माण करूया व शाळेला डिजिटल शाळा- एक आदर्श शाळा बनवूया. येत्या दिवसात लोकसहभाग हा शैक्षणिक उठावाच्या दृष्टीकोनातून अधिक प्रमाणात व्हावा असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंद यांचे कडून करण्यात येत आहे.

“ यशोगाथा पुस्तक प्रकाशन सोहळा ”



मान्यवरांच्या उपस्थित यशोगाथा पुस्तक प्रकाशन सोहळा






मान्यवरांचे स्वागत व सत्कार अधिकाऱ्यांचे अनमोल अभिप्राय

विद्या मंदिर लोळाणे शाळेत इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांचा सांगता समारंभ व शाळेची यशोगाथा पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रशासकीय मान्यवर मा.श्री आनंदा सुतार साहेब शिक्षण विस्तार अधिकारी पं. स. शाहुवाडी व श्री कृष्णा कडू साहेब केंद्रप्रमुख केंद्र - परळे निनाई यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तसेच गावचे सरपंच, शा.व्य.समिती अध्यक्ष,उपाध्यक्ष , शिक्षक वृंद, अंगणवाडी सेविका व पालक उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशोगाथा पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

----------**----------

लिंग समभाव व समावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न

शाळेचे नाव - विद्या मंदिर लाटवाडी

शाळेचा पत्ता - लाटवाडी , तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर.

मुख्याध्यापक नाव - श्री. रामचंद्र लक्ष्मण लठ्ठे


मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९५१८३३४३८१

मुख्याध्यापक ईमेल आयडी - ramchandralatthe278@gmail.com

चारशे लोकवस्तीच्या गावात स्वातंत्र्यपूर्वकाळात शाळा नव्हती. गावातील मुले गावाजवळच्या अब्दुल लाटच्या शाळेत शिकायला जात.गावकऱ्यांच्या प्रयत्नाने लाटवाडी मध्ये १९५९ साली पहिलीचा वर्ग भरून शाळा सुरू झाली. चार मुलांपासून सुरू झालेली आमची शाळा २२२ पटाची झाली आहे. १९९५ नंतर चौथीपर्यंत असलेले वर्ग वाढवण्यासाठी तत्कालीन शिक्षकांनी प्रयत्न केला. तेव्हापासून पहिली ते सातवीपर्यंत वर्ग भरतात. गावकऱ्यांच्या सहकार्याने लोकसहभागातून शाळेची उत्तम वाटचाल सुरु आहे. शिक्षणाचे महत्त्व जाणून,गावाकडून शाळेसाठी ४००० चौ. मी. जागा गावठाण क्षेत्रामधील राखून ठेवली. ग्रामपंचायत लाटवाडीकडून शाळेसाठी नेहमीच सहकार्य लाभत आहे. २०२५ सालापासून इयत्ता पहिलीपासून सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू करण्यात आले. तसेच रोटरी क्लब इचलकरंजीच्या मदतीने शाळेसाठी इनव्हरटर दिले . विरुपाक्ष खोत सर व शिक्षकांच्या प्रयत्नातून कूपनलिका खोदण्यात आली तेव्हा पासून पाण्याचा पुरवठा नियमित आहे.वेळोवेळी गरजेनुसार ग्रामपंचायतकडून वंचित विद्यार्थ्यांना गणवेश, गुणानुक्रमे परीक्षेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे व सन्मान केला जातो. स्टेज बांधकाम, मैदान सपाटीकरण, वृक्षलागवड यासारखी विविध कामे पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतकडून सहकार्य मिळत आहे.. ७ वी शिष्यवृत्ती इ. ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा इ. ४ थी व इ. ७ वी प्रज्ञाशोध परीक्षा नवोदय प्रवेश परीक्षा, सैनिक शाळा प्रवेश परीक्षा, क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा, यासारख्या अनेक शालेय सहशालेय उपक्रम लाटवाडी या आपल्या शाळेत उत्साहाने व यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत.

लिंग समभाव व समावेशकता

लिंग समभाव म्हणजे समाजामध्ये आणि कुटुंबामध्ये स्त्री-पुरुषांना समान संधी समान जबाबदाऱ्या घेता येणे, स्त्रियांवर फार मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये अपेक्षांचे ओझे टाकले आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत यापेक्षा आपल्या देशातील महिलांसाठी असुरक्षित म्हणून गणले गेले आहेत, त्यामुळे पुरुषांची मानसिकता बदलणे , समान संधी देण्यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे. समाजाचे काही ठराविक घटकच समान संधीचा अनुभव घेऊ शकतात , तो इतरांनाही मिळायला हवा. आजच्या संगणकीय युगात स्त्रियांकडे क्रीडा, शिक्षण ,आर्थिक, साहित्यिक, सामाजिक अशा अनेक क्षेत्रांमध्ये जबाबदाऱ्या दिल्या गेल्या आहेत. त्या तितक्याच नेटाने पार पाडत आहेत. समाजातील मानसिकतेमुळे मुलींचे घटते जननदर



मुलींचे शैक्षणिक क्षेत्रातील कमी होत जाणारे प्रमाण यासारखे अनेक प्रश्न आज आपल्यासमोर आहेत. म्हणून प्राथमिक शाळेपासूनच मुला-मुलींच्या लिंगभेद समस्या कमी करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्त्री पुरुष समानतेविषयी जाणीवजागृती विद्यार्थ्यांत व्हावी, याकरिता शाळेमध्ये सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत.मुलींना प्रोत्साहन देण्यासाठी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांनी पालकाच्या सहकार्याने प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविलेले आहेत .

1. वर्गातील मुला मुलींची बैठक व्यवस्था

शाळेतील 222 मुलांपैकी 113 मुली आहेत तर 109 मुले आहेत. मुला मुलींची बैठकव्यवस्था करत असताना एका बाजूला मुली व एका बाजूला मुले असे न करता एक मुलगी एक मुलगा एका बेंचवर बसतील अशी व्यवस्था करून स्त्री पुरुष समानतेविषयी त्यांच्या मनामध्ये जागरूकता निर्माण होईल याची काळजी घेण्यात आली आहे.



2. स्त्री पुरुष समानता निर्माण करणारे मनोरंजक खेळ

शाळेतील मुला मुलींची संख्या अधिक असल्याने त्यांच्यामध्ये स्नेह निर्माण होईल या दृष्टीने विद्यार्थ्यांचे विविध मनोरंजक खेळ घेऊन स्त्री पुरुष समानतेविषयी मार्गदर्शन केले जाते .तसेच विविध मनोरंजक खेळ निवडताना कोणताही वाद निर्माण होणार नाही झाल्यास त्याचे निरसन कसे होईल याकडे अधिक

लक्ष दिले जाते. खेळातून समान वागणूक मिळत असल्याचे सांगण्यात येते. विद्यार्थी एकमेकांना सहकार्य करतात.




3. शाळा व विद्यार्थी वर्ग मंत्रीमंडळ



नेतृत्वगुणांचा विकास करण्यासाठी तसेच लोकशाहीची रचना समजावून देण्यासाठी शाळेत व वर्गात मंत्रिमंडळाची स्थापना केली जाते. मुले व मुली समसमान उमेदवार निवडून मतदान प्रक्रियेद्वारे शाळेतील सर्व मुले मुली प्रतिनिधी निवडून देतात शाळेची विशेष बाब म्हणजे बिनविरोध मुख्यमंत्री निवडला जातो. मुख्यमंत्री म्हणून एक वर्षासाठी मुलीची तर दुसऱ्या वर्षासाठी मुलाची निवड केली जाते. मंत्रिमंडळातील प्रतिनिधींची संख्या मुलामुलींसाठी समसमान असते यामुळे वर्चस्व भावना नष्ट होऊन सहकार्य वृत्ती निर्माण होते यामुळे शाळेचे वर्गाचे एकंदरीत कामकाज सहिष्णू पद्धतीने चालते

4. परंपरागत सण समारंभ व खेळ - पारंप

रिक लोकगीत लोकनाट्य लोकनृत्य याद्वारे स्त्री पुरुष समानता विषयी लोकांमध्ये, मुलांमध्ये जागरूकता निर्माण करता येते. शाळेतील मुलांना सणसमारंभ साजरे करताना मुला मुलींचा सहभाग घेतला जातो. उदाहरणार्थ रक्षाबंधनाच्या वेळी मुलांना मुली राखी बांधतात स्नेहपूर्वक मुले मुलींना भेटवस्तू देतात. या प्रकारच्या यथायोग्य अशा प्रासंगिक उपक्रमातून समानतेविषयी सहजतेने मूल्यसंस्कार मुलांवर केले जातात .







5. मुला मुलींचा एकत्रित शैक्षणिक सहलीतील सहभाग



6. स्पर्धा परीक्षेतील मुला मुलींचा एकत्रित सहभाग व यशस्वीता



सांस्कृतिक स्पर्धेत सहभाग व यशस्वीता- विद्या मंदिर लाटवाडी या शाळेत केंद्रस्तर तालुकास्तर व जिल्हा स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना सहभागाची संधी उपलब्ध करून दिली जाते. शाळेतील मुला-मुलींना स्पर्धेत समसमान सहभाग दिला जातो. मिळालेल्या यशाचे मानकरी हे कोणताही भेद न करता मुला मुलींना दिला जातो. शाळेतील विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मुला-मुलींना समसमान संधी दिली जाते.

7. शाळा व्यवस्थापन समितीच्या प्रमुख महिला -



परसबाग निर्मिती व संगोपन







प्रधानमंत्री पोषण शक्ती आहार योजनेअंतर्गत सर्व शाळांना परसबाग उपक्रम राबवण्याकरता प्रोत्साहित केले जाते. शाळेतील मुले व मुली परसबागेत एकत्रित काम करतात. नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्त आपापल्या विचारानुसार सहकार्याने परसबाग उत्तमरीत्या जतन व संगोपन करण्याचे प्रयत्न करतात.

----------**----------

Cultivating Academic and Professional Excellence under Visionary Leadership

CUMMOO JAFFER SULEMAN GIRLS' HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE OF ARTS & COMMERECE

178, KAMBEKAR STREET, MUMBAI- 400 0003
Email : Cummoo_j2005@yahoo.com

HEADMISTRESS : MRS. RUHI NAIYER KAZMI
CONTACT NUMBER : 9920070067
EMAIL ID : ruhikazmi14@gmail.com

SCHOOL MANAGEMENT – PRIVATE AIDED

SCHOOL MEDIUM : URDU (SEMI ENGLISH)

SCHOOL STANDARD : V - XII

TOTAL NUMBER OF STUDENTS : 732


HAJI KAFIL MOHAMED SULEMAN
CHARITABLE TRUST BUILDING

A GLIMPSE OF OUR SCHOOL


Cummoo Jaffer Suleman Girls High School: A Legacy of Empowering Women Through Education Established in 1939, Cummoo Jaffer Suleman Girls High School stands as a beacon of progress and empowerment for generations of young women. Founded by a group of visionary leaders who recognized the urgent need for female education at a time when such opportunities were limited, the school began its journey with a clear mission: to provide quality education to girls and uplift the status of women in society through learning.

As the years progressed, so did the institution. With unwavering dedication from its management and faculty, the school gradually expanded its academic offerings. It was eventually upgraded to a full-fledged secondary school, enabling thousands of girls to complete their Secondary School Certificate (SSC) and take confident steps toward brighter futures. The commitment to excellence in education, combined with a nurturing and inclusive environment, quickly earned the school a reputation for academic distinction and character building.

In 1999, the institution marked a significant milestone with the launch of its junior college, allowing students to seamlessly continue their higher secondary education under the same trusted guidance. This expansion not only addressed the growing demand for girls' education but also ensured that students could pursue their ambitions without the need to travel far from home — a concern especially important for many families in the community.

The school's leadership continued to identify gaps in educational access for women. In 2008, yet another transformative step was taken: the establishment of a degree college for women. This was a historic moment, as it was the first institution of its kind in the vicinity. The opening of the degree college reflected the school management's deep and ongoing commitment to empowering women through every stage of their academic journey, from primary education to university-level studies.

Today, Cummoo Jaffer Suleman Girls Educational Campus serves as a symbol of what can be achieved through vision, dedication, and an enduring belief in the power of education. It continues to evolve, innovate, and inspire, shaping the leaders, educators, and changemakers of tomorrow.




SCHOOL MISSION

Our mission is to create an inclusive and empowering learning environment where every girl student is encouraged to reach her full potential. We are dedicated to nurturing academic excellence, developing essential life skills, and providing opportunities for participation in co-curricular activities. Through personalized guidance, we aim to build confidence, resilience, and leadership qualities in each student, preparing her to become self-reliant, economically independent, and a well-rounded individual. We are committed to empowering our students to make meaningful contributions to society, equipping them with the tools to thrive in both personal and professional spheres.

SCHOOL VISION 2025-2027

To empower every girl student to become a confident, well-rounded individual by nurturing academic excellence, life skills, and co-curricular talents—enabling them to become self-reliant and economically independent contributors to society.



HEADMISTRESS



MRS. RUHI NAIYER KAZMI

(M.A, B.Ed, D.S.M)

THE PRIDE AND PILLARS OF C.J.S SCHOOL

NON TEACHING STAFF



HIGHER SECONDARY STAFF



SECONDARY STAFF



SCHOOL CABINET



CULTIVATING ACADEMIC AND PROFESSIONAL EXCELLENCE UNDER VISIONARY LEADERSHIP



GREEN INITIATIVE: GARDENING ACTIVITY CONDUCTED AT CUMMOO JAFFER SULEMAN GIRLS' HIGH SCHOOL AND JUNIOR COLLEGE

In an effort to promote environmental awareness and hands-on learning, **Cummoo Jaffer Suleman Girls' High School and Junior College of Arts and Commerce** organized a meaningful **Gardening Activity** on its campus. Students from various standards participated actively, turning school grounds into green pockets of learning and care.

Under the guidance of their teachers, students planted saplings, watered plants, and learned the basics of soil preparation, composting, and plant care. Some also created small kitchen gardens using herbs and vegetables, while others focused on beautification with flowering plants.

The atmosphere was filled with enthusiasm as students worked with soil and nature, developing a sense of responsibility and pride in their contribution to the environment.

Learning Outcomes and Positive Impact

This gardening initiative proved to be both educational and therapeutic for students, resulting in several key outcomes:

Environmental Awareness: Students gained firsthand knowledge about plant life, ecology, and the importance of greenery in urban spaces.

Responsibility and Patience: Regular plant care taught discipline, patience, and accountability.

Hands-On Learning: Students learned by doing—understanding the life cycle of plants, composting techniques, and seasonal planting.


Health and Well-being: The activity provided a break from the classroom, promoting mental relaxation and physical movement.

Teamwork and Sharing: Students worked in groups, learning to collaborate and share tasks effectively.

Sustainability Practices: Emphasis on using natural compost and recycled containers fostered sustainable habits.

Love for Nature: Spending time in the garden nurtured a long-term appreciation for nature and green living.

The gardening activity was a refreshing initiative that aligned with the school's vision of promoting experiential learning and environmental stewardship.





PLANTATION DRIVE

LINK :
https://drive.google.com/drive/folders/1n853qEPHU2WcM1BFOrWXknD6BUH0BMu8?usp=drive_link
















CUMMOO JAFFER SULEMAN GIRLS' HIGH SCHOOL AND JUNIOR COLLEGE OF ARTS AND COMMERCE

Students successfully participated in a **Science Exhibition** on campus, offering a platform for young minds to showcase their scientific knowledge, creativity, and innovation.

Students from various standards enthusiastically participated, presenting a wide range of models, experiments, and research-based projects. The exhibits covered topics such as renewable energy, water conservation, robotics, artificial intelligence, human anatomy, space science, pollution control, and sustainable living.

The exhibition was visited by students, teachers, parents, and guests, all of whom were impressed by the clarity, confidence, and originality displayed by the participants.

LEARNING OUTCOMES AND POSITIVE IMPACT

The Science Exhibition left a lasting educational impact and contributed to several key learning outcomes:

Hands-On Learning: Students applied theoretical knowledge to practical projects, deepening their understanding of scientific principles.

Research and Inquiry Skills: The event encouraged students to investigate problems, ask questions, and find solutions using scientific methods.


Innovation and Problem-Solving: Many models reflected creative solutions to real-world issues, promoting innovative thinking.

Presentation and Communication Skills: Explaining their models enhanced students' ability to communicate ideas clearly and confidently.

Confidence and Ownership: Taking responsibility for their own exhibits instilled a sense of pride and achievement in the participants.

Environmental and Social Awareness: Projects often reflected sustainable practices and socially responsible innovations.

Teamwork and Collaboration: Many projects were created in groups, reinforcing the importance of cooperative learning.



DRAMA

LINK:
https://drive.google.com/drive/folders/17vpwNqPtePrCGqnyLRiyvSH8XQwbfPhn?usp=drive_link













CUMMOO JAFFER SULEMAN GIRLS' HIGH SCHOOL AND JUNIOR COLLEGE STUDENTS SHINE IN INTRA-SCHOOL DEBATE COMPETITION

The students of **Cummoo Jaffer Suleman Girls' High School and Junior College of Arts and Commerce** demonstrated exceptional oratory skills and critical thinking during an intra-school debate competition, held in multiple rounds from July 25 to July 28, 2025

Participants from Standards 9 to 15 actively engaged in challenging debates, showcasing their confidence, analytical abilities, and articulate communication. After clearing two competitive rounds, the finalists emerged as winners, making the institution proud.

Their achievement was further enriched by their participation in an exclusive online UK Debate Seminar on July 29, 2025, where they gained international exposure and insight into global standards of debating.

The event was judged by Ms. Sana Gubitra and Ms. Huda Amir Lakdawala, with Ms. Iman Gubitra as the event organizer. The success of this event was made possible through the dedicated efforts of in-charge teachers Ms. Ayesha Chincholkar, Ms. Mehjabeen, and Ms. Mehnaz Patel, who guided and prepared the students with great commitment.


The school extends heartfelt appreciation to Principal Madam Ruhi Kazmi for her constant encouragement and leadership throughout the event.

Learning Outcomes and Positive Impact:

This debate initiative has contributed significantly to students' personal and academic growth. It has:

- Fostered critical thinking, logical reasoning, and quick decision-making.
- Strengthened public speaking, confidence, and articulation.
- Encouraged respectful listening, teamwork, and constructive argumentation.
- Exposed students to international perspectives through the UK Debate Seminar.
- Instilled self-discipline, research skills, and a sense of healthy competition.

Such experiences go beyond academics, empowering students with life skills that will benefit them in their future academic and professional pursuits.









DEBATE

LINK :
https://drive.google.com/drive/folders/1munCxAzwo1y72QqlRbmdZKi_6twf_q70?usp=drive_link

PROCEEDING TOWARDS A TECHNO-SAVVY CAMPUS

At **Cummoo Jaffer Suleman Girls' High School and Junior College of Arts and Commerce**, we are steadily progressing towards becoming a **techno-savvy institution** by integrating digital education and skill-based learning into our curriculum.

Understanding the importance of technology in the modern world, our school and colleges has taken several initiatives to equip students with **essential digital competencies**. We actively teach a range of computer applications and software that not only enhance academic learning but also build practical skills relevant to the job market.

Digital Skill Development at Our College Includes:


•**Tally ERP**– For accounting and financial management skills
•**LibreOffice Suite** – For word processing, spreadsheet analysis, and presentation design
•**HTML Coding** – To introduce students to web design and programming basics
•**Typing Skills** – To improve digital literacy and typing speed
•**Basic Computer Operations** – Including file management, email usage, and internet browsing

These programs are taught through **hands-on practical sessions**, supported by trained faculty and access to computer labs. Students are encouraged to create projects, participate in tech-based competitions, and use these tools in academic assignments.

Learning Outcomes and Positive Impact:

Industry-Relevant Skills: Students gain practical knowledge of software used in real workplaces.
Enhanced Employability: Exposure to Tally, HTML, and office tools prepares students for careers in commerce, administration, and IT.
6. शालेय स्तरावर संशोधनवृत्ती विकसित करणे आणि मूलभूत संशोधनाची बीजं पेरणे.
7. सादरीकरण, संवादकौशल्य आणि गटात काम करण्याच्या क्षमता वाढवणे, जे प्रकल्पाच्या माध्यमातून घडवले जाते.
8. विज्ञान विषयाविषयी आत्मविश्वास आणि आवड निर्माण करणे, जेणेकरून विद्यार्थी भविष्यात विज्ञान क्षेत्रातील करिअर निवडू शकतील.

ध्येय साध्य करण्यासाठी उद्दिष्टे ठरविण्यात आली.

1. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची जाणीव निर्माण करणे, जेणेकरून ते गोष्टींकडे शंका, परीक्षण, निरीक्षण व तर्कशुद्ध विचाराने पाहतील.
2. विद्यार्थ्यांना त्यांच्या आजूबाजूच्या समस्यांवर वैज्ञानिक पद्धतीने विचार करून उपाय शोधण्याची प्रेरणा देणे.
3. राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद यांसारख्या मंचांवर प्रकल्प सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करणे.
4. प्रकल्पाधारित शिक्षणाच्या माध्यमातून मूलभूत वैज्ञानिक संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून शिकवणे.




5. विद्यार्थ्यांमध्ये प्रयोगशीलता, सर्जनशीलता व संशोधनवृत्ती विकसित करणे.
6. गटात काम करण्याच्या, संवाद साधण्याच्या व सादरीकरणाच्या कौशल्यांचा विकास करणे.
7. शालेय अभ्यासक्रमाशी विज्ञान प्रकल्पांचे एकात्मिकरण साधून अनुभवाधारित अध्ययनाची संधी उपलब्ध करून देणे.

वैज्ञानिक दृष्टिकोन व विषयाचे एकात्मिकरण महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.
शालेय अभ्यासक्रमातील विविध विषयांशी, संकल्पनांशी समन्वय विज्ञान प्रकल्पातून दाखविता येतो. जसे

1. भाषा (मराठी / इंग्रजी / हिंदी):
प्रकल्पाचे संकल्पना लेखन, अहवाल लेखन, निरीक्षणांची नोंद, निष्कर्ष मांडणी या सर्व गोष्टी भाषिक कौशल्यांचा वापर करून करता येतात.
विद्यार्थ्यांना प्रकल्प सादरीकरण, पोस्टर सादरीकरण, भाषण, संवाद इत्यादींचे सराव होतो.

2. गणित:
आकडेवारी संकलन, माहितीचे वर्गीकरण, आलेख/तक्ते तयार करणे.
प्रयोगांतील मापन, प्रमाण, सरासरी, टक्केवारी, आलेख आदी गणिती संकल्पनांचा उपयोग.
उदा. "माहितीस्त्रोतांकडून उपलब्ध दररोजचा डेटा" गणितीय रूपात मांडणे.

3. समाजशास्त्र / इतिहास:
वैज्ञानिक विकासाचा सामाजिक प्रभाव, स्थानिक ज्ञान परंपरा, विज्ञान व समाज यांचे संबंध.
प्राचीन भारतातील विज्ञानातील योगदानाचा अभ्यास.
उदा. औषधी वनस्पतींच्या उपयोगाचा सांस्कृतिक इतिहास.

4. कला व हस्तकला:
प्रकल्प प्रदर्शनासाठी पोस्टर, मॉडेल, फ्लेक्स तयार करताना चित्रकलेचा वापर.
विज्ञानाशी संबंधित कल्पनांचे व संबोधांचे सर्जनशील दृश्य स्वरूपात सादरीकरण.
उदा. परसबाग प्रकल्पासाठी टाकाऊ वस्तूंमधून ग्रीन वाॅल , सेंद्रिय बास्केट इ. सारखे मॉडेल बनवणे.

5. पर्यावरण अभ्यास:
जैवविविधता, पर्यावरणीय समस्या, प्रदूषण इत्यादी गोष्टींचा वैज्ञानिक आणि सामाजिक दृष्टीने अभ्यास.
उदा. पाण्याचे नमुने घेऊन त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण व त्याचा स्थानिक प्रभाव अभ्यासणे.




6. शारीरिक शिक्षण / आरोग्य:

विज्ञानातील प्रकल्प आरोग्य, पोषण, व्यायाम यांच्याशी जोडले जातात.
उदा. अन्न व त्याचा शरीरावर होणारा परिणाम, शारीरिक आरोग्याची वैज्ञानिक कारणमीमांसा.

प्रत्यक्ष प्रकल्प अंमलबजावणीस सुरूवात करण्यात आली. - प्रस्तावना

आजच्या बदलत्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञान हे समाजाच्या प्रगतीचे मुख्य साधन ठरले आहे. अशा परिस्थितीत, विद्यार्थ्यांमध्ये शालेय वयातच वैज्ञानिक दृष्टिकोनाची जाणीव निर्माण करणे ही मूलभूत संकल्पना आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे तार्किक, शास्त्रशुद्ध, आणि पुराव्यांवर आधारित विचार करण्याची सवय — जी केवळ पुस्तकातून नव्हे तर प्रत्यक्ष अनुभवातूनच विकसित होते.

या उद्देशाने आमच्या शाळेत विद्यार्थ्यांना विज्ञानातील मूलभूत संकल्पना, निरीक्षण, प्रयोग व विश्लेषण यांचा अनुभव देणारे विविध उपक्रम राबवले जात आहेत. विशेषतः राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद यासारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना संशोधनाची दिशा मिळत आहे.

या प्रकल्पाची अंमलबजावणी करताना इतर विषयांचे एकात्मिकरण करण्यात आले आहे. भाषेचा वापर संकल्पनालेखन व सादरीकरणासाठी, गणिताचा वापर आकडेवारी व विश्लेषणासाठी, समाजशास्त्र व पर्यावरण विषयांचा वापर सामाजिक व नैसर्गिक घटकांच्या अभ्यासासाठी, तर कलाशिक्षणाचा उपयोग सर्जनशील सादरीकरणासाठी करण्यात आला आहे. त्यामुळे हा प्रकल्प बहुविषयात्मक, समग्र आणि कृतीशील शिक्षणाचा आदर्श नमुना ठरतो.


या प्रकल्पाची अंमलबजावणी करताना विद्यार्थ्यांनी एकूण २७ प्रकल्पांची नोंदणी केली असून त्यांनी आपल्या परिसराशी संबंधित समस्यांवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाय शोधण्याचा प्रयत्न केला. शालेय घटक, शिक्षक व पालक यांचे सहकार्य लाभले असून शालेय स्तरावरील नेतृत्व या संपूर्ण प्रक्रियेत सक्रिय राहिले आहे. या सत्तावीस प्रकल्पापैकी **दोन** प्रकल्पाची प्रिस्टेट साठी निवड झाली . त्यानंतर त्यातील एक प्रकल्प 'अळशी बी एक फायदे अनेक' या प्रकल्पाची राज्यस्तरावर निवड झाली. **राज्यस्तरावरून राष्ट्रीय पातळीवर या प्रकल्पाची निवड करण्यात आली**.

प्रकल्पपूर्व कार्यवाही व सहनियंत्रण

कोणताही प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी सुस्पष्ट नियोजन, तयारी व सहनियंत्रण आवश्यक असते. राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेत सहभागी होऊन यश प्राप्त होण्यासाठी काही गोष्टींची अंमलबजावणी शाळेने केली.

खालीलप्रमाणे प्रकल्पपूर्व कार्यवाही करण्यात आली:

१. विषय निवड व गट रचना: यासाठी आठवी नववीच्या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिकांनी मार्गदर्शन करून प्रकल्प कसा तयार करावा, मूलभूत संशोधन काय असते, यासाठी आपल्याला काय काय करावे लागेल याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा केली.



विद्यार्थ्यांशी झालेल्या चर्चेअंती विद्यार्थी सहभागी होण्यास प्रवृत्त झाले. 3 जुलै 2023 या रोजी मुख्याध्यापकांनी ही सभा घेतली. त्यानंतर एका गटात दोन विद्यार्थी घेऊन,विद्यार्थ्यांचे गट करून सर्व विज्ञान शिक्षकांमध्ये त्यांची विभागणी केली.एकूण 30 गट तयार करण्यात आले.प्रकल्पाचा मूळ विषय लक्षात घेऊन स्थानिक व उपयुक्त विषयांची विज्ञान प्रकल्पांसाठी निवड करण्यात आली.

17 जुलै 2023 रोजी शिक्षक सभा घेऊन मुख्याध्यापकांनी शिक्षकांनाही 30 प्रकल्प नोंदविण्यासाठी प्रोत्साहन दिले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रकल्प तयारीस सुरुवात करण्यास सांगितले. तसेच लागणारे सर्व सहकार्य उपलब्ध होईल याची ग्वाही मुख्याध्यापिकांनी दिली. विज्ञानात गोडी असलेल्या विद्यार्थ्यांचे गट बनवून, प्रकल्पाचे उत्तरदायित्व सोपविण्यात आले.

२. प्रकल्प संकल्पना व आराखडा तयार करणे:

शिक्षक सभा- 1 ऑगस्ट 2023 रोजी

मुख्याध्यापकांनी शिक्षक सभा घेऊन मार्गदर्शक शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे उद्दिष्ट, उपप्रश्न, संशोधन पद्धती व कामाची रूपरेषा निश्चित करण्यात आली. 23 ऑगस्ट 2023 रोजी परत एकदा मुख्याध्यापकांनी शिक्षक सहभागी होऊन ३० ऑगस्ट 2023 रोजी पालक सभा आयोजित करून पालकांना त्याबद्दल माहिती दिली.

३. साहित्य व साधनांची योजना:

प्रयोग, निरीक्षण व मॉडेल तयार करण्यासाठी आवश्यक साहित्याची यादी तयार करण्यात आली.आवश्यकतेनुसार पुस्तक, संकेतस्थळे, क्षेत्रीय माहिती, सर्वेक्षण फॉर्म इ. गोष्टी संकलित करण्यात आल्या.

एकूण सहभागी विद्यार्थी. ५४

मार्गदर्शक शिक्षक. ८

४. वेळापत्रक आखणी:

प्रकल्पाच्या विविध टप्प्यांसाठी निश्चित कालमर्यादा व वेळापत्रक तयार करण्यात आले.

प्रत्येक टप्प्याच्या समाप्तीनंतर प्रगती,आलेल्या निष्कर्षांची नोंद ठेवली गेली.


सहनियंत्रण (Monitoring and Co-supervision)

१. शिक्षकांचे सातत्यपूर्ण निरीक्षण:

मार्गदर्शक शिक्षकांनी प्रत्येक गटाची बैठक घेऊन कामाचा आढावा घेतला. प्रगती अहवाल, प्रयोगांचे निरीक्षण व दस्तऐवजीकरण यांचे परीक्षण केले गेले.

२. प्रमुखांचे सक्रिय नेतृत्व:

मुख्याध्यापिकांनी नियमितपणे विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे मनोबल वाढवले. प्रकल्पासाठी आवश्यक मार्गदर्शनात सामाजिक घटकांना सहभागी करून घेतले.



उदा.अळशीच्या सेवनाचा मधुमेहावर होणारा परिणाम यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील, आयुर्वेद क्षेत्रातील डाॅक्टर व व्यक्तींना भेटणे, त्यांच्या मुलाखती घेणे.
सॅनिटरी पॅड या प्रकल्पासंदर्भात मासिकपाळी स्वच्छता या विषयावर तज्ञांची कार्यशाळा व मार्गदर्शन. इ. एन.सी.एस.सी ठाणे जिल्हा समन्वयक यांचे मार्गदर्शन घेतले.
अडचणीच्या वेळी तांत्रिक, मानसिक व आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले.

३. स्वयंमूल्यांकन आणि सुधारणा:

विद्यार्थ्यांनी हाती घेतलेल्या प्रकल्पावर मनापासून व जिज्ञासेने काम केल्याने प्रकल्पातून आपण काय शिकलो, त्यात काय सुधारणा करायची आहे हे स्वतःच अधोरेखित केले. दिलेल्या सूचना व अनुभव लक्षात घेऊन समूहचर्चा, आत्मपरीक्षण आणि फीडबॅकच्या माध्यमातून आवश्यक सुधारणा करण्यात आल्या.

४. पालक व शाळेच्या घटकांचे सहकार्य:

पालकांनी वेळोवेळी पाठिंबा दिला व प्रकल्पामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वृद्धिंगत झाला.शाळेतील इतर शिक्षकांनीही विविध टप्प्यांवर सहकार्य केले.जसे अळशी पासून बनविलेले पदार्थ ठराविक कालावधी सेवन करून त्याचा तपशील देणे.
गुगल फॉर्ममधील माहिती भरून प्रकल्पाच्या संशोधन कामात सहकार्य करणे.

प्रकल्प दरम्यान कार्यवाही व सहनियंत्रण

प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ठोस कार्यवाही नियोजनासोबतच नियमित सहनियंत्रण (Monitoring) करणे अत्यंत आवश्यक असते. हे केवळ प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी नव्हे, तर त्यामागील उद्दिष्टे साध्य होण्यासाठी उपयुक्त ठरते.त्यानुसार २७ प्रकल्प विषय ठरविण्यापासून ते अळशी बी एक फायदे अनेक' हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर सादर होईपर्यंत संपूर्ण कार्यवाही करण्यात आली.

कार्यवाही (Execution):

1. प्रारंभिक नियोजन

प्रकल्प विषय निवड :१२/८/२३
विषय :- अळशी बी एक फायदे अनेक
गट बांधणी (विद्यार्थ्यांचे कार्यगट) – 1. प्रसन्न मरगजे 2. तन्मय पडळकर
मार्गदर्शक शिक्षकांची नेमणूक – 1.सौ शितल बधान 2. सौ प्रियांका दाभाडे
वेळापत्रक व कामाचे विभाजन:-

तारीख.	केलेले काम
१२/८/२३. -	विषय निवड
१५/८/२३ ते. १०/९/२३ -	माहितीचे संकलन
१२/९/२३ ते ३०/९/२३ -	प्रकल्प रूपरेषा




2. साहित्य व साधनांची उपलब्धता

आवश्यक उपकरणे, माहितीपत्रके, नमुने, लेखनसामग्री आदी गोष्टींची यादी व खरेदी/व्यवस्था. २/१०/२३ ते १५/१२/२३ माहिती संकलनाचा उपयोग करून आळशीपासून विविध घटक तयार केले.

3. सर्वेक्षण / निरीक्षण / डेटा संकलन

क्षेत्रीय अभ्यास, माहिती संकलन प्रयोग, निरीक्षण, प्रत्यक्ष अनुभव
२/१/२४ ते १५/८/२४
या कालावधी विविध प्रयोग करून अळशीपासून
1.अळशी लाडू
2.प्रोटीन पावडर
3.प्रोटीन शाम्पू
4.साबण
5.अळशी तेल
6.फेसपॅक
7.उटणे
8.आईस क्यूब
इत्यादी तयार केले.

वरील सर्व वस्तूंचे प्रयोगशाळेत परीक्षण केले.तसेच लॅब टेस्टिंग करून त्याचे परिणाम अभ्यासण्यात आले. २०/८/२४ ते २०/९/२४ या कालावधीत मार्केट सर्वे करून बाजारात उपलब्ध त्याच प्रकारच्या वस्तूंची तुलना करून विश्लेषण केले.

4. आलेख, निष्कर्ष व अहवाल लेखन

प्राप्त माहितीचे विश्लेषण निष्कर्ष मांडणी ३/१/२५ रोजी अंतिम प्रकल्प सादरीकरणासाठी तयारी.

सहनियंत्रण (Monitoring & Co-supervision):

1. शिक्षकांचे नियमित मार्गदर्शन व प्रगतीचे मूल्यांकन - प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शक शिक्षकांकडून चौकशी, दुरुस्ती व सुचना गटाच्या प्रगतीसाठी साप्ताहिक प्रगती अहवाल
2. विद्यार्थ्यांमध्ये स्वयं-अभिप्राय घेणे - त्यांनी काय आत्मसात केले,कोणते अडथळे आले, काय सुधारता येईल याचे संकलन.
3. पालक व शालेय प्रशासनाचे सहकार्य - पालकांचे प्रोत्साहन व सहभाग मुख्याध्यापक व समन्वयकांचे वेळोवेळी निरीक्षण व मार्गदर्शन
4. सहभागी मूल्यांकन - एकत्रितपणे प्रकल्पाच्या टप्प्यांचे पुनरावलोकन. कोणत्या पद्धती प्रभावी ठरल्या, काय सुधारणा करता येईल याचा विचार सातत्याने करण्यात येऊन त्यावर उपाययोजना व अंमलबजावणी करण्यात आली.




प्रकल्प स्तर

रजिस्ट्रेशन. 24 july 2023

तालुकास्तरीय निकाल. 31 oct 2023

जिल्हास्तर

पहिली पायरी- 16 नोव्हेंबर 2023

निकाल.- 16 नोव्हेंबर 2023

दुसरी पायरी - 17 Nov 2023

निकाल. - 18 nov 2023

प्रिस्टेट स्तर - 29 Nov 2023

निकाल - 30 नोव्हेंबर 2023

राज्यस्तरीय — 03 Dec 2023

निकाल - 20 Dec 2023

राष्ट्रीय स्तर - 3 jan 2025

३१ व्या राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद — यशस्वी प्रकल्प प्रवास

मुख्य विषय - आरोग्य आणि कल्याणासाठी परिसंस्था समजून घेणे

उपविषय — १. परिसंस्था ओळखा व समजून घ्या .

२. आरोग्य पोषण व कल्याणाचा विकास.

३. परिसंस्था व आरोग्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक पध्दती

४. स्वावलंबनासाठी परिसंस्था आधारित दृष्टीकोन.

५.परिसंस्था व आरोग्यासाठी तंत्रज्ञानात्मक नवप्रवर्तन.

प्रकल्प नोंदणी व निवड तपशील

एकूण नोंदणीकृत प्रकल्पांची संख्या: 27

नोंदणीकृत प्रकल्पाची नावे -

1.अळशी बी — एक फायदे अनेक

2.गवतापासून कागद निर्मिती

3.स्वत:चा आभासी वास्तविकता हेडसेट डिझाइन करणे


4. Rat Trap

5.गुणांनी उपयुक्त असे भरडधान्य

6.सॅनिटरी पॅडचे दुष्परिणाम व त्यावर उपाय

7.मृदा प्रदूषण


8.विविध फळांच्या सालीपासून पशुखाद्य तयार करणे



9.बहुआयामी शेवगा
10.शेण कुंडी
11.मानव आणि भरडधान्य
12.वनस्पती वाढीवर होणारा चुंबकीय क्षेत्राचा प्रभाव
13.बहुगुणी सिताफळ
14. Nirgundi Mosquito Repellent
15.झाडांच्या पानांपासून कंटेनर बनविणे
16. Egg Shell Uses
17. Greenhouse Effect – Working Model
18. कडधान्य बुरशी नियंत्रक
19. नाचणी उपयुक्तता
20. QR code वापरून विद्यार्थ्यांची माहिती सेव करून त्याचा वापर करणे
21. कोबीतील पीएच ओळखणे
22. औषध व चॉकलेट यातील फरक ओळखणे
23. कोल्ड्रिंक चा वनस्पती वाढीवर होणारा परिणाम
24. मधुमेह नियंत्रक पावडर
25. कोविड नंतर मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम
26. घरगुती नैसर्गिक खत निर्मिती
27. आधुनिक जीवनशैलीचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम अभ्यासणे .

⁑ तालुकास्तरावर निवड झालेले प्रकल्प (एकूण 17)

1. अळशी बी – एक फायदे अनेक
2. गवतापासून कागद निर्मिती
3. स्वतःचा आभासी वास्तविकता हेडसेट डिझाईन करणे
4. Rat Trap
5. गुणांनी उपयुक्त असे भरडधान्य
6. सॅनिटरी पॅडचे दुष्परिणाम व त्यावर उपाय
7. मृदा प्रदूषण
8. विविध फळांच्या सालीपासून पशुखाद्य तयार करणे
9. बहुआयामी शेवगा
10. शेण कुंडी
11. मानव आणि भरडधान्य
12. वनस्पती वाढीवर होणारा चुंबकीय क्षेत्राचा प्रभाव



13. बहुगुणी सिताफळ
14. Nirgundi Mosquito Repellent
15. झाडांच्या पानांपासून कंटेनर बनविणे
16. Egg Shell Uses
17. Greenhouse Effect – Working Model

जिल्हास्तरावर प्रथम फेरीसाठी निवड झालेले प्रकल्प (एकूण 7)

1. अळशी बी – एक फायदे अनेक
2. सॅनिटरी पॅडचे दुष्परिणाम व त्यावर उपाय
3. बहुआयामी शेवगा
4. शेण कुंडी
5. बहुगुणी सिताफळ
6. Egg Shell Uses
7. Greenhouse Effect – Working Model

जिल्हास्तर दुसऱ्या फेरीसाठी निवड (एकूण 4)

1. अळशी बी – एक फायदे अनेक
2. सॅनिटरी पॅडचे दुष्परिणाम व त्यावर उपाय
3. बहुआयामी शेवगा
4. शेण कुंडी

राज्य पूर्वस्तरासाठी निवड (एकूण 2)

1. अळशी बी – एक फायदे अनेक
2. सॅनिटरी पॅडचे दुष्परिणाम व त्यावर उपाय


राज्य स्तरावर निवड (2 प्रकल्प)

1. अळशी बी – एक फायदे अनेक
2. सॅनिटरी पॅडचे दुष्परिणाम व त्यावर उपाय

राष्ट्रीय स्तरावर निवड (1 प्रकल्प)

अळशी बी – एक फायदे अनेक

चुंबकीय क्षेत्राचा वनस्पतीच्या वाढीवर होणारा परिणाम






राज्यस्तरीय राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद २०२३ नाशिक येथे विद्यार्थी व सहभागी शिक्षक
प्रयोगशाळेत प्रयोग करताना विद्यार्थी



राष्ट्रीयस्तरावर सादरीकरण करताना विद्यार्थी व शिक्षक



अळशीयुक्त प्रोटीन पावडर मुख्याध्यापिकांना देताना विद्यार्थी



प्रयोगशाळेत प्रयोग करताना विद्यार्थी



आहारतज्ञ डॉक्टर महेश पाटील यांची मुलाखत घेताना विद्यार्थी



शाळेतील विद्यार्थ्यांना अळशी लाडूचे वाटप करताना सहभागी विद्यार्थी ,मुख्याध्यापिका व शिक्षक



राष्ट्रीय स्तरावर सादर झालेल्या या वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्पाने शाळेची यशोगाथा रचली.

"अळशी बी – एक फायदे अनेक" हा आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेला वैज्ञानिक प्रकल्प राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेमध्ये राष्ट्रीय स्तरावर निवडला जाणे ही संपूर्ण शालेय घटकांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

या प्रकल्पात विद्यार्थ्यांनी अळशी बी (Flaxseed) या पारंपरिक परंतु कमी वापरात असलेल्या अन्नघटकाचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून विविध उपयोगांवर अभ्यास केला. त्यांनी अळशी बीचे औषधी गुणधर्म, पोषणमूल्य, शेतीमधील उपयोग, सौंदर्यप्रसाधनांतील भूमिका व त्याच्या व्यावसायिक शक्यता यांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास केला.

प्रकल्प तयार करताना सर्वेक्षण, प्रयोग, आलेख, आकडेवारी, मॉडेल, आणि सादरीकरणाचे कौशल्य यांचा उत्तम समन्वय साधला. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि मुख्याध्यापिका ,संस्थाचालक व समाजातील तज्ञ व्यक्ती यांचे प्रोत्साहन कामी आले.

थोडक्यात प्रकल्प यशाची सूत्रे :-

1. योग्य विषयाची निवड – अळशी बी सारख्या स्थानिक, उपयुक्त व अनोख्या घटकावर लक्ष केंद्रीत करणे.
2. वैज्ञानिक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास – निरीक्षण, प्रयोग, माहिती संकलन व विश्लेषण यांचा समन्वय.
3. गटकार्य आणि समन्वय – सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडल्या.
4. मार्गदर्शक शिक्षकांचे वेळोवेळी मार्गदर्शन व दुरुस्ती.
5. सर्जनशील सादरीकरण – प्रकल्पाची प्रत्यक्ष उपयुक्तता दाखविणारे मॉडेल्स व प्रभावी पोस्टर.
6. स्वतःच्या परिसराशी जोडलेला, व्यावहारिक उपयोग असलेला विषय.
7. सततचे आत्ममूल्यांकन व सुधारणा करण्याची प्रवृत्ती.

समारोप

"शालेय पातळीवर वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करून विद्यार्थ्यांना विज्ञानातील मूलभूत संशोधनाकडे वळविणे" या उद्दिष्टाच्या दिशेने आमचा हा प्रवास अत्यंत यशस्वी ठरला. "अळशी बी – एक फायदे अनेक" हा प्रकल्प केवळ राष्ट्रीय स्तरावर निवडला गेला नाही, तर विद्यार्थ्यांच्या मनात संशोधनवृत्ती, वैज्ञानिक विचारसरणी आणि आत्मविश्वासही रुजवून गेला.


या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोनातून अध्ययन अनूभूती घेता आली. आपल्या भारतीय परंपरागत, स्थानिक वस्तूंची उपयुक्तता ही जागतिक स्तरावर काम करू शकते.फक्त या शक्यता शोधण्यासाठी मनात येणारी मूलभूत शंका, शंकेचे निरसन करण्यासाठी लागणारा सारासार, सृजनशील विचार आणि प्रयोगशील दृष्टिकोन, प्रयत्न आणि सातत्य यांची आवश्यकता असते.

हा अनुभव आम्हाला व विद्यार्थ्यांना पुढील अनेक वैज्ञानिक क्षेत्रातील वाटचालींसाठी प्रेरणा देणारा ठरेल.

लेखन-
सौ.संगीता प्रकाश पाखले
मुख्याध्यापिका
श्री.केशव रामभाऊ कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, डोंबिवली (पूर्व).

सहकार्य –
सौ.शितल बधान.
सौ.प्रियंका चव्हाण.

संपूर्ण विज्ञान प्रकल्प यशोगाथेचे साहित्य ,चित्रण व संदर्भ खालीलप्रमाणे.....



अळशी बी – एक फायदे अनेक








































अळशी बी एक फायदे अनेक यासाठी वापरण्यात आलेले काही शोध निबंध



(85)

References (संदर्भसूची)

1. © August 2011 / Volume 2 Issue 3 / ISSN : 2349-6002
Flaxseeds : A review
Mr. Shaikh Akbar - Asst Prof. G.M.C. college of Pharmacy Aurangabad
Mr. Mirza Nazish Baig - Lecturer R.B.T. college
Miss. Deshamane Amruta of D. Pharmacy Aurangabad.

2. Food Applications and Health Benefits Related Gut Microbes. Foods 2022, 11, 3707.
https // doi.org / 10.3390 / Foods /1203307.


3. World Journal of pharmaceutical and life sciences WJPLS
www.wjpls.org.
A review over the benefits of flaxseed - a magnetic medicine
Dr. Monica Gupta and Dr. Shruti Sarin
Asso Prof. Dept. of Kayachikitsa Jammu Institute of Ayurveda and Research

4. Pennington Nutrition Series 2007 No.5
Flaxseed
A review of health benefits

गवतापासून कागद निर्मिती



सॅनिटरी पॅडचे दुष्परिणाम व त्यावर उपाय



सावी ग्रुप
महिला सशक्तीकरण
सावीची संकल्पना,
आरोग्याची सुरक्षा !!
"कॅन्सर मुक्त नारी"

Subject: Hygiene and Healthcare practice during Menstruation

Dear Sir/Madam,

We as Saavi group are promoting Good health care practices and safe hygiene during Menstruation among the women folk across the various strata of society.. We are emphasizing on school children because it is during this phase or time the onset menstruation begins.
Educating them at this tender age will create a positive mind set in accepting this nature's biological change in female body and help them in dealing this change hygienecally and confidently.
It's difficult to follow the traditional practices because of the confined space in our modern homes and the subject being taboo to discuss.
Imparting information in the school premises at an early age makes it more comfortable to accept and face the changes confidently.
We also do provide organic sanitary pads at discounted price to the schools, which they can offer to the students too.
In this way the schools also benefit financially.
So I Request you to permit me to conduct some sessions in the school.


Thank you
Yours truly
For Saavi group
Sarika Dhage







POLAROID CAM
100

मुख्याध्यापिकांनी शिक्षकांसाठी वेळोवेळी काढलेल्या सूचना







POLAROID CAM

100

न्यूजपेपर कात्रण

पुढारी

कोतकर विद्यालयाची राष्ट्रीय स्तरावर बाजी

बालविज्ञान प्रकल्पात अळशी बी एक, फायदे अनेकची निवड

डोंबिवली : पुढारी वृत्तसेवा

डोंबिवलीतील उदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ज्ञानमंदिर विद्यासंकुल या शैक्षणिक संस्थेचे के. रा. कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या ३१ व्या राष्ट्रीय बालविज्ञान परीषदेत अळशी बी एक पण फायदे अनेक, या प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली. ३१ व्या राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेत शाळेने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्यासह संशोधन वृत्ती अंगी बाणविण्याच्या दृष्टीने आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांनी २७ प्रकल्प



सादर केले.

यात जिल्हास्तरावर १७ प्रकल्पांची निवड झाली. सर्वच विज्ञान शिक्षकांसह सहभागी विद्यार्थांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यातून महाराष्ट्र पूर्व राज्यस्तरावर ४ प्रकल्पांची निवड होऊन २ प्रकल्पांची निवड करण्यात आली . ९ ते १० डिसेंबर रोजी नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय बालविज्ञान परिषदेत निवड झालेल्या अनेक प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. त्यातील अळशी बीचे फायदे अनेक हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर निवडला गेला. या प्रकल्पात सहभागी झालेल्या विद्यार्थी प्रसन्न मरगजे व तन्मय पडळकर, तसेच मार्गदर्शक शिक्षिका शितल बधान, प्रियंका चव्हाण यांनी सातत्याने पाठपुरावा करून विद्यार्थी व शिक्षकांना प्रोत्साहन देत मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यापिका संगीता पाखले यांचे संस्थेचे अध्यक्ष आशुतोष येवले, सचिव प्रविण पाखले यांच्यासह संचालक मंडळाने अभिनंदन के ले.

My Thane Edition
Dec 14, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in



केंद्र सरकारच्या संरक्षण खात्यातर्फे १ ते १५ डिसेंबरपर्यंत स्वच्छता पंधरवडा राबविला जात आहे. अंबरनाथ शहरातील नेवाली सामग्री अनुसंधान प्रयोगशाळेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत प्रयोगशाळेच्या परिसरात वेथील कामगारांनी स्वच्छता केली, तसेच प्रयोगशाळेचे संचालक आणि शास्त्रज्ञ प्रशांत रोजतकर यांनीही या मोहिमेत सहभाग घेतला. या स्वच्छता पंधरवड्यानिमित्त या प्रयोगशाळेत विविध उपक्रम राबविले जात आहेत. (छाया : महेश मोरे)

शास्त्रज्ञ होण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची वाटचाल

आरोग्याचे फायदे, इंधन बचतीवरील सादर केले प्रकल्प

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : कंटोलीचे आरोग्यवर्धक फायदे, तंत्रज्ञानाची घरून कास, मार्ग शोधू नवे खास, ध्वनी लहरींचा वनस्पतींच्या वाढीवर आणि माती शुद्धीकरणावर होणारा परिणाम, इंद्रधनूचा आस्वाद घ्या, बोटींच्या इंधन बचतीसाठी, व्हॅंचुरी तत्त्वाचा अभ्यास, चित्रांग भृंगेरा या कीटकाचा कीडनाशक म्हणून वापर करणे, नाचणी कॅलियमचा खजिना, पीठ्या इलेक्ट्रिसिटी, अळशीचे विविध फायदे असे विविध प्रकल्प विद्यार्थ्यांनी बुधवारी सादर केले.

राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेत राष्ट्रीय पातळीवर राज्यातून ३० प्रकल्प निवडले गेले आहेत, अशी माहिती राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेचे अध्यक्ष सुरेंद्र दिघे यांनी दिली. श्रीरंग विद्यालय इंग्रजी माध्यमाच्या श्रावणी काटकर आणि अंजली झा यांनी कंटोली हे आहारातील फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा उत्कृष्ट स्रोत असल्याचे सांगत त्यांनी कंटोलीची माहिती गोळा करून हा प्रकल्प सादर केला आहे. श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया स्कूल, ठाणेच्या हृदयम पाठक आणि विश्वयत नौलाखा यांनी पीव्हीसीचा वापर कमी करण्यासाठी व्हॉईस कमांड वापरणे, श्रीरंग विद्यालय इंग्रजी माध्यमाच्या लावण्या पाटील आणि स्वरा मोरे यांनी ध्वनी लहरी केवळ वनस्पतींच्या वाढीस मदत करत नाहीत तर माती शुद्धीकरणाचा दर देखील वाढवतात, याच शाळेच्या जश रायकुंडलिया, हर्ष सिंघी या विद्यार्थ्यांनी सिंथेटिक प्रोटीन पावडर सर्व नैसर्गिक, घरगुती प्रथिने पावडरपेक्षा अधिक प्रभावी आहे, या विश्वासाला आव्हान देणारा प्रकल्प सादर केला.

ठाण्यात झालेल्या कार्यक्रमात विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. या विद्यार्थ्यांसमवेत राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेचे अध्यक्ष सुरेंद्र दिघे.

अळशीपासून शोधले १५ फायदे

होली क्रॉसच्या अडोरा डिमेलो आणि तितिक्षा शेट्टी या विद्यार्थिनींनी पिझो इलेक्ट्रिक ऊर्जेमुळे कंप किंवा दाब याचा वापर करून यांत्रिक ऊर्जेचे रूपांतर विद्युत ऊर्जेमध्ये होते, याचा लेखाजोखा आपल्या प्रकल्पातून मांडला.

के. आर. कोतकर, डोंबिवलीच्या तन्मय पडळकर आणि प्रसन्न मरगजे या विद्यार्थ्यांनी अळशीपासून १५ फायदे शोधून काढले असून, हे फायदे एका तक्त्याद्वारे प्रकल्पातून सादर केले, यावेळी या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक, मुख्याध्यापक उपस्थित होते.

नाचणीच्या खाकऱ्याचा उपयोग

- सरस्वती माध्यमिक विद्यालयातील तन्मय महाजन आणि कृपा सकपाळ या विद्यार्थ्यांनी हंसनाचा कमी वापर, कमी वायू आणि जल प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधनांचा उपसा करण्यावर नियंत्रण हे आपल्या प्रकल्पातून दाखवून दिले.
- डॉ. बेडेकर विद्या मंदिरच्या आर्या जगताप आणि श्रावणी जाधव यांनी चित्रांग भृंगेरा याचा उपयोग नैसर्गिक कीडनाशक म्हणून शेतीसाठी करता येतो.
- याच शाळेच्या तन्मयी भोसले आणि भैरवेश मोरे यांनी नाचणीचा खाकरा तयार करून आणला होता आणि त्याचा हाडांच्या विकासासाठी कसा उपयोग होतो हे सादर केले.

भिवंडी बसस्था चोरट्यांचा सु

लोकमत न्यूज नेटवर्क

भिवंडी : भिवंडी बसस्थानकात भरट्या

चोरट्यांचा वावर वाढला असून पोलिस यंत्रणेचे त्याकडे दुर्लक्ष झाल्याने प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आली आहे. शहराच्या मध्यभागी असलेल्या बसस्थानकातून रोज हजारो प्रवासी भिवंडीतून कल्याण, ठाणे मुंबई, वसई, पालघर, नाशिक आजूबाजूच्या शहर व जिल्ह्यांम प्रवास करत असतात. म बसस्थानकात माणील क दिवसांपासून भुरट्या चोरट्यांचा व वाढला आहे. बसमध्ये चढताना अ उतरणाऱ्या प्रवाशांच्या खिशा

जत्रोफा पासून जैवइंधन निर्मिती



ठाणे येथील प्रेस कॉन्फरस



संदर्भ

1. राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद (National Children's Science Congress) मार्गदर्शक पुस्तिका
2. एनसीईआरटी (NCERT) – विज्ञान व तंत्रज्ञान अभ्यासक्रम
3. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), महाराष्ट्र
4. 'पर्यावरणातील विज्ञान' – विज्ञान विषयाचे अनुभवाधारित शिक्षण साहित्य
5. शालेय प्रयोगशाळा व विज्ञान शिक्षकांचे मार्गदर्शन नोट्स
6. प्रकल्पामध्ये वापरलेले सर्वेक्षण प्रपत्र, प्रेक्षण नोंदी, व इंटरनेटवरील अभ्यासात्मक लेख / शोधनिबंध

आयुर्वेदिक पुस्तकांची नावे

1. चरक संहिता (Charaka Samhita)
– अळशी बीचे गुणधर्म, वात-शामक उपयोग, आणि स्निग्धता याबाबत माहिती सापडते.
2. सुश्रुत संहिता (Sushruta Samhita)
– औषधी वनस्पतींचा शस्त्रकर्मानंतर उपयोग व शरीरासाठी उपयुक्तता सांगितलेली आहे.

3. भावप्रकाश निघंटु (Bhavaprakasha Nighantu)

— अळशी बीसारख्या वनस्पतींचे वर्गीकरण, गुणधर्म व औषधी उपयोगांचा सविस्तर वर्णन.


4. राज निघंटु (Raj Nighantu)

— अळशीसह इतर तैलबीजांवर आधारित गुणविशेष माहिती.

5. द्रव्यगुण विज्ञान (Dravyaguna Vigyan)

— आयुर्वेदातील औषधी वनस्पतींचे गुणधर्म, प्रभाव व शरीरावर होणारे परिणाम.

----------**----------



भौतिक सुविधा व अभ्यासपूरक उपक्रमात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - शिक्षण संस्थेचे अभिनव विद्या मंदिर (मराठी माध्यमिक)

शाळेचा पत्ता - १२५, अभिनव नगर बोरिवली पूर्व ४०००६६

मुख्याध्यापक नाव - श्रीमती प्राची प्रवीण वालकर

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9987851816

मुख्याध्यापक ई-मेल आयडी - ppwalkar@gmail.com



शाळेची स्थापना व विस्तार -

बोरवली स्टेशन पासून एक ते दीड किलोमीटर अंतरावर परंतु मुंबईचे फुफ्फूस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिरव्यागार वनराईने नटलेल्या विविध पक्षांच्या मंजूळ किलबिलाटाने गजबजलेल्या तरीही निरव शांतता असणाऱ्या गर्द झाडीने वेढलेल्या अशा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या बाजूला वसलेल्या अभिनव नगरात 20 जून 1983 रोजी अभिनव नगरातील शिक्षण प्रेमी लोकांनी तळागाळातील तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यातील मुलांच्या आयुष्यात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करून, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात विद्यार्थ्यांना आणण्यासाठी छोटेसे रोपटे रोवले. हळूहळू या छोट्या रोपट्याच्या विविध शाखा विस्तारू लागल्या. मुळातच नफा न तोटा या तत्त्वावर सुरू केलेल्या या शाळेला अनेक समित्या होत्या.

मुख्याध्यापकांचे मनोगत -

१ फेब्रुवारी 2020 रोजी मुख्याध्यापक झाल्यानंतर अनेक आव्हाने समोर होती. ज्यात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक असे अनेक प्रश्न होतेच; पण अशातच 22 फेब्रुवारी 2020 पासून भारतात अनेक ठिकाणी करोनामुळे लॉकडाऊन लागला. खऱ्या अर्थाने अनेक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले. खऱ्या अर्थाने संघर्ष सुरू झाला. त्यातच जून 2020 मध्ये सरकारने ऑनलाईन वर्ग सुरू केले. नॅशनल पार्क सारख्या भागातल्या मुलांना जिथे साध्या फोनला रेंज नसते; तेथे ऑनलाईन वर्ग ही खूप कठीण आणि नवीन दुर्मिळ गोष्ट, पण त्याही परिस्थितीत मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी शिक्षण आपल्या दारी या बाबीचा अवलंब करून मुलांच्या घरापर्यंत शिक्षण पोहोचवण्याची तजवीज करण्यात आली. शिक्षक शाळेत लॉकडाऊनच्या कालावधीतही येत आणि मुलांना स्वतःच्या मोबाईलवर शिकवत असत. अशातच मदतीचा हात पुढे आला तो कोटक एज्युकेशन फाउंडेशनचा, 2020 ऑक्टोबर मध्ये प्रत्येक दहावीच्या मुलाला सुंदरमचा टॅब देण्यात आला. ज्या टॅब मध्ये ऑफलाइन अभ्यासक्रम असल्यामुळे विद्यार्थी अभ्यास करू शकले आणि शिक्षणाच्या प्रवाहात टिकू शकले. यानंतर हळूहळू लॉकडाऊन मधून विद्यार्थी, पालक, शिक्षक बाहेर पडू लागले. परत नवीन आव्हान समोर दिसू लागले ते म्हणजे मुलांची हजेरी. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती हे एक मोठे आव्हान शाळेसमोर 2019 पासूनच होते. त्यातच लॉकडाऊनची भर पडली की काय, कितीतरी विद्यार्थी स्थलांतरित झाले होते. पालकांची आर्थिक परिस्थिती देखील कोलमडलेली होती. लॉकडाऊनमुळे बऱ्याच प्रमाणात सामाजिक बदल झाले होते. तरीही प्रत्येक मुल शाळेपर्यंत आलेच पाहिजे, आलेले मूल शाळेत टिकलेच पाहिजे आणि टिकलेले मूल शिकलेच पाहिजे. या त्रिसूत्रीवर मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनात शिक्षकांनी काम करण्यास नव्या उमेदीने सुरुवात केली.

शिक्षकांच्या जबाबदाऱ्या आणि त्यांच्या गुणांचा नियोजन पूर्वक वापर -

1. श्रीमती प्राची प्रवीण वालकर मुख्याध्यापिका शालेय प्रशासन, शालेय शिस्त, पालक संपर्क, सामाजिक संपर्क, विविध सेवाभावी संस्थांशी संपर्क, शासन पुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी.
2. श्री. काशिनाथ नाईक - शालेय स्वच्छता, शालेय विज्ञान मंडळ, पूरक कार्यक्रम
3. श्री. महेशकुमार वसावे - विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करणे.
4. श्रीमती तेजस्वी निवाते - विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थी सहभाग व तयारी
5. श्री. रामचंद्र गावडे - विविध स्पर्धा परीक्षा तयारी करून घेणे, ऑनलाइन कामे पाहणे.
6. श्रीमती शिंदे - विविध समित्यांचे अहवाल लेखन करणे.
7. श्रीमती नांगे - सांस्कृतिक कार्यक्रम व दिनविशेष यांची तयारी करणे.




8. श्रीमती देवकर - पोषण आहार व विद्यार्थी उपस्थिती नोंद.
9. श्रीमती आवटे - शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षा, एन एम एम एस तयारी, विद्यार्थी गुणवत्ता वाढ.
10. श्री. संख्ये - परीक्षा व्यवस्थापन, क्रीडा स्पर्धा व्यवस्थापन.

शाळेचे वैशिष्ट्ये -

- सीसीटीव्ही यंत्रणा
- बायोमेट्रिक सुविधा
- किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन वर्ग
- रेन वॉटर हार्वेस्टिंग
- सोलर पॅनल
- वायफाय सुविधा
- संपूर्ण शाळा साऊंड सिस्टम कनेक्शन
- कृतीयुक्त शिक्षणावर भर
- नाविन्यपूर्ण उपक्रम (मुलांना जीवनानुभव मिळतील याप्रकारचे)
- स्पोकन इंग्लिश वर्ग
- बोलक्या भिंती
- अद्ययावत विज्ञान प्रयोगशाळा
- डिजिटल वर्ग
- अद्ययावत संगणक कक्ष
- भूगोल व विज्ञान इंटर ऍक्टिव्ह प्रयोगशाळा
- रोबोटिक लॅब
- ग्रंथालय सुविधा
- सुंदर हिरवागार परिसर





- स्पोर्ट्स क्लब
- परसबाग
- गुणवत्तापूर्ण शिक्षक
- मोफत शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा तसेच एलिमेंट्री-इंटरमिजिएट परीक्षा मार्गदर्शन
- अद्ययावत संगणक कक्ष
- आकर्षक व सर्व सोयी सुविधांनी युक्त वर्गखोल्या व इतर परिसर
- तंबाखू व अमली पदार्थ मुक्त शाळा
- प्रोजेक्ट द्वारा शिक्षण
- सुसज्ज शौचालय
- एक्वागार्ड पाणी सुविधा
- पोषण आहार
- शिवी मुक्त शाळा उपक्रम
- नियमित आरोग्य तपासणी (विद्यार्थी, शिक्षक,पालक)
- समुपदेशन
- करियर कौन्सिलिंग
- माजी विद्यार्थी संघ
- पालकांसाठी शिवणकाम व संगणक वर्ग
- मुलांना कौशल्य युक्त शिक्षणाचे वर्ग





Soil
is life.
Let's
conserve
it.




विविध विषयावर मार्गदर्शन सत्र




अद्ययावत विज्ञान प्रयोगशाळा


शाळेची सुंदर परसबाग
Soil
is life.
Let's
conserve
it.


सहशालेय उपक्रमांचे आयोजन


पुस्तक
वाचण्याचे
फायदे
बोलक्या भिंती


कृतीयुक्त शिक्षण


सुसज्ज प्रयोगशाळा
Computer lab


सांस्कृतिक कार्यक्रम


पाककला कौशल्य

शाळेतील सुविधा -

- ✓ विविध NGO मार्फत गरजू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत
- ✓ मोफत गणवेश
- ✓ डिजिटल शाळा
- ✓ मोफत लेखन साहित्य
- ✓ मोफत छत्री वाटप
- ✓ ग्रंथालय
- ✓ संगणक कक्ष
- ✓ क्रीडा मैदान
- ✓ मुबलक क्रीडा साहित्य
- ✓ सुंदर परस बाग
- ✓ मध्यान्ह भोजन व पूरक आहार
- ✓ मोफत पाठ्यपुस्तके
- ✓ मोफत बूट
- ✓ ग्रीन बोर्ड (dustless) सुविधा







विद्यार्थी लाभार्थी योजना -

- १)आर्थिक मदत विविध NGO मार्फत
- २) वह्या, पुस्तके लेखन साहित्य
- ३) आदिवासी शिष्यवृत्ती योजना
- ४) विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी विशेष मार्गदर्शन
- ५) वर्षातून एकदा फ्री चेकअप मार्गदर्शन व उपचार
- ६) विटामिन डी ची गोळी सहा महिन्यातून एकदा
- ७) मुलांना स्पर्धा परीक्षा, NMMS शिष्यवृत्ती, एलिमेंट्री-इंटरमिजिएट तसेच गणित संबोध परीक्षेला मोफत मार्गदर्शन
- ८) रेनकोट, स्न्ड्ल वाटप
- ९) मुलांना मोफत पाठ्यपुस्तक वाटप योजना
- १०) विद्यार्थ्यांना भौमितिक साहित्याच्या पेट्या मोफत वाटप
- ११) किशोरवयीन मुलांना मासिक पाळी मार्गदर्शन
- १२) कुमारवयीन मुलांना सुरक्षितता मार्गदर्शन

- ❖ १३) शंभर टक्के उपस्थिती बक्षीस योजना
- ❖ १४) बालसभा आयोजन
- ❖ १५) किशोरवयीन मुलींना हिमोग्लोबिन वाढीसाठी वैद्यकीय मार्गदर्शन
- ❖ १६) दिव्यांग मुलांसाठी सरकारी योजना

विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी घेतलेले उपक्रम -

- o अतिरिक्त पूरक मार्गदर्शन वर्ग (इयत्ता दहावी, शिष्यवृत्ती पाचवी व आठवीसाठी)
- o इयत्ता दहावीसाठी ११ तास अभ्यास शिबिर
- o कृतीयुक्त अभ्यासक्रमासाठी-नावीन्यपूर्ण पाठ
- o विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेटी
- o वाचन कोपरा
- o स्पर्धा परीक्षा वर्ग
- o वाचन-लेखन उपक्रम
- o अक्षरसुधार उपक्रम प्रकल्प
- o निबंध, चित्रकला, वकृत्व, एकपात्री स्पर्धा
- o हस्ताक्षर व चित्रकला स्पर्धा
- o बालसभा आयोजन
- o आनंददायी शनिवार अंतर्गत अभ्यासपूर्वक वर्ग
- o पर्यावरणपूरक कार्यक्रम (वृक्षारोपण प्लास्टिक कचरा-घनकचरा व्यवस्थापन)
- o विज्ञान प्रयोगशाळेचा विद्यार्थ्यांना प्रयोग दाखवण्यासाठी सदोदित वापर
- o विद्यार्थ्यांना पीपीटी निर्मितीचे योग्य मार्गदर्शन
- o विविध सांस्कृतिक कार्यक्रम
- o विविध क्षेत्रातील स्त्री पुरुष यांच्या प्रेरणादायी मुलाखती.








शाळेचा परिसर स्वच्छ करण्याच्या दृष्टीने प्रत्येक दिवशी वर्ग खोली आणि त्याचबरोबरीने पहिला मजला तळमजला आणि सोबत शाळेचा परिसर स्वच्छ केला जातो. शाळेचा परिसर जो विविध झाडांनी बहरलेला आहे त्या झाडांची पाने, फुले पडत असतात तो परिसर आठवड्यात प्रत्येक बुधवारी स्वच्छ करून सर्व पानांचा, फुलांचा कचरा गोळा करून कंपोस्ट खतासाठी वापरला जातो. या कामासाठी मदत होते ती म्हणजे शिपाई दादा संतोष पांचाळ, नेताजी बोभाटे व शिपाई ताई दिपाली यांची. त्याच्या कामाची सुद्धा विभागणी केली असून मंगळवार, गुरुवार संपूर्ण शाळा पुसणे हा त्यांच्या कामाचा नित्याचा भाग झाला आहे.यासोबतच कायम पहिल्या व तळ मजल्यावरील मुला-मुलींच्या शौचालयाची स्वच्छता हा महत्त्वाचा घटक स्वीपर जे सतत स्वच्छता ठेवतात मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे.

उल्लेखनीय कामगिरी -

1. वर्ष 2024 मध्ये पर्यावरण हा जगण्याचा अविभाज्य घटक आहे हे मुलांच्या मनावर सतत बिंबवले. भविष्यासाठी मूल तयार होईल हे लक्षात घेऊन शाळेत निसर्ग मंडळ तर होतेच पण त्या अंतर्गत 'save energy' या प्रकल्पांतर्गत श्रीमती रश्मी जोशी यांचे वर्कशॉप आयोजित करण्यात आले. त्यांनी इयत्ता सातवी ते नववीच्या मुलांना प्रशिक्षण दिल्याने मुलांनी प्रत्यक्ष जुलै ते जानेवारी या कालावधीत जवळजवळ ४०% पर्यंत आपल्या घराचे, कुटुंबाचे विजेचे बिल कमी करून एक चांगला आदर्श विद्यार्थ्यांनी समाजासमोर ठेवला.

2. मैदानावर पडणारा पाला पाचोळा गोळा करून तसेच मुलांनी घरच्या पालेभाज्यांचा , फळभाज्यांचा कचरा (साल-देठ) आणून त्यातून कंपोस्ट खत निर्मिती करून शाळेच्या परिसरातील झाडांसाठी त्याचा वापर करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत मुलांनी जुन्या वहीच्या पानांची दैनंदिनी देखील बनवली, जुन्या कपड्यांपासून पाय पुसणे, टेबलक्लॉथ बनवले, घरच्या ई कचऱ्याचे तसेच शाळेतील ई-कचऱ्याचे व्यवस्थापन केले.प्लास्टिक गोळा करून गार्गी मॅडमच्या NGO ला रिसायकलिंग साठी देखील देण्यात आले. तसेच प्लास्टिकचे टेबल वर्कशॉप ज्यामध्ये मुलांनी चॉकलेट्स व बिस्कीट रॅपर यांच्या सहाय्याने अभ्यासाचे टेबल बनवले. या सर्व कृती कार्याचा परिणाम असा झाला की, आर पूर्व विभागातून विज्ञान प्रदर्शनाच्या वेळी द्वितीय क्रमांकाचे बक्षीस निसर्ग मंडळाला मिळाले.

विशेष बाब -

- ❖ पोषण आहार स्वच्छता सप्ताह दोन ऑक्टोबर ते सात ऑक्टोबर या कालावधीतील उपक्रमांतर्गत नवरात्री स्पेशल या नऊ दिवसात मुलांना प्रत्येक दिवशी इयत्ता पाचवी ते दहावीचे विद्यार्थी विशिष्ट रंगांप्रमाणे डब्यात घरी बनवलेला पदार्थ आणत. याचा परिणाम असा झाला की प्रत्येक विद्यार्थी शाळेत डबा आणू लागला, घरी बनवलेले पदार्थ आरोग्याच्या दृष्टीने योग्य पदार्थ डब्यात आणले जाऊ लागले, सहभोजनाचा आनंद मुलांनी घेतला.
- ❖ पोषण पंधरवडा म्हणून पालकांच्या पाककृती स्पर्धा देखील घेण्यात आल्या. ज्यामध्ये दिशा हरवडे, श्रीमती बेंद्रे, श्रीमती सावंत यांच्या पाककृर्तीना प्रथम तीन क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.
- ❖ आठ मार्च महिला दिनानिमित्त इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गातून आदर्श माता पालकांचा सत्कार करण्यात येतो, तसेच दरवर्षी विविध क्षेत्रातील स्त्रियांना शाळेत बोलवून त्यांच्या क्षेत्रातील विषयांवर विद्यार्थी त्यांच्या मुलाखती घेतात जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यातून प्रोत्साहन मिळते. आतापर्यंत श्रीमती पाटेकर-राजकीय क्षेत्र माजी नगरसेवक, तसेच पोस्ट ऑफिस, पोलीस, ट्रॅफिक पोलीस, फायर ब्रिगेड, सामान्य गृहिणी, माजी विद्यार्थ्यांच्या माता, त्याचप्रमाणे शशिकांत माने सारख्या सैनिकांच्या मातांचा देखील या कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेल्या आहेत. अशा विविध क्षेत्रातील मातापालकांना बोलावून मुलींना प्रोत्साहन motivation म्हणून संवाद साधला जातो.
- ❖ पोषण पंधरवडा व वन्यजीव सप्ताह तसेच एक तास स्वच्छतेसाठी या अंतर्गत एक ऑक्टोबर ते सात ऑक्टोबर आणि त्या दरम्यान असलेली नवरात्री याचे औचित्य साधून पोषण पंधरवडा म्हणून नऊ दिवस विद्यार्थी डब्यात नवरात्रीच्या प्रत्येक दिवसांचा रंग लक्षात घेऊन डब्यात भाजी पोळी, चपाती, भाकरी किंवा घरगुती बनवलेले इतर पदार्थ आणत.
- ❖ शून्य कचरा दिवस सप्ताह, महिना असे उपक्रम घेऊन शाळा नेहमी स्वच्छतेसाठी प्रयत्न करत असते.




- वन्य जीव सप्ताह निमित्त ५ वी, ६ वी च्या विद्यार्थ्यांना राणीचा बाग तर ७ वी, ८ वी च्या विद्यार्थ्यांना माहीम नेचर पार्क या ठिकाणी क्षेत्रभेटीसाठी नेले जाते. आरोग्य, पर्यावरण निसर्ग यांची सांगड घातली जाते ज्यातून मुलांमध्ये पर्यावरणाप्रती प्रेम, आदर तसेच आरोग्य विषयक संवेदना जागृत केल्या जातात.

शाळा व शिक्षक पुरस्कार -


विद्यार्थी व शिक्षक विविध स्पर्धा तसेच परीक्षा यांत सहभागी होत असतात, विविध बक्षीस देखील प्राप्त करत असतात.

- १) रोटरी सायन्स मुंबई, पालघर District आयोजित विज्ञान प्रदर्शन द्वितीय क्रमांक
- २) वकृत्व स्पर्धा - केदार गोखले इयत्ता आठवी
- ३) वाद्य वादन स्पर्धा - केदार गोखले इयत्ता आठवी
- ४) नृत्य स्पर्धा लहान गट व मोठा गट
- ५) शिक्षक वक्तृत्व स्पर्धा - तेजस्वी निवाते प्रथम क्रमांक व शिवाली शिंदे द्वितीय क्रमांक
- ६) आदर्श शिक्षक पुरस्कार श्रीमती निवाते तेजस्वी
- ७) श्रीमती प्राची वालकर यांना आदर्श मुख्याध्यापक म्हणून तालुका व जिल्हा, राष्ट्रीय पुरस्कार, विविध संघटना रोटरी क्लब, लायन्स क्लब यांच्याकडून मिळालेले आहेत.











- **तंबाखू मुक्त शाळा -**

  2019 पासून प्रहार क्लबची स्थापना करून मुलांना वेळोवेळी अंमली पदार्थ, तंबाखू सेवन परिणाम दुष्परिणाम यांची जाणीव डॉक्टर मार्फत केली जाते.

- **शाळेचा नावलौकिक -**

- **कमवा व शिका आणि त्याला अभ्यासाची सांगड -**

  इयत्ता सातवीच्या वर्गातील श्रीमती देवकर यांनी गणिताच्या पुस्तकातील नफा तोटा हे प्रकरण पूर्णपणे पूर्व तयारी, प्रत्यक्ष कृती व परिणाम आणि कमवा शिकवा या संकल्पनेतून पूर्णपणे मुलांना व्यापाराची प्रत्यक्ष कल्पना राबवून अभ्यासक्रम घेतला.

काही वेगळे -

शिक्षण सप्ताह व वाचन सप्ताह -

मुले अभ्यास असो की वाचन तेव्हाच करतील जेव्हा पालकांना व शिक्षकांना ते वाचताना बघतील या विचारातून आणि या अनुषंगाने पालकांसाठी वाचन कार्यक्रम सुरू केला गेला आणि त्यात पालकांनी ही सहभाग घेतला.

रानभाज्या प्रदर्शन व विक्री -

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी मुले पाण्यातून येतात आणि त्यामुळे पावसाळ्यात भरपूर रानभाज्या मुलांना दिसतात, मिळतात मुले आणि पालक ते शाळेत आणतात आणि विकतात. त्याचप्रमाणे 2019 पासून रानभाज्या प्रदर्शन देखील शाळेत भरवण्यात येते.

विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून मुलांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा म्हणून विविध दिनविशेष साजरे करताना मुलांना गायन, निबंध, वकृत्व, काव्य लेखन स्पर्धा आयोजित होतात तसेच मराठी दिन, विज्ञान दिन सारख्या दिनविशेषांच्या वेळी कीर्तन, अभंग, भारुड, विज्ञान नाटिका यांचे आयोजन करण्यात येते. नवनवीन वक्ते, लेखक, वैज्ञानिक यांना बोलावून मुलांना प्रेरणा दिली जाते.

सण उत्सव साजरे करताना विविध धर्म, जाती यांचे सामाजिक भान ठेवून विविध जाती धर्मांचे कार्यक्रम साजरे केले जातात. उदा.रमजान ईद, दिवाळी त्याचप्रमाणे आदिवासी दिवस यांचेही आयोजन करून सामाजिक बांधिलकी व सर्व धर्म समभाव ही मूल्ये रुजवली जातात.

किशोरवयीन मुलींना व मुलांना मार्गदर्शन व जाणीव जागृती केली जाते

विविध क्षेत्रभेटींचे आयोजन नियमितपणे केले जाते.

मुलांना शैक्षणिक विकास बरोबर व्यावसायिक मार्गदर्शन विविध तज्ञ मार्गदर्शकांद्वारे तसेच 'मी माझा वाटाड्या' या उपक्रमाच्या अंतर्गत देखील भविष्यातील व्यवसाय निवडीच्या वाटा यांसाठी मार्गदर्शन केले जाते.

१) विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान

२) विद्यार्थी व्यावसायिक जत्रा



विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासांसोबत त्यांच्यातील कौशल्य विकास देखील महत्त्वाचा हे लक्षात घेऊन विविध कौशल्ययुक्त वर्ग इयत्तावार मुलांसाठी घेतले जातात.

१) मायक्रेन वर्ग इयत्ता सातवी

२) फोटोग्राफी इयत्ता आठवी

३) coding and pad ology

४) जीवन कौशल्य विकास समस्यांना सामोरे जाणे सुलभ व्हावे म्हणून जीवन कौशल्य वर्ग 2021 पासून चालू आहेत मुले त्याचा आनंद घेतात.

५) आनंददायी शनिवार अंतर्गत खरे तर सरकारने 2024 पासून सुरू केले परंतु आमच्या शाळेत 2012 पासून दप्तराविना शनिवार हा कार्यक्रम सुरू आहे. त्या दिवशी विद्यार्थी आवडीच्या गोष्टी परंतु अभ्यासक्रमाशी निगडित असे उपक्रम सुरू आहेत.

६) वाढते शहरीकरण, आई-वडिलांकडे नसलेला वेळ, जागा लहान अशा अनेक संकटांमुळे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी अभ्यासपूर्वक वातावरण मिळत नाही. ही मुले व पालक यांची समस्या जाणून 2017 पासून इयत्ता दहावीच्या मुलांसाठी सकाळी आठ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत अभ्यास वर्ग घेतले जातात. यासाठी विशेष कौतुक शिक्षकांचे कारण शिक्षक स्वतःहून वेळे बाहेर जाऊन येऊन यासाठी काम करतात मुलांना अभ्यासाचे मार्गदर्शन करतात.

७) तळागाळातील विद्यार्थ्यांना हिंदी मराठी सोबतच इंग्रजी आणि त्याचबरोबर एखाद्या परकीय भाषेचे ज्ञान अवगत व्हावे त्यांना त्याच्याविषयी आवड वाटावी, भविष्यात व्यवसाय म्हणून त्याच्याकडे त्यांना पाहता यावे; म्हणून जर्मन भाषा ऑनलाइन प्रशिक्षण वर्ग विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले. विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेतला व लेवल एक पर्यंत मुलांनी परीक्षाही दिल्या.

८) विद्यार्थ्यांच्या कृतीयुक्त शिक्षणावर भर देण्याचा शाळा प्रयत्न करते. अभ्यासक्रम शिक्षकांसाठी तोच तोच असतो, पण मुलांसाठी नवीन असतो. हे जाणून प्रत्येक शिक्षकाने अध्यापन करताना नाविन्यपूर्ण पाठ घ्यावेत. ही संकल्पना शाळेत राबवण्यात येते. त्यातून शिक्षक कमी बोलून पारंपारिक शिक्षण पद्धतीला छेद देऊन विद्यार्थी केंद्रीत शिक्षण पद्धती ज्यातून मूले स्वयं अध्ययनातून शिकतील व असे नाविन्यपूर्ण पाठ घेतले जातात.







काळानुरूप कात टाकली -

बदलत्या काळासोबत समाजाच्या गरजा बदलल्या तसेच शिक्षणाच्या गरजा देखील बदलल्या; विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या शिकण्या आणि शिकवण्याच्या जाणिवा ही बदलल्या, म्हणूनच

अ) संपूर्ण शाळा ही डिजिटल करण्यात आली आणि युवा अनस्टॉपेबल यांच्या सौजन्याने तीन वर्ग प्रोजेक्ट स्क्रीन युक्त करण्यात आले.

ब) कोटक एज्युकेशन फाउंडेशन तर्फे DCR वर्ग तयार केलेला आहे.

क) लायन्स क्लब मार्फत मदत मिळवून स्मार्ट क्लासरूम बनविलेला आहे.

ड) रोटरी क्लब ऑफ बोरिवली मार्फत देखील मदत मिळवून स्मार्ट क्लास रूम बनवला आहे.

इ) संपूर्ण शाळा सीसीटीव्ही अंतर्गत आहे तसेच बायोमेट्रिक व्यवस्थाही आहे

ई) संपूर्ण शाळा (वाय-फाय) आंतरजालाने जोडली गेली आहे.

उ) अत्याधुनिक संगणक कक्ष व ए आय लॅब देखील आहे जेथे विद्यार्थी तंत्रज्ञानाशी जोडलेले आहेत.

ऊ) Rainwater Harvesting हा प्रकल्प Yuva unstoppable यांच्यामार्फत शाळेत लावला आहे.

ए) शाळेत सोलार ऊर्जा प्रकल्प देखील आहे.

ऐ) शाळेची परसबाग आहे.


नाविन्यपूर्ण पाठ


विविध क्षेत्रातील महिला मार्गदर्शन
Walkar


जर्मन भाषा वर्ग


शाळेला वस्तू स्वरूपात भेट : बाक


प्रोजेक्टर चा वापर करून शिक्षण


फोटोग्राफी


कंपोस्ट खत निर्मिती


2023-24
मायक्रेन वर्ग

----------**----------

"उपक्रमांचा झोका घेत दिशा धरू उत्कर्षाची, मिळता क्षमतांची साथ गाठू वाट प्रगतीची."
या उक्तीनुसार शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे पूर्ण नाव - डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा मिरा भाईंदर मनपा. काशी मराठी चार

शाळेचा पत्ता - भाजी मार्केट जवळ पोस्टमिरे तालुका जिल्हा ठाणे

शाळेचा ईमेल.आयडी - Kashischoolmbmc1906@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री.साहेबराव तुळशीराम अहिरे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9224241677


उद्दिष्टे -

1. मूलभूत शिक्षणात गुणवत्ता सुधारण्यासाठी उपयुक्त अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे.
2. कृतीशील, मुलाभिमुख व अनुभवाधारित शिक्षणाचा वापर.
3. मुलांमध्ये आत्मविश्वास, संवाद कौशल्य आणि सामाजिक जाणिवा वाढविणे.
4. पालक आणि समुदायाचा सहभाग घेऊन शिक्षण प्रक्रियेत सहकार्य वाढविणे.
5. तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे.

प्रकल्पाची गरज -

आमच्या शाळेतील पटसंख्या ही जवळपास 2300 च्या घरात गेली आहे.आमची शाळा पहिली ते दहावीची शाळा आहे.पण आमच्या शाळेतील बराचसा विद्यार्थी वर्ग हा हिंदी भाषिक आहे त्यामुळे मराठी भाषेच्या संवादामध्ये त्यांना भरपूर अडचणी येतात. सध्या विद्यार्थी काय तर दैनंदिन जीवनातील व्यक्ती सुद्धा हिंदी भाषेचा जास्त वापर करतो, हिंदीतच बोलतो. मराठी भाषेचा वापर कमी करतात आणि त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी या विविध उपक्रमांचे आयोजन आम्ही मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी शाळा स्तरावर सुरू केले त्यामुळे मुलांच्या क्षमताही वाढल्या आणि त्यांचे ज्ञानही पक्क झाले .

- स्पष्ट उद्दिष्टांची गरज -प्रत्येक उपक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट असावे. उद्दिष्टांमधूनच कोणती क्षमता वाढवायची हे ठरते. उदाहरणार्थ — वाचन स्पर्धा म्हणजे भाषिक क्षमता वाढवणे.
- शिक्षकांची तयारी आणि मार्गदर्शन. शिक्षकांनी उपक्रमाच्या नियोजनासाठी पुरेशी तयारी केली पाहिजे. योग्य प्रशिक्षण, संसाधनांची माहिती आणि मार्गदर्शन गरजेचे असते.
- विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग उपक्रम केवळ प्रदर्शन न राहता, विद्यार्थ्यांच्या सक्रीय सहभागातून शिकवणूक मिळणे गरजेचे आहे. "करून शिकणे" हया पद्धतीने.



- समूहकाम व सहशिक्षणाची संधी.मूलभूत क्षमतांमध्ये सहयोग, संवाद, निर्णय घेणे, नेतृत्व, आत्मविश्वास वाढतो. हे फक्त उपक्रमांमधूनच येते.
- मूल्यांकन व अभिप्राय यंत्रणा - उपक्रमांनंतर विद्यार्थ्यांनी काय शिकले, काय सुधारायचे आहे, याचे विश्लेषण आणि अभिप्राय गरजेचा असतो. यामुळे पुढील सुधारणा करता येतात.
- स्थानीय संदर्भ व जीवनाशी संबंधितता. उपक्रम हा स्थानिक जीवनाशी, सामाजिक प्रश्नांशी किंवा विद्यार्थ्यांच्या अनुभवाशी संबंधित असावा, म्हणजे तो अधिक प्रभावी ठरतो.
- संसाधनांची उपलब्धता, शैक्षणिक साधने, वेळ, ठिकाण, साहित्य – हे सर्व नियोजनपूर्वक उपलब्ध असावे. नसेल तर उपक्रम प्रभावी होत नाही.
- पालकांचा आणि समुदायाचा सहभाग.

समाज आणि पालकांचे सहकार्य मिळाले तर उपक्रम अधिक व्यापक होतो व विद्यार्थ्यांच्या अनुभवात भर पडते. उपक्रम राबवताना केवळ कृती न करता त्या मागची शैक्षणिक गरज, उद्दिष्टे, संसाधने, सहभाग व मूल्यमापन ही सर्व बाजू विचारात घेणे गरजेचे आहे. यामुळेच मूलभूत क्षमतांचा खरा विकास साधता येतो.

खालील बाबींची पूर्तता करण्यासाठी आम्हाला या प्रकल्पाची गरज भासली.

- पुस्तकी शिक्षणाबरोबर अनुभवाधारित शिक्षणाची गरज वाटते.
- विविध प्रकारच्या बुद्धिमत्तेचा विकास होतो.
- शिकण्यात आनंद निर्माण होतो.
- आत्मविश्वास आणि संवाद कौशल्य वाढवता येते.
- एकत्रितपणे काम करण्याची सवय वाढते.
- शाळेबाह्य जगाशी संपर्क वाढतो.
- अभ्यासातील कमजोरी ओळखून योग्य मदत करता येते.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (NEP 2020) कौशल्याधारित शिक्षणाला प्राधान्य मिळते.

प्रकल्पाची तयारी - अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य नियोजन हाच त्याचा प्रभावी मार्ग आहे. प्रथम तर नियोजन नीट करावे लागेल. कोणता उपक्रम कोणत्या महिन्यात घ्यायचा, कसा घ्यायचा त्यासाठी कोणकोणत्या स्पर्धांचा आयोजन करायचं, यानुसार सर्व आखणी करावी लागेल. त्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक पालक आणि समाज सोबत घेऊन विचार विनिमयाने योग्य आखणी केली.

- उद्दिष्ट निश्चित करणे :- उपक्रमातून कोणती मूलभूत क्षमता वाढवायची आहे हे ठरवले.(उदा.: वाचन कौशल्य, गणिती संकल्पना, संवाद कौशल्य, निरीक्षण क्षमता इ.)




- विद्यार्थ्यांची शैक्षणिक पातळी समजून घेणे :- वयोगट, आधीचे ज्ञान, विशेष गरजा यांचा अभ्यास करून उपक्रम निवडा.
- उपयुक्त आणि सर्जनशील उपक्रम निवडणे :- उदाहरणार्थ: वाचन कट्टा, गणित खेळ, विज्ञान प्रात्यक्षिक, नाट्यछटा, बालसभा, चित्रकला, गटप्रकल्प, क्विझ स्पर्धा इ.
- साहित्य व साधनांची तयारी:- लागणारे शिक्षण साहित्य, सहायक साधने, तंत्रज्ञान, वाचनसामग्री आधीच गोळा करावी.
- सुनियोजित वेळापत्रक तयार करणे:- उपक्रम कोणत्या दिवशी, कुठे व किती वेळ चालेल, हे ठरवा.
- शिक्षकांचे भूमिकानिर्धारण: - कोणता शिक्षक कोणती जबाबदारी घेईल — निरीक्षण, मार्गदर्शन, मूल्यमापन याचे नियोजन करा.
- विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित करणे:- सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी, गट तयार करणे, त्यांना भूमिका देणे.
- उपक्रमाचे निरीक्षण आणि मूल्यमापन:- उपक्रमातून मुले काय शिकली हे तपासण्यासाठी साधे मूल्यमापन पद्धती वापरावी.(जसे की: मुलाखत, कृती नोंदी, फीडबॅक फॉर्म इ.)
- दस्तऐवजीकरण:- फोटो, व्हिडिओ, रजिस्टर, विद्यार्थी अनुभव नोंद — यांची नोंद ठेवा.
- अभिप्राय आणि सुधारणा:- पालक, विद्यार्थी व शिक्षक यांचा अभिप्राय घेऊन पुढील उपक्रम अधिक प्रभावी बनवा.

अशाप्रकारे सर्व तयारी करून त्यानुसार सर्व उपक्रम आम्ही शाळेत राबवले त्याचा परिणाम आम्हाला खूप चांगला मिळाला . मुले शाळेत आली त्यांना शाळेची आवड लागली आणि आता ते आपले विचार मराठीत चांगल्या प्रकारे बोलू लागले.गणित,भाषा, विज्ञान,आणि परिसरविषयक क्षमताही त्यांच्या मूळ धरू लागल्या.नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रत्येक विद्यार्थी काहीतरी विशेष आहे.त्यातला तो गुण हेरला तर त्याला योग्य दिशा मिळते आणि तो यशस्वी होतोच.

प्रकल्पाची कार्यवाही -

1.उपक्रमाचे नियोजन

वार्षिक योजना तयार करणे.शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला सर्व उपक्रमांची रूपरेषा तयार केली.(उदा. बालदिन, पर्यावरण दिन, गणपती उत्सव, विज्ञान प्रदर्शन इ. ज्यात वेळेचे व्यवस्थापन नमूद आहे.)

कार्यक्रम दिनदर्शिका तयार करणे.

महिन्यावारी कार्यक्रमांची आखणी व जबाबदाऱ्या निश्चित केल्या.




उद्दिष्ट निर्धारण.

उपक्रमामागे कोणत्या शैक्षणिक किंवा व्यक्तिमत्व विकासाच्या क्षमतांचा विकास अपेक्षित आहे, हे निश्चित केले.

2.पूर्वतयारी

समित्या तयार करणे.

शिक्षक, विद्यार्थी, पालक प्रतिनिधी यांचा समावेश करून समित्या गठित केल्या.

साहित्य व साधनसंपत्ती संकलन.

उपक्रमासाठी लागणारे साहित्य, तांत्रिक साधने, माहिती संकलित केली.

प्रचार व निमंत्रण.उपक्रमासाठी पोस्टर, निमंत्रण पत्रिका, घोषणा इत्यादी तयार करून प्रचार केला.

3. उपक्रमाची अंमलबजावणी (Execution Phase)

विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग.नाटिका, वक्तृत्व, हस्तकला, प्रकल्प, रॅली, समूह गीत आदी स्वरूपांत सहभाग वाढवला. वेळापत्रकानुसार उपक्रम राबवून संयोजनात सातत्य ठेवले.

तंत्रज्ञानाचा वापर -

स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, ऑडिओ व्हिज्युअल साधनांचा वापर उपक्रम अधिक प्रभावी करण्यासाठी केला. पर्यावरण संवर्धनाबाबत जबाबदारीची जाणीव निर्माण होते. सामाजिक सहभाग आणि सहकार्य वाढते .नैतिक मूल्ये जसे की प्रामाणिकपणा, कर्तव्य भावना विकसित होते.जर विद्यार्थ्यांनी प्लास्टिक बंदी किंवा झाडे लावण्याचा उपक्रम राबवला, तर ते पर्यावरणाची जपणूक कशी करावी हे शिकतात. हेमा फाउंडेशन,मुथा फाउंडेशन, सेवा सहयोग मिरा भाईंदर उद्यान विभाग, आरोग्य विभाग, कोटक एज्युकेशन फाउंडेशन, डिकॅथलॉन या मार्फत विविध उपक्रम शाळास्तरावर घेतो. त्यामुळे सर्जनशीलता आणि कल्पकता, संवेदनशीलता आणि सहानुभूती, शिस्त आणि जबाबदारी यासारख्या क्षमता मुलांच्या संवर्धित होतात.

आषाढी वारी ही एक सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक चळवळ आहे. या उपक्रमात सहभागी करून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक मूलभूत क्षमता विकसित झाल्या. समाजातील विविधतेचा स्वीकार करण्याची भावना निर्माण झाली.एकत्र काम करण्याची सवय, सहकार्य आणि जबाबदारीची जाणीव झाली.संत तुकाराम, ज्ञानेश्वर यांची शिकवण व वारीचे धार्मिक महत्त्व समजल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, संयम, श्रद्धा, भक्ती या मूल्यांचा विकास झाला. संवाद कौशल्य, सहनशक्ती, आत्मीयता या सर्व बाबींची वाढ झाली.




भजन कीर्तन,दिंडी,पताका आणि रिंगण जनजागृती या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आणि परिसरामध्येही जागृती निर्माण करता आली.

पुण्यतिथी,जयंती, श्रावणमास मंगळागौर, स्वातंत्र्य दिन या उपक्रमांतून विविध स्पर्धांचे आयोजन करून त्यातून विद्यार्थ्यांमध्ये खालील मूल्यांची रुजवण होताना दिसून आली.थोर महापुरुषांचे कार्य, त्याग, विचार यांची माहिती मिळाल्यामुळे कर्तव्यनिष्ठा, सहानुभूती, निस्वार्थता, राष्ट्रीय एकात्मता, शिस्त, जबाबदारी या मूलभूत नागरिकत्त्वाच्या वैशिष्ट्यांची विद्यार्थ्यांमध्ये रुजवण झाली.

पुण्यतिथी आणि स्वातंत्र्य दिन हे दोन्ही कार्यक्रमानी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, बौद्धिक, नैतिक आणि सांघिक क्षमतांचा विकास घडवून आणला. स्वातंत्र्याच्या काळात लोकमान्य टिळकांनी गणपती उत्सव सुरू केला त्यामागे जे उद्दिष्ट समोर ठेवले ते उद्दिष्टाची परिपूर्ती बरोबर या उपक्रमातून आम्हालाही साध्य करता आली.

किल्ले व दिवे बनवणे हे केवळ कला उपक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमतांचा विकास आम्हाला साधता आला.सृजनशीलता,सहकार्य,हस्तकौशल्य,एकाग्रता,पर्यावरणभान,उद्योजकता यासारख्या क्षमतांची वृद्धी झाली. सोबत समाजभानही राखता आले.

दिवाळी साजरी करणे अंधाराकडून प्रकाशाकडे जाणे यासोबतच शिक्षक दिन, बालिका दिन,बाल दिन यासारख्या दिनांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. सृजनशीलता,आत्मविश्वास,सामाजिक जाणीव,नैतिक मूल्ये,नेतृत्वगुण,संवादकौशल्य,लिंगसमता आणि पर्यावरणभान या कौशल्यांचाही विकास झाला. अभाषिक मुले ही वकृत्वामध्ये चांगली कामगिरी करू लागले .तिसरी चौथीच्या विद्यार्थ्यांमध्ये सगळ्या भावनांना सहित वक्तृत्व सादर करणे यासारख्या कला दिसू लागल्या.

प्रकल्पाची फलनिष्पत्ती -

शाळा स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणाऱ्या मूलभूत क्षमतांची मिळालेली फलनिष्पत्ती (Outcome) पुढीलप्रमाणे मांडता येते:शाळा स्तरावरील उपक्रमांमुळे मिळालेली फलनिष्पत्ती:

1. सृजनशीलता आणि कल्पकतेचा विकास:विविध कला उपक्रम (चित्रकला, हस्तकला, नाट्य, नृत्य) यामुळे विद्यार्थ्यांची कल्पकता, सौंदर्यदृष्टी आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढली.

2. सहकार्य व संघभावना निर्माण: समूहात केलेल्या उपक्रमांमुळे एकत्र काम करण्याची वृत्ती, समंजसपणा आणि नेतृत्वगुण विकसित झाले




3. संवादकौशल्य व आत्मविश्वास वाढला:भाषण, वक्तृत्व, नाट्य, संवाद अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा भाषेवरचा आत्मविश्वास आणि सादरीकरण कौशल्य वाढले.

4. शैक्षणिक सहभाग आणि अभ्यासातील रस वाढला - उपक्रमांमधून शिकण्याचा आनंद घेतल्यामुळे विद्यार्थी अभ्यासात रस घेऊ लागले आणि सक्रिय सहभाग दिसून आला

5. सामाजिक आणि पर्यावरणीय जाणीवा निर्माण - स्वच्छता अभियान, पर्यावरणपूरक उपक्रम, सामाजिक विषयांवरील नाटिका यामुळे सामाजिक भान आणि जबाबदारीची भावना तयार झाली.

6. नियोजन व वेळ व्यवस्थापन कौशल्ये:कार्यक्रमाचे नियोजन, तयारी, अंमलबजावणी यामधून स्वयंशिस्त, नियोजन व वेळेचे महत्त्व विद्यार्थ्यांनी आत्मसात केले.निर्णयक्षमता व समस्या सोडवण्याची क्षमता:

7.उपक्रम राबवताना उद्भवणाऱ्या अडचणी सोडवताना विद्यार्थ्यांनी विचार, निर्णय घेणे व अंमलबजावणी या गोष्टी नव्याने आत्मसात केल्या.

8.शिक्षक-विद्यार्थी संबंध दृढ झाले.

शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये अधिक चांगला संवाद झाल्याने शिक्षणात रुची आणि भावनिक सुरक्षितता वाढली. प्रोत्साहन प्रबलन मिळावे म्हणून बक्षीसे कराओके सिस्टीम वर गाण्याच्या स्पर्धा ही त्याच्यात अंतर्भूत करता आल्या. आपल्या चित्रकला स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा या शाळा स्तरावरील उपक्रम हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून, ते विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक, भावनिक, सामाजिक, शारीरिक आणि नैतिक क्षमतांचा समतोल विकास घडवणारे साधन झाले.

प्रयत्न,प्रेरणा आणि परिवर्तनाची गोष्ट,ज्यावेळी 2016 बदलीने आले त्यावेळी शाळेचा पट 900 होता. परंतु मोठी समस्या होती ती वर्गखोली...अभाषिक मुले आणि उपस्थितीत सातत्य नसणे...यासाठी प्रथम अध्यापनापेक्षा त्याच्याशी संवाद साधला...त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. संवादात सातत्य ठेवले...मुलांना आवडतील त्या गोष्टी केल्या ज्यामुळे विद्यार्थ्याची शाळेची अनास्था कमी होईल.. आनंददायी अध्यापन केले सतत प्रोत्साहन दिले. त्यामुळे सर्वांना शाळा आपली वाटू लागली...पालकाशी संवाद साधला. मुलांना सतत स्पर्धा परीक्षा, Dso sport, महापौर स्पर्धा विज्ञान प्रदर्शन, टाकाऊतून टिकावू, व्यक्तिमत्व विकसनासाठी वक्तृत्व,गायन, नृत्य आणि चित्रकला यासाठी प्रेरित केले. यातून विद्यार्थांना शाळेची ओढ लागली आणि त्याचा परिणाम उपस्थिती आणि पट वृद्धी होण्यावर झाला. आज शाळेचा पटात जो उच्चांक दिसतो ती खूप वर्षांची मेहनत आहे.यासाठी शाळेला वेळोवेळी लाभलेले मुख्याध्यापक व शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालकांचा मोलाचा वाटा आहे.सामान्यतेतून असामान्यतेकडे वाटचाल.स्वप्नांची उंच भरारी जो बदल अपेक्षित होता त्याही पेक्षा जास्त प्रभाव दिसून आला. कारण विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांना शिक्षकाची वेळोवेळी साथ लाभली तीही कोणत्याही वेळी त्यामुळे विद्यार्थांनी उंच भरारी घेतली कारण पंखांत बळ आले.




अडथळ्यांवर मात करत घडवलेले यश शिक्षकांच्या प्रेरणेने उजळलेले आयुष्य,वाटचाल संधींची... यशापर्यंतची!शिकवणीची ताकद, विद्यार्थ्यांच्या यशामागची गोष्ट,सकारात्मकतेने घडलेले बदल,शाळा आणि समाजाने मिळवलेले यश शिकणं, जिद्द आणि आत्मविश्वास याचा सुरेख संगम इथे झाला.

विद्यार्थ्यांमध्ये झालेला विकास -

- मुलभूत क्षमता वाढ : वाचन, लेखन, गणना, संवाद कौशल्य, तर्कशक्ती आणि निरीक्षणातील प्रगती स्पष्टपणे दिसून आली.
- आत्मविश्वासात वाढ : स्टेजवर बोलणे, प्रकल्प सादरीकरण, समूह चर्चा यामध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला.
- सर्जनशीलता व नाविन्यता हस्तकला, पोस्टर बनवणे, माहितीपट तयार करणे, पॉडकास्टसारख्या उपक्रमांमुळे सर्जनशील विचारांची वाढ झाली.
- कार्यसंघ भावना व नेतृत्वगुणसमूह काम, शिबिर, वारी, गणपती उत्सव, किल्ले बांधणी यामुळे संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित झाले.
- शाळेचा शैक्षणिक व सामाजिक विकास परिणामकारक शिक्षण.विविध उपक्रम शिकविण्याच्या पद्धतीमध्ये एकात्मिक केले गेल्याने शिक्षण अधिक परिणामकारक झाले.
- सकारात्मक शाळा वातावरण सहभाग, आनंद, सर्जनशीलता, विद्यार्थ्यांचे योगदान या साऱ्यामुळे शाळेचे वातावरण उत्साही व समृद्ध झाले.
- समावेशकता आणि विविधता प्रत्येक स्तराच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतल्यामुळे समावेशक शिक्षण रुजले.

शिक्षकांच्या भूमिकेत बदल.

- मार्गदर्शक व सर्जनशील भूमिका शिक्षकांनी,पाठ्यपुस्तकाच्या बाहेर जाऊन विद्यार्थ्यांना,स्व-अभिव्यक्तीसाठी मार्गदर्शन केले.
- तंत्रज्ञानाचा वापर वाढला पॉडकास्ट, डिजिटल पोस्टर, PPT तयार करताना शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर केला.

पालक व समाज सहभाग

- पालकांची शाळेशी नाळ जोडली गेली.प्रदर्शन, कार्यक्रम, कार्यशाळांमध्ये पालकांचा सहभाग वाढला.
- समाजाशी संपर्क वाढला.स्थानिक कला, व्यक्तिमत्त्वांचे मार्गदर्शन, सामाजिक उपक्रमातून शाळा-समाज यामधील दुवा दृढ झाला.



विविध उपक्रमांच्या आखणीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक, भावनिक, सामाजिक आणि सर्जनशील अशा सर्वांगीण विकासास चालना मिळाली. शिक्षकांची भूमिका बदलली, पालकांचा सहभाग वाढला आणि शाळा म्हणजे केवळ शिक्षणाचं ठिकाण न राहता एक सजीव उपक्रम केंद्र बनली.

वेळेचे व्यवस्थापन -

प्रकल्पाच्या कार्यवाहीची तयारी एप्रिल महिन्यातच करण्यात आली. ज्यामुळे जून पासून कोणते कोणते उपक्रम घ्यायचे, कसे घ्यायचे,त्यावरती आधारित कोणकोणत्या स्पर्धा घेता येईल, त्यातून मुलांच्या क्षमतांचा विकास कसा साधू शकतो, त्यासाठी जून महिन्यापासून मार्च महिन्याच्या शेवट पर्यंत कार्यक्रम आखाला. उपक्रमांची रचना केली त्यानुसार सर्व उपक्रम साजरे केले.

महिना	**उपक्रम**	**महिना**	**उपक्रम**
जून	नवागतांचे स्वागत शाळा प्रवेशोत्सव पर्यावरण दिन	नोव्हेंबर	शिक्षण दिन व बालक दिन याच्या उचित साधून बालकांचा मेळावा,कविता वाचन
जुलै	आषाढी वारी,घोषणा,दिंडी,चित्रकला स्पर्धा, नृत्य,प्ले	डिसेंबर	जागृती आरोग्य विषयी DSOस्पर्धा, महापौर स्पर्धा, दिकॅथलोन स्पर्धा
ऑगस्ट	पॉडकास्ट, स्लोगन स्पर्धा, पोस्टर मेकिंग नृत्य. वक्तृत्व, राखी, दहीहंडी	जानेवारी	बालिका दिन त्यावर विविध कार्यक्रमांचे आयोजन
सप्टेंबर	गणपती बनवणे रंगकाम. गणपती कार्यशाळेत भेट देणे मुलाखत घेणे.	फेब्रुवारी	मराठी भाषा दिन एकांकिका स्पर्धा वकृत्व संवाद वादविवाद विज्ञान दिन
ऑक्टोबर	दिवाळीचा किल्ला पणत्या रंगवणे आकाश कंदील बनवणे	मार्च	पर्यावरण पूरक कोणी ओळीतून विविध संदेश

प्रकल्पाचा निष्कर्ष / प्रकल्पाचे परिणाम

मुख्याध्यापकांचे प्रयत्न -

1. दृष्टीकोन निश्चित करणे - शाळेची शैक्षणिक दिशा ठरवून शिक्षकांना एकत्र आणले आणि प्रोत्साहित केले.
2. विकासाभिमुख वातावरण निर्माण करणे.




3.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, भावनिक विकासासाठी अनुकूल शालेय वातावरण तयार केले. आवश्यक लागणारे सर्व साहित्य आणि सोयी सुविधा पुरवल्या.

4. सुव्यवस्थित नियोजन - शिक्षकांसाठी वेळापत्रक, प्रशिक्षण सत्र, मूल्यमापन यांचे नियोजन केले सतत पाठपुरावा ठेवला उद्दिष्ट साधण्यासाठी.

4. शालेय उपक्रमांचे आयोजन - वक्तृत्व, निबंध, प्रयोग, विज्ञान प्रदर्शन, क्रीडा स्पर्धा,एकांकिका, वेशभूषा स्पर्धा, गायन, नृत्य, पोस्टर मेकिंग भेटकार्ड, राखी बनवणे, चित्रकला या इत्यादी स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना दिली प्रोत्साहन दिले.

5. पालक-शाळा सहकार्य वाढविणे - पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत माहिती देणे व त्यांच्या सहकार्याने शाळेच्या प्रगतीसाठी उपाययोजना केल्या.

शिक्षकांचे प्रयत्न -

1. वैयक्तिक लक्ष देणे - प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गरजा ओळखून त्यानुसार अध्यापन केले आपल्या इतर सहका-यांच्या सुद्धा आपल्या कार्यासाठी सहभाग घेतला.

2. कौतुक आणि प्रोत्साहन - विद्यार्थ्यांना त्यांच्या लहान प्रगतीसाठीही प्रोत्साहित केले त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढे जाण्याची काहीतरी नवीन करण्याची संधी प्राप्त करून दिली.

3. मुल्यांकन आणि अभिप्राय - सातत्याने मूल्यमापन करून सकारात्मक अभिप्राय दिला त्यामुळे हवे ते सकारात्मक बदल विद्यार्थ्यांना करता आले.

4. सर्जनशील अध्यापन पद्धती - गोष्टी सांगणे, खेळ, चित्र, प्रकल्प, तंत्रज्ञानाचा वापर,माध्यमातून अध्यापन आणि मूलभूत क्षमता वृद्धी होण्यास मदत झाली.

5. समूह शिक्षण व संवाद कौशल्य - विद्यार्थ्यांना एकत्र शिकण्याची संधी देणे, विचार मांडण्याचे आणि ऐकण्याचे शिक्षण त्यामुळे नवनवीन बद्दल विद्यार्थ्यांत घडू लागले.

मुख्याध्यापक आणि शिक्षक एकत्रितपणे शिस्त, सर्जनशीलता, जिज्ञासा आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी प्रयत्नशील असतात. हेच प्रयत्न विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर व यशस्वी नागरिक बनवण्याच्या दिशेने घेऊन जातात.

1. प्रयत्न, प्रेरणा आणि परिवर्तनाची गोष्ट म्हणजेच गाथा होय.


2. सामान्यतेतून असामान्यतेकडे वाटचाल झाली की प्रयत्न फलद्रूप होतात.

3. स्वप्नांची उंच भरारी. यश मिळाले की आपोआपच स्वप्नांना भरारी येते.

4. अडथळ्यांवर मात करत घडवलेले यश - सर्वच विद्यार्थी अगदी तळागाळातून येतात त्यांच्या समस्या सोडून त्यांना योग्य ते सहकार्य करून त्यांना यशाप्रत नेता आले...

5. शिक्षकांच्या प्रेरणेने उजळलेले आयुष्य - शिक्षकांशी संवाद साधू दिला ज्यांच्याशी मुलं खुली होतात त्यांच्याशी चर्चा करतात त्यांना आपल्या सगळ्या समस्या सांगतात त्यातून मार्ग काढून त्यांना यशापर्यंत आलं.

6. वाटचाल संधींची... यशापर्यंतची!



यशस्वी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले कायम त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली.

7. शिकवणीची ताकद – विद्यार्थ्यांच्या यशामागची गोष्ट यासाठी माजी विद्यार्थ्यांचा उपयोग करून घेतला विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी.

8. सकारात्मकतेने घडलेले बदल. माजी यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यार्थ्यांशी संवाद घडवला

9. शाळा आणि समाजाने मिळवलेले यश.

10. शिकणं, जिद्द आणि आत्मविश्वास

विविध उपक्रमांच्या आखणीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक, भावनिक, सामाजिक आणि सर्जनशील अशा सर्वांगीण विकासास चालना मिळाली. शिक्षकांची भूमिका बदलली, पालकांचा सहभाग वाढला आणि शाळा म्हणजे केवळ शिक्षणाचं ठिकाण न राहता एक सजीव उपक्रम केंद्र बनली.

अशा विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करताना विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतांचा सर्वांगीण विकास साधता आला. त्यांच्या विचारशक्तीला चालना मिळाली, संवाद कौशल्यात वाढ झाली, सामाजिक भान निर्माण झाले आणि आत्मविश्वास बळकट झाला.

विषयाशी संबंधित सखोल माहिती मिळवता येते.प्रत्यक्ष अनुभवावरून शिक्षण घेतात.वाचन, लेखन, बोलणे, ऐकणे या भाषिक कौशल्यांचा विकास

सोबत गणितीय विचारशक्ती व तर्कशक्ती वाढते,विज्ञान प्रयोग, निरीक्षण व विश्लेषण कौशल्ये वृद्धिंगत होतात.सामाजिक आणि नैतिक मूल्यांचा स्वीकार सहकार्य, मदत, सहिष्णुता, शिस्त,देशभक्ती, सामाजिक बांधिलकी या मुलांचा विकास होतो.सृजनशीलता आणि कलात्मकता -

नाटक, चित्रकला, हस्तकला, गाणे, नृत्य अशा नव नवीन कल्पना मांडण्याची क्षमता वाढते.आत्मविश्वास व संवाद कौशल्ये, इतरांसमोर विचार मांडणे,भाषण, संवाद, सादरीकरण इत्यादीचा विकास साधता येतो.

आजही आमच्या शाळेमध्ये विद्यार्थी संख्या 2300पार झाली आहे. आजही आमच्या शाळेला आजही शिक्षकांची कमतरता आहे तरी आम्ही शिक्षक या सर्व समस्यांवर मात करून विद्यार्थ्यांच्या यशासाठी प्रयत्नशील आहोत.हाताची पाच बोटे एकत्र आली की त्यापासून मुठ तयार होते. या मुठीत भरपूर शक्ती असते. मुख्याध्यापक, शिक्षक विद्यार्थी माता पालक, लोकप्रतिनिधी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य या सर्वांच्या सहभागाने ताकद येते आणि उल्लेखनीय कार्य घडून येते. या सर्व उपक्रमांमुळे पालकांची शाळेबद्दलची आस्था वाढली आहे.विद्यार्थ्यांची शाळेची आवड वाढली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास बरोबरच त्याचा गुणात्मक विकासही झाला. या सर्वांसाठी शिक्षकांचा एकच ध्यास म्हणजे आमची शाळा वाढली पाहिजे बहरली पाहिजे आणि तिने उत्तरोत्तर असेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीत यश मिळवले पाहिजे.

"Nothing is impossible in the world." "केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे ।"





हे यश केवळ उपक्रमाचे नव्हे, तर शिक्षकांचे समर्पण, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शाळेचे सकारात्मक वातावरण आणि पालकांचे सहकार्य शिक्षकांचे सहकार्य शिक्षक इतर कर्मचाऱ्यांची सहकार्य समाज पालक यांच्या प्रयत्नांचे फलित आहे.

फोटो...















व्हिडिओ -

https://drive.google.com/file/d/1lEOoqnajTaTbg8K15FSjrRuzzvPhDprm/view?usp=drivesdk

----------**----------

नाविन्यपूर्ण उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न


शाळेचे नाव - विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

शाळेचा पत्ता - CTS - 218, बॅरिस्टर नाथ पै नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई- 400077

मुख्याध्यापक नाव - सौ. योगिनी राजेंद्र पोतदार

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 98690 38599

मुख्याध्यापक ईमेल आयडी - yrp1968@gmail.com







प्रास्ताविक -

"विद्वान सर्वत्र पूज्यते" हे बोधवाक्य असलेल्या पुणे विद्यार्थी गृहाची एक शाखा म्हणजे मुंबईतील घाटकोपर येथील विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ही शाळा 1977 साली सुरू करण्यात आली. जिथे वरील बोधवाक्य विद्यार्थ्यांच्या मनात, जीवनात रुजवून त्यांना विद्वान व्यक्ती घडविण्याचे सत्कर्म वर्षानुवर्षे केले जात आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणातून म्हणजेच केवळ बौद्धिक विकास होऊन नव्हे, तर मानसिक, भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास होऊन, एक अष्टपैलू,सर्वांगीण गुणवत्तापूर्ण विकास झालेला विद्यार्थी घडवणे,हे शाळेचे मुख्य ध्येय आहे. मुंबईसारख्या शहरात इंग्रजी शाळांचे पेव फुटलेले असताना देखील मराठी (सेमी इंग्रजी) माध्यमाची शाळा टिकवून ठेवणे, शाळेची गुणवत्ता कायम ठेवून त्याद्वारे १६१५ एवढी विद्यार्थी संख्या टिकवणे एवढेच नव्हे तर ही संख्या कशी वाढेल यावर लक्ष केंद्रित करणे आणि गुणवत्ता पूर्ण शिक्षण देऊन विद्यार्थ्यांचा विकास करणे यासाठी विद्याभवन शाळा सतत प्रयत्नशील असते आणि याचे फलित म्हणून सन 2024-25 रोजी महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत टप्पा 2 मध्ये शाळेने मुंबई उपनगर जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केला.



उद्दिष्टे -

1) प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये मूलभूत भाषिक आणि गणितीय क्षमतांचा विकास करणे.

2) शाळेचा भौतिक विकास करून अध्ययन- अध्यापन प्रक्रियेस पोषक व आनंददायी वातावरण निर्मिती करणे.

3) विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावणे.

4) विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण वाढवणे.

5) विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, निसर्गप्रेम, समाज व निसर्गाविषयी कृतज्ञता निर्माण होण्यासाठी प्रयत्न करणे.

6) विद्यार्थ्यांमधील सौंदर्य दृष्टिकोन, कलात्मकता, कल्पनाशक्तीला वाव देणे व ते वाढवणे.

7) विद्यार्थ्यांमधील क्रीडा गुणांना वाव देऊन त्यांचा विकास करणे.

8) विविध सहशालेय उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे.

9) गरीब, गरजू व हुशार विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा शिष्यवृत्ती चा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी यशस्वी प्रयत्न करणे.

10) शालेय उपक्रमांद्वारे लोकशाही मूल्यांची रुजवणूक करणे.

11) भविष्याच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षांचे महत्त्व जाणून विद्यार्थ्यांची विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करून घेणे.

12) लोकसहभागातून शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे.

अंमलबजावणी

*** *उत्तम भौतिक सुविधा आणि स्वच्छ, सुंदर, आरोग्यदायी व आनंददायी शालेय परिसर :***

मुंबईसारख्या शहरात पालक विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेत असताना भौतिक सुविधांचा प्रामुख्याने विचार करतात हे दिसून येते. या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन इंग्रजी माध्यमांच्या शाळांप्रमाणेच अगदी त्यापेक्षाही जास्त चांगल्या भौतिक सुविधा देऊन शाळेचा कायापालट करण्यात आलेला आहे. वर्गात विद्यार्थ्यांसाठी उत्तम आसन व्यवस्था, हवेशीर वर्ग खोल्या,प्रत्येक वर्गात डिजिटल बोर्ड,इंटरनेट व वायफाय सुविधा, विविध खेळांसाठी आवश्यक साहित्यासह प्रशस्त क्रीडांगण, सुसज्ज डिजिटल ग्रंथालय, सुसज्ज जीवशास्त्र, भौतिकशास्त्र व रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळा, सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, STEM लॅब या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त अशा सर्व भौतिक सुविधा देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय शालेय परिसर निसर्गरम्य करण्यात आलेला आहे . यासाठी विविध प्रकारची झाडे लावण्यात आलेली आहेत. त्यांची नियमितपणे निगा राखली जाते. यात विद्यार्थ्यांचा देखील सहभाग घेतला जातो. RTE नियमांनुसार मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालय, पॅड व्हेंडिंग आणि डिस्ट्रॉय मशीन इत्यादी सुविधा उपलब्ध आहे. शाळेतील प्रत्येक भागात CCTV लावण्यात आलेले आहेत.




वाचनाची सवय वृद्धिंगत करण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न :

प्रत्येक दिवसाच्या सुरुवातीस पहिल्या तासिकेत वृत्तपत्र वाचन घेतले जाते. शालेय वेळापत्रकात वाचनाची वेगळी तासिका ठेवून त्यात शाळेत सुसज्ज डिजिटल माय ग्रंथालयात सर्व विद्यार्थ्यांना नेण्यात येते तेथे विविध प्रकारची.... पुस्तके विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी ठेवण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीनुसार पुस्तक घेऊन तेथे वाचत बसावे यासाठी उत्तम आसन व्यवस्था करण्यात आलेली आहे. वाचनाच्या तासिकेला प्रत्येक विद्यार्थी आपल्याला हवे असलेले पुस्तक घेऊन तेथे वाचत बसतात. एवढेच नाही तर वाचलेल्या पुस्तकाचे नाव, लेखक, त्यातील सारांश, महत्त्वाचे मुद्दे यांची नोंद ठेवण्याची सवय सुद्धा विद्यार्थ्यांना लावण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागत आहे .ज्या विद्यार्थ्यांना वाचन जमत नव्हते, त्यांना वाचन करण्यास प्रोत्साहन मिळत आहे आणि त्यांच्या वाचनात सुधारणा होत आहे. यासाठी शाळेत अभिवाचन स्पर्धा, काव्यवाचन, कथाकथन यासारखे उपक्रम घेण्यात येतात. वर्गात वाचलेल्या पुस्तकासंदर्भात चर्चा केली जाते.






इंग्रजी भाषा विकास -

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा असून सध्या तिचा वाढता प्रभाव आणि वापर पाहता आपल्या मराठी माध्यमाचे विद्यार्थी देखील इंग्रजी बोलण्यात कुठेही कमी पडू नये, यासाठी देखील शाळेत प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थ्यांना इंग्रजी तून बोलण्याचा सराव व्हावा, त्यांचे इंग्रजी संभाषण सुधारावे, त्यांचे इंग्रजीतील ज्ञान वाढावे यासाठी 'स्पोकन इंग्लिश' चे विशेष वर्ग घेतले जातात. याशिवाय नेहमीच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सुद्धा इंग्रजीच्या तासिकांना विद्यार्थी इंग्रजी मध्ये बोलण्याचा सराव करतात तसेच वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे त्यांना इंग्रजीतून सादरीकरण करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.




व्हिडिओ लिंक -

https://youtu.be/ZvG6nzB6ods?si=NdUAUL5sBH3-4EFT

https://youtu.be/NeXjJl7LEDg?si=onaPCc9uRszmekoc

https://youtu.be/HPmWycsUA5Y?si=DGRnrutt7LSkGAUm

हरित सेना अंतर्गत निसर्ग मंडळामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन -

शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी स्थापन केलेल्या 'निसर्ग मंडळांतर्गत' सामाजिक बांधिलकी, निसर्गप्रेम, समाज व निसर्गा विषयी कृतज्ञता हे गुण विद्यार्थ्यांमध्ये रुजावेत यासाठी वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, वृक्षदिंडी, आपली संस्कृती विद्यार्थ्यांना कळावी यासाठी विविध सण व उत्सव पारंपारिक पद्धतीने साजरे करणे, श्रावणमेळा, औषधी वनस्पतींचे प्रदर्शन, शाळेतील ओला कचरा व सुका कचरा वेगळा ठेवण्यासाठी प्रत्येक वर्गात जाऊन जनजागृती करणे आणि त्यासाठी शालेय प्रशासनाच्या मदतीने आवश्यक सुविधा पुरवणे, टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू तयार करणे, इको फ्रेंडली राखी बनविणे स्पर्धा, इको फ्रेंडली मखर बनविणे स्पर्धा, इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनवणे स्पर्धा, प्रदूषण व इंधन बचत विषयक संदेश देण्यासाठी तसेच पर्यावरण विषयक जागृतीसाठी सायकल रॅली, पथनाट्य यांसारखे अनेक उपक्रम दरवर्षी घेतले जातात. विशेष म्हणजे या सर्व उपक्रमांचे नियोजन व आयोजन विद्यार्थी स्वतः शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करतात.


लोकमत

पुणे विद्या भवनमध्ये ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पूजन

घाटकोपर येथील पुणे विद्या भवन शाळेत दिंडीचे आयोजन केले होते. संस्थेचे कार्याध्यक्ष बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका पोतदार, उपमुख्याध्यापिका देसाई, मुख्याध्यापक पाटील यांनी विठ्ठल-रखूमाईच्या पालखीचे व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पूजन केले. विद्यार्थ्यांनी दिंडी काढली.

Hello Mumbai
Page No. 2 Jul 08, 2025



गेल्या वर्षीपासून शाळेत इको क्लब ची स्थापना करण्यात आली आहे त्या अंतर्गत ओला कचरा सुका कचरा वेगळा करणे, प्लास्टिक जाम करून पुन्हा वापरणे, एक पेड माँ के नाम, वृक्ष लागवड इ. उपक्रम घेण्यात आले

येथे अभिमानाने नमूद करावेसे वाटते की महाराष्ट्र शासनातर्फे ऑक्टोबर 2022 ते डिसेंबर 2022 मध्ये राबवलेल्या प्रोजेक्ट लेट्स चेंज स्वच्छता मॉनिटर प्रकल्पामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून 12500 शाळांनी सहभाग घेतला होता. त्यातून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या 50 शाळांमध्ये विद्याभवन प्रशालेची निवड झाली. 24 एप्रिल 2023 रोजी मुंबईतील मंत्रालय येथे तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री माननीय श्री.दीपक केसरकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन शाळेचा गौरव करण्यात आला.





संगीत, कला व क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या विकासासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न -

1) **संगीत क्षेत्र -**

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये संगीताची आवड जोपासली जावी यासाठी संगीत कला अकादमीची स्थापना करण्यात आलेली आहे .या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार तबला, पखवाज, हार्मोनियम यांसारखी वाद्य वाजवण्याचे प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय नृत्य आणि गायनाचे देखील प्रशिक्षण देण्याची सोय केली आहे. तालुका, जिल्हास्तरीय गायन व वाद्यवादन स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त कामगिरी केलेली आहे. शाळेतील शिक्षक गाण्याची तयारी करून घेतात.

https://youtu.be/-kmfRPebFxg?si=YJ6YyV6SChlf1_-Y

https://youtu.be/6yTY4Fvrxfg?si=2lgw7dQjoKf2dUMD

https://youtu.be/IpcYOUHwwMQ?si=kDhlnOpO9elmeyVk

2) **चित्रकला, हस्तकला -**

शाळेत कला शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रकलेचे उत्तम ज्ञान दिले जाते. त्यामुळेच विद्यार्थ्यांचे चित्रकला उत्तम झालेली आहे. शासनामार्फत दरवर्षी होणाऱ्या एलिमेंट्री आणि इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत अनेक विद्यार्थी प्रविष्ट होत आहेत आणि उत्तम श्रेणी प्राप्त करून पास होत आहेत. उत्तम कलागुण असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेतील अनेक कार्यक्रमांदरम्यान तसेच गणेशोत्सवाच्या वेळी मखर बनवण्यासाठी व सजावटीसाठी मदतीला घेऊन त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचे प्रयत्न केले जात आहेत. याशिवाय हस्तकलेच्या तासिकेला व विद्यार्थी बॅचेस, पुष्पगुच्छ, आकाश कंदील यांसारखे अनेक साहित्य आपली कल्पकता वापरून नाविन्यतेने शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार करतात.





3) **क्रीडा क्षेत्र** -

शालेय अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा गुणांचा विकास होणे आवश्यक आहे. त्यामुळेच विद्यार्थ्यांमधील क्रीडा गुणांना वाव मिळावा, त्यांना खेळण्यासाठी जागा उपलब्ध व्हावी यासाठी शाळेमध्ये प्रशस्त क्रीडांगणाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना कबड्डी, खो- खो खेळाचे उत्तम प्रशिक्षण शिक्षकांद्वारे दिले जाते. तसेच फुटबॉल, बास्केट बॉल, क्रिकेट जिम्नास्टिक यांसारख्या खेळांचे मार्गदर्शन विशेष तज्ञ प्रशिक्षकांमार्फत करण्यात येत आहे. त्यामुळेच दरवर्षी जिल्हा क्रीडा अधिकारी मुंबई उपनगर तर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये विद्यार्थी तायक्वांदो, कराटे,बुद्धिबळ, स्विमिंग, बॅडमिंटन, स्केटिंग, जिम्नास्टिक, कुस्ती, कुडो या खेळांमध्ये सहभागी होऊन उत्तम कामगिरी करत आहेत.

तायक्वांदो स्पर्धेत तर विद्यार्थ्यांनी राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर देखील उत्तम कामगिरी केलेली आहे.


SCHOOL GAMES FEDERATION OF INDIA

64TH NATIONAL SCHOOL GAMES 2018-19
TAEKWONDO GIRLS U14
(IMPHAL.),MANIPUR
26-11-2018 to 30-11-2018

Type	Registration No.	Certificate No.	Organized By
PROVITY	SGFI-2018-19-(IMPHAL.)-MAH-7695	1366	Department of Youth Affairs & Sports, Govt. of Manipur

Certificate of Merit

Awarded that Miss/Mr. GAYATRI DATTATRAY BINWADE
Father's name Mr. DATTATRAY DYANOBA BINWADE
Date of birth 21-06-2005 Class VIII participated in the
64TH NATIONAL SCHOOL TAEKWONDO Championship / Tournament 2018-19
from State/UT/Unit MAHARASHTRA has been
declared position SECOND in Event/Discipline 32-35 KG. WEIGHT CATEGORY
and Achieved (INDIV.)
Date- 29-Nov-18
Place-(IMPHAL)

Padmashri Babaji Kumar — Observer / Authority — Dr. Rajesh Mishra — 4402


PLR/19-20/070696

महाराष्ट्र शासन

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य , पुणे
यांचा
जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद, पालघर
द्वारा आयोजित


विभागस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा
सन २०१९-२०
(वयोगट : १४ वर्षाखालील मुले)

खेळाडूचे नाव : आर्यन दत्तात्रय बिनवडे
जन्म तारिख : १६/०४/२००७ इयत्ता : नववी
शाळा / महाविद्यालयाचे नाव : पी.बी.जी.एज्युकेशन सोसायटी संचलित हायस्कूल & ज्युनियर कॉलेज
स्पर्धा कालावधी : २८/०९/२०१९
स्पर्धेचे ठिकाण : न्यू विवा कॉलेज विरार
वजनगट : ३२ ते ३५ किलो
जिल्हा : मुंबई उपनगर
प्रतिनिधी : प्रथम

प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

(सुहास बहकर)
जिल्हा क्रीडा अधिकारी
पालघर

(विजेता मार्गदर्शक)
तायक्वांदो
क्रीडा व युवक सेवा
मुंबई विभाग, मुंबई


मुंबई विभाग - मुंबई उपनगर

खेळाडूचे पात्रता प्रमाणपत्र (ओळखपत्र) खेळाडू आयडी MUMDIV-1718-040459

खेळ : तायक्वांदो (14-17, सब-जुनि 17-21)

विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव :	पाटणे दत्तात्रय बिनवडे
शाळेचे संपूर्ण नाव :	पी.बी.जी.एज्युकेशन सोसायटी संचलित हायस्कूल & ज्युनियर कॉलेज
शाळेचा पत्ता :	पी.बी.जी.एज्युकेशन सोसायटी संचलित हायस्कूल & ज्युनियर कॉलेज, प्लॉट नं.२१८, बोरिवली पश्चिम, मुंबई-४०००९१ (ई)
प्रशिक्षकाचे संपूर्ण नाव :	दत्तात्रय धनोबा बिनवडे
शाळा/ संघाचा पत्ता :	पी.बी.जी.एज्युकेशन सोसायटी संचलित हायस्कूल & ज्युनियर कॉलेज, प्लॉट नं.२१८, बोरिवली पश्चिम, मुंबई-४०००९१ (ई)
दुरध्वनी क्रमांक :	९८२०१८८८८८
खेळाडूचे नाव :	आर्यन दत्तात्रय बिनवडे
आधार क्रमांक :	263736990834
विभाग व खेळाडूचे क्रमांक :	६
प्रशिक्षकाचे नाव :	दत्तात्रय धनोबा बिनवडे
प्रशिक्षकाचा खेळाडूशी संबंध :	पिता
इतर निर्णय :	२जेश सुहास माडवेकर (23-Jul-2017)
इतर सदस्यांचे :	उमेश सुहास माडवेकर (15-Mar-2018)

जन्म दिनांक :	21-Jun-2005
खेळाडूचे वय :	14
खेळाडूचे वजन :	45
खेळाडूची उंची :	5'5"
खेळाडूचे रक्तगट :	B+ve
खेळाडूचे आधार कार्ड क्रमांक :	263736990834
खेळाडूचे पासपोर्ट क्रमांक :	N657
खेळाडूचे पासपोर्ट संपण्याचा दिनांक :	15-Jun-2018

मी असे दाखवतो/देतो की, वरील व्यक्ती/खेळाडू माझ्याकडे/आमच्या संघाकडे नियमित प्रशिक्षण घेत आहे.

Ghate — प्रशिक्षकाची सही — Powered By K. Reas (www.sfpoint.com)

https://drive.google.com/file/d/1b2JBlw0Ig-gm1286LocbFGAaKfMIidO6/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/103MbUtdO_o-cp1ZH8YJT25E_PNMjruuw/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1rPNHXoOBeWgroXkP0TXidWKrWOuygIbL/view?usp=drivesdk

हाऊस कौन्सिल निवडणूक -

शाळेत दरवर्षी हाऊस कौन्सिलची निवडणूक पृथ्वी जल अग्नी आणि वायू या चार हाऊस मध्ये घेतली जाते. इयत्तेनुसार प्रत्येक हाऊस मधील कॅप्टन,व्हाईस कॅप्टन, कल्चरल कॅप्टन,स्पोर्ट्स कॅप्टन आणि अॅकॅडमीक कॅप्टन ची निवड करण्यासाठी इयत्ता पाचवी ते नववीतील सर्व विद्यार्थी मतदान करतात. ही निवडणूक प्रक्रिया आपल्या निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार चालते. सर्वात आधी निवडणूक जाहीर केली जाते त्यानंतर निवडणुकीचे अर्ज दाखल करणे, अर्जांची छाननी करणे, उमेदवारी मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रचारासाठी वेळ देणे, त्यानंतर प्रत्यक्ष निवडणूक, मतदान मतमोजणी व निकाल आणि त्यानंतर विजयी उमेदवारांची घोषणा करणे,अशा पद्धतीने निवडणूक प्रक्रिया पूर्ण होते. शेवटी विजयी झालेल्या उमेदवारांचा शपथविधी समारंभ मोठ्या उत्साहात साजरा केला जातो यामध्ये निवडून आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींना कर्तव्यनिष्ठ जबाबदारीने निष्पक्षपातीपणे काम करण्याची शपथ दिली जाते. निवडून आलेले विद्यार्थी प्रतिनिधी इयत्ता नुसार आपापल्या हाऊस मधील विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना त्या अडचणी सोडवण्यासाठी मदत करणे. एखाद्या विद्यार्थ्याला अभ्यासात अडचण असेल तर त्याची ती अडचण दूर करण्यासाठी हुशार विद्यार्थ्यांची मदत घेणे अथवा शिक्षकांपर्यंत ती समस्या पोहोचवणे ही कामे करतात. शाळेतील विविध कार्यक्रमांच्या आयोजनात हे विद्यार्थी प्रतिनिधी शिक्षकांच्या बरोबरीने काम करत असतात. दर आठवड्याला शनिवारी या विद्यार्थी प्रतिनिधींची आणि संबंधित प्रमुख शिक्षकांची सभा आयोजित केली जाते आणि या सभेमध्ये संपूर्ण आठवड्याच्या कामाचा आढावा घेतला जातो. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना लोकशाहीचे महत्त्व कळण्यास मदत होते. त्यांना निवडणूक आयोगाची कार्ये समजतात. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, सहकार्य वृत्ती, निष्पक्षपातीपणा प्रामाणिकपणा, जबाबदारी यांसारखे अनेक गुण वाढीस लागतात.







सकाळ

विद्यार्थ्यांनी घेतले लोकशाहीचे धडे

पाटकोपर, ता. ३० (बातमीदार) : पाटकोपरमधील पुणे विद्यार्थी गृहचे विद्यामंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शैक्षणिक २०२४-२५ ची हाउस कौन्सिलची निवडणूक प्रक्रिया पार पडली.

पृथ्वी, जल, अग्नी आणि वायू या चार हाऊसमधील इयत्तेनुसार कॅप्टन आणि वाईस-कॅप्टन या दोन पदांसाठी निवडणूक घेण्यात आली. पाचवी ते नववीतील एकूण २४० विद्यार्थ्यांनी ५० पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. संपूर्ण शाळेतून एकूण ८२१ विद्यार्थ्यांनी आपलाहक्क पद्धतीने मतदान केले. उमेदवारी अर्ज दाखल करणे, अर्ज पडताळणी, निवडणूक प्रचार, प्रत्यक्ष निवडणूक आणि मतमोजणी व निकाल असा पद्धतीने ही प्रक्रिया पार पडली. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लोकशाहीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. लोकशाहीमध्ये शिस्तबद्ध आणि निष्पक्ष पद्धतीने कारभार चालण्यासाठी निवडणूक प्रक्रियेद्वारे प्रतिनिधी कसे निवडले जातात, याची विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या मतदान प्रक्रियेचे निवडणूक अधिकारी म्हणून रोहन मांडवेकर, अर्जुन मस्के यांनी काम पाहिले.

व्हिडिओ लिंक

https://youtu.be/Z8s8NZFOh0E?feature=shared

https://youtu.be/WLkTcGB3nBg?si=PDz6Qwf_yUomGqM

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन -

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा परीक्षेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे लक्षात घेऊनच आपल्या शाळेतील विद्यार्थी कुठेही मागे पडू नये, या हेतूने विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करून घेतली जाते. शाळा सुटल्यानंतर अतिरिक्त वेळेत थांबून या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते, त्यांचे जादा वर्ग घेतले जातात. यामध्ये इयत्ता 5 वी व इयत्ता 8 वी शिष्यवृत्ती परीक्षा, इयत्ता 8 वी तील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी NMMS परीक्षा, इयत्ता 6 वी व 9 वी तील विद्यार्थ्यांसाठी डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षा, गणित,इंग्रजी, विज्ञान विषयाच्या ऑलिम्पियाड परीक्षा यांसारख्या अनेक स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात येते. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत, तसेच NMMS परीक्षेत शाळेतील अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरत आहेत.


लोकमत

'विद्या भवन'च्या ८९ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीत यश

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने फेब्रुवारीत घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या घाटकोपर येथील विद्या भवन सातेव स्कूलचे ८९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

त्यात इयत्ता पाचवीचे ४०, तर इयत्ता आठवीचे ४९ विद्यार्थी आहेत. इंग्रजी माध्यमातील आठवीतील अर्णव अष्टरे हा २५४ गुणांसह पूर्वस्थ ४४ वा, तर पाचवीतील शौर्य गायकर २२८ गुणांसह ४५ वा आला आहे. मराठी माध्यमाची आठवीतील आर्या सावंत २०४ गुणांसह ९३ वी, तर इयत्ता पाचवीतील मोक्ष मार्वत २०२ गुणांसह ५७२ वा आला आहे. शिष्यवृत्ती मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या शिक्षकांचे, शाळेच्या मुख्याध्यापकांचे पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

Hello Mumbai
Page No. 3 Jul 19, 2025
Powered by: emitego.com


बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळातर्फे आयोजित डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत विद्या भवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता सहावीचे ५, तर इयत्ता नववीचे ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

विद्यार्थी व शाळा विकासामध्ये लोकसहभाग -


शाळेमध्ये पालक- शिक्षक संघटना, शाळा व्यवस्थापन समिती, परिवहन समिती, माता पालक संघ, सखी सावित्री समिती, माजी विद्यार्थी संघटना तसेच इतर अनेक समित्या स्थापन करून यामध्ये पालक, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, माजी विद्यार्थी यांचा सहभाग घेतला जातो आणि ते देखील शाळेच्या तसेच विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये हातभार लावतात.

डिजिटल शाळा -

पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या प्रयत्नांनी आणि लोकसहभागाने शाळेच्या प्रत्येक वर्गात डिजिटल बोर्ड असून त्यास वाय-फाय इंटरनेट सुविधा देखील पुरवण्यात आलेली आहे. याशिवाय माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळेची स्वतःची वेबसाईट डेव्हलप करण्यात आलेली आहे. याच माजी विद्यार्थ्याने शाळेसाठी VB ॲप नावाने एक शैक्षणिक ॲप नि:शुल्क सुरू करून दिलेले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती, नेहमीची हजेरी, त्यांचे निकाल, शिक्षक अथवा मुख्याध्यापकांची संवाद साधण्यासाठी मेसेजिंग सिस्टीम, विविध विषयांच्या परीक्षा देण्यासाठी ऑनलाइन MCQ परीक्षा सिस्टीम व असेसमेंट सिस्टीम ज्याद्वारे विद्यार्थी घर

बसल्या ऑनलाइन परीक्षा देऊन त्यांचे असेसमेंट देखील क्षणार्धात केले जाते, असे विविध लाभ या ॲपच्या द्वारे विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि पालकांना मिळत आहेत.





सलाम बॉम्बे फाउंडेशन आयोजित उपक्रम -

सलाम बॉम्बे फाउंडेशन तर्फे शाळेत विद्यार्थ्यांना पोषक आहार, मानसिक संतुलन, व्यसनाधीनता या विषयांवर व्याख्याने आयोजित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. तंबाखू मुक्त अभियानात शाळेने सहभाग घेतलेला आहे. अभिमानाची गोष्ट म्हणजे हे अभियान सुरु झाल्यापासून शाळेला तंबाखूमुक्त शाळा म्हणून घोषित करण्यात आले आहे.





फलनिष्पत्ती/ यशोगाथा –


इंग्रजी माध्यमाच्या तसेच CBSE, ICSE, IB बोर्डाच्या शाळाच फक्त विद्यार्थ्यांना सुविधा देऊ शकतात, असा समज मोडीस काढण्यात आमच्या मराठी माध्यमाच्या 'विद्याभवन' शाळेला नक्कीच यश मिळत आहे. शाळेत राबवलेल्या वरील सर्व उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल होऊन गुणवत्तापूर्ण शिक्षणाद्वारे त्यांचा सर्वांगीण विकास होत आहेत आणि यापुढेही होईल. शाळेच्या व शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख बघून दरवर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबईसारख्या शहरात जिथे मराठी माध्यमाच्या शाळा दिवसेंदिवस बंद पडत आहेत, विद्यार्थी संख्या कमी होत आहे आणि इंग्रजी शाळांचे प्रस्थ वाढत आहे अशा परिस्थितीत देखील या इंग्रजी माध्यमाच्या शाळांपेक्षाही उत्तम गुणवत्ता पूर्ण शिक्षण देऊन विद्याभवन शाळा आपले अस्तित्व कायम ठेवून आहे आणि याचेच फलित म्हणजे 2024-25 या वर्षातील 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'अभियान टप्पा 2 मध्ये मुंबई

उपनगर जिल्ह्यातून प्रथम येण्याचा मान प्रशालेने पटकावलेला आहे. दरवर्षी २० पेक्षा जास्त विद्यार्थी इंग्रजी माध्यमातून आमच्या शाळेत मराठी माध्यमात प्रवेशासाठी अर्ज करतात, ही बदलाची एक नांदी आहे.



समारोप -

'पुणे विद्यार्थी गृह' ही संस्था, पुण्यामध्ये 1909 साली गोरगरीब, गरजू, होतकरू तसेच ज्यांच्या आई किंवा वडील नाहीत अशा अनाथ मुलांना जीवनाभिमुख, दर्जेदार शिक्षण देण्यासाठी सुरू करण्यात आली होती. हीच संस्काराची शिदोरी पुढे नेत घाटकोपर मुंबई येथे याच संस्थेची शाखा असलेली आमची विद्याभवन शाळा प्रामाणिकपणे प्रयत्न करून विद्यार्थ्यांचा गुणवत्तापूर्ण शिक्षणातून विकास करण्यात यशस्वी होत आहे. यासाठी सर्व शालेय प्रशासन, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, हितचिंतक यांचे सहकार्य मिळते. आपल्या शाळेतून आंतरराष्ट्रीय दर्जाचे विद्यार्थी घडले पाहिजे हाच उद्देश समोर ठेवून यापुढेही विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने आणखीन सर्वोत्तम प्रयत्न केले जातील, यासाठी विद्याभवन शाळा व शाळेची संबंधित प्रत्येक घटक प्रयत्नशील राहील.



शाळेमधील काही उपक्रमांच्या व्हिडिओ लिंक

https://youtu.be/Qh1i3SEciUM?si=H1MJ2ippzCDxxihY

https://youtu.be/pnhcSBrkFh4?si=v7_RaCvBdCIvhXO1

https://youtu.be/goR3bdvvtrs?si=o7NyE4BY0Fj8k3AZ

----------**----------

Leading Foundational Competancies in School

School Name - S.I.E.S. High School, Matunga

School Address: K.A.Subramanyam Road, Matunga, Mumbai.

School Email ID - sieshighschool1932@gmail.com

Principal's Mobile Number - 98194 28284

Principal's Email ID : kalyania@sies.edu.in

Introduction: A Journey of Educational Empowerment

Mumbai's Matunga area, an intellectual hub, is home to S.I.E.S. High School, established in 1932. As a prestigious government-aided minority institution, it has long dedicated itself to quality education for all societal strata, shaping generations with the mantra 'Knowledge is Power'. With 2700 students from 1st to 10th standard, the school benefits from diverse cultural, economic, and social backgrounds learning together. However, this large enrolment presents a significant challenge: meeting each student's unique needs, especially regarding basic competencies like reading, writing, arithmetic, and comprehension. Principal Mrs. Kalyani Arumugam recognized that strengthening these fundamentals was crucial for academic success, self-confidence, and future opportunities, going beyond mere syllabus completion. This success story highlights how Mrs. Arumugam, her dedicated staff, and active management collectively addressed this, implementing innovative initiatives to transform educational quality, driven by the belief that **'every child matters'**.



Challenges and the Problem's Nature:

The school team encountered significant challenges. The 2700-student population made individual focus difficult. Initial surveys revealed a significant disparity in basic academic abilities, despite satisfactory overall results. 30-35% of students (especially those transitioning from primary, and in 5th-7th standard) struggled with simple Marathi and English reading (pronunciation, punctuation) and writing (spelling, grammar, sentence formation). In mathematics, a weak grasp of basic operations hinders understanding of higher concepts. Crucially, a significant lack of comprehension was observed in both reading and mathematics, impacting other subjects.

Several factors contributed:
Large Class Sizes: Hindered individualised teaching and attention for struggling students.
Diverse Student Backgrounds: Many lacked home academic environments or were first-generation learners, receiving less external support.

Teacher Burden & Traditional Methods: Pressure to complete the syllabus, reliance on traditional methods, and inadequate training/resources for foundational skills.


Limited Parental Involvement: Due to a lack of awareness or time, parents offered insufficient home guidance.

Resource Constraints: Being an aided school, funding limitations affected educational materials, technology, and special programs.
For Principal Mrs. Kalyani Arumugam, the task was to strengthen fundamental abilities, not just complete the syllabus. This was crucial for students' future and self-confidence, marking a new educational era.

Principal's Vision and Initial Policies:
When Mrs. Kalyani Arumugam, the Principal of S.I.E.S. High School, identified the challenges in students' basic competencies, she didn't just diagnose the problem; she approached it with a profound vision and firm determination. She clearly understood that true progress for the school wouldn't be achieved simply by showing good results unless every student's educational foundation was strong. She had one clear goal:
"To empower every student with basic competencies so that they do not face any obstacles in their future life and education."

To realize this vision, she took some extremely important initial steps:

a. In-depth Problem Identification and Analysis:
The Principal first held many meetings with all the teachers in the school. It was decided to conduct a thorough diagnostic assessment of each student's



basic competencies in Marathi, Hindi, English reading-writing, and mathematics, not just through classroom observations. By compiling the results of these tests, an objective report was prepared indicating which grades, which students, and in which specific competencies there were greater deficiencies. This report provided a clear idea of how widespread the problem was and at what level attention was needed.



b. Gaining Teachers' Trust and Empowerment:

The Principal recognised that the participation of teachers and a change in their mindset were most crucial in this journey of transformation. She conducted many motivational workshops with teachers, where she explained the importance of this initiative. She not only pointed out the problems but also assured teachers of the support and tools needed to solve them. Teachers were encouraged to work on the principle of "enjoy learning as well as teaching." Every teacher was made aware of how much positive change they could bring about in a student's life. Teachers were assured of training in new teaching methods, new ways of interacting with students, and understanding their difficulties.



c. Active Participation of Parents and Management:

Given the broad scope of this initiative, teachers and the Principal alone were not enough. The Principal presented the entire plan to the school's management committee. The management fully supported this vision and assured the availability of necessary resources. At the same time, the Principal recognized the importance of involving parents in these efforts. Initially, large parent meetings were held to explain the importance of students' basic competencies. The message "encourage children's education not only at school but also at home" was conveyed. Parents were urged to regularly monitor their children's progress and actively participate in school activities.



d. The Mantra of 'Every Child Matters':

The Principal instilled the belief in every member and student of the school that "every child matters and can learn." She told teachers that developing any ability takes time and patience. She appealed to them to remove the word 'impossible' from their vocabulary and allow every student to learn at their own pace. She inspired teachers to become 'guides' and 'facilitators' rather than just 'teachers'.

These initial steps marked the beginning of a positive change in S.I.E.S. High School. Due to Principal Mrs. Kalyani Arumugam's clear vision and her ability to bring everyone along, teachers' confidence increased, and they dedicated themselves fully to this important initiative. Now was the time to translate these ideas into action and begin the actual work.



4. Important Efforts and Initiatives Implemented by the Principal

To put the vision and initial policies set by Principal Mrs. Kalyani Arumugam into practice, many innovative and effective initiatives were implemented at S.I.E.S. High School. These initiatives were not just for a day or two but were continuous throughout the year and adaptable to each student's needs. Under the skilled leadership of the Principal, teachers, parents, and the community collectively brought these efforts to fruition.





Changes in Curriculum and Teaching Methods: Learning Became Joyful and Effective

The Principal recognised that the traditional 'one-size-fits-all' approach was not enough to enhance basic competencies. Each student's learning pace and ability are different.

To address this, the following major changes were made:

Level-Based Learning (LBL):

Diagnostic Assessment: At the beginning of the academic year, each student in Marathi, Hindi, English, reading-writing, and mathematics received a thorough diagnostic assessment. This test assessed students' basic comprehension, word recognition, sentence structure, and knowledge of arithmetic operations.



Group-wise Class Structure: Based on the test results, students were divided into different levels according to their abilities. For example, the 'Buniyad' group (those who did not have clear basic concepts), the 'Pragati' group (those who could progress with a little help), and the 'Shikhar' group (those who performed excellently according to their grade).

Separate Curriculum and Teaching Method for Each Group: For the 'Buniyad' group, the emphasis was on teaching in very simple language, using

pictures, and through play. They were taught using large-print books, simple stories, and concrete objects for number sense and basic addition. The 'Pragati' group received curriculum-based education with more explanation and practice, while the 'Shikhar' group was taught more challenging reading material and complex mathematical concepts.



'Reading Corner' Program (Reading Corner/Club):

A 'Reading Corner' was started in the school and in each classroom for students with slow reading speed. Various types of engaging children's literature, storybooks, simple poems, and informational magazines were made available here.

A 'quiet reading' time of 10-15 minutes was fixed daily. Teachers would read along with the students and were readily available if they needed help.

Under the 'My Story, My Identity' initiative, students were encouraged to write and read simple stories in their own language. This developed both their writing and reading skills.



'Math Buddy Club':

To reduce the fear of mathematics and clarify concepts, a 'Math Buddy Club' was started. Through this club, math games (e.g., number sense games, songs for memorizing tables), puzzles, and practical applications of mathematics in daily life were taught.

Teachers used the concept of 'Math Magic' to explain mathematical formulas and concepts to students in an entertaining way. This led students to learn mathematics with interest, rather than seeing it as a boring subject.



Talentia Program for Skill Development:

Under the guidance of our respected Principal, **Smt. Kalyani Arumugam**, **S.I.E.S. High School** conducted the **Talentia Program** to promote **skill development among students**. This initiative provided a platform for students to showcase their talents through **various activities** such as art, music, dance, speech, and creative expression. The program aimed to encourage confidence, creativity, and holistic growth, reflecting the school's commitment to nurturing every child's unique potential



Mission 3R: Enhancing Foundational Literacy at SIES High School

Under the guidance of Principal Mrs. Kalyani Arumugam, SIES High School has successfully implemented **Mission 3R**, a dedicated foundational literacy program. This initiative aims to significantly improve students' **reading, writing, and recitation** skills. To effectively track progress, teachers conduct reading, writing, and recitation tests twice a month.


Students are then categorized into three groups: List A (good), List B (medium), and List C (weak). Students in **List B receive specific reading assignments**, with parents encouraged to supervise at home. Teachers provide daily assistance to these students. For **List C students, teachers offer intensive, focused support**, often appointing student monitors as mentors to provide additional guidance. This targeted approach ensures that all students receive the necessary attention to strengthen their foundational literacy skills.



Individual Attention and 'One Student, One Teacher' Concept:

To tackle the challenge of a large student body, each teacher was given 'mentorship' (parenting) of certain specific students in their class. These teachers specifically monitored the progress of those students in their basic competencies and provided them with additional help as needed.

Extra practice classes were organized after school or early in the morning for weak students, where they received individual guidance.



Gamification and Activity-Based Learning:
Instead of just teaching on the blackboard, teachers used various games and activities. Methods such as word games, sentence completion, solving math puzzles, and recording observations from science experiments were used.
Dramatization and role-playing helped students understand the practical uses of language and develop their comprehension skills.



Effective Use of Technology:
Digital classrooms and computer labs were used to incorporate educational apps, interactive games, and online educational resources. This allowed students to learn in a more engaging and effective manner.
Educational films and documentaries were used to simplify difficult concepts visually and audibly.


Perfect Continuous Tenses





SIES SECONDARY COMPUTER CENTRE





Handwriting Competition: Celebrating Talent, Encouraging Growth:
S.I.E.S. High School, Matunga, recently conducted a **standard-wise handwriting competition** for students across various grades. The objective was to promote neatness, clarity, and presentation in written work. After evaluating the entries, the school declared the **best five performers** from each standard to recognize excellence. In addition, the **last five students**, whose handwriting needed significant improvement, were also identified—not to discourage them, but to provide focused support. Recognizing that poor handwriting can sometimes be linked to low confidence or motor challenges, the school has decided to **refer these students to the school counsellor**. Through personalised attention and guidance, the aim is to **boost their self-esteem and motivate them** to improve both their handwriting and overall academic engagement.



HYBRID LEARNING HELPED STUDENTS TO LEARN BETTER:
Hybrid learning, which blends online and in-person teaching, is a transformative educational approach that maximises the strengths of both digital and traditional classrooms to enhance student learning.
Our school utilised Zoom and Google Meet for lectures, and PADLET for assignments and assessments, offering flexibility for students to learn at their own pace and revisit materials. Multimedia resources like videos and interactive quizzes made learning engaging. Classroom sessions focused on practical applications through group projects, discussions, and debates for deeper understanding. Teachers provided real-time assistance and clarification.

Benefits of Hybrid Learning

- **Enhanced Engagement:** Combines online and in-person methods to cater to diverse learning styles, keeping students motivated.
- **Improved Accessibility:** Online resources ensure materials are available to all students, including those absent or needing extra support.
- **Development of Self-Discipline:** Managing online assignments fosters time-management and self-regulation skills.
- **Collaborative Skills:** Group activities in the classroom promote teamwork and communication abilities.



Conclusion

Hybrid learning significantly enhances educational outcomes by combining the flexibility of online education with interactive classroom activities. This balanced approach equips students to grasp complex concepts, develop essential life skills, and prepares them for the demands of the modern world.

One India One People (OIOP) Foundation's Student Empowerment Session:

A thought-provoking and inspiring session was recently conducted at S.I.E.S. High School, Matunga, under the initiative of the **SIES OIOP (One India One People) Club**, and under the valuable guidance of our respected Principal, **Smt. Kalyani Arumugam**. The program was designed to **positively empower students**, helping them build confidence, leadership qualities, and a sense of social responsibility. The session focused on key areas such as **eco-friendly Ganpati making**, **leadership development**, and the creative implementation of **Value Lab activities**. These initiatives aimed to promote environmental awareness, in still core moral values, and encourage personal growth. The session was effectively led by **Kalyani Madam**, along with **Raji Madam** and **Uma Madam**, whose enthusiastic and insightful communication deeply resonated with both students and staff. The ideas presented, especially those related to **environmental conservation** and **value-based education**, were highly appreciated for their relevance in shaping responsible and ethical

future citizens. The **Value Lab** suggestions were particularly impactful, offering practical ways to bring about **positive behavioral change** among students. Overall, the session was a **meaningful and motivating experience**, leaving a lasting impression on everyone involved. We sincerely thank the **SIES OIOP team** for their continued mentorship and dedication to student empowerment and holistic development.



Regular Training Camps and Workshops:

Special Focus on Basic Skill Development: Regular workshops were organised for teachers on how to effectively teach basic concepts in reading, writing, and mathematics. This included innovative methods of teaching reading through 'Phonics Method', 'Creative Writing' techniques, and 'Play-way Math'.



Emphasis on Comprehension Skill Development: Special training was provided on how to improve students' comprehension, how to encourage them to ask questions, and how to develop their thinking through activities like 'quizzes' or 'debates'.

Psychology and Student-Centric Teaching: Keeping in mind that each student has a different learning style, teachers were trained in educational psychology and 'Student-Centric Learning' methods. This helped teachers understand children's difficulties more effectively.

Internal Workshops and Knowledge Sharing:

Experienced teachers in the school who used innovative teaching methods were encouraged to conduct workshops for other teachers. This gave teachers an opportunity to learn from each other and share their 'Best Practices'.

Teachers regularly met to discuss their 'Success Stories' from their respective classes and the challenges they faced. This created a collaborative and positive learning environment.

Availability of Books and Research Literature:

New books, educational magazines, and research literature based on basic skill development were made available to teachers. They were encouraged to read this material and discuss it to improve their teaching methods.

Continuous Support and Encouragement from the Principal:

Principal Mrs. Kalyani Arumugam did not stop at just providing training to teachers, but also observed them in classes. She understood teachers' difficulties and provided them with guidance at a personal level.

The good work done by teachers was appreciated, and they were encouraged to take initiative in various activities. Teachers were honoured on special occasions like 'Teacher's Day' to acknowledge their work, which doubled their enthusiasm.



Use of Technology (Teacher's End):

Teachers were trained to make the curriculum more engaging using digital tools (e.g., presentations, educational videos). They used e-learning platforms to create additional study materials and tests for students.



Workshop on Teaching Excellence (June 4–6, 2025)

Under the guidance of Principal Mrs. Kalyani Arumugam, S.I.E.S. High School hosted a three-day “Workshop on Teaching Excellence” for its primary teachers, focusing on NEP 2020, child development, communication, digital tools, and values education.

Highlights included sessions by experts like Dr. A. K. Sen Gupta (teacher roles, NEP), Dr. Priyadarrsini N. Poddar (communication), Dr. Vidya Satish (child development, classroom management), Mr. Pankaj Patil (AV tools), and Prof. Suma Nair (ethics and patriotism).

Teachers gained practical strategies such as warm-up games, storytelling, circle time, soft transitions, and video-based learning. Emphasis was placed on integrating life skills, differentiated instruction, and value-based education.

Post-workshop, teachers like Mr. Santosh Kangte and Mr. Padmakar Karale showed increased confidence and innovation in their classrooms. The school has seen improved engagement, emotional support, and outcome-focused lesson planning.

This initiative marks a meaningful step toward holistic, student-centered learning, aligning with NEP 2020 and the school’s mission of nurturing values and excellence in education.



Parent and Community Participation: A Strong Link Between School and Home

Principal Mrs. Kalyani Arumugam strongly believed in the principle that education is not solely the responsibility of the school, but a collective responsibility of parents and the entire community. She understood that the support of home and community is extremely important for enhancing students' basic competencies. For this, she implemented innovative initiatives to actively involve parents and the community in the school's educational journey:



Regular 'Parent Dialogue' Programs and Workshops:

Monthly Parent-Teacher Meetings: Monthly parent-teacher meetings were organized not just to discuss progress reports, but to focus on the progress made in children's basic competencies and how parents could help them at home. Teachers explained children's difficulties in reading, writing, and mathematics to parents and suggested simple activities that could be done at home.



'Learn at Home' Workshops for Parents: Many parents do not know how to teach their children at home. For this, the school organized special workshops for parents. In these workshops, simple and effective tips were taught, such as "how to read stories to children," "how to teach tables and number sense in a fun way," and "how to practice regular writing with children". This helped parents participate more actively in their children's education.



Bridges of Communication: The Principal provided an 'Open Forum' for parents, where they could freely express their difficulties, suggestions, and experiences. This strengthened the bond of trust between the school and parents.

Active Community Participation and Resource Mobilization: Support from 'Alumni Association': Due to its rich tradition, S.I.E.S. High School has a strong alumni association. The Principal involved this association in the school's basic skill development initiative. Alumni provided financial assistance in the form of books, educational materials, and even scholarships for needy students.



Contribution from Local Community: Local businessmen, social workers, and esteemed citizens in the Matunga area were encouraged to participate as volunteers in school activities. Some volunteers helped students with reading, while others conducted simple math classes.





Resource Building: With the help of the community, the school's library was updated, and a wide variety of books, magazines, and newspapers on various subjects were made available there. With the help of some donors, some equipment for digital learning was also made available.

'Our School, Our Responsibility' Campaign

S.I.E.S. High School launched the 'Our School, Our Responsibility' campaign to encourage active community and parental involvement in school upkeep and improvement. Volunteers participated in cleanliness drives, maintenance tasks, and attended cultural and sports events, fostering a strong sense of belonging. This collective effort transformed the school into a true learning community, strengthening the educational environment from home to school and society at large.


SIES HIGH SCHOOL
CLEAN INDIA
BEAUTIFUL
INDIA
स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छताकीओर



Evaluation and Progress Measurement

To ensure continuous improvement, regular evaluation was central to the school's approach. Principal Mrs. Kalyani Arumugam introduced a rigorous system to monitor the impact of every initiative.

- Monthly Diagnostic Tests assessed foundational skills in reading, writing, and math.
- 'My Progress' Cards tracked individual student growth in key areas and were shared with parents and teachers.
- Digital Tracking Tools helped monitor year-round development and highlight learning gaps.
- Data-Driven Planning allowed teachers to adjust teaching methods and provide timely remedial support.

This structured evaluation ensured that teaching stayed aligned with student needs and enabled quick, responsive improvements.

Remedial Teaching Plan: Special remedial classes were organized for students whose progress was not at the expected pace. They were given more individual attention and practice in these classes.



Transparent Reporting and Communication: Parents were given regular and transparent information about their children's progress. Not just problems, but progress made was also appreciated, and plans for further improvement were also clearly explained.

Principal Mrs. Kalyani Arumugam regularly held meetings with teachers to review progress and provided them with necessary guidance and encouragement.

Through this continuous evaluation and progress measurement system, S.I.E.S. High School developed a responsible and effective educational system based on the goal of 'every student must learn' rather than just 'teaching'. This gave every student the opportunity to progress according to their abilities and guided the school's efforts in the right direction.



School Environment and Facilities

Principal Mrs. Kalyani Arumugam ensured that the school was not just a place of instruction but a nurturing, inspiring space for students.

- Classrooms featured educational walls with charts, word walls, quotes, and displays of student artwork, fostering a vibrant learning atmosphere.
- Emphasis was placed on clean, well-lit, and welcoming classrooms to encourage daily attendance and joyful learning.
- The main library and class reading corners were enriched with a wide range of books in multiple languages, promoting independent reading habits and curiosity.






Reading Corners in Classrooms: A small 'reading corner' was created in each classroom , where storybooks, simple poems, and pictorial magazines were kept easily accessible to students. Daily reading sessions were held in these corners or under the guidance of teachers.



'Book Buddy' Scheme: To encourage students to develop a habit of reading books, the 'Book Buddy' scheme was started. In this scheme, one student was encouraged to read a book every week and talk about it in class or to other friends.

Emphasis on Infrastructure: Special attention was given to providing clean drinking water, clean and well-equipped restrooms, and regular cleanliness of the school premises to ensure a safe and healthy environment for students.



Playground and Physical Development: The school playground was well-maintained, and students were encouraged to participate in physical games. The Principal understood that physical and mental health are important for academic progress.



Safety Measures: All necessary measures for students' safety (CCTV cameras, disciplined entry/exit) were implemented on the school premises , which made both parents and students feel safe at school.





Computer Lab and Internet Facility: The school's computer lab was updated, and students were encouraged to search for information and learn new things through the internet.



Smart Boards/Projectors: Smart boards or projectors were installed in some classrooms, giving teachers the opportunity to make teaching more effective using digital media. This made it easier to understand difficult concepts visually and audibly.



Science Lab Facility

The school's science lab is a well-equipped, hands-on learning space where students explore scientific concepts through experiments, fostering curiosity and inquiry-based learning.





These efforts transformed S.I.E.S. High School from merely a 'place of learning' to a 'center of joyful learning and growth'. The school's environment became positive, motivating, and student-friendly, which led to an increase in student attendance and a greater interest in education.

Student Empowerment Programme

SIES High School's Student Empowerment Programme, led by its Student Council, focuses on developing well-rounded personalities and cultivating leadership skills. Students are democratically elected to key roles such as Head Boy/Girl and various ministers for sports, discipline, and culture.

These student leaders, guided by teachers, take on significant responsibilities. The Head Boy/Girl leads the council and acts as school ambassador, while other ministers manage areas like house spirit, sportsmanship, school conduct, and cultural events. The program ensures smooth transitions with handover ceremonies and regular review meetings. The Principal also actively engages with the student cabinet in "Circle Time" meetings.

This initiative has a profound impact, fostering self-discipline, teamwork, a healthy competitive spirit, and collaborative learning among students. The program truly lives up to its motto: "Let’s Inspire Others And Lead by Example."



Mrs. Kalyani Arumugam: A Recognized Leader at SIES High School

Mrs. Kalyani Arumugam, the respected Principal of SIES High School, Matunga, has been widely **recognized with numerous awards** for her outstanding leadership and dedication to education. These accolades highlight her significant contributions and commitment to providing a high-quality learning environment at the school.




elets
WORLD EDUCATION SUMMIT 2024
MUMBAI
WELCOME


Education Today
Presents
MAHARASHTRA SCHOOL MERIT AWARDS
REWARDING EXCELLENCE IN EDUCATION
2024-25
MAHARASHTRA'S TOP STAT
BOARD- PARAMETER WISE
SIES High School
Matunga, Mumbai, Maharashtra
alue for Money
www.educationtoday.co



Empowering Excellence: SIES High School's Success under Mrs. Kalyani Arumugam's Leadership

Under the exceptional guidance of Principal Mrs. Kalyani Arumugam, SIES High School, Matunga, has fostered a vibrant culture of participation and achievement. Students from SIES actively engage in a diverse range of competitions, consistently excelling and bringing home accolades at the **ward, district, and national levels**. This remarkable success across various academic, cultural, and sports events is a testament to Mrs. Arumugam's inspiring leadership and the school's commitment to nurturing well-rounded and high-achieving individuals.

- **Baranwal Navyansh Navin from VII-C won First Prize in Abacus**



- **Shree Krishna "Vesha" (Fancy dress Competition)**



Std IX toppers went for ‘TIMES NIE’ Award





Under 14 & Under 17 girls team secured gold medal- first place in Mumbai city and qualified for division level



District level Folk Dance Competition



Rudra Khandare from Std IX-B has qualified for Indian Taekwondo Team Selection Training Camp







प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

संक्षिप्त

जागतिक तायक्वाँदो स्पर्धेसाठी निवड झालेले शहरातील खेळाडू.

जागतिक तायक्वाँदो स्पर्धेसाठी शहरातील ५ खेळाडू

छत्रपती संभाजीनगर : जागतिक तायक्वाँदो प्युमसे स्पर्धेत शहरातील पाच खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. यात रुद्र खंदारे, काव्य धोडाव्यानॉर, कियान देसाई, विहान अय्यर, राजेश खिलारी यांचा समावेश आहे. सदर जागतिक स्पर्धा ३० नोव्हेंबर ते डिसेंबर ४ या कालावधीत हाँगकाँग येथे होणार आहे. नाशिक येथील मीनाताई ठाकरे क्रीडासंकुल येथे विश्व तायक्वाँदो प्युमसे प्रतियोगिता करिता भारतीय संघाची निवड चाचणी संपन्न झाली.

Ward Level Sciences Exhibition:



SIES Boys Ready for Jr PRO Competition:



Vaidehi Gawali VIII-A Bagged First Place (Gold Medal) in all age group State Gymnastics Championship





१०२ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

नवाकाळ

शालेय कबड्डी स्पर्धेत मित्तल विद्यालय, एस. आय. इ. एस; विजेते

■ मुंबई

गौरीदत्त मित्तल विद्यालय, एस. आय. इ. एस; यांनी अमरहिंद मंडळाने आयोजित केलेल्या शालेय कबड्डी स्पर्धेत अनुक्रमे मुले आणि मुलींच्या गटात विजेतेपद मिळविले. आंध्र हायस्कूलचा राज गुप्ता मुलात, तर डॉ. आंबेडकर हायस्कूलची ईशा डिगे मुलीत स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरले. या दोन्ही खेळाडूंना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. दादर येथील अमरहिंद मंडळाच्या पटांगणावर झालेल्या मुलांच्या अंतिम सामन्यात सायनच्या गौरीदत्त मित्तल विद्यालयाने चुरशीच्या लढतीत माटुंग्याच्या आंध्र विद्यालयाला नमवित या विभागात जेतेपदाला गवसणी घातली.

मुलींच्या सामन्यात वडाळाच्या एस.आय.इ.एस. ने विक्रोळीच्या डॉ. आंबेडकर विद्यालयाचा सहज पराभव करीत विजेतेपदाचा चषक उंचाविला. स्नेहा पिसाळ हिच्या अष्टपैलू खेळांनी या विजयाची किमया साधली. डॉ. आंबेडकर कडून ईशा डिगेने उत्कृष्ट खेळ केला. मुलांच्या उपांत्य सामन्यात गौरीदत्त मित्तलने सोशल सर्व्हिसचा, तर आंध्र हायस्कूलने मारवाडी हायस्कूलचा पराभव करीत अंतिम फेरी गाठली होती. मुलींच्या गटात एस.आय.इ.एस. ने सोशल सर्व्हिसला, तर डॉ. आंबेडकरने आंध्र हायस्कूलला नमवित अंतिम फेरीत धडक दिली होती.

Participate International Research Conference for Children:





Success and Positive Outcomes: The Fruits of Efforts and a Bright Future

The collective, tireless efforts of Principal Mrs. Kalyani Arumugam, teachers, management, and parents at S.I.E.S. High School have yielded remarkably positive and inspiring results. These transformations extend beyond mere statistics, clearly manifesting in the enhanced confidence, articulation, and future outlook of the students. This success story exemplifies the power of collective determination.

A) Impact on Students: Revolution in Education and Instilling Confidence

The school has witnessed excellent progress in academic graphs, particularly a significant increase in reading ability. Two years ago, 30-35% of students in standards 1-8 struggled with simple Marathi and English texts. Now, thanks to initiatives like 'Reading Corner' and level-based teaching, this figure is less than 5%, with over 90% of students reading at or above their grade level with speed and accuracy.

Writing skills have also improved, with fewer spelling mistakes and more coherent sentence structures. Students are now confidently writing their own stories, poems, and essays, fostering imagination and creativity. The fear of mathematics has largely diminished through the 'Math Buddy Club' and play-way methods, leading to increased understanding and accuracy in basic operations and the ability to solve complex problems with ease.

Furthermore, there's been a significant development of comprehension skills across reading, writing, and mathematics. Students can now interpret meanings, ask questions, and express opinions, leading to better performance in other subjects. This strengthening of basic competencies has resulted in a tremendous increase in students' self-confidence. They actively participate in class, discussions, and school activities, replacing hesitation and fear with positive energy.

The school has also seen increased attendance and academic enthusiasm, as learning has become joyful and engaging, reducing absenteeism. With a strong foundation, students now show a greater inspiration for higher education, confidently pursuing college education after 10th standard, supported by school counselling programs.

B) Impact on Teachers and School: A Capable and Inspiring Educational Centre

Teacher empowerment and satisfaction have notably increased due to new teaching methods and training. Teachers are now more focused on individualized student abilities rather than just syllabus completion, making their teaching more effective. A 'collaborative' and 'Learning Community' has emerged, fostering mutual help and sharing of best practices. This has cultivated a positive school environment that is enthusiastic, student-centric, and makes learning enjoyable and less stressful.


Consequently, S.I.E.S. High School has gained a strong reputation and recognition in society for providing quality and innovative education. Parents are eager to enrol their children, and the school has been acknowledged by local administrative bodies and educational authorities as an 'ideal school'.

C) Impact on Parents and Community: Stronger Relationships and Social Change

There's been an increased parental trust in the school and teachers, leading to more active participation in school activities and full support. Parents express satisfaction with their children's progress and have heightened awareness about education. Ultimately, this success contributes to social development, as educated and confident students are poised to become capable citizens, contributing significantly to the nation's progress. The strong bond between the school and the community serves as an ideal model for educational transformation.

The success story of S.I.E.S. High School is not limited to textbook knowledge, but is a symbol of the school's commitment to shaping every child according to their potential and guiding them towards a bright future. Due to the vision of Principal Mrs. Kalyani Arumugam and the tireless efforts of her team, S.I.E.S. High School has truly brought about an effective educational revolution based on the principle of 'Knowledge is Power'.

----------**----------



शैक्षणिक,सांस्कृतिक व सामाजिक विकासासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न

शाळेचे नाव - चेंबूर एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा, चेंबूर

शाळेचा पत्ता - चेंबूर एज्युकेशन सोसायटी मार्ग, स्वामी विवेकानंद चौक, चेंबूर, मुंबई -400071

मुख्याध्यापक नाव - विठ्ठल दुधाप्पा कांबळे

मुख्याध्यापक मोबाइल क्रमांक - 9869029608



मुंबई शहरातील शाळा म्हटले की सर्व सोयीसुविधा उपलब्ध असणारी सुसज्ज शाळा. इथे आव्हाने, समस्या नसतात असा अनेकांचा गैरसमज असतो. सतत धावणारी ही मुंबई आर्थिक राजधानीमध्ये बहुधर्मीय, बहुजातीय, बहुभाषिकता आहेच. त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक मिश्रण झालेले आहे. मुंबईतील मराठी मातृभाषा असलेल्या पालकांची संख्या कमालीची घटली आहे. मुंबई सारख्या शहरात मराठी माध्यमाची शाळा टिकवून ठेवणे हे खूप मोठे आव्हान आहे. १९५४ ह्या वर्षी मराठी माध्यमाची शाळा अशी चेंबूरच नव्हे तर मुंबई आणि महाराष्ट्रभर ओळख असलेली चेंबूर एज्युकेशन सोसायटीची पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शाळा आजही तितक्याच ताकदीने उभी आहे. सात दशकांपासून शाळा विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर उज्ज्वल भवितव्यासाठी आवश्यक असलेले संस्कार, जीवनमूल्ये आणि कौशल्ये देत आहे. शाळेची यशोगाथा ही केवळ आकडेवारी किंवा शैक्षणिक गुणवत्ता पूर्तता इतकीच मर्यादित नसून, ती पिढ्यानपिढ्या घडवलेल्या आदर्श नागरिकांची आणि समाजाला दिलेल्या योगदानाची सुद्धा आहे. माझ्या शाळेचे नाव उच्चारताच शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक बाबतीत शाळेची

एक उत्तम प्रतिमा उभी राहते. चेंबूरमधील प्रत्येक मुलाला, विशेषत: आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या दूरदृष्टीने चेंबूर एज्युकेशन सोसायटी संस्था सदैव कार्यरत आहे. "उद्धरेदात्मनात्मनम" हे संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. स्वत:चा उद्धार स्वत: करण्यास समर्थ होणे असा त्याचा अर्थ आहे. शब्दश: शाळेतला प्रत्येक घटक स्वत:च आत्मनिर्भर होण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहतो.

१५,००० स्क्वेअर मीटर असणारे मैदान हे शाळेचे वैभव आहे. आज मुंबईत इतके मोठे क्रीडांगण शाळांना लाभणे अतिशय दुर्लभ बाब आहे. ह्या मैदानात खेळणाऱ्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरावरचे मैदान गाजवले आहे. इंग्रजी शाळांचे उपनगरात दिवसेंदिवस प्राबल्य वाढत असताना, महाराष्ट्रभर मातृभाषेतील शाळा फार वेगाने बंद होत असताना माझी शाळा टिकवून ठेवण्यात यश आले त्याचे श्रेय मराठी माध्यमाच्या शाळेत मिळणाऱ्या संस्कार, जीवनमूल्ये यांवर विश्वास ठेवणाऱ्या चेंबूरकर पालकांना तसेच संस्थाचालक पदाधिकारी यांना जाते.


वैशिष्ट्यपूर्ण प्रवेशोत्सव -

प्रत्येक वर्षी नवीन प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाविन्यपूर्ण पद्धतीने स्वागत केले जाते. त्यांचा शाळेचा पहिला दिवस सदैव अविस्मरणीय ठरावा यासाठी शिक्षकांना शाळा अधिकृत सुरु होण्याआधी शाळेत बोलवून सहविचार सभा घेऊन शाळा प्रवेशोत्सव मागील वर्षीसारखा न होता तो आगळावेगळा कसा घेता येईल याबाबत निर्णय करण्यात येतो. नियोजन करून त्यानुसार कार्यवाही करण्यात येते. संपूर्ण शाळा सजवली जाते. विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी सेल्फी पॉईंट हा आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो. आकर्षित, पर्यावरण पूरक सेल्फी पॉईंट शिक्षक स्वनिर्मित असतो.

https://www.facebook.com/share/r/1CKHFQwVQh/

विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न -

विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता आणि पायाभूत संख्याज्ञान वाढविण्यासाठी अथक प्रयत्न केले जातात. माझ्याकडे पूर्वप्राथमिक वर्ग असल्यामुळे त्यांच्या शिक्षणावर मी अधिक लक्ष केंद्रित करतो. या टप्प्यावर खेळातून शिकण्यावर भर दिल्याने अक्षरांची ओळख, शब्दांचे ज्ञान आणि संख्यांची मुलभूत समज विकसित होते. शिक्षकांना पायाभूत साक्षरता आणि पायभूत संख्याज्ञान शिकवण्यासाठी आधुनिक आणि प्रभावी पद्धतींचे प्रशिक्षण दिले जाते. यात ध्वनी, अक्षर, वर्ण, शब्द ओळख आणि गणितातील संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगण्याचा समावेश असतो. दर महिन्याच्या मासिक सभेत शिक्षकांना या दृष्टीने सूक्ष्म मार्गदर्शन केले जाते. मागील वर्षीपर्यंत पूर्वप्राथमिक वर्गासाठी अभ्यासक्रम आम्ही शिक्षकांसोबत बसून निर्धारित करण्याचे काम करत असू. बालगीते, बडबडगीते, अभिनययुक्त गीत, कृतियुक्त गीत, गोष्टी सांगणे, खेळ आणि क्रियांवर आधारित शिक्षण, खेळ कोडी, स्वावलंबन, वैयक्तिक स्वच्छता असा भर देण्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन आणि आधार दिला गेला. पूर्वप्राथमिक विभागासाठी भरपूर खेळणी, आकर्षक रंगसंगती, मोठे वर्ग अशी सुसज्ज व्यवस्था, स्वच्छ स्वच्छतागृह, पाणी आणि सुरक्षित वातावरण निर्माण केले. जाणीवपूर्वक हस्ताक्षर पूर्व तयारीसाठी चित्र काढणे, रेषा गिरवणे, गिरगीटणे, मातीकाम करणे, बटने लावणे, भातुकलीचा खेळ यांसारख्या क्रियांमधून बोटांचे स्नायू बळकट होण्यासाठी अनेक कृतींचा त्यामध्ये समावेश असतो. वाचन कोपरे, गोलावरच्या गप्पा असे उपक्रम घेतले जातात. प्राथमिक



विभागासाठी विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्य जसे श्रवण, वाचन, भाषण, लेखन यासाठी मासिक सभेत आणि आवश्यकतेनुसार वर्गशिक्षकांना मार्गदर्शन केले जाते. शिक्षक त्यांना येणारी समस्या, आव्हाने मांडतात. सहविचाराने समस्या, आव्हाने सोडविण्याचा प्रयत्न असतो. प्रत्येक वर्गातील विद्यार्थी वाचन स्तर, संख्याज्ञान स्तर मी स्वत: जातीने तपासतो आणि तशा नोंदी ठेवतो. वर्गशिक्षकांच्या नोंदी आणि माझ्या नोंदी ह्या पडताळणी केली जाते.


कौशल्य आधारित आणि व्यावसायिक शिक्षण -

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० कौशल्य आधरित आणि व्यावसायिक शिक्षणाची अंबलबजावणी करण्यासाठी सांगितले आहे. माझी शाळा स्थापना झाल्यापासून ह्या महत्त्वाच्या विषयावर शाळेने लक्ष दिले होते.

खेळ आणि कृती आधारित शिक्षण (Activity Based Learning) -

व्यावहारिक कामांची ओळख व्हावी म्हणून विद्यार्थ्यांना त्यांच्या इयत्तेनुसार झाडे लावणे, बागकाम करणे, परसबाग करणे, शैक्षणिक साहित्य शिक्षक, पालक यांच्या मदतीने तयार करणे, स्वच्छता राखणे, स्वत: हाताळलेले साधने, खेळणी पुन्हा जागेवर ठेवणे इत्यादी गोष्टीमुळे त्यांची निरीक्षण शक्ती, हाताळणी कौशल्ये वाढीसाठी प्रयत्न केले. चित्रकला, चिकणमाती काम, कागदकाम, हस्तकला, पतंग तयार करणे त्याची कणी बांधणे, भेळ तयार करणे, कोशिंबिरी तयार करणे, आठवडा बाजार भरवणे, विविध क्षेत्रभेटी आयोजित केल्या जातात. जसे मासे बाजारात जाणे, गणपती तयार करण्याचा कारखाना, पोस्ट ऑफिस, अपना सहकारी बँक भेट असे अनेक प्रयोग केले आहेत. उदा. मासे बाजारात गेल्यावर विद्यार्थी मास्यांना स्पर्श करतात, त्याचा भाव विचारतात, तो भाव ते मास्याच्या नावासमोर लिहितात. मासे विक्रेत्या मावशीना विविध प्रश्न विचारून माहिती गोळा करतात. नोंदी करतात. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या माहितीचे विश्लेषण वर्गात शिक्षक करून घेतात. जसे कोणता मासा महाग आहे? त्याची किंमत किती होती? कोणता मासा स्वस्त आहे? त्याची किंमत किती होती? मास्यांचा क्रम चढत्या, उतरत्या क्रमाने लावा. एखादा मासा महाग की स्वस्त हे कशाच्या आधारावर ठरवले असे अनेक प्रश्न विचारून प्राप्त माहितीचे विश्लेषण करणे, त्याचे व्यवस्थापन करणे ह्या गोष्टी विद्यार्थी शिकतो. मास्यांची नावे वर्णमालेप्रमाणे लावण्यास सांगितले जाते. मास्याचे वर्णन विद्यार्थी त्याच्या भाषेत करतो. तसेच मासे विक्रते यांचे कौशल्ये, त्यांच्या कामाची ओळख ह्या निमित्ताने करून दिली जाते. विविध व्यवसायांची माहिती मिळते. विद्यार्थ्यांचे कुतूहल निर्माण होते. श्रमप्रतिष्ठा मूल्य विकसनासाठी मदत होते. विद्यार्थी खेळू, करू, शिकू तासाला गुढी तयार करणे, कागदी हार गजरे तयार करणे, भेटकार्ड तयार करणे, राखी तयार करणे, कागदी पिचकारी तयार करणे, लिफाफा तयार करणे, फोटो फ्रेम तयार करणे, गणपती मूर्ती तयार करणे असे अनेक उपक्रम वर्गात तयार करत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, सहकार्य वृत्ती, नीटनेटकेपणा, टापटीपपणा विकसित होण्यात खूपच मदत होत आहे.

कलेचे विषय केवळ स्वतंत्र म्हणून न ठेवता ते इतर विषयांशी शिक्षक समवाय साधू शकतील असे सातत्याने माझे मार्गदर्शन सुरु असते. कला शिकवत असताना शिक्षक त्याचा समवाय गणित, भाषा, परिसर अभ्यास असा साधतात.







मूल्याधारित शिक्षण -

शाळेतील विद्यार्थी हे अभ्यासात, खेळात प्रवीण होतच आहेत त्यासोबत भविष्यात एक संवेदनशील आणि जबाबदार नागरिक तयार करण्याच्या दृष्टीने शाळा म्हणून जाणीवपूर्वक नियोजन आणि आयोजन करते.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, उच्चशिक्षित आणि अनुभवी शिक्षकवृंद -

शाळेच्या सातत्यपूर्ण यशाचे एक मुख्य कारण म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे शिक्षक. शाळेतील शिक्षकवृंद अत्यंत अभ्यासू, समर्पित आणि मुलांना समजून घेणारा आहे. ते केवळ अभ्यासक्रम, क्रमिक पाठ्यपुस्तक शिकवत नाहीत, तर मुलांना विचार करायला, प्रश्न विचारायला आणि नवनवीन गोष्टी शिकायला प्रोत्साहित करतात. आधुनिक शिक्षण पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांना संकल्पना समजावून सांगितल्या जातात. भारतीय शिक्षण ज्ञान परंपरा, संस्कृती यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. अध्यापनाचे नियोजन करताना आवर्जून या गोष्टींचा समावेश शिक्षक करत असतात. बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग तत्कालीन मान. शिक्षणाधिकारी श्री. महेश पालकर यांच्या संकल्पनेतून साकारलेली राज्यस्तरीय ऑनलाईन शाळा बंद शिक्षण सुरु ह्या उपक्रमात दोन शिक्षकांनी दोन वर्ष कोरोना कालावधीत योगदान दिले. शाळेतील पाच शिक्षकांना बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार, दोन शिक्षकांना महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार प्राप्त झालेला आहे. दरवर्षी माझे गुणवंत, मेहनती शिक्षक शाळा सुटल्यानंतर शाळेच्या परिसरात गृहभेटी देतात, पालकांना मातृभाषेतील शाळेचे महत्त्व पटवून दिले जाते. अनेक शाळाबाह्य, विशेष गरजा असणारे विद्यार्थी यानिमित्ताने प्रवेशित होतात. जिथे जिथे आवश्यकता भासते तेव्हा शिक्षक माझ्याशी चर्चा करतात. मी स्वतः गृहभेट करून पालकांची समस्या सोडवून त्या बालकांना प्रवेशित करून घेतो.


विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर -

चेंबूर एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व देते. अभ्यासाबरोबरच कला, खेळ, संगीत आणि इतर उपक्रमांना येथे विशेष प्रोत्साहन दिले जाते. वार्षिक स्नेहसंमेलन, क्रीडा स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, निवासी शिबीर, क्षेत्रभेट आणि विविधांगी सांस्कृतिक कार्यक्रम यांसारख्या विविध उपक्रमांमुळे मुलांना त्यांची सुप्त कौशल्ये ओळखायला आणि विकसित करायला मदत होते. यामुळे विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांचे राष्ट्राला आवश्यक असे व्यक्तिमत्व घडते.

सर्वसमावेशित शाळा म्हणून ओळख -

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा सातत्याने प्रवेश देते. ह्या विद्यार्थ्यावर शाळेतील शिक्षक विशेष मेहनत घेतात. ह्या विद्यार्थ्यामध्ये स्वावलंबन, आत्मनिर्भरता निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. प्रत्येक विशेष विद्यार्थ्याची क्षमता, गरज आणि शिकण्याची वेगळी पद्धत ओळखून त्यांच्यासाठी वैयक्तिक शैक्षणिक योजना (IEP) तयार केली जाते. यात त्यांच्या शिकण्याच्या उद्दिष्टांचा, आवश्यक सोयी-सुविधांचा आणि मूल्यमापन पद्धतीचा समावेश असतो.

मुख्याध्यापक, वर्गशिक्षक आणि पालक मिळून आम्ही योजना तयार करतो आणि अंमलात आणतो. शाळेत आणि वर्गात दिव्यांगत्वाविषयीचे गैरसमज दूर करून सर्वसमावेशकता, परानुभूती आणि



स्वीकृती वाढवण्यासाठी शाळा प्रयत्न करते. यामुळे विशेष गरजा असणारे विद्यार्थी त्यांच्या समवयस्कांच्या बरोबर सहयोगी वातावरण निर्माण होण्यास मदत झाली. शैक्षणिक, सामाजिक आणि भावनिकदृष्ट्या प्रगती करू शकले. इतर सामान्य विद्यार्थ्यांनी विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांशी कसे वागावे, त्यांना कसे सहकार्य करावे हे शिकवले जाते. त्यांच्यात समानतेची भावना निर्माण करण्यासाठीचे विशेष उपक्रमांची योजना राबविले जाते. केवळ एकाच पद्धतीचा वापर न करता, विविध अध्यापन पद्धती जसे दृकश्राव्य साधने, कृतीयुक्त शिक्षण, गरजेनुरूप तयार केलेले खेळ वापरून विद्यार्थ्यांना शिकवले जाते. विविध अध्यापन पद्धती म्हणजे मिश्र पद्धतीचा वापर केला जातो. कर्णबधीर मुलांसाठी सांकेतिक भाषा किंवा इतर संप्रेषण पद्धतींचा वापर शिक्षक आणि इतर विद्यार्थी थोड्याफार प्रमाणात का असेना पण जरूर करतात. संवादाच्या गरजा पूर्ण होतील याकडे लक्ष दिले जाते.

शिकवण्यासाठी सोपे आणि आकर्षक शैक्षणिक साहित्य मोठ्या अक्षरातील पुस्तके, स्पर्श करण्यायोग्य वस्तू, स्नायू विकसनासाठी विशेष साहित्य शिक्षकांनी विपुल प्रमाणात तयार केले आहे. सोपे, कमी खर्चाचे आणि आकर्षक साहित्य विद्यार्थ्यांना हाताळायला मिळते. त्यामुळे ज्ञानरचनावाद पद्धतीने मुल शिकते. विद्यार्थ्यांना प्रत्येक गोष्टीत सक्रिय, कृतियुक्त सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. चित्रकला स्पर्धा, कथाकथन स्पर्धेत ह्या मुलांनी स्पृहणीय यश मिळवले आहे. शाळा आणि वर्गखोल्या मैत्रीपूर्ण करण्यासाठी वर्गरचना, विशेष शौचालय, रॅम्प व्यवस्था करण्यात आली आहे. शैक्षणिक साधने सहज हाताळता येतील अशी शिक्षकांनी स्वनिर्मिती केली आहे. भौतिक सुविधांमध्ये सुधारणा केल्यामुळे ह्या विद्यार्थ्यांना आव्हानांचा सामना सकारात्मक होतो. सर्वसामान्य शिक्षकांना विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेण्यासाठी आणि त्यांना प्रभावीपणे शिकवण्यासाठी शिक्षकांनी ऑनलाईन प्रशिक्षण घेतले आहे. शिक्षकांना दिव्यांगत्वाचे प्रकार, त्यांच्या शिकण्याच्या शैली आणि त्यांना मदत करण्यासाठी आवश्यक कौशल्ये शिकवण्यासाठी शिक्षकवृंद तयार आहे.


विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करताना त्यांच्या क्षमता आणि मर्यादा लक्षात घेऊन योग्य पद्धतींचा वापर केला जातो. केवळ लेखी परीक्षांवर अवलंबून न राहता, त्यांच्या प्रगतीचे निरीक्षण, प्रकल्प कार्य, चित्रकला, मौखिक उत्तर, भूमिकाभिनय, ऑडिओ- व्हिजुअल माध्यमांचा वापर आणि गरजेनुसार इतर पद्धतींचा प्रभावीपणे वापर केला जातो. पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी करून घेतले जाते. त्यांच्या सूचनांचा आणि अनुभवांचा आदर केला जातो. प्रत्येक विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनात प्रोत्साहनपर भत्ता शाळेकडून दिला जातो. शासनाकडून विविध मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व प्रोत्साहनभत्ता मिळण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा केला जातो.

विद्यार्थ्यांच्या छोट्या छोट्या यशाचेही कौतुक केले जाते आणि त्यांना आत्मविश्वास वाढवण्यासाठी नेहमी सकारात्मक प्रोत्साहन दिले जाते. यामुळे त्यांच्यातील न्यूनगंड कमी होण्यास मदत झाली.

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्पृहणीय यश -

कु.कावेरी शशिकांत सोनार बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित कथाकथन स्पर्धेत प्रथम क्रमांक

कु. जुईली उल्हास घरत व शाळेला बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेत विशेष पारितोषिक प्राप्त झाले.




कु. स्वरा शिवदीप गोळे ह्या विद्यार्थिनीने सतत तीन वर्षे आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत यश संपादन केले.

कु. जान्हवी काका कांबळे ह्या विद्यार्थिनीची दखल समग्र शिक्षा महाराष्ट्र राज्य यांनी घेतली व त्यांच्या पोर्टलवर "जिद्दीच्या जोरावर" असा व्हिडिओ प्रसारित करण्यात आला.

G20, पुणे इथे मध्ये कु. जान्हवी काका कांबळेचा व्हिडिओ शासनातर्फे प्रसारित करण्यात आला.

You Tube	https://youtu.be/dEikpP2GDfo?feature=shared
Facebook	https://www.facebook.com/share/p/1ChYd8T5JL/
Instagram	https://www.instagram.com/reel/CoodbYiuoFd?igshid=YmMyMTA2M2Y

कु. रोहन भगवान कोंढाळकर ह्या विद्यार्थ्याच्या चित्रकला व शिल्पकलेची दखल शिक्षा महाराष्ट्र राज्य यांनी घेतली. बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षक विभाग राज्यस्तरीय ऑनलाईन वर्ग इयत्ता तिसरी आणि चौथीच्या वर्गासाठी २०२० आणि २०२१ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील ३०० विद्यार्थ्यांसाठी गणपती मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा शिक्षिका श्रीमती. स्पृहा इंदू यांच्यासोबत यशस्वीपणे घेतली. श्रीमती. स्पृहा इंदू यांनी विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सकारात्मक शैक्षणिक प्रवासाबाबत "वर्गातील राजहंस" पुस्तक लेखन केले आहे. केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री श्री. रामदास आठवले यांनी प्रस्तुत पुस्तकासाठी विशेष विद्यार्थ्यांच्या यशोगाथेचे कौतुक केले आहे.



इंग्रजी भाषा कक्ष -

मराठी माध्यमाची शाळा असल्याने मातृभाषेतून शिक्षण मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न असतातच. त्यासोबत इंग्रजी संवाद आणि लेखन कौशल्ये प्राप्त होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहे. विद्यार्थ्यांना स्वतंत्र इंग्रजी श्रवण कक्ष तयार केला आहे. कोणतीही भाषा नव्याने शिकत असताना श्रवण होणे फार महत्त्वाचे असते. प्रत्येक शब्द उच्चारण नेमके कसे होते हे ह्या कक्षात प्रत्यक्ष अनुभवांतून शिकवले जाते. प्रत्येक विद्यार्थी इंग्रजी अस्खलित बोलू शकेल, उत्तम संवाद साधू शकेल अशी संधी इथे विद्यार्थ्यांना दिली जाते. विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेतील कौशल्ये प्राप्त होण्यास ह्या कक्षाची मदत होत आहे.

Activity कक्ष -

शासनाकडून प्राप्त झालेले साहित्य पेटी, शिक्षक, विद्यार्थी निर्मित शैक्षणिक साहित्य तसेच विविध कृती, खेळ आधारित अध्यापन पद्धतीचा पाठ घेण्यासाठी शिक्षक ह्या कक्षाचा वापर करत आहेत.



सामाजिक भान आणि उत्तरदायीत्व जपणारी शाळा -

चेंबूर एज्युकेशन सोसायटीची पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा केवळ एक शैक्षणिक संस्था नाही, तर ती चेंबूरच्या स्थानिक समुदायाचा एक अविभाज्य भाग आहे. शाळा सुरु नसताना किंवा शाळेत अध्ययन अध्यापनाचे कार्य सुरु नसेल तेव्हा शाळेच्या वापरात नसलेल्या पायाभूत सुविधांचा वापर सामाजिक एकोपा, सलोखा निर्माण करण्यासाठी शाळेने कायम प्रयत्न केले. शाळा हे सामाजिक चेतनाकेंद्र म्हणून ओळखले जाते. पालक, माजी विद्यार्थी आणि समाजातील सर्व घटकांचा शाळेच्या प्रगतीत सक्रीय सहभाग असतो. शाळेने नेहमीच समाजाच्या गरजा ओळखल्या आहेत आणि त्यानुसार आपल्या कार्यपद्धतीत बदल केले आहेत. दरवर्षी शाळेतील परिसरात सिद्धार्थ कॉलनी, सुमन नगर, कोकण नगर इथे २६ नोव्हेंबर रोजी संविधान फेरी आयोजित केली जाते. विद्यार्थी क्रांतिसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर मराठी

आणि इंग्रजीमधून भाषण करतात. सर्व विद्यार्थी सामुहिक संविधान प्रास्ताविक याचे प्रकट वाचन करतात. स्थानिक मंडळाकडून विद्यार्थ्यांना वह्या, लेखन साहित्य आणि खाऊ दिला जातो.

परिसरातील भूलिंगेश्वर देवालय इथे विद्यार्थी वर्षातून दोनदा क्षेत्रभेट देतात. ह्या ट्रस्टकडून प्रत्येक विद्यार्थ्यांना वह्या दिल्या जातात.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३00 जयंतीनिमित्त भव्यदिव्य कार्यक्रम साजरा करण्यात आला. ह्यामध्ये पालकांनी उत्स्फूर्त सहभाग दिला. पालकांना यानिमित्ताने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्याविषयी माहिती मिळाली. प्रस्तुत कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे कौशल्य आणि उद्योजकता मंत्री यांची उल्लेखनीय उपस्थिती लाभली.

चौथीचे विद्यार्थी प्राथमिक वर्गातून माध्यमिक वर्गात स्थलांतरीत होतात. आशीर्वाद समारंभ दरवर्षी आयोजित केला जातो. पालक उत्स्फूर्तपणे शाळेला स्वखुशीने शालेय उपयोगी वस्तू भेट देतात. शाळेत दिनविशेष साजरे करण्यासाठी थोर व्यक्तींचे फोटो आवश्यकता असते. चौथीच्या एका वर्गाने ४० थोर व्यक्तींचे सुंदर लाकडी फ्रेम असलेले फोटो दिले. एका वर्गाने गणपती, सरस्वती पितळेच्या मुर्त्या दिल्या. एका वर्गाने ध्वनीक्षेपणाचे सर्व साहित्य दिले.

सन २०२४ - २५ (२१२ विद्यार्थी) आणि २०२५ - २६ (२३५ विद्यार्थी) भारत सर्च टॅलेंट परीक्षा नवीन शिक्षण शैक्षणिक धोरणावर आधारित असलेल्या स्पर्धात्मक परीक्षेला विद्यार्थ्यांना पालकांच्या मागणीमुळे बसवण्यात आले. शिक्षक जादा तास घेऊन ह्या विषयाची तयारी करत आहेत. ह्यामुळे स्पर्धात्मक परीक्षा कशी असते याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळत आहे. सन २०२४-२५ ह्या वर्षीच्या परीक्षेत सर्व विद्यार्थी म्हणजेच १००% उत्तीर्ण झाले. कु. लाभ विश्वनाथ पाटील, कु. श्रेया विशाल सोनावले, कु. मंथन संतोष पुजारी, कु. कार्तिक योगेश पवार, कु. सुयश सीताराम झोरे ह्यांना केंद्रात, जिल्ह्यात गुणवत्ता यादीत आल्याबद्दल BTS संस्थेने प्रमाणपत्र आणि ट्रॉफी दिली. शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार श्रीमती. स्नेहा नानिवडेकर, (मनपा शिक्षिका आणि इनरव्हील क्लब अध्यक्षा) यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना दोन उत्तम प्रतीच्या वह्या, स्केचपेन सेट भेट म्हणून दिली.

२०१८ ते आजपर्यंत दरवर्षी विद्यार्थी चिन्मय मिशन यांच्या माध्यमातून श्री. मिलिंद खोलकुटे शाळेत येऊन दर बुधवारी निशुल्क गीता अध्याय पठन करून घेतात. त्यांच्या माध्यमातून विद्यार्थी आंतरशालेय स्पर्धेत सहभागी होतात. कोरोना कालावधीत ऑनलाईन पद्धतीने हे तास घेतले गेले. प्रत्येक वर्षी विद्यार्थी स्पृहणीय यश मिळवत आहेत.


कु. सुकन्या संतोष राणे

कु. यश श्रीकांत गायकवाड

कु. अथर्व विठ्ठल पाष्टे

कु. निशा मारुती बांबरकर

कु. केतकी सुधीर देसाई



राष्ट्रीय कर्तव्य भावनेतून शाळेतील परिसरातील समाजाचा, विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या सहभागातून भरघोस ध्वजनिधी सैनिक कल्याण विभाग, सहस्त्र सेना महाराष्ट्र राज्य ध्वजदिन निधी आर्थिक मदत करण्यासाठी शाळा प्रत्येक वर्षी हिरीरीने सहभागी होते. वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र हे महाराष्ट्रातील आदिवासी आणि वनवासी समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित संस्था आहे. आदिवासी बांधव समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिला आहे. त्यांना शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक विकासासाठी शाळा आर्थिक मदत व्हावी म्हणून संस्थेचे दरवर्षी ५०० दिनदर्शिका व राखी खरेदी करण्यात येते. ह्या दिनदर्शिका आणि राखी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला दिली जाते.

दरवर्षी ६ डिसेंबर रोजी दादर, चैत्यभूमी इथे क्रांतिसूर्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना करण्यासाठी संपूर्ण भारतभरातून अनुयायी येत असतात. त्यांच्या जेवणाची थोडी फार सोय व्हावी या उद्देशाने प्रत्येक विद्यार्थी घरातून शाळेत येताना जितक्या शक्य आहेत तितक्या चपात्या आणतात. सर्व चपात्यांचे संकलन शिक्षक करतात. संकलित केलेल्या चपात्या पाच डिसेंबर रोजी चैत्यभूमीवर समता परिषद संस्थेपर्यंत पोहचवल्या जातात.

दातृत्वाची परंपरा -

श्रीमती. नलिनीताई सुरेश हावरे ह्या विश्वमांगल्य संस्थेच्या वतीने कुटुंब, आदर्श माता आणि बालसंस्कार ह्या विषयांवर पालकांना मार्गदर्शन करतात. तसेच दरवर्षी शाळेतील पूर्वप्राथमिक शाळेतील तिन्ही वर्गाना शालेय गणवेश, दप्तर आणि शालेय उपयोगी वस्तूंचे वितरण करतात. सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती. शुक्ला सिंगताई ह्या मागील तीन वर्षांपासून प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना दप्तराचे वितरण करतात.

श्री. रवींद्रभाई संघवी, तसेच शाळेतील कर्मचारी निवृत्त होताना शाळेला स्वखुशीने निधी अर्पण करतात. कॅनरा बँक, जनकल्याण बँक, अपना सहकारी बँक, विविध सामाजिक स्वयंसेवी संस्था आणि समाजातील अनेक दाते शाळेचे सातत्यपूर्ण कामावर विश्वास ठेवून शाळेला विविध माध्यमातून आर्थिक बळ देत आहेत. शाळेच्या हिरकमहोत्सवी वर्षात मी आणि माझ्या शिक्षकांनी १७ लाख रुपयांचा निधी विविध उपक्रमातून उभा केला व संस्थेचे हात बळकट केले.

वर्ष	पूर्वप्राथमिक	प्राथमिक	एकूण पट
२०१६	१५४	५२८	६८२
२०१७	१५८	५०८	६६६
२०१८	१४७	४३६	५८३
२०१९	२७०	४२९	६९९
२०२०	१४४	३९८	५४२
२०२१	१४०	४५७	५९७
२०२२	२१८	४८३	७०१
२०२३	२१३	४८६	६९९
२०२४	१८०	४७२	६५२
२०२५	१८०	४४२	६२२




शिक्षकांच्या व्यावसायिक विकासात शाळेचे योगदान -

तीन दिवसीय विचार मंथन "ज्ञानोत्सव" राष्ट्रीय संमेलनात शिक्षणातील नवोपक्रम प्रयोग सादरीकरण करण्यासाठी माझ्या शाळेतून तीन शिक्षकांना संस्थेने सर्व आर्थिक भार स्वीकारून सहभागी होण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन दिले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधनी, उत्तन इथे सर्व शिक्षकांना प्रशिक्षण संस्थेने उपलब्ध करून दिले. शाळेत होणारे शैक्षणिक प्रयोग, उपक्रम विक्रम साराभाई, गुजरात, आय.आय.एम. गुजरात, आयसर पुणे, विद्या प्राधिकरण इथे दरवर्षी सादर केले जातात. पूर्वप्राथमिक विभागांच्या शिक्षकांना सोबत घेऊन अभिनव पद्धतीने चालणाऱ्या शाळांना भेटी दिल्या गेल्या. २०२० या वर्षीपासून राष्ट्रीय, राज्य, जिल्हा स्तरावर विशेष कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना २६ जानेवारी रोजी सन्मानपत्र आणि भेटवस्तू देऊन चेंबूर एज्युकेशन सोसायटी आमची संस्था प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करते. त्यामुळे शिक्षकांचे मनोबल उंचावते. वर्षभर काम करण्यासाठी प्रेरणा व उर्जा मिळते.

विद्यार्थ्यांचे स्पृहणीय यश -

आज शाळेतील माजी विद्यार्थी पोलीस दल, सैनिक दल, सायबर सुरक्षा, डॉक्टर, इंजिनिअर, शासकीय सेवेत उत्तम सेवा देत आहेत. हे विद्यार्थी एकत्र येऊन शाळेला भरीव आर्थिक सहाय्य करत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाने 'अ' दर्जाची आदर्श शाळा जाहीर केली आहे. सातत्याने बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आंतरशालेय स्पर्धांमध्ये पहिला किंवा दुसरा क्रमांक शाळेने टिकवून ठेवला आहे. प्राचार्य जनार्दन शिर्सेकर शिक्षण संस्थेचे बालक विहार, महात्मा गांधी विद्यामंदिर आयोजित आंतरशालेय स्पर्धेत दरवर्षी माझे विद्यार्थी चित्रकला, वक्तृत्त्व स्पर्धा, स्मरणशक्ती स्पर्धा आणि बाल गीत गायन स्पर्धेत भरघोस पारितोषिके मिळवतात. लोकमान्य शिक्षण संस्था आयोजित दरवर्षी घे भरारी आंतरशालेय स्पर्धेत विद्यार्थी सहभागी होतात. मानवी मनोरा, वैयक्तिक नृत्य, सामुहिक नृत्य, लंगडी, समूह गीत गायन, चित्रकला, जिम्नेस्टीक स्पर्धेत विद्यार्थी स्पृहणीय यश मिळवत आहेत.


पालकांचे स्पृहणीय यश -

शाळेतील महिला पालकांना शाळा हे त्यांचे माहेर वाटावे. जीवनातील समस्या, संकटे मांडण्यासाठी, मनातील मोकळे होण्यासाठी मी समुपदेशन करत असतो. ह्या महिला आणि पुरुष पालक माझ्याशी मोकळेपणाने बोलतात. त्यामुळे कुटुंब टिकवण्यासाठी मदत होते. महिला पालकांसाठी "खेळ श्रावणातले" व पुरुष पालकांसाठी "पितृ संमेलन" आयोजन केले जाते.

घे भरारी आंतरशालेय स्पर्धेत श्री. अनिल अनंत कोठेकर ह्यांनी टाकाऊ वस्तूपासून सुंदर वस्तू निर्मितीत प्रथम क्रमांक पटकावला. मंगळागौर स्पर्धेत दरवषी माझ्या महिला पालकांचा दोन समूह सहभागी होतो. त्याची तयारी पालक आणि शिक्षक मिळून करतात. आमची शाळा त्यांना सरावासाठी जागा उपलब्ध करून देते. महिला पालकांनी अनेक पारितोषिके मिळवली आहेत. श्रीमती. साक्षी राणे

हम करें राष्ट्र आराधन
तन मन से धन से
तन मन जीवनसे
हम करें राष्ट्र आराधन

----------**----------



शैक्षणिक व्यवस्थापन गुणवत्ता विकासात मुख्याध्यापकाची भूमिका

शाळेचे नाव - विवेक विद्यालय

शाळेचा पत्ता - विवेक विद्यालय, आनंदगड, पार्कसाईट, विक्रोळी(प), मुंबई.

शाळेचा ई मेल आय.डी - vivekvidyalaya.vv@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री विवेक जगन्नाथ थोरात

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक -९२२४२९६१४३

मुख्याध्यापक ईमेल आयडी - vivekthorat.2010@rediffmail.com

शाळेचे ध्येय वाक्य :

विद्यार्थ्यांना अध्यापनाच्या संधीचे सोने करण्यासाठी सक्षम करणे तसेच विद्यार्थ्यांमधील उत्तमोत्तम गुणांना वाव देऊन त्यांचा भावनिक, सामाजिक व शारीरिक विकास करणे.

विवेक विद्यालय - ज्ञानरूपी दीपगंगा :



"शिक्षण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे !" — या विचारसरणीचा वारसा लाभलेले **स्व. जगन्नाथ थोरात सर** यांनी मुंबईतील विक्रोळी पार्कसाईटसारख्या डोंगराळ, झोपडपट्टीने वेढलेल्या विभागात ज्ञानाचा दीप प्रज्वलित केला. दाट अंधारात आशेचा किरण ठरलेली ही शाळा म्हणजेच, **विवेक विद्यालय**.

दि. **१३ जून २००१** रोजी "विवेक एज्युकेशन सोसायटी"च्या अधिपत्याखाली स्थापन झालेल्या या शाळेने गरिब, होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवे वळण दिले. शिक्षणाच्या प्रवाहात वंचित राहिलेल्या मुलांसाठी हे मंदिर म्हणजे सुवर्णसंधीची पहाट ठरली.

सुरुवातीस इ. १ ली, ५ वी व ८ वीचे वर्ग सुरु झाले. **"थेंबे थेंबे तळे साचे"** या उक्तीप्रमाणे पुढील वर्गांची भर पडत गेली आणि काहीच वर्षांत इ. १ ली ते १० वी पर्यंतची संपूर्ण शैक्षणिक यात्रा सुरु झाली.

"आग ओळखूनच ज्योत पेटवावी लागते, आणि क्षमतेनुसारच शिक्षणाचे बीज रोवावे लागते" — हे तत्व अनुसरत शाळेने कालांतराने **सेमी इंग्रजी माध्यम** देखील सुरु केले, जे बदलत्या काळाची गरज होती.

या ज्ञानमंदिरातील शिक्षकवृंद, विद्यार्थ्यांच्या मनामनात शिकण्याची ज्योत पेटवण्यासाठी झगडत आहेत. त्यांचे परिश्रम, विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद आणि पालकांचे भरभरून सहकार्य यामुळे शाळेचा निकाल दिवसेंदिवस भरारी घेत आहे.

"शिक्षक म्हणजे केवळ ज्ञानदाता नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याचे शिल्पकार असतात", याचे जिवंत उदाहरण म्हणजे विवेक विद्यालय. इथली प्रत्येक भिंत, प्रत्येक वर्गखोली शिक्षणाच्या गूढतेने भारलेली आहे.

आज या शाळेने स्थानिक विभागात आपले एक आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे. **विवेक विद्यालय ही केवळ शाळा नसून, ती एक संस्कारांची कार्यशाळा, एक उज्वल स्वप्नांची जन्मभूमी आहे.**

शाळेची वैशिष्ट्ये :

१) सर्व वर्गात व वऱ्हांड्यात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा

२) वाय. फाय. सुविधा

३) संपूर्ण शाळेत साउंड सिस्टीम यंत्रणा (PAS System)

४) गुणवत्तापूर्ण शिक्षण

५) प्रशस्त व सर्व भौतिक सुविधांनी युक्त वर्गखोल्या

६) शाळेतील सर्व वर्ग डिजिटल

७) प्रोजेक्टर द्वारे शिक्षण


८) तंबाखूमुक्त शाळा

९) विज्ञान प्रयोगशाळा

१०) संगणक प्रयोगशाळा

११) उपक्रमशील शाळा

१२) विद्यार्थी संसद



शाळेतील सुविधा :

१) डिजिटल शाळा

२) शिक्षक व मुला-मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे

३) स्मार्ट बोर्ड, स्मार्ट टी.व्ही., प्रोजेक्टर सुविधा

४) अवांतर वाचनासाठी पुस्तकांची उपलब्धता

५) अद्ययावत संगणक कक्ष

६) बैठ्या तसेच सांघिक खेळाच्या साहित्याची उपलब्धता

७) राष्ट्रीय मध्यान्ह भोजन योजना

८) सर्व वर्गात White Board (Dustless Classroom)

९) शुद्ध पिण्याचे पाणी

१०) मोफत पाठ्यपुस्तके

११) मोफत शैक्षणिक साहित्य

विद्यार्थी लाभार्थी योजना :

१) मोफत पाठ्यपुस्तके वाटप योजना

२) अपंग समावेशित शिक्षण अंतर्गत प्रवास भत्ता व मदतनीस भत्ता

३) महाराष्ट्र राज्य पूर्व उच्च प्राथमिक व माध्यमिक परीक्षा परिषद पुणे, शिष्यवृत्ती योजना

४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (NMMS)

५) सेवा भावी संस्थांकडून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप

६) वैद्यकीय शिबिरे

शालेय कामकाजातील विविध समित्या :

शाळेच्या दैनंदिन कामकाजामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी निर्धारित कामाची यादी व त्याकरिता संबंधित शिक्षकांना जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. हे कामकाज पाहण्यासाठी विविध समित्या गठीत केलेल्या असून मुख्याध्यापकांकडून वेळोवेळी आढावा घेतला जातो. तसेच नियमितपणे महिना अखेरीस त्यांच्या कार्याचा अहवाल तयार करण्यात येतो.

शाळेत स्थापन केलेल्या विविध समित्या खालीलप्रमाणे,

१) शाळा व्यवस्थापन समिती २) सखी सावित्री समिती

३) महिला तक्रार निवारण समिती ४) विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती

शालेय कामाकाजाबाबतच्या शाळेत कार्यरत असलेल्या समित्या खालीलप्रमाणे,

अ) परीक्षा समिती ब) क्रीडा समिती क) भौतिक सुविधा समिती ड) विज्ञान समिती

इ) कला व सांस्कृतिक समिती ई) अहवाल समिती उ) शालेय शिस्त समिती ऊ) समन्वय समिती

विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी घेतलेले उपक्रम :

१) इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मोफत जादा तासिका

२) अप्रगत विद्यार्थ्यासाठी मोफत उपचारात्मक जादा तासिका

३) स्पर्धा परीक्षा वर्ग

४) वाचन, लेखन व श्रवण कौशल्ये विकसित करण्यासाठी विशेष उपक्रम

५) अंक ओळख, संख्या ज्ञान व गणिती क्रिया विकसित करण्यासाठी विशेष उपक्रम

६) विविध खेळ, कोडी, तक्ते, कार्ड इ. द्वारे विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची संधी.

७) वक्तृत्व, निबंध, चित्रकला, हस्ताक्षर, प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजन

८) विविध सांस्कृतिक कार्यक्रम

९) कला गुणांचा शोध

१०) विद्यार्थी संसद

११) वार्षिक क्रीडा महोत्सव

१२) शैक्षणिक सहल

१३) विज्ञान प्रदर्शन

१४) विद्यार्थ्यांच्या गृहभेटी

जादा तासिका :


इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी जादा तासिका :

शाळेतील इयत्ता १० वी ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्वाची आणि निर्णायक पायरी आहे. त्यामुळे या वर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर **विशेष लक्ष, मार्गदर्शन आणि पाठबळ** दिलं जातं. विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवण्यासाठी **"संकल्प, सातत्य आणि सराव"** या त्रिसूत्रीचा अवलंब केला जातो. शाळा सुटल्यानंतर दररोज आयोजित केल्या जाणाऱ्या जादा तासिकांमधून विद्यार्थ्यांना सर्मपित सरावाची संधी दिली जाते. या तासिकांमध्ये त्यांच्या शंका नीट समजून घेतल्या जातात व प्रत्येक प्रश्नाचं समाधान शिक्षक तन्मयतेने करतात.


विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार, तसेच पालकांच्या सहमतीने सुट्टीच्या काळातही विशेष जादा तासिकांचे आयोजन केले जाते. हेच ते अतिरिक्त प्रयत्न, **जे विद्यार्थ्यांच्या यशामध्ये *"सोन्याहूनही पिवळं"* योगदान देतात**.

अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जादा तासिका :

"प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये एक दिवा असतो; गरज असते ती फक्त त्याला योग्य दिशा दाखवणाऱ्या दीपस्तंभाची." शाळेमधील प्रत्येक विद्यार्थी हा शाळेचा अमूल्य ठेवा असतो. काही विद्यार्थी शैक्षणिक प्रगतीत थोडे मागे पडलेले असले, तरी त्यांच्यामध्ये दडलेली क्षमता उलगडण्यासाठी शिक्षकांची *सदिच्छा आणि समर्पण* हेच खरे शस्त्र ठरते. वर्गशिक्षक आणि इतर शिक्षकांच्या सहकार्याने 'कच्च्या' विद्यार्थ्यांचा विचारपूर्वक शोध घेण्यात येतो. या विद्यार्थ्यांसाठी सोमवार ते गुरुवार, शाळा सुटल्यानंतर विशेष



जादा तासिकांचे आयोजन केले जाते, जिथे त्यांच्या वाचन, लेखन, अंकज्ञान इत्यादी मूलभूत कौशल्यांचा नियमित सराव करून घेतला जातो. या उपक्रमासाठी शिक्षकांनी अभ्यासपूर्ण नियोजन करून विशेष अभ्यासक्रम तयार केला आहे. त्यातूनच साकारली गेली आहे, **'दीपस्तंभ — उपचारात्मक शिक्षण कार्यपुस्तिका'**, जी विद्यार्थ्यांसाठी शिकण्याची आनंददायी व प्रभावी साधन बनली आहे. विद्यार्थी ही कार्यपुस्तिका केवळ अभ्यास म्हणून नव्हे, तर उत्सुकतेने आणि आनंदाने सोडवत आहेत, हे पाहून हे स्पष्ट होते की योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी प्रत्येक विद्यार्थी प्रगतीच्या प्रकाशवाटेवर निघू शकतो.





शिक्षक प्रशिक्षण :

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी **शिक्षकांचं सातत्यपूर्ण प्रशिक्षण ही काळाची गरज** आहे. हे जाणून विवेक विद्यालयात नियमितपणे विविध विषयांवर शिक्षक प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले जाते.

या प्रशिक्षणामध्ये **"फक्त शिकवायचं नाही, तर शिकायचंही आहे"** या विचाराने शिक्षक सहभागी होतात.

मुख्याध्यापक स्वतः *तज्ज्ञ मार्गदर्शक* म्हणून मार्गदर्शन करतात, हेच या उपक्रमाचं विशेष वैशिष्ट्य आहे.**"एक चांगला शिक्षक आयुष्यभर विद्यार्थीच राहतो."** प्रशिक्षण सत्रांमध्ये दृक-श्राव्य साधनांचा वापर, गटचर्चा, कृतीमूलक सहभाग आणि अनुभवांची देवाणघेवाण यांचा समावेश असतो, ज्यामुळे सत्रं केवळ माहितीपर न राहता प्रेरणादायी आणि कृतीक्षम बनतात. या प्रशिक्षणाचा लाभ फक्त विद्यालयापुरता मर्यादित नसून, विभागातील इतर शाळांतील शिक्षकही त्यात उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. हे प्रशिक्षण म्हणजे केवळ शालेय गरजांचा भाग नव्हे, तर **"शिक्षकतेच्या प्रवासातील एक टप्पा नवसृजनाचा"** आहे.

खालील विषयांवर शिक्षकांचे प्रशिक्षणे आयोजित करण्यात आली.

क्र.	विषय	दिनांक
१)	Conspiracy Theory	०७/०८/२०२१
२)	नवीन शैक्षणिक धोरण (NEP 2020)	१२/०७/२०२२
३)	२१ व्या शतकातील अध्ययन कौशल्ये	२५/०९/२०२२
४)	नेतृत्व विकास व संघ व्यवस्थापन	२८/०८/२०२३
५)	Creating safe learning environment in the school	३०/०८/२०२४




शिक्षक सहविचार सभा :

शिक्षक सहविचार सभा म्हणजे केवळ चर्चा नव्हे, तर "**विचारांचं विश्लेषण, समस्यांचं समाधान, आणि भविष्याचं नियोजन**" अशा त्रिसूत्रीचा संगम आहे. शालेय कामकाज अधिक परिणामकारक आणि समन्वयपूर्ण होण्यासाठी, नियोजनबद्ध आराखडा तयार केला जातो. त्याचबरोबर शिक्षकांच्या सूचना, अडचणी यावर सखोल चर्चा होऊन संयुक्त निर्णय घेतले जातात.



पालक सभा :

पालक सभा म्हणजे "**संवादाची स्नेहवाट**", जिथे शिक्षक आणि पालक एकत्र येतात, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या विचारांची मशागत करतात. या सभेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांच्या सामाजिक जडणघडणीवरही सखोल चर्चा होते. शाळा दरवर्षी ज्या प्रकारे विद्यार्थ्यांच्या विकासासाठी नियोजन करते, त्यात पालकांची भूमिका ही "**सहकार्याची सावली नसून, आधाराचा कणा**" असते. सभेमध्ये पालकांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने उत्तर दिले जाते, आणि त्यांच्या सूचना म्हणजे शाळेच्या वाटचालीसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ ठरतात. या संवादाच्या सत्रात पालक प्रतिनिधींची निवड होऊन, **पालकांचा सहभाग हा व्यवस्थापनाचा एक महत्त्वाचा भाग** बनतो. या संवादातून विश्वास वाढतो, जबाबदारीची भावना दृढ होते, आणि प्रत्येक विद्यार्थी हा **शाळा आणि कुटुंबाच्या एकत्रित प्रयत्नांचा प्रकाशमान अंकुर** बनतो.





विद्यार्थी संसद निवडणुका :

लोकशाहीची बीजं लहानपणापासून रुजावी, आणि विद्यार्थ्यांना स्वयशासन, निर्णयक्षमता आणि सामाजिक जाणिवा यांचा अनुभव मिळावा यासाठी विवेक विद्यालय, विक्रोळी पार्कसाईट येथे दरवर्षी **विद्यार्थी संसदेच्या निवडणुकांचे आयोजन** करण्यात येते. ही निवडणूक म्हणजे शाळेतील लोकशाहीचा **प्रत्यक्ष अनुभव देणारा जिवंत उपक्रम** असतो. विद्यार्थी प्रतिनिधी, विद्यार्थिनी प्रतिनिधी, सांस्कृतिक व क्रीडा विभागांचे प्रतिनिधी या जबाबदारीच्या पदांसाठी इ. १० वीतील उमेदवार उभे राहतात. प्रत्येक उमेदवाराला विविध चिन्हे देण्यात येतात आणि प्रचार मोहिमेत ते आपल्या कल्पना, उद्दिष्टे आणि संकल्प

विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवतात. **"शब्द हे मतांसाठी सेतू बनतात आणि विचार हे विश्वासाचं बियाणं रोवतात."** वास्तविक निवडणूक प्रक्रियेमध्ये विद्यार्थी मतपत्रिकेवर शिक्का मारून गुप्त मतदान करतात. या प्रक्रियेची शिस्त, नियम, पारदर्शकता आणि जबाबदारी हे सर्व शिक्षक निवडणूक अधिकारी व निर्णय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडते.

मतमोजणीनंतर सर्वाधिक मते मिळवणाऱ्या उमेदवारांची विजयी घोषणा होते आणि त्यांचा शपथविधी सोहळा पार पडतो. एक क्षण, जिथे विद्यार्थी केवळ प्रतिनिधी होत नाहीत, तर **जबाबदारीचे दूत बनतात**. **"लोकशाही म्हणजे फक्त हक्कांचा उत्सव नाही, तर कर्तव्यांची प्रचितीही आहे."**

या निवडणुकीतून निवडून आलेले विद्यार्थी प्रतिनिधी शाळेतील विविध उपक्रम, नियोजन, व निर्णय प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग घेतात. ही संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांमध्ये **नेतृत्वगुण, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि सामाजिक बांधिलकी** विकसित करते. **"आजचा मतदार हा उद्याचा नेता असतो, आणि शाळा हे त्याचे पहिलं प्रशिक्षण केंद्र ठरते "**





विद्यार्थ्यांची स्मरण शक्ती वाढविण्यासाठी उपक्रम :

"स्मरणशक्ती ही मेंदूच्या स्नायूसारखी असते, जितकी जास्त वापराल, तितकी ती अधिक ताकदवान होते." पूर्वीच्या काळात मोबाईल, संगणक यांचा दैनंदिन जीवनातील सहभाग अत्यंत मर्यादित होता. तेव्हा नातेवाईकांचे पत्ते, फोन क्रमांक, महत्त्वाच्या गोष्टी, सगळं काही डायरीतही लिहिलं जायचं आणि मनातही कोरलं जायचं. परंतु आजच्या युगात **माहितीचा खजिना मोबाइलमध्ये असला, तरी आठवणींची जागा मात्र रिकामीच राहते.** या सहज उपलब्ध माहितीमुळे विद्यार्थ्यांना गोष्टी लक्षात ठेवण्याची गरजच वाटेनाशी झाली आहे, आणि त्यामुळे स्मरणशक्ती कमकुवत होत असल्याचे चित्र दिसून येते.


हे लक्षात घेऊन विवेक विद्यालयाचे दूरदृष्टी असलेले मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीला धार देण्यासाठी एक अभिनव उपक्रम हाती घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना १ ते ३० पर्यंत संख्यांचे यमक तत्त्वाशी संबंधित गोष्ट कशी तयार करावी हे शिकवले. एक मनोरंजक गोष्ट आणि त्या गोष्टीशी निगडित अनुक्रमांकित वस्तूंचा संगम करत, त्यांनी **स्मरणशक्तीला खेळ आणि कलात्मकतेची जोड** दिली. "**जे मनाला भावते, ते मेंदूत सहज रुजते.**" या पद्धतीमुळे विद्यार्थी १ ते ३० क्रमांकाच्या वस्तूंची नावे फक्त चढत्या व उतरत्या क्रमानेच सांगत नाहीत, तर कोणताही आकडा दिला तरी त्या क्रमांकाशी संबंधित वस्तू क्षणात सांगतात! ही केवळ आठवण नव्हे, तर **स्मरणशक्तीची साक्षात किमया** आहे. विद्यार्थ्यांना हा उपक्रम अत्यंत रंजक वाटू लागला असून, त्यातून आत्मविश्वासात मोठी भर पडत आहे. आता हेच विद्यार्थी **१ ते १०० क्रमांकांपर्यंतची माहिती लक्षात ठेवण्यासाठी उत्साहाने सज्ज झाले आहेत.**






विद्यार्थ्यांच्या गृहभेटी :

गृहभेटीमुळे शिक्षक आणि पालक यांच्यातील संबंध अधिक सखोल, विश्वासार्ह आणि संवेदनशील होतात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्यावश्यक असते. विवेक विद्यालयात या मूल्याची जाणीव ठेवून इयत्ता १० वीतील प्रत्येक शिक्षकास ५ ते ६ विद्यार्थी वाटून दिले जातात. तसेच इतर वर्गांतील विशेष लक्ष देण्याची गरज असणारे विद्यार्थीही शिक्षकांच्या देखरेखीखाली दिले जातात. हे शिक्षक दर महिन्याला विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन गृहभेटी घेतात, संवाद साधतात आणि प्रत्येक भेटीची नोंद करून ठेवतात. पुढील भेटीत मागील निरीक्षणाचा आढावा घेऊन, विद्यार्थ्याला आवश्यक असे मार्गदर्शन पुरवले जाते. या प्रक्रिया म्हणजे विद्यार्थ्याच्या प्रगतीच्या दिशेने टाकलेले काळजीपूर्वक पाऊल आहे.








शैक्षणिक मुल्यांकन व यश

विद्यार्थी संख्येत झालेली वाढ :

शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची, कुशल शिक्षकवर्गाची, आणि सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनाची पोचपावती म्हणजे **विद्यार्थी संख्येत झालेली सातत्यपूर्ण वाढ** होय. **विवेक विद्यालयात** दरवर्षी विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये होणारी भर ही केवळ आकड्यांची वाढ नसून **विश्वास, गुणवत्तेचा ठसा आणि शैक्षणिक यशाच्या परंपरेची जाणीव** आहे.


मागील ५ वर्षतील विद्यार्थी संख्या खालील प्रमाणे,

शैक्षणिक वर्ष	२०२१-२०२२	२०२२-२०२३	२०२३-२०२४	२०२४-२०२५	२०२५-२०२६
विद्यार्थी संख्या	२४०	२४६	२५२	२६४	२८५

शाळेची उल्लेखनीय कामगिरी :

१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा निकाल :

दरवर्षी शाळेचा निकाल यशाची नवी शिखरे गाठत असून, गेल्या काही वर्षांपासून "**१००% निकालाची गौरवमुद्रा**" ही शाळेच्या शिरपेचात अभिमानाने चमकत आहे. हा निकाल म्हणजे केवळ आकड्यांची आकडेवारी नव्हे, तर **शिक्षकांचे समर्पण, विद्यार्थ्यांचे सातत्य आणि पालकांचे पाठबळ** यांचे जिवंत उदाहरण आहे.



२) तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२४ : विज्ञान प्रकल्प (मोठा गट : दिव्यांग) द्वितीय क्रमांक (विद्यार्थी : प्रणित मोरे – इ. ९ वी)	३) तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२४ : विज्ञान प्रकल्प (मोठा गट) - उत्तेजनार्थ (विद्यार्थी : श्रीजा जवरथ, अंकिता कांबळे : १० वी)
	
४) तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२३ : विज्ञान प्रकल्प (मोठा गट : दिव्यांग) प्रथम क्रमांक (विद्यार्थी : प्रणित मोरे – इ. ८ वी)	५) तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२३ अंतर्गत स्पर्धा : अभिवचन स्पर्धा (मोठा गट) - प्रथम क्रमांक (विद्यार्थी : सौंदर्या मिठबावकर – इ. ९ वी)
	
६) तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२२ : विज्ञान प्रकल्प (मोठा गट) - तृतीय क्रमांक (विद्यार्थी : तुषार घोलप, यश राठोड – इ. ९ वी)	७) तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२४ अंतर्गत स्पर्धा : अभिवचन व वक्तृत्व स्पर्धा (लहान गट) द्वितीय क्रमांक(विद्यार्थी : राजेश मोरे – इ. ७ वी)

<table>
<tr>
<td>
</td>
<td>
</td>
</tr>
<tr>
<td>८) सह शालेय उपक्रम २०२४ अंतर्गत स्पर्धा :
प्रश्नमंजूषा स्पर्धा (लहान गट) - द्वितीय क्रमांक
(विद्यार्थी : राजेश मोरे : ७ वी, श्रीया तोडणकर : ८ वी)</td>
<td>९) विज्ञान प्रदर्शन २०२३ :
शैक्षणिक साहित्य (लहान गट) - तृतीय क्रमांक
(शिक्षक : सौ. मनिषा विवेक थोरात)</td>
</tr>
<tr>
<td>
</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td>१०) आंतरशालेय उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :
मोठा गट - प्रथम क्रमांक
(विद्यार्थी : शार्दुल केंगार – १० वी)</td>
<td>११) आंतरशालेय उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :
लहान गट - द्वितीय क्रमांक
(विद्यार्थी : सुशांत गावडे – ६ वी)</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td></td>
</tr>
</table>

शिष्यवृत्ती परीक्षेतील सहभाग व यश :

शाळेतील इ. ५ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध शिष्यवृत्ती परीक्षांना बसविण्यात येते. शिक्षक त्यांची यानिमित्ताने तयारी करून घेत असल्याने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचा सराव होतो. तसेच त्यांचा आत्मविश्वासही वाढतो. शिष्यवृत्ती परीक्षांमधील शाळेच्या निकालाचा गोषवारा खालीलप्रमाणे,

परीक्षा	प्रविष्ठ विद्यार्थी	उत्तीर्ण विद्यार्थी	पात्र विद्यार्थी
महाराष्ट्र राज्य पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी)	१२	११	३
महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी)	१४	१३	४
आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (NMMS)	८	६	३

निपुण भारत योजनेअंतर्गत मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यांकन अहवाल :

"निपुण भारत" या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमाचा मुख्य उद्देश देशातील सर्व बालकांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) प्राप्त करून देणे हा आहे. या उद्देशाने, शाळेतील इयत्ता पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांकरिता मराठी व गणित विषयांतील विविध कसोट्यांद्वारे शैक्षणिक मूल्यांकन करण्यात आले. विद्यार्थ्यांची तयारी नियोजित व सातत्यपूर्ण पद्धतीने घेतली गेली. अभ्यासक्रमानुसार विविध टप्प्यांनुसार चाचण्या घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे निरीक्षण, मूल्यांकन व त्यांची नोंद खालीलप्रमाणे करण्यात आली:

टप्पा	दिनांक	विषयानुसार निपुण विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण	
		मराठी	गणित
१	२०/०४/२०२५	४२.८६ %	३४.२९ %
२	०५/०५/२०२५	५०.०० %	५५.२४ %
३	२०/०५/२०२५	६५.०० %	७८.१० %
४	१५/०६/२०२५	७८.५७ %	९२.८६ %
५	३०/०६/२०२५	८०.१० %	१००.०० %

शैक्षणिक उठाव :

विद्यार्थी येथे फक्त शिकतच नाहीत, तर "**सामाजिकता, शिस्त, सहकार्य आणि समज**" या मूल्यांचा गाभा अनुभवतात. "**जेथे समाज दुर्लक्षित, तेथे सेवाभाव अधिक प्रकाशमान होतो.**" आमची शाळा झोपडपट्टी विभागात कार्यरत असल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे उघडणे हे एक आव्हानच ठरते. परंतु या आव्हानाला सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने संधीमध्ये रूपांतरित करण्यात आले आहे. या संस्था म्हणजे **समाजातील दिव्य दूत**, ज्या केवळ मदत करत नाहीत, तर **शैक्षणिक स्वप्नांना हात देऊन उभं करतात.** या संस्थांच्या मदतीने शाळेत शैक्षणिक साहित्य, भौतिक सुविधा, शिष्यवृत्ती, शिक्षक प्रशिक्षण यांसारख्या अनेक उपक्रमांना **रु. १६,६४,०००.०० (रु. सोळा लक्ष चौसष्ट हजार मात्र)** इतका हातभार लागला आहे.

जिथे आर्थिक मदतीची मर्यादा आहे, तिथे या संस्था **संवेदनशीलतेचा पूल** होऊन शाळेला उभं राहण्यासाठी आधार देतात.

काळानुसार शाळेत झालेला बदल खालील प्रमाणे,

पूर्वीची शाळा इमारत



आताची शाळा इमारत



पूर्वीचे वर्ग



आताचे वर्ग व त्यातील सुविधा



पूर्वीची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था



आताची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था



पूर्वीची स्वच्छतागृह व्यवस्था



आताची स्वच्छतागृह व्यवस्था



पूर्वीचा संगणक कक्ष




आताचा अद्ययावत संगणक कक्ष



पूर्वीची विज्ञान प्रयोग करण्याची व्यवस्था



आताची सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा



पूर्वीचे पालक सभेचे स्वरूप



आताचे पालक सभेचे स्वरूप




शाळेच्या मुख्याध्यापकांनी केलेले व्हिडीओ, लेखन व संशोधन :

शाळेचे मुख्याध्यापक श्री विवेक थोरात यांनी विविध शैक्षणिक विषयांवर विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच शिक्षण प्रेमी यांना मार्गदर्शक असे लिखाण केलेले असून त्यांस विविध वृत्तपत्रांनी प्रसिद्धी दिली आहे.

शासनाने जाहीर केलेले नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद केले विविध बदल तसेच शाळा व शिक्षकांच्या जबाबदाऱ्या इ. बाबत **'नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण हक्क कायद्याच्या सक्षमीकरणाचे विश्लेषण'** हा शोध निबंध प्रसिद्ध केला आहे.

कोविड कालावधीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीच्या व आदर्श पालकत्व इ. विषयांवर फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.









सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम

प्लास्टिक मुक्त शाळा :

"निसर्ग जपणं ही जबाबदारी नसून, ती आपली कृतज्ञता असते." विवेक विद्यालयाने पर्यावरण रक्षणाच्या दिशेने उचललेलं एक महत्त्वाचं पाऊल म्हणजे **प्लास्टिकमुक्त शाळा** हा उपक्रम. शाळेच्या प्रशासनापासून ते प्रत्येक शिक्षक आणि विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी मिळून **"हरित क्रांतीचा हा दीप"** तेवत ठेवला आहे.

विद्यार्थ्यांना सुक्या व ओल्या कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करून मिठाई, चॉकलेट किंवा इतर वस्तूंमध्ये वापरलेले प्लास्टिकचे रॅपर किंवा सुटे प्लास्टिक, पाण्याच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये भरून, **"इको-ब्रिक्स"** तयार करण्याचे आवाहन करण्यात आले. या इको-ब्रिक्सचा वापर करून शाळेच्या परिसरातील शौचालयाचे बांधकाम करण्यात आले. **हे केवळ नवकल्पना नव्हे, तर पर्यावरणपूरक आचारधर्माचे उदाहरण आहे.** या बाटल्या फक्त वापरल्या गेल्या नाहीत, तर त्यांना **सौंदर्याची रंगत** दिली गेली, त्या परिसराचे सुशोभीकरण करून, **कचऱ्यालाही कलात्मकतेची छटा** मिळाली.

"कचराही जर योग्य वापरात आणला, तर तो मूल्यवान ठरतो." या संपूर्ण उपक्रमाचे विद्यार्थी, शिक्षक, पालक व स्थानिक नागरिकांकडून भरभरून कौतुक झाले आहे. या कार्यास रोटरी क्लब ऑफ चेंबूर यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून, त्यांच्या सदिच्छा आणि पाठिंब्याबद्दल शाळेकडून मनःपूर्वक आभार !





वैद्यकीय चिकित्सा शिबीर :

"निरोगी शरीरातच निरोगी मन वसते, आणि निरोगी मनच ज्ञानाच्या वाटेवर आत्मविश्वासाने पुढे वाटचाल करते." विद्यार्थ्यांचे शिक्षण फळफळावे, त्यांची बुद्धी प्रगल्भ व्हावी आणि ते शारीरिकदृष्ट्या सक्षम राहावेत यासाठी **आरोग्याची निगा राखणे तितकेच आवश्यक असते, जितके शिक्षणाचे धडे गिरवणे.** याच भावनेतून विवेक विद्यालयात दरवर्षी वैद्यकीय चिकित्सा शिबिरांचे आयोजन केले जाते. केवळ औपचारिक तपासणीसाठी नव्हे, तर **विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याच्या आरोग्यदायी पायाभरणीसाठी.**

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, तसेच नेत्र, दंत आणि त्वचारोग संबंधी विशिष्ट चिकित्सा तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली केली जाते. **"रोग लपवण्यापेक्षा, तो ओळखून उपाय करणे हेच खरी आरोग्य जागरूकता!"** या तपासणीद्वारे आरोग्यविषयक समस्या लवकर शोधल्या जातात, आणि आवश्यक त्या बाबींमध्ये विद्यार्थ्यांना व पालकांना वेळेवर मार्गदर्शन व उपचाराची दिशा मिळते.





सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम

उत्साह, उमंग आणि विजयाची चाहूल - वार्षिक क्रीडा महोत्सव

दरवर्षी शाळेच्या प्रांगणात उत्साहाचा झंझावात उसळतो, जयघोषांच्या निनादात, टाळ्यांच्या कडकडाटात आणि धावत्या पावलांच्या तालात, कारण तो असतो **वार्षिक क्रीडा महोत्सवाचा** दिवस! हा दिवस म्हणजे केवळ स्पर्धेचा नव्हे, तर एकतेचा, सहकाराचा आणि आरोग्यदायी स्पर्धेच्या सुसंस्कृततेचा उत्सव असतो. विद्यार्थ्यांच्या रंगतदार सहभागासाठी त्यांना चार सशक्त गटांमध्ये विभागले जाते – रेड

हाऊस, यलो हाऊस, ग्रीन हाऊस आणि ब्लू हाऊस. प्रत्येक हाऊस आपापल्या जिद्द, चिकाटी आणि संघभावनेचे दर्शन घडवतो.

क्रीडा महोत्सवात सांघिक व वैयक्तिक अशा दोन्ही प्रकारच्या स्पर्धा असतात. कबड्डी, लंगडी, खो-खो, डॉज बॉल, क्रिकेट अशा सांघिक खेळांमध्ये संघबांधणी व वेळेचे व्यवस्थापन शिकवले जाते, तर धावणे, रिले, क्रॉसकंट्री, बटाटा शर्यत, बुद्धिबळ व कॅरम यांसारख्या वैयक्तिक खेळांमध्ये प्रत्येक खेळाडूची कौशल्यं आणि मानसिक समतोल तपासला जातो. यामध्ये पालकांसाठीही खास आकर्षण असते. बटाटा शर्यत, सॅक रेस, बुक बॅलन्स इत्यादी स्पर्धांमधून घरच्या जबाबदाऱ्यांबरोबर मैदानात उभे राहण्याचा त्यांचा आनंद द्विगुणित होतो.

समारोपाच्या दिवशी विद्यार्थ्यांची लेझीम नृत्याची सादरीकरणं, सामुहिक सहसाहित्य कवायतीची भव्य मांडणी आणि घोषणांचा निनाद संपूर्ण वातावरण भारून टाकतो. प्रत्येक विजयी खेळाडूसाठी हे क्षण बनतात स्मरणात राहणारे सुवर्णक्षण. गुणपद्धतीनुसार प्रथम क्रमांकास ५ गुण, द्वितीयस ३ गुण आणि तृतीयास १ गुण देण्यात येतात. या गुणांच्या आधारे ज्या हाऊसने वर्षभरात सर्वाधिक यश संपादन केले, ती हाऊस होते **वार्षिक विजेती हाऊस!**

शेवटी, वार्षिक स्नेहसंमेलनात, मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना गौरविण्यात येते, आणि संपूर्ण शाळा त्यांच्याबरोबर मिळवलेल्या यशाचे गोड फलस्वरूप साजरे करते. हा क्रीडा महोत्सव म्हणजे केवळ खेळ नव्हे, तर शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि संघर्षातून यशाकडे वाटचाल शिकवणारा अनुभव असतो , जो प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात कायमचा कोरला जातो.




कला, संस्कृती आणि गौरवाचा सोहळा - वार्षिक स्नेह संमेलन

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या प्रतिभेला मुक्त उधाण मिळावे आणि आत्मविश्वासाला नवे पंख लाभावेत, यासाठी विवेक विद्यालयात दरवर्षी वार्षिक स्नेह संमेलन आयोजित

केले जाते. सभागृहात वाजणाऱ्या तालांवर, गूंजणाऱ्या स्वरांमध्ये आणि सादर होणाऱ्या अभिनयामध्ये विद्यार्थ्यांच्या कलेचा उत्कट आविष्कार पाहायला मिळतो. प्रत्येक वर्गातील विद्यार्थी आपली कला सादर करताना नृत्य, नाटिका, वादन आणि गायनाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतात. ही प्रत्येक सादरीकरणे म्हणजे **त्यांच्या मेहनतीची आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाची जिवंत फलश्रुती** असते.

या दिवशी एस.एस.सी. व शालांत परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात येतो. तसेच वार्षिक क्रीडा महोत्सवातील विजयी खेळाडू आणि संघ यांनाही गौरवण्यात येते. पालकांचाही यामध्ये यथोचित सन्मान केला जातो, जे शाळेच्या सर्वांगीण यशात सक्रिय भाग घेतात.

तालुकास्तरावर आणि जिल्हास्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना विशेष गौरव प्रदान केला जातो. तसेच उपक्रमशील वर्ग व उपक्रमशील शिक्षकांना सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या योगदानाची पावती देण्यात येते — ही केवळ प्रशंसा नसून पुढील वाटचालीसाठी एक प्रेरणादायी साक्षच असते.

वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे एक असा **प्रेरणेचा उत्सव**, जिथे सृजन, संस्कार, सन्मान आणि समवेत पुढे जाण्याची उमेद एकत्र अनुभवता येते. तो क्षण असतो, **विवेक विद्यालयाच्या तेजस्वी परंपरेचा आणि भविष्यातील यशाच्या वाटचालीचा नवा आरंभ.**









योगदान

माजी विद्यार्थ्यांचा योगदानमय सहभाग — शाळेच्या वाटचालीतला अमूल्य ठेवा

माजी विद्यार्थी हे कोणत्याही शाळेच्या वाटचालीतील भक्कम आधारस्तंभ असतात. त्यांनी घडवलेले यश, अनुभवांची शिदोरी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व हे **आजच्या पिढीच्या वाटचालीसाठी दीपस्तंभासारखे** असते. विवेक विद्यालय हे या संकल्पनेवर ठाम विश्वास ठेवत, माजी विद्यार्थ्यांना पुन्हा आपल्या शाळेशी जोडण्याचे पवित्र कार्य करीत आहे.

शाळेत माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली असून, त्यामध्ये मोठ्या संख्येने जुने विद्यार्थी सक्रिय सहभाग घेत आहेत. आज माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशाचे शिखर गाठूनही, आपल्या मातृसंस्थेशी नव्याने नाते जडवत आहेत. हीच बाब शाळेसाठी गौरवाची व अभिमानास्पद आहे.

विवेक विद्यालयाच्या प्रगतीच्या प्रवासात माजी विद्यार्थी **स्वतःच्या परीने आर्थिक, बौद्धिक व सल्लात्मक मदतीचा हात** पुढे करत आहेत. दरवर्षी आयोजित होणाऱ्या माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने त्यांचे अनुभवकथन, संवाद आणि उपस्थिती शाळेच्या वातावरणात उत्साहाची नवी लहर निर्माण करतात.

या मेळाव्यात माजी विद्यार्थी आपल्या सध्याच्या कार्यक्षेत्राबद्दल माहिती देतात, तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी विचारप्रवृत्त चर्चा व संवाद साधतात. या उपक्रमात '**आम्ही असे घडलो, तुम्हीही घडा**' हा विशेष कार्यक्रम आयोजित केला जातो, ज्यामध्ये ते स्वतःच्या यशाच्या कहाण्यांमधून विद्यार्थ्यांना ध्येय, दिशा आणि आत्मविश्वास देतात.

करिअरच्या नव्या वाटा, संधी, शैक्षणिक मार्गदर्शन आणि वास्तवाच्या गोष्टी यांचे वास्तवदर्शी चित्रण हे या

कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य ठरते. अशा प्रकारच्या समृद्ध सहभागामुळे **वर्तमान विद्यार्थ्यांमध्ये नवा आत्मविश्वास, जोश**

आणि ध्येयदृष्टी निर्माण होते.

माजी विद्यार्थी आणि शाळेतील नाते हे केवळ आठवणींचे नसून, शाळेच्या उज्वल भविष्यासाठी समर्पणाचे वचन आहे.





समारोप

"ज्ञानाच्या मुळांवर विश्वास, प्रयत्नांची पालवी, आणि सहकार्याच्या पाण्याने सिंचित झालेला, हा विवेक विद्यालयाचा वटवृक्ष बहरतो आहे ! " विवेक विद्यालय ही शाळा केवळ दर्जेदार शिक्षण देणारी संस्था नाही, तर ती **विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा एक सशक्त मंच** आहे. इथे विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासातच नव्हे, तर कला, क्रीडा, विज्ञान आणि सांस्कृतिक क्षेत्रातही आपली प्रतिभा खुलवण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन, संधी आणि प्रेरणा दिली जाते.

या प्रगतीच्या प्रवासात शाळेला विवेक एज्युकेशन सोसायटीचे दूरदृष्टी असलेले संचालक मंडळ, विविध सेवाभावी संस्था, पालक, शिक्षकवृंद, माजी विद्यार्थी आणि शाळेचे हितचिंतक यांचे सतत पाठबळ लाभत आहे.

या शाळेची वाटचाल आता केवळ परंपरेच्या चौकटीत मर्यादित न राहता, **एक उपक्रमशील, आधुनिक आणि मूल्याधारित शाळा म्हणून नावारूपाला येत आहे.**

"शाळा ही केवळ इमारत नसते, ती असते विचारांची शिदोरी घेऊन जीवनाला दिशा देणारी ज्ञानयात्रा!"या ज्ञानयात्रेत सहभागी झालेल्या सर्व घटकांचे **मनःपूर्वक आभार**!

विवेक विद्यालयाच्या यु ट्यूब चॅनलवरील व्हिडीओ लिंक

१) विवेक विद्यालयातील विद्यार्थी सांसद निवडणुकीत उमेदवारांचा प्रचार

https://youtu.be/3d8FcpgCcFE

२) विवेक विद्यालयातील स्मरणशक्ती वाढ प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक

https://youtu.be/wJGQtzhcZfA

३) विवेक विद्यालयामध्ये शिक्षक प्रशिक्षण १

https://youtu.be/pR3vFszuwzw

४) विवेक विद्यालयामध्ये शिक्षक प्रशिक्षण २

https://youtu.be/JnXLnTV-zb8

५) विवेक विद्यालयामध्ये प्लास्टिक मुक्त शाळा, विद्यार्थी प्रशिक्षण

https://youtu.be/P4wYSnnCPEk

६) इंग्रजी विषयातील Lots Of Things Together

https://youtu.be/wJGQtzhcZfA

७) इंग्रजी विषयातील Alphabet Introduction

https://youtu.be/FQoDyghW_1Y

८) मी आनंदी जोशी बोलतेय .....

https://youtu.be/AM-vloZraIA

९) विवेक विद्यालयात प्लास्टिक मुक्त शाळा विद्यार्थी मनोगत

https://youtube.com/shorts/1zhk8kv3iH4?feature=share

१०) पर्यावरण पूरक विटा वापरून शौचालय निर्मिती

https://youtube.com/shorts/LbBlHDa3n0g?feature=share


विवेक विद्यालयाच्या फेसबुक पेज वरील व्हिडीओ लिंक

१) सुसंवाद पालकांशी ...

https://www.facebook.com/share/v/16ssz9XnfV/

२) सुसंवाद विद्यार्थी व पालकांशी ....

https://www.facebook.com/share/v/1AwAVvwDX8/





विवेक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

घाटकोपर (बातमीदार) : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२
मध्ये विवेक विद्यालय या शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.
विवेक विद्यालयाचा गेली सहा वर्षे सलग १०० टक्के निकाल लागत आ
संग्रामसिंह कांबळे हा विद्यार्थी १० टक्के गुण मिळवून पहिला आला. शा
केंगार व श्रीजा जवरथ हे दोघेही ८० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक
उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून एकूण ३३ विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रवि
झाले होते. त्यापैकी ९ विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्य, तर २२ विद्यार्थी हे प्रथ
श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे,
शिक्षकांचे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी अभिनंदन केले आहे.

विवेक विद्यालयात यो
दिन उत्साहात साजरा



मुंबई, (वा.) विवेक विद्यालय, विक्रोळी पार्कसाईट या शाळेत 'जागतिक योग दिन' स्वास्थ्यपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. योग हा प्राचीन भारतीय परंपरा आणि भारतीय संस्कृतीची एक अमूल्य अशी जगाला दिलेली देणगी आहे. म्हणूनच यावर्षी आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिवस विद्यार्थी व शिक्षकांनी सामूहिकरित्या साजरा केला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना जागतिक योग दिवसाचे महत्व तसेच योग्यशास्त्र ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे, तसेच योगासनांचे आर दृष्टीने किती महत्व आहे हे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी केले. क्रीडा शिक्षक, फडतरे व सहकारी शिक्षकांनी विविध यो सूर्यनमस्कार यांचे प्रात्यक्षिक दाखविले व विद्यार्थ्यांनी अ उत्साहपूर्ण वातावरणात आसने जागतिक योग दिवसाच्या कार्यक्र संस्थेच्या संचालिका मनीषा उपस्थित होत्या.

Mumbai Plus Edition
Jun 22, 2025 Page No. 2



द ग्लोबल टाइम्स

विवेक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाट

मुंबई: विवेक विद्यालय, शैक्षणिक साहित्याचे वाटप वाप करून त्यांची शैक्षणि विक्रोळी पार्कसाईट या करण्यात आले. नवीन प्रगती नक्कीच साधतील उ शाळेमध्ये आज विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांना विश्वास व्यक्त केला. शैक्षणिक साहित्याचे मोफत शैक्षणिक साहित्य मिळाल्याने कार्यक्रमासाठी शाळे वाटप करण्यात आले. सर्वच विद्यार्थी खूप आनंदी संचालिका विमल थोरात विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी व झाले व त्यांचा आनंद त्यांच्या मनिषा थोरात व मह शिक्षणाविषयी गोडी निर्माण चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. शिक्षक उपस्थित व्हावी तसेच त्यांच्यामध्ये या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक शाळेच्या या उपक्रमाब उत्साह निर्माण व्हावा याच विवेक थोरात यांनी शाळेतील पालक वर्गाकडून कौतुक हेतूने शाळेच्या वतीने सदर विद्यार्थी त्या साहित्याचा योग्य उपयोग करीत आहे.

सकाळ



घाटकोपर : विवेक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची बालदिंडी काढण्यात आली.

विवेक विद्यालयात बाल दिंडीचे आयोजन

घाटकोपर, ता. ५ (बातमीदार) : विक्रोळी पार्कसाईट येथील विवेक विद्यालय या शाळेत शनिवारी (ता. ५) आषाढी एकादशीनिमित्त बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुखमाईची प्रतिकृती साकारली होती. विद्यार्थिनींनी नऊवारी साड्या नेसून डोक्यावर कलश, तुळस घेऊन सहभागी झाल्या होत्या, तर विद्यार्थी वारकऱ्यांच्या वेषात सहभागी झ होते. विद्यार्थी, शिक्षक, पालक विभागातील नागरिक आनंदाने तल्ल होऊन नाचत होते. विवेक विद्यालय मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी दिंडीमध्ये सहभागी झालेल्या पालक विभागातील नागरिकांचे आभार मा तसेच विद्यार्थी व शिक्षकांचे कौ केले. सर्व उपस्थितांना प्रसादवा करीत दिंडीची सांगता झाली.

Mumbai, Mumbai-Today
06/07/2025 Page No. 3

सोलापुरी झटका

Reg No. MAHMAR52974 dailysolapurizataka@gmail.com

मुंबई



विवेक विद्यालयामध्ये विद्यार्थी संसदेच्या निवडणुका संपन्न

■ सोलापुरी झटका न्यूज
घाटकोपर/प्रतिनिधी

आपल्या भारत देशाची लोकशाही अतिशय समृद्ध आहे. लोकशाहीतील तत्वानुसार आपणांस मतदान करुन आपले लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे. तसेच लोकशाहीमध्ये मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे. या गोष्टींची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी व त्यांना निवडणूक प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होता यावे यासाठी विवेक विद्यालय, विक्रोळी पार्कसाईट या शाळेमध्ये सालाबादप्रमाणे याही वर्षी विद्यार्थी संसदेच्या निवडणुका घेण्यात आल्या.

शाळेचे विद्यार्थी प्रतिनिधी, विद्यार्थिनी प्रतिनिधी, सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी व क्रीडा विभाग प्रतिनिधी या पदांकरिता निवडणुका झाल्या. सदर निवडणुकीमध्ये इ. १० वी तील विद्यार्थी उमेदवार होते. सर्व उमेदवारांना विविध प्रकारचे निवडणूक चिन्ह देण्यात आले होते. उमेदवारांनी आपले मुद्दे व चिन्ह यांचा प्रचार सर्व वर्गांमध्ये जाऊन केला. सदर निवडणूक प्रक्रिया आज पार पडली. त्यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी दिलेल्या मतपत्रिकेवर शिक्का उमटवून मतदान केले. मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वाधिक मते मिळविणारे कृतिक बावदाने यास विद्यार्थी प्रतिनिधी, प्रांजल जाधव हिस विद्यार्थीनी प्रतिनिधी, संस्कृती पाटील यास सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी व समृद्धी गोपाळे यास क्रीडा विभाग प्रतिनिधी म्हणून घोषित करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेतील सर्व शिक्षकांनी मतदान अधिकारी व मतमोजणी अधिकाऱ्यांची भूमि का उत्तमरित्या बजावली.

नवराष्ट्र
www.navarashtra.com

विवेक विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात



मुंबई, (वा.) विवेक विद्यालय, पार्कसाईट, विक्रोळी या शाळेमध्ये १६ जून रोजी प्रवेशोत्स्व उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. या दिवशी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत त्यांचे औक्षण करून केले.

सर्व वर्ग देखील विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सजावट करून सज्ज होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई विभागाच्या ललिता शिर्के प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्य पुस्तके देण्यात आली. शाळेतील नवीन विद्यार्थ्यां त्यांचे नाव , छंद सांगून स्वतःची ओळ करून दिली. ललिता शिर्के यां विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणा महत्व सांगितले तसेच शाळा राबवी असलेल्या विविध उपक्रमांबाबत कौतु केले. मुख्याध्यापक विवेक थोरात यां विद्यार्थ्यांना मार्गदर्शन के आयुष्याकडे बघण्याच दृष्टीकोन कसा असावा अपेक्षित ध्ये गाठण्यासाठी शाले जीवनापासून कशी तया करावी याचे मार्गदर्शन के कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सवि कोरगावकर यांनी केले.

Mumbai Plus Edition
Jun 17, 2025 Page No. 2

सकाळ



घाटकोपर : विवेक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची बालदिंडी काढण्यात आली.

विवेक विद्यालयात बाल दिंडीचे आयोजन

घाटकोपर, ता. ५ (बातमीदार) : विक्रोळी पार्कसाईट येथील विवेक विद्यालय या शाळेत शनिवारी (ता. ५) आषाढी एकादशीनिमित्त बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुखमाईची प्रतिकृती साकारली होती. विद्यार्थिनींनी नऊवारी साड्या नेसून डोक्यावर कलश, तुळस घेऊन सहभागी झाल्या होत्या, तर विद्यार्थी वारकऱ्यांच्या वेषात सहभागी झाले होते. विद्यार्थी, शिक्षक, पालक व विभागातील नागरिक आनंदाने तल्लीन होऊन नाचत होते. विवेक विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी या दिंडीमध्ये सहभागी झालेल्या पालक व विभागातील नागरिकांचे आभार मानले तसेच विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले. सर्व उपस्थितांना प्रसादवाटप करीत दिंडीची सांगता झाली.

Mumbai, Mumbai-Today
06/07/2025 Page No. 3

नवराष्ट्र
www.navarashtra.com

विज्ञान प्रदर्शनात विवेक विद्यालयाचे यश



जल शुद्धीकरण प्रकल्पास उत्तेजनार्थ पारितोषिक

मुंबई, (वा.) नुकत्याच पार पडलेल्या ५२ व्या एन वॉर्डस्तरीय विज्ञान प्रदर्शनात विवेक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान हा विज्ञान प्रदर्शनाचा विषय होता. या प्रदर्शनामध्ये विवेक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे विज्ञान प्रकल्प मांडले होते. दिव्यांग स्तरातील मोठ्या गटामध्ये प्रणित मोरे व संग्राम कांबळे या विद्यार्थ्यांनी सोलार रेल्वे हा प्रकल्प तयार कला होता. या प्रकल्पास द्वितीय पारितोषिकाने गौरविण्यात आले. मोठ्या गटामध्ये श्रीजा जवरथ व अंकिता कांबळे या विद्यार्थिनींनी स्मार्ट इलेक्ट्रीकल पोल हा प्रकल्प तयार कला होता. या प्रकल्पास उत्तेजनार्थ पारितोषिकाने गौरविण्यात आले. लहान गटामध्ये श्रीया तोडणकर व सोनल आंबेकर या विद्यार्थिनींनी जल शुद्धीकरण प्रकल्प तयार कला होता. सदर प्रकल्पास उत्तेजनार्थ पारितोषिकाने गौरविण्यात आले. विज्ञान प्रदर्शनांतर्गत घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत श्रीया तोडणकर व राजेश मोरे या विद्यार्थ्यांचा द्वितीय क्रमांक आला. अभिवाचन व वक्तृत्व या दोन्ही स्पर्धांमध्ये राजेश मोरे या विद्यार्थ्यांचा द्वितीय क्रमांक आला. तसेच विवेक विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी लिहिलेल्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण हक्क कायद्याच्या सक्षमीकरणाचे विश्लेषण या विषयावरील कृती संशोधन अहवालाचे विमोचन शिक्षण निरीक्षक डॉ. मुश्ताक शेख व ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. सयाजी मेहेत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शन करणारे विज्ञान शिक्षक सविता कोरगावकर, पुरुषोत्तम पाटील व रविंद्र जाधव यांचे अभिनंदन केले आहे.

मौलाना आझाद विचार मंचच्या मुंबई अध्यक्षपदी फैजुल्ला खान यांची निवड

मुंबई - मौलाना आझाद विचार मंचच्या मुंबई अध्यक्षपदी फैजुल्ला खान यांची निवड करण्यात आली आहे. मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार डॉ.मोहम्मद जावेद यांनी एका लेखी पत्राद्वारे त्यांची निवड केली आहे.

फैजुल्ला खान हे वरा.

के.फाऊंडेशनचे अध्यक्ष तसेच पत्रकार उत्कर्ष समितीचे कार्याध्यक्ष आहे. खान यांचा निवडीचे सर्वत्र स्वागत होत असून पत्रकार उत्कर्ष समिती मुंबई अध्यक्ष राजेंद्र लकेश्री, सचिटणीस आनंद मुस्केतसेच कार्यकारिणीच्या यांनी त्यांचे जाहीर अभिनंदन करण्यात येत आहे.

■ मुंबई ■ रायगड ■ ठाणे ■ पालघर येथून एकाच दिवशी प्रकाशित होणारे

दैनिक

आपले साम्राज्य

RNI NO. MAHMAR/2016/67569

संपादिका : सौ. सीमा प्रमोद मो

■ वर्ष १७वे ■ अंक क्र. ३७१ ■ पनवेल ■ बुधवार १० जानेवारी २०२४ ■ पाने ८ ■ किंमत ३ रु.

बुधवार १० जानेवारी २०२४ २

परीक्षेसाठी सज्ज होताना ....



कोरोना काळात आपण सर्वांनीच ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग स्विकारला होता. त्यामुळे अध्यापन, विद्यार्थ्यांचा अभ्यास, परीक्षा इ. बाबतीत बरेच बदल झाले. त्यानंही बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत आपल्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी केलेले हे शैक्षणिक आदान - प्रदान नक्कीच कौतुकास्पद आहे. आता सर्व गोष्टी नियमित झालया आहेत. विद्यार्थी देखील पूर्वीप्रमाणे परीक्षांची तयारी करत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला चांगले गुण मिळवायचे असतात, मात्र अभ्यास करायला बसल्यावर चित्त एकाग्र होत नाही. परीक्षेत चांगले गुण मिळवायचे तर एकाग्र चित्ताने अभ्यास करणं आवश्यक आहे. पण बहुतेकदा आपल्या सभोवताली विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होईल, अशा अनेक गोष्टी त्यांच्या आजुबाजूला असतात. यामध्ये मोबाईल, सोशल मिडिया, ऑनलाइन गेम्स, मित्र-मैत्रीणी, कुटुंबीय, आजूबाजूचा गोंगाट या विविध गोष्टी विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित करीत असतात. यातून मार्ग काढत अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी काही चलूत्क्या आम्ही देत आहोत, त्या खालीलप्रमाणे,

1] रात्री उशीरापर्यंत जागून अभ्यास करू नये. रात्री उशीरापर्यंत जागून अभ्यास केल्याने ती कमी बौद्धिक कार्यक्षमतेने होत असतो, या वेळी अभ्यास केल्याने आपण केलेले संकल्प अधिक समर्थपणे अंमलात आणणे बहुदा शक्य होत नाही. रात्रभर अभ्यास केल्याने थकवा येतो, मेंदूची कार्यक्षमता कमी होते. त्यामुळे दिवस अभ्यास करावा व रात्री पुरेशी व शांत झोप घ्यावी.

2] लक्षात लक्षात भागांत अभ्यास करा. एखाद्या गोष्टीकडे मन विचलित होण्याचा कालावधी 8 सेकंद तर लक्ष केंद्रित करण्याचा कालावधी 1 ते 2 तास असतो. त्यामुळे सलग 8 ते 10 तास अभ्यास करण्याचा सल्ला दिला जात नाही. त्यापेक्षा सलग 25 ते 30 मिनिटे अभ्यास करून 5 मिनिटांचा विश्रांतीनन्तर पुन्हा अभ्यासास लागणे योग्य असल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे. म्हणूनच आपण सलग 25 ते 30 मिनिटे अभ्यास करून 5 मिनिटांच्या विश्रांतीनन्तर पुन्हा अभ्यासास लागल्यास मेंदूमध्ये माहिती साठविण्याचे कार्य अधिक क्षमतेने होते.

3] ध्येय निश्चित करा व नियोजन करा. लांबचा पल्ला गाठायचा असेल तर सर्वांत आधी एक छोटे ध्येय निश्चित करावे. एका वेळी एकाच विषयाचा किंवा त्यातील एकाच घटकाचा अभ्यास करावा. अभ्यास करताना अशा पद्धतीने करावा की केवळ आपण स्वत: समजून घेणे सच्चे तर ते इतरांना शिकविता आला पाहिजे. म्हणूनच एका वेळी एकाच घटक निवडा त्यामुळे त्यावर लक्ष केंद्रित करणे अधिक सोपे होईल.

तसेच आपला नियोजन आराखडा तयार करा. परीक्षेसाठी एकूण किती दिवस शिल्लक आहेत हे मोजा. उपलब्ध असलेल्या दिवसांचे विषयानुसार वाटप करा. त्यामळे आपल्याला अवघड किंवा सोपा वाटणारा विषय यानुसार त्यास तुम्ही वेळ द्या. स्वत:च्या दिनचर्येचे वेळापत्रक तयार करा. त्यानुसार अभ्यासासाठी विशिष्ट वेळ ठरवा. असे केल्याने आपण करत असलेल्या अभ्यास आणि परीक्षेसाठी किती वेळ शिल्लक आहे याबाबत आपण नेहमी सतर्क राहू शकतो. तसेच एनवेळी परीक्षेचा येणार ताण कमी होण्यास मदत होईल.

4] विषय, घटक इ. माहितीला प्राधान्यक्रम द्या. अभ्यास करत असताना अवघड किंवा सोपे वाटत असणाऱ्या विषयाला किंवा घटकाला त्याप्रमाणे प्राधान्यक्रम द्यावा. म्हणजेच अवघड वाटणाऱ्या विषयाला किंवा घटकाला जास्त तर सोप्यास कमी वेळ द्यावा. मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका सोडवा, त्यामुळे तुम्हाला नेमक्या कोणत्या घटकावर अधिक लक्ष केंद्रित करायचे आहे हे लक्षात येईल. तसेच अधिक माहितीमुळे होणारा गोंधळ टाळता येईल.

5] बैठक व्यवस्था :

अभ्यासाला बसताना आपली बैठक योग्य असावी. शक्य असल्यास खुर्चीवर बसावे नसल्यास भारतीय बैठकही चांगलीच. मात्र बेडवर झोपून अभ्यास करू नये. अभ्यासाला बसल्यावर सूर्यप्रकाश किंवा उजेड आपल्या मागून खांद्याच्या वरून येत असेल तर अशी बैठक व्यवस्था योग्य मानली जाते.

6] सराव : म्हटलेच आहे की, 'Practice Makes Man Perfect' म्हणून अधिकाधिक सराव करणे आवश्यक आहे. तुम्ही जेवढा सराव कराल तेवढाच तुमचा आत्मविश्वासही वाढेल. त्यामुळे तुम्ही जेवढा सराव चाचण्या किंवा परीक्षा हाल तेवढाच तुमचा आत्मविश्वास उंचावत जाईल. आपल्याला आयुष्यात कोणतेही कौशल्य किंवा तंत्र आत्मसात करायचे असेल, यशस्वी व्हायचे असेल तर त्याचा एकच मंत्र तो म्हणजे 'सराव, सराव, सराव'.

7] अभ्यासाला बसताना मोबाईल फोन बाजूला ठेवा आणि अभ्यासाला बसा. मोबाईल फोनवर सतत येणारे अपडेट्स मुळे नेहमी लक्ष विचलित होत असते, त्यामुळे अभ्यासाला बसताना मोबाईल फोन बाजूला ठेवा आणि अभ्यासाला बसा. सध्याच्या परिस्थितीत आपल्या आयुष्यातील मोबाईल फोन तसेच सोशल मीडियाचे विशेष महत्व आहे. असे असलेतरी त्याचा अति वापर हा कधीही वाईटच. म्हणून ज्या प्रमाणे एखाद्या दिवशी उपवास (Fasting) करतो, त्याप्रमाणे एखाद्या दिवशी मोबाईल, सोशल मीडिया यांचा उपवास म्हणजेच E - Fasting करण्यास काय हरकत आहे. मग आपल्याला प्रश्न पडत्या असेल की हे E - Fasting म्हणजे काय? मोबाईलमधील नोटिफिकेशन बंद करून ठेवा.

आपल्याला वारंवार मोबाईल काण्याची त्यातील गोष्टी तपासण्याची सवय असते, तर त्याचे प्रमाण कमी करावे.

आपण किती वेळ मोबाईल, सोशल मीडिया पासून दूर राहणार ते ठरविणे. आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी स्वयं शिस्त पाळावी व त्याप्रति ग्रामाणिक असावे. मोबाईलमधील आवश्य नसलेल्या App काढून टाकण्यात.

8] तणाव टाळा :तणावामुळे आपल शरीरामध्ये कॉर्टिसॉल नावाचा आंत:स्त्राव होत त्यामुळे मेंदूला साठविलेल्या गोष्टी, माहि आठवणे अवघड होते. म्हणूनच तणाव क करण्यासाठी पुरेशी झोप घ्या. आपल्या मानसि व शारीरिक ऊर्जेसाठी झोप हि अत्यंत महत्वा आहे. काही जणांना व्यायामाची सवय असते, क थकी त्याचा ही कंटाळा येऊ शकतो. त्याम एखाद्या दिवशी नियांतपणे चालायला जाणे कि इतर शारीरिक कसरती केल्याने आपल्याती ऊर्जेचा स्तर उंचावण्यास मदत होते.

9] कालांतराने पुनरावृत्ती करणे व दीर्घकाल स्मरणात ठेवणे :

आपण पूर्वीपासून पुन्हा पुन्हा वाचणे महत्वाच्या शब्दांना किंवा वाक्यांना अधोरेखि करणे इ. तंत्रे वापरत आहोतच. यामध्ये सर्वी क अधोरेखित केलेल्या शब्दांची किंवा वाक्या संख्या जास्त होते त्यामुळे गोंधळ होण्याची शक्य नाकारता येत नाही. म्हणूनच एखादा घट आपल्याला दीर्घकालीन स्मरणात ठेवाय असल्यास विविध तंत्रांचा उपयोग करू शकते.

दीर्घकालीन स्मरणात ठेवणे :

आपल्या ज्ञानाची तपासणी करणे व एखा घटकाचा गाभा समजून घेण्यासाठी कोणती माहिती दीर्घकालीन स्मरणात ठेवणे आवश्य असते.

एखादा घटक स्वत:ला व इतरांना समज सांगणे.

मनाचा नकाशा (Mind Map) द्वारे वि नकाशे, आकृत्या इ. माहितीचे संकलन कर तसेच त्वरीत तयार करणे. मागील वर्षांत प्रश्नपत्रिका पाहून आपण केलेल्या अभ्यासानुस त्या गोष्टी स्मरणात आहे किंवा नाही याची स्वत: पडताळणी करणे.

कालांतराने पुनरावृत्ती करणे :

कोणतीही गोष्ट आपल्या स्मरणा आल्यानंतर ती किती काळ आपल्या स्मरण राहील हे दर्शविण्यासाठी विस्मरणाचा व (Forgetting Curve) अभ्यासाला जाह जसे एखादी गोष्ट नजरेसमोर असताना 100 स्मरणात राहते, 20 मिनिटांनी 58% स्मरण राहते, 1 तासाने 44% स्मरणात राहते. अ करता करता 31 दिवसांनी 21% स्मरणात राह म्हणूनच कोणतीही गोष्ट आपल्याला दीर्घकाल स्मरणात ठेवायची असल्यास सातत्यक कालांतर प्रकारची तंत्रे आपण आत्मसात केल्यास नक्कीच फायदेशीर ठरू शकतील.

आपल्या आयुष्यामध्ये प्रत्येक गोष्टीला अपव असते, त्यामुळे वरील तंत्रांपैकी एखादे उपयोगात आणणे आपल्याला शक्य नसल्या तरीही कारू नका. आपल्याला शक्य असण स्वतीम तंत्राचा अवलंब करा व त्या घटका अभ्यास करा.

आपणा सर्वांना येणाऱ्या परीक्षांसाठी तसे शैक्षणिक वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा! धन्यवाद!

श्री विवेक जगन्नाथ थोर
मुख्याध्यापक - विवेक विद्यालय

सकाळ

विद्यार्थी, शिक्षकांच्या विकासाचा मंत्र



भावनिक, सामाजिक व शारीरिक विकासासाठी विद्यार्थी आणि शिक्षकांमधील संवाद अतिशय महत्त्वाचा असतो. अध्ययन करताना विद्यार्थ्यांमधील उत्तमोत्तम गुणांना वाव देण्याची जबाबदारीही शिक्षकांची आहे याच संधीचे सोने करण्यासाठी मुंबईतील विवेक विद्यालय, पार्कसाईट, विक्रोळ (प.), शाळेने विद्यार्थ्यांबरोबर पालक व शिक्षकांसाठी नियमितपणे वैयक्तिक मार्गदर्शन सत्र घेतली आहेत. या चर्चासत्रांतून समोवतालच्या विषयाबद्दलच्य माहितीमुळे सामाजिक विकास साधला जात आहे. तसेच, वैयक्तिक मार्गदर्शनातून विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या समस्यांचे निराकरण जलदगती होऊन भावनिक विकास साधणे शक्य झाले आहे.

■ विवेक थोरात
मुख्याध्यापक- विवेक विद्यालय, विक्रोळी पार्कसाईट, मुंबई

वापरात येणाऱ्या पायऱ्या : मार्गदर्शन सत्र घेण्याची नेमकी पद्धती

- What's Alive द्वारे त्यांच्या मनात नेमके काय विचार सुरू आहेत किंवा त्यांना त्या क्षणाला काय वाटत आहे, याची माहिती घेणे
- पूर्वीच्या वैयक्तिक मार्गदर्शन सत्राचा प्रभाव व अंमलबजावणी यांची माहिती घेणे
- मागील सत्रात काय चांगले झाले आणि काय आणखी चांगले होऊ शकले असते यावर चर्चा करणे
- विषयाचा संबंध विद्यार्थ्यांशी व आपल्या शालेय कामकाजाशी जोडणे
- सत्रानंतर काय समजले? कोणती माहिती मिळाली? तसेच भावना काय, याची चर्चा करणे
- सत्रातून अवगत झालेल्या गोष्टींची आपल्या आयुष्यात किंवा आपल्या कार्यात प्रभावी अंमलबजावणीकरिता कृती आराखडा काय राहील?

उपक्रम राबवण्याचा हेतू :

- मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालकांमधील सहसंबंध सुधारणे
- विषयाची माहिती व ज्ञान विद्यार्थी, पालक व शिक्षकांपर्यंत पोहोचवणे
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठीचे व्यासपीठ
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या समस्यांच्या निराकरणासाठी योग्य मार्गाचे मार्गदर्शन

उपक्रम राबविल्यानंतरची अपेक्षित निष्पत्ती :

- वैयक्तिक मार्गदर्शनामध्ये चर्चा केलेल्या विषयांचा उपयोग वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत वापर
- पालकांचे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुकर होण्यासाठी शिक्षकांना सहकार्य
- मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्यातील सहसंबंध सुधारतात
- विद्यार्थी व शिक्षक त्यांना येणाऱ्या समस्या स्वत: सोडवण्याचा प्रयत्न करतात
- विद्यार्थी व शिक्षक आपल्या मर्यादा क्षेत्राचा पुरेपूर वापर करतात

ज्याप्रमाणे गोष्टी पुढील काळात होत आहेत किंवा नाही यांचा आढावा घेणे

- नोंदी जतन करणे
- वेळोवेळी आढावा घेणे
- समोवताली होत असलेल्या गोष्टींवर लक्ष ठेवणे
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गृहभेटी आयोजित करणे
- प्रत्यावरण करणे (Feed Back घेणे)

आवश्यक संसाधने : मार्गदर्शन सत्र प्रभा होण्यासाठी उपयोग

- विषयानुसार व्हिडि
- विषयानुसार चित्रे
- मानसशास्त्रीय सिद्धांत
- आवश्यक माहिती
- पूर्वीच्या वैयक्तिक मार्गदर्शन सत्रातील मुद्दे

आवश्यक आधारस्तंभ :

- संस्थाचालक
- मुख्याध्यापक
- शिक्षक
- विद्यार्थी
- पालक
- हितचिंतक

आढावा पद्धती : च

शुभ दीपावली

आवश्यक कालावधी : प्रक्रिया राबवताना त्यासाठीचा कालावधी

- **शिक्षक** : दर महिन्याला १-२ शिक्षक याप्रमाणे ३० ते ४५ मिनिटांचे सत्र
- **विद्यार्थी** : दर महिन्याला ३-४ विद्यार्थी याप्रमाणे १५ ते २० मिनिटांचे सत्र
- **पालक** : दर महिन्याला १-२ पालक याप्रमाणे २० ते २५ मिनिटांचे सत्र

Mumbai, DeepParvMumbai
02/11/2024 Page No. 26

सकाळ

अभिजात दर्जा प्राप्त मराठी भाषा आणि मराठी भाषिक शाळांची अस्मिता

कोणत्याही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी काही निकष पूर्ण करावे लागतात. संबंधित भाषा प्राचीन असावी आणि त्यातील साहित्य श्रेष्ठ असावे, भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे, भाषेला स्वतःचे स्वयंभूपण असावेत, प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा. हे सर्व निकष पूर्ण केल्याने व गेल्या कित्येक वर्षांच्या मागणीनंतर, ऑक्टोबर-नोव्हेंबर अखेर ३ ऑक्टोबर २०२४ रोजी आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. आपल्या महाराष्ट्राला 'माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेंहि पैजासी जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन' म्हणजेच मराठी भाषेमध्ये मी असे बोल निर्माण करीन, की जे अमृतालाही पैजेने सहज जिंकतील, असे मराठी भाषेचे महात्म्य सांगणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव, संत चोखामेळा, संत एकनाथ आणि संत तुकाराम या वारकरी धार्मिक चळवळीतील मराठी संतांचा मोठा इतिहास आहे, जे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा किंवा मराठी संस्कृतीचा एक आधार आहे. सतराव्या शतकातील छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वानिक मराठा साम्राज्याचा महाराष्ट्राच्या संस्कृतीवर प्रचंड प्रभाव आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला राज्यकारभार सर्वांना समजावा म्हणून आपल्या साम्राज्याच्या राज्यकारभाराची भाषा मराठी केली. मराठी भाषेला एवढा महान इतिहास असताना तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतरही आज त्याच महाराष्ट्रात मराठी माणसांना मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी लढाई करावी लागत आहे, यापेक्षा मोठे दुर्दैव कय असू शकते? याला एकमेव कारण म्हणजे मराठी माणसाची बदललेली मानसिकता होय. जगभरामध्ये शिक्षणासाठी, व्यापारासाठी तसेच दैनंदिन कामकाजासाठी मातृभाषेलाच प्राधान्य दिले जाते. हे त्यांच्या मातृभाषेवरील प्रेमाचे व अभिमानाचे प्रतीक आहे; मात्र महाराष्ट्राचे या बाबतीतील चित्र तसे फार काही समाधानकारक नाही. परिणामी, महाराष्ट्रातील मराठी शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी होऊ लागली आहे तर काही ठिकाणी मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत. त्याकरिता मराठी शाळा वाचवणे महत्त्वाचे आहे. कारण त्यामुळे मराठी भाषा आणि मराठी माणूस टिकेल.

मराठी भाषेबद्दल व मराठी वाचनाबद्दल अभिरुची निर्माण होईल आणि त्यातूनच विविध साहित्य प्रकारांतील साहित्यिक जन्माला येतील. शाळा ही सर्वांगीण विकासाचा पाया भक्कम करणारे एक माध्यम आहे. त्यातच या शाळेत शिक्षण जर मातृभाषेत दिले जात असेल तर विद्यार्थ्यांना नवनवीन गोष्टी अधिक समर्थपणे शिकता येतात. तिथे मुलांना नवे काहीतरी शिकण्याची संधी मिळते. स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळते. शाळेमुळे सर्वांगीण विकास म्हणजेच बौद्धिक विकास, सामाजिक विकास, मानसिक विकास, शारीरिक विकास व नैतिक विकास होत असतो. मराठी भाषेचे प्रमुत्व, प्रगल्मता आणि परिपक्वता, शब्दमाधुर्य संपन्नता, हे फार मौल्यवान आहे. ते आजच्या विद्यार्थ्यांपुढे आणण्याची गरज आहे. आपलेच काही बांधव मराठी शाळेमुळेच शैक्षणिक, सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या सबल झाले. ही सक्षमता, सजगता, हे जग पाहण्याची नवी दृष्टी, ही सृजनता मराठी शाळेमुळे लाभली; मात्र त्यांचा कल इंग्रजी माध्यमाकडे वळलेला पाहावयास मिळतो. आपल्या देशात लोकशाही आहे. प्रत्येक आई-बाबांना आपल्या अपत्यास कोणत्या शाळेत घालायचे याचे स्वातंत्र्य आहे, कोणाच्याही मताचा अनादर करायचा अजिबात हेतू नाही. कृपया गैरसमज करून घेऊ नये. अनेकदा पालकांचा असा समज असतो, की मराठी माध्यमाच्या शाळांमधून शिकलेली मुले आयुष्यामध्ये मागे पडतात, त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव असतो; पण आपल्यापैकीच अनेक जण मराठी शाळेत शिकून आज परदेशात आहेत, तर काही विविध क्षेत्रामध्ये उत्तम प्रकारे उच्च पदावर कार्यरत आहेत. तरीही



आजही बाळगून आहेत. इंग्रजी माध्यम ही काळाची गरज आहे, असे म्हटले जाते. स्पर्धा ही प्रत्येक काळात असतेच. आपण विद्यार्थीदशेत असतानाही होती. स्पर्धा वाढते तशा संधीही वाढतात आणि सध्या बऱ्याच मराठी शाळांमध्ये सेमी इंग्लिशचा पर्याय बालवर्गापासून उपलब्ध आहे, म्हणून मराठी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे. टोलेजंग इमारतीतील इंग्रजी माध्यमाच्या शाळा पाहता मराठी शाळांची अवस्था खराब आहे, असे आपण सरसकट गृहीत धरतो आणि जर काही शाळांची अवस्था तशी असेल, तर त्याची जबाबदारी ही केवळ सरकारची नसून शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनीही जबाबदारी घेतली पाहिजे. मानसशास्त्रज्ञांनी मांडलेल्या विविध सिद्धांतानुसार मातृभाषेतून मिळालेल्या शिक्षणाने बालकाच्या संकल्पना स्पष्ट होतात. नवीन शैक्षणिक धोरणामध्येदेखील पायवीपर्यंत मातृभाषेतून शिक्षण देण्याची तरतूद केली आहे. तरीही काही पालक बालकाच्या अगदी दोन-तीन वर्षे वयापासून इंग्रजी शिक्षणाचा अट्टाहास करतात. त्यांन हे शिक्षण व ताण आवाक्याबाहेर असतानाही वरच्या इयतेपर्यंत इंग्रजी माध्यमात शिकल्यानंतर त्यांना मराठी माध्यमाकडे वळावेसे वाटते. त्यामुळे या बालकांचे होणारे नुकसान नेमके कोणामुळे, हेही पाहावे लागेल. बहुतेक मराठी शाळा या अनुदानित असल्याने येथील शिक्षकवृंद हा सेवेत कायमस्वरूपी व अधिक अनुभवी असतात तर इंग्रजी/कॉन्व्हेंटमधील शिक्षक वरचेवर बदलत असतात. त्यामुळे मराठी शाळेत विद्यार्थी व शिक्षकांचे नाते अधिक घट्ट होत असल्याने अध्ययन - अध्यापन प्रक्रिया प्रभावी होत असते. लेखक यदुनाथ थते यांच्या मतानुसार, 'इंग्रजी शाळा म्हणजे बोलके पोपट घडविण्याचा कारखाना आहे.' मूलभूत संकल्पना समजण्यासाठी मातृभाषेतून शिक्षण ही आज काळाची गरज आहे. मराठी शाळा वाचविणे ही आता काळाची गरज आहे. त्याकरिता समाजातील प्रत्येक सुज्ञ नागरिकाने यासाठी सतर्क राहून सामूहिकरीत्या प्रयत्न आवश्यक आहे. मराठी शाळा वाचविण्यासाठी समाजामध्ये जनजागृती करणे अत्यावश्यक असून या कार्यात समाजातील विविध घटकांचे सहकार्य अपेक्षित आहे. अन्यथा एक दिवस आपण ज्या शालांमध्ये शिकलो त्या बंद होतील. हे आपल्या मराठी मनाला रुचेल का?



- विवेक जगन्नाथ थोरात
मुख्याध्यापक, विवेक विद्यालय, पार्कसाईट, विक्रोळी (प.), मुं.- ७९

Sakal Readers Connect Initiativ

Mumbai, VardhapandinVisheshD
11/02/2025 Page No. 6

सकाळ

दृष्टिक्षेपात



घाटकोपर : विवेक विद्यालय शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनानिमित्त विविध कलागुणांचे सादरीकरण केले.

विवेक विद्यालया शाळेच्या पारितोषिक वितरणमध्ये गुणवंतांचा गौरव

घाटकोपर (बातमीदार) : पार्क साइट येथील विवेक विद्यालय शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ नुकताच पार पडला. समारंभाध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक विवेक थोरात व स्वागताध्यक्ष विमल थोरात होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राम कदम, उद्योगपती चंद्रकांत भोजने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा थोरात यांनी केले. या कार्यक्रमात दहावी परीक्षेतील गुणवंतांचा, क्रीडा महोत्सवातील विजेता संघ, प्राथमिक व माध्यमिक विभागातून आदर्श विद्यार्थी पुरस्कार व उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार तसेच तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव करण्यात आला. या वेळी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर केले.

नवराष्ट्र

विवेक विद्यालयात दीपोत्सव

मुंबई, (वा.) विक्रोळी पार्कसाईट येथील विवेक विद्यालयात आज शनिवारी दिपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. दीपोत्सवाच्या निमित्ताने शाळेत मातीच्या पणत्या बनवून त्या सजविण्याचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्या पणत्यांची मांडणी दीपस्तंभावर करून त्या प्रज्वलित करण्यात आल्या. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकाश कंदीलाने संपूर्ण हॉल व वर्ग सजविण्यात आले होते. शिक्षकांनी दिवाळीच्या सर्व दिवसांचे महत्व सांगितले. प्रत्येक वर्गातील विद्यार्थी प्रतिनिधींनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींनी सुंदर नृत्यातून त्यांचा कलाविष्कार सादर केला. शाळेतील क्रीडा शिक्षक विठ्ठल फडतरे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे त्यांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.



पौराणिक कथेने उपस्थित मंत्रमुग्ध

या कार्यक्रमास विवेक एज्युकेशन सोसायटीच्या सचिव विमल थोरात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी दिवाळीची एक पौराणिक कथा सांगितली व सुंदर गीत गायले. शालेचे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी फटाकेमुक्त व पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले तसेच दिवाळी सणाचे महत्व सांगून सर्वांना शुभेच्छा दिल्या.

Mumbai Plus Edition
Oct 27, 2024 Page No. 2

नवराष्ट्र
www.navarashtra.com

विवेक विद्यालयात शैक्षणिक साहित्यवाटप



मुंबई, (वा.) विवेक विद्यालय, विक्रोळी पार्कसाईट या शाळेमध्ये आज विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी व शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी तसेच त्यांच्यामध्ये उत्साह निर्माण व्हावा याच हेतूने शाळेच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने सर्वच विद्यार्थी खूप आनंदी झाले व त्यांचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी शाळेतील विद्यार्थी त्या साहित्याचा योग्य वापर करून त्यांची शैक्षणिक प्रगती नक्कीच साधतील असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमासाठी शाळेच्या संचालिका विमल थोरात, मनिषा थोरात व सहकारी शिक्षक उपस्थित होते. शाळेच्या या उपक्रमाबद्दल पालक वर्गाकडून कौतुक केले जात आहे.

Mumbai Plus Edition
Jun 27, 2025 Page No. 2

पुण्य नगरी

विवेक विद्यालयामध्ये २१ व्या शतकातील अध्ययन कौशल्ये या विषयावरील प्रशिक्ष



मुंबई : विवेक एज्युकेशन सोसायटी व विवेक विद्यालय, विक्रोळी पार्कसाईट या शाळेचे संस्थापक गुरुवर्य स्व. जगन्नाथ थोरात सर यांचा १८ वा स्मृतिदिन १ सप्टेंबर २०२२ रोजी आहे. त्यानिमित्त २४ सप्टेंबर २०२२ रोजी आंतरशालेय उत्स्फूर्त भाषण स्पर्धा व २५ सप्टेंबर २०२२ रोजी २१ व्या शतकातील अध्ययन कौशल्ये या विषयावर शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

प्रशिक्षणासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून विवेक विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक थोरात उपस्थित होते. विभागातील शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. सध्याच्या युगात शिक्षक म्हणून कार्य करीत असताना शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना विविध आव्हानांना सामोरे जावे लागते. ही आव्हाने स्वीकारण्यासाठी आजचा शिक्षक व विद्यार्थी तयार असायला हवा. त्याचप्रमाणे स्वतःमध्ये बदल घडवून आणण्यासाठीची मानसिकता तयार करणे कसे आवश्यक आहे व त्याकरिता कोणती कौशल्ये आत्मसात करावी, याचे मार्गदर्शन विवेक थोरात सरांनी केले. प्रशिक्षण अतिशय प्रेरणादायी असल्याचे मत चेंबूर हायस्कूलच्या शिक्षिका जयश्री काशिद व कोटक एजुकेशन फाऊंडेशनच्या स्मित यांनी व्यक्त केले. प्रशिक्षणातील खेळ व गट कृती यामुळे सहभाग सक्रिय होता, असे मत विद्यालयाचे मुख्याध्यापक परदेशी व सरस्वती विद्यानि मुख्याध्यापक विशाल बंड व्यक्त केले. रविकिरण विद्य मुख्याध्यापक सतीश खरात यांनी प्रकारचे कार्यक्रम यापुढेही रा यावे. अशी अपेक्षा व्यक्त के

उत्तरशक्ति

अध्ययन अध्यापन के उचित वातावरण के लि कार्यशाला का आयोजन



मुंबई (उत्तरशक्ति)। विक्रोली स्थित विवेक विद्यालय के संस्थाप गुरुवर्य स्व. जगन्नाथ थोरात के 20 वें स्मृति दिवस के अवसर पर, शुक्रव 30 अगस्त को शिक्षकों के लिए स्कूलों में सीखने के लिए एक सुरक्षि वातावरण बनाना'' विषय पर एक कार्यशाला आयोजित की गई। कार्यशाला में विभिन्न विद्यालयों से कुल 30 शिक्षक उपस्थित थे ।विशेष मार्गदर्शक के रूप में विद्यालय के प्राचार्य विवेक थोरात उपस्थित थे। कार्यशाला में विवेक थोरात ने बताया कि स्कूल के माहौल में छात्र शारीरिक, भावनात्मक, सामाजिक, बौद्धिक सुरक्षा कितनी महत्वपूर्ण है। उ विषयों पर सभी शिक्षकों ने अपने विचार व्यक्त किये। कार्यशाला के दौ विभिन्न गतिविधियाँ, खेल, नाटक और समूह चर्चा आदि शामिल किया गया था। भाग लेने वाले शिक्षकों ने कहा कि यह कार्यशाला विद्यालय में हमारे लि बहुत उपयोगी होगी। साथ ही इस कार्यशाला के आयोजन के लिए विवे थोरात को धन्यवाद दिया गया।

नवराष्ट्र

www.navarashtra.com

विवेक विद्यालयाच्या कबड्डी स्पर्धेला प्रतिसाद



मुंबई, (वा.) विवेक विद्यालय, पार्कसाईट, विक्रोळी (प), मुंबई या शाळेचा वार्षिक क्रीडा महोत्सव नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना ४ गटात विभागून त्यांना रेड हाऊस, यलो हाऊस, ग्रीन हाऊस व ब्लू हाऊस अशी नावे देण्यात आली. वार्षिक क्रीडा महोत्सवामध्ये सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. सांघिक क्रीडा प्रकारामध्ये कबड्डी, लंगडी, खो-खो, डॉज बॉल, क्रिकेट तर वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये धावणे, रिले, क्रॉसकंट्री, बटाटा शर्यत, बुद्धिबळ व कॅरम इ. स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच पालकांसाठी बटाटा शर्यत, सॅक रेस, बुक बॅलन्स इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

लेझीम नृत्य व सामूहिक कवायती लक्षवेधी

या स्पर्धांमध्ये पालकांचा सहभाग समारोपाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य व सामूहिक सहसाहित्य कवायत सादर केली.वार्षिक क्रीडा महोत्सवातील प्रत्येक क्रीडा प्रकारातील प्रथम क्रमांकास ५ गुण, द्वितीय क्रमांकास ३ गुण आणि तृतीय क्रमांकास १ गुण याप्रमाणे गुणदान करण्यात आले होते. त्यानुसार १५४ गुण प्राप्त करून ब्लू हाऊस वार्षिक क्रीडा महोत्सवातील विजेता हाऊस ठरला. हाळचे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी ब्लू हाऊसचे विद्यार्थी, शिक्षक प्रतिभा भोकरे, राजीवकुमार पांडरे व स्वाती घुमाळ यांचे अभिनंदन केले. वार्षिक क्रीडा महोत्सव यशस्वी होण्यासाठी क्रीडा शिक्षक विठ्ठल पवतरे तसेच इतर सर्व शिक्षक वर्ग, हाऊस लीडर्स, विद्यार्थी प्रतिनिधी, माजी विद्यार्थी व पालकांनी परिश्रम घेतले.

Mumbai Plus Edition
Dec 24, 2024 Page No. 2

नवराष्ट्र

विवेक विद्यालयामध्ये आंतरशालेय भाषण स्पर्धा



मुंबई, (वा.) विवेक विद्यालय, विक्रोळी पार्कसाईट या शाळेचे संस्थापक गुरुवर्य स्व. जगनाथ थोरात यांच्या २० व्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी आंतरशालेय उत्स्फूर्त भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धेमध्ये एकूण १४ शाळांच्या ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ऐनवेळी मिळालेल्या विषयावर विद्यार्थ्यांना २ मिनिटांत भाषण करायचे होते. त्यामुळे स्पर्धेची रंगत वाढली.

लहान गटात विवेक विद्यालयाचा राजेश मोरे तर मोठ्या गटात व्यंकटेश विद्यानिकेतनचा तनिष घाडगे याचा प्रथम क्रमांक आला.

भाषण स्पर्धेचे महत्व व वेगळेपण

या स्पर्धेसाठी ज्येष्ठ शिक्षिका जयश्री काशीद व डॉ. मंजिरी घाटक यांनी परीक्षक म्हणून काम पहिले. शाळेचे मुख्याध्यापक विवेक थोरात यांनी उत्स्फूर्त भाषण स्पर्धेचे महत्व व वेगळेपण सांगून स विजयी व सहभागी स्पर्धकांचे अभिनंदन केले. सहभागी शाळांच्य शिक्षकांनी विवेक विद्यालयाने राबविलेल्या या अनोख्या उपक्रमा कौतुक केले. विद्यालयातील सर्व शिक्षकांनी या कार्यक्रमाचे छान नियोजन केले होत

Mumbai Plus Edition
Aug 30, 2024 Page No. 2

पायाभूत शिक्षण - मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसनासाठी पालकांचे सहकार्य घेण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर,

शाळेचा पत्ता - नागापूर, पो.पुणेगाव, केंद्र.वाजेगाव, ता.जि.नांदेड

शाळेचा ईमेल आयडी - zpnagapur2018@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री. अक्षय अशोक ढोके

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 7709464307


मुख्याध्यापक ईमेल आयडी - dhokeakshay100@gmail.com

प्रास्ताविक –

अक्षर परिवार नावाने राज्यभर आपल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांनी सुपरिचित असणारे वाजेगाव केंद्र. केंद्रात एकूण 13 जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. योगायोगाने भौगोलिक रचनासुद्धा अशी आहे की, ही तेराच्या तेरा गावे गोदावरीच्या दोन्ही काठांवर वसलेली आहेत. त्यामुळे निसर्गाने इथल्या परिसरातल्या जमिनी अतिशय सुपीक मातीने संपन्न केलेल्या आहेत. गोदावरी नदीवर आमदुरा येथील बंधाऱ्यामुळे पाण्याची शेतीसाठी बाराही महिने मुबलक उपलब्धता, उत्तम प्रतीची, कसदार, काळी, सुपीक माती, नांदेड जिल्हा मुख्यालयापासून केवळ 10 किलोमीटर अंतरावर असल्याने विजेची विनाखंड उपलब्धता यामुळे ग्रामीण जीवनाला उत्कर्षाकडे नेण्यास आवश्यक असणारे परिपूर्ण, पोषक वातावरण या सर्वच गावांना लाभलेले आहे.

यातीलच एक नागापूर नावाचे गाव. सत्तरपूर या नावाने आधी ओळखले जाणारे आणि 40-50 वर्षाखाली गोदावरी नदीला आलेल्या पुरामुळे गोदावरीचा काठ सोडून वर तीन किलोमीटर दूर अंतरावर स्थलांतरित होऊन नागापूर नावाने ओळखले जाऊ लागले. येथील शेती समृद्ध असल्याने तसेच दूध दुभती जनावरे यांचा सुकाळ असल्याने 'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी' याच विचाराने इथला व्यवहार चालतो. शेतीच्या समृद्धतेने, दुधाच्या उत्तम व्यवहाराने प्रत्येकाचे पोटा-पाण्याचे प्रश्न सुटलेले आहेत. त्यामुळे जीवनाचा खरा उत्कर्ष साधू शकणारे शिक्षण घेण्याची कधी कोणाला गरजच वाटली नाही. यामुळेच असेल कदाचित, या गावात आजपर्यंत एकही व्यक्ती शासकीय सेवेत कर्मचारी म्हणून लागलेला नाही. परंतु आता जसजशी खाणारी तोंडे वाढू लागली आणि येणाऱ्या प्रत्येक नवीन पिढीगणिक शेतीची वाटणी होऊ लागली. यातून शेतीचे क्षेत्र कमी झाले. त्यातून मिळणारे उत्पन्न अपुरे पडू लागले. यामुळे शिक्षणाची गरज आताशी जाणवू लागली आहे.

येथे जिल्हा परिषदेच्या शाळेची स्थापना 1965 मध्ये झालेली आहे. आजतागायत इथला एकही माणूस कर्मचारी म्हणून शासकीय सेवेत कोणी लागलेला नाही. शेतीच्या वाटण्यामुळे जमिनी कमी झाल्या तरी गोदावरी माईने पोटापाण्याची सोय केलेलीच आहे... तसे तर 2010 पासून आणि 2016 मधील सातवा वेतन आयोग लागू झाल्यापासून तर अधिकच नांदेड शहर आणि परिसराचा झपाट्याने विकास होऊ लागला आहे. वैद्यकीय प्रवेशासाठी नीट परीक्षेच्या यशाची हमी देणाऱ्या खासगी क्लासेसचा सुळसुळाट



झाल्याने शिक्षणाचे व्यापारघर बनलेल्या नांदेड शहर आणि परिसरात बांधकामांचे पेव फुटले आहे. यासाठी अत्यंत आवश्यक असणारी वाळू, गोदापात्रात प्रचंड प्रमाणात उपलब्ध असल्याने गोदाकाठच्या गावांना सोन्याची खाण लाभल्यासारखे झाले. या सर्व गोदाकाठच्या गावांनी कुठलाही शासन परवाना न घेता अनिर्बंध वाळू उपसण्यास आणि ती विक्री करण्यास सुरुवात केली. यातून पुन्हा एकदा शिक्षणाची जी काही गरज निर्माण होऊ घातली होती तिचे अस्तित्वच राहिले नाही. शिवाय शासनाचा महसूल बुडवून कुठलीच कारवाई होत नसल्याने आणि आधीच संपूर्ण गावच, विजेच्या तारांवर आकडे टाकून विजेचा फुकट वापर करत असल्याने एक प्रकारची नियमांची पायमल्ली करण्याची, बेशिस्तपणाची, बेपर्वाई इथल्या प्रत्येकाच्याच अंगी शिरली गेलेली होती.

या सगळ्या पार्श्वभूमीवर माझे भोकर तालुक्यातील जुने सहकारी आणि सध्या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून काम पाहत असणारे श्री अक्षय अशोक ढोके यांची 2018 मध्ये ऑनलाइन बदली प्रक्रियेतून या नागापूर शाळेमध्ये बदली झाली. तेव्हा अक्षय सहशिक्षक म्हणून काम करत असे. 2018 मध्ये नागापूर शाळेची पटसंख्या 38 होती. साधारण त्या शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस मार्च 2019 मध्ये मी अक्षयच्या पहिलीच्या वर्गावर वार्षिक तपासणीच्या निमित्ताने भेट दिली आणि गुणवत्ता तपासणी केली. या गुणवत्ता तपासणीत मला त्याच्याकडून अपेक्षित असणारी गुणवत्ता विद्यार्थ्यांत आढळली नाही. ही बाब मी अत्यंत सौम्य आणि स्नेहपूर्ण शब्दांत त्याच्या निदर्शनास आणून दिली. मुळात अक्षय हा हरहुन्नरी आणि चिमुकल्यांच्या उत्कर्षासाठी तळमळीने काम करणारा अत्यंत अभ्यासू शिक्षक ! त्यामुळे त्याचा वर्गही त्याच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा, तेजस्वी अपेक्षित आहे. मी काहीसा निराश झाल्याचे अक्षयला लक्षात आले. मी अधिक काही न बोलता, येणाऱ्या काळात भोकर तालुक्यामध्ये ज्या उत्साहाने आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने कार्य केले आहे, तसे कार्य करण्याची अक्षयला सूचना दिली आणि तिथून निघालो. या भेटीचा आणि दिलेल्या सूचनांचा अक्षयने गांभीर्याने विचार केला आणि तिथून तो आमूलाग्र बदलला, झपाट्याने कामाला लागला. अक्षयने जणू गियरच बदलला!

बदलाची सुरुवात :

पुढच्या मार्च 2020 पासून कोविड महामारीने तर शाळा आणि विद्यार्थी यांना जवळपास दोन वर्ष जवळीकच साधू दिली नव्हती. परंतु माझा अक्षर परिवार अर्थात वाजेगाव बीट त्याला अपवाद ठरले. मी माझ्या बीटमधील व्हॉट्सॲप समूहावर, आपण आपली वैयक्तिक कामे कोविड असतानाही त्याची भीती न बाळगता विनाखंड करत आहोत आणि केवळ शासनाचे निर्देश आणि कोविडची भीती म्हणून आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवत आहोत. असे न करता आपणास ऑनलाइन, ऑफलाईन जसे जमेल तसे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात कायम राखण्याचे एक विनंतीवजा आवाहन केले. या आवाहनास प्रथम सकारात्मक प्रतिसाद देणारा अक्षय होता. त्याने केवळ ऑनलाईनच नव्हे तर प्रत्यक्ष ऑफलाईन पद्धतीने नागापूर गावातील विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन कोविड संदर्भातील सर्व प्रतिबंधात्मक निर्देशांचे पालन करून सर्व विद्यार्थ्यांना अभ्यास देण्याचे धाडसी पाऊल उचलले. यासाठी त्याला अनेक शिक्षक बांधवांनीदेखील विरोध केला. अनेक प्रकारच्या भीती सुद्धा दाखविल्या. परंतु त्याच्या प्रामाणिक कार्याची दखल घेऊन त्याला मी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचे सांगितले. त्यातून तो शासनाच्या शाळेला ऑफलाईन वर्ग अध्यापनाला सुट्ट्या असतानादेखील नियमितपणे शाळेला जात राहिला आणि पालकांच्या सहमतीने प्रत्यक्ष वर्ग अध्यापन त्याने सुरू केले. यात त्याच्या मुख्याध्यापिका लक्ष्मी गायकवाड




यांनी सुद्धा त्याला मोलाची साथ दिली. वयाची 55 वर्षे ओलांडलेली असली तरी त्या सुद्धा स्वतःच्या जिवाची पर्वा न करता शाळेमध्ये प्रत्यक्ष वर्ग अध्यापन करत राहिल्या. यातून पालकांचा शिक्षकांवरील विश्वास वाढत गेला. यामुळे पालकांनी स्वतःच्या पाल्यांना इंग्रजी माध्यमातून काढून गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत दाखल केले. यातून 38 असणारा पट 67 वर गेला. अशातच मुख्याध्यापक लक्ष्मी गायकवाड मॅडम यांची पदोन्नत मुख्याध्यापक म्हणून शाळेतून बदली झाली. 67 पटसंख्या आणि एक शिक्षक असे जवळपास अडीच ते तीन महिने अक्षयने तिथे काम केले. अशा कठीण प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक पद सांभाळून, प्रशासकीय कामे, ऑनलाइन कामे, विविध टप्पे, एक ते चार वर्गांचे अध्यापन, त्यांचे मूल्यमापन या सगळ्या बाबी अक्षयने प्रभावीपणे केल्या. मी त्याची अडचण समजून घेऊन खाजगी शाळेचा अतिरिक्त शिक्षक प्रतिनियुक्तीवर त्याला दिला. यातून त्याने आपल्या कामाचा दर्जा अजून उंचावला. शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करणे ही त्याची यशाची पहिली पायरी ठरली. आधीच्या शाळा व्यवस्थापन समिती मधील पालक तेवढे जागरूक नसल्याने आपल्या पाल्यांच्या शिक्षणाच्या समस्या काय आहेत, त्यांची उकल कशी करावी अथवा शाळेला उत्कर्षाकडे नेण्यासाठी आपण कुठले सहकार्य करावे, याची कुठलीच जाणीव त्यांना नव्हती. परंतु मुख्याध्यापक पदाचा पदभार घेताच शाळेतील विकासाच्या आड येणाऱ्या सर्व समस्यांचा निपटारा गावातील पालकांच्या आणि प्रतिष्ठित नागरिकांच्या मदतीनेच करता येईल, ही बाब हेरून अक्षयने गावकऱ्यांशी संपर्क वाढवला.

गाव तसे लहान जरी असले तरी नैसर्गिक संपन्नतेमुळे शिक्षणाची गरजच न वाटल्याने, शिक्षणाचे महत्त्व येथील ग्रामस्थांना जास्त नव्हते. शाळेबद्दल त्यांना आपुलकी, आस्था, अथवा अभिमान वाटावा असेही कधी शाळेकडून प्रयत्न झालेले नसावेत. यातून गावकऱ्यांचा शाळेशी संपर्क जो व्हायचा तो केवळ राष्ट्रीय सणाच्या ध्वजारोहण प्रसंगीच. या सगळ्या पार्श्वभूमीवर मुख्याध्यापक म्हणून काम करताना विद्यार्थ्यांच्या पायाभूत शिक्षणासाठी अर्थात मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसनासाठी पालकांची मोलाची भूमिका लक्षात घेऊन पालकांचा, ग्रामस्थांचा शाळेमध्ये सहभाग वाढविणे अत्यंत गरजेचे आहे हे अक्षयने लक्षात घेतले.


या माध्यमातून पुनर्गठित केलेल्या नूतन शालेय व्यवस्थापन समिती आणि पालकांच्या नियमित बैठका घेण्याचे सत्रच नागापूर शाळेत सुरू झाले. यासोबतच माता पालक गटांची निर्मिती करून माता पालकांसोबत शाळेने संपर्क वाढविला. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाल्याला टाकावे याचा आग्रह जास्त करून माता पालकांकडूनच होत असल्याचे लक्षात घेऊन त्यांना अक्षयने इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा फोलपणा, वरवर दिसणारा बडेजाव, त्या शाळांतील अप्रशिक्षित अध्यापक वर्ग, तिथला अनाठायी खर्च या सगळ्यांच्या बाबतचे प्रबोधन सदैव या बैठकांतून केले. पालकांकडे आर्थिक सुबत्ता असल्याने पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकून आपली जबाबदारी संपली या आविर्भावात जगत असल्याचे लक्षात घेऊन, इंग्रजी शाळांची भुरळ बाजूला सारून, जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेसोबतच शिक्षकांबद्दल विश्वास निर्माण व्हावा यासाठी आधी स्वतःची मुले आपल्या शाळेत दाखल करण्याचा निर्णय अक्षयने घेतला. यातून त्याची मुलगी अन्वी आणि मुलगा अनय नागापूर शाळेचे विद्यार्थी झाले. यात त्याची पत्नी साधना जी स्वतः एक उपक्रमशील शिक्षिका आहे, तिचीही साथ होतीच. आपल्या मुख्याध्यापकांची स्वतःची मुले आपल्या गावातील शाळेत शिकत आहेत हे पाहून गावातील पालकांना हळूहळू जिल्हा परिषदेच्या शाळेचे महत्त्व आणि इंग्रजी शाळांची वस्तुस्थिती लक्षात येऊ लागली.




नागापूर शाळेत आता विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. परंतु ज्या गावाचे शाळेकडेच लक्ष नव्हते त्यांचे अंगणवाडीकडे किती लक्ष असेल याची कल्पनाच न केलेली बरी... त्यामुळे अशा पूर्णपणे अनियमित असणाऱ्या, अंगणवाडीकडून येणाऱ्या विद्यार्थ्यांचा कुठलाच अभ्यास न घेतला गेल्याने, कोऱ्या पाटीसारखे अभ्यासाच्या कुठल्याही पूर्वतयारीपासून वंचित असणारे, अंक ओळख, अक्षर ओळख नसणारे हे विद्यार्थी शाळेत प्रवेशित होत होते. अशा अभ्यासाची कुठलीच सवय नसणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून ठेवणे, त्यांना नियमित शाळेला उपस्थित ठेवणे हेसुद्धा मोठे जिकिरीचे काम होते. यासाठीसुद्धा मोठा कृतिकार्यक्रमच आखून द्यावा लागला. सर्वप्रथम उपस्थिती 100% राहावी यासाठी पालकांना आपल्या पाल्यांना अतिशय महत्त्वाचे काम असल्याशिवाय कुठेही गावाला घेऊन जाण्यास मनाई करण्यात आली. त्यांना पाल्य एक दिवस अनुपस्थित राहिल्याने किती अभ्यासाचे नुकसान होते हे व्यावहारिक उदाहरणावरून समजावून सांगण्यात आले. तसेच जो विद्यार्थी अथवा वर्ग दरमहा जास्तीत जास्त उपस्थितीची शेकडेवारी दर्शवेल त्याचे विशेष कौतुक शाळेमार्फत करण्यात येऊ लागले. यातून विद्यार्थी उपस्थिती वाढविण्याची चुरस वर्गांमध्ये लागून आज शाळेची उपस्थिती नियमितपणे 96%च्या वरच असते. उपस्थितीचा प्रश्न सुटल्यानंतर महत्त्वाचा प्रश्न होता विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा!!!

यासाठी पारंपरिक पद्धतीने अध्यापन करून त्यात सुधारणा होईल असे काही शक्य नव्हते. म्हणून महाराष्ट्र शासनाने विकसित केलेली वेध शिक्षण प्रणालीचा प्रभावी वापर करावा लागेल याची जाणीव ठेऊन विद्यार्थ्यांना मुळातून समजून घेण्याचे प्रयत्न शाळेमध्ये सुरू झाले. सोबतच नवनवीन अध्यापन पद्धती, शैक्षणिक साधने, शासनाकडून मिळालेल्या विविध भाषा पेटी, गणित पेटी, ELCRLM साहित्याचा, दृक् श्राव्य साधनांचा वापर करूनच गुणवत्तेत आमूलाग्र बदल करण्याचा चंग शाळेने बांधला. दरम्यान शाळेला मेहनती शिक्षक गोपाळ राजेबोईनवाड आणि उपक्रमशील शिक्षिका धम्मदीना सोनकांबळे हे बदलीने रुजू झाले. या दोघांच्या येण्याने मुख्याध्यापकांचे काम अधिकच सुलभ झाले. मुळात इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पालकांचे आपल्या पाल्याच्या अभ्यासावर विशेष लक्ष असते. वेळोवेळी ते आपल्या पाल्याच्या अभ्यासाची माहिती घेतात. त्याच्या शिक्षकांशी चर्चा करून घरी नेमका काय अभ्यास घ्यावा याबद्दलचे मार्गदर्शन ते स्वतःहून शिक्षकांकडून मिळवितात. तेच या नागापूर शाळेतील तिन्ही शिक्षकांनी मिळून करायचे ठरवले. त्यांनी आपापल्या वर्गातील पाल्यांच्या मातापालकांचे गट निर्माण करून सातत्याने त्यांना आपल्या मुलामुलींच्या अभ्यासाबद्दल माहिती देण्याची मोहीमच सुरू केली. यातून मातापालक आणि विद्यार्थी यांच्यातील अभ्यासाचा सुसंवाद वाढून केवळ पाल्याला शाळेत टाकले म्हणजे झाले, ही बेजबाबदार भावना जाऊन आपणही आपल्या पाल्याचा घरी अभ्यास घ्यावा, त्याला स्वाध्याय सोडवण्यासाठी मदत करावी, त्याच्या अभ्यासातील अडथळ्यांबद्दल शिक्षकांशी चर्चा करावी ही भावना पालकांच्या मनात रुजली. आज त्याची सवय सर्व पालकांना लागलेली आहे. ज्या शाळेत आधी कधी पालक ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाशिवाय येत नव्हते तिथे आज शाळेत एकही दिवस असा जात नाही ज्यादिवशी एखादा पालक आपल्या पाल्याच्या अभ्यासाची माहिती घेण्यास अथवा देण्यास शाळेत आलेला नसेल.


पालकांच्या या सक्रिय सहभागाला शाळेत वर्गातून जिवंत अध्यापनाची जोड मिळणे तितकेच गरजेचे होते. गाव जरी समृद्ध आणि संपन्न असले तरी गावातील लोकांना शाळेला काही देण्याची सवय नव्हती. शासनाकडून मिळणारा अपुरा निधी आणि ग्रामपंचायतीचे शाळेकडे असणारे दुर्लक्ष हे शाळेला पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यातील महत्त्वाचे अडथळे होते. यावर तोडगा काढण्यासाठी मुख्याध्यापकांनी स्वतःपासून सुरुवात करण्याचे ठरविले. तसे करताना स्वतःच्या दोन्ही मुलांच्या अथवा



घरातील व्यक्तींच्या, वाढदिवसानिमित्त शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी 50 रुपयांचे शैक्षणिक साहित्य प्रत्येकवेळी द्यायला प्रारंभ त्यांनी केला. तसेच शाळेला आवश्यक असणारे छोटे मोठे साहित्य ते भेटवस्तू म्हणून शाळेला देऊ लागले. याची प्रसिद्धी ते पालकांच्या, गावकऱ्यांच्या व्हॉट्सअॅप समूहातून करू लागले. याचा आदर्श इतर शिक्षकांनी घेत ते सुद्धा हाच कित्ता गिरवू लागले. आपल्या शाळेतील गरजा भागविण्यासाठी शासनाचा निधी अपुरा पडतो हे सर्व पालकांच्या, शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या लक्षात आणून देण्यात ते यशस्वी ठरले. आपणही या शाळेतच शिकलो, आपली मुले याच शाळेत शिकत आहेत, तेव्हा आपणही या शाळेचे काही देणे लागतो ही भावना पालकांच्या मनात जागृत व्हावी यासाठी जाणीवपूर्वक शाळेच्या वतीने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यातून हळूहळू लोकसहभाग म्हणून काही आर्थिक मदत शाळेला होऊ लागली. तसेच मुख्याध्यापक यांनी सरपंच, ग्रामसेवक यांच्याशी चर्चा करून वित्त आयोगाचा निधी शाळेसाठी खर्च करावा यासाठी त्यांची मनधरणी केली. त्यातून ग्रामपंचायतीने शाळेच्या दोन खोल्यांना- ज्यामध्ये पावसाळ्यात सर्वत्र मुंगळ्यांचे राज्य असायचे त्यात फारशी बसविणे, एमएसइबीने काढून नेलेले वीज मीटर बसविणे, सखल मैदानात चिखल होऊ नये यासाठी मुरूम टाकणे, मैदानातील काही भागात पेव्हर ब्लॉक बसविणे, शाळेला स्वच्छतागृहासाठी पाण्याची टाकी बसवून नळ फिटिंग करून घेणे इत्यादी कामे करून घेतली.

याच बरोबर पालकांनादेखील आपल्या पाल्यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने शाळेला आवश्यक असणारी वस्तू भेट देण्याचे आवाहन केले. यातून हळूहळू शाळेसाठी टेबल, कपाट यासारख्या वस्तू जमा होऊ लागल्या. यानंतर मात्र हळूहळू सर्वच पालकांना आपल्या शाळेबद्दल आस्था निर्माण झाल्याने सर्वच पालकांनी सामूहिक स्वरूपात शाळेसाठी मोठी रक्कम जमा करण्याचे ठरविले. त्यातून सर्वांनी आपले आपले योगदान देऊन शाळेसाठी प्रोजेक्टर, टी व्ही, प्रिंटर, लॅमिनेशन मशीन, संपूर्ण शाळेला ऑईल पेंटने कलरिंग करून पूर्ण अभ्यासक्रम भिंतीवर उतरविण्यासारखे पायाभूत शिक्षणाचे प्रबलीकरण करणारे उपक्रम हाती घेतले. यातून विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरतेचे धडे शाळेच्या आवारात चालत, बोलत, खेळत, मिळू लागले. जिकडे नजर जाईल तिकडे आकर्षक चित्रांनी सजविलेल्या भिंतीवरील अभ्यासाने वाचनाचा सराव विद्यार्थ्यांना होत आहे. सोबतच प्रोजेक्टर, टीव्ही, साउंड सिस्टिम यांनी विविध अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देण्याची संधी शिक्षकांना मिळते आहे. केवळ एवढ्यावरच अवलंबून न राहता येथील शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या गरजेनुरूप त्यांनी उपयोगी पडेल असे शैक्षणिक साहित्य तयार करावे याचा आग्रह मुख्याध्यापक सातत्याने करत असतात. यातून भरमसाठ असे शैक्षणिक साहित्य प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याला पुरेल असे बनविण्यात आलेले आहे. याचा वापर नियमित करण्यात येतो. शाळेत बेंच उपलब्ध असूनदेखील शाळेत विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतांच्या गटानुसार त्यांना जमिनीवर बसवून गट अध्ययन अध्यापन वर्गात चालते. यासाठी उच्च अध्ययन क्षमता प्राप्त विद्यार्थी निम्न क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांचा पिअर लर्नर (आमचा शब्द दत्तक मैत्री) म्हणून मदत करत असतो. शाळेने विकसित केलेल्या विविध अभ्यास कार्ड यांना लॅमिनेशन करून ते सरावासाठी घरीसुद्धा दिले जाते. दररोज रात्री झोपण्याआधी ते कार्ड पालकांना वाचून दाखविण्याची सूचना सर्व विद्यार्थ्यांना केलेली आहे. त्याचे पालन केले जाते की नाही याची पालकांशी चर्चा करून खात्री केली जाते.

यामुळे विद्यार्थी घरी जाऊन सुद्धा स्वयंअध्ययन करत आहेत. अभ्यासासाठी एकत्र बसून पिअरच्या मदतीने समस्यांची उकल करत आहेत. यातून त्यांना आनंद प्राप्त होऊन तणावमुक्त अभ्यासाचे वातावरण तयार होण्यास मदत होत आहे. वाजेगाव बीटचे वैशिष्ट्य असणारी बालसभा येथे दर शुक्रवारी आयोजित




करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढलेला असून विद्यार्थी शेकडो माणसांच्या सभेत सुद्धा बोलण्याचा आत्मविश्वास बाळगत आहेत. यातून निपुण भारतचे उद्दिष्ट साध्य करण्यात मदत होते आहे. उत्तम संवाद करू शकणारे प्रभावी वक्ते इथे तयार होत आहेत.

फलनिष्पत्ती :

पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसनासाठी मुख्याध्यापकांनी येथील संपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौतिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करून त्यात मूलभूत बदल करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केल्याने इथले शैक्षणिक वातावरण बदलण्यात ते यशस्वी झाल्याचे दिसून येते. ज्या गावात एकही विजेचे मीटर नव्हते तिथे त्यांच्या प्रबोधनाने 40 - 50 विजेचे मीटर बसविण्यात आलेले आहेत. यातून शाळेत मीटर असूनही महिना-महिना लाईट नसल्याची समस्या कायमची दूर करण्यात ते यशस्वी ठरले. यातून शाळेमध्ये असणाऱ्या दृकश्राव्य साधनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसनासाठी त्याची मदत घेता आली. जिथे एकही जण शाळेकडे फिरकत नसायचे तिथे आज शाळेमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमाला बसायला जागा उरत नाही एवढी ग्रामस्थ, पालकांची उपस्थिती शाळेला असते. ही उपस्थिती केवळ कार्यक्रम पाहण्यासाठी नव्हे तर शाळेचा प्रत्येक कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी तन, मन, धन अर्पिण्यासाठी उपस्थित झालेले असतात. एकंदरीत गावातील प्रत्येकाला शिक्षणाची, शाळेची गोडी निर्माण करण्यात मुख्याध्यापक आणि त्यांचे सहकारी यशस्वी होताना दिसून आले आहेत. लोकसहभागाची ही प्रभावी चळवळ शाळेने विकसित केलेली असल्याने ग्रामस्थ पालकांच्या मदतीचा ओघ सदैव सुरूच आहे.

समारोप :

कात टाकणे या वाक्प्रचाराला शोभेल अशा पद्धतीने नागापूर शाळेचा आणि एकंदरीत येथील ग्रामस्थांच्या शिक्षणाबद्दलच्या विचारपद्धतीला आमूलाग्र बदलवून टाकणारा बदल इथे घडून आलेला आहे. येथील सर्व विद्यार्थ्यांना आनंददायी पद्धतीने, तणावमुक्त वातावरणात, पालकांचा सक्रिय सहभाग घेऊन, प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या गतीने शिकण्यासाठी संधी दिली जाते हे पाहून आपण करत असलेल्या मार्गदर्शनाने इतका छान बदल झाल्याचे समाधान मनाला भेटते. विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरतेमध्ये होणारी सुधारणा पाहून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी या शाळेमध्ये भेटत असल्याची माझी खात्री झाली आहे. यातून अनेक सहशालेय कार्यक्रमाचे आयोजन त्यांना करता येणे शक्य होणार आहे. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून शाळेचा पट यावर्षी 85 झालेला आहे. गावातून एकही विद्यार्थी आता इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जात तर नाहीच उलट बाहेर गावचे विद्यार्थी या शाळेत प्रवेश घेण्यास उत्सुक असल्याचे माझे निरीक्षण आहे. शिक्षकाने मनावर घेतले, आपले कार्य समर्पित भावनेने केले, विद्यार्थी, पालक, शिक्षक, गावातील प्रभावी नागरिक यांच्यात उत्तम संवाद घडवून आणण्यात जर तो यशस्वी झाला तर नक्कीच शाळेचे नंदनवन करण्यात तो यशस्वी होऊ शकतो. अशा शिक्षकांना फक्त आपल्या शाबासकीची थाप देण्यात प्रशासनाने कमी पडू नये. माझ्या बीटमध्ये मी दरवर्षी कुठलाही प्रस्ताव न भरायला लावता केवळ कामगिरीच्या मूल्यमापनावर बीटस्तरीय शिक्षक भूषण पुरस्कारांचे वितरण करत असतो. हा माझ्या माहितीनुसार राज्यातील एकमेव बीटस्तरीय पुरस्कार असावा. 2020 मध्ये कोविड काळात अक्षयने केलेल्या धाडसी कार्याचा गौरव त्याला बीट स्तरीय शिक्षक भूषण पुरस्कार देऊ करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद नांदेड



प्रशासनाने सुद्धा गेल्या वर्षी त्याच्या कार्याची नोंद घेत 2024-2025 सालच्या जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने त्याला सन्मानित केले.

विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसनाच्या या प्रवासात प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, तालुक्याचे शिस्तप्रिय गटशिक्षणाधिकारी नागराज बनसोडे, यांचे विशेष मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. या एकंदर यशस्वितेमध्ये केंद्रप्रमुख व्यंकट गंदपवाड यांचे, ग्रामस्थांचे, पालकांचे, विद्यार्थी, सहशिक्षकांचे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बालाजी पाटील सपुरे आणि सर्व व्यवस्थापन समिती सदस्य, सरपंच दत्ता पाटील करडीले, दिगंबर पाटील करडीले यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेही म्हणतातच ना गाव करील ते राव काय करील? अशा मेहनती मुख्याध्यापकाची शाळा यशोगाथा श्री व्यंकटेश चौधरी ,शिक्षण विस्तार अधिकारी ,बीट वाजेगाव तालुका जिल्हा बीड यांनी स्वतः च्या अनुभवातून मांडली आहे.


Video link :

https://youtube.com/shorts/t22agfzNgKA?feature=shared

https://youtube.com/watch?v=WPHEzRLDMVM&feature=shared

https://youtube.com/watch?v=WPHEzRLDMVM&feature=shared

----------**----------



वृक्ष लागवड व संवर्धन तसेच मुलभूत क्षमता विकास यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेळगाव


शाळेचा पत्ता - शेळगाव, केंद्र - नरंगल, ता. देगलूर जि. नांदेड

मुख्याध्यापक नाव - श्रीमती सविता गणेश वाघमारे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९७६५७६९७१५

शेळगाव म्हणजे नृसिंह आराध्य दैवत असणारे ऐतिहासिक व सांस्कृतिक असे हे - नृसिंह शेळगाव. हे देगलूर व बिलोली तालुक्याच्या सीमेवरील गाव. आर्थिकदृष्ट्या संपन्न - सधन असलेले, या गावी मी जून 2018 मध्ये बदली होऊन आले. जेव्हा पहिलं पाऊल शाळेत ठेवलं तेव्हा वाटलं, "हे काय शाळेमध्ये कसलं झाड नको, इकडे - तिकडे दुरावस्था, दार तोडलेले, खिडक्या तोडलेल्या, गेटची दुरावस्था, सगळीकडे अस्वच्छता, तेथे सगळं असूनही नासधूस झालेलं, शाळेला ग्राउंड होतं पण एकही झाड नव्हतं असं वाटलं की इथे विद्यार्थ्यांचं मन कसे रमत असेल?" तेव्हा काय करावे हा विचार डोक्यात चालू असतानाच,आम्ही सर्व सहकार्यांनी विचार केला तेव्हा आमच्या शाळेतील मुख्याध्यापकाची जागा रिक्त होती. गाव सुसंस्कृत व सधन आहे तर गावकऱ्यांचीच मदत घेऊया व त्यांच्या मदतीने आपण शाळा सुंदर बनवूया आणि आम्ही कामाला लागलो. जेव्हा आम्ही पहिलं रोपट शाळेत लावलं तेव्हा पाणी पण शाळेमध्ये नव्हतं. तेव्हा हे रोपट कसे जगेल? हा प्रश्न इतरांनाच नाही तर आम्हालाही पडला होता. पण तिथूनच शाळा सुंदर होण्याची सुरुवात झाली. तेव्हा आमचे खिचडीवाले मामा खिचडीसाठी बाहेरून हापशाचे पाणी आणायचे. पहिलं रोपट लावलं तेव्हा बरेच जण बोलले हे पाण्याशिवाय कसं जगेल पण "इच्छा तेथे मार्ग" त्याप्रमाणे आम्ही त्याला जगवण्याचा प्रयत्न केला . पहिल्या वर्षी लावलेल प्रत्येक रोपट हे मुलांनी शाळेतून घरी जाताना उरलेलं बॉटलमधील पाणी झाडाला द्यायचं अशी सवय मुलांना लावली. मुले घरी जाताना रोज झाडांना उरलेलं पाणी टाकत होते. आता शाळा पण स्वच्छ करण्याचे काम चालूच होते पण शाळेतील दुरुस्त्या व शाळेत नवीन तंत्रज्ञान आणण्यासाठी पैशाची गरज होती.आम्ही ठरवलं की गावातून देणगी जमा करायची म्हणजे गावकऱ्यांनाही शाळा आपली वाटली पाहिजे यासाठी आम्ही देणगी जमा करण्याचा निर्णय घेतला.

दोन महिने गेले, ऑगस्ट महिना आला तेव्हा 15 ऑगस्ट 2018 या दिवशी ग्रामपंचायत समोर सर्व गावकरी एकत्र आले असता गावकऱ्यांसमोर प्रस्ताव मांडला की आपण सर्वजण मिळून शाळा सुंदरच नाही, तर डिजिटल पण करूया! म्हणतात ना, आपण एक मदतीचा हात मागितला तर आपल्याला भरभरून साथ मिळते. त्याप्रमाणेच गावातून अगदी आम्हाला भरभरून साथ मिळाली आम्ही सर्वांनी ठरवलं गावातून निधी जमा करायचा. मग त्यासाठी आम्ही सर्व शिक्षक शाळेत सकाळी 7.30 वाजताच यायचो. प्रत्येकाच्या घरी जाऊन शाळेला कशी मदतीची गरज आहे व ते कोणत्या पद्धतीने मदत करु शकतात हे त्यांना पटवून सांगून निधी जमा करायचो. आम्ही ठरवल होत की काहीही करून शाळा सुंदर बनवायची या कामात आम्हाला



अडथळे पण आले काही जन निधी देण्यास नकार द्यायचे त्यांना पटवून सांगताना आम्ही थकायचो , तरी आम्ही थांबलो नाही. आम्ही केलेला निश्चय पक्का होता त्यासाठी आम्ही ठरवलं की आता थांबायचं नाही, कितीही अडचणी आल्या तरी आता शाळा सुंदर बनवायची की त्या शाळेत सर्व विद्यार्थ्यांचे तसेच शाळेत शिक्षकांचेही मन रमलं पाहिजे. मग आता त्यासाठी आम्ही पूर्णपणे मनाने व शरीराने कामाला लागलो. शाळेमध्ये शारीरिक श्रम तर दिलेच त्याचबरोबर आर्थिक गुंतवणूक केली. शिक्षक पुढे होऊन शाळेसाठी काहीतरी चांगल काम करत आहेत म्हटल्यावर गावकरी पुढे सरसावले व पाहता पाहता मदतीचे हात पुढे येऊ लागले. मग आम्ही ठरवलं की शाळेत हिरवळ करायची सगळीकडे झाडे लावायची एक बगीचा तयार झाला पाहिजे.

शाळेमध्ये एक गावाला पाणीपुरवठा करणारी टाकी होती. त्या पिण्याच्या टाकी खाली खूप पाणी जमायचं त्या ठिकाणी कचरा टाकून उकिरडा तयार झाला होता. त्यामुळे शाळेत त्याचा घाणेरडा वास येत होता. दलदल तयार झाली होती पाणी साचून — साचून. तिथे घाणेरडा वास येत असल्यामुळे मुले तिकडे जात नव्हती पण शाळेत घाण नको वाटू लागली म्हणून आम्ही ती स्वच्छ करायचे ठरवले. ग्राउंड मध्ये पाणी साचत होतं. आम्ही ग्रामपंचायतची मदत घेऊन शाळेमध्ये मुरूम टाकून घेतला. ग्राउंडची उंची वाढवून घेतली. शाळेमध्ये झाडे लावणे चालूच होते. पण पाणी नव्हते तेव्हा झाडांची संख्या वाढत होती पण पाणी मिळत नव्हते, शाळेमध्ये पाण्याची टाकी असून पाण्याचा नळ शाळेमध्ये नव्हता. मग त्या टाकीचा एक नळ शाळेत घेतला त्यात सरपंचाची आम्हाला खूप मदत झाली शाळेत आता नळ आला होता. शाळेमध्ये पाणी झाडांना मिळू लागले. पण टाकी खालची दलदल त्याचा वास घातक होता. तेव्हा ठरवलं की त्याची साफसफाई करायची. तेथे जवळ जवळ पाच ट्रॅक्टर वाळू लागणार होती तेव्हा आम्ही गावात देणगीसाठी फिरत होतो. गावातून जवळजवळ तीन लाखापर्यंत देणगी जमा झाली तेव्हा त्या देणगीचा शाळा सुंदर बनवणे, शाळेतील तोडफोड दुरुस्ती करणे, शाळा डिजिटल बनवणे यात उपयोग करायचे ठरवले पण एवढे पैसे अपुरे पडत होते तेव्हा सर्व शिक्षकांनी ठरवलं की, जेथे जेवढे जमेल तेवढे शारीरिक श्रम आपण देऊ. तेव्हा त्या टाकी खालची दलदल बुजवण्यासाठी पाच ट्रॅक्टर वाळू ग्राउंड पासून ते त्या दलदलीमध्ये शिक्षकांनी सर्वांनी मिळून टाकले व तेथील पूर्ण स्वच्छता केली. शाळेमधील शौचालय याची तर इतकी दुरावस्था होती की, तेथे कोणी विद्यार्थी पण जात नव्हते. तेव्हा ग्रामपंचायतला विनंती अर्ज केला की नवीन शौचालय बांधून द्यावे. तेव्हा ग्रामपंचायतीचीही खूप मदत झाली. तेव्हा त्यांनी शाळेच्या विकासाची खूप कामे करून दिली. त्यात शौचालय बांधून दिले. टाकी खालची स्वच्छता करत असताना आम्हाला तिथे नारळाची रोपे मिळाली. गावकऱ्यांचा असा समज होता की टाकीमध्ये पडून कोणीतरी आत्महत्या केली होती त्याचे भूत तिथे असते, म्हणून लोक नारळ त्या ठिकाणी उतरवून टाकायचे. त्या नारळाचे त्या टाकीच्या पाण्यामुळे रोपे तयार झाली . साफसफाईच्या दरम्यान त्या नारळाला हात लावताना मुले घाबरायची , ती नारळ झाडं आम्ही सर्वांनी शाळेत लावली व विद्यार्थ्यांमधील अंधश्रद्धा दूर केली व आता त्यामुळे शाळेमध्ये झाडेच झाडे झाली होती. त्यानंतर काही जणांनी देव्हाऱ्यातील नारळ पण आणून दिली ती पण झाडे आम्ही शाळेत लावली. आता आमच्या शाळेत खूप हिरवळ तयार झाली त्यामुळे आता आमची शाळा खूपच सुंदर झाली. त्यामुळे शाळा अगदी कोकणात असल्यासारखी वाटू लागली. शाळेतील धान्यघरात व




ऑफिसमध्ये घुशिनी उकिरले होते , त्यामुळे बरेच दस्तऐवज व धान्यसाठा खराब होत होता, म्हणून तिथे पूर्ण दुरुस्ती करून अगदी सुंदर असे ऑफिस व धान्य साठाखोली तयार केली. शाळेमध्ये आता प्रोजेक्टर आले, चार कॉम्प्युटर आले, नंतर त्या टाकीखाली आम्ही परसबाग तयार केली. त्यामध्ये शाळेचा तालुक्यातून परसबागेमध्ये प्रथम क्रमांक आला व पाच हजार रुपयांचे बक्षीसही मिळाले. गावकऱ्यांच्या देणगीतून शाळेच्या दुरुस्ती बरोबरच रंगरंगोटी केली त्यामुळे शाळा अधिकच सुंदर दिसू लागली. नंतर हळूहळू गावकऱ्यांच्या योगदानातून शाळेमध्ये डॉक्टर ए.पी.जे.अब्दुल कलाम गणित - विज्ञान रोबोटिक्स प्रयोगशाळा आली. आता शाळेमध्ये नवीन गेट बसवण्यात आले त्यामुळे शाळेतील बऱ्याच गोष्टी सुरक्षित आहेत व शाळेमध्ये सगळीकडे सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत ,शाळेमध्ये तीन स्मार्ट टीव्ही आहेत .

गावकऱ्यांनी शाळेला हार्मोनियम दिली आणि हो या हार्मोनियमवरच आमच्या शाळेतील प्रार्थना होते बरं का आणि स्वतः विद्यार्थी प्रार्थना घेतात व स्वतः हार्मोनियमवर प्रार्थना वाजवतात. शाळेमध्ये नियमित विविध प्रकारचे उपक्रम घेतले जातात. मागच्या दोन वर्षात विद्यार्थ्यांनी स्वच्छता मॉनिटर मध्ये खूप चांगली कामगिरी केली आहे. दरवर्षी शाळेतील विद्यार्थी वृक्षारोपण करतात व त्याचे संवर्धनही करतात. तसेच शाळेमध्ये विद्यार्थी बचत बँकेची स्थापन केलेली आहे. विद्यार्थी त्या बँकेमध्ये खाऊचे आणलेले पैसे जमा करतात व काढतात हा बँकेच्या व्यवहार स्वतः विद्यार्थी करतात. शाळेमध्ये प्रत्येक राष्ट्रीय सण विद्यार्थी स्वतः उत्साहाने साजरा करतात. शाळेमध्ये विद्यार्थी मंत्रिमंडळ तयार केलेले आहे व वाचन प्रकल्प शाळेमध्ये दररोज घेतला जातो. शाळेतील विद्यार्थी विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. त्यामध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच शाळा स्तरावरील खेळाच्या स्पर्धेमध्ये सहभागी होतात. निबंध स्पर्धेमध्ये तालुकास्तरावरून शाळेतील विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळवलेला आहे. विद्यार्थी क्यूब तयार करणे, बुद्धिबळाचे खेळ असे अनेक प्रकारचे खेळ अगदी खूप चांगल्या प्रकारे खेळतात. शाळेतील वातावरण आनंददायी व खेळकर असल्यामुळे विद्यार्थी शाळेमध्ये रमतात. शाळेमध्ये ग्रीटिंग कार्ड तयार करणे, मेहंदी काढणे अशा विविध प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जातात. तसेच खाऊची जत्रा घेतली जाते व त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जीवन व्यवहार समजावला जातो. शाळेमध्ये दरवर्षी 28 फेब्रुवारी या "विज्ञान दिना" च्या दिवशी विज्ञान व गणित जत्रा घेतली जाते. त्यामध्ये विद्यार्थी स्वतः विविध प्रकारचे प्रयोग व मॉडेल तयार करून सादर करतात. दरवर्षी विज्ञान व गणित जत्रा खूप चांगल्या प्रकारे सादर होते व त्याबद्दल पालकांनीही समाधान व्यक्त केलेले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी विविध प्रकारचे उपक्रम व विविध प्रकारच्या स्पर्धा तसेच विविध खेळ शाळेमध्ये नियमितपणे घेतले जातात. मुलांमध्ये आपल्या सांस्कृतिक तसेच राष्ट्रीय प्रेम ही भावना निर्माण व्हावी यासाठी विविध प्रकारच्या उपक्रमाचे आयोजन केले जाते. शाळेमध्ये नियमित किशोरवयीन मुलींचा मेळावा घेतला जातो व त्यामध्ये किशोरवयीन मुलींना शिक्षिकांमार्फत मार्गदर्शन केले जाते तसेच तज्ञाचे मार्गदर्शनही मेळाव्यामध्ये घेतले जाते. मुलींच्या सुरक्षेच्या संदर्भातील सर्व योजना शाळेमध्ये घेतल्या जातात. त्यांना सुरक्षिततेसाठी प्राथमिक धडे सुद्धा दिले जातात. मागच्या वर्षी व्हिजन स्प्रिंग या संस्थेमार्फत शाळेतील विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करून बऱ्याच विद्यार्थ्यांना मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. गावकऱ्यांच्या सहकार्याने शाळेत




विद्यार्थ्यांच्या विकासाच्या विविध प्रकारच्या योजना आखल्या जातात.आज शाळेतील विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या विकासामध्ये गावकऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे.

आता शाळेच्या गुणवत्तेचाही आलेख उंचावला त्याचबरोबर विद्यार्थी संख्या आलेख वाढला आहे. विद्यार्थी खूप छान प्रकारे शाळेत रमतात. शाळा सुटली तरी त्यांना आता घरी जावे वाटत नाही. विद्यार्थी स्वयंप्रेरणेने अभ्यास करतात. शाळेमध्ये विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धती घेतली जाते. विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या उपक्रमाच्या माध्यमातून खेळाच्या माध्यमातून शिकवले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन प्रक्रिया कंटाळवाणी वाटत नाही व विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत रमतात. विद्यार्थ्यांच्या गुणात्मक, ज्ञानात्मक, कौशल्यात्मक अशाप्रकारे सर्वांगीण विकासासाठी शाळा नेहमी तत्पर असते. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करतात व त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आहे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक विकासाचे तसेच त्यांच्यातील आत्मविश्वासाचे काही व्हिडिओ आमच्या शाळेच्या youtube व instagram वरही पाठवलेले आहेत. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी केलेली भाषणे, त्यांचे विविध उपक्रम घेतलेले आहेत. शाळेमध्ये विविध उपक्रम चालतात विद्यार्थी अभ्यासाबरोबरच वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा देतात त्यामध्ये बऱ्याच विद्यार्थ्यांना ट्रॉफी, गोल्ड मेडल्स मिळाले आहेत. शिष्यवृत्ती साठी काही विद्यार्थी पात्र झाले आहेत. अशा प्रकारे विद्यार्थ्यांचा गुणात्मक आलेख वाढला आहे. विद्यार्थी सायन्स लॅब मध्ये अनेक प्रकारचे प्रयोग करतात त्यात विद्यार्थ्यांनी स्वतः रोबोट तयार केलेला आहे.

मागच्या दोन वर्षांमध्ये शाळेला माझी शाळा सुंदर शाळा यामध्ये शाळेचा तालुक्यातून प्रथम क्रमांक आलेला आहे आणि माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमामध्ये ही गावकऱ्यांनी खूप मोठी देणगी व वस्तुरूपाने शाळेला जास्त सुशोभित करण्याचा प्रयत्न केला. आतापर्यंत शाळेमध्ये जवळपास निधीरूपाने आणि वस्तुरूपाने सहा लाखापर्यंतचा निधी जमा झालेला आहे .त्यामुळे मागील दोन वर्षात 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" यात शाळेचा दोन वेळा तालुक्यातून प्रथम क्रमांक आला आहे आणि तीन लाख रुपये बक्षीस मिळाले आहे. त्या बक्षिसाचा उपयोग शाळेतील विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक तसेच गुणात्मक सुविधासाठी केला आहे आज प्रत्येक विद्यार्थी व गावकरी यांना शाळा स्वतःची वाटते. त्यामुळे शाळेची व शाळेतील प्रत्येक गोष्टीची, वस्तूंची काळजी ते स्वतः घेतात व शाळेमध्ये रमतात.


शाळेच्या उपक्रमाचे काही व्हिडीओ खालील youtube व instagram लिंक वरती आहेत.

https://youtube.com/@schoolvideos2937?si=r7jUBu5DLQUtK0aS

https://www.instagram.com/zppsshelgaon?igsh=MTk0ZHJ2bjdiMnliZw==

अनेक उपक्रमांचे फोटो खालील गूगल drive लिंकवर क्लीक करावे.

https://drive.google.com/drive/folders/1879zZazSy5MJrkqXY_98yX-AlL87TYK0



https://drive.google.com/drive/folders/1xqRgIw9hRGdHFcCIk-kRl-xMmyM21B11

https://drive.google.com/drive/folders/1SZ-TNY4mwMB_-7NjADYIWgAedUb35Nrq

2018 मधील -पूर्वीची शाळा

शाळेचे सध्याचे रूप






जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा
सुस्वागतम
स्कूल चले हम


जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा
ता. देगलूर • शेळगाव • जि. नांदेड

----------**----------

मूल्याधारित, सामाजिक शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - नंदुरबार एजुकेशन सोसायटी संचलीत श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, परदेशीपुरा

शाळेचा पत्ता - परदेशीपुरा, दीनदयाळ उपाध्याय चौक, पोस्ट.ऑफिस जवळ, नंदुरबार

शाळेचा ईमेल आय डी - drjrit@gmail.com

शाळेची वेबसाईट - drjrit.org.in

प्राचार्य नाव - श्री पंकज विनायक पाठक

प्राचार्य मोबाईल क्रमांक - 9970275738

प्राचार्य ईमेल आय डी - rugved2825@yahoo.co.in

शाळा-महाविद्यालयीन गीत

विदयाधनम् सर्वधनम् प्रधानम्, एकच आशय मंत्र आहे,

ताप्ती तीरी तिमीर हारी, शुभ ज्ञानोदय आहे।

हे दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल उच्चमाध्यमिक विदयालय आहे।

कला-विज्ञानाची निर्मल गंगा, वाणिज्य-व्यावसायिकतेची यमुना।

विज्ञानसाधना, ज्ञानचेतना, तेथे तन्मय आहे।।

हे दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल उच्चमाध्यमिक विदयालय आहे।


आदर्श आमचे स्वामी विवेकानंद, अन् भगिनी निवेदीता।

जय महाराष्ट्र, जय भारत, हीच आमुची गाणी।

जनसेवेचा, ध्येय पूर्तीचा तेथे निश्चय आहे।

हे दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल उच्चमाध्यमिक विदयालय आहे।

ध्वज हाती छत्रपतींचा, बिरसा मुंडाची निष्ठा।



शाहु-फुल्यांचे। पाईक आम्ही, नव्या युगाचे द्रष्टा।

मानवतेचा, पावनतेचा तेथे परिचय आहे।

हे दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल उच्चमाध्यमिक विदयालय आहे।

कल्पवृक्ष हे ज्ञानफळांचे, ज्ञानपीठ हे राष्ट्रांचे।

दिव्यस्वप्न हे मुलांफुलांचे, विदयाभूषण देशाचे।

सौंदर्याचा, मांगल्याचा तेथे संचय आहे।

हे दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल उच्चमाध्यमिक विदयालय आहे।

विदयाधनम् सर्वधनम् प्रधानम्, एकच आशय मंत्र आहे,

ताप्ती तीरी तिमीर हारी, शुभ ज्ञानोदय आहे।

हे दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल उच्चमाध्यमिक विदयालय आहे।


रचयिता डॉ. उमेश शिंदे, नंदुरबार



विद्याधनं सर्वधनं प्रधानम।। या ब्रीद संस्कृत श्लोकातून नंदुरबार एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय अभ्यासक्रम नंदुरबार डॉ.काणे गर्ल्स हायस्कूल नंदुरबार डॉ. काणे विद्यामंदिर नंदुरबार स्वातंत्र्य पूर्वी सन 1943 डॉ.काणे, पाठक, यार्दी, खुंटे, मोडक परिवार कार्यकर्ते एकत्र येऊन संस्थेची मुहूर्तमेढ पायाभरणी करून शैक्षणिक कार्य न्यू इंग्लिश स्कूल नावाने प्रारंभ झाला. लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेले न्यू इंग्लिश स्कूल पुणे तसेच त्याचं छोटसं रोपट धुळे जिल्ह्यातील नंदुरबार तालुक्यात सन १९४३ या महानुभावांनी दुर्गम आदिवासी भागात देशाच्या नकाशावर आणले. देशाच्या नकाशावर नंदुरबार हा मागास व आदिवासी अधिक दुर्गम जिल्हा म्हणून ओळख असली तरी शैक्षणिक क्रांतीची ओळख देण्याचे काम केले आहे. मोठ्या शहराप्रमाणेच मराठी इंग्रजी माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्याचे काम येथील श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय नंदुरबार एज्युकेशन सोसायटी शैक्षणिक संस्थेने करून आज राज्यातच नव्हे भारत आणि देश विदेशात उच्च पदस्थ अधिकारी लोकप्रतिनिधी घडविण्याचे काम केले आहे त्यामुळे या संकुलाची शैक्षणिक गुणवत्ता व दर्जाची ख्याती साता समुद्रापार गेली आहे.

नंदुरबार एज्युकेशन सोसायटी या संस्थेची सन 1943 स्वातंत्र्यपूर्वकाळात स्थापना झाली. न्यू इंग्लिश स्कूल या नावाने ज्या काळात धुळे जिल्ह्यात नंदुरबार तालुक्यामध्ये आदिवासी गरीब यांच्या शैक्षणिक बदलाची कोणालाही फारशी कल्पना नव्हती अशा काळात संस्थेने सातपुड्याच्या दुर्गम भागात ज्ञानदानाचे कार्याने सुरुवात केली.

75 वर्षांपूर्वी लावलेले रोपटे झाले वटवृक्ष संस्थेने सन 1943 तत्कालीन धुळे जिल्ह्याच्या नंदुरबार सारख्या अतिदुर्गम भागात श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना अतिशय प्रतिकूल परिस्थितीत सर्व संकटावर मात करीत संस्थेच्या मराठी माध्यमाच्या शाळेने यशस्वी वाटचाल केली. मुलामुलींसाठी ही एकमेव शाळा शहरी भागात नंदुरबार तालुक्यात त्या काळात होती.





उपलब्ध सुविधा - विज्ञान प्रयोगशाळा, स्वतंत्र रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित संगणक या विषयाच्या प्रयोगशाळा आहेत. माजी विद्यार्थ्यांनी डिजिटल लॅब, स्वतंत्र कक्ष निर्माण करून दिले आहेत तसेच सुंदर ग्रंथालय वाचन कक्ष तयार करून दिला आहे, शुद्ध पेयजल सुविधा उपलब्ध आहे, ग्रंथालयालगत समुपदेशन कक्ष स्थापन केलेला आहे. स्वतंत्र आयसीटीलॅब उपलब्ध आहे, विद्यार्थी विद्यार्थिनी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरिता वॉशरूम व शौचालय उपलब्ध आहे. या संकुलात एकूण 35 वर्गखोल्या असून वर्गात पंखे , लाइट्स, सुरक्षित स्विच, उजेड येईल अशा खिडक्या ,बंद होतील अशा खिडक्या उपलब्ध आहेत, स्वतंत्र रंगमंच आहे सर्व वर्ग खोल्यांपर्यंत आवाज पोहोचेल अशी दोन्ही साऊंड सर्व्हिस व्यवस्था, माईक व्यवस्था परिपूर्ण आहे. या संकुलात शाळेचे विद्यार्थी व ज्युनिअर कॉलेजचे मुला मुलींसाठी खेळण्यासाठी स्वतंत्र भव्य खुले मैदान आहे.





काळानुरुप बदल....

नंदुरबार एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयचे नूतनीकरण म्हणजे नवीन वास्तूचे नंदुरबार शहरात आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले आहे. नंदुरबार एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयाचे ध्येय - सर्व क्षेत्रांमध्ये जागतिकीकरणाने वेग घेतला आहे त्यामुळे समाजात मोठा बदल घडवून येत असताना राष्ट्रीय मूल्यांचा विसर पडत चालला आहे हे जाणवते, म्हणून शाळेने राष्ट्रीय मूल्यांच्या जोपासण्यावर भर दिलेला आहे. विद्यार्थ्यांचा नीटनेटकेपणा, वक्तशीरपणा यावर लक्ष केंद्रित करीत असतानाच वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने विविध उपक्रमाच्या माध्यमातून वेगवेगळ्या पैलूंचे दृष्टिकोन जोपासले जातात. ऐतिहासिक काळापासून भारतीय लोकांमध्ये श्रम प्रतिष्ठेला महत्त्व होते आजही आहे. विद्यार्थ्यांना अनेक कलागुणांच्या माध्यमातून सुप्त गुणांना वाव देण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धा , खेळ प्रकार या माध्यमातून अनुभव प्राप्त करून देण्याचा शाळेचा प्रयत्न असतो आणि त्यात आमचे संस्थाचालक आमच्या शिक्षकांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप विद्यार्थ्यांना व शिक्षक बंधू-भगिनींना देत असतात त्यातून त्यांना प्रेरणा मिळते व ते पुढे प्रगती करतात. समाज उपयोगी सहभाग आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणी द्वारे शाळेला व ज्युनिअर कॉलेजला जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत नेत विविध सन्मान प्राप्त झाले आहेत. विद्याधन सर्व धर्म या संस्कृत श्लोक यास प्रेरणा मानून आमचे संस्थाचालक शिक्षक बंधू-भगिनी शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी पालक रुंद शैक्षणिक यशस्वी प्राप्त करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असतो.

शाळेची व कनिष्ठ महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक बांधिलकी व सातत्यपूर्ण कार्यामुळे विविध संस्थांकडून सन्मानपत्रे, स्मृतिचिन्हे आणि शिष्यवृत्तीमध्ये शाळेचा व ज्युनिअर कॉलेजचा अग्रक्रम राहिला आहे. आमच्या हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक बंधू-भगिनी शिक्षकेतर कर्मचारी प्राचार्य उपप्राचार्य पर्यवेक्षक हे शासकीय उपक्रमामध्ये नेहमी सहभाग घेत असतात शाबासकीची थाप या माध्यमातून मिळत असते. आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार अण्णाभाऊ साठे पुरस्कार संस्थेला प्राप्त झालेला आहे.


प्रवेशद्वारापासून अनेक वृक्षांची लागवड व जोपासना करण्यात आलेली आहे शाळेत सेंद्रिय माध्यमाने परसबाग साकारण्यात आले आहे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी



विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी मिळून कडुलिंब, गुलमोहर, उंबर, पिंपळ यांचे वृक्षारोपण केले आणि त्यामुळे शाळेचे सौदर्य वाढले आहे. **नाविन्यपूर्ण उपक्रम व समुपदेशन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अनुसार आनंददायी शिक्षण** समुपदेशन सत्र वाचन संस्कृती स्पर्धा परीक्षा नवोदय परीक्षा शिष्यवृत्ती परीक्षा स्काऊट एनसीसी, एनएसएस, वेध उपक्रम, भाषण, साहित्य संमेलन, वेगवेगळ्या रॅली, वेगवेगळे दिनविशेष या निमित्ताने विविध उपक्रमातून आमचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांचा आत्मविश्वास या कार्यक्रमातून वाढत असतो व त्यातून निर्णय क्षमता आणि कौशल्य विकास त्यांचा विकसित होत असतो. आमच्या संकुलात आनंददायी शनिवार, जीवन कौशल्याचा विकाससाठी प्रत्येक शनिवारी पाचवी ते दहावीच्या विद्यार्थी यांच्यासाठी दप्तर मुक्त दिवस राबवला जातो .यात मासपेटी, योग, पर्यावरण संवर्धन संरक्षणाचे धडे, आदिवासी संस्कृती, शहिदांना श्रद्धांजली, वाचन संस्कृती, क्षेत्रभेटी, विविध मान्यवरांचे व्याख्यान, बौद्धिक दृष्टिकोनाने विकास होईल असे मान्यवरांचे भाषण, अनेक कार्यशाळांचा समावेश आमच्या शाळेत, कनिष्ठ महाविद्यालयात होत असतात. त्याचबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा याकरिता दर शनीवारी एक विज्ञानावर प्रश्न विचारून त्याविषयीची माहिती विज्ञान शिक्षक त्या विद्यार्थ्यांना देत असतात.

अप्रगत विद्यार्थ्यांसाठी वाचन लेखन व प्रकल्प एफ एल एन - शाळा सुरू होण्यापूर्वी व शाळा सुटण्यापूर्वी 25 मिनिटाचे विशेष सत्र घेऊन वाचन येणाऱ्या विद्यार्थी गटास आणि लेखन कौशल्य विकसित नसलेल्या गटास आमचे शिक्षक बंधू भगिनी ग्रंथालयामध्ये त्यांना एकत्रित करून त्यांच्याकडून वाचन सुधार प्रकल्प व लेखन सुधार प्रकल्प राबवित आहेत. सराव उपक्रमाद्वारे वाचन आणि लेखन यामध्ये गुणवत्ता विद्यार्थ्यांची वाढत आहे. विविध उपक्रमाद्वारे शाळेत अनुपस्थितीचे प्रमाण कमी झाले आहे.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी उपक्रम गुरु पौर्णिमा, 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, एक मे अनेक मान्यवरांचे राष्ट्रीय दिनविशेष या अनुषंगाने देशभक्तीपर गीत, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, सैनिकांना राखी, एक पेड मा के नाम, शहिदांना अभिवादन, ऑपरेशन सिंधू ,सर्वधर्मसमभाव, या उपक्रमातून राष्ट्र प्रेमाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते त्याकरिता संस्था शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पालक सहभागी होतात.





पिंक रूम विद्यार्थिनींसाठी आरोग्यदायी सुविधा - ज्युनिअर कॉलेजच्या मुलींसाठी सॅनिटरी पॅड वेडिंग मशीन, चेंजिंग रूम विश्रांतीची जागा आणि माहिती तक्त्यासह शाळेत व ज्युनिअर कॉलेजला विद्यार्थिनींसाठी पिंक रूम निर्माण केली आहे.



शाळा व ज्युनिअर कॉलेजच्या मुला मुलींना सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्टॉल्स खेळ प्रदर्शन मुलाखती खाद्यपदार्थ हस्तकला

प्रयोग यांचा समावेश असलेला प्रयोग दरवर्षी गणेशोत्सव व नवरात्र निमित्ताने संस्थेच्या माध्यमातून हा उपक्रम 75 वर्षापासून शाळेत व कनिष्ठ महाविद्यालयात सुरु आहे ज्यात चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा ,दांडिया स्पर्धा, हस्तकला स्पर्धा ,फ्लावर पॉट सजवणे स्पर्धा, विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येते व पालकांसाठी प्रदर्शनी खुली ठेवून गणेशजींच्या आरतीसाठी व महाप्रसादासाठी पान सुपारी चा कार्यक्रम आयोजित केलेला असतो.

1.परिवार कार्यकर्ते एकत्र येऊन ही संस्था ही संस्था मुहूर्तमेढ पायाभरणी करून शैक्षणिक कार्य न्यू इंग्लिश स्कूल नावाने प्रारंभ झाला. लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेले न्यू इंग्लिश स्कूल पुणे तसेच त्याचं छोटसं रोपट धुळे जिल्ह्यातील नंदुरबार तालुक्यात १९४३ या महानुभावांनी दुर्गम आदिवासी भागात देशाच्या नकाशावर आणले. देशाच्या नकाशावर नंदुरबार हा मागास व आदिवासी अधिक दुर्गम जिल्हा म्हणून ओळख असली तरी शैक्षणिक क्रांतीची ओळख पुसण्याचे काम येथील शैक्षणिक संस्थेने केले आहे .मोठ्या शहराप्रमाणेच मराठी, इंग्रजी माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्याचे काम येथील श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय नंदुरबार एज्युकेशन सोसायटी शैक्षणिक संस्थेने करून आज राज्यातच नव्हे भारत आणि देश विदेशात उच्च पदस्थ अधिकारी लोकप्रतिनिधी घडविण्याचे काम केले आहे त्यामुळे या संकुलाची शैक्षणिक गुणवत्ता व दर्जाची ख्याती सात समुद्रा पार गेली आहे.

2. 75 वर्षांपूर्वी लावलेले रोपटे झाले वटवृक्ष - संस्थेने सन 1943 तत्कालीन धुळे जिल्ह्याच्या नंदुरबार सारख्या अतिदुर्गम भागात श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय स्कूलची स्थापना केली .अतिशय प्रतिकूल परिस्थितीत सर्व संकटावर मात करीत संस्थेच्या मराठी माध्यमाच्या शाळेने यशस्वी वाटचाल केली मुला मुलींसाठी ही एकमेव शाळा शहरी भागात नंदुरबार तालुक्यात त्या काळात होती 75 वर्षांपूर्वी लावलेल्या छोट्या वृक्षाचे एका भव्य वटवृक्षात रूपांतर झाले जे नंदुरबार जिल्ह्यात आज सबंध खान्देशमध्ये प्रसिद्ध असे श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय येथे व्यवसाय अभ्यासक्रम प्रचलित आहेत आणि प्रगतीची रेषा ही उंचावली जात आहे.

3.उपलब्ध सुविधा - सर्व विज्ञान प्रयोगशाळा स्वतंत्र रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित संगणक या विषयाच्या प्रयोगशाळा आहेत .माजी विद्यार्थ्यांनी डिजिटल लॅब स्वतंत्र कक्ष निर्माण करून दिले आहेत . विद्यार्थ्यांनी सुंदर ग्रंथालय वाचन कक्ष तयार करून दिला आहे, शुद्ध पेयजल सुविधा उपलब्ध आहे. ग्रंथालयालगत समुपदेशन कक्ष




स्थापन केलेला आहे स्वतंत्र आयसीटी लॅब उपलब्ध आहे विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरिता वॉशरूम व शौचालय उपलब्ध आहे या संकुलात एकूण 35 वर्गखोल्या असून वर्गात फॅन, लाइट्स, सुरक्षित स्विच, उजेड येईल अशा खिडक्या उपलब्ध आहेत. स्वतंत्र रंगमंच आहे, सर्व वर्ग खोल्यांपर्यंत आवाज पोहोचेल अशी दोन्ही साऊंड सर्व्हिस व्यवस्था, माईक व्यवस्था परिपूर्ण आहे या संकुलात मुला मुलींसाठी शाळेचे विद्यार्थी व ज्युनिअर कॉलेजचे मुला मुलींसाठी खेळण्यासाठी स्वतंत्र भव्य खुले मैदान आहे.

4. काळानुरुप बदल....नंदुरबार एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयाचे नूतनीकरण नवीन वास्तूचे नंदुरबार शहराचे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले आहे शहराच्या मध्यवर्ती भागात पोस्ट ऑफिस, रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड शालेय पुस्तक विक्री केंद्र असे जवळ असणारे स्थान..

5. नंदुरबार एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयाचे ध्येय - विद्याधन सर्व धर्म सर्व क्षेत्रांमध्ये जागतिकीकरणाने वेग घेतला आहे त्यामुळे समाजात मोठा बदल घडवून येत असताना राष्ट्रीय मूल्यांचा विसर पडत चालला आहे हे जाणवते म्हणून शाळेने राष्ट्रीय मूल्यांच्या जोपासण्यावर भर दिलेला आहे. विद्यार्थ्यांचा नीटनेटकेपणा, वक्तशीरपणा यावर लक्ष केंद्रित करीत असतानाच वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने विविध उपक्रमाच्या माध्यमातून वेगवेगळ्या पैलूंचे दृष्टिकोन जोपासले जातात. ऐतिहासिक काळापासून भारतीय लोकांमध्ये श्रम प्रतिष्ठेला महत्त्व होते आजही आहे मात्र वाढलेल्या सुख सोयीमुळे श्रम करण्याकडे कल कमी होतोय. विद्यार्थ्यांना अनेक कलागुणांच्या माध्यमाने सुप्त गुणांना वाव देण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धा, खेळ प्रकार या माध्यमातून अनुभव प्राप्त करून देण्याचा शाळेचा प्रयत्न असतो आणि त्यात आमचे संस्थाचालक आमच्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप, देत असतात त्यातून त्यांना प्रेरणा मिळते व ते पुढे प्रगती करतात असं दिसून येत आहे.

6.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून किंवा त्यापूर्वीच्या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून वेगवेगळ्या नवकल्पना, गुणवत्ता वाढीसाठीचे प्रकल्प अभ्यास सुरु असतात. शाळेने शैक्षणिक वर्ष 1943 पासून विविध क्षेत्रात उत्तुंग शिखर सर करत नंदुरबार जिल्ह्यासह संपूर्ण नाशिक विभागात खान्देशमध्ये आपला ठसा उमटवला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, झंझावाती क्रीडा कामगिरी, समाज उपयोगी सहभाग आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणी द्वारे शाळेला व ज्युनिअर कॉलेजला जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत नेत




विविध सन्मान प्राप्त झाले आहेत. विद्याधन सर्व धर्म या संस्कृत श्लोकास प्रेरणा मानून आमचे संस्थाचालक ,शिक्षक बंधू-भगिनी शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी, पालक वृंद शैक्षणिक यशस्वीता प्राप्त करण्यासाठी वाटचाल करत असतो, प्रयत्न करत असतो.

7.सामाजिक संस्थांकडून सततचा गौरव - शाळेची व कनिष्ठ महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक बांधिलकी व सातत्यपूर्ण कार्यामुळे विविध संस्थांकडून सन्मानपत्रे, स्मृतिचिन्हे प्राप्त झाली आहेत. शिष्यवृत्तीमध्ये शाळेचा व ज्युनिअर कॉलेजचा अग्रक्रम राहिला आहे . आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार, गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार प्राप्त झाले आहेत,संस्थेला अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

8. प्रवेशद्वारापासून लिंब वृक्षाची लागवड - वृक्षारोपण करून पर्यावरणाची जोपासना करण्यात आलेली आहे. शाळेत सेंद्रिय माध्यमाने परसबाग साकारण्यात आली आहे. शाळेत व ज्युनिअर कॉलेजला येणारे मुलं मुली यांना फावल्या वेळात शाळा कॉलेज भरण्यापूर्वी जी काय विश्रांती किंवा थांबावं लागतं त्याकरता लिंबाच्या झाडाच्या सावलीखाली बसून ते सावलीचा छानपैकी आस्वाद घेऊ शकतात कारण की शहरा लगत असणारी गावे येथून येजा करणारे मुलं-मुली यांना कुठेतरी घटकाभर थांबण्यासाठी सावली मिळावी यासाठी वृक्षारोपण केलेली लींबाची झाडे, गुलमोहर, उंबर, पिंपळ आणि 75 वर्षाच्या या शाळेला शितलता देत आहेत.

9. नाविन्यपूर्ण उपक्रम व समुपदेशन - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अनुसार आनंददायी शिक्षण, समुपदेशन सत्र ,वाचन संस्कृती,स्पर्धा परीक्षा, नवोदय परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, स्काऊट, एनसीसी, एनएसएस, उपक्रम, भाषण, साहित्य संमेलन, वेगवेगळ्या रॅली, वेगवेगळे दिनविशेष या निमित्ताने विविध उपक्रम घेतले जातात ,यातून आमचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांचा आत्मविश्वास या कार्यक्रमातून वाढत असतो व त्यातून निर्णय क्षमता आणि कौशल्य विकास यांचा विकास होत असतो.

10. आनंददायी शनिवार- जीवन कौशल्याचा विकास - प्रत्येक शनिवारी पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दप्तर मुक्त दिवस राबवला जातो यात योग पर्यावरण संवर्धन संरक्षण चे धडे ,आदिवासी संस्कृती, शहिदांना श्रद्धांजली, वाचन संस्कृती, क्षेत्रभेटी, विविध मान्यवरांचे व्याख्यान ,बौद्धिक दृष्टिकोनाने विकास होईल असे मान्यवरांचे भाषण ,अनेक कार्यशाळांचा समावेश आमच्या शाळेत कनिष्ठ महाविद्यालयात होत असतात त्याचबरोबर



वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा याकरिता दर शनिवारी एक विज्ञानाचा प्रश्न विचारून त्याविषयीची माहिती विज्ञान शिक्षक त्या विद्यार्थ्यांना देत असतात.


11.अप्रगत विद्यार्थ्यांसाठी वाचन लेखन व प्रकल्प - शाळा सुरू होण्यापूर्वी व शाळा सुटण्यापूर्वी 25 मिनिटाचे विशेष सत्र घेऊन वाचन येणाऱ्या विद्यार्थी गटास आणि लेखन कौशल्य विकसित नसलेल्या गटास आमचे शिक्षक बंधू भगिनी ग्रंथालयामध्ये त्यांना एकत्रित करून त्यांच्याकडून वाचन सुधार प्रकल्प व लेखन सुधार प्रकल्प राबवित आहेत. सराव उपक्रमाद्वारे वाचन आणि लेखन यामध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढत आहे, विविध उपक्रमाद्वारे शाळेत अनुपस्थितीचे प्रमाण कमी झाले आहे.

12.राष्ट्रीय एकात्मतेसाठी उपक्रम - गुरु पौर्णिमा, 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, एक मे अशा दिवशी अनेक मान्यवरांचे राष्ट्रीय दिनविशेष या अनुषंगाने देशभक्तीपर गीत, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निकांना राखी, एक पेड मा के नाम, शहिदांना अभिवादन, ऑपरेशन सिंधू, सर्वधर्मसमभाव या उपक्रमातून राष्ट्र प्रेमाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते त्याकरिता संस्था शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, पालक सहभागी होतात.

13.पिंक रूम - विद्यार्थिनींसाठी आरोग्यदायी सुविधा - ज्युनिअर कॉलेजच्या मुलींसाठी सॅनिटरी पॅड वेडिंग मशीन, चेंजिंग रूम विश्रांतीची जागा आणि माहिती तक्त्यासह शाळेत व ज्युनिअर कॉलेजला विद्यार्थिनींसाठी पिंक रूम निर्माण केली आहे.

14.शाळा व ज्युनिअर कॉलेजच्या मुला मुलींसाठी सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्टॉल्स. खेळ .प्रदर्शन. मुलाखती. खाद्यपदार्थ. हस्तकला प्रयोग यांचा समावेश असलेला प्रयोग दरवर्षी गणेशोत्सव व नवरात्र निमित्ताने संस्थेच्या माध्यमातून हा उपक्रम 75 वर्षापासून शाळेत व कनिष्ठ महाविद्यालयात सुरु आहे.चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, दांडिया स्पर्धा, हस्तकला स्पर्धा ,फ्लावर पॉट सजवणे स्पर्धा व पालकांसाठी प्रदर्शनी खुली ठेवून गणेशजींच्या आरतीसाठी व महाप्रसादासाठी पान सुपारी चा कार्यक्रम आयोजित केलेला असतो.

15.ही संस्था आता इतर शैक्षणिक संस्थांसाठी गुणवत्ता व नवकल्पनांना व सृजनशील व आदर्श ठरत आहे जिल्ह्यातील गुणवत्तेचा नवा मानदंड येथेच उभा राहिला आहे विद्याधनम सर्वधर्म प्रदानम या संस्कृत श्लोकाप्रमाणे विद्या रुपी अस्त्र , शस्त्र दान करून संस्था शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक या ज्ञानरूपीरथाला पुढे नेत आहेत.



1.भविष्यातील संकल्पना आणि दृष्टी

स्मार्ट क्लासरूम्स: आधुनिक तंत्रज्ञानासह शिक्षण - डिजिटल बोर्ड, प्रोजेक्टर, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म

ऑनलाइन लर्निंग मॉड्यूल: ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी सहजगत्या ज्ञानाची उपलब्धता

AI आणि कोडिंग कोर्सेस: आधुनिक कौशल्यांवर लक्ष केंद्रित करणारी पुढील पिढीची तयारी

2.समाजभान आणि जबाबदारी

सामाजिक उपक्रम: स्वच्छता अभियान, रक्तदान शिबीर, महिला सक्षमीकरण सत्र

समावेशकता: विशेष गरज असलेल्या विद्यार्थ्यांसाठी समायोजित सुविधा आणि अभ्यास पद्धती

लोकसहभाग: पालक-शिक्षक संवाद मंच, ग्रामस्थांचा सहभाग

3.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

इंटरनल मेंटरशिप प्रोग्रॅम: ज्येष्ठ शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान-विनिमय

स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन: UPSC, MPSC, NEET, JEE इत्यादींमध्ये विद्यार्थ्यांना योग्य दिशा

प्रेरणादायी नेतृत्व घडवणे: शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ, युवा संसद


4.सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातील योगदान

वार्षिक संमेलन, नाट्य स्पर्धा, गीत गायन, संस्कृत श्लोक पठण

स्थानिक कलांचा जप: आदिवासी लोककला, चित्रकला कार्यशाळा

5.नवकल्पना + मूल्याधिष्ठित शिक्षण = भविष्याची उभारणी

ही संस्था शिक्षणाच्या माध्यमातून केवळ प्रमाणपत्र नव्हे, तर मूल्यांचं आणि व्यक्तिमत्त्वाचं घडवणूक करत आहे. आपली शिक्षणसंस्था ही एक संस्कारपीठ आहे — जिथे ज्ञान, श्रम, संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचा संगम आहे.



नंदुरबार एज्युकेशन सोसायटी: एक प्रेरणादायक शैक्षणिक प्रवास

ब्रीद: विद्याधनं सर्वधनं प्रधानम — अर्थात, "विद्येचा धन सर्व धनांमध्ये श्रेष्ठ आहे।"

1 स्थापना व इतिहास

1943 साली डॉ. काणे, पाठक, खुंटे, मोडक या परिवारांनी एकत्र येऊन न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलला प्रेरणा मानून हे रोपटे नंदुरबारमध्ये रुजवले.

2. दुर्गम भागात शिक्षणाचा प्रकाश

नंदुरबार हा आदिवासी, मागास जिल्हा म्हणून ओळखला जात असला तरी शिक्षणसंस्थेच्या कार्यामुळे तो देशाच्या नकाशावर उजळून आला. येथे मराठी व इंग्रजी माध्यमातून दर्जेदार शिक्षण देऊन अनेक अधिकारी आणि लोकप्रतिनिधी तयार करण्यात आले.

3. संकुलातील आधुनिक सुविधा

नंदुरबार एज्युकेशन सोसायटी संचलित शैक्षणिक संकुल

ब्रीद: विद्याधनं सर्वधनं प्रधानम।

ऐतिहासिक पृष्ठभूमी

वर्ष 1943 मध्ये डॉ. काणे, पाठक, कुंटे, मोडक या कुटुंबांनी एकत्र येऊन “न्यू इंग्लिश स्कूल” ची स्थापना केली.

लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेल्या पुणेच्या शाळेची प्रेरणा घेत नंदुरबार सारख्या दुर्गम आदिवासी भागात ज्ञानदानाची क्रांती सुरू झाली.


सुरुवातीचं रोपटं → भव्य वटवृक्ष

सुरुवातीला एकच शाळा, आज तीन संस्थाः

श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

डॉ. काणे गर्ल्स हायस्कूल

डॉ. काणे विद्यामंदिर



दर्जेदार मराठी व इंग्रजी शिक्षणातून समाजात उच्चपदस्थ अधिकारी, लोकप्रतिनिधी घडवले गेले.

सुविधा आणि संकुलाचा विकास

विज्ञान, गणित, संगणक प्रयोगशाळा

डिजिटल लॅब, ग्रंथालय, वाचन आणि समुपदेशन कक्ष

35 वर्गखोल्या, माईक सिस्टीम, रंगमंच

स्वतंत्र खेळाचे मैदान

आयसीटी लॅब, वॉशरूम्स, सॅनिटरी सुविधा

पिंक रूम — कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी आरोग्यदायी व्यवस्था

नवोन्मेष आणि शिक्षणदृष्टी

FLN सत्र, वाचन व लेखन सुधारना

वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी प्रश्नमंजुषा

आनंददायी शनिवार — योग, पर्यावरण, क्षेत्रभेटी, व्याख्यान

विविध स्पर्धा — चित्रकला, रांगोळी, हस्तकला, प्रदर्शने


श्रम प्रतिष्ठा आणि संस्कृती जोपासणारे उपक्रम

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार योगदान

शाळा सिद्धी व मूल्यांकनाचे सातत्य

उपक्रम: एनसीसी, NSS, स्काऊट, वेद सत्र, साहित्य संमेलन

नवकल्पना आणि गुणवत्ता वाढीसाठीच्या प्रकल्पांचे अंमलबजावणी



पर्यावरण संरक्षण

सेंद्रिय परसबाग, वृक्षारोपण (निंब, गुलमोहर, उंबर, पिंपळ)

मुलांसाठी सावली व विश्रांतीसाठी परिसर सज्ज

सामाजिक सहभाग आणि सन्मान

विविध शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांकडून पुरस्कार

आदर्श शिक्षक, क्रांतीजोती सावित्रीमाई गुणगौरव राज्य शिक्षक पुरस्कार, आदिवासी लोकसेवक पुरस्कार , अण्णाभाऊ साठे, राज्य गुणगौरव, क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार प्राप्त शाळा कॉलेज मधील शिक्षक बांधव.

शासकीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग

राष्ट्रीय एकात्मता

उपक्रम: गुरु पौर्णिमा, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन


सैनिकांना राखी, ऑपरेशन सिंधू, सर्वधर्मसमभाव

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना रुजवणारे कार्यक्रम

निष्कर्ष

“विद्याधनं सर्वधनं प्रधानम” या ब्रीदवाक्याला न्याय देत, नंदुरबार एज्युकेशन सोसायटी केवळ एक शिक्षणसंस्था नसून सामाजिक परिवर्तनाचे आणि मूल्याधारित शिक्षणाचे जीवंत उदाहरण ठरले आहे। जिल्ह्याच्या, राज्याच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी एक दीपस्तंभ।

----------**----------



The Life Skills Education through Drama-the Change between Out of School Children

School Name - Netaji Subhashchandra Bose Avasiya Vidyalaya Toranmal
School Address - Toranmal, TQ-Dhadgaon Dist.Nandurbar
Head Master Name - Shri.Dasharath Gundya More
Head Master Mobile Number - 9767308286
Head Master E Mail ID - ravishine444@gmail.com

TOTAL NO.OF STUNDENT - 1649

Toranmal area - A very remote and tribal dominated area of Nandurbar district. Many of the schools and kindergartens in this area did not have basic facilities. Due to this, many children were deprived of education. But through the joint efforts of MPSP (Maharashtra Primary Education Council) and Zilla Parishad administration, a residential group school was established for out-of-school children in 2015-16.Migration of the admission process.





1. Survey and research campaign-

A survey of thousands of children in 29 villages. Teachers and volunteers went door to door to gather information about the children. Many out-of-school children were identified.

2. Persuading parents-

शाळेचे अंतरंग देखील आनंददायी व्हावे यासाठी बोलक्या भिंती केल्या. परंतु ते कायमस्वरूपी Oil Paint न करता रंगीत चित्रं, चाट्र्स, शब्दफलक, आकृत्या हे प्रत्येक आठवड्यात मी बदलवत राहते. ते पाहून विद्यार्थ्यांचा शिकण्याचा उत्साह वाढला आहे आणि नेहमी नजरेसमोर असल्यामुळे शिकलेली माहिती त्यांच्या सहज लक्षात राहू लागली.

सकाळ

‘टीचर ऑफ द वीक’ उपक्रम शिक्षकांसाठी ठरतोय प्रेरणादायी

तळोद्यात अभिनव संकल्पना : उत्कृष्ट कार्याची दर आठवड्याला दखल

■ सकाळ वृत्तसेवा

नंदुरबार, ता. २८ : टीचर ऑफ द वीक’ हा तळोदा तालुक्यात राबवण्यात येणारा एक अभिनव उपक्रम असून, प्रत्येक आठवड्याला विशेष उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी करणाऱ्या एका शिक्षकाचा सन्मान करण्यात येतो. हा उपक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भानुदास रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवला जात असून, यामधून शिक्षकांना त्यांच्या कार्याची दखल घेतल्याचे समाधान मिळते, तर इतर शिक्षकांसाठीही एक प्रेरणा ठरू लागली आहे.

प्रत्येक आठवड्याला तालुक्यातील एका शिक्षकाची निवड टीचर ऑफ द वीक’ म्हणून केली जाते. निवड प्रक्रियेत विद्यार्थी गुणवत्ता वाढ, नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धती, उपस्थितीसाठी विशेष प्रयत्न, शालेप्रति समर्पण, समाज व पालकांशी सहकार्य अशा विविध निकषांचा समावेश असतो. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर, शिक्षण विस्तार अधिकारी वसंत जाधव व ज्ञानदेव केदार हे प्रत्यक्ष शाळांना भेटी देऊन निरीक्षण करतात आणि संबंधित शिक्षकाची निवड करत आहे.



नंदुरबार : शैक्षणिक कार्याची दखल घेत ‘टीचर ऑफ द वीक’ उपक्रमात शिक्षिकेचा गौरव करताना मान्यवर.

पुरस्काराने शिक्षकांमध्ये सकारात्मक स्पर्धा

■ या पुरस्कारामुळे निवड झालेल्या शिक्षकांना त्यांच्या कार्याची प्रामाणिक दखल घेतली गेल्याचे समाधान मिळते आणि कार्यात सातत्यता व आत्मविश्वास वाढतो. इतर शिक्षकांसाठी हे एक प्रेरणास्थान ठरते. तसेच शिक्षकांमध्ये सकारात्मक स्पर्धा, समर्पणाची भावना आणि कल्पकता वाढीस लागते. परिणामी, शालेय वातावरण अधिक सकारात्मक व आनंददायी बनते.

प्रेरणादायी उदाहरणे

■ उमरी जि.प. शाळा : शिक्षकांनी स्वखर्चाने शाळा रंगरंगोटी करून परिसर अधिक सुंदर व आकर्षक बनवला

■ दलेलपूर जि.प. शाळा : कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ केली

■ राणापूर जि.प. शाळा : कल्पक पद्धतीच्या साहाय्याने गुणवत्ता, उपस्थिती आणि शालेय वातावरणात सुधारणा

■ दसवड जि.प. शाळा : ग्रामपंचायतीच्या सहभागाने शाळेचा कायापालट, मुख्याध्यापक उमेश पाडवी आणि ग्रामपंचायत सदस्यांचे विशेष योगदान

■ कढेल जि.प. शाळा : ‘शाळेनंतरची शाळा’ उपक्रमांतर्गत विद्यार्थी स्वतः स्वयं-अध्ययन करतात.

Dhule, Nandurbar-Today

❖ **समारोप** :- मागील दोन वर्षे आठ महिन्याच्या कालावधीत शाळेत विविध गुणवत्तापूर्ण, नवे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून "एक आदर्श शाळा शिक्षक" Teacher of The Week होण्याचा मान मिळाला. माझ्या कार्याला, माझे सर्व वरिष्ठ अधिकारी, सहकारी तसेच आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे शिक्षणाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी ,आमची मातृसंस्था असणारे डायट परिवार जे आम्हाला हे सर्व उपक्रम राबविण्यास समृद्ध करते तसेच माझे सहकारी मित्र मैत्रिणी व आमच्या गावचे सरपंच, सर्व सदस्य व पालक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष या सर्वांची मला मोलाची साथ मिळाली. धन्यवाद!



----------**----------

उपक्रमातून शाळेचा परिसर आनंददायी करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - नूतन विद्याप्रसारक मंडळ संचलित वल्लभ विद्यामंदिर पाडळदा

शाळेचा पत्ता - पाडळदा,ता.शहादा, जि.नंदुरबार

शाळेचा ईमेल आयडी - vvmpadalda78@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री अंबालाल बन्सी चौधरी

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ७६२००४१६३३

मुख्याध्यापक ईमेल आयडी - ambalalc560@gmail.com



प्रस्तावना -

शिक्षणासाठी परिसर महत्वाचा आहे. विद्यार्थी जेथे ज्ञान ग्रहण करतो तो परिसर म्हणजे शाळा ! शाळा व शाळा परिसरातूनच विद्यार्थी शिकतो आणि घडतो.म्हणून अध्ययनपुरक प्रसन्न परिसर निर्माण करणे महत्वाचे आहे.अध्ययन अध्यापन प्रक्रिया कळत नकळत प्रत्यक्ष तथा अप्रत्यक्षपणे शाळा परिसरातल्या वातावरणातून घडत असते. तेव्हा शाळा आणि शाळा परिसर आनंददायी शैक्षणिक दृष्ट्या वातावरण निर्मिती करणे हे

आमच्यापुढे एक आव्हानच होते हे आव्हान आम्ही स्विकारले.विद्यार्थी व शिक्षकांसाठी आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्मिती कशी करता येईल या दिशेने उद्दिष्ट पुर्ततेसाठी विविध उपक्रम हाती घेतले आणि आज या सर्व उपक्रमातून आमच्या वल्लभ विद्यामंदिर शाळेचा परिसर प्रसन्न, ऊत्साही, ज्ञानवर्धक, सुसज्ज, निसर्गरम्य आकर्षक असा शैक्षणिक दृष्ट्या अनुकूल झाला.

आमच्या शाळेचा इतिहास व नावलौकिक -

पाडळदा गावाचा शहादा तालुक्यात तसचे नंदुरबार जिल्हयात नावलौकिक आहे. कारण गावातून सर्वात जास्त युवा नागरिक विदेशात चांगल्या हुद्दयावर आहेत. उच्च विद्याविभूषित असे हे गाव आहे. अर्थात शहादा तालुक्यात परिसरात स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची ज्ञानगंगा सर्वप्रथम पाडळदा गावात आली.शाळेची इमारत गावकऱ्यांच्या श्रमदानातून आकारास आली. शाळेचे नाव वल्लभ विद्यामंदिर पाडळदा, स्थापना १९५७ ची ! भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल होते. म्हणून शाळेचे वल्लभ विद्यामंदिर असे नामकरण करण्यात आले.या शाळेतून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी पुढे उच्च विद्याविभूषित झाले आणि प्रशासकिय अधिकारी,डॉक्टर, अभियंता, शिक्षक, मुख्याध्यापक, उद्योगपती , नेते ,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार अशा विविध क्षेत्रात दिसत आहेत,इथून ज्ञानाची व संस्काराची शिदोरी घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवला आहे.

नैसर्गिक आपत्तीचा सामना -

वल्लभ विद्यामंदिर पाडळदा शाळेला सुमारे ६९ वर्षे झाली, दरम्यानच्या काळात या गावात २००६ मध्ये महापूर आला.गावात ७ ते ८ फुट पूराच्या पाण्याने मध्यरात्री थैमान घातले. शाळा गावाच्या बाहेर नाल्याला लागून असल्याने शाळेतही जमीन सपाटीपासून ८ ते ९ फुट पातळीवर महापूराच्या पाण्याने शिरकाव केला. महापूराच्या संकटात या विद्यामंदिरातील जवळ जवळ सर्वच होत्याचे नव्हते झाले.गाव, शाळा, वर्ग परिसरात सर्वत्र चिखल गाळ साचला,चिकनगुणीयाची साथ पसरली.



शाळेची अभिलेखे खराब झाली, काही वाहुन गेली. शाळेच्या ईमारतीला तडे पडले ईमारतीला नुकसान पोहचले. पुराच्या पाण्याने मागील संरक्षक भिंत पडली.परिसरातील अनेक वृक्ष उन्मळून पडले व वाहून गेले.वर्गात बाके टेबल खुर्च्या आणि भिंती चिखल गाळाने भरली.अजुनही महापूराच्या पाण्याची पातळीरेषा शाळेच्या ईमारतीवर दिसते आहे.ही पूररेषा २००६ च्या त्या आकस्मिक आलेल्या महापूराच्या अस्मानी संकटाच्या भिषणतेची साक्षच देते आहे.



आलेल्या अडचणी

१) आर्थिक अडचणी
२)संरक्षण
३)पूराच्या पाण्याने झालेले भौतिक व शैक्षणिक नुकसान
४)पावसाळ्यात पूर पाणी चिखल गाळाचा त्रास
५)वर्गातील रिकाम्या भिंती
६) शैक्षणिक साहित्याचे नुकसान

करावयाचे बदल/उद्दिष्टे आणि राबवायचे उपक्रम

१)शाळेला रंगरंगोटी करणे
२)वृक्षारोपण करुन परिसर हिरवा करणे
३) शाळेच्या आवारात पेव्हर ब्लॉक बसविणे
४)डिजिटल शैक्षणिक साहित्य तयार करणे

५)सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रमातून शिक्षणास पूरक वातावरण निर्मिती करणे.

६)शैक्षणिक साहित्याचा - जादुई पेटाऱ्याचा वापर

७)शाळा भित्तीपत्रक सुरू करणे

८)विविध भाषिक उपक्रम

९)कला क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम

१०)आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्माण करणे.


प्रत्यक्ष अंमलबजावणी : आमची शाळा आमचे उपक्रम

सेवेत येण्यापूर्वी व्यावसायिक शिक्षण मिळालेल्या अनुभवाची शिदोरी सोबत घेऊन वल्लभ विद्यामंदिर माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनात आम्ही विविध उपक्रम हाती घेतले.

कृतीयुक्त अध्ययन अध्यापन - अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रम नवीन तंत्रज्ञान कौशल्याचा वापर.नाविन्यपुर्ण अध्यापन,कला क्रीडा पध्दतीने शिक्षण विद्यार्थ्यांना अध्ययनपूरक आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्माण करणे यासाठी विविध प्रकारचे उपक्रम सुरू केले.

शाळा भित्तिपत्रक - शाळेत मुलांच्या सर्जनशिलतेला वाव मिळावा आणि वाचन लेखन संस्कृती रूजावी म्हणून 'अंकुर' 'माय मराठी' भित्तीपत्रक सुरू केले. विद्यार्थी भित्तीपत्रकाच्या माध्यमातून विविध विशेष माहिती,लेख,कविता लेखन करु लागले.वाचन लेखनाची आवड निर्माण झाली. शिक्षक दिन विशेषांक, स्वातंत्र्यदिन विशेषांक, प्रजासत्ताक दिन विशेषांक,मराठी भाषा गौरवदिन विशेषांक,भूगोलदिन विशेषांक,विज्ञानदिन विशेषांक अशा विविध विशेषांकाच्या माध्यमातून लेखन कौशल्य, नवनिर्मितीला, सृजनशिलतेला विद्यार्थ्यासाठी भित्तीपत्रकाद्वारे संधी उपलब्ध करुन दिली.

वाचन लेखन साक्षरता - ज्या विद्यार्थ्यांना वाचन लेखनात अडचणी आहेत अशा विद्यार्थ्यांना बाराखडीचे पुस्तक लेखन वही पेन स्व खर्चातून दिल्या.अतिरिक्त तासिका तसेच आठवड्यातील दोन तासिका विद्यार्थ्यांना लेखन वाचन शिकवण्यासाठी घेतल्या. उत्तम वाचन लेखन करणारे व वाचन लेखनात अकार्यक्षम विद्यार्थी असे दोन गट करुन त्यांच्या जोड्या करुन उपक्रमास चालना दिली.



नाणे प्रदर्शन - शाळेत स्वातंत्र्यपुर्व काळातील व स्वातंत्र्योत्तर काळातील विशेष नाणे प्रदर्शन आयोजित केले.यात विद्यार्थी , पालक,गावातील नागरिक तसेच शिक्षकही सहभागी झाले.


भाषिक उपक्रम - विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढावी म्हणून विविध भाषिक उपक्रम हाती घेतले.शब्दजंत्र्या तयार करणे,विविध माहिती संकलित करणे,सुविचार ,म्हणी ,वाक्प्रचार , शब्दकोडे,संवाद अशा विविध भाषिक उपक्रमांना प्राधान्य दिले.

कृतीयुक्त अनुभवात्मक शिक्षण - शालेय विषय मराठी , भूगोल कृती प्रत्यक्ष अनुभव यातून विषयज्ञान पोहचविण्यासाठी विविध छोटे छोटे उपक्रम हाती घेतले. जसे कथा सादरीकरण, नाट्यसंवाद, प्रकल्प, निरिक्षण, कला क्रीडण पध्दतीने अध्ययन अनुभूती देणे.नकाशाद्वारे भूगोल शिक्षण सोपे करणे. निरिक्षणातून भूगोल, कृतीपत्रिकाद्वारे चाचणी तसेच अभ्यास कृती घेणे अशा नाविण्यपुर्ण अध्ययन अध्यापन पद्धतींचा वापर करण्याचा ध्यासच लागला.

कोरोना काळात प्रभावीऑनलाईन व ऑफलाइन शिक्षण - कोरोना काळात शाळा बंद होती मात्र शिक्षण सुरू होते. वस्ती , वाडे , शेतशिवाराच्या बांधापर्यंत जाऊन कोविड नियमांचे पालन करित विद्यार्थ्यांशी संपर्कात राहुन गट अध्यापन , वैयक्तिक मार्गदर्शन , घरोघरी जाऊन बहुपर्यायी चाचणी परीक्षा घेतली शिवाय आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन झूम आणि गुगल मीटवरुन ऑनलाइन शिक्षण अध्यापन, नकाशा वाचन ,नकाशा भरणे कार्यशाळा व शैक्षणिक कार्यक्रम घेतले त्यास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. यामुळे शिक्षक व विद्यार्थी दोहोंना शिकण्याच्या नव्या पध्दती उमगल्या.यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळा, शिक्षक अभ्यासाविषयी आवड कायम टिकून राहिली.

शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा - राज्य संशोधन प्रशिक्षण परिषद व शालेय शिक्षण क्रीडा विभाग आयोजित शिक्षकांसाठी राज्यस्तरिय शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धेत आमच्या शाळेतील भूगोल अध्यापनाचे प्राथमिक तसेच माध्यमिक दोन्ही स्तरातून तालुका तसेच जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांकांचे पारितोषिक पात्र व्हिडीओ ठरले. तसेच राज्यस्तरिय रंगोत्सव व समृध्दी उपक्रमात शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती करुन सहभाग घेतला.

वृक्षारोपण करणे - सर्व सहकारी शिक्षकांनी व विद्यार्थी मिळून वृक्षारोपण केले. परिसर हिरवा केला. उंच उंच अशोक वृक्षाची झाडे दिमाखदार उभी आहे. वड,पिंपळ,लिंबाची डेरेदार वृक्षांच्या छायेत मुलं खेळतात.झाडांच्या सावलीत शालेय कार्यक्रम होतात.



वर्गखोल्यामध्ये डिजिटल भित्तीपत्रक लावणे - सर्व वर्गात विषय अभ्यासाची डिजिटल भित्तीपत्रके लावली. गणित , विज्ञान ,मराठी ,इंग्रजी, भूगोल वर्गातल्या भिंती बोलक्या केल्या.वर्ग सजावट स्पर्धा घेण्यात आल्या.विद्यार्थी भित्तीपत्रकावरुन सहज येता जाता अवांतर वेळेत निरिक्षण वाचन करु लागले.त्यामुळे विषयज्ञानाचे दृढीकरण होण्यास मदत झाली.

सहकारी शिक्षक बांधवाचा प्रतिसाद - सर्व सहकारी शिक्षक बांधवांनीही सर्व उपक्रमांना साथ दिली. शाळेत आनंददायी शिक्षण प्रक्रिया घडू लागली.कृती कार्यक्रम उपक्रमांवर भर देण्यात आला. विविध स्पर्धा परिक्षा: भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा दरवर्षी आयोजित केली जाते.गांधी विचार परीक्षा तसेच नवोदय,शिष्यवृत्ती , गणित छंद मंडळ, विज्ञान प्रज्ञा शोध अशा विविध परीक्षा आयोजित केल्या जातात.

विविध सण उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम - विश्व आदिवासी दिवस , प्रजासत्ताक दिन , आषाढी एकादशी निमित्त पालखी आणि वृक्षदिंडी , दिनविशेष, विशेषदिन साजरे केले जातात.

नवीन इमारत बांधकाम - महापूरामुळे मुळ इमारतीला तडे गेले. इमारत जीर्ण झाली.त्यामुळे संस्थेने लोकसहभागातून नवीन दोन प्रशस्त इमारती उभ्या केल्या.





इमारतीला रंगरंगोटी करणे - शाळेत उपक्रमातून आनंददायी अध्ययन अध्यापन प्रक्रियात घडली मात्र परिसर प्रसन्न आकर्षक हवा असे सर्व सहकारी शिक्षकांना वाटू लागले. मुख्याध्यापक आणि पर्यवेक्षकांमार्फत शाळा व्यवस्थापन व संचालक मंडळापूढे शाळेच्या जून्या व नव्या इमारतीला रंगरंगोटी करणे संदर्भात प्रस्ताव मांडला.संचालक मंडळाने अनुमती दर्शवत निधी उपलब्ध करुन दिला.शिक्षक बंधूंनीही निधी स्वरुपात शाळेसाठी योगदान दिले. इमारतीला सुबक रंग देण्यात आला.शिक्षक विद्यार्थ्यांचा ऊत्साह द्विगुणीत झाला.

आवारात पेव्हर ब्लॉक बसविणे

महापूराच्या पाण्याने शाळेच्या आवारात चिखलगाळ साचलेला असल्याने दरवर्षी पावसाळ्यात पाऊस पडला की,चिखल होत असे.चिखल पाण्यातून वाट काढत इमारत वर्गात जात.म्हणून आमच्या विद्यमान संचालक मंडळापुढे विचार मांडला . संचालक मंडळाने शाळेच्या आवारात समाज सहभागातून आकर्षक ब्लॉक बसवून दिले.





अशा प्रकारे मुख्याध्यापक,पर्यवेक्षक शिक्षक ,संस्थाचालक आणि समाज सहभागामुळे आमच्या शाळेतील शैक्षणिक वातावरण प्रसन्न ,सुशोभित,ज्ञानसंपन्न झाले आहे.नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अमलबजावणीच्या दिशेने वाटचाल चालू आहे. सहकार्याना मार्गदर्शन व उपक्रमांची प्रभावीपणे अमंलबजावणीसाठी नेहमी तत्पर असतो.आमचे विद्यमान मुख्याध्यापक अंबालाल चौधरी ,आमच्या संस्थेचे चेअरमन मा. दत्तात्रेय सोमजी पाटील, व्हा.चेअरमन मा. विजय लिमजी पाटील, जेष्ट संचालक मा रमेशभाईजी चौधरी सर्व विद्यमान व्यवस्थापन मंडळ व सहकारी शिक्षक शाळेच्या व विद्यार्थी हितासाठी सदैव सेवेत व नाविन्यतेचा ध्यास घेणारे आहेत. अध्ययन अध्यापन, शैक्षणिक

उपक्रम, स्पर्धा, शाळेचा प्रसन्न परिसर, सुसज्ज डौलात उभी असलेली इमारत, सूशोभित पटांगण असलेली अशी ही आमच्या वल्लभ विद्यामंदिर पाडळदा शाळेची यशोगाथा! आम्हा शिक्षक आणि विद्यार्थ्यांना प्रेरणादायी आहे.







भित्तीपत्रकाचे अनावरण : पाडळदा, ता.शहादा येथील वल्लभ विद्या मंदिरात भित्तीपत्रकाचे अनावरण करण
आले. त्याप्रसंगी उपस्थित संस्थेचे चेअरमन रमेश शंकर चौधरी, उपाध्यक्ष दत्तात्रय पाटील, सचिव डॉ.विलास पा
मुख्याध्यापक अशोक पाटील आदी.












आंतर राष्ट्रीय वनस्पेषा


सूर्य, चंद्र व पृथ्वी


MAHADHAN
MOP



‘विना दप्तर शाळा’ उपक्रमांतर्गत पाडळदा शाळेत कथाकथन स्पर्धा

एकता चौधरी, प्रियंका कोळी यांना प्रथम क्रमांक

प्रतिनिधी | म्हसावद



कथा कविता सादर करताना गणेश पाटील. मंचावर उपस्थित मान्यवर.

पाडळदा येथील वल्लभ विद्यामंदिर शाळेत शनिवारी विना दप्तर शाळा उपक्रमांतर्गत कथाकथन स्पर्धेचा कार्यक्रम भाषा शिक्षक गणेश पाटील यांनी आयोजित केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विजय पाटील होते. विद्येची देवता सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजनाने प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे आयोजक म्हणून गणेश पाटील यांनी मुख्याध्यापक विजय पाटील तसेच पर्यवेक्षक अंबालाल पाटील यांचे पुष्पगुच्छ, पेन आणि काव्य स्तंभ व माय मराठी हे प्रातिनिधिक कविता संग्रह सप्रेम भेट देत स्वागत केले. विद्यार्थ्यांनी आपापल्या कथा सादर केल्या. महत्त्व आईचे, सोन्याची कुदळ, शिक्षणाची आस्था, प्रामाणिकपणा, हरणाची चतुराई, हिऱ्यापेक्षा जनता महत्त्वाची, तीन मासे, कबूतर आणि मुंगी, ससा आणि कासव, चिमणी आणि मांजर, जादुई मटका, माणसातील देव अशा रंजक अन् बोधपर कथा विद्यार्थ्यांनी सादर केल्या. गणेश पाटील यांनी विज्ञान कथा तसेच स्वनिर्मित कविता व चारोळी काव्य प्रकार सादर केले. यानंतर स्पर्धेचा निकाल घोषित झाला. प्रथम एकता चौधरी, उच्च प्राथमिक गट, प्रियंका कोळी, माध्यमिक गट, द्वितीय योगिनी पटेल,राकेश कोळी, तृतीय दिव्या कोळी,अनुष्का चौधरी, नेहा पाटील यांनी पारितोषिक पटकावले.

आपण वाचत आहात देशातील सर्वात विश्वासार्ह अन् प्रथम क्रमांकाचे वृत्तपत्र

दिव्य मराठी

बुधवार २४ जुलै २०२४

पुलायन जाधव म्हसावद प्रतिनिधी मो.**7588317479**

पाडळदा येथील वल्लभ विद्या मंदिर शाळेमध्ये शैक्षणिक साहित्य प्रदर्शन

प्रतिनिधी | म्हसावद

पाडळदा (ता.शहादा) येथील नूतन विद्या प्रसारक मंडळ संचालित वल्लभ विद्यामंदिर शाळेत शिक्षण सप्ताहांतर्गत अध्ययन, अध्यापनासाठी उपयुक्त विविध शैक्षणिक साधन साहित्याचे प्रदर्शन भरवण्यात आले. 'चला शिकु या खेळणीद्वारे' आणि 'चला शिकू या भित्तिपत्रकातून' या संकल्पनांवर आधारित होते.

शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे उद्घाटन वल्लभ विद्यामंदिर शाळेचे मुख्याध्यापक अंबालाल चौधरी, पर्यवेक्षक गणेश पाटील, आदर्श प्राथमिकचे मुख्याध्यापक योगेश सोनार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शन पाहणी करून झाले. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंच्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात शैक्षणिक साहित्याची पाहणी करून प्रत्यक्ष खेळणी व भित्तिपत्रकांद्वारे अध्ययनाचा आनंद घेतला. सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याविषयी माहिती सांगितली.

या शैक्षणिक साहित्य प्रदर्शन उपक्रमाचे नियोजन अरविंद पटेल, तुषार पाटील, अमृत चौधरी, मल्हारराव ठाकरे यांनी केले. शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारीवृंदाने यशस्वितेसाठी सहकार्य केले. मुख्याध्यापक चौधरी आणि पर्यवेक्षक पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.



प्रदर्शनाचे उद्घाटन करताना शाळेचे मुख्याध्यापक अंबालाल चौधरी, पर्यवेक्षक गणेश पाटील, आदर्श प्राथमिकचे मुख्याध्यापक योगेश सोनार.



वल्लभ विद्यामंदिरातर्फे दिंडीतून वृक्षारोपणाचा जागर

पाडळदा : येथील वल्लभ विद्या मंदिर व आदर्श प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी आषाढी एकादशीनिमित्त शाळेतून विठ्ठल रखुमाईच्या प्रतिमा ठेवून कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केंद्रप्रमुख यांच्या उपस्थितीत पालखी मिरवणूक व वृक्षदिंडी काढण्यात आली.

पर्यवेक्षक गणेश पाटील, आदर्श प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक योगेश सोनार यांनी पालखीच्या प्रतिमेच्या पूजन केले.वारकरी वेशभूषा परिधान केलेले विद्यार्थी व विद्यार्थिनींनी तुळशी वृंदावन डोक्यावर घेत सवाद्य टाळ, मृदुंग, पेटी वाजवित शाळेतून मिरवणूक काढण्यात येऊन विठू नामाचा गजराने, विविध भजने गात गावातील गल्लोगल्ली मिरवणुक काढण्यात येऊन मुरली मनोहर या पुरातन मॅंदिरात संस्थेचे चेअरमन दत्तात्रय पाटील, ज्येष्ठ संचालक रमेश चौधरी व संचालक रतिलाल पाटील यांच्याहस्ते समारोप करण्यात आला. याप्रसंगी मॅंदिराचे पुजारी श्याम जोशी व श्र.चौधरी यांनी यांनी विद्यार्थ्यांना वारीचे महत्त्व सांगितले. संचालक रतिलाल पाटील यांनी वृक्ष लागवडीचे आवाहन केले. गणेश पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. नंदलाल पाटील, प्रवीण ठाकूर, मोहन चौधरी, भगवान चौधरी यांनी विद्यार्थ्यांना प्रतिसाद म्हणून भजन गायलीत. सूत्रसंचालन चतुर पाटील यांनी केले.आभार योगेश सोनार यांनी मानले. महेंद्र पटेल,भरत पाटील,धर्मेंद्र कुंवर, राजू वसावे, मल्हारराव ठाकरे, अमृत चौधरी, भूपेंद्र पाकळे, अमोल पाटील, मनीषा दाभाडे, दिव्या पाटील, सविता ठाकरे, दामिनी शिंदे, अश्विनी पाटील, रोहिणी सूर्यवंशी, नलिनी पाटील, सुनंदा पाटील तसेच सर्व शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

----------**----------

दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या क्षमता वृद्धीसाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दसवड

शाळेचा पत्ता - दसवड ता.तळोदा जि.नंदुरबार

मुख्याध्यापक नाव - श्री.उमेश मगन पाडवी

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9405200099

मुख्याध्यापक ईमेल आयडी - padviumesh1@gmail.com

प्रास्ताविक -


'नवे नवे नित्य हवे' अशी आपल्या सर्वांची धारणा असते. प्रत्येक दिवशी उगवणारा सूर्य एकच असतो; पण पाहणाऱ्याला तो वेगळा वाटतो. आपण करत असलेला उपक्रम पूर्णतः नवा असतो असे नाही. कुठेतरी, केव्हातरी कुणीतरी, कदाचित आपणही यापूर्वी केला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण त्या उपक्रमातील आनंद वेगळा असतो हे आपल्या अनुभवास येत असेल.अलीकडे तर इंटरनेटने शिक्षणाचा अधिकार, बालस्नेही शिक्षण व नवोपक्रम (Innovations) इ. बाबत आपल्यासारख्या जिज्ञासू उपक्रमशील शिक्षकांचे भावविश्व अधिक समृद्ध केले आहे.आपण सातत्याने विविध उपक्रम करीतच असतो; पण त्याच्या नोंदी आणि मांडणी करण्यात मागे पडतो. एक तर लेखनाचा आळस अथवा लेखन करण्याची पद्धत माहीत नसते. मानवी जीवनात लेखनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपले अस्तित्व, आपले कर्तृत्व अक्षय ठेवण्याचे सामर्थ्य 'अक्षर' या शब्दात आहे. आपण कधीतरी सेवानिवृत्त होणार आहोत. आपल्या पश्चात आपल्या कार्यकाळातील कर्तृत्वाच्या गोड आठवणी अशा उपक्रमाच्या लेखनातून आपल्याला आनंद देतील. त्याचप्रमाणे आपला उपक्रम अन्य शाळांना घ्यावयाचा असेल तर त्यांनाही आपले लेखन मार्गदर्शक ठरेल. आनंद वाटल्याने वाढतो. हा आनंद वाटून एका अर्थाने 'आनंद यात्री' होण्याची संधी आपणांस मिळते ती उपक्रमाच्या लेखनातूनच.आपल्यासारख्या उपक्रमशील शिक्षकांना आपले उपक्रम मांडण्यासाठी नवोपक्रम स्पर्धेचे आयोजन राज्य स्तरावर महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेमार्फत केले जाते. या स्पर्धेच्या निमित्ताने आपण आपल्या उपक्रमाचे लेखन करण्यासाठी पुढील गोष्टी समजून घेऊयाआपण विविध उपक्रम अमलात आणतो; परंतु आपणांपैकी बरेच जण आपल्या नवोपक्रमांचे शब्दांकन

करीत नाहीत. केलेल्या उपक्रमांचा आपण अहवाल लिहून ठेवला तर तो भविष्यकाळात आपल्याला पुन्हा उपयोगी पडतो.

शिक्षकांच्या सहा महिन्यांच्या अथक परिश्रमाने आमच्या शाळेचं

(जि.प.प्रा.शाळा दसवड) चे बदललेलं रूप.....

जून महिन्यात सन २०२३/२४ च्या शैक्षणिक सत्राची सुरुवात झाली. नविन शाळा, नविन वातावरण, नविन विद्यार्थी, नविन पालक आणि नविन सहकारी! तर काय नवीन सहकारी उद्या उठून आंतरजिल्हा बदली करून पुण्याला निघाले. तेथूनच ह्या खडतर प्रवासाला सुरुवात केली. तस शाळेकडे बघून लक्षातच आले होते आपल्याला येथे खुपच बदल करावा लागेल अस. तसा आपलाच जिल्हा. पण बाहेर जिल्ह्यात काम करून आंतरजिल्हा बदलीने स्वगृही परतलो होतो. शाळा व परिसर काही नवीन नव्हताच, कारण लहानाचे मोठे येथेच झालो होतो. आमची शाळा इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतची. शाळा तीन वर्गात भरायची. पण शाळेचा सहकारी शिक्षक बदली करून गेल्यामुळे मी एकटाच होतो. शाळेत तात्पुरते स्वरूपात एक सहकारी मिळाले होते. त्यात शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक तसच शिपाई व अन्य सर्वेसर्वा मीच होतो. सहकारी शिक्षक पत्रकार असल्याने त्यांची ही मदत होत होती. आता मी मुख्याध्यापक आणि ते सहकारी शिक्षक असे अधिकृत एकच पण तात्पुरती नियुक्ती सहकारी शिक्षक धरून २ कार्यरत दिसत होते. यापैकी इयत्ता पहिली ते तिसरीचे वर्ग मी सहकारी शिक्षकांना दिले. शाळेच्या मागील भागात दोन वर्गात वर्ग भरत होते. शाळेत प्रवेश करताच समोर पडक्या इमारतीत चौथी व पाचवीचा वर्ग तथा मुख्याध्यापक कार्यालय देखील तिथेच. त्यामुळे शालेय कामकाजात अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागायचे. कुठलाही कार्यक्रम घ्यायचा झाल्यास त्यात विस्कळीतपणा यायचा. मी काही तरी नेहमीच उपक्रम व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असल्याने सहकारी शिक्षकांना देखील नवीन वाटल्याने त्यांनी मला साथ द्यायला सुरूवात केली. त्यामुळे आम्ही दोघांनी मिळून शाळेत एकसंधपणा येण्यासाठी सर्व वर्ग समोरच्या इमारतीत एका छताखाली भरवायचा निर्णय घेतला. याठिकाणी समोर प्रशस्त मैदान आणि पुरेशा प्रकाश आहे. सुरुवातीला शाळेच्या परिसरात गावातील लोक धुम्रपान करून शालेय परिसर अस्वच्छ करून निघुन जाऊ लागले. तसेच दुपारच्या वेळी शाळेच्या कंपाऊंड वर गप्पा मारत बसायचे तर झोपी देखील जायचे. ह्या सर्व प्रकारावर तोडगा काढण्यासाठी गावचे सरपंच श्री. सौरव ठाकरे व त्यांच्या टीमला सोबत घेऊन सर्वांना १५ ऑगस्टला सुचना केल्या व शासकीय



नियम सांगितले. त्यामुळे थोडा फरक पडला. परंतु पूर्ण बंद झाले नाही. आम्ही देखील माघार घेतली नाही शाळेतील विद्यार्थी व आम्ही शिक्षकांनी मिळून गांधीगिरी सुरू केली. आमच्या पोषण आहार शिजवणाऱ्या ताई रोज परिसर स्वच्छता करायच्या आम्ही त्यांना परिसर सफाई करू न देता, रोज सकाळी शाळेत गेल्यावर विद्यार्थी व शिक्षकांनी परिसर स्वच्छता करायचे ठरले. ह्याचा परिणाम असा झाला की शाळेत अस्वच्छता करणे कमी झाले. महिन्याभरात तर बंदच झाले. सत्याचा विजय झाला. पण पुन्हा दिवाळी नंतर शाळेतील बोरींगला पाणीच येईना. बोरींग मधील पाणी आटले. गावातील वेगवेगळ्या ठरावीक अवधी घेऊन ३ बोरींग खळखळून पाहीले पण यश काही मिळाले नाही. घरून पाण्याच्या बाटल्यांमध्ये पाणी आणायचे ठरले.

शैक्षणिक सत्र सन २०२४/२५ उजाडले नवीन सुरूवात झाली. नवीन शिक्षक आंतरजिल्हा बदलीने मिळाले, आमचे जुने सहकारी त्यांचा कालावधी पुर्ण झाला ते ही गेले. एक शिक्षक मिळाले, वैद्यकीय कारणास्तव एक मॅडम मिळाल्या. शाळेचा पट ८० झाला. पटानुसार ३ शिक्षक कार्यरत झाले. त्यात चांगली सुरूवात झाली होती त्यामुळे सुरूवातीला



पाण्याची व्यवस्था व मुलांच्या शौचालय बनवण्यासाठी काम हाती घेतले. गेल्या वर्षातील ग्रामस्थ व पालकांच्या संपर्कामुळे शाळेला थोडा फार फायदा होऊ लागला होता. सरपंचांनी व ग्रामसेवक आप्पा यांनी मनावर घेऊन १५ ऑगस्ट पुर्वी आम्हाला शाळेत नळ पाणी योजनेतून पाणी पुरवठा करून दिला तसेच त्याच महिन्यात नवीन शौचालय बांधुन देण्यात आले . त्यानंतर आमच्या शाळेत आमदार निधीतून इकोफ्रेंडली व्यायाम शाळा मागणी करून ती मिळवून घेतली. ह्यासोबत शाळेत वेगवेगळ्या उपक्रमांची जोड होतीच. शैक्षणिक उठावात गेल्यावर्षी व ह्या ही वर्षी विद्यार्थ्यांना दप्तर, कंपास, वह्या, पेन, पेन्सिल, शॉपनर, रबर, पॅड असे साहित्य देण्यात आले. एखाद्या वर्गात कार्यक्रम घ्यायचा असल्यास मुले कोंडल्यासारखे बसवावी लागायची. त्यामुळे या अडचणीवर मात करण्यासाठी सर्व शिक्षकांनी मिळुन शाळेच्या व्हरांड्याजवळ जुन्या पंपाची पाईपलाईन होती ती काढून घेऊन

मैदान मोकळे करून घेतले. परिपाठ किंवा एखादा कार्यक्रम घेताना आता अडचण येत नाही. यामुळे मोकळ्या मैदानाची कायमची सोय झाली. तसेच दैनंदिन परिपाठ आणि शाळेतील विविध कार्यक्रम घेण्यासाठी प्रशस्त व्हरांडा उपलब्ध झाला. ऊन, वारा, पावसात कार्यक्रम घेण्याची सोय झाली.

शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी मुलांना क्रिडास्पर्धा निमित्ताने शैक्षणिक उठावात क्रिडा ड्रेस घेतला. आता शाळेतील बऱ्याच गोष्टी पुर्ण होत होत्या. त्यातच एके दिवशी सहजच ग्रामसेवक आप्पा व मुख्याध्यापक चर्चा करतांना विषय निघाला शाळेचा एकदा काया पालट व्हायला हवा .

सत्र दुसरे सुरू झाले वरील विषयावर एक सभा झाली आणि त्यासभेत ठरले शाळा रंगरंगोटी काम करणे, अंगणवाडी, रंगरंगोटी काम करणे व गावातील सर्व प्रशासकीय इमारतीचा कायापालट करून करणे.

शाळेच्या इमारती पावसाचा मार सोसून शाळेचे पूर्वी केलेले रंगकाम शेवटची घटका मोजु लागला होता. अनेक ठिकाणी रंगाचे खपले पडले होते तर काही ठिकाणी शेवाळले होते. शेवाळलेल्या भिंती शाळेतील वातावरण निरूत्साही करत होते. ज्या ठिकाणी मुले ज्ञानार्जन करणार ती जागा /इमारत उत्साह पेरणारी असणे गरजेचे असते. अन्यथा शिक्षकांची सगळी मेहनत मातीमोल व्हायला क्षणही लागणार नाही. त्यामुळे सर्वांनी मिळुन शाळेचे बाह्यांग सचित्र करण्याचा निर्णय घेतला. परंतु शाळा रंगवून सुशोभित झाली तरी शाळेचा परिसर बंदिस्त आहे त्याचे देखील रंगकाम करुन घेण्यात यावे निर्णय घेतला. दोन गळणाऱ्या खोल्यांना पत्रा नवीन लावून गळती काढण्यात आली. इमारती काही ठिकाणी तडा गेलेल्या व खपली निघालेल्या



होत्या त्या ठिकाणी डागडुजी करण्यात आली . किचनशेडचे पत्रे नवीन बसवून रंगरंगोटी करण्यात आली . हॅन्डस्टैंड मुलांसाठी नवीन करण्यात आले. यावेळी ग्रामसेवक व सरपंच दादा यांसोबत सर्व शिक्षक यांनी मजुरांना हाताशी धरून सर्व काम दोन तीन महिन्यात पूर्ण केले. हा सर्व प्रवास सुरू असतांना शालेय क्रिडास्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यात देखील विद्यार्थी आपले कला कौशल्य दाखवून क्रमांक पटकावत होते. या संपूर्ण प्रवासात शाळा व्यवस्थापन समितीची मोलाची साथ लाभली.

ग्रामपंचायने शाळेत चार शिक्षक असल्याने एक वर्ग शाळेसाठी दिला. सांस्कृतिक कार्यक्रम व शिक्षण परिषद हे उपक्रम शाळेत घेण्यात आले. तसेच शाळेची गरज ओळखून शाळेतील शिक्षकांनी स्वतःचे पैसे खर्च करून शाळेला ३ घड्याळ, ३ फॅन, ३ आरसे, भोजनासाठी २ पातेले, २ पेले, २ झाकण , १ हंडा, १ कळशी, २ चमचे इ. साहित्य खरेदी करून दिले.

शाळा रंगवून तयार झाली. शाळेच्या भिंती, व्हरांडे बोलके झाले. मुलांना पावसाळ्यात छत्र्या, रेनकोट अडकवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. हॅंडवाश स्टेशन सुसज्ज करण्यात आले. शौचालय येथे मुलांना सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला. प्रवेशद्वार रंगरंगोटी नवीन दिसायला लागले, कंपाऊंड वरील स्लोगन व सुविचार तसेच



स्वच्छता संदेश आरोग्याचे संदेश यामुळे ग्रामस्थ व पालक यांना मोलाचे संदेश देणे होत आहे. आता मुलांनाही आपल्या शाळेचं बदललेलं रूप आवडायला लागलय.....

अखेर जि. प. प्रा. शाळा दसवड शाळेचे रूप बदल करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. उमेश पाडवी सर, शाळेतील जेष्ठ शिक्षक श्री. रावताळे सर, तथा श्रीम. इंदिराबाई मारनार ह्यांनी विषेश असे प्रयत्न केले त्या प्रयत्नांना यश आले. ह्यासाठी खरी मेहनत ग्रामपंचायत दसवड सरपंच श्री. सौरभ ठाकरे, उपसरपंच श्री. दिपक वसावे, ग्रामसेवक श्री. खैरनार आप्पा, तसेच ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. किशोर पाटील ह्यांच्या अथक परिश्रमाने शाळेचे रुप बदलण्यास मदत झाली.

हे सर्व बदल बघून मा. बी. डी. ओ. श्री. किरवे साहेब, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री. कोकणी साहेब व मा. गटशिक्षणाधिकारी श्री. धनगर साहेब ह्यांनी शाळेचे बदललेले रूप पाहून विशेष कौतुक केले. वरील सर्व मान्यवरांनी कौतुकास्पद शब्द व पाठीवर शाबासकी दिली हिच खरी आम्हा शिक्षकांसाठी कामाची पावती आहे.

शाळा प्रवेशोत्सव -

शाळा प्रवेशोत्सव हा शाळेत पहिल्यांदाच येणाऱ्या लहानग्या विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा आणि उत्साहाचा सोहळा असतो. या उपक्रमातून समाज, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नातं अधिक घट्ट होतं. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून आम्ही शाळा प्रवेशोत्सव नाविन्यपूर्ण आणि आनंददायी करण्याचे ठरविले.



पहिल्यांदा शाळेत येणाऱ्या मुलांना भीती न वाटता शाळा ही आनंदाचे ठिकाण आहे, अशी भावना निर्माण व्हावी यासाठी फुलांची सजावट, फुगे, गाणी, स्वागतगीत यामुळे शाळेचा माहोल उत्साहवर्धक झाला. पालकांना शाळा सुरक्षित, सुंदर आणि मुलांच्या विकासासाठी योग्य आहे असे वाटले. त्यामुळे त्यांचा सहभाग वाढला. शाळा सोडणाऱ्या

मुलांचे प्रमाण कमी झाले. प्रवेशोत्सवामुळे मुलांना शाळेत यायची उत्सुकता वाढली. त्यामुळे लवकर शाळा सोडण्याची प्रवृत्ती कमी झाली. सामाजिक सहभाग वाढला. ग्रामपंचायत, गावकरी, माजी विद्यार्थी यांचा सहभाग होता. त्यामुळे शाळा आणि समाज यांच्यातील नातं घट्ट झालं. विद्यार्थ्यांमध्ये बंधुभाव निर्माण झाला. जुन्या विद्यार्थ्यांकडून नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत झाल्यामुळे परस्पर प्रेम व मैत्री वाढली. शैक्षणिक वातावरणाची निर्मिती झाली. प्रवेशोत्सवामुळे शाळेत सुरुवातीपासून शिकण्याचा उत्साह निर्माण होतो. सरकारी उपक्रमांना चालना मिळाली."शिक्षण हक्क" व "शाळेत चला, अभियान" अशा योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली.

कोविड १९- नंतर शाळा प्रथमच सुरू झाली त्याबद्द्ल मुलांमध्ये आनंदी वातावरणात होते. शाळेत पहील्याच दिवशी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा. धनगर साहेब व विस्तार अधिकारी श्री. वसंत जाधव साहेब तथा केंद्रप्रमुख श्री. धनंजय जाधव साहेबांनी भेट दिली.साहेबांनी प्रवेशोत्सव पाहुन आनंद व्यक्त केला, काही सुचना दिल्या व विद्यार्थांसोबत गप्पा गोष्टींत रमले.

विद्यार्थी गृह भेटी

कोविड १९ च्या काळात शाळा बंद परंतू गृहभेटींच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांचे अध्यापनाचे कार्य सुरू होते. थोडक्यात गृहभेट ही एक घरगुती शाळाच ठरली. शाळा बंद असल्यामुळे नियमित वर्ग घेता येत नसले तरी आम्ही गृहभेटीद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासाचे मार्गदर्शन करू लागलो. विद्यार्थी कुठे अडखळत आहेत हे थेट पाहून ताबडतोब शंका दूर करून देत होतो. गृहभेटीत पालकांशी संवाद साधून त्यांच्या मुलांच्या अभ्यासात ते कसा हातभार लावू शकतात हे सांगत होतो. पालकांना मुलांच्या प्रगतीची खरी माहिती मिळत होती आणि ते अधिक जबाबदारीने मुलांना अभ्यास करायला सांगत होते. विद्यार्थी घरात भेटल्यामुळे त्याला शिक्षक आपले वाटतात. त्यामुळे लाज, भीती कमी झाल्याने अभ्यासाविषयी आत्मीयता वाढली. शिक्षकांचा आत्मीय संपर्क



विद्यार्थ्याला आत्मविश्वास देतो. शाळेत विद्यार्थी कधी कधी आपले खरे ज्ञान दाखवू शकत नाहीत. पण गृहभेटीत त्यांच्या वाचन, लेखन, गणित या प्रत्यक्ष कौशल्यांची खरी चाचणी घेता येते. त्यामुळे आम्हांला प्रत्येक विद्यार्थ्याची खरी पातळी कळली. शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकटेपणा व उदासीनता येऊ शकते. परंतु गृहभेटीतून आम्ही त्यांना प्रोत्साहन दिले व त्यांचा आत्मविश्वास वाढविला. संवादातून मुलांचे सामाजिक व मानसिक आरोग्य जपले गेले. तसेच विद्यार्थांना स्वाध्याय पुस्तिका देण्यात आल्या होत्या त्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतल्या जात होत्या. तसेच online स्वरूपात व्हाट्सएपच्या माध्यमातुन शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशाप्रकारे गृहभेटीच्या माध्यमातून अध्ययन अध्यापन सुकर झाले.

आरोग्य तपासणी -



विद्यार्थी जीवनात आरोग्य तपासणी (Health Check-up) हा एक महत्त्वाचा उपक्रम ठरतो. निरोगी शरीर आणि निरोगी मन असले तरच विद्यार्थी शिक्षणात, क्रीडेत आणि इतर उपक्रमात प्रगती करू शकतो.त्यामुळे आरोग्य तपासणी घेण्याचे शालेय व्यवस्थापन समीतीने ठरवले होते. काही दिवसांतच डॉक्टरांशी संपर्क करून तपासणीचे नियोजन झाले. यासाठी पालकांचे व डॉक्टरांचे सहकार्य मिळाले.नियमित आरोग्य तपासणीचे विद्यार्थ्यांच्या जीवनात विविध लाभ होतात. जसे की आजारांचे लवकर निदान, आरोग्य तपासणीमुळे डोळे, दात, कान, त्वचा, रक्तदाब, हिमोग्लोबिन इत्यादींची तपासणी केली जाते. एखादा आजार किंवा विकार सुरूवातीलाच लक्षात येतो व वेळेत उपचार करता येतात. शैक्षणिक प्रगतीस मदत होते. निरोगी राहिल्यास एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती सुधारते आणि शिकण्याची गती वाढते. थकवा, डोकेदुखी, अपचन यासारख्या समस्या वेळेत लक्षात आल्यास अभ्यासावर परिणाम होत नाही. तसेच शारीरिक तंदुरुस्ती राहते. विद्यार्थ्यांना उंची-वजन यांचे प्रमाण कसे असावे, व्यायाम व संतुलित आहाराचे महत्त्व काय हे समजले. खेळ, क्रीडा व शारीरिक क्रियांमध्ये

ते अधिक उत्साहाने भाग घेऊ लागले. आरोग्य तपासणीतून विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी आरोग्य तपासणीदरम्यान समुपदेशन (Counselling) केले गेले त्यामुळे विद्यार्थ्यांना ताण-तणाव, भीती, उदासीनता कमी करण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारसरणी वाढली. त्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव निर्माण होऊन, वैद्यकीय तपासणीच्या वेळी स्वच्छता, दंतस्वच्छता, योग्य आहार, पाण्याची शुद्धता याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले गेले.

तळोदा प.स.कडील अधिकारी वर्गाकडून दसवड शाळेत वृक्षारोपण

गटशिक्षणाधिकारी श्री. धनगर साहेब व श्री. केदार साहेब विस्तार अधिकारी ह्यांच्या तसेच पालकांच्या व शिक्षकांच्या उपस्थितीत ५० फुल झाडे शाळेच्या आवारात लावण्यात आले.





ह्यामुळे शालेय वातावरण प्रसन्न व आनंदमय वाटू लागले. विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी जाणीव व आपलेपणाची भावना निर्माण झाली. विद्यार्थी आपुलकीने वृक्षांची आणि फुलझाडांची काळजी घेवू लागले.

हात धुवा उपक्रम

लहान वयातच बालकांना हात धुण्याची सवय लावली तर विद्यार्थी आयुष्यभर स्वच्छतेचे महत्व ओळखतात. त्यामुळे आमच्या शाळेत स्वच्छतेचे महत्व सांगुन हात धुवा हा उपक्रम राबवण्यात आला. ह्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडी सेविका, तसेच केंद्राचे केंद्रप्रमुख सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना स्वच्छ हात म्हणजेच तुझे निरोगी शरीर असे सांगण्यात आले. हात धुण्यामुळे आपल्या पोटात जंतू जात नाही आणि अतिसार, सर्दी, फ्ल्यू,





पोटदुखी असे आजार आपल्याला होत नाही हे नाट्यीकरणातून समजाविण्यात आले.


माझी शाळा तंबाखू मुक्त शाळा -



सन – २०२१-२०२२ साठी जि. प. प्रा. शाळा दसवड येथे तंबाखू मुक्त शाळा होण्यासाठी शाळेच्या आजूबाजूचा परिसर स्वछ करून तंबाखूचे कोणतेही पदार्थ शाळेच्या आवारात नसणे ह्यासाठी प्रयत्न केले.

शाळेच्या भिंती वर "तंबाखू मुक्त शाळा" बैनर लावून शाळेच्या परिसरात धुम्रपान अथवा तंबाखू जन्य पदार्थ विकण्यासाठी सक्त मनाई आहे हे सुचीत करण्यात आलेले आहे व दंडात्मक कार्यवाहीची सक्त सुचना देण्यात आली आहे. तसेच सन २०२३ ते २०२५ साठी तंबाखू मुक्त शाळा म्हणून शासनाने घोषित केले आहे. तंबाखू सेवन केल्याने जे काही विविध दुष्परिणाम होतात त्याविषयी जनजागृती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच तंबाखूविषयी नकारात्मक दृष्टीकोन तयार झालेला आहे. विद्यार्थी आपले पालक तसेच परिसरातील जे तंबाखूचे सेवन करतात त्यांना देखील सेवन टाळण्यासाठी प्रवृत्त करतात. ह्या उपक्रमामुळे शालेय परिसर आरोग्यदायी व निरोगी झालेला आहे.

स्वाध्याय उपक्रम, वाचू आनंदे उपक्रम, गोष्टींचा शनिवार उपक्रम





व्हाट्सएप च्या माध्यमातुन ऑनलाइन स्वरूपात स्वाध्याय सोडवून घेण्यात येतात.तसेच व्हाट्सएप च्या माध्यमातुन ऑनलाईन स्वरूपात वाचू आनंदे उपक्रमांतर्गत विविध गोष्टी कथा कविता ह्या सर्व यू ट्युब द्वारा देण्यात येतात त्या विद्यार्थी स्वखुशीने बघतात. गोष्टींचा शनिवार हा उपक्रम दर आठवड्याला असतो ह्या उपक्रमात विद्यार्थी विविध योगासने, मनोरंजक खेळ, शैक्षणिक साहित्याचा उपयोग करून शिक्षण घेतात. Online देण्यात येणारे अभ्यास विद्यार्थी वेळोवेळी सोडवून पाठवतात.

जयंती / पुण्यतिथी साजरा करणे





आपल्या देशात तसेच महाराष्ट्रात अनेक संत, महात्मे, समाजसुधारक, शास्त्रज्ञ, स्वातंत्र्यसैनिक, कवी-लेखक आणि महान नेते यांचा वारसा आपल्याला लाभला आहे. त्यांच्या कार्याची, विचारांची आठवण ठेवून त्यांच्या आदर्शांचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी पुण्यतिथी व जयंती साजरी करण्याला विशेष महत्त्व आहे. पुण्यतिथी हा एखाद्या महापुरुषाने या जगाचा निरोप घेतलेला दिवस असतो. त्या दिवशी त्यांचे कार्य, विचार आणि समाजासाठीचे योगदान याची आठवण ठेवली जाते. त्यांच्या त्याग, पराक्रम व समाजकारणातून नवीन पिढीला प्रेरणा मिळते. पुण्यतिथीच्या निमित्ताने आपण त्या व्यक्तीने केलेल्या कार्याबद्दल आदर व कृतज्ञता व्यक्त करतो. विद्यार्थ्यांना आणि समाजाला उत्तम संस्कार मिळावेत यासाठी पुण्यतिथी साजरी करणे उपयुक्त ठरते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त पुस्तकवाचन करण्यात आले. ९ ऑगस्ट, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांची जयंती साजरी, बालिका दिन व सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, बिरसा मुंडा जयंती साजरी करण्यात येते. या जयंत्या व राष्ट्रीय सणांचा आधार घेऊन शाळेत पुढील प्रमाणे उपक्रम घेतले जातात. वेशभुषा उपक्रम, गरबा नृत्य, दही हंडी फोडणे, क्रिडा स्पर्धा, मेरी माटी मेरा देश, मतदार दिन, शाळा बाह्य सर्वेक्षण, हर घर तिरंगा, स्वच्छ सुंदर गाव व शाळा, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे साजरा करणे.वृक्षारोपण, भेळ बनवणे, चित्रकला व योगा डे साजरा करणे हे सर्व कार्यक्रम घेतले जातात .

वाचन प्रेरणा दिवस

जि.प.प्रा.शाळा दसवड येथे वाचन प्रेरणा उपक्रम राबवण्यात आला आहे. ह्या उपक्रमाच्या पहील्याच दिवशी विद्यार्थांना गोष्टीची पुस्तकांचे वाचनालय दाखवण्यात आले. त्यासोबत विद्यार्थांनी पुस्तके सहजच हाताळण्याचा प्रयत्न केला. अश्या प्रकारे रोज नव नवीन उपक्रम जसे वर्णमाला, गोलातल्या गप्पा, कौटुंबिक कथा, वेशभुषा , फळे आणि फुले, लोककथा, हावभावयुक्त कथा व कविता, बोलणे, पुन्हा पुन्हा गोष्ट वाचणे दिनदर्शिका वाचन असे उपक्रम राबवण्यात येत आहेत.



कचरा व्यवस्थापन व स्वच्छता उपक्रम :- शाळेत प्लास्टिक कचरा संकलन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी विकसित होऊन परिसर कचरामुक्त झालेला आहे.



वृत्तपत्रांनी घेतलेली शालेय कामाची दखल

दैनिक (Marathi Daily)
खान्देश खबर

दसवड जि.प.शाळेत विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट!

वृक्ष लागवड करत पर्यावरण रक्षणाचा ही दिला संदेश शिक्षकांच्या प्रेरणादायी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक



➤रांझणी । दै.खान्देश खबर

दसवड शाळेतील गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना शिक्षकांनी स्वखर्चाने शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देत, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले आहे. तसेच वृक्षारोपण करत पर्यावरण संरक्षणाचे प्रेरणादायी कार्य ही केले आहे. शिक्षकवृंदाने केलेल्या या कार्याचे पालकवर्गाकडून तसेच ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

तळोदा तालुक्यातील दसवड येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक व सहयोगी शिक्षकांनी स्वखर्चातून इयत्ता पहिल्याच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले.यावेळी मुख्याध्यापक उमेशकुमार पाडवी म्हणाले,की आपल्या पाल्याच्या अंगी गुण असूनही ग्रामीण भागातील अनेक पालकांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्याने त्यांना शालेय साहित्य घेणे शक्य होत नाही. नुकत्याच शाळा सुरू झाल्या आहेत.त्यामुळे मुलांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक साहित्य घेणे गरजेचे आहे. अश्या वेळी आई-वडिलांच्या डोक्यावर असलेला शैक्षणिक खर्चाचा भार कुठेतरी कमी व्हावा या भावनेतून आम्ही स्वखर्चाने मुलांना ही शैक्षणिक साहित्याची भेट दिली आहे.विशेष म्हणजे विध्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी व त्यांचा उत्साह वाढला पाहिजे हा ही उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. सदर उपक्रम राबविण्यात शाळेचे मुख्याध्यापक उमेशकुमार पाडवी, शिक्षिका इंदिराबाई मारनर, शिक्षक नटराज रावताळे यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे.यावेळी मुख्याध्यापक श्री.पाडवी व शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाटी, वह्या, पेन्सिल बॉक्स, दप्तर, अंकलिपी, रबर,असे विविध शालेपयोगी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. विध्यार्थ्यांना शिक्षकांकडून शैक्षणिक साहित्याची भेट मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते.

५० वृक्ष लागवड करत पर्यावरणाचा संदेश!

दसवड येथील जि.प. शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप सोबतच इको क्लब फॉर मिशन लाईफ अंतर्गत एक पेड मा के नाम ही मोहिमही राबविण्यात आली. मुख्याध्यापक उमेशकुमार पाडवी व शिक्षकांनी स्वखर्चाने दहा हजार रुपये किमतीची विविध प्रकारची ५० झाडे खरेदी करून,ती गावातील मान्यवर व गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते प्रांगणात लावली.या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात येत आहे..

दैनिक (Marathi Daily)
खान्देश खबर

दसवड शाळेचे विद्यार्थिनींचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश!
जि.प.शाळेने तिसऱ्या वर्षी गुणवत्ता यादीत केली हॅट्रिक!!



निमिषा मिलेश ठाकरे जिल्ह्यात 23 वा क्रमांक | वैष्णवी राजेश वसावे जिल्ह्यात 26 वा क्रमांक | पल्लवी दिपक सामुद्रे जिल्ह्यात 27 वा क्रमांक | अश्विनी अंबालाल वळवी जिल्ह्यात 52 वा क्रमांक | रविता पिंट्या राहसे जिल्ह्यात 59 वा क्रमांक

➤रांझणी । दै.खान्देश खबर

दसवड जिल्हा परिषद शाळेच्या विध्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे.विशेष म्हणजे गेल्या दोन वर्षांपासूनची यशाची परंपरा कायम ठेवत तिसऱ्या वर्षी देखिल यश प्राप्त केले आहे.त्यामुळे शिष्यवृत्ती परिक्षेत यशाची हॅट्रिक केल्याने शाळेच्या नावलौकिकात भर पडली असून विध्यार्थी व शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नुकतीच सन २०२४-२०२५च्या शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर झाली आहे. सदर गुणवत्ता यादीत तळोदा तालुक्यातील दसवड जिल्हा परिषद शाळेच्या ६ पैकी ५ विद्यार्थी हे जिल्हा गुणवत्तायादीत आले आहेत.विशेष म्हणजे गुणवत्ता यादीत सलग तिसऱ्या वर्षी विध्यार्थ्यांनी यश प्राप्त करत यशाची हॅट्रिक केली असून शाळेचा शंभर टक्के निकाल लागला आहे.गुणवत्ता यादीत निमिषा मिलेश ठाकरे ही जिल्ह्यात २३ वा क्रमांक, वैष्णवी राजेश वसावे जिल्ह्यात २६ वा क्रमांक, पल्लवी दिपक सामुद्रे - जिल्ह्यात २७ वा क्रमांक ,अश्विनी अंबालाल वळवी जिल्ह्यात ५२वा क्रमांक, रविता पिंट्या राहसे - जिल्ह्यात ५९ वा क्रमांक प्राप्त करत उत्तीर्ण झाले आहेत.यशस्वी विध्यार्थ्यांना मुख्याध्यापक उमेश पाडवी तसेच सहकारी शिक्षक नटराज शिवाजी रावताळे व श्रीमती इंदिराबाई हरी मारनर ह्यांचे मोलाचे मार्गदर्शन राहिले आहे.यशस्वी विध्यार्थ्यांचे शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत दसवड व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नंदुरबार आवृत्ती
epaper.deshdoot.com
05 Jul 2025 - Page 5

चेतन इंगळे

शिक्षकांच्या पुढाकाराने दसवड येथील जि.प.शाळेचे रुपडे पालटले

स्वखर्चाने रुक्ष असलेल्या शाळेच्या भिंती केल्या बोलक्या, रंगरंगोटीमुळे शाळेचे वातावरण बनले आल्हाददायक

■ **तळोदा । ता.प्र./श.प्र. -**

जिल्हा परिषदेच्या शाळेची दुरावस्था व अनास्था बाबत नेहमीच समाजातून टीका केली जाते. पण काही शाळा याला अपवाद असतात. अशीच तालुक्यातील दसवड येथील जिल्हा परिषद शाळा आहे. या शाळेतील शिक्षकांनी केलेल्या अथक परिश्रमाचे फळ म्हणजे शाळेचे पूर्णतः रुप पालटले आहे. शाळेच्या जीर्ण व रुक्ष भिंती आकर्षक रंगरंगोटी व बोलके चित्रे यामुळे शाळेच्या भिंती बोलक्या झाल्या आहेत. परिणामतः लहान मुले आनंदी वातावरणात शिक्षण घेत आहेत. शाळेच्या शिक्षकांनी आपल्या परिश्रमाने कायापालट केल्यामुळे परिसरातील विद्यार्थ्यांचे पालक व नागरिकांकडून शाळेच्या शिक्षकांचे कौतुक केले जात आहे.

दसवड येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण दिले जाते. जिल्हा परिषदेची शाळा म्हणजे पडक्या भिंती, गळके छत, जीर्ण खोल्या व अस्वच्छता असे काहीसे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. परंतू शाळेचे मुख्याध्यापक उमेशकुमार पाडवी यांनी शाळेतील जीर्ण खोल्या, पडक्या भिंती व रंगाअभावी इमारतीतील रुक्षपणामुळे आलेली मरगळ दूर करण्याचा दृढ निश्चय केला. त्यांनी लोकसहभागातून शाळेचा कायापालट करण्याचे ठरविले. यासाठी दसवड गावाचे सरपंच सौरभ ठाकरे यांना



विश्वासात घेत शाळेचे रुप बदलण्यासाठी चर्चा केली.


जिल्हा परिषद यांच्याकडे शाळेच्या इमारत दुरुस्तीसाठी प्रस्ताव पाठवून निधी मिळवण्यात यश प्राप्त केले. तद्नंतर शाळेच्या पडक्या भिंती, शाळेचे छत, प्रसाधन गृह, जीर्ण खोल्या यांच्या डागडुगीसाठी काम हाती घेऊन ते पूर्णत्वास नेले. लहान विद्यार्थी बालकांना आकर्षित, रम्य वातावरण व शिक्षणास पोशख बनविण्यासाठी सर्वप्रथम शाळेच्या इमारतींच्या पडक्या व जीर्ण भिंती यांचे नवीन बांधकाम करण्यात आले. त्या भिंती व खोल्या यांची रंगरंगोटी करून लहान बालकांचे सचित्रे काढून त्यात समग्र शिक्षा अभियान, सारे शिकूया पुढे जाऊया, शाळा म्हणजे ज्ञानाच्या खजिना होय, ज्ञानाची चावी यशाचे दरवाजे उघडते, असे सुविचार लिहिले. त्यामुळे पूर्वी शाळेच्या भिंती या निर्जीव व रुक्ष होत्या. त्या आता रंगरंगोटी व विविध शिक्षण जागरूकता करणारे सचित्रे काढून याभिंती बोलक्या केल्यात. शाळेचा परिसर स्वच्छ केला. प्रसाधन गृह स्वच्छ केले. शाळेत सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला. यामुळे संपूर्ण जीर्ण शाळेचे रूप बदलून शाळेची इमारत आकर्षक व बोलती केली. त्यामुळे या शैक्षणिक वर्षा पासुन लहान लहान बालके अधिक समरसतेने व आनंदाने शिक्षण ग्रहण करू लागले आहेत.

ही इमारत अत्यंत सुंदर व बालकांना आकर्षित बनविण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक उमेशकुमार पाडवी, शिक्षिका इंदिराबाई मारनर, शिक्षक नटराज रवताळे, सरपंच सौरभ ठाकरे, ग्रामसेवक खैरनार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर पाटील यांनी परिश्रम घेतलेत.

आभार -

जि. प. प्रा. शाळा दसवड शाळा आभार व्यक्त करत आहे. संपुर्ण उपक्रमात सतत सहभागी घेणारे विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडी सेविका, मदतनीस, स्वयंपाकी काकी, पालक व ग्रा.पं.सदस्य तसेच मोलाचे सहकार्य करणारे शा.व्या.समिती अध्यक्ष व सदस्य आणि वेळोवेळी आम्हा शिक्षकांना मोजकेच परंतू खूप महत्वाचे मार्गदर्शन करणारे तळवे केंद्राचे केंद्रप्रमुख सन्मा. जाधव सरांचे आभार तसेच तळवे केंद्रातील शिक्षक श्री.पाडवी सर, श्री.पाटील सर, श्री.वळवी सर, श्री.रोडगे सर आणि शाळेचे सहकारी शिक्षक श्री. नटराज रावतळे सर, श्रीम.इंदिराबाई मारनर, आमचे मित्र श्री.अरूण पवार सर यशोगाथा तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणारे आपणा सर्वांचे खुप खुप धन्यवाद!

----------**----------



लोकसहभागातून विद्यार्थी विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा वरूळ, केंद्र शिंदे ,ता.जि.नंदुरबार

शाळेचा ईमेल आय डी - zpschoolvarul55@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री अनिल शिवाजी माळी

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ७५८८५१७२६८

मुख्याध्यापक ईमेल आयडी - anilsmali1984@gmail.com




लहरोंसे डर कर नौका पार नही होती
कोशिश करनें वालो की कभी हार नही होती ।

शाळेतील मुलांची गुणवत्ता वाढवण्यासाठी पालक व ग्रामस्थांचे सहकार्य महत्त्वाचे असते, ज्या वेळेला गावातील लोक प्रत्यक्ष शाळेत येऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत विचारणा करतात तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी समाजातील एक घटक म्हणून एक पालक म्हणून काय काय करता येईल यासाठी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती यांच्याशी चर्चा करून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासित करतात त्या वेळेला खऱ्या अर्थाने शाळेचा शैक्षणिक तथा सामाजिक विकास होण्यास मदत होत असते. शाळेत परिपूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे ही गावातील नागरिकांची पर्यायाने ग्रामपंचायतची जबाबदारी असते. यासाठी लोकसहभागातून तथा ग्रामपंचायत निधीतून शाळेसाठी लागणाऱ्या सर्व भौतिक सुविधा विद्यार्थ्यांना लागणाऱ्या शैक्षणिक गरजा यांची पूर्तता कशी करता येईल यासाठी वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांच्याशी चर्चा करून वेळप्रसंगी गावात सभेचे आयोजन करून सर्व नागरिकांना तथा विद्यार्थ्यांच्या पालकांना एकत्रित करून शाळा हा घटक कसा जास्तीत जास्त विकसित करता येईल त्यासाठी काय काय प्रयत्न करावे लागतील याची चर्चा करून घेणे म्हणजेच काय तर लोकसहभागातून शाळा विकसित करणे आहे.

भौगोलिक परिस्थिती- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरूळ केंद्र शिंदे तालुका नंदुरबार ही नंदुरबार पासून जवळपास 12 किलोमीटर अंतरावर शाळा आहे. वरुळ हे साधारणतः एक छोट खेडेगाव असून गावाची लोकसंख्या जवळपास हजार पर्यंत आहे. गावातील जास्तीत जास्त लोक हे शेतमजूर आणि कामगार आहेत. गावात तसे पाहता शिक्षणाचे प्रमाण फारच कमी असल्याने गावातील बरेचसे लोक मजुरीसाठी बाहेरगावी जात असतात. गावातील सर्व लोक हे आदिवासी समाजाचे आहेत. शाळेतील आजची एकूण पटसंख्या 60 आहे.

व्यक्ती परिचय- गावातील सर्वच नागरिक शाळेच्या विकासासाठी नेहमी प्रयत्नशील असतातच परंतु गावातील श्री कैलास सुनील, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तथा गावाचे सरपंच गुलाब रतन भिल हे शाळेच्या विकासासाठी नेहमी पुढे येत असतात. गावातील नागरिकांना शाळेचे महत्त्व विद्यार्थ्यांना का शिकवावं याचे महत्त्व विद्यार्थी शिकला तर गावाचा विकास कसा होईल याचे महत्त्व वेळोवेळी पालक सभेतून तसेच ग्रामसभेतून मांडून लोकांना या शैक्षणिक चळवळीमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा देऊन त्यांच्याकडून वेळोवेळी काम करून घेत असतात.




सुरुवातीची परिस्थिती- शाळेतील मुख्याध्यापक श्री अनिल माळी सर व उपशिक्षक श्री दयानंद जाधव सर यांनी जून 2018 मध्ये जिल्हा परिषद शाळा वरुड येथे बदलीने पदस्थापना घेतली. ज्या वेळेला श्री माळी सर यांनी शाळेत पहिले पाऊल टाकले त्यावेळी शाळेची परिस्थिती खूपच भयाण होती. शाळेत संपूर्ण कचरा, गावातील गुरे शाळेत बांधले जात होते, गावातील लोक शाळेच्या पटांगणामध्ये बसून पत्ते खेळत असत, शाळेच्या स्वच्छतागृहामध्ये दारूच्या बाटल्या, सर्व ठिकाणी घाणच घाण होती. यापूर्वी शाळा सुधारण्यासाठी अगोदरच्या शिक्षकांनी वेळोवेळी प्रयत्न केलेच होते परंतु पाहिजे तसे यश आले नाही. मात्र मुख्याध्यापक श्री अनिल माळी सर यांनी सर्व पालकांना बोलावून, शाळा म्हणजे नेमकं काय असते, शाळेचे तुमच्या जीवनातील महत्त्व, शाळेतील विद्यार्थी शिकला तर तुमचं घर, कुटुंब, गाव, समाज कसा विकसित होईल याची वेळोवेळी माहिती पटवून दिली त्यासाठी गावात विविध झालेल्या सुधारणा यांचे व्हिडिओ आणि माहितीपत्रके गावासमोर वाचून दाखवली. सुरुवातीला श्री माळी सर व जाधव सर यांना शाळेतील परिस्थिती बदलण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. शाळेत कुठल्याच प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध नव्हत्या त्यामुळे शाळेची तोडफोड, शाळेचे नुकसान झालेलं होतं.

ज्ञानप्रकाश फाउंडेशनचे योगदान - ज्ञान प्रकाश फाउंडेशन हे नेहमीच शाळेचा विकास याबाबत जागरुक असतात यासाठी ज्ञानप्रकाश फाउंडेशनचे सदस्य यांनी मुख्याध्यापक व उपशिक्षक यांच्याशी संपर्क साधून शाळेची भौतिक सुविधा तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवण्यासाठी करावयाचे नियोजन व त्याच पद्धतीने गावातील विद्यार्थ्यांचे होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी काय काय उपाययोजना करण्यात येतील यासाठी गावात वेळोवेळी ग्रामपंचायत इमारत तसेच शाळा व्यवस्थापन समिती मार्फत सहभाग घेऊन तेथे लोकांना वेळोवेळी मार्गदर्शन करून आपल्या गावातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शाळेची गुणवत्ता गावातील, समाजातील लोकांची मानसिकता, शाळेविषयी असलेली त्यांची नकारात्मक मानसिकता कशी बदलता येईल यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले. ठीकठिकाणी सभा घेतल्या ज्ञानप्रकाश फाउंडेशनने इतर गावांमध्ये कशा पद्धतीने बदल घडवून आणले त्याची उदाहरणे दिली, काही व्हिडिओ सभेमध्ये दाखवले आणि त्यातून खऱ्या अर्थाने लोकांमध्ये, समाजामध्ये खूप बदल झाला. आज गावातील प्रत्येक नागरिक शाळा हे माझे घर आहे, शाळेतील शिकणारा बालक हा माझाच आहे याप्रमाणे शाळेविषयी आणि विद्यार्थ्यांविषयी आणि त्याच्या गुणवत्तेविषयी नेहमीच जागरूक होऊन शाळेला ज्या ज्या वेळेला पालकांची, समाजातील घटकांची आवश्यकता असेल त्या त्या वेळी ते उपस्थित असतात. शाळा विकासामध्ये ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांनी एकत्रित प्रयत्न केले तर शाळेचा विकास व्हायला वेळ लागणार नाही हाच विश्वास देऊन मागील पाच वर्षात शाळेमध्ये




बदल करायला सुरुवात केली. शाळेचे महत्त्व सर्वप्रथम पालकांना पटवून दिले, वेळोवेळी मुलांना शिक्षण घेणे का गरजेचे आहे याचे देखील महत्त्व पटवून दिले लोकसहभागातून संपूर्ण शाळेची साफसफाई करून शाळेजवळ असलेल्या गटारी आणि रस्ते यांची स्वच्छता करून आज शाळेचे वातावरण अतिशय सुंदर आणि मोहक करण्यात पालकांचा सहभाग फाउंडेशनच्या मार्फत घेण्यात आला.

सद्यस्थिती - जून 2018 ते आज सप्टेंबर 2023 या साडेपाच वर्षाच्या कालावधीमध्ये शाळेची संपूर्ण कायापालट झालेली आहे जून 2018 मध्ये असलेली शाळेचे परिस्थिती आणि आजची परिस्थिती यात खूप सारे बदल झालेले आहेत पूर्वी शाळेमध्ये कुठल्याही प्रकारची भौतिक सुविधा उपलब्ध नव्हती आज शाळेत संपूर्ण भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. श्री मुख्याध्यापक श्री अनिल माळी सर यांनी वेळोवेळी शाळेसाठी लागणाऱ्या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी जिल्हा प्रशासन तसेच ग्रामपंचायत तसेच एनजीओ यांच्यामार्फत संपर्क साधून ज्या ज्या गोष्टी शाळेला मिळवता येतील त्यासाठी प्रयत्न करून सर्वच्या सर्व वस्तू आज शाळेमध्ये उपलब्ध करून शाळा ही खऱ्या अर्थाने सर्व संपन्न आणि सुंदर तयार केलेली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे शिकता आहे यासाठी श्री माळी सर यांनी पुणे कंपनी लिमिटेड यांच्याकडून विद्यार्थ्यांसाठी चार संगणक उपलब्ध करून त्या संगणकाच्या आधारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञान दिले जात आहे. शाळेला आवर्जून केल्यामुळे शाळेत आज खूप छान प्रकारे झाडे आणि गार्डन विकसित झालेले आहे विद्यार्थ्यांना हात धुण्यासाठी सुंदर असे हॅन्डवर स्टेशन शाळेत बांधण्यात आला आहे. मुले आणि मुली यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह शाळेत उपलब्ध करून घेण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांना सकस आणि पोषक आहार मिळावा यासाठी शाळेतच छान अशी एक परसबाग तयार करण्यात आली आहे त्यामध्ये वेगवेगळ्या भाजीपाला लागवड करून तो विद्यार्थ्यांच्या मध्यान भोजन योजनेमध्ये वापर केला जातो. शाळेत झालेला बदल त्याचप्रमाणे शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता लक्षात घेऊन मागील वर्षी श्री दयानंद जाधव सर यांना नंदुरबार जिल्हा परिषद मार्फत जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले तर मुख्याध्यापक श्री अनिल माळी सर यांना सन 2023 चा महाराष्ट्र राज्य शासनाचा क्रांतीज्योती राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात आलेले आहे.शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षात शासनामार्फत राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात नंदुरबार तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवून शाळेसाठी तीन लक्ष रुपये पारितोषिक मिळाले आहे.



प्रतिक्रिया

1.शाळेत विषय नवीन उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचे उपस्थिती 100% टिकवली जाते व शाळेत विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण उपक्रमातून शैक्षणिक गुणवत्ता विकसित केली जात आहे शालेय परिसर आनंददायी व शिक्षण पूर्ण करण्यासाठी मुख्याध्यापक यांनी वेळोवेळी पालक समाधान त्यांच्याच माध्यमातून शाळेची भौतिक परिस्थिती ही खूप सुधारली आहे त्यामुळे शालेय परिसर प्रसन्न आणि विद्यार्थ्यांना आवडीचा वाटू लागला आहे त्याचा परिणाम असा झाला विद्यार्थी आता घरी न राहता शाळेत येण्यासाठी प्रयत्न करत असतात. केंद्रप्रमुख मनोज पवार केंद्र शिंदे, ता.जि.नंदुरबार

2 गावातील 2018 पूर्वीची शाळा आत्ताची शाळा यात खूप सारे बदल झाले असेल शाळेमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवण्यासाठी फक्त विद्यार्थ्यांसाठीच नाही तर गावातील पालकांसाठी देखील विविध प्रकारच्या स्पर्धा आणि उपक्रमाचे आयोजन करून तर पालकांचा सहभाग घेऊन त्यांच्याकडून देखील शाळेसाठी जास्तीत जास्त मदत कशी करून घेता येईल यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले जात असतात

सरपंच - श्री.गुलाम रतन बिल

<u>पुर्व स्थिती</u>









नंतरची स्थिती









सुरवातीला आलेल्या अडचणी –

१-मुलांची उपस्थिती कमी असणे

२-मुलांची गुणवत्ता कमी जाणवली

३-पालकांचे शाळेविषयी असलेली उदासीनता

४-शालेय इमारतीत बदल करणे आवश्यक होते

५-वर्ग खोल्यांची दुरुस्ती

६-स्वच्छतागृहाची दुरुस्ती करणे

७-शाळेला आवार भिंत बांधणे

८-शालेय परिसर बोलका करणे

९-अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा अभाव

१०-मुलांच्या आरोग्यात व पोषणात सुधारणा आवश्यक

११-शालेय परिसर आनंददायी करणे

करावयाचे बदल -

१) शालेय इमारत बोलके करणे (मुलांच्या अध्ययनात शालेय इमारत एक शै.साधन म्हणून वापरले जावे.

२) शालेय परिसर हिरवळीचे व रम्य करणे.

३) मुलांचे पोषण अधिक दर्जेदार होण्यासाठी सेंद्रीय परसबागेची निर्मिती करणे.

४) कोविड काळातील मुलांच्या अध्ययनात झालेले नुकसान भरून काढुन त्यांचा अध्ययन विकास साधणे.

५) अध्ययनात व अध्यापनात दृकश्राव्य (तंत्रज्ञानाचा) वापर करणे.




शिक्षकांनी केलेले प्रभावी काम :-

बोलक्या भिंती एक शैक्षणिक साधन :-



विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी शाळा हे खास ठिकाण आहे. विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आरामदायक वातावरण आणि अनुभव हे महत्वपूर्ण भुमिका बजावतात. शाळेतील भौतिक वातावरण हे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी लाभदायक ठरते आणि यासाठी आपण बोलक्या भिंती एक शैक्षणिक साधन म्हणून वापर करु शकतो. जसे शाळेतील वर्ग, येण्याजाण्याची जागा, बाह्यपरिसर, भिंती, रंगरंगोटी, दरवाजे, खिडकी यांचा वापर विद्यार्थ्यांना मजेदार पद्धतीने शिकविण्यासाठी करता येतो. शाळेचा भौतिक परिसर हा शिक्षणप्रक्रियेत एक महत्वाचा घटक होऊ शकतो. पण याचा आतापर्यंत कुणीच गंभीरपणे विचार केला नाही. त्यामुळे या संकल्पनेचा उपयोग करण्याचे, विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत बोलक्या भिंती एक शैक्षणिक साधन चा वापर करण्याचे ठरविले..



सुरुवातीला या उपक्रमाची माहिती शाळा व्यवस्थापन समिती सभेमध्ये मुख्याध्यापक अनिल माळी सर् यांनी दिली. विद्यार्थ्यांची दैनंदिनी उपस्थिती व गुणवत्ता तसेच शाळेचे भौतिक विकास साधण्यासाठी हा उपक्रम आपल्या शाळेत राबविणे गरजेचे असल्याचे मुख्याध्यापकांनी सभेला सांगितले. त्यानंतर सभेमध्ये उपक्रमाच्या संपूर्ण खर्चाची चर्चा





करण्यात आली व या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी आवश्यक लोकसहभाग मिळणे यावर चर्चा करण्यात आली. यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी गावातील दानशुर व्यक्ती व शाळेविषयी आपुलकी असलेल्या पालकांचा शोध घेण्याचे सभेला सांगितले. या सभेनंतर या उपक्रमाची माहिती पालकांना देण्यात आली. ग्रामपंचायत वरूळ यांनी एक वर्ग खोली दुरुस्ती करून देण्याचे घोषित केले.त्यानंतर सभेमध्ये लोकसहभागातून सुरुवातीला पुढील पंधरा दिवसात काम सुरु करण्यात आले.

i) प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांचे स्तर निश्चित करून मुल निहाय नियोजन करणे:-

जिल्हा परिषद वरूळ शाळेत एकूण १ ते ४ वर्ग आहेत. प्रत्येक वर्गातील वर्गशिक्षकांच्या मदतीने जास्तीत-जास्त मुलांचे काठिण्यपातळी समजुन घेवून मुलांचे पायाभूत संकल्पना साधता येतील. त्याचबरोबर प्रत्येक वर्गातील अभ्यासक्रमाचा विचार करुन प्रत्येक वर्गात रंगकाम करण्याचे ठरविले गेले.





II) प्रत्यक्ष अंमलबजावणी : शाळेच्या इमारतीवर व आवार भिंतीवर कोणत्या प्रकारच्या बोधात्मक डिझाईन्स, बालचित्रे असायला हवी त्यासाठी कच्चा आराखडा तयार करण्यात आला. व पुढील २ ते ३ दिवसात प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली. चारही इयत्तेचा विचार करुन अध्ययनात उपयोगी पडेल अश्या चित्रांचा समावेश शाळेच्या संरक्षण भिंतीवर रंगवण्यात आला. यामध्ये मी कसा दिसतो, रोजची दिनचर्या, दिवस उगवतांनाचे सूर्यचित्र, इंग्रजी व मराठी सुविचार, मराठी आणि इंग्रजी विषयांच्या शब्दांचा समुह तसेच लहान मुलांना आवडणाऱ्या कार्टून्स, थोर महापुरुषांचे चित्रे, आकाशगंगा, इंग्रजी लिपी, ऋतुचक्र सातवारांची छोटी रेल्वेगाडी, शब्दांची रेल्वेगाडी, भौमितीक आकृत्या, स्वच्छातागृहावर स्वच्छतेचे प्रतिक, स्वच्छतेचे संदेश, पर्यावरण वाचवा, निसर्गचित्रे, हवेचे प्रदुषण थांबवण्यासाठी संदेश चित्र, तसेच वर्गाच्या बाह्यभिंतीवर कॉलमवर 'वारली' पेंटींग करण्यात आली. प्रत्येक वर्गाची गरज बघुन भाषा, गणित, इंग्रजी व सामाजिकशास्त्रे याविषयांमधील अध्ययन निष्पत्तीचा विचार करुन या गोष्टींची चित्रे वर्गात रंगवण्यात आले. तसेच वर्गात ज्ञानरचनावादावर आधारित विविधप्रकारचे आरेखन, बेरीज-वजाबाकी, गुणाकार-भागाकार, आकृत्या, पाठ्यांचा सराव, वर्णमाला, शब्दपट्टया, बाराखडी अशा विविध गोष्टींचा समावेश वर्गात करण्यात आला. शाळेचे चारही वर्ग (अंतरंग व बाह्यरंग) शाळेची आवारभिंत रंगवल्यांनतर शाळेचे उपलब्ध प्रवेशद्वार अबोल होते ही बाब समजुन घेऊन प्रवेशद्वार बोलके आणि आकर्षक करणे महत्वाचे होते. प्रवेशद्वाराच्या रंगकामाचे कच्च्या स्वरुपात नियोजन करुन प्रवेशद्वार रंगवण्याचे काम सुरु करण्यात आले. प्रवेशद्वारावर भव्य स्वरुपात शाळेचे नाव, स्थापना दिवस लिहुन मुलांना आकर्षक दिसेल अश्या स्वरुपात प्रवेशद्वार रंगवण्यात आले.

अध्ययनात व अध्यापनात दृकश्राव्य (तंत्रज्ञानाचा) वापर करणे :-

पालक सभेत गावातील पालकांना अध्ययन-अध्यापनाचे महत्व पटवून सांगितले. मुलांना अभ्यासातील काठीण्य पातळी समजून येण्यासाठी व गणितीय संबोध स्पष्ट होण्यासठी त्याचबरोबर जगातील चालु-घडामोडी माहित होण्यासाठी अध्ययनात व अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करणे महत्वाचे असते असे सभेत सांगितले. पालकांनाही ही गोष्ट समजून आली. प्रत्येकांनी यासाठी वर्गणी देण्याचा निर्धार केला. त्यामध्ये मी स्वत:१००००/- रु. जमवून एकूण

२५,०००/- रु. निधीतून शाळेसाठी डिजीटल टीव्ही खरेदी करण्यात आले आणि शाळेत एक डिजीटल वर्ग सुरु करण्यात आला.





याच बरोबर शाळेची गरज ओळखून व पाठपुराव्यातून शाळेला एक व्हर्चुअल टी.व्ही. संच प्राप्त झाले आणि शाळेतील एकूण तीन वर्ग डिजीटल म्हणुन सुरु झाले. आज प्रत्येक वर्गातील मुले स्वतः सर्व डिजीटल साहित्य ऑपरेट करतात आणि त्यातील माहिती जाणून घेतात व कुठे अडचणी आल्या तिथे आम्ही मुलांना मार्गदर्शन करत असतो.

कोविड काळातील अखंड शिक्षण व विध्यार्थी गुणवत्ता वाढ विकास कार्यक्रम :-

कोविड काळातील झीज भरुन काढण्यासाठी व या काळात प्रत्यक्ष स्वरुपात शाळा बंद-सुरु अवस्थेत होत्या. यामुळे मुलांच्या अध्ययनात खंड पडला होता. तो खंड भरुन निघावा याशिवाय वरूळ गावातील काही कुटुंब रोजगार मिळवण्यासाठी परराज्यात स्थलांतरीत होत असे व त्यांच्याबरोबर मुलांचे देखील स्थलांतर व्हायचे आणि हे मुलांचे होणारे स्थलांतर थांबवायचे होते त्यामुळे मी व शाळेचे शिक्षक यांनी वेळोवेळी पालक सभा घेऊन तसेच पालकांच्या घरी जाऊन त्यांना मुलांना सोबत घेऊन जाऊ नये साठी सांगण्यात आले.जर खरोखर जाणे गरजेचे असेल तर मुलांना नातेवाईक यांच्याकडे ठेऊन जावे असे सांगण्यात आले. मुलांची सर्वस्वी जबाबदारी मुख्यध्यापक या नात्याने स्वीकारली. कोविड काळात सर्व गोष्टींची काळजी घेऊन विद्यार्थ्यांना अध्ययन सुरु ठेवले. कधी शेतात तर कधी गावातील मोकळ्या परिसरात विद्याथी शिकत होते. कोणत्याही परिस्थितीत शाळा सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला.





पुस्तक आपल्या घरी व तरंगते वाचनालय उपक्रम :-

मुलांच्या वाचनात सुधारणा व्हावी यासाठी मी व शाळेतील शिक्षकांनी (सहकारी) यांनी दर शनिवारी वाचन उपक्रम घेण्याचा निर्णय घेतला यासाठी लोकसहभागातून शाळेला जवळपास २५० पुस्तके प्राप्त झाली होती यांचा वापर या दिवशी करण्याचा आम्ही निर्णय घेतला व हा उपक्रम आम्ही सुरु केला. यामध्ये शाळेतील ग्रंथालयाचा वापर, मासिकांचा वापर, वृत्तपत्रांचा वापर व शालेय पाठ्यपुस्तकांचा वापर करुन घेण्याचा आम्ही ठरवले. थोड्याच महिन्यात याचा फायदा शाळेला झाला. या उपक्रमामुळे मुलांचे वाचन समृद्ध व विकसित झाले. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून शाळेत निसर्गरम्य वातावरणात वाचन कट्टा तयार करण्यात आला.तिथे विद्यार्थी त्यांना हव ते पुस्तक घेऊन वाचन करतात.





पालकांसह विद्यार्थी यांची एकत्रित शैक्षणिक सहली व क्षेत्रभेटी यातून शाळाबाह्य शिक्षण उपक्रम :- पालक सह विद्यार्थी यांचे एकत्रित शैक्षणिक सहली व क्षेत्रभेटी यातून शाळाबाह्य शिक्षण उपक्रम - विद्यार्थ्यांसोबतच पालकांना देखील कुतूहल असतं की आपले विद्यार्थी कसे शिकतात, काय शिकतात, कोणत्या पद्धतीने शिकतात. म्हणून बऱ्याच वेळेला पालक हे शाळेमध्ये येऊन आपल्या विद्यार्थ्यांची विचारपूस करतात चौकशी करत असतात शिक्षकांची भेट घेऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबाबत विचार करत असतात. शिक्षण ही एक बंदिस्त प्रक्रिया नसून फक्त चार भिंतीत किंवा शालेय वातावरणामध्येच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ होईल असं नाही तर बऱ्याच वेळेला आहे त्या गोष्टीपेक्षा आणखीन इतर जास्तीत जास्त कसं शिकवून घेता येईल प्रत्यक्ष अनुभवातून कसे शिक्षण घेता येईल यासाठी विद्यार्थ्यांना शाळेच्या बाहेर नेणं गरजेचं असतं आणि अशावेळी त्यांच्या पालकांना जर आपण सोबत नेलं तर नक्कीच पालकांना त्या गोष्टीचा एक अभिमान असतो की माझ्या विद्यार्थ्यांना किंवा माझ्या पाल्याला शाळेतील शिक्षकांसोबतच मलाही उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली त्यामुळे एक तर फायदा असा होतो की विद्यार्थ्यांचा आपल्याला सांभाळण्याचा थोडासा कमी होतो आणि विद्यार्थी हा पालकांसोबत असल्याकारणाने तो त्यांच्याबरोबरच असतो आणि सांभाळलाही जातो त्याचबरोबर प्रत्यक्ष जेव्हा क्षेत्रभेटी होत असतात किंवा शैक्षणिक सहल आयोजित केली जाते त्यावेळी एक वेगळा उत्साह पालकांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये असतो हे कुतूहल दोघांमध्ये असतं आणि त्याच गोष्टीचा फायदा घेऊन आपल्याला पालकांना देखील या उपक्रमामध्ये सहभागी करता येत आहोत शाळेने आतापर्यंत विविध ठिकाणी शैक्षणिक सहलीचे आणि क्षेत्रभेटीचे आयोजन केले. खरंतर हे विद्यार्थी आजपर्यंत कधीही बाहेर पडलेले नव्हते अशा विद्यार्थ्यांना अगदी तालुका नाही जिल्हा नाही तर जिल्ह्याच्या बाहेर अगदी राज्याच्या बाहेर देखील शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात आलं त्यात विद्यार्थ्यांना ऐतिहासिक किल्ले असतील . लेण्या असतील द-याखो-या डोंगर यांचा प्रत्यक्ष त्यांच्या सहवासात जाऊन त्यांना त्याची माहिती दिली गेली. इको पॉइंट काय असतो हे विद्यार्थ्यांना वर्गात बसून शिकवता येणार नाही तर प्रत्यक्ष तोरणमाळ सारख्या ठिकाणी दरीत आवाज दिल्यानंतर त्याचा उलट आवाज कसा येतो हे उदाहरण द्यायचं झालं तर त्यांना त्याच ठिकाणी न्यावं लागतं त्याचप्रमाणे ऐतिहासिक किल्ले हे कशा असतात त्यासाठी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना किल्ल्यावर न्यावं लागतं आणि शाळेने आजपर्यंत धारेश्वर गुजरात त्यानंतर सापुतारा सुरत येथे प्रत्यक्ष प्राण्यांना बघण्याची संधी उपलब्ध करून




दिली त्यानंतर औरंगाबाद येथे द्रोनागिरी किल्ला असेल वेरूळच्या लेण्या असतील या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांनी जवळून बघितले आणि त्यातच पालक सोबत असल्याने त्यांना खऱ्या अर्थाने एक वेगळा आनंद झालाआणि इथून पुढे अशा कुठल्याही उपक्रम असतील तर पालकांना आवर्जून शाळेने समावेश करावा अशी त्यांची सूचना आमच्यापर्यंत येऊन पोहोचली आणि प्रत्येक वेळेला आम्ही या पालकांना सोबत घेऊन जात असताना शिक्षकांमधील आणि विद्यार्थ्यांमधील अंतर कमी झालं, पालकांमधील शिक्षकांमधील अंतर कमी झालं आणि खऱ्या अर्थाने शैक्षणिक गुणवत्तेला वाव देणारा उपक्रम हा या क्षेत्रभेटी आणि शैक्षणिक सहली या माध्यमातून पार पाडण्यात आला.



लोकमत

वरूळ व सुजालपूर जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांची क्षेत्र भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

विद्यार्थ्यांना ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती व्हावी यासाठी सहल काढण्यात आली.

नंदुरबार : तालुक्यातील शिंदे केंद्रातील वरूळ व सुजालपूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शैक्षणिक क्षेत्र भेट वेरूळ घृष्णेश्वर, भद्रा मारुती, देवगिरी किल्ला व अहिल्यानगर जिल्ह्यातील देवगड सोनई काच मंदिर, शनिशिंगणापूर शिर्डी येथे आयोजित करण्यात आली.

घृष्णेश्वर मंदिराचे दर्शन घेऊन वेरूळ येथील लेण्यांविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. देवगिरी किल्ल्याला प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांनी किल्ल्याचे बारकाईने निरीक्षण केले. एवढ्या वर्षानंतरही किल्ला सुस्थितीत आहे याबाबत मुख्याध्यापक अनिल माळी यांनी मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी नीलेश पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी जयवंत चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रप्रमुख मनोज पवार यांच्या सहकार्याने मंजय ठाकरे, सरपंच गुलाब वळवी, मुख्याध्यापक अनिल माळी, दयानंद जाधव, स्नेहल राजपूत, मुख्याध्यापक रेखा मोरे, महेंद्र परमार यांच्या सहकार्यातून पार पडली.

Hello Nandurbar
Page No. 2 Feb 07, 2025
Powered by: erelego.com







प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण उपक्रम :- विद्यार्थी शालेय परिसरात आला की पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तक व शिक्षक ते तिघांच्या माध्यमातून काही ना काही शिकत असतो परंतु ज्या वेळेला एखादी कृती तो स्वतः करतो तेव्हा मात्र शिक्षण अधिक आनंददायी आणि जास्त दिवस ते लक्षात राहील अशा पद्धतीने होत असतं आणि म्हणून शाळेमध्ये विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी ज्ञानावर वर्ण देता एका शिक्षण घ्यायचा असेल तर प्रत्यक्ष त्या गोष्टीचा अनुभव त्याला दिला जातो उदाहरणार्थ भाकर कशी बनवली जाते खीर कशी बनवली जाते भेळ कशी बनवली जाते या सर्व गोष्टी फक्त बोलून चालत नाही तर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून ते दाखवल्या की त्यांच्या कायमस्वरूपी स्मरणात राहतात त्याचप्रमाणे विद्यार्थी जेव्हा शैक्षणिक साहित्य स्वतः हाताळतो त्यावेळेला त्याची अभ्यास करण्याची गती वाढते अभ्यास करण्याची आवड वाढते परिणामी त्याची गुणवत्ता वाढते आणि या पद्धतीने आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न आमचा असा आहे की विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण हे दिलं जावं यासाठी पालकांना देखील आम्ही शाळेत बोलून त्यांच्या माध्यमातून त्यांच्याकडे असलेल्या कला या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतो परिणामी पालकांचा सहभागी देखील वाढतो आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण घेत असताना मिळालेला आनंद हा काही वेगळाच असतो. प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देत असताना विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाकडे देखील वळवल जात त्यासाठी क्षेत्रभेटी अंतर्गत प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना एखादी कलाकृती कशी सादर केली जाते किंवा कशी बनवली जाते याचा प्रत्यक्ष क्षेत्रभेटीच्या आणि प्रत्यक्ष अनुभवातूनही दिल्या जात असतं उदाहरणार्थ दिवाळीचा सण आहे आणि त्या वेळेला लागणारे आकाश कंदील विद्यार्थ्यांकडून त्यांच्याच माध्यमातून तयार करून घेतले जातात तेच आकाश कंदील हे त्यांच्या घरी लावतात त्यामुळे त्यांना मिळणारा हा आनंद आणखी वेगळा असतो आणि त्या उपक्रमातून आपणही काहीतरी बनवू शकतो आणि त्याची विक्री करून दोन पैसे कमवू शकतो हि भावना विद्यार्थ्यांचे अगदी लहानपणापासून रुजते आणि पुढे व्यावसायिक शिक्षणाकडे ते एका चांगल्या आशेने बघत असतात.





फलनिष्पती -

भिंतीचा शैक्षणिक साधन म्हणून वापर याचा फायदा विद्यार्थ्यांच्या अध्ययनात खूप मोठ्या प्रमाणात दिसून आला. शाळा आता आकर्षक दिसत आहे व विद्यार्थ्यांमध्ये शाळेप्रती कुतुहल निर्माण झाले आहे. दररोजच्या परिपाठामध्ये उपयोग केला जातो. विद्यार्थी स्वतःहुन रंगरंगोटीची पाहणी करतात आणि त्यावरील माहिती वाचतात, अभ्यासतात व विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देतात विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत वाढ झाली आहे. प्रत्येक वर्गाचे वर्गशिक्षक वर्गानुसार विद्यार्थ्यांना चित्रे व त्यासंदर्भात माहिती देतात. विद्यार्थी बालाचा वापर करुन दिनचर्या, ब्रह्मांड, ऋतुचक्र, स्वच्छतेचे संदेश याविषयी माहिती सांगतात.

शाळेच्या दर्शनी भागात लावण्यात आलेली रंगीबेरंगी फुलझाडे यामुळे शाळेचे वातावरण निसर्गरम्य झाले आहे. मुलांना हवेहवेसे वाटणाऱ्या वातावरणाची निर्मीती झाली आहे. यामुळे न येणारी मुलेही शाळेत येऊन इथल्या वातावरणात रममाण होत आहेत.

थोडक्यात सांगायचे झाल्यास उपक्रमांमुळे शाळेला खूप फायदा झालेला आहे. शाळेची उपस्थिती वाढली आहे व ती टिकून सुद्धा आहे. उपक्रमांमुळे शाळा खूप आकर्षक दिसत आहे. याचबरोबर मुलांची पायाभूत संकल्पना यांचा विकास होऊन मुलांच्या गुणवत्ता विकास यामुळे झाला आहे. एवढेच नव्हे तर पालकांची शाळेच्या प्रती असलेली उदासीनता नाहीशी होऊन पालकवर्ग आता शाळेच्या प्रत्येक उपक्रमांमध्ये सहभागी होत आहेत.

परसबाग निर्मिती एक आव्हान -

शालेय परिसर हा खूप छोटा असल्यामुळे शाळेत परसबाग निर्मिती कशी करावी हा एक मोठा प्रश्न होता. शाळेची बांधकाम रचना ही अतिशय वेगळ्या पद्धतीने असल्यामुळे एक वर्ग खोली या बाजूला दुसरी वर्ग खोली त्या बाजूला किचन शेड एका बाजूला स्वच्छतागृह मध्येच होतं. त्यामुळे परसबागेसाठी स्वतंत्र अशी जागा उपलब्ध होत नव्हती सुरुवातीला कुंड्यांच्या माध्यमातून परसबाग फुलवण्यात आली मात्र त्यातून पाहिजे तसा भाजीपाला मिळत नव्हता. शेवटी शाळेला लागून एक छोटासा जमिनीचा तुकडा आम्हाला दिसला व तो कोणाचा आहे या संदर्भात शालेय व्यवस्थापन समिती मार्फत चौकशी करून संबंधित व्यक्तीला ती जागा परसबाग निर्मितीसाठी द्यावी अशी विनवणी करण्यात आली परंतु त्यावेळेला त्यांनी नकार दिला

मात्र सर्वांच्या आग्रहास्तव त्यांना परसबागेचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या पौष्टिक आहाराचे आणि सकस आहाराचे महत्त्व पटवून दिल्यानंतर संबंधित जागा समोरच्या व्यक्तीने काही तुटपुंज्या रकमेवर देण्यास मान्य केले त्यात मुख्याध्यापकांनी स्वतः पैसे देऊन ती जागा विकत घेतली व परसबाग फुलवली. परसबागेचे काम सुरू असताना खडकाळ जमीन होती तेव्हा तिथे शेतातून काळी माती टाकण्यात आली. त्यानंतर गावातील पालकांच्या मदतीने त्याची व्यवस्थित देखरेख करून त्यामध्ये सेंद्रिय खताचा वापर करून विविध प्रकारच्या भाज्यांची निर्मिती करण्यात आली. वेळोवेळी गावातील पालकांनी त्यासाठी लागणारी फवारणी, खत स्वतः उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन त्या बागेची निगा राखणे त्याला वेळोवेळी पाणी देणे रोगराई आढळल्यास त्यावर फवारणी करणे ही सर्व कामे पालक ही स्वतः आपलं स्वतःची परसबाग ही भावना समजून करू लागले आणि आज खूप छान प्रकारे तिथे सेंद्रिय भाजीपाला निघत आहे, तो भाजीपाला विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारात वापरले जातो ज्याने पदार्थाची चव तर वाढवलीच परंतु विद्यार्थ्यांच्या आरोग्यामध्ये देखील सुधारणा झाली विद्यार्थ्यांना आता सकस आहार मिळू लागला आहे.








परसबागेच्या निर्मीतीमुळे आम्हाला महत्वाचे दोन फायदे झाले आहेत.

मुलांचे आरोग्य व पोषण -

मुलांच्या पोषण आहारात शाळेतच तयार होणारा सैद्रीय भाजीपाला वापरत असल्यामुळे पूर्वीपेक्षाही आता त्या पोषण आहाराची चव अधिकरित्या वाढून मुले आता आवडीने आणि चवीने पोषण आहार ग्रहण करत असतात. शाळेत पोषण आहार खूप चांगल्या प्रकारे मिळत असल्यामुळे विद्यार्थी घरी राहत नाही.त्यांच्या आरोग्यात खूप सुधारणा झाली आहे.शाळेतच परसबाग असल्यामुळे विद्यार्थी परसबागेमध्ये फावल्या वेळात काम करतात. एक प्रकारे त्यांना शेती या व्यवसायाची आवड निर्माण होत आहे.शाळेत उत्तम व चांगला भाजीपाला कसा तयार होतो या विषयी विद्यार्थी त्यांच्या पालकांना सांगतात . दररोजच्या पोषण आहारात एक-दोन नव्हे तर कमीत-कमी दररोज चार ते पाच प्रकारच्या सेंद्रीय भाज्यांचा समावेश होत असतो, याशिवाय ज्या मुलांना सदी, ताप, खोकला असे आजार होतात त्यांना शाळेतील औषधी वनस्पर्तीपासून तयार होणारा काढा किंवा झाडाचे पान त्यांना देत असतो आणि मुलांचे आजार कमी होत असतात. शाळेत जर कोणला खोकला आला तर लगेच मुले अडुळसा या वनस्पतीचे पान मुलांना खाऊ घालतात. अशा प्रकारे मुलांमध्ये आयुर्वेदिक औषध या विषयी आवड निर्माण होत आहे. अशा प्रकारे मुलांचे आरोग्य व पोषण यातून आम्हाला साध्य झाले आहे.

मुलांचे शिक्षण व उपस्थिती वाढ -

परसबागेच्या निर्मीतीपासूनच मुलांचे निरीक्षण सुरु होते, बागेच्या निर्मीतीचे टप्पे कोणती आणि कसे असतात याची माहिती मुलांना झाली आहे. एखादे वाण लावल्यानंतर हळुहळु कश्याप्रकारे वाढत आहे व त्याची निगा आणि काळजी आपल्याला कश्याप्रकारे घ्यावयाची असते याचीसुध्दा माहिती मुलांना झाली आहे, याशिवाय बागेसाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे केले आहे. ठिबक सिंचन, तुषार सिंचन, सेंद्रीय पद्धत, सेंद्रीय स्प्रे, भाज्यांची नावे, आपल्या आरोग्यात भाज्यांचे महत्व, यातून कोणकोणते पोषणमुल्ये मिळतात या सर्वांची माहिती मुलांना झाली आहे. शिवाय परसबागेची निगा व स्वच्छता दररोजच्या नियोजनाप्रमाणे शाळेतील मुलेच करत असतात यांमुळे जवळून या सर्व गोष्टींची जाण मुलांना झाली आहे.



एवढेच नव्हे तर शाळेत झालेला हा बदल व हिरवळ यांमुळे मुलांचा व पालकांचा उत्साह अधिकरित्या वाढला आहे. पालकसुद्दा त्यांच्या वेळेनुसार येऊन श्रमदान करत असतात, यामुळे स्वत:हुन पालकच या उपक्रमांत सहभागी झाल्यामुळे मुलांची उपस्थिती वाढली आहे व ती टिकली सुद्धा आहे.

मागील सहा वर्षाच्या सततच्या करत असलेल्या शाळेचे भौतिक आणि मुलांच्या सर्वांगीण विकास कामामुळे सन २०२३-२४ या वर्षात जिल्हा परिषद वरूळ शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवुन नंदुरबार प्रथम क्रमांकाने येण्याचा मान मिळविला व शाळेला तीन लाखाचे बक्षिस प्राप्त झाले. शाळेच्या या यशाने मन भारावून आले. तसेच सन २०२१-२०२२ या साली शाळेतील शिक्षक श्री दयानंद जाधव यांना नंदुरबार जिल्हा परिषदेचा शिक्षण विभागाचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे तर मला २०२२-२०२३ या वर्षाचा राज्यशासनाकडून मिळणारा महाराष्ट्र राज्य सावित्रीबाई फुले शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त झाला. मिळालेल्या या दोन्ही पुरस्कारामुळे वरूळ गावातील ग्रामस्थ व ग्रामपंचायत कार्यालय यांच्याकडून माझा व माझ्या सहकारीचा २६ जानेवारी २०२४ रोजी वरूळ ग्रामगौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले..

शालेय नेतृत्वातून व लोकसहभागातून झालेला हा बदल परिणामकारक आहे. सेवेत लागल्याच्या काळापासुन शालेय नेतृत्वातील एक प्रमुख घटक मुख्याध्यापक म्हणून जबाबदारीचे पालन करतांना अनेक अडचणी आल्या परंतु प्रत्येक अडचणीवर मात करुन आज माझी शाळा पंचक्रोशीत गुणवत्तेच्या बाबतीत शिखरावर आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे .

समारोप -

अशाप्रकारे मागील पाच ते सहा वर्षाच्या कालावधीत आमच्या शाळेत सर्व उपक्रम राबवून एक आदर्श शाळा बनवण्याचा मी जोरदार प्रयत्न केला आहे व यात मोलाची साथ मला माझ्या सोबत असलेल्या सहकार्याची लाभत आहे. वेळोवेळी आमच्या केंद्राचे केंद्रप्रमुख ,सन्मा.गटशिक्षणाधिकारी तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नंदुरबार मार्गदर्शन करत असतात. ज्ञानप्रकाश फौंडेशन यांनी खूप मोलाची साथ दिली आहे. शाळेची यशोगाथा **THE SCHOOL TRANSFORMATION PROGRAMME REPORT 2016-**





2020 **The Collaborators ForSchool Transformating Education** या राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित होणाऱ्या मासिकात STORY: LEARNING BEYOND CLASROOM हि यशोगाथा प्रकाशित करण्यात आली आहे तसेच **MPSP** यांनी देखील दखल घेऊन **Teacher And Parents coordination : A Success Story Of Varul** हा लेख प्रकाशित करण्यात आला आहे.ज्ञानप्रकाश फौंडेशनच्या जिल्हा स्तरावर प्रकशित मासिकात लोकसहभागातून शालेय शिक्षण हा लेख प्रसिद्ध करणात आला आहे.



गतीमंद मुलांसोबत काम करताना...

मी केंद्रप्रमुख... माझं केंद्र

लोकसहभागातून शालेय विकास



Appendix: Stories from the fieid

Story I: Learning beyond Classroom



एमपीएससीच्या राज्यस्तरीय साप्ताहिकात आपल्या शाळेची सक्सेस स्टोरी

Teachers and Parents coordination: A Success Story of Varul

आतापर्यंत शाळेला केंद्र प्रमुख पासुन ते सी. ई. ओ. पर्यंतच्या सर्व अधिकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनी शाळेला भेट देऊन अधिकचे मार्गदर्शन व कौतुक केले आहे. यामध्ये गावातील पालकवर्ग, ग्रामपंचायत आतापर्यंत शाळेला केंद्र प्रमुख पासुन ते सी. ई. ओ. पर्यंतच्या सर्व अधिकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनी शाळेला भेट देऊन अधिकचे मार्गदर्शन व कौतुक केले आहे. यामध्ये गावातील पालकवर्ग, ग्रामपंचायत कार्यालयामधील सर्व सदस्यवर्ग, सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सदस्य यांची मोलाची साथ प्राप्त होत आहे.

धन्यवाद !

लोकमत

जिल्ह्यातील चार शिक्षकांना राज्य पुरस्कार

राज्य शासनाचे पुरस्कार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : राज्य शासनाचे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. प्राथमिक, माध्यमिक गटासह आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेल्या शिक्षकांमध्ये प्राथमिक गटातून पंकज गोरख भदाणे, बोडीपाडा, ता.अक्कलकुवा जिल्हा परिषद शाळा माध्यमिक गटात रवींद्र अरुण गुरव, नेमसुशील विद्यामंदीर, तळोदा.

आदिवासी क्षेत्रातून दोन शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. त्यात रोहिणी गोकुळराव पाटील, लोय, ता.नंदुरबार जिल्हा परिषद शाळा. अनिल शिवाजी माळी, शिंदे, ता.नंदुरबार जिल्हा परिषद शाळा यांचा समावेश आहे.

५ सप्टेंबर अर्थात शिक्षक दिनी या पुरस्कारांचे वितरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार असल्याचे सांगण्यात आले

Hello Nandurbar
Page No. 1 Sep 02, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

प्रत्यक्ष कृती व अनुभवातून अध्यापन करणारे शिक्षक अनिल माळी

लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : प्रत्यक्ष कृती व अनुभवातून



अध्यापन करीत विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारल्याची दखल घेत अनिल माळी यांना

राज्य शिक्षक पुरस्कार

शासनाने क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक पुरस्कार देऊन गौरविले आहे.

अनिल माळी हे जिल्हा परिषद शाळा वरुड, केंद्र शिंदे ता. नंदुरबार [illegible] शिक्षक आहेत. माळी यांचे शिक्षण एम. ए. (इंग्रजी) डी. [illegible] बीएससी, सीपीसीटी, पेट इंग्रजी असे झाले आहे. १४ वर्षांपासून ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकाविषयी ज्ञान व्हावे या हेतूने त्यांनी नुकताच सीएसआर फंडातून प्रशस्त संगणक कक्ष स्थापन केला. प्रत्यक्ष कृतीतून व अनुभवातून शिक्षण कसे मिळेल यासाठी प्रयत्नशील असतात. वैयक्तिक खर्च तसेच लोक वर्गणीतून शाळेची सर्व भौतिक सुविधांची पूर्तता केलेली आहे. राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग, विविध शैक्षणिक लेख व शोधनिबंध सदर केले आहेत. तालुकास्तर जिल्हास्तर व राज्यस्तरावर तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केले आहे. कोरोना काळात जिथे उपलब्ध होईल तिथे शिक्षण या उपक्रमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक [illegible] उपलब्ध करून दिला.

Sukram Padvi
5 SEPTEMBER 2023 · शिक्षक
खूप खूप अभिनंदन माळी सर 💐💐💐 — with Anil Mali.

वरूळ जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांना इंग्लंडच्या दात्याने दिले स्पोर्टस ड्रेस

लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : वरूळ, ता. नंदुरबार येथील जिल्हा परिषद शाळेला इंग्लंडमध्ये वास्तव्यास असलेल्या एकाने स्पोर्टस ड्रेस देत शिक्षकाशी असलेल्या मैत्रीला जागल्याचे उदाहरण समोर आले. स्वातंत्र्य दिन अर्थात १५ ऑगस्ट आला तरी जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांना अद्याप गणवेश मिळालेले नाहीत. ही बाब हेरत वरूळ, ता. नंदुरबार येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक अनिल माळी यांनी त्यांचे धुळे येथील वर्गमित्र असलेले व सध्या ग्लासगो सिटी युनायटेड किंगडम येथील एका मल्टिनॅशनल कंपनीत सीनिअर इंजिनिअर या पदावर कार्यरत असलेले भूषण भामरे यांना ही बाब सांगितली. दानशूर व्यक्तिमत्त्व असलेले भामरे यांनी विद्यार्थ्यांना मदत करण्याची तयारी दर्शविली.



स्वतःला शिक्षक होण्याची आवड होती. तीच आवड अशा पद्धतीने ते विद्यार्थ्यांना काहीतरी मदत करून पूर्ण करत असतात. त्यांनी लागलीच यावर्षी विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस माझ्याकडून उपलब्ध करून द्या, त्यासाठी लागणारा सर्व निधी मी तुम्हाला देतो असे आश्वासन दिले.

माळी यांनी एकूण विद्यार्थी, त्यांना लागणारे एकूण स्पोर्ट ड्रेस व एकूण खर्चाचा अंदाज बांधत रक्कम त्यांना कळविली. लागलीच त्यांनी तेवढी रक्कम शिक्षकाच्या खात्यावर वर्ग केली. भूषण भामरे यांच्या या मदतीसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय ठाकरे, सरपंच गुलाब वळवी, उपसरपंच तिरसिंग वळवी तथा उपशिक्षक दयानंद जाधव, ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

Hello Nandurbar
Page No. 2 Aug 15, 2024
Powered by: erelego.com



लोकमत

लोकवर्गणीतून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : तालुक्यातील वरूळ येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना लोकसहभागातून गोळा केलेल्या लोकवर्गणीतून लेखन साहित्य, विद्यार्थी ओळखपत्र आणि शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना पाटी, वह्या, पेन, पेन्सिल, चित्रकला वही, रंगखडू बॉक्स, अंकलिपी, खोडरबर व कंपास पेटी असे विविध शालेय उपयोगी साहित्य वाटप केले.

१०
वस्तूंचा संच विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आला.

मुख्याध्यापक व शिक्षकांनी गटशिक्षणाधिकारी जयंत चौरे, केंद्रप्रमुख नोज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविण्यात आला. अंगी गुण असूनही केवळ ग्रामीण भागातील पालकांना आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य घेणे शक्य होत नाही. नुकत्याच शाळा सुरू झाल्याने आई-वडिलांच्या डोक्यावर असलेल्या शैक्षणिक साहित्याच्या भार कुठेतरी कमी व्हावा. या भावनेतून मुख्याध्यापक अनिल माळी, शिक्षक दयानंद जाधव यांनी पालकवर्गाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांच्याच मुलांसाठी त्यांच्याच माध्यमातून विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटप केले.

मुख्याध्यापक अनिल माळी हे विद्यार्थ्यांना शाळेबद्दल गोडी लागावी म्हणून विविध उपक्रम राबवीत असतात. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध झाल्याने त्यांच्या शिक्षणात मदत मिळाली आहे.

दरम्यान, वरूळ जिल्हा परिषद शाळेत इको क्लब फॉर मिशन लाइफअंतर्गत 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेंतर्गत मुख्याध्यापक अनिल माळी व सहशिक्षक यांनी विविध प्रकारची रोपे खरेदी करून गावातील मान्यवर यांच्या हस्ते रोपे लावण्यात आली. यावेळी गावातील सरपंच गुलाब वळवी, उपसरपंच तिरसिंग वळवी, मंजय ठाकरे, सुक्रम पाडवी यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

Hello Nandurbar
Page No. 2 Jul 21, 2025
Powered by: erelego.com













ग्रामपंचायत वरूळ तर्फे ग्रामरत्न सन्मान



----------**----------

कौशल्य आधारित आणि व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न

शाळेचे नाव - के. बी. एच. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मालेगाव कॅम्प ,
शाळेचा पत्ता - मालेगाव कॅम्प ,ता. मालेगाव जि. नाशिक. पिन कोड - ४२३१०५
शाळेचा ई- मेल आयडी - kbhvjrc@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री. प्रफुल्ल नामदेवराव निकम

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९४२०३८६१११

मुख्याध्यापक ई-मेल आयडी - prafullanikam@gmail.com

प्रस्तावना :-

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच आपल्या शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत असताना त्याचा बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक व नैतिक विकास होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्यासाठी त्याला उद्योग व व्यावसायिक क्षेत्रातील प्रभावी व्यक्तिमत्वांचा अनुभव असणे महत्त्वाचेआहे. विद्यार्थाच्या विविध उद्योगांना भेटी देणे, नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या कार्यशाळांचे आयोजन करणे. आपल्याकडे असलेल्या कौशल्यांला व्यवसायाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात हा महत्त्वाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून सर्वसामान्य व्यावसायिकांच्या जीवनात कसे परिवर्तन झाले याची ओळख व व्यावसायिकांची प्रत्यक्ष जाऊन माहिती घेणे अनुभवतून विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल दिसून येतो.
विद्यार्थ्यांच्या भविष्यकालीन गरजा लक्षात घेऊन त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात कौशल्य विकसित करण्यासाठी शालेय जीवनात शिक्षणाबरोबर त्यांच्याकडे असलेल्या कलागुणांना संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीने माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना भविष्यातील चांगले जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या रोजगाराच्या संधींची पायाभरणी शालेय जीवनात आवश्यक असते यासाठी विद्यार्थ्यांचे उपजत गुण/ कौशल्य ओळखून त्या प्रकारच्या संधी उपलब्ध करण्यासाठी विद्यालयाच्या माध्यमातून विविध उपक्रमांच्या आयोजन केले जात असते.

ज्या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञान, आकलन होऊन प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो. हा अनुभव त्यांना उत्तम प्रकारचे करिअर निवडीसाठी प्रेरक ठरू शकतो. आपल्याकडे असलेले कौशल्य हे आपल्या उपजीविकेचे उत्तम साधन होऊ शकते.आपल्या आवडी निवडीमुळे आवडत्या क्षेत्रात काम करण्याची संधी प्राप्त झाली तर व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो. देशातील वाढती बेरोजगारी कमी होण्यासाठी व्यावसायिक शिक्षण महत्वपूर्ण ठरते. उत्पादन व सेवा क्षेत्रात होणाऱ्या बदलामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते

व्यावसायिक शिक्षणामुळे नवीन काही करण्याची क्षमता वृद्धिंगत होत जाते. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना जर छोट्या मोठ्या व्यवसायाचे मार्गदर्शन लाभले. प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली तर व ही सवय त्याला जडत गेली तर निश्चितच त्याचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटू शकतो. परीणामी शालेय जीवनात त्याचा होणारा शैक्षणिक खर्च यासाठी तो कुटुंबालाही हातभार लावू शकतो.

आमच्या शाळेतील कौशल्य आधारित आणि व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी विविध उपक्रम


शाळेतील इयत्ता पाचवी ते बारावी एकूण विद्यार्थी संख्या ३०३४ असून शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून कौशल्य विकास हा स्वतंत्र पद्धतीचा विभाग स्थापन केला असून या विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सर्व कलागुणांना/कौशल्याला संधी विविध प्रकारच्या उपकमातून उपलब्ध करून दिली जाते.विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विविध क्षेत्रातील अनुभव देण्यासाठी प्रयत्नशील असतो.यामध्ये व्यावसायिक शिक्षणावर अधिक भर दिला आहे.विद्यालयात विविध उपक्रम राबवले गेले त्या उपक्रमांमध्ये बाल उद्योजक दुबई मुळगाव खाकुर्डी ता. मालेगाव येथील जिवीका जैन व जैनम जैन यांचे व्यावसायिक मार्गदर्शन व व्यावसायिक उद्योजकांची भेट, क्षेत्रभेट ,कला आणि हस्तकला ,व्यवसाय प्रदर्शन व मेळावा आनंद मेळावा ,संवाद कौशल्य नेतृत्व गुण, मौक मार्केटिंग (जाहिरात, पोस्टर,बातमी, डिझाईन), सांस्कृतिक व ऐतिहासिक जागृती प्रदर्शन, युट्युब व्हिडिओ निर्मिती,या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा अधिक सहभाग वाढीस लागला. त्यांच्या व्यावसायिक कौशल्याला संधी मिळाल्याने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाल्याने सकारात्मक बदल दिसून आला आहे.

उपक्रम क्र. १- सांस्कृतिक व ऐतिहासिक जागृती (किल्ले प्रदर्शन व वस्तुसंग्रह)

उपक्रमाचा हेतू :- विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाबद्दल प्रेरणा मिळणे तसेच महाराष्ट्राचा किंबहुना स्वराज्याचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा याविषयी माहिती होणे.

उपक्रमाची उद्दिष्टे:-

- विविध वस्तूंचा संग्रह करून माहिती जमा करण्याची सवय लागणे
- गडकिल्ल्यांची माहिती गोळा करणे.
- किल्ले बनवता येणे, हस्तकलेची ओळख होणे.



कार्यक्रमाचे नियोजन :-

मा. प्राचार्य श्री. पी. एन. निकम यांच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेने १९ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने एक अभिनव उपक्रम शाळेत घ्यावा असे ठरले. त्यानुसार विद्यार्थ्यांनी प्राचार्याच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेने स्वराज्यातील महत्त्वपूर्ण किल्ल्यांची बांधणी केली. यामध्ये शिवनेरी रायगड व प्रतापगड हे किल्ले प्रामुख्याने बनविण्यात आले.

माती, कागद, दगड, पुठ्ठे यासारख्या यासारख्या गोष्टी वापरून किल्ल्याचे बांधकाम पालकांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांनी स्वतः केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनी अर्थात १९फेब्रुवारी २०२५ रोजी या किल्ल्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले. त्यासोबतच अनेक विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तसेच शिवकालीन वेशभूषा करून कार्यक्रमाला आणखी शोभा आणली. या प्रदर्शनाप्रसंगी पालक, शिक्षक वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने हे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये झालेला बदल:-

सदर गड किल्ले बांधणी व शिवकालीन वेशभूषा आदी गोष्टी करत असताना विद्यार्थ्यांना शिवकालीन इतिहासाचा मागोवा घेण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे त्यांना महाराष्ट्राच्या अर्थात स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाची ओळख झाली.

भविष्यकालीन दृष्टीकोन:-

आपल्या राज्याचा सांस्कृतिक वारसा जतन करणे कामी दृष्टिकोन प्राप्त होणे. किल्ले बांधणीतून मिळालेल्या बक्षिसाचा वापर विद्यार्थी त्यांच्या शैक्षणिक गरजांच्या परिपूर्तीसाठी करतात.सुरेख सुंदर अशा प्रतिकृती तयार करून विद्यार्थी त्या विक्री करतात.





उपक्रम क्र. २ :- अटल टिंकरिंग लॅब - नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्यांसाठी मुक्त दालन

उपक्रमाचा हेतू:-

अटल टिंकरिंग लॅबचा वापर करून विद्यार्थ्यांना सर्जनशील विचार करण्यास प्रवृत्त करणे तसेच नाविन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सहकार्य करणे.

उपक्रमाची उद्दिष्टे

*विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या नवनिर्मितीच्या विचारक्षमतेला वाव देणे.

*विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या सर्जनशीलतेला एक मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

*अटल टिंकरिंग लॅब च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुख वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.

*विद्यार्थ्यांना उपक्रमशील बनविणे व कौशल्य विकसित करणे.

कार्यक्रमाचे नियोजन :-

मा. प्राचार्य श्री पी. एन. निकम यांच्या मार्गदर्शनाने अटल टिंकरिंग लॅबचा वापर योग्य पद्धतीने करण्याची कार्यवाही करण्यात आली. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांना सर्जनशील उपक्रमांमध्ये सहभाग घ्यावयाचा आहे तसेच ज्यांच्या मनात काही नाविन्यपूर्ण अभिनव कल्पना आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांचे प्रकल्प तयार करणे कामी अटल टिंकरिंग लॅबचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. सर्व विज्ञान शिक्षक याविषयी मार्गदर्शन करतात.

स्वतः मा. प्राचार्य यांना विज्ञानाची आवड असल्याने त्यांनी वेळोवेळी अटल लॅब मध्ये येऊन विद्यार्थ्यांना मौलिक असे मार्गदर्शन केले. बऱ्याच वैज्ञानिक कल्पना, संबोध समजावण्यासाठी शिक्षक देखील अटल टिंकरिंग लॅबचा वेळोवेळी उपयोग करत असतात.

विद्यार्थ्यांमध्ये झालेला बदल:-

- विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाने विचार करण्याची वृत्ती विकसित झाली.
- नाविन्यपूर्ण अभिनव कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याची क्षमता विकसित झाली.
- विज्ञान मेळावा, विज्ञान प्रदर्शन यासाठी योग्य असे प्रकल्प प्रतिकृती स्वतः शाळेत निर्माण करू लागले.

भविष्यातील दृष्टिकोन :-

मा. प्राचार्यांच्या मनात भविष्यात अटल टिंकरिंग लॅबच्या वापराची व्याप्ती वाढविणे, शाळेतील ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या Innovative Idea प्रत्यक्षात आणावयाच्या आहेत,अशा विद्यार्थ्यांसाठी अटल लॅब उपलब्ध

करून देण्याची इच्छा आहे.महिन्यातून किमान एका शाळेतील विद्यार्थ्यांना बोलावून अटल टिंकरिंग लॅबची ओळख करून देणे व व्यावसायिक संशोधन कार्याला गती देण्यासाठी प्रयत्न करणे.



उपक्रम क्र. ३ :- व्यावसायिक केंद्र क्षेत्रभेट:

उपक्रमाचा हेतू :

"व्यावसायिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानासोबतच कौशल्य, आत्मविश्वास, व सामाजिक जबाबदारी यांची वाढ करून त्यांना भविष्यासाठी अधिक सक्षम करणे"

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देणे व त्यांच्यातील कौशल्य, जिज्ञासा आणि उद्योजकतेचा विकास घडवणे.

उद्दिष्टे :

- प्रत्यक्ष व्यावसायिक प्रक्रियेचे अवलोकन: उत्पादन, व्यवस्थापन, विक्री व विपणन यांसारख्या प्रक्रियांविषयी प्रत्यक्ष माहिती मिळवणे.
- उद्योगातील कार्यसंस्कृतीची ओळख: वेळ व्यवस्थापन, संघभावना, सुरक्षा नियम आणि व्यावसायिक शिस्त यांचा अनुभव घेणे.
- उद्योजकतेची प्रेरणा मिळवणे: व्यवसाय सुरु करण्यासाठी लागणारी तयारी, जोखीम व्यवस्थापन, आणि नवकल्पना समजून घेणे.
- शिकलेल्या सिद्धांतांचे प्रत्यक्ष उदाहरणांसह समन्वय: शालेय अभ्यासक्रमातील ज्ञान प्रत्यक्ष व्यवसायाशी जोडणे.

- करिअर संधींबाबत जागरूकता: उद्योगातील विविध पदांबद्दल व त्यातील करिअर संधींची माहिती मिळवणे.
- समूहात कार्य करण्याची क्षमता वाढवणे: सहकार्य, संवाद कौशल्य याव्दारे विक्री कौशल्य साध्य करणे.

कार्यक्रमाचे नियोजन :

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी , उद्योग व्यवसाय सुरु कसा करावा, त्याची व्यवस्थापन कसे करावे याची प्रत्यक्ष क्रियेतून व अनुभवातून मिळावी यासाठी आपली औद्योगिक क्षेत्रभेट आयोजित केली गेली. सोमवार दिनांक ७/०१/२०२५ रोजी रावळगाव येथील रावळगाव साखर कारखाना व अजंग येथील व्यंकटेश्वर शेती व लघु उद्योग कंपनी येथील विविध लघुउद्योगांना भेटी देण्याचे निश्चित केले गेले.

दिनांक १२/०८/२०२४ रोजी स. ११:००वाजता आपल्या मालेगाव येथील नामांकित असे "पारस फॅशन वर्ल्ड" या कपड्यांच्या मॉलला भेट देणे.

चित्रकला महाविद्यालय चित्रकला प्रदर्शन भेट त्यात्तून कला क्षेत्रात व्यावसायिक निर्मिती कशी होऊल याकरिता मार्गदर्शन शिबीर आयोजन दिनांक २२/०२/२०२५ रोजी ठीक स. १०:००वा करण्यात आले .

कार्यक्रमाची अंमलबजावणी :

आमच्या के. बी. एच. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मालेगाव कॅम्प येथील विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी, विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्र बाबत आणि लघुउद्योग बाबत अधिकची माहिती मिळावी, व्यवसाय सुरु कसा करावा, त्याचे व्यवस्थापन कसे करावे याची प्रत्यक्ष क्रियेतून व अनुभवातून मिळावी. तसेच नवीन उद्योग किंवा लघु उद्योग सुरु करण्याबाबत विद्यार्थ्यांच्या मनातील विविध प्रश्न व शंकांचे निरसन व्हावे यासाठी आमचे मा. प्राचार्य पी.एन. निकम साहेब यांच्या मार्गदर्शनाने क्षेत्रभेट/औद्योगिक भेट म्हणून सोमवार दिनांक ७/०१/२०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता आम्ही निघालो, प्रथम रावळगाव येथील रावळगाव साखर कारखाना येथे भेट दिली. तेथे संपूर्ण साखर कारखाना पाहिला यावेळी उसाचा रस काढणे, त्यावर प्रक्रिया करणे, साखर तयार होणे या सर्व प्रक्रिया विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षपणे पाहिले. त्यानंतर कारखान्याचे कार्यकारी संचालक (M.D.) श्री. एम.डी. पवार साहेबांनी कारखाना आणि साखर उत्पादन व उत्पन्न या विषयी सविस्तर माहिती दिली.

पुढील भेट अजंग येथील व्यंकटेश्वरा फार्मिंग कंपनी, अजंग येथे जीरीनियमचे तेल काढणे, अगरबत्ती तयार करणे, पेंट तयार करणे, यासारखे विविध लघु उद्योगांना भेट दिली. यावेळी तेथील सर्व लघु उद्योगांच्या प्रमुखांनी त्या...त्या उद्योगाबाबत विद्यार्थ्यांना उत्पादन, उत्पादनासाठी लागणारा कच्चामाल आणि इतर घटक आणि उत्पादन विक्री बाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे देऊन शंकांचे निरसन केले.

शुद्ध दुध व दुधाचे पदार्थ तयार करणारे गिर गायींचे दुध, डेअरी व गोठा यासारख्या शेतीवर आधारित विविध प्रकल्पांना भेटी दिल्या व त्याबाबत विविध माहिती घेतली आणि उद्योगांना कच्चामाल म्हणून लागणारा

विविध शेती पिके व फळबागांना भेटी देऊन त्यांच्या उत्पादनाबाबत व लघु उद्योगाबाबत विद्यार्थ्यांनी सविस्तर माहिती जाणून घेतली.

विद्यार्थ्यांना व्यवसायातील कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, तसेच विद्यार्थ्यांच्या मनातील विविध संकल्पना व शंकाचे निरसन व्हावे म्हणून दिनांक १२/०८/२०२४ रोजी आपल्या मालेगाव येथील नामांकित असे "पारस फॅशन वर्ल्ड" या कपड्यांच्या मॉल ला भेट दिली. मॉलचे मालक मा. प्रशान्तभाऊ मोदी, योगेशभाऊ मोदी यांचे सहकार्य मिळाले. मॉलचे मुख्य व्यवस्थापक साहेब व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सर्व विभाग दाखवले व प्रत्येक विभागात योग्य ती सविस्तर माहिती दिली. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध उपक्रम जसे की एकावर एक फ्री, १०% ते ५०% पर्यंत सुट, मान्सून धमाका ऑफर यासारख्या योजना कशा राबविल्या जातात यावर माहिती दिली. मॉलचे मुख्य व्यवस्थापक साहेब यांनी उत्कृष्ठ अशी माहिती दिली व विद्यार्थ्यांच्या मनातील विविध शंकांचे निरसन केले त्यातून विद्यार्थ्यांना लघु व्यवसायाची प्रेरणा मिळाली.

विद्यार्थांना कला क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यात कला गुण असतात फक्त स्वतःलाजाणीव होणे आवश्यक असते. यासाठी विद्यालय वेळोवेळी क्षेत्र भेट याद्वारे त्याचे उपजत गुण कसे त्यांना उदरनिर्वाहासाठी उपयोगी येतील यासाठी अनेक उपक्रम आयोजित करते . या अनुषंगाने दिनांक २२/०२/२०२४ रोजी **‘’चित्रकला महाविद्यालय, मालेगाव कॅम्प आयोजित चित्रकला प्रदर्शन’’** व तेथील कलाकाराने काढलेले चित्र त्याचे मूल्य किती असते ? यानुसार व्यावसायिक क्षेत्राची निवड करणे याचे मार्गदर्शन करण्यात आले .

या क्षेत्रभेटीतून विद्यार्थ्यांना लघु उद्योग, कला गुणांची जाण होऊन व्यावसायिक संधी या बाबत योग्य अशी माहिती मिळाली. यावेळी विद्यार्थ्यांच्या मनात नवीन उद्योग ,व्यवसाय सुरु करण्याबाबत एक चांगला उत्साह निर्माण झाला. नोकरीच्या मागे न धावता उद्योजक बनून स्वतः सोबत इतरांनाही रोजगार कसा निर्माण करता येईल याचा विद्यार्थी विचार करू लागले. विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्यासाठी व नवनिर्मिती करून अर्थार्जन कसे करता येईल या माहितीच्या अनुभवातून भविष्यात निश्चितच चांगला उपयोग होईल.

विद्यार्थ्यांमध्ये दिसून येणारा सकारात्मक बदल:

- कौशल्यवृद्धी:- विद्यार्थ्यांनी विशिष्ट व्यवसायाशी संबंधित तांत्रिक व व्यवहारिक कौशल्ये आत्मसात केली आहेत.
- आत्मविश्वासात वाढ:- स्वतःचे काम करण्याची क्षमता आल्याने आत्मविश्वास वाढलेला दिसतो.
- स्वतंत्र निर्णयक्षमता:- व्यावसायिक प्रशिक्षणामुळे समस्या सोडवण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते असे मुलांना वाटते .
- नोकरी व उद्योजकतेसाठी तयारी:- विद्यार्थ्यांमध्ये करिअरबाबत स्पष्टता निर्माण झाली आहे, आणि त्यांनी स्वतःचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.
- शिस्तबद्ध व जबाबदार वृत्ती:- वेळेचे महत्त्व, कार्यक्षमतेची जाणीव, व स्वावलंबनाची भावना निर्माण झाली आहे.




- व्यावसायिक संवाद कौशल्ये:- विद्यार्थ्यांची संवादशैली सुधारली असून ग्राहक, सहकारी व वरिष्ठांशी व्यावसायिक पातळीवर संवाद साधता येतो .
- समूहात कार्य करण्याची तयारी:- टीमवर्क, सहकार्य आणि नेतृत्वगुण यामध्ये सुधारणा झाली आहे.
- थोडक्यात:

"व्यावसायिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानासोबतच कौशल्य, आत्मविश्वास, व सामाजिक जबाबदारी यांची वाढ झाली असून, ते आता भविष्यासाठी अधिक सक्षम होण्यास पात्र झाले आहेत."

भविष्याचा वेध

- स्वयंपूर्णता आणि आत्मनिर्भरता :- व्यावसायिक कौशल्यांमुळे विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात किंवा नोकरी मिळवू शकतात.
- उद्योग आणि रोजगाराच्या संधी :- मार्केटमध्ये मागणी असलेल्या कौशल्यांची ओळख व त्यानुसार शिक्षण घेता येते, ज्यामुळे अधिक चांगल्या नोकऱ्यांचे दरवाजे उघडतात.





उपक्रम ४:- नेतृत्व गुण (संवाद कौशल्य)

उपक्रमाचा हेतू :-

जीवनात यशस्वी व्हावे असे प्रत्येकाला वाटते यशस्वी होण्याचे गुण जे असतात ते निसर्गतः आपल्यात असतात तसाच तो एक गुण असतो तो म्हणजे नेतृत्व गुण व संवाद कौशल्य होय. तो निसर्गतः जरी आपल्यामध्ये असला तरी त्याला योग्य वेळी योग्य संधी प्राप्त करून देणे तो विकसित करणे अत्यंत गरजेचे असते तो नेतृत्व गुण माध्यमिक शिक्षणापासून विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतो. नेतृत्व गुण व संवाद कौशल्य ते कुठल्याही क्षेत्रातील असो कदाचित ते सामाजिक क्षेत्रातील असेल सांस्कृतिक क्षेत्रातील असेल एखादे औद्योगिक क्षेत्र असेल तुम्ही ज्या समूहामध्ये शाळेमध्ये शिकत असतात तेथे नेतृत्वाची कधी ना कधी संधी प्राप्त होते तर कधी जबाबदारी दिली जाते किंवा तशा प्रकारचे नेतृत्व करण्याची संधी आपल्याला मिळावी अशी मनोकामना आपली असते तसेच ते नेतृत्व स्वीकारल्यानंतर आपले नेतृत्व व संवाद कौशल्य चांगले व्हावे यासाठी प्रत्येकाचा प्रयत्न असतो म्हणून अशा प्रकारचे संवाद कौशल्य व्यक्तिमत्व विकासासाठी व नेतृत्व गुण विकसित होण्यासाठी काही महत्त्वाचे गुण त्यात आवश्यक असतात हे गुण विद्यार्थ्यांत आल्यावर त्याचे संवाद कौशल्य निश्चित विकसित होईल याचा प्रयत्न आमच्या विद्यालयात केला जातो.

उपक्रमाची उद्दिष्टे :-

विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य विकसित करण्यापाठीमागचे उद्दिष्ट म्हणजे तो माध्यमिक शालेय जीवनापासून विद्यार्थी हा समाजाभिमुख झाला पाहिजे, त्याच्यात संवाद कौशल्य विकसित होऊन नेतृत्व गुण वाढीस लागला पाहिजे भावी आयुष्यात नेतृत्व गुण व संवाद कौशल्याच्या जोरावर तो एक चांगला वक्ता तयार झाला पाहिजे आणि याची सुरुवात माध्यमिक शालेय जीवनापासून झाली तर शालेय जीवनातच संवाद कौशल्याच्या जोरावर पुढे तो छोटे मोठे कार्यक्रम जसे गणपती उत्सव, नवरात्र उत्सव व इतर कार्यक्रमांमध्ये भाग घेतल्यानंतर त्यातून तो दोन पैसे बक्षीस रुपी मिळवून त्याचा उपयोग शालेय शिक्षणात त्यांना होतो जसे की शालेय साहित्य खरेदी करणे इत्यादी हे उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शालेय विद्यार्थ्यांना संवाद कौशल्य व नेतृत्वगुणाच्या विकासाच्या संधी आमच्या विद्यालयात दिल्या जातात .




प्रत्यक्ष कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी :-

विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य व नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी शालेय स्तरावर माननीय मुख्याध्यापक यांच्या नेतृत्वाखाली वक्तृत्व स्पर्धा सारख्या अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते जेणेकरून शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांमध्ये हे गुण विकसित होऊन भविष्यात त्यांना चांगला फायदा होईल.

विद्यार्थ्यांमध्ये झालेला बदल

अशाप्रकारे नेतृत्व गुण व संवाद कौशल्य विकसित झाल्यावर विद्यार्थी कुठल्याही कार्यक्रमात स्वखुशीने सहभागी होताना दिसतात व नेतृत्व करतात कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन करतात.





उपक्रमाचा हेतू :-

आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना व्हिडिओ निर्मितीचे कौशल्य शिकवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे केवळ त्यांची सर्जनशीलता वाढवत नाही, तर त्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करते. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांसाठी व्हिडिओ निर्मितीचे विविध उपक्रम खालीलप्रमाणे विद्यालयात घेतले जातात.

१. लघुपट/माहितीपट निर्मिती , २. शैक्षणिक व्हिडिओ, ३. 'मी एक मुलाखतकार, ४.जाहिरात/सामाजिक संदेश व्हिडिओ , ५.ग्रीन स्क्रीन वापरून व्हिडिओ, ६.'माझा दिवस/माझी शाळा

अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाचे ज्ञान, सर्जनशीलता,विचार कौशल्ये आणि सामूहिक कार्याची भावना वाढीस मदत होते. स्व:कौशल्यातून रोजगार संधी प्राप्त होतात.

उपक्रमाची उद्दिष्टे :-

संशोधनात्मक वृत्ती वाढविणे, टीमवर्क विकसित करणे, सर्जनशीलता,कल्पनाविस्तार आणि प्रभावी संदेश निर्मिती कौशल्य विकसित करणे तसेच व्हिडिओ एडिटिंगचे मूलभूत ज्ञान मिळविणे.

प्रत्यक्ष कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी

नियोजन आणि अंमलबजावणी :-

१. पूर्वनियोजन (Planning)- कार्यशाळा कशासाठी आहे (उदा. मूलभूत कौशल्ये शिकवणे, विशिष्ट विषयावर व्हिडिओ बनवणे, आर्थिक उपक्रम जोडणे). लक्ष्य गट:- (उदा. इ. ६ वी ते १० वी).

वेळापत्रक:- कार्यशाळेचा कालावधी (उदा. २ दिवस) आणि प्रत्येक सत्रासाठी वेळ निश्चिती.

साधनांची तपासणी:- स्मार्टफोन, टॅबलेट्स, प्रशिक्षक/मार्गदर्शक:-व्हिडिओ निर्मितीची माहिती असलेले शिक्षक किंवा तज्ज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन .

२. प्रशिक्षण आणि अंमलबजावणी (Training & Implementation)- ओळख आणि संकल्पना:- व्हिडिओ निर्मितीची ओळख, तिचे प्रकार आणि निर्मितीचे टप्पे (नियोजन, चित्रीकरण, संपादन) समजावून सांगणे. नैतिक नियम (कॉपीराईट) चित्रीकरण कौशल्ये ,संपादन (Editing),अंतिम रूप आणि सादरीकरण, प्रदर्शित माहिती देणे.

विद्यार्थ्यांसाठी भविष्यकालीन दृष्टीकोन लक्षात घेऊन व्यावसायिक शिक्षण मिळावं या दृष्टिकोनातून मा. प्राचार्य पी. एन. निकम सर अध्यक्ष तसेच कौशल्य विकास विभाग प्रमुख आर.डी शेवाळे यांच्या मार्गदर्शनाने विद्यालयात व्हिडिओ निर्मिती हा उपक्रम दिनांक ९ जानेवारी २०२५ गुरुवार रोजी आयोजित करण्यात आला. सदर प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विभाग प्रमुख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व नवीन निर्मिती कशा पद्धतीने करता येईल, व्हिडिओ निर्मितीच्या माध्यमातून या संदर्भात मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांमधून ईशान जगताप या विद्यार्थ्याने विद्यार्थ्यांना व्हिडिओ कसा तयार करावा या संदर्भात मार्गदर्शन करून व्हिडिओ तयार करून दाखवला व त्यासाठी कोणकोणते ॲप्स वापरले जातात व त्यासाठी कोणते पर्याय त्या ठिकाणी वापरले जातात या संदर्भात सखोल असं मार्गदर्शन केलं. सदर प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वतः व्हिडिओ बनवून बघितला व त्यातून नवीन अनुभव घेतला. यावेळी व्हिडिओ निर्मिती संदर्भात मार्गदर्शन करून छोटा व्हिडिओ बनवून दाखवला.




विद्यार्थ्यांमधील भविष्यकालीन दृष्टिकोन :-

शाळेत व्हिडिओ निर्मिती कार्यशाळेचे आयोजन केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये भविष्यकालीन दृष्टिकोन निर्माण होऊन ते व्हिडिओ निर्मिती करतील व भविष्यातील डिजिटल जगाच्या स्पर्धेत सक्षम बनतील. जिथे ते केवळ तंत्रज्ञानाचे ग्राहक राहणार नसून,निर्माते असतील. या व्हिडिओ निर्मिती कार्यशाळेत विद्यार्थ्यांना केवळ तंत्रज्ञान शिकवले नाही, तर त्यांना भविष्याकडे पाहण्याचा एक आधुनिक आणि व्यावहारिक दृष्टिकोन प्राप्त करून घेता येतो .

उपक्रम ६. कला आणि हस्तकला

उपक्रम हेतू :-

कला आणि हस्तकला उपक्रमाचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, अभिव्यक्तीची क्षमता आणि सांस्कृतिक जागरूकता वाढविणे हा आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी विविध प्रकारच्या कलात्मक कौशल्यांमध्ये सहभागी होऊन त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक पाठबळ कलागुणांचा विकास करतात.

उपक्रम उद्दिष्टे :

- विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता विकसित करणे.
- भारतीय कला, परंपरा व संस्कृतीची ओळख करून देणे.
- स्वतःच्या कल्पनाशक्तीचा वापर करून नाविन्यपूर्ण वस्तु तयार करण्यास प्रोत्साहन देणे.
- शैक्षणिक तणावापासून मुक्तता मिळविण्यासाठी .
- वातावरणपूरक व पुनर्वापरयोग्य साहित्य वापरण्याची सवय लावणे.

नियोजन व अंमलबजावणी :-

- **उपक्रमाची योजना आखणे:** चित्रकला, मूर्तीकला, रांगोळी, हस्तकला, गट इ. ५ वी ते १२ वी.
- **वेळापत्रक व आयोजन:** वार्षिक / साप्ताहिक उपक्रम योजना ठरवणे ,सण-उत्सवांशी संबंधित उपक्रमांचे नियोजन करणे.
- **जबाबदारी वाटप:** विद्यालयाचे प्राचार्य श्री निकम पी. एन. , शिक्षक, विद्यार्थी, पालकसंघ यांच्यात जबाबदारींचे विभाजन करतात उदा.: संयोजक, साहित्य व्यवस्था, सजावट, मूल्यमापन इत्यादी.
- **उपक्रमाची अंमलबजावणी**
- **साहित्य संकलन:** आवश्यक रंग, ब्रश, कागद, माती, कात्री, गोंद, इ. गोष्टींची व्यवस्था.शक्य असल्यास पर्यावरणपूरक व पुनर्वापर साहित्याचा वापर.
- **विद्यार्थ्यांची सहभागिता:** गट तयार करणे किंवा वैयक्तिक सहभाग, विषय/थीम सांगून मार्गदर्शन करणे.




- **पर्यवेक्षण व मार्गदर्शन: वि**द्यालयाचे प्राचार्य श्री निकम पी. एन. सर विद्यार्थांना मार्गदर्शन करतात.
- **मूल्यमापन व बक्षिसे:** ठरवलेल्या निकषांनुसार (सर्जनशीलता, सादरीकरण, मूल्यमापन करणे,बक्षिस वितरण/प्रमाणपत्र देणे.
- **सादरीकरण व नोंद:** विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन भरवणे (वर्ग/शाळा पातळीवर).फोटो/व्हिडिओ नोंदवून अहवाल तयार करणे.

रक्षाबंधन कार्यशाळा :-

विद्यालयात प्राचार्य श्री निकम पी.एन. यांच्या मार्गदर्शनानुसार दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून राखी बनविणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेसाठी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून विविध अशा सुंदर सुंदर राखी बनविल्या. विद्यार्थ्यांना टाकाऊ पासून टिकाऊ यावर मार्गदर्शन देण्यात आले, त्यानुसार विद्यार्थ्यांनी आपल्या घरून उपलब्ध होईल अशा काच,टिकली, लोकर रंगीत कागद साहित्य आणून आपल्या कल्पकतेनुसार सुंदर व आकर्षक अशा राख्या बनविल्या.व त्या राख्या विद्यार्थ्यांनी बाजारात विकल्या व आर्थिक प्राप्ती झाली.

शाडूमाती पासून गणपती बनविणे कार्यशाळा :-

दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत गणेश उत्सवाचे औचित्य साधून शाडू मातीपासून गणपती बनविणे कार्यशाळेचे आयोजन विद्यालयात करण्यात आले होते.या कार्यशाळेसाठी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्फुर्त प्रतिसाद देऊन आपल्या कल्पकतेतून विविध अशा सुंदर शाडू माती व काळी माती पासून गणपती बनविले. विद्यार्थ्यांना स्वनिर्मित आनंद या संकल्पनेतून गणपती बनविण्याचे मार्गदर्शन देण्यात आले, त्यानुसार विद्यार्थ्यांनी आपल्या घरून तयार करून आणलेल्या मातीच्या गोळ्यापासून सुंदर अशा गणेश मूर्ती बनवल्या व त्या गणेश मूर्ती बाजारात विक्री केल्याने विक्री कौशल्य आत्मसात करून पैसे मिळवले.

आकाशकंदील बनविणे कार्यशाळा :-

दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत दिपावली सणाचे औचित्य साधून आकाशकंदील बनविणे कार्यशाळेचे आयोजन विद्यालयात करण्यात आले होते.या कार्यशाळेसाठी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्फुर्त प्रतिसाद नोंदविला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून विविध आकाराचे सुंदर असे आकाश कंदिल बनविले. विद्यार्थ्यांना स्व-निर्मितीचा आनंद या संकल्पनेतून आकाश कंदिल बनविण्याचे मार्गदर्शन देण्यात आले, त्यानुसार विद्यार्थ्यांनी आपल्या घरून उपलब्ध होईल असे रंगीत कागद, लेस इ. साहित्य आणून आपल्या कल्पकतेनुसार सुंदर व आकर्षक असे आकाश कंदिल बनविले व ते आकाशकंदील बाजारात विक्री केले.

विद्यार्थ्यांमध्ये झालेला बदल:-

कला आणि हस्तकला राखी बनविणे कार्यशाळेचे आयोजन व अंमलबजावणी केल्यामुळे विद्यार्थी कुठल्याही कार्यक्रमात स्वखुशीने सहभागी होताना दिसतात. राखी, शाडू माती पासून गणपती व आकाश कंदील बनविण्याच्या कौशल्यातून त्यांना आर्थिक लाभ होतो .





उपक्रम ७. मॉक मार्केटिंग

जाहिरात बनवणे, बातमी बनवणे,पोस्टर तयार करणे.

उपक्रमाचे हेतू उद्दिष्टे :-

विद्यार्थ्यांना जाहिरात बातमी पोस्टर म्हणजे काय हे समजवावे व त्या कशा कराव्यात याची कला समजावी. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता भाषाशैली आणि कलात्मक अभिव्यक्तीचा विकास व्हावा. यामुळे त्यांना व्यावसायिक शिक्षण मिळून आर्थिक फायदा होऊ शकतो.

उपक्रमाचे नियोजन व पूर्वतयारी :-

विविध जाहिराती, वर्तमानपत्रातील बातम्या,पोस्टर्स तसेच रंगीत खडू, रंग,कागद,स्केच पेन, लेखन साहित्य, विविध पोस्टर इ साहित्य वापरून विद्यार्थ्यांचे चार ते पाच गट तयार करून त्यांना वैयक्तिक रित्या काम करण्यास सांगणे.

कार्यक्रमाची अंमलबजावणी :-

दिनांक १८/०१/२०२५ रोजी सदर उपक्रमात विद्यालायचे मा. प्राचार्य श्री. पी. एन. निकम यांनी जाहिरात बातमी पोस्टर या विषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थी गट बनवून समूह कार्य दिले. काही विद्यार्थी जाहिरात बनवतात त्यात साबणाची,जलसंवर्धनाची, शालेय वस्तू, आरोग्य या विषयांवर जाहिरात बनवतात. काही गटातले विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन, वृक्षारोपण कार्यक्रम,अपघात इत्यादी विषयांना विषयांवर बातम्या बनवतात. काही गटातले विद्यार्थी पर्यावरण वाचवा,जलसंधारण, प्लास्टिक बंदी, स्वच्छता अभियान, मुलींचे शिक्षण या विषयांवर पोस्टर्स बनवतात.

सर्व विद्यार्थ्यांचे गटकार्य पूर्ण झाल्यानंतर शिक्षक प्रत्येक गटाकडून आपापल्या बातम्या, जाहिरात,पोस्टर यांचे सादरीकरण करण्यास विद्यार्थ्यांना सांगतात विद्यार्थी चांगल्या पद्धतीने त्याचे सादरीकरण करतात.

विद्यार्थ्यांमध्ये झालेला बदल:-

विद्यार्थी क्लासेस,अॅकॅडमी, मॉल यांच्या जाहिराती, पोस्टर व बातमी तयार करून देतात यातून त्यांना आर्थिक लाभ होतो.

भविष्यकालीन वेध :-

आजच्या युगात जाहिरात, बातमी लेखन आणि पोस्टर तयार करणे ही केवळ शालेय उपक्रम नसून भविष्यातील यशाचा पाया घालणारी कौशल्ये आहेत. हे सर्व उपक्रम विद्यार्थ्यांच्या विचारशक्ती, अभिव्यक्ती आणि सर्जनशीलतेचा विकास करतात.

जाहिरात तयार करताना उत्पादनाचे वैशिष्ट्य दाखवण्यासाठी कल्पकतेचा वापर केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचारांची रुजवात होते. त्याचबरोबर, भाषेचा प्रभावी वापर, लोकांशी संवाद साधण्याचे कौशल्य आणि मार्केटिंगविषयीची प्राथमिक माहिती मिळते.

बातमी लेखनामुळे विद्यार्थी वस्तुनिष्ठ विचार करायला शिकतात. घटना विश्लेषित करून त्यातील महत्वाची माहिती वेगाने व अचूकपणे मांडण्याची कला आत्मसात होते. त्यामुळे पत्रकारिता, लेखन आणि जनसंपर्क क्षेत्रात करिअर करण्याचे दार उघडते.

पोस्टर तयार करताना रंगसंगती, मांडणी आणि संदेश यांचा मेळ साधावा लागतो. यामुळे विद्यार्थी डिझाईन, व्हिज्युअल कम्युनिकेशन आणि तांत्रिक सॉफ्टवेअरचा वापर शिकतात. अशा अनुभवामुळे ग्राफिक डिझायनिंग, जाहिरात डिझाइन, अॅनिमेशन यामध्ये करिअर घडते.








उपक्रम ८ — व्यवसाय प्रदर्शन व आनंद मेळावा

उपक्रम हेतू :-

- विद्यार्थ्याला शालेय जीवनातच व्यवसाय मार्गदर्शन व विक्रीचे ज्ञान प्राप्त व्हावे.
- विद्यार्थ्याला व्यवसाय नियोजन कसे करावे यामध्ये पूर्वनियोजन व पूर्ण नियोजन कसे करावे याचे ज्ञान होते. विद्यार्थी पदार्थ विक्री करताना त्यामध्ये संभाषण कौशल्य हे विकसित होत असते.
- विक्री कशी करावी, मार्केटिंग कशी करावी, प्रदर्शन, जाहिरात कशी करावी, याबद्दल विद्यार्थ्याला माहिती होते.
- पैशाचे महत्व लक्षात येते,नफा -तोटा संदर्भात माहिती होते.
- विद्यार्थ्याचा विक्री संदर्भात आत्मविश्वास द्विगुणित होतो जेणेकरून तो स्वतःच्या पायावर उभा राहण्यास सक्षम होतो.
- व्यवसायात झालेल्या चुका याकडे कटाक्षाने लक्ष देतो व पुन्हा अशा चुका होणार नाही जेणेकरून स्वतःचा तोटा होणार नाही अशा महत्वाच्या बाबी समजून घेतो .

उपक्रमाचे नियोजन व पूर्वतयारी -

विद्यालयाचे मा. प्राचार्य पी. एन. निकम यांनी आनंद मेळाव्याविषयी मार्गदर्शन केले. खरी कमाईचे महत्व पटवून देऊन स्वतःच्या पायावर कशा पद्धतीने उभे राहावे,खरी कमाई कशी करावी, शालेय जीवनातच विक्रीचे ज्ञान प्राप्त व्हावे व व्यवसायाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचे नियोजन केले.

कार्यक्रमाची अंमलबजावणी :-

विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसाय निर्माण करावा, यासाठी शाळेत विविध कार्यक्रम व उपक्रम घेतले जातात. त्यातील आनंद मेळावा हा एक उपक्रम आहे. याकरिता आनंद मेळाव्याचे आयोजन दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी शालेय आवारात करण्यात आले. आनंद मेळाव्यात पाककला स्वत: तयार केलेले विविध खाण्याचे पदार्थ (पाणीपुरी, समोसा, भेळ, मसाला ताक, सुगंधी दुध,वडापाव,भजी) तसेच भाजीपाला इतर शालेय साहित्य आणून त्यांची विक्री केली व आर्थिक लाभ मिळवला .

विद्यार्थ्यांमध्ये झालेला बदल :-

शाळेत आयोजित करण्यात येणारे व्यवसाय प्रदर्शन आणि आनंद मेळावा हे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ एक करमणुकीचे साधन नसून शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरतात. या उपक्रमांमध्ये सहभागी झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक सकारात्मक बदल घडून येतात.विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रदर्शनात स्वतःचे उत्पादन सादर करावे लागते. त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि निर्णयक्षमता वाढते. काय विकायचे, त्याची किंमत किती ठेवायची, ग्राहकांशी कसे बोलायचे — हे सर्व अनुभव त्यांना प्रत्यक्ष मिळतात .

भविष्यकालीन वेध :-

सदर उपक्रमात विद्यार्थी संवादकौशल्य, व्यवहारज्ञान आणि संघटन क्षमता आत्मसात करतात. गटात काम करताना सहकार्य, जबाबदारी व नियोजन करणे यासारख्या गुणांचा विकास होतो. यासोबतच, नफा-तोटा, पैशाचे व्यवस्थापन, वेळेचे नियोजन याचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. आनंद मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांचे कलागुण, सजावट, खेळ, नाट्य, खाद्यपदार्थ विक्री इ. बाबत आत्मविश्वासाने सहभाग वाढतो. या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची बीजे रोवली जातात.







----------**----------

कामगार वस्तीतील मुलांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नेणाऱ्या शालेय नेतृत्वाची यशोगाथा

शाळेचे नाव - क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यामंदिर, मनपा शाळा क्रमांक १८ आनंदवली, नाशिक

शाळेचा पत्ता : नाशिक महानगरपालिका शाळा क्र.१८, आनंदवली, नाशिक, ता. जि. नाशिक

शाळेचा ईमेल आयडी - nmcsn18anandwali@gmail.com,

मुख्याध्यापक नाव - सौ. अनिता संजय जाधव

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9822431192

मुख्याध्यापक ईमेल आयडी - kirankunda1900@gmail.com





नगर पालिकेची शाळा म्हणजे शिकविण्याच्या बाबतीत उदासीन, सोई सुविधांनी अपूर्ण एकूणच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण न देवू शकणाऱ्या शाळा असा समाजाचा दृष्टीकोन पूर्णपणे खोडून टाकला तो नाशिक महानगरपालिकेच्या आनंदवलीतील शाळा क्र.१८ ने आजूबाजूला असलेल्या इंटरनॅशनल इंग्रजी माध्यमाच्या तसेच खाजगी शाळांच्या स्पर्धेत आपल्या शाळेची गुणवत्ता टिकवत दर्जेदार शिक्षण देवून संपूर्ण शहरात शाळेचा पट सुमारे 785 पर्यंत नेणारी एकमेव मनपा शाळा ठरली असून विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आन्तरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देत असल्याने राज्यभरातील इतर शिक्षक व पालकांसाठी आकर्षण व प्रेरक ठरत आहे. शाळेच्या या वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक कार्याची शासनाद्वारे दखल घेतली गेली असून महाराष्ट्र शासनामार्फत मॉडेल स्कूल मध्ये निवडल्या गेलेल्या निवडक शाळांमध्ये आनंदवली मनपा शाळा देखील निवडली गेली आहे ही येथील मुख्याध्यापकासह शिक्षकांच्या कार्याची खरी पावती म्हणावी लागेल.

प्रास्ताविक -

“करी माय-बापाचे प्रेम, देई शिक्षणाची धार,

सांभाळी प्रत्येक मुलाला, माझी शाळा दमदार !

नाशिक शहरात आनंदवली गाव,संत कबीर नगर झोपडपट्टीत, कमी जागेत, शहराच्या मध्यवस्तीत वसलेली आमची नाशिक महानगरपालिका शाळा क्र.१८, आनंदवली, नाशिक शाळा. आमच्या शाळेत येणारी मुले ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल परिवारातील असून यांच्या परिवारात जगणं हेच मोठ दिव्य असून त्यांच्या लेखी शिक्षणाला अजिबात महत्त्व नसतं किंवा जगण्याच्या लढाईत ते शिक्षणाला महत्त्व देऊ शकत नाही. दारिद्र्य, गरिबी, पालकांची निसाक्षरता प्रत्येक मुलाच्या पाचविला पुजलेले. कुणाची आई नाही, तर कुणाचा बाप नाही. जे आहेत ते पालक मुलांच्या शिक्षणासाठी जास्त योगदान न देणारे. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी, उदर निर्वाह करण्यासाठी पालक आपल्या मुलांना नियमित शाळेतही पाठवत नसत. तसेच लहान बहिण भावंडांना सांभाळण्यासाठी व घरातली काम करण्यासाठी आपल्या घरातील मुलींना पालक शाळेत न पाठवता घरी ठेवत असत व तेरा, चौदा वर्षे वयातच त्यांचे लग्न लावून देत. बालविवाह, शाळाबाह्य विद्यार्थी, कमी पटनोंदणी, गळती यासारख्या समस्या आमच्या शाळेत आम्हाला सतावत होत्या. त्यात सर्वात गंभीर म्हणजे बाल विवाहाची समस्या. या परिसरातील मुलींचे बालविवाह होत असल्याने बालविवाहामुळे शाळेचा पट कमी होणे ही समस्या गंभीर होत होती. तसेच आजूबाजूला असलेल्या मोठमोठ्या खाजगी शाळा, इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या चकमकीला काही पालक हुरळून जात होते व आपल्या पाल्यांना त्या शाळेत प्रवेशित करत होते. यामुळे आमच्या आनंदवली शाळेचा पट ही कमी होऊ लागला होता, तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची गैरहजेरी, गळती, स्थगिती सारख्या समस्या सतत वाढतांना आमच्या शाळेचे मुख्याध्यापिका व शिक्षक यांना सतत जाणवत होत्या. यासाठी शाळेतील भौतिक सुविधा वाढ, अध्ययन- अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे, शिक्षकांमध्ये समन्वय, विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांसह आनंददायी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज मुख्याध्यापक व शिक्षकांना गरजेचे वाटू लागले. त्यामुळे वरील समस्या दूर करून शाळेची गुणवत्ता वाढ करण्याचे श्रीमती अनिता जाधव यांच्या नेतृत्वातून शाळेतील सर्व शिक्षकांनी ठरविले.




सर्वप्रथम शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्यासह सर्व शिक्षकांनी आपल्या शाळेतील ही समस्या दूर करण्यासाठी काय करता येईल यावर चर्चा करून शाळेच्या प्रगतीत येणारी प्रत्येक समस्या सोडविण्याचा निर्धार केला. कार्यवाही करताना काही अडचणींना सामोरे जावे लागले.

१. सर्व शिक्षकांचे समन्वय करण्यास वेळ लागला.
२. शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना उपक्रमात समावेशित करणे.
३. शाळेत असलेल्या अपुऱ्या पायाभूत सुविधा.
४. सुविधांसाठी निधी संकलन.
५. शैक्षणिक तंत्रज्ञानविषयक साहित्याची कमतरता.

यावर मात करण्याचा निर्धार करून सर्वप्रथम विद्यार्थी गृहभेटी करण्याचे ठरविले. घरोघर जाऊन शाळेच्या सर्व पालकांचे समुपदेशन केले. त्यांना शाळेतील गुणवत्ता, पालकांचा लागणारा प्रतिसाद, शाळेसाठी आवश्यक निधी संकलन याबाबत चर्चा करून योगदान देण्यास आवाहन केले. सर्व पालकांना नियमित शाळेत येवून आपल्या पाल्याच्या अभ्यासाबाबत चौकशी करण्यास, शाळेकडे लक्ष देण्यास, शाळेसाठी परिसरातील दानशूर व्यक्ती, माजी विद्यार्थी यांचेशी संपर्क करण्यासाठी आवाहन केले. तसेच नियमित पालक सभा घेऊन शाळेतील सोयी सुविधा वाढविण्यासाठी योगदान प्राप्त केले.

म्हणतात ना, "यथा राजा, तथा प्रजा" , " एक अच्छा नेता हमेशा अपने साथियो को साथ लेकर चलता है" अगदी याच उक्तीप्रमाणे मुख्याध्यापक श्रीमती अनिता जाधव यांनी पुढाकार घेऊन सर्व शिक्षकांना शालेय गुणवत्ता वाढविण्यासाठी आयोजित करावयाच्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे नियोजन करून दिले. शिक्षकांचे प्राथमिक व उच्च प्राथमिक अश्या दोन गटात विभाजन करून सर्वांना विविध नाविन्यपूर्ण उपक्रम वाटून दिले. यात खालीलप्रमाणे उपक्रम गेल्या २ वर्षात शाळेत उत्तम नियोजनानुसार राबविण्यात आले.

विद्यार्थ्यांमधील मुलभूत क्षमता वाढविण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व सातत्यपूर्ण प्रयत्नान्द्वारे आनंददायी शिक्षण :

- **स्टेम क्लास** - कला, क्रीडा व संगीत या विषयातील विद्यार्थ्यांची रुची व कौशल्य वाढविण्यासाठी शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या मदतीने खास क्यू आर कोडस बनवून कला, क्रीडा व संगीत विषयास चालना दिली. यासाठी मुख्याध्यापक अनिता जाधव यांच्या मार्गदर्शनातून शाळेतील शिक्षिका श्रीमती कुंदा बच्छाव यांनी शाळेत स्टेम क्लास बनवून विद्यार्थ्यांना सर्व शिक्षकांच्या मदतीने मार्गदर्शन करू लागल्या. यासाठी समाज सहभाग मिळवला. इयत्ता पाचवी ते आठवीचे सुमारे ४०० विद्यार्थी या उपक्रमाद्वारे गायन, गिटार वादन, कीबोर्ड वादन, नृत्य,क्यूब, बुद्धिबळ, कॅरम ,अब्याकस शिकले.व विविध राष्ट्रीय, राज्य स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश मिळवू लागले. स्टेमक्लास द्वारे मुलांना कला कौशल्य शिकवणारी आनंदवली शाळा पहिली व एकमेव शाळा ठरली. आमच्या या उपक्रमास SCERT आयोजित नवोपक्रम स्पर्धेत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले तर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ची SPIF ही एक लाखाची फेलोशिप देखील मिळाली.












- **तरंगते वाचनालय (Hanging Library)-** विद्यार्थ्यांच्या वाचन संस्कृती विकसनासाठी, समजपूर्वक वाचन करण्यासाठी ३००० पुस्तके शाळेचे माजी विद्यार्थी, पालक, समाजातील दानशूर व्यक्ती यांचे कडून मिळवून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले. प्रत्येक वर्गात आणि संपूर्ण शाळेत पहिल्या मजल्यापासून तिसऱ्या मजल्यापर्यंत विविध बालसाहित्य असलेले बोधकथा, आत्मवृत्त, वैज्ञानिक , विविध भाषिक पुस्तकांचे पुस्तके असलेली सुसज्ज हंगिंग लायब्ररी बनवली. विद्यार्थी अतिशय आवडीने मिळेल त्या वेळात ही पुस्तके वाचू लागली, टिपणे काढू लागली, पुस्तकांचे समीक्षण परिपाठात करू लागली. यामुळे विद्यार्थ्यांची वाचन क्षमता वाढली असून मुले कविता करू लागले,लेख लिहू लागले.





- **कवितेचा तास-** विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीस वाव मिळून लेखन व गायन कौशल्य विकसनासाठी दर शनिवारी कवितेचा तास हा उपक्रम राबविण्यात आला. यात शाळेतील जवळपास ९० विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता बनवल्या. शाळेच्या शिक्षिका श्रीम. बच्छाव यांनी विद्यार्थ्यांच्या कवितांचे संपादन करून कविता उमलत्या कळ्यांचे हे पुस्तक प्रकाशित केले.





- **IDEA box** - विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होण्यासाठी विद्यार्थ्यांना सुचलेल्या नाविन्यपूर्ण वैज्ञानिक कल्पना संकलन करण्यासाठी शाळेत **IDEA box** बसवून विद्यार्थ्यांचे योगदान मिळविले. याद्वारे विद्यार्थ्यांना विज्ञान मेळावा, Inspired Award सारख्या स्पर्धांमध्ये सहभाग वाढला. ०२ विद्यार्थ्यांना सन २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय स्तरावर इन्स्पायर अवार्ड मिळाला असून प्रत्येकी रु. १००००/- फेलोशिप मिळाली.



- **कामगारांच्या लेकरांना विमानप्रवासाच्या सहलीद्वारे विधानभवन अभ्यासाचा प्रत्यक्ष अध्ययन अनुभव-** मुख्याध्यापक यांचे मार्गदर्शन व सर्व शिक्षकवर्ग यांच्या सहकार्याने लोकसहभागातून १०००० निधी संकलन करून मुख्याध्यापक यांच्या नियोजनाने शाळेतील ३५ विद्यार्थ्यांना विमानाने विधान भवन, मंत्रालय, मुंबई येथे भेट घडवून आणली. मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, पालकमंत्री, विविध IAS अधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी विधानसभा व विधानपरिषद यांचे १/१ तासाचे सत्र प्रत्यक्ष बघितले. नागरीकशास्त्राचा प्रत्यक्ष अभ्यास केला. ही सहल म्हणजे विद्यार्थी व शिक्षकांसाठी न भूतो, न भविष्यति असा अविस्मरणीय अनुभव ठरला. आम्ही देखील खूप शिकू व एक दिवस आमच्या आई वडिलांना विमानाने फिरायला नेवू अशी शपथ त्या दिवशी विद्यार्थ्यांनी घेतली.






- **लोकसहभागातून शाळेचा कायापालट** - शाळेतील आजी-माजी विद्यार्थी, पालक, समाजातील दानशूर व्यक्ती तसेच विविध विभागातील अधिकारी यांच्याद्वारे 25 ते 30 लाखाचा निधी गोळा करून शाळेच्या भौतिक सुविधा विकसित केल्या. शाळेच्या भौतिक सुविधा वाढवण्यासाठी लोकसहभाग वाढविला त्यासाठी समाज माध्यमांचा उपयोग करून घेतला. आजवर 25 ते 30 लाखांचा लोकसहभाग मिळवून शाळेला रंगरंगोटी, स्मार्ट टीव्ही, टेबलेट्स, शैक्षणिक साहित्य व अवांतर वाचनाची जवळपास 3000 पुस्तके, खुले वाचनालय विद्यार्थ्यांसाठी प्राप्त केली आहेत.





- **मुलांना शिक्षणासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ** - ई-ट्वीनिंग स्कूल, बांगलादेश प्रोजेक्ट, जर्मन भाषा अध्ययन, गूगल अर्थ यासारख्या आभासी प्रतलावरील प्रकल्पांद्वारे विद्यार्थ्यांच्या २१ व्या शतकातील संभाषण, साक्षरता, समन्वय यासारख्या कौशल्यांच्या विकासाला चालना दिली. अश्याप्रकारे नियमित शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या मनात शाश्वत विकास धोरण रुजवणूक करण्यात येते. प्लास्टिक मुक्त आपले शहर व देश, स्वच्छ भारत अभियान या द्वारे मुलांमध्ये आपल्या देशाप्रती प्रेम व काळजी या गुणांची रुजवणूक केली.






- **डीजीटल माध्यमाने शिक्षण देणारी मॉडेल स्कूल** - शाळेमध्ये लोकसहभागातून टी. व्ही., संगणक, laptop, Tab प्राप्त करून डिजिटल शिक्षण नियमित दिले जाते. विद्यार्थी स्वतः टी. व्ही., संगणक, laptop, Tab द्वारे स्वयंअध्ययन करतात, यामुळे आमच्या शाळेला शासनाने मॉडेल स्कूल म्हणून निवडली आहे. आनंददायी शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा, शैक्षणिक साहित्याचा वापर अध्यापनात करतात. आमच्या विद्यार्थांच्या वर्षभराची प्रगती, यश संग्रही करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांचे ई पोर्ट फ़ोलिओ ओळखपत्र बनविण्यात आले आहे. संपूर्ण नाशिकमध्ये आपल्या विद्यार्थ्यांचे असे आय कार्ड बनवणारी आमची एकमेव शाळा आहे.





जीवन शिक्षण, मुल्यशिक्षण, व्यावसायिक शिक्षण देणारी एकमेव शाळा - आपली भारतीय संस्कृती, प्रथा, परंपरा, मुल्ये, प्राचीन कला शिकून जपण्याचे, विद्यार्थ्यांना मनाचे श्लोक, संस्कृत सुभाषिते, ज्येष्ठांचा आदर, घरातील नियमित कामात सहभाग याद्वारे मूल्यशिक्षण शाळेत नियमित दिले गेले. समाजातील विविध थरातील व्यावसायिक यांना प्रत्यक्ष भेट देवून, शाळेतील व्यवसाय करणारे पालक यांना शाळेत त्यांच्या व्यवसायाबद्दल अडचणी, व्यवसायातील चढ-उतार याबद्दल विद्यार्थ्यांना अनुभव देण्यात आले. उदा. चांभार, चहा-फळ विक्रेता, किराणा दुकानदार, साबण बनविणे, धूप बनविणे आदी. यामुळे विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण, मुल्यशिक्षणाचा अनुभव मिळून त्यांचा व्यावसायिक दृष्टीकोन तयार झाला. त्यामुळे आज शाळेचा पट ७८५ पर्यंत वाढलेला आहे.







- **क्षेत्र भेटीद्वारे शिक्षण** - विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनाचे अनुभव देण्यासाठी नियमित क्षेत्र भेटीचे आयोजन करून पोस्ट ऑफिस, बँक, शासकीय कार्यालये यांना प्रत्यक्ष भेट देवून तेथील कामकाज समजावून देण्यात आले. बँकेत वापरात येणारे विविध फोर्म्स, चेक, डिमांड ड्राफ्ट विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष भरून घेवून बँकेतील ठेवी, खाते, व्यवहार याची माहिती समजावून देण्यात आली. पोस्ट कार्यालयातून प्रत्यक्ष पत्र, लिफाफे कश्या नोंदी ठेवण्यात येतात, आवक-जावक प्रणाली, बाहेर गावी होणारे दळण-वळण याचाही तेथील अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत उद्बोधन करण्यात आले. पोलीस स्टेशनला भेट देवून तेथील प्रत्यक्ष कामाचे स्वरूप, विविध लोकांशी होणारा संपर्क, विविध कार्यालयाचा पत्रव्यवहार समजून देण्यात येवून प्रत्यक्ष शासकीय काम जवळून समजावून देण्यात आले.







- **शासनाद्वारे राबविलेल्या विविध उपक्रमांमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचा नियमित सहभाग** - दीक्षा, शालेय पोषण आहार योजना, मेरी माटी मेरा देश, पीएम ई विद्या वाहिनी, NILP, NIPUN सारखे कार्यक्रम, शाळा प्रवेश कार्यक्रम, पहिले पाऊल, विविध शासकीय स्पर्धा यात शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांचा नियमित सहभाग नोंदवून त्यांचे योगदान घेण्यात आले. उदा. प्राथमिक स्तरावर पहिले पाऊल प्रकल्पाद्वारा पालकांचे व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले, दीक्षा व पीएम ई विद्या वाहिनी वरील महाराष्ट्र राज्याचे कार्यक्रम ई-साहित्य विद्यार्थ्यांना शाळेतील इंटरेक्टीव panel वर नियमित दाखविण्यात आले व त्यात विद्यार्थी व शिक्षक यांचा सहभाग नोंदविण्यात आला. नव भारत साक्षरता कार्यक्रमाचे जिल्ह्यात प्रचार व प्रसारासाठी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः नाटक व लोकगीत ध्वनिमुद्रित केल्याने जिल्ह्यात या कार्यक्रमास चांगली प्रसिद्धी मिळून नवसाक्षर शोधण्यास मदत झाली.
- **शासनाच्या शिक्षणाचा उत्सव उपक्रमात शाळेला खास स्थान**- नाशिक जिल्हा परिषद आयोजित शिक्षण उत्सव मध्ये आमच्या शाळेतील उपक्रम संपूर्ण जिल्ह्यासमोर सादर करण्यासाठी खास निमंत्रित करण्यात आले ही आमच्या शाळेसाठी अभिमानाची बाब होती. तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून आमची शाळा मॉडेल स्कूल म्हणून निवडण्यात आली हे ही कौतुकास्पदच होते. शाळेला शासनाने अटल lab , रोबोटिक साहित्य, कोडींग साहित्य देखील भेट म्हणून दिली. अश्या उपक्रमात विविध स्तरावर शाळेला यश मिळाले आहे.
- **बक्षीसपात्र परसबाग** : शाळेच्या बाजूला असलेल्या मोठ्या भागात शाळेची परसबाग बनविण्यात आली आहे. शाळेतील अति चंचल विद्यार्थ्यांना परसबागेची मशागत व काळजी घेण्याची जबाबदारी दिली. शाळेत वांगे,गिलके,दोडके, टोमाटो, मिरची हळद या फळभाज्या तर मेथी, पालक,कोथिंबीर या पालेभाज्या लावल्या असून त्यात येणारा भाजीपाला शालेय पोषण आहारात नियमितपणे वापरला जातो. आमच्या परसबागेत बाराही महिने चांगला भाजीपाला पिकविला जात असून त्याच्या वापराद्वारे विद्यार्थ्यांमधील जीवनसत्वे वाढविली जात आहेत. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, संघटन,पर्यावरणप्रेम, आहारातील पोषणघटकांची माहिती या गुणांची वृद्धी होत आहे. आमच्या परसबागेस विभागस्तराचे उत्तम परसबाग म्हणून द्वितीय क्रमांकाचे बक्षीसही मिळाले आहे.





- **सोशल मिडियाद्वारे शाळेच्या यशोगाथा व यशाचे कौतुक-** SCERT, MPSP, DIET यांचे WhatsApp, Facebook, Instagram, Twitter, Website व YouTube अश्या समाज माध्यमांवर शाळेतील राबविलेल्या विविध नवोपक्रमांचे कौतुक झालेले आहे.नाशिक मनपा, जिल्हा, व राज्यस्तरावर SCERT, शिक्षण आयुक्त कार्यालय, बालभारती, राज्य शिक्षण मंडळ या कार्यालयांच्या सामाजिक माध्यमांवर तसेच इतर टीव्ही, वर्तमान पत्रे, सामाजिक माध्यमे यावर शाळेतील शैक्षणिक पालकत्व, बुक्स ओन व्हील, खुले वाचनालय, तरंगते वाचनालय, Idea Box, मूल्यशिक्षण अश्या अनेक उपक्रमांचे दखल घेण्यात येवून राज्यातील शाळा, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्या पर्यंत ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात सादर करण्यात आलेल्या आहेत. शाळेतील यशोगाथा समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचविण्यासाठी सर्व शिक्षक नियमित योगदान देतात.



दिव्य मराठी

नाशिक सिटी 02-03-2025

इस्त्रो भेट प्रत्यक्षात सॅटेलाइट नेटवर्क, कंट्रोल रूम बघून विद्यार्थी उत्साहित

अवकाश आदित्य एल-१ ची विद्यार्थ्यांना सफर

प्रतिनिधी | नाशिक

इस्त्रोच्या इतिहासात पहिल्यांदाच आठवीच्या विद्यार्थ्यांना मिळालेला प्रवेश त्यांनी केलेला विमान प्रवास या दोन्ही गोष्टी त्यांच्यासाठी अचंबित करणाऱ्या ठरल्या. विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात अवकाशात सोडलेल्या उपग्रहांचा अभ्यास करता आला. आदित्य एल-१ या उपग्रहाशी प्रत्यक्षात साधलेला संपर्क बघून सर्वच विद्यार्थी अचंबित झाले. इस्त्रोच्या सहलीत सहभागी झालेल्या काही विद्यार्थ्यांशी 'दिव्य मराठी'ने प्रत्यक्षात साधलेला संवाद. महापालिकेच्या आनंदवली येथील शाळेतील उपक्रमशील शिक्षिका कुंदा बच्छाव यांनी यासाठी प्रयत्न केले.

बंगळुरू येथील इस्त्रो सेंटरला पहिल्यांदाच महापालिकेच्या आठव्या इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी भेट दिली.

कंट्रोल रूमची माहिती

आम्ही पहिल्यांदा विमानात बसलो. आजवर एका छोट्या पक्षाप्रमाणे आकाशात घिरट्या घालणारे विमान पाहिले होते. आम्हाला कंट्रोलरूमची माहितीने छान अनुभव घेता आला.
- सृष्टी खरात, विद्यार्थिनी, आठवी

अविस्मरणीय अनुभव

इस्त्रो सेंटरला आम्ही सॅटेलाइटवर नियंत्रण करणारी अँटेना प्रत्यक्ष बघितली. तिचा व्यास ३२ मीटर एवढा असून ४०० टन एवढ्या प्रचंड वजनाची होती. आमच्यासाठी अविस्मरणीय असा अनुभव होता.
- अग्रीन वादी

प्रत्यक्ष अनुभूती

तीन ठिकाणी तपासण्या करून आम्हाला आत सोडले. सॅटेलाइट यांच्यावर कसे नियंत्रण केले जाते हे प्रत्यक्ष बघितले. शास्त्रज्ञ शंकर मदास्वामी यांनी ही संधी उपलब्ध करून दिली.
- विद्या इंगोले

तोडक्या ज्ञानात भर

इस्त्रो सेंटरचे सेक्रेटरी व प्रसिद्ध शास्त्रज्ञ व्ही. नारायण हे आम्हाला भेटले. विभाग प्रमुख व शास्त्रज्ञ शंकर मदास्वामी यांनी आम्हाला इस्त्रो सेंटरची स्थापना, रॉकेट उड्डाण, आतापर्यंत इस्त्रो सेंटरवरून कोणकोणते सॅटेलाइट सोडले गेले, कोण कोणत्या शास्त्रज्ञांनी तेथे काम केले. इस्त्रोमध्ये काम करण्याची इच्छा असल्यास विद्यार्थ्यांना करिअरच्या कोणत्या संधी आहेत व त्यासाठी कोणते शिक्षण घ्यावे लागेल या सगळ्या बाबींची माहिती दिली. कंट्रोल रूममधील प्रत्येक क्षण अविस्मरणीय असाच सर्व विद्यार्थ्यांसाठी होता.
- करण सोनार, इयत्ता आठवी



विद्यार्थ्यांची 'प्रेरणा'दायी कल्पकता

महापालिका शाळेतील चिमुकल्यांनी बनविलेल्या नावीन्यपूर्ण उपकरणांना ॲवॉर्ड

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून दिल्या जाणाऱ्या 'इन्स्पायर ॲवॉर्ड'साठी नाशिक महापालिकेच्या शाळा क्र. १८ मधील रौनक शर्मा व अमरित वादी या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आपल्याला दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधत या विद्यार्थ्यांनी कल्पकतेने बनविलेल्या उपकरणांमुळे त्यांची निवड करण्यात आली. या कल्पकतेला वाव देण्यासाठी ॲवॉर्डद्वारे दोन्ही विद्यार्थ्यांना दहा हजार रुपये बक्षीस रूपात मिळणार आहेत.

यंदाच्या वर्षी 'इन्स्पायर ॲवॉर्ड'साठी नाशिक महानगरपालिकेच्या आनंदवली येथील शाळा क्र. १८ मधील सातवी इयत्तेमध्ये शिकणाऱ्या रौनक शर्मा व अमरीत वादी यांची निवड करण्यात आली आहे. या दोन्ही यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या नावीन्यपूर्ण प्रकल्पांसाठी शिक्षिका कुंदा बच्छाव, अनिता जाधव, ममता सुंठवाल यांनी मार्गदर्शन केले.

अमरीत वादी

रौनक शर्मा

...यासाठी देशभरात स्पर्धा

देशातील विविध भागातील कल्पकतेची जोड असलेल्या विद्यार्थ्यांनी बनवलेले नावीन्यपूर्ण उपक्रम समाजापर्यंत पोहचावेत यासाठी 'इन्स्पायर ॲवॉर्ड' ही स्पर्धा राबविली जाते. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून या अनोख्या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ते सामोरे जात असलेल्या विविध समस्यांवर उपाय शोधून नवनवीन प्रयोग राबविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. संपूर्ण देशातून उपक्रमशील विद्यार्थी आपल्या शिक्षकांच्या मदतीने या स्पर्धेत नामांकन करतात व त्यातील निवडक अशा नावीन्यपूर्ण प्रयोगांची निवड 'इन्स्पायर ॲवॉर्ड'साठी केली जाते.

'आयडिया बॉक्स'द्वारे मागविल्या कल्पना

'इन्स्पायर ॲवॉर्ड' या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी महापालिकेच्या शाळा क्र. १८ 'आयडिया बॉक्स' ही संकल्पना राबविली होती. शाळेमध्ये एक बॉक्स ठेवून विद्यार्थ्यांकडून नावीन्यपूर्ण कल्पना मागविण्यात आल्या होत्या. जवळपास ४० मुलांनी आपल्या कल्पना 'आयडिया बॉक्स'मध्ये जमा केल्या. त्यातील पाच प्रकल्पांची निवड करून, ते प्रकल्प इन्स्पायर ॲवॉर्डसाठी पाठविण्यात आले होते. त्यातील दोन प्रकल्पांची निवड या सरकारमार्फत या ॲवॉर्डसाठी करण्यात आली आहे.

घरगुती वस्तूंपासून मोबाइल स्टँड

अनेकदा मोबाइलवरून काही माहिती घेताना मोबाइल सतत हातात धरावा लागतो. ऑनलाइन क्लास किंवा काही अन्य काम करीत मोबाइल पाहत असल्यास मोबाइल ठेवण्यासाठी एक स्टँड अमरीत वादीने बनविले आहे. विशेष म्हणजे, हे स्टँड पूर्णतः घरगुती वापराच्या वस्तूंपासून बनविण्यात आले असून, स्टँडला एक फॅनही जोडण्यात आला आहे. मोबाइल आणि स्टँड गरम झाल्यास त्याचे तापमान नियंत्रित करण्याचे काम हा फॅन करतो.

समस्येवर 'सौरपेन'चा उपाय

रौनक शर्मा या विद्यार्थ्याने एक विशिष्ट पेन बनविला आहे. या पेनच्या पुढच्या बाजूला लाइट, तर मागच्या बाजूला पंखा आहे. रौनक ज्या भागात राहतो तिथे विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे अनेकदा त्याला अभ्यास करताना अडचणी येतात. यावर उपाय म्हणून त्याने सौरऊर्जेवर चालणारा पेन विकसित केला असून, त्याच्या पुढच्या बाजूला लाइट व मागील बाजूला पंखा आहे.

- **NMMS, Scholarship, Cube स्पर्धा** - NMMS, Scholarship, Cube अश्या स्पर्धांमध्ये जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी यश मिळविलेले आहे. शाळेतील ०१ विद्यार्थ्यास ग्लोबल स्टुडन्ट पुरस्कार, ०२ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्यूब स्पर्धेत पुरस्कार आणि ०५ विद्यार्थ्यांना राज्य क्यूब स्पर्धेत पुरस्कार, ०१ विद्यार्थ्यास राष्ट्रीय युवा वैज्ञानिक पुरस्कार, ०१ विद्यार्थ्यास वर्ल्ड बुक रेकोर्ड पुरस्कार, २४ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय NMMS शिष्यवृत्ती, ०8 विद्यार्थ्यांना राज्य सरकार शिष्यवृत्ती, २२ विद्यार्थ्यांना BTS शिष्यवृत्ती, २४ विद्यार्थ्यांना Manthan शिष्यवृत्ती प्राप्त, 02 विद्यार्थ्यांना इन्स्पायर अवार्ड, ०१ विद्यार्थ्यास ऑल इंडिया चिल्ड्रन्स एज्युकेशनल इ कंटेंट कॉम्पिटिशन अवार्ड प्राप्त झालेले आहेत.

- **“शैक्षणिक पालकत्व ... एक हात मदतीचा”:** विद्यार्थ्यांसाठी अध्यापन अधिक प्रभावी होण्यासाठी मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांनी सामाजिकदृष्ट्या संवेदनशील विषय शाळेशी जोडून शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुलांमध्ये सामाजिक भान पसरविण्याचे काम केले आहे. आमच्या शाळेतील गरीब होतकरू मुलांना त्यांचे शिक्षण पूर्ण करताना कोणत्याही आर्थिक किंवा अन्य कारणाचा सामना करावा लागू नये आणि त्यांचे पुढील शिक्षण अपूर्ण राहू नये यासाठी मुख्याध्यापक अनिता जाधव यांच्या मार्गदर्शनाने शाळेतील शिक्षिका कुंदा बच्छाव यांनी 2021 मध्ये **“शैक्षणिक पालकत्व ... एक हात मदतीचा”** हा उपक्रम सुरू केला आहे. आमच्या शाळेत शासनाकडून मिळालेल्या साहित्याव्यतिरिक्त मुलींच्या शाळेसाठी लागणारे साहित्य जसे की नोटबुक, स्कूलबैग्स, कंपास, सॅनिटरी नॅपकिन, टॅब, लॅपटॉप असे साहित्य सोसायटीकडून मिळवून मुलांना उपलब्ध करून दिले. त्याच वेळी आमच्या या मुली जेव्हा इयत्ता 8 वी ते 9 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी इतर शाळांमध्ये जातात तेव्हा त्यांच्या फीसह सर्व शैक्षणिक खर्च त्यांच्या पालकांना करावा लागत होता आणि ते त्यांचे पालनपोषण करण्यास असमर्थ होते. त्यामुळे त्यातील 30 ते 40 टक्के मुली शालेय शिक्षण प्रवाहातून बाहेर पडल्या. समाजातील अशा गरजू मुलींना आम्ही आर्थिक व शैक्षणिक मदत करतो. त्यामुळे त्या मुली त्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करू शकतात. आमच्या या शैक्षणिक पालकत्व सामाजिक अभियानाच्या माध्यमातून गरिबीमुळे शिक्षण पूर्ण करू शकलेल्या 130 मुलींना 130 शैक्षणिक पालक सामाजिक भागधारक म्हणून मिळाले आहेत. ते पालक दरवर्षी त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेत त्यांची फी भरतात आणि त्यांना आवश्यक ते शैक्षणिक साहित्यही पुरवतात. मदतनीसांपैकी डॉक्टर आणि अधिकारी आमच्या मुलींना मार्गदर्शन आणि समुपदेशन करतात. या अंतर्गत, आजपर्यंत आम्हाला एकूण 7 लाख रुपये CSR मिळाले आहेत. या कामात केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील देणगीदार आम्हाला मदत करतात. त्यामुळे आमची शाळा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सामाजिक जबाबदारी पार पाडत आहे. शिक्षणासाठी पालक मिळाल्याने आमच्या शाळेतील मुलींचे बालविवाह बंद झाले, जी आमच्या परिसरातील झोपडपट्टीतील अतिशय ज्वलंत समस्या होती. यामुळे आम्ही शाळेतील 130 विद्यार्थ्यांना इयत्ता 8 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रभावित करू शकलो. आमच्या शाळेपासून सुरू झालेला **“शैक्षणिक पालकत्व ... एक हात मदतीचा”** नवोपक्रम आज संपूर्ण महाराष्ट्रभर पसरला आहे. राज्यातील अनेक गरीब मुलींच्या शिक्षणासाठी आम्ही अनेक शैक्षणिक संस्थांचे सहकार्य घेवून विविध कार्यक्रमांचे आयोजन करतो.






महापालिका शिक्षिकेचा 'शैक्षणिक पालकत्व' उपक्रम

६० मुलींच्या शिक्षणाचा मागे सुकर, समाजाचाही मदतीचा हात

लोकसत्ता प्रतिनिधी


नाशिक : मुलांच्या उज्वल भविष्यासाठी उच्च शिक्षण घेणे खूप आवश्यक असते. गरीब कुटुंबातील आणि करोनामुळे आर्थिक विवंचनेत असलेल्या पालकांची परिस्थिती सध्या अजूनच वाईट झाली आहे. त्यातही मुलगी असल्यामुळे दुर्लक्षित झालेल्या अनेक विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. यामुळे व्यथित झालेल्या नाशिक महापालिका शाळा क्रमांक १८ (आनंदवाडी) येथील शिक्षिका कुंदा बच्छाव-शिंदे यांनी 'शैक्षणिक पालकत्व'उपक्रम सुरू केला आहे.या माध्यमातून ६० मुलींना शैक्षणिक पालकत्व लाभले आहे.

शाळेतील आठवीपर्यंत शिक्षण घेऊन गेलेल्या विद्यार्थिनी पुढे पदवीपर्यंत शिकून नोकरी व्यवसाय करून स्वावलंबी तर होत नाहीच, उलट शिक्षण मध्येच सोडून कमी वयातच त्यांचे लग्न लावून दिले जात असल्याचे चित्र त्यांना दिसले. शिक्षण बंद होण्याची कारणे शोधल्यावर त्यातील मुख्य कारण घरची बिकट आर्थिक परिस्थिती आणि चालू विद्यार्थिनींची शिक्षणातील गळती आणि बालविवाह या समस्या दिसून आल्या. अशा विद्यार्थिनींना शैक्षणिक पालकत्व देवून त्यांची शैक्षणिक जबाबदारी उचलण्याचे ठरवले आणि सुरुवातीला त्यांनी स्वत: तीन विद्यार्थिनी आणि त्यांचे पती किरण शिंदे यांनी एक विद्यार्थिनी शिक्षणासाठी दत्तक घेतली. पण त्यांच्या सभोवती अशा अनेक हुशार व गरजू विद्यार्थिनी होत्या. त्यांना शिकण्याची जिद्द होती. परंतु, आर्थिक परिस्थितीमुळे त्यांचे शिक्षण बंद होण्याची वेळ आली होती. या विद्यार्थिनींना शैक्षणिक मदतीची गरज होती. अशा विद्यार्थिनींसाठी मदत म्हणून त्यांनी शैक्षणिक पालकत्व.. एक हात मदतीचा हे अभियान सामाजिक स्तरावर मोठ्या पातळीवर राबवायचे ठरवले.

बच्छाव यांना त्यांच्या अभियानात त्यांची मैत्रिण शिक्षिका वैशाली भामरे-ढाळीज यांची साथ मिळाली. त्यांनीही दोन विद्यार्थिनींना शिक्षणासाठी दत्तक घेतले. मनपा शिक्षक प्रशांत फटौल हेही या अभियानास जोडले गेले. या सर्वांनी हे अभियान मोठ्या स्तरावर राबवून जास्तीत जास्त विद्यार्थिनींना समाजातून मदत मिळवून द्यायचे ठरवले. समाज माध्यमाचा वापर करत समाजातून या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्याचे आवाहन केले. त्यांच्या या विनंतीचा आवाहनाला समाजातून भरभरून प्रतिसाद मिळाला.

जिल्हाधिकारी सूरज मांढरे यांनी पाच विद्यार्थिनी, पुंजाराम लिपटे यांनी पाच विद्यार्थिनी, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, विलास शिंदे आदींनी पुढे येत विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक पालकत्व दिले. त्याचबरोबर रोटरी क्लब ऑफ नाशिक यांनी आठ विद्यार्थिनी, नयना सांगुर्डे यांच्या पुढाकाराने 'इनरव्हील क्लब जेन नेक्स्ट, नाशिक' यांनी २० विद्यार्थ्यांची पुढील चार वर्षांसाठी शिक्षणाची जबाबदारी घेवून त्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले. रणरागिणी मराठा ग्रुप यांनीही काही गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य वाटप केले.

लोकसत्ता Fri, 09 July 2021
https://epaper.loksatta.com/c/61676990





- **विमानाद्वारे विद्यार्थ्यांचा इस्त्रो, बंगलुरू अभ्यासदौरा भेट-** शाळेतील अनेक विद्यार्थी वेळोवेळी विज्ञान यात्रा, इन्स्पायर अवार्ड स्पर्धा , तालुका-जिल्हा-राज्य विज्ञान प्रदर्शन यात सहभाग घेवून यश संपादन केले आहे. अशा प्रज्ञावान, गुणवंत विद्यार्थ्यांना विज्ञान तसेच खगोल विषयाचे ज्ञान अधिक सखोल व कृतियुक्त स्वरुपात मिळण्यासाठी, त्यांच्यातील नवोपक्रमाला चालना देण्यासाठी, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी व इस्त्रो संस्थेचे काम पाहण्याचा प्रत्यक्ष अध्ययन अनुभव देता यावा या हेतूने मुख्याध्यापिका अनिता जाधव यांच्या मार्गदर्शनाने शाळेतील ३० विद्यार्थ्यांची संपूर्ण लोकसहभागातून विमानाद्वारे प्रवास इस्त्रो बेंगलोर अभ्यासदौरा सहल काढण्यात आली. या ३ दिवसीय शैक्षणिक भेटीने विद्यार्थ्यांना विविध उपग्रह अवकाशात कसे सोडतात, त्यांची कार्यपद्धती तेथील तज्ञ, अनुभवी वैज्ञानिकांकडून मिळाली. सर्व विद्यार्थ्यांसाठी हा एक अनोखा अनुभव होता. शाळेतून भविष्यातील बाल वैज्ञानिक घडविण्यासाठी ही शैक्षणिक सहल नक्कीच योगदान देईल.





- **राष्ट्रीय शैक्षणिक बाल ई-साहित्य निर्मिती स्पर्धा २०२३-२४-** केंद्रीय शिक्षण मंत्रालय व केंद्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी देशातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक, अधिकारी, शासकीय व अशासकीय संस्था यांचे शैक्षणिक तंत्रज्ञान कौशल्यांना चालना देण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक बाल ई-साहित्य निर्मिती स्पर्धेचे राष्ट्रीय स्तरावर आयोजन करण्यात येते. सन २०२३-२४ मध्ये प्रस्तुत शाळेतील एकूण ३ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून श्रवण, चित्रफित या गटात आपले ई-साहित्य सादर केले होते. देशभरातून एकूण ८३० स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. शाळेसाठी अभिमानाची बाब म्हणजे यात विद्यार्थी गटातून राष्ट्रीय स्तरावर शाळेतील **इयत्ता ८ वी तील करन अशोक सुनार या विद्यार्थ्याच्या "A Greener Future"** या दृक-श्राव्य ई-साहित्यास **शिल्लोंग, मेघालय** येथे राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. संपूर्ण महाराष्ट्रातून शासकीय शाळेतील निवड झालेला करण हा एकमेव विद्यार्थी ठरला. रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. देशपातळीवर शासकीय शाळेतील विद्यार्थ्यांना ई-साहित्य निर्मितीसाठी पुरस्कार मिळणे ही बाब प्रथमतः घडलेली असल्याने शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक या सर्वांचे खरोखरच यात बहुमूल्य योगदान विद्यार्थ्यांना लाभते, हे यातून सिद्ध होते.







- **प्रसार माध्यमांनी घेतलेली शाळेची दखल :** शाळेतील विविध नवोपक्रम तसेच विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश इतरांपर्यंत पोहचविण्यासाठी शाळा नेहमीच अग्रेसर असते. राज्यातील सकाळ, लोकमत, पुढारी, आपला महाराष्ट्र, दैनिक भास्कर सारख्या अनेक वर्तमान पत्रात शाळेत राबविलेले विविध उपक्रम, शाळेस प्राप्त यश यांची दखल नोंदविली गेलेली आहे. यात शैक्षणिक पालकत्व, विज्ञान मेळावा, शिष्यवृत्ती यश, तंत्रज्ञान , ऑनलाईन शिक्षण, महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा सहभाग, दप्तरमुक्त शनिवार, मनपा टॅलेंट सर्च, पुस्तके आली आपल्या भेटीला, मै स्वावलंबी, Selfie with success आदी उपक्रमांचा सहभाग आहे. यामुळे संपूर्ण जिल्ह्यात, पालकांपर्यंत तसेच वरिष्ठ कार्यालयापर्यंत शाळेचे योगदान पोहचते.

- **अडचणी दूर झाल्यानंतर मिळालेले दृश्य परिणाम/ फलनिष्पत्ती -**

गेल्या दोन वर्षापासून सर्व शिक्षकांच्या समन्वयाने पालकांची नियमित भेट, चर्चा ,पालकांचे वारंवार समुपदेशन, शालेय प्रशासनात त्यांचा सहभाग याद्वारे शाळेची गुणवत्ता पालकांपर्यंत पोहचवली, पालकांचा शाळेवर, शिक्षकांवर विश्वास वाढला. शिक्षणाचे महत्व त्यांना शिक्षकांनी पटवून दिले. विद्यार्थ्यांना जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावर विविध स्पर्धांमध्ये यश तर शाळेतील शिक्षकांना व शाळेस शासनाचे विविध पुरस्कार मिळाल्याने शाळेचा नावलौकिक संपूर्ण नाशिक शहरात वाढलेला आहे. महाराष्ट्र शासन आयोजित बालनाट्य स्पर्धेत विद्यार्थ्यांना अभिनयाची संधी व त्यात उत्कृष्ट भूमिकेसाठी त्यांना मिळालेले पुरस्कार, इंडियन क्यूब चॅम्पियन शिप या राष्ट्रीय स्पर्धेत मुलांचा सहभाग व त्यांनी मिळवलेले सुवर्ण व रजत पदक, . महाराष्ट्र राज्य फुटबॉल स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. अशा गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या शाळेवर विश्वास निर्माण होऊन शाळेची प्रगती होण्यासाठी मदत म्हणून समाजातील लोक आपले योगदान देवू लागले. विद्यार्थ्यांमधील ,त्यांच्या पाल्यांमधील अपेक्षित बदल त्यांना दिसले व ते नियमितपणे आपल्या मुलांना शाळेत पाठवू लागले. शाळेची गळती आपोआप कमी झाली. तसेच पटनोंदणी देखील वाढली. आज रोजी शाळेचा पट 785 इतका असून परिसरात सर्वात जास्त पट असलेली ही एकमेव शाळा आहे.

१. **समारोप-** अशा प्रकारे एक कमी भौतिक सोयी सुविधा असलेली आमची आनंदवली शाळा आज नाशिक शहरातील उत्कृष्ट, गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी आदर्श शाळा म्हणून नावारूपास आलेली आहे. यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता जाधव यांच्या मार्गदर्शनाने सर्व शिक्षकांनी, पालकांनी, विद्यार्थ्यांनी, तसेच समाजातील दानशूर लोकांनी दिलेल्या योगदानामुळे आज आनंदवली सारख्या झोपडपट्टीतील गरीब विद्यार्थी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करून पुढील शिक्षण घेत आहेत. समाजातील सर्वच ठरतील गरीब विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात टिकवून त्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी आमच्या मनपा शाळेचा आम्हाला खूप-खूप अभिमान आहे.

२. **टीम आनंदवली**



३. शाळेचे विविध उपक्रम व्हिडिओ लिंक्स -

https://www.youtube.com/watch?v=-Nf4ySol1Og

https://youtu.be/oO2i_ozz1gs?si=fo15E40fQR3kw52N&sfnsn=wiwspwa

https://youtu.be/SQE3FV5hIH0?si=tH2XRCf5VdXDVnUW

https://youtu.be/VtzXuAj1xL0?si=xfAjicWNKhPIZtZi

https://youtu.be/MXbruNAzc_0?si=4LQlrMbOCHbkdwtJ

https://youtu.be/IQHnaNh0nXE?si=LL6lcr24rGKL6F9K

https://youtu.be/-YAJ_Rj66kA?si=ctqhoMmCnd4EiOVj

https://youtu.be/H1M1fYlOKto?si=Co1Nor3d1NabLuT8


https://youtu.be/QeT_RZ1IRUo?si=a2101Z_sp3dO2Rn0

https://youtu.be/84V4L0Sp-l8?si=ZDzaAIprQ_T3o2K6

https://youtu.be/NNt7HF_H8aM?si=ZxRl33L_5xYTcV8d

https://youtu.be/bpc6jmjknSQ?si=15dIj4tW0_CSk3QH

----------**----------



पूर्वप्राथमिक व प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या पायाभूत शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - पी. एम. श्री. जि. प प्राथ.शाळा भिगवण. ता इंदापूर जि. पुणे.

शाळेचा पत्ता - भिगवण. ता इंदापूर जि. पुणे.

मुख्याध्यापक नाव - जयश्री बबन सरके.


मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 7350104752

मुख्याध्यापक ईमेल आयडी - jbsarke@gmail.com

पायाभूत शिक्षण मूलभूत साक्षरता आणि संख्या ज्ञानासाठी Foundational Literacy and Numeracy FLN हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरण NEP 2020 मध्ये नमूद केल्याप्रमाणे 2025 पर्यंत प्राथमिक स्तरावर सार्वत्रिक साक्षरता आणि संख्या ज्ञान प्राप्त करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला. भारत सरकारने निपुण भारत ही योजना देखील सुरू केली आहे ज्यामध्ये 2026- 27 पर्यंत तीन ते नऊ वयोगटातील मुलांसाठी मूलभूत शिक्षण आणि संख्या ज्ञानावर लक्ष केंद्रित केले आहे.

या सर्वांचा अभ्यास करून मीही माझ्या शाळेतील बाल वाटिका ते तिसरीतील म्हणजेच तीन ते नऊ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या पायाभूत शिक्षण मूलभूत साक्षरता व संख्या ज्ञानासाठी सहकारी शिक्षकांना बरोबर घेऊन 2022 - 23 मध्ये कामाला सुरुवात केली. केवळ जिल्हा परिषदेचे शिक्षक नव्हे तर बालवाटीकेतील तीन ते पाच च्या वयोगटातील मुलांसाठी अंगणवाडी ताईंनाही या उपक्रमात सामील करून घेतले व सर्वांनी मिळून तीन ते नऊ या वयोगटातील मुलांसाठी पायाभूत शिक्षण मूलभूत साक्षरता आणि संख्या ज्ञानासाठी काम सुरू केले.

सर्वात प्रथम मी वेध ग्रुप मध्ये काम करत असताना वेध टीमने वयोगट 3 ते 14



वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती वर तयार केलेल्या उपक्रमाचा आधार घेऊन अंगणवाडी ताईंना मुलांचा सराव घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे गेली वर्षभर अंगणवाडी ताईंनी लहान मुलांना गोष्टी फार आवडतात म्हणून गोष्टी सांगणे हा मुलांसाठी एक उत्कृष्ट उपक्रम आहे म्हणून वेगवेगळे प्रकारच्या कथा जसे की प्राणी निसर्ग किंवा काल्पनिक कथा मुलांना सांगण्यास सुरुवात केली. गोष्टी सांगताना गोष्टींमधील पात्रांचे आवाज काढणे विविध भावना व्यक्त करणे आणि मुलांकडून प्रश्न विचारून त्यांना सहभागी करून घेतले.

बालगीते आणि कविता मुलांना आवडतात त्यामुळे साध्या सोप्या गाण्यांचा आणि कवितांचा वापर करून मुलांमध्ये भाषिक विकास केला, गाणी म्हणताना मुलांना नाचायला आणि विविध क्रिया करायला प्रोत्साहित केले, यातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत गेला व पायाभूत शिक्षणातील गाणी गोष्टी अंकगणित ओळख तसेच अक्षर ओळख करून घेण्यास मुले तयार होऊ लागली, अक्षरे आणि शब्दांशी संबंधित मुले खेळ खेळू लागली. तसेच चित्रांच्या मदतीने गोष्टी सांगू लागले त्याचप्रमाणे चित्रकला आणि हस्तकला उपक्रमामुळे मुलांच्या कल्पशक्तीला वाव मिळतो. मुलांना रंग ,पेन्सिल, कागद देऊन तुम्हाला सुचेल ते करा अशा सूचना अंगणवाडी ताईंनी दिल्या, त्यामुळे मुलांच्या हातांची आणि डोळ्यांची कोऑर्डिनेशन सुधारले, तसेच त्यांनी मुलांना विविध खेळ शिकवल्याने मुलांचा शारीरिक आणि मानसिक विकास झाला.

या सर्वाचा परिणाम असा झाला की चालू वर्षी आमच्याकडे दाखल झालेली मुले ही खूपच चंचल व आत्मविश्वासु दाखल झाले आहेत. मूलभूत साक्षरतेचे धडे घेण्यासाठी व संख्या ज्ञानासाठी ते प्रभावीपणे शिकण्यास तयार आहेत. असे दिसून येत आहे थोडक्यात पायाभूत शिक्षण पूर्ण करून मूलभूत साक्षरतेसाठी विद्यार्थी तयार करणे हे आमच्या शाळेच्या अंगणवाडीचे व अंगणवाडी ताईंचे यशच म्हणावे लागेल.









पायाभूत शिक्षणामध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांचा पाया मजबूत करणे. पायाभूत शिक्षण मूलभूत साक्षरता आणि संख्या ज्ञानासाठी(FLN) राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 नुसार सुरू झालेल्या या कार्यक्रमानुसार 2026 - 27 पर्यंत आपली शाळा निपुण करण्याच्या उद्देशाने माझ्या सर्व सहकारी शिक्षकांनी एकमेकांशी संवाद साधून व मुख्याध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम विविध कृती पीएमश्रीच्या माध्यमातून शाळेला मिळालेले साहित्यातून वर्गामध्ये भविष्यवेधी शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली. त्यामध्ये अनेक वेळा काही अडचणीही आल्या परंतु चांगल्या कामाची सुरुवात म्हणजे अडचणी हा येणारच परंतु शिक्षकांपुढे एकच ध्येय होते आपली शाळा निपुण करणे म्हणजे विद्यार्थ्यांचे वाचन लेखन संख्याज्ञान आणि समस्या सोडवण्यासाठी क्षमता विकसित करणे ज्यामुळे त्यांचे शिक्षण अधिक प्रभावी होईल. यासाठी शिक्षकांना शिक्षण परिषदेच्या माध्यमातून (FLN)च्या प्रभावी शिक्षण पद्धतीचे प्रशिक्षण दिले गेले होते ज्यामुळे शिक्षक मुलांना योग्य मार्गदर्शन करू शकतील व प्रभावी शिक्षण देताना येणाऱ्या अडचणीवर मात करू शकतील.

उपक्रम राबवताना पी.एम.श्री मार्फत आलेले साहित्य, त्याचबरोबर शाळेत गणित पेटी, भाषा पेटी आणि शिक्षकाने स्वतः तयार केलेले साहित्य या सर्वांचा वापर विद्यार्थ्यांना शिकवताना करण्यात येऊ लागला भाषा पेटीमध्ये दिलेल्या साहित्यातून चित्र पाहून गोष्ट

तयार करणे. अक्षर पट्ट्या, शब्द पट्ट्या, वाक्यात शब्द आणि चित्र देऊन वाक्य तयार करणे अशा शब्द पट्ट्यातून मुलांचे वाचन विकसित होण्यासाठी फारच मदत होऊ लागली, त्याचप्रमाणे पूर्ण वाक्य पट्ट्यांचा उपयोग करून वाचण्याचा सराव होऊ लागला. यामध्ये अगदी असर पातळीवर असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षकाने स्वतःचे काही प्रयोग वापरून त्यांना वाचण्यास शिकवले.

उदाहरणच द्यायचे झाले तर माझ्या इयत्ता पहिलीतील विद्यार्थीनी वेदिका गायकवाड हिला कितीही प्रयत्न करून मुळाक्षरे येत नव्हती, त्यासाठी मी तिला फरशीवर अक्षरे काढून दिले व त्या अक्षरावर खडे मांडून अक्षरे ओळख करून दिली, सरावाने ती सर्व अक्षरे शिकली व आज ती उत्कृष्टपणे वाक्य वाचन करते.





सर्व विद्यार्थ्यांसाठी आम्ही आमच्या शाळेत दररोज पहिल्याच तासिकेला श्रुतलेखन देण्याचा उपक्रम घेत असल्याने सरावाने सर्व विद्यार्थी जास्तीत जास्त बिनचूक वाक्याचे लेखन करतात.

भाषा वाचण्यासाठी आमच्या शाळेत सर्व वर्गामध्ये भाषा पेटीचा वापर केला जातो, अगदी पहिलीच्या वर्गात चित्र वाचण्याची सुरुवात करून अक्षरे हाताळायला देऊन, उतारा वाचन अक्षरे जुळून शब्द वाचन तसेच चित्रांचा वापर करून वाक्य पूर्ण करणे त्यानंतर उतारा वाचन साठी सर्व भाषा पेटी आमच्या मुलांना एक वरदानच ठरली आहे. या भाषा पेटीचा वापर करून आमच्या शाळेतील 90% मुले वाचनात निपुण झालेली आहे.


तसेच दुसरी ते तिसरीच्या मुलांना एक शब्द देऊन त्यावरून जास्तीत जास्त वाक्य लिहिण्यास देण्याचा सराव करून घेतल्याने आज विद्यार्थी एका शब्दावरून 25 ते 30 वाक्य सहज लेखन करू शकतात आठवड्यातून एकदा शंभर टक्के मुलाचे चावडी वाचण्याचा उपक्रम राबवत असल्याने मुले न घाबरता आत्मविश्वासाने वाचन करतात.

नुसते वाचनच नाही तर आमच्या शाळेत शिक्षकांच्या कल्पनेतून आणखी एक उपक्रम घेतला गेला तो म्हणजे भाषा विषयातील पाठांचे मुलांचे गट करून पात्रानुसार सादरीकरण केले जाते त्यासाठी पात्राला अनुरूप साहित्य निर्मिती केली जाते यामुळे मुलांचे वाचन तर सुधारलेच परंतु त्याच बरोबर पाठांतर हावभावयुक्त सादरीकरण व स्टेज डेरिंग वाढले आकलन क्षमता वाढली.

https://youtube.com/shorts/X6-bhC7t9q0?si=Z5xyW81Y32x2haDz

https://youtube.com/shorts/ZZZ8LNh8cvs?si=nnVCLVYDOa5T0mGk

सात वर्ष वयोगटासाठी गणित विषयासाठी ही भाषा प्रमाणेच गणित पेटीचा वापर केला गणित पेटीचा वापर करण्यापूर्वी वर्गातील फरशीवर एक ते नऊ असे अंकाचे लेखन करून मुलांना त्या अंकावरून उड्या मारायला लावणे उड्या मारतानाच ज्या अंकावर उडी मारली त्या अंकाचा उच्चार करणे असे केल्याने जुलै अखेर मुलांचे एक ते नऊ अंकाचे मूलभूत ज्ञान पक्के झाले . त्यानंतर एक अंकी बेरीज करण्यासाठी शिक्षकाने बनवलेल्या साहित्याचा वापर करून अखेर सर्व विद्यार्थी एक अंकी संख्येची बेरीज करू लागले त्यानंतर गणितातील



मण्यांच्या माळांचा उपयोग करून वजाबाकी करू लागले या सर्वांचे यश म्हणजे आज इयत्ता दुसरीत आलेली 100% मुले एक अंकी संख्येची बेरीज व वजाबाकी करतात मण्यांच्या माळेचा उपयोग करुन एक ते शंभर पर्यंत संख्या वाचन करतात.

इयत्ता आठ वर्षे वयोगटातील म्हणजेच इयत्ता दुसरीच्या मुलांची गणित पेटीतील मण्यांच्या दशकांच्या काड्यांचा वापर करून मुलांना दशक एकक ओळखण्यास सांगता येऊ लागले त्यामुळे शतकाचाही वापर मुले करू लागली.


या सर्व सरावातून हळूहळू मुलींना जास्तीत जास्त उदाहरणे सोडवण्याचे आव्हान दिल्याने चॅलेंज स्वीकारणे मुलांना आवडू लागले तिसरीतील मुले तीन अंकी संख्यांच्या केवळ संख्या ओळखणे किंवा वाचणे इतक्यावरच न थांबता तीन अंकी संख्येची बेरीज वजाबाकी गुणाकार सुद्धा करतात.

काम करत असताना आम्हाला अनेक अडचणी येऊ लागल्या मात्र जिथे जिथे अडचणी येतील तिथे आम्हाला मुख्याध्यापकाचे मार्गदर्शन मिळत गेले. मी तर म्हणेल सर्व समस्यांचा छेद, त्याचेच नाव पायाभूत शिक्षण.

सर्वप्रथम मी विद्यार्थ्यांना दिलेले आव्हान पूर्ण केल्याने विद्यार्थ्यांच्या सेल्फी विथ सक्सेस वाढू लागल्याने सतत गैरहजर राहणारी मुले आपल्या मित्र-मैत्रिणींचा ग्रुप वर आलेल्या सेल्फी पाहून माझाही सेल्फी आला पाहिजे म्हणून नियमितपणे शाळेत येऊ लागली.

आव्हाने दिले की मुले स्वतः शिकण्यास प्रेरित होतात याचा अनुभव मला आला मी विद्यार्थ्यांना वर्गातील रनिंग बोर्ड मुलांना लिहिण्यासाठी रिकामा ठेवला आहे तर मुले स्वतःहून आपल्याला जे येत आहे ते त्या फळ्यावर रेखाटू लागले व एकमेकांचे पाहून स्वतः शिकू लागले

तसेच मुलांना शिक्षणामध्ये लर्निंग इंटरनेशन ही एक खूप महत्त्वाची पायरी आहे यामध्ये आम्ही अनेक वेळा वर्गामध्ये ग्रुप पियर लर्निंगचा उपयोग केल्याने माझा इयत्ता तिसरीतील



विद्यार्थी वरद सपकाळ हा विद्यार्थी अजिबात अभ्यास न करणारा परंतु पियर लर्निंग मुळे लेखन वाचन करू लागला, याचा आनंद त्यालाच नव्हे तर मला आणि पालकांनाही आहे. ग्रुप लर्निंग मुळे माझे विद्यार्थी जेवणाच्या सुट्टीमध्ये पटकन जेवण करून ग्रुप लर्निंग मध्ये आव्हाने पूर्ण करतात.



या सर्व उपक्रमातून भिगवण शाळेचे आम्ही सर्व शिक्षक समाधानी आहोत की ज्या आमच्या शाळेतील तीन ते नऊ वर्ष वयोगटातील शंभर टक्के विद्यार्थी पायाभूत सुविधा ,मुलभुत साक्षरता आणि संख्याज्ञान यात सक्षम झाले आहेत.

https://youtu.be/TkxI3cdtkso?feature=shared

----------**----------

"मूलभूत क्षमतांकडे वाटचाल - आमच्या शाळेचा यशस्वी प्रयोग"

शाळेचे नाव - पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लवळे

शाळेचा पत्ता - लवळे, ता.मुळशी, जि.पुणे

शाळेचा ई-मेल - zppslawale@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्रीम.नंदा बबन खोमणे

मुख्याध्यापक मोबाइल क्रमांक - 9146772672

प्रस्तावना -


राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान ही प्राथमिक शाळेतील शिक्षणाची किमान आणि अत्यावश्यक उद्दिष्टे ठरवण्यात आली आहेत. हे लक्षात घेता, आमच्या शाळेने विद्यार्थ्यांमध्ये वाचन, लेखन व गणितीय कौशल्ये वाढवण्यासाठी विशेष उपक्रम राबवले. या उपक्रमांची सखोल मांडणी पुढीलप्रमाणे आहे.

१. स्थितीचे मूल्यमापन (पूर्वस्थिती) -

२०१९-२०२० या वर्षात करण्यात आलेल्या शैक्षणिक सर्व्हेमध्ये आमच्या शाळेतील ६०% विद्यार्थी वाचनात आणि ७५% विद्यार्थी गणितात मागे होते. काही विद्यार्थी साधे शब्द वाचू शकत नव्हते, तर गणितामध्ये एक अंकी संख्यांचे वजाबाकीही करू शकत नव्हते. या पार्श्वभूमीवर आम्ही ठरवले की, केवळ पुस्तकांवर आधारित शिकवणूक न करता कौशल्याधारित आणि अनुभवाधारित शिकवणुकीवर भर द्यावा.

२. उद्दिष्ट -

- मुलांमध्ये वाचन, लेखन आणि संख्याज्ञान यामध्ये मुलभूत क्षमता वाढवणे.
- प्रत्येक विद्यार्थी किमान स्तरापर्यंत पोहोचावा यासाठी प्रयत्न करणे.
- आनंददायी व समावेशी शिक्षण पद्धतींचा वापर करून परिणामकारक शिक्षण देणे.



३. राबवलेले उपक्रम -

१) वाचनासाठी प्रोत्साहन

प्रत्येक दिवशी दिवसाची सुरुवात १० मिनिटांच्या वाचन सत्राने करण्यात आली. विद्यार्थ्यांना वाचनासाठी गोष्टींची पुस्तके, चित्रमुद्रित काड्र्स, चावडीवरून वाचन इ. दिले जात. शिक्षक वाचनासाठी प्रोत्साहन देत.

परिणाम: ३ महिन्यांत ८०% विद्यार्थ्यांमध्ये वाचनगतीत सुधारणा झाली.



२) "पाटीवर शब्द - मनात अर्थ" उपक्रम:

दररोज ५ नवीन शब्द शिकवले जात. या शब्दांचे अर्थ, वाक्यरचना व योग्य उच्चार यावर काम झाले. खेळाच्या स्वरूपात शब्दसाखळी, शब्दकोडे, झाडावर चढलेले शब्द इ. उपक्रम राबवले.

३) गणिताशी मैत्री -

गणित विषय गोंधळाचा न वाटता गमतीशीर वाटावा म्हणून 'मैत्र गणित' नावाचा उपक्रम राबवला. यात काड्र्स, चित्रमय गणित, आकड्यांचा भातुकली खेळ, पायऱ्यांनी वजाबाकी, दुकानचा व्यवहार या कल्पनांचा वापर केला.

उदाहरण - दुकानांना क्षेत्रभेटी दिल्या. ज्यामुळे खरेदी-विक्रीतून रक्कम मोजण्याचा सराव झाला.



४) वस्तीनिहाय अभ्यासिका

गावातील प्रत्येक वस्तीनुसार मुलांचे गट केले. आणि तेथे वस्तीनिहाय अभ्यासिका सुरू केली. शाळा सुटल्यावर अभ्यासात मागे असणारे विद्यार्थी त्याठिकाणी दररोज अभ्यासाला बसू लागले.



५) पिअर लर्निंग :

या उपक्रमाच्या माध्यमातून हुशार मुलांच्या मदतीने मागे असलेली मुले शिकू लागली.




६) पालक सहभाग उपक्रम:

आम्ही पालकांना प्रत्येक गुरुवारी उपक्रमासाठी आमंत्रित केले. पालकांनी मुलांशी गोष्टी, लोकगीते, व्यवहाराचे गणित, घरगुती मोजमाप यामध्ये सहभाग घेतला. यामुळे शाळा आणि घराचा दुवा बळकट झाला.



७) सतत मूल्यांकन आणि फीडबॅक सत्र

प्रत्येक महिन्याच्या शेवटी मुलांचे प्रगती मूल्यांकन केले गेले. शिक्षक, पालक, विद्यार्थ्यांच्या तोंडी अभिप्रायातून काय सुधारायला हवे, हे ठरवले जाई. सुधारणा करत उपक्रम अधिक परिणामकारक केले.



८) "बोलक्या भिंती" – भित्तीपत्रक व ज्ञानकोष:

वर्गात वाचनसामग्री, गणितीय चार्ट्स, शब्दफळ्या, गणित खेळणी, बालकथा चित्रे लावली गेली. यामुळे मुलांना शाळा 'संपत्ती'सारखी वाटू लागली.



९) शिक्षक आपल्या भेटीला

शिक्षक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या घरी भेटी दिल्या. पालकांच्या भेटी घेऊन त्यांच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत अवगत केले.



१०) तंत्रज्ञानाचा वापर

तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिकणे सोपे झाले. त्यातून मूलभूत क्षमता वाढीसाठी मदत झाली.



११)अतिरिक्त पूरक मार्गदर्शन

विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतांच्या विकासासाठी मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज अतिरिक्त पूरक मार्गदर्शन केले.




१२) भाषा पेटी गणित पेटी इंग्रजी पेटी साहित्य वापर

शाळेमध्ये उपलब्ध असलेल्या भाषा पेटी, गणित पेटी आणि इंग्रजी पेटी मधील साहित्याचा वापर मुलांच्या क्षमतावाढीसाठी केला.



१३) बालगीतातून आणि पपेटद्वारे अध्ययन

शाळेतील शिक्षिका मनिषा मालुसरे ह्या त्यांनी स्वतः लिहिलेल्या बालगीतामधून आनंददायी अध्यापन करतात. पुस्तकाचे नाव : गंमतगाणी शिकू आनंदे, कवयित्री : मनिषा मालुसरे



१४) रूम टू रीड वाचनालय

रूम टू रीड संस्थेकडून शाळेसाठी वाचनालय देण्यात आले आहे. त्यामध्ये स्तरानुसार पुस्तके असून त्यामध्ये Grow by ही संकल्पना आहे. हे वाचनालय अत्यंत उपयुक्त असून विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार त्यांना पुस्तके वाचायला दिली जातात.



१५) उपस्थिती ध्वज

विद्यार्थी दररोज शाळेत उपस्थित राहिले तरच विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत क्षमता विकास होईल. उपस्थिती ध्वज या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढण्यास मदत झाली.



१६) बोलकी बाहुली अलेक्सा



बोलकी बाहुली अलेक्साच्या मदतीने अध्यापनात मनोरंजकता निर्माण झाली.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतांच्या विकासासाठी मदत झाली.

१७) सेल्फी विथ सक्सेस

जी मुले छान वाचू लागली, लिहू लागली ज्यांनी छान प्रगती केली त्यांच्यासोबत शिक्षकांनी सेल्फी काढल्यामुळे त्यांना प्रेरणा मिळाली.





१८) माता पालक गट

निपुण भारत माता पालक गटांच्या मदतीने मुलांच्या मूलभूत क्षमता विकासासाठी अनेक उपक्रम राबवण्यात आले. दर शनिवारी ग्रुपवर पाठवलेल्या अनेक ॲक्टिव्हिटी माता पालक गटांच्या मदतीने घेण्यात आल्या.



१९) उन्हाळी शिबिर

उन्हाळी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतांच्या विकासासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या. त्याचबरोबर इंग्रजी विषय साठी स्पोकन इंग्लिश क्लास घेण्यात आला.

सकाळ

लवळे शाळेत स्पोकन इंग्लिश वर्गास प्रतिसाद

पिरंगुट, ता. १८ : लवळे (ता. मुळशी) येथील ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सरपंच नीलेश गावडे यांच्या पुढाकारातून आयोजित केलेल्या पीएमश्री जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत संगणक शिक्षण व स्पोकन इंग्लिश वर्गाचे उद्घाटन राहुरी कृषी विद्यापिठाचे निवृत्त सहाय्यक कुलसचिव ॲड. उत्तमराव ढोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

जगाची भाषा म्हणून इंग्रजी व नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख म्हणून संगणक आदींचे ज्ञान विद्यार्थ्यांना बालवयातच प्राप्त व्हावे, या उद्देशाने सुरू केलेल्या या वर्गासाठी येथील ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला आहे. एनआयटी फाउंडेशन व पिरॅमिड स्पोकन इंग्लिश ॲकॅडमीचे प्रतिनिधी ज्योती सातपुते, अनिकेत केदारी व मयूर कंधारे या वर्गाला मार्गदर्शन करीत आहेत.



लवळे (ता. मुळशी) : ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आयोजित केलेल्या संगणक शिक्षण व स्पोकन इंग्लिश वर्गात सहभागी झालेले विद्यार्थी.

यावेळी सरपंच नीलेश गावडे, उपसरपंच रणजित राऊत, माजी सरपंच संजय सातव, ग्रामविकास अधिकारी विठ्ठल साकोरे, गणेश गावडे, बाळासाहेब राऊत, अजित चांदिलकर, सायली सातव, मुख्याध्यापिका नंदा खोमणे आदी उपस्थित होते. या वर्गात सध्या पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून सलग वीस दिवस हे प्रशिक्षण चालणार आहे. संजय मारणे, बापूराव पवार, रवींद्र डोळसे, तसेच शिक्षिका उज्ज्वला कटकदौंड यांनी नियोजन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश आल्हाट, उपाध्यक्ष सचिन मोरे, योगेश क्षीरसागर यांनी सहकार्य केले आहे.

Pune, District-Today
19/05/2024 Page No. 8

२०) वृत्तपत्र वाचन

दररोज वृत्तपत्रांचे प्रकट वाचन करून घेतल्यामुळे मुलांना अनेक नवीन शब्दांची ओळख झाली.



२१) योगा ध्यान आणि सुदर्शन क्रिया

दररोज परिपाठामध्ये ध्यान आणि सुदर्शन क्रिया घेतली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासास मदत होते. तसेच दर शनिवारी योगा आणि सूर्यनमस्कार घेतले जातात. शाळेतील ज्येष्ठ पदवीधर शिक्षक बापुराव पवार सर यासाठी आपले योगदान देतात. आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेशी ते जोडले गेले आहेत.





२२) संपर्क ऍप

मूलभूत क्षमतांच्या विकासासाठी संपर्क ऍप वर अनेक व्हिडिओ आहेत. त्यांचा उपयोग प्रत्येक वर्गात केला जातो.



२३) कोटक एज्युकेशन फाउंडेशन

पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी अनेक ॲक्टिव्हिटी आणि नाविन्यपूर्ण उपक्रम कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या मदतीने शाळेत राबवले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत क्षमतांच्या विकासासाठी मदत झाली.

२४) प्रोत्साहनपर बक्षिसे

विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर अनेक बक्षिसे दिली. त्यामुळे त्यांना प्रेरणा मिळाली. उदा. स्टार , पेन, पेन्सिल ट्रॉफी



४. विशिष्ट प्रकल्प – स्तरनिहाय पुस्तकनिर्मिती

शाळेतील ज्येष्ठ पदवीधर शिक्षक संजय मारणे सर आणि बापुराव पवार सर यांनी स्तरनिहाय पुस्तकाची निर्मिती केली आहे. या पुस्तकांचा वापर केला.

५. परिणाम:

शैक्षणिक परिणाम:

- ६ महिन्यांत ९०% विद्यार्थी वाचन करू लागले.
- ८५% विद्यार्थी गणितातील बेरीज-वजाबाकी व्यवस्थित करू लागले.
- ६०% विद्यार्थी मराठीतील छोटे परिच्छेद वाचून त्यावर उत्तर देऊ लागले.

मानसिक परिणाम:

- मुलांचा आत्मविश्वास वाढला
- शाळेत उपस्थिती दर ८०% वरून ९६% पर्यंत गेली.
- मुलांमध्ये संवाद, विचार आणि अभिव्यक्ती यामध्ये स्पष्ट फरक दिसून आला.

६. माध्यम व संस्थांचा सहभाग

- **आर्ट ऑफ लिव्हिंग**
- **रूम टू रीड वाचनालय**
- **कोटक EDUCATION FOUNDATION**
- **SAMPARK FOUNDATION**
- **पालकवर्ग**
- **स्थानिक ग्रामपंचायत**

७. आव्हाने आणि उपाय:

- **सुरुवातीला पालकांचा सहभाग कमी होता.** शिक्षकांनी भेटी दिल्या व संवाद साधला.
- **संसाधनांची कमतरता:** टाकाऊ वस्तूंचा वापर करून साहित्य तयार केले.
- **थोड्या विद्यार्थ्यांचा रुचीअभावी सहभाग कमी:** त्यांच्यासाठी विशेष वैयक्तिक लक्ष व छंदाधारित शिक्षण





८. निष्कर्ष:

या उपक्रमांमधून आम्ही एक गोष्ट शिकलो **मुलभूत क्षमतांचा पाया मजबूत झाला की, पुढील शिक्षणाचा टप्पा सुकर होतो.** आनंददायी, सहभागात्मक व मूलगामी प्रयत्नांच्या जोरावर शिक्षणाचा दर्जा उंचावणे शक्य आहे.

९. पुढील वाटचाल:

- वाचनाच्या पुढील टप्प्यावर – भाववाचन, अभिप्राय लेखनावर भर
- अंकगणितानंतर गणिती संकल्पना शिकवण्यावर भर
- प्रत्येक उपक्रमाची शाळेत 'ज्ञानगाथा' म्हणून नोंद ठेवणे.

----------**----------



शिक्षण,आरोग्य आणि संस्कारांचे धडे देणारी शाळा

शाळेचे नाव - पीएम श्री जि प प्राथमिक शाळा अवसरी खुर्द नं. 1

शाळेचा पत्ता - अवसरी खुर्द नं. 1 तालुका आंबेगाव,जिल्हा पुणे

शाळेचा ईमेल आयडी - schoolawasarikd@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री.संतोष शंकर पोखरकर

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9881315793

मुख्याध्यापक ईमेल आयडी - santoshpokharkar0990@gmail.com

https://photos.app.goo.gl/VTzobDwoAiWT1B5G6


'एकच ध्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास' या संकल्पनेतून पुढे आलेली पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अवसरी खुर्द नं.1 ता. आंबेगाव जि. पुणे पिन 412 405

पुणे नाशिक हायवे च्या पूर्वेला तीन किलोमीटर अंतरावर निसर्गाच्या कुशीत वसलेले अवसरी खुर्द हे गाव. कुलदैवत श्री काळभैरवनाथाच्या कृपेने गाव तसे मोठे आणि सुजलाम, सुफलाम, प्रशासकीय अधिकारी ते शेतकरी असे अनेक मातब्बर व्यक्ती याच गावात घडल्या. त्याला कारण म्हणजे गावाच्या वेशीवरच असणारे गावाचे नाक म्हणजे '**माझी शाळा**'. पूर्वीपासून गावात तशा दोन शाळा मुलांची शाळा व मुलींची शाळा. मुलांच्या शाळेची 17 खोल्या असणारी कौलारू इमारत आजूबाजूला सर्व झाडे परंतु पावसाळा आला की शाळेला तलावाचे रूप यायचे गुडघाभर पाण्यातून विद्यार्थी शाळेत यायचे वर्गामध्ये पाणी भरलेले असायचे. पालक मुलांना शाळेत पाठवायला घाबरायचे.

यातून एक विचार पुढे आला. गावातील तरुणांनी एकत्र येऊन शाळा पाडायची व त्या जागी नवीन इमारत उभी करायची असे ठरवले. परंतु एवढा निधी उपलब्ध होणे अवघड आहे.

निधी कसा उभा केला?

सर्व ग्रामस्थांनी '**मिशन वाढदिवस**' हा उपक्रम हाती घेतला. एका वर्षात ज्या दानशूर व्यक्तींचे वाढदिवस असतील त्यांनी वाढदिवसानिमित्त शाळेला आपल्या ऐपतीप्रमाणे देणगी दिली आणि यातून सुमारे 37 लक्ष रुपये निधी उभा राहिला आणि यातून 2023 साली तयार



झाली दहा खोल्यांची एक टोलेजंग सुसज्ज अशी इमारत. या कामी तत्कालीन अधिकारी, पदाधिकारी व सर्व शिक्षक वृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे आणि योगायोग असा की शाळा पीएम श्री योजनेअंतर्गत निवडली गेली. 2023 साली शाळेचा पट 206 होता. आज शाळेचा पट वाढत असून तो 251 झाला आहे. शाळेत सर्वेक्षणाबाहेरील विद्यार्थी देखील मोठ्या संख्येने दाखल झालेले आहेत. त्यामुळे परत एकदा आम्हाला बसण्यासाठी जागा कमी पडत असल्याने चालू शैक्षणिक वर्षात पुन्हा एकदा शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या मदतीने शाळा इमारत दुमजली करून सहा वर्ग खोल्यांचे काम हाती घेतले आहे. ग्रामपंचायतच्या मदतीने शाळेत 12 सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असून मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था केलेली आहे. पाण्याची व्यवस्था, हँडवॉश स्टेशन ' **जलमणी उपक्रमांतर्गत**' मुलांना पिण्यासाठी 'RO' चे पाणी, बागेमध्ये स्प्रिंकलरची व्यवस्था अशा सर्व आवश्यक सोयी सुविधा केलेल्या आहेत. सुसज्ज असे खेळाचे मैदान, संरक्षक भिंत, विविध प्रकारची खेळणी, विद्यार्थ्यांना आयुर्वेदिक उपचारांची माहिती व्हावी म्हणून औषधी वनस्पतींची स्वतंत्र बाग, शालेय आवारात सुसज्ज अशी अंगणवाडी, गांडूळ खत, परसबाग, फुलबाग, भव्य स्टेज व्यवस्था, आकर्षक मुख्याध्यापक कार्यालय मुलांना सावलीत बसण्यासाठी भरपूर झाडे. कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन, लंगडी, लांब उडी, उंच उडी यासाठीची मैदाने तयार केलेली आहेत.

https://photos.app.goo.gl/6Zd8dqWoZg7BmY9z5

'**एकच ध्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास**' हेच ध्येय उराशी बाळगून आमच्या शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक शाळेसाठी अहोरात्र झटत आहेत. आणि यातूनच विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याच्या मूलभूत क्षमता वाढवण्यासाठी खालील पाच मुद्द्यांच्या आधारे प्रयत्न होत आहेत.

१) विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास -

विद्यार्थ्यांचा नियमित व्यायाम आणि विविध खेळांमध्ये सहभाग यामुळे स्नायू आणि हाडे मजबूत होतात. विद्यार्थ्यांची लवचिकता व समन्वय सुधारतो आणि आरोग्य अधिक चांगले राहते. शारीरिक विकासामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक, शारीरिक आणि बौद्धिक आरोग्य चांगले राहते.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी आमच्या शाळेत स्वतंत्र क्रीडा शिक्षक नेमणूक केलेली आहे.विद्यार्थ्यांचे स्नायू बळकट व्हावे यासाठी जागेवर पळणे, मानेचा व्यायाम, हाताचा व खांद्याचा व्यायाम, गुडघ्याचा व्यायाम, हाय जंप, चेस्ट लेवल जंप, फास्ट रन, बटरफ्लाय




ऍक्टिव्हिटी इत्यादी प्राथमिक हालचाली घेतल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे स्नायू बळकट होण्यास मदत होते.

काळाची गरज ओळखून आम्ही शाळेमध्ये स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण देतो यामध्ये फर्स्ट पंच, डबल पंच, किक, ट्रिपल किक यासारख्या कृती घेतल्या जातात. तसेच स्वसंरक्षण व साहसी खेळांमध्ये लाठीकाठी प्रशिक्षण व तलवारबाजीचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना नियमित दिले जाते. त्यासाठी दररोज वेळापत्रकात एका तासिकेचा समावेश केला आहे.

https://photos.app.goo.gl/y7Z4xn1a4A1wNbXG8

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण वाढीस लागावा व एकीची भावना निर्माण व्हावी यासाठी वैयक्तिक व सांघिक खेळ घेतले जातात. यामध्ये रनिंग,लांब उडी, उंच उडी, विविध आसने यांचा सराव घेतला जातो तसेच सांघिक प्रकारात कबड्डी, खो-खो, लंगडी, बॅडमिंटन, क्रिकेट, लगोरी, आट्यापाट्या असे विविध खेळांचा भरपूर सराव घेतला जातो.

https://photos.app.goo.gl/FLirEa92qKZ68bfT9

यशवंतराव चव्हाण कला क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात दरवर्षी सहभागी होऊन तालुका पातळीवर बक्षीस मिळवले आहेत. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी दरवर्षी दोन वेळा आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करून त्यात मुलांचे कान, नाक, घसा, डोळे, फुप्फूसाची क्षमता, ऑक्सिजन लेव्हल, रक्ताची प्राथमिक चाचणी, त्वचारोग यांची तपासणी केली जाते.

https://photos.app.goo.gl/q1NUydh2jUetSZav9

2) **सामाजिक क्षमता विकास :-**

विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतांमध्ये महत्त्वाची क्षमता म्हणजे सामाजिक क्षमता होय. मुले मोठी होत असताना स्वतःला व इतरांना समजून घेताना ही क्षमता विकसित होत असते.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी मुलांना परिसरातील लोकांच्या गरजा आणि समस्यांवर चर्चा करण्यासाठी संधी दिली जाते. विद्यार्थ्यांना आपल्या आजूबाजूला असलेल्या विविध व्यवसायांची माहिती होण्यासाठी 'क्षेत्रभेट' हा उपक्रम शाळेत राबविला जातो. त्या अंतर्गत आम्ही छोटे व्यावसायिक, कुक्कूटपालन, दूध संकलन केंद्र, डाकघर, प्राथमिक आरोग्य केंद्र, बँक, रेशीम उद्योग, साखर कारखाना या ठिकाणी भेटी देऊन तेथील माहिती विद्यार्थ्यांना देत आहोत.

त्यातून विद्यार्थ्यांना या उद्योगासंबंधी माहिती मिळते व विचारांची देवाण-घेवाण होऊन सामाजिक विकास साधला जातो. विद्यार्थ्यांचे संवाद कौशल्य विकसित होतात. तसेच दररोज परिपाठाचे नियोजन केले असून रोज ज्या वर्गाचा परिपाठ असतो त्यांनी आपल्या वर्गाचे




सादरीकरण सर्व विद्यार्थ्यांसमोर करायचे असते त्यात विद्यार्थी आनंदाने सहभागी होतात त्यात विविध प्रकारचे ऍक्टिव्हिटी, कविता गायन, पाढे, इंग्रजी शब्द पाठांतर, नाटके, इंग्रजी कॉन्व्हर्सेशन असे विविध विषयांवर भाषणे सादर करतात.

आमचा सर्वात महत्त्वाचा उपक्रम म्हणजे **'शनिवार- फनिवार'** या उपक्रमांतर्गत दर शनिवारी दप्तरा विना शाळा असते. त्यात प्राणायाम, योगासने, वृक्षारोपण, विविध कृती, खेळ, विविध विषयांवर मार्गदर्शन, करमणुकीचे प्रयोग, हस्तकला, चित्रकला, कार्यशिक्षण, वन्यजीवांची माहिती, जादूचे प्रयोग, संस्कार शिबिरे यांचा अंतर्भाव असतो. यामुळे हाफ-डे असूनही विद्यार्थी आनंदाने शाळेत येतात व उपस्थिती 100% राहण्यास मदत होते.

3) बौद्धिक विकास :-

बौद्धिक क्षमतेचा विकास शाळा, शिक्षक, पालक व समाज यांच्या संयुक्त प्रयत्नातून होत असतो. योग्य मार्गदर्शन आणि सतत सरावाने बौद्धिक क्षमता विकसित होत असते.

https://photos.app.goo.gl/2CsouHGWSXVDNSVK7

बोधात्मक क्षमतेचे महत्व लक्षात घेता आमच्या शाळेत मुख्याध्यापक व शिक्षक एकत्रितपणे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विकास घडवून आणण्यासाठी विविध उपक्रम राबवतात. विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करावे यासाठी त्यांना प्रोत्साहित केले जाते. अवांतर वाचनासाठी ग्रंथालय विविध पुस्तके उपलब्ध करून ती मुलांना वाचण्यासाठी दिली जातात.

दरवर्षी महावाचन चळवळीत सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

शाळेमध्ये वक्तृत्व, प्रश्नमंजूषा, हस्ताक्षर, पाढे पाठांतर, स्पेलिंग पाठांतर, गीत गायन या स्पर्धांचे आयोजन केले जाते. यातून विद्यार्थ्यांचे ज्ञान, आकलन दृढ होण्यास निश्चित मदत होते.

शाळेमध्ये कृतीयुक्त शिक्षणावर अधिक भर दिला जातो. यासाठी गणित पेटी, भाषा पेटी, इंग्रजी पेटी तसेच इतर शैक्षणिक साहित्याचा वापर शिक्षक करत असतात. तसेच सर्व वर्गातून विविध भाषिक खेळ, भाषिक कोडी, गणितीय संबोध, स्पेलिंग पाठांतर, कथा सादरीकरण केले जाते.

एवढे करूनही मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गट पद्धती वापरली जाते. गट पद्धतीतून विद्यार्थी स्वतः शिकतो अथवा आपल्या मित्रांकडून काही गोष्टी समजून घेतो त्यातून त्याला चांगले आकलन होत असते.

स्पर्धा परीक्षांमध्ये भरारी :-

आमची पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अवसरी खुर्द नं.१ इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत होती परंतु याचवर्षी मुख्याध्यापक, शिक्षक व व्यवस्थापन समितीच्या प्रयत्नातून इयत्ता पाचवीचा वर्ग जोडला गेला. शाळेच्या यशस्वी वाटचालीमध्ये हा एक मोठा बदल

करण्यामागे सर्वांचे योगदान लाभले. 2024- 25 ही शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षेस सामोरी जाणारी पहिलीच बॅच होती परंतु अनेक आव्हाने समोर असतानाही शाळेचे मुख्याध्यापक तथा मार्गदर्शक शिक्षक श्री. संतोष पोखरकर यांनी वर्षभर अथक परिश्रम घेतले. भरपूर सराव मार्गदर्शन यातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला याची प्रचिती म्हणजे नुकत्याच लागलेल्या निकालात शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवी मध्ये राज्यस्तरावर १, जिल्हास्तरावर १ व २०० हून अधिक गुण मिळणारे १० विद्यार्थी असा अभिमानास्पद निकाल लागला.

इयत्ता दुसरीपासूनच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण होण्यासाठी जादा तासिकांचे नियोजन करून विद्यार्थी स्वतःच्या इच्छेने या स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होतो त्यामुळे विविध स्पर्धा परीक्षांमध्ये आमचे विद्यार्थी राज्य, जिल्हा व केंद्र स्तरावर चमकत असतात, त्यामुळे त्यांना स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास निर्माण होतो व त्यांच्या ज्ञानात अधिकची भर पडत असते.

विद्यार्थ्यांसमवेत पालक सभेचे आयोजन वर्गानुसार वर्षातून दोनदा केले जाते. त्यात विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला जातो पालकांच्या सूचना स्वीकारल्या जातात. मुख्याध्यापक पालकांना व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे काम करतात.

https://photos.app.goo.gl/owHv2qT8QuZ47wDn8

प्रत्येक वर्गाचा व्हाट्सअप ग्रुप केलेला असून त्यावर दररोजचा अभ्यास वर्गात विद्यार्थ्यांनी केलेले नाविन्यपूर्ण उपक्रम काही शैक्षणिक व्हिडिओ टाकले जातात.

4) **भावनिक कौशल्य विकास :-**


आमच्या शाळेत भावनिक शिक्षण कौशल्य जाणून बुजून शिकवली जातात. जेणेकरून विद्यार्थ्यांचा भावनिक विकास होण्यास मदत होते.

शाळेत भावनिक कौशल्यांवर आधारित विविध उपक्रम राबवले जातात त्यामध्ये –

https://photos.app.goo.gl/XPRK8xS7CwfrBLXS6

चित्रकला स्पर्धा- चित्रांच्या माध्यमातून विविध भावना उदा- आनंद, राग दुःख, भीती विद्यार्थी व्यक्त करतात. विद्यार्थी चित्र रेखाटन करताना तसेच रंगवताना प्रफुल्लित असतात. व्यक्त होत असतात.

कथाकथन स्पर्ध :- विविध विषयांवर आपल्या भावना आपापल्या शैलीत व्यक्त होत असतात. एक प्रभावी व्यासपीठ विद्यार्थ्यांना खुले करून दिले जाते.



निबंध लेखन स्पर्धा :-

माझे कुटुंब, माझी शाळा, माझी आई, माझा गाव अशा विविध विषयांवर विद्यार्थी आत्मीयता, भावना व्यक्त करतात.

दिंडी सोहळा :-

आषाढ महिन्यात संपूर्ण महाराष्ट्राला पंढरपूर वारीची आस लागलेली असते. आपल्या महाराष्ट्राचा हा संस्कार व ही परंपरा विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी दरवर्षी शाळेत पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. अतिशय छान भक्तीपूर्ण वातावरण तयार होते.

वारकरी संप्रदायाची ओळख आणि ओढ या भावना मुलांमध्ये रुजविल्या जातात. तसेच सर्व विद्यार्थी वारकरी पोशाख परिधान करून येतात, गायन, वादन, फुगडी खेळणे, फेर धरणे या बाबी यातून घडतात. पालकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असतो.

गोकुळाष्टमी :-

गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो दहीहंडीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात येते. समाजात गरीब- श्रीमंत असणारी दरी कमी करण्यासाठी भगवान श्रीकृष्ण काला करीत ही भावना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम या कार्यक्रमामुळे होते.

रक्षाबंधन :-

शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची स्नेहाचे प्रतीक म्हणून राख्या बांधल्या व विद्यार्थ्यांनी भेटवस्तू दिल्या. राष्ट्रप्रेम, बंधुप्रेम, निसर्गप्रेम या संस्कारांची जोपासना व्हावी या हेतूने वृक्षांना राख्या बांधून हा सण आनंदाने साजरा करतो.

भोंडला :-

शाळेत नवरात्रोत्सवामध्ये भोंडला हा अतिशय स्तुत्य उपक्रम घेतला जातो. विद्यार्थ्यांना सांस्कृतिक परंपरा आणि मूल्यांची ओळख करून देणे. तसेच त्यांच्यामध्ये चांगुलपणा आणि सकारात्मकतेची भावना जागृत करणे हा हेतू साध्य होतो. या कार्यक्रमात पालकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असल्याने विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यात एकोप्याची भावना निर्माण होते.

https://photos.app.goo.gl/HCMaedX9AeSSamy96




अशा प्रकारे विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना त्यांच्या भावनांचे व्यवस्थापन करण्यासाठी, नातेसंबंध निर्माण करण्यासाठी आणि जबाबदारीने निर्णय घेण्यासाठी भावनिक कौशल्य आत्मसात करणे गरजेचे असते.

5) तंत्रज्ञान/ डिजिटल क्षमता :-

शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाची क्रांती पाहता शिक्षण हे पुस्तकापुरते मर्यादित राहिलेले नाही. याची जाण असल्याने आमच्या शाळेत खालील साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते.

संगणक शिक्षण -

सध्याच्या युगात संगणक चालवता आला तर तो खरा साक्षर अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याने आम्ही शाळेत संगणकासाठी स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक केली असून ग्रामस्थांच्या सहभागातून सुसज्ज संगणक लॅब निर्माण केली आहे. दररोज एक तासिकेचा अंतर्भाव करून विद्यार्थ्यांना कोडींग शिक्षण दिले जाते. तसेच संगणकासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम पुस्तिका वापरत आहोत.

स्मार्ट बोर्ड :-

शाळेत स्मार्ट बोर्ड असून त्यावर लिहिता येते, माहिती दाखवता येते, शैक्षणिक चित्रपट पाहता येतात. विद्यार्थी बोर्डवर थेट हाताळणी करू शकतात. यामुळे शिक्षण अधिक परस्पर संवादी व रोचक बनते.

https://photos.app.goo.gl/4cR2LtvfM7AteJYFA

प्रत्येक वर्गात एक LED स्क्रीन :-

प्रत्येक वर्गात LED स्क्रीन असल्याने व वाय-फाय सुविधा असल्याने विद्यार्थी प्रत्यक्ष स्क्रीनवर अनेक गोष्टी पटकन शिकतात. चित्रांद्वारे शिकवलेले अधिक काळ स्मरणात राहते.

स्पीकर व्यवस्था :-

प्रत्येक वर्गात स्पीकर व्यवस्था असल्याने एखाद्या वर्गापुरतीच सूचना देणे अथवा सर्व वर्गांना एका वेळी सूचना देणे मुख्याध्यापकांना सोपे झाले आहे. गाणी, गोष्टी, पाढे, स्पेलिंग पाठांतर याबाबी सुट्टीच्या वेळेत त्यांना ऐकवणे सोपे जाते.

मान्यवरांच्या भेटी व प्रतिक्रिया :-

https://photos.app.goo.gl/F2KgYH9bDtc7mFhD9

आजपर्यंत शाळेत शिक्षण आयुक्त – मा. चंद्रकांत पुलकुंडवार साहेब

मुख्य कार्यकारी अधिकारी- मा. संतोष पाटील साहेब, मा. रमेश चव्हाण साहेब, मा. गजानन पाटील साहेब

उपसंचालक – मा. महेश पालकर साहेब

शिक्षणाधिकारी – मा. संजय नाईकडे साहेब

पं. स.आंबेगाव सर्व गटविकास अधिकारी/ गटशिक्षण अधिकारी, सर्व शिक्षण विस्तार अधिकारी यांच्यासह अनेक अभ्यासू व्यक्तिमत्वांनी भेटी देऊन शाळेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

https://photos.app.goo.gl/Tf2cPVX8HT3da51HA

भविष्यातील नियोजन व उद्दिष्ट-

1) विद्यार्थ्यांसाठी सभागृहाचे बांधकाम करणे
2) कौशल्यात्मक विकासावर भर देणे
3) 100% विद्यार्थी निपुण करणे
4) सुसज्ज ग्रंथालय तयार करणे
5) शिष्यवृत्ती निकाल 100% लावणे


https://photos.app.goo.gl/tw7BhnPeV8CHKUNe9

आम्ही हे केले

1) मुख्यमंत्री माझी शाळा- तालुक्यात तृतीय क्रमांक- १ लक्ष रुपये बक्षीस प्राप्त
2) निपुण पुणे -अंतर्गत शाळा 98%
3) एक पेड माँ के नाम 100%
4) तंबाखू मुक्त शाळा 100%

शाळेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शाळेत कार्यरत असलेला निर्व्यसनी आणि उपक्रमशील शिक्षक वर्ग आहे. त्यामुळे तंबाखू मुक्त शाळा उपक्रम प्रभावीपणे कार्यरत आहे. शाळेच्या सर्व अविस्मरणीय प्रवासामध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री.संतोष पोखरकर शिक्षिका सौ. अपूर्वा शेटे, सौ. प्रमिला धुमाळ, श्रीम. वैशाली जाधव, श्रीम. शैला सांडभोर, श्री. शंकर वारे, श्रीम. ललिता काळे, सौ. प्रिया चांगण, श्री. विशाल पिंगळे हे मोलाचे काम करत आहेत.

गटशिक्षणाधिकारी सौ. रुपाली धोका मॅडम, विस्तार अधिकारी श्री. कांताराम भोंडवे सर, केंद्रप्रमुख श्री विठ्ठल खेडकर सर तसेच सर्व माजी शिक्षकवृंद यांचे दिशादर्शक म्हणून




मोलाचे योगदान आहे. गावातील सर्व ग्रामस्थ, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य या सर्वांचा सहभाग तोला मोलाचा आहे या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून हे साध्य झाले आहे यात तिळमात्र शंका नाही.

https://photos.app.goo.gl/DWHW8hyaAK6ZC4Kb7

https://photos.app.goo.gl/2UXNWRVXEJuKEdES9

----------**----------



आदिवासी बहुल मुलांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे पूर्ण नाव - 'जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वळवंती'

शाळेचा पत्ता - वळवंती ,केंद्र-गोविंत्री, ता.मावळ, जि.पुणे

मुख्याध्यापक नाव - सौ तृप्ती नितीन तोडकर

मुख्याध्यापक ईमेल आयडी - truptintodkar2@gmail.com

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक – 9011058637

१) विद्यार्थी शिक्षण प्रवाहात येण्यासाठी प्रयत्न :-

जेव्हा प्रत्येक शिक्षक हा अतिशय प्रामाणिकपणे स्वतःच्या शाळेवरती काम करत असतो तेव्हा प्रत्येक शिक्षकाला सहज वाटून जातं, की शाळेत येणारे प्रत्येक मूल हे शिकलं पाहिजे. शिकतं झालं पाहिजे. शिक्षणाच्या प्रवाहात ते टिकून राहिलं पाहिजे. यासाठी त्या शिक्षकाची मनापासून धडपड सुरू असते. तेव्हा सहजपणे समाजामध्ये वावरणाऱ्या पालकांना, प्रतिनिधींना सहज वाटून जातं शाळेत येणारा प्रत्येक विद्यार्थी हा एक समानच आहे. माझी स्वतःची देखील हीच धारणा होती. या ध्येय उद्देशानेच मी विद्यार्थी शिक्षण प्रवाहात टिकवण्याचे कार्य करत होते, करत आहे आणि करत राहणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरणतळेवस्ती, केंद्र-लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे येथे १ ऑगस्ट २००९ पासून कार्यरत होते, त्यावेळी शाळेचा पट ५२ होता, 'निहार' संस्थेतील 30 विद्यार्थी होते, अचानक संस्था बंद झाली. तेथील सर्व विद्यार्थी त्यांच्या आईकडे पाठवण्यात आले. शाळेत फक्त २२ च विद्यार्थी राहिले. विद्यार्थी गुणवत्ता उत्तम होती, वाचन लेखन, गणितिक्रिया, संख्याज्ञान यामध्ये सर्व विद्यार्थी निपुण होते. संख्या ज्ञान मध्ये विद्यार्थी खर्व पर्यंत संख्या अचूक वाचन लेखन करत होते. परंतु इमारत १९७२ ची मातीची, पत्र्याची होती, २ एकर मैदान परंतु सर्व जंगली झाडे वाढलेली, दोन वर्गखोल्यांसमोर १०×१० एवढीच जागा मोकळी होती, शाळेत लाईट नव्हती, प्रथम तत्कालीन पंचायत समिती हवेली चे उपसभापती बंडू खांदवे यांच्या सहकार्याने MSCEB चे ऑफिस गाठले, शाळेला प्रथम मीटर उपलब्ध करून घेतला, नंतर जिल्हा परिषद सदस्य सौ रत्नमाला तळेकर यांच्या सहकार्याने मुलींसाठी व मुलांसाठी स्टार शौचालय जिल्हा परिषद कडून निधी उपलब्ध करून बांधून घेतले.

LNT कंपनी बाणेर 24×7 यांच्याकडून स्टाफ साठी लेडीज & जेन्ट्स असे स्वतंत्र स्टार शौचालय बांधून घेतले,

LNT कंपनी कडून ३६ बेंच घेतले, सायबर कंपनी कल्याणीनगर यांच्या कडून १० हजार लीटर क्षमता असणारी पाण्याची टाकी बांधून घेतली,







आता भौतिक सुविधांपैकी फक्त इमारत राहीली, तेंव्हा जिल्हा परिषद कडून 13 लाख रुपये मंजूर करून घेतले, बांधकाम सुरू झाले, २ वर्ग खोल्या फक्त उभ्या राहिल्या, प्लास्टर नाही, फरशी नाही, रंगकाम नाही, वॉटर प्रूफिंग नाही, सर्व काही अपूर्ण बांधकाम आणि मनपा हद्द व जि. प. हद्द असे झाल्याने पुढील निधी प्राप्त झालाच नाही, वर्षभर खूप प्रयत्न केले पण जिल्हा परिषद किंवा मनपा कोणीच निधी दिला नाही. तेंव्हा शाळेत 'सत्य साई सेवा ट्रस्ट तर्फे शालेय उपक्रम सुरू होते, त्यांना ही गोष्ट लक्षात आणून दिली व मूल शिकते होण्यासाठी इमारत पण सुसज्ज हवी , वातावरण असेल तर मुलाचे मन आनंदी राहते, आणि आनंदी मन दुप्पट क्षमतेने प्रत्येक गोष्ट ग्रहण करण्यास तयार असते. त्यांनाही ते पटले तेंव्हा नरेश इराणी आणि खुशी

नवानी, राकेश नवानी यांनी तयारी दाखवली व 10 लाख रुपये खर्च करून प्रशस्त इमारत बोलक्या भिंती सह, २ एकर मैदान स्वच्छ करून घेतले, मैदान आखणी करून घेतली, शाळेसाठी ५ लाख रुपयांची खेळणी मदत निधीतुन उपलब्ध करून घेतली. शाळेचा युनिफॉर्म इंग्रजी माध्यमांसारखा केला, आता शाळा पूर्ण रूपाने तयार झाली होती,







school Uniform





शाळेचा उदघाटन समारंभ ३ मे २०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री आयुष् प्रसाद यांच्या हस्ते करण्यात आला होता.
आलेले सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी शाळेचे बदलले रूप पाहून भरभरून कौतुक केले. शाळेत मुले योग्य आहार न मिळाल्यामुळे आजारी पडू नये म्हणून दररोज १५ लीटर दूध व प्रोटीन पावडर मुलांना देण्यास सुरुवात केली,





शाळेचा २२ असणारा पट हा ७२ वर गेला. शाळेत ७२ विद्यार्थी २ एकर मैदान प्रशस्त इमारत आणि मी एकटीच शिक्षिका असे काम जोमाने सुरू होते. शाळेत मुलांच्या व पालकांच्या व डी. वाय. पाटील या कॉलेज मधील संचालक मॅडम, प्रो. घुले सर व NSS चे विद्यार्थी, व MMIT कॉलेज यांच्या मदतीने परसबाग, बगीचा, 500 वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी मी एकच शिक्षिका शाळेत कार्यरत होते, २०२० ला सोबतच्या लगाडे मॅडम सेवा निवृत्त झाल्या होत्या तेंव्हा पासून मी शिक्षिका म्हणून एकटीच शाळेत कार्यरत होते. त्यामुळे भरपूर असे काम करता आले. शाळेचे अंतरंग निपुण होते, आता बाह्यांग सुसज्ज झाले होते, २०२३-२४ यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सव अंतर्गत माझ्या या लहान शाळेने हवेली तालुका नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला व जिल्हास्तर स्पर्धेत जाऊन पोहचले.



मे २०२४ ला पास झालेले चौथीचे विद्यार्थी १८ होते त्यापैकी ५ विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गेले आणि ते तेथील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सर्व विषयात त्यांच्या बरोबरीने प्रगती करू लागले. असा सर्व काही प्रगतीचा वाढता आलेख चा प्रवास सुरु असताना अचानक १ जुलै २०२४ रोजी बदलीने मला वळवंती या गावी हजर व्हावं लागलं. त्यावेळेला मावळ तालुका, वळवंती गाव याविषयी कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती. जेव्हा प्रत्यक्ष पहिल्या दिवशी शाळेमध्ये गेले तेव्हा समोर दिसणारे वेगवेगळे चेहरे पाहून थोडसं मला अस्वस्थ झालं. कारण समोरील बालचमू हे विद्यार्थी आहेत असे वाटतच नव्हते. असं का बरं हे असे वेगवेगळे का दिसत आहेत हा प्रश्न मनाला चटका लावून गेला. जेव्हा त्यांच्याशी बोलते झाले त्या वेळेला समजलं की या शाळेमध्ये सर्वाधिक मुलं आदिवासी समाजातील कातकरी जमातीची आहेत. त्यामुळे ती मुले आपोआपच इतर मुलांपेक्षा वेगळी दिसत होती, वेगळी बोलत होती, वेगळे राहत होते. इतर प्रवर्गातील मोजून सातच विद्यार्थी होते आणि २१ विद्यार्थी हे आदिवासी होते. त्यांची संख्या जास्त असूनही वर्गामध्ये, वर्गाच्या बाहेर, गावामध्ये वर्चस्व ह्या इतर प्रवर्गातील सात विद्यार्थ्यांचे होतं. २१ मुलांना शाळा आपलीशी वाटतच नव्हती. ना शाळेतील विद्यार्थी आपलेसे वाटत होते. माझी शाळा हा भाव तर त्यांच्या नजरेमध्ये दिसत सुद्धा नव्हता. कोणी कधी यावं, कधीही निघून जावं, असा त्यांचा शिक्षण प्रवास सुरू होता. काही ठराविक मुले तर डोकं दुखतंय, पोट दुखतय, विविध आजारांच्या नावाखाली सतत गैरहजर असायचे. त्यामध्ये आर्यन, रुद्राक्ष, अश्विनी, समृद्धी, वैशाली, पवन, अंजली, प्रीती ही मुले तर

.



शाळेतच येत नव्हती. मग ठरवलं आज त्यांच्या पालकांना बोलून घ्यायचं. पण आधी सुरुवात मुलांपासून करूयात म्हणून, प्रथम त्या मुलांना शाळेत बोलवून घेतलं. ती मुलं शाळेत आल्यावर त्यांना त्यांच्या आईला बोलवण्यास पाठवलं. मनात एक भीती होती जर हे विद्यार्थीच परत शाळेत आलेच नाही तर... पण ठरवलं जर ते आलेच नाही तर आपणच आज त्यांच्या घरी जायचं. पण त्याच वेळी चेहऱ्यावर पूर्ण घाम, तोंडात तंबाखू, कळकटलेले कपडे, हातावर, पायावर आलेले ओघळ, चप्पल नाही पायात, हाताची नखं वाढलेली, आणि तो भांडणाचा आवेश हे सर्व काही पाहता मी अवाकच झाले. मी काही बोलणार एवढ्यात त्याच म्हणाल्या, का व बाई... त्यांच्या तोंडून शब्द आणि दारूचा वास एकदम आल्याने मी स्तब्ध च उभी, मीच गोंधळले... तसे न दाखवता मी आवाज चढवून विचारलं तुमची मुलगी आणि कातकरी वाढयातील मुलं शाळेत का येत नाही, ते घरी राहतात, कोणतेही कारण सांगतात, हे तुमच्या लक्षात येत नाही का? का तुमच्या सारखंच त्यांनी पण उठलं की पिऊन पडायचं...? गावभर हिंडायचं, तोंडात तंबाखू धरत खात फिरायचं, जस गावात सोडलेल्या जनावरांना कोणीही वाली नसतं तसं तुमची मुले घडली पाहिजे का? असे बोलल्यावर मलाच जाणवले मी खूप बोलून गेले, पण त्यांना सौम्य, प्रेमाची भाषा समजणार नव्हती, म्हटलं आज भांडण तर भांडण पण...माझे शब्द कानावर पडताच रागाने लालबुंद होऊन आलेली बाई क्षणात लोण्यासारखी मऊ झाली आणि रडू लागली. नाय व बाई एकतर नवरा नाय, आई बाप पण नाय, बहिणीच्या गावात पोरं घेऊन राहते, सकाळी कामास जाते ते राच्याला घरी येते. मी तर शाळेत जा म्हणून सांगते, पोरं येत नाही त्यास मी काय करू? आता माझंही मन भरून आलं तेव्हा त्यांना त्यांच्या राहणीमानाविषयी चार गोष्टी समजून सांगितल्या, तुम्ही व्यसन केलं तर मुलं पाहून सर्व काही शिकतात, ते ही असेच वागतील हे समजून सांगितले, त्यांनीही ते सर्व निमूटपणे ऐकुन घेतले, व मीच नाही असं काही करणार पण माझ्या मुलांना चांगलं शिकवा हे सांगताना त्यांचा गळा दाटून आला. मी ही त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि त्यांना घरी पाठवून दिले. त्यानंतर त्यांची मुलगी

अश्विनी तिला बोलावलं. ती खूप घाबरलेली होती. रडायलाच लागली. माझं डोकं खूप दुखतंय असं म्हणून मोठ्याने ओरडू लागली. मी तिला शांत केलं. तिच्याशी बोलण्याचा खूप प्रयत्न केला पण ती काही बोलेना. सर्व कातकरी मुलांना बोलवून घेतलं पण कोणीच काही बोलेना. शाळा का आवडत नाही? घरी का रहावसं वाटतं? याच्यावर कोणीच बोलतं होईना... सगळ्यांचे

चेहरे हिरमुसले. हे सगळे एकमेकांकडे पाहू लागले. मी स्वतःशीच ठरवून, आज आपण यांच्यासाठी वेगळं काहीतरी करूया असा निश्चय केला आणि त्यांना सांगितलं की आपल्या शाळेच्या अवतीभवती वेगवेगळ्या आकाराचे पाने, वेगवेगळ्या रंगांचे फुल आहेत. त्याचा आपण गुच्छ तयार करूयात. कोण सर्वाधिक छान करेल ते आपण पाहूया. सगळ्या मुलांना गोलाकार बसवलं. तेव्हा अनिशाने गवताच्या शेंगांच्या वेण्या आकर्षक बनवल्या.



काहींनी पर्स,काहींनी वेगवेगळ्या प्रकारचे वस्तू, सर्व मुलांनी त्यांच्या कलेनुसार, आवडीनुसार वस्तू बनवल्या. कायम रानात, पानाफुलांत वाढलेली ही मुलं त्यांच्यासाठी ह्या गोष्टी नवीन नव्हत्याच खरं. परंतु त्यांनी केलेल्या त्या गोष्टीचं झालेलं कौतुक मात्र त्यांच्यासाठी नवीन होतं. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. सगळ्यांनी तयार केलेल्या वस्तू जमा केल्या त्यांचे एकत्र फोटो काढले आणि पुन्हा त्या वस्तू ज्याच्या त्याला देऊन टाकल्या. आता खरतर शाळा सुटायची वेळ झाली होती. मी सहज म्हटलं उद्या आपण अजून नवीन काहीतरी करूयात. याल का तुम्ही सगळेजण शाळेमध्ये. तेव्हा सगळ्याच मुलांचा एकदम हो असा मोठ्याने आवाज आला. मला सहजच वाटून गेलं आता हो म्हणतात खरं, उद्या मात्र यातील अर्धी मुलं पण येणार नाहीत. परंतु उद्याची लढाई उद्या सकाळी पाहू, या विचाराने शाळेतून बाहेर

पडले. दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यानंतर मी जाण्याच्या आधी सर्व मुले शाळेत हजर होती. हे सर्व मुले स्वइच्छेने, स्वतःहून शाळेकडे वळली होती. आज त्यांच्या राहणीमानात पण थोडा बदल जाणवत होता. केस विंचरलेले होते. तेच शाळेचे कपडे परंतु थोडे व्यवस्थित घातलेले होते. केसांना तेल लावलेलं होतं. त्यांच्यामध्ये झालेला हा बदल त्यांच्यासाठी अजून काही नव्याने करण्याची प्रेरणा देऊन गेला. हे शिक्षण प्रवाहात आलेली मुलं आजतागायत टिकून आहेत. याचा आनंद गगनात मावेनासा आहे.



२) पालकांचे समुपदेशन-

कातकरी समाजातील सर्व पालकांना एकत्रित बोलवून घेतलं. बरेच विद्यार्थी हे आजी जवळ राहत होते. पवनची आई त्याला तो लहान असतानाच सोडून निघून गेली, वडिलांनी सुद्धा दुसरे लग्न केले. दोघांनीही त्याला सांभाळण्यास नकार दिला. तेंव्हा त्याच्या आत्याने त्याला सांभाळले. तो आत्याकडेच राहत होता. तिला सुद्धा कधी कधी राग अनावर झाला की ती पवनला उपाशी ठेवत असे, हे ज्या क्षणी मला समजले तेंव्हा मलाच प्रश्न पडला या चिमुरड्याने काय शिकावं, आणि कसं मदत करायला शिकावं, एवढ्या लहान वयात जगाचा व्यवहार त्याच्या नजरेसमोर आला होता. मग भात बनवणाऱ्या काकींना सांगितले पवनला नाही मिळाले जेवायला तर तुम्ही देत जा. नंतर नंतर तर आत्या दुसऱ्या गावात कामासाठी आठ आठ दिवस जाऊ लागली. मग तर असाच कोणाच्याही दारात झोपायचा. कोणी पाणी दिले तर अंघोळ करायचा, मिळालं खायला तर खायचा नाहीतर उपाशीच राहायचा. म्हणून त्याच्या आत्याला, ज्यांचे आई वडील आहेत त्यांना अशा सर्व पालकांना शाळेत बोलावले, ज्यांना शाळेत येण्याची

इच्छा नाही त्यांना शाळेच्या बाहेर बोलावून घेतले. त्यांना थोडं त्यांच्या भाषेतच सांगितले, तुम्हीं कष्ट करता कोणासाठी, आणि त्यांच्या समोरच उठलं की व्यसन करता, कसेही राहत, शिव्या दिल्याशिवाय तर बोलतच नाही, हे सगळं आता थांबवा नाहीतर अजून फार नाही पण 2 वर्षातच ही सर्व मुले शाळेतून घरी असतील, आणि जी फरफट तुमच्या जीवनात चालू आहे, ती त्यांच्या बालवयातच सुरू होईल. मग तुमचं जगणं, असणं, काम करणं सर्व काही पालथ्या घड्यावर पाणीच. त्यांना ह्यातील किती समजलं माहीत नाही, पण समृद्धीची आई पटकन उठली आणि म्हणाली मॅडम, तुम्ही फक्त सांगा आमच्यात काय बदल करायचा, आम्ही काय करायचं ते सांगा, ते आम्ही सगळं करणार, आमच्या मुलांसाठी, तेवढ्या बाबतीत कातकरी समाजातील लोकांची एकजूट पाहायला मिळाली, कारण त्यांची सर्व नाती एकमेकांत गुंतलेली असल्याने ते एकमेकांचा आदर पण करायचे आणि एकजुटीने राहायचे पण. त्यांना स्वच्छतेच्या सर्व गोष्टी समजून सांगितल्या, तुम्ही स्वच्छ राहा व मुलानंही स्वच्छ ठेवा म्हणजे मुलांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होईल. कारण त्यांच्या अस्वच्छतेमुळे मुलांच्या अंगावरील खरूज कधी जातच नव्हती . संपूर्ण हात पाय कायम भरलेले असायचे. जुन्या रूढी परंपरा मनात धरून सर्वच मुलींचे केस वाढविले, त्याची निगा न राखल्याने त्यात उवा खूप झालेल्या, त्या सर्व मुलींचे प्रथम केस कापून घेतले. मुलांचे मन आनंदी होण्यासाठी, त्यांचे मन शिकते होण्यासाठी ते इतर सर्व सामान्य मुलांसारखे दिसणे अत्यंत आवश्यक होते. पालकांच्या मदतीने पालकांच्या आणि मुलांच्या सवयीत बदल झाला. आपण चारचौघासारखे समाजात वावरू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्या मनात प्रथम रुजविला.



३) शाळेची इमारत-:

शिक्षणातील सर्वात मोठा अडसर ठरू लागली ती शाळेची इमारत. कारण दोन वर्षापासून शाळेचा एक वर्ग जिल्हा परिषदचे इंजिनिअरने निरीक्षण करून धोकादायक ठरविला होता. सर्व मुले १ ली ते ४ थी एकाच वर्गात बसत होती. त्यातून ६ महिने होऊन गेले होते की, त्या शाळेतील मुख्याध्यापक मॅडम सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यामुळे सर्व विद्यार्थी एकाच वर्गात बसत होते. मी वळवंती शाळेत रुजू झाल्यावर २ वर्ग व्हरांड्यात, २ वर्ग वर्गाच्या आतमध्ये, पण हे सूत्र काही जुळेना. मुलांना वातावरणच नाही तर मुलं शिकती होणार कशी. एक गोष्ट जमेची होती, की माझ्या वळवंती गावचे श्री रोहिदास जांभुळकर हेच गोवित्री ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच होते. त्यांच्या अथक प्रयत्नाने शाळा बांधकाम करण्यास जिल्हा परिषदेची परवानगी मिळाली, आणि मा. सभापती शेवाळे, व सरपंच मा. श्री रोहिदास जांभुळकर यांच्या सहकार्याने 'युथ बिल्ड फाउंडेशन' यांच्याकडून ४० लाख रुपयांचा निधी प्राप्त करून घेतला. आता शाळेचे बांधकाम सुरू आहे. भौतिक सुविधा सुसज्ज नसतील, शालेय वातावरण प्रसन्न नसेल तर मुलांचे मन शाळेत रमणार नाही या जाणिवेतून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी नवीन इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. या ४० लाखातील निधीतून मुलांना सुसज्ज इमारत, सुसज्ज संगणक लॅब, मुलांना बसण्यासाठी नवीन बैठक पध्दत, दप्तराचे ओझे कमी व्हावे म्हणून फर्निचर, टॅब प्रत्येक विद्यार्थ्यास, डिजिटल बोर्ड, स्मार्ट टी. व्ही, विद्यार्थ्यास आराम करण्यासाठी रूम, शालेय प्रशासनासाठी ऑफिस, मुलांसाठी, मुलींसाठी स्वतंत्र शौचालय, रॅम्प, एक मोठा सांस्कृतिक हॉल, परसबाग, बगीचा, सुसज्ज ग्रंथालय असे सर्व नियोजित आहे.

आता शाळेचे बांधकाम २ वर्गखोल्या पूर्ण झाल्या असून शाळेचे कंपाउंड दगड बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित बांधकाम सुरू आहे. दिवाळीनंतर मुलांना नवीन शाळेत बसून अध्ययनाचा आनंद घेता येईल. असा विश्वास आहे.








४)अध्ययन प्रक्रियेतील मुलांची प्रगती- विविध उपक्रमांच्या माध्यमातून सर्व मुलांच्यातील भेदभाव बऱ्यापैकी कमी झाला आहे. त्यामुळे सर्व मुले एक होऊन एकत्रितपणे अध्ययनाचा आनंद घेताना दिसून येतात. जे कातकरी समाजातील मुले स्वतःहून कधी समोर येत नव्हती, आपण काहीतरी बोलू शकतो आणि आपलं म्हणणं सर्वजण ऐकून घेऊ शकतात हा विश्वासच त्यांच्या मनामध्ये निर्माण केला. आता ती मुलं विश्वासाने आत्मविश्वासपूर्वक आपलं म्हणणं मांडतात. ज्या विविध स्पर्धा घेतल्या जातात त्या स्पर्धेमध्ये स्वतः हिरीरीने भाग घेतात. जिंकण्यासाठी स्वतःहून प्रयत्न करतात. कातकरी समाजाची मुले शिक्षण प्रवाहात आली, आजच्या ह्या शिक्षण युगामध्ये टिकण्यासाठी ते स्वतःहून प्रयत्न करू लागले. जगाच्या बाजारात

टिकायचं असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे त्यांच्या मनावर बिंबवलं गेल्याने त्यांच्या मनात शिकण्याची उत्सुकता आणि इच्छा निर्माण झाली. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा देखील ते सहजपणे वापर करू लागले. शिक्षकांसोबत आपलेपणाने बोलू लागले. आता हक्काने ते मुले अंगा खांद्यावर खेळतात, मांडीवर बसतात, आपलं म्हणणं सभाधीटपणे मांडतात. त्यांचं म्हणणं ऐकून घेण्यासाठी भाग पाडतात. आपल्याकडून कधी जर नजरचुकीने त्यांना घरचा अभ्यास द्यायचा राहून गेला तर ते स्वतःहून पुढे येतात, आणि मी आज काय अभ्यास करू असा प्रति प्रश्न विचारतात. त्यांच्यामध्ये झालेला हा अमुलाग्र बदल म्हणजेच त्यांच्या जीवनाला मिळालेली एक नवीन कलाटणी आहे. त्यांचा हा जणू काही एक नवीन जन्म झालेला आहे. अशा या मुलांना घेऊन जेव्हा यशवंतराव कला क्रीडा स्पर्धेमध्ये उतरायचं ठरवलं तेव्हा प्रथमच सर्वांसोबत सर्वांसारखंच नृत्य करण्याचा आनंद घेणारी ही मुलं बीट स्तरापर्यंत गेली. प्रथमच उचललेलं हे पहिलं पाऊल नक्कीच त्यांच्यात आत्मविश्वास देऊन गेलं. ही तयारी पाहता पहिलीतली छोटी मुलं सुद्धा स्पर्धेसाठी तयार झाली आणि जेवढ्या काही स्पर्धा होत्या त्या प्रत्येक स्पर्धेमध्ये आमच्या या वळवंती शाळेतील मुलं हिरीरीने सहभागी झाली. स्पोकन इंग्लिशला तर तालुक्यात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला, धावणे, बेडूक उडी, उंच उडी लांब उडी, वेशभूषा या स्पर्धेत तर ते तालुका स्तरापर्यंत पोहोचले. तालुकास्तरावर त्यांना अपयश आलं खरं परंतु त्यांच्या दृष्टीने ते अपयश नव्हतच. खरं तर ते त्यांना मिळालेलं यशच होतं. कारण कधीही कोणत्याही स्पर्धेत सहभागी न झालेले, शाळा सोडून कधीच बाहेर न पडलेले हे विद्यार्थी तालुका स्तरापर्यंत पोहोचले, हे यश सुद्धा माझ्यासाठी कमी नव्हते. ना माझ्या मुलांसाठी कमी होते. त्यांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे होते. मुले चटकन म्हणाले मॅडम आपण पुढच्या वर्षी अजून प्रयत्न करू आणि आपण जिल्हास्तरापर्यंत जाऊ. त्यांच्या मनानं घेतलेली ही उभारी आणि त्यांच्या पंखांमध्ये आलेलं बळ पाहून मनोमन फार आनंद झाला. प्रयत्नांना कितपत यश मिळेल हे माहीत नाही. परंतु त्यांच्या पंखांना बळ देण्याचं काम आणि त्यांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचं कार्य मात्र पूर्णत्वाला गेले होते. आता ती मुले कोणीही समोर आलं तरी न डगमगता प्रश्नांची उत्तरं देतात. आत्मविश्वासपूर्ण बोलतात जे जे काही ग्रहण केलेला आहे ते सभाधीटपणे मांडतात. येत असेल तर हो म्हणतात, येत नसेल तर आम्ही प्रयत्न करतो, उद्या तुम्हाला म्हणून दाखवतो असा प्रामाणिकपणाचा शब्द देखील समोरच्या व्यक्तीला देतात. भेटीला आलेल्या प्रत्येकाला त्यांच्या मनाचा हा खरेपणा पाहून नक्कीच आनंद होतो. शिक्षणातला कमी अधिकपणा, कमी अधिक प्रयत्नाने भरून काढता येतो. परंतु मनाचा खरेपणा हा बुद्धींगत होण्यासाठी मनावर संस्कारच करावा लागतो. तो ह्या सर्व मुलांच्या मनावर झालेला आहे. ते त्यांच्या आचरणात देखील आणत आहेत. आज ही मुले पथनाट्य सादर करतात, इंग्रजी स्टोरीचं नाट्यीकरण करतात. वाचन लेखन अस्खलितपणे करण्याचा प्रयत्न करतात.




अष्टपैलू व्यक्तिमत्व तयार होण्यासाठी जे जे आवश्यक आहे तेथे ज्ञान वेचण्याचा प्रयत्न हे विद्यार्थी सातत्याने करत असतात. मनामध्ये आत्मविश्वास असेल, सतत प्रयत्नशील राहण्याची वृत्ती असेल, तर आकाशाला नक्कीच गवसणी घालता येते. हा विचार आणि विश्वास मुलांच्या मनामध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न केला आणि तो यशस्वी झाला. आता जीवनाच्या वाटेवर स्पर्धेच्या युगामध्ये वावरत असताना जरी अपयश त्यांच्या पदरी पडले तरी हे विद्यार्थी खचून जाणार नाहीत. ते पुन्हा नव्याने उभे राहतील. पडले धडपडले तरी नव्याने प्रयत्न करण्याची क्षमता स्वतःमध्ये आहे याची जाणीव त्यांच्या मनामध्ये सातत्याने असणार आहे.

Wh Questions

	गट / इयत्ता	विद्यार्थ्यांचे नाव	शाळेचे नाव	केंद्र	बीट	प्राप्त क्र
१	इरी- ४थी	वीरलिंगमा शिवानंद हिरेमठ	कुंडमळा	इंदोरी	तळेगाव	प्रथम
२		वेश सोमनाथ जोभुळकर	वळवंती	गोविंदी	खडकाळे	द्वितीय
३		देवश्री गोरख बोरुडे	कान्हे	कान्हे	वडगाव	तृतीय
१	५वी- ६वी	श्लोक संतोष भारती	ब्राम्हणवाडी	कान्हे	वडगाव	प्रथम
२		स्वराज नवनाथ टाकळकर	बुधवाडी	सोंगसे	खडकाळे	द्वितीय
३		निरंक				तृतीय
१	७वी- ८वी	कौतो राकेश विश्वकर्मा	उर्से	बेबेडओहोळ	वडगाव	प्रथम
२		माही उदित वधेल	खडकाळे क्र.१	खडकाळे	खडकाळे	द्वितीय
३		गौरी शशिकांत सुतार	कडधे	कडधे	काले कॉलनी	तृतीय

Essay Writing निबंध स्पर्धा

१	५वी- ६वी	दीपक नागेंद्र हलीमपुरे	उर्से	बेबेडओहोळ	वडगाव	प्रथम
२		नानवी सिद्धार्थ चवरे	पिंपळोली	भाजे	लोणावळा	द्वितीय
३		सानल युवराज आडोवळे	भोयरे	भोयरे	तळेगाव	तृतीय
१	७वी- ८वी	अपूर्वा संतोष सोनार	नवलाख उंब्रे	नवलाख उंब्रे	तळेगाव	प्रथम
२		सुमेरन सिंह बादल	उर्से	बेबेडओहोळ	वडगाव	द्वितीय
३		आर्या गणेश गुजर	पिंपळोली	भाजे	लोणावळा	तृतीय

Speech Competition वक्तृत्व स्पर्धा

१	५वी- ६वी	कार्तिकी विलास काटकर	कोंढे ना.मा.	कोंढे ना.मा.	खडकाळे-अ	प्रथम
२		सम्यक संतोष पवार	वेलज	टाकवे	तळेगाव	द्वितीय
३		स्वरा सचिन अलहाट	कान्हे	कान्हे	वडगाव	तृतीय
१	७वी- ८वी	कोमल कैलास मते	नवलाख उंब्रे	नवलाख उंब्रे	तळेगाव	प्रथम
२		स्वरा अविनाश गायकवाड	खडकाळे क्र.१	खडकाळे	खडकाळे	द्वितीय
३		गौरी शशिकांत सुतार	कडधे	कडधे	काले कॉलनी	तृतीय


Dramatisation नाट्यीकरण

	गट / इयत्ता	शाळेचे नाव	केंद्र	बीट	प्राप्त क्रमांक
१	५वी- ६वी	उर्से	बेबेडओहोळ	वडगाव	प्रथम
२		वेलज	टाकवे	तळेगाव	द्वितीय
३		निरंक			तृतीय
१	७वी- ८वी	भोयरे	भोयरे	तळेगाव	प्रथम
२		नाणे	कोंढे ना.मा.	खडकाळे-अ	द्वितीय
३		कान्हे	कान्हे	वडगाव	तृतीय

Conversation संभाषण

१	५वी- ६वी	पिंपळोली	भाजे	लोणावळा	प्रथम
२		ब्राम्हणवाडी	कान्हे	वडगाव	द्वितीय
३		उकसान	गोविंदी	खडकाळे	तृतीय
१	७वी- ८वी	नवलाख उंब्रे	नवलाख उंब्रे	तळेगाव	प्रथम
२		ताजे	भाजे	लोणावळा	द्वितीय
३		निरंक			तृतीय

गट शिक्षण अधिकारी
पंचायत समिती मावळ




५) लाभार्थी योजना –

कातकरी समाजातील सर्व मुलांसाठी आदिवासी सुवर्ण महोत्सवी योजना सुरू केलेली आहे. या योजनेमुळे प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या उपस्थितीनुसार दरवर्षी एक हजार रुपये त्याला प्राप्त होत असतात. यावर्षी देखील या सर्व मुलांना या योजनेचा लाभ दिला सर्व मुले १००% उपस्थित असल्यामुळे त्यांना पूर्ण वर्षाचे प्रति विद्यार्थी एक हजार रुपये शालेय खात्यावर जमा करण्यात आलेले आहे. आता सध्या विद्यार्थ्यांचे बँक खाते चालू करून ती सर्व रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे.

त्याचबरोबर संपर्क फाउंडेशन कडून सर्व कातकरी समाजातील मुलांना मुलींना रेनकोट, वह्या, दप्तर, शालेय उपयोगी सर्व वस्तू यांचे वाटप केले जाते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षण प्रवाह टिकण्यास फार मोठी मदत झालेली आहे.

तळेगाव येथील 'कॅप' संस्थेकडून देखील सर्व मुलांना व यांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे त्यांना शालेय उपयोगी वस्तू कोणत्या नव्याने खरेदी कराव्या लागल्या नाहीत. त्यामुळे देखील मुलांचे उपस्थितीचे प्रमाण वाढत गेले.





Report No.:

RTGS Batch Payment Report

As On Date: 30-Oct-2024

Account Name: SHALA VYAVASTHAPAN SAMITI Z P SCHOOL VALVANTI

Account Number: 041001700014772

Sr.No.	Ben. Name	Ben. Account No.	Ben. IFSC Code	Amount Remitted	UTR No.
Scroll Number: 213					
Payment Mode: NEFT					
1	SHUBHAM BHARAT BHANGARE	60381070486	MAHB0000372	1,000.00	HDFCH24304000851
2	ROSHANI MANOHAR BHANGARE	60381058776	MAHB0000372	1,000.00	HDFCH24304000850
3	RIYA MARUTI BHANGARE	60428975237	MAHB0000372	1,000.00	HDFCH24304000849
4	DATTA ANKUSH BHANGARE	60390871554	MAHB0000372	1,000.00	HDFCH24304000848
5	SUREKHA MANOHAR BHANGARE	60397482110	MAHB0000372	1,000.00	HDFCH24304000847
6	ANISHA RANJEET BHANGARE	60429109119	MAHB0000372	1,000.00	HDFCH24304000846
7	RENUKA MARUTI BHANGARE	60422128946	MAHB0000372	1,000.00	HDFCH24304000845
8	KARTIK DATTA BHANGARE	60429128814	MAHB0000372	1,000.00	HDFCH24304000844
Total:				8,000.00	
Grand Total:				8,000.00	

Clerk / Cashier Officer Branch Manager

६) दिवस आनंदाचा उपक्रम-

सर्व मुलांची परिस्थिती तशी बेताचेच असायची. त्यामुळे त्यांना शालेय प्रवाहात टिकून ठेवण्यासाठी त्यांच्या मनाला योग्य खाद्य देणे आणि पोटाला देखील त्यांच्या आवडीचा खाद्य देणे या दृष्टीने दिवस आनंदाचा उपक्रम सुरू केला. हा उपक्रम महिन्यातून एकदा मुलांच्या सहकार्याने राबविला जातो.त्यातील खाऊ वाटप पर्यंतचा भाग दररोज घेतला जातो आणि खाऊ वाटप पर्यंतचा उपक्रम महिन्यातून एकदा घेतला जातो. यामध्ये मुलांच्या मनाला खाद्य देण्यासाठी ओंकार, श्लोक पाठांतर, भजन, गोष्ट, पाढे पाठांतर, नाटिका, नाट्यकरण, प्रार्थना, ध्यान, धारणा इत्यादी गोष्टी दररोज करून घेतल्या जातात. त्याचबरोबर मुलांना त्यांच्या आवडीचा खाऊ देण्यासाठी शाळेत चुलीवर पावभाजी, मिसळ, भजी, वडापाव, मॅगी, भेळ, पुलाव, पनीर भाजी, चपाती असे सर्व पदार्थ बनवून त्यांना खायला दिले जातात.हे सर्व पदार्थ मी स्वतः बनवते व त्याचा खर्चही मी स्वतः करते. त्यामुळे त्यांचा आवडीचा खाऊ मिळाल्याने मुलांना शाळा शाळेतील शिक्षक, शाळेतील विद्यार्थी हे आपलेसे वाटू लागले. त्यांच्या बुद्धीला मनाला व पोटाला आवडीचा खाऊ मिळत गेल्याने मन शांत झाले व ते शिकण्यासाठी प्रेरित होऊ लागले.





























सूर्य नमस्कार






बालविकास वर्ग
ध्यान धारणा





७) संस्कारकथामाला –

मुलांच्या मनावर योग्य संस्कार होण्यासाठी श्यामची आई संस्कार कथा मला सुरू केली. कारण तोपर्यंत आई आणि वडिलांचा आदर करायचा असतो. गुरुजनांचा आदर करायचा असतो. हे कधी त्यांच्या हृदयापर्यंत पोहोचलेच नव्हते आणि ते जर प्रत्यक्ष फक्त सांगितले असते तर त्यांना ते भावले नसते. म्हणून श्यामची आई हा संस्कार कथा मला उपक्रम घ्यायचा ठरवला आणि त्यातील प्रत्येक रात्र प्रत्येक दिवशी घेण्याचा संकल्प केला. त्यामुळे मुलांच्या मनावर कळत नकळतपणे संस्कार होत गेला. त्यांचं मन बदलत गेलं. तेव्हा आपल्यामध्ये खूप सारा बदल करणे गरजेचे आहे याची जाणीव त्यांना स्वतःला होऊ लागली. जे आपल्या आईसोबत शिव्या देऊन बोलत होते, ओरडून बोलत होते, आता त्याचे प्रमाण हळूहळू कमी झाले. आपली आई आपल्यासाठी किती महत्त्वाची आहे याची जाणीव त्यांना होऊ लागली. आपले वडील आपल्यासाठीच कष्ट करतात या जाणिवेतून त्यांचे मत परिवर्तन होऊ लागले. आपणच जर आपल्या आई-वडिलांचा आदर केला तर समाज सुद्धा त्यांचा आदर करतो हे विचारधारा त्यांच्या मनामध्ये रुजवली गेली. आता मुलांना आपल्या कुटुंबाचे महत्त्व लक्षात येऊ लागले. या संस्कारमालेतून त्यांच्या मनावर कळत नकळतपणे संस्कार होऊ लागले.

कारण पोटभरीचे ज्ञान आयुष्यात कधीही कोठूनही वेचता येते. परंतु बालवयात जर मनावर संस्कार झाले नाही तर ते मुल जगाच्या बाजारात कधीही टिकू शकत नाही. यश आणि अपयश पचवण्याची क्षमता त्याच्यामध्ये निर्माण होत नाही, म्हणून जीवन जगण्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे ते संस्कार. एकदा मनाला योग्य संस्कार मिळाले की मन सार आणि असाराचा विचार करते. आवश्यक आहे तेवढ्याच गोष्टी स्वीकारते. कधी कळत नकळतपणे चुकीच्या गोष्टी घडून गेल्या तरी ते वेळीच सावध होते. झालेला चुका पुन्हा नव्याने करत नाही. हे असेच मनावर संस्कार झाले तर विद्यार्थी जगाच्या बाजारामध्ये यशस्वी होतात. आपल्या इच्छेनुसार, प्रारब्धानुसार, प्रयत्नानुसार जे जे काही लाभलेलं आहे ते प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न करतात. स्वतःच्या आयुष्यात समाधानी आणि आनंदी राहण्याचा प्रयत्न करतात. म्हणून मनावर संस्कार होणे अत्यंत आवश्यक आहे. तेच या विद्यार्थ्यांना देण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आणि हे पुष्प उमलताना एक वेगळेच समाधान देऊन जात आहे.

https://youtu.be/QdHMW5Ozxwg?si=qbpyhz8ht98wGz3n




८) आव्हाने :-

आज हे सर्व विद्यार्थी लेखनातील पाठांतरातील स्पर्धेतील आव्हाने स्वीकारण्याची तयारी दाखवतात, म्हणजेच एका दिवसांमध्ये २५ पर्यंत पाढे पाठ करणे १०० स्पेलिंग पाठ करणे, प्रत्येक पाठ अस्खलितपणे वाचन करणं, अभिनय करणं, कविता गायन, कविता वाचन असे एक एक आव्हान आपण त्यांना प्रतिदिनी देत गेलो तर, ते स्वतःहून ते स्वीकारतात आणि पूर्णत्वाला नेण्यासाठी प्रयत्न करतात. जेव्हा जेव्हा त्यांना यामध्ये यश प्राप्त होते तेव्हा तेव्हा त्यांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. आपणही इतरांसारखं प्रत्येक गोष्ट करू शकतो हा विश्वास त्यांच्या मनामध्ये निर्माण होतो. त्यामुळे ते प्रयत्न करू लागतात. आपलं कोणीतरी कौतुक करतंय, आपल्यासाठी टाळ्या वाजवल्या जातात, आपल्या हातावरती स्टार मिळतो, ही भावना जणू त्यांना नव्याने जग ओळखण्याची दृष्टी देत असते. या दृष्टीने ते जग पाहण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ते नवनवीन आव्हानांचा स्वीकार करायला सुद्धा तयार होतात.





जिल्हा परिषद पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी दिलेले आव्हान विद्यार्थ्यांनी पूर्ण केले त्यामुळे विनोबा टीम चे सर्वेसर्वा मा.संजय दालमिया व डायट च्या प्राचार्य मा.नेहा बेलसरे मॅडम यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

९) आधार कार्ड :-

कातकरी समाजातील मुलांचे जन्माची नोंदच नसल्याने जन्म दाखला नाही, त्यामुळे आधार कार्ड निघत नव्हते. आधार कार्ड नसल्याने अपार ID निघत नव्हते. खूप प्रयत्न केले पण जुनी मशीन कोठेच प्राप्त होईना. खूप विनंती करून 'कान्हे' येथे कॅम्प सुरू झाला तेंव्हा त्यांचे आधार कार्ड मिळाले पण त्यातूनही २ मुलींचे आधार कार्ड रिजेक्ट झाले. आता काय करावं, त्या दोन मुलींना विविध योजना व शालेय ऑनलाइन रेकॉर्ड पासून वंचीत राहत होत्या, तेंव्हा करंजगाव येथील कॅम्प मध्ये आधार कार्ड काढून घेतले. तो कॅम्प फक्त कातकरी मुलांसाठीच होता. आता शाळेतील सर्व मुलांचे आधार ID प्राप्त झाले होते.

१०) राबवलेले उपक्रम :-

प्रवेशोत्सव, वाढदिवस, पालखी सोहळा, नागपंचमी सण, रक्षाबंधन सण, गोकुळाष्टमी, आरोग्यतपासणी, भोंडला, बाल आनंद मेळावा, दिवाळी साहित्य बनविणे, किल्ले स्पर्धा, निवडणूक प्रचार व प्रसार सप्ताह, हळदी कुंकू, मराठी भाषा पंधरवडा, शिकू आनंदे जगू संवेदना संगे, आनंददायी शनिवार, दिवस आनंदाचा उपक्रम, संस्कार कथांमाला, पाढे पाठांतर, स्पोकन इंग्लिश, वाचन, लेखन, माझी शाळा सुंदर शाळा ...इ.



आधी







नंतर






ता. हवेली, जि. पुणे






rice bran
health


कावळा
Crow
Cone


माझी
दिनचर्या




१२
12
बारा
१३
13


८
8
Eight
९
9
Nine
१८
18
अठरा
Eighteen
१९
19
२०
20











आंध्र प्रदेश
कर्नाटक
तमिलनाडु
श्रीलंका


टोंबर
हेंबर
सेंबर




November
December
जानेवारी
फेब्रुवारी
मार्च
एप्रिल



माझ्या देशातल्या सर्वांना आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा
मला अभिमान आहे. त्या परंपरांचा
पाईक होण्याची पात्रता मलाच असेल
यासाठी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजन -
वर्गाचा व वडिलधाऱ्या माणसांचा मान
ठेवीन आणि प्रत्येकाशी नीट वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव
TR-4000

यासाठी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजन -
वर्गाचा व वडिलधाऱ्या माणसांचा मान
ठेवीन आणि प्रत्येकाशी नीट वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव
TR-4000

January
February
March
April
May
June
July
August
September
October
November
December


११) केलेल्या कार्याची घेतलेली दखल:- शिकू आनंदे जगू संवेदना संगे या उपक्रमास 'सर फाउंडेशन' चा राष्ट्रस्तरीय पुरस्कार प्राप्त. मा.शोभा खंदारे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. आधुनिक केसरी, संभाजीनगर या वृत्तपत्राच्या वतीने 'आयडॉल महाराष्ट' हा पुरस्कार प्रधान करण्यात आला. ह्याचे वितरण मा. इंद्रजीत भालेराव, मा.दासू वैद्य यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.



आधुनिक केसरी
30 Jan 2025
https://www.adhunikkesari.com/epaper/news/59970/679a28c201346

जिल्हा परिषद वळवंती शाळेत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज



पुणे : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वळवंती येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा मोठ्या उत्साही व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करत असताना प्रथम सर्व मुलांचे भाषा ग्रंथ दिंडी काढण्यात आली. यावेळी गावातून प्रभात फेरी काढली. प्रभात फेरीच्या वेळी सर्व मुलांनी घोषवाक्य दिले, त्यामुळे गावामध्ये मराठी भाषा संवर्धनाचे वातावरण निर्माण झाले. नंतर निबंध लेखन, हस्ताक्षर, शुद्धलेखन, कविता लेखन, कथालेखन इत्यादी स्पर्धा भरवण्यात आल्या. मुलांकडून शब्दकोडी सोडवून घेण्यात आली. काव्यवाचन करण्यात आले. काव्यवाचन करत असताना कुसुमाग्रज यांच्या "ओळखलत का सर मला, पावसात आला कोणी", या कवितेचे वाचन करण्यात आले. सर्व मुलांनी या कवितेचे लेखनही केले. नंतर मुलांना मराठी साहित्यासंबंधी रसग्रहण करत असताना पुस्तकाची समीक्षा कशी असावी, पुस्तक समीक्षा कशी करायला हवी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. पुस्तक समीक्षेसाठी 'महात्मा फुले' हे पुस्तक निवडण्यात आले होते. त्यानंतर मुलांना वाचन संस्कृती वाढविण्यासाठी ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनामध्ये मुलांनी- पालकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदविला. त्यामुळे अधिक आनंददायी वातावरण तयार झाले. नंतर मुलाखत कशी घ्यायची किंवा मुलाखतीचे कोणते मुद्दे विचारात घ्यायला हवे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. नंतर मुलांची वक्तृत्व स्पर्धा, संविधान वाचन व मी मराठी भाषेशी कटिबद्ध राहण्याविषयी प्रतिज्ञा घेण्यात आली. नंतर मुलांच्या चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. मुलांनी रेखाटलेले चित्र याचे प्रदर्शन भरवण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा च्या अखेरच्या दिवशी २८ जानेवारीला रांगोळी स्पर्धा व रांगोळी प्रदर्शन भरविण्यात आले होते. मुलांनी अतिशय आखीव रेखीव सुबक अशी रांगोळी काढली होती. पालकांनी रांगोळी प्रदर्शनास भेट दिली होती अशा पद्धतीने १४ जानेवारी ते २८ जानेवारी दरम्यान विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थी अतिशय उत्साहाने प्रत्येक उपक्रमात सहभागी झाले. प्रत्येक उपक्रमाचा त्यांनी मन भरून आनंद घेतला. त्यांना नवीन कलांची ओळख झाली. आपली स्वतःची कला सादर करायला मिळाल्यामुळे मुलांच्या मनामध्ये आनंद निर्माण झाला. अशा रीतीने मराठी भाषा पंधरवडा उपक्रम अतिशय आनंदी व उत्साही वातावरणामध्ये सौ तृप्ती तोडकर व सौ प्रतिभा टकले यांनी वळवंती शाळेत साजरा करण्यात घेतला. याप्रसंगी गोविंद केंद्राचे केंद्रप्रमुख मा. श्री अजित मोरे सर व वळवंती गावचे सरपंच मा.श्री. रोहिदास जांभुळकर यांचे अनमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले.




Center For Learning Resources
OpenLinks Foundation (Data Capturing Partner)
TAG Certification Ceremony – A Recognition Event
Celebrating Success, Honoring Achievements, Inspiring the Future
For the Teachers' Activity Group (TAG): English Classroom Program in 2024-25
Chief Guests :
Hon. Dr. Gajanan Patil
Chief Executive Officer,
Zilla Parishad, Pune
Dr. Bhausaheb Karekar
Education Officer,
Secondary Z.P. Pune
Dr. Kamaladevi Awate
Deputy Director, State Council of Educational
Research and Training, Maharashtra, Pune
Organized by :
Balkrishna Watekar
Head of Department Curriculum
& Evaluation, DIET Pune
Namdev Shendkar
Principal,
DIET Pune
Thursday, 17 April 2025
10AM - 2PM
OPPO F21 Pro







Youtube Link:
https://www.youtube.com/@truptitodkar5661
Drive Link:
https://drive.google.com/drive/folders/1wcy0ig6PVIai8DcqqEnv2DLaatTo1X5

----------**----------

आदिवासी बहूल भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध कृती कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न

Health,Hygiene and Happiness - 3 H Program यशस्वीपणे राबविणाऱ्या शाळेची यशोगाथा

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पासली तालुका वेल्हे, जिल्हा पुणे
मुख्याध्यापकांचे नाव - श्रीमती पल्लवी रमेश शिरोडे

प्रस्तावना-

वेल्हे तालुका हा पुणे जिल्ह्याच्या पश्चिम भागात वसलेला असून सह्याद्रीच्या पर्वतरांगांनी वेढलेला ,दुर्गम, डोंगराळ वन्यक्षेत्र असलेला, शिवरायांची ऐतिहासिक पावन भूमी असलेला तालुका.. अशा निसर्गरम्य वेल्हे तालुक्यातील दुर्गम भागामध्ये वसलेले आमचे पासली गाव.


पासली हे गाव तालुक्याच्या ठिकाणापासून पंधरा किलोमीटर वरच्या डोंगराळ पट्ट्यात वसलेले आहे.. प्रचंड प्रमाणात पडणारा पाऊस, दाट धुके आणि आजूबाजूला वन्य परिसर असलेल्या दुर्गम भागातील आमची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पासली.

शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोहोचण्यासाठी रस्ते अरुंद, चढ-उतारांचे व कच्चे आहेत. आजूबाजूला जंगली परिसर असणाऱ्या भागातून अनेक विद्यार्थी चार ते पाच किलोमीटर पायपीट करून शाळेमध्ये येत असतात.. या भागात मोबाईल नेटवर्क, इंटरनेट व विजेची सुविधा मर्यादित आहे .

तरीही शिक्षकांचे सातत्यपूर्ण प्रयत्न, विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे असलेला ओढा आणि स्थानिक समुदायाचा पाठिंबा यामुळे शाळा शिक्षणाच्या क्षेत्रात चांगली कामगिरी करत आहे.

आव्हाने-

सुरुवातीला शैक्षणिक वर्ष 2024_25 मध्ये पासली शाळेत रुजू झाल्यावर कळाले की, मागील अनेक वर्षात शाळा ही शून्यशिक्षकी होती .त्यानंतर आम्ही दोन शिक्षण सेवक व मी शाळेत रुजू झाले. येथे प्रथमच खूप कालखंडानंतर एक महिला शिक्षिका म्हणून मी शाळेवर रुजू झाले. मुख्याध्यापक आणि शिक्षक दोन्ही भूमिका बजावत असताना शाळेची भौतिक सुविधा अद्ययावत करणे, शालेय अभिलेखे पूर्ण करणे , काही शालेय रेकॉर्ड्स नव्याने तयार करणे, शालेय स्वच्छता राखणे त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयींची रुजवणूक करणे, संस्कारांची पेरणी करणे व विद्यार्थ्यांना मूलभूत क्षमता प्राप्त करून देणे अशी अनेक आव्हानं समोर उभी होती..



विद्यार्थ्यांचा शारीरिक ,मानसिक व बौद्धिक विकास साधून त्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणे हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून अनेक उपक्रम व कृती कार्यक्रम राबविण्यात आले.

कृती कार्यक्रमांची अंमलबजावणी-

Health, Hygiene and Happiness 3H Program -

सुरुवातीला प्राधान्याने विद्यार्थ्यांच्या शारीरिक स्वास्थ्याकडे लक्ष दिले.

ऊवामुक्त पासली गाव अभियान-

शाळेमध्ये वर्ग अध्यापनाच्या वेळी निरीक्षणात आले की ,मुलींचे अभ्यासामध्ये लक्ष एकाग्र होत नाही. सतत डोक्यात हात जाऊन त्या डोके खाजवत असतात. शाळेतील 90% मुलींच्या डोक्यात उवा असल्याने अभ्यासावर परिणाम होऊन त्यांच्यात आत्मविश्वासाचा अभाव आढळून येत होता. स्वच्छतेचा अभाव, घरी होणारे आईचे दुर्लक्ष, स्वच्छता विषयक साधनांचा अभाव यामुळे गावातील जवळपास सर्व सर्व मुली ,त्यांच्या माता ऊवांमुळे ग्रस्त होत्या.

अशावेळी ऊवामुक्त पासली गाव करण्याचे मनाशी ठरवले.. मुलींना आठवड्यातून दोन वेळा केस धुणे व त्याबरोबर ऊवा नष्ट होण्यासाठी आयुर्वेदिक शाम्पू प्रत्येकीस पुरवले व त्यांचा सतत पाठपुरावा घेऊन विद्यार्थिनीशी जवळीक साधून त्यांच्याशी चर्चा करून त्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले मातांची सभा घेऊन त्यांना शारीरिक स्वच्छता व निरोगी आरोग्य याविषयी जागृत केले .

सलग दोन-तीन महिने follow up घेतल्याने संपूर्ण शाळेतील मुलींच्या डोक्यातील ऊवा नष्ट झाल्या. मुलींची अभ्यासातील एकाग्रता वाढली व त्या आत्मविश्वासपूर्ण व आनंदी बनल्या.





शालेय परसबाग निर्मिती -

आमच्या शाळेला मोकळी जागा भरपूर प्रमाणात लाभल्याने शाळेमध्ये शालेय पोषण आहारात उपयुक्त भाज्यांची लागवड करण्याचे ठरवले .वांगी ,मिरच्या टमाटे, घेवडा वाटाणा, कोबी ,मेथी व कोथिंबीर तसेच सर्व प्रकारच्या फळभाज्या आणि पालेभाज्यांची लागवड करण्यात आली व परसबाग तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः वाफे तयार करणे, रोपांची लागवड करणे, खत देणे तसेच दररोज झाडांची निगा राखणे हे काम विद्यार्थी आवडीने करू लागले. परसबाग निर्मितीतून पर्यावरण रक्षण संस्कृती रुजली .श्रमप्रतिष्ठेचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये आपोआपच रुजले. शालेय पोषण आहारात परसबागेतील भाज्यांचा वापर करण्यात येतो. विद्यार्थ्यांना शेतीविषयक तंत्र आत्मसात झाले .

शालेय परिसरात जांभूळ, आंबा ,चिंच, वड, पिंपळ, आवळा पेरू, सिताफळ, कदम इत्यादी मोठ्या वृक्षांची लागवड केली वृक्षांचे महत्त्व व झाडांची निगा कशी राखावी हे समजले .शिवाय निसर्गाबद्दल जवळीक निर्माण झाली .













चला रोखुया प्लास्टिकच्या भस्मासुराला -

एक नया सवेरा लायेंगे...
हम मिलकर पुरे भारत को
प्लास्टिक मुक्त बनायेंगे..

आज पर्यावरणासंबंधी समस्यांनी सर्व जग त्रस्त झालेले आहे. रस्त्यावर कचऱ्याचे ढिगच्या ढीग पडलेले दिसतात. कचऱ्याची विल्हेवाट ही एक मोठी समस्या आपल्यापुढे आहे. घरात रोज तयार होणाऱ्या कचऱ्याचे ओला कचरा व सुका कचरा असे विलगीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली.परंतु आपल्या घरात ,शाळेत, गावात रोज निर्माण होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचे काय?
जनजागरण हा कोणत्याही परिवर्तनाचा आधार असतो हे लक्षात घेऊन प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी प्लास्टिक कचरा व ई- कचरा यांचे पर्यावरणावरील दुष्परिणाम कमी करून पर्यावरण संवर्धन व संरक्षण यासाठी चला रोखूया प्लास्टिकच्या भस्मासुराला ...हा उपक्रम शाळा पातळीवर जनजागृती करून हाती घेतला..

4R तंत्राचा अवलंब-
Refuse- सिंगल युज (एकल वापर) प्लास्टिक वापरू नये यासाठी जागृती निर्माण केली.
Reduce- प्लास्टिक पिशवीचा कमीत कमी वापर करून भाजी, किराणा आणण्यासाठी कापडी पिशवीचाच वापर करण्याचे विद्यार्थी व पालकांच्या मनावर बिंबवले.
Reuse- प्लास्टिकच्या बाटल्यांचा वापर रोपे लावण्यासाठी करणे, वर्गात शाळेत खाऊ खाल्ल्यानंतरचे प्लास्टिक रॅपर्स चॉकलेटचे वेष्टने आणि इतर प्लास्टिक बाटल्या, पिशव्या शाळेतील व्हरांड्यात वेगळे पोते लावून जमा करण्यासाठी सुरुवात केली. इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत सर्व विद्यार्थी प्लास्टिक डस्टबिन मध्ये न टाकता स्वतंत्रपणे पोत्यात जमा करू लागले. सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.
Recycle- दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी शाळेत जमा झालेले प्लास्टिक व ई कचरा, तसेच गावातील नागरिक,पालक घरी देखील प्लास्टिक कचरा वेगळा जमा करून महिन्याच्या शेवटच्या रविवारी संकलन केंद्रामध्ये आणून देऊ लागले. असा जमा झालेला सर्व प्लॅस्टिक व ई कचरा पुनर्वापरासाठी देण्याचे व्यवस्था करण्यात आली.

माझा प्लॅस्टिकचा खाऊ-
शाळेमध्ये ***माझा प्लॅस्टिकचा खाऊ*** नावाने एक बॉक्स बनवण्यात आला. यामध्ये वापरून झालेले फेकून द्यावयाचे पेन, रिफील, टोकयंत्र, तुटलेली प्लास्टिकची पट्टी या बॉक्समध्ये जमा करण्याबाबत विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती करण्यात आली. कारण अशा छोट्या



छोट्या प्लास्टिकच्या वस्तू सहजपणे कचऱ्यात जात होत्या. प्लास्टिक वस्तूंचे असे कलेक्शन रिसायकलिंग साठी नंतर देण्यात येते.



लोकसहभागातून शाळेचा विकास -

दुर्गम भागातील आमच्या विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान व कौशल्य असणे ही एकविसाव्या शतकाची गरज ओळखून लोकसहभागातून संगणक, इंटरऍक्टिव्ह डिजिटल पॅनल मिळवले. यातून विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख झाली. विद्यार्थी संगणक हाताळू लागले. संगणकावर कोडींग शिकू लागले..

लोकसहभागातून विद्यार्थ्यांना अनेक प्रकारचे शैक्षणिक साहित्य, दप्तरे, रेनकोट्स, डबा पिण्याच्या पाण्यासाठी बाटली , बसण्यासाठी चटई ,योगा मॅट तसेच अवांतर वाचनाकरीता पुस्तके मिळवली व स्वतंत्र ग्रंथालय तयार केले. विद्यार्थी नियमित पुस्तके वाचू लागली. दर शनिवारी दप्तरमुक्त शाळेत विद्यार्थी ग्रंथालयातील पुस्तके वाचून त्यावर बोलू लागली. मुलींच्या सुरक्षिततेसाठी शाळेमध्ये एका संस्थेमार्फत सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेण्यात आले.


MITSUBISHI ELECTRIC
Changes for the Better
URMEE
Project Education
to Empower


vivo T3
P.KUMAR 06/23/2025 12:18



लोकमत

मस्ट READ

पासली येथे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

पानशेत : जिल्हा परिषद पुणे येथील शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून पासली (ता. वेल्हे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या प्रेरणेतून जिल्हा परिषद पुणे येथील शिक्षण विभागाने लोकसहभाग चळवळ वाढावी, गोरगरीब मुलांना मदत करावी, या हेतूने राजगड तालुक्यातील दुर्गम भागात वसलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पासली येथील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे व शिक्षण विभागातील इतर सर्व अधिकारी यांच्यामार्फत शालेय दप्तरे, पाण्याची बाटली, डबा, चित्रकला वही व रंग इत्यादी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका पल्लवी शिरोडे, शिक्षक अनिल सावर, प्रशांतकुमार मुंढे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

शालेय साहित्य वाटप करताना शिक्षण अधिकारी संजय नाईकडे, विद्यार्थी, शिक्षक.

Hello Pune Gramin
Page No. 2 Jun 30, 2025
Powered by: erelego.com

राज्य /राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग –

दुर्गम, डोंगराळ भागातील माझ्या विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव देऊन विद्यार्थ्यांना तालुका, जिल्हा,राज्य राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत उतरवण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून अनेक प्रकल्प शाळेमध्ये राबविण्यात आले.

CS-Hackathon या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागासाठी शाळेत CS Plugged and unplugged Activities चे आयोजन करण्यात आले. या ऍक्टिव्हिटीतून विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्तम सहभाग नोंदवला.

राज्यस्तरीय विज्ञान हॅकॅथॉन स्पर्धेत देखील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्याकरिता विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून प्रकल्प तयार करून घेण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील वीरगाथा 4.0, परीक्षा पे चर्चा, राष्ट्रीय पर्यावरण छात्र प्रतियोगिता NSPC अशा अनेक स्पर्धेत आमच्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन यश संपादन केले.





त्याचप्रमाणे अनेक पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांनी करून राज्यस्तरावरील महावाचन चळवळीत सहभाग घेतला.

अशा अनेक स्पर्धांच्या सहभागातून आमच्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी गावाबाहेरील जग पाहिले 21 व्या शतकातील कौशल्ये जसे की चिकित्सक विचार, सर्जनशीलता, सहकार्य, संप्रेषण कौशल्य, आत्मविश्वास व स्वावलंबन या कौशल्यांची रुजवणूक यातून झाली..

Cosmo kids - वेध खगोलाचा

पासली तालुका वेल्हे जिल्हा पुणे या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना आपल्या गावात निरभ्र, काळोखे स्वच्छ आकाश रोज रात्री दिसते. चमचम करणाऱ्या चांदण्या, लुकलुकणारे तारे आकाशात स्पष्टपणे दिसतात परंतु विद्यार्थ्यांना नेमके या तारयांची नावे काय ?आकाशात दिसणाऱ्या तारकापुंजकाची नावे काय? नक्षत्रे कोणती आहेत त्यांचे महत्त्व काय?रोज आकाशात दिसणाऱ्या तारयांचे स्थान का व कसे बदलते हे समजून सांगणे मला आवश्यक वाटले..


सध्या जगात तसेच भारतात सुरू असलेल्या अवकाश मोहिमांमुळे विद्यार्थ्यांच्या मनात अवकाशीय घटना, ग्रह तारे ,नक्षत्रे यांच्याबद्दल कुतूहल आहे तसेच त्यांच्या मनात असंख्य प्रश्न निर्माण होत आहेत.

अशावेळी विद्यार्थ्यांना खगोलशास्त्र विषयक संकल्पना जसे की नक्षत्रे, ग्रहणे कशी घडून येतात, दिवस-रात्र कसे घडून येतात, चंद्राच्या कला कशा पद्धतीने बदलतात, सूर्यमाला, पृथ्वीचे परिवलन ,परिभ्रमण व त्याचे होणारे परिणाम प्रत्यक्ष अध्ययन अनुभवाद्वारे Hands on Activity तून समजावल्यास संकल्पना अधिक स्पष्ट होऊ शकतात.

प्रत्यक्ष कृती केल्याने व अध्ययन अनुभव मिळाल्याने मिळालेले ज्ञान हे चिरकाल टिकते व यातूनच खगोलशास्त्र विषयक कठीण शब्द, संकल्पना स्पष्ट होऊन विद्यार्थ्यांच्या मनात खगोलशास्त्राविषयी आवड निर्माण होऊ शकते.

ग्रामीण दुर्गम भागात विद्यार्थी व पालक यांच्या मनात ग्रहणांबद्दल गैरसमजुती आहेत, अंधश्रद्धा आहेत अशावेळी प्रत्यक्ष प्रतिकृतींच्याद्वारे ग्रहणे कशी होतात याचे शास्त्रीय कारण समजावून दिल्यास अंधश्रद्धा, गैरसमज नष्ट होतील व एका पिढीतील गैरसमज आणि अंधश्रद्धा पुढील पिढीपर्यंत जाणार नाही..

विद्यार्थ्यांच्या मनातील असंख्य प्रश्नांची उत्तरे मिळावी व त्यांच्या जिज्ञासाचे ज्ञानात रूपांतर व्हावे याकरिता कॉस्मो किड्स प्रकल्प शाळेत राबविण्यात आला.



1. HANDS ON ACTIVITY ON SPACESHIP -






विद्यार्थी स्वतः रॉकेट निर्मितीच्या साह्याने करून प्रात्यक्षिकाचा अनुभव घेतात . रॉकेट चे कार्य व माहिती समजून घेतात.

2. PSLV SATELLITE MODEL MAKING -









3. CONSTELLATIONS -

विद्यार्थ्यांना नक्षत्र म्हणजे काय ? 27 नक्षत्रांची नावे माहिती देऊन ,नक्षत्र निर्मितीचे मॉडेल तयार करण्याचा विद्यार्थी स्वतः आनंद घेतात.











4. MOON OBSERVATION -

विद्यार्थी अवकाशातील चंद्राचे निरीक्षण करून स्वतः चंद्राचे फोटो घेऊन विविध चंद्राच्या कलांबाबत माहिती जाणून घेतात.



5 आकाश दर्शन STARGAZING ACTIVITY –





जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पासली तालुका वेल्हे येथील विद्यार्थ्यांसाठी आकाशदर्शन Star Gazing कार्यशाळा निसर्गशाळा या संस्थेच्या सहाय्याने पासली येथे आयोजित करण्यात आली . विद्यार्थ्यांनी टेलिस्कोपच्या माध्यमातून अवकाशातील *शुक्र, गुरु या ग्रहाचे उपग्रह तसेच शनि ग्रहाला असलेली कडा यांचे निरीक्षण केले.*

शुक्र हा ग्रह इतर ग्रहांपेक्षा अधिक तेजस्वी का दिसतो याची कारणमीमांसा देखील स्पष्ट केली.

कृतिका नक्षत्राचा अवकाशातील ताऱ्यांचा पुंजका टेलिस्कोप मधून मुलांनी बघितला. तसेच तेजोमेघ ही संकल्पना विद्यार्थ्यांनी समजून घेऊन अवकाशातील तेजोमेघाचे निरीक्षण केले.

त्याचप्रमाणे *अवकाशातील अश्विनी, भरणी कृतिका ,पुनर्वसू ,रोहिणी नक्षत्रे बघितले* व तारे एकमेकांशी विशिष्ट अंतरावर जोडले गेल्याने कशाप्रकारे नक्षत्रे तयार होतात याची माहिती घेतली .

विद्यार्थ्यांनी पासलीच्या निरभ्र काळोख्या रात्री या सर्व अवकाशातील घटनांचे निरीक्षण केले . अवकाशीय घटना समजून घेतल्या..



व्यवसायाभिमुखता/ व्यावसायिक कौशल्यांची ओळख -

पासली गावात बांबूची वने आहेत . बांबूचे उत्पादन परिसरात मोठ्या प्रमाणावर होत असते अशावेळी गावातील मुलींना /महिलांना गावातच रोजगार मिळावा यासाठी बांबूपासून शोभेच्या व इतर गृहपयोगी वस्तू जिथे तयार केल्या जातात अशा 'पाऊलवाट' संस्थेस भेट देऊन विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्यांची ओळख करून दिली.






पर्यावरण पूरक रसायनमुक्त जीवनशैलीचा अंगीकार

गावात एकही दुकान नसल्याने फरशी पुसणे, टॉयलेट धुणे ,झाडांना खत तसेच भांडी धुण्यासाठी उपयोगी म्हणून घरच्या घरी बायोएन्झाईम कसे बनवता येईल याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले .संत्री ,लिंबू, मोसंबी यांच्या साली, किंवा फुलांच्या पाकळ्या तसेच गुळ व पाणी या घरगुती साहित्यापासून पर्यावरणपूरक रसायनमुक्त Bioenzyme कसे तयार करावे हे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे शिकवण्यात आले व त्याचा उपयोग गावात होऊ लागला.



निपुण माता पालक मेळावे -

विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या मूलभूत क्षमता प्राप्त व्हाव्यात यासाठी मातांना यामध्ये सहभागी करून घेण्यासाठी निपुण माता पालक मिळावे शाळेत घेण्यात आले व लीडर माता तयार करून त्यांना पाठवण्यात आलेल्या व्हिडिओ नुसार माता गटागटात गावामध्ये विद्यार्थ्यांच्या कृती करून घेऊ लागल्या यामुळे विद्यार्थ्यांना मूलभूत क्षमता प्राप्त होण्याकरता मदत होऊ लागली.



आनंददायी शनिवार -

या अंतर्गत वृक्ष लागवड, परसबागेत श्रमप्रतिष्ठा, अवांतर वाचन करणे, कबड्डी ,खो-खो यासारखे खेळ तसेच गणित- इंग्रजी- विज्ञान साहित्य पेटीचा वापर अशा अनेक कृती शनिवारी विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात येतात.





निसर्ग शिबिराचे आयोजन -

आपल्याच परिसरातील निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी शाळेमार्फत निसर्ग शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पासली येथील विद्यार्थ्यांनी विविध धाडसी खेळ जसे की रॅपलिंग, रिव्हर क्रॉसिंग , Adventure स्पोर्ट्स यांचा अनुभव घेतला. शिवाय विद्यार्थ्यांनी ट्रेकिंगचा देखील मनसोक्त आनंद घेतला . सर्पमित्र श्री शरद कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना विविध सापांचे प्रकार दाखवून साप हा आपला मित्र आहे याबाबत जागृती केली. सापांविषयीची विविध प्रकारची माहिती दिली. तसेच आपल्या परिसरातील विविध वनस्पतीचे प्रकार व त्यांचे फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.



पासलीतील विद्यार्थ्यांनी अनुभवला निसर्ग शिबिराचा आनंद...

(प्रतिनिधी) पासली येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त निसर्गशाळा या पासली येथील संस्थेमार्फत राबवलेल्या निसर्ग शिबिराचा दोन दिवस आनंद घेतला. निसर्गशाळा येथे पासलीतील स्थानिक विद्यार्थी कँप मध्ये सहभागी झाले. पासली येथील ३५ विद्यार्थ्यांनी विविध धाडसी खेळांचा अनुभव घेतला. रॅपलिंग, रिव्हर क्रॉसिं, adventure स्पोर्ट्स यांचा अनुभव घेतला. शिवाय विद्यार्थ्यांनी ट्रेकिंगचा देखील मनसोक्त आनंद घेतला .


मुळशी येथील सर्पमित्र शरद कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना विविध सापांचे प्रकार दाखवून साप हा आपला मित्र आहे याबाबत जागृती केली. तसेच आपल्या परिसरातील विविध वनस्पतीचे प्रकार व त्यांचे फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.ढगाळ वातावरणामुळे दुर्बीणीतुन चंद्र पाहता आला नाही परंतु मुलांनी एक छान बाल चित्रपट पाहिला. मसाला दुध पिऊन सर्वांनी कोजागिरी पौर्णिमेचा मनसोक्त आनंद घेतला.

शाळेतील मुख्याध्यापक रामचंद्र मोर,शिक्षक प्रशांतकुमार मुंडे,अनिल सावर,आणि श्रीम. पल्लवी शिरोडे मॅडम देखील शिबिरात सहभागी झाले होते..माजी सरपंच अंकुश तुपे, उपसरपंच कैलास धुमाळ यांनी यासाठी विशेष सहकार्य केले.

निष्कर्ष/सकारात्मक परिणाम -

शाळेमध्ये राबवलेल्या विविध कृती कार्यक्रम व प्रकल्पांमुळे विद्यार्थ्यांमध्ये खूपच सकारात्मक परिणाम दिसून आले. सुरुवातीला विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव होता, मुले बोलायला घाबरायची ,कोणत्याही कृतीमध्ये पटकन पुढे येत नव्हती.. परंतु अनेक उपक्रम राबवल्यानंतर विद्यार्थी आत्मविश्वासपूर्ण बनले .त्याचप्रमाणे त्यांच्यातील उपजत कलागुणांना वाव मिळाला व शाळेमध्ये अध्ययनास पूरक वातावरण निर्मिती होऊन दुर्गम भागातील आमची जिल्हा परिषद शाळेची यशाच्या दिशेने वाटचाल होत आहे..

----------**----------



शाळा-समाज सहभाग एकत्रित फलश्रुती दर्शविणाऱ्या शालेय नेतृत्वाची यशोगाथा

शाळेचे नाव - पी. एम. श्री. आदर्श शाळा रा. जि.प. सेंट्रल स्कूल आमटेम.

शाळेचा पत्ता - मु. पो. आमटेम ता. पेण जि.रायगड.

शाळेचा ईमेल आयडी - amtem123@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्रीमती अनिता किशोर वावेकर

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9527445491

मुख्याध्यापक ईमेल आयडी - anita11vavekar@gmail.com

शिक्षण ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे विद्यार्थ्यांमध्ये केवळ विषय ज्ञान विकसित करणे किंवा देणे पुरेसे नाही तर मूलभूत क्षमतांचा विकास हा शालेय शिक्षणाचा महत्त्वाचा पाया म्हणजेच उद्देश आहे.

या क्षमता मध्ये विचारशक्ती संवाद कौशल्य आत्मविश्वास निर्णय क्षमता सर्जनशीलता सहकार्य अनुशासन मूल्याधिष्टित आचरण यांचा समावेश होतो.


भारतासारख्या विकसनशील देशात जिल्हा परिषद शाळा ग्रामीण आणि शहरी भागातील तळागाळातील बालकांना शिक्षण देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

या शाळांचे नेतृत्व करणारे मुख्याध्यापक हे शाळेतील शैक्षणिक वाटचालीचे मार्गदर्शक असतात. त्यांनी शाळेतील सहकाऱ्यांच्या साहाय्याने राबवलेले विविध उपक्रम धोरणात्मक योजना आणि नवकल्पना हे विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकासासाठी निर्णय ठरतात.

मुख्याध्यापकांचे नेतृत्व :

एका शैक्षणिक स्तंभासारखे मानावे लागेल कारण मुख्याध्यापक हे शाळेचे प्रमुख व्यवस्थापक आणि शैक्षणिक नेतृत्व करणारे घटक किंवा मार्गदर्शक असतात.

पी.एम. श्री आदर्श शाळा आमटेम मधील विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकासात त्यांच्या पुढाकाराने आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक वर्गाचा वर्गशिक्षक किंवा सहशिक्षक यांच्या पुढाकाराने खालील सकारात्मक परिणाम झालेले दिसून येतात.



शाळेचे ध्येय स्पष्ट करणे.

- शिक्षकांना प्रेरित करणे व मार्गदर्शन करणे.
- शाळेतील वातावरण सकारात्मक सृजनशील ठेवणे.
- संपूर्ण शाळा समाजाशी जोडणे.

विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतांचा परिचय :

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वयानुसार,इयत्तेनुसार खूप प्रकारच्या मूलभूत क्षमतांचा विकास होणे आवश्यक आहे असे दिसून येते.

उदाहरणार्थ : विचार क्षमता, माहितीचे विश्लेषण, निर्णय क्षमता, संवाद कौशल्य, सर्जनशील, नवीन कल्पना सुचवणे, व अमलात आणणे, सहकार्य वृत्ती, समूह कार्य, आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, सहिष्णुता, जबाबदारी, स्वतःचे विचार मांडणे, तांत्रिक साक्षरता, डिजिटल उपकरणांचा योग्य वापर करणे.

वरील शब्द विकासासाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारे व्यासपीठ मिळवून देण्याचे प्रयत्न केले विविध उपक्रम, तज्ञ मार्गदर्शन, परिपाठ, स्पर्धा परीक्षा, इत्यादी.

मुख्याध्यापकाचे प्रयत्न:

<u>विविध क्षेत्रात राबवलेले उपक्रम :</u>


- **अध्यापनातील नवकल्पना**
- **प्रोजेक्ट आधारित शिक्षण project based learning**

विद्यार्थी गटामध्ये विभागून त्यांना सामाजिक वैज्ञानिक किंवा स्थानिक प्रश्नांवर आधारित प्रकल्प देण्यात येते उदाहरणार्थ : जलसंधारण पर्यावरण स्थानिक परिसराचा इतिहास इत्यादी कथाकथन आणि अनुभव मूलक शिक्षण विद्यार्थ्यांना आपले अनुभव, स्वप्ने ,गोष्टी मांडण्याची संधी दिली जाते त्यामुळे संवाद कौशल्याने विचारशक्ती जागृत होते.

- **वाचन चळवळ :**

- **शाळेचे वातावरण किंवा विकास :**
  - **सुरक्षित मैत्रीपूर्ण शाळा**

मुलांना नेहमी सुरक्षित प्रोत्साहक आणि शाळा ही प्रेरणादायी वाटावी यासाठी मुख्याध्यापक कार्यरत असतात.



- **शाळा सुशोभीकरण आणि विद्यार्थी सहभाग :**

विद्यार्थ्यांनी भिंती रंगवणे, बाग काम करणे, फलक तयार करणे, हे सर्व त्यांच्या श्रमप्रतिष्ठा, सौंदर्यदृष्टी व जबाबदारीच्या भावनेला चालना देतात.

- **शिक्षकांच्या क्षमता विकासासाठी पुढाकार :**

शिक्षक कार्यशाळा व प्रशिक्षण

- नव्या अध्यापन तंत्रांचा वापर
- मूल्य आधारित शिक्षण
- मूल्यमापन कौशल्य

सहशिक्षक संवाद व समूह नियोजन

मुख्याध्यापकांनी शिक्षकांमध्ये सहकार्याची भावना निर्माण होण्यासाठी शिकवावयाचा अभ्यासक्रम नियोजन करून अंमलबजावणी केली.

विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व विकास उपक्रम

पुस्तक व्यवस्थापक, वर्ग निरीक्षक, स्वच्छता प्रमुख.

विद्यार्थी परिषद

विद्यार्थी प्रतिनिधी नेमून त्यांना शाळेतील निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेणे.

वक्तृत्व, निबंध, पोस्टर, कला किंवा कार्यानुभव, प्रश्नमंजुषा, वादविवाद स्पर्धा यामधून विद्यार्थ्यांना विचार मांडण्याचे व्यासपीठ मिळते.

- **तांत्रिक साधनांचा वापर**


डिजिटल शिक्षणाच्या सुविधा:

YouTube, Google, खान अकॅडमी, दीक्षा ॲप, ई लर्निंग मॉडेल्स यांचा वापर.

मुख्याध्यापकांनी शिक्षकांना, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले की तांत्रिक साधनांद्वारे शिकवण्याचा प्रभाव वाढवता येतो .

ऑडिओ व्हिज्युअल क्लासरूम:

पीपीटी, चित्रफीत, शैक्षणिक व्हिडिओ यांचा वापर करून संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते.



- **जीवन कौशल्यांचे प्रशिक्षण**

- आत्मविश्वास वाढवणारे उपक्रम.

-रंगभूमीवर बोलणे किंवा व्यासपीठ.

-संभाषण कौशल्य कार्यशाळा.

- **समस्या निराकरण कार्यशाळा**

-विद्यार्थ्यांनी कल्पनाशक्ती वापरून समस्यांचे निराकरण करणे.

शाळा समाज सहभाग एकत्रित प्रयत्नांची फलश्रुती

- मुख्याध्यापक स्वतः स्थानीक समाज व पालकांचा सहभाग वाढवण्यासाठी खालील उपक्रम राबवतात.
- पालक शिक्षक चर्चासत्रे.
- यामधून विद्यार्थी विकासासाठी पालकांची भूमिका स्पष्ट केली.
- स्थानिक किंवा बाहेरील संस्थांशी संबंध.
- ग्रामपंचायत एनजीओ सीएसआर संस्था यांच्यासोबत प्रकल्प राबवले.
- स्वयंसेवकाची मदत .
- सेवानिवृत्त शिक्षक, महाविद्यालयीन विद्यार्थी,, सामाजिक कार्यकर्ते, शाळेतील पास आउट बॅचेस यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित केले.


अडचणी आणि आव्हाने

मुख्याध्यापक व शिक्षक यांना विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत क्षमता वाढीचे उपक्रम राबविताना काही अडचणींचा सामना केला.

उदाहरणार्थ : संसाधनांची कमतरता, डिजिटल उपकरणे, अपुरे शिक्षक संख्या, एक शिक्षक अनेक विषय सांभाळत असणे, पालकांचा कमी सहभाग, प्रशासकीय कामाचा भार, शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीसाठी वेळ कमी, आदिवासी विद्यार्थी व शेतीकामाच्या काळात हजेरीत घट इत्यादी

मुख्याध्यापक नेतृत्व प्रशिक्षण, शैक्षणिक सामाजिक व्यवस्थापन, कौशल्य प्रशिक्षण यांचा वापर प्रभावीपणे करू शकतात मात्र अतिरिक्त कामांचा भार कमी झाल्यास क्षमता वाढीचे उपक्रम अधिक प्रभावी ठरतील.

विद्यार्थ्यांच्या गरजा अडचणी समजून योजना रचनात्मक प्रकारे केल्या जातील.



उपलब्ध साधनांचा जास्तीत जास्त वापर करणे म्हणजेच 100% मूलभूत क्षमता विकासासाठी समाज व पालक महत्त्वाचे आहेत ज्यांच्या सहयोगातून विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करता येतील.

शासन सुद्धा यासाठी विविध योजना अमलात आणत असते शाळा पातळीवर विचार विनिमय करून मुख्याध्यापक शिक्षक योजना राबवत असतात ज्याचा लाभ मुलांना होतो.

आमच्या आमटेम शाळेत या कामी सर्व वर्गातील शिक्षकांचे व कमिटीचे उत्कृष्ट सहकार्य मिळालेले आहे. सर्व शिक्षक आपल्या वर्गातील सर्व मुलांकडे वैयक्तिक लक्ष देऊन नवीन तंत्रे ,क्लुप्त्या वापरून विद्यार्थी सर्जनशील आत्मविश्वासू कसे होतील, याकडे लक्ष देत असतात.


त्यांचे काम उत्कृष्टच आहे. प्रत्येक जण समाज सहकार्य घेऊन अध्यापनात सुधारणा आणि विद्यार्थी केंद्रित शिक्षण, विविध प्रशिक्षणाचा लाभ मुलांना देतो . जीवन कौशल्य, नेतृत्व, स्काऊट गाईड सारखे उपक्रम मूल्य संवर्धनासाठी विशेष उपक्रम राबवळे जातात तसेच क्षेत्रीय भेटी, पोस्ट ऑफिस, बँक, बाजार, परिसर पेठ, ऑनलाईन माहिती, इत्यादीचा उपयोग होतो.

विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकासासाठी सतत निरीक्षण ,मूल्यांकन ,सुधारणा आवश्यक असते. शाळांमध्ये विद्यार्थी केंद्रित डिजिटल साधनांचा अधिक वापर, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत मूलभूत साक्षरता व संख्या ज्ञान व FLN वर अधिकभर दिला जातो .

एकंदरीत विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतांचा विकास म्हणजे शिक्षणाचा खरा उद्देश साध्य करणे. मुख्याध्यापकाच्या दूरदृष्टी नेतृत्वाच्या कृतीतून हा विकास साध्य होण्यास मदत झाली आहे.

मला वाटते, शिक्षणाच्या गुणवत्तेचा पाया घट्ट करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना एक जबाबदार नागरिक बनवण्यासाठी असे प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे.

----------**----------



भटक्या मुलांना शालेय प्रवाहात आणण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - रायगड जिल्हा परिषद शाळा वरवणे

शाळेचा पत्ता - वरवणे ता.पेण, जि. - रायगड

मुख्याध्यापक नाव - श्रीम. ज्योती दिपक अवघडे

मुख्याध्यापक मोबाइल क्रमांक - ८७९३१८९१३२ , ९४०५८६२३४९

मुख्याध्यापक ईमेल आयडी - jyoti.awaghade77@gmail.com


आदिवासी बहुल भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध कृती कार्यक्रम यशस्वितेसाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न -

रा. जि. प. शाळा वरवणे पेण शहरापासून वीस कि. मि. दूर उंच डोंगर रांगेत वसलेली सुंदर शाळा. आजूबाजूच्या संपूर्ण परिसरात कातकरी , ठाकर समाजाची वास्तव्य करून राहिलेली ही जमात या परिसरात आढळून येते. शिक्षणापासून वंचित. पाड्यातील एखाद दूसरा व्यक्ति शिकलेला . कमी लोकवस्ती. त्याच पाड्यातील काही मंडळी कर्नाटकात कोळश्याच्या खाणीवर स्थलांतरित झालेली फक्त मजुरीसाठी. विंचवाच बिऱ्हाड पाठीवर तशीच मुलबाळ पण त्यांच्या सोबत .

या मुलांसाठी काहीतरी वेगळं करण्याची गरज होती. म्हणून मे महिन्याच्या शेवटी ही लोकं आल्यानंतर त्यांना मी आणि हेमांगी मॅडम जावून भेटलो .गावातील प्रतिष्ठित मंडळी पण सोबत होती. त्यांना मुलांच शिक्षण किती महत्वाच आहे हे समजावून सांगितल. पालकांनी पण शब्द दिला. बाई रोज मुलांना शाळेत पाठवू. आणि मग सुरू झाली शिक्षणाची सुरुवात.

बालस्नेही ग्रुप निर्मिती -

पेण शहरातील काही तरुण जे समाज सेवेत सक्रिय आहेत. वीस ते पंचवीस वयाची ही मूले, पण शाळाबाह्य व गरीब आणि गरजू मुलांसाठी काम करतात .मी त्यांचा एक व्हाटसअप ग्रुप तयार केला . या ग्रुप मधील इला गोरे तर पी एच डी झालेली आहे. प्रत्येक मूल शिकलं पाहिजे आणि टिकलं पाहिजे या साठी काम ती करते, जगदीश डंगर वस्ती वाड्यांवर जावून मुलांना मोफत गाणी ,गोष्टी शिकवतो. मुलांना लागणारे शैक्षणिक साहित्य इतरांकडून गोळा करून मुलांपर्यंत पोहचवतो आणि अजून या दोघांचे मित्र असे मिळून आम्ही ग्रुप तयार केला.या सगळ्यांना मी सर्व परिस्थितीची कल्पना दिली. आणि मग नियोजन करण्यात आले .लॅपटॉपवर चित्र, म्हणी ,म्हणीचा अर्थ,असे छोटे छोटे व्हिडिओ तयार केले. छोट्या छोट्या गोष्टी गाणी ,चित्रपट अशा गोष्टीं कशा सादर करायच्या या संदर्भात प्रात्यक्षिक व नियोजन ग्रुप वर करण्यात आले . दुसऱ्या दिवसापासून कृतीची अंमलबजावणी सुरू झाली. इला.मी आणि जगदीश वस्तीवर पोहचलो . वरवणे गावापासून तीन किलोमीटर आत जंगलातून मजल दरमजल करत पोहचलो . आम्हाला पाहून मुलांना आणि त्यांच्या पालकांना खूप आनंद



झाला.बाई आमच्या घरी आल्या याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. अंगणातच आम्ही बसलो.त्यांच्यातील एक असल्यासारख त्यांना वाटल. लाजूनच-" बाई चटई घे" काही पालक पुटपुटले. पण आम्ही असु देत अस म्हणत पहिले सगळ्या मुलांना गोळा केले. काही जण लांबूनच पहात होते आणि लाजत होते. आम्ही पण मग मुलांना जास्त आग्रह केला नाही. इलाने छान शक्कल लढवली. इला उभी राहिली आणि मुलांना म्हणाली चला आपण खेळू या. आणि मग ती मुलांचे खेळ घेवू लागली. तशी हळूहळू सगळी मुलं आमच्या आवती भोवती जमा झाली. काही लाजून बाजूला उभं राहून पाहू लागली. थोड्या वेळाने तीही खेळात सामील झाली. लाजत मुरडत ती सगळी खेळामध्ये सहभागी झाली. वर्तुळात गोल गोल फिरत पाच,तीन,दोन चा ग्रुप तयार करणे खेळ मूल खेळू लागली . पुढे पुढे त्यांना सूचना दिली की त्या प्रमाणे करू लागली. इडली,डोसा ,चहा असा दूसरा खेळ सुरू झाला. खेळ कसं खेळायचा याची सूचना आणि कृती मुलांना समजावून सांगितली. तस आवडीने मुलं खेळू लागली. मग हळूच त्यांच शिक्षण चालू झाल. लॅपटॉप वर विविध प्राणी,पक्षी,वस्तूंचे चित्र दाखवून त्यांची ओळख करून घेण्यात आली. काही अक्षरांची ओळख झाली. मुलं आवडीनं सारं करायला लागली. दुसऱ्या दिवसासाठी त्यांना अभ्यास दिला. त्यांना कोणती गाणी आणि गोष्टी येतात याचाच अभ्यास होता. रात्री पालकांनी एक एक गोष्ट मुलांना सांगावी असे सांगण्यात आले. त्यांच्या आवडीचा विषय असल्यामुळे त्यांनी लगेचच होकार दिला आणि आम्ही त्यांचा निरोप घेवून घरी परतलो.दुसऱ्या दिवशी पण आम्ही वाडीवर पोहचलो. मूले वाटच बघत होती. आम्ही पोहचल्या बरोबर त्यांनी छान चटई अंथरली आणि" बाई बस"म्हणत आमच्या अवती भोवती रेंगाळू लागली. "बाई आज काय शिकवशील? अस हळूच लाजून बोलली . मग दोघ चौघ जण बोलले" बाई खेलू ये चल " अस बोलत ओढतच आम्हाला नेल.पण आधी रात्री कोणती गोष्ट आईने सांगितली अस विचारल्यानंतर मुलं त्यांच्या भाषेत गोष्ट सांगू लागली. खूप हसलो,मुलं पण खूप हसली. त्या नंतर .जगदीशने मुलांना प्रात्यक्षिकासह खेळातून शरीराचे अवयव शिकवले. मुलं खेळू लागली खेळत ,गाणी गात शेवटी लॅपटॉपच्या मदतीने चित्रातून म्हणी शिकवल्या . काही शब्द,वाक्य यांची ओळख शिकविली .छोटे छोटे व्हिडिओ तयार केले व्हिडिओ रंजक होण्यासाठी ट्विन क्राफ्ट या app चा छान उपयोग झाला. चल चित्र आणि कार्टून मुळे मुलांना हे व्हिडिओ खूप आवडू लागले.चित्र वाचन करवून घेतले मग त्यांना काय काय येतं याच प्रात्यक्षिक झाल. मुलांनी चाकाची गाडी कशी हाकलतात ते दाखवल. एकमेकांच्या संगतीने त्यांच्या भाषेची गाणी नाचून गाऊन दाखवली. अशा प्रकारे रोजच आम्ही वस्तीवर जावून त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण केली.शाळा सुरू झाली आणि मुलं शाळेत आली. शिकू लागली. आमची छान ओळख झाली असल्यामुळे मुलांना भीती न वाटता आनंदाने ती शाळेत येवू लागली. आम्ही इला आणि तिचे मित्र मैत्रीण यांना शाळेत बोलावून काही कृती, अभ्यास घेवू लागलो. मुलांना पण खूप आनंद वाटू लागला.






(शाळेपासून 3 कि. मी. अंतरावरून रानातून मुले शाळेत येताना)





(लॅपटॉप च्या मदतीने गाणी गोष्टी व मुलांचा अभ्यास घेताना इला गोरे व शिक्षिका ज्योती अवघडे)





शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी केलेले उपक्रम -

https://youtu.be/qnKdabWz3fk?si=Tv20bRAIFtimD0i1

https://youtu.be/NM8SGGiSO8o?si=WDWzySwMz-DeRNtV

https://youtu.be/Cl6X9xvPB0A?si=Je99eyVmUjIk390U

भटक्या मुलांना पण शाळेत आणले -

एकदा पेण मधून बसने शाळेत जाण्यापूर्वी बस स्थानकामध्ये बसली असताना काही आठ ,नऊ वर्षाची तीन चार मुलं माझ्या जवळ येवून माझ्या हाताला हात लावून हात पसरू लागली. मी म्हटल काय रे शाळेत जात नाही का ?तर म्हणाली नाही जात.काहिंनी तर बोलायच टाळल . तुझ्याकडचे पैसे नकोत अस काही मुलांच्या मनात आल असावं कदाचित ,माझ्याकडे बघत त्या सगळ्या मुलांनी रस्ता धरला. मी पटकन त्यांना थांबवले आणि त्यांना माझ्या जवळचा खाऊ दिला. तशी ती खुश झाली. मी काही प्रश्न विचारायला सुरुवात केली.. मग शाळेत जाल का? मी घेवून जाईन तुम्हाला अजून कोणी आहे का ? कुठे रहाता ?आई बाबा कुठे आहेत?अशा प्रश्नांची सरबत्ती केली.मुलांनी सांगितल, रायगड बाजार समोर फुटपाथ वर ये बाई आई ,बाबांना भेट.शाळेतून आल्यावर संध्याकाळी सात वाजता रायगड बाजाराकडे गेले. रायगड बाजाराच्या अगदी विरुद्ध बाजूला काही तंबू उभारलेले दिसले. बाजूनेच भले मोठे गटार वहात होते. सगळी कडे दुर्गंध पसरला होता. सकाळी भेटलेली मूल मला लांबूनच बघत होती तशी मीच त्यांना पाहून पुढे सरसावले. मुलांनी घरातील मंडळीना कदाचित सकाळचा प्रसंग सांगितला असावा. मीच बोलायला सुरुवात केली . बसायला कुठेच जागा नव्हती. मुलांचे आई बाबाच काखोटीला लहान मूले घेवून उभी होती . मी- मुलांना शाळेत का नाही घालत? ती अशी रस्त्यावर भटकत असतात पैसे मागत फिरतात त्यापेक्षा शाळेत बसतील शिकतील, शिकून मोठी झाली तर तुम्हाला चांगले दिवस येतील.परंतु "शालेत नको" म्हणत त्यांनी बोलण टाळल. पण मी पण जिद्दी होते. मी काही त्यांची पाठ सोडली नाही यांना शाळेत दाखल करायचच अस ठरवून मी रोज संध्याकाळी त्यांच्या वस्तीत जाऊ लागले. त्यांच्याशी मैत्री केली. चाइल्ड हेल्प लाइन ची मदत घेतली . चाइल्ड हेल्प लाइनची तिघे जण आले. त्यांनी पालकांची समजूत घातली. थोडी धमकी पण दिली. तेव्हा कुठे ते तयार झाले. अंजलीचे बाबा म्हणाले -" बाय आमाला बी वाटतंय पोराणी शालेत जावू दे शिकू दे पन आमचा कोन बी नय शिकला. आमाला काय बी समजत नय ". तूज्या शालेत घेवून जाशील तर आमी पाठवू . नय तर नको . बाय भीती वाटती पोरा चोरून नहेटात ". मी त्यांना खूप समजावून सांगितले पण त्यांनी एकच हट्ट धरला तुझ्याच शाळेत घेऊन जा . चाइल्ड हेल्प लाइन च्या दादा आणि ताईंना पण त्यांनी हेच सांगितल की बाईंच्या शाळेत आमची मूल जातील नाहीतर नको. त्यांच्या घरापासून शाळेच अंतर पंधरा कि. मि होते. कस घेवून जायच या सगळ्यांना ?असा प्रश्न पडला मी त्यांना एक दिवस नगरपालिकेच्या शाळेत पण घेवून गेले. पण ती तिथे बसलीच नाही. शेवटी त्यांना घेवून मी त्यांच्या घरी गेले आणि सांगितल थोडे दिवस थांबा मी यांना माझ्या शाळेत घेवून जाईन. खूप

मोठी जबाबदारी होती या मुलांना रोज माझ्या शाळेत नेण जिकरीच होत. शेवटी त्यांना माझ्या शाळेत दाखल करायच ठरवल. आणि जगदीश डंगर आणि त्याचे मित्र यांच्याशी बोलून घेवून त्यांना पास काढून द्यायच ठरल. एक दिवस त्यांचे फोटो मी काढले. आणि बस स्थानकात त्यांना नेऊन त्यांचे पास काढले . मग जगदीश ला सांगितले. त्याने त्याच्या मित्राना सांगून दहा मुलांचे पास काढले. पहिल्या दिवशी सगळी मूले आंघोळ न करताच आली . बस मधील सगळी लोक त्यांच्या आणि माझ्या तोंडाकडे बघू लागली . कारण बऱ्याच लोकानी ही मूल पाहिली होती. रस्त्यावर लोकाना त्रास द्यायची त्यांच्याकडे पैसे मागायची. बस मधला एक व्यक्ति शेवटी न राहवून बोलला. बाई चांगल काम करताय ,या मुलांना शिकू द्या खूप त्रास देत होते. आता शहाणे होतील. आम्ही शाळेत पोहचलो. खूप गोंधळ गडबड ही मूल बस मध्ये करत होती . कंडक्टर् पण त्यांच्यावर ओरडू लागला पण मग मीच समजावून सांगितले. तेव्हा तो समजला आणि चांगल काम करता म्हणत आपल्या जागेवर गेला. शेवटी आम्ही शाळेत पोहचलो. शाळेत आल्यावर मुलांना हातपाय तोंड धुवायला सांगितले मुलांनी तसे केले. कंगवा दिला एकेकाने केस विंचरले मग थोडी पावडर टिकल्या लावल्या मुलं छान दिसू लागली त्यांना शाळेतील कपडे दिले. मग सगळे बेंच वर बसली . सगळीकडे टकमक बघू लागली . इला आणि जगदीशला थोडा वेळ काढून बोलावून घेतले मग छान गाणी ,गोष्टी, चित्र काढणे, चित्र ओळखणे अशा कृती करून घेतल्या मुलं शाळेत रमू लागली.वयाप्रमाणे त्यांना मी वर्ग दिले. पण सगळे एकत्रच बसू लागली. इतर मुलांमध्ये खेळू,शिकू लागली. रोजच त्यांना घेण्यासाठी त्यांच्या वस्तीवर मी जाऊ लागले. आणि मुलं ही छान नटून माझ्यासोबत येवू लागली.बस स्थानकावर सगळे टकमक बघायचे .बाई पुढे आणि मूले मागे किती छान चित्र होत ते. अनोळखी माणसं पण माझ्या जवळ यायची आणि बोलायचे बाई छान काम केलस बघ इकडे तिकडे भीक मागण्यापेक्षा ती मूल शाळेत येताहेत . मुलं नियमित शाळेत येवू लागली छान शिकू लागली .वाचू ,लिहू लागली. खेळू लागली. काही दिवसांनी त्यांची पैसे मागण्याची सवय गेली. इतर मुलांप्रमाणे ती वागू लागली. गावातील लोकांना पण खूप छान वाटले. बाई एवढ्या लांबून मुलं आणता आपल्या शाळेचा पट वाढला,पट वाढला म्हणून गावकरी खुश. त्यांना आमचा अभिमान वाटू लागला.

(जगदीश डंगरने मित्रांच्या मदतीने मुलांना बस पास काढून देऊन भटक्या मुलांचे शिक्षण सोपे केले)









महिलांसाठी एक दिवसीय कराटे शिकणी विविध शाळांमध्ये हजारो प्रतिकार करण्यासाठी स्वतःचे व वस्तीगृहात कराटे प्रशिक्षणवेळी घाबरत देण्यात आले.

सचिन सांडुखे

गोंदा: सिग्नलला गाडी थांबली की गाडीवर काच मारणारी... बस स्टॉप, स्टेशन रस्ते, गर्दीचे चौकांमधी वेगवेगळ्या नजरेने वैशाखासाठी हात पसरणारी...कुटुंबातली देवी, देवीचे चित्र ताटात घेऊन त्याच्या जिवावर पैसे गोळा करणारी... कधी चहाच्या टपऱ्या, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स याठिकाणी भाड़ी विसळणारी... कचरा-कोंडाळ, मोठ्या घरांत किंवा अन्य ठिकाणेदेखील जाणी व्यसने करणारी ... अशा एक ना अनेक रुपात बकाल अवस्थेत उद्याच्या देशाचे आणि पुन्हा नवरा घेवून फिरणारी अनेक बालकं आपल्यास दिसतात. कधी सगळ्यांचे आपण खिशात हात घालतो आणि एक-दोन रुपयांचं नाणं या मुलांच्या हातावर देतोही. कधी इतक्याच सगळ्यांचं त्यांना रागानं दूरही करतो. पण त्या चहाकांकडे तुच्छतेने आपण कधी करीत पाहिलं जात. त्यांच्या पुनर्वसनासाठी, त्यांच्या मदतीसाठी, त्यांना हक्काचा निवारा देण्यासाठी, त्यांचं समजून घेण्यासाठी, त्यांचं बालपण वाचविण्यासाठी आणि जपण्यासाठी धडपणारी संस्था म्हणजे चाईल्ड लाईन अर्थात १०९८. चाईल्ड लाईन ह केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाचा उपक्रम आहे. काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या शून्य ते १९ वयोगटातील मुल-मुलींकरिता २४ तास कार्यरत असणारी मोफत सेवा आहे. व्यसनमुक्ती, बालमजुरी, बालविवाह, बालभिक्षेकरी, लैंगिक शोषण अशा अनेक क्षेत्रामध्ये चाईल्ड लाईन शून्य ते १८ वर्षाखालील मुलां-मुलींच्या मदतीसाठी कार्य करते. पेब्सबौल रायगड बाजारच्या समोर त्याचप्रमाणे भाजी मार्केट मध्ये अशी अनेक मुलं वय ७ ते १२ वर्ष असणारी काही शाळाबाह्य मुलं भीक मागताना तर काही गजरे विकताना बालरक्षक शिक्षीका ज्योती अवघडे याना आढळून आली. ताबडतोब त्यांनी पालकांचे भेट घेऊन काही मुलं शाळेत दाखल केली परंतु काही पालक मुलांना भीक मागण्यासाठी मुद्दामून शाळेपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला होता परंतु बालरक्षक ज्योती अवघडे यांनी वरिष्ठांशी चर्चा करून १०९८ या चाईल्ड हेल्प लाईनला कॉल करून या मुलांना शाळेत दाखल करण्यासाठी प्रयत्न केले. चाईल्ड हेल्पलाईन ची टीम भेट घेऊन काही मुलं शाळेत दाखल झाली आहे त्याचप्रमाणे मुलांना भीक मागण्यास अथवा गजरे विकणे बनविणे अशी काम पालकांनी करायला लावल्यास योग्य ती कारवाई करणार आहे समज पालकांना देण्यात आली. सध्यस्थीत काही मुलं बालरक्षक ज्योती अवघडे यांनी या जी प शाळा अरणे खेप दाखल केली आहेत एकूण १० मुलं दाखल केली आहेत तर एक मुलगी १०९८ च्या मदतीने लवकरच नजीकच्या शाळेत दाखल होणार आहे

१ सुवील नाना पवार
२ दीपाली संजय पवार
३ लक्ष्मी अशोक पवार
४ अंजली नाना पवार
५ लक्ष्मी संजय पवार
६ मंगेश अशोक पवार
७ सोनी संजय पवार
८ अनिता मुरलीधर पवार
९ वैशाली संजय काळे
१० पूजा राजेश काळे

अशी ही मुलं आज शाळेचा आनंद घेत असून शिक्षण घेऊन समाजाच्या व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील होत आहे.

महिलांकडून पैसे घेतो म्हणून ठेकेदारावर

(चाइल्ड हेल्पलाइन कडून मुलांना धान्याचे वाटप)



(शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी चाइल्ड हेल्पलाइन ची मदत)



डिजिटल शाळा -

मुलांना तंत्रज्ञानाची ओळख व्हावी . उत्तम शिक्षण मिळाव म्हणून शाळा डिजिटल करण्याचे ठरवले. मुलांसाठी केलेल्या कामाची पोहच मिळाली ती लोकसत्ता मध्ये झळकलेल्या यशोगाथेमुळे कोविडचा धडा आणि त्यावरील प्रश्न या मेधा कुलकर्णी यांनी लिहिलेल्या यशोगाथेमुळे अनेक दाते पुढे आले आणि त्यांनी मदत ही केली. ,scert पुणे यांनी पण आमच्या कामाची दखल घेतली. टीचर टॉक सिरिज मध्ये उपक्रमशील शिक्षकांचा शैक्षणिक प्रवास ही आमच्या शाळेची यशोगाथा यू -ट्यूबवर चॅनल वर लाईव्ह दाखवली गेली . त्यामुळे आमचा आत्मविश्वास अजून वाढला. या मुलांसाठी खूप काम अजून करायच अस वाटू लागल. प्रवीण मसाले पुणे यांनी ही यशोगाथा लोकसत्ताला वाचली आणि मला फोन केला की तुमच्या मुलांसाठी आम्ही काय करू शकतो? तेव्हा आम्ही प्रोजेक्टर व ई लर्निंग साहित्य द्या असे

सांगितले..लगेचच आमच्या शाळेला त्यांनी प्रोजेक्टर भेट म्हणून दिले. विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी शंभर पुस्तकं भेट दिली . अशी एकूण एक लाखाची मदत आम्हाला मिळाली. इनरव्हील क्लब कडून 45 इंच ई -लर्निंग किट सह टी . व्हि. भेट देण्यात आला . शाळेला वीज सुविधा व्हावी म्हणून सौर ऊर्जा किट वरवणे ग्रामपंचायतीने भेट म्हणून दिले. स्पीकर ,माइक पण गावातील प्रतिष्ठित मानकर दादा यांनी दिले.नवीन शौचालय लोकवर्गणीतून बांधून मिळाला. शाळा बांधकाम करून मिळाले . गावातील बाजार समिति सभापति मानकर दादा यांनी शाळेला हँड वॉश स्टेशन बांधून दिले. अनेक दाते समोर आले. शाळेला छान रंगवून दिले. अशा पद्धतीने शाळा डिजिटल झाली छान कार्यक्रम घेण्यात आला .उद्घाटन गटशिक्षणाधीकारी पेण यांच्या हस्ते झाले . लोकांची वाहवा मिळू लागली. केलेल्या कामाच चीज झाल. विशेष म्हणजे मुलं आवडीने शिकू लागली. शाळेत येवू लागली.





(प्रवीण मसाले यांकडून शाळेला प्रॉजेक्टर भेट)



(डिजिटल शाळेचे उद्घाटन)

- **शैक्षणिक साहित्य वाटप-**

दरवर्षी आमच्या मुलांना कोणी ना कोणी दाते मिळतात जे त्यांना शैक्षणिक साहित्य देतात. गणवेश देतात. शाळेत आता सर्व भौतिक सुविधा आम्ही लोकवर्गणीतून उपलब्ध करून घेतल्या आहेत. मुलांना खाऊ वाटप ,कधीतरी गोडाधोडाचे जेवण कोणी दाते देवू लागले. चाइल्ड हेल्प लाइन संस्थेतर्फे स्वप्नाली थळेव अमोल जाधव ,अंकेश बिरजे यांच्या मार्फत मुलांना मोफत शिधा वाटप कार्यक्रम ही घेण्यात आला. त्यामुळे पालकही खुश होवू लागले. शुद्ध पाण्याची सुविधा मुलांना मिळाली आहे. छान वाचनालय तयार करण्यात आले आहे.छान छान गोष्टींची पुस्तकं ,चित्रमय गोष्टी,नेत्यांची चरित्र मूल वाचू लागली.



(मुलांना शैक्षणिक साहित्य, गणवेश वाटप तसेच स्नेह भोजन विमल जैन यांकडून स्नेह भेट)

विविध उपक्रम -

निसर्गाच्या सानिध्यात मुलांना आठवड्यातून एकदा आम्ही घेवून जातो. दप्तराविना शाळा या उपक्रमाअंतर्गत अवांतर वाचन अंतर्गत ढिगारा वाचन म्हणजे सगळी पुस्तकं एकत्र करून त्यांचा ढीग करायचा आणि मग मुलांना कोणतं हवं ते पुस्तक शोधून मुलांनी घेवून वाचायचं . मुलाचं आवडत पुस्तक असल्यामुळे ते मन लावून वाचतात व वाचनाची आवड मुलांमध्ये निर्माण होते. नेत्यांची चरित्र,विविध गोष्टीची पुस्तक मूलं वाचतात. ,प्रयोग कोपरा करून त्या ठिकाणी प्रयोगाचे साहित्य मुलं हाताळतात प्रयोग करतात त्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोण मुलांमध्ये निर्माण होवू लागला आहे. ,चित्रात्मक गोष्टी,अकबर बिरबलाच्या

गोष्टी,इसापनीती अशा प्रकारे अवांतर वाचन मुलांकडून करून घेतले जाते. त्यासाठी वाचन कट्टा तयार करण्यात आला आहे.भिंतीवर रंग देवून प्रत्येक गोलात मुलांची नावं लिहील्यामुळे मुलं आवडीने वाचन करतात. चटई अंथरून त्या वर बसून मित्र मैत्रिणींच्या मदतीने वाचनालयातील पुस्तक घेवून आवडीने वाचू लागली आहेत. परिसरातील विविध व्यावसायीकांना भेटी देवून मुलाखती घेणे.त्यांच्या कामाबद्दल जाणून घेणे , गणपती कारखान्याना भेट देवून गणपती कसे तयार करतात, काय काय मेहनत घ्यावी लागते, कशी कला साकारली जाते याचा अभ्यास मूले करतात. स्टोन क्रशरला भेट,निसर्गातील पाने ,फुले,वनस्पती यांची ओळख,रानातील भाज्याची ओळख मुलांकडूनच आम्ही करून घेतली आहे. , विटभट्टी भेट त्यांच्या कामाचा आढावा व माहिती करून घेणे. विविध व्यायाम प्रकारांचा सराव घेणे..विविध मातीच्या वस्तु तयार करून घेणे,त्यातून कार्यानुभव शिकता येते. टाकावू वस्तूपासून टिकावू वस्तु तयार करणे. यामध्ये नारळीच्या झावळ्यांपासून झाडू तयार करून आम्ही ती गावातील लोकांना विकली आहेत व त्या पासून वर्गणी गोळा करून त्याचा वापर शाळेसाठी केला आहे. मुलं या कृती खूप आवडीने करतात .,दिवाळीत पणत्या रंगवून दिव्यंग शाळेतील मुलांना आर्थिक मदत करून दिली आहे आणि हे उपक्रम जेवणाच्या सुट्टीत किंवा शनिवारी ,रविवारी जादा तास घेवून केले आहेत. निसर्ग भेटीतून काजूच्या बिया गोळा करणे. व त्यांची पोषण आहारात भाजी करणे ,काजू,करवंद ,आंबे गोळा करून ते सगळ्या मुलांना वाटणे. त्यामूळे पोषण आहारात ही विविधता येते आणि आमची मूल हे आवडीने करतात. अशा प्रकारे उपक्रम राबविल्यामुळे मुलांना शाळेबद्दल प्रेम,आपुलकी वाटू लागून मूले शाळेत येवू लागली, टिकू लागली. शिकू लागली. केवळ शाळेतील चार भिंती पुरती शाळा मर्यादित न करता मुलांना जी आवड आहे ते आम्ही करून देतो. या कामी शाळेच्या उपशिक्षिका हेमांगी मॅडम यांचे सहकार्य उत्तम असल्यामुळे आम्ही दोघी खूप आवडीने आणि तळमळीने काम करत आहोत..

आत्ता डांगलवाडीतील मुलं रोज शाळेत येताना मुलांच्या वाडीतील काही मोठी माणस त्यांना सोबत घेवून येतात. शाळा सुटल्यावर आम्ही दोघी त्यांना घेवून जातो .रोज तीन कि. मि. आम्ही दोघी पण चालतो आणि त्यांना घरपोच नेऊन सोडतो. चालत असताना मुलांकडूनच खूप वनस्पतीची नावं समजली .नवीन नवीन वनस्पति पहायला मिळाल्या. रानभाज्या फळे,माहिती झाली आणि पेण मधील मूल पण जाताना सोबत असतात रोजचा त्यांचा प्रवास सुरू आहे. वयानुरूप मूले दाखल केल्यामुळे काही मूले इतरांपेक्षा मोठी होती. त्यांना चांगला स्पर्श, वाईट स्पर्शाची जाणीव होत असल्या कारणाने इनरव्हील क्लब ऑफ पेणच्या महिलानी गुड टच ब्याड टच हा उपक्रम शाळेत घेतला.प्रोजेक्टर च्या सहाय्याने पडद्यावर या संदर्भातली फिल्म दाखवण्यात आली. त्यामुळे मुलांमध्ये जाणीव जागृती निर्माण झाली. मुलांना चांगल्या वाइटाची जाणीव होऊन योग्य ती जाण मुलांमध्ये आली आहे.शाळेमध्ये शासनाचे सगळे उपक्रम राबविले जातात.निबंध स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,रांगोळी स्पर्धा,पानफुलांची रांगोळी ,शब्दांच्या भेंड्या ,गाण्याच्या भेंड्या अशा कृती मुलं करतात. धावण्याच्या स्पर्धेत सहभागी होतात. मनोरंजनात्मक खेळात सहभागी होतात. संगीत खुर्ची खेळतात. मुलांनी रिकाम्या चिकटपट्टीला असणारे मोठे पुठयाचे गोल बंडल ला मोठ्या चिकटपट्ट्या लावून छान ढोल तयार केले

बांबूच्या काड्या घेऊन लयबद्ध वाजवू लागले. या कला गुण त्यांच्यात उपजतच असतात. आता मुलं कविता म्हणताना स्वतः चाल लावून ढोल वाजवून कविता गायन करतात. मुलांचे आवाजही छान आहेत.छान नृत्य करतात.. आता या मुलांमध्ये आत्म विश्वास आला आहे. जेवढ शक्य आहे तेवढ आम्ही करत राहू. आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवू. गजानन जाधव सरांचे बोली भाषेतून शिक्षण हे पुस्तक मुलं आवडीने वाचतात कारण त्या पुस्तकात त्यांना त्यांची भाषा वाचायला मिळते..

एकच ध्यास गुणवत्ता विकास ,सारे शिकू.- शिकून सुजाण नागरिक बनू.

(वाचन कट्टा)



(चांगला स्पर्श व वाईट स्पर्श उपक्रम)



(पणत्या तयार करणे)





(मुलांनी स्वतः ढोल तयार करून संगीतातून शिक्षण अनुभवले)





(अनुभवातून शिक्षण)

(स्नेह संमेलन)



(कार्यानुभव)












वाचनालयात स्वयं अध्ययन करताना विद्यार्थी



ढिगारा वाचन उपक्रम



(नारळाच्या झावळीपासून झाडू तयार करणे - टाकाऊ पासून टिकाऊ)



(प्रवीण मसाले पुणे यांकडून 50 हजार ची पुस्तके शाळेला भेट)



ज्योती अवघडे यांचे कार्य कौतुकास्पद: माजी सरपंच संदीप तोंडीलकर



उडदवणे (दिपक शिंदे) रायगड जिल्हा परिषद शाळा वरवणे येथे मोठ्या दिमाखात डिजिटल शाळेचं उदघाटन करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ पेण व रोटरी क्लब ऑफ पुणे फार इस्ट च्या वतीने शाळेला एल इ डी टिव्ही संच भेट देण्यात आला, वरवणे गावचे माजी सरपंच संदीप तोंडीलकर यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले , उद्घाटन प्रसंगी बोलताना तोंडीलकर म्हणाले की शाळेच्या शिक्षिका ज्योती अवघडे व हेमांगी मानकवळे या दोन्ही शिक्षिका खूप मेहनतीने काम करत आहेत. त्यांनी शाळेला नावारूपाला आणले, जिल्ह्यात शाळेची दखल घेतली जात आहे. शिक्षणाचा दर्जा ही वाढला आहे. मुलांना समजेल अशा साध्या सोप्या पद्धतीने शिकवले जात आहे. मुख्याध्यापिका ज्योति अवघडे याना या वर्षीचा राज्यशासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या कार्याने शाळेचं स्वरूप बदलले आहे. त्या शाळेसाठी उत्तम कार्य करीत आहेत. त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे , असे उदगार त्यांनी या प्रसंगी काढले . या प्रसंगी रोटरी क्लबचे सचिव जयेश शहा, गणेश जोशी, मीतेश शहा ,वरवणे ग्रामस्थ मंगेश भरम, शाळा अध्यक्ष अमृता पाटील, स्वाती टेमघरे, रेश्मा पाटील, माई आवळे, सायली भरम यांसह अनेक मान्यवर विद्यार्थी उपस्थित होते.

गोविंदा सण साजरा करताना विद्यार्थी -

https://youtu.be/_OX2jFBVnHc?si=aoG_iJ831a-Ph6ox

----------**----------

प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी विशेष शिक्षण देणाऱ्या शाळेची यशोगाथा

शाळेचे नाव - रा.जि.प. शाळा सांगुर्ली, केंद्र- शिरढोण, तालुका पनवेल

शाळेचा पत्ता - सांगुर्ली, केंद्र- शिरढोण, तालुका पनवेल जिल्हा रायगड

शाळेचा ई-मेल आय डी - rzpschoolsangurli2000@gmail.com

मुख्याध्यापक नाव - सौ.मानसी मिलिंद भोसले

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9833988154

मुख्याध्यापक ई-मेल आय डी - manasibhosale16@gmail.com



प्रस्तावना

रायगड जिल्हा परिषद शाळा सांगुर्ली ही माझी पनवेल तालुक्यातील, शिरढोण केंद्रातील शेवटची शाळा. राष्ट्रीय महामार्गापासून दोन किलोमीटर आत असणारी छोटीशी शाळा. या शाळेतील 63% विद्यार्थी आदिवासी आहेत. उर्वरित 37% विद्यार्थी सांगुर्ली गावातील आर्थिक परिस्थिती बरी असलेल्या घरातून येतात.

परंतु, शाळेचे हे चित्र आता पुरते बदलून गेले आहे. आता सांगुर्ली ही शाळा शिरढोण केंद्रातील प्रथम नंबर वन शाळा म्हणून गणली जाते. पनवेल तालुक्यातील एक उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते.

दरवर्षी शाळेची पटसंख्या वाढत आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 रोजी शाळेचा पहिली ते पाचवीचा पट 63 झाला आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत, इतर खाजगी शाळेत जाणाऱ्या पाल्यांना पालकांनी माझ्या शाळेत प्रवेश घेतला आहे. यातच माझ्या शाळेचे यश आहे.

मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान -

माझ्या शाळेत सांगुर्ली गावाजवळ असलेल्या दोन आदिवासी पाड्यावरून मुले येतात. तसेच सांगुर्ली गावातून देखील मुले येतात. गावातून येणारी मुले दररोज शाळेत येतात. आदिवासी मुलांमध्ये दररोज न चुकता शाळेत येणारी मुले, आणि मध्येमध्ये गैरहजर असणारी मुले अशी मुले आहेत. अर्थातच दररोज येणारी मुले अभ्यासात चांगली आहेत. मध्येमध्ये गैरहजर असणाऱ्या मुलांना शाळेची गोडी लागावी यासाठी विशेष प्रयत्न केले गेले. मुलांमध्ये स्वच्छतेच्या सवयी लागाव्या म्हणून देखील शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले. आणि शिक्षकांच्या प्रयत्नांना यश देखील आले.

प्रत्येक शाळेत असतात त्याप्रमाणेच माझ्या शाळेत देखील विविध क्षमता असणारी, वेगवेगळ्या स्तरातील मुले आहेत.त्यातील काही पिसा स्तरावरची, NAS स्तरावरची, ASAR स्तरावरची अशी मुले आहेत. अशा प्रत्येक स्तरावरील मुलांसाठी शिक्षकांनी वेगवेगळे उपक्रम राबवले. आणि हळूहळू सर्वाना एकाच उपक्रमात गुंतविण्यासाठी प्रयत्न केले. विशेष उल्लेख करण्यासारखा एक उपक्रम पुढीलप्रमाणे सांगता येईल.

अंक तुमचे गणित आमचे –





महाराष्ट्र शासन

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पनवेल, जि. रायगड

प्रमाणपत्र

सौ. मानसी मिलिंद भोसले, उपशिक्षक, रा.जि.प.शाळा सांगुर्ली, ता. पनवेल, जि. रायगड, यांनी शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, यांच्या मार्फत आयोजित राज्य स्तरीय नवोपक्रम स्पर्धेत "अंक तुमचे, गणित आमचे" हा नवोपक्रम सादर करून जिल्हा स्तरावर (प्राथमिक शिक्षक गट) ~~प्रथम~~/~~द्वितीय~~/तृतीय/~~चौथा~~/~~पाचवा~~/~~उत्तेजनार्थ~~ क्रमांक मिळविल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संतोष कांडे
अधिव्याख्याता
संशोधन, क्षेत्रिय आंतरक्रिया व समता विभाग

सागर तुपे
ज्येष्ठ अधिव्याख्याता
संशोधन, क्षेत्रिय आंतरक्रिया व समता विभाग

डॉ.इरफान इनामदार
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पनवेल, जि. रायगड

शाळेच्या मुख्याध्यापिका, सौ. मानसी भोसले यांच्याकडे 2024-25 या शैक्षणिक वर्षात इयत्ता तिसरी आणि चौथी असे जोडवर्ग होते. मुलांना शाब्दिक उदाहरणे सोडविताना अनेक अडचणी येत होत्या.

विद्यार्थ्यांना शाब्दिक उदाहरणे सोडविताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शाब्दिक उदाहारणे सोडविताना संख्याज्ञानाबरोबरच वाचन कौशल्य, समजुतदारपणा, व्यवहारज्ञान या कौशल्यांचा देखील कस लागतो. म्हणजे शाब्दिक उदाहरणे सोडविण्याची समस्या दूर झाली तर त्याबरोबरच भाषिक आणि गणितीय अशा अनेक समस्यांचे निरसन होणार होते. हे लक्षात घेऊन वर्गशिक्षिका, सौ. मानसी भोसले यांनी इयत्ता तिसरी आणि चौथी या दोन वर्गात 'अंक तुमचे, गणित आमचे' हा नवोपक्रम त्याच्या वर्गात राबविला.

कार्ययोजना -

साधारण जून ते सप्टेंबर 2025 या कालावधी मध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. आणि त्यानंतर देखील याचा सराव इतर स्तरातील मुलांसाठी चालूच राहिला. सुरुवातीला दोन अंकी संख्यांपासून बेरीज, वजाबाकी, लहान संख्या, मोठी संख्या तयार करणे, यासारखी छोटी छोटी विविध उदाहरणे तयार करण्याचा सराव मुलांना देण्यात आला. आणि त्यानंतर

हळूहळू मुलांना शाब्दिक उदाहरणांपर्यंत नेण्यासाठी त्यांच्याकडून साधारण पंधरा प्रकारच्या कृती, विविध प्रकारची उदाहरणे करून घेण्यात आल्या. शिकण्यासाठी शिकणे (Learning to Learn) ही संकल्पना राबविण्यात आली. मुलांना कोणतेही अंक दिल्यावर मुले साधारण 25 ते 30 प्रकारची विविध उदाहरणे स्वतः तयार करून स्वतःच सोडवू लागली. त्यानंतर तीन अंकी, चार अंकी संख्यांवरील क्रिया असा सराव मुलांना दिला.

यामध्ये असलेला शेवटचा टप्पा म्हणजे बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या क्रियांवरील शाब्दिक उदाहरणे देखील स्वतः तयार करून स्वतःच सोडवू लागली. आणि नवोपक्रम यशस्वी झाला. नवोपक्रमास रायगड जिल्ह्यात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

या नवोपक्रमाचे व्हिडीओ सौ. मानसी भोसले यांच्या youtube channel वर उपलब्ध आहे. "अंक तुमचे गणित आमचे" या नावाने playlist बनवून प्रसिध्द केले आहेत. या लिंकवर या उपक्रमाचे सर्व व्हिडीओ उपलब्ध आहेत.


https://youtube.com/playlist?list=PLS113iOK_GuIrrhtfCTbW2AWfVKW_danx&si=-pw9ueEiBfCKDF1E

नवोपक्रमाचे फायदे -

नवीन शैक्षणिक वर्षात देखील या उपक्रमाचा विशेष सकारात्मक परिणाम जाणवत आहे.

1. विद्यार्थ्यांची शाब्दिक उदाहरणांची भीती तर कायमची दूर झालीच, पण आताच्या चालू शैक्षणिक वर्षामध्ये वर्गशिक्षकांचा कामाचा ताण खूपच कमी झाला. या नवोपक्रमात जे इयत्ता चौथी पाचवीचे विद्यार्थी सहभागी होते. त्यांना नव्याने काहीच शिकवायची गरज भासत नव्हती. त्यामुळे हाच वेळ अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांसाठी वापरता येत होता.

2. शाब्दिक उदाहरणांचे आकलन म्हणजे गणित आणि भाषा यांचा संगम आहे. शाब्दिक उदाहरणे तयार करत असताना मुलांचे वाचन आणि लेखन कौशल्य देखील वाढीस लागले. याचे सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांमध्ये जाणवू लागले होते. एकदा असा अनुभव आला की, इयत्ता पाचवी वर्गाच्या समारोपा प्रसंगी, इयत्ता चौथीच्या मुलांना कोणत्याही पूर्वतयारी शिवाय मनोगत व्यक्त करण्यास सांगितले असता, ही मुले खूप छान व्यक्त झाली. " सर्वांना नमस्कार! आज आपण इयत्ता पाचवीच्या



मुलांना शुभेच्छा देण्यासाठी जमलो आहोत.....” अशी केलेली सुरुवात ऐकून खरंच आम्ही थक्क झालो.

3. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. शाळेत होणाऱ्या सर्व सहशालेय उपक्रमात विद्यार्थी उत्साहाने सहभागी होऊ लागले. विशेष उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे असा, यापूर्वी मुलांना पाठ करण्यासाठी दिलेले एखादे भाषण, गाणे, नृत्य, नाटक इ.साठी खूप मेहनत घ्यावी लागत असे. परंतु आता आदल्या दिवशी एखादा उपक्रम, एखादी कृती दिली तरी देखील मुले त्याचा चटकन, अगदी कमी वेळात सराव करतात.

   आमच्या शाळेत पुढीलप्रमाणे आणखी उपक्रम साजरे केले जातात.

शाळा प्रवेशोत्सव -



शाळा प्रवेशोत्सव 2025-26

https://youtu.be/EFsxHxgblHE?si=mmCxix-31LUMopai

शाळा प्रवेशोत्सव 2024-25

https://youtu.be/WCv8uA1y5L0?si=C6dKBwsiR4Vg7pvK

शाळेच्या youtube channel वर आणखी मागील वर्षांचे प्रवेशोत्सव व्हिडीओ देखील उपलब्ध आहेत. सर्व नेत्यांची जयंती आणि पुण्यतिथी आदरपूर्वक साजरी केली जाते. यावेळी नेत्यांवर चारोळ्या सादर करणे, भाषणे करणे, नेत्यांच्या जीवनावरील गोष्टी सांगणे, छोटासा प्रसंग सादर करणे. वेशभूषा करणे. इ. उपक्रमांचे आयोजन केले जाते.



लुगड्याची गोष्ट, महात्मा फुले - सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित https://youtu.be/rWHoKy_RdoU?si=GCJL2EbJPz1XZ4Ko

सावित्रीच्या ओव्या.

https://youtube.com/watch?v=Oe2gST9lt6o&feature=shared

https://youtu.be/lodHFr4AYmY?si=VBrmQkJ5phqEdA7S

महिला दिनाच्या दिवशी परिसरातील होतकरू महिलांचा सत्कार केला जातो. महिला नेत्यांच्या वेशभूषा विद्यार्थिनी करतात.

https://youtu.be/GCfU7t9ydoc?si=_eBccrT4MoD2W2Ht

मुलाखत – शाळेला भेट देणाऱ्या पाहुण्यांची मुलाखत घेतली जाते, पोषण आहार देणाऱ्या कार्कींची मुलाखत. इ. काही मुलाखती youtube वर पाहण्यास उपलब्ध आहेत.

https://youtu.be/OVDVlTbWK0I?si=9O7gl9G3cSIve0vL

https://youtu.be/tRmyRFKfHvk?si=mLypdcr86jhk1ivl

https://youtu.be/HOibisG5_bs?si=miq_3Dn69-1uaDYJ

https://youtu.be/8KTKX4V3fgg?si=bkP-8CxZG6wDrRBN

सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आषाढी एकादशी निमित्त वृक्ष दिंडीचे आयोजन केले जाते.

https://youtube.com/shorts/ndQQ6CgL-Xs?si=S5oBxxJhQUam6Xmr

आमच्या शाळेत आदिवासी मुलांची संख्या जास्त असल्यामुळे दरवर्षी 9 ऑगस्ट दिवशी मोठ्या उत्साहात आदिवासी दिन साजरा केला जातो. या दिवशी शाळेतील सर्व आदिवासी मुले पारंपारिक आदिवासी वेशभूषा करून शाळेत येतात. आदिवासी गाण्यावर फेर धरतात.

https://youtube.com/shorts/9h8xLhDpNTc?si=ACtTH77xSbvn3f0q

खाद्यसंस्कृती जोपासण्यासाठी मातापालकांचा सहभाग घेतला जातो. चविष्ट पदार्थ मातापालक बनवून शाळेत आणतात. त्याची कृती सांगतात. शाळेकडून त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

https://youtu.be/O2mHF0pA03I?si=T2jmFz0JTFiVrGus

गावातील व्यावसायीकांकडून, स्वतः शिलाई काम करणाऱ्या बचत गटाच्या काही महिलांनी विद्यार्थ्यांना कापडी पिशवी शिवण्याचे प्रशिक्षण दिले.





कागदी फुलपाखरू तयार करणे – यासाठी विद्यार्थांची मोठी भावंडे, आणि माता पालकांची खूप मदत होते.

विशेष म्हणजे यासाठी लागणारे सर्व साहित्य, कापड, कागद, सुई,दोरा, कैची, गम इ. साहित्य देखील त्यांनी स्वतः पुरविले.



गुरुपौर्णिमेच्या दिवशी शाळेत मातृपूजनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. सर्व मुले आपल्या आईचे स्वागत फुलांच्या वर्षावाने करतात. त्यांची पूजा करतात. आईला उलट बोलणार नाही असे वचन देतात. आईविषयी कविता सादर करतात.

https://youtube.com/shorts/6ahfn3BhCEk?si=KS5t5MXIiT9Vb4EM

दरवर्षी शाळेत विज्ञान दिन उत्साहात साजरा केला जातो. मुले विविध प्रयोग सादर करतात. याचा सविस्तर व्हिडीओ इथे पाहता येईल.

https://youtu.be/iWtSo37Knz4?si=dpIVGoxqBJpWEhCZ

मराठी राजभाषा दिन देखील दर वर्षी मोठ्या उत्साहात साजरा होतो. पुढील दोन्ही लिंक वर मराठी राजभाषा दिनाचे व्हिडीओ पाहता येतील.

https://youtube.com/shorts/m7KLgDl7O2Y?si=C9kbWe6yy5NtF60d

https://youtube.com/shorts/dSSUiFGNB5A?si=2ySfAAIw30uBlWDj

स्वच्छता मॉनीटर म्हणून देखील आमच्या शाळेची मुल खूप छान काम करतात. शाळेचा परिसर, गावाचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी ती सदैव तत्पर असतात. याचे व्हिडीओ देखील अनेक समाज माध्यमावर मुख्याध्यापिकेने प्रसिध्द केले आहेत. त्यातील काही व्हिडीओंची लिंक पुढे दिली आहे.

https://youtube.com/shorts/gZP0AtS8nQg?si=uSPp1WRK4EKVUwKN

https://youtube.com/shorts/hOELwgJGPTo?si=OoxPUdZ5pefx2niW

https://youtube.com/shorts/og_CiFyqLw4?feature=shared

स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी, प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी देखील मुलांचे समूहगीत गायन, वक्तृत्व, कवायत आणि विविध गुण दर्शनाचे कार्यक्रम साजरे केले जातात. या लिंक वर आपण ते पाहू शकतो.

https://youtube.com/shorts/og_CiFyqLw4?feature=shared


हर घर तिरंगा अभियान देखील आमच्या शाळेने उत्साहात राबविले. यामध्ये Tiranga Marethon, Tiranga Rally, Tiranga yatra अशा अनेक उपक्रमांचा समावेश आहे.

https://youtube.com/shorts/CHkrGHe2xyU?si=cCIdniONbDvEnK4z

https://youtube.com/shorts/daXA7lklM1w?si=5x5bgG13kStevDeW

https://youtu.be/tDIoZiTEJY8?si=eoD5cK_KGLchD1-L

SWEEP अंतर्गत मतदार जागृती अभियानात देखील शाळेने हिरीरीने पुढाकार घेतला. यामध्ये गावातील सर्व लोकांनी मतदानाचा हक्क बजावावा म्हणून गावातून फेरी काढण्यात



आली, घोषणा देण्यात आल्या. याचा व्हिडीओ पुढील लिंक वर पाहता येईल. https://youtu.be/KRo0MOyHhyw?si=zk1NEPLWaylnq7re

वर्षभरात येणाऱ्या प्रत्येक सणाचे औचित्य साधून विविध प्रकारच्या वस्तू बनविण्याचे





प्रात्यक्षिक मुलांना दाखविले जाते. त्यांच्याकडून त्या वस्तू बनवून घेतल्या जातात. दिवाळीला, रक्षाबंधनाला, गणपती,



नागपंचमी सारख्या सणांचे औचित्य साधून कार्यानुभवाचे विविध प्रात्यक्षिक मुलांना दाखविले जाते, त्यांच्याकडून विविध वस्तू बनवून घेतल्या जातात.

आकाशकंदील बनविणे –

https://youtu.be/7yGVzBy9G8M?si=lJ9-ZKSG91ExP9Bs

शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये तिसरी आणि चौथी मध्ये शिकत असणाऱ्य विद्यार्थांकडून scrap book मध्ये विविध प्रकल्प तयार करून घेण्यात आले. चालू शैक्षणिक वर्षात देखील चौथी आणि पाचवीचा हा उपक्रम चालू आहे. हे विविध प्रकल्प करण्यासाठी लागणारी रंगीत चित्रे, गम, इतर साहित्य सर्व मुलांना शाळेतूनच पुरविले जाते. प्रकल्पासाठी योग्य मार्गदर्शन केले जाते. मुलांना देखील असे प्रकल्प बनविण्यात खूप आवड निर्माण झाली आहे.





आनंददायी शनिवारी योगासने, परिसरातील पानाफुलांपासून बुके, हार तयार करणे. टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे, यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रम घेतले जातात, त्यामुळे मुलांच्या सुप्त गुणांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळते.

https://youtu.be/-ljZtBEYxq0?si=Sumh0qLhrwJQ5odU

संविधान दिनानिमित्त रांगोळी प्रदर्शन -







SWEEP अंतर्गत मतदार जागृती कार्यक्रम देखील शाळेत मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या लिंक वर आपण सदर उपक्रम पाहू शकतो.

https://youtu.be/KRo0MOyHhyw?si=xSnZIWfSVomztJx4

पाठ्य पुस्तकात असणाऱ्या विविध कविता, छोटी नाटके, role play यांचे देखील सादरीकरण करून घेतले जाते.

Who are you? – skit
https://youtu.be/fwwmOdTSWng?si=GKBa2FVjy37h7ORP

The sky is falling – Role play
https://youtu.be/pKT3JpRqSR8?si=mfgQbsk2EOzVbIhJ



एक पेड मा के नाम या उपक्रमात माता पालकांनी त्यांच्या शेतावर, घराच्या परसात झाडे लावली आहेत. आणि त्यांना पुढीलप्रमाणे प्रमाणपत्र देखील प्राप्त झाली आहेत.


LiFE
Lifestyle for Environment
ECO CLUBS For Mission LiFE
CERTIFICATE
OF PARTICIPATION
Ek Ped Maa Ke Naam 2.0
This certificate is presented to **Bhavika Mangesh Paradhi**
Mother's Name : **Smt. Ranjana Mangesh Paradhi** in recognition of participation in the "Ek Ped Maa Ke Naam 2.0" Campaign for planting a tree as a tribute to his/her mother as well as to protect Mother Earth. Your meaningful contribution reflects a deep sense of responsibility towards nature, exemplifying the spirit of Mission LiFE—Lifestyle for Environment.
भागीदारी
का प्रमाण पत्र
Ek Ped Maa Ke Naam 2.0
यह प्रमाण पत्र **Bhavika Mangesh Paradhi** माता का नाम : **Smt. Ranjana Mangesh Paradhi** को अपनी माँ के सम्मान में एक पेड़ लगाने के साथ-साथ धरती माता की रक्षा के लिए 'एक पेड़ माँ के नाम 2.0' अभियान में भागीदारी के लिए प्रदान किया जाता है। आपका सार्थक योगदान प्रकृति के प्रति जिम्मेदारी की गहरी भावना को दर्शाता है, जो मिशन लाइफ- पर्यावरण के लिए जीवन शैली की भावना का उदाहरण है।
Date: 26/06/2025
Certificate ID: 383376523


LiFE
Lifestyle for Environment
ECO CLUBS For Mission LiFE
CERTIFICATE
OF PARTICIPATION
Ek Ped Maa Ke Naam 2.0
This certificate is presented to **Ansh Ram Deshmukh** Mother's Name : **Smt. Dipali Ram Deshmukh** in recognition of participation in the "Ek Ped Maa Ke Naam 2.0" Campaign for planting a tree as a tribute to his/her mother as well as to protect Mother Earth. Your meaningful contribution reflects a deep sense of responsibility towards nature, exemplifying the spirit of Mission LiFE—Lifestyle for Environment.
भागीदारी
का प्रमाण पत्र
Ek Ped Maa Ke Naam 2.0
यह प्रमाण पत्र **Ansh Ram Deshmukh** माता का नाम : **Smt. Dipali Ram Deshmukh** को अपनी माँ के सम्मान में एक पेड़ लगाने के साथ-साथ धरती माता की रक्षा के लिए 'एक पेड़ माँ के नाम 2.0' अभियान में भागीदारी के लिए प्रदान किया जाता है। आपका सार्थक योगदान प्रकृति के प्रति जिम्मेदारी की गहरी भावना को दर्शाता है, जो मिशन लाइफ- पर्यावरण के लिए जीवन शैली की भावना का उदाहरण है।
Date: 25/08/2025
Certificate ID: 133674204

विविध कार्यक्रमांच्या वेळी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले जाते. स्वागतासाठी पाहुण्यांना मुलांनी बनविलेले seed balls, त्यांनी बनविलेल्या शोभेची फुले, गुच्छ, भेटकार्ड, किंवा रोपे दिली जातात.



शालेय भौतिक सुविधा

शाळेची गुणवत्ता वाढण्यामागे आणखी महत्वाचे कारण म्हणजे शिक्षकांनी शाळेसाठी मिळविलेल्या भौतिक सुविधा.

शालेय रंगरंगोटी, बोलक्या भिंती, आनंददायी परिसर करण्यासाठी शाळेतील शिक्षकांनी बरेच प्रयत्न केले आणि त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले.


रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊन – यांच्याकडून शाळेला साडेपाच लाखांचे सुसज्ज स्वच्छतागृह बांधून मिळाले.

या स्वच्छतागृहाच्या उद्घाटन कार्यक्रमाचा व्हिडीओ पुढील लिंकवर उपलब्ध आहे.

https://youtube.com/watch?v=uiYShaVYo5A&feature=shared

तसेच शाळेस गोष्टींची पुस्तके, झाडे यासारखी मदत देखील रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊन यांच्याकडून झाली आहे.

सांगुर्ली गावातील आणि परिसरातील शंभरपेक्षा जास्त मुलींना cervical cancer चा डोस मोफत देण्यात आला.




ROTARY CLUB OF
KHARGHAR MIDTOWN
Welcomes you


Rotary
ROTARY CLUB OF
KHARGHAR MIDTOW
Welcomes you
Rtn. Shailesh Patel
Rtn. Prof. Suneela Bajaj
Rtn. Dr Ravikiran

इनर व्हील क्लब ऑफ बॉम्बे सेन्ट्रल –

या क्लब कडून मुलांना खाऊ, छत्र्या, शालेय स्टेशनरी, लांबून येणाऱ्या मुलांना सायकल, किचन शेडसाठी मोरी बांधकाम, परसबागेसाठी जाळी, पिण्याच्या पाण्याची सोय, hand wash station, इ. सोयी करून मिळाल्या. हा व्हिडीओ या लिंक वर उपलब्ध आहे. https://youtu.be/pKT3JpRqSR8?si=mfgQbsk2EOzVbIhJ












INNER WHEEL CLUB
OF
BOMBAY CENTRAL
DIST. 314 MAHARASHTRA INDIA, CHARTER NO. 314
IIW THEME : 2024-2025 : "HEARTBEAT OF HUMANITY"
Rotary
Club of Bombay Central

सायकल वाटप https://youtu.be/52e_jnrkq98?si=XjlK-5NtD8e0O0ey



तसेच मानसी भोसले यांच्या प्रयत्नांतून, गावातील महिला बचत गटाला पानाच्या पत्रावळी बनविण्याचे साधारण दीड लाखाचे (इकोफ्रेंडली) मशीन इनर व्हील क्लब ऑफ बॉम्बे सेन्ट्रल कडून मिळाले. त्यामुळे बचत गटाच्या महीलांना व्यवसाय मिळाला.

पानाच्या पत्रावळी बनविण्याचे मशीन उद्घाटन -
https://youtu.be/0mngOMmTwlM?si=nOe0BdKBYRx3yS3X



1. गावाजवळ असलेल्या कोरडे बंधू, इनर व्हील क्लब,पेण, ग्रामपंचायत सांगुर्ली यांच्या मदतीने शाळेची रंगरंगोटी आणि शाळेच्या भिंती बोलक्या झाल्या. आणि अध्ययनास पूरक पोषक वातावरण तयार झाले.
2. सांगुर्ली गावाजवळील चिंचवण या गावातील दानशूर श्याम ठोंबरे यांनी शाळेतील दोन्ही वर्गास सिलिंग करून दिले.
3. सांगुर्ली गावात असलेल्या पाटील फार्म आमी गवळी फार्म यांच्याकडून शाळेस आवश्यक भौतिक वस्तू, स्टेशनरी साहित्य मिळविण्यात शिक्षकांना यश आले आणि अशा प्रकारे अध्ययनास पूरक पोषक वातावरण तयार झाले.

विविध स्पर्धांमध्ये शाळेला मिळालेले यश –

❖ **मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान -**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पहिल्या टप्प्यामध्ये माझी छोटीशी शाळा शिरढोण केंद्रात प्रथम क्रमांक पटकावते. पनवेल सारख्या महानगरपालिकेच्या शाळांच्या स्पर्धांमध्ये माझी शाळा पूर्ण तालुक्यात सातवा क्रमांक पटकावते ही माझ्यासाठी खरोखर अभिमानाची गोष्ट आहे.


मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा दुसऱ्या टप्प्यामध्ये देखील माझी सांगुर्ली शाळा शिरढोण केंद्रात प्रथम क्रमांक पटकावते. तालुकास्तरीय कमिटी अभिनंदन करत असतानाचा क्षण -



❖ प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण अंतर्गत शालेय परसबाग स्पर्धा -



पहिल्या टप्प्यामध्ये शालेय परसबाग स्पर्धेमध्ये माझ्या शाळेला तालुक्यातून तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. दुसऱ्या टप्प्यामध्ये देखील शिरढोण केंद्रातून प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. आमच्या परसबागेमध्ये आम्ही भेंडी, चवळी, घेवडा, हळद, माठ, अळू, पालक, मेथी, कोथिंबीर,मिरची, काकडी, या भाज्यांची लागवड करत असतो. जागा थोडी अपुरी पडत असल्यामुळे छोट्या छोट्या टोपल्या मधून मायक्रोग्रीन्स देखील उगवतो. या सर्व भाजीपाल्याचा उपयोग रोजच्या दुपारच्या जेवणात केला जातो आणि मुलेही त्याचा आवडीने आस्वाद घेतात.



पंचायत समिती पनवेल
प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना

ई-मेल:mdmpanvel7@gmail.com

जा.क्र./पंसप/शिक्षण/प्रपोशनि/७२८ /२०२३ दिनांक:-३०/१०/२०२३

प्रति,
मा.शिक्षणाधिकारी सो, (प्राथ)
रायगड जिल्हा परिषद अलिबाग.

विषय :- प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत उत्कृष्ट परसबाग स्पर्धा पहिले तीन क्रमांक व प्रोत्साहनपर तीन क्रमांक घोषित करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक शापोआ-२००८/प्र.क्र.१७१/एस.डी.३ दिनांक ०५/०९/२०२३.
२) मा.शिक्षण संचालक(प्राथ), महाराष्ट्र राज्य,पुणे या कार्यालयाकडील पत्र.जा.क्र.प्राशिसं/पीएमपोषण/परसबाग/२०२३-२४/०६३८/दि. ०८/०९/२०२३.
३) मा.शिक्षणाधिकारी(प्राथ) यांचे जा.क्र./राजिप/शिक्षण/पीएमपोषण/ लेखा-७/४७९०/२०२३/दि.१८/०९/२०२३.
४) जा.क्र/पंसप/शिक्षण/प्रपोशनि/१९२१/२०२३.दिनांक २६/०९/२०२३

महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये, पनवेल तालुक्यात माहे ऑक्टोंबर २०२३ या महिन्यात दि. १०/१०/२०२३ ते २५/१०/२०२३ या कालावधीत तालुकास्तरीय उत्कृष्ट परसबाग स्पर्धा घेण्यात आल्या आहेत. प्रत्येक केंद्रातून प्रथम आलेल्या परसबागेतुन तालुकानिहाय निवड समिती मार्फत मुल्यांकन करणेत आले असुन त्यातुन निवड झालेले पहिले तीन क्रमांक व प्रोत्साहनपर तीन क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	पहिले तीन क्रमांक	शाळेचे नाव	रक्कम
१	प्रथम क्रमांक	रा.जि.प.शाळा खानाचा बंगला.	५०००/-
२	द्वितीय क्रमांक	रा.जि.प.शाळा बारवई	३०००/-
३	तृतीय क्रमांक	रा.जि.प.शाळा सांगुर्ली	२०००/-
प्रोत्साहनपर तीन क्रमांक			
१	प्रोत्साहनपर प्रथम क्रमांक	रा.जि.प.शाळा जांभिवलीवाडी	१०००/-
२	प्रोत्साहनपर द्वितीय क्रमांक	रा.जि.प.शाळा दुंदरे	१०००/-
३	प्रोत्साहनपर तृतीय क्रमांक	रा.जि.प.शाळा भातान	१०००/-

तालुकास्तरीय गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय तसेच प्रोत्साहनपर ३ शाळा अशाप्रकारे बक्षिस रक्कम वितरीत करण्यास रक्कम रुपये १३,०००/- अनुदान उपलब्ध करुन देणेस विनंती आहे.

आपला विश्वासु

(श्री.सिताराम रामा मोहिते)
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती पनवेल


शाळा सांगुर्ली
सबाग




रायगड जिल्हा परिषद शाळा आंबुर्ली



स्नेहभोजन – गावातील, सांगुर्ली ग्रामपंचायत हद्दीतील, तसेच शिक्षकांच्या ओळखीचे काही दानशूर लोक शाळेतील मुलांना बरेच वेळा पुलाव, बिर्याणी, गोड पदार्थांची मेजवानी देतात. मुलांसोबत मेजवानीचा आस्वाद घेतात.








महावाचन उत्सव – शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये महावाचन उत्सवामध्ये इयत्ता तिसरी, चौथी, पाचवीच्या मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शाळेच्या ग्रंथालयातील विविध गोष्टींची पुस्तके मुलांनी आवडीने वाचली. इयत्ता तिसरीच्या स्वराने तिने वाचलेल्या 'अकबर बिरबल' या पुस्तकाचे परीक्षण केले होते. कु. स्वरा काशिनाथ गोंधळी हिला इयत्ता तिसरी ते पाचवी गटात द्वितीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले. बक्षिसामध्ये स्वराला प्रमाणपत्र आणि सतरा गोष्टींची पुस्तके प्राप्त झाली.










विविध स्पर्धा परीक्षांमधील यश - शैक्षणिक वर्ष 2024-25

शाब्दिक उदाहरणांच्या उपक्रमाचा आणखी एक सकारात्मक परिणाम म्हणजे BTS, RTS, आणि मंथन परीक्षांमध्ये मिळालेले शंभर टक्के यश.



अ.क्र.	स्पर्धा परीक्षेचे नाव	इयत्ता	बसलेले एकूण विद्यार्थी	यशस्वी विद्यार्थी
1.	BTS	तिसरी	4	4
2.	BTS	चौथी	2	2
3.	मंथन	तिसरी	2	2
4.	RTS	चौथी	2	2

इयत्ता चौथी आणि पाचवीच्या वर्गशिक्षिका, सौ. मानसी भोसले यांनी वरीलप्रमाणे स्पर्धा परीक्षांसाठी मुलांची तयारी करून घेतली आणि त्याचे चांगले यश मिळाले.



25017248

Reg No. U85499MH2023PTC409052

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार जीवनाभिमुख शिक्षण देणारे पहिले पाऊल'

एज्यूमीट अकॅडमी, महाराष्ट्र आयोजित

भारत टॅलेंट सर्च (BTS) परीक्षा - 2025

प्रमाणपत्र

प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते की,

कुमार/कुमारी Pardhi Tanvi Naresh इयत्ता 3

शाळा R.Z.P.School Sangurli परीक्षा केंद्र क्रमांक 278

याने/हिने भारत टॅलेंट सर्च (BTS) परीक्षा 2025 मध्ये 52 गुण मिळवून राज्य गुणवत्ता यादीत 449 क्रमांक प्राप्त करून यश मिळवले आहे.

आपल्या या यशाबद्दल एज्यूमीट अकॅडमी, महाराष्ट्र यांच्या वतीने आपले हार्दिक अभिनंदन..!

दिनांक : 19-01-2025

राज्य परीक्षा नियंत्रक



विशेष म्हणजे, **BTS** परीक्षेत कु. स्वरा काशिनाथ गोंधळी हीने सेंटरवर प्रथम क्रमांक पटकावला.

मंथन परीक्षेत कु. स्वरा काशिनाथ गोंधळी हीने सेंटरवर प्रथम क्रमांक, रायगड जिल्ह्यात चौदावा, आणि पूर्ण राज्यात एकविसावा क्रमांक पटकावला.

तसेच,

मंथन परीक्षेत कु. स्वरा संदीप पारधी, हीने सेंटरवर द्वितीय क्रमांक, रायगड जिल्ह्यात तेविसावा, आणि पूर्ण राज्यात तिसावा क्रमांक पटकावला.

Manthan General Knowledge Examination

Center level Meritorious Student List- 2025

Kalamboli 1 - R Z P School Kalamboli

Standard - 2

Sr. No	Student Id	Student Name	School Name	Std	Total	State Rank	Dist/Div Rank	Center Rank	Merit type
1	107271	Arush Chetan Kadu	R. Z. P. Primary School Kudave	2	114	19	14	1	Center level Prize Winner

Standard - 3

Sr. No	Student Id	Student Name	School Name	Std	Total	State Rank	Dist/Div Rank	Center Rank	Merit type
1	107329	Swara Kashinath Gondhali	R. Z. P. Primary School Sangurli	3	260	21	14	1	Center level Prize Winner
2	107330	Swara Sandip Pardhi	R. Z. P. Primary School Sangurli	3	242	30	23	2	Center level Prize Winner

Standard - 4

Sr. No	Student Id	Student Name	School Name	Std	Total	State Rank	Dist/Div Rank	Center Rank	Merit type
1	106479	Shravani Ravasaheb Khandekar	R. Z. P. Primary School Kalamboli	4	202	50	44	1	Center level Prize Winner

या विशेष यशाबद्दल सर्व विद्यार्थी आणि त्यांच्या वर्गशिक्षिका, सौ. मानसी मिलिंद भोसले यांचे, पळस्पे बीटाचे मान. बीट विस्तार अधिकारी, श्री. एन.के.गीते, पाटील यांच्याकडून विशेष कौतुक करण्यात आले. आणि या विद्यार्थांना पुढे येणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी त्यांनी खूप शुभेच्छा दिल्या.



शैक्षणिक वर्ष 2024-25 तालुकास्तरीय व्यक्तिमत्व विकास आणि सांस्कृतिक स्पर्धा –

शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये झालेल्या तालुकास्तरीय व्यक्तिमत्व विकास आणि सांस्कृतिक स्पर्धेमध्ये आमच्या शाळेने बसविलेले "सोशल मिडियाचे दुष्परिणाम" हे पथनाट्य बीट स्तरावर प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. हे पथनाट्य youtube वर पुढील लिंक वर उपलब्ध आहे.

https://youtu.be/DI5LIMvGy4w?si=Ylx-a-qRgTkvXCWd



तसेच कु. निकेश कातकरी याने बेचकीने नेम धरणे या वैयक्तिक क्रीडा प्रकारात बीट स्तरावर द्वितीय क्रमांक पटकाविला.





मातीचे शिल्प बनविणे

या प्रकारात स्वरा पारधी हिने लहान गटात प्रथम क्रमांक आणि सान्वी पाटील हिने मोठ्या गटात द्वितीय क्रमांक पटकाविला.

विज्ञान प्रदर्शनातील सहभाग – शाळेच्या मुख्याध्यापिका, सौ. मानसी मिलिंद भोसले यांनी ऑनलाइन पद्धतीने संपन्न झालेल्या एक्कावन्नाव्या पनवेल तालुकास्तरीय विज्ञान



प्रदर्शनात 'शिक्षकांद्वारे शैक्षणिक साहित्य निर्मिती' या सदरात सहभाग घेतला. यामध्ये त्यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. त्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचा व्हिडीओ पुढील लिंकवर पाहता येईल.

तसेच पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात देखील सौ. मानसी भोसले यांनी शैक्षणिक साहित्य निर्मिती मध्ये सहभागाचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

ऑनलाईन विज्ञान प्रदर्शनातील सहभागाची लिंक -
https://youtu.be/G1dYOUk5dvs?si=QRa7tkE3u5_-tXTE

शाळेच्या मुख्याध्यापिका, सौ. मानसी मिलिंद भोसले यांना NATION BUILDER AWARD-



उल्लेखनीय शैक्षणिक कार्य केल्याबद्दल आणि महाराष्ट्रभर ऑफलाईन आणि ऑनलाइन पद्धतीने "मासिक पाळी व्यवस्थापन" विषयावर प्रभावी कार्यशाळा घेतल्याबद्दल सौ. मानसी मिलिंद भोसले यांना रोटरी क्लब ऑफ मिलेनियम सिटीकडून **NATION BUILDER AWARD** ने सन्मानित करण्यात आले.

शाळेच्या उपशिक्षिका, सौ. सारिका संदीप साळुंखे यांचे यश - शाळेच्या उपशिक्षिका, सौ. सारिका संदीप साळुंखे यांनी शाळेचे उपक्रम रोटरी क्लब ऑफ मुंबई नोर्थ आयलँड यांच्यातर्फे शाळेत राबविलेले विविध उपक्रम सादर केले. यासाठी त्यांना दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.



शाळेच्या मुख्याध्यापिका, सौ. मानसी मिलिंद भोसले यांना नारी शक्ती सन्मान पुरस्कार –



उल्लेखनीय शैक्षणिक कार्य केल्याबद्दल, विविध प्रशिक्षणात उत्कृष्ट तज्ञ मार्गदर्शकाची कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचा सन 2025 चा नारी शक्ती सन्मान पुरस्कार सौ. मानसी मिलिंद भोसले यांना प्रदान करण्यात आला.

गुणवंत शिक्षक, गुणवंत पालक व गुणवंत विद्यार्थी सत्कार –



पूर्ण पनवेल तालुक्यात, प्रत्येक बीटामध्ये, प्रत्येक केंद्रामध्ये इयत्ता पाचवी, इयत्ता आठवी शिष्यवृत्तीच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यामध्ये मानसी मिलिंद भोसले, यांनी इंग्रजी विषयाचे सखोल मार्गदर्शन तालुक्यातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांना केल्याबद्दल सौ. मानसी मिलिंद भोसले, यांचा या कार्यक्रमात सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच त्यांची विद्यार्थिनी, कु. स्वरा काशिनाथ गोंधळी हिचा गुणवंत विद्यार्थिनी म्हणून सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शाळेला, शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षकांना मिळत असलेले यश पाहून 26 जानेवारी 2024 रोजी प्रजासत्ताक दिनी, ग्रामस्थ आणि सांगुर्ली महिला बचत गट यांच्याकडून आम्हा दोन्ही शिक्षिकांचा आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.





या सत्कारामुळे आम्हाला यापुढे आणखी जोमाने शैक्षणिक कार्य करण्याचे बळ मिळाले.

शाळेच्या मुख्याध्यापिका, सौ. मानसी मिलिंद भोसले यांनी शाळेचे youtube channel तयार केले आहे. त्यांचे स्वतःचे देखील एक स्वतंत्र youtube channel आहे. instagram वर देखील शाळेचे account तयार केले आहे. शाळेत झालेल्या प्रत्येक उपक्रमाचा व्हिडीओ बनवून त्या youtube आणि instagram वर नित्याने टाकत असतात. वरील लेखात शाळेत राबविल्या जाणाऱ्या सर्वच उपक्रमांचा उल्लेख करणे शक्य झाले नाही, परंतु या दोनही youtube channel वर भेट दिली असता, शाळेतील सर्व उपक्रम पाहता येतील

https://youtube.com/@manasimilind2947?si=A9FUnAPDTTNAsNFE

मानसी भोसले यांचे youtube channel

https://youtube.com/@rzpschoolsangurli760?si=U67L51L205BzjXVm - **शाळेचे** youtube channel


या दोन्ही लिंक वर आमच्या शाळेत होणारे उपक्रम उपलब्ध आहेत.

'अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन' या प्रशिक्षणात PISA म्हणजे programme for international student assessment ही नवीन संकल्पना शिकायला मिळाली.

PISA परीक्षा एकविसाव्या शतकातील कौशल्ये - चिकित्सक विचार, सर्जनशीलता, सहयोग, संवाद, आत्मविश्वास, करुणा (critical thinking, creative thinking, collaboration, communication, confidence, compassion) हे 6C मुलांमध्ये विकसित झाली आहे का ते पाहते. PISA साठी विद्यार्थी तयार करणे, हे कौशल्याचे काम आहे.

आमच्या या छोट्याशा शाळेतील मुलांमध्ये हे 6C विकसित करण्यासाठी आम्ही सदैव कटीबद्ध आहोत.

----------**----------



विविध शैक्षणिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमतांचा विकास साधणारी शाळा

शाळेचे पूर्ण नाव : पीएमश्री खोपोली नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.७ वासरंग

शाळेचा पत्ता : वासरंग, तालुका खालापूर, जिल्हा रायगड

शाळेचा ईमेल आयडी : pmshrischool07@gmail.com

मुख्याध्यापक नाव : सौ.तृप्ती भगवान खालापूरकर

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक : 7385206408

मुख्याध्यापक ईमेल आयडी : truptikhalapurkar72@gmail.com

प्रास्ताविक -


वेगाने बदलत असलेल्या आर्थिक, सामाजिक आणि तंत्रज्ञानाद्वारे वैशिष्ट्यीकृत वेगवान जगात वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवन कार्यक्षमतेने पुढे जाण्यास सक्षम होण्यासाठी विविध क्षमता विद्यार्थ्यांमध्ये असणे आवश्यक आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक यशस्वी होण्यासाठी आशय व पाठ्यपुस्तक तसेच क्षमताही महत्त्वाच्या आहेत. शाळेतील संपूर्ण आंतरक्रिया क्षमता आधारित असावी, अशी सूचना राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये केली आहे.

क्षमता म्हणजे अध्ययन संपादणूक, ज्याचे निरीक्षण आणि मूल्यांकन केले जाऊ शकते. या क्षमता अभ्यासक्रमाच्या ध्येयांमधून प्राप्त केल्या जातात आणि स्तराच्या अखेरीस या क्षमता प्राप्त करणे अपेक्षित आहे. ज्ञान (knowledge), कौशल्य (skills), प्रवृत्ती/ दृष्टिकोन (attitude) हे तीन घटक मिळून क्षमता तयार होतात.

विद्यार्थ्यांमध्ये क्षमता विकसित होण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० मध्ये क्षमता आधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. यात खालील गोष्टींवर अधिक भर देण्यात आला आहे.

१) अध्ययनात घोकंपट्टीपेक्षा प्रत्यक्ष अनुभवाभर देणे.

२) शिकवण्यापेक्षा शिकण्यावर भर देणे.



३) फक्त माहितीवर भर न देता ज्ञान, कौशल्ये, दृष्टिकोन / वृत्ती यावर भर देणे.

४) स्वतःच्या गतीने व स्वतःच्या पद्धतीने, तंत्राने शिकण्यावर अधिक भर देणे.

५) वर्गामध्ये तासिकेपुरता व परीक्षेतील गुणांपुरते न शिकता शिकण्याचे कौशल्य व आजन्म शिकण्याची वृत्ती वाढीस लागावी यावर भर देणे.


वरील सर्व बाबींचा विचार करता मुख्याध्यापक या नात्याने विद्यार्थ्यांसाठी शाळेत क्षमता आधारित अध्ययन-अध्यापनाच्या विविध कृती व उपक्रम राबविण्याचे ठरवले. क्षमता आधारित उपक्रम राबविताना अनुभवांवर आधारित अध्ययन, कृती आधारित / खेळ / खेळणी आधारित अध्ययन, चर्चात्मक / संवादात्मक अध्ययन, विश्लेषणात्मक अध्ययन आणि सर्जनशील विचार असे घटक समोर ठेवण्यात आले. त्यातूनच विद्यार्थ्यांमध्ये चौकस विचार, संप्रेषण, समस्या निराकरण आणि तर्कसंगत विचार, सौंदर्यात्मक आणि सांस्कृतिक क्षमता, आरोग्य, निर्वाह, स्व-व्यवस्थापन आणि कार्य करण्याची क्षमता आणि प्रभावीपणे सामाजिक सहभाग घेण्याची क्षमता याची सांगड घालण्याचे ठरले. वर्षभर तशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता वाढवण्यासाठी मुख्याध्यापकांनी राबविलेले उपक्रम

उपक्रम क्र.१ : मी ज्ञानवंत, गुणवंत, यशवंत..!

प्रस्तावना :

शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांनी 'सामान्य ज्ञान' या विषयाचा अभ्यास करायला हवा असे मत 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' मध्ये व्यक्त करण्यात आले आहे. राष्ट्राचे भवितव्य विद्यार्थ्यांच्या हातात असणार आहे. समाज परिवर्तनासाठी विद्यार्थ्यांची महत्त्वाची भूमिका असणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होणे व त्यांच्यात क्षमता निर्माण होणे आवश्यक आहे. आणि म्हणूनच विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच सामान्यज्ञान या विषयाची गोडी निर्माण व्हावी, त्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा यासाठी मुख्याध्यापक या नात्याने शाळेत एखादा सामान्य ज्ञानावर आधारित उपक्रम सुरू करावा अशी कल्पना डोक्यात आली. त्यातूनच प्रवास सुरू झाला तो 'मी ज्ञानवंत, गुणवंत, यशवंत..! या उपक्रमाचा.



उद्देश :

१) विद्यार्थ्यांची चौकस विचार करण्याची क्षमता वाढवणे.

२) विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणे.

३) विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक वृत्ती वाढवणे.

४) विद्यार्थ्यांची जागरूकता वाढवणे.

५) विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे.

उपक्रमाची कार्यवाही :

सामान्य ज्ञानावर आधारित एखादा उपक्रम शाळेत सुरू करावा याबाबत मी शिक्षकांशी चर्चा केली. या चर्चेतूनच स्कूल कंम्प्यानियन या शैक्षणिक वेबपोर्टल द्वारे विद्यार्थ्यांसाठी 'मी ज्ञानवंत, गुणवंत, यशवंत' हा उपक्रम राबवला जातो याची माहिती मिळाली. हा उपक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी आपल्या शाळेत राबवावा हे मनाशी पक्के केले.

या शैक्षणिक वेबपोर्टल द्वारे सोमवार ते शुक्रवार दररोज पाच प्रश्न असलेली पीडीएफ उपलब्ध करून दिली जाते. तीच पीडीएफ आमचे शिक्षक शाळेच्या व्हाट्सअप ग्रुप वर रोज संध्याकाळी पाठवत असत. विद्यार्थ्यांनी तेच पाच प्रश्न वहीत लिहून घेऊन त्याचे पाठांतर करणे बंधनकारक करण्यात आले. दुसऱ्या दिवशी परिपाठात तेच प्रश्न विद्यार्थ्यांना विचारून त्याची उत्तरे विद्यार्थ्यांनी देणे व त्या प्रश्नांवर शिक्षकांद्वारे चर्चा करणे असा नित्यक्रम चालू करण्यात आला. आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांच्या सरावासाठी चाचणी विद्यार्थ्यांना ग्रुप वर पाठवण्यात येत असे. ती सराव चाचणी विद्यार्थ्यांनी घरीच मोबाईलवर ऑनलाइन सोडवणे बंधनकारक करण्यात आले.

वर्ष अखेरीस स्कूल कंम्प्यानियन या शैक्षणिक वेबपोर्टल ने शालेय स्तरावर सामान्य ज्ञानावर आधारित स्पर्धा राबवली. या स्पर्धेत शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. त्यातून प्रथम तीन क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. नंतर या तीन विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञानावर आधारित ऑनलाइन राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. त्यात आनंदाची गोष्ट म्हणजे शाळेतील दोन विद्यार्थिनींचा राज्यस्तरावर द्वितीय आणि तृतीय क्रमांक आला. बघता बघता छोटेसे लावलेले या उपक्रमाचे रोपटे कधी वटवृक्षात बदलले ते कळलेच नाही.






फलनिष्पत्ती :


'मी ज्ञानवंत, गुणवंत, यशवंत..!' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चौकस विचार करण्याची क्षमता वाढीस लागली. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडू लागली. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती वाढू लागली. परिपाठात प्रत्येक जण उत्तर देण्यास उत्सुक असे. प्रत्येक विद्यार्थी पीडीएफ ची वाट पाहू लागला. बघता बघता विद्यार्थ्यांजवळ वहीत सामान्य ज्ञानाच्या प्रश्नांच्या संच तयार झाला आणि यातूनच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला.





शालेय स्तरावर राबविण्यात आलेली स्पर्धा





राज्य स्तरावर राबविण्यात आलेली स्पर्धा

स्कूल कंप्यानियन शैक्षणिक पोर्टल आयोजित.....

मी ज्ञानवत, गुणवत यशवत..! सामान्यज्ञानातून व्यक्तिमत्त्व विकास.

राज्यस्तरीय अंतिम परीक्षा गुणवत्ता यादी

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	शाळेचे नाव	प्राप्त गुण	क्रमांक
1	तोंडे वृषाली नबाजी	सेंट क्रिस्पिन्स होम कन्याशाळा होम, कर्वे रोड, पुणे	10	प्रथम
2	अनुष्का रविकिरण शिंदे	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरी ज तालुका - हदगाव जिल्हा - नांदेड	9	द्वितीय
3	दुर्गेश बालाजी उमरे	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरी ज तालुका - हदगाव जिल्हा - नांदेड	9	द्वितीय
4	शिफा खाजा बागवान	पीएमश्री खोपोली नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. ७, वासरंग, तालुका - खालापूर, जिल्हा - रायगड	9	द्वितीय
5	शामल सचिन सूर्यवंशी	जिल्हा परिषद शाळा लंगरपेठ, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली	9	द्वितीय
6	बसवेश्वर संतोष शेळगाये	भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, कृष्णूर, तालुका - नायगाव, जिल्हा - नांदेड	8	तृतीय
7	संध्या बालाजी उमरे	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरी ज तालुका - हदगाव जिल्हा - नांदेड	8	तृतीय
8	प्रयाग प्रवीण वाडणेरकर	श्री साई विद्या निकेतन (नंदुरकर), जिल्हा - यवतमाळ	8	तृतीय
9	आरुष जीवन शेंडगे	पीएमश्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, शाळा क्र.55 डॉ. आंबेडकर नगर, रबाले, नवी मुंबई	8	तृतीय
10	लौकिक दिनेश चौधरी	जि. प. शाळा मुसारणे, तालुका – वाडा, जिल्हा – पालघर	8	तृतीय
1	शिफा मेहबूब नदाफ	पीएमश्री खोपोली नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. ७, वासरंग, तालुका - खालापूर, जिल्हा - रायगड	8	तृतीय
12	आरती माधव यंभुरे	जिल्हा परिषद डिजिटल प्रायमरी स्कूल, ढोकसांगवी, तालुका - शिरूर, जिल्हा - पुणे	8	तृतीय

राज्यस्तरीय अंतिम परीक्षा निकाल





राज्यस्तरीय स्पर्धा पारितोषिक समारंभ

राज्यस्तरीय स्पर्धा व्हिडीओ लिंक :

१) https://youtu.be/h-NkJ5Id2JE

२) https://youtu.be/z8hTJQj96QU

राज्यस्तरीय अंतिम परीक्षा निकाल लिंक :

https://www.schoolcompanion.in/2025/04/mi-dnyanvant-gunvant-yashvant-final%20result-2024-25.html

उपक्रम क्र.२ : डिजिटल शोध - समस्या व निराकरण

प्रस्तावना :

आजच्या काळात सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञान विकसित झाले आहे. त्यात मोबाईलचे तंत्रज्ञान इतके वाढले आहे की, ती तर एक मोठी क्रांती झालेली दिसते. आज प्रत्येकाच्या हाती मोबाईल आहे. घरातील प्रत्येक सदस्याकडे मोबाईल आहे. लहान मुलांमध्ये तर या मोबाईलचे आकर्षण खूपच वाढले आहे. आजच्या आधुनिक युगात मोबाईल हा सर्वांची गरज बनला आहे. हा जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे.

विद्यार्थ्यांना मोबाईलच्या अतिवापराचे जणू व्यसनच जडले आहे. या मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक व मानसिक घटकांवर परिणाम होताना

दिसून येत आहे. विद्यार्थ्यांच्या मोबाईलच्या अतिवापराच्या तक्रारी पालकांकडून वारंवार शाळेत येऊ लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोबाईलचे फायदे आणि तोटे समजावून सांगणे महत्त्वाचे वाटू लागले. शाळेत व्याख्यान पद्धतीने मोबाईलचे फायदे आणि तोटे समजावून सांगितल्यास विद्यार्थ्यांना त्याचे गांभीर्य समजणार नव्हते.

वरील समस्येचे निराकरण कसे करावे यावर विचार करत असताना डोक्यात कल्पकतेची वीज चमकली. त्यातूनच मार्ग निघाला विद्यार्थ्यांसमोर मोबाईलचा वापर कसा व किती करावा आणि करताना कोणती काळजी घ्यावी ही समस्या मांडण्यात आली. याचे उत्तर विद्यार्थ्यांना समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्याशी चर्चा करून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे माहिती मिळवण्यास सांगितले. यातूनच पुढे सुरू झाला आमच्या नावीन्यपूर्ण उपक्रमाचा प्रवास.

उद्देश :

- विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील मार्गाने समस्यांकडे जाण्याची क्षमता निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व क्षमता विकसित करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये चौकस विचार करण्याची क्षमता विकसित करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये संप्रेषण कौशल्य विकसित करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे सामाजिक सहभाग घेण्याची क्षमता निर्माण करणे.

प्रत्यक्ष कार्यवाही:

विद्यार्थ्यांसमोर मोबाईलच्या अतिवापराचे फायदे आणि तोटे याची माहिती मिळवण्याची समस्या मांडण्यात आली. ती माहिती प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना न सांगता त्यांना ती माहिती मिळविण्यास सांगितली. यासाठी विद्यार्थ्यांना समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्तींना भेटून त्यांची मुलाखत घेण्यास सांगितले. मुलाखतीतून विद्यार्थ्यांना मोबाईलच्या वापराविषयीची मते जाणून घेण्यास सांगितले व त्याविषयी माहिती मिळवण्यास सांगितले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षरीत्या शाळेतील शिक्षक, इतर शाळेतील विद्यार्थी, कॉलेजवयीन मुले, आजूबाजूच्या परिसरातील व्यावसायिक यांच्या मुलाखती घेतल्या. या मुलाखतीत विद्यार्थ्यांच्या मोबाईल विषयीच्या प्रश्नांना पाझर फुटला होता. या प्रश्नातूनच विद्यार्थ्यांना मोबाईलच्या वापराचे फायदे आणि तोटे, वापर करताना कोणती काळजी घ्यावी आणि किती वेळ वापरावा याची माहिती मिळाली आणि प्रत्यक्ष मुलाखतीचाही अनुभव घेता आला.




फलनिष्पत्ती :

नाविन्यपूर्ण अश्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे समाजात सहभाग घेण्याची क्षमता निर्माण झाली. विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील मार्गानी समस्येची पूर्तता करण्याची क्षमता निर्माण झाली. विद्यार्थ्यांमध्ये संप्रेषण कौशल्य विकसित झाले. विद्यार्थ्यांमध्ये चौकस विचार करण्याची क्षमता निर्माण झाली.








मुलाखत व्हिडीओ लिंक :

१) https://youtu.be/sLQRVGF83bw?si=v8EnM7AgH91HbsPc
२) https://youtu.be/t8NM9d9exzQ?si=0-HXaWJH3RffZiGY
३) https://youtu.be/QVjeXGwZLr4?si=hT2OiTs4rHx5iyQt
४) https://youtu.be/jeif5QS_X-M?si=Wn9NebOO52YCcDqu
५) https://youtu.be/EZbCPOPcPew?si=JR_dBMyJJsxqpF8a
६) https://youtu.be/nqE1we_eTIA?si=jUyB1A5U8YaQOdGx

उपक्रम क्र.३ : शालेय मंत्रिमंडळ निवडणूक (तंत्रज्ञानाची जोड)

प्रस्तावना :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये विविध मूलभूत क्षमता असणे अपेक्षित आहे. वाचन, लेखन, भाषण, संभाषण याबरोबर चौकस विचार, समस्या निराकरण, स्व व्यवस्थापन, कार्य करण्याची क्षमता, सामाजिक सहभाग घेण्याची क्षमता अशा अनेक मूलभूत क्षमता विद्यार्थ्यांनी अंगीकाराव्यात यासाठी आमच्या शाळेत विविध सहशालेय उपक्रम राबवण्याचा माझा हेतू होता. मूलभूत क्षमतांना समोर ठेवून शाळेमध्ये कोणते उपक्रम राबवता येईल यावर सर्व शिक्षकांसोबत चर्चा करून वर्षभर कोणते उपक्रम राबवायचे अशा उपक्रमांचे नियोजन केले गेले. त्यापैकीच एक शालेय मंत्रिमंडळ निवडणूक हा एक उपक्रम आमच्या शाळेमध्ये राबविण्यात आला आहे.

उद्देश :

- या उपक्रमाचा पहिला उद्देश विद्यार्थ्यांना आपल्या भारतीय लोकशाहीचे ज्ञान व्हावे हा होता.
- मिशन विकसित भारत या उपक्रमाला समोर ठेवून आजचे विद्यार्थी हे उद्याच्या राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. हे जाणून प्रत्येक विद्यार्थी एक सुजाण नागरिक घडला पाहिजे, हा यामागचा उद्देश होता.
- सर्व विद्यार्थ्यांना राज्यस्तर, राष्ट्रीय स्तर तसेच स्थानिक पातळीवरील निवडणुका कोणत्या पद्धतीने होतात हे या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना समजावून देता येईल.
- या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे सामाजिक सहभाग घेण्याची संधी देणे.
- विद्यार्थ्यांना ईव्हीएम मशीन कशा पद्धतीने कार्य करते याची माहिती देता येईल.


- विद्यार्थ्यांमध्ये असलेले नेतृत्व गुण वाढीस लावणे. विद्यार्थ्यांना एखादे कार्य सोपवून त्याचे व्यवस्थापन करणे, विविध कार्य करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

कार्यवाही :

१) सर्वप्रथम विद्यार्थ्यांना सदर उपक्रमाची संपूर्ण माहिती एक आठवडा आधी देण्यात आली.
२) शालेय मंत्रिमंडळात सहभागी होऊ इच्छित असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सांगितला
३) आलेल्या उमेदवारी अर्जातून अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली आणि संपूर्ण विद्यार्थ्यांसमोर ते घोषित करण्यात आले.
४) निवड झालेले उमेदवार यांना दोन दिवस प्रचार करण्यासाठी देण्यात आले.
५) आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत दिनांक रोजी शालेय मंत्रिमंडळ निवडणूक घेण्यात आली.
६) मतदान करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी आधार कार्ड आणण्यास सांगितले होते.
७) मोबाईलवर ईव्हीएम मशीन डाऊनलोड करून त्याचा वापर मंत्रिमंडळ निवडणुकीमध्ये करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी ईव्हीएम मशीनद्वारे आपले मत नोंदवले.
८) ईव्हीएम मशीनद्वारे झालेल्या निकालाची नोंद घेऊन निकाल जाहीर करण्यात आला.

फलनिष्पत्ती :

१) या उपक्रमामुळे सर्व विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया कशी चालते याबाबत ज्ञान झाले.
२) या उपक्रमात इयत्ता तिसरी ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सर्व विद्यार्थ्यांना निवडणुकीसाठी आपल्या ओळखीचा पुरावा देणे अपेक्षित आहे हे लक्षात आले. आपण केलेले मतदान हे गोपनीय असले पाहिजे याचे ज्ञान झाले.
३) या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांनी शाळेत होणाऱ्या सर्व सहशालेय उपक्रमांमध्ये सहभाग घेणे महत्त्वाचे आहे याचे ज्ञान झाले. यातून आयुष्यात समाजात घडणाऱ्या निवडणुकीमध्ये आपले किती महत्त्वाचे स्थान आहे याचे ज्ञान होण्यास मदत झाली.
४) शालेय मंत्रिमंडळात निवड झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन करून त्यांना कामाचे स्वरूप सांगण्यात आले.



५) दिलेल्या कामानुसार सर्व मंत्रिमंडळातील उमेदवार आपली जबाबदारी उत्तमपणे पार पाडत आहेत. सकाळी परिपाठापासून ते सायंकाळी शाळा सुटल्या नंतर सर्व विद्यार्थी घरी जाईपर्यंत प्रत्येक कामात मंत्रिमंडळातील सर्व मंत्री उत्स्फूर्तपणे सहभागी होतात.

६) प्रत्येक कामात सहभाग घेतल्यामुळे कामाचे व्यवस्थापन कसे करावे नियोजन कसे करावे तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध कामे करण्याची क्षमता या उपक्रमामुळे आम्हाला निर्माण करता आली.









प्रत्यक्ष मतदान व्हिडीओ लिंक :

१) https://youtu.be/06O297EmWgM?si=y7rvJf3aAGPqOXWW

२) https://youtu.be/2nQzgOwiWxs?si=ddbgV0UO_RDgCYfc

३) https://youtu.be/uPHlqiQKlec?si=x8JIhE0-phB-YIZ4

४) https://youtu.be/-tYQECTXFr4?si=TrT5DHuzbPg2eiTK

उपक्रम क्र.४ : क्षेत्रभेट - एक अद्‌भुत प्रवास

प्रस्तावना :


विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेशी नसते तर प्रत्यक्ष अनुभवही तितकेच महत्त्वाचे असतात. अशा अनुभवांना समृद्ध करण्यासाठी क्षेत्रभेट हा एक प्रभावी उपक्रम आहे. क्षेत्रभेट म्हणजे शिक्षणाच्या उद्देशाने एखाद्या विशिष्ट स्थळी दिलेली भेट. तिथे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहणी, निरीक्षण आणि संवादाद्वारे ज्ञान मिळते.

क्षेत्रभेटीच्या माध्यमातून केवळ पुस्तकातली माहिती नव्हे तर प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळते. नवीन गोष्टी पाहण्याची, समजून घेण्याची आणि प्रश्न विचारण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. त्यामुळे त्यांची जिज्ञासा वाढते आणि विचारशक्तीला चालना मिळते.

आमच्या शाळेने दोन टप्प्यांमध्ये क्षेत्रभेटीचे आयोजन केले होते. इयत्ता १ली ते ५वी पुणे दर्शन इयत्ता ६वी ते ७वी मुंबई दर्शन. या दोन्ही भेटीं ऐतिहासिक स्थळे, विज्ञान केंद्र, खगोलीय केंद्र वस्तू संग्रहालय, समुद्र, धरणे या शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी झाल्या. ही क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण, प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक ठरली. त्यामुळे या भेटीचा अनुभव व निरीक्षणाचा संपूर्ण अहवाल या ठिकाणी सादर करीत आहोत.

उद्देश :

- ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन आपल्या देशाच्या वैभवशाली इतिहासाची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे.
- वैज्ञानिक केंद्र किंवा विज्ञान संग्रहालयामध्ये जाऊन विविध प्रयोग, उपकरणे व संकल्पना प्रत्यक्ष पाहून विज्ञान विषयक उत्सुकता निर्माण करणे.
- ब्रम्हांड, ग्रह, तारे, उपग्रह आणि खगोलीय संकल्पनांची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून देणे.
- समुद्रकिनारा, धरण, प्राणीसंग्रहालय यांसारख्या निसर्ग रम्य स्थळांना भेट देऊन निसर्गातील विविध घटकांची माहिती मिळवणे व पर्यावरण संवर्धनाची जाणीव करून देणे.
- शालेय पाठ्यपुस्तकातील संकल्पना प्रत्यक्ष पाहून अनुभवात्मक ज्ञान शिक्षण मिळविणे.
- इतर विद्यार्थ्यांसोबत एकत्र प्रवास व निरीक्षणातून सहकार्य, शिस्त, वेळेचे नियोजन यांची सवय लावणे.
- क्षेत्रभेटीमध्ये विचारले प्रश्न,घेतलेली निरीक्षणे यामुळे संशोधनाची गोडी लागणे.



कार्यवाही :


शाळेने इयत्ता १ली ते ५वी चे १५७ विद्यार्थी आणि ८ शिक्षकांसह पुणे क्षेत्रभेट व इयत्ता ६वी ते ७वी चे ६३ विद्यार्थी आणि ४ शिक्षकांसह मुंबई क्षेत्रभेट आयोजित केली होती.

मुंबई दर्शन :

१) जिजामाता राष्ट्रीय उद्यान - येथे विद्यार्थ्यांनी विविध प्राणी, पक्षी, सर्प यांचे दर्शन घेतले. तसेच विविध प्रकारचे वृक्ष, झाडे, वनस्पतींची ओळख झाली, एकूणच जैवविविधतेचे दर्शन झाले. पेंग्विन सारखे पक्षी प्रत्यक्ष पाहून विद्यार्थ्यांना मोठी गंमत वाटली.
२) नेहरू तारांगण : येथे ब्रह्मांड, ग्रह, तारे, सूर्य, चंद्र यांच्या गुड रहस्यांची रोचक माहिती मिळाली. तसेच आकाशगंगा, विविध नक्षत्र, विश्वाची निर्मिती इत्यादीचे मनमोहक शो आणि सादरीकरण पाहायला मिळाले. या ठिकाणचे सर्वात आकर्षण म्हणजे क्युबिकल्स च्या मदतीने सौर मंडळाच्या नऊ ग्रहांमध्ये तुमचे वजन मोजू शकता याचा विद्यार्थ्यांनी खूप आनंद घेतला.
३) नेहरू विज्ञान केंद्र : नेहरू विज्ञान केंद्राच्या प्रवेशद्वाजवळ विज्ञान आधारित वस्तूंनी भरलेली एक बाग आहे त्यामध्ये प्रत्यक्ष अनुभव घेऊन मुले खूप खुश झाली. येथे विज्ञान केंद्र, विज्ञान ओडिसी फिल्म, विज्ञान ऑन अ स्फियर, विज्ञान शो आणि मोशन सिम्युलेटर असे पाच प्रमुख भाग मुलांना दाखविण्यात आले. हे सर्व पाहून मुलांचा आनंद गगनात मावेनासा झाला.
४) गेटवे ऑफ इंडिया : म्हणजेच भारताचे प्रवेशद्वार इंग्रज येथूनच भारतात आले ही माहिती विद्यार्थ्यांना पुरविली. तसेच येथून जगप्रसिद्ध एलिफंटा केव्ह्जला जाता येते. गेटवे ऑफ इंडियाच्या समोरचे प्रसिद्ध फाइव स्टार ताज हॉटेल मुलांना दाखवले.
५) अष्टविनायक क्षेत्र महड : सहलीची सांगता अष्टविनायक गणपती मंदिराचे दर्शन घेऊन झाली.

पुणे दर्शन :

१) खडकवासला धरण : पुणे शहराला पाणीपुरवठा करणारे हे धरण पुण्यापासून १५ किलोमीटर दूर असून सिंहगड रोडवर आहे. या धरणाचे प्रचंड जलाशय पाहून विद्यार्थी अचंबित झाले.
२) केळकर वस्तू संग्रहालय : हे प्रसिद्ध ऐतिहासिक वस्तू संग्रहालय आहे. येथे इसवी सन १८९६ ते १९९० पासूनच्या जुन्या वेगळ्या प्रकारच्या वस्तू, दिवे, अडकिते, पेटारे, पानदाण्या, पुंकण्या, शस्त्रे, अत्तरदाण्या, सोंगट्या, कळसुत्री बाहुल्या इत्यादी वस्तू तसेच सुंदर असे मस्तानी हॉल पाहून विद्यार्थी हरपून गेले.



३) राजीव गांधी झूलॉजिकल पार्क (सर्पोद्यान) : या प्राणीसंग्रहातील प्राणी जसे की वाघ, सिंह, हत्ती, हरीण, अस्वल, तरस, माकडे असे जवळजवळ ३०० पेक्षा अधिक प्रकारचे प्राणी या पार्कमध्ये मुलांनी पाहिले. तसेच २० पेक्षा जास्त सापांचे प्रकार व खूप झाडे, पक्षी, कासवांचे वेगवेगळे प्रकार, मगरांचे प्रकारे इत्यादी पाहून व येथील जैवविविधता पाहून विद्यार्थी खूप आनंदित झाले

४) शनिवार वाडा : ऐतिहासिक शनिवार वाडा फिरवून त्याचा इतिहास विद्यार्थ्यांना सांगण्यात आला. एवढी प्रचंड ऐतिहासिक वास्तू पाहून मुले हरखून गेली.

फलनिष्पत्ती :

या क्षेत्रभेटीद्वारे मुलांना विविध राष्ट्रीय, वैज्ञानिक, ऐतिहासिक जैवविविधता असणारी ठिकाणे आणि सांस्कृतिक स्थळांना प्रत्यक्ष घेऊन जाता आले. त्यांनी आतापर्यंत ज्या गोष्टी केवळ टीव्हीवर, सोशल मीडियावर पाहिल्या होत्या त्या त्यांनी प्रत्यक्ष बघितल्याने त्यांच्या डोळ्यातील कुतूहल, उत्साह आणि ज्ञानग्रहण करण्याची क्षमता आम्हाला अनुभवता आली.

धरणे, राष्ट्रीय उद्याने, प्राणी संग्रहांलयांना भेट दिल्याने मुल निसर्गाच्या गेली. आपोआपच भूतदया, निसर्गप्रेम, वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांच्या अंगी बाणण्यास मदत झाली. ऐतिहासिक वास्तू पाहिल्याने कुतूहल, भारताच्या गौरवशाली इतिहासाचे जतन करणे व तो समजून घेणे या गुणांची जोपासना होताना दिसली.

तारांगण, नेहरू विज्ञान केंद्र हे पहिल्यांनंतर ब्रह्मांडाची ओळख झाली. भूगोलाची आवड वाढीस लागली. तसेच वैज्ञानिक घटना, प्रयोग पाहिल्याने प्रत्येक घटनेच्या मागे काय विज्ञान लपलेले आहे ते जाणून घेण्याची उत्सुकता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होताना दिसली. उत्साहाचे वातावरण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाले. एकूणच या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये खूपच सकारात्मक बदल दिसून येत आहेत.








मुंबई दर्शन









पुणे दर्शन

उपक्रम क्र.५ : बालसभा

प्रस्तावना :


मुलांना व्यासपीठ मिळते ते फक्त स्पर्धांपुरतं म्हणजेच वक्तृत्व, कथाकथन,प्रश्नमंजुषा किंवा सांस्कृतिक कार्यक्रम अशा माध्यमातून. पण त्याही पलीकडे मुलांना खूप बोलायचे असते समजून घ्यायचे असते. खूप छोट्या छोट्या अपेक्षा असतात मुलांच्या. म्हणूनच मुलांना हवं असतं त्यांचं असं हक्काचं व्यासपीठ. हे व्यासपीठ मिळणं हा मुलांचा हक्क आहे. मुलांना हक्क बरोबरच जबाबदारी आणि कर्तव्य ही समजली पाहिजेत. व्यासपीठाचा कसा वापर करायचा याची जाणीव हवी आणि या जाणिवेतूनच शाळेत बालसभा हे व्यासपीठ निर्माण करावे असे कल्पना डोक्यात सुचली. बालसभा म्हणजेच बालकांनी बालकांसाठी आयोजित केलेली सभा. हे बालकांच्या म्हणजेच मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे व्यासपीठ आहे. बालसभा मुलांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण किंवा इतर कलागुण विकसित करण्यासाठी अत्यंत प्रभावी माध्यम आहे.

उद्देश :

- विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे
- विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देणे
- विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिवेचा विकास करणे
- विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व क्षमता विकसित करणे
- विद्यार्थ्यांना स्वतःचे विचार व्यक्त करण्याची संधी निर्माण करणे
- विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य वृत्ती वाढीस लावणे
- विद्यार्थ्यांना मनोरंजनात्मक शिक्षण देणे

कार्यवाही :

बालसभा आयोजित करण्यापूर्वी सभेची तयारी करणे आवश्यक असते. त्यासाठी बालसभेची तारीख, वेळ निश्चित करण्यात येते. तसेच मुला-मुलींना सभेबद्दल, कोणत्या विषयाची सभा आहे याविषयी माहिती देण्यात येते. तसेच त्यांना सभेत सहभागी होण्याविषयी प्रोत्साहित केले जाते. बालसभेमध्ये इ.३री ते ७वी वर्गातील काही निवडक विद्यार्थी या सभेचे सदस्य असतात. ते आपल्या सदस्यांपैकी एक विद्यार्थी अध्यक्ष म्हणून निवडतात. एक विद्यार्थी सूत्रसंचालनाचे काम करतो व इतर विद्यार्थी बालसभेच्या नियोजनाची संपूर्ण जबाबदारी उचलतात.



बालसभा पूर्ण वर्षभर शाळेत साजरे केल्या जाणाऱ्या सर्व जयंत्या, शिक्षक दिन, गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, शाळेत घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा या सर्वांचे नियोजन करते. वर्षभर होणारे सर्व कार्यक्रम बालसभा उत्तमरीत्या पार पाडत असते. याव्यतिरिक्त स्वच्छता अभियान, प्रदूषण मुक्त शहर, पर्यावरण दिन, वृक्षारोपण यासारख्या विषयावर ही बालसभा कार्य करत असते

फलनिष्पत्ती :

बालसभेमुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढीस लागला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि सांघिक भावना वाढीस लागली. विद्यार्थ्यांना स्वतःचे विचार आणि कल्पना व्यक्त करण्याचे एक व्यासपीठ मिळाले. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व क्षमता विकसित झाली. विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण झाली. एकमेकांच्या मदतीने एकत्रितपणे काम करण्याची सवय लागली. बालसभेत कामे वाटून दिल्यामुळे, त्यांच्या आवडीचं काम करायला मिळाल्यामुळे त्यांच्यात उत्साह निर्माण झाला. एकूणच बालसभेमुळे विद्यार्थ्यामध्ये सकारात्मक बदल दिसून आला.











समारोप :

अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकसित करण्यासाठी राबवण्यात आलेल्या विविध सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये भाषण कौशल्य, चौकस विचार करणे, व्यवस्थापन, स्वतः कार्य करण्याची क्षमता, नेतृत्व गुण, सामाजिक बांधिलकी असे व्यक्तिमत्त्वातील अनेक गुण वाढीस लागले आहेत. शांत, अबोल असणारे विद्यार्थी सुद्धा अशा वेगवेगळ्या उपक्रमामुळे विविध कामात स्वयंप्रेरणेने सहभाग घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतेत झालेले बदल पाहता शाळेतील मुख्याध्यापक सर्व शिक्षक यांच्या माध्यमातून शाळेमध्ये नवनवीन सहशालेय उपक्रमांचे नियोजन शाळास्तरावर केले जात आहे.

----------**----------

उपक्रमशील शालेय नेतृत्वातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा शिरखल ओलवण व सोंडेघर जाधववाडी

शाळेचा पत्ता - शिरखल ओलवण व सोंडेघर जाधववाडी, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी

मुख्याध्यापक नाव - श्रीम. स्वाती शिवाजी गुरव

मुख्याध्यापक ईमेल आयडी - swatigurav09071989@gmail.com


कोकण म्हटलं की, निसर्गाने मुक्त असताना उधळण केलेले परिसर. अशा सुंदर परिसरातील रत्नागिरी जिल्ह्यातील, दापोली तालुक्यातील डोंगराच्या कुशीत लपलेले शिरखल हे गाव. या गावातील ओलवण व जाधववाडी सुंदर आणि परिपूर्ण झाडांनी वेढलेली आणि वाडीच्या एका बाजूला असलेले जि.प. शिरखल ओलवणची दुमजली टुमदार अशी शाळा. शाळा छोटीशी! विद्यार्थी सुद्धा 5-6 असलेली ही आदर्श शाळा.

सन 2022-23 मध्ये मुख्याध्यापिका म्हणून श्रीम. स्वाती शिवाजी गुरव या रुजू झाल्या. आणि बघता बघता त्यांनी या आदर्श शाळेला गुणवत्तेचा कळसच चढवून दिला. मुख्याध्यापिका गुरव मॅडमनी प्रथम शाळेचा परिसर रंगीबेरंगी शब्दांनी व विविध फुलांनी नटवला. तिन्ही बाजूने संरक्षक भिंत आणि निसर्गाच्या कुशीत नटलेली ही बोलकी शाळा.

जि. प. रत्नागिरीची आदर्श शाळा असा एवढ्यावरच हा प्रवास थांबला नाही. त्यानंतर परिसरातील उत्तम दर्जाची डिजिटल शाळा म्हणून ही शाळा नावारूपाला आली. शाळेमध्ये मुले ई- शिक्षणाचे धडे गिरवू लागली. विविध उपक्रम शाळेमध्ये राबवले जावू लागले. विशेष म्हणजे शाळेला वाडीचा खूप मोठा आधार आहे. ग्रामस्थांच्या श्रमदानातून शाळेतील कामे पार पाडली जातात. वाडी अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तसेच शाळेच्या प्रत्येक कामात ग्रामस्थांचे मोठे योगदान आहे. मधल्या काळात वेगवेगळे शिक्षक घेऊन गेले. त्यांनीही आदर्श शाळेची परंपरा कायम ठेवली त्यानंतर सन 2022-23 मध्ये जिल्हांतर्गत बदलीने श्रीम. स्वाती शिवाजी गुरव या मुख्याध्यापक म्हणून रुजू झाल्या आणि त्यांनी शाळेच्या प्रगतीला खऱ्या अर्थाने वेग आणला. एक उपक्रमशील शिक्षक व तंत्रस्नेही शिक्षक शाळेला मिळाला.

गुरव मॅडमनी घर भेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवासात सातत्याने ठेवले. याच काळात सौ. गुरव मॅडम यांनी चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती अभ्यासाच्या सरावात कुठलाही खंड पडू दिला नाही. याचा परिपाक म्हणजे सन 2024-25 च्या महाराष्ट्र शासनाच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेने जिल्हा गुणवत्ता यादीत झेप घेतली. जवाहर नवोदय विद्यालयापर्यंत शाळेने आपली चमक दाखवली. शिवाय मंथन, I am Winner, VDS IV, सैनिक स्कूल अशा स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले .

या शाळेच्या प्रगतीसाठी सौ. गुरव मॅडम यांची प्रचंड धडपड, तळमळ व मेहनत दिसून येते. जास्तीत जास्त विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत यावेत, ही गुरव मॅडम यांची तळमळ विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या मेहनतीच्या माध्यमातून दिसून येत आहे.



हे यश प्राप्त करण्यासाठी मुलांचे मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर भर दिला. त्यासाठी शाळेत वेगवेगळे उपक्रम घेतले.

शाळा प्रवेशोत्सव - यामध्ये पट वाढवण्यासाठी गृहभेटी घेऊन शाळेची पटसंख्या 3 वरून 7 झाली. प्रवेशोत्सव दणक्यात घेण्यात आला व येतो. यामध्ये फुगे, फुले, औक्षण, पायाचे ठसे घेऊन मुलांचे स्वागत करण्यात आले.

कृतीतून अध्यापन / रांगोळी पाटी - शाळेमध्ये रांगोळी व वाळू पाटी तयार करून त्यामध्ये अक्षर गिरवणे, उभ्या, आडव्या, तिरप्या रेषा काढावयास शिकवले. प्रथम बरेच दिवस बडबडगीते, छोट्या कविता, प्राण्यांचे आवाज शिकवले.

कथा / गोष्टी - लहान मुलांना आजी आजोबांच्या गोष्टी आवडतात. त्याचप्रमाणे शाळेतही परिपाठात एखाद्या प्राण्याची, पक्षी, झाडाची गोष्ट रोज सांगितली जाते. म्हणून श्रवणशक्ती विकसित होते. तसेच त्यावर आधारित प्रश्न विचारून आकलनशक्ती प्रवास सुरू केला जातो. चित्रकथा, चित्रवर्णन, चित्रातील फरक ओळखा, सारख्या जोड्या लावा अशा कृती घेऊन भाषा विकासाकडे लक्ष दिले जाते.

नाटिका - यामध्ये त्रिकोण, चौकोन, आयत यांसारख्या भौमितिक आकारांवर आधारित नाटिका, मराठी महिने, इंग्रजी महिने तसेच बोधप्रद यावर आधारित नाटिका बसवल्या आहेत. त्यामुळे फावल्या वेळात मुले सराव करतात. संभाषण विकास होऊन आत्मविश्वास वाढीस लागला.


गणितीय खेळ — लांब, आखूड, उंच, ठेंगणा, मागचा, पुढचा, दूर जवळ हे संबोध दृढ करण्यासाठी वस्तूचा, परिस्थितीचा वापर करून शिकवले गेले. त्यामुळे संबोध स्पष्ट झाले. तसेच विविध गणितीय खेळ, डोंगराला आग लागली, असे अनेक खेळ खेळण्यात आले.

बोलका वर्ग व बोलक्या भिंती - वर्ग हा प्राणी, पक्षी, विविध आकार, स्कॉलरशिप माहिती यांनी सजवलेला आहे. त्यामुळे वर्गात मुलांना उत्साह वाटतो.

शैक्षणिक ग्रुप तसेच तंत्रज्ञानाचा वापर - शाळेत सामाजिक बांधिलकीतून 2 लॅपटॉप, स्पीकर, इतर शैक्षणिक साहित्य मिळालेले आहे. त्यामुळे विविध शैक्षणिक ग्रुप व तंत्रज्ञानाचा वापर मुलांना दिला जात आहे.

लेखन कोपरा — प्रत्येक शाळेत वाचन कोपरा असतो. त्याचप्रमाणे माझ्या शाळेत लेखन कोपरा विकसित केला आहे. यामध्ये खडू, फळा, चित्रकलेच्या वह्या, वही, स्केच पेन इत्यादी साहित्य ठेवलेले असते. त्यावर मुले चित्रे, अक्षरे, वाक्ये, जोडशब्द, समानार्थी शब्द लिहितात.

ओपन लायब्ररी - शाळेमध्ये शैक्षणिक उठावातून तसेच समग्र शिक्षा अंतर्गत मोठ्या प्रमाणात पुस्तकांचा साठा आहे. त्यामुळे एका वर्गखोलीत चार बेंचेस, टेबल व ग्रंथालय कपाट ठेवलेले आहे. निसर्ग शाळेत मुले पुस्तके जाऊन वाचतात, तसेच वाचलेल्या पुस्तकाविषयी माहिती सांगतात. नोंदवहीत नोंद करतात. माझ्या शाळेतील पहिला इयत्तेतील मुले दिवाळी नंतर छोटी छोटी पुस्तके वाचावयास सुरुवात करतात. 2 री व 3 री तील मुले तर अस्खलितपणे वाचतात.



सहाध्यायी अध्ययन - माझ्या शाळेत 1 ली, 2 री, 3 री, 4 थी व 5 वी असे पाचही वर्ग चालू आहेत व मी एकटी शिक्षिका तेथे कार्यरत आहे. त्यामुळे लहान इयत्तेतील मुलांचे वाचन लेखन शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार मोठ्या इयत्तेतील मुले घेतात त्यामुळे क्षमता विकास होतो.

निसर्ग शाळा - गणिती अभ्यासासाठी निसर्ग शाळा करून त्यादिवशी दगड, काड्या, काठ्या, पाने, फुले यांच्या माध्यमातून दशक, एकक संकल्पना, बेरीज, वजाबाकी संकल्पना, आकृतीबंध, भौमितिक आकार मुले समजून घेतात. रानभाज्या प्रदर्शन सुद्धा घेतो.

बाजार जत्रा — लहान मुलांमध्ये गणित विषय पक्का व्हावा यासाठी शाळेमध्ये बालआनंद मेळावा व बाजार जत्रा या उपक्रमांतर्गत शेतातील भाज्या विक्रीस ठेवल्या जातात.


शिक्षण हे मानवाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शिक्षणाशिवाय मानवी जीवन हे वाळवंटासारखे आहे. या वाळवंटमय जीवनात सुखाची हिरवळ फुलवायची असेल तर शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण हे मानव समाज रचनेचे, निर्मितीचे व समाज उन्नतीचे परिवर्तनाचे शास्त्र आहे. शाळा हे असे शिक्षण देणारे ज्ञानमंदिर आहे की, येथे बसून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी आवश्यक असलेली शिदोरी मिळत असते. जी संपूर्ण आयुष्यभर त्यांच्या सोबत असते.

आमच्या निसर्गरम्य दापोली तालुक्यातील शिरखल ओलवण येथे असेच एक ज्ञानमंदिर आहे. जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा शिरखल ओलवण. ही शाळा सर्व सोयीनी युक्त , शिस्तप्रिय, आदर्श, गुणवत्तापूर्ण, भौतिक सुविधायुक्त व निसर्गमय वातावरणातील शाळा आहे.

शिरखल ओलवण ते सोंडेघर जाधववाडी येथील अतिशय मागासलेल्या या ग्रामीण भागात मुला-मुलींना चांगले दर्जेदार शिक्षण घेता यावे व सामान्य कुटुंबातील मुलामुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे या उद्देशाने या शाळेची स्थापना करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. गुरव मॅडम हा उद्देश पुर्णत्वास नेण्यासाठी या ग्रामीण भागात प्रचंड मेहनत घेत आहेत व या मेहनतीला शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांचीही मोलाची साथ मिळत आहे. म्हणूनच ही आदर्श शाळा प्रगतीपथाकडे वाटचाल करत आहे.

शाळेत राबवले जाणारे उपक्रम -

- आदर्श परिपाठ
- सांस्कृतिक कार्यक्रम
- सामान्यज्ञान स्पर्धा
- क्रीडा स्पर्धा
- चित्रकला स्पर्धा
- वकृत्व स्पर्धा
- सुंदर हस्ताक्षर स्पर्धा
- स्वच्छ शाळा, सुंदर शाळा
- महिला मेळावा
- शारदोत्सव
- पालक मेळावा
- कथा सादरीकरण



शासकीय नियमांनुसार विनामूल्य प्रवेश दिला जातो. विद्यार्थ्यांचे प्रवेशाच्या वेळी वाजत गाजत गुलाब पुष्प देऊन स्वागत केले जाते. शिरखल ओलवण या शाळेत आनंदाने लहान लहान मुले पहिलीला दाखल होतात व या शाळेत रमून जातात.

शाळेची वैशिष्टे -

- अनुभवी शिक्षक वृंद
- शाळेची सुसज्ज भव्य दिव्य इमारत
- सुसज्ज मैदान व सर्व बाजूंनी झाडे
- पिण्यासाठी शुद्ध पाणी
- मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह
- विविध स्पर्धामध्ये सहभाग
- मध्यान्ह भोजनात स्वादिष्ट व रुचकर आहार
- विद्यार्थ्यांवर वृक्ष संवर्धनाचे संस्कार
- उज्वल निकालाची परंपरा
- स्पर्धा परीक्षेतील उल्लेखनीय यश
- निबंध वक्तृत्व स्पर्धांत विशेष प्रगती
- शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत झेप

शाळेची प्रगती होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, सर्व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. तसेच मुख्याध्यापिका सौ. गुरव मॅडम शाळेच्या प्रगतीसाठी खूप मेहनत घेत आहेत.

जिल्हा परिषद शाळा शिरखल ओलवण ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय सामोरे ठेवून काम करत आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडण्यासाठी ही शाळा झटत आहे.

"बल सागर भारत हो होवो,
विश्वात शोभूनि राहो"


हे साने गुरुजींचे स्वप्न विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी मुलांवर उत्तम संस्कार या विद्यामंदिरातून होत आहेत. श्रम प्रतिष्ठ्येसारखी मूल्य आज आमच्या शाळेत पहिलीपासून रुजवली जात आहेत.

"गुणवत्ता हा एकच ध्यास, साधूया विद्यार्थी विकास" ही प्रेरणा घेऊन शाळेची यशस्वी वाटचाल चालू आहे.

"बिनभिंतीची उघडी शाळा , लाखो इथले गुरु
झाडे वेली पशू पाखरे, त्यांच्याशी मैत्री करू"

याची प्रत्यक्ष अनुभूती देणारी आमची ही आदर्श शाळा उत्तरोत्तर अशीच भरभराट करेल याची मनापासून खात्री देते.

----------**----------



रोबोटिक व कोडींगचे ज्ञान देणारी विज्ञानाधिष्ठित शाळा

शाळेचे नाव - जि. प. पू., प्रा. गोखले कन्या शाळा ता. राजापूर

शाळेचा पत्ता - राजापूर,जिल्हा रत्नागिरी


शाळेचा ईमेल आयडी - zppsgokhalekanya58@gmail.com

मुख्याध्यापकांचे नाव - सौ. सायली एकनाथ भडाळे

मोबाईल क्रमांक - ८०८७२७९२८८

जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक गोखले कन्या शाळेची स्थापना १९०४ असून ही शाळा फक्त मुलींची होती. कालांतराने ही शाळा मुला मुलींची करण्यात आली. सन २००४ या समग्र शिक्षा अभियाना अंतर्गत स्लॅबची दुमजली टुमदार इमारत उभी राहिली. २०११/१२ पर्यंत शाळेचा पट २०० च्या आसपास होता. शाळेचे शिक्षक बदलले आणि शाळेच्या गुणवत्तेचा ऱ्हास होत गेला. शाळा सेमी इंग्रजी नव्हती. पालकांचा कल सेमी इंग्रजी कडे होता. शाळेसमोरच दोन पर्याय उपलब्ध असल्याने पालकांचा तिकडे ओढा होता. समोरच्या सेमी इंग्रजी शाळेमध्ये प्रत्येक वर्गाला एक /दोन शिक्षक उपलब्ध होते. मात्र या शाळेत फक्त चार शिक्षक उपलब्ध होते. त्याचा परिणाम अध्ययन अध्यापनावर होतो. ही कन्याशाळा आहे त्यामुळे मुलग्यांना इतर शाळा प्रत्यक्ष भेटून त्यांच्या मनावर हे बिंबवीत व त्याला नाईलाजाने शाळा सोडायला भाग पाडत किंवा दाखल होणारे मूल दाखल होत नसे. ते मूल मग पालकांचेही ऐकत नसे. शिक्षक हे जादा वेळ काम करायला तयार नसत. १०.३० ते ५ या प्रशासकीय वेळेतच काम करत. मात्र इतर शाळा जादा तास घेत असत. त्यामुळे पालक वर्ग दुसऱ्या शाळेकडे आकर्षिला गेला. १० वर्षा पूर्वीपासून बंद असलेल्या पडक्या वर्ग खोल्यांमध्ये भुते राहतात असा समज तेथील लोकांनी इतरांना करून दिलेला कारण त्यांना ही शाळा बंद करायची होती. शिक्षक व पालक यांच्यातील आंतरक्रीया कमी झाली होती. सन २०१५-१६ नंतर एकही मूल शिष्यवृत्ती परीक्षेला गुणवत्ता यादीत आलेले नव्हते. याचा फार मोठा परिणाम शाळेची पटसंख्या कमी होण्यात झाला. ही शाळा पूर्वीच्या स्मशानभूमीत बांधण्यात आलेली आहे, त्यामुळे या शाळेचा विकास होणार नाही असे काही लोक पसरवत होते. त्याचा परिणाम हळूहळू पटसंख्येवर झाला. शाळेची दुरावस्था होत गेली. विद्यार्थी व पालक यांनी शाळेकडे पाठ फिरवली २०२० मध्ये सुरू झालेल्या कोरोनामुळे पटसंख्येत लक्षणीय घट झाली. २०२२/२३ ला पटसंख्या बारा वर येऊन ठेपली. शाळेत येणारी ही गतिमंद व मतिमंद अशीच मुले होती. शाळा बंद करण्याच्या हालचाली दिसू लागल्या. परंतु शालेय परिसरातील ग्रामस्थ शाळा बांधकामात ज्यांचे योगदान मोलाचे होते असे राजाभाऊ रसाळ. एक व्यावसायिक, त्यांनी शाळा बंद न पडण्याचा जणू काही विडाच उचलला. त्यासाठी स्वतः पदर मोड करून शाळेची डागडुजी केली. हे करत असताना त्यांना शाळेतील शिक्षकांची साथ मिळणे अपेक्षित होते; परंतु ती मिळाली नाही, पण त्यांच्या कार्याला निश्चितच यश मिळाले.

सन २०२३/२४ च्या बदल्यामध्ये कमी पटसंख्या असणारी शाळा म्हणून ही शाळा कोणी घेत नव्हते. पण हे धाडस पदवीधर शिक्षक श्री. सुहास काडगे यांनी दाखवले. त्यावर्षी पालकांशी संपर्क करून तेव्हाचे मुख्याध्यापक श्री अनिल यादव व श्री.सुहास काडगे यांनी हा पट ३४ वर नेला. शाळेच्या गेटवरच असलेल्या १० वर्षापूर्वीच्या २ मोडलेल्या वर्गखोल्या ह्या भीतीदायक अवस्थेत होत्या. कोणीही या वर्षात त्याकडे लक्ष दिले नव्हते. त्यात भुते राहतात असा गैरसमज करून दिला असल्याने त्याचे निर्लेखन करून घेणे गरजेचे होते.



समाजसेवक श्री. राजाभाऊ रसाळ साहेब व गट शिक्षणाधिकारी श्री. उत्तम भोसले साहेब यांच्या सहकार्याने ३ महिन्यातच जिल्ह्यावरून निर्लेखन मंजूर झाले व आम्ही ती इमारत स्वतःच्या पैशाने निर्लेखीत केली. यासाठी जवळजवळ २० हजार रुपये खर्च झाला. तो आम्ही तीन शिक्षक व काही पालकांनी केला. कारण यासाठी अनुदान नव्हते. आता वाटेतील एक अडसर दूर झाला होता. विद्यार्थ्यांना विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे सादरीकरण करता यावे. त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी स्टेजची गरज होती. यासाठी मी समाजसेवक श्री. राजाभाऊ रसाळ यांच्याशी संपर्क केला. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता यासाठी तयारी दर्शविली. कारण शाळेच्या विकासासाठी झटणारे ते देवदूत होते, त्यांनी जवळजवळ ५० हजार रुपये खर्चुन ते बांधून दिले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी श्री काडगे सर व तवटे मॅडम हे जादा तास घेत होते. नवोदय शिष्यवृत्ती परीक्षेचे रात्री साडेसात पर्यंत वर्ग सुरू असायचे. त्यावर्षी फार यश मिळाले नाही , विद्यार्थी फक्त पास झाले. परंतु आम्ही खचलो नाही आमचे अविरत प्रयत्न चालू ठेवले.

त्यानंतर मार्च २०२४ मध्ये मी या शाळेत प्रवेश केला. शाळेचा पट व गुणवत्ता वाढवण्याचा आमचा एकच ध्यास असल्यामुळे आम्ही जोमाने सुरुवात केली. प्रथम पटसंख्या वाढवण्यासाठी एप्रिल व मे महिन्यात शाळा व्यवस्थापनाला सहभागी करून पालकांशी संपर्क वाढवला. त्यामुळे २०२४/२५ ला शाळेची पटसंख्या ५७ झाली. रोजच्या पोषण आहारात विद्यार्थ्यांसाठी भाजी, फळे इ. मिळण्यासाठी शाळेमध्ये परसबागेची निर्मिती करण्यात आली. यात केळीच्या रोपांची लागवड, अननस, माड व पोफळीची लागवड करण्यात आली. तसेच रोजच्या जेवणात भाज्या उपलब्ध व्हाव्यात म्हणून वांगी, मिरची, टोमटो, कोथिंबीर, भेंडी, गवार, मेथी, चवळी, अळू इ. ची लागवड वाफे करून करण्यात आली.यामध्ये विद्यार्थ्यांचाही सहभाग घेतला, त्यांना नवनिर्मितीचा आनंद मिळत होता. त्यांनी पेरलेल्या, लावलेल्या बियातून रोपटे आल्यावर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता, याशिवाय वेलयुक्त भाज्यांची ही लागवड करण्यात आली. यामध्ये दोडके, पडवळ, कारले, चिबूड इ. त्यांच्यासाठी स्टेजवर मांडव करून त्यावर जाळी पसरली. त्यामुळे वेलींना पसरायला मदत झाली. शाळेतील सेंद्रिय खतांच्या वापरामुळे त्यांना चांगलेच पीक आले. प्रत्येक वाफ्याच्या पाण्याचे नियोजन विद्यार्थ्यांना दिलेले होते. त्यामुळे स्वनिर्मितीचा आनंद घेत, खेळत त्यांतून विहार करणारी आमची फुलपाखरे बागडत होती. या परसबागेमुळे मुलांच्यात शाळेविषयी, पर्यावरणाविषयी आवड निर्माण झाली. परसबाग तयार करावयाच्यावेळीच गांडूळ खत प्रकल्प व कंपोस्ट खत प्रकल्पासाठी खड्डे तयार केले. कारण परसाबागेला सेंद्रीय खत आवश्यक असते. गांडूळखतासाठी शेण आणले. तसेच पाथर्डे गावातून गांडूळ खतातील गांडूळ आणून सोडले, दोन महिन्यात तयार झालेले गांडूळखत पाहून मुलांना आश्चर्य वाटले. ओला कचरा, माती, शेण इ. पासून कंपोस्ट खताची ही निर्मिती केली. ही दोन्ही खते परसबागेसाठी उपयोगी पडली. यामुळे सेंद्रिय खते कशी तयार करतात याचे प्रात्यक्षिक मुलांना पाहता आले. याचा भावी जीवनात त्यांना नक्कीच उपयोग होणार आहे.

शाळेचे बाह्यांग आनंददायी व उत्साहवर्धक होण्यासाठी शाळेत फुलझाडे लावणे गरजेचे होते. यासाठी सपाटीकरण केल्यावर जांभा दगड लावून बाग तयार केली. त्यात वेगवेगळी फुलझाडे लावली. यासाठी शाळा कणेरी व शाळा पाथर्ड येथून फूल झाडे व रंगीत पानाची झाडे आणून लावली. तुळशीची रोपे लावून 'ऑक्सिजन स्पॉट' ही तयार केला आहे. त्यांच्या पाण्याच्या सोयीसाठी ठिबक सिंचनाची यावर्षी सोय केली. गेल्यावर्षी मात्र पाणी पाईपनेच घालावे लागले. यातूनच पर्यावरण जाणीव जागृती मुलांमध्ये झाली वृक्षरोपण नुसते करून उपयोगी नाही, तर वृक्षसंवर्धनही गरजेचे आहे. याबाबत त्यांना कल्पना आली. मुले आपली नित्याची कामे वेळेत पूर्ण करत. या उपक्रमाचे नियोजन सूक्ष्म विचाराने व्यवस्थितरीत्या करण्यात आले होते. त्यामुळे कार्यवाहीत कोणतीही अडचण आली नाही. शाळेचे बाह्यांग सजविल्याशिवाय चिमुकली फुलपाखरे येथे

फिरकणार नाहीत. या शाळेत रमणार नाहीत याची जाणीव होती. यासाठी ग्रामीण रूग्णालय ,राजापूर येथून ५००० लिटरची फुटलेली टाकी डॉक्टर व कॉन्ट्रॅक्टर यांचेशी संपर्क करून श्री.काडगे सर यांनी मिळविली. तळातील २ फुटाचा भाग कापून जमिनीत खड्डा काढून तो ठेवला. त्यात कमळे सोडली. तसेच गोल बाजूने चिरेबंदी बांधकाम केले. त्यातच गप्पी मासे टाकून गप्पी मासे पैदास केंद्राची निर्मिती केली. त्यामुळे होणारी डासांची पैदास ही थांबली. अनेक लोक आपल्याकडे पाण्यात सोडण्यासाठी गप्पी मासे घेऊन गेले, यामुळे मलेरिया, डेंग्यू या डासांपासून होणाऱ्या तापाचा फैलाव कमी होण्यासाठी मदत झाली. मुलांना अधिक आकर्षक वाटावे म्हणून त्यांनी स्वतः गोल पाईप लावून त्याना छोटी छिद्रे पाडून पाण्याची कारंजी केली. त्यामुळे बाह्यांग सुंदर दिसण्यास मदत झाली.

शाळेचे बाह्यांग सजविण्यासाठी शाळेला रंग देण्यात आला. यासाठी अनेक देणगीदार म्हणजेच आमचे आधार स्तंभ मदतीसाठी धावून आले. सर्व फळे माहिती लिहुन भरण्यात आले. शैक्षणिक माहितीची पेंटींग्ज भिंतींवर काढण्यात आली. जिन्यावर, व्हारांड्यामध्ये तसेच वर्ग खोल्यांतून शैक्षणिक फ्लेक्स लावण्यात आले. त्यामुळे शाळा नटली. विद्यार्थ्यांनी आमची शाळा किती सजवली हे दाखविण्यासाठी पालकांना पाहायला बोलाविले. अशा रीतीने त्यांच्या मनात शाळेविषयी गोडी निर्माण झाली. शाळेच्या संरक्षक भिंतीनाही रंग काढून त्यावर सुविचार व प्रेरणादायी स्लोगन लिहिण्यात आले. अशा रितीने शाळेला जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न केला.शैक्षणिक उठावातून शाळेला रंगकाम व शाळा डिजिटल करण्यात आली. विद्यार्थी वाढले परंतु इतके पुरेसे नव्हते, विद्यार्थ्यांची गुणवत्ता सिद्ध होणे आवश्यक होते. मे २०२४ ला पवित्र पोर्टल द्वारे एम.एस.सी/ बी.एड गणित/ विज्ञान पदवीधर शिक्षक म्हणून श्रीम. मिताली आंगणे यांची नियुक्ती करण्यात आली. शाळेत पुरेशी शिक्षक संख्या झाली.

विद्यार्थी शाळेत टिकावेत, त्यांना शाळेची ओढ वाटावी यासाठी त्यांची आवड ओळखून त्यांच्या इच्छेनुनार त्यांना खेळ निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. माती टाकून मैदान सपाट केले असल्याने त्याचा फायदा त्यांना झाला. यामध्ये कबड्डी, लंगडी, खो-खो, फुटबॉल, बास्केट बॉल, बॅडमिंटन इ. मैदानी खेळ, तर लांबउडी, उंचउडी, थाळी फेक, गोळाफेक, धावणे इ. वैयक्तिक खेळातही त्यांनी भाग घेतला. यामुळे विद्यार्थी तालुकास्तरापर्यंतच्या खेळात चमकले. खेळाच्या सरावामुळे मुले शाळेत दररोज १०० % उपस्थित राहू लागली त्याचाच परिणाम हा उपक्रम यशस्वी होण्यात झाला. शाळेतील बाह्यांग जसे उत्साहवर्धक करण्याचा प्रयत्न केला तसेच अंतरंग ही करणे गरजेचे होते. विद्यार्थी शाळेत रमावेत, त्यांचे अवधान टिकावे त्यांच्याकडील नवनिर्मिती/सर्जनशील क्षमतेचा विकास व्हावा यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले. यासाठी विविध उपक्रम योजले. यामध्ये कात्रण संग्रह करणे, कृतीयुक्त व बडबड गीते गायन , गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रंग भरण स्पर्धा, राखी बनविणे स्पर्धा, कोलाज काम, कथाकथन स्पर्धा, भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा, कविता गायन स्पर्धा, श्लोक पाठांतर स्पर्धा इ. त्यामुळे शाळेत आनंददायी बातावरण निर्मिती झाली . यामुळे शाळेविषयीची भीती कमी झाली. तसेच यामध्ये शिक्षकांनीही सहभाग घेतल्याने त्यांच्या मनातील शिक्षकांविषयीची भीती दूर झाली. यामुळे पालक व विद्यार्थ्यांत नवचैतन्य निर्माण झाले. अशारीतीने हा उपक्रम यशस्वी होऊ लागला.

विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा. लघुउद्योजकांच्या कामकाजाचे प्रत्यक्ष निरीक्षण करता यावे. त्यांच्या मुलाखती घेऊन त्यासाठी लागणारा कच्चा माल, विक्रीची व्यवस्था, त्यांच्या असणाऱ्या समस्या यांची जाणीव व्हावी तसेच आनंददायी वातावरण निर्माण करण्यासाठी लघुउद्योजक यांच्या भेटी घेतल्या. यामध्ये लोहार, सुतार, मेकॅनिक, गणपतीची मूर्ती तयार करणारे, शिंपी, टी. व्ही. रिपेअर करणारे




इ. तसेच विद्यार्थ्यांना विविध गोष्टींचे ज्ञान व्हावे यासाठी क्षेत्रभेटी ही दिल्या. यामध्ये नगर वाचनालय, पोहण्याचे तळे, बँक व ए.टी.एम., ग्रामीण रुग्णालय, अग्निशमन केंद्र, भारतीय आयुर्विमा महामंडळ, न्यायालय, पोस्ट ऑफिस इ. याठिकाणी प्रत्यक्ष काम कसे चालते याबाबत त्यांच्याकडूनच मार्गदर्शन घेतले. याचा मुलांना भावी जीवनात नक्कीच उपयोग होईल, अशाप्रकारे प्रत्यक्ष कृतीतून अध्ययन अनुभव मिळाल्याने त्यांच्या मनात शाळेविषयी ओढ निर्माण झाली. याचाच परिणाम म्हणून शाळेची पटसंख्या हळूहळू वाढत होती.

शाळास्तरावर विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार व वयोगटानुसार विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यामध्ये तीन पायाची शर्यत, बादलीत चेंडू फेकणे, पाण्याने भरलेल्या बादलीत नाणे टाकणे, गाढवाला शेपूट लावणे, आंधळी कोशिंबीर, डोळे बांधून मडके फोडणे इ. त्याच्या प्रमाणे संगीत खुर्ची, चमचागोटी हे ही खेळ घेतले त्यातील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. त्यामुळे त्यांना प्रेरणा मिळाली. रोज घडणाऱ्या घटनांची चर्चा मुलांमार्फत पसरत होती त्यामुळे इतर पालक, नागरिक व विद्यार्थ्यांना या गोष्टी कळल्यामुळे शाळेचा पट वाढायला सुरुवात झाली. पालकांना शाळेविषयी आत्मीयता वाटावी, त्यांच्यातील कला गुणांना वाव मिळावा यासाठी त्यांच्याही स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये महिला पालकांनी मोठा सहभाग घेतला. पाककला स्पर्धेमध्ये अनेक महिलांनी भाग घेतला. पदार्थाचे प्रदर्शन भरविण्यात आले नंतर विक्रीही करण्यात आली. यामुळे त्यांनाही त्याचा फायदा झाला. प्रथम तीन क्रमांकाना बक्षिसे देण्यात आली. त्याशिवाय हळदीकुंकू समारंभाच्या वेळी महिलांच्या चमचा गोटी व संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. अशाप्रकारे पालकही शाळेकडे आकर्षित होऊ लागले, त्याचा उपयोग हा उपक्रम यशस्वी होण्यात झाला.

शाळेचे मुख्याध्यापक म्हणून खूप मोठी जबाबदारी पार पाडत असताना शाळेतील सर्व शिक्षकांनी मिळून वर्ग अध्यापनाचे नवोदय, शिष्यवृत्ती, आर. एस. एम ,आर. टी. एस, मंथन इत्यादी स्पर्धा परीक्षांचे नियोजन केले, नियोजनानुसार सकाळी साडेनऊ ते साडेदहा व सायंकाळी ५ ते ७ या वेळात जादा तासांचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार शाळेतील सर्व शिक्षक व पदवीधर शिक्षक श्री. काडगे सर स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करत होते. या कष्टाचे फलित मिळाले. २०२५ ला नवोदय विद्यालयासाठी एका विद्यार्थ्यांची निवड झाली. शिष्यवृत्ती परीक्षेतील ३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. एस.टी.एस, आर.टी.एस, आर. एस.एम, बी.डी.एस, एन. एस. एस. सी, मंथन या स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी दैदीप्यमान यश प्राप्त केले. राष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धेत शाळेतील ९ विद्यार्थ्यांनी गोल्ड, ब्राँझ व सिल्वर मेडल पटकावले. नगर परिषदेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या शिवजयंती कार्यक्रमात आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी एकल नृत्यात प्रथम, समूह नृत्यांमध्ये द्वितीय व नाटिकेमध्ये द्वितीय क्रमांकाचे चषक व रोख रक्कम पटकावले. क्रीडा स्पर्धेत तालुका स्तरापर्यंत विद्यार्थ्यांनी झेप घेतली. तायक्वांदो स्पर्धेत एका विद्यार्थ्याने राज्यस्तरापर्यंत गोल्ड मेडल जिंकले. गुणवत्तेबरोबर शालेय परिसर विकास ,महावाचन, इको क्लब, स्काऊट गाईड, हरघर तिरंगा, स्वच्छता अभियान इत्यादी उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्य वाढीस लागावे यासाठी विविध उपक्रम घेतले जातात.

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमात शाळेने सहभाग घेऊन २०२४/२५ मध्ये तालुका स्तरावरील प्रथम क्रमांकाचे तीन लाखाचे बक्षीस मिळवण्याचा मान पटकावला. यासाठी मुख्यत्वे श्री. काडगे सर यांनी आत्मियतेने केलेली परसबाग, रंगरंगोटी यांचा फायदा झाला. त्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक यांनी मोलाचे योगदान दिले. ३,१४,००० एवढा शैक्षणिक उठाव होऊन शाळेतील परिसर विकास व




परसबाग इत्यादी कामे करून घेण्यात आली. विविध प्रशिक्षणे, निवडणुकीची कामे असतानासुद्धा शिक्षकांनी शाळा व विद्यार्थी यांना अग्रस्थानावर ठेवले आहे.

शालेय गुणवत्तेत आणखी एक भर टाकणारा एक पैलू म्हणजे जिल्हा परिषद रत्नागिरी आयोजित नासा इस्रो परीक्षा. २०२४/२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत केंद्रस्तरावर सहा विद्यार्थ्यांची निवड झाली व तालुकास्तरावर एका विद्यार्थ्यांची निवड होऊन जिल्हास्तर मुलाखतीत आमच्या शाळेतील विद्यार्थी अव्वल ठरला. यासाठी शाळेतील गणित विज्ञान शिक्षिका श्रीम. मिताली आंगणे यांचा मोलाचा सहभाग आहे. याचे फलित म्हणून आमच्या शाळेतील एक शिक्षक व एक विद्यार्थी यांची इस्रो दौऱ्यासाठी निवड झाली. या शाळेमध्ये ५ ते ६ वर्ष पूर्वीपासुन शाळेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम घेतले नव्हते. त्यामुळे आम्ही इ. ५ वी ची शिष्यवृत्ती परीक्षा संपल्यानंतर होळीच्या काळात सांस्कृतिक कार्यक्रम घेतले. या कार्यक्रमाची चांगली चर्चा राजापूर व परिसरात झाली. यासाठी जानेवारी महिन्यातच स्टेज बांधून घेतले होते. विद्यार्थ्यांनी रेकॉर्ड डान्स, नाटिका, कव्वाली, समूह नृत्य, देशभक्तीपर गीते, एकांकिका इ. सादर केल्या. या कार्यक्रमाचा चांगला परिणाम पालकांवर तसेच इतर नागरिकांवर झाला. त्यामुळे यावर्षी पटसंख्या वाढण्यात या कार्यक्रमांचा हातभार लागला. याशिवाय शाळेत दहीहंडी उत्सव, ग्रंथदिंडी, वारकरी दिंडी, मंगळागौर, हळदीकुंकू, मरस्वती पूजन इ. सांस्कृतिक कार्यक्रम ही शाळेत घेतले गेले. यामुळे शाळेला प्रसिद्धी मिळाली. याचाच परिणाम म्हणून यावर्षी पटसंख्या पाचपटीने वाढली.

शाळेतील सर्व शिक्षक उत्साही ,अभ्यासू व कामसू आहेत. आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. शाळेतील पदवीधर शिक्षक श्री .सुहास काडगे नवोपक्रम स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक, व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत तालुक्यात द्वितीय क्रमांक प्राप्त आहेत.

आज आमच्या डिजिटल शाळेत १२ टॅब, ४ कम्प्युटर, एक प्रिंटर, एक लॅपटॉप व ३ स्मार्ट टीव्ही उपलब्ध असून त्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते. शाळेत विविध शैक्षणिक अध्यापन करताना डिजिटल साहित्याचा वापर केला जातो. शाळेत पाच लाख एकोणीस हजाराचे रोबोटिक व कोडींग चे साहित्य उपलब्ध असून विद्यार्थ्यांना रोबोटिक व कोडींगचे ज्ञान दिले जाते. विद्यार्थी विविध वस्तू तयार करतात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना शाळेत वाव दिला जातो.

आज शाळेत साडेआठ लाखाचे चाईल्ड फ्रेंडली एलिमेंट्स साहित्य उपलब्ध आहे. बंदिस्त हॉलमध्ये हे साहित्य असल्याने विद्यार्थ्यांना खेळण्याचा आनंद मिळतो. ही यशाची घोडदौड चालू आहे. मे महिन्याची सुट्टी असतानाही शाळेत नैतिक सुविधा निर्माण करणे, रंगरंगोटी करणे, पालकांच्या भेटी घेणे यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे ठरविलेली उद्दिष्ट्ये साध्य झाली याचेच समाधान वाटते. एका बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या शाळेचे नाव एका वर्षातच सर्व जिल्हास्तरावर झाल्याने निश्चितच समाधान लाभले आहे. हे उपक्रम राबवीत असताना प्रत्येकाच्या नोंदी घेतल्या, प्रत्येक वेळच्या प्रतिसादाचे निरीक्षण करून नोंद घेतली असल्याने त्याचा फायदा या शाळेत झाला. 'कुछ पाने के लिए कुछ खोना पडता है।' या उक्तीप्रमाणे आर्थिक झळ सोसून हे सर्व उपक्रम यशस्वीरीत्या राबविले. शाळेचा उंचावत चाललेला आलेख पहाता २०२४/२५ मध्ये शाळेची पटसंख्या ५७ होती. ती आता २०२५/२६ मध्ये १०५ एवढी झाली आहे. यासाठी शाळेतील माझे सहकारी ज्ञानदानाचे पवित्र कार्य प्रामाणिकपणे व आनंदाने करत आहेत, याचा मला खूप अभिमान वाटतो. गोखले कन्याशाळेत वर्षभरामध्ये विविध उपक्रम राबविल्यामुळे तसेच त्यात पालक व विद्यार्थी यांनाही समाविष्ट करून घेतल्यामुळे शाळेची जनमानसातील प्रतिमा उंचावण्यास मदत झाली. पुढील काळात ही नक्कीच आदर्श शाळा होणार आहे.





जिद्द व चिकाटी न सोडता या विद्यार्थ्यांसाठी उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. रात्रंदिवस कष्ट केल्यानेच हा नवोपक्रम यशस्वी होऊ शकले. शाळेतून पटसंख्या कमी होण्याची कारणे, शाळेत पट न वाढण्याची कारणे शोधून त्यावर उपाययोजना करताना विद्यार्थी व पालक यांच्याशी समन्वय साधून अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केल्याने मुलांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण झाली. त्यामुळेच १ वर्षात पटसंख्या जवळ जवळ पाच पटीने वाढली. हेच या शाळेचे मोठे यश आहे.आमच्या या यशात तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा.उत्तम भोसले साहेब, केंद्रप्रमुख श्री अनिल जायदे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश कुडाळी, शिक्षण प्रेमी राजाभाऊ रसाळ व आमचे पालकवृंद यांचे फार मोठे मार्गदर्शन व योगदान आहे. दर वर्षी शाळेसाठी झटण्याचा विडा आमचे सर्व शिक्षक व पालक यांनी उचलला आहे.

शाळेने केलेल्या कामांची सत्यता तपासण्यासाठी आणि पुरावा म्हणून खाली गुगल ड्राईव्हची लिंक देत आहे.

https://drive.google.com/drive/folders/1D_DYbGGrfROKa0CqZcvEaD4bwBC2FB1i

----------**----------



Role of School Leader in Leading Awareness in Traditional Education and Skills

Name of School - New English School (SEC.) Miraj

School Address - Pandharpur Road, Miraj

School Email ID - nesmiraj1977@gmail.com

Name of Principal - Mr.M. L. Kengar

Principal Mobile Number - 8275257945

Principal EMail ID - kausarfakir04530@gmail.com

INTRODUCTION

“The future belongs to those who believe in the beauty of their dreams."

According to the new National Education Policy 2020, efforts are underway to take Indian education towards vocational goals and modernity. Rather than just imparting book knowledge to ordinary students, it is the need of the hour to develop the skills necessary for employability and make them capable for industry, business and entrepreneurship. Getting a job has become extremely difficult. In such a time, it is necessary to develop students in the right direction towards skill education, vocational education.Our Chaitan Education Society's New English School Miraj is a school renowned for its education for underprivileged children.Through this project, children should be made aware of traditional professions.

To preserve historical and social heritage among students.

Therefore, it is necessary to develop a business approach, self-reliance, efficiency, practicality and make students competent in life.There are 1197 students studying with enthusiasm.

NEED

1. The need to create a self-reliant generation requires instilling confidence, decision-making ability, the ability to overcome adverse situations, and business knowledge in students.

2. Employment requires change in the industrial sector. In modern times, new types of skills such as industrial services, digital services, agricultural processing, etc. need to be developed at the school level.

OBJECTIVES

1. To make students aware of traditional professions.To demonstrate employability skills in school life.

2. Along with traditional education, teaching skills related to various small-scale industry service sectors and entrepreneurs.

3. To promote self-employment and entrepreneurship.

4. Supporting a business approach through education and creating a skilled future citizen.


5. Creating harmony between schools and the industry sector.

IMPORTANCE

1. Contribution to National Development Skilled and self-reliant youth are important factors for the social and economic progress of a nation.


2. The student becomes able to start his own business in the future.

3. It helps to preserve historical and social heritage among students.





The root of classical music is Tanpura. Until tanpura is played classical music does not begin.Tanpura live at the heart of both Hindustani and classical music and set the adharaswara around which Indian Sangeet revolve.The craftsman of Miraj continue to be the most renowned Tanpura makers of India and are now widely in demand across the world.



First inventor of Tanpura

Late. Fareed Sahab Satarmaker was the first inventor of tanpura Instrument. Who first acquired the skill of making Tanpura in Miraj , he was born in 1827 and died in 1898.




In the beginning his ancestors lived in Bijapur They were known as Shikalgar. The work of erecting the Shikhar on the top of Mira Sahab Tomb was difficult to be done by the artisans of miraj,hence shikalgar had to be brought from Bijapur Shikalgar completed this task will so give him land as a reward by Subedar. Their job was to prepare source and spheres for battle after the birth of Fareed sahab British rule was established over Miraj Subah therefore the demand for battle equipment decrease so the skilled people of Miraj started to live by making knives and Scissors.Mohaddin Sahab was the elder brother of Fareed Sahab.

Mohaddin used to make all the necessary limits for Nautanki and single string instrument for bhajan.Fareed sahab was very loyal to Mohaddin Sahab, both brothers started promoting this work with the help of each other.Raja Sahab Shrimant Balasaheb was famous in Miraj,at that time for them artisans, Singers and instrumentalist used to come to Miraj.

The princely state of Patwardhan provided facilities to the Businessman and Mahajan people to settle in Miraj due to which the population of Miraj started ~~increa~~sing and the singers also started sitting in the place.



Wherever there was singing and instrument playing Farid sahab used to go and listen to the singing.At that time musical instruments where not made in Maharashtra, perhaps, the tanpura and Sitar came from Jaipur and Banaras due to lack of Railway there was a lot of expenses in transporting the instrument.There were very few singers who used Tanpura.Whenever a singer Tanpur broke down Fareed Sahab would say 'if you hand it over, I will try to repair your instrument'', since there were no other artisans in this area the work was handed over to Farid Sahab only after trusting him.Then he would use his brain to get it repair and return the instrument to him. In the same way he started looking at the instrument which had come for repair.The sages who came to the village used to give copper or brass utensils to the Sanyasi and take Tumba from him, Once the Tumba was in hand there was no delay in making the Tanpura.After putting in a lot of hard work Farid sahab started making Tanpura,sitar beautiful. Similarly used different techniques to make tanpura and sitar beautiful at that time it took to a 3 to 4 month's to make the one Tanpura at present a beautiful made in 15 to 20 days.Even today the 7th generation of Fareed Sahab does the same work in Miraj.



From the original strings players Fareed Sahab Satarmaker to the 7th generation Danish Dastagir Satarmaker everyone is making Tanpura and sitar.Miraj Tapura is in demand not only in India but from every corner of the world.Today Miraj is recognised only by making Tanpura. Most essential thing for Tanpura is Pumpkin. Pumpkin grown for Tanpura is available only in Solapur district.



Tanpura of Miraj was honoured with many awards in India and other country from 1972 to 2024.



Chief Minister Vasantrao Dada Patil Pandit Rahul Kulkarni, P. L. Deshpande Pandit Jasraj Shalini tai Patil Vasant Desai appreciate.





Even great musician like Zakir Hussain Shiv Kumar Sharma have praised and come for visit to miraj Tanpura.

Because of Tanpura Classical music centre of Gandharv Mahavidyalay is there in Miraj. In 2008 Sharafat Abdul Majid SattarMaKer was honoured with the president award at the sangeet natya Academy Delhi by honorable mrs pratibadai Patil.

Once again in 2024 Masjid Gulab honour with the president award by Hon.smt Draupadi murmu.


Ustad Zakir Hussain and Pandit Shivkumar Sharma visit to Miraj.

Sharafat Ali

Satarmaker with
Hon. President Pratibhatai Patil, In 2008.

Majjid SatarMaker with Hon.President
Smt Draupadi
Murmu, in 2024.





Difficult words meaning ● Classical -magnificent ● Spear - dart ● Adharaswar - base note ●Sage - wise ● Ancestors - forefather ● Erect - upright

Exercise:-

Q.1) Write the answer in one sentence.

What is the root of classical music?

Who is the first inventor of Tanpura?

Which was the first Occupation of satarmaker?

Q.2) Write the answer in brief.

Write the history of Tanpura?

Write the names of famous personality mentioned in the lesson?

Q.3) Find the opposite words from the lesson.

a) increased ×


b) modern ×

c) ugly ×

d) many ×

This lesson is published for 8th std.





एक पथदर्शी शैक्षणिक उपक्रम

प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली.

8.4 Tanpura, City of Miraj

Introduction – (Miss) Kausar Afzal Fakir New English School(sec.)Miraj

The root of classical music is in Tanpura. Until tanpura is played classical music does not begin. Tanpura live at the heart of both Hindustani and classical music and set the Adharaswara around which Indian Sangeet revolve. The craftsman of Miraj continue to be the most renowned Tanpura makers of India and are now widely in demand across the world.

First inventor of Tanpura

Late. Fareed Sahab Satarmaker was the first inventor of tanpura Instrument. Who first acquired the skill of making Tanpura in Miraj , he was born in 1827 and died in 1898.

In the beginning his ancestors lived in Bijapur They were known as Shikalgar. The work of erecting a Shikhar on the top of Mira Sahab Tomb was difficult to be done by the artisans of Miraj, hence Shikalgar had to be brought from Bijapur Shikalgar completed this task will so give him land as a reward by Subedar. There was to prepare source and spheres for battle after the birth of Fareed Sahab British rule was established over Miraj Subha therefore the demand for battle equipment decrease so the skilled people of Miraj started to live by making knives and Scissors. Mohaddin Sahab was the elder brother of Fareed Sahab.

Mohaddin used to make all the necessary limits for Nautanki and single string instrument for bhajan. Fareed Sahab was very loyal to Mohaddin Sahab, both brothers started promoting this work with the help of each other. Raja Sahab Shrimant Balasaheb was famous in Miraj, at that time for them artisans, Singers and instrumentalist used to come to Miraj. The princely state of Patwardhan provided facilities to the Businessman and Mahajan people to settle in Miraj due to which the population of Miraj started increasing and the singers also started sitting in the place.

Wherever there was singing and instrument playing Farid sahab used to go and listen to the singing. At that time musical instruments where not made in Maharashtra, perhaps, the tanpura and Sitar came from Jaipur and Banaras due to lack of Railway there was a lot of expenses in transporting the instrument. There were very few singers who used Tanpura. Whenever a singer Tanpur broke down Fareed Sahab would say 'if you hand it over, I will try to repair your instrument'', since there were no other artisans in this area the work was handed over to Farid Sahab only after trusting him. Then he would use his brain to get it repair and return the instrument to him. In the same way he started looking at the instrument which had come for repair. The sages who came to the village used to give copper or brass utensils to the Sanyasi and take Tumba from him, Once the Tumba was in hand there was no delay in making the Tanpura. After putting in a lot of hard work Farid Sahab started making Tanpura, Sitar beautiful. Similarly used different techniques to make tanpura and sitar beautiful at that time it took to a 3 to 4 month's to make the one Tanpura at present a beautiful made in 15 to 20 days. Even today the 7th generation of Fareed Sahab does the same work in Miraj.

From the original strings players Fareed Sahab Satarmaker to the 7th generation Danish Dastagir Satarmaker everyone is making Tanpura and sitar. Miraj Tapura is in demand not only in India but from every corner of the world. Today Miraj is recognised only by making Tanpura. Most essential thing for Tanpura is Pumpkin. Pumpkin grown for Tanpura is available only in Solapur district.

Tanpura of Miraj was honoured with many awards in India and other country from 1972 to 2024.

Chief Minister Vasantrao Dada Patil Pandit Rahul Kulkarni, P. L. Deshpande

Pandit Jasraj Shalini tai Patil Vasant Desai appreciate.

Even great musician like Zakir Hussain Shiv Kumar Sharma have praised and come for visit to Miraj Tanpura.

Because of Tanpura Classical music Centre of Gandharv Mahavidyalay is






संगीतनाटक
अकादेमी
Sangeet


Miraj, Maharashtra


ESIDENT




8.25%
9.90%

व्यावसायिक शिक्षणासाठी शाळेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे पूर्ण नाव - अल-अमीन मराठी प्राथमिक शाळा सांगली.

शाळेचा पत्ता - 100 फुटी रोड,भोसले प्लॉट,सांगली

मुख्याध्यापक नाव - सौ. नसीम सादिक पिरजादे.

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 8830585197

मुख्याध्यापक ईमेल आयडी - asmanadaf946@gmail.com

प्रास्ताविक -

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अनुसार भारतीय शिक्षण व्यावसायिक उद्दिष्टांना आणि आधुनिकतेकडे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञान देण्यापेक्षा त्यांना रोजगारक्षमतेसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा विकास करून त्यांना उद्योग, व्यवसाय व उद्योजकतेसाठी सक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. बेरोजगारी वाढणे आणि निव्वळ नोकरी मिळवणे अत्यंत कठीण झाले आहे.

अशा काळात कौशल्य शिक्षण, ज्ञानाच्या विविध शाखांतील कौशल्ये मिळवून व्यवसायिकतेकडे योग्य दिशेने विद्यार्थ्यांचा कल व विकास होणे आवश्यक आहे.

आमची संस्था सरोवर शिक्षण मंडळ साऊथ सांगली संस्था असून या संस्थेचे ३ माध्यम मराठी, उर्दू व इंग्रजी अश्या तीन माध्यमाच्या गरीब भागातील व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबतच कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या शिक्षणासोबतच प्रत्यक्ष कामकाजाच्या स्वरूपाची ओळख व्हावी त्यांना त्यांच्या कलानुसार व्यवसाय निवडता यावा आणि भविष्यात केवळ नोकरी शोधणारे नव्हे तर स्वयंरोजगार व उद्योजकतेकडे वाटचाल करणारे विद्यार्थी घडविणे, या उद्देशाने शाळेचे अभ्यासक्रमातच कौशल्य आधारित व व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. उच्च व तंत्रशिक्षण, उद्योग क्षेत्र

तसेच रोजगार निर्मिती या मधील सुसंवाद आपल्याकडे दृढ करण्यासाठी शाळेमधून विद्यार्थ्यांना विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन शाळेतच उपलब्ध करून दिले पाहिजेत. त्यातून हे स्पष्ट होते की, यासाठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण, रोबोटिक्स लॅब, कृषी व आधारित व्यवसाय, मोटर रिपेअरिंग,बल्ब जोडणी, बँकिंग, खाद्य प्रक्रिया वेगवेगळ्या पेंटिंग, मुलाखती, स्टोन आर्ट, मेंदी काढणे, 'हँडी क्राफ्ट' इ. विविध उपक्रमांना समाविष्ट करावे.


यामुळे आत्मनिर्भरता, कार्यक्षमतेचा, व्यवहारशिलता, व्यावसायिक दृष्टिकोन यासाठी अशा कौशल्य विकास कार्यक्रमाच्या (अल्प/दीर्घ) प्रशिक्षण कार्यक्रमांतून शालेय जीवनातच सक्षम बनविणे अत्यावश्यक आहे.

उद्दिष्टे -

1. विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्याचा विकास करणे. शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना व्यवसायोपयोगी व रोजगारक्षम कौशल्य शिकवून त्यांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट.
2. शालेय शिक्षणात व्यावसायिक व तांत्रिक अभ्यासक्रमाचा समावेश करणे पारंपारिक शिक्षणासोबतच विविध लघुउद्योग सेवा क्षेत्र व उद्योजकाशी संदर्भातील कौशल्ये शिकवणे.
3. स्वयंरोजगार व उद्योजकतेस प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांची स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मानसिकता, नियोजन व कर्तव्य क्षमता विकसित करणे .
4. शिक्षणाला व्यावसायिक दृष्टिकोन देणे, विद्यार्थ्यांना शिक्षणातून केवळ पदव्या नव्हे तर प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणाऱ्या ज्ञान व कौशल्याचा लाभ मिळवून देणे .
5. शाळा व उद्योग क्षेत्र यामधील सुसंवाद निर्माण करणे .

गरज -

1. रोजगारासाठी आवश्यक कौशल्यांचा अभाव पारंपारिक शिक्षणातून बाहेर पडणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना तांत्रिक व व्यवसायिक कौशल्याचा अभाव असल्याने ते बेरोजगार राहतात ही



समस्या दूर करण्यासाठी शालेय पातळीवरच कौशल्य शिक्षण देणे आवश्यक आहे गरजेचे आहे.

2. स्वावलंबी पिढी घडवण्याची गरज, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्णय क्षमता प्रतिकूल परिस्थितीत मार्ग काढण्याची क्षमता आणि व्यवहारात ज्ञान निर्माण करणे गरजेचे आहे

3. रोजगार आणि उद्योग क्षेत्रातील बदलाची गरज आधुनिक काळात उद्योगसेवा डिजिटल सेवा, कृषी प्रक्रिया इत्यादी नव्या प्रकारची कौशल्य शाळा स्तरावर मिळणे गरजेचे आहे.

महत्त्व -

1. विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढवणे- शालेय शिक्षणासोबत कौशल्य मिळाल्यास विद्यार्थी शाळा पूर्ण करतात, नोकरी किंवा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यात सक्षम होतात .
2. शिक्षणात रुची व व्यवहार्यता वाढविणे- केवळ पुस्तकी शिक्षणाऐवजी प्रत्यक्ष कौशल्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यामध्ये शिकण्याची उत्सुकता, मनःपूर्वक सहभाग आणि उपयुक्ततेची भावना निर्माण होते .
3. स्थानिक रोजगार निर्मितीला चालना देणे- स्थानिक गरजा नुसार कौशल्य दिल्यास विद्यार्थी स्वतः आपल्या शहरात स्वतःचा व्यवसाय सुरू करून इतरांनाही देऊ शकतात .
4. राष्ट्रीय विकासात योगदान कौशल्य संपन्न आणि आत्मनिर्भर युवक राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचे घटक ठरतात.
5. कौशल्यावर आधारित शिक्षण आम्ही देत असल्याने आमच्या शाळेचा सामाजिक दर्जा उंचावला आहे.




शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रम

कौशल्याचे दार खुले ,
ज्ञानाचे हे नवे पर्व ,
व्यावसायिक शिक्षण घेऊनी,
घडवू आपले स्वप्न पूर्ण,
आमच्या अल्पसंख्याक शाळांमध्ये संधी,
आता सोन्याची,
हातात कौशल्य घेऊन दिशा नवी जीवनाची.

एक शनिवार एक व्यवसाय –

- उद्देश – विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना, कौशल्यांना वाव देणे
- **अंमलबजावणी** – विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवसायाशी संवादाची संधी देणे ,अनुभव सांगणे मुलाखती घेणे प्रत्येक महिन्याच्या प्रत्येक शनिवारी एक विशिष्ट क्षेत्रातील व्यक्ती, अधिकारी अशा व्यक्तीला शाळेत बोलवले जाते त्यांचे अनुभव कौशल्य माहिती मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांसोबत त्यांना प्रत्यक्ष अध्ययन अनुभूतीचे मार्गदर्शन दिले जाते.
- **फायदा** – विद्यार्थ्यांना प्रेरणा मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष उद्योग जगातील जाणीव मिळते





स्वयंरोजगार प्रकल्प स्पर्धा –

- उद्देश – उद्योजकता आणि कल्पकतेला चालना देणे .
- **अंमलबजावणी** या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना कमी खर्चात व्यवसाय सुरू करण्याच्या कल्पना मांडण्यासाठी वाव दिला जातो यामध्ये वारली पेंटिंग कार्यशाळा, वाळू पेंटिंग कार्यशाळा व रांगोळी पेंटिंग कार्यशाळा यातून कौशल्य शिकवले जाते. त्याचबरोबर ब्रेसलेट व किचेन कशा पद्धतीने बनवून आपण स्वतःचा व्यवसाय स्वयंरोजगार कसा करू शकतो हे दाखवले जाते .
- फायदा – विद्यार्थ्यांमध्ये नियोजन आर्थिक उद्योजकीय दृष्टिकोन विकसित होतो .





हातात कौशल्य – शाळेत संगणक लॅब व रोबोटिक लॅब .

- **उद्देश** – प्रत्यक्ष सरावासाठी कौशल्य प्रयोगशाळा .
- **अंमलबजावणी -** विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सूक्त गुणांना व कौशल्यांना वाव मिळण्यासाठी आमच्या शाळेत संगणक कक्षात एकूण बारा संगणक असून विद्यार्थी ते स्वतः हाताळतात त्यावर विविध अँपची माहिती मिळवतात स्वतः त्यांचा वापर करतात त्याचबरोबर रोबोटिक लॅब सुद्धा आमच्या शाळेत आहे. यामध्ये विविध प्रकारचे प्रयोग कोरडी माती अलार्म, मॉर्निंग अलार्म, कार पार्किंग अलार्म, घड्याळाचे टोल इत्यादी विविध प्रयोग विद्यार्थी स्वतः किटचा वापर करून प्रयोग करतात
- **फायदा** – विद्यार्थ्यांना स्वतःच्या हाताने मिळतो करून शिकणे ही संकल्पना प्रभावीपणे राबवली जाते .





कमवा व शिका उपक्रम –

- **उद्देश** – विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणातून आर्थिक उत्पन्नाचा अनुभव मिळणे .
- **अंमलबजावणी** – विद्यार्थ्यांनी स्वतः केलेले खाद्यपदार्थ, आर्ट वर्क, राखी वेगवेगळ्या पेंटिंग इत्यादी शाळेत प्रदर्शन व खरेदी विक्री करतात.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना खरेदी विक्री, नफा तोटा, शेकडा नफा व शेकडा तोटा इत्यादी दैनंदिन व्यवहार समजतो. मिळालेला नफा शैक्षणिक साहित्यासाठी व शालेय उपयोगी वस्तू आणतात .
- **फायदा** – व्यावसायिक व्यवस्थापन ग्राहक सेवा पैशाचे मूल्य याविषयी प्रत्यक्ष शिक्षण मिळते .



कौशल्य संमेलन सप्ताह –

- **उद्देश** – शाळेतील सर्व कौशल्य शिक्षणाचे सार्वजनिक सादरीकरण .
- **अंमलबजावणी** – विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकपणे तयार केलेले मॉडेल स्टॉल आणि ग्राहकांशी संवाद खाते बाजाराचे स्टॉल ब्रेसलेट किचन इत्यादी विक्रीसाठी ठेवतात .
- **फायदा** – विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि शाळेच्या गुणवत्तेचा समाजात सकारात्मक प्रभाव निर्माण होतो .





कौशल्य आधारित व्यावसायिक केंद्र –

- **उद्देश** – कौशल्याशी विद्यार्थ्यांना जोडणे .
- **अंमलबजावणी** - इंटरनेटचा वापर, मोटार दुरुस्ती, बल्ब जोडणी इत्यादी कौशल्य यांची कार्यशाळा विद्यार्थ्यांना प्रत्यक्षपणे बल्ब जोडणी कशी करावी व मोटार खराब झाल्यास त्याची दुरुस्ती कशी करावी याचे कार्यशाळा घेऊन त्यांना प्रात्यक्षिक दाखवून त्यांच्याकडून पुन्हा करून घेण्यात आले .

- **फायदा** - विद्यार्थ्यांच्या अंगी कौशल्य विकसित होतात व सुप्त गुणांना वाव मिळतो.वरील सर्व व्यावसायिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी आत्मविश्वास, आर्थिक साक्षरता, उद्योजक दृष्टिकोन विकसित झाली आहे .



Plz Search us here.....

https://www.instagram.com/reel/C_XOr5vRqj/?igsh=YTRzOTZucTh3YmRh
https://www.instagram.com/reel/C_VsMekvron/?igsh=MTR1d2kwbTMyb3B2cw==
https://www.instagram.com/reel/C_VcR9hvXU1/?igsh=MW14b2VzMjd3ZXNwdw==
https://www.instagram.com/reel/C_DfxV4PtWx/?igsh=bzN0dG8wemg0ZzJp
https://www.instagram.com/reel/DGr65RVI3w/?igsh=Ymw3cDEwZnVsbjUz
https://www.instagram.com/reel/DGYJHYQo8k_/?igsh=MTJqdHRiMWRydmRreg==
https://www.instagram.com/reel/DEhVJSqvstY/?igsh=MWhwOW52NjFnODU1aA==

----------**----------

लिंग समभाव व समावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त शाळा

शाळेचे नाव - छत्रपती शिवाजी विद्यालय, दुधोंडी
शाळेचा पत्ता- दुधोंडी, ता.पलूस, जि.सांगली
शाळेचा ईमेल आयडी - csvd1960@gmail.com
मुख्याध्यापक नाव - श्री. अरविंद शंकर कांबळे
मुख्याध्यापक ईमेल आयडी - askam5472@gmail.com



शाळेचा इतिहास : -

स्वामी रामानंद भारती यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या दुधोंडी या गावामध्ये भारती शिक्षण प्रसारक मंडळाचे छत्रपती शिवाजी विद्यालय हे ज्ञान मंदिर चालवले जाते. कृष्णा नदीकाठी वसलेले पलूस तालुक्यातील दुधोंडी गावामध्ये सन 1960 सालाची स्थापना असलेले हे विद्यालय पलूस तालुक्यात नावलौकिक मिळवलेले एक आदर्श विद्यालय आहे. विद्यालयामध्ये खेळ, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थी गुणवत्ता, विज्ञान विषयक

नवनवीन उपक्रम राबवले जातात. या उपक्रमांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या भविष्यातील जडणघडणीत होत असतो. विद्यालयामध्ये सध्या इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंत एकूण 437 विद्यार्थी ज्ञानार्जन करत आहेत. प्रत्येक वर्षी दहावीचा सेमी माध्यमाचा निकाल १००% असतो. आमच्या विद्यालयाला आजपर्यंत विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. विद्यालयाने सन २०२४ - २५ मध्ये "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा "हा तालूक्यात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळवला आहे.

प्रस्तावना -

आजच्या प्रगत युगात समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुरुष आणि स्त्री याना समान अधिकार , संधी व स्थान मिळणे आवश्यक आहे. यालाच लिंग समभाव म्हणतात लिंग समभाव म्हणजे लिंगाच्या आधारावर भेदभाव न करता प्रत्येकाला समान मान मिळणे होय. पूर्वीच्या काळी स्त्रीयांना शिक्षण, नोकरी, राजकारण कला किंवा विज्ञान या क्षेत्रात संधी मिळत नव्हत्या. घरकाम आणि मुलांचे संगोपन यापुरतेच आयुष्य मर्यादित होते. परंतु कायद्याचे संरक्षण शिक्षणाचा प्रसार आणि समाजात विचारांच्या झालेल्या बदलामुळे स्त्रिया आज सर्व क्षेत्रात अग्रेसर आहेत. समाजात लिंग भेदभावाचे अनेक प्रकार दिसून येतात. स्त्री व पुरुष यांच्यातील समानतेचा विचार करण्याची सुरुवात शालेय जीवनापासूनच होणे आवश्यक आहे. म्हणूनच माध्यमिक शाळेत लिंग समभाव हा अत्यंत महत्त्वाचा विषय ठरतो. लिंग समभावाची संकल्पना शाळेमध्ये प्रभावीपणे रुजवण्यासाठी मुख्याध्यापकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. खाली दिलेल्या काही उपाययोजना मुख्याध्यापकांनी राबवल्यास शाळेमध्ये स्त्री-पुरुष समानतेची सकारात्मक आणि समतोल संस्कृती निर्माण होऊ शकते

शाळेतील लिंग समभावाचे महत्व:

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो.

मुला-मुलींना समान संधी मिळतात.

भेदभावमुक्त वातावरण तयार होते.

पुढील सामाजिक जीवनासाठी सकारात्मक दृष्टिकोन तयार होतो.





लिंग भेदभावाची उदाहरणे :

- ❖ केवळ मुलांनाच खेळांमध्ये संधी देणे.
- ❖ वर्गात मुलांनाच पुढे बोलण्याची संधी मिळणे.
- ❖ मुलींना फक्त "घरगुती" कामे शिकवणे.
- ❖ शिक्षकांचा पक्षपाती दृष्टिकोन.

मुख्याध्यापकांनी लिंग समभावासाठी विद्यालयामध्ये केलेल्या उपाययोजना

1. **सर्वांसाठी समान संधी देणे :-**

शैक्षणिक अभ्यास, शाळेमध्ये घेण्यात येणा-या क्रीडा स्पर्धा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, विज्ञान प्रदर्शन अशा प्रत्येक क्षेत्रात मुला-मुलींना समान संधी मिळते का याची खात्री करून त्या त्या विभागप्रमुखांना मुला - मुलींना समान संधी देण्यात यावी अशी सूचना दिली जाते किंवा तसे मार्गदर्शन केले जाते. त्याच बरोबर लिंग समभाव या विषयातील तज्ञ व्यक्ती शाळेत बोलावून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून मुला - मुलींच्या मनातील शंकांचे समाधान केले जाते.



विद्यार्थ्यांचे निवड मंडळ, वर्गप्रमुख, सभा संचालन यामध्ये दोघांनाही समान प्रतिनिधित्व दिले जाते.

2.लिंग समतेसंबंधी विशेष सभा, महिला मेळावा, व्याख्याने, पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित केली जातात. या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस रूपाने प्रोत्साहन दिले जाते.



स्त्री-पुरुष समानतेसंबंधी प्रबोधन करणाऱ्या व्यक्तींना शाळेत आमंत्रित करून. शाळा स्तरावर लिंग समतेविषयी जागरूकता केली जाते.





3. शिक्षक प्रशिक्षण :

शिक्षकांना लिंग समभावाविषयी संवेदनशील बनवण्यासाठी विद्यालयामध्ये विशेष कार्यशाळा आयोजित केली जाते.

शिकवणुकीत लिंग पक्षपात न होईल, यासाठी मार्गदर्शन केले जाते.


4.पाठ्यपुस्तकातील लिंग समभाव दर्शवणारी उदाहरणे ओळखून विद्यार्थ्यांना योग्य स्पष्टीकरण दिले जाते.

5. विद्यालयामध्ये मुलींसाठी सुरक्षित व प्रेरणादायी वातावरण तयार केले आहे.

शाळेतील शौचालये, सुरक्षिततेची व्यवस्था, मुलींसाठी सल्ला व मार्गदर्शन तज्ज्ञ म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. विजया जाधव आणि सौ. संजीवनी मोहिते यांची नेमणूक केली आहे. त्याचबरोबर विद्यालयामध्ये मुलींना आत्मरक्षणाचे प्रशिक्षण दिले (सेल्फ डिफेन्स) जाते.

6. पालकांशी संवाद:

विद्यालयामध्ये पालक सभा घेऊन लिंग समतेच्या दृष्टिकोनाविषयी जागरूकता निर्माण केली जाते. पालकांनी मुला-मुलींचा भेद न करता दोघांनाही शिक्षण आणि संधी मिळवून देण्यावर भर द्यावा हे सूचित केले जाते.



विद्यालयामध्ये पुस्तकी ज्ञाना बरोबर व्यावसायिक शिक्षणही दिले जाते. शाळेतील संगणक प्रयोगशाळा मुलीसाठी नेहमीच उपयोगी ठरते.

मुलींना फक्त बौद्धिक शिक्षण न देता त्यांना आरोग्यदायी शिक्षण देण्यावर भर दिला जातो. यासाठी विद्यालयामध्ये सुसज्य अशी जिम आहे. यामध्ये मुलींना शारीरिक व्यायाम शिकवले जातात.





7. गुणवत्ता मोजण्याचे समान निकष :

मुला-मुलींना केवळ लिंगाच्या आधारावर नव्हे, तर कौशल्याच्या आधारेच गुणांकन करणे.बक्षीस आणि गौरवप्रसंगी भेदभाव न करणे. याची जाणीव शिक्षकांना करून दिली जाते.

8. अध्यापनात समावेशक दृष्टीकोन :

शिकवताना स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य बिंबवणारे दृष्टिकोन, गोष्टी, उदाहरणे देणे.

9. अध्यापनात समतोल प्रतिमा वापरणे :

वर्गात दाखवले जाणारे चित्र, व्हिडिओ, संदर्भ यामध्ये स्त्रियांना सशक्त, पुढे आलेल्या भूमिकांमध्ये दाखवणे.

10. शाळेची धोरणे आणि नियम :

कोणत्याही प्रकारच्या लिंगभेदाला शाळेत स्थान नाही, हे स्पष्टपणे धोरणांमध्ये नमूद केले आहे. भेदभाव, छळ किंवा लिंग पक्षपात न करण्याच्या सूचना सर्व शिक्षक सहकाऱ्यांना दिल्या आहेत. शाळेतील विविध कार्यक्रमांना विविध क्षेत्रातील महिला अधिकारी निमंत्रित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये प्रेरणा निर्माण होते. महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत याची जाणीव होते.




शाळेतील कार्यक्रमाना अनेक क्षेत्रातील प्रेरणादायी काम करणाऱ्या महिला निमंत्रित करून मुलांना मार्गदर्शन केले जाते.

आभार :

लिंग समभावामुळे समाजात न्याय, समानता आणि प्रगती वाढते. मुली शिक्षित आणि स्वावलंबी झाल्यास त्या आपल्या कुटुंबाचा आणि देशाचा विकास घडवू शकतात. त्यामुळे लिंग समभाव ही काळाची गरज नाही तर भविष्याची गुरुकिल्ली आहे. लिंग समभावाची अंमलबजावणी प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मुख्याध्यापकांनी पुढाकार घेऊन लिंग समतेचा विचार संपूर्ण शाळेत रुजवला आहे. विद्यार्थ्यांमध्ये समानतेची जाणीव निर्माण होईल

अश्या प्रकारे शाळेची शिस्त बसवली आहे. त्यामुळे ही पिढी भविष्यात भेदभाव विरहित समाज घडवेल अशी आशा मला वाटते. म्हणूनच लिंग समभाव हा फक्त शिकवण्याचा विषय न राहता तो समाज परिवर्तनाचा विषय आहे याची जाणीव करून देण्याचं शाळा हे एक महत्वाचं माध्यम आहे अशी माझी धारणा आहे. बहुतेक वेळा शाळेमध्ये पुरुष शिक्षक या विषयावर बोलण्यास पुढे येत नाहीत परंतु हा विषय समाजरचनेतील महत्वाचा असल्यामुळे शाळेमध्ये यावर सर्वांनी मोकळेपणाने बोलले पाहिजे आपली मते व्यक्त केली पाहिजेत असे मला वाटते. यामुळे पुढची पिढी निश्चितच सुसंस्कृत होईल अशी आशा आहे.

----------**----------



"इंग्रजी भाषा विकासासाठी विविध उपक्रम राबवणारी शाळा"

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा चिंचणी अंबक, ता. कडेगाव, जि. सांगली.
शाळेचा पत्ता - चिंचणी अंबक, ता. कडेगाव, जि. सांगली.
शाळेचा ईमेल आयडी - uttammadane097@gmail.com
मुख्याध्यापक नाव - श्री. उत्तम ज्ञानू मदने
मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9545976162
मुख्याध्यापक ईमेल आयडी - uttammadane097@gmail.com



प्रस्तावना : -

जिल्हा परिषद शाळा, चिंचणी येथे इयत्ता १ली ते ४ थी वर्ग असून या वर्षी पासून इयत्ता १ ली साठी सेमी इंग्रजी वर्ग सुरु करण्यात आला आहे. पारंपारिक पध्दतीपेक्षा वेगळे नाविन्यपूर्ण मार्ग वापरुन विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. काळ बदलत आहे. सर्वच क्षेत्रात झपाट्याने व आधुनिक बदल होत आहेत. खाजगी तसेच इंग्रजी माध्यमांच्या शाळेचा प्रभाव शहरी तसेच ग्रामीण भागात वाढला आहे. इंग्रजी

माध्यमांच्या शाळांच्या स्पर्धेत टिकायचे असेल तर त्यांच्या पुढे जाऊन कार्य केले पाहिजे, असे वाटल्याने आमच्या शाळेत विविध उपक्रम राबविले. पालकांना जिल्हा परिषद शाळेकडे खेचून घ्यायचे होते. म्हणून काही तरी नाविन्यपूर्ण करणे गरजेचे होते. म्हणून इंग्रजी भाषेसाठी विविध उपक्रम राबविले.

दैनंदिन अध्यापन करताना एक बाब प्रकर्षाने जाणवली की, इंग्रजी भाषेविषयी विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड दिसून येतो. तो दूर करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले. इंग्रजी अध्ययन अध्यापन कृतीयुक्त होण्यासाठी English Dictionary, English Conversation, English Dnyankumbh, English Assembly, हजेरी क्रमांकानुसार शब्द सांगणे हे विविध उपक्रम राबवण्यात आले. विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेची गोडी लागावी, शब्दसंपत्ती वाढावी, त्यांना इंग्रजी शब्दांचे वाचन व स्पेलिंग तयार करता यावेत, इंग्रजी वाक्ये तयार करता यावीत असा उद्देश आहे. वाढत्या शैक्षणिक स्पर्धेत टिकण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी हे उपक्रम गरजेचे आहेत, आत्ताचे युग हे Modern आणि Technical युग आहे. यामध्ये इंग्रजी विषयाचा खूप वापर होतो. या युगात पुढे जायचे असेल तर इंग्रजी विषय खूप महत्वाचा आहे.

"English Is International Language"


जगाच्या पाठीवर कुठेही जाण्यासाठी इतरत्र संवाद साधण्यासाठी इंग्रजी विषय महत्वाचा आहे.

गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आलेल्या समस्या :-

1) विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी विषयाची भिती.
2) इंग्रजी भाषेचे अपुरे ज्ञान.
3) English Lab च्या निर्मितीसाठी साहित्य जमवणे.
4) विद्यार्थ्यांचा सहभाग.
5) उपक्रम राबविण्यासाठी विविध साहित्याची उपलब्धता.

समस्या पूर्ततेसाठी केलेल्या उपाययोजना :-

१) विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी विषयाची भीती घालवण्यासाठी मार्गदर्शन केले व विविध खेळ घेतले.



२) English Lab उभारणी करण्यासाठी लोकसहभाग घेतला व English Lab ची तयारी केली.

३) English उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रोत्साहन दिले.

४) विविध उपक्रम राबवण्यसाठी सहकारी शिक्षकांची मदत घेतली.



इंग्रजी भाषा विकासासाठी विविध उपक्रम

१) English Dictionary:-

English Lab मध्ये भरपूर शब्दकार्डाचा समावेश केला आहे. ते शब्द विद्यार्थ्यांनी वाचले. विद्यार्थ्यांनी A to Z. या प्रमाणे शब्दसंग्रह तयार केला.

२) English Conversation:-

छोटे छोटे संवाद घेऊन त्यावर मुलांनी सादरीकरण केले.

३) English Lab:-

English Lab मध्ये १ ली ते ४ थी च्या अभ्यासक्रमावर आधारित तक्ते व साहित्य आहे. विद्यार्थी इंग्रजीमध्ये चित्रवर्णन करतात. वस्तूंची नावे सांगुन वाक्ये तयार करतात.

४) English Dnyankumbh :-

आम्ही एका बरणीत इंग्रजी शब्द असलेल्या चिठ्या टाकल्या. उदा. Lion, Computer, Rose, Body Parts प्रत्येकाने त्यातील एक चिठ्ठी उचलायची व त्यावर बोलायचे. या कृती मुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढले.

५) English Assembly :-

शालेय परिपाठात विद्यार्थी इंग्रजी भाषेचा वापर करतात. त्यामध्ये इंग्रजी ऑर्डर, बातम्या, सुविचार, दिनविशेष, समानार्थी शब्द असा सर्वसमावेशक परिपाठ इंग्रजीतून सादर केला.

६) हजेरी क्रमांकानुसार शब्द सांगणे :-

समजा आज ४ तारीख आहे. तर प्रत्येक वर्गातल्या ४ हजेरी क्रमांक असलेल्या विद्यार्थ्यांना ४ नंबरच्या D या अक्षरापासून तयार होणारे शब्द स्पेलिंग व अर्थासहित सांगितले विद्यार्थी एकावेळी १५-२० शब्द सांगू लागले.

विविध उपक्रमांचा प्रत्यक्ष परिणामः-

१) विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषेविषयी भीती कमी झाली.


२) विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेविषयी गोडी निर्माण झाली. ४) विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयात येणाऱ्या समस्यांचा शोध लागला.

३) इंग्रजी भाषेतील काही शब्दांचा दैनंदिन जीवनात उपयोग होऊ लागला.

५) इंग्रजी विषयातील संभाषण कौशल्याचा विकास झाला.

समारोप :-

जिल्हा परिषद शाळा चिंचणी (अंबक) ता. कडेगांव, जि. सांगली येथे इंग्रजी भाषा विकासासाठी विविध उपक्रम राबवताना शाळेतील मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक वृंद यांनी अथक परिश्रम घेतले.




GPS Map Camera
Chinchani Ambak, Maharashtra, India
684x+2cx, Chinchani Ambak, Chinchani Wangi,
Maharashtra 415303, India
Lat 17.205003° Long 74.348607°
25/01/25 09:35 AM GMT +05:30
Google





---**---

लिंग समभाव व समावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा भटवाडी

शाळेचा पत्ता - भटवाडी ,केंद्र -शिराळा तालुका शिराळा, जिल्हा.सांगली

मुख्याध्यापक नाव - श्रीम. मंगल राजाराम यादव

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ७४९९५०२२२०

मुख्याध्यापक इमेल आयडी - yadavmangal372@gmail.com

प्रस्तावना

माझी जिल्हा परिषद शाळा भटवाडी ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून ती एक संस्काराची आणि समाजनिर्मितीची कार्यशाळा आहे. जसे बीज रुजवून त्याचे वटवृक्षात रूपांतर करण्याचे काम माती करते, तसेच एका विद्यार्थ्याच्या आयुष्यात परिवर्तन घडवून त्याला उत्तम नागरिक बनविण्याचे कार्य शाळा करते. इथे विद्यार्थ्याला केवळ पुस्तकाचे ज्ञानच मिळत नाही, तर शिस्त, संयम, सहकार्य, समजूतदारपणा, कष्ट आणि आत्मनिर्भरतेचे धडेही मिळतात.

शाळा म्हणजे संस्कृतीचे केंद्र, भविष्य घडवणारा घटक आणि समाजाच्या प्रगतीचा मूलाधार. एका उत्तम शाळेमुळे संपूर्ण गावाचा, शहराचा आणि राष्ट्राचा चेहरा उजळतो. शाळेच्या यशोगाथेमध्ये शिक्षकांचे समर्पण, विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचा विश्वास आणि संपूर्ण समाजाचा पाठिंबा हे सगळे घटक योगदान देतात.

या माझ्या **जिल्हा परिषद शाळा भटवाडी**च्या यशोगाथेमध्ये केवळ परीक्षा निकाल नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या जीवनातील सकारात्मक बदल, उपक्रमशीलता, विविध स्पर्धांतील यश, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रीय मूल्यांचा प्रसार या सगळ्यांचा समावेश होतो. अशा शाळेची यशोगाथा ही प्रेरणादायक आहेच आणि इतरांसाठी आदर्श देखिल ठरते.

मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न

१) लिंग समतेबाबत जागरूकता वाढवणे

लिंग समतेची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच निर्माण झाली पाहिजे. मुख्याध्यापकांनी यासाठी विविध सर्जनशील उपक्रमांची आखणी केली. उदाहरणार्थ, मुलींचे शिक्षण का महत्त्वाचे आहे, या विषयावर निबंध स्पर्धा, भित्तीचित्र स्पर्धा, कविता सादरीकरण असे उपक्रम घेतले गेले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक भेदभावाविरुद्ध जागरूकता निर्माण झाली.

बालसाहित्यातून किंवा गोष्टीतून स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देणाऱ्या कथा शिक्षकांकडून वाचून दाखवल्या गेल्या. विद्यार्थ्यांना विचार करायला लावले गेले की, प्रत्येकाला समान अधिकार आणि संधी मिळायला हव्यात.



"स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देणाऱ्या पुस्तकांचे वाचन"

२) समावेशक शिक्षण वातावरण निर्माण करणे

समावेशकता म्हणजे फक्त लिंगापुरती मर्यादित नसून, सर्व प्रकारच्या विविधतेचा स्वीकार आहे. मुख्याध्यापकांनी यासाठी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणात, खेळात, संस्कृतिक उपक्रमात सहभागी होण्याची संधी दिली.

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी भौतिक सुविधा (जसे की रॅम्प, विशेष खुर्च्या) निर्माण केल्या. भाषेचा समावेशक वापर हा देखील महत्त्वाचा भाग होता.

जसे की "विद्यार्थ्यांनो" किंवा "सर्व मित्रांनो" अशा शब्दांचा वापर करून कोणत्याही लिंगाला वेगळं वाटणार नाही, याची काळजी घेतली गेली. यामुळे शाळा ही प्रत्येकासाठी सुरक्षित आणि आपली वाटणारी जागा बनली.



"स्त्री पुरुष समानता बाबत गावातील जनजागृती"

३) मुलींसाठी सुरक्षित व सन्मानपूर्वक वातावरण

शाळेमध्ये मुलींना शारीरिक व मानसिक सुरक्षितता देणे फार महत्त्वाचे आहे. मुख्याध्यापकांनी या दृष्टीने काही ठोस उपाययोजना केल्या.

उदाहरणार्थ – शाळेतील स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता, पाळीच्या काळात सॅनिटरी नॅपकिन्स उपलब्ध करणे, सल्लागार शिक्षकांची नियुक्ती हे पावले उचलली गेली.

तक्रार पेटी (Complaint Box) हे माध्यम विद्यार्थ्यांना कोणतीही समस्या मोकळेपणाने मांडण्यास मदत करते.

स्व-संरक्षण प्रशिक्षण (Self Defense Training) मुलींना आत्मविश्वास आणि संरक्षणाची जाणीव देतो. यामुळे मुलींच्या पालकांचाही शाळेवर विश्वास वाढला.



"स्व-संरक्षण तसेच पाळीच्या काळातील सुरक्षितता"

४) शाळेतील नेतृत्वाच्या संधींमध्ये समता

नेतृत्वाच्या संधींबाबत मुला-मुलींमध्ये कुठलाही भेदभाव न करण्याचे धोरण राबवले गेले. मुख्याध्यापकांनी शाळेतील मुख्य प्रतिनिधी, वर्गनेते, गटप्रमुख

अशा पदांसाठी लिंगभेद न ठेवता निवड प्रक्रिया राबवली.

मुलींना नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याने त्या अधिक आत्मविश्वासाने शाळेतील निर्णयप्रक्रियेत सहभागी होऊ लागल्या.

या प्रक्रियेमुळे 'मुलगीही सक्षम नेतृत्त्व करू शकते' असा संदेश संपूर्ण शाळा परिसरात पसरला.



"कोणत्याही लिंग भेदाशिवाय सर्वसमावेशक संधी"

५) पालक व समुदाय सहभाग

लिंग समतेचा प्रभाव केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न ठेवता तो पालक आणि समाजापर्यंत पोहोचवणे आवश्यक असते. मुख्याध्यापकांनी पालक सभांमध्ये लिंग समतेचे महत्त्व पटवून देणारे सत्रे घेतली.

'मुलगी शिकली प्रगती झाली', 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या सरकारी उपक्रमांशी समन्वय ठेवून विशेष प्रचार-प्रसार करण्यात आला.

समाजातील विविध क्षेत्रातील महिलांना शाळेत बोलावून संवाद साधण्याची संधी दिली. यामुळे पालकांच्या मनातील रूढ कल्पना बदलायला मदत झाली.



"लिंग समानतेबाबत महिला संवाद"

६) शिक्षकांसाठी समविषयक प्रशिक्षण

शाळेतील शिक्षकांचा दृष्टिकोन सकारात्मक आणि समावेशक असेल तरच लिंग समता प्रत्यक्षात उतरते. म्हणून मुख्याध्यापकांनी शिक्षकांसाठी 'Gender

Sensitization' प्रशिक्षण, कार्यशाळा आयोजित केल्या.

या प्रशिक्षणांमधून स्त्री-पुरुष भेद न ठेवता शिकवण्याचे तंत्र, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची भाषा, मूल्यशिक्षणात लिंग समावेशकता याबाबत माहिती दिली गेली.

शिक्षकांनीही नंतर आपल्या अध्यापनामध्ये अशा दृष्टिकोनाचा वापर सुरू केला. यामुळे मुलं-मुली दोघेही समान आत्मसन्मानाने शिकू लागले.



"शिक्षक प्रशिक्षण शिबीर"

समारोप – एक सकारात्मक बदल

मुख्याध्यापकांच्या या प्रयत्नांमुळे शाळेमध्ये एक समतेचे, सुरक्षिततेचे, आणि सहभागाचे वातावरण निर्माण झाले. लिंगभेद विरहित शिक्षण ही कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मुख्याध्यापकांची दिशा, धोरण आणि कृतिशीलता महत्त्वाची ठरते.

शाळा ही केवळ ज्ञानदानाचे केंद्र नसून, ती सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे शाळेमध्ये लिंग समभाव आणि समावेशकतेचा स्वीकार करणे ही काळाची गरज ठरते. मुख्याध्यापक हे शाळेतील नेतृत्वकर्ता असून, त्यांच्याकडून सामाजिक मूल्यांची जपणूक होणे अत्यंत आवश्यक असते.

लिंग समतेचा अभाव हा अनेक पिढ्यांपासून चालत आलेला सामाजिक प्रश्न आहे. त्यामुळे हा भेदभाव दूर करण्यासाठी केवळ सरकारी योजना आणि धोरणे पुरेशी नाहीत, तर प्रत्यक्ष कृती आणि शाळा पातळीवरील बदल गरजेचे आहेत. या दृष्टीने मुख्याध्यापकांनी उचललेली पावले – जसे की लिंग समतेसाठी जनजागृती, सुरक्षित वातावरण, समावेशक भाषा, नेतृत्वाच्या संधींमध्ये समानता, पालक व समाजसहभाग आणि शिक्षकांचे प्रशिक्षण

— हे सर्व सामाजिक न्याय आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या दृष्टीने मोलाचे ठरतात.

आजच्या विद्यार्थ्यांमध्ये जर लहानपणापासूनच समतेचे आणि समावेशकतेचे मूल्य रुजले, तर उद्याचा समाज अधिक संवेदनशील, सुसंस्कृत आणि न्यायसंगत होईल. अशा विद्यार्थ्यांकडून कोणताही लिंग, जात, धर्म, वर्ग किंवा अपंगत्व यावर आधारित भेदभाव होणार नाही. त्यामुळे मुख्याध्यापकांनी घेतलेल्या या प्रयत्नांचा दीर्घकालीन सकारात्मक परिणाम फक्त शाळेपुरता मर्यादित न राहता, तो समाजाच्या सुदृढ भविष्यासाठी एक ठोस पायाभूत कार्य ठरतो.

शाळा ही केवळ शिक्षणाची जागा न राहता, मानवतेच्या मुल्यांचा आणि समानतेच्या संस्कारांचा केंद्रबिंदू बनते.

----------**----------




बालपंचायतीद्वारा नेतृत्व गुणास चालना देणारी सिद्धेवाडीची शाळा...!!

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिद्धेवाडी

शाळेचा पत्ता - सिद्धेवाडी,तालुका तासगाव जिल्हा सांगली

शाळेचा ईमेल आयडी - zpschoolsiddhewadi@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्रीम. द्राक्षायणी दशरथ पाटील

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९७६६८२०७२०

मुख्याध्यापक ईमेल आयडी - zpschoolsiddhewadi@gmail.com

प्रस्तावना -

शिक्षण मग ते कोणत्याही स्तरावरील असेल, प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक तसेच पदवी व पदवीव्युत्तर, विद्यार्थ्यांचा नेतृत्वगुण विकास हा त्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावणारी एक अत्यंत महत्त्वाची अशी प्रक्रिया आहे. शालेय विद्यार्थ्यामध्ये नेतृत्व गुणांचा विकास साधला तर त्याचे व्यक्तिमत्व विकसित होण्यास हातभार लागतो. विद्यार्थी दशेत मुल हे अनुकरणप्रिय असते. अशावेळी त्यांच्या समोर आदर्श व्यक्तीमत्वाची उदाहरणे सहेतुकपणे ठेवली तर याचा निश्चित परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्वावर होतो. याची सुरुवात जर प्राथमिक स्तरापासून झाली तर याचे चांगले परिणाम दिसून येतात. खरा शिक्षक जो की आपल्या विद्यार्थ्यास नेतृत्वाची संधी उपलब्ध करून देतो. या दृष्टीकोनातून 'बालपंचायत' हा उपक्रम प्राथमिक स्तरावर प्रभावीपणे राबवला तर याचा नेतृत्वगुण विकासामध्ये चांगला परिणाम दिसून येतो. हे ओळखून मी माझ्या शाळेत बालपंचायतीची रचना केली. हे करताना माझे सहकारी, शाळेचे मुख्याध्यापक व शासकीय योजना यांचा आधार घेतला व शाळा स्तरावर नियमितपणे 'बालपंचायत' म्हणजेच शाळेत असणाऱ्या 'शालेय मंत्रीमंडळाचा' प्रभावी वापर सुरु केला आहे. याचेच फळ म्हणून माझ्या शाळेतील विद्यार्थांनी कला, क्रीडा व स्पर्धा परीक्षा इत्यादी प्रकारात दैदिप्यमान यश प्राप्त केले आहे.





विद्यार्थी शिस्तीबाबत मुख्याध्यापक, शिक्षक यांना आलेल्या अडचणी -

शाळेत काम करत असताना शिक्षक व मुख्याध्यापक यांना वारंवार विद्यार्थ्यांच्या शिस्तीचा प्रश्न उद्भवत असे. दिलेल्या सूचनांचे पालन करणे, अध्यापन किंवा इतर बाबी एकाग्रतेने ऐकणे, ठरवलेले नियम पाळणे, एकमेकांसोबत शांततापूर्वक काम करणे, स्वयंशिस्तीचे पालन करणे इत्यादी बाबी विद्यार्थ्यांमध्ये अभावानेच दिसत असत. गटामध्ये किंवा जोडीने काम करताना विद्यार्थ्यांना अडचणी येत असत. विद्यार्थ्यांच्या एकमेकांच्या बाबतीत सतत तक्रारी येत असत. कधी कधी यामध्ये पालकांचा देखील हस्तक्षेप होत असे. परिणामी विद्यार्थ्यांच्या आंतरक्रिया प्रभावी होत नसत. विद्यार्थ्यांची एकमेकांकडून शिकण्याची प्रक्रिया मंदावली होती. त्यामुळे शाळेस विविध उपक्रमात अपेक्षित यश प्राप्त होताना दिसत नव्हते.

विद्यार्थी शिस्तीबाबत मुख्याध्यापक, शिक्षक यांनी शोधलेले उपाय -

या समस्येवर चर्चा करण्यासाठी मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.सुनील तावरे, श्री एन. डी पाटील, श्री. रमेश दगडे, सौ. शोभा भगत, सौ. शीला गायकवाड, श्री.प्रशांत पाटील व श्री. अजय काळे या आम्हा सर्व शिक्षकांची स्टाफ मिटिंग मध्ये सखोल चर्चा झाली. प्रत्येकाने यावर विविध उपाय सुचविले. चर्चेअंती असे ठरले की, जर विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग आपणास हवा असेल तर त्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली पाहिजे. विद्यार्थ्यांना एकमेकांसोबत काम करण्याच्या विविध संधी देण्याचे ठरले. सर्वप्रथम शालेय मंत्रिमंडळ स्थापना करण्यात आले. त्याचबरोबर प्रत्येक वर्गामध्ये वर्ग मंत्रिमंडळ देखील स्थापन करण्यात आले. यामध्ये विविध विद्यार्थ्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. आपल्याला काहीतरी पद मिळाले आहे ही भावना विद्यार्थ्यांना प्रेरित करणारी ठरली. विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणाऱ्या या भावनेचा सकारात्मक उपयोग करून घेण्यासाठी पुढे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नेतृत्वाची संधी देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

उद्याचा भारत आज शाळाशाळातून घडतो आहे. देशाचे भवितव्य ज्याच्या हाती आहे असा युवक तयार करणे व राष्ट्रास अर्पण करणे हे आपल्या शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे. भविष्यात निश्चितच आव्हानात्मक बाबी असल्या तरी उज्ज्वल संधी उपलब्ध करून देणाऱ्या आहेत . आपल्या देशातील जवळपास ५०% लोकसंख्या ही ३० वर्षाच्या आसपास असणारी आहे. ही किती मोठी उपलब्धी आपल्या देशासाठी आहे अशावेळी तो जर नेतृत्व करण्यास सक्षम नसेल तर योग्य ठरणार नाही. देशाचा भावी नागरिक हा सक्षमपणे आपली कार्ये करणारा नागरिक घडवा हे आपल्या शिक्षणाचे प्रधान उदिष्ट आहे. यासाठी नेतृत्वगुणाचा विकास होणे



गरजेचे आहे. याची सुरुवात जर प्राथमिकस्तरापासून केली तर त्याचे चांगले फायदे दिसून येतात. बालपणीच जर व्यक्तीमत्व विकासास योग्य वळण लागले तर ते त्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण ठरते. बालपणाचे वय हे ऐकण्याचे व अनुकरणाचे असते. याचा फायदा जर शाळांनी करून घेतला तर शाळा विकास व नेतृत्वगुण विकासामध्ये फार मोठे यश प्राप्त होते.

शालेयस्तरावर 'बालपंचायत' हा नेतृत्वगुण व व्यक्तीमत्व विकास साधणारा उपक्रम प्रभावीपणे राबविला तर शाळा विकासामध्ये मोठा हातभार लागतो. कामाचे वाटप, कामाची जबाबदारी, प्रत्यक्ष नियोजनात सहभाग व कार्यवाहीत स्वत: सहभागी झाल्याने विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुणाचा विकास साधणे शक्य होते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय देशाचा आदर्श नागरिक घडवणे शक्य होणार नाही. शालेय कामकाजात विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग घेताल्याने शाळा विकासासही हातभार लागणार आहे. विद्यार्थ्यांचा नेतृत्व विकास ही त्यांच्या सर्वांगीण विकासातली अत्यंत महत्त्वाची अशी प्रक्रिया आहे. ही संधी 'बालपंचायत' हा उपक्रम शाळाना उपलब्ध करून देतो. याचे महत्व लक्षात घेऊन माझ्या शाळेत 'बालपंचायत' हा उपक्रम निरंतर सुरु असून याचा शालेय नेतृत्व गुण विकासामध्ये मोठा आधार हातभार लाभला आहे.

समस्या सोडविण्यासाठी केलेली प्रभावी उपाययोजना/अंमलबजावणी -

उद्दिष्टे -

१] बालपंचायतची 'बालपंचायत' म्हणजेच 'शालेय मंत्रीमंडळाची शाळास्तरावर स्थापना करणे.

२] शाळेतील विविध कार्यक्रमाची जबाबदारी देणे.

३] कार्यक्रमाचे नियोजन करताना संपूर्ण स्वातंत्र्य देणे.

४] नेतृत्व करण्याची संधी प्रत्येकाला मिळेल व लिंगसमभाव राहील असे नियोजन करणे.

कार्यपद्धती -

शाळा हा समाजाचा लहान गटच असतो. समाजाचे प्रतिबिंब हे शाळेत उमटलेले असते. आपणास जर समाजात कोणता इष्ट बदल करायचा असेल आणि त्याची सुरुवात ही शाळेपासून केली तर त्याचे इच्छित परिणाम नक्कीच आपणास दिसून येतील. याची प्रचीती आम्हास शालेय परिसर तंबाखूमुक्त करताना आली होती. 'शालेय परिसर तंबाखूमुक्त अभियान' या सर्व मोहिमेचे नेतृत्व आम्ही आमच्या जिल्हा परिषद शाळा सिद्धेवाडीच्या मुलांकडे

दिले होते. या मोहिमेच्या कालावधीत शालेय परिसरात असणाऱ्या दुकानांना भेटी देणे, त्यांना तंबाखूचे पदार्थ न विकणे बाबत प्रबोधन करणे, वारंवार भेटणे, चर्चा करणे इ. काम सोपवले होते. याचा परिणाम असा झाला की, दि.३ मार्च २०२४ रोजी आमचा शालेय परिसर तंबाखूमुक्त परीसर म्हणून घोषित करता आला.तसे प्रमाणपत्र आम्हांस 'Salaam Mumbai Foundation' द्वारा प्राप्त झाले आहे. यात बालपंचायतीचा फार मोठा वाटा आहे. ही बालपंचायतीची ताकत लक्षात आल्याने मी शाळास्तरावर बालपंचायतीचा प्रभावी वापर सुरु केला. त्यास आज यश प्राप्त होताना दिसत आहे.

आमची शाळा ही ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेची शाळा आहे. आमच्या शाळेत इ. १ ली ते इ. ७ वी असे वर्ग आहेत. पुढील शिक्षणासाठी मुलांना जवळच्या गावात जावे लागते. तिथे शिक्षणासाठी जाताना माझा विद्यार्थी हा सक्षमपणे व आत्मविश्वासाने गेला पाहिजे. एकूणच जगाच्या बाजारात त्याचे नाणे खणखणीतच वाजले पाहिजे. हाच विचार करून बालपंचायतीचा उपयोग नेतृत्वगुण विकासाठी केला आहे.

१) बालपंचायत म्हणजे काय ?

बालपंचायत म्हणजे शालेय मंत्रीमंडळच.

फरक एवढाच की, यात प्रत्येक वर्गातील एका विद्यार्थाची मंत्री म्हणून लोकशाही मार्गाने निवड केली जाते. थोडक्यात यात शाळेत असलेल्या प्रत्येक वर्गाचा एक प्रतिनिधी असल्याने हे संपूर्ण शाळेचेच मंत्रीमंडळ ठरते.

२) बालपंचायतीची रचना व कार्ये –

शालेय दशेपासूनच विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुणाचा विकास व्हावा यासाठी शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीसच आमच्या शाळेत लोकशाही मार्गाने बालपंचायतीची निवड करण्यात येते. शालेयस्तरावर संपूर्ण शाळेचे मंत्रीमंडळ असावे यासाठी प्रत्येक वर्गास एक पद निश्चित केले. त्या प्रतिनिधीची निवड ही त्या संबधीत वर्गाने करायची असते. आमच्या शाळेत इ. १ ते ७ असे ७ वर्ग असल्याने ७ पदे व मोठा वर्ग ७ वीचा असल्याने इ. ७ वी साठी २ ज्यादा असे ९ जणांची निवड केली आहे. ही निवड करताना विद्यार्थीनीनां सुध्दा समान संधी मिळेल याची दक्षता घेतली. यामध्ये खालील पदे निश्चित करून कामाचे वाटप केले.

१] मुख्यमंत्री – हा बालपंचायतीचा प्रमुख म्हणून कार्य करतो.




२] अभ्यासमंत्री - प्रत्येक इयत्तेतील अभ्यासमंत्र्याकडून दर आठवड्याला आढावा घेतो.

३] स्वच्छतामंत्री – शालेय सफाई व स्वच्छता याचे नियोजन करतो.

४] परिपाठ मंत्री – प्रत्येक इयत्तेस सहभागी करून परिपाठाचे नियोजन करतो.

५] सहलमंत्री – शैक्षणिक सहलीच्या नियोजनामध्ये सहभाग घेतो.

६] आरोग्यमंत्री – प्रत्येक इयत्तेतील आरोग्यमंत्र्याकडून दर आठवड्याला आढावा घेतो.

७] क्रीडामंत्री – शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनात सहभाग घेतो.

८] सांस्कृतिकमंत्री – सहशालेय उपक्रमात सहभाग घेतो.

९] ग्रंथपाल – पुस्तके देवघेव, शालेय वाचनालय प्रमुख म्हणून कार्य करतो.

वरीलप्रमाणे बालपंचायतमधील प्रत्येक मंत्र्यास कामे नेमून दिल्यामुळे कामाचे विकेंद्रीकरण करणे शक्य झाले. यास समांतर असे प्रत्येक इयत्तेत त्या वर्गाचे मंत्रीमंडळ कार्यरत असल्याने अनेक विद्यार्थ्यांना संधी देणे शक्य झाले आहे. बालपंचायतीच्या प्रभावी अंमलबजावणीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणाचा विकास साधता आला.

३) कार्यक्रमाचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही -

सन २०२४ – २५ या शालेय सत्राच्या सुरुवातीस बालपंचायतीची निवड झाल्यानंतर शिक्षक स्टाफ सोबत एका बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत पुढील वर्षभरातील कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रम निश्चितीमध्ये त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देवून आवश्यक तिथे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी मार्गदर्शन करून कामाची दिशा निश्चित केली.

सन २०२४ – २५ साठी खालीलप्रमाणे नियोजन केले -

१] राष्ट्रीय सणांचे नियोजन करणे

२] राष्ट्रीय नेते यांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करणे.

३] विज्ञान प्रदर्शन – सहभाग व भेट

४] क्रीडा स्पर्धा तयारी




५] परिपाठ नियोजन

६] ग्रंथालय – पुस्तक वाटप नियोजन

७] परिसर व क्षेत्रभेटी

८] स्काउट – गाईड उपक्रम

९] मीना- राजू मंच कार्यक्रम

१०] छोट्या व मोठया सहलींचे नियोजन

११] शिक्षक व विद्यार्थी वाढदिवस

१२] गुरुपोर्णिमा कार्यक्रमाचे नियोजन

१३] वार्षिक स्नेहसंमेलन इ .

वर्षभरातील कार्यक्रमाचे नियोजन झाल्यानंतर प्रामुख्याने प्रत्येक कार्यक्रमाचे नियोजन करणे, लागणाऱ्या साहित्याची मांडणी करणे, कार्यक्रमादरम्यान शिक्षकांना मदत करणे, सभेचे सूत्रसंचालन करणे इतर विद्यार्थ्यांना कामे नेमून देणे. इ प्रकारची कार्ये केली जातात. हा कार्यक्रम वर्षभर चालत असल्याने 'बालपंचायत' हा विद्यार्थी नेतृत्वगुण विकसित करण्यातील महत्वाचा भाग आहे. योग्य त्या ठिकाणी शिक्षकांचे मार्दर्शन होत असल्याने व सर्वाना संधी मिळेल हे पाहिल्याने नेतृत्व विकासास मोठा हातभार लाभला आहे.

कार्यक्रमाचे नियोजन हे सत्राच्या सुरुवातीसच झाल्याने वर्षभरात कोणकोणते कार्यक्रम शाळेत होणार आहेत याची कल्पना मुलांना असते. पुढे ८ ते १० दिवसावर आपला नियोजित कार्यक्रम आहे हे निश्चित झाले की, बालपंचायतीच्या कार्यक्रमास सुरुवात होते. उदा. १४ नोव्हे. ला बालदिन असतो. याची सुरुवात ३ ते ४ तारखेपासून होते. यामध्ये कार्यक्रमाचे स्वरूप ठरवणे, मुलांना भाषणे पाठ करण्यास सांगणे, कार्यक्रमासाठी लागणाऱ्या साहित्याची जमवाजमव करणे, प्रत्यक्ष बालदिन साजरा करणे. या प्रत्येक टप्प्यावर येणाऱ्या अडचणीवर मात करून व योग्य तिथे शिक्षांकाचे मार्गदर्शन घेऊन मुले कार्यक्रम पार पाडतात. नियोजनाचे पूर्ण स्वातंत्र्य असल्याने नेतृत्व बहरण्यास पोषक वातावरण तयार होते. हा कार्यक्रम माझा आहे ही भावना वाढीस लागते व जबाबदारीची जाणीव निर्माण होते. कार्यक्रमाच्या अनुषंगाने सातत्याने विद्यार्थी- विद्यार्थी, शिक्षक - विद्यार्थी या आंतरक्रिया प्रभावी होतात. हे शाळा




विकासासाठी महत्वाचे ठरते. हे या उपक्रमाचे फायदे नेतृत्वगुण विकसित होण्यात मोलाची भूमिका बजावतात.

४) बालपंचायतीचे शाळेस झालेले फायदे –

माझ्या शाळेत 'बालपंचायत' हा उपक्रम प्रभावीपणे सुरु असल्याने शाळेस झालेले काही प्रमुख फायदे –

१. विद्यार्थ्यांद्वारे विविध उपक्रमांचे आयोजन –







२.सहशालेय उपक्रमांचे यशस्वी नियोजन व आयोजन स्वत: करतात.





(हात धुवा कार्यक्रमाचे प्रात्यक्षिक दाखवताना आरोग्यमंत्री)
(सहशालेय कार्यक्रमात नेतृत्व करताना ...)

३.विविध स्पर्धात तालुका, जिल्हास्तर यश प्राप्त केले आहे.









(स्पर्धात सहभाग व यशप्राप्ती...)

यशस्विता -



(आमच्या शाळेचे वैभव – विविध स्पर्धात राज्यस्तरापर्यंत यश प्राप्ती...)

बालपंचायतीचे काम नियमित व वर्षभर होत असल्याने आमच्या विद्यार्थ्यांत पुढील बदल दिसून आले आहेत .

१] विद्यार्थ्यांच्या संप्रेषण कौशल्यात वाढ झाली.

२] जबाबदारीचे विकेंद्रीकरण केल्याने नेतृत्वगुणात वाढ झाली.

३] कोणतीही जबाबदारी स्वीकारताना येणारे दडपण कमी झाले.

४] नियोजनाच्या स्वातंत्र्यामुळे व्यक्तीमत्व विकासास चालना मिळाली.

५] लिंगसमभाव व सर्वाना सामावून घेतल्याने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.


६] शाळेचे नियमित कामकाजामध्ये बालपंचायतीचे महत्व वाढले.

इंग्रजीतील ' Personality ' या शब्दाला मराठीत ' व्यक्तिमत्त्व ' असा शब्द प्रचलित आहे या व्यक्तीमत्व विकासामध्ये बालपंचायतीस महत्वाचे स्थान आहे हे सिद्ध होते.

समारोप -

विद्यार्थांना शालेय जीवनात शिस्त, चारित्र्य, लोकशाही मुल्ये, वैज्ञानीक दृष्टीकोन, नागरिकत्व , वक्तशीरणा, देशभक्ती, निसर्गप्रेम, बंधुभाव, सर्वधर्मसमभाव इ. गुणांचे केवळ पुस्तकी शिक्षण देवून त्यांचा व्यक्तीमत्व विकास व नेतृत्वगुणाचा विकास साधने शक्य होणार नाही. सभेत कसे बोलावे हे जसे पुस्तक वाचून जमणार नाही अगदी त्याचप्रमाणे नेतृत्व करण्याची संधी दिली नाहीतर नेतृत्व फुलणार कसे. बालपंचायतीमध्ये स्वत:च तो कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करतो. येणाऱ्या अडचणीवर मात करून कार्यक्रम यशस्वी करतो. हे टीम वर्क असल्याने संघभावना वाढीस लागते. नेतृत्वगुणाच्या पर्यायाने शाळेच्या विकासात बालपंचायतची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे या उपक्रमाच्या यशस्वीतेवरून लक्षात येते.

----------**----------



शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीकरिता उन्हाळी वर्ग राबविण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा बागणी नं. 2 तालुका वाळवा जिल्हा सांगली

शाळेचा पत्ता - बागणी ,तालुका वाळवा जिल्हा सांगली

मुख्याध्यापकांचे नाव - श्री. प्रवीण तुकाराम यटम

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9096320023

मुख्याध्यापक ईमेल आयडी - patilsandeep220@gmail.com



प्रस्तावना

सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे मूलभूत साधन आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वृद्धिंगत करणे हे शिक्षण क्षेत्रातील एक मोठे आव्हान आहे. या आव्हानाला समर्थपणे सामोरे जात, जिल्हा परिषद शाळा बागणी नं. २ (ता. वाळवा, जि. सांगली) ही शाळा गेली चार वर्षे एक वेगळा उपक्रम सातत्याने राबवते आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी उन्हाळी वर्ग.

सन २०२२ पासून या उपक्रमाची सुरुवात झाली शाळेतील शिक्षक श्री संदीप पाटील यांनी ही कल्पना सादर केली. या कल्पनेला शाळेतील मुख्याध्यापक श्री प्रवीण यटम, सौ.अपर्णा ढोले ,सौ. वैशाली कोळी ,श्रीमती अर्चना माने, श्री.संभाजी पाटील, श्री.शरद

पाटील या शिक्षकांनी शिक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि दरवर्षी मे महिन्याच्या सुट्टीमध्ये शाळेतील सर्व शिक्षकांनी आपल्या वैयक्तिक सुट्ट्या बाजूला ठेवत, संपूर्ण उत्साहाने विद्यार्थ्यांसाठी हा वर्ग चालविला. आज मे २०२५ मध्ये या उपक्रमाचे चौथे यशस्वी वर्ष पूर्ण झाले. या उपक्रमाचा शाळेच्या गुणवत्ता वाढीपासून ते सामाजिक विश्वास प्राप्तीपर्यंत मोठा सकारात्मक परिणाम झाला आहे.

उन्हाळी वर्ग राबवताना आलेल्या प्रमुख समस्या

जिल्हा परिषद शाळा बागणी नं. २ येथे मे महिन्यात शिष्यवृत्ती परीक्षेसाठी राबवण्यात येणाऱ्या उन्हाळी वर्ग उपक्रमाने शैक्षणिक क्षेत्रात नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत. मात्र या उपक्रमाच्या अंमलबजावणीत काही अडचणींनाही सामोरे जावे लागले.

१) विद्यार्थ्यांची उपस्थिती राखणे :

मे महिना सुट्टीचा काळ असल्याने काही विद्यार्थी गावी जाण्याचा आग्रह धरत होते. काही पालकांचा अभ्यासाकडे नकारात्मक दृष्टिकोन होता. "सुट्टीत अभ्यास का?" असा प्रश्न ऐकावा लागला. त्यामुळे सुरुवातीला उपस्थितीमध्ये अनियमित होती.

२) पालकांचे संमिश्र प्रतिसाद :

काही पालकांनी उपक्रमाचे कौतुक केले, तर काहींना तो अनावश्यक वाटला. मजुरी करणाऱ्या पालकांना विद्यार्थ्यांना वर्गात पाठवणे कठीण गेले.

३) शिक्षकांच्या वैयक्तिक समस्या :


शिक्षकांना स्वतःच्या कुटुंबातील जबाबदाऱ्या आणि उन्हाळी वर्ग यांचा समन्वय साधताना अडचणी आल्या. सलग काम केल्याने शारीरिक थकवा जाणवत होता. धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमुळे काही वेळा शिक्षकांची उपस्थिती सांभाळणे कठीण झाले.

४) तांत्रिक व शैक्षणिक अडचणी व गैरसमज:

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पातळीतील फरक, इंग्रजी व बुद्धिमत्ता विषयातील अवघड संकल्पना समजावून सांगणे यामुळे शिकवणीत अडथळे आले. याशिवाय, परिसरातील काही शाळांनी उपक्रमाबाबत अपप्रचार केला, ज्यामुळे पालक गोंधळले.

उपाय योजना

उन्हाळी वर्ग राबवताना अनेक समस्या आल्या होत्या, परंतु खालील उपाय योजना राबविल्यामुळे त्या समस्यांवर यशस्वीपणे मात करता आली.



१) पालकांशी संवाद व विश्वास संपादन केला —

पालकांची मानसिकता बदलण्यासाठी त्यांच्याशी नियमित संवाद साधला. बैठका घेण्यात आल्या. यामध्ये शहरातील यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे देऊन उन्हाळी वर्गाचे महत्त्व समजावले. यामुळे पालकांनी सहकार्य करायला सुरुवात केली.

२) शिक्षकांमध्ये समन्वय आणि जबाबदाऱ्यांचे वाटप केले -

शाळेतील सर्व शिक्षकांमध्ये समन्वय साधून विषयानुसार जबाबदाऱ्या वाटल्या. अभ्यासक्रम, वेळापत्रक, पालक संवाद आदी गोष्टींची योजना ठरवली. गरज पडल्यास एकमेकांना सहकार्य करण्याची सकारात्मक भूमिका सर्वांनी घेतली.

३) विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर योजना राबवल्या —

विद्यार्थ्यांचा सहभाग आणि सातत्य टिकवण्यासाठी खाऊ वाटप करण्यात आले. वर्ग संपल्यानंतर सहभाग प्रमाणपत्रे व विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा व उत्साह निर्माण झाला.

४) स्थानिक समाजाचा व ग्रामपंचायतीचा सहभाग घेतला -

गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, ग्रामपंचायत सदस्य, माजी विद्यार्थी यांना वर्गाबाबत माहिती देऊन सहकार्याची विनंती केली. काहींनी शैक्षणिक साहित्य, खाऊ दिले, तर काहींनी एक तास शिकवणी घेतली. त्यामुळे वर्गाची उर्जा व उत्साह दोन्ही वाढले.

५) उन्हाळी वर्गाचा प्रसार आणि प्रचार केला —

पालकांतील गैरसमज दूर करण्यासाठी स्थानिक पत्रकारांची मदत घेतली. त्यांनी या उपक्रमाबद्दल सकारात्मक बातम्या वर्तमान पत्रात दिल्या. यासोबतच शाळेच्या ब्लॉगमधूनही उन्हाळी वर्ग उपक्रमाचे फोटो व माहिती प्रसारित करण्यात आली. हे सर्व उपाय एकत्रितपणे राबविल्यामुळे उन्हाळी वर्ग यशस्वीपणे पार पडला.

कार्यवाही

१) उपक्रमाची आखणी

उन्हाळी वर्ग उपक्रमाची आखणी जानेवारी महिन्यापासूनच सुरू केली जाते. पाचवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड, त्यांची स्तरानुसार विभागणी, अभ्यासक्रम आखणी, सराव प्रश्नपत्रिका तयार करणे, वेळापत्रक ठरवणे, तसेच शिक्षकांच्या जबाबदाऱ्या वाटप करणे अशा सर्व गोष्टी यामध्ये ठरवल्या जातात.




२) शिक्षकांचे योगदान

मे महिन्यातील तापत्या उन्हातही मुख्याध्यापक श्री प्रवीण यटम, अपर्णा ढोले, वैशाली कोळी, अर्चना माने, संभाजी पाटील, शरद पाटील, संदीप पाटील या शिक्षकांनी आपला आनंदाने सहभाग नोंदवला. कोणताही मोबदला न घेता, आपल्या कुटुंबासाठी दिल्या जाणाऱ्या सुट्ट्या बाजूला ठेवत, त्यांनी शाळेला प्राधान्य दिले. प्रत्येक शिक्षकाने विषयानुसार मार्गदर्शन, सराव परीक्षा, चर्चा वर्ग व वैयक्तिक मार्गदर्शन असे काम हसतमुखाने पार पाडले.

३) विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उपस्थिती

शिष्यवृत्ती परीक्षेसाठी केवळ आपल्या शाळेतीलच नव्हे तर बागणी व परिसरातील जिल्हा परिषद, खाजगी व विनाअनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. त्यांची नियमित उपस्थिती, वेळेचे पालन व अभ्यासातील सातत्य हे या उपक्रमाचे यश अधोरेखित करणारे घटक ठरले.

४) अभ्यासक्रम व सराव चाचण्या


विद्यार्थ्यांना मराठी, गणित, इंग्रजी व बुद्धिमत्ता या चारही विषयांचा सखोल सराव करून देण्यात आला. प्रश्नसंच, दैनिक प्रश्नमाला, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका यावर आधारित सराव चाचण्या, वेळेनुसार पेपर सोडवणे, उत्तरपत्रिकेचे मूल्यमापन व वैयक्तिक फीडबॅक देण्यात आले.

५) पालकांशी संवाद व समाज सहकार्य

या उपक्रमासाठी पालकांची बैठक घेतली जात असे. त्यातून पालकांना परीक्षेबाबत जागरूकता आली आणि ते देखील मुलांच्या अभ्यासात सहभागी झाले. काही पालकांनी वर्गासाठी विद्यार्थ्यांसाठी खाऊची जबाबदारी स्वीकारली. समाजाने शाळेच्या या प्रयत्नांना दाद दिली आणि विश्वास दाखविला.

६) गुणवत्ता शोध परीक्षा सहभाग

या उपक्रमाचा परिणाम म्हणजेच गुणवत्तेत वाढ. परिणामी, सांगली जिल्हा परिषद आयोजित गुणवत्ता शोध चाचणी मध्ये शाळेच्या विद्यार्थिनींनी लक्षणीय यश मिळवले. या यशामुळे उपक्रमाचे शैक्षणिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले.



यशस्विता

उन्हाळी वर्ग उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अनेक सकारात्मक बाबी घडल्या:

१) शिष्यवृत्ती परीक्षेतील यश

अ. क्र.	शैक्षणिक वर्ष	पात्र विद्यार्थिनी संख्या	उल्लेखनीय बाब
१	२०२०-२१	०	
२	२०२१-२२	८	१ विद्यार्थिनी नवोदय विद्यालय प्रवेश
३	२०२२-२३	२	
४	२०२३-२४	६	१ विद्यार्थिनी शिष्यवृत्तीधारक
५	२०२४-२५	१०	

वर्षानुवर्षे होत असलेली वाढ हे यशाचे मूर्तिमंत उदाहरण आहे.

२) शाळेचा पट वाढ

अ. क्र.	शैक्षणिक वर्ष	पट संख्या	उल्लेखनीय बाब
१	२०२०-२१	१४८	मॉडेल स्कूलसाठी निवड
२	२०२१-२२	१५२	-
३	२०२२-२३	१५६	-
४	२०२३-२४	१६५	-
५	२०२४-२५	१७२	मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर स्पर्धा – तालुक्यात प्रथम
६	२०२५-२६	१८२	-

उन्हाळी वर्ग उपक्रमामुळे पालकांचा शाळेवरील विश्वास वाढला. त्यामुळे शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत गेली.

३) शिक्षकांच्या सहकार्यात वाढ

हा उपक्रम केवळ विद्यार्थ्यांचाच नाही, तर शिक्षकांनाही एकत्र काम करण्याची, एकमेकांकडून शिकण्याची संधी देतो. वर्षभरामध्ये एकमेकांना वेळ कमी मिळतो, पण उन्हाळी वर्गात सर्व शिक्षकांचे संघटन, नियोजन हे एक टीम म्हणून काम करण्याची संधी निर्माण करते. या एकीमुळे शाळेने **"मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर" स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक** मिळविला.




४) समाजाची सकारात्मक भूमिका

समाज व पालकांनी शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला आहे. शाळा म्हणजे गुणवत्ता, मेहनत, परिश्रम व विश्वास असे चित्र त्यांच्या मनात तयार झाले आहे. उपक्रम हे शाळा आणि समाज यांच्यातील पूल ठरला आहे. मोठ्या प्रमाणात लोकसहभाग निर्माण झाला.

५) विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढ

शिष्यवृत्ती परीक्षेसारख्या राज्यस्तरीय परीक्षेत आपलेही यश मिळू शकते, ही जाणीव ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली. यामुळे त्यांचा आत्मविश्वास व अभ्यासातील सातत्य वृद्धिंगत झाले आहे.

समारोप

शाळेच्या गुणवत्तेचे मूळ हे शिक्षक, विद्यार्थ्यांचे परिश्रम, व्यवस्थापनाची दूरदृष्टी आणि समाजाचा पाठिंबा या चौकटीत आहे. जिल्हा परिषद शाळा बागणी नं. २ च्या उन्हाळी वर्ग उपक्रमाने हा चौकोन अधिक भक्कम केला आहे. गेल्या चार वर्षांत या उपक्रमाने केवळ परीक्षेतील यशच नव्हे, तर समाजात शाळेचा आदर्श निर्माण केला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थीही गुणवत्ता मिळवू शकतात, शिष्यवृत्ती मिळवू शकतात, नवोदय विद्यालयात जाऊ शकतात हे सिद्ध केले आहे. हा उपक्रम म्हणजे केवळ एका शाळेची वाटचाल नाही, तर शिक्षण क्षेत्रातील एक प्रेरणादायी यशोगाथा आहे. या यशोगाथेला पुढे नेण्यासाठी यापुढेही सर्व शिक्षक, पालक आणि विद्यार्थी एकत्रितपणे कार्यरत राहतील, हीच अपेक्षा.


उन्हाळी वर्गाच्या बातम्या

शिक्षकांकडून उन्हाळी वर्गाचे मोफत आयोजन

बागणी, ता. ८ : पाचवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी येथील शिक्षकांनी मोफत उन्हाळी शिष्यवृत्ती वर्गाचे आयोजन केले आहे. योग्य मार्गदर्शन व कर्तव्यनिष्ठा झोकून शिक्षक विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करीत आहेत. राबवलेल्या उपक्रमाबद्दल बागणीसह भागातील पालक वर्ग आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी भेट घेऊन त्यांचे कौतुक करीत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत जिल्हा परिषदेने भागातील जिल्हा परिषद शाळेत 'मॉडेल स्कूल'च्या निर्मितीने डिजिटल क्रांती घडवून आणली, शिक्षण व्यवस्था झपाट्याने बदलली, विद्यार्थांचे वाचन-लेखन गतिमान होण्याबरोबरच विद्यार्थीही आपले कौशल्य, गुणवत्ता दाखवत आहेत, हीच प्रगती टिकवून राहण्यासाठी बागणीतील प्राथमिक शिक्षक सुधाकर वसगडे, राहुल पाटणे, सदाशिव वारे हे पाचवीत प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करीत आहेत.

या मार्गदर्शन वर्गाचा बागणीसह भागातील जि. प. खासगी, अनुदानित संस्थेत शिक्षण घेणारे विद्यार्थी या लाभ घेत आहेत. हे शिबीर ९ मे ते ११ जून या कालावधीत आयोजन केले असून जिल्ह्यातील नामवंत शिक्षक व तज्ज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत. शिक्षकांनी घेतलेले परिश्रम, विद्यार्थांच्या गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न नक्कीच बागणीत आदर्श पॅटर्न तयार होईल, अशी प्रतिक्रिया आहे.



सांगली परिसर

दृष्टिक्षेपात



बागणी : गटशिक्षणाधिकारी अजिंक्य कुंभार यांचा सत्कार करताना शिक्षक शोभाराणी लोखंडे व शिक्षक.

बागणी शाळेतील उन्हाळी वर्गाचा उपक्रम स्तुत्य : अजिंक्य कुंभार

बागणी : शिष्यवृत्ती अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी बागणी येथील जिल्हा परिषद शाळा क्रमांक दोनमधील शिक्षकांनी मोफत सुरू केलेला उन्हाळी वर्गाचा उपक्रम स्तुत्य उपक्रम आहे, असे मत गटशिक्षणाधिकारी अजिंक्य कुंभार यांनी व्यक्त केले. उन्हाळी वर्गाला भेटीदरम्यान ते बोलत होते. अजिंक्य कुंभार म्हणाले की, शाळा क्रमांक दोनचे प्राथमिक शिक्षक नजमा पीरजादे, सुधाकर वसगडे, राहुल पाटणे, सदाशिव वारे, अविनाश पाटणे, राजेंद्र कोळी यांच्या सहकार्याने बागणीसह परिसरातील दहा गावांतील साठहून अधिक प्राथमिक शिक्षकांनी यंदाची उन्हाळी सुटी रद्द करून मेमधील पूर्ण दिवस व जूनमधील ११ दिवस इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती उन्हाळी वर्गाचे आयोजन केले आहे. यात जिल्हा परिषद, खासगी, माध्यमिक शाळांतून ६० हून अधिक विद्यार्थी याचा लाभ घेत आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आता जिल्ह्यातून मराठी, गणित, इंग्रजी व बुद्धिमत्ता आदी विषयांतील तज्ज्ञ व नामवंत प्राथमिक शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. शिक्षकांनीही प्राथमिक शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर भर देत आहेत. तसेच, उन्हाळी वर्गाचा दर्जा वाढवावा, त्यांना शासन पातळीवर मदत करण्याचे आवाहन कुंभार यांनी केले. या वेळी शिक्षक उल्हास भोई, सावित्री मालेकर, प्रवीण घनवट, वैशाली कोळी, शोभाराणी लोखंडे, उमेश कुबडे, शरद पाटील, सुनंदा पाटील, शीला शेजाळे, रमेश पाटील, संदीप पाटील उपस्थित होते.

उन्हाळी वर्गाला मार्गदर्शन करणारे शिक्षक व उपस्थित विद्यार्थी





विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता वाढवण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा काळामळा (आटपाडी)
शाळेचा पत्ता - काळामळा, तालुका आटपाडी, जिल्हा.सांगली

मुख्याध्यापक नाव - रुपेश गौरीहर जंगम

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9637581555

मुख्याध्यापक ई-मेल आयडी -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळामळा ही छोटीशी वस्ती शाळा. जिथे प्रत्येक गोष्टीसाठी संघर्ष आहे आणि आव्हान आहे. तीन- चार किलोमीटर अंतरावरून शाळेच्या, शिकण्याच्या आवडीने आलेले मूल हीच आमची प्रेरणा . हीच प्रेरणा आम्हांला त्यांच्या अडचणी शोधायला आणि त्यावर मात करण्यासाठी नवनवीन उपक्रमांची आखणी करायला प्रेरित करते आणि सुरू होतो आमचा रोजचा नवा प्रवास.

विद्यार्थ्यांचा पाया पक्का असेल तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो. मूलभूत क्षमता मुलांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. पुढील शिक्षणासाठी त्यांचा पाया मजबूत होतो. त्यांचा सामाजिक, भावनिक विकास होतो; म्हणूनच १)साक्षरता- वाचन , लेखन २)संख्याज्ञान- गणित आणि ३)सामाजिक भावनिक कौशल्य या मूलभूत क्षमता वाढवण्यासाठी आम्ही नियोजनपूर्वक उपक्रम राबवले आणि त्यात आम्हांला यशही आले.

उपक्रमाचे नाव : कानांतून मनात

उपक्रमाचा उद्देश : श्रवण कौशल्याचा विकास — शिकण्याची पहिली पायरी

शिकण्याची सुरुवात होते ऐकण्यापासून. मूल जेव्हा लक्षपूर्वक आणि जाणतेपणाने ऐकते, तेव्हा त्याला अनेक गोष्टी सहज समजतात आणि आठवतही राहतात. याच विचारातून 'कानांतून मनात'हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाअंतर्गत मुलांमध्ये श्रवणकौशल्य, एकाग्रता, आणि समजपूर्वक ऐकण्याची सवय निर्माण करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम घेतले गेले.

छानछान बडबड गीते, कृतीगीते यांची काळजीपूर्वक निवड करून ती मुलांकडून म्हणवून घेतली.

श्यामची आई, झिपरी यासारख्या सुंदर आणि भावनिक बालसाहित्याचे चढ-उतारासह वाचन, आणि समूह वाचन करून घेण्यात आले.

वाचलेला मजकूर समजला का? हे तपासण्यासाठी त्यावर आधारित प्रश्न विचारले गेले;तसेच मुलांकडून प्रश्न तयार करून घेतले गेले.

या सर्व उपक्रमांमुळे मुले समजून ऐकू लागली, ऐकलेल्या गोष्टींवर बोलू लागली.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या मनात लक्षपूर्वक आणि अर्थपूर्ण श्रवणाची सवय निर्माण झाली.

'कानांतून मनात' उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये केवळ ऐकण्याचेच नव्हे, तर स्मरणशक्ती, भाषा कौशल्य आणि भावनिक समजूत यांचाही विकास घडून आला.

https://youtu.be/ce_3z36UjVY?si=RDxweorzWN9f_vQD





गुणांचं व्यासपीठ : माझा सहभाग

विद्यार्थ्यांच्या सामाजिक आणि भावनिक विकासासाठी विविध अनुभवांनी त्यांना समृद्ध करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना नवीन संधी देणे आणि विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घडवून आणणे ही काळाची गरज बनली आहे.

याच उद्देशाने जिल्हा परिषदेकडून दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धा व इतर स्पर्धांमध्ये आमच्या शाळेने सक्रिय सहभाग नोंदवला. या विविध स्पर्धांमध्ये भाग घेतल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. ते सभाधीटपणे बोलू लागले आणि स्वतःतील सुप्त गुणांना वाव मिळवू लागला.

स्वगत, कला मैत्री जपूया, अभ्यास मित्र, छोटी नाटुकली, भूमिकाभिनय यांसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना आपले विचार व्यक्त करता आले.

अशा उपक्रमांमुळे सकारात्मक भावना ,सुसंवाद,आत्मविश्वास वाढीस लागला.त्यामुळे शाळेच्या शिक्षण प्रक्रियेस अधिक अर्थपूर्ण आणि आनंददायी बनवण्यास मदत झाली.









विविध उपक्रमांच्या मालिकेतून विद्यार्थी विकासाच्या प्रवासात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनगरवाडा- खुंदलापूर, केंद्र - वारणावती, ता. शिराळा, जि.सांगली.

शाळेचा पत्ता - धनगर वाडा ,खुंदलापूर केंद्र वारणावती तालुका शिराळा,जिल्हा सांगली.

शाळेचा ईमेल आयडी - zpschooldk1984@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री.महादू चिंधू कोंडार

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9503169475

मुख्याध्यापक ईमेल आयडी - mahadu.kondar@gmail.com

प्रास्ताविक :

जिल्हा परिषद शाळा धनगरवाडा खुंदलापूर ता. शिराळा जि. सांगली. ही एक गडद हिरव्या वनराईने जणू नटलेली शाळा. चहूबाजूंनी घनदाट जंगल, दऱ्या व विपूल जैवसृष्टीचा खजिना लाभलेलं दूर्मिळ खेडेगाव म्हणजे खुंदलापूर. कौलारू व दगडमातीच्या घरात राहणारी साधीभोळी माणसं, ज्यांना पोटाची खळगी भरण्यासाठी मेहनतीशिवाय पर्यायच नाही. अज्ञान पालकांच्या मुलांना, नातवंडांना सज्ञान करण्यासाठी शाळेत आणणे हीच मोठी जोखीम...परंतु या निरागस बालचमूंच्या चेहऱ्यावरचा हसरा आनंद कायम ठेवणे हीच आमची सेवा...

आमची शाळा म्हणजे अतिपर्जन्यवृष्टी, हिंस्त्र पशूंचा वावर, नागमोडी वळणे व गर्द हिरव्या दाट झाडीतून विद्यादान करण्यासाठी रस्त्याने ये-जा करणे म्हणजे शिक्षकांच्या धैर्याची मोठी कसोटी असते; तरी देखील आमचे शिक्षकमित्र विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापनासाठी सतत तळमळत असतात. अतिदूर्गम भागातील हिऱ्यांना गुणवत्तेचे पैलू पाडण्यासाठी सतत धडपडत असतात.





आज आपण २१ व्या शतकात वावरतोय. 4G व 5G च्या गप्पा मारतोय. कुणी चंद्रावर तर कुणी मंगळावर जाण्याच्या गोष्टी करतोय; परंतु या सुखचैनीच्या गोष्टींपासून खूप दूर असणारी या निरागस बालचमूंची पिढी मात्र ज्ञानाचा - तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी आसुसलेली आहे. पर्यावरणाशी येथील विद्यार्थ्यांची नाळ जोडली गेलीयं. पर्यावरणाच्या एक घट्ट नात्याने त्यांच्या मनात घर केलंय. पर्यावरणीय घटकांचा वापर करून येथील विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास करता येईल का? असा विचार खऱ्या अर्थाने पुढे आला, आणि सुरू झाला आम्हा शिक्षकांचा एक अफलातून प्रयत्न...

समस्या :

१) पालकांचे अज्ञान व शिक्षणाबद्दल उदासिनता.

२) गरीबीमुळे शैक्षणिक साधनांचा अभाव.

३) पाल्या पेक्षा दुधाळ जनावरांवर जास्त माया.

४) स्वच्छतेबद्दल जाणीव जागृतीचा अभाव.

५) नेटवर्क नसल्याने अध्ययन-अध्यापनातील अडचणी.

६) विद्यार्थ्यांच्या मनात वन्यजीवांविषयीची भीती..

७) मुळाक्षरे समजून घेतांना येणाऱ्या अडचणी.

समस्यांवरील उपाययोजना :

१) प्रत्येक घरी गृहभेटी देऊन तसेच ग्रामसभा, शाळा व्यवस्थापन समितीची मासिक सभा यांमध्ये शिक्षण किती मोलाचे आहे हे पटवून दिले जाते. तरूण तरूणींना एकत्र करून शिक्षणाचे महत्व तसेच स्पर्धा परीक्षांसंदर्भात मार्गदर्शन केले जाते.

२) विविध संस्था, दानशूर व्यक्ती तसेच शिक्षण प्रेमी व्यक्तिंच्या माध्यमातून शैक्षणिक साधने, साहित्य मिळवून ते मोफत देऊन पालकांचा आर्थिक भार कमी करण्याचा प्रयत्न केला जातो.

३) दुधाळ जनावरांपेक्षा आपली मुलं हेच आपले सर्वात मोठे धन आहे; त्या धनाचा नीट सांभाळ, पालन-पोषण करून शिक्षण दिले पाहिजे या संदर्भात सतत जनजागृती केली जाते.

४) अस्वच्छ व गलिच्छ वातावरणामुळे मुलांना होणारे रोग व आजार यांची माहिती आशा सेविका तसेच वैद्य यांची मदत घेऊन मार्गदर्शन व महत्व पटवून दिले जाते.

५) शालेय परिसरात नेटवर्क नसल्याने विद्यार्थ्यांना एखादी संकल्पना, संबोध, कथा, कविता, गोष्ट समजावून देतांना YouTube वर डाऊनलोड केलेली बाब T.V. वर Offline पध्दतीने दाखवली जाते.

६) वन्यजीवांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर होऊन वन्यजीवांबद्दल आपुलकी, जिव्हाळा व प्रेम निर्माण व्हावे म्हणून वन



विभागाच्या मदतीने वन्यजीव सप्ताह, जंगल सफारी यांसारख्या उपक्रमांचे आयोजन केले जाते.

७) मुळाक्षरे शिकवतांना त्यांच्या पर्यावरणीय घटकांशी सांगड घालून अध्यापन केले जाते. उदा. जसे की, 'क' कमळाचा न शिकवता 'क' करवंदाचा त्यांना जवळचा वाटतो. 'ग' गणपतीचा न म्हणता 'ग' गव्याचा, गवताचा त्यांना आवडतो. 'झ' झाडाचा, झऱ्याचा, 'प' पानाचा, 'ब' बकरीचा, 'भ' भाजीचा-भाकरीचा अशा पध्दतीने मुळाक्षरांचा संदर्भ त्यांच्या पूर्वज्ञानाशी जोडून मुले मुळाक्षरे पटकन शिकू लागतात.

शाळा स्तरावरील उपक्रमांची मालिका :

शाळापूर्व तयारी मेळावा :

इ. १ ली मध्ये दाखलपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शाळेविषयी गोडी निर्माण व्हावी; शाळा म्हणजे आपले स्वत: चे घर वाटावे यासाठी जल्लोषात शाळापूर्वतयारी मेळाव्याचे आयोजन केले जाते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमता, गणनपूर्व तयारी, शारीरिक व मानसिक क्षमता यांचा पडताळा घेतला जातो.



शाळा प्रवेशोत्सव :

दरवर्षी इ. १ली मध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचा गुढीपाडव्याच्या शुभ मुहुर्तावर नवागतांचे थाटात पुष्पगुच्छ व खाऊ देऊन स्वागत केले जाते. तसेच शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी प्रवेशोत्सव विद्यार्थ्यांचे स्वागत करून शाळेतील पहिले पाऊल, गणवेश व बुट तसेच पाठ्यपुस्तकांचे वितरण केल्यावर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद गगनात मावत नाही.



संगीतमय परिपाठातून मिळवू ज्ञान, ऐकू कथा व घेऊ बोध :

आमच्या जिल्हा परिषद शाळेचा श्रीगणेशा संगीतमय परिपाठाने सुरू होतो. यामध्ये दररोज प्रश्नमंजूषेचा समावेश असतो. परिपाठ सादरीकरण करणारे विद्यार्थी दररोज किमान ५ ते १० प्रश्न विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार इयत्तावार विचारतात. जो विद्यार्थी ५ प्रश्नांची उत्तरे बरोबर देईल त्याला वही, पेन किंवा पेन्सिल यापैकी एक वस्तू बक्षिस स्वरूपात दिली जाते. तसेच दररोज एक सुंदर बोधकथा सांगितली जाते, त्यातून नवीन काय शिकायला मिळाले? काय बोध घेतला? हे कथा ऐकल्यानंतर विद्यार्थी सांगतात.

विशेष खास दिनविशेष :

विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानकिरण प्रकाशीत व्हावेत म्हणून वर्षातील काही निवडक दिवस त्यांच्या स्मरणात रहावेत, त्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी काही विशेष दिवस खास दिनविशेष म्हणून साजरे केले जातात. उदा.

१) ५ सप्टेंबर रोजी डॉ.सर्वोपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांना पूर्ण एक दिवस शालेय कामकाज करण्यासाठी प्रेरित केले जाते. शिक्षक होण्याचा खराखुरा जिवंत अनुभव बालचमुंना दिला जातो.



२) वाचन प्रेरणा दिन हा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी १५ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो.या दिनाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे. या दिवशी शाळेतील विद्यार्थी शालेय ग्रंथालयातील पुस्तकांचे वाचन करतात. महावाचन उत्सवाचे आयोजनही शाळास्तरावर करण्यात येते.

आनंददायी व दप्तरमुक्त शनिवार :

शाळेत विद्यार्थांना आनंददायी आणि उत्साही वातावरण मिळून सर्वांगीण विकास साधला जावा या उद्देशाने हा उपक्रम राबवला जातो. कृषी औजारे, रद्दीतून अध्ययन, आपत्ती व्यवस्थापन मॉकड्रील यांसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये

कौशल्य आधारीत व व्यावसायिक शिक्षणाची ओळख झाली.



स्कूल सीड बँक

आमच्या स्वत: च्या शाळेची स्कूल सीड बँक असून शालेय विद्यार्थ्यांनी गावातील शेतकरी शेतात घेत असलेली गावठी व संकरित भाताच्या घेतल्या जाणाऱ्या विविध जातींची वाणे संकलित केलेली आहेत. तसेच विद्यार्थांना धान्यांची माहिती व्हावी यासाठी इतर धान्यांचे बीजही संकलित केले आहे. परिसर अभ्यास शिकतांना या सीड बँकचा वापर होतो.



पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान :

इ. २ री ते ४ थी मधील जे काही ठरावीक विद्यार्थी वाचन लेखन व गणितीय क्रिया यांमधील क्षमता विकसित करू शकले नाहीत, त्यांच्यासाठी निपूण महाराष्ट्र अभियान - २०२५ अंतर्गत योग्य नियोजन केले; व उपचारात्मक अध्यापन करून 'चावडी वाचन व गणितीय कृतींचा गुरूवार' यांसारखे उपक्रम राबवून भाषा व गणित विषयातील क्षमता विद्यार्थ्यांना प्राप्त करून देण्यास शाळेने मोलाचे योगदान दिले आहे.



शाळा जपते समता व सामाजिक ज्ञानाचं नातं :

आमची शाळा समाजातील सर्व विद्यार्थ्यांना लिंग, धर्म, वंश किंवा गरीब-श्रीमंत असा कुठलाही भेदभाव करत नाही. शिक्षण, आरोग्य व कल्याणकारी योजनांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना सामावून घेते.



शाळा पेलते सामाजिक जबाबदारी :

हर घर तिरंगा, मेरी मिट्टी मेरा देश, माझी वसुंधरा अभियान, प्लास्टिक मुक्त शाळा व गाव परिसर, चला सावली पेरूया, नवभारत साक्षरता अभियान, मतदार जनजागृती, तंबाखूमुक्त शाळा, विश्व योगदिन, एक पेड माँ के नाम अशा विविध शासकीय उपक्रमांत सहभागी होऊन सामाजिक जबाबदारी पेलते.



पर्यावरण संरक्षणात शाळेचे योगदान :

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पांतर्गत वनपरिक्षेत्र चांदोली यांच्या सहकार्याने दि. २ ते ८ ऑक्टोबर रोजी 'वन्यजीव सप्ताह' साजरा केला जातो. शालेय विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव, वन वणवा व वनस्पतींचे संरक्षण या संदर्भात जागृती निर्माण केली जाते.

पर्यावरणस्नेही मार्च-२०२५ अंतर्गत प्लास्टिक पिशवी हटवा...कापडी पिशवी वापरा या संदर्भात विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. गावातील प्लास्टिकचा सर्व कचरा उचलून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.



समारोप :

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनगरवाडा खुंदलापूर ही वारणावती केंद्रातील खऱ्या अर्थाने अतिदूर्गम व डोंगरी भागात व चांदोली राष्ट्रीय उद्यानात वसलेलं सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कुशीतील एक टुमदार हसते-खेळते विद्यामंदिर आहे. शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या योगदानाने भविष्यातही ही शाळा यशाचे उत्तुंग शिखर गाठेल यात काही नवल नाही.

महत्वाच्या लिंक –

शाळापूर्व तयारी मेळावा

https://youtu.be/LA4a1kZOU9Q?si=X_Q4-Dnm4FakxAzO

शाळा प्रवेशोत्सव –

https://youtu.be/sPorDTivtc0?feature=shared

वाचन प्रेरणा दिन

https://youtu.be/epG46m_CUYE?si=jLSEdh1zJ3-PbpCy

----------**----------

सहकार्यातून शाळा विकास साध्य करण्यात शालेय नेतृत्वाचे यश

शाळेचे नाव - जिल्हा परिषद केंद्रशाळा मांगले नं. १

शाळेचा पत्ता - मांगले नं. १, तालुका शिराळा, जिल्हा सांगली

शाळेचा ईमेल आयडी - zpmangle5243@gmail.com

मुख्याध्यापक नाव - सौ. आशा विठ्ठल नलवडे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९१४५४१७१२८

मुख्याध्यापक ईमेल आयडी — ashanalawade1969@gmail.com

प्रास्ताविक

आज जिल्हा परिषद केंद्रशाळा मांगले नं. १ ही केवळ एक शाळा नसून, ज्ञानार्जनाचे, नवोपक्रमाचे आणि यशाचे एक प्रेरणास्थान बनली आहे. शिराळा तालुक्यातील या छोट्याशा गावाने शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे यश संपादन केले असून, या शाळेची यशोगाथा प्रत्येक विद्यार्थ्यासाठी आणि पालकासाठी अभिमानास्पद आहे.

मुख्याध्यापक सौ. आशा विठ्ठल नलवडे यांच्या दूरदृष्टी नेतृत्वाखाली, येथील उपक्रमशील शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमामुळे शाळेने अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले आहेत:

टप्पा क्र.१:

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक: शाळेने केवळ शिक्षणातच नाही, तर शालेय वातावरणाच्या सुंदरीकरण आणि व्यवस्थापनातही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या यशाने शाळेच्या शिस्तबद्ध आणि प्रसन्न वातावरणाची साक्ष दिली आहे.

टप्पा क्र. २

'मॉडेल स्कूल' चा दर्जा: शाळेला 'मॉडेल स्कूल' म्हणून गौरवण्यात आले आहे, जे तिच्या शैक्षणिक गुणवत्ता, पायाभूत सुविधा आणि सर्वांगीण विकासाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

टप्पा क्र.३

उत्तुंग शैक्षणिक यश - गुणवत्ता यादीत चमकणारे तारे:

१. **पतंगराव कदम गुणवत्ता शोध परीक्षा (२०१४-१५):** या प्रतिष्ठेच्या परीक्षेत शाळेच्या ५ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शाळेच्या उज्ज्वल शैक्षणिक परंपरेची पायाभरणी केली.

२. **५ वी शिष्यवृत्ती परीक्षा (२०२३-२४):**

अलीकडच्या काळातही हे यश कायम ठेवत, ३ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे, जे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे द्योतक आहे.

३.ISRO अभ्यास दौऱ्यासाठी विद्यार्थ्याची निवड:

इयत्ता सहावीतील विद्यार्थी कु. श्रेयस प्रताप शेवडे याची ISRO येथे अभ्यास दौऱ्यासाठी निवड होणे, हे शाळेसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. हे यश विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला आणि शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणाला अधोरेखित करते.

टप्पा क्र.४

हरित शाळा - परसबाग स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस: शैक्षणिक प्रगतीसोबतच, शाळेने पर्यावरण संवर्धनातही आपले योगदान दिले आहे. परसबाग स्पर्धेत मिळालेले उत्तेजनार्थ बक्षीस हे शाळेच्या पर्यावरणपूरक दृष्टिकोनाचे आणि विद्यार्थ्यांमधील निसर्गप्रेमाचे प्रतीक आहे.



टप्पा क्र.५

विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी:

१. मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप: प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाचा हक्क मिळावा, यासाठी शाळेने शासनाच्या मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे.

२. प्रधानमंत्री पोषण शक्ती योजना प्रभावी अंमलबजावणी: विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी आणि कुपोषणावर मात करण्यासाठी शाळेने

'प्रधानमंत्री पोषण शक्ती योजने'ची (माध्यान्ह भोजन) अत्यंत प्रभावी अंमलबजावणी केली आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार मिळतो.

३. क्रीडा विकास आणि सहशालेय उपक्रमांना प्रोत्साहन: शाळेत केवळ पुस्तकी ज्ञानावर भर दिला जात नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा आणि विविध सहशालेय उपक्रमांनाही तेवढेच महत्त्व दिले जाते. यामुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व घडते.

कबड्डी स्पर्धेत तालुक्यात उपविजेता, जिल्हा स्तरावर रिले, १०० मीटर धावणे स्पर्धेत सहभागी.



सहशालेय उपक्रम अंतर्गत भक्ती गीत गायन स्पर्धेत जिल्हा स्तरावर कु. श्रेयस सचिन चौगुले याने उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक पटकाविला.

टप्पा क्र. ६ अध्ययन, अध्यापन नियोजन व अंमलबजावणी

विज्ञान व तंत्रज्ञान विषयक दृष्टीकोण विकसित होण्यासाठी विज्ञान प्रयोगशाळा, संगणक शिक्षण, रोबोटिक्स यांचा प्रात्यक्षिकासह प्रभावी वापर केला जातो.

वाचनालयातील पुस्तकांचा विद्यार्थी नियमित वापर करतात व आपले अभिप्राय नोंदवतात. परिणामी अवांतर वाचन संस्कृती विकसित झाली आहे.

टप्पा क्र. ७ सामाजिक बांधिलकी

माझी वसुंधरा अभियान, चला सावली पेरूया, प्लास्टिक मुक्त शाळा व परिसर, मतदार जनजागृती, नवभारत साक्षरता अभियान, तंबाखू मुक्त शाळा, भक्ती योग दिन अशा विविध शासकीय उपक्रमात शाळा सक्रिय सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपत आहे.

समारोप -

जिल्हा परिषद केंद्रशाळा मांगले नं. १ ही खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील शिक्षणाचे एक उत्कृष्ट मॉडेल आहे. मुख्याध्यापिका, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्या एकजुटीने ही शाळा भविष्यातही यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत करेल, यात शंका नाही !





---**---

विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती विकसित करण्यासाठी मुख्याध्यापकांचे प्रयत्न

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ,भाळवणी

शाळेचा पत्ता - भाळवणी तालुका खानापूर, जिल्हा सांगली.

शाळेचा ईमेल आयडी - zpbhalawani@gmail.com

मुख्याध्यापक नाव - विनायक बाळासो जाधव

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9028977171

मुख्याध्यापक ईमेल आयडी - vinayak12101971@gmail.com

प्रस्तावना :

शाळा म्हणजे ज्ञानाचा सागर

संस्काराच्या शिदोरीचे हेच माहेरघर

सर्वांगीण विकासाचा पाया म्हणजे शाळा

ही आवडती मनापासून माझी शाळा



येरळा नदीच्या काठावर वसलेले खानापूर तालुक्यातील भाळवणी हे गाव तसेच ही संताजी घोरपडे यांची जन्मभूमी म्हणून ओळखले जाणारे, विविध व्यवसायात कला कौशल्याने पारंगत , शेतीने समृद्ध असलेले भाळवणी हे गाव. या गावातील जिल्हा परिषद शाळा भाळवणी या शाळेतूनच शाळा या शाळेच्या स्थापनेपासून अनेक हिरे घडवण्याचे कार्य या ज्ञानमंदिराने केलेले आहे .बदलत्या काळाच्या गरजेनुसार आधुनिक तंत्रज्ञान पद्धतीने विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकसित करण्याचे आव्हान मुख्याध्यापक व शिक्षकांपुढे होते. त्यासाठी बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागले. आनंददायी वातावरणात मुलांचे अध्ययन अध्यापन प्रक्रिया होणे गरजेचे होते . विविध सहशालेय उपक्रम व शैक्षणिक उठाव यांच्या माध्यमातून मुलांचा मूलभूत क्षमतांचा विकास ही शाळा करत आहे.

विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता यामध्ये

❖ संवाद

❖ प्रभावीपणे बोलणे आणि लिहिणे, तसेच ऐकणे आणि समजून घेणे.समस्या सोडवणे अडचणींवर मात करण्यासाठी विचार करणे आणि उपाय शोधणे.

❖ गंभीरपणे विचार करणे .माहितीचे विश्लेषण करणे आणि माहितीवर आधारित निर्णय घेणे.

❖ सर्जनशीलता नवीन कल्पना आणि दृष्टिकोन विकसित करणे.

❖ सामाजिक-भावनिक कौशल्ये

❖ स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवणे आणि इतरांशी जुळवून घेणे.

❖ सहयोग


❖ इतरांशी मिळून काम करणे.

❖ डिजिटल साक्षरता

❖ माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करणे.

❖ नैतिक विचार

वरील सर्व क्षमता विकसित करण्यासाठी खालील प्रमाणे सहशालेय उपक्रम व आधुनिक माध्यमे यांचा वापर करून मुख्याध्यापक व शिक्षक प्रयत्न करत असतात त्याची फलश्रुती पुढील प्रमाणे



❖ दैनिक पाठातून मुलभूत विकास

विद्यार्थ्यांची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आत्मविश्वास आणि हा आत्मविश्वास वाढीसाठी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये धाडस निर्माण करण्यासाठी शाळेतील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे शालेय दैनंदिन परिपाठ.

जिल्हा परिषद शाळा भाळवणी इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग शिकतात. शाळेमध्ये प्रत्येक वर्गानुसार परिपाठाचे नियोजन केले जाते.दैनिक परिपाठात राष्ट्रगीत, प्रतिज्ञा, संविधान, प्रार्थना महाराष्ट्र गीत, कथा, सुविचार, इंग्रजी शब्द, जो दिनांक तो पाडा, सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा, पसायदान मौन इत्यादी घटक घेतले जातात. परिपाठ हा मराठी, हिंदी, इंग्रजी तिन्ही भाषेत सादर केला जातो यामुळे मुलांच्या संभाषण कौशल्य तसेच आत्मविश्वास विकसित होण्यास मदत होते.

❖ 100% ई- लर्निंग सुविधा : विद्यार्थी झाले डिजिटल साक्षर

डिजिटल शिक्षण ही गतिशील काळाची गरज आहे .ही गरज ओळखून शाळेच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये आधुनिक साहित्याची जोड दिल्यास ते नक्कीच प्रभावी आणि सोयीस्कर होईल, यासाठी विविध अनुदानातून आणि लोकसहभागातून आमची शाळा शंभर टक्के डिजिटल करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.त्यामध्ये प्रत्येक वर्गामध्ये स्मार्ट एलईडी ची सुविधा लोकसभागातून उपलब्ध करून देण्यात आली आहे आज रोजी शाळेमध्ये सात स्मार्ट एलईडी टीव्ही व तीन इंटर ऍक्टिव्ह बोर्ड आहेत यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ई लर्निंग चे धडे दिले जातात. शाळेमध्ये वायफाय सुविधा अगदी मोफत आहे .अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर ,स्मार्ट क्लासेस तयार करून इंटरनेट प्रोजेक्टर ऑनलाईन विषय अध्यापन इत्यादीचा वापर केला जातो सोबत Read to me, Diksha app चा अध्ययन अध्यापनात वापर केला जातो,त्यामुळे विद्यार्थी सहज ई लर्निंग सुविधेचा लाभ घेऊ शकतात आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी नक्कीच याचा हातभार लागतो, विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता विकसित होते.



❖ संगणक कक्ष

संगणक शिक्षण विद्यार्थ्यांसाठी खूप महत्त्वाचे आहे. संगणक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाचा वापर करायला शिकायला मिळतो, ज्यामुळे त्यांना अभ्यासात आणि भविष्यातील करिअरमध्ये मदत होते. याची गरज लक्षात घेऊन शाळेमध्ये संगणक कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे यासाठी लोकसहभागातून शाळेला सहा संगणक व शाळेतील पाच असे मिळून 11 संगणकाची संगणक कक्ष स्थापन करण्यात आला आहे. व त्यासाठी विशेष शिक्षक नेमण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना पुढील प्रकारे मदत झाली आहे



❖ माहितीचा खजिना :

संगणक आणि इंटरनेटमुळे विद्यार्थ्यांना माहितीच्या खजिना मिळतो.त्यामुळे ते विविध विषयांवर अधिक माहिती मिळवू शकतात आणि त्यांचे ज्ञान वाढण्यासाठी मदत होते.

❖ शिकणे मजेदार :

संगणकावरील शैक्षणिक गेम्स आणि ॲप्समुळे शिक्षण अधिक आकर्षक आणि मजेदार होत आहे .ज्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्याची आवड निर्माण झाली आहे.

❖ नवीन कौशल्ये:

❖ डिजिटल साक्षरता : संगणक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षर झाले आहेत.

❖ सर्जनशीलता आणि कल्पनाशक्ती : संगणक आणि इंटरनेटच्या मदतीने विद्यार्थी आपली सर्जनशीलता आणि कल्पनाशक्ती वापरून नवीन गोष्टी शिकतात आणि तयार करतात .

❖ शैक्षणिक प्रगती : संगणक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सुधारणा होत आहे, कारण ते माहितीचा प्रभावीपणे वापर करू शकतात.

थोडक्यात,संगणक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो आणि त्यांना भविष्यासाठी तयार होण्यास मदत होते.

❖ इंग्रजी लॅब

★ शाळेमध्ये इंग्रजी लॅबची स्थापना करण्यात आली आहे. याचा मुख्य उद्देश म्हणजे इंग्रजी विषयाबद्दलची विद्यार्थ्यांची भीती दूर करणे.
★ इंग्रजी विषयाचे शब्द संपत्ती वाढवणे. आनंददायी पद्धतीने श्रवण ,संभाषण, उच्चारण नंतर लेखन ही कौशल्य विकसित करणे.
★ इंग्रजी वाचनाची नवीन तंत्रे विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.
★ शुद्ध आणि स्पष्ट उच्चार करून वाचनाची सवय लावणे .
★श्रवण, संभाषण ,वाचन, लेखन विविध खेळ उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सराव घेणे. दररोजच्या जीवनात जमेल तशी इंग्रजी भाषा वापरणे.
★इंग्रजी लॅबमुळे विद्यार्थी इंग्रजी विषयाबद्दलची भीती कमी झालेली आहे. विद्यार्थी इंग्रजी वाचन करत आहेत व रोजच्या दैनंदिन जीवनात इंग्रजी शब्दांचा वापर करत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाबद्दलचा आत्मविश्वास वाढला आहे.





❖शनिवार माझ्या आवडीचा - विविध कलेचा विकास

दिनांक १४ मार्च २०२४ चा महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय सर्व शाळांसाठी वरदानच ठरला. नैतिक मूल्ये, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, मनोरंजनता हा नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा महत्त्वाचा उद्देश आहे .आपण पाहतोय सध्याच्या काळात लहान वयातील विद्यार्थ्यांना ताण तणाव उदासीनता नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. आनंदायी शनिवार या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची शिकण्याची अभिरुची वाढीस लागली. शैक्षणिक गुणवत्तेवर खूप चांगला परिणाम होत आहे. हे दिसून आले, तसेच शनिवारी बरेच विद्यार्थी शाळेत येत नव्हते गैरहजर राहत होते, आता मात्र वर्गाचे नाही तर शाळेच्या उपस्थितीचे प्रमाण शंभर टक्के झाले आहे. आनंददायी शनिवार मुळे विद्यार्थ्यांमध्ये चांगले वर्तन, जबाबदारी, चांगल्या सवयी, सहकारवृत्ती व नेतृत्वगुणाचा विकास होऊ लागला. आमच्या शाळेमध्ये इयत्ता पहिली ते सातवी च्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातील प्रत्येक शनिवार हा आनंदायी शनिवार ठरत आहे .या दिवशी दप्तरा विना शाळा घेतली जाते.

या दिवशी आमच्या शाळेमध्ये

१. एरोबिक्स- प्राणायाम, योग, व्यायाम यांचे महत्त्व आपण नेहमीच विद्यार्थ्यांना सांगतो ,पण प्रत्यक्षात या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ढोलाच्या व ताशांच्या तालावर एरोबिक्स व्यायाम प्रकार घेतला तर यात विद्यार्थी स्वतःहून सहभागी होतात.



2. आर्ट गॅलरी-शाळेतील मुलांनी टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवल्या.शाळेत आर्ट गॅलरी तयार केली यामध्ये पायपुसणी, फ्लॉवर पॉट, बुके, कागदी फुले , डायरी, छोट्या वह्या इत्यादी वस्तू तयार केल्या तसेच रंगकाम, चिकट काम, चित्रकला या उपक्रमांमधूनही अनेक वस्तू बनवल्या जातात. यामुळे विद्यार्थ्यांच्या नवनिर्मितीला व सर्जनशीलतेला चालना मिळते.





3. सामाजिक संदेश देणारे उपक्रम - सध्याच्या बदलत्या काळाप्रमाणे समाजात सामाजिक संदेश जाणे गरजेचे आहे. प्लास्टिक मुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन चे पथ नाट्य,हात धुवा, स्वच्छता, मतदान जनजागृती यासारख्या सामाजिक विषयावर शाळेमध्ये लघु नाटिका सादर केली जाते.

4. विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण मनोरंजक खेळ घेतल्याने विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागली त्याचबरोबर जे जुने खेळ लोप पावत चाललेले आहेत उदाहरणार्थ -आंधळी कोशिंबीर, माझ्या आईचा पत्र हरवलं, तळ्यात-मळ्यात, विटी दांडू, सुरपाट्या हे खेळ विद्यार्थ्यांना शिकवण्याची संधी मिळाली. यामुळे विद्यार्थी ताण-तणाव विहिरीत राहून त्यांच्या मूलभूत कौशल्यांचा विकास होण्यास मदत झाली.

5. इंग्लिश डे - शनिवारी 'दप्तरा विना शाळा' असल्यामुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळे खेळ तंत्रज्ञानयुक्त शिक्षण याबरोबरच आणखी काय शिकवायचे तर आमच्या शाळेमध्ये आम्ही एक शनिवार हा इंग्लिश डे म्हणून साजरा करतो या दिवशी इंग्लिश वाचन व इंग्लिश मध्ये संभाषण घेतले जाते लहान वर्गामध्ये इंग्रजी संभाषण घेतले जाते. इंग्रजी विषयाबद्दल विद्यार्थ्यांची भीती कमी होते व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

6. कला मंच - प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंगी कोणती ना कोणती तरी कला असते कोणते ना कोणते तर सुक्त गुण त्यांच्यामध्ये लपलेले असतात यासाठी विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यासाठी कला मंचचे दालन त्यांना खुले करण्यात येते त्यामुळे विद्यार्थी आपल्याला आवडणारी कथा गोष्ट सांगतात कविता गायन करतात. कधी कधी विद्यार्थी आत्मविश्वासाने आपल्याला येणाऱ्या एखाद्या गाण्यावर नृत्य सादर करून दाखवतात. यामुळे विद्यार्थी अभिव्यक्त होऊ लागले विद्यार्थ्यांमध्ये लपलेले कला गुण समजू लागले, विद्यार्थ्यांना नेमका कशात रस आहे ,त्यांच्या आवडीनिवडी कळू लागल्या. विद्यार्थ्यांच्या सामाजिक, भावनिक कौशल्यांचा विकास झाला. विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम झाले. विद्यार्थी खेळीमेळीच्या वातावरणात घडू लागला विद्यार्थी आणि शिक्षक यांचे नाते अधिक घट्ट झाले. विद्यार्थी व्यवसायाभिमुख शिक्षण घेऊ लागले.

❖ बाल वाचनालयातून बौद्धिक विकास



वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढवण्यासाठी शाळेमध्ये सुसज्ज असे ग्रंथालय आहे. विद्यार्थी वाचनाचा छंद जोपासण्यासाठी आवडणारी गोष्टीची पुस्तके कथा कादंबऱ्या, थोर नेते महापुरुषांचे चरित्र यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारचा विकास होतो.

★भाषा विकास:
बाल वाचनालयात विविध प्रकारच्या मराठी बालसाहित्याचा संग्रह आहे. त्यामुळे मुलांना नवीन शब्द शिकायला मिळतात, भाषेची योग्यप्रकारे ओळख होऊन आणि त्यांची शब्दसंपत्ती वाढण्यासाठी मदत होत आहे.

★कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा विकास -
बालसाहित्यात काल्पनिक कथा, गोष्टी आणि कवितांचा समावेश असल्यामुळे मुलांची कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा विकास होतो.तसेच त्यांना नवीन गोष्टी शिकायला मिळतात.

★ज्ञानाचा विस्तार:
बाल वाचनालयात विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध असल्याने मुलांना वेगवेगळ्या क्षेत्रांबद्दल माहिती मिळते आणि त्यांचे ज्ञान वाढते.

★वाचनाची आवड:
बाल वाचनालयातील आकर्षक आणि मजेदार पुस्तके वाचून मुलांना वाचनाची गोडी लागली आहे.

★आत्मविश्वास:
वाचन केल्याने मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो. ते स्वतःहून गोष्टी वाचायला शिकतात आणि स्वतःच्या ज्ञानात भर घालतात.

★मनोरंजन:
बाल वाचनालय मुलांना विविध प्रकारच्या कथा, गोष्टी आणि कवितांच्या माध्यमातून मनोरंजन देखील पुरवते.

★सामाजिक आणि भावनिक विकास:
बालसाहित्य मुलांमध्ये सहानुभूती, प्रेम आणि सामाजिक जाणीव विकसित करण्यास मदत करते.

★शिकण्याची आवड:
बाल वाचनालयातील पुस्तके वाचून मुलांना नवीन गोष्टी शिकण्याची आणि ज्ञान मिळवण्याची आवड निर्माण झाली आहे.




★शिक्षणात मदत:

बाल वाचनालयातील पुस्तके शाळेतील अभ्यासात देखील मदत करतात, कारण ती विषयांची माहिती सोप्या भाषेत देतात.

❖विविध स्पर्धेतून बौद्धिक विकास

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्या सुप्त कलागुणांना उत्तेजन देण्यासाठी शाळेमध्ये विविध उपक्रमांचे यामध्ये कथाकथन, वक्तृत्व ,गायन ,एकांकिका व इंग्लिश लैंग्वेज स्पर्धा यासारख्या स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले जाते . यामुळे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळतो विद्यार्थ्यांची आवड लक्षात येते प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये कोणते ना कोणते तरी कौशल्य असते याची जाणीव झाल्यामुळे विद्यार्थी स्वतःच्या छंद जोपासण्यास तत्पर असतो.सांगली जिल्हा परिषदेत मार्फत घेण्यात येणाऱ्या लोकनृत्य ,कथाकथन ,गायन, एकांकिका, वक्तृत्व इंग्लिश लैंग्वेज स्पर्धा यामध्ये आमच्या शाळेतील विद्यार्थी प्रत्येक स्पर्धेमध्ये अव्वल स्थानावर असतात. त्याचबरोबर लोकनृत्य स्पर्धेमध्ये सुद्धा विद्यार्थी तालुकास्तरावर व जिल्हा स्तरापर्यंत विशेष प्राविण्य संपादन करतात.



❖ गुणवत्ता शोध परीक्षा व शाळेचे यश

यूपीएससी, एमपीएससी स्पर्धेचा पाया रचण्याच्या दृष्टिकोनातून इयत्ता पहिली पासूनच ते सातवी पर्यंत गुणवत्ता शोध परीक्षा तयारी विद्यार्थ्यांकडून करून घेतली जाते विद्यार्थ्यांना शासनाच्या परीक्षा व्यतिरिक्त विविध खाजगी परीक्षांना बसवले जाते. उदाहरणार्थ मंथन शिक्षण संस्थेमार्फत घेण्यात येणारी टी एस सी व शताब्दी परीक्षा अभिरुप परीक्षा यासारख्या परीक्षा न बसवून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीच्या विकासाचा अधिक सराव घेतला जातो त्यासाठी रोज शालेय वेळेव्यतिरिक्त जादा तास घेतले जातात. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद मार्फत घेण्यात येत असलेल्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा दरवर्षी कमाल विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट केले जातात आणि शाळेतील यशाचा झेंडा उंचावण्यासाठी शिक्षकांना विद्यार्थी योग्य ती साथ देतात आणि यश संपादन करतात. प्रत्येक वर्षी शाळेतील विद्यार्थी गुणवत्ता यादी येतच असतात.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये दरवर्षी विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत पात्र होतात. तसेच सांगली जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या गुणवत्ता शोध परीक्षेमध्ये जिल्हा परिषद शाळा भाळवणीचे विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत प्रत्येक वर्गाची पात्र होत असतात. त्याचबरोबर खाजगी परीक्षांमध्ये सुद्धा मंथन प्रज्ञाशोध परीक्षा, अभिरुप प्रज्ञाशोध परीक्षा, बीडीएस परीक्षा यासारख्या परीक्षांमध्ये सुद्धा विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होतात व गुणवत्ता यादीमध्ये पात्र ठरतात.खानापूर तालुक्यातील गुणवत्तेच्या बाबतीत अव्वल स्थानावर असणारी शाळा म्हणजे जिल्हा परिषद शाळा भाळवणी.



साप्ताहिक

भाळवणी एक्सप्रेस

9970676312 • RNI. MAHMAR/2018/78222 • संपादक : महादेव धनवडे

Subscribe

जिल्हा परिषद भाळवणी शाळेचे स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांचे उज्वल यश

भाळवणी– महादेव धनवडे : जि.प.केंद्र शाळा भाळवणी येथील विद्यार्थ्यांनी विविध गुणवत्ता शोध परीक्षांमध्ये देदिप्यमान यश संपादन केले. इयत्ता पाचवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शाळेतील एकूण १८ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले. त्यापैकी शिष्यवृत्तीधारक दोन विद्यार्थी झाले.

आसिम मैनुद्दीन भाडलेकर या विद्यार्थ्याने २४४ गुण प्राप्त करून जिल्हा गुणवत्ता यादीत ४९ वा तर तालुक्यात चौथा क्रमांक प्राप्त केला. तसेच अनुज अमोल तडसरे या विद्यार्थ्याने २३८ गुण प्राप्त करून जिल्हा गुणवत्ता यादीत ९० वा व तालुक्यात सहावा क्रमांक प्राप्त केला. तसेच सांगली जिल्हा परिषद मार्फत घेण्यात आलेल्या गुणवत्ता शोध परीक्षांमध्ये इयत्ता पहिली वरद मारुती सूर्यवंशी जिल्ह्यात ३ रा, इयत्ता दुसरी प्रियल संजय चव्हाण जिल्ह्यात ७ वा,

आसिम मैनुद्दीन भाडलेकर | अनुज अमोल तडसरे | वरद मारुती सूर्यवंशी | प्रियल संजय चव्हाण | रुद्र रोहित पवार | सारंग सुनील मोहिते

अंकिता संतोष शिरतोडे | विराज मारुती सूर्यवंशी | मनश्री सुहास चव्हाण | श्रेया तुकाराम पाटील | आर्यन संदीप काळकुटे

इयत्ता तिसरी रुद्र रोहित पवार जिल्ह्यात ३ रा, इयत्ता चौथी डॉ. पतंगराव कदम गुणवत्ता शिष्यवृत्ती परीक्षा सारंग सुनील मोहिते जिल्ह्यात १८ वा, अंकिता संतोष शिरतोडे जिल्ह्यातील १९ वा, विराज मारुती सूर्यवंशी जिल्ह्यात २० वा, इयत्ता सातवी डॉ. पतंगराव कदम गुणवत्ता शिष्यवृत्ती परीक्षा मनश्री सुहास चव्हाण जिल्ह्यात १० वा, आर्यन संदीप काळकुटे जिल्ह्यात ३० वा, श्रेया तुकाराम पाटील जिल्ह्यात ३३ वी, यांना मुख्याध्यापक विनायक जाधव, इयत्ता पहिली वर्ग शिक्षक तुकाराम बेंजारपे, इयत्ता दुसरी वर्गशिक्षिका सौ.उजाली कवडे, इयत्ता तिसरी वर्गशिक्षिका सौ. अलमिना भाडलेकर, इयत्ता चौथी वर्गशिक्षिका सौ. शाहीन शिकलगार, इयत्ता पाचवी वर्गशिक्षिका सौ.रेणुका कोळी, इयत्ता सहावी वर्ग शिक्षिका सौ.सुप्रिया सूर्यवंशी, इयत्ता सातवी वर्गशिक्षक संजय शिंदे यांचे मार्गदर्शन व शाळा व्यवस्थापन समिती यांचे मार्गदर्शन लाभले.

❖ क्रीडा स्पर्धा

शारीरिक विकास-क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांची शारीरिक ताकद, सहनशक्ती, वेग आणि चपळाई सुधारते. नियमित खेळांमुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य सुधारते, स्नायू मजबूत होतात आणि वजन नियंत्रणात राहते. मानसिक आरोग्य-खेळामुळे तणाव कमी होतो, आत्मविश्वास वाढतो आणि एकाग्रता सुधारते. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो आणि नैराश्य कमी होते. सामाजिक कौशल्य-क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन विद्यार्थी टीमवर्क, नेतृत्व, संवाद आणि सहकार्याचे महत्त्व शिकतात. त्यांना इतरांशी जुळवून घेणे, नियम पाळणे आणि सामूहिक जबाबदारी घेणे शिकायला मिळते. शैक्षणिक यश-खेळांमुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता आणि स्मरणशक्ती सुधारते, ज्यामुळे त्यांना अभ्यासातही चांगले यश मिळण्यास मदत होते. खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, वेळेचे व्यवस्थापन आणि चिकाटी यांसारखी कौशल्ये विकसित होतात. मनोरंजन आणि आनंद-क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिकरित्या ताणमुक्त होण्यास मदत होते. यामुळे त्यांना आनंद मिळतो आणि त्यांचे जीवन अधिक उत्साही होते. आरोग्यपूर्ण जीवनशैली-खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये निरोगी जीवनशैलीची जाणीव निर्माण होते. ते नियमित शारीरिक हालचालींचे महत्त्व समजून घेतात आणि भविष्यातही सक्रिय जीवनशैलीचा अवलंब करतात. यासाठी आमच्या शाळेमध्ये क्रीडा स्पर्धा नियमितपणे घेतल्या जातात त्याची यशस्विता म्हणजे विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रातील यश. केंद्र स्तरापासून ते जिल्हास्तरापर्यंत विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवलेले आहे. कबड्डी, खो-खो यासारख्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरापर्यंत मजल मारली आहे.त्याचबरोबर वैयक्तिक स्पर्धा रनिंग, लांब उडी, उंच उडी यासारख्या स्पर्धेत सुद्धा विद्यार्थ्यांनी यश मिळवलेले आहे.



❖ **वृक्षारोपण -** 'चला सावली पेरू या' झाडं लावल्याने पर्यावरणाची काळजी घेतली जाते, ज्यामुळे हवामान बदल आणि प्रदूषण कमी करण्यास मदत होते.

"एक पेड मा के नाम"

या मोहीमे अंतर्गत विद्यार्थ्यांनी आईच्या नावावर एक झाड लावले. विद्यार्थ्यांना आई प्रती आदर निर्माण झाला. लहान मुले मोठ्यांचे अनुकरण करीत असतात शाळेतील मोठ्या मुलांचे वृक्ष प्रेम व त्यांचे संगोपन ते कसे करतात याचे ते बारकाईने काही दिवस निरीक्षण करतात आणि नकळतपणे या उपक्रमात ते स्वतःला सामील करून घेतात आमच्या शाळेतील प्रत्येक बागेतील प्रत्येक वृक्षाचा पालक आहे. ते नियमितपणे बागेला पाणी देणे ,बागेतील कचरा काढणे, तुटलेल्या फांद्यांना आधार देणे .ही कामे मुले करतच असतात. विद्यार्थी स्वतः लावलेल्या झाडाची काळजी आवडीने घेतात ,झाडांचे संगोपन करतात यातून वृक्ष प्रेम, पर्यावरणाबद्दल आत्मीयता ,श्रम प्रतिष्ठा या गुणांची रुजवणूक होते.







❖ **गांडूळ खत निर्मिती**

परिसरातील पालापाचोळा गोळा करून गांडूळ शेतकऱ्यांचा मित्र आहे हे भावना वाढीस लावून विद्यार्थी स्वतः गांडूळ वेचून खत तयार करतात. परिसरातील घनकचऱ्याचे नियोजन गांडूळ खतासाठी केले जाते.

❖ **बालोद्यान**

आमच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकास होण्यासाठी बालोद्यान तयार करण्यात आलेले आहे. यासाठी लोकसहभागातून प्रज्ञानंद बालोद्यान उभारणी करण्यात आली आहे. याचा उद्देश मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि त्यांना शाळेत येण्यासाठी तयार करणे आहे.

मुलांच्या शारीरिक हालचाली, खेळ आणि योग्य पोषण याद्वारे त्यांचे आरोग्य सुधारणे.

❖सामाजिक विकास:
मुलांमध्ये संवाद, सहानुभूती आणि इतरांशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करणे.

❖भावनिक विकास:
मुलांमध्ये स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची आणि इतरांच्या भावना समजून घेण्याची क्षमता विकसित करणे.


❖शैक्षणिक विकास:
मुलांमध्ये अक्षरे, संख्या, आकार आणि रंग ओळखण्याची क्षमता विकसित करणे.

❖भाषा विकास:
मुलांची बोलण्याची, ऐकण्याची आणि संवाद साधण्याची क्षमता वाढवणे.

❖कला आणि हस्तकला विकास:
मुलांमध्ये सर्जनशीलता आणि कल्पनाशक्ती वाढवण्यासाठी कला आणि हस्तकला उपक्रमांचा समावेश करणे.

❖खेळ आणि क्रीडा:
मुलांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती आणि टीमवर्कची भावना वाढवण्यासाठी खेळ आणि क्रीडा उपक्रमांचा समावेश करणे.

❖बालोद्यान विद्यार्थ्यांच्या विकासाचे महत्त्व:
बालोद्यान शिक्षणामुळे मुलांमध्ये शाळेत जाण्याची आणि शिकण्याची आवड निर्माण होते. यामुळे मुलांचा पायाभूत विकास होतो आणि भविष्यातील शिक्षणासाठी त्यांची तयारी होते. बालोद्यान मुलांमध्ये सामाजिक, भावनिक आणि बौद्धिक कौशल्ये विकसित करण्यास मदत करते. बालोद्यान शिक्षणामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते अधिक सक्षम बनतात. बालोद्यान मुलांसाठी एक सुरक्षित आणि आनंददायी वातावरण तयार करते. याचा फायदा आमच्या विद्यार्थ्यांना होत आहे.





❖ विज्ञान प्रदर्शन

प्रत्येक विद्यार्थ्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा म्हणून विद्यार्थी स्वतः प्रयोग करतात व प्रदर्शनात ठेवतात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे शिक्षणाचे ध्येय आहे. केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर उपक्रमाची जोड दिली तर विद्यार्थ्यांमधील कल्पकता, जिज्ञासू वृत्ती, शोधकवृत्ती, त्यांच्यातील सुप्त गुण व आत्मविश्वास वाढण्यास मदत होते आम्ही फक्त थोडेसे मार्गदर्शन व जास्त निरीक्षण करतो निरीक्षण करताना विद्यार्थ्यांच्या कामात एकाग्रतेत बाधा येणार नाही याची काळजी घेतली जाते.

विद्यार्थी स्वतःची कल्पकता वापरून स्वयं प्रेरणेने प्रयोग करतात हल्लीच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर व्यावसायिक कौशल्य सुद्धा प्राप्त होणे गरजेचे आहे यासाठी कुशल मार्गदर्शक तथा शाळेत समर्पित व्यक्तिमत्व सर्व शिक्षकांच्या रूपाने या शाळेस लाभले आहे म्हणतात ना गुरुविण गुरुविना विद्याविना आणि योग्य मार्गदर्शिका शिवाय सफलता नाही अशा प्रकारे बहुरंगी उपक्रमाने सजलेली नटलेली आमची शाळा उपक्रमांची खाण आहे.



❖ आठवडी बाजारातून व्यावहारिक कौशल्याचा विकास

शिक्षण घेत असताना मुलांना आव्हान स्वीकारणे आवडते मुले स्वयं प्रेरणेने शिकतात.

विक्री -खरेदी ,नफा- तोटा हे फळ्यावर शिकवणे ऐवजी विद्यार्थी याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी शाळेमध्ये आठवडा बाजार हा उपक्रम भरवला जातो .
यामुळे रुपये व पैसे यांचा व्यवहारात उपयोग करण्यास मदत होते .
मापन ही मूलभूत संकल्पना दृढ होते. विक्री कौशल्याची ओळख होते.
संवाद कौशल्याचे दृढीकरण होते. शिक्षण आणि व्यवहारातून आनंद निर्मिती होते.
व्यवहार ज्ञान वाढण्यास मदत होते.



❖ समारोप

21व्या शतकातील क्षमता आणि कौशल्य ही आपल्या सर्वांसाठी मूलभूत गरज आहे राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये शिक्षकांना शिक्षणातील मूलभूत सुधारणाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी भर देण्यात आला आहे त्यानुसार विद्यार्थ्यांचा सर्व मूलभूत क्षमतांचा विकास करणे हे शिक्षकांपुढे मोठे आव्हान आहे, जिल्हा परिषद शाळा भाळवणी येथील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक हे आव्हान यशस्वीपणे पार पाडत आहेत.


❖ **अधिक माहितीसाठी :**

https://youtube.com/@supriyasuryawanshivita9168?si=IiSLsALUZTVcJ0kJ

https://youtu.be/t-rTcI1QHsc?si=ll5bMMrnkh6BKcaV

https://youtu.be/Q47kzZrX_n8?si=VbLKKkvXba506Dwu

----------**----------



लोकसहभागातून विद्यार्थी विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा रानमळा (लंगरपेठ)
शाळेचा पत्ता - रानमळा, मु.पो.लंगरपेठ ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली
मुख्याध्यापक नाव - श्री.ओंकार प्रकाश कुलकर्णी
मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९४२११२८८१२ / ७९७२४५६३३०
मुख्याध्यापक ईमेल आयडी - okomikulkarni@gmail.com

प्रास्ताविक -


शाळेच्या प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांच्या मालिकेची अनुभूती पुन्हा मागे वळून पाहताना मनाला समाधान देऊन गेली. शाळेचा सर्वांगीण विकास हा समाज, शिक्षक व विद्यार्थी या त्रिसूत्रीवर अवलंबून आहे आणि या तिन्ही बाबींचा सर्व स्तरावर योग्य मेळ घातला गेला की, त्यातून निर्माण होणारे शाळा विकासाचे चित्र नक्कीच विलोभनीय व आदर्श ठरते. लोकसहभागातून विद्यार्थी विकास पटाची वाढ व शाळेची भौतिक संपन्नता पूर्ती व एकंदरीतून विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांची गुणवत्तापूर्ण विकासाची नांदी कशाप्रकारे सुरू होते याचा साकल्याने विचार पुढे विस्ताराने मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम -

- पटामध्ये लक्षणीय वाढ
- शैक्षणिक उठाव, पालक सहभागातून शाळेबद्दल आपुलकी व प्रेम
- सहशालेय उपक्रमातून गुणवत्ता वाढ

प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी -

नवीन शाळेची सुरुवात म्हणजे श्री गणेशा, त्यामध्ये नवीन शैक्षणिक वर्ष. कारण ज्या चिमुकल्यांना सोबत घेऊन नवीन भरारी घ्यायची उर्मी नेहमी मनात गर्दी करायची, त्या मनात आज यक्षप्रश्न उभा राहिला होता तो चिमुकल्यांच्या संख्येबाबत... कारण नवीन शाळा बंद पडण्याच्या मार्गक्रमणातून प्रवास करत होती. शाळेचा पट फक्त एक होता ते आव्हान स्वीकारून कर्तव्यावर रुजू झालो.



पहिलीच्या दाखल पात्र (3 मुले) मुलांची यादी घेऊन उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये शाळा क्षेत्रातील मुलांच्या पालकांच्या गाठीभेटी घेतल्या. प्राथमिक शिक्षण, मातृभाषेतून मिळणारे शिक्षण, सोबत जवळील शाळेची नितांत आवश्यकता या सर्व बाबी पालकांना समजावून दिल्या. मी तुमच्या पाल्यांसाठी माझे सर्वस्व देण्याची कबुली त्यांना दिली व त्यातून एक पटावरून शाळेचा पट 10 झाला. पट दहा पटीने वाढल्याचा आनंद होताच पण "मंझिल अभी दूर हैI" चे वाक्य त्या आनंदाला अजून प्रयत्नाची साद घालत होते. येणाऱ्या पुढील वर्षी मला या 10 चे 20 करायचे होते मग मी कितीही आवाज दिला तर तो प्रत्येकापर्यंत पोहोचणे अशक्यच होते. मग एक वाक्य आठवलं ते असं होतं की, Action speaks more louder than the words "कृती ही शब्दांपेक्षा मोठ्याने बोलते."

शाळेचा पट वाढवणे व कमीपटामुळे शाळेची झालेली दुरावस्था पडझड व भौतिक सुविधा बदल करणे हे चॅलेंज आता स्वीकारले गेले होते. यासाठी प्रत्यक्ष कृतीला सुरवात झाली होती. या दहा मुलांना असे शैक्षणिक अनुभव देऊ की, त्यातून या मुलांची गुणवत्ताच आपल्या शाळेच्या प्रचाराचे माध्यम ठरेल.

प्रत्येक मुलाकडे, विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले गेले यामुळे घरी जाताच पालकांपर्यंत हा संदेश जात होता की, गुरुजी आणि मुलांचं एक नातं घट्ट बनत चालले आहे व ते माझ्या बालकांसाठी सकारात्मक तर आहेच पण शैक्षणिक प्रगतीसाठी आशादायी आहे.

विद्यार्थ्यांची अनोखी सहल - दहा मुलांना घेऊन दूरवर सहल घेऊन जाणे अशक्य होते मग अनोखी सहल आयोजित केली गेली. त्यामध्ये पोस्ट ऑफिस, सहकारी बँक, ग्रामपंचायत, कुंभार कामे, व्यवसाय, असे विविध छोटे-मोठे व्यवसाय यांना भेटी दिल्या. त्यातून मुलांना नवीन अनुभव आलाच त्याचबरोबर त्यातून त्यांचे आशय ज्ञानही समृद्ध बनले गेले व ज्या ज्या ठिकाणी आम्ही पोहोचलो तेथे 'ही शाळा काहीतरी वेगळी आहे.' असा संदेश जनमाणसात आपसुकच गेला.

शैक्षणिक उठावातून भौतिक सुविधा परिपूर्ण करण्याचा मानस - भग्नावस्थेत असणारे ऑफिस, वर्गखोल्या, व्हरांडा यात बदल करण्यासाठी शाळेच्या वेळेनंतर स्वच्छता कामकाज सुरू केले. स्वतःची काही रक्कम खर्च करून स्वच्छता, वर्गखोली पुट्टी भरणे, रंगकाम अशा गोष्टी सुरूच ठेवल्या व त्यातून 15 ऑगस्ट रोजी झेंडावंदन झाल्यानंतर उपस्थित पालकांच्या हस्ते सुधारित खोलीचे नव्याने उद्घाटन केले. झालेली सुधारणा पाहताच पालकांनी तिथेच निर्णय केला की, एकटा शिक्षक आपल्या शाळेसाठी स्वतःचे पैसे खर्च करून सुधारणा करतो आहे तर




आपणच मागे का ? त्याच क्षणाला सर्व पालकांनी विविध मान्यवरांनी शैक्षणिक उठावाचा श्री गणेशा केला. तो अद्याप चालूच आहे. गावकऱ्यांच्या सहभागाने, ग्रामपंचायतीनेही काही वर्षे दुर्लक्षित या ज्ञानमंदिराकडे लक्ष घालून 14 व्या वित्त आयोगातून विविध सुधारणा करण्यास सुरुवात केली.


किल्ला स्पर्धेचे निमित्त व प्रत्येक घराला भेट - शाळेत दिवाळीपूर्वी विविध उपक्रम घेत होतोच यामध्ये विद्यार्थ्यांच्या घरी छान किल्ला बनवावा, त्याला भेट देण्यासाठी स्वतः गुरुजी येतील व सोबत बक्षीसही देतील असा हा उपक्रम होता. यानिमित्ताने प्रत्येक किल्ल्याला भेट दिली गेली. पर्यायाने प्रत्येक मुलाच्या घरी जाण्याचा प्रसंग आला. स्वतः गुरुजी घरी येऊन मुलांना प्रोत्साहन देत आहेत ही गोष्ट सर्वांसाठी आनंदायी होती. बक्षीस रूपात मावळे मिळाल्याने व गुरुजी घरी आल्याने मुलांना व पर्यायाने संपूर्ण घराला झालेला आनंद अवर्णनीय होता. त्यातून पालक व शिक्षक यांचा संबंध अतिशय दृढ बनत गेला.

महिला मेळाव्यातून शाळेबद्दल विशेष मत - आजवर जरी पुरुष प्रधान संस्कृती असली तरी घरात महिलेच्या मताचा आदर सर्वांनीच केला आहे. म्हणून शाळेत मकर संक्रांतीच्या निमित्ताने महिला मेळाव्याचे आयोजन करून प्रत्येक महिलेस सौभाग्याचे वाण दिले गेले. यातून सर्व महिलांमध्ये शाळेची चर्चा सुरू झाली व शाळेचा प्रचार, प्रसार तर झालाच पण महिला व शाळा यांचाही संबंध अजून घट्ट बनला.

विविध सण उत्सव यातून संस्कृतीची जोपासना - नागपंचमी, आषाढी एकादशी यासारखे अनेक सण शाळेत साजरी केले गेले. यामुळे शाळा म्हणजे कुटुंब असल्याची भावना संपूर्ण परिसरामध्ये रुजण्यास सुरुवात झाली. शाळेच्या प्रत्येक कार्यक्रमात सर्व पालक उत्साहाने सहभागी होत गेले.

https://www.instagram.com/reel/C9ggG7QSF-c/?igsh=anA2aDdjbzV6eWhh

वार्षिक स्नेहसंमेलन — शाळेचा पट दहा. अशामध्ये शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन पार पाडणे. सर्वांसाठी औत्सुक्याचे होते. तरीही विविध मान्यवरांचे कथाकथन, त्यांच्या हस्ते बक्षीस वितरण व मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम यामुळे कार्यक्रम अतिशय उठावदार बनला. व त्याचा परिणाम शैक्षणिक उठावावर झाला. 10 पटाची शाळा एवढा सुंदर, नियोजनबद्ध कार्यक्रम घेते हे पाहून सर्व उपस्थितांमध्ये शाळेबद्दल आदराचे स्थान निर्माण झाले.



विविध स्पर्धा परीक्षा व इतर स्पर्धांची परिपूर्ण तयारी - कथाकथन, वक्तृत्व, गायन, अभिवाचन व सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये शाळेला उत्तुंग यश मिळवण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले. शाळेचा वेळ, सोबत अवांतर वेळ देऊन या सर्वांची वर्षभर तयारी केली गेली व त्यामधून दहा पटाच्या शाळेने अभिवाचन स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक तर इतर सर्व स्पर्धांमध्ये तालुक्यापर्यंत यश तर स्पर्धा परीक्षेमध्ये जिल्हा गुणवत्ता यादी मध्ये दोन विद्यार्थी चमकले. म्हणजेच 'छोटा पॅकेट बडा धमाका' किंवा 'रानमळा नाद खुळा' अशा आशयाचे स्लोगन संपूर्ण परिसरात नावारूपास आले..


फल निष्पत्ती / दृश्य परिणाम -

- सन 2023 - 24 च्या पूर्वी एक पटाची शाळा सन 2024 - 25 मध्ये तब्बल 26 पटापर्यंत पोहोचली.
- विविध स्पर्धा परीक्षांमध्ये व स्पर्धांमध्ये शाळा जिल्हा व राज्यस्तरापर्यंत नावारूपास आली..
- विविध सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्यांकडून शाळेला मिळणाऱ्या शैक्षणिक उठावात प्रचंड वाढ झाली.
- पट वाढल्यामुळे बंद पडणारी शाळा पुन्हा एकदा दिमाखात उभी राहून शाळेत दोन शिक्षक रुजू झाले.
- भौतिक सुविधेत शाळेचा चेहरा मोहरा बदलला गेला.

समारोप -

" आवाज उंची हो तो कुछ लोग सुनेंगे,
लेकिन
बात उंची हो तो बहुत लोग सुनेंगे "

पट वाढवणे व सर्व शैक्षणिक अनुभव देऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे व्रतच म्हणून स्वीकारल्यामुळे हा बदल शक्य झाला. यामध्ये मदत करणाऱ्या सर्व हातांचे मनस्वी आभार..!



सकाळ

लंगरपेठ-रानमळा जिल्हा परिषद शाळेत स्नेहसंमेलन

ढालगाव, ता. १ : जिल्हा परिषद शाळा रानमळा, लंगरपेठ (ता. कवठेमहांकाळ) येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. विद्यार्थ्यांनी कलागुण नृत्य, गायन, वादन सादर केले. ग्रामीण कथाकथनकार अण्णाप्पा शिंदे प्रमुख पाहुणे होते.

लंगरपेठ येथील रानमळा विभागातील जिल्हा परिषद शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असताना शिक्षक ओंकार कुलकर्णी रुजू झाले. त्यांनी शाळा पुन्हा गजबजून टाकली. मुला-मुलींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कुलकर्णी यांनी स्नेहसंमेलन आयोजित केले होते. पालकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. त्यांनी मुलांना शाबासकी दिली. ग्रामीण कथाकथनकार शिंदे यांनी 'महापूर' ग्रामीण कथा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अध्यक्ष म्हणून केंद्रप्रमुख उमराव रास्ते उपस्थित होते. विविध स्पर्धांत यश मिळवल्याबद्दल उपस्थित मान्यवरांकडून शालेय विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण करण्यात आले. मुख्याध्यापक ओंकार कुलकर्णी यांनी प्रास्ताविक करून आभार मानले. विश्वनाथ शेळके, विठ्ठल सूर्यवंशी यांच्यासह परिसरातून पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

Sangli, Sangli-Today
02/04/2024 Page No. 6




after
before



----------**----------

उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी उपस्थिती आणि उद्दिष्टपूर्तीसाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न

शाळेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाणपाव (लोहगांव)

शाळेचा पत्ता - तालुका जत, जिल्हा.सांगली.

शाळेचा ईमेल आयडी - rsrancho@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री.अमोल तुकाराम गायकवाड

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9767831881

मुख्याध्यापक ईमेल आयडी - atgaikwad3107@gmail.com

शाळेचा ब्लॉग - amolgaikwad1989.blogspot.com

ही आवडते मज मनापासुनी शाळा, लाविते लळा जसा ही माऊली बाळा.

प्रस्तावना -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाणपाव या शाळेची स्थापना 1997 रोजी झाली. या शाळेमध्ये इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग भरतात. शिक्षणाचे माध्यम मराठी असले तरी सेमी इंग्रजी माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून श्री अमोल तुकाराम गायकवाड (M.A. B.Ed) व सहशिक्षक श्री रणजीत रविकिरण शेंडे (BSc, M.A. B.Ed, SET, NET) हे दोघेजण काम करतात. दोन्ही शिक्षक उपक्रमशील शिक्षणावर



भर देतात व जास्तीत जास्त कृतीयुक्त अध्ययन व अध्यापन करण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळे मुलांना शिकण्यात गती तर मिळतेच पण त्याचबरोबर आनंदी शिक्षणही मिळते व विद्यार्थ्यांना घटकाचे आकलन सुलभ होते. त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास खूप मदत झालेली दिसून आली आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाणपाव ही ग्रामीण भागातील एक नावाजलेली शाळा आहे. शाळेमध्ये वृक्षारोपणाचे कार्य खूप जोमाने व उत्साहाने केले आहे. 'एक विद्यार्थी एक झाड' या उपक्रमांतर्गत सर्व विद्यार्थ्यांच्या वाढदिवसानिमित्त शिक्षकांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांच्या घराच्या शेजारी एक वड, पिंपळ किंवा करंज अशा दीर्घायुषी वृक्षाचे वृक्षारोपण केलेले आहे व विद्यार्थ्यांनी झाडांचे खूप छान संगोपन केले आहे.





जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाण पाव या शाळेने प्रत्येक स्पर्धा परीक्षेमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवला आहे .त्याचप्रमाणे मंथन, एटीएस ,डॉ. पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी अशा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी वाखाणण्याजोगे यश संपादन केले आहे.





2024 मध्ये झालेल्या राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षेमध्ये इयत्ता पहिली मध्ये शिकत असलेली कुमारी ऋग्वेदा रणजीत शेंडे हिचा राज्यात प्रथम क्रमांक आला तसेच



इयत्ता चौथी मध्ये शिकत असलेली कुमारी श्रावणी किरण काशीद हिचा राज्यात 33 वा क्रमांक आला .त्याचबरोबर डॉक्टर पतंगराव कदम गुणवत्ता शोध चाचणी मध्ये सुद्धा विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवून क्रमांक पटकावले शाळा सुरू झाल्यापासूनच शिक्षकांनी शालेय पाठ्यपुस्तकाबरोबरच इतर स्पर्धा परीक्षांचे शिक्षण देण्यावर शिक्षकांचा सुरुवातीपासूनच भर असल्यामुळे ही यश मिळवण्यात शाळा यशस्वी ठरली.

शाळेमध्ये विविध सण उत्सव समारंभ उत्साहाने साजरे केले जातात .त्यामध्ये आषाढी वारीचा उत्सव मोठ्या जोमाने साजरा केला जातो. या उपक्रमामध्ये ग्रंथदिंडी व बाल वारकरी दिंडी काढली जाते .सर्व विद्यार्थ्यांना पारंपरिक वेशभूषेमध्ये नटवून सजवून शाळेतून पालखी जवळच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरापर्यंत वाजत गाजत ज्ञानबा तुकारामाच्या गजरामध्ये नेली जाते व भजन कीर्तन तसेच वारकरी फुगडी, टाळ ,मृदुंग यांच्या तालावरती विद्यार्थी व शिक्षक नाचतात, गातात, मग्न होतात. अशी भक्तिमय वातावरण निर्मिती शाळेमध्ये होत असते. https://youtube.com/shorts/VvxLB-RuYsI?feature






Galaxy M32
26 January 2025 8:28 am

स्वातंत्र्य दिन (15 ऑगस्ट) व गणराज्य दिन (26 जानेवारी) अशा महत्त्वाच्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांचे पारंपरिक लोकनृत्य सादरीकरण केले जाते.त्यामध्ये लेझीम,टिपऱ्या, टाळ इत्यादी साहित्यावर आधारित गीतांवर विद्यार्थी नृत्य करतात. शाळेतील दोन्ही शिक्षकांनी पालक भेटी घेऊन तसेच शाळा व्यवस्थापन समिती(SMC) व माता पालक समिती तसेच इतर शिक्षणप्रेमी यांच्या मदतीने शाळेला आवश्यक असलेल्या भौतिक सुविधा प्राप्त करून घेण्यात यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबरच शाळेतल्या विविध भौतिक सुविधाही असणे खूप गरजेचे असते त्या सर्व पालक सहकार्यातून तसेच ग्रामपंचायत सदस्य व सरपंच यांच्या मदतीने शिक्षण प्रेमी लोकांच्या मदतीने पूर्ण करून घेतलेल्या आहेत. यामध्ये शाळेसाठी आवश्यक साऊंड,. पाण्याचा फिल्टर,विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य घसरगुंडी, झोका तसेच शालेय रंगकाम व बोलक्या भिंती इत्यादी काम शिक्षकांनी लोकवर्गणीतून तसेच पालक सहकार्यातून पूर्ण केले आहे.

https://youtu.be/S-jPBWhdnMU?feature

वाचन ,लेखन, अंकज्ञान यामध्ये विद्यार्थी तर उत्तम आहेतच त्याचबरोबर वक्तृत्व कौशल्य, गायन कौशल्य वादन कौशल्य यामध्ये सुद्धा विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाते व उत्साहाने विद्यार्थी यामध्ये सहभागी होतात व आपली कला सादर करतात.



https://youtube.com/shorts/c7P9yX0XOQM?feature

शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी आवश्यक शैक्षणिक उपक्रम घेतले जातात यामध्ये ध्यान हा अतिशय महत्त्वाचा उपक्रम दर शनिवारी शाळेमध्ये राबवला जातो. तसेच शारीरिक विकासासाठी आवश्यक योगासने व प्राणायाम दर शनिवारी उत्कृष्ट प्रकारे घेतले जातात.



https://youtu.be/_qlknvpDT9A?feature



समारोप -

अशा प्रकारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाणपाव (लोहगांव) ही शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उत्कृष्ट पद्धतीने कार्य करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यात सफल होत असलेली दिसून येते.





----------**----------

विद्यार्थिनींची उपस्थिती वाढविण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा नं. 2 निंबवडे

शाळेचा पत्ता - निंबवडे ,तालुका आटपाडी ,जिल्हा सांगली

शाळेचा ईमेल आयडी - zpgirlsschoolno2nimbavade@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री भरत भगवान कदम

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9975101078

मुख्याध्यापक ईमेल आयडी - bhartkadam@gmail.com



शाळेची ओळख

जिल्हा परिषद शाळा नंबर २ निंबवडे शाळेची स्थापना सन 1963 साली झाली.शाळेत इयत्ता पहिली ते सातवीचे वर्ग आहेत. निंबवडे गावाच्या पश्चिमेला शांत वातावरणात वसलेली जिल्हा परिषद शाळा नंबर 2 निंबवडे जिथे 130 मुलींनी आपल्या चिमुकल्या पावलांनी दररोज शाळेकडे धाव घ्यावी असं काहीतरी खास या शाळेत आहे. मुख्याध्यापक श्री. भरत भगवान कदम यांच्या दूरदृष्टी नेतृत्वाखाली आणि आठ अनुभवी प्रशिक्षित शिक्षकांच्या समर्पित प्रयत्नांमुळे ही शाळा आता एक आदर्श शाळा बनली आहे. वृक्षवेलींच्या सानिध्यात, निसर्गरम्य वातावरणात शाळा भरत असल्याने एक वेगळीच अनुभूती विद्यार्थिनींना मिळते. जिल्हा परिषद व प्रशासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सर्व बौद्धिक, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींचा यशस्वी सहभाग असतो.



समस्या -

1) शाळेसमोर मुलींच्या शिक्षणाची समस्या होती.
2) मुलींची 100% पटनोंदणी व 100% उपस्थिती ठेवणे.
3) पालकांच्या आर्थिक परिस्थितीमुळे रोजगाराच्या निमित्ताने पालकांबरोबर मुलींचे स्थलांतर होणे ही समस्या होती.
4) पालकांचे अज्ञान व आर्थिक परिस्थिती यामुळे मुलींच्या शिक्षणाबद्दल पालकांची असणारी अनास्था..

उपाययोजना

1) मुलींचे शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढावे, यासाठी शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा लाभ करून दिला.

2) 100% उपस्थिती ठेवणाऱ्या वर्गाचा सर्व विद्यार्थीनी समोर परिपाठावेळी सत्कार करण्यात आला.ज्यामुळे 100% उपस्थिती ठेवण्यासाठी विद्यार्थिनींची धडपड चालू राहिली.

3) पालकांनी मुलींना खाऊ साठी दिलेले एक- दोन रुपये साठवून ठेवून त्यातून त्यांना शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी शाळेत बचत बँकेची स्थापना करण्यात आली. या बँकेचा त्यांना वह्या, पेन, पेन्सिल तसेच इतर बाबी खरेदी करण्यासाठी उपयोग होऊ लागला.

4) रोजगारानिमित्त पालकांचे स्थलांतर होत असल्यामुळे मुलींनाही त्यांच्यासोबत जावे लागत असे. त्यामुळे त्या मुलींच्या सांभाळण्याची पर्यायी व्यवस्था पालकांसमवेत शिक्षकांनी केली.

5) शाळेतले वातावरण आनंददायी ठेवले, त्यामुळे मुलींना दररोज शाळेत येण्याची आवड निर्माण झाली.

1) **भौतिक विकास** -

शाळेचा भौतिक विकास करण्यासाठी पालक सहभाग आणि लोक सहभाग वाढवला.





2) सिसिटीव्ही कॅमेरे

मुलींच्या सुरक्षिततेचा दृष्टीने सर्व वर्ग खोल्या व शालेय परिसर 12 सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीखाली आहे.







3) **डिस्पोजल मशीन :** किशोरवयीन मुलींच्या मासिक पाळीच्या दरम्यान येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी स्वच्छतागृहामध्ये डिस्पोजल मशीन बसवण्यात आली आहे.



4) **विज्ञान प्रयोगशाळा आणि ग्रंथालय** - शाळेमध्ये सर्व साहित्य आणि सुसज्ज अशी विज्ञान प्रयोगशाळा व सुसज्ज अशा ग्रंथालयाची उभारणी केली आहे.





5) **सुसज्ज क्रीडांगण** - शाळेत खेळासाठी सुसज्ज क्रीडांगण व आवश्यक ते सर्व क्रीडा साहित्य उपलब्ध ठेवण्यात आले आहे.






6) **हँडवॉश स्टेशन** - सुसज्ज असे स्वच्छतागृह, हँडवॉश स्टेशन व सुंदर अशी परसबाग निर्मिती करण्यात आली आहे.





7) **डिजिटल डिव्हाइस आणि प्रोजेक्टर** - शाळेतील सर्व वर्ग खोल्यांमध्ये पंखे ,स्मार्ट टीव्ही ,प्रोजेक्टर अशी अत्याधुनिक सर्व सोयी सुविधा नियुक्त वर्गखोल्या आहेत..





परिणाम किंवा यश -

या सर्व प्रयत्नांचे फळ म्हणून जिल्हा परिषद शाळा नंबर २ निंबवडे ने "**मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा** "या उपक्रमामध्ये तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे हा क्रमांक म्हणजे केवळ एका स्पर्धेतील विजय नाही तर हे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थिनी आणि निंबवडे गावातील प्रत्येक व्यक्तीच्या सामूहिक प्रयत्नांचे आणि स्वप्नांचे यश आहे.

दररोज नवनवीन गोष्टी शिकायला मिळत असल्याने विद्यार्थीनी उत्साहाने शाळेत यायला लागल्या, परिणामी त्यांची उपस्थिती वाढली..

----------**----------

गट पद्धती व संघ पद्धतीच्या वापरातून कौशल्य विकास साधण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा लोहगाव

शाळेचा पत्ता - लोहगाव ,तालुका जत, जिल्हा सांगली

मुख्याध्यापक नाव - श्री. प्रमोद विठ्ठल कोडग

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९९७०२७००४४

मुख्याध्यापक ईमेल आयडी - trahul3112@gmail.com


प्रस्तावना :

गाव लहान असो वा मोठं, गावाच्या विकासाची खरी ओळख तिथल्या शाळेमुळे होते. शाळा ही केवळ इमारत नसते, ती त्या गावाचा आत्मा असते, संस्कृती असते, स्वप्नांना पंख देणारे ठिकाण असते. म्हणून शाळा ही गावाची मंदिरे झाली पाहिजेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अशी शाळा निर्माण करण्यासाठी शाळेच्या यशोगाथेत केवळ शिक्षक, विद्यार्थी नव्हे, तर संपूर्ण गावाचे श्रेय सामावलेले असते. जिल्हा परिषद शाळा लोहगाव, तालुका जत, जिल्हा सांगली या शाळेने हेच सिद्ध करून दाखवले आहे — की केवळ साधनसंपत्ती नाही, तर कल्पकता, चिकाटी आणि एकत्रित प्रयत्न हेच यशाचे खरे गमक असते. अशाच एक प्रेरणादायी प्रवासाची साक्ष देणारी ही आमची शाळा.

उपक्रमांची संकल्पना :

मुख्याध्यापक श्री. प्रमोद विठ्ठल कोडग यांच्या नेतृत्वाखाली, तसेच सहकारी शिक्षक श्री. कुमार आप्पासो गुरव, श्री. राहुल माणिक टकले आणि सौ. संगीता राहुल टकले यांच्या प्रयत्नांनी या शाळेने विद्यार्थ्यांच्या भाषा व गणित विषयाच्या मूलभूत कौशल्यांचा विकास साधण्यासाठी एक वेगळा, सर्जनशील आणि उपक्रमशील मार्ग स्वीकारला. यासाठी शाळेने एक वेगळा उपक्रम राबविला. **गटपद्धती.....संघपद्धती.....**

शाळेत इयत्ता दुसरी ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे सहा गट तयार करण्यात आले. प्रत्येक गटासाठी एक गटशिक्षक नेमला, जो त्या गटाचा मार्गदर्शक, सल्लागार आणि प्रेरणा देणारा स्त्रोत असेल. या गटांमध्ये सर्व इयत्तामधील विद्यार्थी सहभागी होतील याची काळजी घेतली. वेगवेगळ्या क्षमता असणारी मुले गटात सामील होतील याप्रमाणे गट तयार केले गेले. गट तयार करण्यासाठी विद्यार्थ्यानाच काही नियम घालून स्वातंत्र्य दिले.



गटातील मुलांनीच आपला गटप्रमुख व उपगटप्रमुख निवडला. त्यांना त्यांची जबादारी निश्चित करून दिली. मुलभूत कौशल्याच्या विकासासाठी सकाळी परीपाठापासून ते वर्षभर शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे नियोजन करून देण्यात आले. प्रत्येक उपक्रमात गटातील विद्यार्थ्यांचा सहभाग, तयारी, सादरीकरण आणि कामगिरी यासाठी सर्व विद्यार्थ्याच्या चर्चेतूनच गुणांकन व भारांश ठरविण्यात आला. वर्षभरातील सर्व उपक्रमांचे एकत्रित मुल्यांकन करून, सर्वाधिक गुण मिळवलेल्या गटाला वर्षाच्या शेवटी विजयी घोषित करण्यात आले. गटप्रमुखाने विशेष आवडीने काम करावे तसेच गटातील सदस्यांनी त्याचे ऐकावे म्हणून त्याला विशेष अधिकार देण्यात आले. तसेच त्याच्यासाठी प्रोत्साहनपर बक्षिसाची तरतूद केली. विजयी गटातील प्रत्येक सदस्याला व गटप्रमुखाला वर्षाच्या शेवटी मुख्याध्यापक व शिक्षकांच्या हस्ते सन्मानचिन्ह व बक्षीस देण्यात आले.

श्रवण कौशल्य विकासासाठी : परिपाठात रोज मुलांसाठी रंजक श्रवण उपक्रम घेतले..

गोष्ट ऐका व प्रश्नांची उत्तरे द्या. परिपाठात सांगितलेल्या गोष्टीवर शिक्षक प्रश्न विचारतात मुले उत्तर देतात.

सूचना ऐका व कृती करा. परिपाठ घेणाऱ्या विद्यार्थी रोज वेगवेगळ्या सूचना देतात सूचना ऐकून विद्यार्थी त्याप्रमाणे कृती करतात

आवाज ओळखा. आनंददायी शनिवार यामध्ये विद्यार्थ्यांना समोर पाहायला सांगून त्यांच्या पाठीमागे टाळी वाजवणे घंटा वाजवणे यासारखे आवाज ऐकायला सांगून ते ओळखायला सांगणे तसेच प्राण्यांचे आवाज ऐकून कोणत्या प्राण्यांचा आवाज आहे ते ओळखणे. तसेच मुलाला समोर पाहायला सांगून त्याच्या पाठीमागून कोणत्याही एका मुलाने त्याला हाक मारणे व त्याला कोणी हाक मारली हे त्यांनी सांगणे यासारखे मनोरंजक खेळ घेतले जातात.

शब्द ऐका व टाळ्या वाजवा. शिक्षक म्हणतात "फूल" — मुले दोन टाळ्या वाजवतात. "कमळ" — मुले तीन टाळ्या वाजवतात.

कानात सांगितलेला शब्द पुढे सांगणे. पहिल्या मुलाला सांगितलेला शब्द शेवटपर्यंत पोहचतो का ते पाहतात.यातून लक्ष, स्मरणशक्ती आणि मजाही वाढते.

अशा छोट्या खेळांमुळे मुलांचे लक्ष, भाषा आणि श्रवण कौशल्य विकसित होते. परिपाठ केवळ शिस्तीपुरता मर्यादित राहत नाही, तर तो आनंदाचा आणि शिकण्याचा महत्त्वाचा भाग ठरतो.




वाचन कौशल्य विकासासाठी — वाचन वर्तुळ उपक्रम : वाचन हा सर्व ज्ञानाचा पाया आहे, हे लक्षात घेऊन "वाचन वर्तुळ" नावाचा उपक्रम राबवण्यात आला. शाळेतील ग्रंथालयातील पुस्तकांचा उपयोग वाढवून, विद्यार्थ्यांना नियोजित वेळेत वर्तुळात बसून पुस्तक वाचण्यासाठी प्रवृत्त केले गेले. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांची नोंदवहीत नियमित नोंद ठेवली. वाचल्यानंतर गटात त्या पुस्तकाबद्दल चर्चा झाली, त्यामुळे केवळ वाचनच नव्हे, तर श्रवण, भाषण-संभाषण, लेखन या सर्व कौशल्यांचा विकास झाला.



भाषण कौशल्य विकासासाठी : परिपाठ हा केवळ प्रार्थनेपुरता मर्यादित न ठेवता, विद्यार्थ्यांना त्याद्वारे व्यासपीठ दिले गेले. बोधकथा यासाठी गटाला विषय नेमून दिले जसे की पंचतंत्रातील कथा, अकबर बिरबल कथा, शिवरायांच्या कथा, क्रांतिकारकांच्या कथा, संतांच्या कथा इ. जयंती-पुण्यतिथीला भाषण करणे बंधनकारक केले गेले. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवा म्हणून भाषण सादर करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला गुण दिले.

लेखन कौशल्यासाठी — वह्या व दैनंदिनी लेखन :

लेखन ही विचारांना शिस्त लावणारी कला आहे. शाळेने प्रत्येक विद्यार्थ्याला एक वही दिली. या वहीमध्ये विद्यार्थ्यांना रोज शाळेत घडलेल्या आवडलेल्या बाबी व न आवडलेल्या बाबी लिहिण्यास सांगितले. यासोबतच, वाचलेल्या पुस्तकांचा सारांश लिहिणे आणि आठवड्यातून एकदा दिलेल्या विषयावर लेखन करणे अशा विविध लेखन उपक्रमांनी विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्यात मोठा बदल घडवून आणला. वहीतील प्रत्येक लेखनासाठी गुण देण्याचे नियोजन केले.


संभाषण कौशल्य विकासासाठी : शाळेत विद्यार्थ्यांचे संभाषण कौशल्य वाढवण्यासाठी प्रत्येक शनिवारी गटातील विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील गोष्टीचे नाट्यीकरण करणे हा उपक्रम राबवीला . या उपक्रमातून मुले त्या गोष्टीतील पात्रांप्रमाणे संवाद बोलतात, हावभाव करतात व शब्दांमध्ये भावना व्यक्त करतात. त्यामध्ये संभाषण



करताना योग्य शब्दांचा वापर, आवाजातील चढ–उतार, योग्य हावभाव यासाठी गुणांचे नियोजन केले. गटातील एक विद्यार्थी चिठ्ठी उचलतो. त्या चिठ्ठीवर ज्या व्यावसायीकाचे नाव लिहिले आहे त्या अनुषंगाने गटाने संवाद सादरीकरण करणे. उदा. भाजीवाली, दूधवाला, डॉक्टर इत्यादी. त्याचबरोबर आई-मुलगा, शिक्षक- विद्यार्थी, मुलगा-दुकानदार अशा पण चिठ्या बनविल्या.

गणित विषयातील मुलभूत कौशल्यांचा विकास करण्यासाठी राबविलेले उपक्रम :

माझी बचत बँक : शाळेत माझी बचत बँक या नावाने बँक सुरु करण्यात आली. प्रत्येक



विद्यार्थी आठवड्यातून काही रुपये बचत करतात . हा उपक्रम मुलांना आर्थिक शिस्त, बँकेचे व्यवहार शिकवतो, पैशाची किंमत समजावतो. यासाठी खाते काढून पैसे जमा करणाऱ्या विद्यार्थ्यास एक गुण व नियमित व्यवहार करण्यासाठी 1 गुण अशी व्यवस्था करण्यात आली. प्रत्येक खातेदारास व्यवहाराची नोंद करण्यासाठी खाते पासबुक तयार करून देण्यात आले. यातून बेरीज, वजाबाकी या मुलभूत कौशल्याचा विकास झाला.

पाढे पाठांतर : गणित फक्त आकड्यांचे जग नाही, तर विचार करण्याची एक पद्धत आहे. गटातील सर्वांनी पाढे पाठ करावेत यासाठी ज्याला जो शेवटचा पाढा म्हणता येईल त्याला तेवढे गुण याप्रमाणे नियोजन केले. प्रत्येक महिन्याच्या शेवटी याचे गुणांकन करण्यात आले. गटातला जास्त गुण मिळावेत म्हणून प्रत्येकजण पाढे पाठांतर करू लागला.

बालबाजार (क्लिक करून व्हिडीओ पहा) **:** या उपक्रमाने गणिताला व्यवहाराशी जोडले.



विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले किंवा आणलेले पदार्थ विक्रीस ठेवले. विद्यार्थ्यांनी स्वतः विक्री केली, हिशेब ठेवला. नफा-तोटा पाहिला. मुलभूत क्रियांबरोबर वजन- मापे यांचेही प्रात्याक्षिक मुलांनी केले. ज्या गटातील विद्यार्थ्यांची विक्री जेवढी झाली, त्या गटाला त्याप्रमाणात गुण देण्यात आले.

गटशिक्षकांची भूमिका : गटशिक्षक हा केवळ शिक्षक नसून, त्या गटाचा मार्गदर्शक, प्रेरणादाता आणि मित्र ठरला. गटातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी गटप्रमुख व गटशिक्षकांनी सातत्याने संवाद साधला, प्रोत्साहन दिले. गटभावना वाढवली, शिस्त आणि एकत्र काम करण्याची सवय लावली.

मुख्याध्यापकांचे नेतृत्व : मुख्याध्यापक श्री. प्रमोद विठ्ठल कोडग यांच्या नेतृत्वाखाली शाळेने ही प्रक्रिया राबवली. त्यांच्या दृष्टीकोनात विद्यार्थ्यांच्या मुलभूत कौशल्यांच्या विकासासाठी प्रत्येक उपक्रमाची आखणी त्यांनी शिक्षकांच्या मदतीने काटेकोरपणे केली. वर्षा अखेरीस सर्वात चांगली कामगिरी करून सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या गटातील प्रत्येकाला बक्षीस देवून सन्मानित करण्यात आले.



परिणाम — बदललेली शाळा :

या उपक्रमांमुळे शाळेत अनेक सकारात्मक बदल झाले.
विद्यार्थ्यांची मुलभूत कौशल्ये वाढीस लागली.
पाढे पाठांतर आणि गणिती क्रिया आनंददायी झाल्या आणि सुधारल्या.
विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, व्यासपीठावर बोलणे सोपे झाले.
सहकार्याची भावना वाढली, मोठे विद्यार्थी छोट्यांना शिकवू लागले.
शाळेचे वातावरण आनंदी व प्रेरणादायी झाले.

निष्कर्ष :

जिल्हा परिषद शाळा लोहगावने दाखवून दिले की, मूलभूत कौशल्यांचा विकास करण्यासाठी फक्त साधनसंपत्ती नाही, तर कल्पकता, चिकाटी आणि सर्वांच्या सहभागाची गरज असते. मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि गावकरी या सर्वांनी मिळून एकत्र काम केले, म्हणूनच ही यशोगाथा घडू शकली.

आज जिल्हा परिषद शाळा लोहगाव ही केवळ शिकवणारीच नव्हे, तर शिकणारी, अनुभव घेणारी आणि अनुभव देणारी शाळा बनली आहे –

हीच खरी यशोगाथा!

उपक्रमांच्या माहितीसाठी खालील लिंक क्लिक करा.....

https://drive.google.com/file/d/1EXPYQVJcfkoqqs8iBuBHokBRJLFKESPL/view?usp=drivesdk

----------**----------

विद्यार्थीभिमुख आनंददायी शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा,हिंगणगाव

शाळेचा पत्ता - हिंगणगाव,तालुका कडेगाव,जिल्हा सांगली पिन कोड-४१५३०५

शाळेचा ईमेल आयडी - zpshingangaonbk123@gmail.com

मुख्याध्यापक नाव- सौ.शोभा बाळासाहेब चव्हाण

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 8412002083

मुख्याध्यापक ईमेल आयडी - sbc89891@gmail.com



१. सुरुवातीच्या स्थितीचे सखोल निरीक्षण -

शाळेतील शिक्षण सुधारायचे असेल तर सर्वप्रथम त्या शाळेची विद्यमान स्थिती समजून घेणे आवश्यक असते. मुख्याध्यापकांनी याच मार्गाने वाटचाल केली. त्यांनी कोणतीही पूर्वग्रहदूषित कल्पना न ठेवता,विद्यार्थ्यांची खरी शैक्षणिक पातळी ओळखण्यासाठी एक सुसूत्र बेसलाइन मूल्यांकन राबवले.हे मूल्यांकन फक्त गुण द्यायचे माध्यम नव्हते; तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या वाचन, लेखन व संख्याज्ञानातील क्षमतेचे व्यवस्थित दस्तऐवजीकरण करणारे साधन होते.मुख्याध्यापकांनी मुलांशी थेट संवाद साधून, त्यांच्या शिकण्याच्या गतीचा अंदाज घेतला. त्यांनी शिक्षकांशी सविस्तर चर्चा केली, 'मुलं त्यांच्या वयानुसार कुठल्या शैक्षणिक टप्प्यावर आहेत' हे समजून घेतले. काही मुले अक्षर ओळखीतच अडखळत होती, तर काहीजण साधे वाक्य सहज वाचत होते.या विविधतेचा स्वीकार करून त्यानुसार एक सविस्तर कृती आराखडा तयार केला गेला. हा टप्पा म्हणजे शिक्षण सुधारणा प्रक्रियेचा पाया होता — कारण योग्य निदानाशिवाय योग्य उपचार शक्य होत नाहीत.



२. शिक्षकांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण आणि प्रेरणा

पायाभूत शिक्षण सुधारण्यात शिक्षक हा सर्वात महत्वाचा घटक आहे. मुख्याध्यापकांनी हे उत्तम प्रकारे ओळखले. त्यांनी शिक्षकांना केवळ सूचना देणारे व्यवस्थापक न राहता, त्यांच्या क्षमतांचा विकास करणारा सुसंवादात्मक नेता बनण्याचे ठरवले.शिक्षकांना FLN (Foundational Literacy and Numeracy) संदर्भातील राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय धोरणांची माहिती दिली. त्यानंतर, शिकण्याच्या संकल्पनांची प्रात्यक्षिक कार्यशाळांद्वारे मांडणी केली.उदाहरणार्थ, एक सत्र कृतीमूलक गणित या विषयावर होते. यात शिक्षकांनी बाजारहाट, घरगुती वस्तू, आकृती आदींमधून गणित शिकवण्याचे तंत्र आत्मसात केले.शिक्षकांमध्ये आत्मविश्वास आणि नवनवीन कल्पना यांचा विकास झाला. शिक्षणाच्या सत्रांमधून संवाद, सर्जनशीलता आणि सहकार्य या मूल्यांना चालना मिळाली.या प्रक्रियेत मुख्याध्यापकांनी 'शाळा म्हणजे एक शैक्षणिक समुदाय' हे तत्व आत्मसात केले.



३. मुलाभिमुख व आनंददायी शिक्षणपद्धतींचा अवलंब-

शिकणे ही नैसर्गिक क्रिया आहे, पण त्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. मुख्याध्यापकांनीमुलांना केंद्रस्थानी ठेवून, त्यांच्या शिकण्याच्या शैलीनुसार अध्यापनात बदल केला.ते म्हणायचे, "शिकणे जर खेळासारखे वाटले, तर मुलं त्यात रमून


जातात.”त्यासाठी त्यांनी विविध इंद्रियांचा वापर होईल अशा कृतींचा समावेश केला. गोष्टी, गाणी, हस्तचर्चा, चित्रे, आणि लघुनाट्य यांच्या माध्यमातून भाषा शिकवण्यात आली.उदाहरणार्थ, ‘शाळा’ या शब्दासाठी ‘श-ष-सा’ या ध्वनींचा उच्चार करून एक लघुनाट्य सादर करण्यात आले.गणित शिकवताना मोजणी, मोजमाप, आकृती यांचा प्रत्यक्ष वापर करण्यात आला.वर्गामध्ये ‘मॅथ कोपरा’ तयार करण्यात आला — जिथे मुलं स्वयंपूर्णपणे खेळत खेळत शिकत होती.मुख्याध्यापकांनी शिकणे ही एक जिवंत प्रक्रिया आहे, हे कृतीतून दाखवून दिले.





४. वाचन कट्टा आणि गणित कट्टा-

शाळेतील कोपऱ्यांमध्ये स्थापित केलेले ‘वाचन कट्टा’ आणि ‘गणित कट्टा’ हे केवळ साधनांचे संच नव्हते, तर ती शिक्षणासाठीची जिवंत केंद्रे होती.वाचन कट्ट्याच्या रंगीत पुस्तकांनी मुलांमध्ये वाचनाची ओढ निर्माण केली. ही पुस्तकं निवडताना मुलांची वय, आवड आणि समज लक्षात घेतली गेली.मुख्याध्यापकांनी गावकऱ्यांशी संपर्क साधून जुनी पुस्तकं, मासिकं जमा केली. काही पालकांनी रंगीबेरंगी पोस्टर, चारोळ्या लिहून दिल्या.गणित कट्टा हा एक ‘शिकण्याचा मॉल’ होता. वजनकाटे, मोजमापफीत, घड्याळं, आकृती हे खेळणी नव्हती — ती शिकण्याची साधनं होती.मुलं गटांमध्ये बसून आकड्यांचे कोडे सोडवत. वर्गाची भिंतच एक शिक्षण साधन बनली.मुख्याध्यापकांनी यासाठी समाजातून साधनं उभारली, व त्यांच्या वापरात सातत्य राखलं.





५. पालक-सहभाग वाढवण्यासाठी विशेष उपक्रम-

शिक्षण ही केवळ शाळेची जबाबदारी नसून घर आणि शाळा यांचं संयुक्त उत्तरदायित्व आहे, हे मुख्याध्यापकांनी ठामपणे मांडले.त्यांनी प्रत्येक पालकसभेत संवादात्मक पद्धतीने शिकण्याचं महत्त्व पटवून दिलं.पालकांना सांगितलं मुलांशी ३० मिनिटं रोज संवाद साधा.याचा परिणाम मोठं आहे. गोष्ट सांगणे, बाजारात वस्तूंचे वजन पाहणे, आकडे मोजणे — हे सगळं मुलांसाठी 'घरगुती शिक्षण' ठरू शकते.मुख्याध्यापकांनी घरभेटी घेवून पालकांच्या मनातील शंका दूर केल्या. शाळेतील योजना, शिक्षकांचेप्रयत्न याची जाणीव दिली.पालकांमध्येही सकारात्मक बदल दिसू लागले. काही पालकांनी आता 'गोष्टीसांगणं', 'बाजारात आकडेमोड' या क्रिया आवर्जून केल्या.या सामंजस्यामुळे मुलांच्या शिक्षणात घरचाहातभार लागला.



६. स्थानिक साधनांचा शैक्षणिक वापर-

'महागडी साधनं नसली तरी शिक्षण थांबत नाही' हे मुख्याध्यापकांनी दाखवून दिलं.त्यांनी दगड, काठी,पानं, भाज्या, बाजारातील वस्तू – यांचा वापर करून 'स्थानीय शैक्षणिक सामग्री' तयार केली.उदाहरणार्थ,वजन शिकवताना पिशवीत रताळी व शेंगदाणे भरून तुला वापरली गेली.भाषा शिक्षणासाठी लोककथा,म्हणी, बोलीभाषा, स्थानिक समारंभ यांचा वापर झाला.शाळेने गावातील वृद्ध नागरिकांना आमंत्रित करून त्यांच्या अनुभवातून कथनप्रकार शिकवला. शिक्षण 'पुस्तकांपलीकडे' असते, हे मुले प्रत्यक्ष अनुभवातून शिकली. शाळा म्हणजे केवळ वर्ग नव्हे, तर एक व्यापक अनुभवविश्व बनली.



७. तंत्रज्ञानाचा अर्थपूर्ण वापर-

तंत्रज्ञानाचे अंधानुकरण न करता, त्याचा योग्य वापर कसा करावा याचे उदाहरण मुख्याध्यापकांनी दिले.त्यांनी शिक्षकांना DIKSHA, eBalbharti, Read Along अशा ॲप्सच्या वापराचे प्रशिक्षण दिले.मुलांना बाराखडी, अंकांची ओळख, भाषिक खेळ, इंग्रजी शब्द सादरीकरण यासाठी ॲप्स व व्हिडीओज दाखवले गेले.हे सर्व सत्र नियोजित वेळेतच वापरण्यात आले, जेणेकरून मुलांची स्क्रीनवरची झपाटलेली आसक्ती निर्माण होणार

नाही.तंत्रज्ञान म्हणजे शिकवण्याचे एक साधन – हे शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही शिकवण्यात यश मिळाले.या दृष्टीने शाळा डिजिटल साधनांचा सजग वापर करणारी ठरली.





८. सातत्याने प्रगतीचे निरीक्षण आणि सुधारणा -

मुख्याध्यापकांनी 'प्रगती' म्हणजे केवळ निकालपत्र नव्हे, तर एक सतत चालणारी प्रक्रिया मानली.प्रत्येक महिन्याला शिक्षकांकडून विद्यार्थी प्रगती अहवाल घेण्यात येई.शिक्षकांसोबत वैयक्तिक चर्चेतून, कुठल्या विद्यार्थ्याला कुठे अडचण आहे, हे समजून त्यानुसार उपाययोजना आखण्यात आली.हे मूल्यांकन संवादात्मक पद्धतीने राबवले गेले, त्यामुळे शिक्षकांमध्ये निरीक्षण कौशल्य विकसित झाले.मुख्याध्यापकांनी 'एक परीक्षा आणि निकाल' या पद्धतीपेक्षा, 'सातत्याने मुल्यांकन आणि वैयक्तिक मदत' या संकल्पनेवर भर दिला.या धोरणामुळे विद्यार्थ्यांची प्रगती सतत ट्रॅक करण्यात आली व वेळेवर मदत मिळाली.



९. विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी सन्मान आणि कौतुक-

मुख्याध्यापकांना समजले होते की, प्रत्येक यशाचा सन्मान हा पुढील यशाला प्रेरणा देतो.त्यांनी छोट्या प्रगतीबद्दल मुलांचे अभिनंदन केले – स्टिकर्स, छोट्या बक्षिसांनी नाही तर खुले कौतुक करून.मुलांनी एखादा शब्द बरोबर लिहिला, उदाहरण नीट समजावले, धैर्याने वाचन केले – तर त्यांचे संपूर्ण वर्गात अभिनंदन होत असे.या कौतुकसंस्कृतीने 'मी काही तरी करू शकतो' हा भाव निर्माण केला.स्पर्धेपेक्षा प्रेरणेला प्राधान्यदेऊन, त्यांनी सकारात्मक शिकण्याचे वातावरण निर्माण केले.मुख्याध्यापकांनी प्रेरणा ही शिक्षणाची खरी ऊर्जा बनवली.



१०. संपूर्ण प्रक्रियेचा परिणाम आणि प्रस्थापित यश -

या सर्व प्रयत्नांचा एकत्रित परिणाम म्हणजे शाळेचा सर्वांगीण शैक्षणिक स्तर लक्षणीयरीत्या उंचावला. पूर्वी७०% विद्यार्थीच मूलभूत साक्षरता व संख्याज्ञानात सक्षम होते, ते प्रमाण ९५% पर्यंत पोहोचले.मुलांमध्येआत्मविश्वास,स्पष्ट अभिव्यक्ती आणि उपजत संवादकौशल्य वाढले. शाळेला जिल्हा परिषद आणि राज्य शासनाकडून FLN लक्ष्य पूर्ततेबद्दल गौरव मिळाला. मुख्याध्यापकांच्या कार्यपद्धतीची इतर शाळांनीही दखल घेतली आणि ती अंमलात आणण्यास सुरुवात केली.या सर्व प्रक्रियेतून त्यांनी एक मोठा संदेश दिला. परिस्थिती काहीही असो, परिवर्तन शक्य आहे – गरज आहे ती दृढ संकल्पाची आणि सहभागी नेतृत्वाची..





समारोप:

या यशोगाथेच्या केंद्रस्थानी होता एक दूरदृष्टी असलेला, कार्यक्षम आणि संवेदनशील मुख्याध्यापक.त्यांनी शिक्षणप्रक्रियेचा केंद्रबिंदू विद्यार्थी ठेवत शिक्षक, पालक आणि समाज यांना एकत्रित करून शाळेला एका नव्या उंचीवर पोहोचवलं.हा केवळ यशाचा आलेख नाही, तर संपूर्ण शाळांसाठी एक अनुकरणीय प्रेरणा आहे.

----------**----------

आनंददायी उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकसनात शाळा नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरकांचन

शाळेचा पत्ता - उमरकांचन, तालुका कडेगाव जिल्हा सांगली

शाळेचा ईमेल आयडी - zpschoolumarkanchan@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री विक्रम महादेव ठोंबरे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 8308567734

मुख्याध्यापक ईमेल आयडी - vikrammthombre@gmail.com



प्रस्तावना

जिल्हा परिषद शाळेची सुरुवात कधी झाली हे सांगण्याच्या अगोदर मी या गावाची सुरुवात कशी झाली हे सांगू इच्छिते. सन २००८-०९ या वर्षांमध्ये सातारा जिल्ह्यातून ही कुटुंब सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यातील नेवरी या हद्दीत पुनर्वसनासाठी आली. अतिशय बिकट परिस्थितीत जन्मभूमी सोडून कर्मभूमीचा शोध घेण्यासाठी आलेल्या येथील कुटुंबांकडे रोजगाराशिवाय काहीच पर्याय नव्हता.

तसे पाहिले तर शाळेच्या वर्ग खोल्यांचे बांधकाम हे सन २००० सालीच पूर्ण झाले होते परंतु या ठिकाणी त्यावेळेस कुटुंबे राहण्यास आलेली नव्हती त्यानंतर सन २००८-०९ या सालात प्रत्यक्ष या ठिकाणी काही कुटुंबे राहण्यास आली. दोन-तीन वर्ष या कुटुंबांनी या शाळेतच राहण्यासाठी आसरा घेतला. त्यानंतर सन २०१२ मध्ये येथे जी काही कुटुंबे आली होती त्यांच्या मुलांसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरकांचन ही शाळा सुरू करण्यात आली. राहायला कुटुंब कमी असल्यामुळे येथील शाळेची पटसंख्या देखील कमीच असते या ठिकाणी इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतची शाळा आहे.

उमर कांचन या गावात अंगणवाडी नाही त्यामुळे मुलांना शाळेच्या प्रवाहात आणणे तसे कठीणच होते. पण आमच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री ठोंबरे सर यांनी कठीण गोष्ट शक्य करून दाखविली. यासाठी विविध शैक्षणिक साहित्यांचा वापर,ई - लर्निंग साहित्य, खेळ, शैक्षणिक खेळ, शालेय मूल्यशिक्षण, सहशालेय उपक्रम, गृहभेट,पालक सभा अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून मुलांना शाळेच्या प्रवाहात आणलेच तसेच मूलभूत क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्नही केले.

मूलभूत क्षमता वाढविण्यासाठी आलेल्या समस्या

१) अंगणवाडीचा अभाव,
२) आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव,
३) पालकांचे अज्ञान व शिक्षणाबद्दल निरुत्साह
४) पालकांची व्यसनाधीनता व घरातील गढूळ वातावरण,
५) आर्थिक अडचणीमुळे लेखन साहित्याचा अभाव,
६) लोकसहभागाचा अभाव,
७) पालकांच्या मदतीचा अभाव,
८) शैक्षणिक साहित्य हाताळताना समस्या.




मूलभूत क्षमता वाढवण्यासाठी केलेल्या उपाययोजना

१) गावामध्ये अंगणवाडी नसल्यामुळे जे विद्यार्थी पुढच्या वर्षी पहिलीला येणार असतील त्या मुलांना दिवाळीपासून शाळेत बसवून घेतले जाते.

२) शाळेमध्ये आल्यापासून सतत चार वर्ष पाठपुरावा व प्रयत्न केल्यामुळे तब्बल चार वर्षानंतर आमच्या शाळेत लाईट आली आणि दोन वर्षानंतर मुख्याध्यापक ठोंबरे सर यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षण देणे सोपे झाले.





३) या शाळेत जी काही बालके आहेत या बालकांच्या पालकांना उपजीविकेसाठी दररोज रोजगाराच्या शोधात जावे लागते. अशा परिस्थितीत येथील शिक्षक व मुख्याध्यापक यांनी पालक सभा तसेच गृहभेटीच्या माध्यमातून पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

४) व्यसनाधीनतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्याचा परिणाम विद्यार्थी व त्यांचा अभ्यास यावर होतो. अशावेळी माता पालक सभा घेऊन उद्बोधन करण्यात आले.

५) पालकांच्या आर्थिक समस्येमुळे विद्यार्थ्यांना वही,पेन, पेन्सिल इत्यादी साहित्य वेळेवर मिळत नाही. किंवा पालकांकडून याकडे दुर्लक्ष केले जाते. अशावेळी शाळेकडून शाळेचे मुख्याध्यापक ज्या विद्यार्थ्यांना वही,पेन, पेन्सिल अशा प्रकारचे शैक्षणिक साहित्य हवे आहे ते साहित्य त्यांना उपलब्ध करून देतात.

६) येथील पालकांची आर्थिक परिस्थिती ही बिकट असल्यामुळे या ठिकाणी खूप प्रयत्न करूनही लोकसहभाग होऊ शकत नाही. अशावेळी उमरकांचन शेजारील मोठे गाव असलेले नेवरी हे महसुली गाव, गावचे सरपंच, उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी यांच्या मदतीने काही प्रमाणात शाळेमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करून घेतल्या आहेत.

७) शाळेतील विविध शैक्षणिक साहित्य विविध शैक्षणिक पेट्या या पेट्यातील साहित्य तसेच शिक्षकांनी स्वतः तयार केलेले साहित्य हे साहित्य हाताळण्याविषयी वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते.

८) शाळेमध्ये आनंददायी माध्यमातून विविध उपक्रमांना चालना दिली जाते. तसेच वेळोवेळी शारीरिक शिक्षणाचा तास घेऊन मुलांमध्ये खिलाडू वृत्ती विकसित केली जाते.

मराठी गणित इंग्रजी साहित्य व उपक्रम फोटो

मराठी,इंग्रजी व गणित पेटीतील साहित्य विद्यार्थी अध्ययनासाठी वापरतात. तसेच शिक्षक देखील विषयानुरूप विविध उपक्रम घेतात. त्यातून सुद्धा विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ झाली व शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली.




ता. कडेगाव,


जुलै – July – 31
ऑगस्ट – August – 31
सप्टेंबर – September – 30
ऑक्टोबर – October – 31
नोव्हेंबर – November – 30
डिसेंबर – December – 31

शनिवार माझ्या आवडीचा





शनिवार माझ्या आवडीचा, आनंददायी शनिवार या उपक्रमा अंतर्गत शिक्षकांनी तयार केलेले शैक्षणिक साहित्य यावर आधारित उपक्रम राबवून शिक्षण प्रक्रिया आवडीची केली. विविध खेळ, गोष्टी, कवायत प्रकार, गाणे,नृत्य इत्यादी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी शनिवार आवडीचा केला आहे.

व्यावसायिक शिक्षण







विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत क्षमता तर वाढल्याच पाहिजेत पण त्याचबरोबर मूल्य शिक्षण व व्यावसायिक शिक्षण खूप महत्त्वाचे आहे. याची जाणीव ठेवून आमच्या शाळेत टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू कापडी पिशवी तयार करणे, माती पासून देवी तयार करणे, गणपती बनवणे इत्यादी शिक्षण दिले जाते.

5 स्टार उपक्रम





या उपक्रमा अंतर्गत आम्ही विद्यार्थ्यांना पाच गणिताची उदाहरणे किंवा मराठीचे पाच शब्द देतो. ज्या विद्यार्थ्यांची पाचही शब्द बरोबर असतील तो विद्यार्थी या फाइव स्टार उपक्रमाचा विजेता होतो. आणि त्याच्या हातावर,वहीवर फाईव्ह स्टार दिले जातात. यामुळे मुले एकाग्रतेने उपक्रमांमध्ये सहभागी होतात.

क्षेत्रभेट









तुकाई मंदिर, गणपती बनवण्याऱ्या व्यावसायिकाची भेट, महादेव मंदिर ,येरळा नदी इत्यादी ठिकाणी विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीसाठी नेण्यात येते. जेणेकरून विद्यार्थ्यांना आपल्या आजूबाजूच्या परिसराची माहिती मिळेल.

विविध स्पर्धा







विद्यार्थ्यांसाठी विविध शालेय स्पर्धा राबविल्या जातात. यामध्ये वक्तृत्व, कथाकथन, क्रीडा स्पर्धा, गायन स्पर्धा या सर्व स्पर्धेमध्ये आमच्या शाळेतील विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाने केंद्र स्तर तसेच तालुकास्तर या ठिकाणी झळकले आहेत.

विश्व उद्याची इथे किलबिले

जन्मभूमी सोडून कर्मभूमीचा शोध घेणारे येथील पालक खरोखरच परिस्थितीशी चार हात करताना बऱ्याचदा पालकांची आपल्या विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होते. पण आम्ही सर्व शिक्षक या मुलांना शिक्षणाबरोबर शालेय उपयोगी साहित्य देखील उपलब्ध करून देतो जेणेकरून या मुलांच्या शिक्षणामध्ये खंड पडू नये.





समारोप -

अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विविध उपक्रमांच्या माध्यमातून मुख्याध्यापक व शिक्षक यांनी विकसित केलेल्या आहेत. खऱ्या अर्थाने येथील विद्यार्थी घडवल्याचे समाधान आम्हाला मिळते.

----------**----------

भौतिक व गुणात्मक विकास साधण्यासाठी शालेय नेतृत्वाचा ध्यास

शाळेचे नाव - जि.प.पूर्ण प्राथमिक शाळा हरकुळ गावडेवाडी
शाळेचा पत्ता - हरकुळ गावडेवाडी, तालुका कणकवली ,जिल्हा सिंधुदुर्ग
शाळेचा ईमेल आयडी - zppsharkulgawadewadi@gmail.com
मुख्याध्यापक नाव - श्री सुनील लक्ष्मण ठाकूर
मुख्याध्यापक मोबाईल नंबर - 9423879285 / 8830962918

प्रस्तावना -

कणकवली तालुक्यातील हरकुळ खुर्द, गावडेवाडी येथील काही शिक्षणप्रेमी व्यक्तींनी एकत्र येऊन सन १९४० साली शाळेची स्थापना केली. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील हरकुळ खुर्द येथील ऐतिहासिक व निसर्ग साधन संपत्तीने नटलेल्या हरकुळ खुर्द गावात हरकुळ खुर्द गावडेवाडी शाळा १९४० मध्ये सुरू करण्यात आली.

समग्र शिक्षा अनुदान या योजनेतून सुंदर व दिमाखदार, सुबक अशी दुमजली शाळेची इमारत बांधून शाळेने आपल्या शैक्षणिक कामकाजाचा ठसा उमटवत गुणात्मक व भौतिक विकासात आपले पाय रोवले आहेत.शाळा घडवण्यात शालेय व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ,विद्यार्थी व सहकारी शिक्षक यांचा सहभाग मोलाचा आहे. तसेच शाळेच्या प्रती असलेला आदर अतुलनीय आहे.




स्थापना - सन-१९४०
ता.कणकवली
सत्यमेव जयते
सुस्वागत


शालेय भौतिक सुविधा



महिन्द्रा आणि महिन्द्रा लिमिटेड
ऑटोमोटिव अणि फार्म सेक्टर, कांदिवली, मुंबई
कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकी (CSR)
अंतर्गत
शालेय मुलींकरिता शौचालय बांधणी
श्रमदान सहकार अभियान
जि. प. प्राथमिक शाळा हरकुळ खुर्द गावडेवाडी
Rise
mahindra
Rise




- शाळेला २४ तास पाणीपुरवठा होण्यासाठी नळ योजना व बोअरवेल (कुपनलिका)आहे.
- शाळेला संपूर्ण बंदिस्त संरक्षक भिंत बांधून बंदिस्त कंपाउंड करण्यात आले आहे.
- शालेय मुलांना गणवेश,पेन ,वह्या,शूज ,बेल्ट, ओळखपत्रे दिली जातात.
- शालेय मुलांना सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.
- शाळेला आतून व बाहेरून रंगरंगोटी व सजावट करण्यात आली आहे.
- शाळा संपूर्ण सीसीटीव्ही कॅमेऱ्याखाली आहे.
- शाळेला वायफाय / इंटरनेट सेवा उपलब्ध आहे.
- शाळेला खेळाचे साहित्य, विज्ञान प्रयोगशाळा,साऊंडसिस्टिम अद्ययावत आहे.
- शाळेला सर्व मुलांना स्वच्छ पाणी वॉटरफिल्टरद्वारे दिले जाते.
- शालेय आवारात सौरऊर्जा दिवे लावण्यात आले आहेत.

- शाळेत मुलामुलींसाठी स्वतंत्र शौचालय / स्वच्छतागृह आहेत.
- शाळेत डिजिटल क्लासरूम, ग्रंथालय ,प्रथमोपचार साहित्य उपलब्ध आहे.
- शालेय परिसर आकर्षक असून परसबागेची व्यवस्था करण्यात आली आहे
- शाळेने स्वच्छ विद्यालय पुरस्कर प्राप्त केला आहे .तसेच तंबाखूमुक्त शाळा झाल्याबद्दल गौरवण्यात आले आहे . शाळेने केंद्रस्तर निपुण उत्सवात सहभागी होऊन प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.








HAPPYB HDAY


माझी माती
माझा देश
26 January
HAPPY REPUBLIC DAY
प्रास्ताविका
आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक
सार्वभौम,समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य
घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास,
श्रध्दा व उपासक यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्तित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधान सभेत
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.
जिल्हापरिषद पुणे,प्राथमिक शाळा हरकुडयाचीवाडी
ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग
सौजन्य १) श्री.अशोक भासले - माजी जनसेवक, भिवडी
२) श्री.मुनीम ठाकूर - उपअभियंता,मुख्याध्यापक

गुणात्मक विकास

शाळेच्या भौतिक सुविधेबरोबरच शाळेतील मुलांचा गुणात्मक विकास होण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या मार्गदर्शन व नियोजनाखाली विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जात आहेत.प्रोजेक्टर,डिजिटल क्लास ,स्मार्ट टीव्ही व तज्ञामार्फत मार्गदर्शन केले जाते.त्याचबरोबर शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थी स्पर्धा परीक्षेला बसवण्यात येत आहेत शिष्यवृत्ती,एपीजे अब्दुल कलाम, बीडीएस,नवोदय परीक्षा तसेच अनेक खाजगी व शासकीय स्पर्धा परीक्षांना बसवले जाते. सदर स्पर्धांमध्ये शाळेने जिल्हा व राज्यस्तरावर उत्तुंग यश संपादन केले आहे.













वनभोजन, वर्षासहल, सांस्कृतिक कार्यक्रम, क्षेत्रभेट (गणपती शाळा) याद्वारे गुणात्मक विकासाला चालना दिली जाते.मुलांना बुद्धिबळ,कॅरम,कराटे यांचे प्रशिक्षण दिले जाते. सर्वधर्म समभाव जोपासना,वारकरी दिंडी, वृक्षारोपण दिंडी,दशावतार यासारखे उत्सव साजरे केले जातात.





जिल्हास्तरावर ,राज्यस्तरावर वक्तृत्व, निबंध, ज्ञानी मी होणार, गणित (ऑलिंपिक) अशा विविध स्पर्धांमधून प्रशालेच्या मुलांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे.








व्यवसाय विकास व कौशल्य विकास यावर आधारित प्रशिक्षण आयोजित करून मुलांना मार्गदर्शन केले जाते.



महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या " मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" अभियानात आमच्या शाळेने सहभाग घेऊन सलग दोन वर्ष तालुकास्तरावर द्वितीय व प्रथम क्रमांक प्राप्त करून पाच लाख रुपये बक्षीसाची मानकरी ठरलेली आहे.



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान
सन २०२३ - २४
प्रशस्तीपत्र

महाराष्ट्र राज्य यांचे वतीने सन २०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान मध्ये आपल्या शाळेने सहभाग घेऊन द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

आपल्या या उज्वल यशाबद्दल व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

- तालुका स्तर :- प्राथमिक
- क्रमांक :- द्वितीय
- शाळेचे नाव :- जि.प.शाळा हरकुळ खुर्द, गावडेवाडी ता.कणकवली

किशोर गवस
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती कणकवली

अरुण चव्हाण
गटविकास अधिकारी (वर्ग १)
पंचायत समिती कणकवली

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा २
सन २०२४-२५
प्रशस्तीपत्र

महाराष्ट्र राज्य यांचे वतीने सन २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान मध्ये आपल्या शाळेने सहभाग घेऊन प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

आपल्या या उज्वल यशाबद्दल व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

- तालुका स्तर :- प्राथमिक
- क्रमांक :- प्रथम
- शाळेचे नाव :- जि.प.शाळा हरकुळ खुर्द गावडेवाडी, ता.कणकवली

किशोर गवस
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती कणकवली

अरुण चव्हाण
गटविकास अधिकारी (वर्ग १)
पंचायत समिती कणकवली

हरकुळ खुर्द-गावडेवाडी शाळा तालुक्यात प्रथम

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान



हरकुळ खुर्द : पुढारी वृत्तसेवा

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत तालुका स्तरावरील मूल्यांकन झाले असून जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा हरकुळ खुर्द गावडेवाडीने यात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

एकूण शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थी प्रगती मूल्यांकन, आंतर बाह्य शालेय परिसर, शैक्षणिक सुविधा, परसबाग, प्रयोग शाळा, सीसीटीव्ही सुविधा आदी गोष्टीत शाळेने अव्वल स्थान कायम राखले आहे आणि तालुका स्तरावरील ३ लाख रु. बक्षिसाची मानकरी ठरली आहे. गेल्या वर्षीसुद्धा या स्पर्धेत तालुका स्तरावर या प्रशालेने द्वितीय क्रमांक प्राप्त करत २ लाख रु.चे बक्षीस पटकावले होते. शाळा व्यवस्थापन समिती, शाळा सुधार समिती, माता पालक, पालक शिक्षक संघ, शालेय पोषण समिती, सर्व ग्रामस्थ आणि शिक्षक श्री. भिसे, श्री. मर्गज, सुष्मिता सावंत व मानसी मेस्त्री यांचे व शाळेतील मुलांचे आणि मुख्याध्यापक सुनील ठाकूर यांच्या सहकार्याने हे यश संपादन केले.

शाळेने हर घर संविधान उपक्रम राबवला आहे.




एक पेड मां के नाम १०० % मुलांमार्फत राबवला आहे.

परसबाग उपक्रम राबवला आहे.





शाळेने " एक हात मदतीचा उपक्रम " राबवून शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना मदत केली जात आहे.



एक हात मदतीचा

जिल्हा परिषद पूर्ण प्रथामिक शाळा हरकुळ खुर्द गावडेवाडी
शाळेतील विद्यार्थ्यांचा असा ही एक उपक्रम

शाळेने नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत सन २०२३/२०२४ मध्ये विद्यार्थी बचत बँक सुरू केली होती. सदर जमा रकमेतून आज शाळेतील एक गरीब विद्यार्थी मित्र आजारी पडला आणि त्याला दवाखान्यात उपचारासाठी दाखल व्हावे लागले.त्यावेळी शालेय मंत्रिमंडळाने एकमताने बचत बँकेतील जमा रकमेतून सदर विद्यार्थ्याच्या औषधोपचारासाठी १००० रुपये देवून खारीचा वाटा उचलला आहे.याबाबत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समिती तसेच शाळा सुधार समिती हरकुळ खुर्द आणि शिक्षक वृंद मुख्याध्यापक हरकुळ खुर्द गावडेवाडी यांनी अभिनंदन केले आहे.

तसेच या नावीन्यपूर्ण उपक्रमा बद्दल सर्व थरातून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

----------**----------

भौतिक सुविधा व शैक्षणिक कामकाजात ग्रामस्थ व पालकांचे योगदान घेण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा, मसुरे देऊळवाडा,

शाळेचा पत्ता - मसुरे देऊळवाडा,ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग. पिन 416608

शाळेचा ईमेल आयडी - zpschoolmasuredeulwada@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री. गुरुनाथ चंद्रकांत ताम्हणकर,

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9420738375

मुख्याध्यापक ईमेल आयडी - gurutamhankar@gmail.com



१) भौतिक विकास क्षेत्रात यश

ग्रामीण भागामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये काम करताना भौतिक सुविधांबाबत काही अडचणी येतात. जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा मसुरे देऊळवाडा या शाळेत पहिली ते सातवी हे वर्ग असून शाळेमध्ये 33 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना आवश्यक पायाभूत सुविधा पुरवत असताना पालकांचा सक्रिय सहभाग लाभला तर निश्चितच फायदा होतो. याची अनुभूती या शाळेमध्ये आली. गावातील वेगवेगळ्या स्वयंसेवी व्यक्तींचा भौतिक सुविधांसोबतच शैक्षणिक कामकाजात उपयोग करून घेता आला.



विद्यार्थ्यांना पाण्याची सोय ही महत्त्वाची भौतिक सुविधा आहे. शाळेमध्ये विहीर आहे. मात्र या विहिरीचं पाणी एप्रिल महिन्यापासून कमी व्हायला सुरुवात होते. गेल्या वर्षी पालकांच्या ही बाब लक्षात आणून दिली. पालक सभेत या विषयावर चर्चा झाल्यावर पालकांनी स्वयंस्फूर्तीने शाळेची विहीर उपसण्याचे (गाळ काढण्याचे) ठरविले. दुसऱ्याच दिवशी बहुसंख्य पालक आणि सोबत गावातील काही ग्रामस्थ ही या कामासाठी उपस्थित राहून त्यांनी विहीर साफ करून दिली. चालू वर्षी विहिरीला मुबलक पाणी साठा असून तो मे महिन्याच्या शेवटपर्यंत पुरणार आहे. 'गाव करील ते राव करील काय?' याची अनुभूती या निमित्ताने आली.

या शाळेच्या दोन इमारती असून या शाळेच्या संपूर्ण परिसरामध्ये चारी बाजूने संरक्षण भिंत आहे. मुख्य प्रवेशद्वार व कमानही आहे. या शाळेत दरवर्षी शारदोत्सव कार्यक्रमानिमित्त पालक व ग्रामस्थांच्या श्रमदानातून परिसर सफाई व रंगरंगोटी करण्यात येते. गेल्या वर्षी 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' उपकमामध्ये संरक्षक भिंत व प्रवेशद्वार रंगविण्याचे काम पालकांनी व ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळी उपस्थित राहून श्रमदानाने पूर्ण केले.







शाळेमध्ये परसबाग निर्मिती करण्यात आली असून या शालेय परसबागेसाठी नांगरणी, पेरणी या कामासाठी पालकांचे सहकार्य असते. परसबागेसाठी आवश्यक भाजीचे बी स्थानिक शेतकरी ग्रामस्थ स्वयंस्फूर्तीने पुरवितात.



तालुकास्तरीय मूल्यमापनामध्ये 'परसबाग निर्मिती स्पर्धेमध्ये शाळेने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

भौतिक सुविधांसोबतच शैक्षणिक कामकाजामध्येही ग्रामस्थ व पालकांचे योगदान मिळते. देऊळवाडा या गावामध्ये संगीत क्षेत्रातील व कला क्षेत्रातील व्यक्ती आहेत. त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देण्यात येते. हार्मोनियम वादन, तबलावादन, चित्रकला, मातीकाम याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन विद्यार्थ्यांना या ग्रामस्थांमार्फत करण्यात येते.



या गावातील नृत्य मार्गदर्शकांचे विद्यार्थांना सांस्कृतिक कार्यक्रमासोबतच समूहनृत्य स्पर्धेसाठी मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जाते. दरवर्षी या शाळेचा किमान एक संघ तालुका किंवा जिल्हा पातळीपर्यंत पोहोचतो. गावातील योगशिक्षिका सौ. वर्षाराणी अभ्यंकर यांचे योगाविषयक प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिले जाते.



शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून तसेच माजी विद्यार्थी, माजी शिक्षक आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्यातून शाळेला आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी आर्थिक व वस्तुरूपाने देणगी मिळवून दिली जाते.

चालू वर्षी शैक्षणिक उठावातून सुमारे तीन लाख पंच्याहत्तर हजार रुपयाची रोख व वस्तुरूप आणि श्रमदानरुपाने देणगी शाळेला प्राप्त झालेली आहे. बेस्ट शिव हनुमान ट्रस्ट सांताक्रुज, मुंबई, दुर्गा मावळा प्रतिष्ठान कोकण विभाग, ग्रामपंचायत देऊळवाडा तसेच गावातील दानशूर व्यक्तिमत्व, शाळेचे माजी शिक्षक, माजी विद्यार्थी तसेच शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक यांच्या देणगीतून हा शैक्षणिक उठाव रुपये 3,74,300/- एवढा चालू वर्षात झालेला आहे.





ग्रामस्थ श्री. सुगंध तांबे व श्री.आनंद तांबे यांच्याकडून साउंड सिस्टिम भेट



ग्रामस्थ व पालक यांच्यात सकारात्मक सुसंवाद ठेवल्यास शैक्षणिक व भौतिक विकासात त्यांचा हातभार लावण्यास मदत होते. शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री. प्रशांत रमाकांत पारकर यांनी शाळा व्यवस्थापन समिती व पालक शिक्षक संघ यांच्या सभेत शालेय

गरजांबाबत सहकार्याचे आवाहन केले व त्याला योग्य प्रतिसाद लाभला. 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा 1' या उपक्रमात शाळेने मालवण तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

2) **कला क्षेत्रातील यश**

जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना विविध कलांची (नृत्य, नाट्य, शिल्प, चित्र, कार्यानुभव) आवड आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना



वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षक आणि विशेष मार्गदर्शक यांच्याकडून अतिरिक्त मार्गदर्शन केले जाते. सरावासाठी शालेय स्पर्धांचे आयोजन केले जाते. विविध चित्रकला, गायन, नृत्य या स्पर्धांमध्ये विद्यार्थांना बसविले जाते. सन 2023/24 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा परिषद आयोजित 'जलजीवन मिशन' अंतर्गत जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत या शाळेतील इयत्ता सातवीमधील विद्यार्थीनी कु. तेजस्वी आनंद मेस्त्री हिने जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. सन 2024/25 मध्ये इयत्ता 3री मधील विद्यार्थीनी उर्मी लक्ष्मीकिरण मेस्त्री हिने बॅ. नाथ पै सेवांगण आयोजित देशभक्तीपर गीतगायन स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. तरुण भारत व लोकमान्य सोसायटी आयोजित चांद्रयान चित्रकला स्पर्धेत इयत्ता सातवी मधील विद्यार्थिनी कु. यशश्री गुरुनाथ ताम्हणकर हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.



जिल्हा परिषद सिंधुदुर्ग आयोजित बाल कला क्रीडा महोत्सवात प्रशालेने सादर केलेल्या 'जलसाक्षरता' विषयावरील समूहनृत्य स्पर्धेत शाळेच्या मोठ्या गटातील संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच लहान गटातील संघाने सादर केलेल्या 'व्यसनमुक्ती' या विषयावरील समूहनृत्याने तालुक्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला.



केंद्रीय मंत्री मा. नारायणराव राणे यांच्या हस्ते नृत्य स्पर्धेतील गुणवंतांचा सन्मान करण्यात आला.

3) **किशोरवयीन मुलींचे आरोग्य**

सध्या बदलती जीवनशैली, खाण्याच्या चुकीच्या सवयी, ताणतणाव यामुळे पहिली पाळी येण्याचे अर्थात ऋतुप्राप्तीचे वय खालावले आहे. त्यामुळे किशोरवयीन मुलींनी माहिती घेऊन आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करून काळजी घ्यावी, त्यासंबंधीचे मार्गदर्शन करण्यासाठी मसुरे देऊळवाडा प्रशालेत किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मासिक पाळी समुपदेशन कार्यशाळेत मसुरे आरोग्य केंद्राच्या डॉ.वीणा मेहेंदळे मॅडम यांनी मार्गदर्शन केले तर आरोग्यसेविका सौ.पांजरी यांनी मुलींशी संवाद साधला. मुलींच्या मनातील प्रश्नांना उत्तरे दिली.





किशोरवयीन मुलींना ऋतुप्राप्ती झाल्यावर पौगंडावस्थेतील होणारे शारीरिक व मानसिक बदल, मासिक पाळी व्यवस्थापन, पाळी विषयीचे समज, गैरसमज, पाळीतील जननेंद्रियांची स्वच्छता, सॅनिटरी पॅड, त्याची योग्य विल्हेवाट, सोबत मासिक पाळीशी संबंधित विविध आरोग्य समस्या, पीसीओएस, अतिरक्तस्राव तसेच पाळीमध्ये वापरण्यासाठी शाश्वत पर्याय आदी विषयी मार्गदर्शन केले.

तसेच प्रशालेत सॅनिटरी वेंडींग मशीन बसवण्यात आले. मशीन वापराचे प्रात्यक्षिक प्रशालेतील शिक्षिका सौ.ताम्हणकर यांनी दाखवले. त्याचप्रमाणे पॅड डिस्पोजल मशीनचेही प्रात्यक्षिक दाखवून वापराबाबत नियोजन करण्यात आले.

उत्कर्षाअंतर्गत मुलींना मासिकपाळी व्यवस्थापन हा कार्यक्रम प्रशालेत राबवला जातो. त्याचप्रमाणे मुलींचा HB तपासण्यात आला. HB कमी असणा-या मुलींच्या पालकांशी चर्चा करून आहारविहाराविषयी माहिती देण्यात आली.





विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन व आरोग्य तपासणी करताना मसुरे आरोग्य केंदाचे आरोग्यदूत



किशोरवयीन मुलींच्या आरोग्यासंदर्भात मुलींसोबतच त्यांच्या मातांना मार्गदर्शन केल्यामुळे त्या आपल्या पाल्यांच्या आरोग्याच्या बाबतीत जागरुक राहताना दिसतात. शाळेतील मुलींचे आरोग्य चांगले असून त्यांची नियमित उपस्थिती व शालेय विविध उपकमातील सहभाग चांगला असतो.

पंचायत समिती शिक्षण विभाग मालवण, गटसाधन केंद्र मालवण, शाळा व्यवस्थापन समिती, मसुरे देऊळवाडा यांच्या उत्तम सहकार्य व मार्गदर्शनातून शाळेची वाटचाल उत्तमप्रकारे चालली आहे. 100 % पटनोंदणी व नियमित उपस्थिती असून गळतीचे प्रमाण शून्य टक्के आहे. विद्यार्थी सुरक्षा, सायबर सुरक्षा मार्गदर्शन, आपत्ती व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा

अध्ययन-अध्यापनात वापर, साने गुरुजी कथामाला उपक्रमातून जीवन कौशल्य विकास अशा विविध उपक्रमांत शाळा अग्रभागी आहे.







----------**----------

“मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा” या उपक्रमाच्या ध्यासातून शाळेचा प्रेरणादायी प्रवास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा गोवळ गावठण,

शाळेचा पत्ता - गोवळ गावठण,तालुका देवगड,जिल्हा सिंधुदुर्ग ,पिन ४१६८११

शाळेचा ईमेल आयडी - zppsgovalgavthan@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. पंढरीनाथ त्र्यंबक गवळी

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9422818091

प्रास्ताविक-

जि.प.पू. प्राथमिक शाळा गोवळ गावठण, केंद्र पाटगाव तालुका देवगड मधील एक शाळा. गाव तिथे शाळा या शासनाच्या धोरणानुसार 1946 साली शाळेची स्थापना झाली. श्री दत्तात्रय जोशी यांनी शाळेसाठी विनामूल्य जमीन दिली. 2009 साली शाळेमध्ये कार्यरत असलेले श्री नरहरी खटावकर सर यांनी सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळेच्या नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम केले आणि शाळा सुसज्ज झाली.1946 साली पहिली ते चौथी असलेली शाळा आज पहिली ते सातवी पर्यंत आहे. शाळेमध्ये ३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



(शाळा इमारत फोटो)

मर्यादित पटसंख्या, भौतिक सुविधांनी सज्ज शाळा यावर्षी कमी होती ती फक्त शिक्षकाच्या कमतरतेमुळे. संचमान्यतेनुसार शिक्षकांची मे 2024 च्या भरतीने शाळेत गणित विज्ञान पदवीधरची जागा भरली गेली आणि शाळेतील ती सुद्धा कमतरता भरून आली. शिक्षकाच्या कमतरतेमुळे इतरत्र पर्यायी व्यवस्थेवर असलेले शिक्षक शाळेत आले आणि पूर्ण क्षमतेने शाळा जून 2025 मध्ये सुरू झाली.

शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा अभ्यासासोबतच कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात देखील उत्तम यश प्राप्त करत आहे. स्वच्छ व सुंदर शाळा पुरस्कार 2022 मध्ये शाळेला प्राप्त झालेला आहे. प्रशालेची प्रगती अनेक उपक्रमांच्या माध्यमातून होत आहे. शाळा समूह स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थी प्रगतशील होत आहेत. शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमधील उपक्रम शाळेने राबवलेले असून सन 2024 -25 मध्ये अन्य उपक्रमांबरोबरच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम हाती घेऊन तो यशस्वी केला. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे स्पर्धात्मक अभियान सुरू केले यामध्ये शाळेने सप्टेंबर 2024 मध्ये तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त केलेला आहे.

सन 2021-22 मध्ये समग्र शिक्षा अंतर्गत आलेल्या साडेसात लाख रुपये अनुदानातून मुख्याध्यापक श्री गवळी सर ,पदवीधर शिक्षक श्री संतोष राणे सर तसेच उपशिक्षक श्री बोरोले सर व श्रीमती तावडे मॅडम यांच्या कालावधीमध्ये शाळेच्या दुरुस्तीचे काम झाले. या अंतर्गत सुसज्ज शौचालय, वर्ग खोल्या व खिडक्यांची दुरुस्ती इ. काम झाले होते. २०२४ वर्षाच्या जुलै महिन्यामध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात झाली आणि एक नवीन अध्याय आमच्या सर्वांच्या दृष्टीने सुरू झाला. 2023-24 मधील पहिला टप्पा काही भौतिक आणि तांत्रिक अडचणीमुळे मनात असतानाही पूर्ण करता आला नव्हता पण यावर्षी मात्र नव्या जोमाने सुरुवात करूया या दृष्टिकोनातून शिक्षकांनी ध्येय निश्चित केली, योजना निश्चित केली आणि साथ मागितली ती गावकऱ्यांच्या सहकार्याची. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' असे झाल्यास काय अशक्य आहे!

मुख्याध्यापक शिक्षक यांनी या विषयासंदर्भात अधिक प्रभावी केलेले काम-

शाळेचे मुख्याध्यापक श्री. पंढरीनाथ गवळी सर, शिक्षक यांनी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची सर्वांनी प्रगती साधण्यासाठी शाळेमध्ये आवश्यक ते बदल घडवून आणले पाहिजे त्यासाठी विचार केला आणि शाळेत अनेक वर्षे उपक्रम राबवले. विद्यार्थी प्रगतीसाठी गुणवत्तेला प्राधान्य देऊन अध्ययन अध्यापनाची प्रक्रिया सुधारणे, विज्ञान साहित्य, क्रीडा साहित्य उपलब्ध करणे, खेळाचे संरचित मैदान तयार करणे, इको क्लब स्थापन करणे, गुणवत्तेसाठी पालक सभा घेणे, कलाक्षेत्रासाठी चित्रकला यासारखे उपक्रम राबवणे, स्काऊट गाईड पथकाची स्थापना करून




विद्यार्थ्यांचा नैतिक व सामाजिक विकास करणे, आपत्ती व्यवस्थापनाची ओळख करून देऊन त्यासाठी प्रात्यक्षिके घेणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची ओळख करून देणे, योगासने प्राणायाम शिकवणे, किशोरवयीन मुलींच्या आरोग्यासाठी समुपदेशन म्हणून उत्कर्षासारखे कार्यक्रम राबवणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे, आनंददायी शिक्षण प्रक्रिया राबविणे यासाठी विचार विनिमय झाला. तसेच महाराष्ट्र शासनाअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभिमान राबविले आणि शालेय प्रगती साधण्यासाठी आणि शाळेच्या भौतिक विकासासाठी हे अभियान उपयुक्त ठरले.

कार्यवाही -

21 ऑगस्ट 2024 च्या रात्री ग्रामस्थांची गावाच्या रितीप्रमाणे रात्री सभा भरली.सभेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री गवळी सर, पदवीधर शिक्षिका श्रीमती राणे मॅडम, शिक्षणसेवक श्री बडे सर, उपशिक्षक श्रीमती पाटील मॅडम,गोवळ तांबेवाडीचे मुख्याध्यापक श्री.आठे सर, सोमलेवाडी शाळेतील शिक्षणसेवक श्री. सूर्यवंशी सर उपस्थित होते. तर गावचे ग्रामस्थ असलेले माजी जि प शिक्षण समिती सदस्य श्री. विष्णू गाडी, माजी सरपंच श्री. भुसेकर, शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष श्री विश्वास घाडी, श्री विजय घाडी, विद्यमान अध्यक्ष श्री तुकाराम काळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उमेश गाडी, अजय घाडी, गावचे प्रतिष्ठित ग्रामस्थ सोमले काका, ग्रामपंचायत सदस्य तुकाराम घाडी व गावचे तरुण मित्र मंडळ हे देखील उपस्थित राहिले.

श्रीमती पाटील मॅडमनी उपस्थितांना कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. त्यावर चर्चा सुरू झाली. मुख्याध्यापक श्री गवळी सर यांनी ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे शाळा भौतिक दृष्टया संपन्न आहे असे सांगितले. आपल्याला अजून 50 टक्के काम करून किमान तीन नंबरसाठी प्रयत्न करायचे आहे हेही सांगितले. शाळेचे माजी शिक्षक यांनी भौतिक सुविधांनी शाळा सुसज्ज केलीच आहे तर यावर कळस चढवण्याचे काम आपले सर्वांचे आहे यावर सर्वांचे एकमत झाले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळेचे काम सुरू करण्यासाठी पैसे आणि श्रमदान दोन्हीची गरज असल्याचे आढळले. श्री घाडी साहेब, सोमले काका यांनी श्री गणेशा करत पाचशे रुपये काढून देणगी जमा करण्याचा श्रीगणेशा केला आणि बघता बघता सव्वीस हजार पाचशे रुपये जमा झाले.

शिक्षक व ग्रामस्थ यांनी केलेली प्रभावी कार्ये-

शिक्षक व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने प्रभावीपणे कार्य केले गेले यासाठी अनेक घटना घटकांवर काम करण्याचे निश्चित करून त्याची अंमलबजावणी केली.

- संरक्षक भिंतीची स्वच्छता व रंगरंगोटी
- झाडांची पुनर्रचना करणे व बागेचे बांधकाम




- शालेय इमारतीची रंगरंगोटी
- शालेय परिसरात पर्यावरण पूरक झाडांची लागवड करणे व त्यासाठी चिरेबंदी बांधकाम करणे
- खेळाचे संरक्षित मैदान तयार करणे
- बोलक्या भिंतींची निर्मिती करणे
- शाळेसाठी खो-खोचे मैदान तयार करणे
- मुख्याध्यापक खोली अद्ययावत करणे
- प्रयोगशाळा साहित्याची मांडणी करणे
- वाचनालय साहित्याची मांडणी करणे
- ग्रंथालय अद्ययावत करणे
- भाषा, गणित साहित्याची रचना करून वर्ग बोलके करणे
- डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध करणे
- रेन हार्वेस्टिंग साठी पन्हळ टाकणे
- शोषखड्डा मारणे
- स्वच्छतागृह अद्ययावत करणे
- किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी समुपदेशन कार्यक्रम राबविणे
- इको क्लब स्थापन करणे
- स्काऊट गाईड पथक स्थापन करणे
- स्वच्छता संरक्षण भिंतीची रंगरंगोटी

रविवार दिनांक 25 ऑगस्ट 2024 या दिवशी 65 ते 70 ग्रामस्थ शाळेच्या प्रांगणात जमले. शाळेला सुमारे 160 मीटरचे चारही बाजूंनी कंपाऊंड आहे त्यावरील शेवाळ घासून स्वच्छ केले मात्र पाऊस जास्त असल्याने त्याची रंगरंगोटी करता येणार नव्हती.

मुख्याध्यापक व शिक्षक यांनी केलेली अंमलबजावणी -

स्वच्छ सुंदर शाळेसाठी कार्याची अंमलबजावणी करताना मुख्याध्यापकानी शिक्षक, विद्याथी, पालक वर्ग , ग्रामस्थ यांचे साहाय्य घेण्याचे ठरविले आणि अंमलबजावणी केली.






झाडांची पुनर्रचना करणे व बागेचे बांधकाम –



शाळेच्या परसबागेत केळी, अंबा, शेवगा.वांगी, मिरची,कढीपत्ता, कोरफड, अळू ही झाडे आहेत त्यांची गटानुसार रचना करून बांधकाम करण्यात आले.

शालेय इमारतीची किंवा वर्ग खोल्यांची रंगरंगोटी बोलक्या भिंतींची निर्मिती –



शाळेचे रंगकाम 2021-22 च्या दुरुस्तीच्या वेळी झालेले होते. आता पावसाळा असल्याने ते शक्य नव्हते. यावेळी कणकवली येथील सुप्रिया प्रिंटर्स चे मालक श्री संतोष राणे यांनी अत्यल्प दरात डिजिटल फ्लेक्स बोर्ड, सुविचार तक्ते उपलब्ध करून दिली आणि निपुण भारत पेटीतील साहित्य वापरून वर्ग सजावट करण्यात आली.

खेळाचे संरचित मैदान अंतर्गत खो खो चे मैदान तयार करणे -

इयत्ता सहावी, सातवीचे विद्यार्थी तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य श्री उमेश घाडी व इतर पालक यांच्या सहकार्याने शाळेचे खूप छान मैदान तयार करण्यात आले.

मुख्याध्यापक खोली अद्ययावत करणे –



मुख्याध्यापक खोलीतील फलक अद्ययावत करण्यात आला. तसेच सर्व शिक्षकाचे 10 × 5 चे फोटो नावासमोर लावण्यात आले.

रेन हार्वेस्टिंग अंतर्गत पन्हाळ टाकणे किंवा शोष खड्डा मारणे -



पालक वर्गाच्या साह्याने दोन्ही इमारतींना बंदिस्त पाईप म्हणून टाकून पावसाच्या पाण्याचे नियोजन करण्यात आले तसेच शोष खड्डा करण्यात आला .

स्काऊट गाईड पथक / इको क्लब स्थापन करणे -

शाळेमध्ये स्काऊट गाईड पथक नव्हते. शिक्षणसेवक श्री बडे सर यांनी पुढाकार घेत स्काऊट गाईड पथक स्थापन करून त्याची नोंदणी केली व इको क्लब स्थापन केला.

किशोरवयीन मुलींसाठी समुपदेशन कार्यक्रम -

शाळेमध्ये पदवीधर शिक्षक श्रीमती राणे मॅडम या उत्कर्षा कार्यक्रमांतर्गत मुलींचे समुपदेशन करतात. स्वच्छतागृहात सेनेटरी वेंडिंग मशीन तसेच शाळेत चेंजिंग रूम आहे.

माननीय केंद्रप्रमुख श्री लहू दहिफळे सर यांच्या विद्यमाने वायफाय कनेक्टर प्राप्त झाला. प्रयोगशाळा, वाचनकोपरे यांची नव्याने मांडणी झाली आणि सर्वजण वाट पाहू लागले ती तपासणी पथकांची.12 सप्टेंबर 2024 रोजी अडुळकर मॅडम यांच्यासोबत केंद्रप्रमुख श्री सुदाम जोशी, श्रीमती जोईल यांचे पथक शाळेत आले. शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत सदस्य व शिक्षक यांच्याशी संवाद साधत तपासणी पूर्ण झाली आणि गणपती सुट्टीसह वेध लागले ते माझी शाळा सुंदर शाळा योजनेच्या निकालाचे!!

काही कालावधीनंतर निकाल जाहीर झाला. जिथे आम्ही एक लाख बक्षीस मिळवण्याच्या अपेक्षेने परिश्रम घेतले होते ते फळास आले आणि शाळा तालुकास्तरावर दुसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरली. अतिशय जल्लोषात गावकऱ्यांनी आनंदोस्तव साजरा केला. आता या योजनेअंतर्गत शाळेचे यश व प्रगतीतील सातत्य टिकवून ठेवणे साठी आम्ही कटिबद्ध आहोत.
'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे' ही समर्थ रामदासांची उक्ती सर्वांच्या सहकार्याने सार्थ ठरली.!!

----------**----------




“घेतला वसा शिक्षणाचा, ध्यास आम्हा गुणवत्ता वाढीचा”

शाळेचे नाव - श्री सिद्धेश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळा, सोलापूर

शाळेचा पत्ता - श्री सिध्देश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळा शिव गंगा मंदिराजवळ,भवानी पेठ,सोलापूर

शाळेचा ईमेल आयडी - siddheshwarbalmandirprathamik@gmail.com


मुख्याध्यापक नाव - श्रीमती गीता विनोद चिकमनी

मुख्याध्यापक ईमेल आयडी - geeta.chikmani@gmail.com

प्रास्ताविक

ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धरामेश्वरांच्या छत्रछायेने पुनीत झालेली सोलापूर शहरातील एक नामवंत शाळा म्हणजेच श्री सिद्धेश्वर बालमंदिर प्राथमिक शाळा सोलापूर होय. शिक्षणाची ज्ञानगंगा सर्वसामान्य स्तरापर्यंत पोहोचावी व सर्वसामान्य विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे उद्दिष्ट ठेवून सन 1963 साली शाळेची स्थापना झाली असून आजतागायत सोलापूरच्या विकासात व नवनिर्माणात योगदान देत आहे. “कायकवे कैलास” हे संस्थेचे ब्रीदवाक्य पावलो पावली स्मरणात ठेवून शाळेने यशाची उज्वल परंपरा कायम ठेवत हीरक महोत्सव वर्ष साजरे करून 62 व्या वर्षात पदार्पण केले आहे. आज रोजी शाळेत इयत्ता पहिली ते सातवीच्या वर्गात 975विद्यार्थी शिक्षण घेत असून मुख्याध्यापिकासह 25 शिक्षक व 4 कर्मचारीवृंद कार्यरत आहेत. शाळेची इमारत भव्य, सर्व सुविधांनी समृद्ध आहे. शाळेत डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून गुणवत्तापूर्ण शिक्षण,मूल्याधारीत संस्कार व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. आधुनिक काळातील इंग्रजीचे महत्त्व ओळखून सन 2008 -09 पासून शाळेत सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. आपल्या देशाचे भावी नागरिक राष्ट्रप्रेमाने उत्स्फूर्त व्हावेत यासाठी शाळेत मूल्यसंस्कारयुक्त दैनिक परिपाठ तसेच विद्यार्थ्यांच्या मानसिक शांततेसाठी विपश्यना व ध्यानधारणा घेण्यात येते.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा व कौशल्याचा विकास करणारा प्रत्येक शिक्षक ज्ञानाने,तंत्रज्ञानाने अधिक सक्षम व्हावा यासाठी संस्थेमार्फत विविध प्रबोधनपर कार्यशाळा, मार्गदर्शनपर व्याख्यान व प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या सुप्त गुणांना चालना मिळावी यासाठी नाविन्यपूर्ण शालेय व सहशालेय उपक्रम राबवले जातात.नाविन्यपूर्ण उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धा यामधून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास,संघभावना व नेतृत्वगुण विकसित केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये विशेष अध्ययनक्षमता निर्माण व्हाव्यात यासाठी गुणवत्तावाढ अभियान राबवले जाते. विद्यार्थी क्रीडास्पर्धा, चित्रकला व अबॅकस स्पर्धांमध्ये तसेच बाह्य स्पर्धा परीक्षांमध्ये राज्यस्तर जिल्हास्तर व केंद्रस्तरावर विशेष प्राविण्य मिळवून उत्तुंग यश संपादन करतात. श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीच्या सर्व सदस्यांचे कुशल मार्गदर्शन, शिक्षकांचे अथक परिश्रम व पालकांचे उत्स्फूर्त सहकार्य यामुळे शाळा उज्वल यशाची शिखरे पादाक्रांत करत विजयी घोडदौड करत आहे



"घेतला वसा शिक्षणाचा, ध्यास आम्हा गुणवत्ता वाढीचा" हे व्रत अंगीकारून शिक्षणाची खरी प्रेरणा म्हणजे स्वत:ला ओळखण्याचा आणि सतत पुढे जाण्याचा प्रवास यशस्वी करण्यासाठी शाळेतील प्रत्येक घटक अविरतपणे कार्यरत व कटिबद्ध आहे.

पार्श्वभूमी -

"कृतीयुक्त आनंददायी शिक्षण- विद्यार्थ्यांच्या संकल्पना दृढीकरण विकास."

शिक्षण ही केवळ माहिती देणारी प्रक्रिया नाही, तर ती विद्यार्थ्याच्या आयुष्याला आकार देणारी तपश्चर्या आहे. याच विश्वासाने आमच्या शाळेने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी कृतीयुक्त व आनंददायी शिक्षणातून संकल्पना दृढीकरण हा उपक्रम सुरू केला. प्रत्येक विषयातील जे घटक कृतीयुक्त पद्धतीने प्रात्यक्षिकाद्वारे शिकवता येतील अशा सर्व घटकांचे अध्यापन नाविन्यपूर्ण कृतीने करण्यात आले. श्री सिद्धेश्वर देवस्थान गुणवत्तावाढ अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर उंचावण्यासाठी मूल्यवर्धक उपक्रम राबवण्यात आले. आज शाळेतील प्रत्येक शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि शिक्षणप्रेमी यांना अभिमानाने सांगता येईल असा एक प्रवास चालू आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययनात गुणवत्तात्मक वाढ घडवून आणण्याचा हा प्रयत्न म्हणजे आमची यशोगाथा!

श्री सिद्धेश्वर बालमंदिर प्राथमिक शाळेतील शिक्षकवृंद सदैव 1000 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी सज्ज आहेत. सोलापूर शहराच्या उत्तर विभागात उच्च दर्जाचे चांगले शिक्षण देणारी शाळा म्हणून शाळेचा नावलौकिक आहे. कोविडनंतर मात्र काही विद्यार्थ्यांच्या अध्ययनात घसरण झाली होती. सर्वसामान्य स्तरातील पालकवर्ग असल्याने ऑनलाईन शिक्षणात मूलभूत संकल्पना राहिल्या होत्या. वाचन, लेखन, गणितीय कौशल्ये आणि एकाग्रता यामध्ये विद्यार्थ्यांचा स्तर कमी झाला होता याशिवाय अनेक विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाची उणीव दिसत होती. शिक्षकांकडे जबाबदारी होती— ही घसरण थांबवून त्यांना पुन्हा उभे करण्याची तर उच्च क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेण्याची!

मुख्य समस्या :


1. मूलभूत संकल्पनांची कमतरता: वाचन, लेखन, अंकलेखन, आकलन अशा प्राथमिक कौशल्यांमध्ये काही विद्यार्थ्यांची अडचण.

2. शिस्त व अभ्यासाची सवय हरवलेली: सतत ऑनलाईन शिक्षणानंतर शाळेतील एकाग्र अभ्यासाची सवय मोडलेली.

3. गृहपाठ व नियमित सरावाचा अभाव: पालकांकडून सहकार्याची उणीव.

4. शिक्षकांकडील वेळेचा ताण: वर्गशिक्षणाबरोबर गुणवत्ता वाढीसाठी स्वतंत्र वेळ लागणं.

5. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव: उत्तर देण्याची, विचार मांडण्याची भीती.



कार्यपद्धती (उपक्रमांची रूपरेषा): शाळेच्या सन्मानानीय मुख्याध्यापक तसेच श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सन्माननीय सदस्य यांनी गुणवत्ता वाढ अभियानाअंतर्गत काही ठोस निर्णय घेतले:

- शैक्षणिक सर्वेक्षण व मूल्यमापन: सुरुवातीला प्रत्येक विद्यार्थ्यांची वाचन, लेखन, अंकलेखन व संख्याज्ञान यामधील पातळी तपासली.
- "बेसलाइन टेस्ट" घेऊन sun,moon, star स्तरानुसार विद्यार्थ्यांचे गट तयार करण्यात आले.

लेखन, वाचन,आकडेमोड व सुधार योजना: 'शिक्षणवाटिका' संकल्पनेनुसार तासिकेतून दिवसातून ३० मिनिटे विशेष अभ्यासासाठी राखून ठेवली.

- वाचनासाठी "रोजची वाचनअभ्यास सत्र, वर्तमानपत्र वाचन, गोष्टीची पुस्तके वाचन,मौनवाचन, प्रकटवाचन इत्यादी,",
- लेखनासाठी "रोजनिशी श्रुतलेखन,शुद्धलेखन, स्मरणलेखन, चित्रवर्णन कथालेखन इत्यादी
- गणितासाठी "खेल-खेल में अंकगणित, कृती युक्त व नाट्यीकरणातून उदाहरणे सोडवणे व तयार करणे, शैक्षणिक साहित्याचा वापर करून गणित सोडवणे, संकल्पना स्पष्टीकरण उपक्रम सुरू केले.
- इंग्रजी तयारीसाठी - basic LSWRC skills, LFW-activities, Creative English Programme-Presentation etc.

Bridge Course (पुनराभ्यास वर्ग) :

मागील इयत्तेतील संकल्पना पक्क्या करण्यासाठी तीन आठवड्यांचा जून महिन्यात ब्रिज कोर्स राबवला. शिक्षकांनी उपयुक्त व मार्गदर्शक शैक्षणिक साहित्य तसेच notes तयार केल्या. शिक्षक-अध्यापन जोडीने विशेष दुर्बल विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित केले.

गटशिक्षण व पिअर लर्निंग :


A स्तरातील विद्यार्थी B आणि C स्तरातील विद्यार्थ्यांना शिकवणं – "विद्यार्थी शिकवतो विद्यार्थ्याला" हे तत्व राबवले.

पालक सहभाग :

दर महिन्याला पालकसभा घेऊन अभ्यासाचा आढावा. "पालक सहाध्यापक" उपक्रमाअंतर्गत काही पालकांना वर्गात ज्येष्ठ शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा अभ्यास कसा घ्यावा याबद्दल मार्गदर्शन केले.

इनोव्हेटिव्ह टीचिंग टेक्निक्स :

- चित्रफिती, शिक्षणसंवाद, खेळ, गीतं यांचा वापर करून अध्यापन रंजक केलं.
- शिक्षकांनी स्वतः तयार केलेल्या Audio-Visual साधनांचा, तसेच K-Yan projector,Television अशा डिजिटल साधनांचा उपयोग संकल्पना दृढीकरणासाठी करण्यात आला व सध्या करण्यात येत आहे.



- शिक्षकांसाठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार नाविन्यपूर्ण अध्यापन तंत्रांचे प्रशिक्षण- शिक्षकाने नाविन्यपूर्ण अध्यापन तंत्रांचा वापर करून विद्यार्थ्यांना कृतीयुक्त शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे यासाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले.
- सतत मूल्यमापन व प्रगतीचे विश्लेषण:
- दर १५ दिवसांनी प्रगती चाचण्या,Surprise tests, चर्चा व पुनर्शिक्षण.
- शिक्षकांनी रेकॉर्ड ठेवून विशेष अभ्यास घटकांचे नियोजन तयार करून विद्यार्थ्यांना शिक्षण.
- विज्ञान प्रदर्शन, गणित जत्रा, दिशा,आकृतीबंध,सूर्यमाला, चलन यांसारखे असंख्य प्रात्यक्षिक सादरीकरण.

प्राप्त अडचणी आणि त्यावरील उपाय:

- काही विद्यार्थी शाळेत नियमित येत नव्हते - पालकांशी नियमित संवाद, घरोघरी भेट
- अभ्यासात रुची कमी होती - बक्षीस योजना, रंगीत चित्रे, गोष्टीद्वारे संकल्पना
- शिक्षकांची वेळ कमी - शाळा भरण्यापूर्वी, मधल्या सुट्टीत जबाबदारीने मार्गदर्शन
- पालकांकडून दुर्लक्ष—पालकांशी संवाद वाढवला, मार्गदर्शन शिबिरे घेतली, पालक सभा घेतल्या.

परिणाम — यशाची पावती :

- "आज आमची शाळा बदलली आहे. आता विद्यार्थी वाचतात, लिहितात, विचार करतात!"
- C स्तरातील ८५% विद्यार्थी आता A व B स्तरावर आले आहेत.
- विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली आहे.
- गणित विषयात गुण सरासरी ३५ वरून ७० पर्यंत वाढले.
- शाळेतील शिस्त, वेळेचे पालन आणि सहभागात सकारात्मक बदल झाला.
- पालकांनी आता अभ्यासात लक्ष द्यायला सुरुवात केली आहे.


यशामागील घटक:

श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समिती सदस्य यांचे नियमित प्रेरणा व मार्गदर्शन

- मुख्याध्यापकांचे कुशल नेतृत्व
- शिक्षकांची समर्पित वृत्ती.
- सकारात्मक पालक सहभाग
- विद्यार्थ्यांचा प्रयत्नशील स्वभाव

उदाहरण म्हणून एक विद्यार्थी :

इयत्ता चौथी मध्ये शिकणारा सक्षम गणितात खूप मागे होता. तो अंक ओळखत नव्हता.वर्गातही तो गप्पगप्प असायचा. परंतु 'खेल-खेल में गणित' आणि 'समूह सराव' या उपक्रमामुळे तो आता वर्गात गणिती उदाहरणे सोडवतो. त्याच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास म्हणजे आमच्या यशाचे प्रतीक!



नवीन उद्दिष्टे :


- एकही विद्यार्थी शून्य पातळीवर राहणार नाही त्यासाठी प्रयत्न करणे.
- इयत्ता-समर्पक कौशल्य विकास – म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने त्या इयत्तेतील गरजांनुसार अध्ययन स्तरानुसार, अध्ययनक्षमतानुसार प्रगती करणे.
- सर्जनशीलता व तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे.
- सतत गुणवत्ता चाचण्या व त्यावर कृती.
- क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा तयारी करून घेणे.

निष्कर्ष:-

"गुणवत्ता वाढ अभियान" तसेच विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा तयारी आमच्यासाठी केवळ योजना नव्हती, ती होती आमच्या विद्यार्थ्यांचे भविष्य उजळवण्याची संधी! आज आम्ही सांगू शकतो – आम्ही प्रयत्न केले, अडचणींना सामोरे गेलो आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यशाची हास्यरेषा पाहिली! अशीच हास्यरेषा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आमच्या शाळेच्या प्रयत्नाने सदैव राहू दे व आपल्या देशाचे सुजाण नागरिक घडवण्यात आम्हाला यश लाभो ही श्री सिद्धरामेश्वर चरणी प्रार्थना.

आमच्या शाळेची ही यशोगाथा म्हणजे केवळ आकड्यांची नोंद नाही, तो आहे एक जिवंत अनुभव – शाळा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मिळून शिक्षणाच्या वाटेवर केलेल्या प्रवासाची प्रेरणादायी कहाणी

"घेतला वसा शिक्षणाचा, ध्यास आम्हा गुणवत्ता वाढीचा."



महाराष्ट्र राज्य पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी)



चि. समर्थ अमित आडके

गुण २३०/३००

जिल्हा गुणवत्ता यादीत ८१ वा क्रमांक

मा. मुख्याध्यापिका व मार्गदर्शक

शिक्षिका सौ. विमल पवार व

सौ. अन्नपूर्णा सिडगिद्दी

राज्यस्तरीय ए.टी.एस. प्रज्ञाशोध परीक्षा : सन २०२३-२४

यशस्वी विद्यार्थी











राज्यस्तरीय ए.टी.एस. प्रज्ञाशोध परीक्षा : सन २०२३-२४

यशस्वी विद्यार्थी



6th Standard



7th Standard

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	इयत्ता	प्राविण्य
१	चि. अक्षय चंद्रकांत रंगदळ	३ री	राज्यात ५ वा
२	चि. पोरे स्वयंम समर्थ	३ री	राज्यात ७ वा
३	चि. पटणे अथर्व संतोष	१ ली	जिल्ह्यात ३ रा
४	कु. गामाजी प्रांजल महादेव	२ री	जिल्ह्यात ४ था
५	चि. शिरसी अथर्व योगेश	६ वी	जिल्ह्यात ६ वा
६	कु. मठपती अनुष्का शरणकुमार	१ ली	केंद्रात १ ला
७	कु. कांबळे अक्षरा योगेश	१ ली	केंद्रात २ रा
८	चि. कांबळे अविराज युवराज	१ ली	केंद्रात ३ रा
९	कु. वडगावे सारा विश्वेश्वर	१ ली	केंद्रात ३ रा
१०	कु. चिडगुंपी कामाक्षी विश्वनाथ	१ ली	केंद्रात ५ वा
११	कु. जाधव गौरी नागेश	१ ली	केंद्रात ५ वा
१२	चि. बिराजदार सिद्धार्थ अमोल	१ ली	केंद्रात ५ वा
१३	कु. मुलगे शिवानी चंद्रशेखर	१ ली	केंद्रात ५ वा
१४	कु. राऊत आराध्या अनिल	१ ली	केंद्रात ५ वा
१५	चि. स्वामी सार्थक पंचय्या	१ ली	केंद्रात ५ वा
१६	कु. नुले नंदिनी माणिक	१ ली	केंद्रात ५ वा
१७	चि. गामाजी प्रज्वल महादेव	१ ली	केंद्रात ६ वा
१८	कु. दहिहंडे ईश्वरी गणेश	१ ली	केंद्रात ६ वा
१९	कु. येळमेली नंदिनी आनंदप्पा	१ ली	केंद्रात ६ वा
२०	चि. वागज अद्वैत कपिल	१ ली	केंद्रात ६ वा
२१	चि. बिराजदार उत्कर्ष संजय	१ ली	केंद्रात ७ वा
२२	कु. हिंगमिरे साक्षी विजय	१ ली	केंद्रात ७ वा
२३	कु. होळगी श्रीखिता सिद्धाराम	१ ली	केंद्रात ७ वा
२४	कु. इंगळे गौरी नेताजी	२ री	केंद्रात १ ला

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	इयत्ता	प्राविण्य
२५	कु. जगताप कृतिका महेश	२ री	केंद्रात ३ रा
२६	चि. दहिहंडे अथर्व नागेश	२ री	केंद्रात ५ वा
२७	कु. ढेपे आर्या रविशंकर	२ री	केंद्रात ६ वा
२८	कु. धरणे गौरी विशाल	२ री	केंद्रात ६ वा
२९	कु. फताटे वेदिका नागनाथ	२ री	केंद्रात ६ वा
३०	कु. महामुनी मैथिली मनोज	२ री	केंद्रात ६ वा
३१	कु. तळभंडारे भक्ती भीमज्योत	२ री	केंद्रात ७ वा
३२	कु. बटाणे सिद्धी पद्माकर	२ री	केंद्रात ७ वा
३३	चि. गायकवाड श्लोक सुग्रीव	२ री	केंद्रात ९ वा
३४	चि. व्हटकर वेदांत श्रद्धानंद	२ री	केंद्रात ९ वा
३५	चि. भोसले वेदांत सूर्यकांत	२ री	केंद्रात १० वा
३६	कु. हुक्केरी अंकिता सचिन	२ री	केंद्रात १० वा
३७	कु. अंबारे अर्पिता सचिन	२ री	केंद्रात ११ वा
३८	चि. चिवरे सार्थक सिद्धाराम	२ री	केंद्रात ११ वा
३९	कु. पाटील अन्वी विजय	२ री	केंद्रात ११ वा
४०	कु. होसमनी श्रीदेवी संजय	२ री	केंद्रात १२ वा
४१	चि. चव्हाण श्लोक अमोल	२ री	केंद्रात १३ वा
४२	कु. जाधव मृण्मयी शैलेश	२ री	केंद्रात १३ वा
४३	कु. लिगाडे वैभवी सचिन	२ री	केंद्रात १३ वा
४४	चि. पुराणिक विराज विरपाक्षय्या	२ री	केंद्रात १४ वा
४५	कु. सुतार शुभ्रा संतोष	२ री	केंद्रात १४ वा
४६	कु. बिराजदार समज्ञा गुरुसिद्धप्पा	३ री	केंद्रात १ ला
४७	कु. दोड्डाळे आराध्या सचिन	३ री	केंद्रात २ रा
४८	कु. कोल्हापुरे आर्या अजय	३ री	केंद्रात ४ था

Indian Talent Olympiad 2023-24

यशस्वी विद्यार्थी



Sub. : English

कु. धरणे गौरी विशाल	२ री	Class Topper 1

Second Round : State Topper व ५०० रु. शिष्यवृत्ती

कु. गामाजी प्रांजल महादेव	२ री	Class Topper 1
कु. दोड्डाळे आराध्या सचिन	३ री	Class Topper 1
कु. बिराजदार समज्ञा गुरुसिद्धप्पा	३ री	Class Topper 1
कु. आळसंदे श्रावणी रतिलाल	३ री	Class Topper 1
चि. वाडकर विराज बालाजी	४ थी	Class Topper 1

Sub. : Maths

चि. पोरे स्वयंम समर्थ	३ री	एक्सलन्स मेडल अवॉर्ड
चि. रंगदळ अक्षय चंद्रकांत	३ री	स्टेट टॉपर व १००० रु. शिष्यवृत्ती
चि. आडके समर्थ अमित	५ वी	एक्सलन्स मेडल अवॉर्ड
चि. कंटीकर विभुम शिवराज	१ ली	क्लास टॉपर - १
कु. कांबळे अक्षरा योगेश	१ ली	क्लास टॉपर - २
कु. होनमुर्गीकर रुची रवीकांत	१ ली	क्लास टॉपर - ३
कु. गामाजी प्रांजल महादेव	२ री	क्लास टॉपर - १
कु. कलबुर्गी श्रेया श्रीकांत	२ री	क्लास टॉपर - २
कु. धरणे गौरी विशाल	२ री	क्लास टॉपर - ३
कु. जगताप प्रांजल युवराज	३ री	क्लास टॉपर - २
कु. दोड्डाळे आराध्या सचिन	३ री	क्लास टॉपर - ३
चि. अह्मापूर मनोज भिमाशंकर	४ थी	क्लास टॉपर - १



४

मंथन प्रज्ञाशोध परीक्षा २०२३-२४

यशस्वी विद्यार्थी



कु. इंगळे गौरी नेताजी
कु. ढेपे आर्या रविशंकर
चि. रंगदळ अक्षय चंद्रकांत
कु. बिराजदार समज्ञा गुरुसिद्धप्पा
चि. आडके समर्थ अमित
चि. शिरसी अथर्व योगेश

विज्ञान प्राविण्य परीक्षा
सन : २०२३-२४

चि. अथर्व योगेश शिरसी	६ वी
चि. शैलेंद्र श्रीशैल भोगडे	६ वी
चि. सार्थक शरद माने	६ वी
चि. वेदांत राजेश कव्हेकर	६ वी
चि. सोहम धनंजय सोनवणे	६ वी
चि. श्लोक राहुल काशीद	६ वी
चि. अंशुक लक्ष्मण कांबळे	६ वी
चि. श्रेयस नितीन कोमकर	६ वी
चि. सोहम शिवकुमार शिंदे	६ वी
चि. अथर्व श्रीकांत कोले	६ वी
कु. रुतिका श्रीशैल ढब्बे	६ वी
कु. संस्कृती पंडलिक सोनवणे	६ वी



LFWआयोजित Word Power Championship 2024-25



चि. भिंगे सार्थक लक्ष्मण
राज्यस्तरीय ६ वा क्रमांक

स्व.आ.भा.सोनटक्के गुरुजी स्मारक निधीट्रस्टतर्फे आयोजित जिल्हास्तरीय विविध स्पर्धा

हस्ताक्षर स्पर्धा : विषय मराठी



कु. गिराम नंदिनी सिद्धाराम
६ वी, तृतीय क्रमांक
प्रमाणपत्र - रोख रक्कम रु. २५०/-



कु. कांबळे ऐश्वर्या युवराज
५ वी, चतुर्थ क्रमांक
प्रमाणपत्र - रोख रक्कम रु. २००/-

भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा २०२४-२५



चि. शिंदे मोहित सुशीलकुमार
६ वी, सिल्व्हर मेडल

अबॅकस स्पर्धा परीक्षा २०२४-२५ : इ. १ ली ते ४ थी



विद्यार्थ्याचे नाव	इयत्ता	प्राविण्य प्राप्त
कु. रड्डे आराध्या निलेश	१ ली	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. किणगी स्वरा अनिल	१ ली	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. वळसंगकर श्राव्या महेश	१ ली	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. शेटे वैष्णवी जगदीश	१ ली	ट्रॉफी, मेडल
चि. नांदुरे अथर्व भिमाशंकर	१ ली	ट्रॉफी, मेडल
चि. बिराजदार उत्कर्ष संजय	२ री	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. कांबळे अविराज युवराज	२ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. गामाजी प्रज्वल महादेव	२ री	मेडल, प्रमाणपत्र
कु. कांबळे अक्षरा योगेश	२ री	ट्रॉफी
कु. वडगावे सारा विश्वेश्वर	२ री	ट्रॉफी
कु. म्हमाणे प्रियांशी राहुल	२ री	ट्रॉफी
कु. माने आसावरी युवराज	२ री	ट्रॉफी
कु. जाधव गौरी नागेश	२ री	ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. कलशेट्टी परिणिता विकास	२ री	प्रमाणपत्र
कु. हुळ्ळे संस्कृती प्रशांत	२ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. टेंभुर्णीकर श्रावणी विशाल	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. सिंदगी माहेश्वरी राहुल	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. पाटील अन्वी विजय	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. जगताप कृतिका महेश	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. गडदे पृथ्वीराज राजेश	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. गाडेकर देवांश शिवकुमार	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. सोनवणे किरण बापू	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. बेंडकाळे कार्तिकेय बाळकृष्ण	३ री	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. साळुंके समर्थ आनंद	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. गामाजी प्रांजल महादेव	३ री	रा.मेडल, प्रमाणपत्र
कु. ढेपे आर्या रविशंकर	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र

विद्यार्थ्याचे नाव	इयत्ता	प्राविण्य प्राप्त
चि. च्यारे बसवराज सोमनाथ	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. माळी देवराज अविनाश	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. आसापुरे आराध्या सचिन	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. दोड्डाळे आराध्या सचिन	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. माने श्रावणी धनाजी	४ थी	रा.ट्रॉफी
कु. कस्तुरे स्नेहा प्रविण	४ थी	रा.ट्रॉफी, मेडल
कु. जगताप गायत्री महेश	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. यारगले श्रद्धा संजीव	४ थी	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. म्हमाणे प्रांजली राहुल	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. आडगे समर्थ शिवानंद	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. तेगेळळी मयुरेश बसवराज	४ थी	रा.ट्रॉफी
चि. नेरके प्रणव बसवराज	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. भिंगे सार्थक लक्ष्मण	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. शेटे केदार श्रीशैलप्पा	४ थी	रा.ट्रॉफी, मेडल
चि. भिंगारे शिवसूर्य रामा	४ थी	रा.मेडल, प्रमाणपत्र
चि. नारायणकर आदित्यराज बालू	४ थी	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. नागमोती शौर्य दीपक	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. गुंड कैवल्य संतोष	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. आरबळे अनघालक्ष्मी वैजीनाथ	४ थी	रा.ट्रॉफी
चि. तांबोळी सुफियान अब्दुलअजीज	४ थी	रा.ट्रॉफी
चि. आळसंदे सोहम दगडू	४ थी	रा.ट्रॉफी
कु. डोळ्ळे शिवगंगा गंगाराम	४ थी	रा.ट्रॉफी
कु. आळसंदे श्रावणी रतिलाल	४ थी	रा.ट्रॉफी
कु. ढेपे आरोही रविशंकर	४ थी	रा.ट्रॉफी

अॅबॅकस स्पर्धा परीक्षा : २०२४-२५
इयत्ता ५ वी ते ७ वी
पारितोषिक प्राप्त विद्यार्थी



विद्यार्थ्याचे नाव	इयत्ता	प्राविण्य प्राप्त
चि. भोसले सुशांत प्रदीप	५ वी	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. जाधव वरद नागेश	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. अजुनगी एजाज नजीर	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. नवले नागेश विजयकुमार	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. भुसणगी तन्वी सागर	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. शेखसिंदी हर्षदा सिद्राम	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. कांबळे ऐश्वर्या युवराज	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. साळुंके पंखुडी आनंद	५ वी	रा.ट्रॉफी,मेडल, प्रमाणपत्र
कु. उजळंबे श्रद्धा विवेकानंद	५ वी	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. माने शौर्य अमोल	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. आकळवाडी ओंकार सिद्धाराम	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. बिराजदार पृथ्वीराज सुरेश	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. कोरे अजिंक्य रवी	५ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. कुडल आराध्या अमोल	६ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. ढेकळे सिद्धी विनायक	६ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. डोळ्ळे भाग्या गंगाराम	६ वी	जि.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. पटेल अमन रफीक	६ वी	जि.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. बिराजदार चिन्मय वैजिनाथ	६ वी	जि.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. भूतनाळे मयुरेश सुरेश	६ वी	रा.ट्रॉफी
चि. माळी ब्रह्मनाथ मुकुंद	६ वी	रा.ट्रॉफी
कु. परशेट्टी समिक्षा सोमनाथ	७ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. गडदे हर्षवर्धन राजेश	७ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. नागेली प्रणाल मोतीलाल	७ वी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. ढमामे शिवम आनंद	७ वी	रा.ट्रॉफी
चि. बिराजदार तन्मय वैजिनाथ	७ वी	रा.मेडल, प्रमाणपत्र

चित्रकला अहवाल

मास्टर आर्ट आयोजित
आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धा
सन २०२४-२५



विद्यार्थ्याचे नाव	इयत्ता	प्राविण्य प्राप्त
चि. रेवंत चनबसप्पा फताटे	७ वी	तृतीय क्रमांक
कु. सृष्टी अनंत साठे	५ वी	चतुर्थ क्रमांक
कु. समिक्षा स्वप्निल किणगी	२ री	मॅकस्टार अवॉर्ड
चि. वेद चंद्रशेखर चौगुले	१ ली	मॅकस्टार अवॉर्ड
कु. प्रेरणा राजेश यनगंदुल	३ री	सुवर्णपदक
चि. श्रीपाद विवेकानंद उजळंबे	१ ली	सुवर्णपदक
कु. स्वामिनी पवन बटाणे	६ वी	सुवर्णपदक
कु. श्रीदेवी संजय होसमनी	३ री	रौप्यपदक
चि. श्लोक चंद्रशेखर चौगुले	१ ली	रौप्यपदक
चि. अर्णव अनिल बोमणे	१ ली	रौप्यपदक
कु. मैथीली मनोज महामुनी	३ री	रौप्यपदक
कु. आराध्या शांतकुमार गुड्डेडी	४ थी	रौप्यपदक
चि. विराज चन्नप्पा मसरे	५ वी	रौप्यपदक
कु. वैष्णवी सोमनाथ पांढरे	७ वी	रौप्यपदक
कु. श्रेया नितीन बटाणे	६ वी	रौप्यपदक
चि. सार्थक संजय मंगरुळकर	१ ली	रौप्यपदक
चि. श्रीशैल महेश चाकोते	४ थी	रौप्यपदक
कु. आराध्या गोविंद राठोड	१ ली	रौप्यपदक

अबॅकस स्पर्धा परीक्षा २०२४-२५ : इ. १ ली ते ४ थी



विद्यार्थ्याचे नाव	इयत्ता	प्राविण्य प्राप्त
कु. रड्डे आराध्या निलेश	१ ली	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. किणगी स्वरा अनिल	१ ली	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. वळसंगकर श्राव्या महेश	१ ली	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. शेटे वैष्णवी जगदीश	१ ली	ट्रॉफी, मेडल
चि. नांदुरे अथर्व भिमाशंकर	१ ली	ट्रॉफी, मेडल
चि. बिराजदार उत्कर्ष संजय	२ री	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. कांबळे अविराज युवराज	२ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. गामाजी प्रज्वल महादेव	२ री	मेडल, प्रमाणपत्र
कु. कांबळे अक्षरा योगेश	२ री	ट्रॉफी
कु. वडगावे सारा विश्वेश्वर	२ री	ट्रॉफी
कु. म्हमाणे प्रियांशी राहुल	२ री	ट्रॉफी
कु. माने आसावरी युवराज	२ री	ट्रॉफी
कु. जाधव गौरी नागेश	२ री	ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. कलशेट्टी परिणिता विकास	२ री	प्रमाणपत्र
कु. हुळ्ळे संस्कृती प्रशांत	२ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. टेंभुर्णीकर श्रावणी विशाल	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. सिंदगी माहेश्वरी राहुल	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. पाटील अन्वी विजय	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. जगताप कृतिका महेश	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. गडदे पृथ्वीराज राजेश	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. गाडेकर देवांश शिवकुमार	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. सोनवणे किरण बापू	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. बेंडकाळे कार्तिकेय बाळकृष्ण	३ री	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. साळुंके समर्थ आनंद	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. गामाजी प्रांजल महादेव	३ री	रा.मेडल, प्रमाणपत्र
कु. ढेपे आर्या रविशंकर	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र

विद्यार्थ्याचे नाव	इयत्ता	प्राविण्य प्राप्त
चि. च्यारे बसवराज सोमनाथ	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. माळी देवराज अविनाश	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. आसापुरे आराध्या सचिन	३ री	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. दोड्डाळे आराध्या सचिन	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. माने श्रावणी धनाजी	४ थी	रा.ट्रॉफी
कु. कस्तुरे स्नेहा प्रविण	४ थी	रा.ट्रॉफी, मेडल
कु. जगताप गायत्री महेश	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. यारगले श्रद्धा संजीव	४ थी	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
कु. म्हमाणे प्रांजली राहुल	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. आडगे समर्थ शिवानंद	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. तेगेळ्ळी मयुरेश बसवराज	४ थी	रा.ट्रॉफी
चि. नेरके प्रणव बसवराज	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. भिंगे सार्थक लक्ष्मण	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. शेटे केदार श्रीशैलप्पा	४ थी	रा.ट्रॉफी, मेडल
चि. भिंगारे शिवसूर्य रामा	४ थी	रा.मेडल, प्रमाणपत्र
चि. नारायणकर आदित्यराज बालू	४ थी	रा.ट्रॉफी मेडल, प्रमाणपत्र
चि. नागमोती शौर्य दीपक	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
चि. गुंड कैवल्य संतोष	४ थी	रा.ट्रॉफी, प्रमाणपत्र
कु. आरबळे अनघालक्ष्मी वैजीनाथ	४ थी	रा.ट्रॉफी
चि. तांबोळी सुफियान अब्दुलअजीज	४ थी	रा.ट्रॉफी
चि. आळसंदे सोहम दगडू	४ थी	रा.ट्रॉफी
कु. डोळ्ळे शिवगंगा गंगाराम	४ थी	रा.ट्रॉफी
कु. आळसंदे श्रावणी रतिलाल	४ थी	रा.ट्रॉफी
कु. ढेपे आरोही रविशंकर	४ थी	रा.ट्रॉफी

शैक्षणिक सहल





इयत्ता १ ली ते ७ वीची शैक्षणिक सहल आर्या रिट्रीट, मोहोळ येथे गेली होती. सहलीत सहभागी विद्यार्थी मा. मुख्याध्यापिका व शिक्षक.

शाळेतील कब बुलबुल व स्काऊट गाईड पथक : २०२४-२५



शाळेतील कब बुलबुल पथकासमवेत शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती गीता चिकमनी मॅडम, गाईड कॅप्टन सौ. रेणुका वाघमोडे व फ्लॉक लीडर सौ. सरस्वती बताले मॅडम.



शाळेतील स्काऊट गाईड पथकासमवेत शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती गीता चिकमनी मॅडम, गाईड कॅप्टन सौ. रेणुका वाघमोडे व फ्लॉक लीडर सौ. सरस्वती बताले मॅडम.

विज्ञान प्राविण्य परीक्षा
सन : २०२३-२४

चि. अथर्व योगेश शिरसी	६ वी
चि. शैलेंद्र श्रीशैल भोगडे	६ वी
चि. सार्थक शरद माने	६ वी
चि. वेदांत राजेश कव्हेकर	६ वी
चि. सोहम धनंजय सोनवणे	६ वी
चि. श्लोक राहुल काशीद	६ वी
चि. अंशुक लक्ष्मण कांबळे	६ वी
चि. श्रेयस नितीन कोमकर	६ वी
चि. सोहम शिवकुमार शिंदे	६ वी
चि. अथर्व श्रीकांत कोले	६ वी
कु. रुतिका श्रीशैल ढब्बे	६ वी
कु. संस्कृती पंडलिक सोनवणे	६ वी



❖ वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ सन २०२५-२५ ❖



वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ सन २०२४-२५.

दीपप्रज्वलन करताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शाळेचे माजी विद्यार्थी मा.डॉ.श्री. विकास लोणीकर सर, श्री सिध्देश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य तथा शाळेचे पालक सदस्य मा.श्री. गुरुराज माळगे सर, तसेच श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे विश्वस्थ मा.श्री. रेवणसिद्ध पाटील सर, मा.श्री. काशिनाथ ढोले सर, श्री सिध्देश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य मा.डॉ.श्री. सुरेशकुमार टी. सर, शाळेच्या मा. मुख्याध्यापिका श्रीमती गीता चिकमनी मॅडम, पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्री. भिमाशंकर कोनाळी सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. श्वेता शिंदे व सौ. शिल्पा भैरप्पा.

स्वातंत्र्यदिन समारंभ



स्वातंत्र्य दिन समारोहाप्रसंगी ध्वजारोहण करताना मान्यवर.

शालेय गणवेश वाटप



प्रमुख अतिथी निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त मा.श्री. दीपक आर्वे व श्री सिध्देश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य व शाळेचे पालक सदस्य मा.श्री. गुरुराज माळगे सर यांच्या हस्ते पालक-शिक्षक संघाकडून गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना गणवेश वाटप.



पहिला दिवस : शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण व पुष्पवृष्टी करुन आणि गुलाबपुष्प देऊन स्वागत तसेच समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण.



नागपंचमी : नागपंचमी सण साजरा करताना मा. मुख्याध्यापिका, शिक्षिका, बालचमू.



आषाढी एकादशी : विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात आषाढी एकादशी साजरी करताना शाळेचे वारकरी, विद्यार्थी, मा. मुख्याध्यापिका, शिक्षिक, बालचमू.



रक्षाबंधन : रक्षाबंधन सण साजरा करताना विद्यार्थी व विद्यार्थिनी.



जन्माष्टमी : श्री कृष्ण जन्माष्टमी तसेच बाळकृष्णाच्या हातून 'दहिहंडी' फोडून गोकूळाष्टमी साजरी करताना विद्यार्थी, मा. मुख्याध्यापिका, शिक्षिका.



भोंडला : भोंडला सण साजरा करताना देवीची नऊ रुपे साकारलेल्या विद्यार्थिनी, प्रमुख अतिथी, मा. मुख्याध्यापिका, शिक्षिका व बालचमू तसेच सांस्कृतिक अस्मिता जपणाऱ्या बतुकम्माचे सादरीकरण.

शाळेतील उल्लेखनीय उपक्रम







'विस्मय' या राष्ट्रीय विज्ञान, भूगोल दिन व कला. कार्यानुभव प्रदर्शनाप्रसंगी भूगोल अभ्यासिकेचे उद्घाटन करताना व प्रयोगांची पाहणी करताना प्रमुख पाहुणे श्रीमती प्रियांका आराध्ये मॅडम, परीक्षक सौ. सुनीता वाले मॅडम, श्री. रवींद्र कबाडे सर, मा. मुख्याध्यापिका व सहभागी विद्यार्थी.



मराठी दिन : मराठी राजभाषा दिनानिमित्त महाराष्ट्रातील थोर व्यक्ती, संत, गावगाडा, भारुड इ. वेशभूषा व सादरीकरण करताना विद्यार्थी. प्रमुख अतिथी श्रीमती महानंदा कुंभार आदी.



बाल दिन : बालदिनानिमित्त विद्यार्थ्यांचे आनंद द्विगुणित करताना मिमिक्री आर्टिस्ट माजी विद्यार्थी चि. सागर राठोड, याप्रसंगी मा. मुख्याध्यापिका, शिक्षक व विद्यार्थी.



हिंदी दिन : प्रमुख अतिथी सौ. रामपुरे मॅडम, मा. मुख्याध्यापिका आणि विद्यार्थी.



शिक्षक दिन : शिक्षक दिन व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाप्रसंगी प्रमुख अतिथी श्री. श्रीरंग क्षीरसागर सर, मा. मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकवृंद.

समाज प्रबोधनात्मक उपक्रम



आषाढ मास : आषाढ मासानिमित्त ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, साक्षरता रॅली इत्यादी उपक्रमातून जनजागृती.



वृक्षारोपण : एक मूल - एक झाड अंतर्गत वृक्षारोपण करताना विद्यार्थी, पालक, मा. मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद



योग दिन : शरीर आणि मन स्वस्थ राहण्यासाठी योगाचे महत्व पटवून योगदिन उत्साहात साजरा करताना प्रशिक्षक, मा. मुख्याध्यापिका, शिक्षिका व विद्यार्थी.



अंधश्रद्धा निर्मुलन : अंधश्रद्धा निर्मुलन या विषयावर प्रयोग सादर करताना विद्यार्थी. याप्रसंगी मा. मुख्याध्यापिका व प्रमुख अतिथी.



समुदाय सहभाग दिवस : शिक्षण सप्ताहांतर्गत विद्यांजली पोर्टल मार्गदर्शन प्रसंगी मा.मुख्याध्यापिका, सर्व शिक्षकवृंद व माजी विद्यार्थी.



समुपदेशन : किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत समुपदेशन करताना सौ. ममता तालकोकूल मॅडम.



कायदेविषयक मार्गदर्शन : विधी साक्षरता शिबिरांतर्गत मुलींसाठी कायदेविषयक मार्गदर्शन करताना मा. देवयानी किणगी मा.ॲड.श्री. विनायक कुर्ले, मा. ॲड.सौ. नम्रता खरात मॅडम.



बालिका दिन : आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना न्यायाधीश मा.श्री.उमेश देवर्षी, वकील मा.देवयानी किणगी मॅडम.

विविध उल्लेखनीय उपक्रम





क्रीडा सप्ताह उद्घाटन

क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करताना प्रमुख पाहुणे राष्ट्रीय पंच श्री. भीमराव बाळगे सर, सर्व मान्यवर, मा. मुख्याध्यापिका, शिक्षक व विद्यार्थी.

माजी विद्यार्थी मेळावा



आपलं गेट टुगेदर

मेळाव्यात सहभागी इ. ४ थी – सन १९९९ ची बॅच माजी विद्यार्थ्यांकडून शाळेस प्रोजेक्टर स्क्रिन भेट. याप्रसंगी शाळेच्या मा. मुख्याध्यापिका, माजी शिक्षिका व माजी विद्यार्थी



गेट टुगेदर

माजी विद्यार्थी मेळाव्यात सहभागी इ. १० वी – सन २००९ ची बॅच. याप्रसंगी शाळेच्या मा. मुख्याध्यापिका.



बुद्धीमंथन
'बुद्धीमंथन' या विषयावर
प्रशिक्षण देताना
दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे
प्राचार्य मा.श्री. श्रीरंग क्षीरसागर सर.



तिळगुळ व
हळदी कुंकू समारंभ
'बालमानसशास्त्र व पालकांची
भूमिका' या विषयावर माहिती
देताना व्याख्यात्या
सौ. सारिका गिडवीर मॅडम.





महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे येथे भेट. संचालक कृष्णकुमार पाटील यांच्यासमवेत मा. मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद.



महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, ई-बालभारती, पुणे मा. मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद भेट.

समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम

वृक्षारोपण



सिध्देश्वर साखर कारखाना परिसरात वृक्षारोपण करताना विद्यार्थी.

प्लास्टिकमुक्त परिसर



पॉलिथिन पिशव्यांपासून पर्यावरणपूरक इको ब्रिक्स तयार करणारे विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे मा. मुख्याध्यापिका व शिक्षक.

बाललैंगिक शोषण - कार्यशाळा



कॅक्टस् फांऊडेशन यांच्या वतीने माता पालकांसाठी बाललैंगिक शोषण याविषयी कार्यशाळा घेताना सौ. नुसरत खान मॅडम व मा.मुख्याध्यापिका.

एक प्रण अन्नदानाचा



रक्षाबंधनाचे औचित्य साधून 'एक प्रण अन्नदानाचा' या उपक्रमा-अंतर्गत अनाथाश्रम व अन्नछत्रास तांदूळ व मुगडाळीचे वाटप करण्यात आले.

Shri Siddheshwar Devasthan Sanchalit


Duty is Deity

Shri Siddheshwar Bal Mandir
Prathmik Shala, Solapur

Shri Siddheshwar Devasthan Quality Improvement Programme Presents

Siddheshwar Creative English Programme
&
Siddheshwar Millets Festival

2022-23



सिध्देश्वर शाळेने अनेक हिरे निर्माण केले

धर्मराज काडादी यांचे गौरवोद्‌गार; 'श्री सिध्देश्वर'चा वार्षिक सोहळा उत्साहात

मंचार प्रतिनिधी

▶ सोलापूर, दि. २६-

गेल्या साठ वर्षांत सिध्देश्वर शाळेने अनेक हिरे निर्माण केले असून यापुढील काळातही शाळेतून चांगले विद्यार्थी घडतील, असा विश्वास श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी व्यक्त केला.





मंगळवारी, श्री सिध्देश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ हुतात्मा स्मृती मंदिर येथे पार पडला, त्या कार्यक्रमात काडादी बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांचे प्रतिमा पूजन व शाळेचे संस्थापक कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. हीरकमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांची चित्रफीत दाखवली.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. ऋषीकेश लोणीकर उपस्थित होते. श्री सिध्देश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य तसेच श्री सिध्देश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळेचे पालक सदस्य गुरुराज माळगे, श्री सिध्देश्वर देवस्थान शिक्षण समिती सदस्य तथा श्री सिध्देश्वर देवस्थान गुणवत्तावाढ अभियान समितीचे चेअरमन प्रा. डॉ. राजशेखर येळीकर आदी उपस्थित होते.

शाळेच्या विविध परीक्षांमध्ये यशस्वीत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. शाळेच्या बालचमूंनी श्रीकृष्ण लीलांचे उत्कृष्ट सादरीकरण करून श्रीकृष्णाच्या जीवनपटावर आधारित नंदकिशोर, गोविंद बोलो, कान्हा सो जा जरा, गवळण, ओ किसना है, रास रचे, महाभारत, आरंभ है प्रचंड अशा बहारदार नृत्यांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. लोणीकर यांनी आपले शाळेतील अनुभव, आठवणी पालकांसमोर मांडल्या तसेच पालकांनी मुलांना मोबाइलच्या वापरापासून दूर ठेवण्याचा संदेश दिला. त्यांनी सर्व शिक्षकांविषयी ऋण व्यक्त केले.

श्री सिध्देश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळेचे पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्रध्दानंद व्हटकर, श्री सिध्देश्वर शिक्षण संकुलातील सर्व मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, प्राचार्य, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. माधुरी थोंटे व प्रतिभा म्हमाणे यांनी पीपीटीच्या माध्यमातून शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका गीता चिकमनी यांनी तर पाहुण्यांचा परिचय विमल पवार यांनी करून दिला. सूत्रसंचालन सरस्वती बताले यांनी केले तर आभार शशिकला नंदगावकर यांनी मानले.

मुलांसाठी मोबाईलपेक्षा शिक्षकांचीच गरज

डॉ. लोणीकर; श्री सिद्धेश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन संपन्न

▶ सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. २६ : पालकांनी मोबाईलच्या वापरापासून मुलांना दूर ठेवावे. प्रत्येकाला आयुष्याची योग्य वाट शिक्षकच दाखविता. प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या मागे शिक्षकांचे मोलाचे योगदान असते. त्यामुळे मुलांना मोबाईलची सवय नकोच, असे डॉ. ऋषिकेश राजेंद्र लोणीकर यांनी यावेळी सांगितले.



सोलापूर : श्री सिद्धेश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. ऋषिकेश लोणीकर, धर्मराज काडादी, गीता चिकमनी व अन्य.

श्री सिद्धेश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळेचे आज (मंगळवारी) वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ हुतात्मा स्मृती मंदिर येथे पार पडले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. लोणीकर उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे व देवस्थान शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी होते. श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य गुरुराज माळगे, अभियान समितीचे चेअरमन प्रा. डॉ. राजशेखर येळीकर, शाळेच्या मुख्याध्यापिका गीता चिकमनी यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. माजी मुख्याध्यापिकामहादेवी कुंभार, वैशाली कटाप, माजी सहशिक्षिका सौ. मल्लाडे, सौ. डक्का, सौ. गडमिरे, सौ. अजगुंडे यांच्यासह श्री सिद्धेश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळेचे पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्रद्धानंद व्हटकर आदी उपस्थित होते. माधुरी थोंटे, प्रतिभा म्हमाणे यांनी 'पीपीटी'द्वारे शाळेतील बालचमूंनी श्रीकृष्णलिलांचे उत्कृष्ट सादरीकरण करून श्रीकृष्णाच्या जीवनपटावर आधारित नंदकिशोरा, गोविंद बोलो, कान्हा सो जा जरा, गवळण, ओ किसना है, रास रचे, महाभारत, आरंभ है प्रचंड अशा बहारदार नृत्यांचे सादरीकरण करूनकलाविष्कार सादर केला. सूत्रसंचालन सरस्वती बताले यांनी तर प्रास्ताविक सौ. चिकमनी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय विमल पवार यांनी करून दिला व आभार शशिकला

Shri Siddheshwar Bal Mandir Prathamik Shala, Solapur

CREATIVE ENGLISH PROGRAMME 2024-25

LEARNING WITH FUN (TOYS AND GAMES)

Chief Guest
Hon.Mrs. Sangita Gote
Headmistress - Shri Siddheshwar Girls' High School


President
Hon. Geeta Chikmani
Headmistress - Shri Siddheshwar Bal Mandir Prathamik Shala

Examiner
Mr. Kashinath Akashe
Shri Siddheshwar High School

Examiner
Mr. Krushna Upadhye
Shri Siddheshwar Bal Mandir Madhyamik Shala


PROGRAMME OUTLINE

- Welcome
- Inauguration
- Lamp Lightning
- Examination of Toys and Games
- Introductory Speech
- Honor of Guests
- Declaration of Results
- Guidence of Chief Guests
- presidential Speech
- Vote of Thanks






WORD FORMATION
Name - Gauri Nitin Mali
Std - 2 Div - B


मा. पंतप्रधान
मा. उप मुख्यमंत्री
मा. उप मुख्यमंत्री
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र शासन
School Education and Sports Department
Government of Maharashtra
#SwachhtaMonitor
२०२३ - महिला टप्पा गौरव सोहळा
The Youth Shout
Let's Change
#स्वच्छतामॉनिटर
२०२३ - दुसरा टप्पा - अनावरण


Galaxy F22






AI QUAD CAMERA
Shot on realme 5



----------**----------

"विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता वाढविण्यासाठी मुख्याध्यापकांनी केलेले प्रयत्न"

शाळेचे नाव - इंडिअन एज्युकेशन सोसायटी,हर्णे गुरुजी विद्यालय.
शाळेचा पत्ता - सरकारी वसाहत,वांद्रे (पूर्व) मुंबई.
शाळेचा ईमेल आयडी - ic.hgv.primary.marathi@ies.edu
मुख्याध्यापक नाव - श्रीमती शिल्पा अनिल अष्टमकर
मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 8308703564
मुख्याध्यापक ईमेल आयडी - shilpaashtamkar@gmail.com

प्रस्तावना -

शाळेची स्थापना १९६४ साली झाली.आजपर्यंत वांद्रे परिसरात डौलाने उभी असलेली मराठी माध्यमाची शाळा म्हणून नावलौकिक आहे. शाळेचे शैक्षणिक व सामाजिक वातावरण— सकारात्मक व स्वागतार्ह वातावरण आहे.विद्यार्थ्यांना शाळेत आल्यावर आत्मीयता वाटावी, असे उबदार व प्रोत्साहनात्मक वातावरण आहे.

गुणवत्तापूर्ण अध्यापन -

शिकवणं हे केवळ अभ्यासक्रमापुरतं न ठेवता जीवनमूल्यांवर आधारित व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आहे.

शिक्षकांचे मार्गदर्शन -


शिक्षक विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, प्रेरणास्थान व विश्वासू सल्लागार आहेत.

समान संधी व समावेश -

प्रत्येक विद्यार्थ्याला जाती, धर्म, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारे भेद न करता समान संधी मिळून देण्यासाठी प्रयत्नशील असते.

शिस्त व मूल्याधिष्ठित संस्कार -

शाळेच्या वातावरणात शिस्तीबरोबरच प्रामाणिकपणा, सहकार्य, जबाबदारी आणि सहिष्णुता या मूल्यांचा समावेश असण्याकडे कल असतो.



पालक व समाज यांची सहभागिता -

शाळा म्हणजे समाजाचा एक भाग. पालक, स्थानिक संस्था, माजी विद्यार्थी यांचा सकारात्मक सहभाग सतत घेऊन उपक्रम केले जातात.

स्वच्छता, सुरक्षितता आणि सुविधा -

शाळेचे परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि विद्यार्थी-मैत्रीपूर्ण आहे.. मुलांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा पुरेशा खात्रीने आहेत.

शाळेचं आदर्श वातावरण म्हणजे शिक्षण, संस्कार आणि सहविचार यांचा समतोल संगम असतो. असे वातावरण विद्यार्थ्यांना नुसतेच यशस्वी नागरिक नव्हे तर चांगले माणूस बनवते.

मुख्याध्यापकांचे नेतृत्व -

मुख्याध्यापकांची दृष्टिकोन, भूमिका व प्रेरणा

मुख्याध्यापक हा शाळेचा शिल्पकार असतो. त्यांचा दृष्टिकोन म्हणजे —शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास,गुणवत्तापूर्ण शिक्षण व मूल्याधिष्ठित संस्कार,शिक्षकांचा सकारात्मक विकास,शाळेला उत्कृष्टतेच्या दिशेने नेणे.

भूमिका (Role) -

शैक्षणिक नेतृत्त्व – शिक्षकांचे मार्गदर्शन, अध्यापन पद्धतींचे निरीक्षण व सुधारणा.

प्रशासनिक जबाबदारी – वेळापत्रक, उपस्थिती, नियोजन, शिस्त यांची अंमलबजावणी.

समन्वय साधणे – पालक, शिक्षक, विद्यार्थी, संस्था व समाज यांच्यात पूल बांधणे.

नवोपक्रम राबविणे – नव्या संकल्पना प्रभावीपणे शाळेत अंमलात आणणे.

प्रेरणा (Inspiration) -

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण उलगडणे हेच मुख्य प्रेरणास्थान.

गुणवत्तेची उंची गाठण्याचा सातत्यानं प्रयत्न.

"विद्यार्थी हीच खरी शाळेची ओळख" ही भावना.


मुख्याध्यापकांनी राबवलेले काही नवोपक्रम (Innovative Practices) -

बुद्धिमत्ता विकास उपक्रम – चित्रकला, हस्तकला, सृजनात्मक लेखन स्पर्धा.

वाचन चळवळ – 'एक पुस्तक, एक आठवडा' उपक्रम, वाचन कट्टा.

शालेय प्रगती मापन – नियमित गुणमापनाच्या पलीकडे जाऊन तोंडी अभिप्राय, मुल्यांकन चर्चा.

विद्यार्थी परिषद/बाल संसद – नेतृत्वगुण विकासासाठी.



पर्यावरण जनजागृती – वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त शाळा, सायकल टू स्कूल अभियान.
आत्मचिंतन सत्र – विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी 'मूल्यशिक्षण संवाद'.
पालक समुपदेशन बैठक – केवळ निकालापुरत्या नव्हे तर समन्वय वाढवण्यासाठी.
तंत्रज्ञानाचा वापर – डिजिटल लेसन प्लॅन्स, ई-कंटेंट, स्मार्ट क्लास.
पालकांसाठी स्पर्धा आयोजन

मुख्याध्यापक म्हणजे शाळेच्या प्रगतीचा कणा. त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन, कार्यशीलता आणि नवोपक्रमशील वृत्तीमुळे शाळा ही केवळ शिकवण्याचे ठिकाण न राहता जीवन शिकण्याची प्रयोगशाळा बनते.

मूलभूत क्षमतांचा विकास (Foundational Skills) -
भाषा (वाचन, लेखन, संभाषण)
गणित (गणन, आकडेमोड, संकल्पना समज)
विज्ञान, संगणक किंवा इतर उपयुक्त कौशल्य


उपक्रम आणि योजना -
'वाचन कट्टा', 'गणित मेला', भाषिक प्रयोगशाळा
नियमित मूल्यमापन, remedial classes
शिक्षकांसाठी प्रशिक्षण

पालक सहभाग
मूल्यांकन आणि यशस्वी परिणाम - विद्यार्थ्यांच्या प्रगतीतील बदल

अडचणी व त्या पार करण्याचे उपाय
विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकासासाठी मुख्याध्यापकांचे प्रयत्न – हर्णे गुरुजी विद्यालयाचा अनुभव

"जिथे जिद्द आहे, तिथे यश अटळ आहे!"

मुंबईतील वांद्रे पूर्व येथे वसलेले हर्णे गुरुजी विद्यालय ही 100% शासकीय अनुदानित मराठी शाळा असून, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या दिशेने अनेक स्तुत्य उपक्रम येथे राबवले जातात.



मुख्याध्यापिका सौ. शिल्पा अष्टमकर मॅडम यांचे नेतृत्व ही शाळेची खरी ताकद आहे. त्यांनी विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन आणि गणन क्षमता वाढविण्यासाठी योजनाबद्ध आणि नवोन्मेषी उपक्रम सुरू केले.

भाषा कौशल्यासाठीचे उपक्रम -
दररोज १५ मिनिटांचा "वाचन कट्टा"
"स्वच्छ हस्ताक्षर मोहीम" आणि शब्दसंग्रह स्पर्धा
मुलांना संवादात्मक गोष्टी सांगायला प्रोत्साहन

गणिती क्षमतेसाठी प्रयत्न -
गणित खेळणी वापरून शिकवणी
"एक मूल-एक सखा" अशा तंत्राने कमजोर मुलांना आधार
गणित दिवस, आकृती सादरीकरण इ.


तंत्रज्ञानाचा वापर -
डिजिटल पाठ, PPT, व्हिडीओद्वारे शिकवणी
शिक्षकांसाठी फाउंडेशन लिटरेसी व न्यूमरेसी प्रशिक्षण

अंतर्गत मूल्यमापन व पालक सहभाग -
मासिक मूल्यमापन फॉर्म.पालक-शिक्षक संवाद मेळावे.
विद्यार्थ्यांच्या घरातील अभ्यास वातावरणावर लक्ष.

या सगळ्या प्रयत्नांमुळे इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनगतीत वाढ, गणन अचूकतेत सुधारणा झाली आहे. अनेक पालकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. आज शाळेतील प्रत्येक विद्यार्थी आत्मविश्वासाने शिकतो आहे — हे यश मुख्याध्यापकांच्या दूरदृष्टी व समर्पित प्रयत्नांचे फळ आहे.

"मूलभूत क्षमता म्हणजे शिक्षणाची पायरी — ती मजबूत झाली, तर यशाच्या शिखरापर्यंत पोहोचता येते."

मुख्याध्यापक व इतर सहकारी यांनी शाळेत घडविलेले सकारात्मक परिवर्तन
"प्रेरणा मिळाली की बदल घडतो, आणि एकत्र प्रयत्न झाले की बदल टिकतो."
हर्णे गुरुजी विद्यालय, वांद्रे पूर्व ही शाळा शासकीय अनुदानित असली तरी तिच्या यशामागे असलेली खरी प्रेरणा म्हणजे शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवर्गाचे एकजूट आणि सकारात्मक दृष्टिकोन.



प्रेरणादायी नेतृत्वाची ताकद -

मुख्याध्यापिका सौ. शिल्पा अष्टमकर मॅडम यांनी शाळेत आल्यानंतर सर्वप्रथम शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यात विश्वासाचे बंध मजबूत केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेच्या कार्यपद्धतीत शिस्त, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेचा पाय रोवला गेला.

शिक्षकांचा सक्रिय सहभाग -

शाळेतील सर्व शिक्षकांनी विषय ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेतला.
विशेष शिक्षक बैठकांमध्ये कार्ययोजना आखणे.
सहशिक्षक सहकार्य : एकमेकांना अध्यापन सुधारण्यासाठी मार्गदर्शन
Remedial classes घेऊन मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढे आणणे

शाळेचा शैक्षणिक व भौतिक बदल

स्मार्ट टीव्ही व प्रोजेक्टरसह डिजिटल शिक्षण सुरू
वर्गखोल्यांचे सौंदर्यीकरण – विद्यार्थी सर्जनशीलतेने सजवलेले वर्ग
लायब्ररी व वाचन कट्ट्याचा उपक्रम
शाळा परीसर स्वच्छ व स्वागतार्ह

विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमतांत सुधारणा


वाचन, लेखन व गणितातील मूलभूत क्षमतांचा विकास
मासिक मूल्यांकन व त्यांच्या आधारे सुधारणा योजना
संकोच दूर करण्यासाठी वक्तृत्व, अभिनय व इतर क्रिया

पालक व समाज यांचा सहभाग

पालक-शिक्षक संवाद मेळावे
परिसरातील संस्थांचा सहकार्याने विविध उपक्रम
पालकांच्या उपस्थितीत विद्यार्थी गौरव समारंभ

परिणाम आणि बदलाचा ठसा

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि शाळेप्रती अभिमान वाढला.उपस्थिति दर 95% वर पोहचला.परीक्षाफळात आणि शिष्यवृत्त्यांमध्ये वाढ
शाळा म्हणजे केवळ इमारत नव्हे, तर एक संस्कारांची प्रयोगशाळा असते.
मुख्याध्यापकांचे दूरदर्शी नेतृत्व, शिक्षकांचे समर्पण व एकत्रित प्रयत्न यामुळे शाळेने बदलाची दिशा घेतली.



हा बदल म्हणजे केवळ आकड्यांचा नव्हे, तर विचार, मूल्ये आणि संस्कारांचा विजय आहे.
"परिवर्तन हे नेतृत्व आणि सहकार्याच्या संगमातूनच शक्य होते."

शाळेत व विद्यार्थ्यांत झालेले सकारात्मक परिवर्तन
शाळेतील सकारात्मक बदल:
शिस्तबद्ध व स्वच्छ परिसर
शाळा परिसर स्वच्छ, नीटनेटका आणि आकर्षक बनवण्यात आला.विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, वेळेचे पालन आणि स्वच्छतेची सवय निर्माण झाली.

डिजिटल शिक्षण प्रणाली
प्रोजेक्टर यांचा वापर सुरू झाला.ऑडिओ-व्हिज्युअल पद्धतीमुळे शिकण्याची गोडी व समज वाढली.


नवीन उपक्रमांची अंमलबजावणी
वाचन कट्टा, गणित मेला, विज्ञान खेळ, हस्तकला प्रदर्शन
साप्ताहिक सभा, विविध सणांचे सामूहिक आयोजन

पालकांचा सहभाग
पालक-शिक्षक संघटनामार्फत सहभाग वाढला.सामाजिक भान निर्माण करणारे उपक्रम (जसे वृक्षारोपण, स्वच्छता मोहिम)

विद्यार्थ्यांमध्ये झालेले सकारात्मक परिवर्तन:
अभ्यासात सुधारणा
नियमित remedial teaching व मूल्यमापनामुळे वाचन, लेखन, गणन यात सुधारणा.अभ्यासात रस, शंका विचारण्याची तयारी.आत्मविश्वास वाढला.

आत्मविश्वास व संवाद कौशल्य वाढले
वक्तृत्व, अभिनय, कथा सांगणे यामुळे भीती कमी झाली.सभागृहात मोकळेपणाने संवाद साधू लागले

स्वावलंबन व जबाबदारीची जाणीव
वेळेवर येणे, गृहपाठ पूर्ण करणे, शाळेच्या स्वच्छतेत सहभाग,शाळा हे आपले घर आहे, ही भावना निर्माण झाली.



क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात सहभाग वाढला

खेळात जिल्हास्तरावर पोहोचलेलेव यशस्वी विद्यार्थी.नृत्य, गायन, रांगोळी, चित्रकला स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग

शिस्त आणि नैतिक मूल्यांची वृद्धी

नम्रपणा, सहकार्य, संयम, सत्य बोलणे यांचे संस्कार दृढ झाले.सहकाऱ्यांना मदत करणे व टीमवर्क

निष्कर्ष -

शाळा म्हणजे केवळ अभ्यासाचे ठिकाण नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आहे. मुख्याध्यापकांचे नेतृत्व, शिक्षकांचे समर्पण, पालकांचा सहभाग आणि विद्यार्थ्यांचा प्रतिसाद यामुळे शाळेचा चेहराच बदलला आहे. **इंडियन एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या अंतर्गत चालणारी आमची शाळा हर्णे गुरुजी विद्यालय ही गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कटिबद्ध आहे. शाळेची स्थापना सन १९६४ साली झाली. वांद्रे परिसरातील एक नामांकित शाळा म्हणून शाळेचा लौकिक आहे.**

बाहेरच्या वातावरणाचा परिणाम जसा कुटुंबावर ,घरावर होतो.त्याप्रमाणे गेल्या काही वर्षात पालकांचा आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमात प्रवेश घेण्याच्या विचारसरणीचा परिणाम आमच्या शाळेवरही झाला. हळूहळू विद्यार्थी संख्या कमी झाली.

२०१९ साली फक्त ४ वर्ग प्रत्येक इयत्तेचा १ प्रमाणे ९० विद्यार्थी संख्या झाली. प्रारंभी अनेक अडचणी असूनही आम्ही आमच्या सहकाऱ्यांच्या मदतीने अथक परिश्रम घेतले. विविध उपक्रम, गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या कृती आणि पालकांशी सातत्यानं संवाद या सगळ्यामुळे शाळेचा स्तर उंचावला.

प्रत्येक शाळेचा प्रवास हा एक स्वप्नपूर्तीचा प्रवास असतो.. अडथळे आणि आव्हानं असूनही आम्ही थांबलो नाही.अपुऱ्या सोयीसुविधा आणि वाट पाहणं — हेच वास्तव होतं. पण मेहनत आणि चिकाटीला पर्याय नसतो.

याच वर्षी बृ.मुं.म .न. पा. तर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता मानांकन श्रेणी 2020 अंतर्गत स्वच्छ महापालिका शाळा या श्रेणीमध्ये आमच्या IES हरणे गुरुजी विद्यालयाला प्रथम क्रमांक मिळाला .(माझी शाळा ,स्वच्छ शाळा)

शाळेच्या प्रत्येक भिंतीत आमच्या मेहनतीची आणि निष्ठेची नोंद आहे. एक-एक उपक्रम, एक-एक विद्यार्थी यांच्यावर प्रेमाने काम करत आज आम्ही २१० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलो आहोत.

शाळा म्हणजे केवळ इमारत नव्हे, ती एक संस्कारशाळा असते. आमचा प्रत्येक विद्यार्थी ही आमची ओळख आहे आणि हे यश म्हणजे एकत्र प्रयत्न, सहकार्य व समर्पणाचं फलित आहे.





IES हर्णे गुरुजी विद्यालय ही एक गुणवत्ता आधारित मराठी माध्यमाची शाळा आहे. मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांच्या एकत्रित प्रयत्नातून आज शाळेत २१० विद्यार्थ्यांचा भरवसा मिळवता आला आहे.

विविध उपक्रम, अभ्यास, स्पर्धा आणि मूल्यशिक्षण यामधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा आमचा सतत प्रयत्न आहे. शाळेला मिळणारा वाढता प्रतिसाद आणि विश्वास हेच आमच्या कामाचे खरे प्रमाण आहे.

मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले. हळूहळू पालकांचा विश्वास वाढला, विद्यार्थी संख्येत वाढ झाली. आणि आज आमच्याकडे २१० विद्यार्थी आहेत - हे केवळ आकडं नाही, तर आमच्या कामाची पावती आहे. आज आमची शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ओळखली जाते, हेच आमचं खरे यश आहे. आम्ही शिक्षणावरील निष्ठा आणि विद्यार्थ्यांच्या उत्कर्षासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.


माझ्या सहकाऱ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांमुळे आम्ही विविध उपक्रम राबवले — शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, मूल्यशिक्षण यामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला दिशा दिली. या प्रयत्नांना पालकांचा भरवसा लाभला आणि शाळेचा विश्वासार्ह ठसा समाजात उमटला.

आज, मला अभिमानाने सांगता येते की आमच्या शाळेत २१० विद्यार्थी शिकत आहेत. हे यश म्हणजे फक्त संख्या नसून, ही आपल्या कार्याची आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाची जिवंत साक्ष आहे.

आमचे ध्येय आहे — विद्यार्थ्यांना सक्षम, सुसंस्कारित आणि आत्मविश्वासू नागरिक बनवणे. या दिशेने आमचा प्रवास आजही तेवढ्याच उत्साहाने सुरू आहे.

आज, मी अभिमानाने सांगते की आमच्या मराठी माध्यमाच्या शाळेत २१० विद्यार्थी शिकत आहेत. हे यश म्हणजे एक सामूहिक प्रयत्न आणि शैक्षणिक समर्पणाचे फलित आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही नेहमीच तत्पर आहोत.

----------**----------



नाविन्यपूर्ण,खेळ आधारित आणि क्रियाकलाप केंद्रित अध्यापन पद्धतीचा शाळेत यशस्वी वापर

शाळेचे नाव - ना. म. जोशी मार्ग प्राथमिक मराठी शाळा क्र. १

शाळेचा पत्ता - डिलाईल रोड, मुंबई ,पिन कोड - ४०००११

मुख्याध्यापक नाव - सुमित्रा सिदू यमगेकर

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 98213 15962

मुख्याध्यापक ईमेल आयडी - sumitra.yamagekar@gmail.com

ना. म. जोशी मार्ग प्राथमिक मराठी शाळा क्र. १ ने पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (Foundational Literacy and Numeracy - FLN) विकासासाठी एक अनुकरणीय कार्यक्रम यशस्वीरित्या राबवला आहे. या शाळेचा दृष्टिकोन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० आणि "निपुण भारत" अभियानाच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे सुसंगत आहे, ज्याचा उद्देश प्रत्येक मुलाला मूलभूत वाचन, लेखन आणि अंकगणित कौशल्ये आत्मसात करण्यास सक्षम करणे आहे. शाळेने आपल्या FLN कार्यक्रमाची रचना केवळ शैक्षणिक उद्दिष्टांवरच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून केली आहे, ज्यामुळे त्यांना समाजात ताठ मानेने जगता येईल असे भावी नागरिक घडवता येतील.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या निष्पत्तीमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला आहे, वाचन आणि लेखन प्रवीणतेत उल्लेखनीय प्रगती झाली आहे, संख्याज्ञान कौशल्ये सुधारली आहेत आणि शाळेने जवळपास १००% विद्यार्थी उपस्थितीचे लक्ष्य गाठले आहे. या शैक्षणिक यशापलीकडे, शाळेने विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची खरी आवड निर्माण केली आहे आणि त्यांना उच्च शैक्षणिक टप्प्यांसाठी प्रभावीपणे तयार केले आहे.

शाळेचे हे स्थानिक प्रयत्न, विशेषतः मुंबईसारख्या शहरी वातावरणात, राष्ट्रीय धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीचे एक ज्वलंत उदाहरण आहे. 'शिडी' (ladder) क्रियाकलाप, 'अक्षरखेळ' (letter games) आणि 'जोडाक्षर सोंगट्या' (compound letter tokens) यांसारख्या नाविन्यपूर्ण, खेळ-आधारित आणि क्रियाकलाप-केंद्रित अध्यापन पद्धतींचा वापर हे शाळेच्या यशाचे एक महत्त्वाचे कारण आहे.

पायाभूत शिक्षण मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) चे महत्त्व

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) आणि निपुण भारत अभियान

भारताच्या शिक्षण क्षेत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० हे एक ऐतिहासिक सुधारणा दस्तऐवज म्हणून उदयास आले आहे. या धोरणाने शालेय शिक्षण प्रणालीसाठी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान

(Foundational Literacy and Numeracy - FLN) प्राप्त करण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. NEP २०२० स्पष्टपणे नमूद करते की, मूलभूत शिक्षण - म्हणजे पायाभूत स्तरावरील वाचन, लेखन आणि अंकगणित - प्राप्त केल्याशिवाय, धोरणाचे व्यापक उद्दिष्टे विद्यार्थ्यांच्या मोठ्या भागासाठी मोठ्या प्रमाणात अप्रासंगिक ठरतील. या गंभीर गरजेला प्रतिसाद म्हणून, शिक्षण मंत्रालयाने जुलै २०२१ मध्ये निपुण भारत (National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy) अभियानाची औपचारिक सुरुवात केली.

निपुण भारत अभियानाची व्यापक दृष्टी ही एक सक्षम वातावरण निर्माण करणे आहे, जे पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाची सार्वत्रिक प्राप्ती सुनिश्चित करेल. या अभियानाने एक स्पष्ट आणि महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित केले आहे: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पर्यंत, प्रत्येक मुलाने इयत्ता तिसरीच्या अखेरीस, आणि कोणत्याही परिस्थितीत इयत्ता पाचवीच्या पुढे नाही, वाचन, लेखन आणि संख्याज्ञानामध्ये अपेक्षित शिक्षण क्षमता प्राप्त करावी. हे केवळ शैक्षणिक प्रवीणतेपुरते मर्यादित नाही, तर मुलाच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करते. यात शारीरिक आणि मोटर विकास, सामाजिक-भावनिक विकास, संज्ञानात्मक विकास, भाषा आणि साक्षरता विकास, आणि आवश्यक जीवन कौशल्ये यांसारख्या विविध क्षेत्रांचा समावेश आहे. हा बहुआयामी दृष्टिकोन सुसंस्कृत आणि जबाबदार व्यक्ती घडवण्यासाठी डिझाइन केलेला आहे, जे केवळ शैक्षणिकदृष्ट्या सक्षम नाहीत तर जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी देखील तयार आहेत.

या अभियानाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे अध्यापन पद्धतींमध्ये बदल करण्यावर दिलेला भर. निपुण भारत पारंपरिक घोकंपट्टीच्या शिक्षणापासून दूर जाऊन आकर्षक, सर्वसमावेशक, खेळ-आधारित, क्रियाकलाप-आधारित, अनुभवात्मक आणि बाल-केंद्रित अध्यापनशास्त्रांना प्रोत्साहन देते.

ना. म. जोशी मार्ग प्राथमिक मराठी शाळेचा संदर्भ आणि FLN उपक्रमाची सुरुवात

ना. म. जोशी मार्ग प्राथमिक मराठी शाळा क्र. १, डिलाईल रोड, मुंबई - ४०००११ येथे आहे. ही शाळा मराठी माध्यमात शिक्षण देते आणि इयत्ता १ ते ४ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सेवा देते, सध्या येथे ९९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. श्रीमती सुमित्रा सिदू यमगेकर या शाळेच्या इन्चार्ज आहेत, ज्यांच्या नेतृत्वाखाली FLN उपक्रम राबवला जात आहे.

शाळेने शैक्षणिक वर्ष २०२४ च्या जून महिन्यात एक सक्रिय आणि अंतर्दृष्टीपूर्ण पाऊल उचलले. त्यांनी 'वर्गनिहाय वाचन लेखन उजळणी वजा ' (इयत्तानुसार वाचन-लेखन उजळणी) घेतली. हे मूल्यांकन, जरी अनौपचारिक असले तरी, अत्यंत प्रभावी ठरले. यातून एक गंभीर आणि चिंताजनक शिक्षण दरी उघड झाली: "काही विद्यार्थ्यांना स्पष्ट वाचन लेखन करता येत नाही. संख्यावरील क्रिया करता येत नाही" (काही विद्यार्थी स्पष्टपणे वाचू किंवा लिहू शकत नव्हते, तसेच मूलभूत संख्या क्रिया करू शकत नव्हते). पायाभूत शिक्षणामधील या प्रारंभिक आणि थेट त्रुटींच्या ओळखीने शाळेला 'पायाभूत शिक्षण मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान' (Foundational Literacy and Numeracy) कार्यक्रम सुरू करण्यास प्रवृत्त केले. हे शैक्षणिक

हस्तक्षेपासाठी एक प्रतिसादशील, गरजा-आधारित आणि डेटा-माहितीपूर्ण दृष्टिकोन दर्शवते, ज्यामुळे शाळेची मूलभूत शिक्षण आव्हाने त्वरित सोडवण्याची बांधिलकी अधोरेखित होते.

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला 'उजळणी वजा' (उजळणी) घेण्याचा शाळेचा निर्णय आणि त्यानंतर शिक्षण दरीचे निरीक्षण हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही पद्धत निपुण भारतच्या शिक्षण त्रुटींच्या लवकर ओळखीसाठी सततच्या मूल्यांकनावर भर देण्याशी सुसंगत आहे.

ना. म. जोशी मार्ग शाळेने निश्चित केलेली उद्दिष्टे

ना. म. जोशी मार्ग शाळेने आपल्या FLN उपक्रमासाठी १० स्पष्ट उद्दिष्टे निश्चित केली आहेत, जी त्यांच्या सर्वसमावेशक विद्यार्थी विकासाप्रती सखोल बांधिलकी दर्शवतात:

1. विद्यार्थ्यांनी अक्षर, शब्द आणि वाक्य वाचायला व लिहायला शिकणे.
2. विद्यार्थ्यांना संख्येची ओळख होणे व गणितिक्रिया करता येणे.
3. विद्यार्थ्यांची विचार करण्याची आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे.
4. विद्यार्थ्यांनी दैनंदिन व्यवहारामध्ये ज्ञानाचा उपयोग करणे.
5. विद्यार्थ्यांच्या सृजनशील गुणांना वाव देणे.
6. विद्यार्थ्यांना वाचन व लेखन याची अभिरुची निर्माण करणे.
7. वाचन-लेखन करणा-या विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.
8. देशाचा सुजाण नागरिक तयार करणे.
9. विद्यार्थ्यांची उपस्थिती 00% करणे.
10. विद्यार्थ्याने प्रत्येक शालेय व सहशालेय उपक्रमात सहभागी होणे.

या उद्दिष्टांचे विश्लेषण केल्यास, ती निपुण भारतच्या व्यापक उद्दिष्टांशी आणि NEP २०२० च्या तत्त्वांशी कशी जुळतात हे स्पष्ट होते. उद्दिष्टे १ आणि २ थेट पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाच्या मुख्य तत्त्वांशी जुळतात, जसे की निपुण भारतने परिभाषित केले आहे. उद्दिष्टे ३, ४, ५ आणि ८ संज्ञानात्मक विकास, गंभीर विचार, समस्या सोडवणे, जीवन कौशल्ये आणि NEP २०२० व निपुण भारतच्या विकासात्मक उद्दिष्टांनुसार एका जबाबदार नागरिकाच्या सर्वांगीण विकासावर भर देतात. उद्दिष्टे ६ आणि ७ वाचन आणि लेखनात सकारात्मक शिक्षण वृत्ती, आंतरिक प्रेरणा आणि सततचा सहभाग वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत, जे निपुण भारतच्या प्रमुख निष्पत्ती आहेत. शेवटी, उद्दिष्टे ९ आणि १० थेट गळती दरांमध्ये घट, विद्यार्थी धारणा वाढवणे.

पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाची गरज:

शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रारंभिक मूल्यांकनाचे निष्कर्ष आणि FLN हस्तक्षेपाची निकड

ना. म. जोशी मार्ग शाळेने जून २०२४ मध्ये शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला 'वर्गनिहाय वाचन लेखन उजळणी वजा' (इयत्तानुसार वाचन-लेखन उजळणी) घेतली. या महत्त्वपूर्ण निरीक्षणातून असे दिसून आले की, मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना स्पष्ट वाचन, लेखन किंवा मूलभूत अंकगणित क्रिया करता येत नव्हत्या. हे प्रारंभिक मूल्यांकन एक महत्त्वाचे साधन म्हणून वापरण्यात आले , ज्यामुळे लक्ष्यित पायाभूत हस्तक्षेपाची तात्काळ आणि तातडीची गरज अधोरेखित झाली.

या प्रारंभिक मूल्यांकनामुळे विविध इयत्तांमधील विद्यार्थ्यांच्या विविध गरजा आणि प्रवीणता स्तरांची सखोल माहिती मिळाली. यामुळे शाळेला शैक्षणिक साहित्य वर्ग आणि विषयानुसार धोरणात्मकपणे वर्गीकृत करण्यास प्रवृत्त केले:

- **इयत्ता १:** दोन अंकी संकल्पना, अक्षर वाचन आणि शब्द निर्मितीवर लक्ष केंद्रित करणे.
- **इयत्ता २:** दोन अंकी संकल्पना, शब्द वाचन आणि वाक्य निर्मितीवर भर.
- **इयत्ता ३:** तीन अंकी संकल्पना, वाक्य वाचन आणि परिच्छेद आकलनाकडे प्रगती.
- इयत्ता ४: चार अंकी संकल्पना, परिच्छेद वाचन आणि पूरक वाचनावर प्रगत लक्ष. हा संरचित दृष्टिकोन विभेदित सूचनांचा (differentiated instruction) व्यावहारिक आणि प्रभावी वापर दर्शवतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजांनुसार शिक्षण सामग्री तयार केली जाते.

शाळेने 'उजळणी वजा' (उजळणी) द्वारे विशिष्ट शिक्षण दरीची सक्रिय ओळख आणि त्यानंतर वर्ग स्तरावर आणि कौशल्यानुसार सामग्रीचे पद्धतशीर वर्गीकरण (उदा. "इयत्ता १. दोन अंकी. - अक्षरवाचन शब्द") हे विभेदित सूचनांसाठी अत्यंत व्यावहारिक आणि अनुकूल दृष्टिकोन दर्शवते. औपचारिक, प्रमाणित मूल्यांकन (जसे की मध्ये अधोरेखित केले आहे) सर्वसमावेशक मूल्यांकनासाठी आदर्श असले तरी, शाळेची पद्धत, जरी सोपी असली तरी, एकाच वर्गातील विविध शिक्षण स्तरांच्या व्यापक आव्हानाला प्रभावीपणे संबोधित करते, जे FLN अंमलबजावणीतील एक सामान्य अडथळा आहे हे दर्शवते की शाळा त्यांच्या विद्यमान संसाधनांमध्ये सर्जनशीलपणे कसे जुळवून घेऊ शकतात आणि 'विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार नियोजित धडे' या निपुण भारत मार्गदर्शक तत्वाला पूर्ण करण्यासाठी कसे नवनवीन प्रयोग करू शकतात हे व्यावहारिक, प्रतिसादशील अध्यापनशास्त्रातील एक मौल्यवान केस स्टडी प्रदान करते जे अत्याधुनिक मूल्यांकन साधनांच्या मर्यादित प्रवेश असलेल्या परिस्थितीतही प्रतिकृती बनवता येते.




प्रभावी अंमलबजावणी: ना. म. जोशी मार्ग शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रम आणि कार्यपद्धती


विद्यार्थ्यांच्या क्षमतेवरून व वर्गनिहाय गट तयार करणे आणि वेळापत्रकाची रचना

ना. म. जोशी मार्ग शाळेने FLN उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी एक अत्यंत व्यावहारिक आणि विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोन स्वीकारला आहे. प्रथम, विद्यार्थ्यांची त्यांच्या वैयक्तिक क्षमता आणि सध्याच्या इयत्तांनुसार पद्धतशीरपणे गटवारी करण्यात आली. यामुळे शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्याच्या विशिष्ट गरजांनुसार लक्ष्यित सूचना आणि समवयस्क शिक्षण प्रदान करणे शक्य झाले.

याव्यतिरिक्त, दैनंदिन शाळेच्या वेळापत्रकात FLN क्रियाकलापांसाठी विशिष्ट वेळेचे स्लॉट संरचितपणे समाविष्ट करण्यात आले. "शाळा भरण्यापूर्वी १२.०० ते १२.४५ व मधल्या सुट्टीत डब्बा खाल्यावर वर्ग निहाय वेळापत्रक तयार करण्यात आले" (शाळा सुरू होण्यापूर्वी दुपारी १२:०० ते १२:४५ आणि दुपारच्या जेवणानंतरच्या सुट्टीत, वर्गानुसार वेळापत्रक तयार केले गेले). पायाभूत शिक्षणाला शाळेने दिलेले प्राधान्य या समर्पित, केंद्रित हस्तक्षेप वेळेच्या बांधिलकीतून स्पष्ट होते. शाळेने एक समर्पित FLN लॅबची स्थापना केली आणि शाळेच्या ग्रंथालयाचा धोरणात्मक वापर केला. श्रीमती सुमित्रा यमगेकर आणि श्री. रामेश्वर काकडे या विशिष्ट शिक्षकांना वेगवेगळ्या इयत्तांसाठी "इन्चार्ज" (प्रभारी) म्हणून नियुक्त केल्याने पायाभूत कौशल्य विकासासाठी विशेष लक्ष आणि सातत्यपूर्ण समर्थन सुनिश्चित झाले.

शाळेने नियमित शाळा सुरू होण्यापूर्वी आणि दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत दोन्ही वेळेस समर्पित FLN वेळ स्लॉट लागू करण्याचा निर्णय, तसेच विशिष्ट शिक्षकांना FLN लॅब आणि ग्रंथालयासाठी "इन्चार्ज" म्हणून नियुक्त करणे, हे एक अत्यंत धोरणात्मक आणि प्रभावी दृष्टिकोन दर्शवते. हे अनौपचारिक किंवा तात्पुरत्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता संरचित हस्तक्षेपाची स्पष्ट बांधिलकी दर्शवते. विद्यार्थ्यांच्या क्षमतेवरून व वर्गनिहाय गट तयार करण्यात आले. शाळा भरण्यापूर्वी १२.०० ते १२.४५ व मधल्या सुट्टीत डब्बा खाल्यावर वर्ग निहाय वेळापत्रक तयार करण्यात आले.

इयत्ता	वार	FLN Lab	वाचनालय	इन्चार्ज
पहिली	सोमवार	12.00 - 12.45	3.30 - 3.45	श्रीमती सुमित्रा यमगेकर
दुसरी	मंगळवार	12.00 - 12.45	3.30 - 3.45	श्रीमती सुमित्रा यमगेकर
तिसरी	बुधवार	12.00 - 12.45	3.30 - 3.45	श्री रामेश्वर काकडे
चौथी	गुरुवार	12.00 - 12.45	3.30 - 3.45	श्री रामेश्वर काकडे
चौथी	शिकरवरप	12.00 - 12.45	3.30 - 3.45	श्री रामेश्वर काकडे
सर्व इयत्ता	आनंददायी शनिवार			आनंददायी शनिवार





खेळ-आधारित शिक्षण पद्धती (Play-Based Learning): नाविन्यपूर्ण उपक्रम आणि त्यांचे शैक्षणिक महत्त्व

खेळ-आधारित शिक्षण हा NEP २०२० आणि निपुण भारतचा एक मध्यवर्ती सिद्धांत आहे, जो शिक्षणाला आनंददायी, आकर्षक आणि अत्यंत प्रभावी बनवण्यासाठी ओळखला जातो. खेळामुळे केवळ शैक्षणिक कौशल्येच विकसित होत नाहीत, तर मुलांचा सर्वांगीण विकास—संज्ञानात्मक, सामाजिक, भावनिक आणि शारीरिक—देखील होतो आणि शिकण्याची आंतरिक प्रेरणा वाढते.[0] ना. म. जोशी मार्ग शाळेने या तत्त्वांचा अवलंब करून अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत.

- **"शिडी" (Ladder) क्रियाकलाप – एक बहुआयामी साधन:** शाळेने एक साधी शिडी ('शिडी') एक बहुपयोगी शैक्षणिक साधन म्हणून हुशारीने वापरली आहे. विद्यार्थ्यांना शिकवले जाते की शिडीचा विविध प्रकारे वापर केला जाऊ शकतो. शारीरिक शिक्षणात ती चढण्यासाठी, संतुलन राखण्यासाठी, उडी मारण्यासाठी आणि झोका घेण्यासाठी वापरली जाते, ज्यामुळे स्थूल मोटर कौशल्ये आणि समन्वय वाढतो. गणितामध्ये, ती "क्रमवार संख्या ओळखणे" (क्रमिक संख्या ओळखणे), "मागील पुढील व मधली संख्या ओळखण्यासाठी" (मागील, पुढील आणि मधली संख्या ओळखणे), "सम विषम संख्या ओळखणे" (सम/विषम संख्या ओळखणे), आणि "बेरीज करण्यासाठी" (बेरीज) शिकण्यास मदत करते. इंग्रजीमध्ये, ती "In out game," "Alphabet A to Z," आणि "Make The word" साठी वापरली जाते. मराठीमध्ये, ती "मुळाक्षरे तयार करणे (खेळ)" (खेळाद्वारे अक्षरे तयार करणे) आणि "शब्द तयार करणे (खेळ)" (खेळाद्वारे शब्द तयार करणे) यासाठी वापरली जाते. हे साधे, कमी किमतीचे आणि अनुकूल साधन अनेक विषयांमध्ये सक्रिय, प्रत्यक्ष आणि आकर्षक शिक्षण अनुभव कसे सुलभ करते, ज्यामुळे खेळकर संवादाद्वारे पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान कौशल्यांचा एकात्मिक विकास होतो.

- **"अक्षरखेळ" (Letter Game):** हा परस्परसंवादी खेळ पहिल्या इयत्तेतील विद्यार्थ्यांना अक्षर ओळख जलद करण्यासाठी डिझाइन केलेला आहे. विद्यार्थ्यांना वैयक्तिक अक्षरांपासून विविध शब्द (उदा. कप, कस, कमल, कर, कमळ) तयार करण्यास प्रोत्साहित केले जाते. विद्यार्थ्यांनी स्वतः शब्द तयार केल्याने ते अधिक चांगल्या प्रकारे लक्षात ठेवतात आणि उच्च श्रेणींमध्ये प्रगतीसाठी आवश्यक असलेला मजबूत ध्वनी आणि शब्दसंग्रहाचा पाया तयार होतो. सर्वाधिक शब्द तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांचे सार्वजनिक कौतुक केल्याने आणि त्यांना प्रोत्साहित केल्याने दररोज वाचन सरावासाठी सकारात्मक वातावरण निर्माण होते. ही क्रिया थेट ध्वनी जागरूकता, डीकोडिंग कौशल्ये, शब्दसंग्रह वाढवणे आणि वाचन प्रवाहीपणा वाढवते, जे पायाभूत साक्षरतेच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे जुळते.



- **"शब्दचक्र" (Word Wheel):** हा आकर्षक खेळ विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढवण्यासाठी डिझाइन केलेला आहे. शब्दचक्राद्वारे, विद्यार्थी वैयक्तिक शब्दांमधून वाक्ये तयार करायला शिकतात, शब्दांचे वाचन करतात आणि नवीन शब्दांचे अर्थ समजून घेतात. हा खेळ विद्यार्थ्यांच्या एकूण वाचन आकलन आणि प्रवाहीपणामध्ये सुधारणा करण्यासाठी खूप उपयुक्त ठरतो. प्रामुख्याने वाचन आकलन, शब्दसंग्रह विस्तार आणि वाक्य निर्मितीवर लक्ष केंद्रित करते, जे भाषा आणि साक्षरता विकासाचे महत्त्वपूर्ण घटक आहेत.

- **"जोडाक्षर सोंगट्या" (Compound Letter Dice/Tokens):** हा अनोखा खेळ मराठी साक्षरतेतील एक सामान्य आव्हान: जोडाक्षरे (जोडशब्द) वाचणे आणि लिहिणे यावर विशेषतः लक्ष केंद्रित करतो. विद्यार्थी एक सोंगटी टाकतात किंवा निवडतात, आणि ज्या विद्यार्थ्याला ती सोंगटी मिळते त्याला तो जोडशब्द वाचायचा असतो. ज्या विद्यार्थ्याने सर्वाधिक जोडशब्द वाचले तो विजयी घोषित केला जातो आणि त्याचे कौतुक केले जाते, ज्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना हे अनेकदा कठीण शब्द वाचण्याचा सराव करण्यास खूप प्रेरणा मिळते, परिणामी लक्षणीय सुधारणा होते. ही क्रिया मराठीमध्ये प्रचलित असलेल्या विशिष्ट भाषिक आव्हानाला (जोडाक्षरे/संयुक्त अक्षरे) थेट संबोधित करते, ज्यामुळे जटिल शब्द प्रकारांसाठी डीकोडिंग अचूकता आणि वाचन प्रवाहीपणा वाढतो.

- **"साहित्यावरून संख्या ओळखणे" (Identifying Numbers from Materials):** शाळेने स्थान मूल्य, संख्या ओळखणे आणि मूलभूत अंकगणित क्रिया (एकक, दशक, शतक, हजार इत्यादी) यांसारख्या अमूर्त संकल्पना शिकवण्यासाठी ठोस, मूर्त साहित्य (जसे की एकक ब्लॉक्स, दशक रॉड्स, शतक फ्लॅट्स आणि हजार क्यूब्स) वापरण्याचा अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारला आहे. या प्रत्यक्ष, अनुभवात्मक पद्धतीमुळे, विद्यार्थी संख्या संकल्पना जलद आत्मसात करतात आणि संख्या वाचण्यात व लिहिण्यात प्रवीणता दर्शवतात, ज्याला वारंवार सरावाने बळकटी मिळते. शाळेच्या अद्वितीय क्रियाकलापांचे—'शिडी', 'अक्षरखेळ', 'शब्दचक्र', 'जोडाक्षर सोंगट्या', आणि 'साहित्यावरून संख्या ओळखणे'—तपशीलवार वर्णन बाल विकास, शिक्षण मानसशास्त्र आणि प्रभावी अध्यापनशास्त्रीय तत्त्वांची सखोल समज दर्शवते. हे केवळ सामान्य खेळ नाहीत; ते विशिष्ट FLN कौशल्ये लक्ष्य करण्यासाठी आणि विशिष्ट शिक्षण आव्हानांना (उदा. मराठी जोडशब्दांच्या जटिलतेसाठी 'जोडाक्षर सोंगट्या') संबोधित करण्यासाठी हेतुपूर्णपणे डिझाइन केलेले आहेत. महत्त्वाचे म्हणजे, हे क्रियाकलाप कमी किमतीचे आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या सामग्रीचा वापर करून सहजपणे अनुकूलित करता येण्यासारखे दिसतात, ज्यामुळे ना. म. जोशी मार्ग शाळा व्यावहारिक अध्यापनशास्त्रीय नाविन्याची एक आदर्श ठरते जी इतर संस्थांना प्रेरणा आणि मार्गदर्शन देऊ शकते.




यशस्विता आणि परिणाम: ना. म. जोशी मार्ग शाळेच्या FLN उपक्रमाचे मूल्यांकन

विद्यार्थ्यांच्या सहभागात आणि शिकण्याच्या निष्पत्तीमध्ये वाढ

ना. म. जोशी मार्ग शाळेच्या FLN उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन आणि लेखनाची आवड लक्षणीयरीत्या वाढली आहे. सुरुवातीला सर्व विद्यार्थी सहभागी होत नव्हते, परंतु दर सोमवारी उत्कृष्ट वाचन-लेखन करणाऱ्या वर्गनिहाय एका विद्यार्थ्याची निवड करून त्यांना परिपाठाच्या वेळी शैक्षणिक भेटवस्तू देऊन प्रोत्साहित केले गेले आणि सूचना फलकावर त्यांची नावे लिहिण्यात आली. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याचा सहभाग वाढू लागला. हे प्रोत्साहन आणि मान्यता विद्यार्थ्यांमध्ये आंतरिक प्रेरणा निर्माण करते, ज्यामुळे ते सक्रियपणे शिकण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतात.

'अक्षरखेळ' सारख्या उपक्रमांमुळे पहिल्या इयत्तेतील विद्यार्थ्यांना अक्षर ओळख जलद होते आणि ते छान वाचन करतात. विद्यार्थी स्वतः शब्द तयार करत असल्याने ते शब्द कधीच विसरत नाहीत, ज्यामुळे त्यांचा पाया पक्का होतो. 'शब्दचक्र'मुळे शब्दसंग्रह वाढतो आणि वाक्य निर्मिती सुलभ होते, ज्यामुळे वाचन सुधारते. 'जोडाक्षर सोंगट्या'मुळे जोडशब्द वाचन-लेखन सुधारते, कारण विद्यार्थी जोडशब्द वाचण्याचा प्रयत्न करतात. 'साहित्यावरून संख्या ओळखणे' या प्रत्यक्ष पद्धतीमुळे विद्यार्थी एकक, दशक, शतक, हजार यांसारख्या संख्या संकल्पना पटकन ओळखतात आणि अनेक वेळा सरावाने वाचन-लेखन छान करतात.
इयत्ता तिसरीनंतर विद्यार्थी स्वयंध्यानासाठी वाचू शकतील, याचा शाळेला आनंद आहे. हे पायाभूत कौशल्ये आत्मसात करण्याच्या पलीकडे जाऊन स्वायत्त शिक्षण आणि उच्च-स्तरीय विचार क्षमतेच्या विकासाचे संकेत देते. शाळेने वर्गनिहाय वाचन-लेखन उजळणी वजा घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा घेतला. या पद्धतीमुळे शिकण्याच्या त्रुटी लवकर ओळखता येतात आणि त्यानुसार हस्तक्षेप करता येतो. हे निपुण भारतच्या 'प्रगतीचा मागोवा घेणे' या उद्दिष्टाशी सुसंगत आहे. खेळ-आधारित शिक्षणामुळे केवळ शैक्षणिक कौशल्येच नव्हे तर शारीरिक, सामाजिक आणि भावनिक विकासही होतो.[6] 'शिडी' सारख्या क्रियाकलापांमुळे शारीरिक शिक्षण, गणित आणि भाषा कौशल्ये एकाच वेळी विकसित होतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.

विद्यार्थ्यांच्या सहभागात आणि शिकण्याच्या निष्पत्तीमध्ये झालेली वाढ ही शाळेच्या FLN उपक्रमाच्या थेट यशाचे द्योतक आहे. "प्रथम सर्व विद्यार्थी सहभागी होत नव्हते परंतु दर सोमवारी छान वाचन लेखन करणाऱ्या वर्ग निहाय एक विद्यार्थ्यांची निवड करून परिपाठाच्या वेळी प्रोत्साहनपर एक शैक्षणिक भेट वस्तु देऊन त्यांचे कौतुक करून सूचना फलकावर त्यांची नावे लिहिण्यात आली. त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांचा सहभाग दिसून येऊ लागला." हा उल्लेख दर्शवतो की, शाळेने केवळ शिक्षण पद्धतीच बदलल्या नाहीत, तर विद्यार्थ्यांची आंतरिक प्रेरणा वाढवण्यासाठी आणि त्यांना सक्रिय सहभागी करून घेण्यासाठी प्रभावी प्रोत्साहन यंत्रणा देखील वापरली.




पालक आणि समुदायाचा वाढता सहभाग

ना. म. जोशी मार्ग मराठी शाळेतील पालकही या उपक्रमात सहभागी होऊ लागले, ही एक महत्त्वाची यशस्विता आहे. "आपला पाल्य फोटो मध्ये व्हिडिओ मध्ये आला पाहिजे यासाठी मुलांना शाळा भरण्यापूर्वी पाठवू लागले." हे दर्शवते की पालकांना आपल्या मुलांच्या शिक्षणात सक्रियपणे सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली आहे. वर्गाच्या ग्रुपवर फोटो/व्हिडिओ टाकल्यामुळे पालकांना वाचन-लेखनाचे महत्त्व पटले. डिजिटल माध्यमांचा हा प्रभावी वापर शाळा-पालक संवाद वाढवतो आणि पालकांना मुलांच्या प्रगतीची माहिती देतो, ज्यामुळे ते शिक्षणाचे महत्त्व समजून घेतात आणि घरीही मुलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देतात.

निपुण भारत अभियानामध्ये समुदाय आणि पालकांच्या सहभागाला विशेष महत्त्व दिले आहे. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये घर-आधारित शिक्षणात पालकांच्या सहभागासाठी आणि पायाभूत शिक्षणात समुदाय सहभागासाठी मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे समाविष्ट आहे. ना. म. जोशी मार्ग शाळेचा अनुभव या राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांच्या यशस्वी अंमलबजावणीचे एक उत्तम उदाहरण आहे. पालकांच्या सहभागामुळे मुलांचे शैक्षणिक परिणाम सुधारतात, कुटुंब-शिक्षक संबंध मजबूत होतात, आव्हानात्मक वर्तन कमी होते आणि शिक्षकांचे मनोबल वाढते.[6] पालक जेव्हा मुलांच्या शिक्षण प्रवासात सक्रियपणे सहभागी होतात, तेव्हा ते शिकण्यासाठी एक पोषक वातावरण निर्माण करतात आणि भविष्यातील शैक्षणिक यशासाठी एक मजबूत पाया घालतात. ना. म. जोशी मार्ग शाळेतील पालकांचा वाढता सहभाग या फायद्यांची पुष्टी करतो.

राष्ट्रीय स्तरावर "पालकांच्या सहभागाचा अभाव" हे FLN अंमलबजावणीतील एक मोठे आव्हान आहे ना. म. जोशी मार्ग शाळेने हे आव्हान प्रभावीपणे कसे हाताळले, हे पालकांच्या वाढत्या सहभागातून दिसून येते. "आपला पाल्य फोटो मध्ये व्हिडिओ मध्ये आला पाहिजे यासाठी मुलांना शाळा भरण्यापूर्वी पाठवू लागले" हे वाक्य शाळेने पालकांना केवळ माहिती देऊन नव्हे, तर त्यांच्या मुलांच्या प्रगतीचे दृश्य पुरावे (फोटो/व्हिडिओ) देऊन आणि सामाजिक मान्यता (मुलांचे कौतुक) देऊन कसे प्रेरित केले हे दर्शवते. हा दृष्टिकोन पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो आणि त्यांना सक्रिय सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करतो.

प्रशासकीय आणि बाह्य संस्थांकडून मिळालेले समर्थन आणि मान्यता

ना. म. जोशी मार्ग शाळेच्या FLN उपक्रमांना प्रशासकीय आणि बाह्य संस्थांकडून मिळालेले समर्थन हे तिच्या यशाचे आणखी एक महत्त्वाचे द्योतक आहे. श्रीमती सीमा चतुर्वेदी मॅडम (उप शिक्षणाधिकारी) आणि श्रीमती वर्षा गांगुर्डे मॅडम (प्रशासकीय अधिकारी) यांनी शाळेला भेट देऊन शालेय स्वच्छता, निवडणूक विषयक सुविधा, वर्ग आणि FLN LAB पाहून मार्गदर्शन केले. ही भेट शाळेच्या प्रयत्नांना प्रशासकीय स्तरावर मिळालेली उच्च-स्तरीय मान्यता दर्शवते.

याव्यतिरिक्त, श्री. किरण बेळगे (जिल्हा समन्वयक, समावेशिक शिक्षण विभाग, करीरोड जिल्हा कार्यालय) यांनी २३/४/२०२५ रोजी संकलित मूल्यमापन नं. २ (विषय - इंग्रजी परीक्षा) आणि FLN LAB ला भेट दिली. अशा बाह्य मूल्यांकनामुळे शाळेच्या FLN उपक्रमांची प्रभावीता तपासली जाते आणि सुधारणेसाठी




आवश्यक मार्गदर्शन मिळते. निपुण भारत अभियानामध्ये मिशनच्या क्रियाकलापांचे राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, ब्लॉक आणि शाळा स्तरांवर सतत ट्रॅकिंग आणि निरीक्षण (मासिक, त्रैमासिक, वार्षिक) समाविष्ट आहे. शैक्षणिक आणि प्रशासकीय दोन्ही पैलूंना समाविष्ट करणाऱ्या २२ निर्देशकांद्वारे ही प्रगती ट्रॅक केली जाते. ना. म. जोशी मार्ग शाळेला मिळालेल्या भेटी आणि मूल्यमापन या राष्ट्रीय निरीक्षण चौकटीचा एक भाग आहेत, जे शाळेच्या पारदर्शकतेचे आणि जबाबदारीचे प्रदर्शन करतात.

संदर्भातील फोटो - https://drive.google.com/drive/folders/1SPUPc-6FfmypwmzoENZR-uOQZLBlUcVV?usp=sharing

खेळातून (FLN LAB) पायाभूत शिक्षण मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान :

https://youtu.be/P-SljVv26pk?si=PHq1sRRgUwF-51iU

सुमित्रा यमगेकर ह्यांचे यूट्यूब चॅनेल : https://www.youtube.com/@sumitrayamagekar3559

----------**----------

Leading Technology Integrated School Processes

Name of the school - Worli Seaface Municipal English Upper Primary School

School Address - Khan Abdul Gaffar Khan Road, Worli Seaface,Worli, Mumbai – 400030.

School Email ID - worliseafacemcgm@gmail.com

Head Mistress Name - Mrs. Bageshree Kerkar

Head Mistress Mobile Number - 9820657943

Head Mistress Email ID - bageshreemkerkar.bk@gmail.com

SCHOOL'S ACHIEVEMENT - Worli Seaface Municipal English Upper Primary School has ranked 5th in India in the Education World India school ranking 2024-25. This school has made its way into the list of top 10 Government Day Schools. 1077 students are learning in this year in school.

https://drive.google.com/drive/folders/1QiNNNQ3OdgPuupj1C7-hYfFqUX03hNIb?usp=drive_link

OTHER SUCCESS - The school has also received, the-best clean school award. (Headmistress, teachers, staff members and all the students strive to keep the school clean, students also practice eight steps of hand washing to maintain self-hygiene. School has achieved various awards in competitions like drawing, craft, music and physical education. The school has achieved excellent outcome in student's performance, not only in the academics but also in the co-curricular activities like drawing, craft, music and sports. In Balasaheb Thackeray drawing competition students received prizes. School was awarded second prize in Mukhyamantri Mazhi Shala Sundar Shala 2024-25

https://drive.google.com/drive/folders/1Z8EtIKDP3wUgh2WRPvDuk30l4soZO258?usp=drive_link


LOCATION OF THE SCHOOL - Worli Seaface Municipal English school is located on Khan Abdul Gaffar Khan road in the scenic locality of Worli Seaface. It is situated right across the iconic Rajeev Gandhi Sea link. The school building is an impressive red-coloured anchor-shaped structure.

FACILITIES IN THE SCHOOL - The school has an impressive infrastructure with modern facilities which include, virtual room, digital room, library room, Science laboratory, mini science centre, computer room, drawing room, music room, Tinkering lab, Astronomy lab, Skill lab, FLN Lab and physical education room. 27 articles are provided to all the students. Mid-day meal is provided to all the students. Health check-up is done of the students by BMC doctors who visit the school and suggest proper medications to them.

https://drive.google.com/drive/folders/113JjCsCGED2CMZWtHvQD5vVdEqQUMEiJ?usp=drive_link

Students should get the knowledge of computer. There are 21 computers in the computer room. Students go to the computer room along with the teachers as per their timetable and are using computer efficiently.

https://drive.google.com/drive/folders/1xGC5YctP55Aqk40uwRwVt94Z3m0ZSJNp?usp=drive_link



Library timetable is made and the students go to the library room to read the books. Projects are given to the students and they make use of the knowledge gained from the library books. Story-telling, making of songs, puzzles, model making are also included in the project, which enable oral presentation skills. Students thus become creative and think creatively.

https://drive.google.com/drive/folders/1xl4fyb4wiIrAdx50jwTiJBTDkzEFj-Ay?usp=drive_link

Through craft, children learn to value and appreciate artifacts. Experience in design and crafts enable them to reflect critically on their own work and those by others. Students become creative. Students participate in different craft competition like clay work, lantern making, paper work, Rakhi making etc. and have got prizes in all the competitions every year.

We have digital classrooms in the school. The digital classroom is a "technology enabled" learning environment where student is learning and interacting with the teacher and pears. It allows students to connect better with the learning material.

There is live instruction to students in virtual classroom. Live discussion is done with students. Assessment is done by asking questions to them and by giving questionnaire to the students. Hence it becomes easy to understand the concept to the students.

Science laboratory equipment allows students to interact directly with the data gathered. The students get a first-hand learning experience by performing various experiments on their own. School science lab equipment and supplies make teaching and learning easy both for the teachers as well as for the students. Pupils make use of models and then understand the different scientific concepts and theories. It is a great place for students which help them enhance their learning by understanding theoretical concepts of science which are taught in classrooms.

https://drive.google.com/drive/folders/1dTvJPjfot5OEyhcdrKWu3h1IAj6zdfj_?usp=drive_link


Mini science centre in school helps in teaching science and maths to school children in a simple way. It is an innovative and interactive with a hands on approach to facilitate the learning process the models are plug and play, students can understand the concept by observing them, Thus the curiosity is aroused in students and learning becomes easy. This modern way of teaching not only helps students comprehend the concepts and their applications easily, but also helps in implementing it, as the students will be equipped with the required knowledge and skills for life.

https://drive.google.com/drive/folders/1Io7UqIodicMN34xrRFK1hPby9_nyvTvJ?usp=drive_link

To teach students, activity-based teaching is implemented. We take activities in the class. Teacher gives a task which is related to syllabus. This task is given to students, Teachers gives particular time to complete this task. During this period teacher tell how to complete the task. Teacher observes every student's performance and evaluate the students.

https://drive.google.com/drive/folders/1PaOW6oIK1AgZsp5OmJWatuYW9W-l5kyw?usp=drive_link

Students are given training for wrestling, athletics, Football, Cricket, Kho-Kho, Kabaddi etc. Our students have got prizes in all the sports.



School promotes a reading culture. It aims to ensure that by 2006, every child in class three is able to read. The Mahavachan movement focuses on improving students' reading skills and instilling reading habits in them. Through digital classroom reading is conducted effectively, helping students enhance their pronunciation. Additionally, in the classroom, students are provided with books containing pictures and small articles, fostering interest and facilitating learning. Stalls are set up for a joyful period, featuring various storybooks, small articles, and poems for students to read.

A monthly book exhibition is held in the school passage, providing students with the opportunity to read books of their choice. In conclusion, students connect ideas on the page to what they already know, and reading contributes to the development of agile thinking.


Various programs conducted in the school: School conducts various programs and meetings, inviting SMC members, parents, ex-students, and various organizations. Monthly SMC meetings are held, and every class teacher organizes parent and Mata-Palak meetings, discussing activities and gathering valuable opinions. The school hosts events like sports day, where ex-students and parents are invited. Grandparents' Day is celebrated to strengthen the bond between students and their grandparents.

The objective of this criterion is to diagnose health-related problems in teachers and students and provide free medical treatment to them. Student health is crucial, so BMC organizes a health check-up for students every academic year. This camp runs for four to five days within the school premises. BMC government hospital doctors examine students for height, weight, nails, hands, skin, eyes, vision, hearing ability, ears, and teeth. They create a medical report for each student and call the parents of those with major health issues. Doctors inform parents and students to visit government hospitals for a thorough check-up. Consequently, students and parents visit the clinic, and problems are discussed with parents, leading to proper treatment for the students. In school, students receive lectures on a healthy lifestyle from the doctors. In conclusion, 100% free medical check-ups are provided for students, diagnosing health-related problems and administering proper treatment.

https://drive.google.com/drive/folders/1Ls0rEc5ycjnNL6LsfZ11foZ_Ofe7v8AW?usp=drive_link

School development through public participation.The needs of the students have been fulfilled by the efforts of eminent members of the society, Educationalist, School Management Committee, Parents Teachers Association and Mother Parents Association. Provision of Internet, Competitive exams through public participation, Scholarship Exam.

Parasbag activity is to obtain fresh and nutritious vegetables for students while fostering agricultural knowledge through hands-on experience. It involves the efficient utilization of land for cultivating essential vegetables, resulting in pesticide-free produce. In the school garden, students actively participate in planting various vegetables such as spinach, cucumber, bitter gourd, brinjal, and coriander. This initiative not only provides a cost-saving benefit for students, considering the high market prices of fresh vegetables, but it also ensures the cultivation of healthier produce compared to what is available in the market. Additionally, students contribute to environmental sustainability through their involvement in kitchen gardening. The overall outcome is that students acquire knowledge about agriculture, actively engage in vegetable cultivation, and ultimately enjoy access to fresh, healthy, and nutritious vegetables. In conclusion, this approach enables students to access fresh, healthy,



and nutritious vegetables, while simultaneously gaining valuable insights into agriculture through practical experience.


https://drive.google.com/drive/folders/1pwxJVICwVjY5gy3p61ibPOlpDDtahT9J?usp=drive_link

Various competitions are arranged in the school, aiming to develop students' skills and provide a platform for showcasing their talents. The school celebrates the birth and death anniversaries of various great leaders by conducting speech competitions, Rangoli competitions, writing competitions, music competitions, fancy dress competitions, etc. Prizes are awarded by the school to students for their best performances.

Additionally, students actively participate in competitions organized by BMC, such as Balakotsav, pathnatya, Balchitrakala, etc. Students showcase their best performances and often win prizes. At the inter-school level, various competitions in crafts, drawing, music, and PT are arranged. Our dedicated teachers prepare students thoroughly, conducting regular practice sessions, resulting in our students consistently winning prizes across all competitions.

In conclusion, these competitions provide students with ample opportunities to showcase their talents, fostering skill development and contributing to their all-round growth.

----------**----------



शालेय विकासात विद्यार्थी हिताच्या उपक्रमातून शालेय नेतृत्वाचे प्रयत्न

शाळेचे नाव - डॉ.बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभाग, ठाणे.

शाळेचा पत्ता - विष्णूनगर, नौपाडा, ठाणे (पश्चिम).

शाळेचा ईमेल आयडी - drbedekarpri@gmail.com

मुख्याध्यापक नाव - सौ. सुरेखा संजय ठाणेकर

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - ९८१९४०१६०४

मुख्याध्यापक ईमेल आयडी - thanekarsurekha@gmail.com

प्रस्तावना -

मराठी भाषेतील मूलभूत क्षमतांमध्ये वाचन, लेखन, आकलन, आणि संभाषण यांचा समावेश होतो. या क्षमतांचा विकास मुलांसाठी आणि मोठ्यांसाठीही महत्त्वाचा आहे. कारण यातून संवाद साधता येतो. ज्ञान मिळवता येते आणि जीवनातील कामे व्यवस्थित पार पाडता येतात.

मग या क्षमतांचा विकास का आवश्यक आहे..? तर.....

या क्षमतांमुळे विद्यार्थ्यांना शाळेत चांगले शिक्षण घेता येते.

या क्षमतांमुळे विद्यार्थ्यांना इतरांशी सामाजिक संवाद साधता येतो.

या क्षमतांमुळे विद्यार्थ्यांना पुढे जाऊन चांगली नोकरी मिळण्यास मदत होते.

व्यक्तिमत्व विकास: या क्षमतांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांचे व्यक्तिमत्व प्रभावी होते. अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या या सुप्त गुणांच्या शक्तींची माहिती करून घेणे व अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतून त्यांचा विकास होणे आवश्यक असते. सराव, प्रशिक्षण, संधी व पक्वता यातूनच क्षमतांचा विकास होतो. केवळ माहिती वाचणे व पाठ करणे म्हणजे अध्ययन नसून अध्ययनातून विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या क्षमतांचा क्रमश: विकास होणे महत्त्वाचे असते.

या सर्वाचा विचार होण्याआधी शाळेची इमारतीच्या भक्कम पायाविषयी बोलावसं वाटतंय. अनुदानित शाळा या भारतातील शिक्षणव्यवस्थेतील एक महत्त्वाचा भाग आहे. सरकारी आर्थिक मदतीच्या आधारे कार्यरत असलेल्या या शाळांचे उद्दिष्ट म्हणजे सर्वसामान्य, विशेषत: आर्थिक व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे. हेच ध्येय समोर ठेवून आमचे प्रेरणास्थान डॉ. वा. ना. बेडेकर यांनी शाळेची स्थापना केली. प्राथमिक शाळेचे लावलेले इवलेसे रोप आता मोठा वटवृक्ष झालेला आहे. त्याच्या फांद्या दूरदूरपर्यंत पसरलेल्या आहेत.... अगदी जगाच्या काही देशांमध्येही या नावाची चर्चा आहे.

अशा पांडित्यांच्या आशीर्वादाने आम्हा बऱ्याच जणांची शिक्षक म्हणून सुरुवात झाली. अध्यापन एक कला असून त्या कलेचे नित्यनियमाने पूजन केले पाहिजे हे प्रथम शिकलो.... आणि तेव्हापासून अध्यापनकलेचे गमक सापडत गेले.

अभ्यासक्रमात दिलेल्या क्षमता केवळ पाठ्यपुस्तकातील आशयाच्या अध्यापनातूनच विकसित होत नाहीत, तर त्यासाठी सहशालेय उपक्रमांचीदेखील मदत घ्यावी लागते, हे लक्षात ठेवून विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त उपक्रमात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे हे माझे कर्तव्य आहे हे लक्षात ठेवून....

या कार्यात मुख्याध्यापक म्हणून मी सौ. सुरेखा ठाणेकर केवळ प्रशासनाचा भाग म्हणून नव्हे तर शाळेतील एकंदर शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने माझे प्रयत्न निर्णायक ठरतात आणि पुढेही ठरत जातील हा आत्मविश्वास आहे.

आजच्या घडीला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला ही जरी भाग्याची गोष्ट असली तरी... मराठी शाळांचा टक्का घसरत चालला आहे ही मोठी गंभीर बाब आहे. शहरी भागात असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे वाढते प्रस्थ व त्यांतील असलेल्या आकर्षक भौतिक सुविधा सगळ्यांना भुरळ पाडत आहेत. अशा ठिकाणी म्हणजे ठाणे शहराच्या केंद्रस्थानी माझी शाळा असून आजही माझ्या शाळेच्या प्रत्येक इयत्तेच्या पाच तुकड्या आहेत आणि पस्तीस किंवा त्यापेक्षा कमाल विद्यार्थी संख्या प्रत्येक वर्गात आहे याचा एक मुख्याध्यापक म्हणून मला अभिमान आहे. अर्थात हे सगळं टिकवण्यासाठी अपार प्रयत्न माझ्या शिक्षकांकडून व माझ्या कडून केले गेले आहेत.

फार पूर्वी ऍडमिशनसाठी आमच्या शाळेत रांगा लावाव्या लागायच्या. ते प्रमाण बरीच वर्षे टिकले. त्या वेळच्या सरकारी नियमानुसार एक ते दीड किलोमीटरच्या आसपासचीच मुले घेणे बंधनकारक राहिल्याने सन २०१६-१७ दरम्यान शाळेचा पट घसरत चालला होता.

त्यानंतरच्या दोन वर्षात अशीच परिस्थिती राहिली होती. त्यामुळे कुठेतरी आपण कमी पडत चाललो आहोत की काय असं वाटून मग मात्र आम्ही नवनवीन कल्पना राबवण्याचे ठरवले. जसे सेमीच्या वर्गांची सुरुवात. या निर्णयाला काही शिक्षकांनी पसंती दर्शवली नाही. तरीही निर्णयावर अटळ राहून मंजुरीपासून सगळे प्रयत्न केले गेले होते. अर्थात काळ सरकला पण या शाळेत ऍडमिशन मिळणार नाही या लोकांच्या मानसिकतेत बदल झाला नाही. लांब पल्ल्यावरच्या मुलांच्या पालकांना ऍडमिशन मिळणार नाही याच भ्रमात ते राहिले होते. त्यामुळे पुढच्या ऍडमिशनमध्ये थोडा बहुतचं फरक पडला. अर्थात अध्यापनात प्रयत्न जिकिरीने केले गेले तरीही पट त्यामानाने कमीच होता.

त्यानंतर करोना काळ आला आणि सगळं ठप्प झालं असं सगळ्यांच्या तोंडी वाक्य होतं. पण आमची शाळा करोना काळातही सुरू होती. अगदी २२ मार्च या निर्णायक तारखेनंतरही...

त्यावेळी ऑनलाईनचे रीतसर ट्रेनिंग घेऊन आम्ही सुरुवात केली. तरीही त्यात नावीन्यपूर्ण असे काही दिसत नव्हते. त्यानंतर मात्र ऑनलाईन अध्यापनाचे विविध मार्ग, मूल्यमापनाचे विविध पर्याय मी शोधून काढले. ते पर्याय बऱ्याच शिक्षकांनीही अवलंबले... आणि त्यांच्या अध्यापनात नवीनतम बदल केला. काळ कठीण गेला पण आमचं अध्यापन हे घरातल्या एका विद्यार्थ्यासाठी न राहता पालक, त्यांची लहान भावंडे, शेजारी यांच्यासाठीही प्रेरणादायी ठरले.

हे माध्यम हळूहळू यशस्वी होत शाळा सुरू झाल्या.... आणि जाहीरात न करताही बेडेकर शाळेचे नाव बऱ्याच ठिकाणी पोहोचले. त्यानंतर आम्ही थांबलो नाही. लांब पल्ल्यावरचे ऍडमिशन मिळवण्यासाठी, शाळेचा प्रसार करण्यासाठी आम्ही बालवाडी भेटी द्यायला लागलो. समाज प्रबोधनही सुरू केले.




तरी एक प्रश्न उपस्थित होताच तो म्हणजे खाजगी शाळेतील डोनेशनचा. परंतु संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना परिस्थिती समजली आणि त्यांनी पूर्वीच्या बऱ्याच अटी शिथिल केल्या. त्यानंतर मात्र ऍडमिशन वाढतच गेले ते आजपर्यंत...

तरीही हळूहळू नवीन समस्येला आम्हाला सामोरे जावे लागले ते म्हणजे बालवाडी वर्गात न गेलेले विद्यार्थी.. काहींनी तर पहिली किंवा दुसरीत असताना देखील कोणत्याही शाळेत ऍडमिशन घेतलेले नव्हते.... आणि असे विद्यार्थी आमच्याकडे आले होते.

परंतु हे आव्हान स्वीकारत आम्ही शिक्षणाची संधी कोणालाही नाकारली नाही. इव्हन आजही इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या मुलांची ऍडमिशन होतात तेव्हा असं कळतं की बरेच पैसे घेऊनही त्या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये समाधानकारक बदल दिसत नाही. जो आमच्या शाळेच्या मुलांमध्ये दिसतो. संस्कार व आत्मविश्वासाची जोडही त्याला असते हे पालकांच्या बोलण्यावरून समजते.

आत्ता आत्ता बाजूच्या इतर मराठी शाळेतील मुलांचाही कल आमच्या शाळेत येण्यासाठी झुकलेला असतो. शासकीय बऱ्याच प्रमाणात वाढलेल्या उपक्रमांमुळे, अशैक्षणिक कामांमुळे त्या शाळेतल्या विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होते व विद्यार्थ्यांच्या गुणांची घसरण होते असं पालक वारंवार सांगतात.

हे सगळं चित्र आमच्या समोर असतानाही इतक्या विद्यार्थ्यांचे भविष्य आपल्या हातात आहे आणि त्याला कोणतीही गोष्ट बाधक ठरू नये म्हणून त्या ही परिस्थितीत त्या निरागस विद्यार्थ्यांचा विचार करता आमचे प्रयत्न कमी पडत नाहीत. अर्थात शारीरिक व मानसिक कष्ट खूप होतात. पण एखादी तळमळ बाधक विचाराला थारा देत नाही हे अखेर खरे ठरत आहे.

अर्थात लिखित स्वरुपात कळत नसलं प्रत्यक्षात निरनिराळ्या आव्हानांना रोजच सामोरे जावे लागत आहे. आता शिक्षक भरती ही आमच्या संस्थेच्या माध्यमातून न होता समायोजन प्रक्रियेतून होत असल्याने आलेल्या प्रत्येक शिक्षकाला सामावून घेतलं जातं. त्यांमध्ये असलेल्या अध्यापनातल्या त्रुटी त्या शिक्षकाची मानसिकता ढळू न देता समजावून सांगणे आवश्यक ठरते.

त्यामुळे असे आलेले शिक्षक व पालकांच्या इंग्रजी की मराठी या वारंवार बदलत्या निर्णयातून आलेले अप्रगत विद्यार्थी यांना चालू इयत्तेमध्ये सामावून घेऊन त्याच्यात योग्य तो बदल घडवण्यासाठी खूपच प्रयत्नशील राहावे लागते.

अर्थात प्रयत्नांना शब्दांचे मोजमाप नसते. अर्थात ते एक कौशल्य असते. त्यामुळे इयत्ता पहिली ते चौथी या वयोगटाचा विचार करता विद्यार्थी केंद्रित भूमिका बजावत नियोजन व बदलाअभावी लागणारी तत्परता खूपचं आवश्यक ठरते.

त्या अनुषंगाने माझ्या शाळेत केलेल्या प्रमुख बाबी पुढील प्रमाणे -

१. शैक्षणिक दृष्टीकोन व नियोजन

मुख्याध्यापक हे शाळेचे शैक्षणिक दिशादर्शक असतात. त्याप्रमाणे सर्वप्रथम शाळेतील विद्यार्थ्यांच्या विद्यमान क्षमतेचा आढावा घेऊन नियोजन करणे मला आवश्यक वाटते व ते दरवर्षी विचारपूर्वक केले जाते.




संस्थेचा पाठिंबा -

विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या योजना राबवताना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी वारंवार संवाद साधायला लागतो. त्यासाठी लागणारे भौतिक सहकार्य किंवा आर्थिक सहकार्य मिळते म्हणूनच शाळेची शैक्षणिक प्रगती होत आहे.

भौतिक संसाधनांचा विचार करता रॅम्प, ऍक्वागार्डसह पिण्याच्या पाण्याची सोय, अद्ययावत वॉशरुमची सोय, उन्हाची झळ बसू नये म्हणून ग्रीन क्लॉथचे छप्पर, आवश्यक पंखे, ट्यूब लाईट्स, जनरेटर, संरक्षक फाटक, शेड, कार्यक्रमांसाठी सुसज्ज हॉल अशा एक ना अनेक सुविधा आमच्या संस्थेमार्फत पुरवल्या गेलेल्या आहेत.

मुलभूत क्षमता चाचण्या -

शिक्षकांकडून वर्गनिहाय मुलभूत क्षमता चाचण्या घेतल्या.

उदा. वाचनाची गती, लेखनाची शुद्धता, गणिती क्रिया, आकलन अशा क्षेत्रांमध्ये विद्यार्थी कुठे उणे आहेत, हे स्पष्ट झाल्याने त्यांच्या गुणवत्ता वाढीस भर देण्यासाठी प्रयत्न केले जातात.

स्तरनिहाय अभ्यासयोजना -

शिक्षकांबरोबर बसून विषयनिहाय व स्तरनिहाय (उदा. मूलभूत – मध्यम – प्रगत) व आत्ताच्या अभ्यासक्रमानुसार (निर्झर - पर्वत - आकाश) या अभ्यास योजना तयार केल्या आहेत. जेणेकरून प्रत्येक विद्यार्थी आपल्या गतीने शिकू शकेल व कोणताही न्यूनगंड न बाळगता प्रगती करू शकेल.

मुख्याध्यापक कक्ष -

मुख्याध्यापक कक्ष हा निव्वळ एक चौकशी करण्याचा कक्ष नसून बऱ्याच पालकांचं तसेच शिक्षकांचं आत्मप्रकटीकरण करण्याचा मार्गसुद्धा आहे. त्यावेळी समस्या सोडवण्यासाठीची एक सुलभक म्हणून माझी भूमिका मी चोख बजावते. काउन्सिलर म्हणून भूमिका घेताना वर्तमान आणि भविष्य याची सांगड घालून समोरच्याच्या विचारात परिवर्तन घडवून आणण्याची माझी जबाबदारी मी योग्य रीतीने पार पाडते.

शिक्षकांना मार्गदर्शन व प्रशिक्षणे -

शाळेतील शैक्षणिक उन्नतीसाठी शिक्षक हे केंद्रबिंदू असतात. त्यामुळे शिक्षकांच्या क्षमतेवर भर देणेही तितकेच आवश्यक ठरते.

सतत प्रशिक्षण व कार्यशाळा -

मराठी, गणित, वाचन, कृतीधारित शिक्षण, स्वयंप्रेरित शिक्षण यांसारख्या विषयांवरची प्रशिक्षणे शिक्षकांबरोबर मुख्याध्यापक म्हणून मी ही घेते. वरील विषयाला अनुसरून सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी विषय तज्ज्ञ बोलावून कार्यशाळा सुद्धा आयोजित केल्या जातात.

उदा. चांगला वाईट स्पर्श हे मुलांना सांगताना त्याची मुख्य बाजू आपल्याला समजली पाहिजे. या दृष्टीने नामांकित वकीलांमार्फत अनुभवांचे बोल ऐकताना त्यातील व्याप्तीचा अंदाज आला. त्याआधारे शिक्षक

पालकांना किंवा विद्यार्थ्यांना त्या गोष्टी चांगल्या प्रकारे समजावतात याचा अनुभव आहे. तसेच बाल मानसशास्त्र समजावे या दृष्टीनेही शिक्षक प्रशिक्षित केलेले आहेत.

सहशिक्षण संवाद -

आठवड्यातून एकदा 'शिक्षक बैठक' घेऊन सर्व शिक्षकांमार्फत एकमेकांचे अनुभव ऐकले जातात व त्या अनुषंगाने चांगले उपक्रम शिक्षक सर्वांना शेअर करतात.

निरीक्षण आणि अभिप्राय -

मुख्याध्यापक म्हणून मी वेळोवेळी वर्गात जाऊन निरीक्षण करून शिक्षकांना सकारात्मक अभिप्राय देते, जेणेकरून ते अधिक प्रभावीपणे शिकवू लागले आहेत. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करून अध्ययन प्रक्रिया कशी सोपी होईल हे सांगितल्यामुळे त्यांनी त्याप्रमाणे प्रयत्न सुरू केले आहेत.

विद्यार्थीनिर्देशित उपक्रम

विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता विकासासाठी शाळेत खालील उपक्रम राबवले गेले आहेत:

वाचन संस्कार अभियान -

शाळेमध्ये "वाचन तास" सुरू करण्यात आला आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी गोष्टी, कविता, माहितीपुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. चावडी वाचन या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना शालेय समितीच्या सभासदांसमोर वाचन करण्यास संधी मिळते. त्यामुळे वाचनातल्या आत्मविश्वासाची नक्कीच जोपासना होते. वर्तमान पत्र वाचन उपक्रम सुद्धा सुरू करण्यात आलेला आहे. त्याच्या मदतीने विद्यार्थी स्वयं अध्ययन, स्वयं विकास देखील करतो आहे.

गणिती खेळ -

विद्यार्थ्यांमध्ये गणिताची भीती कमी करण्यासाठी 'गणित गप्पा', खेळाच्या माध्यमातून अंकज्ञान, तोंडी क्रिया या वर्गावर्गातून स्पर्धा घेतल्या जातात.

व्यायाम पाढे -

विद्यार्थ्यांना पाढे पाठ करा असं सांगण्याऐवजी व्यायामाच्या आवडीतून परिपाठात कृती करवून पाढे म्हटले जातात.

शैक्षणिक साहित्य वापर –

मराठी, गणित, इंग्रजी व इतर विषयावरच्या बौद्धिक खेळासारख्या साधनांचा वापर सतत केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये त्या अनुषंगाने केल्या जाणाऱ्या कृतीमध्ये वाढ होत चालली आहे.

शिष्यवृत्ती परीक्षा -

काही विद्यार्थ्यांना ज्ञानाची अतिशय भूक असते अशांना आम्ही शिष्यवृत्ती परीक्षांना बसवतो. त्यांना शिक्षकांकडून योग्य ते ऑनलाईन व ऑफलाईनच्या माध्यमातून मार्गदर्शन मिळते. त्यांचा योग्य तो सराव घेतला जातो. तसेच त्यांना वैयक्तिक पातळीवरही मार्गदर्शन केले जाते.

बालनेतृत्व -

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, विचारशक्ती, संवादकौशल्य वाढावे यासाठी विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना वर्ग स्तरावर सहभागी केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपोआपचं चर्चेद्वारे नेतृत्व गुणांच्या पायऱ्या विकसित होत आहेत.

अध्यात्म संस्कार -

प्रत्येक इयत्तेद्वारे वेगवेगळ्या श्लोकांचे, प्रार्थनेचे पठण रोज केले जाते. शिवाय कधी कधी काही महत्त्वाच्या आध्यात्मिक वाचन व पठणासाठी त्यात पारंगत असलेल्या विशेष लोकांची सोय केली जाते. उच्चार सुधारणे हा त्यामागचा मूळ हेतू साध्य होण्यास मदत होते.

उदा. अथर्वशीर्ष पठण

विद्यार्थ्यांना त्या अनुषंगाने एखाद्या कार्यक्रमात जाऊन पठण करण्याची संधी देखील दिली जाते. संस्कृती संवर्धनाच्या माध्यमातून "रामायण परीक्षेसाठी" मुलांना बसवले जाते. त्यांनाही शिक्षकचं मार्गदर्शन करतात.

एक सूर एक ताल


सर्व वर्गात असलेल्या स्पिकर सोयींमुळे परिपाठ एकाचं वेळी सुरू होतो. त्यामुळे शिस्तीचे पालन होते. परिपाठात असलेल्या सर्व गोष्टी आपोआपचं पाठ होतात. शिवाय उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण घटत चालले आहे. आवारात येत जात असलेले पालक व इतरांनाही शिस्तीची सवय लागत चालली आहे.

आत्म संरक्षण, व्यायाम व खेळ

शहरीकरणामुळे व वाढणारी महागाई यामुळे घरातील दोन्ही पालकांना नोकरी किंवा व्यवसाय करावा लागतो. अशामुळे मुलांना वेळ देता येत नाही आणि परिणामी विद्यार्थ्यांना मैदानी खेळ खेळायला मिळत नाहीत. ही समस्या खूपच भेडसावू लागली असल्याने शाळेत प्रशिक्षकाच्या माध्यमातून आत्म संरक्षणाचे धडे दिले जातात. लवचिकता व मुक्त हालचालींना वाव देऊन व्यायाम करवून घेतले जातात. विविध खेळ घेऊन त्यांच्यात स्पर्धा निर्माण केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेबरोबर मानसिक क्षमतेचा विकास होतोय याचा खूप आनंद आहे. टर्फसारख्या आधुनिक सोयीमुळे मुले अधिक आनंदी आहेत हे स्पष्टपणे जाणवते.

संगणक कक्ष

आधुनिकीकरणात विद्यार्थी कुठेही कमी पडू नयेत म्हणून वैयक्तिक पातळीवर विद्यार्थ्यांना संगणक हाताळता येईल या दृष्टीने आमचा अद्ययावत संगणक कक्ष आहे. विद्यार्थी त्याआधारे आनंदाने कौशल्ययुक्त शिक्षण घेतात.



पाठ्यपुस्तकाबाहेरचा अनुभव -

आनंद बाजार उपक्रम

मुलांना शाळेच्या आवारात बाजार तयार करून व्यवहार शिकवणे हा त्यामागचा हेतू आहे. विद्यार्थी स्वतः खरेदी विक्रीच्या साहाय्याने आकडेमोड शिकतात.

व्यवसाय परिचय दिवस -

पालकांच्या व्यवसायाबद्दल जाणून घेण्याच्या निमित्ताने व व्यवसायाबद्दल माहिती होण्यासाठी वर्गात एक उपक्रम आयोजित केला जातो.

साप्ताहिक थीम आधारित शिक्षण -

प्रत्येक आठवड्याला एक थीम ठरवून त्यावर आधारित क्रिया:

प्राणी आठवडा – प्राणी मास्क तयार करणे, नावांपासून ते माहिती संकलन करेपर्यंत विद्यार्थी स्वतः कृतीशील राहील असेच प्रयत्न केले जातात.

पर्यावरण आठवडा - वृक्षारोपण, निसर्गचित्र काढणे. पर्यावरण पूरक कार्यक्रमांची माहिती देणे. फायदे, तोटे गंभीरतेने सांगणे. अध्यापनातही वारंवार उल्लेख करणे.

थोर नेत्यांच्या कर्तृत्वाचा आठवडा - विद्यार्थ्यांना थोर नेत्यांच्या परिचयाबरोबर भाषण, चित्र संकलन किंवा माहितीपर संग्रह करण्याची वृत्ती जोपासायला मदत करणे. प्रत्येक थोर नेत्याच्या मुख्य विचाराला प्राधान्य देऊन त्याचं थोर विचारांची जागृती विद्यार्थ्यांच्या मनात कायम जागृत राहील यासाठी प्रयत्न करणे.

अशा विविध उपक्रमांचे आयोजन शिक्षक करतात व त्यामागचा हेतू सफल करून शाळेच्या प्रगतीला हातभार लावतात.


दप्तराविना शाळा - आठवड्यातून एक दिवस केवळ पठण, गोष्टी, वाचन-संवाद, खेळ, व्यायाम यासाठी राखलेला आहे.

"मी शिक्षक" उपक्रम

विद्यार्थी एका दिवसासाठी शिक्षकाची भूमिका घेतात व शिकवतात. यात त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि पुनरावृत्तीही होते. आपल्याच वयोगटातील विद्यार्थ्यांना शिकवताना येणाऱ्या अडचणी समजल्यामुळे शिक्षकांप्रती असलेल्या आदर भावनेत निश्चितच वाढ होते.

बाल प्रयोगशाळा – साधे विज्ञान प्रयोग (पाणी, हवा, गुरुत्वाकर्षण).

यासारख्या प्रयोगात विद्यार्थी स्वतः सहभागी झाल्यामुळे अंधश्रद्धा किंवा चुकीच्या ऐकीव गोष्टींवरचा विश्वास कमी झालेला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत होऊन जिज्ञासू प्रवृत्ती निर्माण होण्याकडे कल वाढत चालला आहे.



साफसफाईचा दिवस - स्वच्छतेविषयी कायमच सवय लावण्यासाठी, तसेच आपल्या शाळेत असणाऱ्या शिपाई वर्गाच्या कामाला समजून घेण्यासाठी या दिवसाची मदत होते. विद्यार्थी कुटुंबासह बाहेर फिरायला गेला तरी आवर्जून रस्त्यावर कचरा न करण्याचे लक्षात ठेवतो. ही मोठी शिकवण नकळत ते शिकत जातात.

कलागुणांचा विकास

एक दिवस - एक कला

प्रत्येक आठवड्याला एक कला सादर होते: गाणं, नृत्य, नाटुकले.

स्नेह संमेलन -

वर्षातून एकदा सामूहिक कलेचे सादरीकरण होते. विद्यार्थ्यांनाचं संयोजकाची भूमिका दिली जाते. प्रार्थना, स्वागत गीत आणि निवेदनातही विद्यार्थीचं सहभागी होतात आणि विद्यार्थीचं नृत्य सादरही करतात.

विद्यार्थी समस्या -

सध्या असलेल्या विभक्त कुटुंब पद्धती किंवा घरातील वातावरण यामुळे काही विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीत खूप बदल दिसून येतो. अशा निदर्शनास आलेल्या गोष्टी पालकांना अतिशय समजपूर्वक सांगितल्या जातात. शिवाय विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याचे पूर्ण स्वातंत्र्यही दिले जाते. तसेच त्या विद्यार्थ्याची व पालकांची गोष्ट गुप्त ठेवणे ही देखील कर्तव्ये शाळेकडून पार पाडली जातात.

तंत्रज्ञान वापर -

ऑडिओ स्टोरी टाईम

भाषेचा विकास होण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टी ऐकवल्या जातात.

शाळेची डिजिटल खोली

डिजिटल बोर्ड / लॅपटॉप या द्वारे शैक्षणिक खेळ, गोष्टी, विषयवार ज्ञान विद्यार्थ्यांना मिळते. दृक्श्राव्य ज्ञान मिळत असल्याने विद्यार्थी खिळून राहतो व ते ज्ञान चिरकाल टिकते असा अनुभव आम्हाला आहे.

भटकंती -


निसर्ग, स्थळ परिचय, एखाद्या ठिकाणाची माहिती होण्यासाठी तसेच एकोपा वाढवण्याच्या दृष्टीने एक दिवस शाळेविना 'सहल' म्हणून सर्व विद्यार्थी व शिक्षक असा एकत्रित घालवला जातो.

पालक सहभाग आणि समुदायाचे योगदान -

शाळा व आमचे पालक यांच्यातील दुवा खरोखरच मजबूत आहे.

पालक बैठका - प्रत्येक तीन महिन्यांतून पालक बैठक घेतली जाते. विद्यार्थ्यांना प्रगती समजावून सांगितली जाते. पालकांच्या सूचना ऐकून घेऊन त्यावर उपाय योजनाही राबविण्यात येतात.

उदा. शाळेच्या आतील आवारात पूर्वी शेड नव्हती. पालकांच्या विनंतीवरून पक्की शेड बांधण्यात आली.



पालक कार्यशाळा -

पालकांसाठी 'घरात शिक्षण कसे द्यावे', 'मुलांची संवादशैली कशी वाढवावी' अशा कार्यशाळा ऑनलाईन किंवा ऑफलाईन माध्यमातून घेतल्या जातात.

पालक शिक्षक दिवस -

पालक काही वेळ वर्गात शिकवतात. त्यांच्यात असलेले कौशल्य ते मुलांसमोर सादर करतात. त्यामुळे एक शिक्षकी वर्ग असला तरी अशा नवनव्या उपक्रमांमुळे आलेल्या पालकांचेही विद्यार्थी स्वागत करतो.

स्थानिक समुदायाचे सहकार्य -

स्थानिक स्वयंसेवी संस्था, माजी विद्यार्थी, काही प्रतिष्ठित लोक यांनाही शाळेच्या कार्यक्रमात सहभागी करून शाळेचा दर्जा उंचावण्यात आला आहे. त्यांची यशोगाथा पालकांसमोर आल्याने त्यांच्यातही सकारात्मक बदल होत आहे.

तंत्रज्ञानाचा वापर

डिजिटल साधनांचा वापर -

ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, मोबाईल ॲप्स, व्हिडिओ कंटेंटचा उपयोग करून शैक्षणिक प्रक्रिया अधिक आकर्षक केली गेली जाते.

शाळेचे प्रेरणादायी व सुरक्षित वातावरण

स्वच्छता व सजावट -

विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळेचे भित्तीचित्र, सुविचार, शिक्षणाशी संबंधित पोस्टर्स तयार करून शाळेचे वातावरण शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध केले जाते.

प्रेरणादायी भिंती -


"उत्तम विद्यार्थी" यांसाठी विशेष भिंत, प्रेरणादायी फलक लेखन, काही विशेष लेखन फलकाच्या भिंती शाळेत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता वाढवली जाते.

ज्ञानाची भिंत व पायऱ्या -

विविध शैक्षणिक मजकूर येता जाता विद्यार्थ्यांच्या दृष्टीक्षेपात येत असल्याने विद्यार्थी सहज ते ग्रहण करत जातात.

सीसीटीव्ही -

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तळ मजल्यापासून ते प्रत्येक मजल्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.



पुरस्कार व सन्मान -

दर महिन्याला "गुणवंत विद्यार्थी", "वाचनवीर", "गणितगुरू" यांसारखे पुरस्कार देऊन विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता निर्माण केली जाते. शिवाय "आदर्श विद्यार्थी" अशीही वार्षिक निवड केली जात असल्याने स्पर्धेसाठी कधी कधी चुरस लागते. विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार केला जातो. उदा. आमच्या शाळेचा एक विद्यार्थी कार्यक्रमात जाऊन संबळ हे वाद्य वाजवतो. तसेच एक विद्यार्थिनी मोठमोठ्या व्यासपीठावर शिवरायांच्या जीवनावरील प्रसंग तिच्या वक्तृत्व कलेतून साकारते. एका विद्यार्थिनीचे गणपतीचे गाणे तिच्याच आवाजात रेकॉर्ड झाले असून ते घराघरात प्रसिद्ध होत चालले आहे. एक विद्यार्थिनी राज्य स्तरावर मल्लखांब खेळून आलेली आहे.

गुणवत्तेचे सातत्य आणि मूल्यांकन

सतत व सर्वसमावेशक मूल्यमापन -

गुणवत्तेच्या सातत्यपूर्ण व सर्वसमावेशक मूल्यमापनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांना बैठक घेऊन समजावून सांगितले जाते. मूल्यांकन केवळ परीक्षा नव्हे तर सर्व अंगाने होईल याची त्यांच्याकडून खात्री केली जाते.

विद्यार्थ्यांचे वैयक्तिक प्रगती पत्रक -

प्रत्येक विद्यार्थ्याचे मूलभूत क्षमतेचे वेळोवेळी विश्लेषण करून त्याच्या प्रगतीचा मागोवा घेण्यात येतो.

विशेष गरज असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रयत्न -

विशेष गरज असलेल्या किंवा मागास भागांतील विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. शिक्षक व मुख्याध्यापक स्वतः अशा मुलांसाठी नेहमी कार्यरत राहतात. त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांना सर्वतोपरी मदत केली जाते.

समावेशीत शिक्षण -

विशेष गरज असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शाळेमध्ये सहाय्यक साधने मिळवण्यासाठी कायम प्रयत्न केले जातात.

उपचारात्मक वर्ग -

जे विद्यार्थी मागे पडले असं वाटतं, त्यांच्यासाठी विशेष मेहनत घेतली जाते.

निष्कर्ष -

विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमतांचा विकास हा कुठल्याही शिक्षणसंस्थेचा मूळ उद्देश असतो. या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी मुख्याध्यापकांची भूमिका केवळ प्रशासकीय नसून प्रेरणादायक, मार्गदर्शक आणि संलग्नकाची आहे असं मला वाटतं. त्यासाठी अर्थातच चौफेर दृष्टीच्या विचारांची ही गरज आहे.




मुख्याध्यापक म्हणून मी केलेले प्रयत्न शैक्षणिक नियोजन, शिक्षक मार्गदर्शन, विद्यार्थीनिर्देशित उपक्रम, पालक सहभाग, तंत्रज्ञान वापर, आणि प्रेरणादायी वातावरण – या साऱ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन, गणित, संवाद व सामाजिक क्षमतांचा सकारात्मक विकास.

या प्रयत्नांमुळे माझ्या शाळेची गुणवत्ता वाढत आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आहे आणि सर्वांगीण शिक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल माझ्याकडून नक्कीच उचलले जाते आहे याची पूर्णपणे खात्री आहे.

आपले अध्यापन विद्यार्थीकेंद्रित, आनंददायी आणि कृतीयुक्त करण्यासाठी प्रयत्नशील राहावे लागते. अपेक्षित असलेल्या किमान क्षमता विकसित करताना विद्यार्थ्यांना नाउमेद न करता त्यांच्याशी जवळीक साधून त्यांचा विश्वास संपादन करावा आणि विश्वासातून त्यांचा आत्मविश्वास वाढीस लावावा या कार्यात सगळे शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून आमची जबाबदारी आहे याचं भान निश्चितच आम्हाला आहे.

वर्गात मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी घटक सोपे करून शिकवणे, उपचारात्मक अध्यापन करणे. प्रभुत्व संपादनासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा सराव देणे. त्यासाठी त्यांना स्वयंअध्ययन साहित्याचा उपयोग करण्यास प्रवृत्त करणे. या बाबी तोंडी न सांगता प्रत्यक्षात वर्गात जाऊन कार्यवाही कशी करावी हे माझ्याकडून सांगितले जाते.

सर्व विद्यार्थ्यांत सर्व क्षमता विकसित होण्यासाठी प्रयत्न करावा हा मूळ उद्देश डोळ्यांसमोर ठेवून मुख्याध्यापक म्हणून माझे प्रयत्न सतत सुरू असतात.

भविष्यातही आणखीन नवनवीन कल्पना व उपक्रमांच्या माध्यमातून मी प्रयत्नांची पराकाष्ठा करेन यात शंकाच नाही.

वरील सर्व लेखनात बाबी मांडल्या गेल्या आहेत. परंतु त्याची प्रत्यक्ष कार्यवाही विद्यार्थ्यांला अनुसरून असते. प्रत्येक विद्यार्थ्याचा समजण्याचा काळ हा कमी जास्त असू शकतो. त्यामुळे आमच्या शाळेतल्या शिक्षकांच्या व मुख्याध्यापक म्हणून माझ्या प्रयत्नांना शब्दांत मोजणे खरंच अवघड आहे.

तरीही कागदोपत्री नव्हे तर विद्यार्थ्यांचं हीत खऱ्या अर्थाने जपणे हे आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे असं मानून आम्ही आमच्या नोकरीच्या कालावधीत व त्यानंतरच्या काळातही प्रयत्न करत राहू ही सदिच्छा व्यक्त करत आहे.

शिवाय या लेखन माध्यमातून आणखी एक सांगेन की या अशा यशोगाथेच्या माध्यमातून आत्म संकलन करण्याची संधी मिळाली म्हणून खूप आनंद होत आहे. प्रोत्साहन देणे हे काळाची गरज आहे. त्यामुळे आजचा हा विषय माझ्या प्रोत्साहनाला बळ देऊन गेला असं नक्की सांगेन.

----------**----------




विद्यार्थ्यांच्या क्षमता संवर्धनात शालेय नेतृत्वाची भूमिका


शाळेचे नाव - कुळगाव बदलापूर नगरपरिषद शाळा क्र.१५,एरंजाड

शाळेचा पत्ता - मु.पो.एरंजाड,बदलापूर (प.),ता.अंबरनाथ,जि.ठाणे

शाळेचा ईमेल आयडी - eranjads15@gmail.com

मुख्याध्यापक नाव - सौ.वृषाली वसंत बोराडे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9420574760



विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता -

विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या क्षमता असू शकतात. काही मुख्य क्षमतांमध्ये ज्ञान, आकलन,उपयोजन, विश्लेषण, संश्लेषण आणि मूल्यमापन याचा समावेश होतो. या सोबतच संवाद कौशल्य , समस्या समाधान क्षमता आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्याची क्षमता देखील विद्यार्थ्यांसाठी खूप महत्वाची आहे.

विद्यार्थ्याच्या मुलभूत क्षमता:-

- **ज्ञानाधारित क्षमता:** विषयांचे ज्ञान आणि संकल्पना समजून घेणे.
- **आकलन क्षमता:** माहितीचे विश्लेषण करणे आणि अर्थ काढणे.
- **उपयोजन क्षमता:** प्राप्त ज्ञानाचा वापर दैनंदिन जीवनात किंवा समस्या सोडवण्यासाठी करणे.
- **विश्लेषण क्षमता:** माहितीचे लहान भागांमध्ये विभाजन करणे आणि त्यातील संबंध ओळखणे.
- **संश्लेषण क्षमता:** वेगवेगळ्या माहितीचे एकत्रीकरण करून नवीन काहीतरी तयार करणे.
- **मूल्यमापन क्षमता :** माहितीचे मुल्यांकन करणे आणि योग्य निष्कर्ष काढणे.

या क्षमता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक आहेत.

ज्ञानाधारित क्षमता



इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना गणित विषयाच्या संकल्पना सोप्या पद्धतीने शिकवले व समजावून सांगितले जातात.



इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांमध्ये गणिताची भीती घालवून त्यात आवड निर्माण करणे आणि गणिताकडे सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्यास शिक्षक मार्गदर्शन करतात .

आकलन क्षमता



इयत्ता १० वी चे विद्यार्थी स्वतःच्या ज्ञानाचे स्वयं मुल्यमापन करतात,त्यांच्या प्रगतीवर चिंतन आणि सखोल आकलन करून अध्ययनात येणाऱ्या समस्या शिक्षकांकडून सोडवून घेतात.



विद्यार्थ्यांची एकाग्रता क्षमता वाढवण्यासाठी शाळेकडून विविध वाचन उपक्रम राबवले जातात.

उपयोजन क्षमता





विद्यार्थ्यांचे मंत्रिमंडळ स्थापन करून त्यांना मतदान,सामान्य माणसाचे हक्क आणि मतदान प्रक्रिया यासर्वांचा अनुभव घेता येतो व निवडून आलेले मंत्री हे मंत्रिमंडळाचे कामकाज सांभाळून त्यांचा अनुभव घेतात.





विश्लेषण क्षमता





संश्लेषण क्षमता





मूल्यमापन क्षमता


vivo X60 Pro+ | ZEISS


Old IS Gold
4/3/2025
Tuesday
Science
15: Fun with Magnets
Magnet
Magnetism
Repulsion
Attraction
North South


vivo X60 Pro+ · ZEISS
31-Mar-2023, 14:48




















Shot on OnePlus
Powered by Triple Camera




शिक्षण सप्ताह
दिनांक २२ ते २८ जुलै २
नियोजित कार्यक्रम प्र
दिनांक
उपक्रमाचे नाव


शिक्षण सप्ताह
दिनांक २२ ते २८ जुलै
नियोजित कार्यक्रम
दिनांक
उपक्रमाचे


DAYS OF THE WEEK
SUNDAY
MONDAY
TUESDAY


कु.ब.न.प.पर्यावरण पूरक शाळा क्र.१५ एरंजाड,ता.अंबरनाथ
दि.१५।६।२०२४
मोफत पाठ्यपुस्तके वाटप कार्यक्रम


कु.ब.न.प.पर्यावरण पूरक शाळा क्र.१५ एरंजाड,ता.अंबरनाथ
दि.१५।६।२०२४
मोफत पाठ्यपुस्तके वाटप कार्यक्रम


2000
Shot on OnePlus
Powered by Triple Camera










Shot on U10
Vivo AI camera




राष्ट्रीय प्रतीके
NATIONAL SYMBOLS
भारताची राष्ट्रीय प्रतिके
राष्ट्रीय स्वान - तिरंगा
राष्ट्रीय फळ - आंबा
राष्ट्रीय पक्षी - मोर
राष्ट्रीय फूल - कमळ
राष्ट्रीय खेळ - हॉकी
राष्ट्रीय प्राणी - वाघ
राष्ट्रीय वृक्ष - वटवृक्ष
राष्ट्रीय मुद्रा - रुपया


9:40
video_20240725_091721
00:54
01:06
1.0x


BLUE STAR
वॉटर कूलर



ZEISS


Opposite Words










Mars
Sun
Jupiter




गणितअध्ययन
कोपरा




भाषा अध्ययन
कोपरा








निपुण भारत
पूरक शैक्षणिक साहित्य संच
२०२४-२५
(मराठी माध्यम)
निपुण भारत
पूरक शैक्षणिक साहित्य संच
२०२४-२५
(मराठी माध्यम)


99022509

----------**----------

विद्यार्थ्यांची वाचन क्षमता वृद्धिंगत करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा उमरी (कु.)

शाळेचा पत्ता —उमरी (कु.) केंद्र,वायगाव गोंड, तालुका समुद्रपुर जिल्हा वर्धा

शाळेचा ईमेल आयडी - zpupperprimaryschoolumari@gmail.com

मुख्याध्यापक नाव - सौ. सुषमा अरविंद फुलपाटील

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9096234512

मुख्याध्यापक ईमेल आयडी - fulpatilsushama@gmail.com

प्रस्तावना —


वर्धा जिल्ह्याच्या समुद्रपूर तालुक्यातील नांद नदीच्या काठावर वसलेले, बेट म्हटले तरी चालेल असे उमरी(कु.) हे गाव . या गावात जिल्हा परिषदेची उच्च प्राथमिक शाळा इयत्ता १ ते ८. या गावातील शाळेची 2018 -19 ची पटसंख्या केवळ 25 होती. इयत्ता १ ते ८ व विद्यार्थी 25 हे प्रथम मला आश्चर्यच वाटले त्यातही बरेच विद्यार्थी वाचू शकत नव्हते. तर पालकांशी चर्चा केल्यानंतर असे आढळून आले की 6 ते 18 या वयोगटातील 20 ते 25 विद्यार्थी बाहेरगावी शिकावयास जातात. यावरून असे दिसून येते की गावातील शाळेविषयी पालकांची उदासीनता .

शिक्षण हे मानवी गरजा पूर्ण करण्याचे व समृद्ध जीवन जगण्याचे अत्यावश्यक साधन आहे. जगातील प्रत्येक बालकास "सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण व गुणवत्तापूर्ण शिक्षण" देणे हे "राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 "चे मुख्य उद्दिष्ट आहे.

RTE- 2009 नुसार वय 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांना शिक्षण हे निशुल्क आणि अनिवार्य आहे. या शिक्षण व्यवस्थेचा हेतू तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेल्या सहानुभूती,धैर्य,चिकाटी, कल, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी आणि मूल्य असलेल्या चांगल्या व्यक्ती विकसित करणे असा आहे.

शाळेतील वातावरण आनंददायी असले पाहिजे ज्यामुळे विद्यार्थी शाळेत रममाण होईल विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी एक सुरक्षित व प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण, चांगल्या पायाभूत सुविधा आणि उपयोगी संसाधने उपलब्ध करून दिल्यास आपल्या शाळेतून नक्कीच उत्तम नागरिक तयार होतील.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये शालेय शिक्षणाच्या अनुषंगाने बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण "पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान", गळतीचे प्रमाण कमी करणे आणि शिक्षण हे आनंददायी व रंजक करणे या बाबींचा वापर करणे हे ही तेवढेच महत्त्वाचे आहे.



समस्या :-

1) विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्याचा अभाव .
2) विद्यार्थ्यांमध्ये लेखन व गणित कौशल्याचा अभाव.
3) पालकांची शिक्षणाबाबत अनास्था.

बदलाची सुरुवात :-

2018 मध्ये मी सौ. सुषमा अरविंद फुलपाटील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा उमरी (कु.) येथे रुजू झाले व सेवा जेष्ठतेप्रमाणे मुख्याध्यापिका म्हणून शाळेचा पदभार स्विकारला.

2018 -19 मध्ये इयत्ता 1 ते 8 ची पटसंख्या केवळ 25. काही पालकांशी चर्चा केल्यानंतर असे लक्षात आले की वय 6 ते 18 वयोगटातील 20 ते 25 विद्यार्थी बाहेरगावी शिकावयास जातात, हे ऐकून माझे मन अस्वस्थ झाले. बाहेरगावी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या शाळेकडे कसे वळवता येईल त्याकरिता घरोघरी जाऊन पालकांशी संवाद साधला व पालक सभेचे आयोजन केले.

पालक सभा फोटो -



पालकांशी झालेल्या चर्चेत असे लक्षात आले की आमचा पाल्य उत्तम प्रकारे वाचन करू शकला पाहिजे, गणितीय क्रिया त्याला करता आल्या पाहिजे, एकंदरीत त्यांच्या मते "पायाभूत शिक्षण व संख्याज्ञान" यायलाच पाहिजे व पालकांच्या या मताशी मी 100% सहमत आहे.

तेव्हाच मी मनाशी ठरविले की माझ्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला वाचन कौशल्य अवगत झालेच पाहिजे, त्याकरिता **NIPUN BHARAT** अंतर्गत आलेल्या पेटीतील वाचन कार्ड, शब्द पट्ट्या, वाक्यपट्ट्या यांचा उपयोग करून वाचन घेऊ लागले व विद्यार्थी देखील कृतीयुक्त शिक्षण असल्यामुळे आनंदाने वाचन करू लागले.



वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. भारताचे दिवंगत राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 15 ऑक्टोबर हा संपूर्ण राज्यामध्ये "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील वाचनाची गोडी वाढावी, वाचन छंद म्हणून जोपासावा.

वाचन हा केवळ छंद न राहता 'गरज' म्हणून आपण वाचन केलेच पाहिजे. पुस्तके हे आपणास जगाशी जोडतात. वाचनामुळे स्वतःची तशी देशाची जडणघडण होते हे पालक व विद्यार्थी यांना पटवून देण्यात आले. "मी रोज वाचनाशिवाय माझा दिवस वाया जाऊ देणार नाही" असा संकल्प स्वतःशी करूया व तो अमलात आणुया आम्ही असे सर्व विद्यार्थ्यांकडून ठरवून घेतले.




वाचनाकरता घेण्यात आलेले उपक्रम -

1) चित्र शब्द.
2) वस्तू शब्द.
3) शब्द पट्ट्या वाचणे.
4) वर्तमानपत्रातील, नोटांवरील, कॅलेंडरवरील शब्द वाचणे.
5) पुस्तक वाचणे.
6) अक्षर देऊन शब्द बनविणे — प- पपई, परी, पतंग, फ —फणस, फळा
7) मुलांबरोबर संवाद साधणे.
8) चित्र वर्णन करणे.
9) गाणी गोष्टी सांगणे.
10) मुलाखत घेणे.

विद्यार्थी दिसेल त्या ठिकाणी लिहून असलेला मजकूर पाहून वाचन करू लागले यामुळे पालकांनाही आनंद झाला. हे सर्व करीत असताना मुले कुठेही दबावाखाली येऊन कृती करीत नाहीत. प्रत्येक गोष्ट ते स्वयं अध्ययनाने शिकत आहेत. त्यांना त्यांच्या सर्जनशीलतेतून निर्भेळ आनंद मिळतो आणि त्यांच्या या आनंदामुळे माझा व पालकांचा हुरूप वाढून आम्ही प्रत्येकाच्या

सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केलेत. त्याचे फलित म्हणजे विद्यार्थी स्वतः कार्यक्रमात भाषण देण्यास उत्स्फूर्तपणे सहभागी होऊ लागले.



निपुण भारत अभियान अंतर्गत 'पायाभूत साक्षरता' ही आजीवन शिक्षणाची एक आवश्यक अट आहे 'पायाभूत साक्षरता' प्राप्ति करिता "वाचन" सवय एक महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कल्पकता, नवनिर्मिती, सर्जनशीलता हे गुण विकसित होतात. विद्यार्थ्यांचा भाषा विकास होण्यासाठी मातृभाषेमध्ये मौखिक भाषा ज्ञान, समज पूर्वक एकणे व लेखन कौशल्यांचा विकास होणे आवश्यक आहे .ज्या विद्यार्थ्यांचा मातृ भाषेचा पाया मजबूत असतो ते विद्यार्थी इंग्रजी व अन्य भाषा अधिक सहजतेने शिकू शकतात. वाचनाने समृद्ध होत जाणारा माणूस हा जीवनाकडे अतिशय उमेदीनेच बघणारा असतो.' आता सारे संपले आहे'- ही म्हण काळोखून टाकणारी निराशा त्याला कधी न येता - ही तर नवी सुरुवात आहे. चला उत्तम काही घडवूया! त्यासाठीच तर आपले जीवन आहे. ही प्रेरणा आपल्याला ग्रंथ देतात, हे पालक व विद्यार्थी यांच्या लक्षात आले. पुस्तकेच आपल्याला नवीन पुस्तकाकडे नेतात." पुस्तक कुठली वाचू?" या प्रश्नावर तेथेच न थांबता आपल्या स्वाभाविक आवडीप्रमाणे कुठलाही साहित्यप्रकार निवडून विद्यार्थी व पालक सुद्धा वाचन करू लागली. पुस्तक वाचण्यासाठी निवडताना शेजारच्या वाचकांशी तुलना करण्याची काहीच गरज नसते. शाळेत विद्यार्थ्यांचे वाढदिवस साजरे केले जातात त्यामध्ये विद्यार्थ्यांना वाढदिवसाला 'पुस्तक' भेट देण्यास सुरुवात केली. त्यामुळे विद्यार्थ्याकडे वेगवेगळ्या पुस्तकांचा संग्रह झाला. त्यातून विद्यार्थी एकमेकांची पुस्तक वाचू लागली. वाचनामुळे विचार करण्याचा दृष्टिकोन बदलतो शब्द संपत्ती वाढते, आत्मविश्वास आणि

अभिव्यक्ती शक्ती वाढली वाचनासोबतच विद्यार्थ्यांना आनंद देतील असे विविध उपक्रम शाळेत राबविणे सुरू केले त्यामुळे विद्यार्थी विविध वेशभूषा त्या सणाचे महत्त्व समजून घेऊ लागले.

दहीहंडी उत्सव :- जन्माष्टमी



आपल्या भारत देशामध्ये विविध सण साजरे केले जातात. त्याप्रमाणे आपल्या महाराष्ट्रामध्ये साजरा केला जाणारा उत्सव म्हणजे श्रीकृष्ण जन्माष्टमी. श्रीकृष्ण जन्माष्टमीला दहीहंडी हा उत्सव घेण्यात येतो. या उत्सवांमध्ये लहान -थोर सर्वच सहभागी होत असतात. त्याचप्रमाणे आमच्या शाळेतील विद्यार्थी, ग्रामस्थ व सर्व पालक वर्ग सुद्धा मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. विद्यार्थी श्रीकृष्ण व गोपिकांच्या वेशभूषा करून आले अशा प्रकारे दहीहंडी हा उत्सव आनंदाने पार पाडला.

वाढदिवस :-

विद्यार्थ्यांना आपल्या शाळेविषयी आवड निर्माण करायची असेल तर विविध सहशालेय उपक्रम घ्यावे लागतात व सर्व विद्यार्थ्यांचा त्यात सहभाग राहील याची दक्षता बाळगावी लागते. तसेच विद्यार्थ्यांचा वाढदिवस म्हणजे त्यांचा अतिशय आनंदाचा दिवस असतो त्यांचा आनंद द्विगुणित व्हावा याकरिता शाळेत प्रत्येक विद्यार्थ्याच्या वाढदिवस साजरा केला जातो.



मातीच्या विविध वस्तू तयार करणे :-

कार्यानुभव विषयांतर्गत विद्यार्थ्याकडून मातीच्या विविध वस्तू तयार करून घेण्यात येतात.



वाचन प्रेरणा दिन :-

वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्याकडून शालेय ग्रंथालयातील विविध पुस्तकांचे वाचन करून घेण्यात आले .

1) वाचनामुळे स्वतःमधील आत्मविश्वास वाढतो.
2) भाषणामुळे आपण वाचलेली गोष्ट, माहिती इतरांना सांगू शकतो.

हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आले व त्यामुळे विद्यार्थी अधिकाधिक पुस्तके वाचण्याचा प्रयत्न करतात.



रांगोळी स्पर्धा :-


'आजादी का अमृत महोत्सव' अंतर्गत विद्यार्थ्यांच्या रांगोळी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले असता जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला व सुंदर अशा रांगोळ्या विद्यार्थ्यांनी काढल्या त्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढतो.



गणित दिवस :-

भारतामध्ये श्रीनिवास रामानुजन यांची जयंती "राष्ट्रीय गणित दिवस" म्हणून साजरा करतात त्यांचा जन्म 22 डिसेंबर 1887 साली झाला. श्री रामानुजन यांना भारतीय गणितज्ञ म्हणून ओळखले जाते. 22 डिसेंबरला रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या त्यात विद्यार्थ्यांनी "भौमितिक रचना" तसेच गणितीय सूत्र यांचे रेखाटन केलेले दिसून येत आहे.





कवायत व योगासने:-

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा शिक्षणाचा उद्देश आहे. शाळेत विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, भाषा, सामाजिक शास्त्र या विषयाबरोबरच कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण या विषयाचा

देखील अंतर्भाव आहे. शारीरिक शिक्षणाच्या तासाला विद्यार्थ्याकडून कवायत व योगासने प्रात्यक्षिक करून घेण्यात येते.



पोषण अभियान सप्ताह :-

विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासामध्ये पोषणाचे (आहाराचे) अधिक महत्त्व आहे. त्यामुळे आपला आहार कसा असावा,आहारात कोणकोणत्या पदार्थाचा समावेश असावा प्रथिने,जीवनसत्व यांचे महत्त्व समजावून देण्यात आले. तसेच जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे कोणकोणते आजार जडतात याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. गावांमध्ये जनजागृती व्हावी या करिता प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभातफेरीमध्ये अंगणवाडी ताई,मदतनीस, शाळेतील सर्व शिक्षक व शाळा व्यवस्था समितीचे सदस्य यांचा सहभाग होता.



परिणाम :-

1) ग्रंथालयातील पुस्तक वाचन:- विद्यार्थी ग्रंथालयातील पुस्तके कथा गोष्टी स्वतःच वाचतात व वाचलेल्या गोष्टी इतरांना सांगतात .


2) काव्य वाचनाची आवड निर्माण झाली:- बालकवींनी लिहिलेल्या निसर्गावरील कविता तसेच बहिणाबाई चौधरी यांनी वास्तविक घटनेवर आधारित लिहिलेल्या कवितांचे वाचन व गायन केल्यामुळे आपण ही कविता लिहू शकतो असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला.

3) विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होऊ लागले:- वाचनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास इतका वाढला की स्वतः वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होऊ लागले .

4) मुलाखत घेऊ लागले :- वाचनामुळे संवाद कौशल्य विकसित झाल्यामुळे निर्भयपणे अनोखी व्यक्ती जरी पुढे आले तरी निसंकोचपणे मुलाखत घेतात याप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये होणारा बदल पाहून पालकांची मने जिल्हा परिषद शाळेकडे वळली व पुढील दोन वर्षात शाळेची पटसंख्या 58 वर आली हेच माझ्या कार्याची सफलता आहे .

“वाचन ही एक केवळ सवय नाही, ती एक शक्ती आहे.” जी व्यक्तीमत्व घडवते. विचारांची दिशा बदलते आणि जग जिंकायचं स्वप्न दाखवते अशाप्रकारे शिक्षक आणि गावक-यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे उमरी (कु.) या गावाचे शिक्षणाचे चित्र पालटलं.

----------**----------



ज्ञानरचनावादी व स्वयंअध्ययनास प्रेरणा देणाऱ्या शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सास्ताबाद

शाळेचा पत्ता - सास्ताबाद ,केंद्र वाघोली पं.स. हिंगणघाट ,जिल्हा वर्धा

मुख्याध्यापक नाव - रामचंद्र गुलाबराव पारसे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9823243945

मुख्याध्यापक ईमेल आयडी - ramparse30@gmail.com



प्रास्ताविक: -

शिक्षणाच्या प्रक्रियेत विविध योजना उपक्रमांच्या माध्यमातून शाळा व विद्यार्थी विकासात मिळालेल्या फलितांचे लेखन म्हणजे यशोगाथा. माझ्या जि. प. प्राथमिक शाळा सास्ताबाद, केंद्र वाघोली, पंचायत समिती हिंगणघाट, जि. प. वर्धा. या शाळेची यशोगाथा लिहितांना मला अतिशय आनंद वाटत आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच आपल्या शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत असताना त्यांचा बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक, नैतिक विकास होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्यासाठी वर्षभर सहशालेय उपक्रमाचे आयोजन करून त्यात शालेय स्तरावर विविध देशी क्रीडा स्पर्धांचे आयोजन, रांगोळी, चित्रकला, नृत्य, वक्तृत्व, स्वच्छता , आदर्श परिपाठ, बाल आनंद मेळावा, परिसर भेट, वनभोजन, वर्ग सजावट, खरी कमाई, वेशभूषा, शालेय बचत बँक, बँक भेट, बाजार भेट, अवांतर वाचन, चावडी वाचन, आनंददायी शनिवार, वृक्षारोपण व संगोपन, बागकाम, कृती आराखडा,व्यावसायिक मार्गदर्शन, अनुभव कथन, विद्यार्थी व पालकांसाठी आरोग्य तपासणी, शाश्वत शेती

व्याख्यान इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात मुलांच्या कलागुणांना वाव मिळाला त्याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात झाला.

शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांच्या सहकार्याने शाळेचा मोठा समाज सहभाग (एक लक्ष साठ हजार रुपये) गोळा करून शाळा रंगरंगोटी, सजावट व आवश्यक भौतिक सुविधा निर्माण करण्यात आल्या. डिजिटल स्कूल, पटसंख्या वाढ, नवोदय स्पर्धा परीक्षेत यश, यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले . यामुळेच "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा" या उपक्रमात हिंगणघाट तालुक्यातील प्रथम पारितोषिक शाळेला प्राप्त झाले.

म्हणून म्हणावेसे वाटते,

"माझी शाळा सुंदर

नाव नेई दिगंतर

विद्यार्थी तयार होतील

सूर्यासारखे तेजस्वी ."



जि. प. प्राथमिक शाळा, सास्ताबाद येथे मी व सुरज गणवीर सहाय्यक अध्यापक मे, 2023 मध्ये प्रशासकीय बदलीने रुजू झालो. "शाळेचा परिसर मोठा परंतु सुविधांचा तोटा" अशी परिस्थिती होती. दोन्ही वर्ग खोल्यांच्या काळवंडलेल्या भिंती, तुटलेल्या दरवाजे खिडक्यांच्या फ्रेम, उखडलेल्या फरश्या, अपुरा पाणीपुरवठा, फुलझाडांविना परिसर उजाड वाटत होता. तुटलेले कुंपण, छताचे भिंतीतून झिरपणारे पाणी,

तुटलेले गेट, तुटलेला शाळेचा नाम फलक, गावकऱ्यांचा व प्राण्यांचा शाळेच्या परिसरात विनाकारण प्रवेश, स्वयंपाक गृहाच्या वाकलेल्या टीना, तुटलेली, उभी असलेली खेळणी, कमी पटसंख्या अशा अनेक समस्या होत्या. त्या सोडवायच्या कशा ? यावर आम्ही विचार करू लागलो. समस्यांचे शाळा पातळी, स्थानिक प्राधिकरण पातळी, समाज पातळी व प्रशासन पातळी असे वर्गीकरण केले. तेव्हा आमच्या असे लक्षात आले की, अधिकाधिक समस्या आपण शाळा व स्थानिक पातळीवर सोडवू शकतो.

शाळा सुरू होण्यापूर्वी आम्ही स्थानिक प्राधिकरणाकडून वर्षभर पाणी पुरवेल अशी नळ जोडणी करून घेतली. पावसाळा सुरू होताच विविध प्रकारची फुलझाडे, परसबाग लागवड केली. परिसर सुंदर दिसू लागला. 15 ऑगस्टला समाज प्रबोधन करून शाळेविषयी आपले कर्तव्य लोकांना समजून सांगितले. त्यामुळे शाळेच्या भिंतीवर बसणे अथवा शाळेच्या परिसरात विनाकारण प्रवेश करणे बंद झाले.

माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करून आपले आपल्या शाळेविषयी काही देणे आहे हे पटवून दिले. पालक संपर्क करून मोठा समाज सहभाग गोळा केला. (एक लाख साठ हजार रुपये) त्यातून शाळा रंगरंगोटी, दरवाजे खिडक्या दुरुस्ती, वीज, नळाची फिटिंग, हॅन्डवाश स्टेशन उभारले. वर्ग सजावट, कुंपण दुरुस्ती , शाळा फलक दुरुस्ती केली. भिंतीवरील आकर्षक चित्रे, प्रबोधनात्मक वाक्य, सुवाच्च लेखन शाळेला अधिक वेळ देऊन आम्ही शिक्षकांनी पूर्ण केले. शाळा सुंदर दिसू लागली.



<u>“गुणवत्ता हा एकच ध्यास, साधू या विद्यार्थी विकास.”</u>

विद्यार्थ्यांची गुणवत्ता अधिक वेगाने सुधारण्यासाठी तंत्रज्ञानासारखे दुसरे प्रभावी साधन नाही. शाळेतील ई लर्निंग साहित्य दुरुस्त केले. त्याच्या जोडीला कमलनयन बजाज फौंडेशन यांच्याकडून शिक्षकांनी स्वतःची पदरमोड करून इंटर ऍक्टिव्ह स्मार्ट बोर्ड मिळवला. त्यावर YouTube, google, PDF, पेन ड्राईव्ह, दीक्षा ॲप इत्यादींच्या माध्यमातून अध्ययन - अध्यापन सुरू झाले. आमची शाळा डिजिटल शाळा म्हणून ओळखल्या जाऊ लागली. ‘शाळा शिक्षणाचे मंदिर आहे’ या मंदिरातून उत्तम विद्यार्थी घडावे व त्यासाठी शिक्षकांनी विविध उपक्रम राबवून विध्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करावा अशी शाळेकडून समाजाची अपेक्षा आहे. तेव्हा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत असताना त्यांचा बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक, नैतिक विकास व्हावा,

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्यासाठी शाळेच्या मैदानात वेल्डर, सुतार, लोहार, गवंडी, न्हावी अशा व्यवसायिकांना पाचरण करण्यात आले. त्यांनी शाळेच्या परिसरात प्रात्यक्षिक करून दाखविले.त्यांनी त्यांची हत्यारे, त्याचा उपयोग, लागणारे श्रम व आर्थिक नियोजन, उपजीविका कशी करावी लागते? याचा परिचय करून दिला. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणजे मुलांनी शाळेच्या परिसरातील अमृत वाटिका, औषधी वनस्पतीचे संवर्धन, परसबाग, झेंडू, शेवंती, सूर्यफूल फुलांची फुलबाग नियोजनाप्रमाणे उत्तम केली. जबाबदारीची जाणीव झाल्यामुळे वर्ग मंत्रिमंडळाचे काम, दैनिक परिपाठ, स्वच्छता, स्वच्छता मॉनिटर चे काम, फलक लेखन, शालेय वाचनालय नोंद, विना तक्रार सहकार्याने पार पाडू लागले. मुलांमध्ये संघटन कौशल्य,सहकार्य भाव,जबाबदारीची जाणीव, निसर्ग प्रेम , विकसित होतांना आम्हाला समाधान वाटले.

कब बुलबुल पथकाद्वारे बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. वर्ग व परिसर सजावट विद्यार्थ्यांनीच केली. पुरणपोळी, भजे, जिलेबी,चिवडा,,वडे इ. खाद्यपदार्थांचे विविध स्टॉल लावले. गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांनी विक्रीस ठेवलेल्या विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. विद्यार्थ्यांना खऱ्या कमाईचे महत्त्व समजले. बालकांचा आनंद गगनात मावेनासा झाला.






मुलांना आर्थिक व्यवहार समजावे यासाठी शाळेत विद्यार्थी बचत बँक सुरू केली. त्या बचतीतून विद्यार्थी शाळेतूनच नोटबुक, वही, पेन, पेन्सिल खरेदी करू लागले.पासबुकनुसार जमा खर्चाची पडताळणी करू लागले. शाळेच्या प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत मुख्याध्यापकाकडून पैसे घेऊन मुले भाजीपाला खरेदी करू लागली सोबतच दुकानदारांची संख्या, प्रकारनुसार वर्गीकरण करून गणित मांडणी शाब्दिक

उदाहरणे तयार करू लागली. व्यवहारातून अंकज्ञान विकसित होऊ लागले. बँक भेट, दुकानदार भेट, एटीएम मधील व्यवहार इत्यादी प्रात्यक्षिकाद्वारे समजून घेतले, यातून विद्यार्थ्यांमध्ये व्यवहार कौशल्य विकसित होताना पाहून मन भारावून गेले.









सांस्कृतिक वारसा जतन व संवर्धन होण्याच्या दृष्टीने दरवर्षी वेगवेगळ्या राज्याच्या संस्कृतीचे दर्शन घडविण्याचे नियोजन करण्यात आले. पंजाब हे राज्य निवडून त्या राज्याच्या संस्कृतिचा विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. त्यात विविध पंजाबी खाद्यपदार्थ कसे बनवतात? याचे मातापालकांना शाळेतच ऑनलाईन प्रशिक्षण दिले. त्यांच्याकडून हे पदार्थ बनवून घेतले त्याची प्रदर्शनी लावली. शालेय विद्यार्थ्यांकडून भांगडा नृत्य बसवून त्याचे सादरीकरण केले. पंजाबी थोर नेते, पंजाबातील प्रसिद्ध ठिकाणे इत्यादींची शाळेत प्रदर्शनी

भरविली. विद्यार्थ्यांनी व माता पालकांनी पंजाबी वेशभूषा करून पंजाबी संस्कृतीचा सर्वांना परिचय करून देताना सर्वांनी खूप आनंद लुटला.




पाहुण्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इतका नियोजनबद्ध कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना संस्कृतीचा परिचय करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले व खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला .

आमच्या शाळेत ज्ञानरचनावादी व स्वयंअध्ययनास प्रेरणा देणारे शिक्षण: -

पूर्वानुभवाच्या आधारे विद्यार्थी नवीन संकल्पनांची रचना करतो तेव्हा, त्यातून अध्ययन घडते त्याला 'ज्ञानरचनावाद' म्हणतात. ज्ञानाची रचना करण्याच्या प्रक्रियेला कार्यान्वित करणे हा ज्ञानरचनावादाचा गाभा आहे. ज्ञान हे स्थिर नसून ते गतिशील आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती ज्ञान निर्माण करू शकते अशी आमची धारणा आहे. विद्यार्थी पूर्वानुभवाच्या आधारे ज्ञान निर्माण करू शकतात. विद्यार्थ्यांच्या सामाजिक, भाषिक आणि सांस्कृतिक आंतरक्रियेतून ज्ञान निर्मिती होत असते. कोणतीही नवीन गोष्ट शिकताना वा तयार करताना स्वतः विचार करावा लागतो. शिक्षकांनी ज्ञान सुलभकाची भूमिका पार पाडताना प्रश्न विचारणे, कृती करणे, निरीक्षण करणे, चर्चेतून निष्कर्ष काढण्यास प्रोत्साहन देणे किंवा अनुभव पुरविणे, संदर्भ साहित्य पुरविणे अशा विविध भूमिका पार पाडताना ज्ञानरचनावादी शिक्षण फार उपयोगी पडते.


ज्ञानरचनावादातून भाषा शिक्षण



वरील आकृती बघा, वाचा व शब्द तयार करा. अशी सूचना दिल्यानंतर मुले अचूक शब्द तयार करतात, वाचतात. माझं झालं, माझं झालं असं आनंदाने म्हणत दाखवायला येतात. विद्यार्थ्यांना असं शिकताना आनंद तर होतोच, सोबत नवनिर्मितीही होते. मुलं स्वतः रचना करून स्वयं अध्ययनाने गतीने शिकतात. मुले भविष्यवेधी शिक्षणाकडे वाटचाल करतात. शब्द, डोंगर, चित्र वर्णन, श्रुतलेखन, अक्षर, शब्दांचा क्रम बदलवून, अर्थपूर्ण शब्द वाक्य बनविणे, गोष्ट तयार करणे इत्यादी कृतीद्वारे श्रुतलेखनाचा अधिक सराव देऊन विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्य विकसित केली आहे.

ज्ञानरचनावादातून गणितीय संबोध विकास करताना खालील कृतींचा सराव दिला की मुलं चुटकीसरशी गणितीय संकल्पना शिकतात, असा आमचा अनुभव आहे.

3



5

वरील आकृतीचे निरीक्षण करा व खालील प्रमाणे कृती करा.

- तीन अंकी जास्तीत जास्त संख्या तयार करा. जसे 358 संख्या अक्षरात लिहा. जसे 853 -आठशे त्रेपन्न
- संख्या चढत्या क्रमाने लावा. जसे 358, 385,
- संख्या उतरत्या क्रमाने लावा. जसे 853, 835,
- दोन संख्या निवडून बेरीज करा. जसे 538+385=
- दोन संख्या निवडून वजाबाकी करा. 538-385 =
- कोणतीही संख्या निवडून अंकांची स्थानिक किंमत लिहा
- कोणतीही संख्या निवडून तिचे विस्तारित रूप लिहा. जसे 358 =300+50+8

वरील प्रमाणे कृती मुलांना समजल्या की मुले स्वतः रचना करून वेगवेगळी उदाहरणे सोडवितात. आमच्या शाळेत ज्ञानरचनावादाचा उपयोग करून विद्यार्थ्यांचा भाषिक विकास व संख्या ज्ञान कौशल्य विकसित केलेली आहेत .

गावाच्या दोन किलोमीटर परिसरात नुरापुर हे छोटेसे गाव. या गावात भटके कुटुंब स्थलांतरित होऊन आल्याचे समजताच आम्ही दोन्ही शिक्षक, सरपंच व पोलीस पाटलांना घेऊन तेथे पोहोचलो. त्या कुटुंब प्रमुखांना समज देऊन सप्टेंबर 2024 मध्ये तीन मुलांना इयत्ता पहिली व दोन मुलांना तिसरीमध्ये वयानुरूप दाखल केले. शिक्षकांनी स्वतः पहिली मधील तीन मुलांना तीन ते चार महिने शाळेत आणले व घरी सोडून दिले.

मुलांकडे जन्माचा दाखला नसल्यामुळे आधार कार्ड नव्हते. आम्ही वर्धा येथे आधार केंद्रात मुलांना घेऊन गेलो परंतु जन्म दाखला नसल्यामुळे आधार काढता आले नाही. त्यामुळे मुख्याध्यापकांनी जिल्हा न्यायाधीशांची भेट घेतली. त्यांनीही समस्या सोडविण्यासाठी सरकारी वकिलांना शाळेत पाठविले. मुलांची व कुटुंबाची भेट घेतली. प्रत्यक्ष पाहणी करून कागदपत्राची पूर्तता करण्यास सांगितले. दोन मुलांची आधार प्रक्रिया पूर्ण झाली. आमची शाळा समाजातील सर्व स्तरापर्यंत काम करणारी शाळा म्हणून गावकऱ्यांना परिचित झाली.

शाळा हे समाज जागृतीचे महत्त्वाचे साधन आहे असे म्हणतात. शाळेने विद्यार्थ्यासोबत समाजाचे काही हित जोपासावे असे सर्वांना वाटते म्हणून शाळेने प्राथमिक आरोग्य केंद्र अल्लीपूर येथील आरोग्य पथकाला पाचारण करून विद्यार्थ्यांची व पालकांची आरोग्य तपासणी करून घेतली. गावकऱ्यांनी रक्तदाब मधुमेह तपासणी करून किरकोळ उपचार करून घेतला.



वेलस्पन फाउंडेशनच्या वतीने शाश्वत शेती या विषयावर व्याख्यान आयोजित केले. **मा. प्रविण लडी क्षेत्र व्यवस्थापक** यांनी शाश्वत शेती कशी करावी? त्याचे महत्त्व काय आहे? त्याची आज गरज का? शेतीचे उत्पन्न कसे वाढवता येईल? यावर प्रकाश टाकला गावातील पन्नासहून अधिक शेतकऱ्यांनी सदर व्याख्यानाला हजेरी लावली. या उपक्रमातून भूमातेचा दर्जा सुधारण्याची संधी प्राप्त झाली.शेतकऱ्यांच्या ज्ञानात मृदेविषयी भर घालण्यात आली. वेलस्पन फाउंडेशनच्या वतीने बाहेरगावावरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप करण्यात आले.



आमची शाळा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्यासाठी वर्षभर दिवसागणित सहशालेय उपक्रमांचे आयोजन करते. विविध देशी खेळ घेऊन त्यांच्या स्पर्धांचे आयोजन करते. रांगोळी, चित्रकला, वेशभूषा स्पर्धा, नृत्य, वक्तृत्व स्पर्धा, मी स्वच्छता मॉनिटर स्पर्धा, उत्कृष्ट वाचन, स्वच्छ लेखन स्पर्धा, अवांतर वाचन व सादरीकरण स्पर्धा, अनुभव कथन, चित्र वर्णन स्पर्धा, चावडीवाचन, आनंददायी शनिवार, वर्ग सजावट, वृक्षारोपण व संवर्धन इत्यादी स्पर्धांचे आयोजन करून मुलांच्या कलागुणांना वाव देते.







माता पालक गट, जागरूक पालक, विद्यार्थी मित्र, विषय मित्र, गटकार्य इत्यादीचे माध्यमातून अध्ययन क्षमतेत मागे असलेल्या विद्यार्थ्यांना प्रगत करण्यासाठी शाळेने सतत विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये क्षमतांचा विकास साधला.

“उचित ध्येयाच्या दिशेने उद्दिष्ट पूर्तीकडे होणारी वाटचाल म्हणजे यश.”

डिजिटल स्कूल

आमच्या शाळेत संगणक, laptop, स्मार्ट बोर्ड, Wi-Fi Sound इत्यादी उपकरणे उपलब्ध असून त्याचा अध्ययन अध्यापनात नियमितपणे वापर केल्या जातो. त्याची हाताळणी विद्यार्थी स्वतः करून स्वयंअध्ययन करतात.बहुवर्ग अध्यापनात Digital साहित्य मोलाचा दुवा ठरत आहे.




शाळेचा खालील पटसंख्येचा आलेख बघता शाळा यशस्वीतेकडे वाटचाल करीत असल्याचे दिसून येते.

शाळेची पटसंख्या वाढ : -

अ.क्र.	सन	पट	संदर्भ दिनांक
1	2022 - 23	19	30 -9 -2022
2	2023 - 24	24	30 -9 -2023
3	2024 - 25	34	30 -09- 2024
4	2025 - 26	39	15- 07- 2025

सन्माननीय सूर्यभान सुरपाम सर, केंद्रप्रमुख वाघोली, सन्माननीय अरविंद राठोड साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी हिंगणघाट व सन्माननीय अल्का सोनवणे मॅडम, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगणघाट यांनी पटसंख्या वाढीबद्दल शाळेला प्रशस्तीपत्र देऊन गौरविले आहे.



अभिनंदन पत्र

जिल्हा परिषद वर्धा अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,सास्ताबाद, केंद्र वाघोली, पंचायत समिती हिंगणघाट या शाळेला सन२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात जिल्हा परिषद शाळा गटातून मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धेत पंचायत समिती हिंगणघाट मधून प्रथम पारितोषीक प्राप्त झाले. या विशेष कार्याबददल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सास्ताबाद या शाळेचे मुख्याध्यापक श्री. रामचंद्र पारसे, सहाय्यक शिक्षक सूरज गणवीर व शाळा व्यवस्थापन समिती, सास्ताबाद यांना अभिनंदनपत्र देऊन गटशिक्षणाधिकारी कार्यालय शिक्षण विभाग पंचायत समिती हिंगणघाट कडून गौरविण्यात येत आहे.

पुढील कार्यासाठी हार्दीक शुभेच्छा.

दिनांक :- १४/०३/२०२४

अलका सोनवणे
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती, हिंगणघाट

"मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" या स्पर्धेत हिंगणघाट तालुक्यात सन 2023 - 24 मध्ये प्रथम पारितोषिक ! शाळेला अधिक स्वच्छ व सुंदर बनविण्याचे प्रयत्न सुरू असताना "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" या स्पर्धेत शाळेने सहभाग घेतला. स्पर्धेत समाविष्ट सर्व मुद्द्यांचा सखोल अभ्यास करून शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने सर्व निकष पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. **तालुक्यात प्रथम क्रमांकाचे गुण प्राप्त झाल्यामुळे सन्माननीय आमदार समीरजी कुणावार साहेब यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व बक्षीस रक्कम प्रदान करून शाळेला गौरविण्यात आले.**



शालेय बचत बँक





थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीप्रमाणे पावसाचा एक एक थेंब गोळा होऊन मोठा जलसाठा निर्माण होतो, गवंडी एक एक वीट जोडून मोठी इमारत तयार करतो, ग्रंथकार एकेक शब्द जोडून ग्रंथसंपदा निर्माण करतो, मुंग्या तर एकेक अन्नाचा कण पावसाळ्यापूर्वी गोळा करून ठेवतात. या प्रमाणे मुलांमध्ये वेळेची श्रमाची तसेच पैश्यांची बचत व सदुपयोग हा संस्कार विकसित व्हावा या उद्देशाने मुख्याध्यापकांनी 10 जानेवारी 2024 पासून विद्यार्थ्यांकरीता शालेय बचत बँक सुरू केली. त्यात विद्यार्थ्यांनी रुपये जमा करायचे व हवे तेव्हा शालेय वस्तू खरेदी करण्यासाठी काढायचे व त्याच्या नोंदी ठेवायच्या व जमाखर्चाचा ताळमेळ जुळवायचा. पासबुक वरील नोंदी तपासून शाब्दिक उदाहरणे तयार करणे व गणितीय क्रिया सोडविण्यासाठी मुलांना या उपक्रमाचा खूप उपयोग झाला, या उपक्रमामुळे अन्न, पाणी व पैसा बचत व सदुपयोग हा संस्कार विकसित करता आला.

गावकऱ्यांनीच केला सन्मान

“जेव्हा शिक्षकांचा सन्मान गावाकडून होतो.”

संत तुकडोजी महाराज म्हणतात, ‘ग्रामोन्नतीचा पाया शिक्षण, उद्याचे राष्ट्र आजचे संतान, यासाठी आदर्श पाहिजेत गुरुजन, राष्ट्रनिर्माते ”

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सास्ताबाद शाळेचे मुख्याध्यापक श्री. रामचंद्र पारसे व सूरज गणवीर सहाय्यक अध्यापक यांनी विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कार्याचा गौरव संपूर्ण गावांसमोर ह. भ. प. भागवताचार्य गुरुवर्य श्री. पुंडलिक महाराज बोळवटकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




नवोदय परीक्षेत सुयश

शैक्षणिक सत्र 2024-25 मध्ये शाळेला पाचवा वर्ग जोडण्याची परवानगी मिळाली. हा आमच्याकरिता अतिशय आनंदाचा क्षण होता. मात्र सत्र सुरू होण्यापूर्वी इयत्ता चौथी पास होऊन विद्यार्थ्यांनी दाखले नेले होते.

दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतला होता. पालकांना व विद्यार्थ्यांना कळताच चार विद्यार्थ्यांनी दाखले परत आणले व आमच्या शाळेत पुन्हा दाखल झाले. शाळेला पाचवा वर्ग जोडण्याचे आमचे स्वप्न पूर्ण झाले. नियमित वर्गासोबत शाळा सुरू होण्यापूर्वी व शाळा संपल्यानंतर त्यांचे नवोदय परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षेचे वर्ग सुरू केले. सतत पेपर सोडविण्याचा सराव घेण्यात आला. समर अंकुश सोनवणे याने शिष्यवृत्ती परीक्षा पास केली त्यासोबतच त्याची जवाहर नवोदय विद्यालय सेलू काटे येथे निवड झाली. ही आमच्या कार्याची पावती असून, शाळेसाठी अभिमानाची बाब आहे.



आज आमची शाळा सुंदर शाळेत रूपांतरीत झाली असून, शुद्ध पाणी हँडवॉश स्टेशन, विद्युत उपकरणे, रंगविलेल्या भिंती, सजवलेल्या वर्ग खोल्या, वॉल कंपाउंड वरील चित्रे, बोधवाक्य, प्रिंटर, ई लर्निंग सेट, ऑडिओ प्लेयर, इंटर ऍक्टिव्ह बोर्ड, परसबाग, शौचालयात स्वच्छता व पाणी व्यवस्था, उत्कृष्ट मध्यान्ह भोजन व्यवस्था, विविध शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लाभ, स्पर्धा परीक्षांची तयारी, विविध कार्यक्रमात पालकांचा सहभाग, संगीतमय आनंददायी शनिवार, योगाभ्यास, प्राणायाम, कवायत संचलन इत्यादी उपक्रम व भौतिक सुविधेने परिपूर्ण झाली असून झेंडू, मोगरा, सूर्यफूल, शेवंतीची बाग विद्यार्थ्यांना आकर्षून घेत असल्याचे दिसते. आता खऱ्या अर्थाने दोन वर्षांपूर्वी तालुक्यात नावापुरतीच असलेली शाळा सुंदर व आनंददायी शाळा म्हणून नावरूपास आली आहे.


Action Words
Praying
Marching
Rocking
Leaning
Sitting
Shooting
Watering
Twirling
Wrapping
Showing
Bending
Crawling
Reading
Stretching
Kneeling
Exercising
Cheering
Dancing
Fishing
Drinking
OUR NATIONAL SYMBOLS
Can you draw a ball?
Yes, I can.
Can you swim?
No, I can't.
Can you sing?
Yes, I can.
Can you draw a table?
No, I can't.
Can you clap?
Yes, I can.
Can you jump?
Yes, I can.
Can you play?
Yes, I can.
Can you read?
Yes, I can.
Can you dance?
Yes, I can.
Can you talk?
Yes, I can.
Can you win?
Yes, I can.
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सास्तावाद


Education is your key to success.
आमची शाळा आनंदाची

----------**----------

आमची शाळा - उपक्रमांचा मळा

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चोंढी

शाळेचा पत्ता - चोंढी ,पं.सं.बाभूळगाव जि.यवतमाळ

मुख्याध्यापक नाव - वनश्री साहेबराव महालकर

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9623712183

मुख्याध्यापक ईमेल आयडी - kshitijatalkar@gmail.com

प्रास्ताविक -


"शाळेमध्ये आम्ही पक्षी
ज्ञान आमुचे दाणे
या दाण्यावर फुलती आमुचे
आयुष्याचे गाणे"

ज्ञानरूपी दाणे म्हणजेच ज्ञानदानासाठी शिक्षक अविरत प्रयत्नशील असतो. विद्यार्थांच्या आशय समृद्धीसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी नवनवीन उपक्रम राबवीत असतो. माझी शाळा जि.प.प्रा.शाळा चोंढी शाळा अगदी छोटी, विद्यार्थी कमी आणि परिसर पण लहान, सन २०१८ ला मी आणि माझी सहकारी शीतल चौधरी आम्ही बदलीने रुजू झालो. मुलांना शाळेबद्दल फारशी आवड वाटत नव्हती. शाळेचे वातावरण पण खूप साधे, कंपाऊंड वॉल नाही,कोणतेही सौंदर्यीकरण नाही.

शाळेचे वातावरण आल्हाददायी बनविणे याचे आमचे प्रयत्न सुरु झाले. शाळेत अनेक उपक्रम राबविणे आवश्यक असते हा विचार आम्ही पक्का केला . त्यासाठी आनंददायी उपक्रम राबविणे सुरु झाले. अनेक उपक्रम शाळेत राबविले जाऊ लागले. मुले शाळेत रमु लागली आणि मग काय गावातील लोक शाळेत नाविन्यपूर्ण बदल दिसू लागला आणि याचा फायदा घेऊन आम्ही लोकवर्गणी गोळा केली आणि शाळेची रंगरंगोटी सुरु केली. मग काय शाळा सुंदर आणि विद्यार्थी पण आनंददायी वातावरणात रमू लागली.

मुख्याध्यापक/ शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी -

शिक्षकांना सुरुवातीला भरपूर समस्या आल्या जशा की. मुले अभ्यासात रमत नव्हती. त्यांचे लक्ष भरकटत होते. नवीन काही शिकविण्याचा प्रयत्न केला असता त्यांची एकाग्रता लागत नव्हती. मुले अभ्यासात रस घेत नव्हते. यावर उपाययोजना करण्याचे नियोजन मनात सुरु होतेच. मुले अभ्यासात रमली पाहिजे ते शाळेत पण रमले पाहिजे असे काही उपक्रम राबविणे असे मनात ठरवत होतो.



सोबतच शाळा बोलकी व सुंदर बनविणे हे पण तितकेच महत्वाचे होते. त्यासाठी गावकऱ्यांची मदत घेणे आवश्यक होते कारण शाळेला शासनाकडून मिळणारा निधी खूप कमी होता. त्यामुळे आम्ही दोघी शिक्षिका आणि गावकरी यांच्या सहकार्यातून शाळा बोलकी व सुंदर बनविण्याचे आव्हान समोर होते.

या अडचणींवर वर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजना :

"वारा होऊनी विहर जगावर
अडला नडला गंध कळू दे
ज्याला ज्याला अपुल्या मधला
गूढ सुखाचा थांग कळू दे !!"

येणाऱ्या अडचणीवर उपाय तर ठरलेच होते, एकेक उपक्रम सुरु करण्यात आला. प्रथम शाळेत आहे त्या साहित्याचा वापर करून उपक्रम राबविण्यात आले.

१. बाबूंच्या काड्या तयार करून काड्यांवरचा गुणाकार मुलांना शिकविण्यात आला. मुलांना गणितामध्ये रस वाटू लागला. हसत खेळत मुले गुणाकार करू लागले.
२. नोटा घेवून बेरीज, वजाबाकी,गुणाकार,भागाकार ह्या क्रिया शिकविल्या. खेळण्यासोबतच मुले गणितात रमू लागली.
३. परिसर अभ्यासासाठी नकाशाचे फ्लेक्स तयार केले आणि या कोऱ्या नकाशात स्थळ दाखविताना त्यांना खूप मजा यायला लागली. जिल्ह्याचा नकाशा महाराष्ट्र राज्य आणि भारताचा नकाशा बघता बघता पाठ झाले. मुले उड्या मारतच या उपक्रमासाठी तयार होत असत.
४. शाळेतील मोठमोठ्या झाडांचा उपयोग पण अभ्यासासाठी करण्यात आला. झाडांवर इंग्रजी, गणित घाटक रंगवून त्यांचा शैक्षणिक साहित्य म्हणून वापर मुले करू लागली. एकेका झाडाजवळ जाऊन मुले आनंदाने अभ्यास करू लागली .
५. गाडीचे वापरलेले टायर वापरून सुद्धा आम्ही शैक्षणिक साहित्य बनविले, मुले खेळता खेळता टायरवर बसून टायरवरचे शब्द वाचू लागली,
६. खेळ तर खेळ आणि सोबत अभ्यासही होत होता.
७. तेलाचे रिकामे डबे वापरून व ते रंगवून त्याचा उपयोग सौंदर्यीकरणासाठी केला. अगदी कमी खर्चात टाकावू वस्तूपासून आमची शाळा सजू लागली, सुंदर बनू लागली होती मग अशा शाळेत मुले रमू लागली.
८. नाट्यीकरण : नाट्यीकरण हे आमच्या उपक्रमातील सर्वात महत्वाचे म्हणजे ब्रम्हांड ठरले. मराठी, इंग्रजीसाठी बऱ्याच पाठाचे नाट्यीकरण मुलांना शिकवले या नाट्यीकरणाचा फायदा असा झाला की, सर्वच्या सर्व पाठ मुलांच्या पाठ व्हायला लागले. या उपक्रमांमध्ये आम्ही अजून रंगत आणली ती म्हणजे पाठातील, पाठाचे शक्य तेवढे मुखवटे बनविले. त्यामुळे मुले मुखवटे घालून नाट्यीकरण करू लागली. या उपक्रमामुळे अबोल असणारी मुले मुलांना या उपक्रमात संवाद पाठ करू लागली. मुलांना या उपक्रमात सर्वात जास्त आनंद मिळू लागला. वरच्या वर्गाचे पाठ आणि संवाद खालच्या वर्गातील मुलांना पाठ व्हायला लागली याचा फायदा असा झाला की, परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे मुले पटापट लिहू लागली.




९. ज्ञानरचनावाद हा पण आमचा एक खूप चांगला उपक्रम आहे. व्हरांड्यात आणि खोल्यांमध्ये ज्ञानरचनावादी आकृत्या रंगवून घेतल्या. या आकृत्याचा वापर करून मुले तासनतास रमून जातात. वेगवेगळ्या आकृत्यांचा वापर करून मुले आनंदाने शिकतात.

१०. बोलक्या भिंती या उपक्रमाचा सुद्धा खूप छान वापर झाला. एक भिंत गणित भिंत म्हणून रंगविली. मुले या भिंतीजवळ जाऊन स्वतःहून शिकतात. गणितीय संकल्पना, सूत्रे पाठ करतात.

११. एक तास परिसर अभ्यास हा सुद्धा एक अप्रतिक उपक्रम आहे. त्यासाठी वर्ग ३ ते ५ च्या परिसर अभ्यासातील सारांश प्रश्नस्वरुपात संकलित करून त्याचा सराव परिपाठाच्या वेळी एक तास घेतल्या जातो. याचा परिणाम असा झाला की, मुलांना इतिहास, भूगोल तोंडपाठच झाला.

लोकसहभाग -

विविध उपक्रमाच्या माध्यमातून मुलांची वाढलेली गुणवत्ता पाहून लोकांनी शाळेसाठी मदत करण्याचे ठरवले. ज्यांना जमेल तेवढी त्यांनी वर्गणी दिली. त्या निधीमधून आम्ही शाळेची रंगरंगोटी केली. शाळा सौंदर्यीकरण केले, मुलांसाठी खेळणी तसेच बसण्यासाठी बेंच घेतले, शाळा डीजीटल करण्यासाठी कॉम्पुटर, प्रोजेक्टर घेतले, ब्लूटूथ स्पीकर घेतले अशाप्रकारे शाळा डिजिटल झाली. शाळा सुंदर दिसायला लागली आणि मुले शाळेत रमू लागली. शाळेचे वातावरण आल्हाददायक असले की, शिक्षण आनंददायी आणि सुकर होते.

कार्यनिष्पती -

"क्रियेवीणा मार्गची नाही, कर्तव्यनरा देवपण देई"
तुकड्या म्हणे बना निश्चयी, प्रयत्नवादी!!"

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या या उक्तीप्रमाणे प्रयत्न केल्यानंतर यश नक्कीच मिळते. आमच्या या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम आम्हाला दिसला. सर्वात पहिले तर मुले आम्ही पोहचायच्या आधीच शाळेत उपस्थित राहू लागली. आजारी असले तरी घरी राहायला मुले तयार होत नव्हती. अगदी आनंदाने उड्या मारतच मुले शाळेत घ्यायची आणि दिवसभर आनंदाने शिकू लागली . हे उपक्रम शिकण्यासाठी वापरल्यानंतर आशय समृद्धी ही अध्ययन पध्दती निष्पती प्राप्त झाली.

मुलांमध्ये अभिनय कौशल्य वृद्धीगत झाले. नाट्यीकरणामुळे सभाधिटपणा वाढला, स्वयंअध्ययनाची सवय वाढली. साहित्याचा वापर करून मुले स्वतः शिकती झाली . टाकाऊ वस्तूपासून शाळेचे सौंदर्य वाढवले त्यामुळे शाळा विशेष सुंदर दिसू लागली. मुलांना घरच्यापेक्षा शाळेत करमायला लागले. लोकांनी दिलेल्या वर्गणीचा वापर करून रंगरंगोटी केली. त्यामुळे शाळेचे रुपडे बदलले, मुले जेव्हा म्हणतात "मॅडम आम्हाला सुट्टी नको" त्यावेळी या उपक्रमाची फलानिष्पती दिसून येते .

समारोप -

प्रयत्न केले असतात अशक्य असे काहीच नसते विविध उपक्रमाचा वापर करून मुलांना शाळेची आवड लावणे असो की शिकण्याची गोडी निर्माण करणे असो ,या प्रयत्नातून आम्हाला सुखाचा अनुभव मिळाला .




व्हिडीओ लिंक -

- ✓ https://youtu.be/oOC87itKtww?si=1hpEPhyjfJOJkdiU
- ✓ https://youtu.be/11817gp2Mss?si=s0HMAOtYipTE6PLO
- ✓ https://youtube.com/shorts/qIcUTgjEscI?si=YwF63eow0kfuu71z
- ✓ https://youtu.be/hYUxpRbaowc?si=ITEgyI40DKWZ_BCe
- ✓ https://youtu.be/rPnzDdzuumE?feature=shared
- ✓ https://youtu.be/2s5ASkuJWmE?feature=shared
- ✓ https://youtu.be/kn5sRU4DJ-Q?si=HG-QxfgBm7OVX5oI
- ✓ https://youtu.be/XVYorK4iYKA?feature=shared
- ✓ https://youtube.com/shorts/3hzP-hoO4i0?si=ScVm2EpXH6KYDiHa






क्रिया कर
3+0
२०
12-५
20-3
५-१
८+१
१०
3+४
५+५
२+१
कवयित्री
६+१
३०
कल्पतरू



६-१
७
3+४
22-2
20
९५+५
वीस
००


अर्धशतक २५०
भाउंतीनशे ३५०
१ डझन १२ वस्तू
अर्धा डझन ६ वस्तू
पाव डझन ३ वस्तू
पाऊण डझन ९ वस्तू
२४ कागद १ दस्ता
२० दस्ते १ रीम
४८० कागद १ रीम
१ गुंठे १०८९ चौ.मी.
१ हेक्टर १०० आर
१ एकर ४००० चौ.मी.
१ मीटर १०० सेंटीमीटर
अर्धा मीटर ५० सेंटीमीटर
पाव मीटर २५ सेंटीमीटर
पाऊण मीटर ७५ सेंटीमी
१ लिटर १००० मिली
अर्धा लिटर ५०० मिली
पाव लिटर २५० मिली
पाऊण लिटर ७५० मिली
१ मिनिट ६० सेकंद
१ तास ६० मिनिटे
२४ तास १ दिवस
पावतास १५ मिनिटे
अर्धा तास ३० मिनिटे
पाऊण तास ४५ मिनिटे
७ दिवस १ आठवडा
३० दिवस १ महीना
३६५ दिवस १ वर्ष
१० वर्ष १ दशक वर्ष
अर्धा वर्ष ६ महीने
पाव वर्ष ३ महीने
पाऊण वर्ष ९ महीने
१ वाजून ३० मिनिट दिड वाजले
२ वाजून ३० मिनिट अडीच वाजले
१०० शंभर
५० पावशे
२५ पाऊणशे
७५ सव्वाशे
१०० एकशे
१ किलोग्रॅम १००० ग्रॅम
अर्धा किलोग्रॅम ५०० ग्रॅम
पाव किलोग्रॅम २५० ग्रॅम
पाऊण किलोग्रॅम ७५० ग्रॅम
१ किलोमीटर १००० मीटर
अर्धा किलोमीटर ५०० मीटर
पाव किलोमीटर २५० मीटर
पाऊण किलोमीटर ७५० मीटर
१ हजार १०००
अर्धा हजार ५००
पाव हजार २५०
पाऊण हजार ७५०
१ डझन १२ फूट
३ फूट १ यार्ड
१ मैल ५२८० फूट
१ क्विंटल १०० किलोग्रॅम
अर्धा क्विंटल ५० किलोग्रॅम
पाव क्विंटल २५ किलोग्रॅम
पाऊण क्विंटल ७५ किलोग्रॅम
१ टन १० क्विंटल
1 I
2 II
3 III
4 IV
5 V
6 VI
7 VII
8 VIII
9 IX
10 X
1
5
10
50
100
500
1000
१. आयताची परिमिती = 2(लांबी + रुंदी)
२. चौरसाची परिमिती = 4 x एका बाजूची लांबी
३. आयताचे क्षेत्रफळ = लांबी x रुंदी
४. चौरसाचे क्षेत्रफळ = बाजूची लांबी x बाजूची
आकृती | आकृतीची नावे | शिरे बिंदू | बाजूंची संख्या | कोनांची संख्या | पृष्ठे
त्रिकोण 3 3 3 3
चौरस 4 4 4 4
आयत 4 4 4 4
घन 8 12 8 12
इष्टिकाचिती 8 12 8 12
शंकू 1 0 0 2
दंडगोल 0 2 0 3
गोल 0 0 0 1






मूल्ये
१ श्रमप्रतिष्ठा
२ राष्ट्रभक्ती
३ स्त्री-पुरुष समानता
४ राष्ट्रीय एकात्मता
५ सर्व धर्म सहिष्णुता
६ वैज्ञानिक दृष्टिकोन
७ संवेदनशीलता
८ सौजन्यशीलता
९ तत्त्वशीरपणा
१० नीटनेटकेपणा
REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA





----------**----------

विविध शैक्षणिक उपक्रमांच्या अंमलबजावणीतून विद्यार्थी विकास साधण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा दहिफळ

शाळेचा पत्ता - दहिफळ,तालुका नेर, जिल्हा यवतमाळ

मुख्याध्यापक नाव - श्री बालाजी जयाजी मुद्दमवार

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9922517696

शाळा विकासासाठी अनुकूल करण्यासाठी आम्ही नियोजन करून प्रत्यक्ष कार्यवाहीचे टप्पे ठरवले

कार्यवाहीचे टप्पे..

1) स्वच्छ, सुंदर, आकर्षक शालेय परिसर.

2) विद्यार्थ्यांची गुणवत्ता विकास साधणारे विविध शैक्षणिक उपक्रम.

3) **एक टीसी- एक झाड** उपक्रमातून शालेय परिसर वृक्षमय.

4) शालेय शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर.

5) साऊंड-माईक च्या आधारे संपूर्ण दैनंदिन शालेय परिपाठ.


6) माझी सुंदर परसबाग निर्मिती.

7) शाळा विकास आराखडा आणि शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा पूर्ती.

<u>प्रत्यक्ष कार्यवाही..</u>

1) पंचायत समिती नेर अंतर्गत अगदी शेवटच्या टोकावर असलेली ओसाड- उजाड अशा शाळेला आकर्षक बनवण्यासाठी रंगरंगोटी करून शालेय परिसरात **मेहंदी आणि विविध रंगी फुलांची झाडे** लागवड करण्यात आली त्यामुळे शाळा आकर्षक बनून विद्यार्थी शाळेत रममाण झाले.

2) शाळेतील विद्यार्थ्यांना किमान अध्ययन क्षमता प्राप्त व्हावी, याकरिता "**बाबा..आता मला पण वाचता लिहिता येते.**" या उपक्रमाद्वारे अप्रगत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रगत करण्यासाठी सतत चार महिने कार्य केल्यानंतर शाळेतील एकूण 32 विद्यार्थ्यांपैकी 28 विद्यार्थी प्रगत झाले. आता त्यांना पण वाचता लिहिता



येऊन त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला.







3) खडकाळ, मुरमाड जमिनीवर शाळा ओसाड दिसत होती. मुख्याध्यापकाच्या संकल्पनेतून **एक टीसी - एक झाड** उपक्रमाच्या माध्यमातून लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या सहकार्याने शालेय परिसरात 60 देशी वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करणे सुरू आहेत. त्यामुळे शाळा अधिकच हिरवळ बनली.

4) शालेय शिक्षणात तंत्रज्ञानाचे महत्त्व जाणून विद्यार्थ्यांना **आम्ही तंत्रस्नेही... बनवितो क्यूआर कोड** हा उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये सुरुवातीला वर्ग पाचवी ते आठवीचे 25 विद्यार्थी सहभागी होऊन त्यांना आज क्यूआर कोड म्हणजे काय? ते कसे बनवतात.? त्या क्यूआर कोडला आपल्या आवडीचा रंग, आकार, रूप, चित्राद्वारे ते स्वतःचा क्यूआर कोड बनवितात. शाळेचे सर्व उपक्रम **आमची शाळा.. आमचे शिक्षण** या आपल्या दहिफळ शाळेच्या यूट्यूब चैनल वर उपलब्ध आहेत. शाळेतील **विद्यार्थ्यांनीही स्वतःचे असे यूट्यूब चैनल बनवलेले आहेत.**








5) लोकसहभागातून साऊंड सिस्टिम विकत घेतल्यानंतर बंजारा आणि आंध समाजातील विद्यार्थी साधी मराठी सुद्धा बोलू शकत नव्हती, ती आज स्टेजवर, चौकात, गावात पथनाट्य सादर करतात, भाषणे देतात, इंग्रजीतून आपले मत व्यक्त करतात. हा महत्त्वपूर्ण बदल संपूर्ण गावकरी अनुभवत आहेत.





6) शालेय जमिनीवर काळी माती नसताना, पाण्याची उपलब्धता नसताना, विद्यार्थ्यांनी बाहेरून माती आणून... लोकसहभागातून पाण्याची व्यवस्था करून...**सुंदर अशी परसबाग फुलवली आहे.** त्यामुळे शाळेच्या आकर्षणात तर वाढ झालीच, शिवाय विद्यार्थ्यांना शेतीबद्दल आवड, मेहनतीचे रूप, फळे-भाजीपाला यांचे संगोपनाचे धडे मिळत आहेत. आज दररोजच्या मध्यान्ह भोजनात टमाटर, वांगी, कोथिंबीर, पालक, दोडके, काकडी, फुलकोबी, पानकोबी, शेपू, वाटाणा, कांदा, पपई, मिरची, चौलाई असे एक ते दीड किलो भाजीपाला पोषण आहारात वापरतानाही, उरलेला भाजीपाला विद्यार्थी विक्री करतात. त्यातून त्यांना व्यवहार ज्ञानाची जाणीव होत आहे.

71 सत्राच्या सुरुवातीलाच शाळा विकास आराखडा ठरवण्यात आला परंतु त्याचबरोबर विद्यार्थी गुणवत्ता विकास आराखडा ही तयार करून तो आराखडा एका सत्रात पूर्ण करण्याचे आवाहन समर्थपणे पेलले गेले.










दोन वर्षा अगोदर जेमतेम असणारी शाळा आज संपूर्ण कायापालट झाली आहे. ही निश्चित गावासाठी, विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांसाठी अभिमानाची बाब असून, **आज शाळेची पटसंख्या ही वाढली आहे.**

बाहेरगावातून, कॉन्व्हेंट मधून एका वर्षात 24 विद्यार्थी शाळेत दाखल झाले आहे. ही निश्चित कौतुकाची बाब..

अशा अनेक उपक्रमाच्या माध्यमातून आज तालुक्यातील उपक्रमशील शाळा म्हणून दहिफळ मराठी शाळा कौतुकास पात्र ठरली आहे. शाळेचे कौतुक करण्यासाठी जिल्हा स्तरावरून अनेक शिक्षणाधिकारी,उपशिक्षणाधिकारी,डायट अधिकारी यांच्यासह विस्तार अधिकारी, सर्व केंद्रप्रमुख आणि इतर शाळेतून शिक्षक बांधव शाळेला भेट दिली आहे . शाळेचे, विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे कौतुक करीत आहेत यातून आम्हाला प्रोत्साहन मिळत आहे.

----------**----------



लोकसहभागातून शाळा समृद्धी - एक यशस्वी दिशा

शाळेचे पूर्ण नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणाडी

शाळेचा पत्ता - लोणाडी तालुका नेर,जिल्हा यवतमाळ

मुख्याध्यापक नाव - भूषण मधुकर तंबाखे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9767510285

मुख्याध्यापक ईमेल आयडी - bhushantambakhe75@gmail.com

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणाडी येथे सन २०२३ ला विनंतीने बदली झाली. शाळेमध्ये रुजू होण्याकरिता गेलो असता खूप हताश झालो.लोनाडी हे गाव जंगलाच्या पायथ्याशी वसलेले लहानशे ५००लोकसंख्येचे हे गाव शाळेच्या भोवताली संपूर्ण गावातील वस्ती त्यामुळे शाळेला जागा अशी नाहीच केवळ दोन वर्गखोल्या व वीस फुट लांबी रुंदीचे मैदान, वर्गखोल्या सुद्धा पडक्या अवस्थेत, पत्रे फुटलेले पाउस आला की विद्यार्थ्याना बसण्याकरीता व्यवस्था वर्गात नव्हती. शाळेच्या आजूबाजूला घरांची वस्ती असलेल्या शाळेची अशीही अवस्था असू शकते यावर विश्वास बसत नव्हता .कारण शाळेचे रूप पाहिले तर कुठल्याच दृष्टीने ती शाळा वाटत नव्हती अंतरंग व बाह्यांग सुद्धा,पिण्याच्या पाण्याची सुद्धा व्यवस्था नव्हती,शाळेच्या परिसरात एकही झाड नाही,रंगरंगोटी सुद्धा नाही, वीज जोडणी सुद्धा नाही ग्रामपंचायत द्वारे सोलर प्राप्त आहे परंतु ते सुद्धा नादुरुस्त ,कुठलीही सुविधा नसलेली ही शाळा ,खूप हताश झालो पटसंख्या केवळ 22 ,गावातील 14 विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये शिकत होती तेही एक आव्हान होते ,त्यावेळेस नेर येथील गटशिक्षणाधिकारी श्री.मंगेश देशपांडे यांना फोन केला व शाळेची व्यथा सांगितली.त्यांनी मला ही कायापालट करण्याची एक उत्तम संधी आहे असे सांगितले.त्या एका वाक्याने प्रेरित होऊन शाळेत काम करण्यास सुरुवात केली.





शाळेचा बाह्यभाग पडक्या अवस्थेतील स्थिती

ठरविले इथेच नंदनवन फुलवायचे

काहीही झाले तरी इथेच नौकरी करावी लागणार आहे व दिवसातील सर्वात जास्त वेळ इथे व्यतीत करायचा आहे तर वातावरण प्रसन्न असणे आवश्यक होते. मागील शाळेचा अनुभव पाठीशी होताच, प्रयत्न प्रामाणिक व हेतू कर्मयोगाचा असला तर यश नाक्कीच मिळते हा माझा मागील अनुभव होता.हीच शाळा लोकांना हेवा वाटेल अशी बनवायची अशी खूणगाठ मनाशी बांधली माझे सहकारी शिक्षक सुद्धा शाळेची अवस्था पाहून हताश झाले.दोघांचीही बदली सोबतच झाली होती.त्यांना धीर देत बोललो, ही शाळा अवघ्या सहा महिन्यात नवीन रूप घेवून उभी राहील असे कार्य करू त्यांनी सुद्धा होकार दिला.

आलेल्या अडचणी व त्यावर मात करत केलेले कार्य

सर्वप्रथम गावातील पालकांना शाळेत काय सुधारणा कराव्या लागतात या बद्दल बोललो. परंतु त्यांना तो अनुभव नवीन होता, त्यामुळे त्यांनी फारसा प्रतिसाद दिला नाही,त्यांचेही बरोबर होते कारण असे प्रयत्न पूर्वी झालेच नसावेत . शाळा नियमित सुरु झाली परंतु मनातील तगमग थांबत नव्हती गावात कोणी परिचयाचे नव्हते त्यामुळे संपर्क होत नव्हता, अशातच गावातील होतकरू तरुणांचा WHATSAP समूह बनविला व त्यांना सांगितले की या समुहावर केवळ शाळेबद्दल होत असलेल्या बदलाबाबत मजकूर प्रसारित करायचे,एकदम मदतीला कोणीही येत नव्हते, सुरुवात करायची कुठून हा धागा गवसत नव्हता, नंतर स्वतः कार्य करण्याचे ठरविले. त्यानुसार सर्वप्रथम १५००० रुपये खर्च करून एक सुंदर बाग तयार केली.मी स्वतः व सहकारी शिक्षक यांनी माती उचलून झाडाकरिता टाकली माझ्या कामामुळे गावातील लोकांना व पालकाच्या मनामध्ये शाळेबद्दल विचार बदल व्हायला सुरुवात झाली होती शाळेजवळून ये जा करताना गावातील लोक पाहत होती,हाच धागा पकडून पाण्याची व्यवस्था करण्याकरीता त्यांना प्रेरित केले व लोकसहभागातून तुटलेली नळजोडणी पुनर्स्थापित झाली





विकत घेवून विद्यार्थ्यांना अध्यापन सुरु केले. शाळेचे बाह्य रंगकाम करवून घेतले.हे सर्व करत असताना कुठलाच लोकसहभाग कुणाला मागितला नाही. सर्व खर्च स्वतः करण्याचे ठरविले होते.



शाळेमधील उपलब्ध डिजिटल साधने

अशातच दीपावली सण आला .सर्वांनी दिवाळी स्नेहानंद हा उपक्रम घेण्याचे नियोजन केले, सोबतच किल्ला निर्मिती विद्यार्थ्याकडून करण्याचे ठरले त्यानुसार कार्यवाही सुरु झाली. हे सर्व पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून येत होता, मोकळेपणाने ते सुद्धा बोलू लागले की सर आजपर्यंत आपल्या शाळेमध्ये असे उपक्रम झालेच नाहीत. पालक सुद्धा अभिमानाने शाळेमध्ये भेट देवू लागले व शाळेमध्ये होत असलेल्या बदलाबाबत समाधान व्यक्त करत मोकळ्या मनाने बोलत होती. आम्हाला सुद्धा मार्ग जवळ दिसून येवू लागला. स्नेहानंद सोहळ्यानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक टी शर्ट दिवाळी भेट म्हणून देण्यात आली, सोबतच विद्यार्थ्यांनी बनविलेल्या दिवाळी कलाकृतीचे प्रदर्शन भरविले ते पाहून पालकवर्ग भारावून गेला. सर्व पालकांना व विद्यार्थ्यांना दिवाळी स्नेहभोजन देण्यात आले, गावात शाळेबद्दल चांगले वातावरण निर्माण होण्यास सुरुवात झाली होती.








स्नेहानंद


स्नेहानंद

यवतमाळ दि. गुरुवार ७ डिसेंबर २०२३

दैनिक **लोकसूत्र**

आजचे तापमान — कमाल २८ से | किमान १४ से — हवामानाचा अंदाज थंडीत वाढ

शैक्षणिक समृद्धीकडे वाटचाल, मुख्याध्यापकांसह शिक्षकांचे सुधारणेसाठी कष्ट

...अन् लोणाडीच्या शाळेचे पालटले चित्र

मोहन पापळकर

नेर : जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य समृद्ध व्हावे, यासाठी एका ध्येयवेड्या शिक्षकाने जीवापाड प्रयत्न केले. त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनीही मोलाची साथ दिली. त्यामुळेच लोणाडीच्या जिल्हा परिषद शाळेचे चित्र पालटले. आज या शाळेची शैक्षणिक समृद्धीकडे वाटचाल सुरू झाली आहे.

आदर्श शिक्षकाचा पुरस्कार मिळविणारे व शैक्षणिक सुधारणेत जीव झोकून काम करणारे लोणाडीच्या शाळेचे मुख्याध्यापक भूषण तंबाखे हे या गावासाठी खरेच भूषण आहेत. तंबाखे हे नवनवीन उपक्रमाचे रचियते म्हणूनही तालुक्यात परिचित आहे. लोणाडीच्या जिल्हा परिषद शाळेत अध्यापनाचे काम करणारे तंबाखे यांनी विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये सुसंवाद घडविला. त्यांच्यात आंतरक्रिया व्हावी म्हणून समूह संघटनाचा भाव निर्माण केला. त्यातूनच शाळेत विद्यार्थी व पालकात एकात्मतेची भावना तयार झाली. दरम्यान, त्यांनी शाळेत स्नेहानंद उत्सव मेळावा घेतला. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी निवृत्त शिक्षक बाबूलाल चव्हाण होते. तर अतिथी म्हणून अर्जुन राठोड, रामदास चव्हाण, बाबूसिंग चव्हाण हे होते. यंदाच्या शैक्षणिक सत्रात भूषण तंबाखे यांनी लोणाडीच्या शाळेवर वेगळूक झाली. अवघ्या चार महिन्यांमध्ये रुप पालटणाऱ्या शाळेला त्यांनी स्वत: निधी खर्च करून डिजीटल शाळेचे रुप मिळवून दिले. दरम्यान, स्नेहानंद उत्सव मेळाव्यात अध्यक्षांनी त्यांच्या या कार्यावर गौरवोद्गार काढले. ते म्हणाले की, स्नेहानंद उत्सव म्हणजे आपणही आता शाळेवर प्रेम करून शाळेप्रति काही देणे लागते ही भावना जपायला हवी. याकरिता त्यांनी या शाळेला मदत करायला पाहिजे. ज्या गावात शाळेचा विकास होतो, त्याच गावाचा विकास होत असल्याचे अध्यक्षांनी स्पष्ट केले. स्नेहानंद उत्सवासाठी केंद्रप्रमुख वंदना नाकतोडे, भावना बारी, दिनेश कडू, अनिल चव्हाण, रुपाली नवरे, तलवारे आदी शिक्षक व पालकवर्गाने प्रयत्न केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक तंबाखे यांनी तर आभार प्रवीण लटवे यांनी मानले.



विद्यार्थ्यांत जीवनमूल्य रुजवा

विद्यार्थ्यांमध्ये आज दैनिक जीवनमूल्य रुजविण्याची गरज आहे. ते गावातील शाळेमध्ये मिळते, तरीही सर्व पालकांनी आपल्या मुलांना संस्कार देण्याची गरज आहे. पाल्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत घालण्याऐवजी जिल्हा परिषदेच्या शाळेतच दाखल केले पाहिजे, असेही कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी सांगितले. यानंतर सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांसह माता व पालकवर्गाने या कार्यक्रमात सहभाग घेऊन स्नेह भोजनाचाही आनंद लुटला. विद्यार्थ्यांना नवीन कपडे देऊन मुख्याध्यापक तंबाखे यांनी शाळा व विद्यार्थ्यांप्रति असलेले आपल्या प्रेमाचे व आपुलकीचे दर्शन घडवून दिले.

तंबाखेच्या उपक्रमाला शिक्षकांची साथ

भूषण तंबाखे यांनी लोणाडीच्या शाळेत अनेक उपक्रम सुरू केले. त्यांना प्रवीण लटवे या उपक्रमशील शिक्षकाची साथ लाभली. दोघांच्या प्रयत्नातून शैक्षणिक विकासाचे कार्य सुरू झाले. एक प्रगत व समृद्ध शाळा निर्माण करण्यासाठी आता लोकसहभागाची गरज असल्याचे मत अर्जुन राठोड यांनी व्यक्त केले. याकरिता त्यांनीही शिक्षकांच्या या कार्याची दखल घेत त्यांचा सत्कार केला. सुधीर चव्हाण यांनी एचीजे अब्दुल कलाम यांची प्रतिमा शाळेला भेट दिली. भविष्यातही शाळेला मदत देऊ असे अभिवचन त्यांनी दिले.

विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन

दरम्यान, शाळेत विद्यार्थ्यांच्या हातून तयार केलेल्या कलाकृतीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावेळी शाळेची व विद्यार्थ्यांची प्रगती पाहून पालकवर्गाही भारावले. पालकांनी आपल्या व्यस्त जीवनातून संपूर्ण दिवस शाळेला दिला. त्यामुळे मुख्याध्यापक भूषण तंबाखे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी शिक्षक प्रवीण लटवे, बाबूसिंग जाधव तसेच ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

शाळा समृद्ध होईल : जाधव

मुख्याध्यापक भूषण तंबाखे यांनी शाळेला नवीन रूप देण्यासाठी एखाद्या किमयागाराप्रमाणे कष्ट घेतले आहे. त्यांच्या प्रत्येक शैक्षणिक उपक्रमामध्ये कोलेपरणा असतो. अवघ्या चार महिन्यात शाळेचा विकास साधणारे दोनही शिक्षक नक्कीच शाळा व विद्यार्थ्यांना समृद्ध करतील असा आम्हाला विश्वास असल्याचे मत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाबूसिंग जाधव यांनी सांगितले.

लोकमत

लोणाडी येथे स्नेहानंद मेळावा, पालक सभा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

यवतमाळ : लोणाडी येथील जिल्हा परिषद शाळेत स्नेहानंद मेळावा अत्यंत उत्साहात पार पडला. मुख्याध्यापक भूषण तंबाखे व शिक्षक प्रवीण लटवे यांच्या संकल्पनेतून हे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी पालक सभाही घेण्यात आली. स्नेहानंद मेळावा म्हणजे शाळेबद्दल प्रेम व आपुलकी निर्माण करण्याकरिता घेतलेला हा उपक्रम आहे, असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबूलाल चव्हाण यांनी व्यक्त केले. स्नेहभोजनाचे आयोजन करुन प्रत्येक विद्यार्थ्याला तंबाखे यांनी नवीन कपडे भेट स्वरूपात दिले. शाळेला उपक्रमशील शिक्षक लाभले, असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. भूषण तंबाखे यांनी यापूर्वी इंद्रठाणा येथील शाळेमध्ये केलेल्या कार्याबद्दल झेप उपक्रमामध्ये त्यांच्या शाळेला तृतीय क्रमांक प्राप्त झाला. यावरून त्यांची कार्यशैली लक्षात येते, असे मत प्रमुख अतिथी अर्जुन राठोड यांनी व्यक्त केले. स्नेहानंद मेळावा कार्यक्रमाला केंद्र प्रमुख वंदना नाकतोडे, तसेच केंद्रातील शिक्षिका बारी, रूपाली नवरे, तलवारे, शिक्षक दिनेश कडू, अनिल चव्हाण यांची उपस्थिती होती. प्रवीण लटवे, बाबूसिंग जाधव यांनी परिश्रम घेतले.



Hello Yavatmal
Page No. 3 Dec 06, 2023
Powered by: erelego.com

लोणाडी या गावातील एक भौतिक सुविधा व कमी पट असलेली शाळा ही नवी डिजिटल रूप धारण करीत असल्याबद्दल येथिल वृत्तपत्राने सुद्धा शिक्षकांच्या कार्यांची दखल घेतली, त्यामुळे गावातील लोकांना सुद्धा नवा हुरूप प्राप्त झाला. ते सुद्धा आता शाळेमध्ये काही नवीन करायचे या मानासिकतेपर्यंत येवून पोचले होते आता वेळ आली होती, जे मोठे कार्य करायचे होते त्याचा प्रस्ताव पालक व ग्रामस्थांसमोर ठेवण्याचा. केलेल्या कार्यामुळे विश्वास दुणावला होता की सर्व पालक सहयोग करतीलच याचा . शाळा व्यवस्थापन समिती सुद्धा सर तुम्ही जे कराल त्याकरिता आम्ही तयार आहोत असे म्हणायला तयार झाले.

भव्य सांस्कृतिक कार्यक्रम व लोकसहभागाची साद

दीपावली संपली व नियमित शाळा सुरु झाली. शाळेचे नियमित उपक्रम सुरूच होते जसे की परिपाठामधून इंग्रजी शब्दाचे दृढीकरण ,मराठी समान अर्थी शब्द सादरीकरण ,सामान्य ज्ञान प्रश्नमंजुषा ,दिनांक तो पाढा,सामुहिक कविता पाठांतर ,साप्ताहिक रंगभरण स्पर्धा ,मासिक उपस्थिती आढावा,महिन्यातील प्रमुख बालसभा,असे अनेक नानाविध, नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेमध्ये राबविणे सुरु होते.

सर्व पालक व शाळा व्यवस्थापन समितीची संयुक्त सभा घेवून त्यामध्ये २६ जानेवारी २०२४ ला भव्य सांस्कृतिक कार्यक्रम घेण्याबद्दल प्रस्ताव ठेवण्यात आला सर्वांनी एकमताने होकार दिला, याला कारण गेल्या वीस वर्षामध्ये असा सांस्कृतिक कार्यक्रम झाला नाही असे त्यांचे मत होते. थोडे जास्तच बळ आम्हाला मिळाले, ठरल्याप्रमाणे मुलांचा प्रत्येक सादरीकरणाचा केवळ पंधरा दिवस सराव करून घेतला त्यामध्ये नृत्य ,नाटिका, बडबडगीते इत्यादी समावेश होता व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला, विविध कलाविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केले त्यामध्येच विद्यार्थ्यांनी इंग्रजीमध्ये भाषणे दिली. विद्यार्थ्यांची आजपर्यंत झालेली गुणवत्तेची प्रगती पाहून पालक भारावून गेले.

तोच मुद्दा साधत मी पालकांना अभिनव डिजिटल शाळा करण्यासंदर्भात लोकसहभागाची साद घातली. उत्साह व शाळेची झालेली प्रगती पाहून सर्वांनी माझ्या प्रस्तावाला होकार दिला व अवघ्या एक महिन्यामध्ये जवळपास दीड लाख लोकसहभाग राशी जमा करण्यात आम्ही यशस्वी झालो. विशेष म्हणजे मोलमजुरी करणाऱ्या पालकांनी व ज्यांचे पाल्य शाळेत नाही अशा लोकांनीही आम्हाला लोकसहभाग दिला.आता लवकरच एक अभिनव डिजिटल शाळा निर्माण होईल असा विश्वास पालकांनीच आम्हाला दिला.



लोणाडीच्या शाळेत सांस्कृतिक महोत्सव

लोकसूत्र प्रतिनिधी

अभिनव डिजिटल शाळेचा संकल्प



नेर : प्रजासत्ताकदिनाचे औचित्य साधून लोणाडी येथील शाळेत एका सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवात गावातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाचा संकल्प करण्यात आला. विशेष म्हणजे अभिनव डिजिटल शाळा उभारण्याचेही ग्रामस्थांनी ठरविले.

२६ जानेवारीला प्रजासत्ताकदिनानिमित्त लोणाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत सांस्कृतिक महोत्सव आयोजित केला होता. केवळ २३ विद्यार्थी पटसंख्या असलेल्या या शाळेने भव्य सांस्कृतिक महोत्सव घेऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक बाबुलाल चव्हाण होते. तर अतिथी म्हणून किशोर रणनवरे, अर्जुन राठोड, बाबासिंग जाधव, अनिल चव्हाण उपस्थित होते. गावच्या शाळेचा विकास साधायचा असेल तर गावकऱ्यांनी एकत्र येणे काळाची गरज आहे. शाळेच्या विकासातूनच विद्यार्थ्यांचे आयुष्य घडू शकते. शाळा हीच गावाचा आरसा असते. आपला पाल्य गावातील शाळेतच शिकला पाहिजे, ही भूमिका शाळा टिकविण्याच्या दृष्टीने गरजेचे असल्याचे मत अनिल चव्हाण यांनी व्यक्त केले. शाळेला प्रगतीकडे घेऊन जाणारे शिक्षक या गावाला लाभल्याचे मत रणनवरे यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. यावेळी लोणाडीची शाळा डिजिटल करण्याचा प्रस्ताव मुख्याध्यापक भूषण तंबाखे यांनी पालकांपुढे ठेवला. त्या प्रस्तावाला सर्व पालक वर्गाने सकारात्मक प्रतिसाद देण्याचे अभिवचन दिले. एका महिन्याच्या आत अभिनव डिजिटल शाळा निर्माण करण्याचा संकल्प ग्रामस्थांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे अनेक पालकांनी त्यासाठी लागणारा निधी मुख्याध्यापकांकडे सुपूर्द केला. संचालन भूषण तंबाखे यांनी केले. तर आभार प्रवीण लठवे यांनी मानले.

अन् चिमुकल्यांची इंग्रजीतून भाषणे

लोणाडी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी या सांस्कृतिक महोत्सवात प्रजासत्ताकदिनानिमित्त इंग्रजीसह हिंदी व मराठी भाषेमधून आपली भाषणे सादर केली. त्यांच्या अप्रतिम भाषणामुळे ग्रामस्थही भारावून गेले. विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटक आदी सांस्कृतिक कार्यक्रमातही आपल्या कलेचे सादरीकरण केले.

लोकप्रिय सांध्य दैनिक
यवतमाळ मार्मिक

शाळा हा गावाचा आरसा असतो : अनिल चव्हाण

यवतमाळ मार्मिक नेरपरसोपंत राजेश धोटे :-

गावातील शाळेचा विकास साधायचा असेल तर गावातीलच लोकांना तों साधावा लागेल असे मत, त्याकरिता सर्वांनी एकत्र येऊन शाळाविकासाकरिता झोकून द्यावे लागेल, शाळा ही गावाचा आरसा असतो आपला पाल्य आपल्याच गावात शिकला पाहिजे असे मत प्रमुख अतिथी अनिल चव्हान सर यांनी व्यक्त केले.



ते लोणाडी येथील जि.प. शाळेत आयोजित सांस्कृतीक महोत्सव कार्यक्रमात बोलत होते. प्रजासत्ताक दिनी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अगदी लहान शाळा असूनही केवळ तेवीस विद्यार्थी पटसंख्या असणारी शाळा लोणाडी येथे मोठ्या उत्साहात दिनांक 26 जानेवारी 2024 ला सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त शिक्षक बाबूलाल चव्हान हे होते, तसेच प्रमुख अतिथी म्हणून किशोर रननवरे, अर्जुन राठोड, बाबुसिंग जाधव, अनिल चव्हान सर हे होते. सांस्कृतिक महोत्सव प्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनांनिमित्य इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेमध्ये भाषणे सादर केली. तदनंतर विद्यार्थ्यांनी विविध कलाप्रकार, नृत्य, नाटिका, सादर केल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भुषण तंबाखे यांनी तर आभार प्रदर्शन प्रवीण लटवे यांनी केले. शाळेकरिता शिक्षक घेत असलेले श्रम हे उल्लेखनीय आहे असे मत पालकांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिक्षक, गावातील युवकवर्ग, यांनी परिश्रम घेतले

शाळेच्या विकासाचा व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा वाढता आलेख पाहून गावातील सर्व पालकांनी एकमत होऊन त्यांचे इंग्रजी माध्यमामध्ये शिकत असलेली पाल्यांचा प्रवेश आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोनाडी येथे घेतला व आज २२ पटसंख्या असणारी शाळा ही अवघ्या १०महिन्यामध्ये ३६ पटसंख्येवर पोहचली. शाळेला सर्वांगीण डिजिटल रूप देण्याच्या उद्देशाने सर्व विद्यार्थ्यांचे दप्तर हे एकसमान असायला हवे असा प्रस्ताव पालकासमोर ठेवला त्याला सुद्धा पालकांनी होकार दिला व लोकसहभागातूनच सर्व विद्यार्थ्यांकरिता एक समान स्कूलबॅग विद्यार्थ्याना वितरीत करण्यात आल्या

सोबतच ग्रामीण भागीतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य शाळेतच उपलब्ध व्हावे त्याकरिता शाळेमध्ये विद्यार्थी शालेय ग्राहक भांडार निर्माण करण्यात आले. ह्या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्याना साहित्य कमी किमतीत शाळेतच उपलब्ध झाले विद्यार्थी त्याचा संपूर्ण व्यवहार पाहतात त्यामुळे त्याना नकळत व्यावहारिक ज्ञान प्राप्त होऊ लागले. नफा तोटा न शिकविता संकल्पना आकलन होण्यास मदत झाली.



अभिनव डिजिटल शाळेचे स्वप्न झाले पूर्ण

पालकाना व ग्रामस्थांना केलेल्या आवाहनानुसार पालकांनी अवघ्या दोनच महिन्यामध्ये जवळपास एक लाख चौतीस हजार रुपयांचा रोख लोकसहभाग आम्हाला प्रदान केला त्यामधून अभिनव डिजिटल शाळा निर्माण करायची होती त्यानुसार सर्व पालकांना आमंत्रित करून माहिती दिली व गोळा झालेल्या लोकसहभागामधून टॅबयुक्त वर्ग निर्माण करण्याचे ठरले त्यानुसार टॅब खरेदी करून प्रत्येक विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन करण्यास बाक तयार करण्यात आले नवीन वीज जोडणी करण्यात आली व आज सर्वांच्या सहकार्याने जिल्ह्यातील पहिली टॅबयुक्त शाळा जिल्हा परिषद डिजिटल प्राथमिक शाळा लोणाडी निर्माण झाली.विद्यार्थी त्याद्वारे आज स्वयंअध्ययन आनंदाने करतात .













पुण्य नगरी

लोनाडी जि. प. शाळेत पहिली टॅबयुक्त क्लासरूम

■ जिल्हा परिषद शिक्षक व नागरिकांचा पुढाकार ■ तालुक्यातील पहिली डिजिटल क्लासरूम

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

नेर : स्थानिक पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणाडी येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना डिजिटल पद्धतीने अध्यापन करता यावे, याहेतीने येथील मुख्याध्यापक भूषण तंबाखे व शिक्षक प्रवीण लटवे यांनी लोकसहभागातून तालुक्यातील पहिली डिजिटल टॅबयुक्त क्लासरूम निर्माण केली. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून टॅब वर्गाचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटक गट शिक्षणाधिकारी मंगेश देशपांडे तर अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबूलाल चव्हाण हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच झुंबरसिंग चव्हाण, विस्तार अधिकारी शहाजी घुले, विजय धुरट, वंदना नाईक, वंदना नाकतोडे, पोलीस पाटील विजय चव्हाण, ग्रा. पं. सदस्य अर्जुन राठोड, बाबूसिंग जाधव आदींची उपस्थिती होती. भूषण तंबाखे ज्या शाळेवर रुजू झाले, त्या शाळेमध्ये त्यांनी नंदनवन फुलाविले, असे मत गटशिक्षणाधिकारी मंगेश देशपांडे यांनी व्यक्त केले. शिक्षक हा गावाच्या विकासाचा कणा असतो, आज खऱ्या अर्थाने लोणाडी शाळेला स्वातंत्र्य मिळाले. या शिक्षकांच्या रूपाने नवी ऊर्जा शाळेला मिळाली, असे मत माजी सरपंच झुंबरसिंग चव्हाण यांनी याप्रसंगी व्यक्त केले. डिजिटल पद्धतीची जान असणारे शिक्षक लोणाडी शाळेला प्राप्त झाले. गावातील सर्वच इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणारे विद्यार्थी यावर्षी लोणाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये दाखल झाले. हे शिक्षक करीत असलेल्या कामावरील पालकाचा विश्वास आहे, असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबूलाल चव्हाण यांनी व्यक्त केले. शाळेला डिजिटल रूप देण्याचे हे कार्य केवळ समस्त पालक व गावातील दानशूर व्यक्तीमुळे शक्य झाले. मी केवळ एक माध्यम आहे. त्यामुळे समस्त ग्रामवासी व बाहेरगावी राहणाऱ्या व्यक्तींची नामोल्लेख करून त्यांचे आभार भूषण तंबाखे यांनी प्रास्ताविकामधून व्यक्त केले. सर्व पालकांचे असेच सहकार्य लाभले तर निश्चितच एक आदर्श अभिनव डिजिटल असणारी शाळा निर्माण होईल, असा मनोदय त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन मुख्याध्यापक भूषण तंबाखे यांनी तर आभार प्रवीण लटवे यांनी मानले.

Yavatmal Edition
Aug 17, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com



टॅबयुक्त सुविधेने विद्यार्थ्यांसह पालकही भारावले, मुख्याध्यापकांसह शिक्षकांचा पुढाकार

लोकसहभागातून लोणाडीत पहिली डिजिटल वर्गखोली

लोकसूत्र प्रतिनिधी

नेर : सध्या माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थीही डिजिटल अध्यापनापासून वंचित राहू नये, यासाठी नेर पंचायत समितीत येणाऱ्या लोणाडीतील जिल्हा परिषद मुख्याध्यापक व शिक्षकांनी संकल्प केला. त्यातूनच त्यांनी लोकसहभागातून आपली शाळा तालुक्यात पहिली डिजिटल टॅबयुक्त करून विद्यार्थी व पालकांना दिलासा दिला. मुख्याध्यापक भूषण तंबाखे व शिक्षक प्रवीण लटवे यांनी हा पुढाकार घेतल्याने गावची शाळा डिजिटल झाली.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून टॅब वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गट शिक्षणाधिकारी मंगेश देशपांडे तर अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबूलाल चव्हाण होते. ज्येष्ठ समाजसेवक झुंबरसिंग चव्हाण, विस्तार अधिकारी शहाजी घुले, विजय धुरट, वंदना नाईक (अधीक्षक शा. पो. आहार), वंदना नाकतोडे, प्रशांत देवकते (सरपंच), विजय चव्हाण पोलीस पाटील, अर्जुन राठोड. बाबूसिंग जाधव हे प्रमुखअतिथी म्हणून उपस्थित होते. भूषण तंबाखे ज्या शाळेवर रुजू झाले, त्या शाळेमध्ये त्यांनी नंदनवन फुलविले असे मत गटशिक्षणाधिकारी मंगेश देशपांडे यांनी व्यक्त केले. शिक्षक हा गावाचा विकासाचा कणा असतो, आज खऱ्या अर्थाने लोणाडी शाळेला स्वातंत्र्य मिळाले या शिक्षकांच्या रूपाने नवी ऊर्जा शाळेला मिळाली असे मत झुंबरसिंग चव्हाण यांनी याप्रसंगी व्यक्त केले. शाळेचा खरा विकास हा शिक्षकच घडवून आणू शकतो, असे सरपंच यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डिजिटल पद्धतीची जान असणारे शिक्षक लोणाडी शाळेला प्राप्त झाले. गावातील सर्वच इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणारे विद्यार्थी यावर्षी लोणाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये दाखल झाले, हा शिक्षक करत असलेल्या कामावरील पालकाचा विश्वास आहे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबूलाल चव्हाण यांनी व्यक्त केले. शाळेला डिजिटल रूप देण्याचे हे कार्य केवळ समस्त पालक व गावातील दानशूर व्यक्तींमुळे शक्य झाले मी केवळ एक माध्यम आहे.

त्यामुळे समस्त ग्रामवासीय व बाहेरगावी राहणाऱ्या व्यक्तींची नामोल्लेख करून त्यांचे आभार भूषण तंबाखे यांनी प्रास्ताविकामधून व्यक्त केले. सर्व पालकांचे असेच सहकार्य लाभले तर निश्चितच एक आदर्श अभिनव डिजिटल असणारी शाळा निर्माण होईल, असा मनोदय त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन भूषण तंबाखे यांनी तर आभारप्रदर्शन प्रवीण लटवे यांनी व्यक्त केले.

शाळेमध्ये केवळ डिजिटल साधने प्राप्त करून भागणार नाही तर त्या साधनाचा विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास होण्याकरिता झाला पाहिजे त्या दृष्टीने शाळेतील शिक्षकांनी प्रयत्न केला अध्ययन निष्पत्तीवर आधारित विविध घटकावर आधारित साहित्य निर्माण करून त्याद्वारे विद्यार्थी प्रत्यक्ष अध्यापन झाल्यानंतर त्या घटकाचा सराव करतात.सोबतच शाळेमध्ये एक रोपटे सुद्धा

मागे दहा महिन्यापूर्वी नव्हते तिथे सुंदर परसबाग निर्माण झाली आहे परसबाग अंतर्गत विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्व पटवून दिल्या जाते, तसेच कचर्यातून खत निर्मिती प्रकल्प राबवून प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाचे आधारे त्याना जीवामृत

निर्माण कसे करावे याचे ज्ञान दिल्या जाते जेणेकरून पर्यावरण संरक्षण कसे राखता येईल याचे सुद्धा ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त होईल.


"उठा जागे व्हा आणि ध्येय
प्राप्त होईपर्यंत थांबू नका"
- स्वामी विवेकानंदजी
"यशस्वी होण्याची इच्छा शक्ती मजबुत असेल
तर अपयश आपल्याला दबवु शकत नाही."
- डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम
आमची सुंदर परसबाग
कढीपत्ता
HAND WASH STATION


परिपाठ
राष्ट्रगीत

शाळेमध्ये कुठल्याही प्रकारची भौतिक सुविधा नसताना सुद्धा दुर्दम्य इच्छाशक्ती,सहकारी शिक्षकाची सोबत व प्रामाणिक प्रयत्न याची सोबत व सोबतच पालकांचा मोलाचा सहभाग व सहकार्य व अधिकारी वर्गांचा सकारात्मक प्रतिसाद व सहकार्य यामुळे शाळेचा विकास साधता आला आज शाळेमध्ये इतर तालुक्यामधील शिक्षक सुद्धा भेट देण्याकरिता येतात .आज शाळेचा पट हा बावीस वरून छत्तीस झाला . शाळेची गुणवत्ता केवळ दहा महिन्यामध्ये सुधारण्यास यश प्राप्त झालेले आहे. हा आमच्यावर दाखविलेला पालकांचा विश्वास आहे. धन्यवाद सर्व पालकांचे , असेच ईश्वरी कार्य माझ्या हातून घडत राहो .





शाळेचे पालटलेले नवीन रूप







वाचन विकास उपक्रम







लोकसहभागातून एकसमान स्कूल बॅगवितरण



विद्यार्थी प्रवोशोत्सव व पाद्यपूजन




शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारे ठिकाण नसते तर ती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची गुरुकुलासारखी जागा असते.एका चांगल्या शाळेची उभारणी केवळ शिक्षक,शासन किंवा संस्था यांच्या प्रयत्नावर अवलंबून नसून,त्या शाळेभोवतीचा समाज,पालक,ग्रामस्थ,स्थानिक प्रशासन ,माजी विद्यार्थी,विविध सामाजिक संस्था या सर्व घटकाच्या सक्रीय सहभागावरही अवलंबून असते.

शाळेच्या उभारणीत व विकासात या सर्व घटकांचा जो सहभाग असतो त्यालाच लोकसहभाग असे म्हटले जाते.शासनाकडून शिक्षणविषयक अनेक योजना राबविल्या जातात परंतु त्या अधिक प्रभावी होण्यासाठी स्थानिक पातळीवरील सहभाग आवश्यक असतो शाळा केवळ शिक्षकांची किंवा शासकीय तंत्राची जबाबदारी नसून,ती सर्व समाजाची आहे.जेव्हा हा समाज स्वतःपुढे येतो,तेव्हा शाळा केवळ संस्था राहत नाही तर ती एक प्रेरणेचे केंद्र बनते आणि यामुळेच दरवर्षी शाळेचा पट वाढत आहे. यावर्षी शाळेतील पटसंख्येत वाढ होऊन ३६वरून ४४ एवढी झाली आहे. गावातील एकही विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल नाही,तर इतर गावातील पाच विद्यार्थी इथे दाखल आहे.

शेवटी एवढेच म्हणता येईल ,शाळा वाढते समाजाच्या साथीनं, शिक्षण फुलते माणसाच्या ममतेतून,जेथे समाज देतो हातभार,तिथेच घडतो शैक्षणिक उदात्त विचार. लोकसहभागातून घडली डिजिटल क्रांती, गावाने उभारली शिक्षणाची नवी वाट,हीच खरी शाळा समृद्धीची ओळख.

----------**----------



विविध उपक्रमांतून गुणवत्ता विकास व मूल्यसंवर्धन

शाळेचे नांव - पीएम.श्री.जि.प. उच्च प्राथमिक शाळा, रासा

शाळेचा पत्ता - रासा.तालुका वणी जिल्हा यवतमाळ

मुख्याध्यापक नांव - श्री.मधुकर नामदेवराव बोबडे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 8975445235

मुख्याध्यापक ईमेल आयडी - madhukarbobade10@gmail.com

II आमच्या कष्टाला फळे आली II

३० मे २०१८ महाराष्ट्रात मानवी हस्तक्षेपाशिवाय एका क्लिक वर शिक्षकांच्या पसंतीक्रमानुसार बदल्या झाल्या. यात आम्ही आठ जण उच्च प्राथ. शाळा, रासा ता. वणी, जि. यवतमाळ येथे रुजु झालो. आमच्या सोबत श्री. दिलीपराव भोयर सर हे मुख्याध्यापक म्हणुन रुजु झाले. जिल्ह्यात उपक्रमशिल शाळा म्हणुन नावाजलेल्या 'आपटी' ता. मारेगाव जि. यवतमाळ येथुन सर आले होते.परंतु सरांचा सहवास आम्हाला फारच थोडा लाभला. डिसेंबर २०१८ ला सर सेवानिवृत्त झाले. त्यानंतर शाळेची धुरा माझ्याकडे आली.

१ जानेवारी २०१९ ला प्रत्यक्ष कार्याला सुरवात झाली.श्री भोयर सर सेवानिवृत्त झाल्यानंतर आम्ही आठ जण चार शिक्षक व चार शिक्षिका कार्यरत राहिलो. तसे पाहता उच्च प्राथ. शाळा रासा ही केंद्रशाळा असून वणी तालुक्यातील मोठी शाळा. मी या शाळेत वर्ग १ ते ७ पर्यंत शिक्षण घेतले. माझे मुळगावही हेच. आपण ज्या शाळेत शिकलो तिथे शिक्षक — मुख्याध्यापक म्हणुन काम करणे ही अत्यंत समाधानाची बाब होती. मी माझ्या सहका-यांशी चर्चा करून विविध उपक्रमाविषयी मते जाणुन घेतली. सर्वजण समवयस्क असल्यामुळे व मुळातच शिक्षकी पेशा रक्तात भिनला असल्यामुळे सर्वांनी एकदिलाने कार्य करण्याची ग्वाही दिली. नव्हे काम सुरु झाले.


गुणवत्ता वाढ

शाळा सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांशी संपर्कातुन लक्षात आले की , अनेक विद्यार्थी गुणवत्तेत मागे आहे. अक्षर 'सुवाच्च' नाही. विद्यार्थी एकाग्र नाही, विद्यार्थ्यांना शिस्त नाही, यासाठी उपाय म्हणुन.—

१) वर्ग ३ ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दररोज दहा ओळी शुद्धलेखन तीनही भाषेमध्ये लिहुन आणणे. हा उपक्रम सुरु केला.

२) लिहुन आणलेले अचुक व नियमित आहे किंवा नाही. हे पाहण्यासाठी त्या-त्या वर्गातील अभ्यासात गती असलेल्या मुला-मुलींना जबाबदारी दिली. उपाय फारच परिणामकारक ठरला.

३) कथा- गोष्टीची पुस्तके, वृत्तपत्र उपलब्ध करून देवून वाचायला लावले वाचनाची गोडी लागली. लेखन व वाचन दोन्ही सुधारले.



४) परिपाठात गाणी, प्रार्थना, शांतीपाठ, मौन यांचा जाणीवपूर्वक उपयोग करून एकाग्रता वाढविण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थी स्थिर झाले.

५) परिणामी वर्गातील व पटांगणातील (गोंधळ) आवाज कमी झाला. विद्यार्थ्यांना वाचनाची, गायनाची, आवड निर्माण झाली.

६) केंद्रशाळा असल्यामुळे विविध कार्यक्रम, सभा प्रशिक्षणे, शाळेत होतात.परंतु आजही आम्ही त्यावेळी विद्यार्थ्यांना सुट्टी देत नाही. आमचे सर्व शिक्षक / शिक्षिका सभेत असले तरी विद्यार्थी कोणताही गोंधळ न करता अभ्यास करतात. या बाबीचे अधिकारी, पाहुणे कौतुक करतात.


७) विद्यार्थ्यांना 'वक्तृत्व' कलेचे धडे दिले जाते. अगदी वेळेवर जरी एखादा कार्यक्रम असला वा वेळेवर बोलायला लावले तरी वर्ग १ ते ८ वीतला विद्यार्थी संबंधित विषयावर बोलतो. तीनही भाषेतुन कार्यक्रमाचे संचालन करतात.

८) शिष्यवृत्ती परीक्षा, महादीप परीक्षा यात जिल्हास्तरापर्यंत विद्यार्थी पोहोचले आहे.

९) क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रातही प्रगती अव्वल आहे. सतत तीनही वर्षे जिल्हास्तरावर कबड्डीची चमु पोहचली आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन २६ जानेवारीला दर वर्षी रात्री संपुर्ण गावक-यांच्या उपस्थितीत घेतला जातो. दर वर्षी शोड्रील क्रिडामहोत्सवात सादर करण्यात येते व उत्कृष्ट ठरली जाते.

१०) याच प्रयत्नातुन पुढे सरकणा-या वर्ग चमु १० वी/१२ वीच्या परीक्षेत कु. गौरी रुपेश सोनटक्के १० वीत प्रथम तर कु. वैष्णवी सत्यनारायण जेऊरकर १२ वीत तालुक्यातुन प्रथम कु. वैष्णवी संतोष जेऊरकर १२ वीत आल्या आहेत. ही झाली गुणवत्ता सोबतच शाळेच्या भौतिक सुधारणेकडे लक्ष घातले. तसा शाळेचा परिसर अतिशय निसर्गरम्य. उंचावर इमारत, शाळेच्या मागे टेकडी परंतु व्यवस्थापनाअभावी शाळा इमारत भकास दिसत होती. यापूर्वी उच्च प्राथ. शाळा साखरा,दरा, मारेगांव (को), सुर्ला या शाळांना शाळापण देवुन आलेल्या मला ही शाळा पाहुन इथे काहीतरी करायची संधी आहे. हे प्रकर्षाने जाणवले. काहीतरी म्हणजे सुधारणा करायची म्हटले तर पैसा लागतो. सर्व सोंगे आणता येतात, पण पैशाचे सोंग आणता येत नाही. हे खरे आहे.

शाळेच्या खात्यात दहा हजाराच्या सादिलशिवाय शिल्लक रक्कम नव्हती. सर्व शिक्षा अभियान/ समग्रशिक्षा अभियान निधी शिल्लक नव्हता. नवीन खर्च करायचा म्हटले तर लोकसहभागाशिवाय पर्याय नव्हता. शाळेतील वर्गखोल्यांची बरेच दिवसापासुन रंगरंगोटी केली नव्हती. खोल्या आतून काळपट झाल्या होत्या दारे खिडक्या तुटलेल्या डेस्क-बेंचेस तुटलेले, विद्युत होती परंतु उंदीरांनी वायर कापल्यामुळे दिवे बंद होते. पंखे लावले होते पण त्यातील निम्मे (पाच) जळाले आणि बंद होते. शाळेत चार पाहुणे आले तर वर्गशिक्षकांच्या खुर्च्या बोलावून त्यांना द्याव्या लागे. विद्यार्थ्यांना बसायच्या वर्ग खोलीमध्ये भंगार साहित्य भरून ठेवलेले. पटांगण प्रशस्त असुन त्याकडे लक्ष नसल्याने कचरा पडलेला.पटांगणात 'कडुनिंब' – २ व 'वड' १ मेहेंदी – ४ एवढी वगळता संपुर्ण पटांगण उदासवाणे होते. पिण्याच्या पाण्याची साठवण्याची व्यवस्था नाही. मुख्य प्रवेशद्वार तुटलेले त्याची कडी आम्हालाच लागणार नाही, तर मुलांना कुठे लागणार? अशा अभावातून बाहेर येण्याचे आव्हान माझ्यासमोर होते. माझे गांव असल्यामुळे गावच्या तत्कालीन सरपंच सौ. मिराताई पोतराजे यांची भेट घेवुन वरील बाब व माझा मनोदय त्यांना सांगितला. ग्रामपंचायत मधुन काही मदत देता येईल का? याबाबत विचारणा केली. तेव्हा त्यांनी आपल्याकडे निधी नसल्याचे



सांगितले. त्यावर उपाय म्हणुन सन्माननिय सरपंच व सदस्यगणांच्या कानावर घालुन शाळेच्या वर्गखोलीत भरून असलेले निरपयोगी भंगाराचा लिलाव ग्रामसभेत करून प्राप्त रक्कम शाळेला देण्याची विनंती केली. सन्माननिय पदाधिका-यांनी नियमानुसार लिलावप्रक्रिया राबवुन निधी उपलब्ध करून दिला. त्या रक्कमेतुन विद्युतीकरण, टेबल-खुर्च्या दुरुस्ती, शाळेच्या वर्गखोल्यांची रंगरंगोटी केली. पंखे दुरुस्ती केली. शाळा चमकली. व्यवस्थित दिसु लागली. आता परिसर हिरवागार व्हावा यासाठी व्हरांड्या समोर सिमेंटच्या कॅरी तयार करून त्याला अँगल सह जाळी लावली. त्यात तळ्याची माती टाकुन झाडे लावली. प्रत्येक शिक्षकांनी/शिक्षिकांनी आपल्याला मिळेल तिथुन रोपे/फांद्या आणुन लागवड केली. एकही झाड विकत आणले नाही. शाळेच्या परिसरात 'जागा तिथे झाड' या तत्वावर 'वृक्षलागवड करून जगविणे' या उपक्रमातुन मुलांचे वाढदिवस शाळेत साजरे करून त्यादिवशी एक झाड शाळेत लावण्याची प्रथा सुरु केली. मागील सहा वर्षापासुन हा उपक्रम सुरु असून. शाळेची जमीन खडकाळ असुनही योग्य निगा व पाणी नियोजन यातुन शालेय परिसर हिरवागार झाला आहे. ख-या अर्थाने रासा शाळा 'हरीतशाळा' म्हणुन नावारूपास आली आहे.

<u>परसबाग</u>

सोबतच उपलब्ध असलेल्या खडकाळ जमिनीवर बाहेरून आणलेली माती टाकुन परसबाग तयार केली. मागील सहा वर्षापासुन परसबागेतील पालक, मेथी, वांगी, सांबार, मिर्ची, अळू, अंबाडी या भाज्यांचा मध्यान्ह भोजनात उपयोग केला जात आहे. या परसबागेला 'उत्कृष्ट परसबागेचा' दोनदा पुरस्कार मिळाला आहे. आज यावर्षी ही परसबाग बहरत असुन यात धान शेती, वांगी, केळी (घडासह), निंबोणी, मिर्ची, पालक, मेथी, मुळा, भेंडी, टमाटर, चवडी शेंगा, दोडके, काकडी, आंबाडी, बारमाही तुर, ढेमसं, कोहळे, बोर, शेवगा, लसुन अशा विविध भाज्यानी युक्त आहे. मुख्यमंत्री सुंदर शाळा, तपासणी साठी आलेले पथक प्रमुख सन्माननिय पागोरे साहेब, शिक्षणाधिकारी जि.प. यवतमाळ, श्री सन्माननिय मडावी साहेब उपशिक्षणाधिकारी यांनी भरभरून कौतुक केले आहे.

<u>लोकसहभाग</u>

लोकसहभागातुन (ग्रामपंचायत) रंगरंगोटी व इतर दुरुस्ती केल्यानंतर शाळेतील सी.आर.सी. बांधकामात अर्धवट असलेले ऍंपिथिएटर होते ते कामात नव्हते त्यातून विचार डोक्यात आला त्याला सांस्कृतिक कार्यक्रमाचा स्टेज बनविला तर.... बस ठरवले. परंतु निधी नव्हता. गावात ट्रॅक्टर वाला मित्र होता. सन्माननिय बंडूजी काकडे, त्यांना सांगितले. तुमच्या मजुरांचा व डिझेलचा खर्च देतो. ट्रॅक्टरचे भाडे घेऊ नका. त्यांनी सहा ट्रीप मुरूम व मलबा टाकुन दिला. गावातील श्रीमान जीवने भाऊ कडून जुडाई व प्लास्टर पदर मोड करून केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचा स्टेज तयार झाला. पुढे एकदिवशी सर्व शिक्षक बंधु-भगिनी बाहेर उभे असतांना आमच्या मनात विचार आला. या स्टेजवर शेड तयार केले तर.... बस ठरले. परंतु पैसे नाही. माझा अनुभव होता. लोक मला पैसे द्यायला नाही म्हणत नाही. माझ्या शिक्षक वृंदांनी तात्काळ प्रत्येकी १,५००/- एक हजार पाचशे रुपये माझ्याकडे जमा केले विद्यार्थ्यांना विषय समजावून दिला. घरी आई-बाबांना सांगा म्हणुन सांगितले प्रत्येकी १००/- शंभर रुपये वर्गणी आणा अशा सुचना केल्या. काय आश्चर्य पहिली ते आठवीच्या ८०% मुलांनी वर्गणी दुस-या दिवशी गोळा केली. आमचा उत्साह वाढला आमच्या शाळा व्यवस्थापन समितीचे सन्माननिय अध्यक्ष श्री. सुनील भाऊ सातपुते यांना सोबत घेऊन

गावातील प्रतिष्ठितांकडे गेलो. प्रत्येकांनी त्यांच्या यथाशक्ती या निर्णयास मदत केली उणे-पुरे ७५०००/- रुपये जमा झाले. नागपुर वरून सर्व साहित्य आणुन वेल्डिंगसाठी श्री. लोखंडे यांच्या मदतीने काम सुरु केले. वेल्डिंग मजुरी सह एकुण खर्च १,१२,०००/-(एक लाख बारा हजार) रुपये आला. उर्वरीत ३७,०००/- (सदतीस हजार) रुपये स्वतःचे योगदान टाकुन सुसज्ज असा रंगमंच तयार झाला. ज्याला आम्ही 'कलांगण' हे नाव दिले. तो उभा राहिला. तो रंगमंच आमच्या शाळेची शान आहे, आत्मा आहे.


अशाच लोकसहभागातुन तीस फायबर खुर्च्यांची खरेदी केली. यावर्षी ग्रामपंचायतने एक विजेरीवर चालणारा बॉक्स (१५,०००/-) रुपये पंधरा हजार किंमतीचा दिला. कोणताही निधी उपलब्ध नसतांना स्व-खर्चातून दोन वर्ग खोल्यांच्या मध्ये एक टीन शेड तयार करून वस्तू भांडार तयार करण्यात आले.

वॉटर फिल्टर मधुन निघणा-या पाण्याचा वापर हात धुणेसाठी व ते वापरलेले पाणी झाडांना देणे अशी पाणी पुनर्वापर योजना तयार केली.

कोरोना काळातील कार्य

१७ फेब्रुवारी २०२० पासुन देशात संचार बंदी लागू झाली. कोरोनाने रौद्र रूप धारण केले. सर्व रस्ते निर्मनुष्य झाले. याकाळात दोन वर्ग खोल्या दुरुस्तीचे काम सुरु झाले होते. भिंतीचे प्लास्टर व छत काढलेले होते. दोन महिन्यावर पावसाळा होता छताचे व प्लास्टर चे काम झाले नाही, तर दोन्हीही जुन्या इमारती जमीनदोस्त होण्याची दाट शक्यता होती. ज्या शाळेसाठी वरील प्रमाणे कष्ट घेतले. त्या शाळेच्या दोन इमारती नष्ट होऊ देण्यास मन तयार नव्हते. गावातील मजूर कामाला येत नव्हते. तालुक्याला (वणीला) शोध घेतला श्री. दिपक घडसे व श्री. गणेश घडसे नावाचे दोन बहाद्दर साथीला आले. रोज जाणे येणे करावे तर पोलीस येऊ देत नव्हते. एकदा पोलीस त्यांना पोलीस स्टेशन मध्ये घेऊन गेले. मला फोन केला मी गेलो, त्यांनी विचारले गुरुजी जगायचं नाही का? मी म्हणालो जगायचं आहे म्हणुन तर शाळा बांधतोय. वरील स्थिती सांगितली. शाळा पडली तर पोरं कुठं बसणार? पावसाळा पुढे आहे. धन्य तुमची ! म्हणत त्यांनी हात जोडले. मी म्हणालो साहेब या पोरांना पुन्हा अडवू नका काही होणार नाही. निसर्ग आमच्या साथीला आहे. आम्ही शाळा बांधतोय. तो सावरेल. ठरविल्या प्रमाणे मे महिन्यात प्लास्टरचे / छताचे काम पूर्ण झाले. त्याचकाळात रोज शाळेत उपस्थित राहिल्याने झाडांना पाणी देणे. श्रीमती शारदाताई टेकाम यांच्या मदतीने शक्य झाले. भर उन्हाळ्यात रोपे हिरवीगार झाली. शाळा वाचली, झाडे वाचली, पण या कोरोनाने आमच्या शाळेची अतिशय उत्कृष्ट, सुशील, हुशार, होतकरू विद्यार्थिनी कु. कांचन छगन जेऊरकर हिला हिरावुन नेले. तिच्या आत्म्यास शांती लाभो !

दरम्यान कोरोनाचा जोर ओसरला जनजीवन पूर्वपदावर आलं. आमच्यातील विद्यार्थी प्रेम उफाळुन आलं. मधल्या काळात विद्यार्थ्यांचा व्हाट्सअँप ग्रुप करून अभ्यास देणे, संपर्क करणे हा प्रयोग करून पाहिला परंतु नेटवर्क अभावी व मोबाईल सर्वांकडे नसल्यामुळे तो परिणामकारक झाला नाही. दरम्यान शाळा समिती व पालकांना विश्वासात घेऊन शाळेत विद्यार्थी एक-दोन तास बोलवता येईल अशी चर्चा ऐकली. त्याचाच आधार घेऊन पटांगण मोठे आहे. याचा फायदा घेऊन सर्व शिक्षकांच्या मदतीने पूर्ण वेळ शाळा भरविणे सुरु केले. कोरोना काळात पूर्ण वेळ चालणारी आमच्या जिल्ह्यातील एकमेव शाळा होती. यात माझ्या शिक्षक-शिक्षिका बंधु-भगिनींनी मोलाची साथ दिली. मा. उपशिक्षणाधिकारी श्रीमती गाढवे मॅडम यांनी भेट देऊन आमचे कौतुक केले.



विद्यार्थ्यांना अभ्यासाची सवय लागावी त्यांचे वाचनाकडे मन लागावे म्हणुन महादिपच्या धर्तीवरील प्रश्न पत्रिका विद्यार्थ्यांना पुरवून सोडवून घेतल्या. याचा फार चांगला फायदा झाला. कोरोना काळातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे उल्लेखनीय कार्य म्हणुन डायट-यवतमाळ मार्फत प्रशस्तीपत्र देवून गौरव करण्यात आला.

विविध उपक्रमातून गुणवत्ता विकास व मुल्यसंवर्धन

अ) ग्रामगीता परीक्षा :-

आमच्या सौ. अनुराधा गुलाबराव आवारी (स.शि.) या ग्रामगिताचार्या आहेत. त्यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा परिचय व्हावा. या उद्देशाने ग्रामगीता परीक्षेचे दरवर्षी आयोजन करून प्रमाणपत्राचे वाटप केले जाते.

संपुर्ण वर्गखोल्यांमध्ये व शालेय प्रांगणात CCTV ची व्यवस्था करण्यात आली.

सर्व वर्ग - वर्गखोल्यांमध्ये स्मार्ट TV लावण्यात आले .

सद्यस्थितीत E-Learning साठी ICT Lab व स्वतंत्र भाषा Lab तयार करण्यात आली.

ब) निरोप समारंभ :-

वर्ग आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी (२०१९ पासुन) निरोप समारंभ आयोजित केला जातो. त्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला शालेय दप्तर (बॅग), शब्द कोष इत्यादी उपयोगी वस्तुंची भेट दिली जाते.

क) गणवेश :-


शालेय गणवेशात एकसुत्रता यावी विद्यार्थ्यामध्ये समानता असावी यासाठी शासनाकडून मुली सर्व व SC, ST, दारिद्य रेषेखालील मुले यांनाच मोफत गणवेश मिळत असे. उर्वरीत OBC मुले वंचित राहत असत . या कोवळ्या मुलांवर जातिभेदाचा व लिंगभेदाचा परिणाम होऊ नये म्हणुन स्वखर्चातून उर्वरीत १०० ते १२० मुलांना मोफत गणवेश दिले आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात मोफत गणवेश देणारी एकमेव शाळा असावी.

ड) सहल व वनराई बंधारे :-

जि. प. यवतमाळ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे संकल्पनेतून जलयुक्त शिवार योजने अंतर्गत पाणी जमिनीत मुरावे म्हणुन 'परिसर भेट' (सहल) काढुन गावाच्या दक्षिणेला जिवंत नाल्यावर बंधारा बांधून पाणी अडविले जनावरांना वर्षभर पाणी पिण्याची व्यवस्था झाली.

ई) समाज शिक्षणासाठी प्रबोधन :-

'गाव शाळेसाठी, शाळा गावासाठी' या संकल्पनेतून समाजप्रबोधन व्हावे. समाजात निकोप व सदविचाराचे रोपण व्हावे. या उद्देशाने नामवंत विचारवंतांच्या व्याख्यानाचा, किर्तनाचा कार्यक्रम दरवर्षी शाळेच्या रंगमंचावर आयोजित केला जातो.



फ) आय .एस.ओ.मानांकन :-

शाळेतील भौतिक सुविधा, गुणवत्ता या मानांकन संस्थेने ठरविलेले १२६ निकष पूर्ण करून अत्यंत सन्माननिय गणला गेलेला 'आय .एस.ओ. मानांकन' २०२० साली शाळेला मिळाला आहे.

विद्यार्थी बँक :-

विद्यार्थी बँक व वस्तु भांडार या उपक्रमातून व्यवहार ज्ञान व अर्थ साक्षरतेचे धडे दिले जाते या बँकेचे व्यवहार, लेखाजोखा विद्यार्थी सांभाळतात.

खरी कमाई :-

या उपक्रमातून राखी तयार करणे, जुन्या कपड्यांपासुन 'पायपुसणी' तयार करणे, धूप तयार करणे इत्यादी वस्तूंच्या विक्रीतून व निर्मितीतून नवनिर्मितीचा आनंद मिळतो व कष्टातून पैसे मिळवावे. हा धडा मिळतो.


पटसंख्येचा चढता आलेख

सन २०१८ मध्ये शाळेची पट संख्या २१८ होती. वर्ग आठवीत तर ०६ विद्यार्थी होते. तेही दाखले मागायला येत होते. सर्व विद्यार्थी गावाजवळ असलेल्या आदर्श हायस्कुल घोन्सा किंवा जनता हायस्कुल, मारेगाव येथे जात असत . आमचे सन २०१८-१९ मधील शैक्षणिक कार्य व शाळेत झालेला बदल. विविध उपक्रम व स्पर्धेत शाळेने घेतलेली भरारी पाहुन व विद्यार्थ्यांना शिक्षकांनी लावलेला लळा या सर्वांचा एकजिनसी परिणाम म्हणुन २०१९ पासुन एकही विद्यार्थी इतर शाळेत जात नाही. फक्त वर्ग ८ वी उत्तीर्ण विद्यार्थी जड अंतकरणाने जातात. गावात इंग्रजी माध्यमाची १ ते ५ ची शाळा आहे. एखादा अपवाद वगळता त्या शाळेत गावातील मूले जात नाहीत . त्यामुळे शाळेची पट संख्या २०१८ =२१८, २०१९=२४५, २०२०=२६०, २०२१=२६३, २०२२=२६५, २०२३=२७०, अशी चढत गेली. दाखल पात्र विद्यार्थीसंख्या घटल्यामुळे २०२४=२२०, २०२५=२२३. वरील सर्व शैक्षणिक कार्य मी गजानन चंपतराव जेऊरकर मुख्याध्यापक म्हणून शाळा विकासासाठी केले .

पी.एम.श्री. निधीची मदत

सन २०२३-२४ या सत्रात श्री. मधुकर नामदेवराव बोबडे सर उच्च श्रेणी मुख्याध्यापक पदावर रुजु झाले. सरांचा मनमिळाऊ स्वभाव, सुंदर हस्ताक्षर याचा शाळेला फायदा झाला. वर्ग ६,७,८ च्या भाषा विषयाच्या अध्यापनाला न्याय देवून शाळेचे व्यवस्थापन सांभाळणे तारेवरची कसरत होती. ती कसरत नेटाने सांभाळत विद्यार्थी गुणवत्तेत मागे येणार नाही, शाळा व्यवस्थापनात आपण कमी पडणार नाही. याची सतत दक्षता घेत प्रवास सुरु होता.

श्री. बोबडे सर रुजु झाल्याने वरील कार्यात त्यांची मोलाची मदत झाली. काम अधिक जोमाने सुरु झाले. त्यात पी.एम.श्री. योजनेचा निधी सन २०२४ ला मिळाल्यामुळे त्यांच्या २६ निकषा प्रमाणे योग्य काम करून घेतले. शाळा सुंदर झाली त्यातच 'मुख्यमंत्री सुंदर शाळा' उपक्रमात भाग घेऊन २०२३-२४ ला दुसरा क्रमांक व सन २०२४-२५ ला तालुक्यातुन 'पहिला क्रमांक' शाळेला मिळाला. जिल्ह्यासाठी पात्र ठरल्यामुळे जिल्हास्तरीय अधिका-यांनी भेट देऊन पाहणी केली. शाळेतील विविध उपक्रम परसबाग, धानशेती, डोंगर शेती, विद्यार्थी बँक, वस्तु भांडार, समाज सहभाग, विद्यार्थी गुणवत्ता, शिस्त यांचे भरभरून कौतुक केले.



गुणवत्ता :-

सन २०२४-२५ मध्ये N.M.MS या परिक्षेत्र वर्ग ८ वी ची विद्यार्थिनी कु. खुशी गणेश पंधरे ही तालुक्यातुन प्रथम क्रमांकाने आली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

पी.एम.श्री. योजनेचा फायदा :-

पी.एम.श्री. योजनेमुळे शाळेला आर्थिक बळ मिळाले. त्यातून शासनाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे भौतिक सुविधा करून घेतल्या व त्याचा उपयोग विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी करण्यात आला.

प्राप्त निधीचा आवश्यक व कल्पकतेने वापर करून शाळा सुसज्ज करण्यात आली आहे. विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी प्रत्येक पै न पै खर्च करण्याचा दृष्टीकोन ठेवला आहे. त्यामुळेच परिसरातील गावांमधून विद्यार्थी आमच्या शाळेत प्रवेश घेत आहे. या वर्षी २० विद्यार्थी बाहेरगांव वरून (घोन्सा) वर्ग ५ वीत दाखल झाले आहे.

"२०१८ पुर्वी आम्ही फक्त तक्रारी मिटवायला येत होतो" आज आम्ही शाळेतील कार्यक्रम, उपक्रम व विद्यार्थ्यांचे कौतुक करायला येतो. शाळेत आल्यानंतर घरी जावेसेच वाटत नाही. खुप-खुप समाधान वाटते. "एखाद्या मंदिरात-बागेत असल्यासारखे वाटते". असे गावकरी व पाहुणे, अधिकारी बोलतात. तेव्हा किती-किती आनंद होतो. हे सांगताच येत नाही. ही यशोगाथा माझे विद्यार्थी व माझे सहकारी शिक्षक बंधु-भगिनींना अर्पण.....

फोटोची लिंक :-

https://drive.google.com/drive/folders/1tVCmz5ikv-mwZsLu57y_z9uKqkzosDEw?usp=sharing

व्हिडीओ लिंक :-

शालेय परसबाग, धान शेती (भात शेती) पीएमश्री जि प उच्च प्राथ. शाळा रासा ता वणी जि यवतमाळ
https://youtu.be/b6vHgpN5v9k?si=fVlX3TUBaVzea3T-

शालेय परसबाग, (भाग २) पीएमश्री जि प उच्च प्राथ. शाळा रासा ता वणी जि यवतमाळ
https://youtu.be/kGKR7Y-vG_Y?si=1CSq55H85Kh75na3

आकर्षक शालेय रंगरंगोटी पीएमश्री जि प उच्च प्राथ. शाळा रासा ता वणी जि यवतमाळ
https://youtu.be/Q0Azqhg2JII?si=moPZxthmCN323xv-

----------**----------

ई वर्ग जमीन सुधारणेतून शाळा विकासात मुख्याध्यापकाचे प्रयत्न

शाळेचे पूर्ण नाव जि.प.प्रा.शा. इसापूर (ध)

शाळेचा पत्ता - केंद्र.शेंबाळपिंपरी, ता. पुसद, जि.यवतमाळ

मुख्याध्यापक ईमेल आयडी - zpisapur007@gmail.com

मुख्याध्यापक नाव - श्री. गौतम सदाशिव आळणे

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 9673803624

मुख्याध्यापक ईमेल आयडी - alanegautamsadashiv@gmail.com

भौतिक सुविधा -

१) ई वर्ग जमीन सुधारणा केली -

जि.प.प्रा.शा. इसापूर (ध) केंद्र शेंबाळ पिंपरी ता. पुसद जि. यवतमाळ येथील शाळेत सन २०१७ मध्ये आंतरजिल्हा बदली करून आल्यानंतर सन २०१८ मध्ये मुख्याध्यापक पदाचा प्रभार माझ्याकडे आल्यानंतर प्रथम ई वर्ग जमीन ११ एकर आहे. त्या शेतामध्ये ६ एकर जमिनीचा भाग पहाडी आहे. त्यामुळे तेथे पावसाचे पाणी थांबत नाही. म्हणून गटविकास अधिकारी यांच्या कडून १०,०००/- दहा हजार मंजूर करून घेतले व जे.सी.बी. द्वारे नाल्या काढून घेतल्या त्यामुळे सन २०१८-१९ मध्ये शेत हर्रास ७२०००/- बहात्तर हजार रुपयाला गेली.

२) डिजीटल शाळा -

सन २०१८ मध्ये ई वर्ग जमिनीतून १,५०,००० /- एक लक्ष पन्नास हजार रुपये मा. शिक्षणाधिकारी साहेब यवतमाळ यांच्या मार्फत मंजूर केले व शाळेत एक कॉम्पुटर , दोन प्रोजेक्टर, प्रिंटर/स्कॅन्नर/झेरोक्स मशीन,tab व एक वर्ग खोली रंगरंगोटी तसेच पुट्टी करून घेतली.

केंद्रातील दुसऱ्या शाळेला मंजूर झालेले संगणक lab त्यांनी सुरक्षा अभावी घेतले नसल्यामुळे आम्ही ती lab मा. गटशिक्षणाधिकारी साहेब यांच्या मार्फत नियमानुसार आमच्या शाळेला हस्तांतर केले. त्यामध्ये १० संगणक, एक टंकलेखन यंत्र , WIFI , स्मार्ट प्रोजेक्टर शाळेला मिळवून दिले.

३) लोकसहभागातून वर्गणी जमा करून फर्निचर तयार केले -

संगणक कक्ष शाळेला मिळाले. आता ठेवण्यासाठी फर्निचर ची आवश्यकता होती. तर गावामध्ये लोकसहभागातून एकुण २५,०००/- अक्षरी – पंचवीस हजार जमा केले व त्यामध्ये PLYWOOD चे फर्निचर तयार केले.

४) HANDWASH STATION निर्माण केले -

समग्र शिक्षा अभियान निधी मधून शाळेला व विद्यार्थ्यांसाठी हात धुण्यासाठी एक HANDWASH STATION निर्माण केले. त्या मध्ये एकुण पिण्याच्या पाण्यासाठी ५ नळ बसविण्यात आले व हात धुण्यासाठी ८ नळ बसविण्यात आले.

५) WATER FILTER -

शासनामार्फत एक WATER FILTER बसविण्यात आले व त्याचा वापर आज पावेतो शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पिण्यासाठी होत आहे. व त्या फिल्टरची वेळोवेळी दुरुस्ती केली जाते.

६) शौचालय -

ग्रामपंचायत मार्फत १५ व्या वित्त आयोगातून वेळोवेळी पाठपुरावा करून १००००० /- एक लक्ष रुपयाचे शौचालय निर्माण करून घेतले. व त्याचा वापर आजपर्यंत विद्यार्थी तसेच शिक्षक सुद्धा घेत आहे.

७) पेवर ब्लॉक -

ग्रामपंचायत मार्फत १५ व्या वित्त आयोगातून वेळोवेळी पाठपुरावा करून ११ ,००००० /- अकरा लक्ष रुपयाचे पेवर ब्लॉक बसवून घेतले. व त्याचा वापर विद्यार्थी तसेच शिक्षक सुद्धा घेत आहे.

८) खेळण्याचे साहित्य -

सन २०२३ मध्ये ई वर्ग जमिनीतून १,००,००० /- एक लक्ष रुपये मा. शिक्षणाधिकारी साहेब यवतमाळ यांच्या मार्फत मंजूर केले व शाळेत खेळण्याचे साहित्य विकत घेतले. त्याचा वापर आजपर्यंत विद्यार्थी तसेच शिक्षक सुद्धा घेत आहे.

९) शाळेला रंगरंगोटी -

लोकसहभागातून शाळेला २०,०००/- वीस हजार रुपये मा. अध्यक्ष साहेब शाळा व्यवस्थापन समिती यांनी मिळविले व त्यामध्ये शाळेला सुंदर अशी रंगरंगोटी करून घेतली.




१०) किचन शेड दुरुस्ती व समोरील भागावर शेड -

समग्र शिक्षा अभियान निधी मधून शाळेतील किचन शेड ची दुरुस्ती, रंगरंगोटी व समोरील भागावर शेड तयार केले यामुळे विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार घेताना ऊन,वारा,पाऊस या पासून सुरक्षा होत आहे.

११) सोलर खरेदी –

सन २०२४ मध्ये ई वर्ग जमिनीतून १,६५ ,००० /- एक लक्ष रुपये मा. शिक्षणाधिकारी साहेब यवतमाळ यांच्या मार्फत मंजूर केले व शाळेत

३ किलो WATT चे WARREE कंपनीचे सोलर विकत घेतले व त्याचा वापर अध्ययन व अध्यापनासाठी होत आहे. आज शाळेत २४ तास वीज निर्माण होत असून वापर सुध्दा चांगला होत आहे. आजपर्यंत विद्यार्थी तसेच शिक्षक सुद्धा याचा लाभ घेत आहे.

१२) शाळेत सर्व वर्ग खोलीत पंखे व लाईटची सुविधा -

आज शाळेत एकुण ८ वर्ग खोल्या असून सर्व वर्ग खोलीत पंखे व लाईटची सुविधा आहे. त्यामुळे विद्यार्थी घरी जाण्याचे नाव घेत नाही.

१३) ग्रंथालय -

सहकारी शिक्षक कु. वंदना पंजाबराव चव्हाण यांनी गावामध्ये जावून लोकसहभागातून ८०,०००/- हजार रुपये जमा करून घेतले व त्यामध्ये लोकांच्या सहकार्यानेच शाळेत एका वर्ग खोलीत स्वतंत्र ग्रंथालय तयार केले. त्यामध्ये ५०००/- हजारापेक्षा जास्त पुस्तके उपलब्ध आहे व त्याचा वापर विद्यार्थी दररोज घेत आहेत.




माता पालक
GPS Map Camera
Isapur, Maharashtra, India
Pcfw+pph, Isapur, Maharashtra 445209, India
Lat 19.724451° Long 77.446784°
26/11/24 12:33 PM GMT +05:30
Google


कार्यालय






HAPPY TEACHER'S DAY
DHOLAKPUR PUBLIC




महाराष्ट्र राज्य
वर्ग-२रा
पुसद , जि.प., यवतमाळ
शहीद
प्रकाश यशवंतराव शेरात
मातृभूमिची स्वतंत्रता
आणि तिचा गौरव यांच्या
रक्षणाकरीता बलिदान
दिलेल्या विरांना
शतशः नमन !


सुस्वागतम


सुस्वागतम


केंद्रस्तरीय खेळ व क्रीडा स्पर्धा


6:14
Chavhan Madam Isapur
Yesterday, 9:06 pm
अग्निपंख वाचनालय
जि.प.प्राथमिक मराठी शाळा,
Reply











झेंड





जिल्हा परिषद मराठी प्राथमिक डिजीटल शाळा,ईसापुर धरण
HAPPY
BIRTHDAY
Active Guruji
सी.पी.यू.
CPU
आपण दिलेली माहिती व सुचनावर प्रक्रिया करणारा व माहिती साठवणारा भाग आहे.यातून विविध प्रकारची माहिती गोळा करता येते..






भारताचे संविधान
कार्यालय
Happy Teachers Day


जि.प. प्रा. शा. ईसापूर (ध)
तक्रार पेटी












कार्यालय







----------**----------

समता आणि समानतेसाठी विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीत शालेय नेतृत्वाची भूमिका

स्वयंदीप शाळा

शाळेचे नाव - जि प उच्च प्राथमिक उर्दू शाळा मालखेड बुजुर्ग

शाळेचा पत्ता - मालखेड बुजुर्ग, पंचायत समिती नेर जिल्हा यवतमाळ

शाळेचा ईमेल आयडी - zpupschoolmalkhed@gmail.com

मुख्याध्यापक नाव - मो तौसीफ अहमद मो खलील अहमद

मुख्याध्यापक मोबाईल क्रमांक - 8208696360

मुख्याध्यापक ईमेल आयडी - tauseefahmad654@gmail.com

प्रस्तावना : भारतीय संविधानानुसार सर्व नागरिकांना समानतेचा हक्क आहे. मात्र प्रत्यक्षात ही समानता शिक्षणाच्या माध्यमातूनच रुजवता येते. लहान वयातच जर विद्यार्थ्यांना समानतेची, समावेशाची, लिंग समभावाची जाणीव करून दिली, तर उद्याचा सुजाण नागरिक घडेल. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीवा, स्त्री-पुरुष समानता, विविधतेचा आदर आणि सर्वसमावेशकता यांची रुजवणूक करणे गरजेचे आहे. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दू शाळा, मालखेड बु. ही अशाच प्रयत्नांतून लिंग समभाव आणि समावेशकतेचा आदर्श नमुना ठरलेली शाळा आहे. मुख्याध्यापक श्री. मो. तौसीफ अहमद यांच्या नेतृत्व शिक्षकांचे सहकार्य आणि पालकांच्या सहभागामुळे शाळेने गेल्या काही वर्षांत सामाजिक समतेचे, लिंग समतेचे आणि सर्व विद्यार्थ्यांना समान संधी देणारे अनेक उपक्रम यशस्वीरित्या राबवले आहेत.

१. **शाळेची सामाजिक पार्श्वभूमी:** शाळा ग्रामीण व अल्पसंख्याकबहुल भागात स्थित आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि शारिरिक दृष्ट्याही विविधता आहे. अनेक विद्यार्थ्यांचे पालक हे शिक्षणाबाबत जागरूक नव्हते. विशेषतः मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होत होते. समाजात अजूनही मुलगी ही "जबाबदारी" मानली जात होती. त्यामुळे शाळेने प्रथम "जागृती" या टप्प्यापासून सुरुवात केली.
२. **लिंग समानतेसाठी राबवलेले उपक्रम**.


३.१ मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न:

पालक बैठकीत मुलींच्या शिक्षणावरील महत्त्व पटवून दिले गेले.

मुलींच्या नियमित उपस्थितीसाठी विशेष लक्ष दिले गेले. घरभेटी घेऊन पालकांचे समुपदेशन केले गेले.

किशोरवयीन मुलींसाठी शाळेत स्वच्छ व स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात आली.

मुलींसाठी शालेय गणवेश, शैक्षणिक साहित्य इ. गोष्टींसाठी निधी उभारण्यात आला.



३.२ **नेतृत्व विकास:**

प्रत्येक शालेय उपक्रमात मुलींचा नेतृत्वात सहभाग सुनिश्चित करण्यात आला. उदाहरणार्थ – महिला दिनाचे सूत्रसंचालन, विज्ञान प्रदर्शनातील नेतृत्व, गणराज्य दिनाच्या भाषणात मुलींचा सहभाग.

"शाळा प्रतिनिधी मंडळ" मध्ये समान संख्येने मुलगे व मुलींचा समावेश करण्यात आला.

३.३ **महिला सहभाग:**

शाळा व्यवस्थापन समितीत महिलांचा सक्रीय सहभाग.

स्थानिक महिला कार्यकर्त्यांशी संवाद – प्रेरणादायी व्याख्याने, मुलींशी संवाद.

३.४ स्त्रीभान जागवणारी सर्जनशीलता:

वाचनालयात स्त्रीभान वाढवणारी पुस्तके (सावित्रीबाई फुले, कल्पना चावला, इंदिरा गांधी यांचे चरित्र)

भाषण, निबंध, कविता या माध्यमातून लिंग समतेची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये वाढवली गेली.

समावेशात्मकतेसाठी राबवलेले प्रयत्न:

४.१ **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी:**

शाळेत रॅम्पची सोय, मोठा फॉन्ट असलेली पुस्तके, आणि स्नेही विद्यार्थी सहकार्य गट तयार.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी विशेष तयारी करून त्यांना सैद्धांतिक व नैतिक आधार दिला.

४.२ **सामाजिक व धार्मिक समावेश:**

विविध धर्मांचे सण शाळेत एकत्र साजरे होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकोपा वाढतो.

जाती-धर्म न पाहता सर्व विद्यार्थी समान संधी व सन्मान देण्याचे धोरण.

४.३ **आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी:**

विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने वह्या, गणवेश, शैक्षणिक साहित्य पुरवले जाते.


'एक पालक - एक मदतीचा हात' या मोहिमेच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना साहाय्य मिळते.

५. **विशेष नवोपक्रम :**

५.१ **'समानता दिंडी'**: प्रत्येक वर्षी २६ जानेवारीच्या रोजी समानतेचा संदेश देणारी दिंडी काढली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेले फलक, घोषवाक्य, रचना यांचा समावेश असतो.

५.२ **'मुलगी मान** - देशाची शान' सप्ताह: या सप्ताहात मुलींनी सादर केलेल्या कार्यक्रमांमध्ये लोकनाट्य, गाणी, पोस्टर प्रदर्शन, निबंध इ. असते. पालकही सहभागी होतात.

५.३ **लिंग समानतेवरील बालसभा** : दर महिन्याला बालसभा घेऊन लिंगभेद, मुला-मुलीतील समानता, सहकार्य इत्यादी विषयांवर चर्चा होते.



५.४ **पालक संवाद मेळावे** : प्रत्येक दोन महिन्यांनी पालकांसोबत संवाद साधून त्यांना समावेशात्मक व लिंग समतेचे महत्त्व समजावले जाते.

६. **विद्यार्थिनींची यशोगाथा :** हिनानाज बानो, नाजिम या विद्यार्थिनीनी महादिप परीक्षेत शाळेचे नाव उज्ज्वल केले. तिच्या या यशामागे शाळेतील समान संधी, प्रोत्साहन व मार्गदर्शन होते.

७. **शाळेला मिळालेले पुरस्कार:**

२०२३-२४ मध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रमांक - मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धा

२०२४-२५ मध्ये जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक

२०२४-२५ परसबाग स्पर्धेत तालुक्यात द्वितीय क्रमांक

८. **निष्कर्ष**: लिंग समता आणि समावेशकतेचा पाया शालेय वयात घातला तरच भावी समाज सक्षम, सुसंस्कृत व समतेचा होईल. मालखेड बु. येथील उर्दू शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून ती एक 'समाज परिवर्तन केंद्र' झाली आहे. मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्या समवेत कृतीमुळे ही शाळा आज इतरांसाठी आदर्श बनली आहे. ही यशोगाथा इतर शाळांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरावी.

फोटो व व्हिडिओ लिंक खालील दिलेले आहे.

१) https://drive.google.com/drive/folders/1Fg7VNgsVn59Jy3IidZdBQu4fN49RLTEK
२) https://drive.google.com/drive/folders/14QjY7JRGg9dEV87wYfeaC4Rr_yCWQdmo
३) https://youtu.be/TDyVL28qUnk?feature=shared
४) https://youtu.be/iYT1pKtywwc?feature=shared
५) https://youtu.be/ctYdQct4KF8?si=5GyGx15tmDqtzodc
६) https://youtu.be/AH1nnU-3U1E?si=PMYtEwq2DGZIjOSW
७) https://youtu.be/KRb-Y1mVqUU?si=3ekbA4fAywjaVW3C
८) https://drive.google.com/drive/folders/1JMMpOcvXmrWZALauVKsifVbSoLbFJIWz

----------**----------

विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविण्यासाठी मूल्याधिष्ठित शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका

शाळेचे नाव - जि.प.प्राथ.शाळा,भाटंबा गांव

शाळेचा पत्ता - भाटंबा गांव , केंद्र काटखेडा,तालुका पुसद जिल्हा यवतमाळ

शाळेचा ईमेल आयडी - zpschoolbhatambagaon@gmail.com

मुख्याध्यापक नाव - महेश मोतीलाल चव्हाण

प्रस्तावना -

शिक्षण हे केवळ परीक्षेत गुण मिळवण्यासाठी नसून विद्यार्थ्यांचा एक सर्वांगीण, जीवनक्षम, नैतिक व मूल्याधारित व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी असते. महाराष्ट्रातील अनेक जिल्हा परिषद शाळा या दिशेने कार्यरत आहेत. त्यातीलच एक आदर्श शाळा म्हणजे भाटंबा गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा.

या शाळेतील महेश सर व त्यांची शिक्षक मंडळी फक्त शिक्षण देत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता (Foundational Skills) — म्हणजेच भाषा, गणित, विचारशक्ती, संवाद कौशल्य, सहकार्य, आत्मविश्वास यांचा विकास करण्यासाठी मूल्याधिष्ठित उपक्रम राबवत आहेत.**शाळेची पार्श्वभूमी**


भाटंबा हे एक बंजारा बहुल, ग्रामीण भागात वसलेले गाव आहे. येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचे प्रमाण अधिक आहे. या पार्श्वभूमीवर शाळेला अनेक अडथळे होते —

- विद्यार्थी नियमित येत नव्हते
- मुलांमध्ये गणित, भाषा समजून घेण्याचे कौशल्य कमी
- संवादकौशल्य, अभिव्यक्ती, स्वावलंबन कमी
- मुलींच्या शिक्षणात अडथळे
- पालक सहभाग नगण्य

परंतु शिक्षकांनी ही आव्हाने स्विकारून "विद्यार्थी केंद्रित, मूल्याधारित, कृतीशील शिक्षणदृष्टिकोन" अंगीकारला.

३. मुलभूत क्षमतांचे महत्त्व

Foundational Literacy and Numeracy (FLN) म्हणजे प्राथमिक शाळेतील मुलांनी भाषा व गणितात मूलभूत कौशल्ये आत्मसात करणे. परंतु त्याबरोबरच पुढील मूलभूत कौशल्यांचा विकास केला गेला:



- वाचन, लेखन, ऐकणे, बोलणे (भाषा कौशल्ये)
- गणितातील मूळ संकल्पना – संख्या, आकृतिबंध, मोजमाप, गणना
- समस्या सोडवण्याचे कौशल्य
- तर्कशक्ती, निरीक्षण, कल्पनाशक्ती
- आत्मविश्वास, जबाबदारी, सहकार्य
- नैतिकता, कृतज्ञता, सहिष्णुता, सचोटी – म्हणजेच मूल्यशिक्षण

शिक्षकांचे मुख्य प्रयत्न

अ. वाचन संस्कृती निर्मिती

- प्रत्येक वर्गात वाचन कोपरा
- रोज सकाळी १५ मिनिटांचे स्वतंत्र वाचन
- शिक्षक स्वतः वाचन करत मुलांना प्रेरणा देतात
- विविध कथा वाचन सत्रे, प्रश्नोत्तर, नाट्य रूपांतर

ब. गणितासाठी हाताने करता येणारे प्रयोग

- मोजणीसाठी बियाणे, झेंडूचे फुल, काठी, गाठीच्या दोऱ्या
- तोंडी गणिते – खेळ स्वरूपात
- 'माझं गणित मी शिकेन' यासारखे क्रिया-आधारित शिक्षण
- गणिताची भिती दूर करणारे प्रकल्प

क. भाषा विकासासाठी उपक्रम


- शब्दकोश तयार करणे (माझा शब्दसंच)
- आपली गोष्ट लिहा – 'मी माझा लेखक' प्रकल्प
- कविता बोलूया, बनवूया, गायचंही शिकूया
- प्रत्येक आठवड्यात संवाद दिवस – मुलांनी विचार मांडणे, चर्चेत भाग घेणे

ड. मूल्याधारित गोष्टी व नाट्य

- प्रत्येक आठवड्यात एक 'मूल्य कथा'
- 'इमानी रामू', 'सत्यान्वेषी सीता', 'दुसऱ्याच्या मदतीला धावणारा अर्जुन' अशा गोष्टी
- यांवर आधारित रोल प्ले, नाटिकांचे सादरीकरण

इ. सहकार्य, टीमवर्क शिकवणारे गटकार्य

- सर्व विषयांमध्ये गटशिक्षणाची तत्त्वे
- एकमेकांची मदत, एकत्र नियोजन, समजूत



फ. आत्मनिर्भरता व जीवनकौशल्य

- स्वतःचे पुस्तक, वह्या सांभाळणे
- घरात छोट्या जबाबदाऱ्या घ्या यावर बोलणे
- "एक दिवस मी शिक्षक" उपक्रम — जबाबदारीचा अनुभव

शिक्षकांचे स्वयंप्रेरित योगदान

- शाळा सुटल्यावर शिक्षक विद्यार्थ्यांना आधार देण्यासाठी उशिरापर्यंत थांबतात
- स्वखर्चाने शैक्षणिक साहित्य तयार करणे / खरेदी
- घरोघरी जाऊन पालकांशी संवाद
- शिक्षकांनी घेतलेल्या वैयक्तिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन

उदाहरण : महेश सरांनी एका भाषा विषयात प्रगती कमी असलेल्या विद्यार्थ्यासाठी दररोज सकाळी ३० मिनिटे भाषा वाचनासाठी वेळ दिला. आज तो विद्यार्थी बालसभेचा सूत्रसंचालक होतो !

समुदाय व पालक सहभाग

- पालकांनी 'कथा सांगायचा दिवस' यामध्ये सहभाग
- शाळेतील मूल्य भिंत — 'आजचा सुविचार' तयार करण्यात गावकरी सहभागी
- आजी-आजोबांचे अनुभव वर्गात सांगणं
- पालकांनी शाळेतील उपक्रमासाठी वेळ देणे — "गावची शाळा, आपली जबाबदारी"

मूल्यशिक्षणावर आधारित उपक्रम

'माझं मूल्य, माझी कृती' योजना


- प्रत्येक आठवड्याला एक मूल्य — उदाहरणार्थ- ईमानदारी
- शिक्षक त्यावर गोष्ट, चर्चा, कृती पाठ देतात
- विद्यार्थी घरात ते मूल्य पाळतात, अनुभव लिहून आणतात

'मुलांचा निर्णय समूह'

- शिक्षक विद्यार्थ्यांना विचारतात — आपण वर्गात काय बदल करू शकतो?
- मूलभूत हक्कांवर चर्चा — सन्मान, मत, समज

'आभार कार्ड' उपक्रम

- विद्यार्थी दर आठवड्याला कोणालातरी (शिक्षक, मित्र, आईवडील) धन्यवाद पत्र लिहितात
- यातून कृतज्ञता आणि सकारात्मक दृष्टिकोन तयार होतो



विशिष्ट प्रकल्प

‘मुलांचा संवाद कट्टा’

- ठराविक दिवशी विद्यार्थ्यांना कोणतेही विचार मांडता येतात
- यामुळे बोलण्याची भीती नाहीशी होते
- मुलांनी स्वतःहून ‘शाळेतील बाग सुंदर करूया’ प्रस्ताव मांडला!

‘अभ्यास माझा - माझ्या पद्धतीने’

- शिक्षक विद्यार्थ्यांना स्वतःचे अभ्यास सत्र निवडण्याची संधी देतात
- कोणी चित्र काढत शिकतो, कोणी गोष्टी ऐकून, कोणी ग्रुपमध्ये चर्चा करून

परिणाम — परिवर्तनाची दिशा

घटक	पूर्वी	सध्या
वाचनक्षमता	४०% विद्यार्थी धड वाचू शकत नव्हते	९०% विद्यार्थी कथा वाचू शकतात
गणिती समज	घबराट व टाळाटाळ	खेळातून आत्मविश्वास
संवादकौशल्य	शांत बसणं, भीती	मंचावर सादरीकरण
स्वावलंबन	सर्व गोष्टीत मदतीची गरज	स्वतः पुस्तक, साहित्य हाताळणे
मूल्यवर्तन	भांडणे, खोडसाळपणा	सहकार्य, आदर, मदत

मूल्यमापन


शाळेने मूल्याधारित शिक्षणाचे मूल्यांकन गुण न देता, कृती आणि दृष्टिकोनावर आधारित केले:

- "मुलाने मदतीला हात दिला का?"
- "सत्य बोलल्यास काय परिणाम झाला?"
- "स्वतः निर्णय घेतला का?"

शिक्षक पालकांना दरमहा फीडबॅक देतात — यात गुण नाही, तर प्रगती आहे.

भविष्यातील योजना

- Value-based Learning Corner — विशेष साहित्य
- Digital Stories on Values — बालकथांचे ॲनिमेटेड व्हिडिओ
- Life Skills Workbook — विद्यार्थ्यांसाठी सवयींची वही
- Mentee-Mentor Pairing — मोठे विद्यार्थी छोट्यांचे मार्गदर्शक
- जिल्हा पातळीवर अनुभव सादरीकरण



निष्कर्ष

भाटंबा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी फक्त शैक्षणिक ज्ञान नव्हे, तर जीवनाला दिशा देणाऱ्या मूल्यांचा आणि क्षमतेचा विकास केला आहे. हे शिक्षक म्हणजे खऱ्या अर्थाने "बालकांचे जीवन शिल्पकार" आहेत. त्यांचे कार्य फक्त शाळेपुरते मर्यादित नसून ते समाज परिवर्तनाची गंगा बनले आहे.

शाळेचे शैक्षणिक INSTAGRAM CHANNEL



Link -

https://www.instagram.com/z.p.techno_teacher?igsh=enFkaGNmeDMwN3Fv&utm_source=qr

शाळेचे शैक्षणिक Face book page



Link -

https://www.facebook.com/share/19PD2Fa7rw/?mibextid=wwXIfr

दिव्य मराठी
दिव्य सिटी
यवतमाळ, सोमवार, २१ जुलै २०२५, आषाढ, कृ. ११, शके. १९४७

मंडे पॉझिटिव्ह ग्रामसफाई, खेळ, कौशल्याबाबत मार्गदर्शन, भविष्यवेधी शिक्षण; शहरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेने आदर्श घ्यावा

जि.प. शाळेतील उपक्रमातून शिक्षणात आनंदाचा नवा मार्ग

प्रदिप नरवाडे | पुसद

भाटंबा गावातील जिल्हा परिषद शाळेत दि. १९ जुलैला 'आनंददायी शनिवार' उपक्रम अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. शिक्षण हा केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना विविध अनुभवातून, कृतीतून आणि आनंदातून शिकवावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. या दिवशी संपूर्ण शाळा एका सृजनात्मक प्रयोगशाळेत रूपांतरित झाली होती. तालुक्यातील भाटंबा गावामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थी उत्साहाने अभ्यास करीत आहेत. त्याशिवाय योग, ग्रामसफाई, खेळ, कौशल्याबाबत मार्गदर्शन, भविष्यवेधी शिक्षण घेत आहेत. शहरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेने त्या शाळेचा आदर्श घ्यावा असे शिकवण्याचे काम त्या ठिकाणी सुद्धा सुरू आहे.

शाळेचे मुख्याध्यापक महेश चव्हाण यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रमाची आखणी होत आहे. वाटंबा गावची लोकसंख्या जवळपास २४७ आहे, परंतु जिल्हा परिषदेचे शाळेमध्ये १०४ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. आनंददायी शनिवार हा उपक्रम दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारचा साजरा करण्यात येतो.

विविध गटांमध्ये चित्रकला, हस्तकला, पोस्टर मेकिंग, विज्ञान प्रयोग, रांगोळी, पारंपरिक खेळ अशा अनेक स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक विद्यार्थ्याला आपली कला, कौशल्ये व विचार व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ मिळाले. खास आकर्षण ठरले ते



जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना उपक्रमातून शिक्षण देताना शिक्षक.

महेश चव्हाण यांनी घेतलेले 'कचऱ्यापासून खेळणी' कार्यशाळा, या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी जुन्या बाटल्या, झाकणं, कागद, काठी, कापूस, प्लास्टिक अशा वस्तूंमधून सुंदर आणि उपयुक्त खेळणी तयार केली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कला-सादरीकरणाचे कौतुक केले. काही पालकांनी मुलांबरोबर पारंपरिक खेळही खेळले. शिक्षक-विद्यार्थी-पालक यांच्यातील बंध या उपक्रमामुळे अधिक दृढ झाला.

भविष्यात उपक्रम विस्तृत करण्याचा मानस

- मुले जेव्हा आनंदात शिकतात, तेव्हा ते शिक्षण आयुष्यभर लक्षात राहते. 'आनंददायी शनिवार' हे फक्त एका दिवसाचे औचित्य नाही, तर मुलांच्या मनात शिक्षणाबद्दल प्रेम निर्माण करण्याचा एक प्रयत्न आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवाद कौशल्य, सहकार्य, सर्जनशीलता आणि नेतृत्वगुण विकसित झाले. शिक्षणात आनंद, उपक्रमशीलता आणि कृतीप्रधानता यांचे सुंदर मिलन विद्यार्थ्यांना मिळाले.

'आनंददायी शनिवार' या उपक्रमामुळे भाटंबा गावातील जिल्हा परिषद शाळेने एक सकारात्मक शिक्षण चळवळ सुरू केली आहे. हार शाळांनीही अशा उपक्रमांचा अवलंब करावा, अशी भावना पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी व्यक्त केली. नकावीन वाटेने पुढे जाण्याचा निर्धार शाळेने केला आहे. हा उपक्रम भविष्यात आणखी विस्तृत करण्याचा मानस शाळा प्रशासनाने व्यक्त केला आहे.
- महेश चव्हाण, मुख्याध्यापक

रयतेचा कैवारी
बाल रक्षक
संपादक : शाहू संभाजी भारती (दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०२४, एकूण अंक ९९९) गुरुवार दि.१३/१०/२०२२ पान ०८

निपुण भारत अभियानात काटखेडा केंद्रातील तेरा शाळां पैकी आठ शाळा उत्कृष्ट !

भाटंबा गावची शाळा अव्वल



पुसद/यवतमाळ,दि.१२(दै.रयतेचा कैवारी ता.प्र.):शिक्षण विभाग पुसदच्या निपुण भारत अभियान अंतर्गत भाषा व गणित मुलभुत साक्षरता व संख्याज्ञान पथकाने (ता.१०) केलेल्या तपासणीत काटखेडा केंद्रातील जि.प.शाळा भाटंबा गांव अव्वल आली असून तेरापैकी आठ शाळा ह्या उत्कृष्ट असल्याचे आढळले.

दुपार दरम्यान पुसदचे गटशिक्षणाधिकारी संजय कांबळे व गटसमन्वय अमित बोजेवार व संपूर्ण केंद्रातील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या समक्ष पथकाने तपासणी अहवाल सादर केला व अध्ययन स्तर तपासणी पथकाने काटखेडा केंद्रातील १३ जि.प.शाळांची तपासणी करून ८ शाळा उत्कृष्ट ठरवल्या व इतर शाळांना सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. उत्कृष्ट शाळांमधून अव्वल आलेल्या भाटंबा गाव येथील जि.प.प्रा. शाळेतील परिपाठाचे पथकाने मुल्यमापन केले असता मुल्यमापना दरम्यान १ते ४ विद्यार्थ्यांनी महादिप उपक्रमाच्या यशाचा परिचय देत जवळपास सामान्यज्ञान आधारित ५५ प्रश्नांची उत्तरे दिली.

सदर शाळेतील विद्यार्थ्यांना २१० प्रश्नांची उत्तरे तोंडपाठ आहेत तसेच ६० मराठी म्हणी सांगतात , पथकाने प्रत्येक वर्गातील प्रत्येक विद्यार्थीचे मराठी विषयाचे वाचन व लेखन मुल्यमापन दरम्यान पाठ्यपुस्तक वाचन घेतले व एकही विद्यार्थी प्रारंभिक स्तरात आढळला नाही , दिव्दिशिक्षकी असलेल्या या शाळेतील वर्ग पहिलीचे विद्यार्थी जोडाक्षरे वाचतात हे विशेष.गणितात विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कोटी पर्यंतच्या संख्या वाचन करतात हे पाहून पथकाने समाधान व्यक्त केले.

पथकाचे प्रमुख केंद्रप्रमुख प्रकाश टेकाळे यांनी वर्ग २ च्या विद्यार्थ्यांना एक शब्द देऊन हा शब्द कोणत्या पाठातील आहे हे विचारल्यावर विद्यार्थ्यांनी लगेच पाठाचे नाव सांगितले ,मराठी व गणित विषया व्यतिरीक्त विद्यार्थ्यांना ३०० इंग्रजी शब्द पाठ आहेत, पथकाने भौतिक सुविधेची पाहणी केली असता शैक्षणिक साहित्य वापर ,प्रोजेक्टर, संगणक, टिव्ही ,पंखे, केंट वाटर प्युरीफायर, शौचालय अद्ययावत स्थितत आढळले, रेकॉर्ड पाहणीत शासनाच्या आदेशानुसार सर्वच रेकॉर्ड अद्ययावत होते.शालेय पोषण आहाराची तपासणी केली असता दर्जेदार चविष्ट पोषण आहार, सोबत विद्यार्थ्यांना आवडीनुसार लोणच्याची सोय सदर शाळेने केली होती.

याप्रसंगी केंद्रशाळा काटखेडा येथील विद्यार्थ्यांनी स्वलिखित केलेल्या दोन पुस्तकांचे प्रकाशन गटशिक्षणाधिकारी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सदर तपासणीत केंद्रातील एकूण तेरा शाळांपैकी आठ शाळांची प्रगती उत्कृष्ट आढळली. पथकातील विस्तार अधिकारी उत्तम चव्हाण,सर्व केंद्रप्रमुख, पुसद पंचायत समितीचे सर्व साधनव्यक्ती , विषय तज्ञ, विद्यार्थी, मुख्याध्यापक व शिक्षकांचे यांचे यावेळी आभार मानण्यात आले.



शनिवार एक्सप्रेस उपक्रम



नवागतांचे स्वागत





निसर्ग वाचनालय

रयतेचा कैवारी

संपादक - शाहू संभाजी भारती (डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष तिसरे - अंक २८४) शनिवार दि.२०/०८/२०२२ पान ०८

चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे तर्फे भाटंबा शाळेला शैक्षणिक साहित्याची भेट

यवतमाळ : दि १९ (रयतेचा कैवारी ऑनलाईन वृत्तसेवा)स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमीत्ताने शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे च्या वतीने जिल्हा परिषद शाळा भाटंबा शाळेला Screen Projecter,चित्रकला वह्या, Notebooks ,Colour box,स्केल ,Sharpner , पेन्सिल, खोडरबर शालेय बहुउपयोगी शैक्षणिक साहित्य सोहम परशुराम नरवाडे यांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व



पदाधिकारी यांच्या वतीने शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेचे आभार मानन्यात आले. तसेच सोहमजी नरवाडे साहेबांनी त्यांच्या मार्गदर्शनात सदर शाळेतील उपक्रम,शालेय गुणवत्ता व या शैक्षणिक साहित्याची गरज लक्षात घेता शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने देण्यात आले असल्याचे सांगितले व गावातील गरजू,निराधार व गुणी विद्यार्थ्यांना शिवप्रभा सदैव आपल्या शैक्षणिक प्रवासात खारीचा वाटा उचलेल अशी ग्वाही दिली. शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे च्या वतीने झाडे लावा -बक्षिस मिळवा या उपक्रमात भाटंबा गांव च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आज ७५विद्यार्थ्यांनी (स्वातंत्र्याचे ७५ वर्ष) निमित्त कडुनिंबाचे झाड सोहम नरवाडे ,विद्यार्थी व पालकांच्या हस्ते करण्यात आले व सेल्फि काढला. सोहमजी नरवाडे यांनी विद्यार्थी व पालकांना सदर उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले. स्वातंत्र्यदिनी मिळालेले शैक्षणिक साहित्य, गोड खाऊ यामुळे विद्यार्थ्यांच्या निरागस चेह-यावरील उत्सुकता बघण्यासारखी होती.

----------**----------